कारमाझफ बंधू



अनुवाद

भाऊ धर्माधिकारी

दस्तयेवस्की

दस्तयेवस्की हा केवळ एकच उंच पर्वतशिखर नाही तर तो अनेक उंचच उंच शिखरे असणाऱ्या पर्वताची रांग आहे.

— आंद्रे जीद

कुठल्याही वैज्ञानिक विचारवंतापेक्षा दस्तयेवस्की मला जास्त काही देतो.

— आईन्स्टाईन

खंड दुसरा

किंमत साठ रुपये

द स्त ये व स्की

कारमाझफ बंधू

संपूर्ण अनुवाद – खंड २



फ्योदर मिखाईलोविच दस्तयेवस्की
(इ. स. १८२१ ते १८८१)

कारमाझफ बंधू

फ्योदर दस्तयेवस्की

अनुवाद : भाऊ धर्माधिकारी

खंड दुसरा

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पुणे ३०

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनासाठी
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे
अनुदान लाभलेले आहे.

प्रकाशक
अ. अं. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
विजयानगर
पुणे : ४११ ०३०

मुद्रक
अजित शशिकान्त देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे : ४११ ०३०

मुखपृष्ठ
अपर्णा सोवनी

प्रकाशन क्रमांक ९८४

प्रथमावृत्ती : १९८६

किंमत साठ रुपये

अनुवादकाचे निवेदन

परभाषातील उत्तम म्हणून गाजलेल्या ग्रंथांचे अनुवाद मराठी वाचकांना उपलब्ध करून द्यावयाचे हे एक कार्य महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने अंगिकारले आहे. त्यानुसार सर्वोत्कृष्ट रशियन कादंबरीकार फ्योदर दस्तयेवस्की याच्या काही कादंबऱ्या मंडळाने निवडल्या होत्या, त्यांतील ' ब्रदर्स कारमाझफ ' ही एक प्रदीर्घ कादंबरी. ही कादंबरी मी वाचली अर्थात् इंग्रजी भाषांतराच्या द्वारा. पण कॉन्स्टन्स गार्नेट या बाईंनी हे भाषांतर इतके उत्तम केले आहे की ते जणू मूळ लिखाणच वाटावे. या कादंबरीचा माझ्यावर फार प्रभाव पडला आणि आपण याचे मराठीत भाषांतर करण्याचा प्रयत्न करावा असे मनाने घेतले. मी त्याबद्दल मंडळाला विचारले तेव्हा त्यांनी त्यांच्या ठरलेल्या नियमाप्रमाणे नमुन्यादाखल पंचवीस एक पानांचे भाषांतर करून मागितले. मी एका सबंध प्रकरणाचे भाषांतर करून पाठविले, ते त्यांनी सुप्रसिद्ध मराठी भाषातज्ज्ञ व समीक्षक प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्याकडे अभिप्रायासाठी पाठविले आणि त्यांचा अभिप्राय अनुकूल पडल्यामुळे मंडळाने या कादंबरीचे भाषांतर माझ्याकडे सोपविले.

भाषांतर करताना मूळ लेखकाशी आपले तादात्म्य साधले तरच मूळच्या लेखकाची अर्थगर्भता आणि रस भाषांतरात उतरण्याची शक्यता. हे भाषांतर करताना ते तादात्म्य मी अनुभवीत होतो. अर्थात् मूळ ग्रंथ रशियन भाषेतला, त्याचा हा इंग्रजीत अनुवाद आणि त्या अनुवादाचा हा मराठी अनुवाद. इंग्रजी भाषांतर ज्या मानाने मूळाला धरून असेल त्या मानाने या मराठी अनुवादातून दस्तयेवस्की मराठी वाचकांना दिसणार. गार्नेटबाईंच्या भाषांतरानंतर बऱ्याच वर्षांनी याच कादंबरीची इंग्रजीत आणखी दोन भाषांतरे काळाचे अंतर टाकून झाली. हे मराठी भाषांतर सोपवितांना साहित्य संस्कृती-मंडळाला ती उपलब्ध झालेली नव्हती. गार्नेटबाईंचेच भाषांतर उपलब्ध होते.

१९७० साली हे भाषांतर पूर्ण करून मी साहित्य-संस्कृती मंडळाकडे दिले होते. ते छापून प्रसिद्ध होण्याचा योग मात्र आता १९८६ साली येत आहे. आणि याचे श्रेय माझ्या धडपडी व्यतिरिक्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे व कॉन्टिनेन्टल प्रकाशन यांना दिले पाहिजे.

दस्तयेवस्की हा १९ व्या शतकातील रशियन साहित्यकारातील मुकुटमणी मानला जातो. आजही त्याच्या कादंबऱ्यांचे जगातल्या अनेक भाषांत अनुवाद होत आहेत आणि त्यांच्या आवृत्त्या निघत आहेत. 'ब्रदर्स कारमाझफ' ही त्याची कादंबरी तर आपल्याकडील महाभारतासारखी प्रतिभासंपन्न आणि मानवजीवनाचे धागेदोरे उकलण्याचा आणि मानवजीवनातील दुःखांवर उपाय दाखविण्याचा प्रयत्न करणारी कलाकृती आहे. महाभारतातील पात्रांसारखीच या कादंबरीतील पात्रेही मनुष्यस्वभावाचे निरनिराळे नमुने त्यांतील सूक्ष्म छटांसह प्रभावीपणे उभे करणारी असल्याचे वाचकाला आढळून येईल. दस्तयेवस्कीची वर्णने पाल्हाळिक वाटणारी आहेत हे खरे, मनाची गुंतागुंत दर्शविण्याकरिता इतका पाल्हाळ केल्यावाचून त्याला चैनच पडत नसावे. पण यामुळे कोठेही रसभंग किंवा असंबद्धता निर्माण होत नाही आणि वाचकाची उत्सुकता थंड होत नाही.

माझ्या मताने 'कारमाझफ बंधू'चा संदेश दस्तयेवस्कीने आल्योशा या पात्राच्या रूपाने दिला आहे. भावनांच्या प्रचंड झंझावातातसुद्धा मूळचा बालकासारखा निरागस स्वभाव टिकून धरणारा आणि गुरु झसिमफ यांच्या सान्निध्यात मिळालेल्या उपदेशाने हृदयशुद्धीविषयी अधिकच तत्पर राहणारा आल्योशा विवेकशून्य होऊन तडफडणाऱ्या जीवांचा आशादीप आहे. या पात्राचे चित्रण किती हळुवारपणे दस्तयेवस्कीने केले आहे ते ही कादंबरी वाचल्यानेच कळून येईल.

माझे श्रम सार्थकी लावल्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष डॉ. बारलिंगे यांचा, इतकी मोठी कादंबरी प्रसिद्ध करण्याचे साहस केवळ दस्तयेवस्कीच्या प्रेमाने करणाऱ्या कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांचा आणि सुलभ मुद्रणालयाच्या मुद्रकांचा मी अत्यंत आभारी आहे. या महान कलाकृतीचा आस्वाद आता मराठी वाचकांनी जरूर जरूर घ्यावा हीच इच्छा.

सर्वांचा नम्र
भाऊ धर्माधिकारी

'निवारा,'
६०।१३ भारती निवास वसाहत
एरंडवणा, पुणे ४११ ००४
ता. २६–१–१९८६

अनुक्रमणिका (खंड दुसरा)

भाग तिसरा

विभाग ७ : आल्योशा

विभाग ८ : मीत्त्या

विभाग ९ : प्राथमिक तपासणी

भाग चौथा

विभाग १० : मुले

विभाग ११ : इवान

विभाग १२ : उफराटा न्याय

उपसंहार

परिशिष्टे

भाग तिसरा

विभाग ७ वा

आल्योशा

१

कुजल्याची दुर्गंधी

धर्मगुरू झसीमफचे शरीर प्रस्थापित ठराविक पुरण्याची तयारी करण्यात आली. सर्वांना माहीतच आहे की, मरण पावलेल्या मठवासींच्या अन् साधूंच्या देहाला स्नान घातले जात नाही. चर्चेच्या विधीत सांगितलेले आहे की 'जर मठवासीयांपैकी कोणी प्रभूमध्ये विलीन झाले, तर नियत केलेल्या संन्याशाने (म्हणजे, ज्याच्याकडे ती कामगिरी आहे त्याने) प्रथम मृत व्यक्तीच्या कपाळावर, छातीवर, हातांवर, पायांवर अन् गुडघ्यांवर क्रूसाचे चिन्ह करून गरम पाण्याने स्पंजाने शरीर पुसून काढावे. ते पुरे सेआहे.' हे सर्व धर्मगुरू पाइस्सींनी केले, त्यांनी नंतर मृताच्या अंगावर मठवासीयाचा पोषाख चढविला आणि त्यांच्या झग्याने त्यांना लपेटले; हा झगा रूढीप्रमाणे त्यांच्या सभोवार क्रूसाच्या आकारात दडपून बसविता यावा अशा रीतीने काहीसा कापलेला होता. त्यांच्या डोक्यावर त्यांनी अष्टकोनी क्रूसाचा टोप ठेवला. टोप उघडा ठेवण्यात आला होता आणि मृताचा चेहेरा काळ्या जाळीदार कपड्याने झाकण्यात आला होता. त्यांच्या हातात तारक खिस्ताची मूर्ती ठेवण्यात आली होती. सकाळच्या सुमाराला त्यांना शवपेटीत ठेवण्यात आले, ती केव्हाच तयार करून ठेवण्यात आली होती. ती पेटी मठीत, म्हणजे महंत जिथे भेटायला येणाऱ्या मंडळींना अन् मठवासी बंधूंना भेटत त्या मोठ्या खोलीत, दिवसभर ठेवावी असे ठरविण्यात आले. मृत झालेली व्यक्ती धर्मोपदेशक अन् अत्यंत कडक संप्रदायाचे मठवासी असल्यामुळे, पवित्र श्रेणीतील मठवासीयांनी त्यांच्या शरीराजवळ स्तोत्रग्रंथाऐवजी नवा करार वाचणे अवश्य होते. हे वाचन धर्मगुरू योझिफ यांनी मृतात्म्याच्या शांतीप्रीत्यर्थ होणाऱ्या सामुदायिक प्रार्थनेनंतर लगेच करायला सुरुवात केली. धर्मगुरू पाइस्सींनी नंतर धर्मग्रंथ सबंध दिवस अन् रात्र आपल्या मृत मित्राच्या सन्निध वाचण्याची इच्छा प्रकट केली. पण यावेळी ते आणि आश्रमाचे मुख्य व्यवस्थापक मठवासी हे फार गुंतून पडले, कारण काही अलौकिक, अभूतपूर्व, नव्हे 'न शोभणारी 'सुद्धा क्षुब्धता अन् अतिउत्कंठा मठवासीमंडळीत, मठाच्या

निवासस्थानात आलेल्या अतिथिसमुदायात आणि शहरातून थव्यांनी आलेल्या लोकांच्या जमावात प्रकट होऊ लागली. आणि जसजसा वेळ जात चालला, तसतशी ती अधिकाधिकच प्रकट होऊ लागली व्यवस्थापकांनी न् धर्मगुरू पाइस्सींनी लोकांत पसरलेला कोलाहल न् क्षुब्धता शांत करण्याची पराकाष्ठा केली.

जेव्हा दिवस पूर्ण वर आला, तेव्हा काही लोक आपल्या आजारी माणसांना बहुत करून बालकांना शहरातून आपल्याबरोबर घेऊन येऊ लागले, जणू त्याकरिता ते उत्कंठेने या क्षणाची वाटच पाहात राहिले होते, अर्थात त्यांची समजूत अशी झाली होती की, मृत महंतांच्या शवात रोगहारक शक्ती आहे अन् ती त्यांच्या श्रद्धे-प्रमाणे आता लगेच प्रकट होणार आहे. धर्मगुरू झसीमफ त्यांच्या जिवंतपणी आमच्या शहरात त्या प्रत्येकाने एक थोर संतपुरुष म्हणून कसे निःसंशयपणे मानले होते ते आता उघड दिसून आले, आणि जे आले होते ते सारे खालच्या वर्गाचे तर नव्हतेच नव्हते.

श्रद्धाळू माणसांमध्ये ही जी तीव्र उत्सुकता इतक्या घाईगर्दीने, इतक्या उघड उघड नव्हे इतक्या उतावळेपणाने न् जवळ जवळ अट्टहासाने प्रकट झाली ती धर्मगुरू पाइस्सींना अशोभनीय वाटली. अशा प्रकारचे काही तरी घडेल अशी जरी त्यांची बऱ्याच पूर्वीपासून अटकळ होती, तरी त्या भावनेचा जो प्रत्यक्ष आविष्कार झाला, तो त्यांच्या अपेक्षेपलीकडचा होता. कोणा मठवासीतही उत्सुकता दिसून येताच धर्मगुरू पाइस्सी त्यांना दटावू लागले. "काहीतरी विलक्षण घडण्याबाबतची अशी उत्सुकता बाळगण्यात थिल्लरपणा दिसतो. प्रापंचिक लोकांत तो ठीक आहे, पण आपणासारख्यांत ते वाईट दिसतं," असे ते म्हणाले.

पण त्यांच्याकडे कोणी फारसे लक्ष दिले नाही आणि धर्मगुरू पाइस्सींच्या ते लक्षात येऊन ते अस्वस्थ झाले. तथापि(जर पूर्ण सत्य सांगायचे तर)त्यांच्या स्वतःच्या हृदयातल्या अंतर्भागात गुप्तपणे जवळ जवळ त्याच आशा त्यांनी धरून ठेवल्या होत्या, आणि जरी आपल्या भोवताली कमालीची उतावळी उत्कंठा पाहून त्यांना राग आला होता आणि त्यात त्यांना मनाचा हलकेपणा न वृथाभिमान दिसत होता, तरी आपल्या स्वतःच्या मनाच्या स्थितीची त्यांना जाणीव झाल्यावाचून राहिली नाही. तरीही विशेषेकरून ज्या लोकांच्या येण्याने त्यांच्या मनात मोठे विकल्प निर्माण झाले अशा काही लोकांना भेटणे त्यांना नकोसे वाटत होते. मृत मनुष्याच्या खोलीत जमलेल्यात त्यांना राकितीन अन ओब्दोर्स्कहून आलेला मठवासी असे आलेले दिसले अन त्यांच्या मनात तिटकाऱ्याची भावना आली (त्याबद्दल त्यांनी लगेच स्वतःची निर्भर्त्सना केली), हा ओब्दोर्स्कचा मठवासी अजूनही मठात वास्तव्य करून होता. त्या दोघांही विषयी धर्मगुरू पाइस्सींना काही कारणाने एकदम संशय वाटला— अर्थात त्यांना इतरांविषयीही खरोखर तसेच वाटू शकले असते म्हणा.

तो ओब्दोर्स्कचा मठवासी त्या प्रक्षुब्ध जमावात सर्वात जास्त गडबड करणारा म्हणून उठून दिसत होता. तो इकडे तिकडे सगळीकडे दिसत होता; सगळीकडे तो चौकसखोर प्रश्न विचारत होता, सगळीकडे तो कान देत होता, सगळीकडे तो एक विशिष्ट, रहस्यमय आविर्भाव आणून कुजबूज करीत होता. त्याच्या चेहेऱ्यावर अधीरता, नव्हे एक प्रकारचा त्रस्तपणासुद्धा दिसत होता.

राकितीनविषयी म्हणायचे तर तो, पुढे दिसून आले त्याप्रमाणे, आश्रमाकडे इतक्या लवकर आला होता तो मादाम होहलाहोवाच्या खास विनंतीवरून. ती सज्जन मनाची पण दुर्बल हृदयाची बाई जशी जागी झाली अन् तिने धर्मगुरू झसीमफांच्या मृत्यूविषयी ऐकले, तशी इतक्या तीव्र औत्सुक्याने तिच्या मनाचा ताबा घेतला की, स्वतःला आश्रमात प्रवेश करता आला नसता म्हणून, तिने ताबडतोब राकितीनला आश्रमात पाठविले अन् सांगितले की डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेव अन् अर्ध्या अर्ध्या तासाने पत्राने मला 'तिथे जे काही होईल ते' कळव. ती राकितीनला अत्यंत धार्मिक वृत्तीचा अन भक्तिमान तरुण मानीत होती. लोकांना आपल्याकडे वळवून घेऊन त्यांच्या दृष्टीने जो कोणता भाग असेल तो बजावण्यात तो विशेष हुशार होता.

स्वच्छ ऊन पडलं होतं अन् आलेल्या लोकांपैकी पुष्कळजण थडग्यांच्या अवतीभवती गर्दी करीत होते, विशेषकरून चर्चच्या आवारात गर्दी पुष्कळ होती अन आश्रमाच्या सभोवार लोक इकडे तिकडे विखुरले होते. धर्मगुरू पाइस्सी हे आश्रमाच्या आवारात फिरत असताना, त्यांना आल्योशाची आठवण झाली. आपण त्याला बराच वेळ, रात्रीपासून तरी, पाहिले नाही हे त्यांच्या लक्षात आले. आणि त्याची त्यांना आठवण होते न होते तोच एकदम त्यांना तो आश्रमाच्या बागेच्या दूरच्या कोपऱ्यात दिसला. एका मठवासीच्या थडग्याच्या दगडावर तो बसला होता, हा मठवासी बऱ्याच काळापासून साधुत्वाबद्दल प्रसिद्ध होता. आल्योशाची पाठ आश्रमाकडे होती अन त्याचे तोंड भिंतीकडे होते अन तो त्या दगडामागे जणू लपला असावासे दिसत होते. त्याच्याकडे जाताच धर्मगुरू पाइस्सींना तो हुंदके देत पण कळवळून रडत असलेला दिसला, त्याने आपला चेहेरा आपल्या हातांनी झाकून घेतला होता अन त्याचे सबंध शरीर हुंदक्यांनी गदगदत होते. धर्मगुरू पाइस्सी त्याच्यापुढे थोडावेळ उभे राहिले.

"पुरे, बेटा, पुरे बाळ," ते शेवटी कळवळ्याने म्हणाले. "का रडतोस? आनंद मान, रडू नकोस. त्यांच्या आयुष्यातला हा सर्वोत्तम दिवस आहे हे तुला माहीत नाही काय? ते या वेळी, या क्षणी, कुठं आहेत याचाच विचार कर!"

आल्योशाने आपल्या तोंडावरचे हात काढून त्यांच्याकडे पाहिले; त्याचा चेहरा बालकाच्या चेहेऱ्याप्रमाणे रडून सुजला होता; पण लगेच त्याने काही न बोलता आपले तोंड फिरवले अन् पुन्हा ते आपल्या हातांनी झाकून घेतले.

" कदाचित् हेच ठीक असेल " धर्मगुरू पाइस्सी विचार करीत म्हणाले; " रडणं आवश्यक असेल तर खुशाल रड खिस्तप्रभूनं हे अश्रू तुला पाठविले आहेत."

" तुझ्या हृदयस्पर्शी अश्रूंनी तुझं अंतःकरण मोकळंच होईल अन् त्यामुळे ते आनंदी व्हायला मदत होईल," ते स्वतःशीच बोलले, आणि आल्योशाला तसाच सोडून, त्याच्याविषयी प्रेमळ विचार करीत, ते तिथून चालू लागले. ते तिथून घाईने निघून गेले, कारण त्याच्याकडे पाहून आपल्याला सुद्धा रडू येईल असे त्यांना वाटले.

दरम्यान वेळ चालला होता; मठातले सोपस्कार अन् मृताबद्दलच्या शांति-प्रार्थना क्रमाने चालल्या होत्या. धर्मगुरू पाइस्सींनी शवपेटीपाशी धर्मगुरू योसिफ यांची जागा घेतली अन् त्यांनी शुभवर्तमानाचे पारायण करायला सुरुवात केली. पण तिसऱ्या प्रहरी तीन वाजण्यापूर्वीच, मी मागच्या खंडात ज्याचा उल्लेख केला ते अकल्पित घडून आले, ते आम्हां सर्वांनाच इतके अनपेक्षित होते अन् सर्वसामान्य कल्पनेच्या इतक्या विरुद्ध होते की, मी पुन्हा सांगतो, या क्षुल्लक प्रसंगाचे आमच्या शहरात अन् आसपासच्या भागात, अगदी बारीकसारीक स्मरण लोकांना आहे. इथे मी, माझ्या स्वतःच्या बाबतीत, सांगू इच्छितो की, जरी खरोखर पाहता ही घटना अत्यंत नैसर्गिक अन् अगदी क्षुद्र अशी बाब होती, तरी तिने इतका मूर्खपणाचा प्रक्षोभ निर्माण केला अन् अनेकांना ती मोठी धोंड असल्यासारखे वाटले की त्या गोष्टीची आठवणसुद्धा नको असे मनाला वाटते. माझ्या कथानकाचा मुख्य भावी नायक जो आल्योशा त्याच्या अगदी अंतःपटलावर या घटनेची जर अतिशय जबर छाप पडली नसती, त्याच्या आध्यात्मिक विकासात ती आणीबाणीची अन् क्रांतिकारी घटना ठरली नसती, आणि त्याच्या बुद्धीला धक्का देऊन पुढच्या आयुष्यभर तिला तिनं बळकटी आणून एक निश्चित ध्येय जर दिले नसते, तर मी या घटनेचा सगळा उल्लेख गाळलाच असता.

आता परत आपल्या कथेकडे वळू या. पहाट होण्यापूर्वी जेव्हा त्यांनी धर्मगुरू झसीमफाचे शव पेटीत घालून पुढच्या खोलीत आणून ठेवले, तेव्हा खिडक्या उघडाव्यात की नाही हा प्रश्न शवपेटीच्या आजूबाजूला जे होते त्यांच्यात उत्पन्न झाला होता. पण ही सूचना, जी कोणीतरी जाताजाता केली, तिला कोणी उत्तर दिले नाही अन् कुणी तिकडे लक्षही दिलं नाही. हजर असलेल्यांपैकी काहींनी मनात त्याची दखल घेतली असेल, फक्त एवढ्याच विचाराने की अशा साधूच्या शरीरात बिघाड व्हायला सुरुवात होईल अशी कल्पनाच मनात आणणे मुळी अविवेकाचे आहे. त्यात जी अश्रद्धा अन् मनाची क्षुद्रता अभिप्रेत आहे ती कीव करण्याला (हास्पास्पद होण्यालासुद्धा म्हणा) पात्र आहे. कारण, काही वेगळेच घडणार अशी त्यांची अपेक्षा होती.

आणि, आश्चर्याची गोष्ट, मध्यान्ह उलटताच कशाची तरी चिन्हे दिसू लागली, पहिल्याप्रथम जे आतबाहेर करीत होते त्यांच्याच फक्त ती लक्षात आली. पण ते गप्प राहिले, प्रत्येकजण आपल्या मनात आले ते दुसऱ्याला सांगायला उघडच भीत होता. पण तीन वाजायला आले तशी ही चिन्हे इतकी स्पष्ट अन् बिनचूक दिसायला लागली की, ती बातमी वेगाने सर्व मठवासींना अन् आश्रमात आलेल्या लोकांत पोहोचली, लगेच ती मठात शिरली, सर्व मठवासी चकित झाले, आणि शेवटी, अगदी थोडक्या वेळात, ती शहरातदेखील पसरली. प्रत्येकजण, मग तो श्रद्धाळू असो वा अश्रद्धाळू असो, ती ऐकून चरकला. अश्रद्धाळू होते ते आनंदित झाले. आणि श्रद्धाळू होते त्यांच्यासंबंधी बोलायचे तर, त्यांच्यापैकी काहींना अश्रद्धाळूंच्यापेक्षाही अधिक आनंद झाला, कारण "माणसांना पुण्यशीलांच्या पतनाचा अन् दुर्लौकिकाचा आनंद वाटतो." असं मृत महंतांनी आपल्या एका प्रवचनात सांगितलेच होते.

गोष्ट अशी होती की कुजल्याचा वास त्या शवपेटीतून येऊ लागला होता, तो हळूहळू जास्त लक्षात येण्याइतका वाढला, आणि तीनच्या सुमाराला त्या बाबतीत शंकाच राहिली नाही. आमच्या मठाच्या गेल्या सबंध इतिहासात अशा तऱ्हेचा प्रवाद उठल्याचे कोणालाही आठवत नव्हते, आणि ही गोष्ट उघडकीला आल्यानंतर लगेच खुद्द मठवासी मंडळीतच माजलेल्या अशोभनीय गडबड गोंधळात जो निंदाप्रवाद दिसून आला तसा इतर कोणत्याही परिस्थितीत माजणे शक्य झाले नसते. मागाहून, पुष्कळ वर्षांनंतर, काही शहाण्या मठवासीयांना त्या दिवसाची आठवण होऊन, हा निंदाप्रवाद इतक्या थराला पोचल्याबद्दल, आश्चर्य अन् उबग वाटले. कारण, पूर्वीसुद्धा, अत्यंत शुद्ध चारित्र्याचे संन्यासी, पापभीरू वृद्ध (ज्यांच्या साधुत्वाबद्दल कोणालाही संशय नव्हता, असे) मेले तेव्हा त्यांच्याही गरीबशा शवपेटीतून कुजल्याचा वास, नैसर्गिकपणे जसा इतर मृत शरीरातून येतो तसा, आलाच होता, पण त्याने त्यावेळी कसलाही निंदाप्रवाद किंवा यत्किंचितही क्षुब्धता उत्पन्न झाली नव्हती. पूर्वीच्या काळी, मठात असे सत्पुरुष होऊन गेले होते की ज्यांची स्मृती काळजीपूर्वक जतन करून ठेवण्यात आली होती, आणि चालत आलेल्या कथेप्रमाणे त्यांचे अवशेष बिघडल्याची काही चिन्हे दिसली नव्हती– ही गोष्ट खरी. ही वस्तुस्थिती मठवासी मंडळी भावनास्पर्शी आणि गूढ असल्याप्रमाणे मानीत होती आणि त्याबाबतची आख्यायिका एक धन्यतेची अन् चमत्कारपूर्ण गोष्ट म्हणून, आणि ईश्वराची कृपा झाली तर, भविष्यकाळी त्यांच्या थडग्यातून आणखी याहून महान प्रकट होणाऱ्या गौरवाची ग्वाही म्हणून, त्यांनी उराशी जतन करून ठेवली होती.

अशा प्रकारे ज्याची स्मृती खास जतन करून ठेवण्यात आली होती, असा जोब नावाचा एक वृद्ध मठवासी होता, तो सत्तर वर्षांपूर्वी एकशे पाच वर्षांचा होऊन मरण पावला होता. तो एक सुप्रसिद्ध व्रती होता, उपवासाचे अन् मौनाचे कडक व्रत

होते त्याचे, आणि त्याचे थडगे येणाऱ्या पाहुण्यांना विशेष आदराने आणि त्याच्याशी संबंध असलेल्या महान् आशा-अपेक्षांचे गूढ सूचन करीत दाखविण्यात येई. (धर्मगुरू पाइस्सींना आल्योशा सकाळी ज्यावर बसलेला आढळला ते तेच थडगं होतं.) मठात जतन करून ठेवण्यात आलेली दुसरी एक स्मृती म्हणजे प्रसिद्ध धर्मगुरू वार्सोनोफी यांची. ते नुकतेच वारले होते आणि धर्मगुरू झसीमफांच्या पूर्वी महंत पद त्यांच्याकडे होते. ते जिवंत असताना मठात येणारे सर्व यात्रेकरू त्यांना एक चक्रम साधुपुरुष म्हणून पूज्य मानीत होते. आख्यायिका अशी होती की, त्या दोघांनाही साधारण जीव असतानाच त्यांच्या शवपेटीत घालण्यात आले होते, त्यांना पुरले तेव्हा कुजल्याची कसलीही लक्षणे दिसून आली नव्हती अन् त्यांच्या चेहेऱ्यावर एक प्रकारचे दैवी तेज होते. आणि काही लोक तर आग्रहपूर्वक सांगत होते की, एक मधुर सुगंध त्यांच्या शरीरातून येत होता.

तथापि अशा प्रकारच्या उदात्त स्मृती असल्या तरी, धर्मगुरू झसीमफांच्या शवपेटीपाशी जो उधळपणा, निर्बुद्धपणा न् द्वेष दिसून आला त्याचे स्पष्टीकरण करणे कठीण आहे. माझे आपले खासगी मत असे आहे की, अनेक वेगवेगळी कारणे एकाच वेळी काम करीत होती, आणि त्यांतले एक कारण म्हणजे ज्येष्ठांचा वर्ग. हे नवीनच काढलेले खूळ म्हणून त्या संस्थेसंबंधी विरोधी भाव अनेक मठवासीयांच्या मनात खोलवर रुजला होता, अतिशय नावड खोलात दडलेली होती. त्याहूनही अधिक जबरदस्त म्हणजे मृत मनुष्याच्या साधुत्वाविषयी मत्सरभाव. त्यांच्या जिवंतपणी त्यांचे साधुत्व इतके पक्के झालेले होते की, त्याविषयी शंका घेणे हे जवळ जवळ निषिद्धच होते, कारण जरी परलोकगत महंतांनी (धर्मगुरू झसीमफांनी) अनेक हृदये चमत्कारांपेक्षा प्रेम करूनच अधिक जिंकून घेतली होती अन् आपल्या भोवती प्रेम करणाऱ्या भक्तांचा मेळावा जमा केला होता, तरी त्याचमुळे विशेष करून त्यांनी काहींच्यात मत्सर निर्माण केला होता आणि त्यामुळे त्यांना गुप्त अन् उघडअसे कट्टर शत्रू झाले होते, मठातच नव्हेत तर बाहेरच्या जगातसुद्धा. त्यांनी कोणालाही जरासुद्धा धक्का लावला नव्हता, पण "लोक इतके यांना का मानतात?" हाच प्रश्न हळूहळू पुनः पुन्हा उच्चारला गेल्यामुळे शेवटी त्यातून तीव्र, कधी समाधान न पावणारा असा त्यांच्याविषयीचा एक द्वेषभाव निर्माण झाला होता. त्यामुळेच मला वाटते त्यांच्या मृतदेहातून इतक्या लवकर जी कुजण्याची दुर्गंधी येऊ लागली, तिने अनेक लोक खूपच आनंदित झाले, कारण त्यांना मरून एक दिवसही पुरा झाला नव्हता. त्याच बरोबर असेही काही होते की, जे आजपर्यंत महंतांविषयी पूज्य भावनेने भक्ती बाळगत आले होते त्यांना या प्रसंगाने अगदी मेल्यागत अन् जणू स्वतःचाच अपमान झाल्यासारखे झाले. जे घडले ते असे—

कुजण्याची चिन्हे जसजशी दिसू लागली, तसा त्या खोलीत प्रवेश करण्यातला त्या मठवासीयांच्या मनातला गुप्त हेतू त्यांच्या चेहेऱ्यामोहऱ्यावरून

प्रकट झाला. ते आत जात, थोडा वेळ थांबत अन् लगेच बाहेर येऊन बाहेर उभ्या असलेल्या इतर संन्याशांच्या जमावाला ती बातमी खरी असल्याचे सांगत. त्यांच्यातले काही ते ऐकून शोकभावनेने आपली डोकी हलवीत, पण इतर, आपल्या खुनशी डोळयांत बिनचूकपणे प्रकट होणारा आनंद लपविण्याचीसुद्धा पर्वा करीत नसत. आता त्याबद्दल त्यांना कोणी बोलत नव्हते, कोणी निषेधपर आवाजही काढीत नव्हते, आणि हे विलक्षण होते, कारण बहुसंख्य मठवासी मृत महंतांचे भक्त होते. पण ईश्वराने जणू या प्रकरणी बहुसंख्यांना काही काळ वर्चस्व देण्याचे ठरविलेले दिसले.

बाहेरून आलेले लोकसुद्धा, विशेषतः शिक्षित वर्गातले, याच हेरगिरीच्या हेतूने लवकरच त्या खोलीत गेले. शेतकरी वर्गातले फारच थोडे आत गेले, पण या वर्गाचा जमाव आश्रमाच्या फाटकापाशी मात्र खूप मोठा जमला होता. तीन वाजल्यानंतर आश्रमाबाहेरच्या लोकांची गर्दी खूपच वाढली आणि ती त्या धक्का देणाऱ्या बातमीमुळेच वाढली यात शंका नव्हती. जे लोक अन्यथा त्या दिवशी तिथे आले नसते अन् येण्याचे त्यांच्या मनातही नव्हते. त्यांनाही यावेसे वाटले, आणि त्यात चांगली वरच्या दर्जाचीही काही माणसे होती. परंतु बाह्य शिष्टाचार अजूनही संभाळला गेला होता आणि धर्मगुरू पाइस्सींनी कठोर मुद्रेने शुभवर्तमानाचे वाचन खंबीरपणे अन् सर्वांना ऐकू जाण्यासारखे चालू ठेवले. आपल्या आजूबाजूला काय चालले आहे याकडे त्यांनी वरवर जरी लक्ष दिले नाही, तरी विलक्षण वेगळे काहीतरी या पूर्वीच त्यांच्या दृष्टीस पडले होते ही खरी गोष्ट होती. पण शेवटी, जी गुणगुण प्रथम दबल्या आवाजात होती ती हळूहळू मोठी मोठी अन् अधिक निर्भय होऊन त्यांच्याही कानांपर्यंत गेली. एकदम त्यांच्या कानी उद्गार आले : "ईश्वराचा निवाडा माणसाच्या निवाड्यासारखा नसतो हे यावरून दिसून येते." या भावनेला शब्दरूप देणारा पहिला कोणी तरी एक सामान्य माणूस, शहरातला एक पोक्त सरकारी अधिकारी होता, अतिशय धार्मिक वृत्तीचा माणूस म्हणून तो प्रसिद्ध होता. त्याने मठवासी फक्त जे बराच वेळपर्यंत कुजबुजत होते ते मोठ्याने उच्चारले इतकेच. त्यांनी हा धिक्कार करणारा निष्कर्ष बऱ्याच वेळापूर्वी बनवून ठेवला होता, आणि सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे त्या निष्कर्षाचे एक प्रकारचे विजयी समाधान क्षणोक्षणी अधिकाधिक स्पष्टपणे दिसून येऊ लागले होते. लवकर त्यांनी बाह्य शिष्टाचारसुद्धा बाजूला सारायला सुरुवात केली अन् तसे करण्याचा जणू आपल्याला हक्क आहे असे त्यांना वाटायला लागल्यासारखे दिसले.

काही मठवासी, प्रथमः खेद वाटल्याचा आव आणून, म्हणाले, "आणि 'असं' घडलं याला कारण काय असावं ? त्यांची शरीरयष्टी तर बारीक होती अन् त्यांचं मांस हाडांवरच वाळलेलं होतं, कुजण्याजोगं होतं काय त्यात ?"

लगेच दुसरे म्हणाले, "अहो, हा दैवीच संकेत असला पाहिजे," आणि हे त्यांचे मत विना-हरकत उचलले गेले. कारण, असेही दाखवून देण्यात आले की, कुजू लागण्याची ही क्रिया प्रत्येक मृत पाप्याच्या बाबतीत असते तशी नैसर्गिक असती तर ती नंतर म्हणजे निदान चोवीस तास उलटून गेल्यानंतर दिसू लागली असती, पण इथं अकालीच सुरू झालेली ही कुजण्याची क्रिया 'निसर्गाहून वेगळीच' झालेली आहे, आणि म्हणून त्यात ईश्वराचा हात आहे हे उघड दिसते आहे. काही संकेत यात असला पाहिजे. हा निष्कर्ष खोडून काढणे कठीण होते.

मृदू मनाचे धर्मगुरू योझिफ, जे ग्रंथपाल होते अन् मृत महंताचे फार लाडके होते, त्यांनी वाईट बोलणाऱ्यांपैकी काहींना, "असं मत सगळीकडं सारख्यारीतीनं मानलं जात नाही," आणि साधूंचे शरीर कधी कुजत नाही असं ऑर्थोडॉक्स चर्चचे सिद्धान्त-वचन नाही ते एक मत आहे, आणि अत्यंत धर्मनिष्ठ ऑर्थोडॉक्स प्रदेशात, उदाहरणार्थ अॅथॉसमध्ये, प्रेत कुजल्याचा वास आल्याने लोक फारसे विचलित होत नाहीत, आणि तिथे ज्यांचे पापनिवारण झाले आहे त्याच्या गौरवाचे चिन्ह शरीर न कुजणे हे मानीत नाहीत तर शरीर पुष्कळ वर्षे जमिनीत पुरलेले राहून सडले म्हणजे मग हाडांना येणारा जो रंग येतो त्यावरून ते ओळखतात, असे उत्तर देण्याचा प्रयत्न केला. "आणि जर ती हाडं मेणाच्या रंगासारखी पिवळी झाली, तर प्रभूनं मृत सत्पुरुषाचा गौरव केला याचं ते महान चिन्ह समजावं आणि जर ती पिवळी न होता काळी पडली, तर त्यावरून ईश्वरानं त्याला अशा गौरवाला पात्र मानलं नाही असं समजावं— असं अॅथॉसमधे मानतात, आणि ते एक महान् क्षेत्र आहे, तिथं ऑर्थोडॉक्स धर्मतत्त्व फार प्राचीन काळापासून जतन करून ठेवण्यात आलं आहे, ते तिथं अभंग, त्याच्या अगदी शुद्ध स्वरूपात आहे," असं शेवटी धर्मगुरू योझिफ म्हणाले.

पण त्या अतिनम्र धर्मगुरूंच्या शब्दांचा काहीच परिणाम झाला नाही, उलट त्यांची थट्टा उडविणारे प्रत्युत्तर त्यांना मिळाले. "हे सारं पांडित्य आहे, नवपाखंडी मत आहे, ते ऐकण्यात काही अर्थ नाही," असं त्या मठवासीयांनी ठरविलं. "आम्ही जुन्या धर्मतत्त्वालाच चिकटून राहणार, अलीकडं वाटेल ती नवी मतं प्रचारात येत आहेत, त्या साऱ्यांचं आम्ही अनुसरण करावं की काय?" दुसरे म्हणाले.

"त्यांच्याकडे होते, तितकेच पवित्र धर्मगुरू आमच्याकडे झाले आहेत. तिकडं त्या तुर्की लोकात देखील ते आहेत, पण ते सर्व काही विसरून गेले आहेत. त्यांचं धर्मतत्त्व फार काळापासून अशुद्ध झालं आहे अन् त्यांच्याकडं घंटासुद्धा नाहीत," अगदी नाक मुरडणारे होते ते म्हणाले.

धर्मगुरु योझिफ तेथून निघून गेले. त्यांना अधिकच दुःख झाले, कारण त्यांनी आपले स्वतःचे मत जणू स्वतःचाच त्यावर विश्वास नसल्याप्रमाणे

मांडले होते. त्यांच्या लक्षात आले की, काहीतरी न शोभणारें घडू लागले आहे, आणि आज्ञाभंगाची निश्चित चिन्हे दिसू लागली आहेत, त्यांना दुःख झाले. आस्ते आस्ते सर्व समंजस मठवासी धर्मगुरू योझिफप्रमाणेच गप्प झाले. जे महंतांवर प्रेम करीत होते अन् ज्येष्ठ धर्मगुरूची संस्था ज्यांनी भक्तियुक्त आज्ञाधारकपणे मान्य केली होती, ते सर्व एकदम खिन्न झाले अन् एकमेकांला भेटताना ते एकमेकांच्या चेहऱ्याकडे घाबरटपणाने पाहू लागले. जे ज्येष्ठ धर्मगुरूची संस्था नवीनच समजून तिचा पूर्णपणे विरोध करीत होते त्यांच्या माना गर्वाने ताठ झाल्या. "माजी महंत बार्सोनोफींच्या शरीरातून कुजल्याचा वास आला नव्हता, उलट मधुर सुवास येत होता," ते द्वेषपूर्ण रीतीने आठवण सांगू लागले. "पण हा गौरव त्यांना लाभला तो ते ज्येष्ठ होते म्हणून नव्हे तर ते पवित्र पुरुष होते म्हणून."

आणि त्या मागून धर्मगुरू झसीमफांवर टीकेची झोड उठली अन् लोक त्यांना दोषही देऊ लागले. "त्यांची शिकवण खोटी होती. जीवन हा महान आनंद आहे, अश्रूंची दरी नाही अशी त्यांची शिकवण होती," असे अधिक तंडणखोर होते ते म्हणाले. दुसरे जे त्यांच्याहून जास्त अविवेकी होते ते म्हणाले, "अलीकडच्या रूढ मताच्या मागेच ते गेले, नरकातली भौतिक आग त्यांनी मानली नाही," जे मत्सरग्रस्त होते. त्यांच्यापैकी काहींत "उपवास करण्यात ते कडक नव्हते, गोड गोड पक्वान्न ते घेत, चहाबरोबर ते चेरीचा मुरंबा घेत, मोठ्या घरच्या स्त्रिया त्यांना तो पाठवीत, कडक नियमपालन करणाऱ्या मठवासीने चहा पिणं योग्य आहे काय?" अशी भाषा ऐकू येऊ लागली. जे फार द्वेष करणारे होते त्यांनी सूड बुद्धीने जाहीर केले की, ते गर्वानं बसत, ते स्वतःला सत्पुरुष समजत आणि लोक जेव्हा त्यांच्यापुढं गुडघे टेकीत तेव्हा तो आपला योग्यच मान आहे असं ते मानीत," ज्येष्ठ धर्मगुरू या संस्थेला कडाडून विरोध करणारे द्वेषपूर्ण शब्दांत हळूच कुजबुजले, "पापाची कबुली देण्याच्या पवित्र विधीचा त्यांनी गैरवापर केला." आणि या विरोधकांत सर्वांत जुने, आपल्या धर्मप्रीतीत सर्वांत कडक हाडाचे व्रती असलेले काही संन्यासी होते, मृत महंत जिवंत होते तोवर ते चूप राहिले होते, पण आता एकदम त्यांच्या तोंडाचे कुलूप उघडले. आणि हे फार भयंकर होते, कारण जे तरुण मठवासी अजून आपल्या निष्ठेत पक्के झालेले नव्हते त्यांच्या मनावर त्यांच्या शब्दांचा फार मोठा परिणाम होण्याजोगा होता. "ओब्दोर्स्कहून आलेल्या मठवासीने हे सारे लक्षपूर्वक, दीर्घ निःश्वास सोडीत अन् आपले डोके संमतिदर्शक हलवीत ऐकले. "हां, धर्मगुरू फेरापोन्तनी काल जे आपलं मत सांगितलं ते बरोबर होतं म्हणायचं," अन् त्याच वेळी धर्मगुरू फेरापोन्त स्वतः जणू मुद्दाम गोंधळ वाढविण्याकरिता म्हणून तिथे हजर झाले.

मी मागे सांगितलेच आहे की, ते मधुमक्षिका शाळेजवळची आपली लाकडी मठी सोडून क्वचितच बाहेत येत असत. ते चर्चमध्ये क्वचितच दिसत, आणि ते चक्रम

आहेत या सबबीवर लोक त्यांची ही कृती क्षम्य मानीत, आणि इतरां सर्वांना बंधनकारक असणारे नियम त्यांना लावीत नसत. पण संपूर्ण सत्य सांगायचे तर लोकांच्या मनावर फारसे काही अवलंबून नव्हतेच. कारण एवढ्या थोर व्रतीवर रात्रंदिवस प्रार्थना करणाऱ्या अशा माणसावर (ते आपल्या गुडघ्यांवर असतांनाच झोप लागून खाली पडत असंही घडे) सर्वसामान्य नियम-निर्बंध लादण्याचा आग्रह ठेवणे लांच्छनास्पद झाले असते. तसा आग्रह त्यांनी धरला असता, तर मठवासी म्हणाले असते की "हो, ते तर आमच्यापेक्षा अधिक पवित्र आहेत आणि आम्ही पाळतो त्यांहूनही त्यांचे नियम अधिक कडक आहेत. ते जर चर्चला जात नसतील तर आपण केव्हा जायला पाहिजे हे ते जाणतात म्हणून; त्यांचे स्वतंत्र नियम आहेत." अशी पापयुक्त गुणगुण लोकांच्या तोंडून येण्याची संधीच नको म्हणून धर्मगुरू फेरापोन्तला निर्वंधपणे राहू दिले जाई.

प्रत्येकाला माहीत होते की धर्मगुरू फेरापोन्तना धर्मगुरू झसीमफाविषयी विशेष नावड होती. आणि आता त्यांच्या झोपडीत त्यांना, "ईश्वराचा निवाडा माणसाच्या निवाड्यासारखा नसतो," आणि 'निसर्गापेक्षा वेगळं' "काहीतरी घडलेले आहे, ही बातमी मिळाली. ही बातमी घेऊन पहिल्याप्रथम त्यांच्याकडे जाणारा ओब्दोर्स्कचा तो मठवासीच असला पाहिजे असं समजण्यास हरकत नाही; तो त्यांना आदल्या दिवशी संध्याकाळी भेटला होता अन् त्यांच्या मठीतून भयभीत होऊन बाहेर पडला होता.

मी वर म्हटले आहे की धर्मगुरू पाइस्सी हे खंबीर अन् अविचल राहून शवपेटीपाशी शुभवर्तमानाचे पारायण करीत होते, मठीच्या बाहेर काय चालले आहे ते त्यांना ऐकू येत नव्हते किंवा दिसत नव्हते, तरी अंतःकरणात त्याची बरोबर कल्पना आली होती, कारण आपल्या भोवतालच्या माणसांना ते चांगले ओळखीत होते. ते त्याने डगमगले नाहीत, उलट पुढे काय होतंय त्याची ते निर्भयपणे वाट पाहू लागले. सर्वत्र उसळलेल्या प्रक्षोभांतून पुढे काय निघणार याकडे आपल्या कुशाग्रबुद्धीने अन् अंतदृष्टीने ते पाहात राहिले.

एकाएकी मधल्या वाटेतला, सगळे शिष्टाचार धाब्यावर बसवून झालेला विलक्षण ओरडा त्यांच्या कानी येऊन आदळला. दरवाजा धाडकन् उघडला गेला अन् धर्मगुरू फेरापोन्त उंबऱ्यावर येऊन उभे राहिले. त्यांच्यामागे मठवासींचा घोळका, तसेच शहरातून आलेले पुष्कळ लोक दिसत होते. अर्थात् ते सगळे त्या खोलीत शिरले नाहीत, पायऱ्यांच्या तळाशीच उभे राहून धर्मगुरू फेरापोन्त काय म्हणतात किंवा करतात हे पाहत राहिले. कारण, जरी त्यांच्यात उद्दामपणा असला तरी ते काही उगीच आलेले नाहीत अशी काहीशी दबदब्याची भावना त्यांच्यात होती. दारात उभे राहून धर्मगुरू फेरापोन्तनी आपले हात वर केले, आणि त्यांच्या उजव्या दंडाखाली ओब्दोर्स्कच्या मठवाशांचे तीक्ष्ण चौकस बारीक डोळे

डोकावले. अतिशय कुतूहलामुळे, त्याला एकट्यालाच, धर्मगुरू फेरापोन्तच्या मागून धावत पायऱ्या चढून गेल्यावाचून राहवले नाही. उलट, बाकीचे, तो दरवाजा धाडकन् आवाज करून उघडताच, एकदम घाबरून जाऊन आणखीच मागे सरले. आपले हात वर उंच धरून, धर्मगुरू फेरापोन्त एकदम गरजले :

" हा मी बाहेर काढून फेकून देतो ! " आणि, सर्व दिशांना तोंड फिरवून त्यांनी त्या खोलीच्या चारी भिंतींपैकी प्रत्येक भिंतीपाशी अन् प्रत्येक कोपऱ्यापाशी आळीपाळीने जाऊन चटकन् क्रूसाचे चिन्ह करायला सुरुवात केली. जे त्यांच्यासोबत गेले होते, त्या सर्वांना त्यांची ही कृती लगेच समजली. कारण ते जिथे कुठे जात तिथे नेहमी असेच करीत अन् भुतेपिशाच्चे बाहेर हाकलल्याशिवाय ते खाली बसत नसत किंवा एक शब्दही बोलत नसत, हे त्यांना माहीत होते.

" सैताना, चालता हो इथून ! सैताना, चालता हो इथून ! " प्रत्येक क्रूसाच्या चिह्नागणिक ते म्हणत होते. हा मी बाहेर काढून फेकून देतो ! " ते पुन्हा गरजले.

त्यांनी आपला जाडाभरडा झगा घालून त्यावरून कमरेला एक दोर आवळला होता. पिकलेल्या केसांनी झाकलेली, त्यांची उघडी छाती, त्यांच्या तागी कापडाच्या सदऱ्याच्या आत दिसत होती. त्यांचे पाय उघडे होते. त्यांनी आपले हात फिरवायला सुरुवात करताच त्यांच्या झग्याच्या आत त्यांच्या अंगावर असलेल्या लोखंडी साखळ्यांचा खळखळ असा आवाज होऊ लागला.

धर्मगुरु पाइस्सीनी आपले वाचन थांबविले, ते पुढे झाले अन् त्यांच्यापुढे वाट पाहत उभे राहिले.

" माननीय धर्मगुरू, तुम्ही कशाला आलात ? असलेली व्यवस्था का बिघडवीत आहा ? शांतीचा भंग का करीत आहा ? " त्यांच्याकडे कडकपणे पाहत ते शेवटी म्हणाले.

" मी कशाला आलो ? तुम्ही विचारता, कशाला ? काय आहे तुमची धर्मश्रद्धा ! " धर्मगुरू फेरापोन्त माथेफिरूपणे ओरडले. " मी इथं आलो आहे तो तुमच्याकडं आलेल्या या गलिच्छ पिशाच्चांना हाकलण्याकरिता. मी इथं नसताना ती इथं किती जमा झाली आहेत ते बघण्याकरिता. बर्चच्या झाडूनं मला त्यांना झाडून टाकायचंय."

" पिशाच्चाला तुम्ही बाहेर काढताहा खरे, पण कदाचित तुम्ही स्वतःच त्याला मदत करीत असाल," धर्मगुरु पाइस्सी निर्भयपणे म्हणाले, " ' अन् मी पवित्र आहे ' असं स्वतःसंबंधी कोण म्हणू शकेल ? तुम्ही म्हणू शकता, बाबा ? "

" मी अस्वच्छ आहे, पवित्र नाही. मी खुर्चीत बसून त्यांना मूर्तीसारखं माझ्यापुढं वाकायला लावणार नाही," धर्मगुरू फेरापोन्त गरजले. " आजकाल लोक खऱ्या धर्माचा नाश करताहेत. हा मृत मनुष्य, तुमचा सत्पुरुष," ते

जमावाकडे वळून अन् शवपेटीकडे बोट करून म्हणाले, "पिशाच्चांवर विश्वास ठेवीत नव्हता. पिशाच्यांना हाकलायला त्यानं औषधं दिली. अन् त्यामुळं ती इतकी सगळीकडं भरली आहेत की जणू कोळिष्टकं. अन् आता त्याच्या स्वतःच्या देहालाच दुर्गंधी यायला लागली आहे. यात ईश्वराकडून आलेला मोठा संकेत आम्हाला दिसतो."

त्यांनी ज्या प्रसंगाचा उल्लेख केला तो असा : मठवासींपैकी एकाला स्वप्नात, अन् पुढे, जागेपणी, नेहमी पिशाच्चे दृष्टीला पडायची. अतिशय घाबरून जाऊन त्याने जेव्हा धर्मगुरु झसीमफ यांना हे एकांतात सांगितले, तेव्हा महंतांनी त्याला सतत प्रार्थना अन् कडक उपवास करायला सांगितले. पण त्यांचाही जेव्हा उपयोग होईना, तेव्हा त्यांनी त्याला उपवास अन प्रार्थना सुरूच ठेवून एक विशिष्ट औषध घ्यायला सांगितलें. पुष्कळ लोकांना त्या वेळी त्यामुळे धक्काच बसला होता आणि त्यासंबंधाने बोलताना ते नाखुषीने आपल्या माना हलवीत होते— आणि सर्वांत जास्त बोलणारे होते धर्मगुरू फेरापोन्त, काही छिद्रान्वेषी माणसांनी लगेच त्यांच्याकडे जाऊन हा 'विलक्षण' सल्ला ज्येष्ठ धर्मगुरूंनी दिल्याचे त्यांना कळविले होते.

धर्मगुरू पाइस्सी हुकुमी स्वरात म्हणाले, "बाबा तुम्ही जा!" निवाडा करणं माणसाचं काम नाही, ईश्वराचं आहे. कदाचित् तुम्हांला, मला. किंवा आपल्यापैकी कुणालाच आकलन करता येणार नाही अशा प्रकारचा हा 'संकेत' असेल. जा, बाबा, अन् अनुयायांना त्रास देऊ नका!" ते ठासून पुन्हा म्हणालें.

पण विवेचक बुद्धीला मागे सारणाऱ्या उत्साहातिरेकात वाहून गेलेला तो धर्मान्ध माणूस काही केल्या गप्प बसेना. नियमाला धरून ते उपास पाळीत नव्हते आणि म्हणून हा संकेत आला आहे. हे सत्य आहे अन् ते छपवणं पाप आहे.

मिठाईच्या मोहात ते गुरफटले, स्त्रिया आपल्या खिशातून त्यांना ती आणून देत होत्या. ते चहा प्याले, त्यांनी आपल्या पोटाची पूजा केली, त्यांनी गोड गोड वस्तू पोटात आणि अहंकाराचे विचार मनात भरले... अन त्यामुळेच त्यांची ही बेअब्रू झाली आहे...."

"तुम्ही फार थिल्लरपणानं बोलता आहा, बाबा." धर्मगुरू पाइस्सीसुद्धा आपला आवाज चढवून म्हणाले. "तुमच्या उपवासांची न् कडक व्रतांची मी प्रशंसा करतो, पण तुम्ही एखाद्या उथळ, चंचल अन् बालिश युवकाप्रमाणं थिल्लरपणानं बोलताहात. चालायला लागा. बाबा, मी तुम्हाला आज्ञा करतो!" धर्मगुरू पाइस्सी शेवटी गरजून उद्‌गारले.

"मी जातो," फेरापोन्त काहीसे दबकल्यासारखे होऊन पण पूर्वीइतक्याच कडवटपणाने म्हणाले. "तुम्ही पंडित लोक! तुम्ही इतके हुशार म्हणून माझ्या गरीबपणाकडं तुच्छतेनं पाहता काय? मी फार थोडी विद्या घेऊन इथं आलो अन्

जी आणली ती मी इथं विसरून गेलो. मी दुबळा असलो तरी तुमच्या लुच्चेगिरी-पासून खुद्द ईश्वरानंच माझं रक्षण केलंय."

धर्मगुरू पाइस्सी दृढपणे वाट पाहत त्यांच्या पुढ्यात उभे होते. धर्मगुरू फेरापोन्त थोडा वेळ थांबले आणि, एकदम आपला गाल उदासपणे आपल्या हातावर टेकून, मृत महंताच्या शवपेटीकडे पाहत आवाजाचा चढउतार करीत मोठ्याने म्हणाले :

" उद्या यांच्याकरिता ते 'आमुचा साहाय्यकर्ता आणि संरक्षक तो'– हे सुंदर स्तोत्र गातील अन् मी मेल्यावर माझ्याकरता मात्र जे गातील ते 'इहलोकी तो हर्ष कशाचा' हे छोटंसं स्तोत्र." हे बोलताना त्याच्या डोळ्यांत दुःखाश्रू आले. "तुम्ही अहंकारी न् गर्वानं फुगलेले आहात. हे डामडौलाचं स्थान आहे!" असे ते एकदम एखाद्या वेड लागलेल्या माणसाप्रमाणे ओरडले; आपल्या हाताला झटका देऊन ते एकदम मागे फिरले आणि तसेच झटकन् पायऱ्या उतरले. खाली त्यांची वाट पाहात असलेल जमाव डळमळीत झाला; काहीजण लगेच त्यांच्या मागोमाग गेले तर काहीजण रेंगाळत राहिले, कारण ती मठी अजून उघडीच होती आणि धर्मगुरू पाइस्सी, धर्मगुरू फेरापोन्तच्या मागोमाग पायऱ्यांवर येऊन त्यांना न्याहाळीत तेथे उभे होते. पण ते क्षुब्ध झालेले वृद्ध धर्मवेडे गृहस्थ पूर्ण गप्प झाले नाहीत. वीस पावले गेल्यावर ते एकदम मावळत्या सूर्याकडे वळले. आपले दोन्ही हात त्यांनी उंचावले आणि जणू कोणी एकदम त्यांना फटकारा मारला असावा त्याप्रमाणे ते एक मोठी किंकाळी फोडून धाड्दिशी जमिनीवर पडले.

" माझ्या परमेश्वराचा जय झाला! ख्रिस्तानं मावळत्या सूर्याला जिंकलं!" ते आपले हात सूर्याकडं पसरून वेड लागल्यासारखे ओरडले अन् जमिनीवर पालथे पडून एखाद्या लहान पोरासारखे हुंदके देऊ लागले. अश्रू गाळताना त्यांचे शरीर गदागद हालत होते अन् आपले बाहू त्यांनी जमिनीवर पसरले होते. मग सगळे त्यांच्याकडे धावले; आरोळ्या उठल्या अन कळवळ्याचे हुंदके उमटले... सर्वांनाच एक प्रकारच्या वेडाने पछाडले असल्याचे दिसले.

" खरे संतपुरुष आहेत ते हे! पवित्र पुरुष आहेत ते हे!" काहीजण निर्भय होऊन मोठ्याने ओरडले. " ज्येष्ठ धर्मगुरू व्हावं तर यांनीच!"
दुसरे द्वेषभावनेने बोलले.

" ते मुळीच ज्येष्ठ धर्मगुरू होणार नाहीत... ते नाही म्हणतील... एखाद्या स्थापित नव्या खुळाच्या ते कधी उपयोगी पडणार नाहीत... त्या लोकांच्या मूर्खपणाच्या चाळ्यांची हे नक्कल करणार नाहीत," असे इतर आवाज लगेच त्यात मिसळले आणि ते कुठवर गेले असते हे सांगणे कठीण आहे, पण त्याच वेळी घंटा घणघणू लागून त्यांना प्रार्थनेचे निमंत्रण करू लागली. लगेच सर्वजण स्वतःवर क्रूसाचे चिन्ह करू लागले. धर्मगुरू फेरापोन्तही उठले आणि स्वतःवर क्रूसाचे चिन्ह

करून मागे न पाहता आपल्या मठीकडे परत गेले, अजूनही तोंडाने ते असंबद्ध काहीतरी बोलतच होते. काही थोडे त्यांच्यामागे गेले; पण बराच मोठा समुदाय तेथून घाईघाईने प्रार्थनेकरिता गेला. धर्मगुरू पाइस्सींनी धर्मगुरू योझिफकडे आपल्या जागी वाचन करणे सोपविले आणि ते खाली गेले. धर्मान्धांच्या वेडपट आरोळ्यांनी ते डगमगले नाहीत, पण त्यांचे अंतःकरण एकदम काही विशेष कारणाने खिन्नतेने भरून गेले अन् त्यांना त्याची जाणीव झाली. ते स्तब्ध झाले अन् एकदम त्यांच्या मनात 'मनाला उदास वाटण्याइतकं मला वाईट कशाचं वाटतंय?' असा विचार आला, आणि लगेच त्यांच्या लक्षात आले अन् त्यांना आश्चर्य वाटले की, आपल्या मनाला एकदम वाटलेला खेद एका अतिशय लहानशा अन् खास कारणाने आलेला आहे. मठीच्या प्रवेशद्वाराजवळ गर्दी करून असलेल्या जमावात त्यांना आल्योशा दिसला होता आणि त्याला पाहताक्षणी त्यांना हृदयात वेदना जाणवली होती. "या मुलाविषयी माझ्या अंतःकरणाला या वेळी इतकं वाटणं शक्य आहे?" आश्चर्य करीत त्यांनी स्वतःला प्रश्न केला.

त्याच वेळी आल्योशा त्यांच्याजवळून घाईघाईने गेला, पण तो चर्चच्या दिशेने गेला नाही. त्यांचे डोळे एकमेकांना भेटले. आल्योशाने चटकन् आपले डोळे दुसरीकडे वळविले, खाली जमिनीकडे केले आणि त्या मुलाच्या दृष्टीवरूनच धर्मगुरू पाइस्सींना या वेळी त्याच्यात जो मोठा बदल घडून येत होता त्याची अटकळ आली.

"तू सुद्धा मोहात सापडलास?" धर्मगुरू पाइस्सी म्हणाले, "अल्पश्रद्ध लोकांत तूही सामील आहेस हे संभवनीय आहे?" ते दुःखाने म्हणाले.

आल्योशा स्तब्ध राहिला अन् शून्य नजरेने त्याने धर्मगुरू पाइस्सींच्याकडे पाहिले, पण लगेच त्याने आपली नजर पुन्हा काढून घेतली अन् पुन्हा जमिनीकडे लावली. तो बाजूला उभा राहिला अन् त्याच्याकडे लक्षपूर्वक न्याहाळून पाहत असलेल्या धर्मगुरू पाइस्सींकडे त्याने आपले तोंड फिरवले नाही.

"तू गडबडीनं कुठं चालला आहेस? प्रार्थनेची घंटा वाजते आहे," त्यांनी पुन्हा त्याला विचारले, पण पुन्हा आल्योशा उत्तर न देता गप्प राहिला.

"तू आश्रम सोडून चाललास? होय? परवानगी न घेता, आशीर्वाद न मागता?"

आल्योशानं दुर्मुखलेपणाने स्मित केले, आणि त्याच्या पूर्वीच्या मार्गदर्शकाने पूर्वीच्या त्याच्या हृदयसम्राटाने, त्याच्या प्रियतम ज्येष्ठ धर्मगुरूने ज्यांच्याकडे मरतेवेळी त्याला विश्वासानं सोपविले होते त्या धर्मगुरूंकडे त्याने एक विलक्षण, अति-विलक्षण दृष्टिक्षेप केला, आणि अचानक, न बोलताच जणू आदरशील होण्याचीसुद्धा पर्वा न करता त्याने हात हालवून इशारा केला अन् झटझट पाय उचलीत फाटकाकडे चालत जाऊन तो आश्रमाच्या बाहेर पडला.

"तू पुन्हा परत येशील!" धर्मगुरू पाइस्सी त्याच्याकडे दुःखमिश्रित आश्चर्याने पाहत पुटपुटले.

२

आणीबाणीचा क्षण

अर्थात् धर्मगुरू पाइस्सी आपला 'प्रिय मुलगा' पुन्हा परत येईल असे ठामसपणे म्हणाले तेव्हा ते त्यांचे म्हणणे चूक नव्हते. नव्हे, कदाचित् काही अंशी आल्योशाच्या आंतरिक स्थितीचा खरा आशय त्यांना सूक्ष्म दृष्टीने आकलन झाला असावा. तरी मला मोकळ्या मनाने कबूल केले पाहिजे की, माझ्या अत्यंत आवडत्या तरुण नायकाच्या जीवनातील त्या विचित्र, अस्पष्ट क्षणाची स्पष्ट स्वरूपात माहिती देणे मला फार कठीण होईल. धर्मगुरू पाइस्सींनी "तू सुद्धा त्या अल्पश्रद्ध लोकांत सामील आहेस?" असा जो दुःखपूर्ण प्रश्न केला, त्याचे आल्योशाच्या वतीने मी खात्रीपूर्वक उत्तर देईन की "नाही, तो त्या लोकांत सामील नाही." याच्या अगदी उलट स्थिती होती. त्याची जी सारी अडचण निर्माण झाली होती ती त्याची श्रद्धा मोठी होती यातूनच. तरी ती अडचण होतीच, अन् ती इतकी वेदनाकारक होती की पुढे कित्येक दिवसांनी सुद्धा आल्योशाला तो दुःखाचा दिवस आपल्या आयुष्यातला एक सर्वांत वाईट अन् सर्वांत घातक दिवस वाटला. "त्याचे सर्व दुःख अन् अस्वस्थता ही त्याच्या गुरूच्या शवानं एकदम चमत्कार दाखविण्या-ऐवजी अकालीच कुजण्याची चिन्हं दाखविली यातूनच उद्भवली का?" असा जर कोणी प्रश्न विचारला तर उत्तर देण्याची टाळाटाळ न करता मला सरळ सांगितले पाहिजे की, "होय, त्यामुळंच होती." माझ्या तरुण नायकाच्या शुद्ध अंतःकरणाचा उपहास करण्याची गैरवाजवी घाई वाचकांनी करू नये, एवढीच मी त्यांना हात जोडून विनंती करीन. तो अगदी तरुण होता, या सबबीवर, किंवा अभ्यासात त्याची प्रगती फार थोडी झाली होती, असे कोणतेही कारण सांगून, मी त्याच्याबद्दल मुळीच रदबदली करू इच्छीत नाही किंवा त्याच्या निरागस श्रद्धेचे समर्थन करू इच्छीत नाही. उलट त्याच्या हृदयगुणांबद्दल मला खराखुरा आदर आहे हे मला स्पष्ट सांगितलं पाहिजे. सावधपणा राखूनच आपल्या मनावर जो परिणाम होऊ देतो, ज्याच्या प्रेमात उत्कटता नाही अन् ज्याचे मन त्याच्या वयाच्या मानाने फारच दूरदर्शीपणाचे आहे अन् त्यामुळे कवडी किंमतीचे आहे असा दुसरा एखादा तरुण मनुष्य जर असता, तर त्याने माझ्या नायकाच्या बाबतीत जे घडले ते कदाचित् घडू दिले नसते. हे मी कबूल करतो. पण काही प्रसंगांच्या बाबतीत भावनेच्या भरात वाहून जाणे हे कितीही अविवेकाचे असले तरी भावनाशून्य

राहण्यापेक्षा ते खरोखर अधिक प्रशंसनीय आहे, कारण ती भावना महान प्रेमातून उत्पन्न होत असते. आणि ही गोष्ट तरुणाच्या बाबतीत अधिक सत्य आहे, कारण जो तरुण नेहमी शहाणपणा बाळगतो तो संशयास्पद आणि कवडी किंमतीचा असतो असे माझे मत आहे !

यावर तर्कबुद्धी चालविणारी माणसे कदाचित म्हणतील, "पण प्रत्येक तरुण मनुष्य काही अशा भोळ्या समजुतीवर विश्वास ठेवणारा असू शकणार नाही, आणि तुमचा नायक हा काही इतरांना आदर्श होऊ शकणारा नव्हे."

याला माझे पुन्हा उत्तर आहे की होय, माझा नायक श्रद्धावान् होता, त्याची श्रद्धा पवित्र अन् स्थिर होती, पण तरीसुद्धा मी त्याच्या वतीने रदबदली करणार नाही.

माझ्या नायकाबद्दल खुलासा किंवा समर्थन मी देणार नाही, असे जरी मी वर म्हटले असले अन् कदाचित अति-उतावीळपणे म्हटले असले, तरी माझे पुढचे कथानक समजण्याच्या दृष्टीने काही खुलासा करणे अवश्य आहे असे दिसते. तर मग मी सांगतो की हा प्रश्न चमत्काराचा नव्हता. त्याच्या मनात चमत्काराविषयीची कसलीही उथळ अन् उतावळीची अपेक्षा नव्हती. आणि त्या वेळी आल्योशाला पूर्वी कल्पना करून ठेवलेल्या एखाद्या विचाराचा जय होण्याकरिता म्हणून कसल्याही चमत्कारांची गरज वाटत नव्हती. छेः, मुळीच नाही. सर्वात अगोदर जर त्याला काही दिसले असेल तर ती एकच आकृती– त्याच्या प्रिय ज्येष्ठ धर्मगुरूंची आकृती– ज्याची त्याने इतक्या भक्तिभावनेने पूजा केली होती, त्या पवित्र माणसाची आकृती. खरी गोष्ट अशी आहे की, त्याच्या शुद्ध आणि तरुण हृदयात प्रत्येक व्यक्तीबद्दल अन् वस्तूबद्दल जे प्रेम होते ते सारे गेले वर्षभर एकाच व्यक्तीवर केंद्रित झालेले होते. कदाचित ते चुकीचेही असेल. ती व्यक्ती म्हणजे त्याचे प्रिय ज्येष्ठ धर्मगुरू. इतके दिवस त्याने आपला तोच आदर्श म्हणून मानलेला होता. त्यामुळे तारुण्यातील सर्व बळ अन सर्व कार्यशक्ती त्याच आदर्शाकडे वळल्यावाचून राहणे शक्य नव्हते. इतके की त्याक्षणी इतर सर्व व्यक्ती अन् सर्व वस्तू तो विसरला होता. हे खरं आहे. ज्या भावाविषयी आपल्याला आदल्याच दिवशी इतकी चिंता अन् अस्वस्थता वाटत होती त्या दमीत्रिला, त्या भयंकर दिवशी आपण पूर्णपणे कसे विसरून गेलो, याची नंतरच्या दिवसांत त्याला आठवण झाली. ते दोनशे रुबल इल्यूशाच्या बापाला नेऊन देण्याचे आदल्याच संध्याकाळी इतक्या उत्कटतेने त्याच्या मनात असताना तेही तो विसरला होता. पण काही असलं तरी चमत्कारांची त्याला गरज नव्हती, त्याला फक्त 'ईश्वरी न्याय' हवा होता, पण ज्या आघाताने एकाएकी निष्ठुरपणे त्याच्या हृदयाला जखमी केले, त्या आघाताने त्याच्या मते तो धुडकावला गेला होता. आणि ज्या 'न्याया'ची आल्योशा प्रतीक्षा करीत राहिला होता त्या न्यायाला त्याच्या पूज्य गुरूंच्या अवशेषाने तत्काळ करून दाखविण्याच्या

चमत्कारांचे रूप अपरिहार्यपणे यावे हे काय दाखवीत होते बरे? त्यांचेच नव्हे तर मठातल्या प्रत्येकाने तोच विचार अन् तीच आशा उराशी बाळगली होती. अगदी ज्यांच्या बुद्धिमत्तेविषयी आल्योशाला आदरभाव होता त्यांनीसुद्धा. उदाहरणार्थ, धर्मगुरू पाइस्सींनीसुद्धा. त्यामुळे बिलकूल संशयग्रस्त न होता आल्योशाने इतरांच्या प्रमाणेच आपल्या स्वप्नांनासुद्धा तेच रूप दिले होते. आणि त्याने वर्षभर मठात जे जीवन घालविले, त्यामुळे त्याच्या अंतःकरणाला तीच अपेक्षा बाळगण्याची सवय झाली होती. पण खरे म्हणजे, त्याला नुसते चमत्कार नको होते, न्याय हवा होता, त्याला न्यायाची तहान होती.

आणि आता, त्याच्या मनाने, ज्याला साऱ्या जगातल्या कोणाहीपेक्षा अधिक उच्च पदवीला पोचवायला पाहिजे होते असा मनुष्य, त्याच्या हक्काचा गौरव त्याला मिळण्याऐवजी, एकदम हीन दर्जाला नेला जावा अन् त्याची अप्रतिष्ठा व्हावी हे काय? असं का म्हणून? कोणी त्याचा न्याय केला? हा फैसला देण्याची कोणी हिंमत केली? या प्रश्नांनी त्याच्या अननुभवी अन् निष्पाप हृदयाचा चुराडा केला. पवित्र पुरुषांतसुद्धा अत्यंत पवित्र असा हा मनुष्य त्याच्याहून किती तरी कमी प्रतीच्या मूर्ख जमावाच्या कुचेष्टेला अन् द्वेषपूर्ण विटंबनेला बळी पडावा हे त्याच्याने सहन होईना, त्याला मेल्याहून मेल्यासारखे झाले, नव्हे तिटकारासुद्धा वाटला. समजा चमत्कार झाले नसले, त्याच्या अपेक्षा योग्य ठरविण्याइतके आश्चर्यजनक काहीच घडले नसले तरी ही दुष्कीर्ती काय म्हणून? ही मानखंडना कशासाठी? ते द्वेषी मठवासी म्हणाले त्याप्रमाणे 'निसर्गाहून विपरीत' झालेले हे अकाली कुजणे का? ज्याचा त्यांनी धर्मगुरू फेरापोन्तची री ओढून इतक्या विजयोत्सवाने गाजावाजा केला, तो दैवी संकेत कशासाठी अन् आपल्याला असा गाजावाजा करण्याचा हक्क मिळाला आहे असे त्यांनी मानावे हे का? यांत परमेश्वराचा हात कुठे दिसतो? परमेश्वराने "या अत्यंत आणीबाणीच्या क्षणी" (तसा तो आल्योशाला वाटला होता) आपले तोंड का लपविले? जणू तो स्वतः होऊन निसर्गाच्या अंध, मूक, निर्घृण कायद्यापुढं वाकला असं का?

या कारणाने आल्योशाचे हृदय रक्तबंबाळ झाले होते. आणि अर्थात, मी मागे सांगितल्याप्रमाणे, सर्वांत मर्मभेदक गोष्ट होती ती ही की ज्याच्यावर त्याने जगात सर्वांहून जास्त प्रेम केले त्याची अशी अपकीर्ती व्हावी, अपमान व्हावा! माझ्या नायकाच्या मनातली ही कुरकुर कदाचित् उथळ अन् अविवेकी असेल, पण मी पुन्हा तिसऱ्यांदा सांगतो—आणि या माझ्या भावनेचे समर्थन करणे अवघड होईल हे कबूल करायला मी तयार आहे—की आमचा हा नायक त्यावेळी अति विवेकी झाला नाही याचा मला आनंद वाटतो. कारण समज असणारा कोणीही माणूस नेहमीच योग्य वेळी विवेकी होतो, पण तरुण मुलाच्या हृदयावर अशा अपवादात्मक वेळी जर प्रेम वर्चस्व गाजविणार नाही तर केव्हा गाजविणार? तथापि या घातक अन्

अस्पष्ट क्षणी आल्योशाच्या मनाच्या पृष्ठभागावर काही काळ जे काही एक विलक्षण असे आले त्याचा उल्लेख करण्याचे मी टाळणार नाही. हे जे नवे काही तरी होते ते इवानशी त्याच्या झालेल्या संभाषणाची त्याच्या मनावर पडलेली सतावणारी छाप. ती आता आल्योशाच्या मनाला एकसारखी छळू लागली. या वेळी तिने त्याला पछाडून टाकले. अंहं, त्याच्या अंतरात्म्यातील मूलभूत, त्याच्या स्वभावाचे अंगच म्हणता येईल अशी त्याची श्रद्धा डळमळली असं नव्हतं झालं. त्याची त्याच्या परमेश्वरावर भक्ती होती अन् जरी तो एकदम आपल्या अंतरात त्याच्या विरुद्ध तक्रार करू लागला होता, तरी त्याची त्याच्यावरील श्रद्धा पक्की होती. पण आदले दिवशी इवानशी झालेल्या त्याच्या संभाषणाने जी एक अस्पष्ट पण सतावणारी अन् वाईट छाप त्याच्या मनावर राहिली होती, ती पुन्हा त्या वेळी त्याच्या अंतरात ठळक झाली अन् ती जणू त्याच्या जाणिवेच्या पृष्ठभागाकडे आपला मार्ग जोरानं काढीत वर येऊ लागली.

तिन्ही सांजा होत आल्या होत्या. अशावेळी राकितीन, आश्रमातून मठाकडे जाण्याच्या मार्गात मध्ये असलेली पाइन झाडांची राई ओलांडून, चालला असताना त्याला एकदम आल्योशा एका झाडाखाली, तोंड खाली करून जमिनीवर पडलेला दिसला, त्याची हालचाल होत नव्हती अन् तो झोपी गेल्यासारखा दिसत होता. राकितीन त्याच्याकडे गेला अन् त्याने त्याला नावाने हाक मारली.

"तू इथं, आल्योशा ? तू अशा अवस्थेला येणं..." तो आश्चर्याने बोलता बोलता एकदम थांबला. त्याला म्हणायचे होते. "तू अशा अवस्थेला येणं शक्य तरी आहे ?"

आल्योशाने त्याच्याकडे पाहिले नाही, पण त्याच्या झालेल्या थोड्याशा हालचालीवरून राकितीनला समजले की त्याने आपले शब्द ऐकले न्‌ते त्याला समजले.

"काय झालं ?" तो पुढे म्हणाला; पण त्याच्या चेहेऱ्यावरच्या आश्चर्याचे हळूहळू स्मितात रूपांतर झाले अन ते अधिकाधिक औपरोधिक होऊ लागले.

"अरे, गेले दोन तास मी तुझ्या शोधात आहे. तू एकदम दिसेनासा झालास. काय चाललंय तुझ्या मनात ? हा काय मूर्खपणा ? जरा माझ्याकडं बघ तरी..."

आल्योशाने आपलं डोके वर उचलले, तो उठून बसला अन् आपली पाठ त्याने झाडाला टेकली. तो रडत नव्हता, तरी त्याच्या चेहेऱ्यावर वेदनांचा न् चिडखोरपणाचा भाव होता. पण त्याने राकितीनकडे पाहिले नाही, आपल्या एका बाजूला तो दूर पाहात राहिला.

"तुझा चेहेरा अगदी बदलून गेलाय, माहीत आहे तुला ? त्यावर तुझा तो प्रसिद्ध सौम्यपणा मुळीसुद्धा दिसत नाही. कुणावर रागावलायस का ? तुला त्यांनी वाईट रीतीनं वागवलं का ?"

“ मला एकटं राहू दे,” आल्योशा एकदम आपल्या हाताने थकल्याचा आविर्भाव करून म्हणाला, अजूनही त्याची दृष्टी त्याच्याकडे नसून दुसरीकडेच होती.

“ ओ हो ! असं आपल्याला वाटतंय काय ? म्हणजे तुम्हीसुद्धा इतर मर्त्य माणसांप्रमाणं दुसऱ्यांच्या अंगावर ओरडता म्हणायचे. हे देवदूतपणापासून पतन आहे बरं का. ए, आल्योशा, मला तू आश्चर्यचकित केलंस हं, ऐकलंस का ? खरंच सांगतो, इथल्या कोणत्याही गोष्टीबद्दल इतकं आश्चर्य मला कधी वाटलं नव्हतं. मी तुला एक सुशिक्षित मनुष्य म्हणून नेहमी मानीत आलो...”

आल्योशाने शेवटी त्याच्याकडे पाहिले, पण ते शून्य दृष्टीने, जणू तो काय म्हणाला ते त्याला समजलेच नाही.

“ तुझा तो म्हातारा कुजायला लागला, त्यानं तू इतकं अस्वस्थ व्हावं ? हे खरोखर शक्य आहे काय ? तो चमत्कार करणार असा खरोखरच तुझा विश्वास होता असं तर तुला म्हणायचं नाही ? ” राकितीन पुन्हा खरोखरच आश्चर्य वाटून उद्‌गारला.

“ माझा विश्वास होता, माझा विश्वास आहे, मला विश्वास ठेवायचा आहे अन् मी विश्वास ठेवणार, काय म्हणायचं आहे तुला ? ” आल्योशा चिडून ओरडला.

“ काहीच नाही, माझ्या मुला. सारं जाऊ दे मसणात. अरे, आता तेरा वर्षांचं शाळकरी पोरसुद्धा यावर विश्वास ठेवीत नाही. पण राहू दे... तेव्हा आता तू तुझ्या ईश्वरावर रागावला आहेस, त्याच्याविरुद्ध बंड करून उठला आहेस; त्यानं बढती दिली नाही, त्यानं गुणवत्ता पदवी बहाल केली नाही, होय ना ? अरे तुम्ही एकाच जातीचे ! ”

आल्योशा अर्धवट डोळे मिटून राकितीनकडे बराच वेळ पाहत राहिला, अन् एकाएकी त्याच्या डोळ्यांत चमक आली... पण त्यात राकितीनविषयी राग नव्हता.

“ मी माझ्या ईश्वराविरुद्ध बंड करीत नाही. मी फक्त ‘ त्याचं जग मान्य करीत नाही.’ ” आल्योशाने बळेबळेच स्मित केले.

“ तू जग मान्य करीत नाहीस म्हणालास, त्याचा अर्थ काय ? ” राकितीनने क्षणभर त्याच्या उत्तरावर विचार केला. “ हा काय वेडेपणा ? ”

आल्योशाने उत्तर दिले नाही.

“ चल, पुरे झाला बेअकलीपणा, आता कामाचे बोलू. तुला आज काही खायला मिळालं का ? ”

“ मला आठवत नाही... मला वाटतं मिळालं.”

"तुझ्या चेहऱ्यावरून ठरवायचं झालं तर तुला शक्ती सांभाळण्याची गरज आहे. तुझ्याकडं बघून वाईट वाटतं. तू सबंध रात्र झोपलाही नाहीस असं मी ऐकलं. तुमची तिकडं बैठक झाली म्हणे. आणि मग हा सारा आरडाओरडा. बहुधा तुला घासभर पवित्र रोटीखेरीज खायला काही मिळालेलं नसावं. माझ्या खिशात काही खारवलेले मांसाचे बारीक तुकडे आहेत; गरज लागली तर असावेत म्हणून मी ते शहरातून आणले आहेत, पण तू हे सॉसिज खाणार नाहीस..."

"दे थोडेसे."

"अरेच्या ! चालतात म्हणायचे तुला ! हं, हे सरळ सरळ बंडच आहे हं. अगदी मोर्चे लावून ! बरं माझ्या मुला, आपण त्याचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊ या. चल माझ्या बिऱ्हाडी... मला स्वतःला थोडीशी व्होडका घेतली तर बरं वाटेल. मी थकून अगदी लोळागोळा होऊन गेलोय; व्होडका तुला नाही चालायची, मला वाटतं... की चालेल थोडीशी ?"

"थोडी व्होडकाही दे मला."

"बापरे, ! तू तर मला चकितच करून सोडलंस, बाबा !" राकितीन त्याच्याकडे आश्चर्याने पाहात म्हणाला, "बरं, हे नाही ते, व्होडका म्हण किंवा सॉसिजिस म्हण, हा उत्तम योग आलाय अन् तो चुकवता कामा नये. चल."

आल्योशा मुकाट्याने उभा राहिला अन् राकितीनच्या मागोमाग चालू लागला.

"तुझ्या त्या चिमुकल्या भाबाला इवानला जर हे पाहायला मिळालं तर त्याला आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. बरं पण हे पहा, तुझा भाऊ इवान आज सकाळी मॉस्कोला रवाना झाला, माहीत होतं तुला ?"

"होय," आल्योशा विमनस्कतेने म्हणाला, आणि एकदम त्याच्या डोळ्यांपुढे त्याचा भाऊ दमीत्रि याची मूर्ती उभी राहिली. पण ती क्षणभरच; आणि जरी त्यामुळे त्याला एक स्मरण झालं की, अशी एक गोष्ट आहे की, जी क्षणभर-सुद्धा लांबणीवर टाकता कामा नये, ते कर्तव्य आहे, ते आपल्यावर एक बंधन आहे, तरी त्या स्मरणाचासुद्धा त्याच्यावर काही प्रभाव पडला नाही, ते त्याच्या अंतरापर्यंत जाऊन पोचलेच नाही, लगेच त्याच्या चित्रातून ते मावळले न् विसरले गेले. पण, त्यानंतर पुष्कळ दिवसांनी आल्योशाला या गोष्टीची आठवण राहिली.

"तुझा भाऊ इवान यानं एकदा म्हटलं होतं की मी एक 'जुन्या मताला न जुमानणारा एक नंबरचा ढोंग्या' आहे. एकदा तुलासुद्धा मी 'अप्रतिष्ठित' आहे असं मला जाणवून दिल्याशिवाय राहवलं नाही. ठीक ! आता तुमची बुद्धी अन् प्रतिष्ठितपणाची जाणीव तुमच्यासाठी काय करते ते मला पाहायचं आहे." हा शेवटचा शब्दप्रयोग राकितीनने आपल्याशीच तोंडातल्या तोंडात केला.

"ऐका!" तो मोठ्याने म्हणाला, "आपण मठाच्या पलीकडून शहराकडं जाणाऱ्या त्या रस्त्यानं जाऊ या. अरे हो! मला मादाम होहलाहोवाकडंसुद्धा जायचं आहे बरं का. काय बघा, तिला मी तिथे जे काय घडलं ते सगळं पत्रानं कळवलं, अन् तुला खरं तरी वाटेल, तिनं मला लगेच पेन्सिलीनं उत्तर पाठवून लिहिलं (त्या बाईला चिठ्या लिहिण्याचा भारी छंद आहे.) की 'धर्मगुरू झसीमफांसारख्या पूजनीय चारित्र्याच्या माणसाकडून अशा तऱ्हेची वागणूक मी कधी अपेक्षिली नसती? 'वागणूक' हा तिचा शब्द होता. बरं का, तिला रागही आला आहे. तुम्ही एकाच जातीचे सारे! थांब!" तो पुनः एकदम ओरडला. तो एकाएकी थांबला अन् आल्योशाला खांद्याला धरून त्यालाही त्याने थांबविले.

"तू सांगशील आल्योशा?" त्याने चौकसपणाने त्याच्या डोळ्यांत पाहिले, त्याच्या डोक्यात एकाएकी आलेल्या एका नव्या विचारात तो गर्क झाला, आणि जरी तो वरवर हसत होता तरी तो नवा विचार बाहेर बोलून दाखविण्याची त्याला भीती वाटलीसे दिसले. आल्योशा ज्या विलक्षण अन् अनपेक्षित मनःस्थितीत त्याला दिसला त्यावर विश्वास ठेवणे त्याला इतके कठीण वाटले की, "आल्योशा, आपण कुठे जाणे बरे होईल ठाऊक आहे?" हे शब्द त्यानं शेवटी भीत भीत, अन् हळूच त्याच्या पोटात शिरण्याच्या दृष्टीने उच्चारले.

"मला पर्वा नाही... तुला वाटेल तिथं."

"आपण ग्रूशिंकाकडं जाऊ या, हं? येशील तू?" शेवटी राकितीन भित्र्या अनिश्चिततेने कापत बोलला.

"चला, ग्रूशिंकाकडं जाऊ," आल्योशा चटकन् थंडपणे म्हणाला आणि ही तत्काळ दिलेली न् शांतपणाची संमती राकितीनला इतकी आश्चर्यजनक वाटली की त्याला एकदम धक्काच बसला.

"छान! खरंच छान!" तो आश्चर्यानं ओरडला, पण आल्योशाचा हात घट्ट धरून त्याने त्याला वाटेने चालविले, अजूनही त्याला तो आपले मन बदलील अशी भीती वाटत होती.

ते मुकाट्याने चालले होते, राकितीनला बोलण्याची भीती वाटत होती, हे उघड होते.

"अन् तिला किती आनंद होईल, किती हर्ष वाटेल," तो आपल्याशीच पुटपुटला, अन् पुन्हा गप्प झाला. आणि खरे म्हणजे ग्रूशिंकाला आनंद देण्याकरिता तो आल्योशाला तिच्याकडे नेत नव्हता. तो व्यवहारी माणूस होता अन् स्वतःला फायदा होण्याचा संभव असल्याखेरीज कोणतीही गोष्ट त्याने कधी हाती घेतली नव्हती. या बाबतीत त्याचा हेतू दुहेरी होता, एक म्हणजे "पुण्यशील आत्म्याचं अधःपतन" आणि आल्योशाचे "संताकडून पाप्याकडे" होणारे पतन पाहण्याची सूड भावना

आणि दुसरे म्हणजे, त्याच्या डोळ्यांपुडे त्याला स्वतःचा काही एक महत्त्वाचा लाभ साधायचा होता, त्यासंबंधाने पुढे सांगण्यात येईल.

"म्हणजे तो क्रांतिकारी क्षण आला म्हणायचा," तो द्वेषपूर्ण आनंदाने स्वतःशीच म्हणाला, "अन् तो आपण झटकन पकडणार, कारण तेच तर आपल्याला हवंय."

३

कांदा

ग्रूशिंका शहराच्या अतिशय गजबजलेल्या भागात राहात होती. तिचे बिऱ्हाड कथीड्रल चौकात मोरोझोव नावाच्या विधवा बाईच्या घराच्या अंगणात असलेल्या एका लहानशा लाकडी बंगलीत होतं. मुख्य घर म्हणजे एक मोठी दगडी दुमजली इमारत होती. ती फार जुनी अन् बेढब होती. ती विधवा बाई आपल्या दोन अविवाहित पुतण्यांसह समाजापासून अलग असे जीवन कंठीत होती; तिच्या त्या पुतण्या चांगल्या वयस्कर स्त्रिया होत्या. तिला आपली बंगली भाड्याने देण्याची काही गरज नव्हती. पण तिने ग्रूशिंकाला बिऱ्हाडकरू म्हणून चार वर्षांपूर्वी घेतले होते ते केवळ आपला आप्त व्यापारी सॅमसोनोव याला खूष करण्याकरिता म्हणूनच. तो त्या मुलीचा पालक म्हणून सर्वांना माहीत होता. आपल्या 'लाडक्या माणसा'ला त्या विधवा मोरोझोव बाईकडे ठेवण्याचा त्या मत्सरी म्हाताऱ्याचा हेतू तिने आपल्या नव्या बिऱ्हाडकरूच्या वर्तणुकीवर करडी नजर ठेवावी हा होता, असे म्हणतात. पण ही करडी नजर लवकरच अनावश्यक ठरली, आणि शेवटी असे झाले की मोरोझोव बाई ग्रूशिंकाला क्वचितच भेटू लागली आणि कोणत्याही रीतीने तिच्यावर लक्ष ठेवून तिला चिंता लावीनाशी झाली. त्या म्हाताऱ्याने या शेलाट्या, नाजूक, लाजऱ्या, भित्र्या, स्वप्नाळू अन् दुःखी मनाच्या अठरा वर्षे वयाच्या मुलीला प्रांताच्या मुख्य शहरातून आणून इथे ठेवल्याला चार वर्षे झाली होती, ही गोष्ट खरी आणि त्यानंतर बरेच काही घडून आले होते. शहरात त्या लोकांना या मुलीच्या पूर्वायुष्याबद्दल फारच थोडे माहीत होते, अन् ते थोडेसुद्धा अनिश्चित असे होते. गेल्या चार वर्षांच्या काळात अनेक माणसांचे लक्ष या सुंदर तरुणीकडे– कारण या काळात आग्राफेना अलेक्झांद्रोवना तरुण स्त्री झाली होती– लागले असले तरी तिच्या संबंधाने फारसे काहीच कळून आले नव्हते. ती सतरा वर्षांची असताना तिला कुणीतरी, कोणा सरकारी अधिकाऱ्यासारख्या माणसाने फसवले होते अन् नंतर लगेच तिला टाकून दिले होले होते, अशा अफवा होत्या. तो अधिकारी दुसरीकडे निघून गेला अन् त्याने पुढे लग्न केले, आणि इकडे ग्रूशिंका दारिद्र्यात अन् लांच्छनास्पद अवस्थेत

राहिली. असे म्हणतात की, म्हाताऱ्या सॅमसोनोवने जरी ग्रूशिंकाला त्या पतितावस्थेतून वर काढले असले, तरी ती मुळात धर्मोपदेशकांच्या वर्गातल्या एका प्रतिष्ठित कुटुंबातली होती, ती कोणा डीकनची की अशाच कुणाची तरी मुलगी होती.

आणि चार वर्षांनंतर ती हळुवार मनाची, दुखावलेली न् करुणा उत्पन्न करणारी अनाथ मुलगी आता चांगली अंगाने भरलेली, रशियन थाटाची गुलाबी सौंदर्यरमणी झाली होती. धीट अन् निश्चयी स्वभावाची, गर्विष्ठ अन् उद्दाम बाई झाली होती. तिचे डोके व्यवहारात फार चांगले चालत होते; ती लोभी होती, पैसा वाचविणारी अन् दक्ष होती, आणि बऱ्यावाईट मार्गांनी थोडीशी संपत्ती जमवून ठेवण्यात तिला यश आले होते असे म्हणतात. एकच मुद्दा असा होता की ज्यावर सर्वांचे एकमत होते. ग्रूशिंकाकडे जाणे फारसे सोपे नव्हते, आणि त्या चार वर्षांच्या काळात त्या म्हाताऱ्या पालकाखेरीज तिची कृपा मिळविल्याची प्रौढी सांगणारा एकही माणूस नव्हता. ती खरीच वस्तुस्थिती होती, कारण तिची ती कृपादृष्टी मिळविण्याकरिता धडपडणारे, विशेषतः अलीकडच्या दोन वर्षांत, बरेच लोक होते. पण त्या साऱ्यांचे प्रयत्न फुकट गेले होते. आणि तिची आराधना करणाऱ्यांपैकी काहींना तर या खंबीर मनाच्या तरुणीकडून जो पक्का अन् उपरोधी प्रतिकारात्मक टोला मिळाला त्याने त्यांना कें कें करीत आणि अगदी हास्यास्पद म्हणाली नाही तरी माघार घ्यावी लागली होती. ही तरुणी, ज्याला 'सट्टा खेळणं' म्हणतात त्या नादाला, विशेषतः अलीकडे लागली होती, आणि त्या कामात तिने चांगलीच करामत दाखविली होती, हे सर्वश्रुत होते; त्यामुळे ज्यूमध्ये अन् तिच्यामध्ये मुळीच फरक नाही असे पुष्कळ लोक बोलू लागले होते. याचा अर्थ ती व्याजाने पैसे कर्जाऊ देत असे असे नव्हे, पण, उदाहरणार्थ म्हणून, हे लोकांना माहीत होते की गेल्या काही दिवसांत तिने म्हाताऱ्या कारमाझफच्या भागीदारीने, थकलेली कर्जे यःकश्चित किंमत देऊन, म्हणजे त्यांच्या दर्शनी किंमतीचा दहावा हिस्सा किंमत देऊन, खरेदी करण्यात आपला पैसा प्रत्यक्ष गुंतवला होता, आणि नंतर त्यातून त्यांच्या किंमतीच्या दसपट पैसे काढले होते.

तो म्हातारा विधुर सॅमसोनोव, बडा श्रीमंत माणूस होता. कंजूष अन् निर्दय होता. त्याने वयाने मोठ्या असलेल्या आपल्या मुलावर जुलूम केला होता, पण गेल्या वर्षी, तो आजारी पडला असताना आणि त्याचे सुजलेले पाय निकामी झाले असताना तो बराचसा आपल्या त्या आश्रित मुलीच्या प्रभावाखाली आला होता. प्रथम त्याने तिला कडकपणे अन् गरिबीच्या परिस्थितीत "लेंटच्या आहारावर" (तोटक्या आहारावर; असे त्या वेळी थट्टेखोर लोक म्हणत) ठेवले होते. पण ग्रूशिंकाने स्वतःची सुटका करून घेण्यात यश मिळविले होते, आणि त्याच वेळी त्याच्या मनात आपल्या इमानदारीविषयी अमर्याद विश्वास उत्पन्न केला होता. त्या म्हाताऱ्याला मरून आता बराच काळ लोटला आहे. पण त्याच्या काळी तो मोठा

व्यापार धंदा करीत असे आणि तो विशेष लक्षात भरण्याजोग्या स्वभावाचा माणूस होता. कंजूष आणि काळ्या फत्तरासारखा कठीण. ग्रूशिंकाचा त्याच्यावर इतका जबर पगडा होता की तो तिच्याशिवाय राहू शकत नव्हता. (आणि ही स्थिती गेली दोन वर्षे विशेष होती) तरी त्याने तिच्याकरता फार मोठी संपत्ती ठेवलेली नव्हती. तिने त्याला सोडून जाण्याची धमकी दिली असती तरी ती ठेवायला तो राजी झाला नसता. परंतु त्याने तिला एक लहनशी रक्कम बक्षीस दिली होती, आणि ते जेव्हा सर्वांना कळले तेव्हा ते त्याचेसुद्धा प्रत्येकाला आश्चर्यच वाटले.

त्याने तिला आठ हजार रुबल दिले त्या वेळी तो तिला म्हणाला, "तू चांगली डोकेबाज पोरगी आहेस, आणि तुझी काळजी तूच घेतली पाहिजेस, पण मी तुला सांगून ठेवतो की तुला माझ्याकडून पूर्वीपासून जो वार्षिक तनखा मिळतो तो सोडून तुला मी मरेपर्यंत एक कवडी जास्त मिळणार नाही, अन् मी तुझ्यासाठी माझ्या मृत्युपत्रातही काही ठेवणार नाही."

आणि त्याने आपले म्हणणे खरे केले; तो मेला आणि त्याने सर्व काही आपल्या मुलांना ठेवले, याच मुलांना त्याने त्यांच्या बायकांमुलांसह आयुष्यभर स्वतःच्या चाकरांप्रमाणे वागविले होते. त्याच्या मृत्युपत्रात ग्रूशिंकाचा उल्लेखसुद्धा नव्हता. हे सर्व मागाहून कळले. त्याने ग्रूशिंकाला तिचे भांडवल वाढविण्याच्या बाबतीत– सल्ला मसलत देऊन मदत केली आणि तिला धंदा लावून दिला.

फयोदर पावलोविचचा प्रथम एका सट्ट्याच्या निमित्ताने ग्रूशिंकाशी संबंध आला, आणि शेवटी आपण तिच्या प्रेमाने पागल झाल्याचे त्याला आढळून आले. तेव्हा त्याचे त्यालाच आश्चर्य वाटले. ही गोष्ट म्हाताऱ्या सॅमसोनोवला जेव्हा कळली तेव्हा तो भयंकर आजारी होता, तरी त्याला या गोष्टीची फारच गंमत वाटली. त्या म्हाताऱ्याशी ओळख झाल्यापासूनच्या सगळ्या काळात ग्रूशिंकाचे त्या म्हाताऱ्याशी वागणे पूर्णपणे अन् उस्फूर्तपणे निखालसपणाचे होते हे लक्षणीय होते, अन् ज्याच्याशी ती अशा तऱ्हेने वागली असा बहुधा तोच एक मनुष्य असावा. अलीकडे जेव्हा दमीत्रिही तिच्यावर प्रेम करू लागला, तेव्हा मात्र म्हाताऱ्याने हसणे सोडून दिले. उलट, त्याने ग्रूशिंकाला कडक अन् कळकळीचा सल्ला दिला–

"या दोघा बापलेकांत जर तुला निवडच करायची झाली तर तू म्हाताऱ्याची निवड केलेली बरी. मात्र याची खात्री करून घे की तो बदमाष तुझ्याशी लग्न करील अन् आगाऊच तुला काही मिळकत कायमची करून देईल. याची खात्री करून घे. पण त्या कॅप्टनबरोबर संबंध वाढवू नकोस, त्यातून तुझे काही भले होणार नाही."

त्या म्हाताऱ्या बदफैली माणसाचे हेच शेवटचे शब्द होते, त्याला अगोदरच कळून चुकले होते की आपले मरण आता फार दूर नाही अन् तो खरोखर त्यानंतर पाच महिन्यांनीच मेला.

जाता जाता मी हेही नमूद करून ठेवतो की आमच्या शहरातल्या पुष्कळांना जरी कारमाझफ बाप–लेकांची ग्रूशिंकासंबंधीची तऱ्हेवाईक अन् राक्षसी स्पर्धा माहीत होती, तरी त्या दोघांच्या बाबतीतील तिच्या वृत्तीच्या बुडाशी खरोखर काय होते हे क्वचितच कोणाला कळले होते. ज्या अनर्थासंबंधी मी पुढे सांगणार आहे त्या अनर्थानंतर ग्रूशिंकाच्या दोन नोकर बायांनीसुद्धा कोर्टात अशी साक्ष दिली की ती दमीत्रि फ्योदरोविचला आत घेत असे ती केवळ "त्यानं तिला खुनाची धमकी दिली." म्हणूनच. या नोकर बाया म्हणजे एक तिची म्हातारी स्वैपाकीण. ती नेहमी आजारीशी अन् बहिरट होती, ती ग्रूशिंकाच्या पहिल्या घरून आली होती, आणि दुसरी त्या म्हातारीची नात ती चलाख तरुण पोरगी, वीस एक वर्षांची होती. ती मोलकरणीची सर्व कामे करी. ग्रूशिंका फार काटकसरीने राहात असे आणि तिच्या आजूबाजूचे वातावरण ऐषआरामीचे मुळीच नसे. तिच्या घरात तीन खोल्या होत्या, त्यात सन १८२० च्या फॅशनचे शिसवी सामान होते अन् ते तिच्या घरमालकिणीचे होते.

राकितीन न् आल्योशा यांनी जेव्हा तिच्या घरात प्रवेश केला तेव्हा अंधारच पडला होता, अन् खोल्यात दिवे लावलेले नव्हते. ग्रूशिंका आपल्या दिवाणखान्यात एका मोठ्या कठीण, बेढब शिसवी पाठ असलेल्या कोचावर पडलेली होती. कोचावर घाणरेड्या अन् फाटक्या कातड्याचे आच्छादन घातलेले होते. तिच्या डोक्याखाली तिच्या अंथरुणातल्या काढलेल्या दोन पांढऱ्या शुभ्र उशा होत्या. ती हात डोक्याखाली घेऊन पाय पसरून निश्चल उताणी पडली होती. जणू कोणाची तरी वाट पाहात असल्याप्रमाणे. तिने काळा रेशमी पोषाख केलेला होता आणि डोक्याला सुरेख जाळीदार त्रिकोणी रुमाल बांधला होता, तो तिला अतिशय शोभून दिसत होता. तिने खांद्यावर एक जाळीदार शाल टाकली होती अन् ती मोठ्या सोन्याच्या आकड्याने टाचून टाकली होती. ती खात्रीने कोणाची तरी वाट पाहात होती. ती अधीर होऊन कंटाळल्याप्रमाणे पडली होती, तिचा चेहरा फिकटसा झाला होता आणि तिचे ओठ न् डोळे गरम झाले होते, ती अस्वस्थपणे आपल्या उजव्या पायाच्या टोकाने त्या कोचाच्या हातावर टकटक करीत होती. राकितीन न् आल्योशा आलेले दिसताच तिच्या मनाची थोडीशी चलबिचल झाली. कोचावरून एकदम उठून घाबरलेल्या स्वरात "कोण आहे तिकडं?" असं ती ओरडली ते त्यांना मोठ्या दालनात ऐकू आले. पण मोलकरीण आलेल्या माणसांना भेटली अन् चटकन् आपल्या मालकिणीकडे वळून मोठ्यानं म्हणाली: "तो नाही, तसं काही नाही, हे दुसरेच पाहुणे आहेत."

"हे काय बरं असावं?" आल्योशाला दिवाणखान्यात घेऊन जाताना राकितीन पुटपुटला.

ग्रूशिंका कोचापाशीच अजून भ्यालेल्या अवस्थेत असल्यासारखी उभी होती. तिच्या गडद तपकिरी रंगाच्या केसांची एक जाड बट वरच्या जाळीदार आच्छादनातून निसटून खाली आली होती अन् तिच्या उजव्या खांद्यावर पडली होती पण तिला ती दिसली नाही आणि आपल्याकडे आलेल्या माणसांना पाहून त्यांना ओळखीपर्यंत तिनं ती परत आत सारली नाही.

"अरे, राकितीन, तू आहेस? किती मला घाबरवून सोडलंस. हे कुणाला आणलंयस तू? हे कोण आहे तुझ्याबरोबर? ओहो, यांना तू आणलंस्?" ती आल्योशाला ओळखून एकदम उद्‌गारली.

"मेणबत्त्या आणायला सांग बरं!" अत्यंत सलगीचा मित्र जसा घरात हुकूम सोडण्याचा अधिकार आहे असे समजतो तशा मोकळ्या ढाकळ्या आविर्भावानं राकितीन म्हणाला.

"मेणबत्त्या... हो, खरंच मेणबत्त्या... फेनिया, याच्यासाठी एक मेणबत्ती घेऊन ये बरं... वा, यांना आणायचा बरा मुहूर्त शोधून काढलास!" ती पुन्हा आल्योशाकडे मान करून उद्‌गारली अन् आरशाकडे वळून दोन्ही हातांनी आपले केस झटपट नीट बसवू लागली, ती नाखूष झाल्यासारखी दिसली.

"तुला खूष करण्यासारखं माझ्याकडून नाही घडलं?" राकितीनने चटकन दुखावल्यासारखे होऊन विचारले.

"तू मला घाबरवून सोडलंस राकितीन, एवढंच," ग्रूशिंका स्मित करीत आल्योशाकडे वळली.

"मला भिऊ नका, प्रिय आल्योशा, अपेक्षा नसलेलं माणूस भेटायला आलं, तुम्हाला बघून मला किती आनंद झालाय तो तुम्हाला समजणार नाही. पण तू मला घाबरवून सोडलंस राकितीन, मला वाटलं मीत्याच आत घुसून आला. अरे, आत्ताच मी त्याला चकवलं, माझ्यावर विश्वास ठेवण्याचं की त्याच्याकडून वचन घेतलं अन् मी त्याला खोटंच सांगितलं. मी त्याला सांगितलं मी ही संध्याकाळ माझ्या म्हाताऱ्या बरोबर म्हणजे कुझमा कुझमिचबरोबर घालविणार आहे, अन् तिथंच उशिरापर्यंत त्याचे पैसे मोजीत मी थांबणार आहे. मी नेहमी आठवड्यातून एक संध्याकाळ त्याच्याबरोबर त्याचे हिशेब जमवीत बसते. आम्ही कुलूप लावून आत बसतो अन् तो मोजमण्यांनी मोजतो अन् मी बसून वहीत टिपून ठेवते. एकट्या माझ्यावरच त्याचा विश्वास आहे. मीत्याची कल्पना अशी आहे की, मी तिकडंच आहे, पण मी परत आले अन् एका बातमीची वाट पाहत इथं कोंडून घेऊन बसलेली आहे. तुम्हाला फेनियानं आत कसं येऊ दिलं? फेनिया, फेनिया, धावत धावत फाटकाकडं जा, अन फाटक उघडून कॅप्टन कुठं दिसतो का ते इकडं तिकडं पाहा! कदाचित तो छपून पाळत ठेवून बसला असेल. मी अतिशय घाबरून गेले आहे."

" तिकडं कोणी नाही, आग्राफेना मी आत्ताच बाहेर पाहून आले, मी फटीतून एकसारखी डोकावून पाहत राहाते, मीदेखील भिऊन थरथरतेआहे !"

" खिडक्यांच्या फळ्या घट्ट लावलेल्या आहेत ना, फेनिया? अन आपण पडदे खाली ओढले पाहिजेत," तिनं स्वतःच ते जड पडदे खाली ओढले. आणि म्हणाली, " आता ठीक झाले. त्याला आत उजेड दिसला तर तो एकदम आत घुसेल. मला आज तुमच्या भावाची— मीत्याची— फार भीती वाटते आहे, आल्योशा."

ग्रूशिंका मोठ्याने बोलत होती, आणि जरी ती भ्यालेली होती, तरी तिला कशाचा तरी आनंद वाटत होतासे दिसले.

" तुला आजच मीत्याची इतकी भीती का वाटावी ? " राकितीनने विचारले. " तुला त्याची भीती नाही असं मला वाटत होतं. तू तर त्याला आपल्या बोटावर नाचवशील."

" मी तुला सांगितलं ना, मी एका बातमीची, फार मोलाच्या बातमीची, वाट पाहाते आहे म्हणून, म्हणून मला मीत्या इथं मुळीच नको. मी कुझमा कुझमिचकडं थांबेन यावर त्याचा विश्वास बसला नाही, मला वाटतं बसला नसावा. तो आता त्याच्या लपण्याच्या जागी असेल, फ्योदर पावलोविचच्या घरच्या मागच्या बाजूला, बागेत, माझ्यावर पाळत ठेवीत. अन् तिथं जर तो असला, तर तो इकडं येणार नाही, तितकंच बरं ! पण मी खरंच कुझमा कुझमिचकडं गेले होते. मीत्यानंच मला तिथं नेऊन सोडलं. मी त्याला म्हटलं मी इथं मध्यरात्रीपर्यंत राहीन, आणि मला मध्यरात्री इथून घेऊन जायला तू जरूर ये असं मी त्याला सांगितलं. तो निघून गेला आणि मी कुझमा कुझमिचपाशी दहा मिनिटं बसून परत इकडं आले. बाई ग ! मी भ्याले होते; तो भेटेल या भीतीनं मी धावत आले."

" आणि तू असा पोषाख करून का बसली आहेस? किती विचित्र टोपी वर घातली आहेस !"

" तू स्वतःच किती विचित्र आहेस, राकितिन ! मी तुला सांगते, मी एका निरोपाची वाट पाहाते आहे. तो निरोप जर आला तर मी उडून जाईन, मी घोड— दौडीनं निघून जाईन अन् तुम्हाला पुन्हा कधी दिसणार नाही.म्हणूनच मी हा पोषाख केला. म्हटलं तयार असावं.

" अन् आपली स्वारी कुठं उडून जाणार ? "

तुला अती कळलं, तर तू अती लवकर म्हातारा होशील."

" अरेच्चा ! तू तर फारच आनंदात दिसतेस... अशी मी तुला पूर्वी कधी पाहिली नव्हती. तू नटली आहेस ती एखाद्या नाचाला जाण्याच्या तयारीनं." राकितीनने तिला आपाद मस्तक पाहिले.

" तुला नाचांची भारीच माहिती आहे नाही का ! "

"आणि तुला तरी त्यांची बरीच माहिती आहे का ?"

"मी एक नाच पाहिला आहे. गेल्याच्या गेल्या वर्षी, कुझमा कुझामिचच्या मुलाचं लग्न झालं अन् मी गॅलरीतून पाहिलं. राकितीन, मी तुझ्याशी बोलत राहावं अन् यांच्यासारख्या राजकुमारानं उभं राहावं असं समजतोस काय? केवढे मोठे हे पाहुणे ? आल्योशा, माझ्या लाडक्या मुला, मी तुझ्याकडं पाहते न् माझा माझ्या डोळ्यांवरच विश्वास बसत नाही. खरंच ? तू मला भेटायला आलास हे शक्य तरी आहे काय? तुला खरं सांगायचं तर तुला भेटण्याचा विचारदेखील कधी माझ्या मनात आला नाही अन् तू कधी माझ्याकडं येशील अन् मला भेटशील असंही मला वाटलं नाही. ही जरी योग्य वेळ नसली, तरी तुला बघून किती आनंद झाला आहे. या इथं कोचावर बैस, अस्सं, माझ्या तेजस्वी तरुण चंद्रा. मला अजूनही हे खरं वाटत नाही... हं:, राकितीन, तू याला काल किंवा परवा आणलं असतंस तर ! पण आहे त्यांतच मला आनंद आहे. कदाचित हा आता, या अशा वेळी आला, परवाच्या दिवशी नाही आला, ते बरंच झालं."

ती खुषीने आल्योशाशेजारी कोचावर बसली, आणि त्याच्याकडे खरोखर आनंद भराने पाहू लागली, तिला खरोखरच आनंद झाला होता. ती तसे म्हणाली ते खोटे नव्हते. तिचे डोळे आनंदाने चमकले, ओठ हास्य करू लागले, पण ते हास्य सद्भावपूर्ण आनंदाचे हास्य होते. इतका प्रेमळ भाव तिच्या चेहऱ्यावर दिसेल अशी आल्योशाला अपेक्षा नव्हती ... तो आल्या दिवसापर्यंत तिला क्वचित्च कधी भेटला होता, त्याने तिच्यासंबंधी एक भीतीची कल्पना केली होती, आणि तिने आदल्या दिवशी कातिरीना इवानोवनाशी जी द्वेषपूर्ण न् दगाबाज बतावणी केली होती त्यानं तो भयंकर अस्वस्थ झाला होता. या वेळी तिला अपेक्षिल्या-पेक्षा सर्वस्वी भिन्न असलेली पाहून तो अतिशय चकित झाला. आणि, स्वतःच्याच दुःखाने तो चिरडून गेलेला असल्यामुळे, त्याचे डोळे अभावितपणे लक्षपूर्वक तिच्या-वर विसावले. कालपासून तिची सारी वागण्याची तऱ्हाच बदलून ती चांगली झाली होती. तिच्या बोलण्यात शिसारी आणणाऱ्या त्या मधुरतेचा, अन् हालचालीत त्या वासनोद्दीपक मृदुतेचा, लवलेशही नव्हता. सर्व काही साधे अन् सद्भावपूर्ण होते, तिचे हावभाव गतिमान, उत्स्फूर्त, विश्वास टाकणारे होते, पण ती बरीच उद्दीपित झालेली होती.

"अगबाई, प्रत्येक गोष्ट आज कशी जुळून येत आहे !" ती पुन्हा भरभर बोलली. "अन् तुला बघून मला इतका आनंद का झाला हे माझं मलाच सांगता येणार नाही, आल्योशा ! मला विचारशील तर, मी नाहीच तुला सांगू शकणार."

"चल, तुला आनंद का झाला ते तुला माहीत नाही ?" राकितीन हसून म्हणाला. "तू मला नेहमीच याला आण म्हणून सतावायचीस, तुझा काही हेतू होता मला वाटतं."

" माझा एक वेगळाच हेतू एकेकाळी होता, पण आता तो संपला आहे, त्याची ही वेळ नाही. हे बघ, तू काहीतरी छान घ्यावंस अशी माझी इच्छा आहे. आता मी इतक्या चांगल्या मनःस्थितीत आहे. राकितीन, तू सुद्धा बैस ना रे खाली, उभा का आहेस? बसलासच आहेस होय तू? राकितीन आपली काळजी घ्यायला विसरेल अशी भीतीच बाळगायला नको. बघ, आल्योशा, तो आपल्या-समोर बसलाय, त्याला मी तुझ्याअगोदर बसायला नाही सांगितलंना, म्हणून कसा रागावलाय. हुं:, राकितीन असा राग मानून घेणारा आहे!" ग्रूशिंका हसली. " रागावू नकोस, राकितीन, माझं मन आज कसं प्रेमळ झालंय. तू इतका खिन्न का, आल्योशा, माझी भीती तर वाटत नाही ना?" ती गमतीने न् मस्करीने त्याच्या डोळ्यांत पाहू लागली.

" तो दुःखी झालाय. बढती मिळाली नाही ना?" राकितीन घोगऱ्या आवाजाने म्हणाला.

" कसली बढती?"

" त्याच्या ज्येष्ठ धर्मगुरूंच्या देहाला दुर्गंधी सुटली आहे."

" काय? तू काहीतरी मूर्खासारखं बोलतो आहेस, तुला काहीतरी घाणेरडं बोलायचं आहे. गप्प बैस, मूर्खा! मला तुझ्या मांडीवर बसू दे, आल्योशा, अस्सं." तिनं चटकन् पुढं उसळी घेऊन हसत एखाद्या बिलगून बसणाऱ्या मांजरीच्या पिला-प्रमाणं त्याच्या मांडीवर झेप घेतली अन् आपला उजवा हात त्याच्या गळ्याभोवती टाकला. " मी तुला प्रफुल्लित करते, माझ्या पवित्र मुला. हो, खरंच, तू मला तुझ्या मांडीवर बसू देशील का, रागावणार तर नाहीस ना? तू म्हणालास तर मी लगेच उठेन. अं?"

आल्योशा बोलला नाही. तो आपण हलू अशा भीतीने तसाच बसला, त्याने तिचे " तू म्हणालास तर मी लगेच उठेन" हे शब्द ऐकले, पण उत्तर दिले नाही. पण त्याच्या अंतःकरणात तसे, म्हणजे उदाहरणार्थ, आपल्या कोपऱ्यातल्या जागेवरून राकितीन त्याच्याकडे द्वेषपूर्ण दृष्टीने न्याहाळत असताना जशी त्याची कल्पना किंवा अपेक्षा झाली असेल तसे, काही नव्हते. जे कोणते विकार उद्भवू शकले असते ते सर्व त्याच्या अंतःकरणातल्या दारुण दुःखाने गिळंकृत केले होते, आणि जर त्या वेळी त्याला स्पष्टपणे विचार करणे शक्य झाले असते तर त्याला कळून आले असते की, कोणत्याही विषयलालसेपासून अन् मोहापासून त्याचं संरक्षण करणारे अत्यंत मजबूत कवच त्या वेळी त्याच्यापाशी होते. तरी त्याची आंतरिक अवस्था अशी अस्पष्ट, प्रतिसाद न देणारी असताना अन् त्याच्या दुःखाने त्याला पुरते खलास केले असतानासुद्धा आपल्या अंतःकरणात एक नवीन अन् विचित्र संवेदना उद्भवली असल्याचे पाहून त्याला आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नाही. या स्त्रीबद्दल, या 'भयंकर' स्त्रीबद्दल, आता त्याला दहशत वाटत नव्हती. स्त्रीचा

कसलाही ओंझरता विचार मनात येताच उद्भवणारी दहशत, आता मुळीच त्याला वाटत नव्हती. उलट सर्व स्त्रियांहून जिच्याबद्दल जास्त भय वाटत होते ती स्त्री यावेळी त्याच्या मांडीवर बसली होती, आणि आपल्या बाहूंत तिने त्याला धरले होते. याने यावेळी एक अगदी वेगळी, अनपेक्षित, विशेष प्रकारची भावना, अतिशय गाढ अन् अत्यंत शुद्ध आस्थेची भावना, जिच्यात भीतीचा, त्याला पूर्वी वाटणाऱ्या दहशतीचा लवलेशही नव्हता, अशी भावना, त्याच्या मनात उत्पन्न झाली. याचेच त्याला अभावितपणे नवल वाटले.

"तू पुष्कळ मूर्खासारखं बडबडलीस," राकितीन म्हणाला, "आता आम्हाला थोडी शांपेन दिलीस तर बरं होईल. तू मला ती देणं आहेस, ते तुला माहीत आहे!"

"होय, देणं आहे खरी. तुला माहीत आहे, आल्योशा. यानं जर तुला आणलं तर सर्व काही देऊन वर मी याला शांपेन देण्याचं वचन दिलं होतं. मीसुद्धा थोडी घेईन! फेनिया, फेनिया, मीत्या ठेवून गेलाय ती बाटली, आण बरं इकडं! झटकन आण! जरी मी इतकी कंजूष असले तरी एका बाटलीचा खर्च मी सहन करीन. तुझ्याकरिता नव्हे हं राकितीन, तू कुत्र्याची छत्री आहेस, हा ससाणा आहे! आणि माझं हृदय काही अगदी वेगळ्या गोष्टीनं भरलं असलं तरी मी तुमच्याबरोबर पिईन. मलाही थोडं दुसरीकडं लक्ष जावं असं केव्हापासून वाटतंय."

"पण तुला झालंय काय? अन् हा निरोप कसला, ते विचारू का, का ते गुपित आहे?" राकितीनने चौकसपणे मध्येच विचारले. त्याला उद्देशून तिने जे एकसारखे टोमणे मारले ते आपण लक्षातच घेतले नाहीत असा आव आणण्याचा तो शक्य तितका प्रयत्न करीत होता.

"छेः, ते गुपित नाही, अन् ते तुला माहीतही आहे," ग्रूशिंका म्हणाली, तिचा स्वर एकदम सचिंत झाला. तिने आपली मान राकितीनकडे वळविली, आणि जरी ती अजूनही आल्योशाच्या मांडीवर बसली होती अन् तिचा हात त्याच्या माने-भोवती होता तरी त्याच्यापासून जरा ती लांब झाली. "माझा हपिसर येणार आहे, राकितीन, माझा हपिसर येणार आहे."

"मी ऐकलंय खरं की, तो येणार आहे, पण तो इतका जवळ आलेला आहे?"

"तो आता मोक्रोय इथं आहे, तिकडून एक जासूद पाठवीन असं त्यानं लिहिलंय. त्याचं पत्र मला आजच मिळालं. त्या जासूदाची मी क्षणाक्षणाला वाट पाहात आहे."

"खरं की काय? मोक्रोयला कशाला जातेस?"

"ती एक लांबलचक कथा आहे, मी तुला बरंच सांगितलंय."

"मीत्या आता काही तरी करणार मला वाटतं! त्याला हे माहीत आहे की नाही?"

" त्याला माहिती ? ' छेः, त्याला अर्थातच माहीती नाही. त्याला माहीत झालं तर खून पडेल. पण मला आता त्याची भीती नाही वाटत. त्याच्या सुऱ्याची मला भीती नाही वाटत. गप राहा, राकितीन, दमीत्रि फ्योदरोविचची मला आठवण करून देऊ नको. त्यानं माझ्या हृदयाला जखम केली आहे. आणि यावेळी मला त्याविषयी विचार ही करावासा वाटत नाही. इथं मी आल्योशाचा विचार करू शकेन, त्याच्याकडं पाहू शकेन...माझ्याकडं बघून हास पाहू, लाडक्या, प्रफुल्लित हो, माझ्या मूर्खपणाकडं बघून हास ना, मला बरं वाटावं म्हणून...ओहो, हसला रे हसला ! किती मायेनं हा माझ्याकडं बघतोय ! अन् बरं का आल्योशा, आता एकसारखं मला वाटत होतं तू माझ्यावर रागावलायस, परवा दिवशीच्या त्या कारणामुळं त्या तरुण स्त्रीच्या संबंधात मी अगदी हलकटपणे वागले. खरं आहे ते... पण तसं घडलं हे बरंच झालं. ती महाभयानक गोष्ट होती तरी चांगली पण होती." ग्रूशिंका स्वप्नाळूपणे हसली अन् एक क्रूर छटा तिच्या त्या स्मितात उमटली. मीत्या मला म्हणाला की ती मोठ्यानं किंचाळली. म्हणे की मला 'फटके मारले पाहिजेत.' मी तिचा खरंच भयंकर अपमान केला. तिनं मला बोलावून घेतलं, तिला माझ्यावर विजय मिळवायचा होता, आपल्या चॉकोलेटनं मला जिंकून घ्यायचं होतं... हंः, त्याचा शेवट तसा झाला हे बरंच झालं." ती पुन्हा हसली. "पण अजून मला रागावशील की काय अशी भीती वाटते."

" होय, ते खरंच आहे," राकितीन, खरोखरच आश्चर्य वाटून, मध्येच बोलला. " आल्योशा, ती खरोखरच तुझ्यासारख्या कोंबडीच्या पिलाला भिते बघ."

" तो तुला कोंबडीचं पिलू वाटतो राकितीन्... कारण तुला सदसद्विवेकबुद्धीच मुळी नाही, खरंच नाही ! माझं याच्यावर अगदी अंतःकरणापासून प्रेम आहे, खरं खरं आहे ! आल्योशा, माझं तुझ्यावर अगदी अंतःकरणापासून प्रेम आहे यावर तुझा विश्वास आहे ? "

" हेः, काय निर्लज्ज स्त्री आहे ! ती तुझ्यापुढं आपलं प्रेम जाहीर करते आहे, अलेक्सी !"

" हो, मग काय झालं ? माझं प्रेम आहे त्याच्यावर ! "

" अन् मग तुझ्या हपिसराचं काय ? आणि मोक्रोयहून यायच्या त्या बहुमोल निरोपाचं ? "

" ते अगदी वेगळं आहे."

" त्याकडं पाहण्याची ही स्त्रीची रीत आहे ! "

" राकितीन, मला उगीच राग आणू नको. " ग्रूशिंकाने संतापून मध्येच त्याला अडवले. " ही गोष्ट अगदी वेगळी आहे. माझं आल्योशावर वेगळ्या प्रकारचं प्रेम आहे. आल्योशा, मागं मी तुझ्याविरुद्ध चोरून बेत केले होते हे खरं आहे. कारण

मी एक महाभयानक हिंसक प्राणी आहे. पण इतर वेळी, आल्योशा, मी तुला माझी मनोदेवता म्हणून मानलं आहे. मी नेहमी विचार करीत आले— याच्यासारखा माणूस माझ्यासारख्या गलिच्छ वस्तूचा किती तिरस्कार करीत असला पाहिजे बरं, ' परवा मी त्या तरुण स्त्रीच्या घराकडून इकडे पळाले ना, त्यावेळी हाच विचार माझ्या मनात होता. त्या तऱ्हेनं मी फार दिवस तुझ्याविषयी विचार केलाय आल्योशा, अन् मीत्याला हे माहीत आहे, मी त्याच्याजवळ त्याबद्दल बोलले आहे. मीत्याचीही समजूत पटली आहे. मी कधी कधी तुझ्याकडं पाहाते अन् मला शरम वाटते, स्वतःची मला अतिशय शरम वाटायला लागते हे तुला खरं वाटेल ?...अन् असा मी तुझ्याविषयी कसा न् केव्हापासून विचार करायला लागले मला नाही सांगता येणार, मला आठवत नाही..."

फेनिया आत आली आणि तिने बूच काढलेली बाटली अन् तीन शांपेनचे पेले असलेले तबक टेबलावर ठेवले.

"ही आली शांपेन !" राकितीन ओरडून म्हणाला, "तू भावनेनं उद्दीपित झाली आहेस. आग्राफेना अलेक्झांद्रोवना, तू शुद्धीवर नाहीस. एक शांपेनचा पेला घेतलास की तू नाचायला तयार होशील. हेः, ह्या लोकांना एवढीसुद्धा गोष्ट नीट करता येत नाही," तो बाटलीकडे पाहात म्हणाला. "त्या म्हातारीनं स्वैपाकघरातच ऊन झालेले पेले भरले अन् तू बूच काढलेली बाटली इथं आणून ठेवली. बरं, असू दे, मला थोडी घेऊ दे."

तो टेबलाकडे गेला, त्याने एक पेला घेतला अन् एका घोटासरशी रिकामा करून दुसरा पुन्हा भरला.

"माणसाला शांपेन सहजासहजी मिळत नाही," तो आपले ओठ चाटीत म्हणालाः "हं, आता. आल्योशा, एक पेला घे, तू काय करू शकतोस ते दाखव ! आपण कशाचं चिंतन करून पिऊ या ? स्वर्गाच्या दरवाज्याचं ? पेला उचल, ग्रूशिंका, तूही स्वर्गाच्या दरवाज्याचं चिंतन करून पी."

"कसले स्वर्गाचे दरवाजे ?"

तिने एक पेला घेतला, आल्योशाने आपला घेतला, त्याची चव घेतली अन् तो खाली ठेवला.

"नको, न घेणं बरं," तो मंदपणे हसला.

"अन् तू फुशारकी मारली होतीस की रे !" राकितीन ओरडून म्हणाला.

"बरं तसंच असेल तर, मी पण नाही घेत," ग्रूशिंकाही त्याच्यासारखेच बोलली, "मला खरंच काही नको. तू सगळी बाटली एकटा पी हवी तर, राकितीन. आल्योशानं घेतली तर मी पण घेईन."

"काय हृदयस्पर्शी भावुकता !" राकितीन टोमणा देऊन म्हणाला, "अन् ती त्याच्या मांडीवरही बसली आहे ! त्याला निदान कशाचं दुःख तरी आहे, पण

तुला काय झालंय? तो ईश्वराविरुद्ध बंड करतोय अन् सॉसिज खायला तयार झालाय..."

"ते कसं काय?"

"त्याचे ज्येष्ठ धर्मगुरू आज वारले. सत्पुरुष धर्मगुरू झसीमफ."

"म्हणजे धर्मगुरू झसीमफ वारले?" ग्रूशिंका ओरडून म्हणाली. "अरे देवा, मला माहीत नव्हतं हे!" तिने भक्तिभावानं स्वतःवर क्रूसाचे चिन्ह केले. "छीः, हे मी काय करीत होते, या अशा वेळी अशी त्याच्या मांडीवर जाऊन बसले मी!" ती भयाचा हबका बसल्याप्रमाणे दचकली अन् पटकन् त्याच्या मांडीवरून खाली सरकून कोचावर बसली.

आल्योशाने वाकून तिच्याकडे एक दीर्घ साश्चर्य दृष्टिपात केला आणि एक प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर उजळू लागल्यासारखा दिसला.

"राकितीन," तो एकाएकी दृढ अन् मोठ्या स्वरात म्हणाला, "ईश्वराविरुद्ध मी बंड केल्याबद्दलचा टोमणा मला मारू नको. मला तुझ्यावर रागवायचे नाही तेव्हा तूही माझ्याशी ममतेनं वागलं पाहिजेस. मी असा एक ठेवा गमावला आहे की जो तुझ्यापाशी कधी नव्हता, अन् तू माझ्या विषयीचा बरावाईट निवाडा या वेळी करू नको. तू हिच्याकडं पाहिलंस तर बरं– तिला माझ्याविषयी किती करुणा वाटते पाहिलंस? इथं मला दुष्ट आत्मा दिसेल असं मानून मी इथं आलो–पापाकडं ओढलं जावंसं मला वाटलं. कारण मी हलकट होतो, स्वतःच दुरात्मा होतो. आणि मला एक खरी बहीण मिळाली. मला एक ठेवा मिळाला– एक प्रेमळ हृदय मिळालं. तिला आता माझ्याविषयी कीव वाटली... आग्राफेना अलेक्झांद्रोवना, मी तुझ्यासंबंधानं बोलतोय. तू माझ्या आत्म्याला अधःपातातून वर उचललंस."

आल्योशाचे ओठ थरथरत होते आणि त्याचा श्वास रोखल्यासारखा झाला.

"तिनं तुला वाचवलंय असं दिसतं." राकितीन तुच्छतेने हसून म्हणाला. "अन् तिला तुला आपल्या पंजात पकडायचं होतं, ते तुला कळलं का?"

"थांब, राकितीन," ग्रूशिंका उसळून म्हणाली, "चूप बसा, तुम्ही दोघेही. आता मी तुला त्यासंबंधानं सर्व काही सांगते. बोलू नकोस, आल्योशा, तुझ्या शब्दांनी मला लाजवलं आहे, कारण मी वाईट आहे, चांगली नाही–अशी आहे बघ मी. अन् तू, राकितीन, चूप बैस, कारण तू खोटं सांगतो आहेस. त्याला माझ्या पंजात पकडण्याचा प्रयत्न करायची माझी दुष्ट कल्पना होती खरी, पण आता तू खोटं बोलत आहेस. आता ते सर्व वेगळं आहे. अन तुझ्याकडून मला ऐकायचं नाही, राकितीन."

हे सर्व ग्रूशिंका अतिशय आवेगाने बोलली.

"दोघंही पागल आहेत." त्या दोघांकडे पाहात राकितीन आश्चर्याने

उद्‌गारला : एखाद्या पागलखान्यात तर मी नाही असं मला वाटतंय. हे दोघंही इतके मनानं दुबळे व्हायला लागले आहेत की, क्षणभरात ते रडायला लागतील."

"मी रडायला लागेन, होय लागेनच" ग्रूशिंका पुनःपुन्हा म्हणाली. "यानं मला आपली बहीण म्हटलं अन् ते मी कधीसुद्धा विसरणार नाही. फक्त मला तुला एवढंच सांगायचंय, राकितीन, की जरी मी वाईट असले, तरी मी खरोखरच एक कांदा काढून दिला आहे."

"कांदा? हत्‌तेरी, तू खरंच पागल आहेस."

राकितीनला त्यांच्यातल्या उत्कटतेचे आश्चर्य वाटले. तो क्रुद्ध अन् त्रस्त झाला तरीसुद्धा त्याला हा विचार करता आला असता की, त्या दोघांपैकी प्रत्येकजण एक प्रकारच्या आध्यात्मिक कटोकटीच्या अवस्थेतून चालला होता, तशी अवस्था माणसाच्या आयुष्यात वरचेवर येत नसते. राकितिन स्वतःसंबंधीच्या प्रत्येक बाबतीत फार भावनाप्रवण होता, तरी इतरांच्या भावना अन् संवेदनांच्या बाबतीत तो फार बधिर होता— एकतर तो तरुण अननुभवी होता, अन् दुसरे म्हणजे त्याच्यात अतिशय अहंकार होता.

"बरं का आल्योशा," ग्रूशिंका त्याच्याकडे वळून ओशाळे हास्य करीत म्हणाली, "राकितीनला जेव्हा मी आता म्हटलं की मी कांदा काढून दिलाय, तेव्हा मी गर्वानं बोलत होते, पण तुला जे मी त्या संबंधानं सांगणार आहे ते मात्र गर्वानं नाही, बरं का. ती एक गोष्टच आहे, पण छान गोष्ट आहे. मी लहान होते तेव्हा माझी स्वैपाकीण मात्र्योना—तिच्याकडून मी ती ऐकत असे. ती अजून माझ्याकडं आहे. ती गोष्ट अशी : पूर्वीच्या काळी एक शेतकरी बाई होती. ती फार दुष्ट बाई होती. ती मेली अन् मागं तिनं एकसुद्धा सत्कृत्य ठेवलं नाही. यमदूतांनी तिला पकडलं अन् नरकाच्या धगधगत्या आगीत टाकलं. तेव्हा तिचा रक्षक देवदूत होता तो उभा राहिला आणि तिचं कोणतं सत्कृत्य आठवून ईश्वराला सांगावं, त्याचा विचार करू लागला; 'तिनं एकदा आपल्या बागेतला एक कांदा जमिनीतून उकरून एका भिकारणीला दिला होता,' हे त्याला आठवलं. आणि त्यानं ते सांगितलं. तेव्हा ईश्वर म्हणाला, 'तर मग तो कांदा घेऊन जा, नरकात तो तिच्या पुढं धर आणि त्याला पकडून तिला वर येऊदे. अन् जर तिला तू अशी नरकातनं वर ओढून काढू शकलास, तर येऊ दे तिला स्वर्गात, पण जर का तो कांदा तुटला, तर त्या बाईला ती आहे तिथंच राहावं लागेल,' तो देवदूत त्या बाईकडं धावत गेला अन् तो कांदा त्यानं तिच्यापुढं धरला. 'चल,' तो म्हणाला, 'धर त्याला अन् मी ओढून घेतो तुला.' आणि तो तिला बेतानं वर ओढून घेऊ लागला. त्याने तिला जवळ जवळ बाहेर काढलंच होतं. इतक्यात बाकीचे जे पापी त्या नरकात होते ते तिला बाहेर ओढून घेतलं जात आहे हे पाहून तिला धरण्याचा

प्रयत्न करू लागले. अशाकरिता की तिच्याबरोबर आपण सुद्धा बाहेर ओढलं जावं. पण ती फार दुष्ट बाई होती, ती त्यांना लाथा मारू लागली. ' मला बाहेर ओढायचं आहे, तुम्हाला नाही. तो माझा कांदा आहे, तुमचा नाही.' तिच्या तोंडून असे शब्द बाहेर पडतात ना पडतात तोच तो कांदा तुटला, आणि ती बाई परत नरकात पडली अन् अजून ती तिथंच यातना भोगते आहे. मग तो देवदूत रडला अन् तिथून निघून गेला. तेव्हा अशी ती गोष्ट आहे, आल्योशा; ती अगदीम ला पाठ झालेली आहे. कारण मी स्वतः ती दुष्ट बाई आहे. मी राकितीनला गर्वानं सांगितलं की मी कांदा काढून दिला म्हणून, पण तुला मी म्हणेन: ' मी आयुष्यात एक कांदा काढून देण्या-पलीकडं काहीच केलं नाहीरे, तेवढंच माझं एक सत्कृत्य आहे.' म्हणून माझी स्तुती करू नकोस आल्योशा, मला चांगली समजू नकोस, मी वाईट आहे, मी दुष्ट स्त्री आहे अन् तू माझी स्तुती केलीस तर मला जास्तच लाज वाटेल. हं:, मला सर्व काही कबूल केलं पाहिजे. ऐक, आल्योशा, तुला कबज्यात घेण्याकरिता मी इतकी उत्सुक झाले होते की, मी राकितीनला वचन दिलं होतं की जर त्यानं तुला माझ्याकडं आणलं तर मी त्याला पंचवीस रुबल देईन. थांब, राकितीन, थांब!"

ती झटझट टेबलापाशी गेली, तिनं खण उघडला, पैशाची पर्स बाहेर काढली अन् त्यातून पंचवीस रुबलची नोट बाहेर काढली.

"हा काय मूर्खपणा! हा काय मूर्खपणा!" राकितीन अस्वस्थ होऊन म्हणाला.

"घे ही राकितीन, मी ते तुझे देणं लागते, तू ते नाकारशील हे शक्यच नाही म्हणा; तूच ते स्वतः मागितले होतेस." अन् तिने ती नोट त्याच्याकडे फेकली.

"मी कदाचित ती नाकारीनसुद्धा!" राकितीन गरजला, अर्थातच तो शरमला होता, पण आपला गोंधळ तो मोठेपणाचा आव आणून झाकू पाहात होता. "बरं झालं, खर्चाला मिळालं; शहाण्याचा फायदा करून देण्यासाठीच मूर्ख माणसं जन्माला येतात."

"अन् आता तुझी वटवट बंद कर, राकितीन. आता जे मी बोलणार आहे ते तू ऐकण्यासाठी नाही. जा. त्या कोपऱ्यात जाऊन बैस जा अन् चूप राहा. तुला आम्ही आवडत नाही ना, मग तोंड दाबून धर तुझं."

"मला तुम्ही कशासाठी आवडावं?" राग न झाकता राकितीन गुरगुरला, त्यानं ती पंचवीस रुबलची नोट आपल्या खिशात ठेवून दिली अन् आल्योशाने ते पाहिले याची त्याला शरम वाटली. आपला मेहेनताना मागाहून मिळेल, आल्योशाला समजणारच नाही, अशी त्याने कल्पना केली होती. अन् आता शरम वाटून याचा तोल सुटला. आतापर्यंत ग्रूशिंकाने किती जरी टोमणे मारले तरी तिला उलट न बोलणे हे त्याने सुज्ञपणाचे मानले होते, कारण त्याला तिच्याकडून काही काढायचे होते. पण आता तोही रागावला.

"माणूस लोकांवर प्रेम करतो ते काही कारणानं, पण तुमच्यापैकी कुणी माझ्याकरता काय केलंय?"

"तू कारण नसताना माणसांवर प्रेम करावंस, जसा आल्योशा करतो तसं."

"तो काय तुझ्यावर प्रेम करतो? त्यानं असं काय दाखवलंय की तू एवढं त्याचं स्तोम माजवलंस?"

ग्रूशिंका खोलीच्या मधोमध उभी होती; ती आवेशानं बोलू लागली आणि तिच्या आवाजात झटक्यांनी चढउतार होत होता.

"चूप राकितीन, तुला आमच्यासंबंधानं काही माहीत नाही! अन् पुन्हा माझ्याशी असं बोलण्याचं धारिष्ट करू नकोस. इतकी सलगीची वागणूक करायची तुला हिंमत तरी कशी होते! बैस जाऊन त्या कोपऱ्यात अन् माझा हुजऱ्या आहेस असं समजून चूप रहा. अन् आता आल्योशा, मी तुला सगळं सत्य सांगते, म्हणजे तुला मी किती हलकट बाई आहे ते कळेल! मी राकितीनशी बोलत नाही, तुझ्याशी बोलते आहे. तुला धुळीला मिळवावं अशी माझी इच्छा होती. आल्योशा, हे अगदी देवाशपथ खरं आहे; माझ्या तरसंच मनात होतं. माझ्या इतकं ते मनात होतं की, मी राकितीनला तुला आणण्यासाठी लाच दिली. अन् असं मला का करावंसं वाटलं? तुला त्याबद्दल काही माहीत नाही आल्योशा. तू माझ्या जवळून चाललास की, माझ्यापासून तोंड वळवायचास, तुझे डोळे खाली जायचे. अन् मी तुझ्याकडे यापूर्वी शंभरदा पाहिलंय! तुझ्या संबंधानं मी प्रत्येकाला विचारू लागले. तुझ्या चेहऱ्यानं माझ्या हृदयाला पछाडलं. 'तो माझा तिटकारा करतो, माझ्याकडे बघत सुद्धा नाही.' असं मला वाटलं. अन् ते मला शेवटी इतकं जाणवलं की एका पोराला मी इतकी भीत असल्याचं माझं मलाच आश्चर्य वाटलं. त्याला मी माझ्या पंजात धरीन अन् त्याच्या तोंडावर हसेन मी म्हटलं. मी द्वेषानं अन् रागानं भरून गेले. तुला खरं तरी वाटेल, इथं एकाही माणसाची आग्राफेना अलेक्झांद्रोवनाशी वाईट विचारानं बोलायची किंवा तिच्याकडं वाईट उद्देशानं यायची छाती नाही. इथं माझा संबंध येतो तो एकट्या म्हाताऱ्या कुझमाशी. मी त्याला बांधलेली न् विकलेली आहे, सैतानानं आम्हाला एकत्र आणलं, पण त्याखेरीज दुसरं कुण्णी कुण्णी नाही. पण तुला पाहिल्याबरोबर माझ्या मनात आलं मी याला माझ्या पकडीत घेईन अन् त्याचा उपहास करीन. मी किती द्वेषी हलकट बाई आहे पाहिलंस, अन् तू मला आपली बहीण म्हणालास! अन् ज्या माणसानं माझं नुकसान केलं तो आता आला आहे; त्याच्याकडून निरोप येणार म्हणून मी इथं वाट पाहात बसले आहे. अन् त्या माणसाचा माझा संबंध काय माहीत आहे? पाच वर्षांपूर्वी, जेव्हा कुझमानं मला इथं आणलं, तेव्हा मी, आपण कुणाच्याही दृष्टीस पडू नये, कुणाच्याही कानी आपला आवाज जाऊ नये म्हणून स्वतःला कोंडून घेत असे. मी एक खुळी पोर होते; इथं मी रडत बसायची, रात्रभर सताड

डोळे उघडे ठेवून जागी राहायची. मनात विचार यायचा, ' ज्यानं माझं नुकसान केलं तो आता कुठं असेल ? तो बहुधा दुसऱ्या बाईबरोबर मला हसतच असेल. मला जर तो दिसला, माझी त्याची जर भेट झाली, तर मी त्याचा बरोबर बदला घेईन, खरंच, त्याचा मी बरोबर बदला घेईन ! ' रात्री मी अंधारात माझ्या उशीत डोकं खुपसून रडत राहायची, अन् मी त्यावर एकसारखी विचार करायची. काय करावं म्हणून मी माझी छाती फाडून घ्यायची अन् स्वतःच्या रागावर मिटक्या मारायची. ' मी त्याचा बदला घेईन, मी त्याचा बदला घेईन ! ' हेच मी काळोखात रडत ओरडत राहायची. अन् जेव्हा मला एकाएकी वाटलं की मी त्याचं खरोखर काही एक करणार नाही, अन् तो त्या वेळी मला हसत असणार, किंवा कदाचित् पुरता मला विसरून गेलेला असणार, तेव्हा मी धाडदिशी जमिनीवर पडे, माझं दुःख असहाय अश्रूंच्या रूपानं ओघळे, आणि तशीच सकाळपर्यंत मी गदगदत पडून राही. सकाळी मी कुत्र्यापेक्षासुद्धा जास्त सूडबुद्धीनं पेटून उठे, वाटे साऱ्या जगाचे तुकडे तुकडे करून त्याला फाडून टाकावं. आणि मग मी काय केलं असं तुला वाटतं ? मी पैसा साठवू लागले, मी कठीण हृदयाची बनले, लठ्ठ झाले – शहाणी झाले म्हणतोस ? छे: रे, साऱ्या जगाला कुणालाही दिसत नाही, कुणालाही माहीत नाही, पण जशी रात्र येते, तशी मी कित्येकदा पाच वर्षांपूर्वी, एक खुळी मुलगी असतांना, जशी पडत असे, तशी दात कचकचा चावीत अन् सारी रात्र रडत पडते. मनात येतं ' मी त्याचा बदला घेईन, मी त्याचा बदला घेईन ! " ऐकतोस ना तू ? ठीक तर, आता मी काय आहे ते तुला कळलं. एक महिन्यापूर्वी एक पत्र मला आलं – तो येणार आहे, त्याची बायको मेली आहे, अन् त्याला मला भेटायचं आहे. माझं धाबं दणाणलं, मग लगेच माझ्या मनात आलं, " जर त्यानं येऊन शीळ घालून मला बोलावलं, तर एखाद्या झोडपलेल्या कुत्र्यासारखी मी सरपटत त्याच्याकडं जाईन.' माझा स्वतःवर विश्वासच बसेना. इतकी मी पामर झाले आहे ? मी त्याच्या गळ्यात जाऊन पडावे की नाही ? अन् हा सबंध महिना माझा मलाच इतका भयंकर संताप आलेला आहे की मी पाच वर्षांपूर्वी होते त्याहूनही वाईट झालेली आहे. बघितलंस, आल्योशा, किती हिंसक, खुनशी प्राणी मी आहे ती ? तुला मी संपूर्ण सत्य दाखवून दिलं आहे ! त्या दुसऱ्याच्या गळ्यात मला पडावं लागू नये म्हणून मी मीत्याची फसवणूक केली. चूप, राकितीन, माझा न्यायनिवाडा करण्याचं काम तुझं नाही, तुझ्याशी मी बोलत नाही. तुम्ही येण्यापूर्वी मी इथं वाट पाहात, विचार करीत, माझ्या सगळ्या पुढच्या आयुष्या-संबंधी निर्णय करीत पडले होते, अन् माझ्या अंतःकरणात काय होते, तुला कधीच कळणार नाही. हां, आल्योशा, तुझ्या त्या तरुण महिलेला जाऊन सांग, म्हणावं, परवा जे काही घडलं त्याबद्दल माझ्यावर राग धरू नको... आता मी कोणत्या अवस्थेतून जात आहे हे साऱ्या जगात कोणालाही कळणार नाही, अन्

कोणाला तें करणे शक्यही नाही...कारण कदाचित मी आज माझ्यांबरोबर एक सुरा घेऊन जाणार आहे, माझ्या मनाचा निश्चय होत नाही..."

आणि या 'शोककारक' शब्दांबरोबर ग्रूशिंकाला रडू कोसळलं, तिनं आपलं तोंड आपल्या हातांनी झाकून घेतलं, ती धाडदिशी कोचावरच्या उशांवर जाऊन पडली, अन् एखाद्या लहान मुलाप्रमाणं ओक्साबोक्शी रडू लागली.

आल्योशा उठला अन् राकितीनकडं गेला.

"मिशा," तो म्हणाला, "रागावू नकोस. तिनं तुला दुखावलंय, पण रागावू नकोस. ती आता काय म्हणाली ते ऐकलंस तू? माणसाच्या सहनशक्तीला फार ताण देऊ नये, माणसानं दयाशील असावं."

आल्योशा हे आपल्या अंतःकरणापासून उत्स्फूर्त भावनेने बोलला. त्याला हे बोलणे आवश्यक वाटले अन् तो राकितीनकडे गेला. जर तिथे राकितीन नसता तर तो हवेशी बोलला असता. पण राकितीनने त्याच्याकडे वक्रदृष्टीने पाहिले अन् आल्योशा एकदम बोलायचे थांबला.

"काल रात्री तुझ्या गुरूच्या उपदेशानं तू इतका ठासून भरला होतास की तो उपदेश आता तुला माझ्यावर सोडावा लागतोय, अलेक्सी, देवाच्या माणसा!" राकितीन द्वेषपूर्ण स्मित करीत म्हणाला.

"हसू नकोस, राकितिन, हसू नकोस, मृताविषयी बोलू नकोस – जगातल्या कोणाहीपेक्षा ते अधिक चांगले होते!" आल्योशा म्हणाला, त्याचे डोळे अश्रूंनी डबडबले. "मी बोललो ते एखादा न्याय-निवाडा करणारा म्हणून तुझ्याशी बोललो नाही, पण ज्यांचा न्याय होतो त्यांच्यातला सर्वांत हीन म्हणून बोललो. तिच्यापुढं मी काय? मी इथं आलो माझा सत्यानाश करायला, अन् 'केला म्हणून काय झालं?' असं मनाशी म्हणालो ते भ्याडपणानं. पण ती पाच वर्षं वेदना सोसल्यानंतर जेव्हा कोणी तिच्याशी मनापासून एक शब्द बोलतं तेव्हा ती आपल्या अश्रूंत सर्व काही विसरून जाते, सगळ्यांना क्षमा करते! तिच्यावर अन्याय करणारा माणूस परत आला आहे, त्यानं तिला बोलावणं पाठवलंय, अन् ती त्याला सगळ्या गोष्टींची क्षमा करते, आणि आनंदभरानं त्याला भेटायला तयार होते, ती आपल्याबरोबर सुरा नाही नेणार. ती नाही नेणार! छेः, मी नाही तसा; तू तसा आहेस की काय कुणास ठाऊक, मिशा, पण मी मात्र तसा नाही. हा मला धडा आहे... ती आपल्यापेक्षा अधिक प्रेमळ आहे...आता तिनं आपल्याला जे सांगितलं ते बोलताना तू ऐकलंस? नाही, तू ऐकलं नाहीस; तू ऐकलं असतंस तर तिला तू फार पूर्वीच ओळखलं असतंस... आणि परवा दिवशी ज्या व्यक्तीचा अपमान झाला तिनंसुद्धा तिला क्षमा केली पाहिजे! हा आत्मा अजून स्वस्थ झालेला नाही, आपण त्याच्याशी हळूवार झालं पाहिजे... कुणास ठाऊक, त्या आत्म्यात मोठा ठेवाही कदाचित असू शकेल...."

आल्योशा थांबला, कारण त्याला दम लागला. राग आला असला तरी राकितीन त्याच्याकडे आश्चर्यानं पाहत राहिला. सौम्य आल्योशाकडून इतक्या धिक्कारात्मक, आवेशपूर्ण भाषणाची त्याने कधीच अपेक्षा केली नव्हती.

"आपली वकिली करायला तिला कोणीतरी भेटलं म्हणायचं! अं, तू तिच्या प्रेमात पडलायस काय? आग्राफेना अलेक्झांद्रोवना, आमचा हा मठवासी खरंच तुझ्या प्रेमात पडलाय बरं का, तुझा जय झाला!" तो खो खो करीत हसत ओरडला.

ग्रूशिंकाने आपले मस्तक उशीवरून उचलले अन् आल्योशाकडे पाहिले तेव्हा तिच्या अश्रुसिंब मुखावर मधुर स्मित होते.

"त्याला राहू दे तिकडं, आल्योशा. माझ्या देवदूता, तो कसा आहे ते तुला दिसतं आहे, तू बोलण्यासारखा तो माणूस नाही, मिखाईल ओसिपोविच," ती राकितीनकडं बघून म्हणाली, "मी तुझ्याशी उद्धटपणानं वागले म्हणून तुझी क्षमा मागण्याचं माझ्या मनात आलं होतं, पण आता मला तसं वाटत नाही. आल्योशा, इकडं माझ्याकडं ये, इथं बैस." तिने त्याला आनंदीयुक्त स्मित करून बोलावलं, "हां, अस्सं. मला सांग," तिनं त्याचा हात धरला अन् त्याच्या मुखाकडे पाहून हसत ती म्हणाली, "मला सांग, माझं त्या माणसावर प्रेम आहे की नाही– तो माणूस, ज्यानं माझं नुकसान केलं तो, त्याच्यावर माझं प्रेम आहे की नाही? तू येण्यापूर्वी, इथं अंधारात मी स्वतःच्या मनाला विचारीत पडले होते की, मी त्याच्यावर प्रेम करते का? आल्योशा माझ्याकरता तू निर्णय कर, ती वेळ आली आहे, तू म्हणशील तसं होईल. मी त्याला क्षमा करायची का, की नाही?"

"पण तू त्याला यापूर्वीच क्षमा केली आहेस," आल्योशा स्मित करून म्हणाला.

"होय, मी त्याला खरोखरच क्षमा केली आहे," ग्रूशिंका विचार करीत मंद स्वरात म्हणाली, "किती दुबळे हृदय! या माझ्या दुबळया हृदयाच्या नावानं तिनं चटकन् मेजावरचा एक पेला घेतला, एका घुटक्यासरशी तो खलास केला, तो वर उचलला अन् खाली जमिनीवर फेकून दिला. तो पेला खळकन् फुटला. क्रूरपणाची लहानशी छटा तिच्या स्मितात उमटली.

"तरीपण मी त्याला कदाचित् क्षमा नाही केलेली," ती म्हणाली, तिच्या आवाजात एक धमकी उमटली, आणि तिने आपले डोळे खाली केले. जणू ती स्वतःशीच बोलत असावी. "कदाचित् माझं मन क्षमा करण्यासाठी फक्त तयार होत असावं. मी माझ्या मनाशी झगडेन. बघितलंस, आल्योशा, ही पाच वर्षे माझ्या अश्रूंवर प्रेम करायची मला सवय लागली आहे...कदाचित् माझं माझ्या संतापावरच प्रेम असेल, त्याच्यावर नसेल..."

"हं : आपल्याला नाही बुवा त्याच्या जागी जाण्याची इच्छा होणार," राकितीन फुसफुसला.

"अं हं, तू नाहीच जाणार, तू त्याच्या जागी कधीच जाणार नाहीस, राकितीन. तू माझे जोडे पुसशील, राकितीन. तीच तुझ्या लायकीची जागा आहे. तुला माझ्यासारखी स्त्री कधीच मिळायची नाही...अन् त्यालाही कधी नाही, कदाचित्... "

"त्यालाही नाही! मग हा एवढा पोशाख कशासाठी केला आहेस?" राकितीन विषारी टोमणा मारून म्हणाला.

"पोषाख करण्याबद्दल मला टोमणा मारू नकोस, राकितीन. माझ्या अंतःकरणात काय आहे ते सारं तुला माहीत नाही! माझा हा भपकेदार पोषाख फाडून टाकण्याचं माझ्या मनात आलं तर तो मी चटकन्, एका क्षणात, फाडून टाकीन," ती दणाणून टाकणाऱ्या आवाजात ओरडली. "हा भपकेदार पोषाख कशासाठी आहे हे तुला माहीत नाही, राकितीन! कदाचित् मी त्याला भेटेन अन् म्हणेन 'पूर्वी कधी तुम्ही मला अशी बघितली आहे?' तो गेला तेव्हा मी एक सतरा वर्षांची किडकिडीत, क्षयी, रडकी पोर होते. मी त्याच्या जवळ बसेन, त्याला मोहित करीन अन् हळूहळू त्याला उद्दीपित करीन. 'आता मी कशी आहे बघितलंत?' मी त्याला म्हणेन. हं, तुम्हाला पुरे बरं, महाशय, अहो, बरं का!' हा एवढा पेला ओठांना लागेपर्यंत अनेक घोटाळे होऊ शकतात, पोषाख त्या करताच असू शकेल, राकितीन," एवढे बोलून ग्रुशिंका खुनशीपणाने हसली. "मी हिंसक अन् तामसी आहे, आल्योशा. मी माझे वस्त्रालंकार फाडून टाकून देईन, मी माझं सौंदर्य नष्ट करून टाकीन, माझा चेहरा मी भाजीन, सुऱ्यानं त्याला खचाखचा खाचा पाडीन, अन् भिकारी होईन. माझ्या मनात आलं तर मी आता कुठंही कुणालाही भेटायला जाणार नाही. माझ्या मनात आलं तर मी कुझमाला त्यानं आतापर्यंत मला जे काही दिलंय ते, आणि त्याचा सारा पैसा, उद्या परत करीन अन् बाहेर जाऊन जन्मभर मोंडी घाशीत राहीन. राकितीन, तुला वाटतं मी ते करणार नाही, माझी तेवढी हिंमत नाही? असं तुला वाटतं? करीन, करीन, मी ते आताच करू शकेन. फक्त मला चिडवू नकोस... अन् मी ताडकन् त्याला हाकून लावीन, मी त्याच्या तोंडावर माझी बोटं मोडीन अन् पुन्हा कधी त्याच्या दृष्टीसही पडणार नाही!"

ती हे शेवटचे शब्द वातातल्याप्रमाणं किंचाळून बोलली, पण पुन्हा तिला रडू कोसळलं, आपल्या हातांनी तिनं आपलं तोंड झाकून घेतलं, डोकं उशीत खुपसलं अन् हुंदक्यांनी ती गदगदा हलू लागली.

राकितीन उठला.

"आता आपल्याला इथून गेलं पाहिजे," तो म्हणाला, "उशीर झालाय, मठ बंद झाला तर आपल्याला बाहेरच राहावं लागेल."

ग्रूशिंका एकदम आपल्या जागेवरून उसळली.

" तू तर जाणार नाहीस ना, आल्योशा ? " शोकाकुल विस्मयाने ती म्हणाली. " तू माझं काय करणार ? तू माझ्या हृदयातल्या भावना चाळवल्यास, मला यातना दिल्यास, अन् आता या रात्रीला तोंड द्यायला मला एकटीला सोडणार ? "

" तो कसा तुझ्याबरोबर रात्र घालवील ? अर्थात् त्याला हवं असेल तर राहू दे बापडा. मी एकटाच जाईन," राकितीन चेष्टा करीत उपहासाने म्हणाला.

" चूप, काळतोंड्या ! " ग्रूशिंका त्याच्यावर संतापाने ओरडली; " तो आज बोलला तसे शब्द तू मला कधीही बोललेला नाहीस."

" इतकं खास असं तो काय बोललाय ? " राकितीनने चिडून विचारले.

" मला सांगता येणार नाही, मला माहीत नाही. तो मला काय बोलला ते मला माहीत नाही, ते थेट माझ्या हृदयात जाऊन पोचलंय; त्यानं माझं हृदय पिळवटून काढलंय...माझी करुणा करणारा हा पहिलाच आहे, एकटाच आहे. तू यापूर्वी का बरं आला नाहीस, माझ्या देवदूता ? " तिने जणू एकदम वेडी होऊन त्याच्यापुढं गुडघे टेकले. " तुझ्यासारखं कोणी यावं म्हणून जन्मभर मी वाट बघितली. मला माहीत होतं तुझ्यासारखं कोणी तरी येईल अन् मला क्षमा करील. माझा विश्वास होता की, जरी मी अपवित्र असले तरी कोणी तरी माझ्यावर प्रेम करील, लाज वाटायला लावणारं प्रेम नव्हे, खरं मनापासूनचं ! "

आल्योशा खाली वाकून प्रेमळ स्मित करीत आणि तिचे हात हातात घेऊन म्हणाला, " मी काय केलंय तुझ्यासाठी ? मी फक्त तुला एक कांदा दिला, एक एवढासा चिमुकला कांदा, यापेक्षा काही नाही, बस्स ! "

हे बोलताना त्याचेही डोळे अश्रूंनी भरून आले. त्याच वेळी बाहेरच्या वाटेवर एकदम ओरडा झाला. कोणी तरी त्या दालनात आले. ग्रूशिंका अतिशय भयभीत होऊन एकदम उठली. फेनिया आरडत ओरडत खोलीत धावत आली अन् मोठ्यानं म्हणाली,

" बाईसाहेब, बाईसाहेब, एक जासूद धावत आलाय," ती धापा टाकीत अन् आनंदोत्फुल्ल होऊन म्हणाली, " तो मोक्रोयहून तुमच्यासाठी गाडी घेऊन आलाय. तिमोफे गाडीवान आहे. तीन घोडे आहेत. ते आता नवे दुसरे घोडे जुंपताहेत...पत्र, हे पत्र घ्या बाईसाहेब."

एक पत्र तिच्या हातात होते अन् बोलत असताना ती ते हवेत हलवीत होती. ग्रूशिंकाने ते तिच्याकडून हिसकावून घेतले अन् ती मेणबत्तीपाशी गेली. ती फक्त एक चिठ्ठी होती. चार-दोन ओळीच होत्या. क्षणात तिने ती चिठ्ठी वाचून टाकली.

" त्य नी मला बोलावणं पाठवलंय," ती म्हणाली. " तिचा चेहरा पांढरा फटक अन् वाकडा झाला, त्यावर म्लान हसू आलं; तो शीळ घालीत आहे! कुत्र्याच्या बच्चा, सरपटत परत जा ! "

पण फक्त एक क्षणभरच ती साशंक अवस्थेत उभी राहिली; एकदम तिच्या डोक्याकडे रक्त चढले अन् तिच्या गालांवर तकाकी आली.

" मी जाते," ती ओरडून म्हणाली. " पाच वर्षांचं माझं आयुष्य! नमस्ते ! नमस्ते, आल्योशा, माझं भवितव्य पक्कं झालं. जा, जा, सगळेजण तुम्ही मला सोडून जा, परत भेटणेही नको ! ग्रूशिंका वेगानं एका नव्या आयुष्याकडे चालली आहे... माझ्या बाबतीत काही वाईट मनात आणू नको, राकितीन. कदाचित माझी ही मरणाकडं बोळवण असेल! हंः, मी प्यायले असल्यासारखं मला वाटतंय ! "

ती एकदम त्यांना सोडून आपल्या झोपण्याच्या खोलीकडे धावत गेली.

" चला, आता तिच्या डोक्यात आपल्याबद्दलचे विचार नाहीत." राकितीन कुरकुरला. " चलू या, नाही तर पुन्हा आपल्या कानांवर ती बायकी किंचाळी यायची. मला या साऱ्या अश्रूंचा न् रडण्याचा वीट आलाय."

आल्योशा यंत्रवत् त्याने नेले तसा गेला. अंगणात एक छत असलेली गाडी उभी होती. जुवाखालून घोड्यांना बाहेर काढून घेण्यात येत होते. माणसे कंदिल घेऊन इकडून तिकडे धावत होती. तीन ताजेतवाने घोडे उघड्या फाटकातून आत आणले जात होते. पण आल्योशा न् राकितीन जेव्हा पायऱ्या उतरून खाली पोचले, तेव्हा ग्रूशिंकाच्या झोपण्याच्या खोलीची खिडकी एकदम उघडली आणि तिने खणखणीत आवाजात आल्योशाला हाक मारली :

" आल्योशा, मीत्याला माझे नमस्कार सांग. अन् मी त्याला दुःख दिलं असलं तरी त्याला म्हणावं माझ्यासंबंधी मनात काही वाईट आणू नको. अन् हेही माझ्या शब्दात त्याला सांग : ' ग्रूशिंका एका बदमाषाच्या वाट्याला गेली, उमद्या हृदयाच्या माणसा, तुझ्या वाट्याला नाही.' आणि वर आणखी हेही सांग की ग्रूशिंकानं तुझ्यावर फक्त एकच तास प्रेम केलं, फक्त एक छोटासा तास तिनं तुझ्यावर प्रेम केलं– तेव्हा तो तास त्यानं साऱ्या आयुष्यभर आठवावा– सांग ' ग्रूशिंकानं तुला आठवण म्हणून सांगितलंय ! '

शेवटी तिचा स्वर हुंदक्यांनी भरून गेला. खिडकी पट्दिशी लावली गेली.

" हां हां ! " राकितीन गुरगुरला अन् हसला, " ती तुझा भाऊ मीत्याचा खून करते अन् मग त्याला त्याची सबंध आयुष्यभर आठवण ठेवायला सांगते ! काय क्रूरता ! "

आल्योशाने उत्तर दिले नाही, त्याने ते ऐकले नाहीसे दिसले. तो राकितीनच्याबरोबर भयंकर घाईत असल्यासारखा वेगाने चालत होता. तो विचारात मग्न

होऊन गेला होता अन् यंत्रवत चालला होता. राकितीनला ओल्या जखमेला धक्का लागावा तशी एकदम वेदना जाणवली. आल्योशाला अन् ग्रूशिंकाला एकत्र आणल्याने काही वेगळेच घडेल अशी त्याने अपेक्षा केली होती. पण त्याने आशा केली होती त्याहून अगदीच वेगळे असे काही तरी घडले होते.

"तो तिचा हपिसर, एक पोल आहे," त्याने संयम करून पुन्हा बोलायला सुरवात केली, "आणि खरं म्हणजे तो आता मुळीच हपिसर नाही. तो सैबेरियात कस्टम खात्यात नोकरीला होता, चिनी सरहद्दीवर कुठं तरी एक भिकारडा पोल असावा असा माझा समज आहे. कामावरून निघाला म्हणतात. ग्रूशिंकानं थोडासा पैसा साठवला आहे हे आता त्याला कळलंय. तेव्हा तो आता पुन्हा परत आलाय— रहस्याचा उलगडा हा असा आहे."

तरी आल्योशाने ते ऐकलेच नसावेसे दिसले. राकितीनला आता राग आवरेना.

"ठीक म्हणजे तू त्या पापिणीला वाचवलंस म्हणायचं!" तो द्वेषपूर्ण हसला. "या माग्दालीनला सरळ मार्गावर आणलंस का? सात पिशाचं पिटाळून लावलीस, अं? तेव्हा ज्या चमत्कारांची आता तू अपेक्षा धरून होतास ते घडलेच म्हणायचे!"

"चूप, राकितीन," आल्योशा व्यथित अंतःकरणाने म्हणाला.

"म्हणजे तू मला त्या पंचवीस रुबलबद्दल धिक्कारतो आहेस? मी आपल्या मित्राला विकलं असं तुला वाटतं? पण तू ख्रिस्त नाहीस, समजलास, आणि मी ज्यूडास नाही."

"अरे अरे, राकितीन, मी त्यासंबंधानं सारं विसरलो होतो हे तुला खात्रीनं सांगतो," आल्योशा मोठ्याने म्हणाला, "तूच त्याची मला आठवण करून देतो आहेस..."

पण राकितीनला असह्य व्हायला एवढे यःकश्चित कारण पुरेसे होते.

"तुमचं प्रत्येकाचं अन् सर्वांचे वाटोळं होवो!" तो एकदम म्हणाला. "कोणत्या गाढवानं मला तुला न्यायला सांगितलं होतं? या क्षणापासून पुढं तुझी ओळख ठेवण्याची सुद्धा मला इच्छा नाही. एकटा जा, हा तुझा रस्ता!"

आणि तो मध्येच, आल्योशाला एकट्यालाच अंधारात सोडून, दुसऱ्या रस्त्याला वळला. आल्योशा शहराच्या बाहेर आला आणि शेतं ओलांडून मठाकडे चालत गेला.

४
गॅलीलीतील केना गाव

आल्योशा जेव्हा आश्रमात परतला, तेव्हा मठाच्या नियमानुसार बराच उशीर झालेला होता; दारावरच्या चौकीदाराने त्याला एका खास दारातून आत घेतले. नवाचे ठोके पडले होते— इतक्या मनःक्षोभात सबंध दिवस गेल्यानंतर सर्वांच्या विश्रांतीची न् झोपण्याची ही वेळ होती. आल्योशाने भीत भीत दरवाजा उघडला अन् जिथे आता ज्येष्ठ धर्मगुरूंची शवपेटी ठेवलेली होती त्या मठीत तो गेला. तिथे यावेळी धर्मगुरू पाइस्सीखेरीज कोणी नव्हते, शवपेटीपाशी एकांतात बसून शुभवर्तमानाचे वाचन करीत होते, आणि पोर्फिरी आदल्या रात्रीच्या संभाषणाने अन् चालू दिवसाच्या अस्वस्थ करणाऱ्या घटनांनी पूर्ण थकून जाऊन दुसऱ्या खोलीत जमिनीवर तरुणपणची गाढ झोप घेत पडला होता. धर्मगुरू पाइस्सींनी जरी आल्योशा आत येतानाचा आवाज ऐकला, तरी त्यांनी त्याच्या बाजूला नुसते पाहिलेसुद्धा नाही. आल्योशा दारातून उजवीकडे एका कोपऱ्यात वळला, त्याने एकदम आपले गुडघे टेकले अन् तो प्रार्थना करू लागला.

त्याचा अंतरात्मा भरून चालला होता, पण त्यात नाना भावनांचे मिश्रण होते; कोणतीही एक संवेदना ठळकपणे उमटलेली नव्हती; उलट एक दुसरीला खो देऊन येत होती, असे मंदगतीने सतत आळीपाळीने चालले होते. पण त्याच्या अंतःकरणात माधुर्य आले होते आणि, विलक्षण असे की, आल्योशाला त्याचे नवल वाटत नव्हते. पुन्हा त्याला समोर ती शवपेटी दिसली. ती त्याला पृथ्वीमोलाची वाटणारी आकृती दडलेली होती, पण आता सकाळचे रडू आणणारे न् चटका लावणारे दुःख त्याच्या अंतःकरणाला वेदना देत नव्हते. आत येताच त्याने त्या शवपेटीपुढे एखाद्या पवित्र मूर्तीपुढे घालावे तसे, लोटांगण घातले. पण आनंद, आनंद त्याच्या चित्तात अन् हृदयात प्रकाशित झाला होता. त्या मठीची एकच खिडकी उघडी होती. हवा ताजी थंड होती. "ज्या अर्थी त्यांनी खिडकी उघडली त्याअर्थी दुर्गंधी फार सुटली असली पाहिजे," त्याच्या मनात आले. पण हा शरीर कुजल्याच्या दुर्गंधीचा विचारसुद्धा, जो त्याला काही तासांपूर्वी इतका भयंकर अन् अपमानास्पद वाटला होता तो, आता त्याला कष्टीपण किंवा संताप आणीत नव्हता. तो शांतपणे प्रार्थना करू लागला, पण लवकरच त्याला वाटले की, आपली प्रार्थना यंत्रवत् होते आहे. विचारांचे खंड त्याच्या अंतरात तरंगत ताऱ्यांप्रमाणे चमचम करीत अन् एकदम नाहीसे होत जात होते, अन् त्यांच्या जागी दुसरे येत होते. तरी त्याच्या अंतःकरणात एक पूर्णतेचा बोध—काहीतरी स्थिर अन् सुखद असे—साम्राज्य करीत होता आणि त्याला स्वतःला त्याची जाणीव होत

होती. एकदा दोनदा तो कळकळीनें प्रार्थना करू लागला, आपली कृतज्ञतेची अन् प्रेमाची भावना ओतण्याकरिता तो अधीर झाला...

पण त्याने प्रार्थना करायला जेव्हा सुरुवात केली, तेव्हा त्याचे मन तत्क्षणी दुसऱ्या कशाकडे तरी गेले, आणि ते विचारात मग्न झाले. त्यामुळे तो प्रार्थनाही विसरला अन् तिच्यात व्यत्यय आणणारे होते तेही विसरला. तो धर्मगुरू पाइस्सी जे मोठ्याने वाचीत होते ते ऐकू लागला, पण थकव्याने अगदी गळून जाऊन तो हळूहळू पेंगू लागला.

" आणि तिसऱ्या दिवशी गॅलिलीच्या केना गावात एक लग्न होते." धर्मगुरू पाइस्सी वाचीत होते. " आणि येशूची आई तेथे होती; आणि येशूला व त्याच्या शिष्यांना उभयतांना त्या लग्नाचे आमंत्रण होते."

" लग्न? काय बरं... लग्न?" हे प्रश्न आल्योशाच्या मनात चक्राकार गती घेऊन तरंगू लागले. " तिला तिथंसुद्धा सुख आहे... ती मेजवानीला गेली आहे... नाही, तिनं सुरा बरोबर घेतलेला नाही... हा फक्त एक दुःखद शब्द-प्रयोग होता... ठीक, दुःखद शब्दप्रयोगांना क्षमा करायला पाहिजे, केलीच पाहिजे. दुःखद शब्दप्रयोग हृदयाला विसावा देतात... त्यांच्यावाचून दुःख हे माणसाला सहन करणं फार जड जाईल, राकितीन मागच्या बोळकांडीत निघून गेला. जोवर राकितीन आपल्या अन्यायांचंच चिंतन करीत राहील, तोवर तो नेहमी मागच्या बोळकांडीतच जात राहणार .. पण हा राजरस्ता... हा रस्ता कसा रुंद अन् सरळ स्फटिकासारखा चकचकीत आहे. अन् त्याच्या शेवटच्या टोकाला सूर्य आहे... हं!... काय बरं वाचताहेत?..."

" आणि जेव्हा त्यांना मद्याची गरज लागली, तेव्हा येशूची आई त्याला म्हणाली : " त्यांच्याकडे मद्य नाही "... आल्योशाच्या कानी पडत होते.

" हां, खरंच, तिकडं माझं लक्ष नव्हतं अन् तो मला चुकवायचा नाही, तो भाग मला फार आवडतो : ते गॅलीलीचं केना गाव, तो पहिला चमत्कार... अहाहा तो चमत्कार! अहाहा, तो गोड चमत्कार! माणसांच्या दुःखांना नव्हे त्यांच्या आनंदाला ख्रिस्तानं भेट दिली. त्यानं आपला पहिला चमत्कार दाखविला तो माणसांच्या आनंदाला मदत करण्याकरिता... 'जो माणसांवर प्रेम करतो तो त्यांच्या आनंदावरसुद्धा प्रेम करतो...' तो नेहमी याचा पुन्हा पुन्हा उच्चार करी. तो विचार त्याच्या प्रमुख विचारांपैकी होता... 'आनंदावाचून जीवन नाही,' असं मीत्या म्हणतो... होय, मीत्या... 'जे काही सत्य आहे अन् चांगलं आहे ते नेहमी क्षमेनं भरलेलं असतं,' हेसुद्धा तो म्हणत असे..."

"येशू तिला म्हणाला, बाई, त्याच्याशी तुला आणि मला काय कर्तव्य आहे? माझी वेळ अजून आलेली नाही."

" त्याची आई सेवकांना म्हणते : तो जे काही तुम्हाला सांगेल ते करा..."

" ते करा... आनंद, काही गरीब लोकांचा, अगदी गरीब लोकांचा आनंद ... अर्थातच ते गरीब होते, कारण त्यांच्यापाशी लग्नाच्या वेळीसुद्धा पुरेसे मद्य नव्हतं... इतिहासकार लिहितात की, त्या काळी जेन्नासरेथ सरोवराच्या आसपास राहणारे लोक कल्पना करता येणार नाही इतके गरीब होते... आणि दुसरं महान हृदय, ती दुसरी महान देवता, त्याची आई, तिला माहीत होतं की तो केवळ आपला महान दारुण यज्ञ करण्याकरिताच आलेला नाही. तिला माहीत होतं की त्याचं हृदय ज्या कोणा अज्ञात अन् अशिक्षित लोकांनी त्याला प्रेमानं आपल्या गरीबशा लग्नाला बोलावलं होतं त्यांच्या साध्यासुध्या, अकृत्रिम मौजमजेकरितासुद्धा उघडं होतं. ' माझी वेळ अजून आली नाही,' असं तो मृदू हास्य करीत म्हणाला. (त्यानं तिच्याकडं पाहून मंद हास्यच केलं असलं पाहिजे.) आणि खरोखर गरिबांच्या लग्नात मद्याची रेलचेल करण्याकरिताच तो पृथ्वीवर अवतरला होता काय ? आणि तरी तो गेला अन् तिनं त्याला सांगितलं होतं तसं त्यानं केलं... हं, ते पुन्हा वाचताहेत..."

" येशू त्यांना म्हणतो, पाण्याची भांडी पाण्याने भरा. आणि त्यांनी ती काठोकाठ भरली.

" आणि तो त्यांना म्हणतो, आता काढून घ्या आणि मेजवानीच्या प्रमुखाला वाढा. आणि त्यांनी ते वाढले.

" मेजवानीच्या प्रमुखाने जेव्हा त्या पाण्याची चव घेतली तेव्हा ते मद्य झाले होते, आणि ते कुठून आले हे त्यांना कळेना; [पण ज्या सेवकांनी पाणी काढले त्यांना ते माहीत होते] मेजवानीच्या प्रमुखाने नवरदेवाला बोलावले,

" आणि त्याला तो म्हणाला : सुरुवातीला प्रत्येकजण चांगले मद्यच पुढे ठेवतो; आणि माणसे जेव्हा खूप पितात तेव्हा वाईट असेल ते ठेवतो; पण तू आतापर्यंत चांगले मद्यच ठेवले आहेस."

" पण हे काय, हे काय ? खोली अशी मोठी मोठी कशी होत चालली ?... हां, बरोबर... लग्न आहे, विवाह आहे ना... हां, बरोबर. हे इकडे पाहुणे आहेत, इकडं ते तरुण जोडपं बसलं आहे अन् मौजमजा करणारा हा जमाव आहे आणि... समारंभाचा तो शहाणा पुरोहित कुठं आहे ? पण हे कोण ? कोण ? पुनः भिंती मागं सरकताहेत... त्या मोठ्या मेजावरून ते कोण उठतं आहे ? काय ?... हेसुद्धा इथं ? पण ते तर शवपेटीत आहेत... पण ते इथंसुद्धा आहेत. ते उभे राहिले, ते माझ्याकडं पाहाताहेत, ते इकडं येताहेत... देवा !... "

होय, ते त्याच्यापाशी आले, ते छोटेसे किडकिडीत वृद्ध गृहस्थ, चेहेऱ्यावर चिमुकल्या सुरकुत्या पडलेले, आनंदभराने न् मंद मंद हास्य करीत त्याच्यापाशी आले. आता तिथे शवपेटी नव्हती, आणि काल त्यांच्याभोवती मंडळी जमली होती तेव्हा त्यांच्या सोबत बसले असताना जो पोषाख त्यांनी घातला होता, त्याच पोषाखात ते आता होते. त्यांचे तोंड झाकलेले नव्हते, त्यांचे डोळे तेजस्वी होते. हे कसं

काय बरं, म्हणजे यांनासुद्धा मेजवानीला बोलावलंय वाटतं. हे सुद्धा गॅलीलीच्या केना येथील लग्नाला हजर...

"होय, माझ्या लाडक्या, मलासुद्धा बोलावलं आहे, बोलावलं नव्हे आज्ञा झाली आहे," त्याच्या कानांवर एक मृदू, स्वर पडला. "तू इथं का असा लपून राहिला आहेस, कोणाला न दिसता? तूही ये अन् आमच्यात सामील हो."

हा त्यांचाच आवाज होता, धर्मगुरू झसीमफांचा आवाज. अन् ज्या अर्थी त्यांनी मला हाक मारली त्या अर्थी ते तेच असले पाहिजेत!

ज्येष्ठ धर्मगुरूंनी आल्योशाला हाताला धरून उठविले अन् तो गुडघे उचलून उठला.

"आम्ही मजा करीत आहोत," तो छोटासा किडकिडीत वृद्ध मनुष्य म्हणाला, "आम्ही ते नवं मद्य पीत आहो, नव्या, महान आनंदाचं मद्य; किती पाहुणे आहेत, पाहिलंस? ही पहा नवरा न् नवरी, हे ते समारंभाचे प्रमुख, ते ते नवं मद्य चाखीत आहेत. असा चकित होऊन माझ्याकडं काय पाहतोस? मी एका भिकाऱ्याला एक कांदा दिला म्हणून मीसुद्धा इथं आलो आहे. आणि इथं आलेल्या पुष्कळांनी असा एक एक कांदा—एकच एवढासा कांदा—दिलाय... आमच्या साऱ्या कृती म्हणजे काय? आणि तू, माझ्या हळव्या बाळा, तू, माझ्या ममताळू मुला, तुलासुद्धा भुकेलेल्या स्त्रीला कांदा कसा द्यायचा हे आज कळलं. तुझं काम सुरू कर, माझ्या लाडक्या, ते सुरू कर, प्रेमळ बेटा!... तुला आमचा सूर्य दिसतो आहे का, 'तो' तुला दिसतो आहे?"

"मला भीती वाटते....मला पाहण्याचं धारिष्ट होत नाही," आल्योशा पुटपुटला.

"भिऊ नकोस त्याला. मोठेपणाच्या दृष्टीनं त्याला पाहिलं तर तो भयंकर आहे, उदात्त म्हणून पाहिलं तर तो भयचकित करणारा आहे, पण अपार दयावंत आहे. त्यानं स्वतःचं रूप आमच्यासारखं केलं आहे ते प्रेमामुळं आणि तो आपल्याबरोबर आनंद लुटतो. तो पाण्याचं मद्य करतो आहे ते पाहुण्यांचा आनंद खुंटू नये म्हणून. तो नव्या पाहुण्यांची अपेक्षा करीत आहे. तो नव्या पाहुण्यांना अविरतपणे अनंत काळ बोलावून राहिला आहे... ते पहा ते नवीन मद्य आणताहेत. ते भांडी आणत आहेत. दिसलं तुला?..."

आल्योशाच्या हृदयात काही तरी प्रकाशल्यासारखे झाले, कशाने तरी त्याचे हृदय इतके भरून गेले की, ते दुखू लागले. उत्कट आनंदाचे अश्रू त्याच्या हृदयाच्या गाभ्यातून निघाले...त्याने आपले हात पसरले, हर्षहुंकार दिला अन् तो जागा झाला.

पुन: तीच शवपेटी, तीच उघडी खिडकी अन् तेच मृदू, पवित्र, स्पष्ट असे शुभवर्तमानाचे वाचन. पण आल्योशाचे कान त्या वाचनाकडे नव्हते. आश्चर्य म्हणजे

तो गुडघे टेकूनच झोपी गेला होता, पण आता तो पायांवर उठून उभा राहिला, आणि एकदम, पुढे फेकला गेल्याप्रमाणे, झपझप तीन पावले टाकीत तो थेट शवपेटी-पाशी गेला. त्याचा खांदा धर्मगुरू पाइस्सींना झटकून गेला, पण त्याची त्याला दाद नव्हती. धर्मगुरू पाइस्सींनी आपले डोळे आपल्या पुस्तकावरून क्षणभर वर उचलले पण या मुलाला काहीतरी विलक्षण होत आहे हे पाहून त्यांनी ते झटकन् दुसरीकडे फिरविले. आल्योशाने अर्धाएक मिनिट त्या शवपेटीकडे, शवपेटीतल्या त्या आच्छादित, हालचाल नसलेल्या मृत व्यक्तीकडे पाहिले. त्याच्या छातीवर ती प्रतिमा अन् डोक्यावर निमुळते टोक असलेली अष्टकोनी क्रूस लावलेली टोपी होती. नुकताच आल्योशा त्याचा आवाज ऐकत होता, अन् तो अजून त्याच्या कानात घुमत होता. तो ऐकून होता, आणखी शब्द कानांवर पडतील अशी अपेक्षा करीत होता, पण एकदम तो गर्रकन मागे फिरला अन् मठीच्या बाहेर पडला.

तो पायऱ्यांवरही थांबला नाही, झटझट खाली उतरला; त्याचा आत्मा उत्कट आनंदाने ओसंडून चालला होता. त्याला स्वातंत्र्याची, मोकळ्या अवकाशाची खुलेपणाची आस लागली होती. त्याच्या डोक्यावर आकाशाचा घुमट, मंद मंद चमकणाऱ्या ताऱ्यांनी खचलेला, विशाल अन् अथांग पसरलेला होता. स्वर्गंगा खस्वस्तिकापासून क्षितिजापर्यंत दोन निस्तेज प्रवाह पडून वाहात होती. ताज्या निश्चेष्ट स्तब्ध निशेने पृथ्वीला आवरण घातले होते. कथीड्रलचे शुभ्र मनोरे अन् सोनेरी घुमट निळ्या आकाशावर चमकून उठत होते. घरांच्या भोवताली असलेल्या ताटव्यातील शरद्ऋतूतील भपकेदार फुले प्रातःकाळपर्यंत निद्रासुख घेत होती. पृथ्वीची स्तब्धता आकाशाच्या स्तब्धतेत जणू वितळून मिसळून जाताना दिसत होती. पृथ्वीचे गूढ वरच्या ताऱ्यांच्या गूढाशी एकरूप होऊन गेले होते...

आल्योशा उभा राहिला, त्याने पाहिले, आणि एकदम त्याने जमिनीवर लोटांगण घातले. आपण तिला का मिठी मारली हे त्याला कळले नाही. तिचे चुंबन घ्यायला, त्या सर्वांचे चुंबन घ्यायला, आपण इतके अनिवार आतुर का झालो हे त्याला सांगता आले नसते. पण तो रडत होता. हुंदके देत होता अन् तिची चुंबनं घेत होता. अन् आपल्या अश्रूंनी तिला न्हाऊ घालीत होता, आणि तिच्यावर प्रेम करण्याची सतत अन् चिरकाल प्रेम करण्याची तळमळीने शपथ घेत होता. "पृथ्वीला तुझ्या आनंदाश्रूंनी न्हाऊ घाल अन् त्या अश्रूंवर प्रेम कर," हे शब्द त्याच्या हृदयात उमटत होते.

तो कशासाठी रडत होता?

ओः! उत्कट आनंदात तो त्या ताऱ्यांना पाहूनही रडत होता, आकाशाच्या पोकळीतून ते त्याच्याकरिता प्रकाशत होते, आणि "त्याला त्या उत्कटतेची लाज वाटत नव्हती." त्या सर्व असंख्य परमेश्वरी विश्वातून धागे येऊन त्याच्या आत्म्याला जणू आपल्याशी निगडित करीत होते, आणि तो आत्मा "इतर

विश्वाच्या संपर्कानं " सर्वांगांनी थरथर कापत होता. प्रत्येकाला अन् प्रत्येक गोष्टीची क्षमा करायला, अन् त्याच्याकरिता क्षमेची याचना करायला, तो आतुर झाला होता; अं हं, स्वतःकरिता नव्हे तर सर्व मानवांकरितां, सर्वांकरिता अन् प्रत्येक गोष्टीकरिता. " आणि दुसरेही माझ्याकरिता प्रार्थना करीत आहेत." हा प्रतिध्वनी पुनः त्याच्या अंतरात्म्यात उमटला. पण प्रत्येक क्षणाला त्याला स्पष्टपणे आणि जणू साक्षात दर्शन व्हावे तसे जाणवले की आकाशाच्या त्या घुमटासारखे काही तरी स्थिर अन् हालविता न येण्याजोगे असे आपल्या आत्म्यात प्रविष्ट झाले आहे. जणू एखाद्या विचाराने त्याच्या मनाचे सार्वभौमत्व आपल्याकडे घेतले असावे– अन् ते त्याच्या आयुष्यभर अन् सतत न् चिरकाल राहणार आहे. एक दुर्बल तरुण म्हणून तो धरणीवर पडला होता, पण उठला तो एक दृढ मनाचा महारथी होऊन, आणि त्याला ते त्याच्या उत्कट भावसमाधीच्या वेळीच एकदम कळले अन् जाणवले. आल्योशा आपल्या सबंध आयुष्यात कधी कधीही हा क्षण विसरणे शक्य नव्हते.

" त्या वेळी कोणीतरी माझ्या आत्म्याला भेटलं." असे तो मागाहून म्हणत असे. आपल्या या शब्दावर त्याची नितांत श्रद्धा होती.

तीन दिवसांतच त्याने आपल्या ज्येष्ठ धर्मगुरूंच्या सांगण्याप्रमाणे मठाचा त्याग केला. त्यांनी त्याला " संसारी जगात काही काळ कंठण्याची " आज्ञा केली होती.

विभाग ८ :

मीत्या

१

कुझमा सॅमसोनोव

नव्या जीवनाकडे वेगाने झेप घेत असता ग्रूशिंकानं दमीत्रिकरिता आपले शेवटचे निरोपाचे शब्द आपल्या प्रेमाची घटका चिरकाल लक्षात ठेव म्हणून मागणी करणारे उच्चारले होते, पण त्याला तिचे काय झाले आहे हे काहीच माहीत नव्हते आणि त्यावेळी तो मनाच्या अत्यंत प्रक्षुब्ध अवस्थेत अन् धडपडीत होता. गेले दोन दिवस तो मनाच्या अशा अकल्पनीय अवस्थेत होता की तो कदाचित मेंदूच्या ज्वराने सहज आजारी पडला असता, असे तो स्वतःच मागाहून म्हणाला. आल्योशाला आदल्या दिवशी सकाळी तो भेटला नव्हता, आणि इवानलाही त्या दिवशी त्याची त्या खाणावळीत गाठ घेण्यात यश आले नव्हते. त्याच्या बिन्हाडातल्या माणसांनी त्याच्या हुकुमावरून त्याच्या हालचाली छपविल्या होत्या.

ते दोन दिवस त्याने अक्षरशः सगळीकडे धावाधाव करण्यात आणि तो स्वतःच नंतर म्हणाला त्याप्रमाणे 'माझ्या नशिबाशी झगडण्यात अन् स्वतःला बचावण्याचा प्रयत्न करण्यात' घालविले होते, आणि काही तास तो शहराच्या बाहेर निकडीच्या कामाकरिता अचानकपणे जाऊनही आला, कारण ग्रूशिंकाला क्षणभरही आपल्या दृष्टीपुढून गमावणे त्याला भयंकर वाटत होते. हे सर्व मागाहून तपशिलाने समजावण्यात आले अन् कागदोपत्री पुराव्यांनी निश्चित करण्यात आले; पण तूर्त मी, जी भयंकर आपत्ती त्याच्यावर अचानकपणे कोसळली तिच्याबरोबर अगोदरच्या त्या भयानक दोन दिवसांतल्या अत्यंत महत्त्वाच्या घटनाच फक्त नमूद करणार आहे.

जरी ग्रूशिंकाने त्याच्यावर फक्त एक तासभरच खरेपणाने न् मनापासून प्रेम केले हे खरे असलें, तरी तिने त्याचा कित्येक वेळा क्रूरपणाने न् निर्दयपणाने छळहीं केला. त्यात सगळ्यांत वाईट गोष्ट ही की, तिच्या मनात काय आहे हे त्याला कधी कळूच शकले नाही. सक्तीने किंवा प्रेमाने तिच्यावर वर्चस्व मिळविणे सुद्धा अशक्य होते; कारण ती कशालाच बधायची नाही. त्या मुळे ती रागावली असती किंवा

त्याच्यापासून तिने सर्वस्वी तोंडच फिरवले असते, हे त्याला पूर्वीच समजून चुकले होते. तीसुद्धा एका मानसिक झगड्यातून जात आहे, आणि फार मोठ्या आनिश्चित अवस्थेत आहे, ती कशाकरिता तरी आपल्या मनाची तयारी करीत आहे अन् त्यावर ठाम होणे तिला जमत नाही अशी त्याला शंका आली होती अन् ती बरोबर होती. त्यानं निराश होणाऱ्या अंतःकरणानं अगोदरच हेरलं, अन् त्याला सबळ कारण होतं, आणि म्हणून, काही वेळा ती आपला अन् आपल्या आवेगाचा निश्चळ द्वेष करीत असली पाहिजे हे त्याने निराश अंतःकरणाने अगोदरच हेरले, अन् बहुधा तसेच होते, पण ग्रूशिंकाच्या अंतःकरणाला कशाची यातना होती हे त्याला कळले नाही. त्याच्या दृष्टीने तीव्रतेने सतावणारा प्रश्न तो अन् फयोदर पावलोविच यांच्या मधला होता.

जाता जाता, इथे आपल्याला एक विशिष्ट वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे; ती ही की फयोदर पावलोविच ग्रूशिंकापुढे कायदेशीर लग्नाची सूचना ठेवील, किंवा कदाचित त्याने ती यापूर्वी ठेवलीही असेल अशी त्याने आपल्या मनाची पक्की समजूत करून घेतली होती. आणि तो विषयलंपट म्हातारा आपला हेतू तीन हजार रुबलनी साधण्याची आशा बाळगीत असेल हे त्याला क्षणभरही खरे वाटत नव्हते. मीत्त्याने हा निष्कर्ष काढला होता तो त्याला जे ग्रूशिंकाचे न् तिच्या स्वभावाचे ज्ञान होते त्यावरून. त्यामुळेच तो केव्हा केव्हा ग्रूशिंकाच्या सर्व अस्वस्थपणाचे मूळ, दोघांपैकी कुणाला पसंत करावे; कोणापासून आपल्याला जास्तीत जास्त लाभ होणार आहे, हे समजत नसण्यात आहे यावर त्याचा विश्वास बसत होता.

ज्या हपिसराचे ग्रूशिंकाच्या जीवनावर इतके विनाशकारी दडपण होते अन् त्याचे आगमन ती इतक्या भावविवशतेने अन् भीतीने अपेक्षित होती, तो मनुष्य येऊ घातला आहे हा विचार करण्याचे त्या दिवसांत त्याच्या डोक्यातच कधी आले नाही; हे आश्चर्य म्हटले पाहिजे. ग्रूशिंका त्याबाबतीत अलीकडे अगदी गप्प असे हे खरे. तथापि तिला फूस लावणाऱ्याकडून एक महिन्यापूर्वी तिला एक पत्र आले आहे याची त्याला पूर्ण जाणीव होती. आणि त्यासंबंधाने त्याने तिच्या तोंडूनच ऐकले होते. त्या पत्रात काय आहे हेसुद्धा त्याला अंशतः माहीत होते. एका संतापाच्या क्षणी ग्रूशिंकाने त्याला ते पत्र दाखविले होते, पण त्याला त्याने काहीच महत्त्व दिले नाही, हे पाहून तिला आश्चर्य वाटले. हे असे का होते हे सांगणे कठीण आहे. कदाचित् या स्त्रीकरिता स्वतःच्या बापाशी चाललेल्या त्याच्या झगड्याच्या, शिसारी येण्याजोग्या भयाने भारावून गेल्यामुळे त्याला त्याहून अधिक भयानक अशा कसल्याही धोक्याची कल्पना करण्याचे सामर्थ्य, निदान त्यावेळी तरी, राहिलेच नसावे. पाच वर्षे नाहीसा झालेला माणूस तिच्यावर हक्क सांगत अचानकपणे परत येतो. यावर त्याचा मुळी विश्वासच बसला नाही, अन् तो इतक्या जलदीने येऊन दाखल होईल यावर तर नाहीच नाही. शिवाय 'हपिसर'चे जे

पहिले पत्र मीत्याला दाखविण्यात आले होते, त्यात त्याच्या नव्या प्रतिस्पर्ध्याच्या आगमनाची सूचना फार संदिग्ध स्वरूपात प्रकट झाली होती. ते पत्र फार अनिश्चित स्वरूपाचे, मोठ्या मोठ्या शब्दांत लिहिलेले आणि भावुकतेने भरलेले असे होते. ग्रूशिंकाने त्यातल्या शेवटच्या ओळी त्याच्यापासून दडवून ठेवल्या होत्या हे लक्षात घेतले पाहिजे. त्या ओळीत त्याच्या परत येण्याचा उल्लेख अधिक निश्चित स्वरूपात करण्यात आला होता. शिवाय त्या वेळी त्याला ग्रूशिंकाच्या चेहेऱ्यावर सैबेरियाहून आलेल्या या पत्राबद्दल एक प्रकारचा अभावित, अभिमानी तिरस्कार दिसला होता हे त्याला पुढे कित्येक दिवसांनी आठवले. तिच्यात अन् या प्रतिस्पर्ध्यात मागाहून काय घडले होते याबद्दल ग्रूशिंकाने त्याला सांगितले नाही; त्यामुळे हळू हळू तो त्या हपिसराचे अस्तित्व पूर्णपणे विसरून गेला होता.

त्याला वाटले की मागाहून काहीही होवो, गोष्टी कशाही घडोत, फ्योदर पावलोविचशी त्याचा अंतिम झगडा हा आता अगदी नजीक आहे, अन् त्याचा निकाल दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपूर्वी लागला पाहिजे. निराश होत चाललेल्या मनाने तो क्षणोक्षणी ग्रूशिंकाच्या निर्णयाची वाट पाहत होता. त्याला सतत वाटत होते की, तो निर्णय अचानकपणे, त्या क्षणीच्या आवेगातून येईल. एकाएकी ती आपल्याला म्हणेल : "माझा स्वीकार कर, मी कायमची तुझीच आहे," अन् हे सारे संपून जाईल. आपण तिला धरून ठेवू अन् एकदम जगाच्या दुसऱ्या टोकाला घेऊन जाऊ. हो, मग आपण तिला दूर, शक्य तितके दूर, रशियाच्या अगदी दूरच्या टोकाला नाही तर पृथ्वीच्या दुसऱ्या टोकाला घेऊन जाऊ. मग आपण तिच्याशी लग्न करू, आणि नाव बदलून तिच्याबरोबर संसार करू म्हणजे आपल्याबद्दल तिथे, इथे किंवा कुठेही कुणाला काही कळणार नाही. मग, अहाहा मग, नवीन जीवनाला एकदम सुरुवात होईल !

या वेगळ्या सुधारलेल्या अन् 'सद्गुणी' जीवनाची ("ते सद्गुणी खासच असलं पाहिजे") तो क्षणोक्षणी अतिशय आतुरतेने स्वप्ने पाहात होता. त्याला त्या सुधारणेची अन् नव्या जीवनाची तहान लागून राहिली होती. ज्या गलिच्छ चिखलात तो स्वतःच्याच इच्छेने रुतला होता त्याची त्याला अगदी किळस आली होती, आणि अशा परिस्थितीतल्या बऱ्याचशा लोकांप्रमाणे, त्याचा सर्वात मोठा विश्वास स्थान बदलण्यावर होता. अशी परिस्थिती जर नसती, या शापित ठिकाणापासून जर आपल्याला उडून जाता आले– तर आपण अगदी नवा माणूस होऊ, नव्या जीवनात प्रवेश करू, असे तो मानीत होता, आणि त्याकरिता तो तळमळत होता.

पण हे सारे पहिल्या गोष्टीवर, म्हणजे त्या प्रश्नाचा सुखद निकाल लागण्यावरच, अवलंबून असणार होते. दुसरी एक शक्यता होती, तिचा शेवट वेगळा न् भयंकर होता. एकाएकी ती त्याला म्हणेल : "चालू लाग ! फ्योदर

पावलोविचशी मी आताच जमवलं आहे. मी त्याच्याशी लग्न करणार आहे अन् मला तुझी गरज नाही–" आणि मग...पण मग...पण मग काय घडेल ते मीत्याला माहीत नव्हते. शेवटच्या घटकेपर्यंत त्याला कळले नव्हते. हा त्याचा गुण म्हणून सांगितला पाहिजे. त्याचे निश्चित काहीच बेत नव्हते, कसलाही गुन्हा करण्याची त्याची योजना नव्हती. तो केवळ सखेद पाहत राहिला होता, पण मनात पहिल्याची, म्हणजे आपल्या नशिबाचा सुखद निकाल लागणार याची, त्याने तयारी केलेली होती. दुसरा कोणताही विचार तो खरोखर हाकूनच लावीत होता. पण असा शेवट होण्याच्या बाबतीत एक अगदी वेगळीच चिंता उत्पन्न झाली, एक नवीन, प्रासंगिक, तरी प्राणघातक अन् न सुटणारी अडचण दत्त म्हणून उभी राहिली.

जर ती त्याला म्हणाली की, "मी तुझी आहे, मला घेऊन चल," तर तो तिला कसा घेऊन जाणार? त्याच्याजवळ त्याकरिता साधनसामग्री, म्हणजे पैसा, कुठे होता? बरोबर याच वेळी फ्योदर पावलोविचकडून येणारा पैशाचा सर्व वसूल, म्हणजे इतकी वर्षं विनाव्यत्यय येत राहिलेली मदत, थांबली. ग्रूशिंकाकडे अर्थात पैसा होता; पण त्या बाबतीत मीत्याचा अभिमान एकदम जागा झाला; तिला घेऊन जाऊन तिच्याबरोबर नव्या जीवनाला सुरुवात करायची ती स्वतः; स्वतःच्याच पैशानं, तिच्या नाही. तिचा पैसा घ्यावा हा विचारसुद्धा त्याच्या मनाला शिवणे शक्य नव्हते, आणि नुसत्या त्या विचारानेच तीव्र तिटकाऱ्याची तिडीक त्याच्या मनात उठली. या वस्तुस्थितीविषयी मी इथे लांबण लावून किंवा तिचे विश्लेषण करून सांगू इच्छीत नाही. फक्त एवढेच सांगतो की, यावेळी त्याची मनःप्रवृत्ती अशी होती. हे सर्व कदाचित अप्रत्यक्षपणे अन् न कळत कतिरिना इवानोवनाच्या ज्या पैशाचा त्याने अप्रामाणिकपणे अपहार केला होता त्याचा गुप्त डंख मनाला असल्यामुळे वाटत असेल. "एकीशी मी बदमाषगिरी केली, आणि दुसरीशी मी जाणूनबुजून बदमाषगिरी करीन," अशी त्याची त्या वेळी भावना होती, असा त्यानं नंतर खुलासा केला. तो म्हणाला, "अन् ग्रूशिंकाला कळेल तेव्हा अशा बदमाषाबद्दल तिला पर्वा वाटणार नाही."

तर मग त्याला साधन कुठून मिळणार? नशीब घडविणारा हा पैसा कुठून तो पैदा करणार? त्याशिवाय सर्व काही हातचे जाणार होते व काहीच करणे शक्य नव्हते, "आणि याचे कारण फक्त माझ्याकडे पैसा नाही. अरेरे! किती शरमेची गोष्ट!"

पुढच्या गोष्टींची आगाऊ अटकळ म्हणून सांगतो : त्याला कदाचित हा पैसा कुठून मिळवायचा हे माहीत होते, तो त्या वेळी कुठे ठेवलेला आहे हेही कदाचित माहीत होते. या संबंधीने मी इथे अधिक सांगत नाही, कारण पुढे ते स्पष्ट होणारच आहे, कितीतरी अस्पष्ट रीतीने का होईना पण त्याची मुख्य अडचण मला सांगितली पाहिजे, ती ही की त्याला माहीत असलेली ती रक्कम घेण्याकरिता, ती घेण्याचा अधिकार मिळण्याकरिता त्याने प्रथम कतिरिना इवानोवनाचे तीन हजार

परत केले पाहिजेत— ते केले नाहीत तर, "मी एक सामान्य खिसेकापू होईन, एक बदमाष होईन," असे मीत्याच्या मनाने घेतले. आणि म्हणून त्याने कतिरीनाचे ते तीन हजार परत करण्याकरिता आकाश-पाताळ एक करण्याचा निर्धार केला, अन् ते काम सर्वांत प्रथम करण्याचे त्याने ठरविले. या निर्णयाच्या शेवटच्या अवस्थेला तो दिवसाच्या शेवटच्या घटकांच्या काळातच पोचला होता, म्हणजे दोन दिवसांपूर्वी. मोठ्या रस्त्यावर, ज्या संध्याकाळी ग्रूशिंकाने कतिरीनाचा अपमान केला होता, अन् आल्योशाशी शेवटची भेट झाल्यानंतर मीत्याने आल्योशाकडून त्यासंबंधीचा वृत्तान्त ऐकल्यावर आपण बदमाष आहो हे कबूल केले होते, अन् कतिरीना इवानोवनाला जर तिचे त्यामुळे काही समाधान होणार असेल तर तसे सांगायला सांगितले होते त्यावेळी त्या रात्री आपल्या भावाचा निरोप घेतल्यानंतर त्याला त्या उन्मत्तावस्थेत "कात्याचे माझ्यावरचे ऋण फेडायचं राहून जाण्यापेक्षा कुणाचा तरी खून करून त्याला लुबाडलेलं पत्करलं." असे त्याला वाटले होते. "मी तिला फसवलं अन् तिचा पैसा चोरला आणि तिच्या पैशाचा विनियोग ग्रूशिंकाबरोबर पळून जाऊन नव्या जीवनाला सुरुवात करण्याकडं केला, असं म्हणण्याचा कात्याला अधिकार मिळण्यापेक्षा, ज्यानं त्यानं मला चोर अन् खुनी म्हटलेलं मला चालेल, सैबेरियाला जाणं मी पत्करीन ! ते मी करू शकेन !" दात-ओठ खात मीत्याने तसे ठरवले, आणि एकदा दोनदा त्याला वाटले की, आपला मेंदू तडकतो आहे. पण दरम्यानच्या काळात तो धडपडतच राहिला...

आता त्याच्यापाशी निराशेवाचून काही राहिले नव्हते अशी कोणाचीही समजूत होईल...कारण जगात त्याचे काही नसताना इतकी रक्कम उभी करणे त्याला कसे शक्य होते? तरी आश्चर्य असे की, तो शेवटपर्यंत ते तीन हजार आपल्याला मिळतील, तो पैसा कसा का होईना आपल्याकडे आपणहून चालत येईल, जणू तो आकाशातूनच पडेल; अशी सतत आशा करीत राहिला. दमीत्रिसारख्या ज्या माणसांना, पैसा स्वतःच्या कष्टाने न मिळता वारशाने त्यांच्याकडे आलेला असेल, तो उधळणे या खेरीज त्याच्याशी काही कर्तव्य नसते, आणि पैसा कसा मिळवितात याची काही कल्पना नसते, अशा माणसांची हीच स्थिती होते. दोन दिवसांपूर्वी आल्योशाचा निरोप घेतल्यानंतर लगेच अत्यंत वेड्यावाकड्या कल्पनांच्या झंझावाताने त्याच्या मेंदूचा ताबा घेतला, अन् त्याचे विचार अस्ताव्यस्त करून गोंधळ उत्पन्न केला. याच कारणामुळे त्याने पहिल्या प्रथम अत्यंत अफाट साहस करण्याचा बेत योजला. या जातीच्या माणसांना अशा परिस्थितीत कदाचित अत्यंत असंभवनीय अफाट योजना अगोदर सुचत असाव्यात अन् त्या अत्यंत व्यवहार्य वाटत असाव्यात.

त्याने तत्काळ ग्रूशिंकाचा पालक व्यापारी सॅमसोनोव याच्याकडे जाण्याचे

व त्याला एक ' योजना ' सुचविण्याचे ठरवले, आणि तिच्या साहाय्याने त्याकरिता लागणारी सगळी रक्कम एकदम त्याच्याकडून उचलण्याचे ठरविले. आपल्या योजनेच्या व्यापारी दृष्टीने असणाऱ्या किंमतीबद्दल त्याला मुळीसुद्धा संशय नव्हता. फक्त सॅमसोनोव आपल्या या विलक्षण कल्पनेचा, समजा, व्यापारी दृष्टिकोणाखेरीज इतर कोणत्याही दृष्टिकोणातून विचार करू लागला तर त्याला ती कशी वाटेल याचीच त्याला निश्चिती वाटेना. मीत्याला तो व्यापारी पाहून माहीत होता तरी त्याची त्याच्याशी ओळख नव्हती अन् कधी एक शब्दही तो त्याच्याशी बोलला नव्हता. पण कोणत्या तरी अज्ञात कारणांने बऱ्याच दिवसांपासून त्याची अशी खात्री झाली होती की, माणसांवरून ओवाळून टाकलेला आणि मरणाच्या दाराशी पडलेला तो म्हातारा, आता ग्रूशिंकाला जर प्रतिष्ठित दर्जा मिळत असला आणि तिने " विश्वासार्ह " माणसाशी जर लग्न केले तर कदाचित् मुळीच हरकत घेणार नाहीं असा संभव होता. आणि तो हरकत घेणार नाही इतकेच नव्हे तर त्याची तशीच इच्छा असेल, आणि जर तशी संधी आली तर, तो मदत करायलाहीं तयार होईल असे त्याला वाटले. कोणत्यातरी जनप्रवादांवरून म्हणा, किंवा ग्रूशिंकाच्या तोंडून क्वचित् केव्हातरीं बाहेर पडलेल्या शब्दावरून म्हणा, हा म्हातारा ग्रूशिंका-करिता फयोदर पावलोविचपेक्षा आपल्यालाच अधिक पसंत करील असेही त्याने पुढे जाऊन अनुमान केलेले होते.

अशा तऱ्हेच्या मदतीवर विसंबण्यात आणि एक प्रकारे आपल्या वधूला तिच्या पालकाच्या हातून काढून घ्यायला तयार होण्यात दमीत्रिने अतिशय जंगलीपणा दाखविला अन् सौजन्याचा अभाव दर्शविला असे माझ्या कादंबरीच्या अनेक वाचकांना कदाचित वाटेल. मी एवढेच म्हणेन की, ग्रूशिंकाचा भूतकाळ आता पूर्णपणे संपला असे मीत्या मानीत होता. त्या भूतकाळाकडे तो अपार दयाबुद्धीने पाहत होता आणि आपल्या प्रेमाच्या आवेगात त्याने निश्चय केला होता की, एकदा ग्रूशिंकाने आपल्याला माझे तुझ्यावर प्रेम आहे म्हणून सांगितले अन् आपल्याशी लग्न केले की तिथून नव्या ग्रूशिंकाचा अन् नव्या दमीत्रिचा प्रारंभ होईल, अन् तो दुराचारापासून मुक्त असेल. ते एकमेकांना क्षमा करतील आणि आपल्या आयुष्यांना नव्याने सुरुवात करतील. कुझमा सॅमसोनोवबद्दल बोलायचे तर, ग्रूशिंकाचे त्याच्यावर कधीच प्रेम नसताना तिच्या गतायुष्यावर ज्याने निर्णायक रीतीने प्रभाव गाजविला अन् जो आता भूतकाळात जमा झाल्यासारखा होता, त्याला संपूर्णपणे खतम झाल्यासारखा, अन् अस्तित्वातच नसल्यासारखा दमीत्रि मानीत होता. शिवाय मीत्या त्याला मनुष्य म्हणून मानीतच नव्हता, कारण शहरात प्रत्येकाला माहीत होते की, शरीराने तो केवळ विकलांग झालेला होता, ग्रूशिंकाशी असलेल्या त्याच्या संबंधाचे स्वरूप बदलून आता ते केवळ पित्यासारखे झालेले होते, अन् ही स्थिती बऱ्याच काळापासून होती.

काही म्हटले तरी या सर्व गोष्टींत मीत्याचा फार भोळेपणा होता, कारण तो किती जरी दुर्गुणी असला तरी, त्याचे अंतःकरण साधेभोळे होते. म्हातारा कुझमा आता परलोकाला जाण्याच्या तयारीत असल्यामुळे आपल्या ग्रूशिंकाशी असलेल्या मागील संबंधाबद्दल मनापासून पश्चात्ताप करीत असला पाहिजे, आणि आता तिला या निरुपद्रवी, म्हाताऱ्या माणसाहून दुसरा कोणी अधिक निष्ठावान मित्र अन रक्षक जगात नाही, अशी मीत्याने आपल्या मनाची खरोखरच समजूत करून घेतली होती. हे त्याच्या भोळेपणाचे उदाहरण होते.

त्या चौकात आल्योशाशी त्याचे बोलणे झाल्यानंतर, सारी रात्र त्याला झोप जवळ जवळ आलीच नाही. आणि दुसरे दिवशी सकाळी दहा वाजता, तो सॅमसोनोवच्या घरी जाऊन पोचला अन् त्याने नोकराला आपण आल्याची वर्दी द्यायला सांगितले. ते फार मोठे अन् उदासवाणे दिसणारे जुने दुमजली घर होते. त्याला जोडून एक घर अन् बाहेर खोल्या होत्या. खालच्या मजल्यावर सॅमसोनोवचे दोन लग्न झालेले मुलगे आपल्या कुटुंबासह, त्याची म्हातारी बहीण अन् त्याची अविवाहित मुलगी असे राहत होते. बाजूच्या घरात दोन कारकून राहत होते, त्यांपैकी एकाचे मोठे कुटुंब होते. बाजूचे घर अन् खालचा मजला यात माणसांची गर्दी होती. परंतु म्हाताऱ्याने वरचा मजला स्वतःकडे ठेवला होता आणि त्याची मुलगी जरी त्याची सेवा करीत असे तरी तो तिला आपल्या बरोबर राहू देत नव्हता, आणि तिला दमा होता तरी अमुक ठरलेल्या वेळांना अन् तो बोलावील त्या कोणत्याही वेळी तिला खालून वर धावत जावे लागे.

या वरच्या मजल्यावर अनेक मोठ्या खोल्या होत्या अन् त्या केवळ प्रदर्शनीय म्हणून ठेवल्या होत्या. जुन्या ढंगाच्या व्यापारी लोकांच्या पद्धतीने त्या सजविलेल्या होत्या. भिंतीला लागून बेढब शिसवी लाकडाच्या खुर्च्यांच्या लांबलचक अन् कंटाळवाण्या रांगा होत्या, वरती आच्छादने असलेल्या काचेची झुंबरे होती, अन् भिंतीवर, फिकट झालेले आरसे होते. या साऱ्या खोल्या रिकाम्या, पूर्णपणे रिकाम्या अन् बिनवापरात होत्या, कारण तो म्हातारा फक्त एकाच खोलीचा, म्हणजे एका लहान, दूर असलेल्या झोपण्याच्या खोलीचा वापर करी. तिथे एक म्हातारी नोकर बाई डोक्याला रुमाल गुंडाळून त्याच्या दिमतीला राही, आणि एक मुलगा वाटेवरच्या एका कपाटावर बसून राही; पाय सुजलेले असल्यामुळे म्हाताऱ्याला चालतासुद्धा येत नव्हते. आणि क्वचित केव्हातरीच त्याच्या कातडी आरामखुर्चीवरून त्याला उचलले जाई, त्या वेळी ती म्हातारी बाई त्याला आधार देऊन त्या खोलीत इकडून तिकडे अन् तिकडून तिकडे एकदा दोनदा नेई. तो या म्हाताऱ्या बाईवरही चिडाचीड करी अन् फारसा बोलत नसे.

त्याला 'कॅप्टन' आल्याची वर्दी देण्यात आली तेव्हा त्याने त्याला भेटायला चटकन् नकार दिला. पण मीत्याने आग्रह धरून आपले नाव पुनः वर पाठविले.

सॅमसोनोवने त्या मुलाला बारकाईने प्रश्न केले : तो कसा दिसतो ? तो दारू प्याला आहे का ? तो आरडाओरडा करणार आहे का ? त्याला जे उत्तर मिळाले ते असे की तो शुद्धीवर आहे, पण जाणार नाही म्हणतो. म्हाताऱ्याने पुन्हा नकार दिला. मग मीत्याने, आगाऊच हे सारे हेरून आपल्याबरोबर आणलेल्या कागदावर पेन्सिलीने स्वच्छ लिहिले : आग्राफेना अलेक्झांद्रोवनाच्या संबंधात अत्यंत महत्त्वाच्या कामाकरिता," आणि तो कागद त्या म्हाताऱ्याकडे पाठविला.

थोडा विचार केल्यानंतर सॅमसोनोवने आलेल्या मनुष्याला दिवाणखान्यात घेऊन जाण्याबद्दल मुलाला सांगितले, आणि त्या म्हाताऱ्या बाईला आपल्या धाकट्या मुलाला ताबडतोब वर येण्याची आज्ञा देऊन खाली पाठविले. हा धाकटा मुलगा सहा फुटांच्यावर उंचीचा अन् असामान्य ताकद असलेला होता. त्याचे केस बारीक कापलेले होते आणि त्याचा पोशाख युरोपियन पद्धतीचा होता, पण त्याच्या बापाच्या अंगावर एक लांब तुर्की सदरा होता अन् त्याला दाढी होती; ह्या मुलाला आज्ञा जाताच तो न कुरकुरता आला. सारे कुटुंब बापापुढे चळचळा कापत असे. म्हाताऱ्याने या प्रचंड पुरुषाला बोलावून घेतले, ते त्याला त्या 'कॅप्टन'ची भीती वाटली म्हणून नाही (तो तसा मुळीच भित्र्या स्वभावाचा नव्हता) तर काही घडले सवरले तर एखादा साक्षी असावा म्हणून. आपल्या मुलाचा अन् त्या नोकर मुलाचा आधार घेऊन तो शेवटी लडखडत दिवाणखान्यात आला. त्याला बरेच कुतूहल वाटत होते असे मानता येईल. ज्या दिवाणखान्यात मीत्या त्याची वाट पाहात बसला होता ती चांगली प्रशस्त, माणसांची ये-जा नसलेली खोली होती, ती पाहाताच मनावर एक उदासीनपणाचे दडपण पडल्यासारखे होई. तिला खिडक्यांच्या दोन रांगा होत्या, एक गॅलरी होती, संगमरवरी फरशीच्या भिंती होत्या आणि वर आच्छादने असलेली तीन प्रचंड झुंबरे लटकत होती.

दारापासल्या एका लहान खुर्चीवर बसून घाबरट अधीरपणाने मीत्या आपल्या नशिबाची वाट पाहात होता. सत्तर फूट दूर असलेल्या विरुद्ध बाजूच्या दारातून जेव्हा तो म्हातारा येताना दिसला, तेव्हा मीत्या एकदम उठून उभा राहिला आणि आपल्या लांब, लष्करी ढांगा टाकीत त्याला भेटण्याकरिता चालत गेला. मीत्याने पोषाख चांगला केला होता. त्याने फ्रॉक कोट घातला होता अन् बटने लावली होती, डोक्यावर गोल टोपी होती आणि हातात काळे मोजे; तीन दिवसांपूर्वी ज्येष्ठ धर्मगुरूंच्या इथे आपल्या बापाच्या न् भावांच्याबरोबर कौटुंबिक बैठकीकरिता गेला असताना त्याने जसा पोषाख केला होता तसा. तो म्हातारा त्याची वाट पाहात थांबला, त्याची उभे राहण्याची ऐट प्रतिष्ठितपणाची होती अन् तो ताठ होता, आणि मीत्याला जाणवले की, आपण पुढे पुढे जात असतानाच त्याने आपल्याला पुरते पाहून घेतले आहे. सॅमसोनोवचा भयंकर सुजलेला चेहरा पाहून मीत्याच्या मनावर फार परिणाम झाला. त्याचा खालचा ओठ नेहमीच

जाड असे तो आता खाली लोंबत होता अन् पुरीसारखा दिसत होता. त्याने आपल्या पाहुण्याला शिष्टाचाराला शोभेलशा मौनाने वाकून नमस्कार केला, कोचाजवळच्या एका बुटक्या खुर्चीवर बसण्याची हाताने खूण केली, आणि आपल्या मुलाच्या हातावर भार देऊन तो हळूहळू समोरच्या कोचावर खाली खाली होऊ लागला अन् तसे होत असताना वेदनेने कण्हू लागला; त्याचे ते वेदनायुक्त कष्ट पाहून मीत्याला तात्काळ पस्तावा झाल्यासारखे झाले आणि ज्या प्रतिष्ठित माणसाला त्रास देण्याचे आपण धारिष्ट केले, त्याच्या सान्निध्यात त्याला आपल्या यःकश्चित-पणाची पटकन जाणीव झाली.

"माझ्याकडून आपल्याला काय पाहिजे, महाशय?" त्या म्हाताऱ्याने एकदाचे खाली बसल्यानंतर विचारपूर्वक, स्पष्ट शब्दांत, कठोरपणे पण सौजन्याने विचारलं.

मीत्या दचकला, एकदम उठला पण पुन्हा खाली बसला. मग त्याने एकदम मोठ्याने, घाबरटपणाच्या घाईने बोलायला सुरुवात केली. बोलतांना त्याचे अंगविक्षेप होत होते अन् तो अगदी स्पष्ट दिसण्याजोग्या आवेशात बोलत होता. आपण पुरते कचाट्यात सापडलेलो आहो, धुळीला मिळण्याच्या बेतात आहो, काडीचा आधार शोधायला म्हणून आलो आहो, जर मिळाला नाही तर ठार बुडणार वगैरे. म्हाताऱ्या सॅमसोनोवने बहुधा एका क्षणात हे सारे ताडले असावे, पण त्याचा चेहरा भावनाशून्य अन् पुतळ्यासारखा निश्चल राहिला.

"अत्यंत माननीय महाशय, कुझमा कुझमिच, माझे वडील फयोदर पावलोविच त्यांच्याबरोबर चाललेले माझे वाद आपण खात्रीने अनेकदा ऐकले असतील. त्यांनी माझ्या आईकडून वारशाने आलेल्या संपत्तीचा अपहार केला आहे...सबंध शहराच्या तोंडी हा विषय झाला आहे...कारण इकडे ज्या संबंधानं बोलू नये अशा गोष्टी लोकांच्या तोंडी असतात...तो आपल्याला कळला असेल, शिवाय ग्रूशिंकाकडून—चुकलो, आग्राफेना अलेक्झांद्रोवनाकडून आपल्या कानापर्यंत ते आलं असेल, आग्राफेना अलेक्झांदोवनाबद्दल माझ्या मनात अतिशय आदर अन् प्रेमभाव आहे..."

अशी मीत्याने सुरुवात केली अन् पहिल्या वाक्यालाच तो अडखळला. मी त्याचे बोलणे शब्दन् शब्द इथे देणार नाही, पण त्याचा सारांशच फक्त देतो. तो म्हणाला, तीन महिन्यांपूर्वी या प्रांताच्या मुख्य शहरातील एका वकिलाचा मी मनात विशिष्ट हेतू धरून ("बुद्धिपूर्वक" हा शब्द न वापरता मीत्याने मुद्दाम व हे शब्द वापरले) सल्ला घेतला; कुझमा कुझमिच, हा वकील म्हणजे पावेल पावलोविच कोर्नेप्लोदोव, आपण त्याचे नाव ऐकलं असेल? फार विशाल बुद्धिमत्तेचा अन् मुत्सद्द्याचं मन असलेला मनुष्य आहे...तो आपल्यालाही ओळखतो...आपल्याविषयी त्यानं फार गौरवाचे उद्गार काढले होते..." मीत्या पुन्हा अडखळला. पण

या अडखळण्यांनी तो हटला नाही. मध्ये पडलेल्या अंतरायांवरून त्याने झटकन् उडी मारली अन् तो पुढे पुढे बोलण्याची धडपड करीत राहिला.

या कार्नोप्लोदोवने बारकाईने प्रश्न विचारून अन् त्याला त्याच्याकडे नेता आले ते कागदपत्र तपासून (मीत्याने या कागदपत्रांचा एकप्रकारे संदिग्धपणेच उल्लेख केला अन् घाईघाईने तो त्या विषयावरून पुढे सरकला) त्याला सांगितले की चेरमाश्न्या या खेड्यासंबंधाने आपल्याला काम चालविता येण्याजोगे आहे, ते खेडे तुमच्याकडे, म्हणजे मीत्याकडेच, तुमच्या आईकडून आलेले असले पाहिजे. अन् अशा त्या म्हाताऱ्या चांडाळाला म्हणजे (त्याच्या बापाला) चांगला शह देता येईल. “कारण सगळीच दारं काही बंद झालेली नाहीत अन् न्यायाला अजूनही एखादी पळवाट मिळेल.” खरे म्हणजे फ्योदर पावलोविचकडून सहा नव्हे, सात हजार सुद्धा रुबल आणखी मिळण्याजोगे तुम्हाला मानता येतील. कारण चेरमाश्न्याची किंमत किमान पंचवीस हजार, मी म्हणेन अठ्ठावीस हजार, नव्हे, कुझमा कुझमिच, तीस, हो, तीस हजारसुद्धा होईल. अन् तुम्हाला खरं तरी वाटेल मला त्या हृदयशून्य माणसाकडून सतरासुद्धा मिळाले नाहीत!” म्हणून त्याने म्हणजे मीत्याने ते प्रकरण तूर्त बाजूला टाकले. कारण त्याला कायद्याचे काहीच ज्ञान नव्हते. पण इकडे आल्यानंतर आपल्यावरच उलट येणे काढलेले पाहून तो तर थक्कच होऊन गेला. (इथे मीत्या पुन्हा भरकटला अन पुन्हा त्याने छलांग उडी घेतली). “म्हणून, सज्जन अन सन्माननीय कुझमा कुझमिच, आपण माझे हे सर्व हक्क त्या अमानुष राक्षसाला विरोध करून घ्यायला तयार होणार नाही काय? अन मला फक्त तीन हजारांची रक्कम देणार नाही काय?... काही झालं तरी आपल्याला यात तोटा येणार नाही निश्चित समजा. माझा शब्द देऊन, मी हे सांगतो. उलट, आपल्याला तीन हजारांऐवजी सहा-सात हजार मिळतील...” सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे प्रकरण त्याच दिवशी संपविण्याची त्याला इच्छा होती.

“मी हा सौदा आपल्याशी एखाद्या दस्तऐवज करणाऱ्या अधिकाऱ्यापुढं किंवा जो कोणी असेल त्याच्यापुढं करीन... नव्हे, मी काय वाट्टेल ते करायला तयार आहे... मी सर्व खतपत्रं आपल्या स्वाधीन करायला तयार आहे... ज्यावर म्हणाल त्यावर सही करीन... अन् आपण करारपत्र एकदमच करून टाकू... अन् जर शक्य असेल, तर आता सकाळीच... आपण ते तीन हजार मला देऊ शकाल, कारण या शहरात आपल्या तोडीचा असा दुसरा कोणी सावकार नाही, अन् आपण मला वाचवाल... मला वाचवाल, खरं म्हणजे... एका चांगल्या, मी म्हणेन एका सामान्य कृतीकरिता... कारण एका व्यक्तीबद्दल मी माझ्या हृदयाशी कमालीची मानाची भावना बाळगली आहे, त्या व्यक्तीला आपण चांगली ओळखता अन तिची पिता म्हणून काळजी घेता. खरोखर, जर आपण पिता नसता तर मी मुळीच आलो नसतो. खरोखर या प्रकरणात तिघांचा

झगडा आहे, कारण हे नशीब आहे– ती भयानक वस्तू आहे, कुझमा कुझमिच ! शोकघटना आहे, कुझमा कुझमिच, शोकघटना आहे ! अन् त्यातून आपण आता गळून पडला आहात, म्हणून ही दोघांची रस्सीखेच आहे. मी हे कदाचित् विचित्र रीतीनं मांडतो आहे, पण मी काही साहित्यिक मनुष्य नव्हे. काय समजलात, मी एका बाजूला आहे, अन् तो राक्षस दुसऱ्या बाजूला. तेव्हा आपण निवड केली पाहिजे. एक तर मी किंवा तो राक्षस. हे सर्व आपल्या हाती आहे– तीन जिवांचं भवितव्य, अन् दोघांचं सुख... माफ करा, मी सारा गडबड घोटाळा केलाय, पण आपल्याला समजलं... आपल्या डोळ्यांवरून आपल्याला समजलं असं मला दिसतं... आणि जर आपल्याला समजत नसेल, तर मग मी संपलोच... तेव्हा हे असं आहे ! "

मीत्याने आपलं बेढंगी भाषण " हे असं आहे " या शब्दांनी थांबवले अन् आपल्या जागेवरून एकदम उठून उभा राहून तो आपल्या मूर्खपणाच्या सूचनेवरील उत्तराची वाट पाहू लागला. ह्या शेवटच्या शब्दप्रयोगासरशी त्याला एकदम निराशापूर्वक जाणीव झाली होती की आपले सारे बोलणे व्यर्थ झाले आहे; आपण अगदीच बेवकूफपणाने बोलत होतो याची त्याला जाणीव झाली.

" किती विचित्र आहे ! इकडं येताना वाटेत हे अगदी ठीक वाटलं, अन् आता हा निव्वळ बेवकूफपणा वाटतो आहे," हा विचार एकदम त्याच्या निराशामय मनात उद्भवला. त्याचे बोलणे चालू होते तो सबंध वेळ तो वृद्ध गृहस्थ निश्चल बसला होता. त्याचे निरीक्षण करीत होता, त्याचे डोळे निर्विकार भावशून्य दिसत होते. एक क्षणभर त्याला संदिग्धावस्थेत ठेवल्यानंतर कुझमा कुझमिच शेवटी अत्यंत परखड अन् गारठून टाकणाऱ्या स्वरात बोलला :

" माफ करा, आम्ही असला धंदा करीत नसतो."

मीत्याला आपल्या पायातील शक्ती खलास होत असल्यासारखी वाटली.

" आता मी काय करावं, कुझमा कुझमिच ? " तो फिकटपणाने हसून पुटपुटला. " मला वाटतं मला काही आशा राहिलेली नाही– आपल्याला काय वाटतं ? "

" माफ करा मला... "

मीत्या उभा, न हालता नुसता पाहतच राहिला. एकदम त्याला त्या वृद्धाच्या चेहेऱ्यावर हालचाल दिसली. तो भानावर आला.

" हे पहा, महाशय, असल्या प्रकारचा धंदा आमच्या वहिवाटीतला नाही," तो वृद्ध सावकाशीने म्हणाला. " तिकडं ते कार्ट आहे, ते वकील आहेत– ते म्हणजे पूर्ण दैन्यच आहे. पण तुम्हाला वाटलं तर, इथं एक माणूस आहे त्याला विनंती करून बघा."

" अहाहा ! कोण आहे तो ? तुम्ही माझे मुक्तिदाते आहात; कुझमा कुझमिच," मीत्या अडखळला.

तो इथं राहात नसतो, आणि आता तो नाहीही. तो एक शेतकरी आहे, तो लाकडाचा व्यापार करतो. त्याचं नाव आहे ल्यागेवी. गेलं वर्ष त्याची फ्योदर पावलोविचशी चेरमाश्न्याच्या तुमच्या जंगलाबाबत रकझक चालली आहे. त्यांचं किंमतीच्या बाबतीत जमत नाही, तुम्ही कदाचित ते ऐकलं असेल. तो आता पुन्हा इथं आला आहे आणि इल्यिनस्को, इथं पाद्र्याच्या घरी त्याचा मुक्काम आहे. वोलोविया स्टेशनपासून आठ नऊ मैल ते ठिकाण आहे. त्यानं मलाही जंगलांच्या व्यवहारासंबंधी माझा सल्ला घेण्याकरिता लिहिलं होतं. फ्योदर पावलोविच स्वतःच जाऊन त्याला भेटू म्हणतो. तेव्हा जर फ्योदर पावलोविचच्या अगोदर तुम्ही गेलात अन् माझ्यापुढे जे मुद्दे मांडलेत ते ल्यागेवीपुढं मांडलेत तर तो कदाचित्..."

" सुरेख कल्पना ! " मीत्या भावनोद्रेकाने मध्येच बोलला. " अगदी योग्य मनुष्य, हे त्याला मान्य होईल. तो त्याकरिता त्यांच्याशी हुज्जत घालतो आहे, कारण ते त्याच्याकडं जास्त मागणी करताहेत, आणि इथं तर खुद्द त्या मालमत्तेचीच मालकी देणारे सर्व कागदपत्रच त्याला मिळतील. हा–हा–हा ! "

आणि मीत्या एकदम विक्षिप्तपणाने हसू लागला, त्याने सॅमसोनोव दचकला.

" मी आपले कसे आभार मानू, कुझमा कुझमिच ? " मीत्या अतिशय भावुकतेने म्हणाला.

" त्याचा उल्लेख करण्याची गरज नाही," सॅमसोनोव आपले डोके तिरके करून म्हणाला.

" पण आपल्याला माहीत नाही, आपण मला कसं वाचवलंय. केवढी मोठी चिंता घेऊन मी आपल्याकडं आलो... तेव्हा आता या पाद्र्याच्या घरी ! "

" आभारांची गरज नाही."

" मी जलदी करून तिकडं जाईन. मी आपल्या शक्तीला फार ताण दिलासं मला वाटतं. मी ते केव्हाही विसरणार नाही. हे एक रशियन बोलतो आहे, कुझमा कुझमिच, एक रशियन ! "

" अर्थातच ! "

मीत्याने त्यांचा हात हाती घेऊन दाबण्याकरिता धरला, पण त्या वृद्ध माणसाच्या डोळ्यांत एक द्वेषपूर्ण झाक त्याला दिसली. मीत्याने आपला हात मागे घेतला. पण लगेच त्याने स्वतःला स्वतःच्या गैरविश्वासूपणाबद्दल दोष दिला.

" तो थकलाय म्हणून तसं असेल." त्याने विचार केला.

" तिच्याकरिता ! तिच्याकरिता, कुझमा कुझमिच ! हे तिच्याकरिता आहे हे तुमच्या लक्षात आलंच असेल." तो ओरडून म्हणाला. त्याचा आवाज सबंध खोलीभर दणाणला. त्याने वाकून नमस्कार केला. तो गर्रदिशी मागे फिरला आणि

त्याच लांब लांब ढांगा टाकीत तो मागे न पाहता दाराकडे गेला. तो आनंदाने कापत होता.

" सगळं काही वाटोळं होण्याच्या बेतात होतं. आणि माझ्या पालक देवदूतानं मला वाचवलं." हा विचार त्याच्या मनात आला. आणि जर सॅमसोनोवसारख्या धंदेवाईक माणसाने (अत्यंत लायक वृद्ध माणूस अन् काय त्याचा प्रतिष्ठितपणा !) हा मार्ग सुचविलाय, तर... तर यश हमखास ठेवलेलंच. आपण ताबडतोब जाऊ. " मी रात्र होण्यापूर्वी परत येईन, रात्री मी परत येईन अन् ही गोष्ट पूर्ण झालेली असेल. तो म्हातारा मला हसत असेल काय ? " मीत्या आपल्या घराकडे चालला असता म्हणाला. अर्थात त्याला हा सल्ला " अशा व्यवहारी माणसाकडून " म्हणजे ज्याला व्यवहाराचं ज्ञान आहे, त्या ल्यागेवी (काय विचित्र नाव तरी !)ची माहिती आहे अशा माणसाकडून मिळालाय यावाचून त्याच्या डोक्यात आता कसलीच कल्पना येऊ शकत नव्हती. की तो म्हातारा मला हसत असेल.

हाय हाय ! हा दुसरा तर्कच बरोबर होता. पुष्कळ दिवसांनंतर, जेव्हा तो अनर्थ घडून गेला होता तेव्हा म्हाताऱ्या सॅमसोनोवने स्वतःच हसून कबूल केले की, आपण त्या ' कॅप्टन 'ला उल्लू बनविले. म्हातारा भावनाशून्य, द्वेषी अन् कडवट बोलणारा मनुष्य होता. जबर वैरभाव ठेवू शकेल असा त्या " कॅप्टन "चा उद्दीपित चेहरा, हा सॅमसोनोवच्या असल्या म्हणजे त्याच्या योजनेसारख्या बनवून सांगितलेल्या गोष्टीने हुरळून जाईल अशी त्या " दुराचारी न् उधळ्या "ची मूर्खपणाची खात्री, ज्या ग्रूशिंकाचे नाव घेऊन हा ' स्त्रीलंपट ' पैसे काढण्याकरिता असली थाप घेऊन त्याला फसविण्याकरिता आला तिच्या बाबतीतील मत्सर, यांपैकी कोणत्या गोष्टीचा त्या म्हाताऱ्यावर परिणाम झाला असावा हे मला सांगता येत नाही. पण जेव्हा मीत्या त्याच्यापुढे उभा राहिला अन् त्याला आपल्या पायातले बळच नाहीसे झाल्यासारखे वाटले अन् आपला सत्यानाश झाला असे तो जोराने ओरडला, त्याचक्षणी त्या वृद्ध माणसाने त्याच्याकडे तीव्र द्वेषाने पाहिले अन् त्याची फजिती करण्याचे ठरविले. मीत्या निघून गेल्यानंतर कुझमा कुझमिच रागानं काळानिळा होऊन आपल्या मुलाकडे वळला अन् त्याला त्याने आज्ञा केली की, या भिकाऱ्याचे पुन्हा आपल्याला तोंड दिसता कामा नये, अशी व्यवस्था करा. त्याला अंगणातसुद्धा येऊ देऊ नका, नाही तर मी..."

आपली धमकी त्याने उच्चारली नाही. पण ज्याने त्याला नेहमी रागावलेला पाहिले होते, तो त्याचा मुलगा सुद्धा भीतीने थरथरला. त्यानंतर सबंध तासभर तो म्हातारा रागाने कापत होता, आणि सायंकाळच्या सुमाराला तर त्याची प्रकृती फार बिघडली अन् डॉक्टरला बोलावणे गेले.

२

त्यागेवी

भरवेगाने घोडागाडी घेऊन जाणे अवश्य होते. आणि त्याच्यापाशी तर घोड्यांना देण्यासाठी पैसे नव्हते. त्याच्यापाशी फक्त चाळीस कोपेक होते, बस्स तेवढेच. इतकी वर्षे वैभवात काढल्यानंतर उरलेले होते ते तेवढेच! पण घरी त्याच्याकडे एक चांदीचे घड्याळ होते व ते बरेच दिवस बंदच होते. ते त्याने उचलले अन् बाजारपेठेत एका ज्यू घड्याळजीचे दुकान होते त्याच्याकडे नेले. त्या ज्यूने त्याला त्याचे सहा रुबल दिले.

"अन् इतकेही मिळतीलसं मला वाटलं नव्हतं," मीत्या भावनाभराने म्हणाला, तो अजून भावनोद्रेकाच्या भरातच होता. त्याने ते सहा रुबल चटकन् उचलले अन् धावतच तो घरी गेला. घरी त्याने त्या घरातल्या माणसांच्या कडून तीन रुबल उसने घेतले, त्यांचे त्याच्यावर इतके प्रेम होते की जरी त्यांच्यापाशी तेवढेच रुबल होते तरी ते त्यांनी-खुषीने दिले. मीत्याने आपल्या उद्दीपित अवस्थेत तिथल्या तिथे त्यांना सांगितले की, माझे नशीब आज ठरणार आहे, अन् बेसुमार घाईत त्याने सॅमसोनोवपुढे ठेवलेली आपली संपूर्ण योजना, सॅमसोनोवने सांगितलेला निर्णय, भविष्यकाळासंबंधीच्या स्वतःच्या योजना वगैरे वगैरे सर्व वर्णन करून त्यांना सांगितले. त्या लोकांना पूर्वी त्यांच्या या बिऱ्हाडकरूनं आपली बरीच रहस्ये सांगितली होती, आणि ते त्याला पूर्ण निगर्वी सद्गृहस्थ अन् आपल्यातलाच एक मानीत होते. असे नऊ रूबल जमवून मीत्याने वोलोव्या स्टेशनला स्वतःला नेण्याकरिता घोडे आणायला सांगितले.

"ती विशिष्ट घटना घडण्यापूर्वी आदल्या दिवशी, भर दुपारी, मीत्याकडे एक फार्दिंगही नव्हता; आणि त्यानं पैसे मिळविण्याकरिता आपलं घड्याळ विकलं होतं अन् आपल्या घरमालकाकडून तीन रूबल उसने घेतले होते आणि हे सर्व साक्षीदारांच्या समक्ष घडलं होतं," ही गोष्ट लक्षात राहण्याला आणि सिद्ध होण्याला अशा रीतीने मदत झाली.

ही वस्तुस्थिती मी मुद्दाम नमूद करतो त्याचे कारण पुढे उघड होईल.

आपल्या सर्व अडचणी शेवटी आपण सोडविणार अशा आनंदाच्या कल्पनेने जरी तो बहरून गेला होता तरी, जसा तो बोलोव्या स्टेशनाजवळ आला तसा आपल्या गैरहजेरीत ग्रूशिंका काय करीत असेल या विचाराने तो सटपटला. तिने आज फ्योदर पावलोविचकडे जाण्याचा निश्चय केला तर? म्हणूनच तो तिला न सांगता गेला होता अन् म्हणूनच त्याने घरमालकिणीला, जर कोणी आपली चौकशी करायला आले तर आपण कुठे गेलो आहोत हे न सांगण्याची सूचना देऊन ठेवली होती.

"मला रात्री परतलंच पाहिजे, रात्री परतलंच पाहिजे," असं तो गाडीत गचके खात असताना एकसारखा मनाशी म्हणत होता, "अन् मला त्या ल्यागेवीला इकडं परत आणावं लागेल .....खतपत्र तयार करण्याकरिता." धडकत्या अंतःकरणाने मीत्या असा स्वतःशीच विचार करीत होता, पण अरेरे! त्याची स्वप्ने खरी व्हायची नव्हती.

पहिली गोष्ट म्हणजे, वोलोव्या स्टेशनहून त्याने जो जवळचा रस्ता म्हणून धरला तो नऊ मैलांऐवजी पंधरा मैल निघाला. दुसरे म्हणजे, त्याला तो पाद्री इल्यिन्स्को इथे घरी भेटला नाही; तो शेजारच्या खेड्यात गेला होता. मीत्या त्याच थकलेल्या घोड्यांना घेऊन तिकडे निघाला अन् त्याचा शोध घेऊ लागला तेवढ्यात जवळजवळ रात्र झाली.

तो पाद्री एक संकोचशील आणि मनमिळाऊ दिसणारा अटकर बांध्याचा माणूस होता. त्याने लगेच त्याला सांगितले की ल्यागेवी प्रथम त्याच्याकडे राहत असे खरा, पण आता तो सुहॉय पोस्सियोलोकला आहे, तिथे तो जंगल मालकाच्या घरात रात्री मुक्कामाला राहणार आहे, कारण तिथेही त्याला लाकूड खरेदी करायचे आहे. आपल्याला ल्यागेवीकडे तत्काळ घेऊन जावे ह्या मीत्याच्या निकडीच्या विनंतीला, अन् तसं केल्यानं "मला तुम्ही एक प्रकारे वाचवाल" अशा त्याच्या उद्‌गारामुळे, त्या पाद्यानं थोडी कां कूं करीत, त्याला सुहॉये पोस्सियोलोकला घेऊन जाण्याचे कबूल केले; त्याचे कुतूहल अर्थातच जागेत झाले होते. परंतु, दुर्दैवाने त्याने त्याला पायी चालण्याचा सल्ला दिला, कारण ते गाव "पाऊण मैलापेक्षा काही जास्त" नव्हते. मीत्याने अर्थातच ते मान्य केले आणि आपल्या तीन फूट लांबीच्या ढांगा टाकीत तो चालू लागला, तो बापडा पाद्री त्याच्या मागून पळू लागला. तो म्हातारा झालेला नव्हता, तरी फार सावध मनुष्य होता.

मीत्याने लगेच त्याच्याशीही आपल्या बेतासंबंधी बोलायला सुरुवात केली, जरा घाबरटपणे अन उद्दीपित होऊन ल्यागेवीसंबंधी त्याला तो सल्ला विचारू लागला, अन वाटेत एकसारखा बोलत राहिला. पाद्याने त्याचे सर्व बोलणे लक्षपूर्वक ऐकले, पण सल्ला विशेष दिलाच नाही. त्याने मीत्याच्या प्रश्नांना– "मला माहीत नाही"; "अं हं, मला सांगता येणार नाही." "मी कसं सांगणार?" अशा तऱ्हेच्या उत्तरांनी बगल दिली. जेव्हा आपल्या बापाशी वारसासंबंधी चाललेल्या आपल्या भांडणासंबंधी मीत्या बोलू लागला, तेव्हा पाद्री बिचारा घाबरूनच गेला, कारण तो एक प्रकारे फ्योदर पावलोविचवर अवलंबून होता. तथापि त्याने आश्चर्याने विचारले की, "तुम्ही शेतकरी-व्यापारी गोर्स्तकिनला ल्यागेवी का म्हणता?" अन् त्यानं सौजन्यपूर्वक मीत्याला सांगितले की, "जरी त्या माणसाचे खरे नाव ल्यागेवीच आहे तरी त्याला त्या नावाने कधी हाक मारली जात नाही, त्या नावाने तो खूपच दुखावला जाईल, आणि त्याने लक्षात ठेवून त्याला 'गोर्स्तकिन' म्हणूनच

हाक मारायची नाही तर तुमचे त्याच्यांशी काही जमायचे नाही, तो तुमचे बोलणे देकणारसुद्धा नाही," असे पाद्यानं शेवटी सांगितले.

मीत्या क्षणभर काहीसा चकित झाला; आणि त्याने खुलासा केला की, हे नाव त्याला सॅमसोनोवनेच सांगितले होते. हे ऐकून त्या पाद्याने तो विषय गाळला. पर सॅमसोनोवने तुम्हाला त्या शेतकऱ्याकडे त्यागेवी म्हणून संबोधून पाठवले असेल तर त्यात काही तरी चूक नसेल का, अन् तो तुम्हाला हास्यास्पद बनवीत नव्हता का ?" ही शंका त्याने बोलून दाखविली असती तर बरे झाले असते. पण असल्या क्षुल्लक गोष्टीकडे ध्यान द्यायला मीत्याला सवड नव्हती. तो लांब लांब ढांगा टाकीत घाईघाईने चालला. आणि जेव्हा तो सुहॉय पोस्सियोलोकला पोचला तेव्हा त्याला कळून आले की ते पाऊण मैल नव्हे, एक मैल नव्हे, निदान दोन मैल तरी आले होते. त्याची त्याला चीड आली, पण त्याने स्वतःला सावरले.

ते त्या झोपडीत गेले. जंगलमालक त्या झोपडीच्या अर्ध्या भागात राहत होता, अन् गॉर्स्तोकिन दुसऱ्या भागात; ती चांगली खोली मधल्या वाटेच्या पलीकडच्या बाजूला होती. ते त्या खोलीत गेले अन् त्यांनी एक मेणबत्ती पेटविली. झोपडीत फारच उष्णता होती. टेबलावर चहा उकळण्याचा समोवार थंड थंड होता, पेले ठेवलेले एक तबक होते. रमची रिकामी बाटली, व्होडकाची अर्धी भरलेली बाटली आणि पावाचे अर्धवट खाल्लेले तुकडे पडले होते. पाहुणा स्वतः बाकावर पाय पसरून झोपला होता, आपला कोट चुरगळून त्याने उशाला घेतला होता, अन् तो डाराडूर घोरत होता. मीत्या गोंधळल्यासारखा होऊन उभा राहिला.

"याला अर्थातच उठवावं लागेल. माझं काम अतिशय महत्त्वाचं आहे. मी इतक्या त्वरेनं आलोय. मला आजच परत जायची घाई आहे." तो अतिशय अस्वस्थ होऊन म्हणाला, पण तो पाद्री अन तो जंगल-मालक गुपचूप उभे होते, त्यांनी आपले मत दिले नाही. मीत्या त्याच्यापाशी जाऊन स्वतःच त्याला उठविण्याचा प्रयत्न करू लागला; त्याने खूप जोराचा प्रयत्न केला, पण झोपलेला गडी उठला नाही.

तो प्यालेला आहे, हे मीत्याला समजून आले. "देवा रे देवा ! काय करायचं ? काय करायचं ?" आणि भयंकर अधीर होऊन त्याने त्याचे हात ओढायला, पाय ओढायला, डोके हलवायला, त्याला उचलून बाकावर बसते करायला सुरुवात केली. तथापि इतक्या प्रदीर्घ प्रयत्नानंतर त्याला फक्त त्या प्यालेल्या माणसाला वेडेवाकडे आवाज अन अत्यंत घाणेरड्या पण तोंडातून बाहेर न पडणाऱ्या शिव्या काढायला लावण्यापुरतेच यश आले.

"अं हं, तुम्ही थोडा वेळ वाट पाहिलीत तर बरं," तो पाद्री शेवटी बोलला, "कारण तो ठीक अवस्थेत नाही हे दिसतंच आहे."

"तो सबंध दिवसभर पीतच होता," जंगल मालकाने री ओढली.

" परमेश्वरा ! " मीत्या ओरडून म्हणाला, " माझं किती महत्त्वाचं काम आहे अन् मी किती जिवावर उदार होऊन आलोय हे तुम्हाला कसं कळणार ? "

" अं हं, तुम्ही सकाळपर्यंत वाट पाहिलेली बरी, " पाद्री पुन्हा बोलला.

" सकाळपर्यंत ? छान ! ते अशक्य आहे ! "

निराशेच्या भरात तो त्या झोपलेल्या माणसावर पुन्हा चढाई करण्याच्या बेतात होता, पण एकदम थांबला. त्याला आपल्या प्रयत्नाचा उपयोग नाही हे कळून आले. तो पाद्री काही बोलला नाही, तर पेंगाळलेला जंगल मालक उदासवाणा दिसत होता.

" वास्तव जीवन माणसांकरिता किती भयंकर शोकघटना हिकमतीनं योजीत असतं, " मीत्या पूर्ण निराश होऊन म्हणाला. त्याच्या तोंडावरून घामाचे ओघळ वाहात होते. पाद्र्यानं ही संधी साधून आपले विचार त्याच्यापुढे मांडले, अन् ते वाजवी होते, की जरी तुम्हाला त्या माणसाला जागं करण्यात यश आलं तरी तो बेहोषच राहणार अन् त्याच्याशी संभाषण करणं शक्य होणार नाही. अन् तुमचं काम तर महत्त्वाचं आहे, तेव्हा तुम्ही ते उद्यावर ढकललंत तर खात्रीनं बरं होईल."

निराशेने हात झटकून मीत्याने ते मान्य केले.

" पाद्री बाबा, मी इथं मेणबत्ती लावून थांबतो, अन् अनुकूल संधी मिळताच ती पकडतो. तो जागा होताच मी बोलायला सुरुवात करीन." नंतर तो जंगल मालकाला म्हणाला, " मी तुमचे मेणबत्तींचे अन् रात्रीपुरत्या मुक्कामाचेसुद्धा पैसे देईन; दमीत्रि कारामाझफचं तुम्हाला स्मरण राहील, अडचण फक्त ही आहे, पाद्री बाबा, की तुमच्या बाबतीत आम्ही काय करावं हे मला समजत नाही. तुम्ही कुठं झोपाल ? "

" छे: छे:, मी घरी जाणार आहे. मी यांचा घोडा घेईन अन् घरी पोचेन, " तो जंगल मालकाकडे बोट दाखवून म्हणाला. " अन् आता मी तुमचा निरोप घेतो. तुम्हांला यश येवो."

असे सर्व ठरले. पाद्री त्या जंगल मालकाच्या घोड्यावर बसून निघून गेला. सुटलो एकदाचे, असा त्याला आनंद झाला, परंतु अस्वस्थ मनाने त्याने आपले डोके हलविले; या चमत्कारिक घटनेसंबंधी आपला उपकारकर्ता फ्योदर पावलोविच याला दुसरे दिवशी कळविणे आपले कर्तव्य आहे की नाही असे त्याच्या मनात आले, " नाहीतर एखाद्या अशुभ क्षणी त्याच्या हे कानांवर जायचं, तो रागवायचा अन् आपली मेहेर नजर मागं घ्यायचा."

जंगल मालक आपले अंग खाजवीत एक शब्दही न बोलता आपल्या खोलीकडे परत चालता झाला, आणि मीत्या, त्याने म्हटल्याप्रमाणे, ' अनुकूल संधी मिळताच ती पकडण्याकरिता ' बाकावर बसून राहिला. विलक्षण खिन्नतेने त्याचे मन दाट धुक्याप्रमाणे ग्रासून टाकले. ही खिन्नता उत्कट होती, तीव्र होती !

तो विचार करीत राहिला, पण काही निर्णय करू शकला नाही. मेणबत्ती मंदपणे जळत होती, एक रातकिडा किर्र आवाज काढीत होता; त्याला अतिशयच गरम झालेल्या खोलीत असह्य रीतीने कोंदटल्यासारखे झाले. एकदम त्याच्या डोळ्यांपुढे बगीचा, बगीचाच्या मागची वाट, आपल्या बापाच्या घराचा दरवाजा कोणीतरी उघडत आहे अन् ग्रूशिंका आत धावत जात आहे असे चित्र दिसले. तो बाकावरून एकदम उठला.

"अनर्थ आहे!" दात कचकचा चावीत तो म्हणाला. यंत्रवत् तो त्या झोपलेल्या माणसाकडे गेला आणि त्याचा चेहरा त्याने निरखून पाहिला. तो दुबेल, मध्यम वयाचा शेतकरी होता. अतिशय उभट चेहरा, तागाच्या धाग्यासारखे जाड कुरळे केस, आणि लांब, पातळशी, लालसर दाढी त्याला होती, त्याने अंगात निळा सुती सदरा अन् काळे जाकीट घातले होते, त्या जाकिटाच्या खिशातून रुपेरी पत्र्याळाची साखळी लोंबत होती. मीत्याने त्याच्या चेहऱ्याकडे तीव्र द्वेषाने पाहिले, आणि का कुणास ठाऊक त्याला त्याच्या त्या कुरळ्या केसांची चीडच आली.

असह्य मानहानीची गोष्ट ही होती की, इतकी महत्त्वाची कामे सोडून अन् इतके नुकसान सोसून आपण अतिशय थकून जाऊन इतक्या निकडीचे काम हाती असताना एका गाढवाचा चेहरा पाहत उभे आहोत, अन् त्याच्यावर आपले सारे नशीब अवलंबून आहे, आणि तो जणू काही चिंता नसल्याप्रमाणे जणू दुसऱ्याच ग्रहावरून खाली पडल्यासारखा घोरत पडला आहे!

"अरे अरे, काय हा नशिबाचा खेळ!" मीत्या म्हणाला, आणि अगदी पागल होऊन पुन्हा तो त्या गुंगीत पडलेल्या शेतकऱ्याला उठविण्याच्या उद्योगाला लागला. त्याने जंगली क्रूरपणाने त्याला गदगदा हालविले, ओढले, ढकलले, मारले-सुद्धा; पण पाच मिनिटांच्या व्यर्थ खटपटीनंतर तो असहाय निराशेने परत बाकाकडे आला, अन् खाली बसला.

"बेअकलीपणा! बेअकलीपणा!" मीत्या म्हणाला. "अन् हे सारं किती नामुष्कीचं आहे!" काही विचाराने तो पुढं म्हणाला. त्याचे डोके विलक्षण दुखू लागले. "हे सारं सोडून उठून चालू लागावं काय?" तो विचार करू लागला. "नाही, आता उद्या सकाळपर्यंत वाट पाहा. मी जाणून बुजूनच थांबणार आहे. नाहीतर मी इथं आलो कशाला? शिवाय, जायला साधन काय? इथून आता मी जाणार कसा? छे: छे:, काय हा मूर्खपणा!"

पण त्याचे डोके अधिकाधिक दुखू लागले. तो निश्चल बसला, अन् नकळत पेंगू लागला अन् बसल्या बसल्या त्याला झोप लागली. तो दोन तास किंवा त्याहून अधिक झोपला असावा. तो जागा झाला तो डोकं इतकं असह्य रीतीने दुखू लाग-ल्यामुळे की तो ओरडलाच असता. त्याच्या कानशिलात घणाचे घाव पडत होते,

आणि त्याची टाळू सणसणत होती. पूर्णपणे जागे होऊन आपण कोणत्या परिस्थितीत आहे याची जाणीव होण्याला त्याला बराच वेळ लागला.

शेवटी त्याच्या लक्षात आले की, चुलीतल्या कोळशांच्या धुराने खोली भरून गेली आहे, अन् आपण गुदमरून मरून जाऊ. तो दारू प्यालेला शेतकरी अजून तसाच घोरत पडला होता. मेणबत्ती पाघळून तिचा ओघळ चालला होता अन् ती आता विझण्याच्या बेतात होती. मीत्या मोठ्याने ओरडला, आणि झोके खात मधली वाट ओलांडून त्या जंगल मालकाच्या खोलीकडं धावला. तो जंगल मालक चटकन् जागा झाला, पण ती खोली धुराने भरली आहे हे ऐकून, 'मरू दे' अशी विलक्षण बेपर्वाई त्याने दर्शविली. याचे मीत्याला आश्चर्य वाटले अन् चीड आली. अर्थात् तो माणूस तिकडे जाऊन ती बघून आला.

"पण तो मेला आहे! आणि... मग मी काय करायचं?" मीत्या घाबरून जाऊन ओरडला.

त्यांनी दरवाजे उघडे केले, एक खिडकी अन् धुराडे उघडले. मीत्याने मधल्या वाटेत पाणी होते तिथून पाण्याचा मोठा तांब्या भरून आणला. प्रथम त्याने आपले स्वतःचे डोके भिजविले, मग, एक फाटका कपडा मिळाला तो त्या पाण्यात भिजवून त्याने तो ल्यागेवीच्या डोक्यावर ठेवला. जंगल मालक या गोष्टीकडे अजून तुच्छतेनेच पाहात होता, आणि जेव्हा त्याने खिडकी उघडली तेव्हा तो उदासीनपणे म्हणाला–

"आता सगळं ठीक होईल."

तो परत झोपायला गेला; मीत्याला तो एक लावलेला कंदील देऊन गेला. मीत्याने त्या गुंगीत पडलेल्या शेतकऱ्याशी अर्धा तासपर्यंत झटापट केली, त्याचे डोके त्याने ओले केले, आणि रात्रभर आपण आता झोपायचे नाही असा निश्चय केला. पण तो इतका थेपाळून गेला होता की क्षणभर तो दम घ्यायला म्हणून टेकतो न् टेकतो तोच त्याचे डोळे मिटले, नकळत त्याचे पाय बाकावर पुरते पसरले गेले आणि तो मेल्यासारखा झोपी गेला.

तो जागा झाला तेव्हा अतिशय उशीर झाला होता, जवळपास नऊ वाजले होते. झोपडीच्या दोन लहानशा खिडक्यांतून झगझगीत सूर्यप्रकाश पडला होता. तो कुरळ्या केसांचा शेतकरी बाकावर बसलेला होता अन् त्यानं कोट चढविला होता. त्याने समोवार पुन्हा गरम केला अन् पुन्हा आपल्या पुढयात बाटली ठेवली. कालची बाटली जवळजवळ खलास झाली होती, अन् नवी होती ती अर्ध्याहून अधिक रिकामी होती. मीत्या उसळी मारून उठला आणि त्याला एकदम दिसले, की तो साला शेतकरी पुन्हा तर्र झाला आहे, त्याला आता शुद्धीवर आणणे अशक्य आहे. त्याने डोळे विस्फारून क्षणभर त्याच्याकडे टक लावून बघितले. तो शेतकरी मुकाट्याने अन् चोरनजरेने त्याच्याकडे न्याहाळून पाहात होता. त्याचा आविर्भाव

अपमानजनक होता. अन् एक प्रकारची तुच्छतादर्शक मेहेरबानीही त्यात दिसून येत होती, असे मीत्त्याला वाटले. तो त्याच्याकडे धावला.

"माफ करा, हे पहा... मी... तुम्ही इथल्या या झोपडीतल्या जंगल मालकाकडून बहुतेक ऐकलं असेल. मी लेफ्टनंट दमीत्रि कारमाझफ. ज्या म्हाताऱ्या कारमाझफचं जंगल तुम्ही खरेदी करणार आहात त्यांचा मी मुलगा."

"खोटं आहे हे!" तो शेतकरी शांतपणे अन् खात्रीपूर्वक म्हणाला.

"खोटं? तुम्ही फ्योदर पावलोविचला ओळखता?'

"मला कुणी माहीत नाही तुझे फ्योदर पावलोविच बिवलोविच," तो जडपणे बोलला.

"तुम्ही त्या जंगलाबद्दल, त्या जंगलाबद्दल हो, त्यांच्याशी सौदा चालवलाय ना? जागे व्हा अन् भानावर या. इल्यिनस्कोच्या फादर पावेलनी मला इथं आणलं. तुम्ही सॅमसोनोवला लिहिलं होतंत ना, मग त्यांनीच मला तुमच्याकडं पाठवलंय." मीत्त्या दम टाकीत बोलला.

"अरे का ऽऽ य खोटं–बोलतो!" ल्यागेवी पुन्हा बरळला. मीत्त्याचे पाय गार पडले.

"दया करा! मी चेष्टा करीत नाही! तुम्ही बहुधा पिऊन बेहोष झाला आहात. तरी तुम्ही बोलू शकाल अन् समजू शकाल... नाहीतर... मला काहीच समजत नाही!"

"तू पेंटर आहेस!"

"दया करा! मी कारमाझफ, दमीत्रि कारमाझफ आहे, मला तुमच्यापुढं एक सूचना ठेवायची आहे, सूचना तुमच्या फायद्याची आहे.... फार फायद्याची आहे, त्या जंगलासंबंधीची आहे!"

शेतकऱ्याने मोठेपणाने आपली दाढी हाताने थोपटली.

"अंहं, त्या कामाबद्दलचं कंत्राट घेतलंस अन् लबाड निघालास. तू बदमाष आहेस!"

"तुमची गैरसमजूत झाली आहे हे खात्रीनं सांगतो," मीत्त्या आपले हात निराशेने चोळीत ओरडला. तो शेतकरी आपली दाढी अजूनही थोपटीत होता, आणि एकदम त्याने आपले डोळे लुच्चेगिरीच्या आविर्भावाने आकसले.

"नाही, तू मला दाखवून दे; ठकबाजी करू देतो असा कोणता कायदा आहे मला सांग. काय, ऐकतोयस की नाही? तू बदमाष आहेस! समजलास का?"

मीत्त्या कपाळाला हात लावून मागे सरला; आणि एकदम 'डोक्यावर फटकारा बसावा तसं' त्याला झाले, असे मागाहून त्याने त्याचे वर्णन केले. एका निमिषात डोक्यात प्रकाश पडावा तसे त्याला झाले, "एक ज्योती पेटली अन् सर्व काही माझ्या लक्षात येऊन चुकलं." तो स्तंभितच झाला. आपण, एवढी बुद्धी

असलेले, असल्या मूर्खपणाच्या आहारी गेलो कसे, असल्या विचित्र कृतीला प्रवृत्त झालो कसे, अन् ती जवळ जवळ चोवीस तास आपण चालू ठेवून या त्यागेवीच्या भोवती त्याचे डोके भिजवीत अन् धामधूम करीत राहिलो कसे याचे त्याला आश्चर्य वाटले.

"अरे, हा माणूस पिऊन तर्र झालेला आहे, अगदी ठार बेहोष झाला आहे, अन् हा आता आठवडाभर असाच पीत राहणार आहे; इथं वाट पाहत राहण्याचा उपयोग काय? आणि सॅमसोनोवनं मुद्दामच तर आपल्याला इकडं पाठविलं नसेल? जर तिला... देवा, देवा, हे मी काय केलं?"

तो शेतकरी त्याच्याकडे पाहत न् दात विचकीत बसला होता. दुसऱ्या एखाद्या वेळी मीत्याने त्याला संतापाच्या भरात ठार मारले असते, पण यावेळी त्याला एखाद्या लहान पोरासारखा दुबळेपणा जाणवू लागला. तो मुकाट्याने बाकाकडे गेला, आपला ओव्हरकोट त्याने उचलला, एक शब्दही न उच्चारता तो अंगात चढविला, अन् त्या झोपडीच्या तो बाहेर पडला. त्याला तो जंगलमालक त्याच्या खोलीत दिसला नाही; तिथे कुणीच नव्हते. त्याने आपल्या खिशातून पन्नास कोपेकची मोड बाहेर काढली आणि ती आपल्या रात्रीच्या वास्तव्याचे भाडे, मेणबत्ती-खर्च अन् त्याने दिलेली तसदी याबद्दल टेबलावर ठेवून दिली. झोपडीच्या बाहेर आल्यावर त्याला आपल्या सभोवार जंगलच जंगल दिसले. तो मनाला येईल तसा चालू लागला, झोपडीतून बाहेर पडल्यावर उजव्या बाजूला वळायचे की डाव्या बाजूला ते काहीच त्याला कळेना. त्या फादरबरोबर आदल्या संध्याकाळी तो घाई-घाईने आला होता. त्यामुळे त्याने रस्ता पाहून ठेवला नव्हता. त्याच्या मनात कोणाबद्दलही सूड भावना नव्हती, सॅमसोनोवबद्दल सुद्धा. तो जंगलातली एक पायवाट धरून, पाय नेतील तिकडे, विमनस्क अवस्थेत, आपण कुठे चाललो आहोत याकडे लक्ष न देता लांब लांब ढांगा टाकीत चालला. एखाद्या मुलानेसुद्धा धक्का देऊन पाडावे इतका तो मनाने न् शरीराने दुबळा झाला होता. तरीही, तो कसाबसा त्या जंगलातून बाहेर पडला अन् कापणी झाल्यामुळे उघडी पडलेली विस्तारलेली शेते त्याच्या दृष्टीच्या पल्ल्यापर्यंत पसरलेली त्याला दिसली.

"काय ही निराशा! काय हे सर्व बाजूंनी मरण!" तो तोंडाने वरचेवर म्हणत होता, त्याचे पाय पुढे पुढे चाललेच होते.

एका म्हाताऱ्या व्यापाऱ्याने त्याची सुटका केली. तो त्याला वाटेत भेटला. तो एका भाड्याच्या गाडीतून चालला होता. त्याची गाडी जेव्हा मीत्यापाशी आली, तेव्हा तो म्हातारा व्यापारीसुद्धा वोलोव्याकडेच चालला असल्याचे समजून आले. थोडे बोलणे झाल्यानंतर मीत्या त्या गाडीत चढून बसला. तीन तासांनी ते पोचले. वोलोव्यात मीत्याने लगेच शहराकडे नेण्याकरिता घोड्यांची गाडी ठरविली, आणि एकदम त्याच्या लक्षात आलं की, आपल्याला जबरदस्त भूक लागली आहे. घोडे

झुंपले जाण्याच्या वेळात त्याच्यासाठी आमलेट तयार करण्यात आले; त्याने एका घासात ते खाऊन टाकले, पावाचा एक मोठा तुकडा गट्ट केला. एक सॉसिज खाल्ले, अन् तीन पेले व्होडका तो प्याला. खाणे झाल्यानंतर त्याला तकवा आल्यासारखा वाटला अन् त्याचे मनही हलके झाले. तो शहराकडे धावत सुटला. गाडीवानाला त्याने घोडे पिटाळायला लावले, आणि मनाशी एकदम तो 'साला पैसा' संध्याकाळ होण्यापूर्वी मिळविण्याचा त्याने एक नवीन अन् 'न बदलण्यासारखा' बेत केला. "माणसाचं आयुष्य या क्षुद्र तीन हजारांकरिता बरबाद व्हावं, ही काय गोष्ट आहे!" तो तुच्छतेने म्हणाला, "मी आज ते मिटवून टाकणार." आणि ग्रूशिंकाचा अन् तिचे काय झाले असेल त्याचा विचार त्याच्या मनात सतत नसता तर तो कदाचित पुन्हा चांगला प्रसन्न झाला असता... पण तिचा विचार क्षणोक्षणी त्याच्या हृदयात तीक्ष्ण सुऱ्यासारखा भोसकला जात होता.

शेवटी मीत्या पोचला, अन् ताबडतोब ग्रूशिंकाकडे धावला.

३

सोन्याच्या खाणी

राकितीनपुढं ग्रूशिंका मीत्याच्या ज्या भेटीसंबंधी भीतीने थरकाप होऊन बोलली ती हीच भेट. ती त्याचवेळी त्या 'निरोपा'ची वाट पाहात होती, अन् मीत्या त्या दिवशी किंवा आदल्या दिवशी तिला भेटायला आला नाही हे पाहून तिला खूपच सुटका झाल्यासारखं वाटलं होतं. "परमेश्वरा, कृपा करून मी जाईपर्यंत तो येऊ नये असं कर" अशी ती आशा करीत होती, अन् अचानकपणे तो दत्त म्हणून उभा राहिला होता. पुढचे आपल्याला ठाऊक आहे. त्याला हुलकावणी देण्याकरिता म्हणून तिने सॅमसोनोवच्या घरापर्यंत त्याने आपल्याबरोबर यावे अशी एकदम त्याला सूचना केली, तिकडे 'त्याचे हिशेब जमविण्याकरिता' आपल्याला गेलंच पाहिजे' असं ती म्हणाली, आणि जेव्हा मीत्या लगेच तिच्यासोबत गेला तेव्हा फाटकातूनच तिने त्याला निरोप दिला आणि आपल्याला पुन्हा घरी घेऊन जाण्याकरिता बारा वाजता येण्याचे वचन घेतले. या तजविजीचा मीत्यालासुद्धा आनंद झाला. ती जर सॅमसोनोवकडं बसणार तर ती फ्योदर पावलोविचकडं जाणार नाही. "अर्थात ती जर खोटं बोलत नसेल तर," असं लगेच तो पुढं म्हणाला, पण त्याला जे दिसलं त्यावरून ती खोटं बोलत नसावी असं त्याला वाटलं.

तो अशा प्रकारचा मत्सरी मनुष्य होता की जो, आपली प्रिया समोर नसली की तिचे काय चालले असेल, आपल्याला ती कशी दगा देत असण्याचा संभव आहे यासंबंधी वाटेल तशा भयंकर कल्पना करतो, पण जेव्हा तो पुरता हादरून जातो, त्याचा हृदयभंग होतो, तिच्या बेईमानीची त्याला खात्री पटते, तेव्हा तो परत

तिच्याकडे जातो; तिच्या मुखाच्या प्रथमदर्शनाने, तिचा आनंदी, हसरा, प्रेमळ चेहरा पाहाताच तो पुन्हा सजीव होतो, सर्व संशय बाजूला सारतो आणि आनंदयुक्त शरमेने स्वतःचीच स्वतःच्या मत्सराबद्दल निंदा करतो.

ग्रूशिंकाला फाटकापाशी सोडून तो घरी धावत गेला. बापरे, किती गोष्टी त्याला अजून त्या दिवशी करायच्या होत्या! पण काही का असेना एक ओझे मनावरून उतरले होते.

"आता घाई करून मला स्मिर्दायाकोफकडून गेल्या रात्री तिकडं काही घडलं काय, कोणत्याही दैवयोगाने ती फ्योदर पावलोविचकडे गेली होती काय, याचा शोध घेतला पाहिजे; छीः!" त्याच्या मनात तरंग चालले होते.

आपल्या बिऱ्हाडी पोचण्यापूर्वीच त्याच्या अस्वस्थ मनात मत्सराचे पुन्हा थैमान सुरू झाले.

मत्सर! पुष्किनने म्हटले आहे. "ऑथेल्लो मत्सरी नव्हता, तो विश्वास ठेवणारा होता," आणि तेवढ्या उद्‌गारांवरूनच आमच्या महान् कवीच्या सखोल अंतर्दृष्टीची कल्पना येते. ऑथेल्लोचा आत्माच भग्न झाला होता व त्याचा सारा दृष्टिकोण झाकोळला होता तो केवळ त्याचे आदर्श चित्र नष्ट झाले म्हणूनच. पण ऑथेल्लोने कधी लपणेछपणे, पाळत ठेवणे, हळूच डोकावून पाहणे असे सुरू केले नव्हते. तो विश्वास ठेवणारा होता. उलट, दगाबाजीची कल्पना त्याच्या मनात वावरू लागण्यापूर्वी त्याला घेऊन जावे लागे, पुढे ढकलावे लागे, मोठ्या कष्टाने चिथवावे लागे. खरा मत्सरी असा नसतो. सदसद्विवेक बुद्धीची आच मनाला न लागता मत्सरी मनुष्य किती लज्जास्पद स्थितीला अन् नैतिक अधःपाताला जाऊन पोहोचतो त्याची मनात कल्पना करणेसुद्धा अशक्य आहे. तरी मत्सरी तेवढे सगळे हलकट अन् नीच असतात असे समजण्याचे कारण नाही. उलट, उदात्त भावना असणारा माणूस, त्याची प्रीती शुद्ध अन् त्यागपूर्ण असतानासुद्धा टेबला-खाली लपून बसू शकेल, हलकटातल्या हलकट लोकांना लाच देईल, आणि हेरगिरी करण्याचा अन् गुप्तपणे कान लावण्याचा नीचतम अप्रतिष्ठितपणाही करील.

ऑथेल्लो आपल्या मनात बेइमानीच्या कल्पनेला थारा देण्याला— त्याबद्दल क्षमा करण्याला नव्हे, तर तशी कल्पना करायला असमर्थ होता., त्याचे अंतःकरण अर्भकाच्या अंतःकरणासारखे निष्पाप अन् मत्सररहित होते. खरा मत्सरी असतो त्याची स्थिती तशी नसते. काही मत्सरी माणसे काय करण्याचा निश्चय करतील अन् काय नजरेआड करतील, आणि कशाची क्षमा करू शकतील याची कल्पना करणे कठीण आहे! मत्सरी असतात ते क्षमा करायला सर्वांत जास्त तयार होतात, अन् हे स्त्रियांना माहीत असते. मत्सरी मनुष्य विलक्षण तत्परतेने क्षमा करू शकतो— अर्थात् मोठा दांडगाईचा देखावा करून, अन् अगदी पूर्णतः शाबीत झालेली बेईमानी म्हणजे त्याने आपल्या डोळ्यांनी पाहिलेली चुंबने न् आलिंगने

असली तरीसुद्धा—जर त्याची काहीही करून "हा शेवटचा प्रकार" तो प्रतिस्पर्धी त्या दिवसापासून पुढे आता कायमचा नजरेआड होणार आहे, तो जगात कुठेतरी दूर दूर निघून जाणार आहे, किंवा धोका वाटणारा तो प्रतिस्पर्धी तिच्याजवळ येणार नाही अशा ठिकाणी तो स्वतःच तिला घेऊन जाणार आहे, अशी त्याची खात्री करून देता आली, तर तो क्षमा करू शकतो. अर्थात् ही मनजुळणी तासाभराचीच असते. कारण, जरी तो प्रतिस्पर्धी दुसऱ्याच दिवशी अदृश्य झाला, तरी हा गडी दुसरा कोणी प्रतिस्पर्धी म्हणून शोधून काढील आणि त्याचा मत्सर करील. आपल्याला असे मनात वाटेल की, ज्या प्रीतीवर इतका पहारा ठेवावा लागतो त्या प्रीतीत काय अर्थ आहे. ज्या प्रीतीला इतक्या कटकटीच्या संरक्षणाची गरज पडते त्या प्रीतीची किंमत काय ? पण मत्सरी माणसाला ते कधी समजणार नाही, आणि तरी अशा माणसांत थोर हृदयाची माणसे असतात. हीच थोर मनाची माणसें एखाद्या कपाटात लपून, कान लावून अन् पाळत राखून उभी राहतात. त्यांना, काही असो, त्याक्षणी सदसद्विवेक बुद्धीचा कधी दंश होत नाही. अर्थात् त्यांचे "विचार थोर" असल्यामुळे त्यांना आपण स्वतःहून किती निलाजऱ्या अधःपाताला पोचलो आहोत हे मात्र स्पष्टपणे समजत असते.

ग्रूशिंका दिसताक्षणीच मीत्याचा मत्सर मावळला आणि क्षणभर तो विश्वास ठेवणारा अन् उदार बनला, आणि आपल्या वाईट विचाराबद्दल त्याने खरोखरच स्वतःचा तिरस्कार केला. पण त्याने खरोखरच स्वतःचा तिरस्कार केला. यामुळे एवढेच सिद्ध झाले की, त्या स्त्रीविषयी त्याला वाटणाऱ्या प्रेमात, त्याला कल्पना नसेल अशा एका फार मोठ्या उच्च वस्तूचे बीज होते. ते प्रेम केवळ वैषयिक नव्हते, "शरीराचा डौलदार बांधा" ज्याविषयी तो आल्योशाजवळ बोलला होता एवढेच त्याचे कारण नव्हते. पण ग्रूशिंका जशी निघून गेली तसा मीत्याला बेइमानीच्या साऱ्या नीच कावेबाजपणाबद्दल तिचा संशय येऊ लागला, आणि त्यात त्याला सदसद्विवेकबुद्धीची काही टोचणी वाटली नाही.

आणि अशा रीतीने पुन्हा मत्सराने थैमान घालायला सुरुवात केली. काही असो, त्याला घाई करणे भाग होते. पहिली गोष्ट करायची म्हणजे निदान एक लहानसे, तात्पुरते कर्ज मिळवायचे. ते नऊ रुबल या मोहिमेतच जवळ जवळ सर्व खर्च होऊन गेले होते. आणि, आपल्याला माहीत आहे, पैशाशिवाय माणसाला पाऊल टाकता येत नाही. पण हे कर्ज आपल्याला कुठे मिळेल याचा त्याने गाडीत विचार केला होता. त्याच्यापाशी एका वेष्ठनात ठेवलेली सुरेख द्वंद्वयुद्धाची पिस्तुल-जोडी होती, ती आतापर्यंत त्याने गहाण टाकलेली नव्हती, कारण आपल्या साऱ्या संग्रहात त्याला तिचे मोल अधिक वाटत होते.

"मेत्रोपोलिस" खाणावळीत त्याने काही काळापासून सैन्यातल्या एका तरुण अधिकाऱ्याशी ओळख करून घेतली होती आणि त्याला समजले होते की या

खूप पैसेवाल्या अविवाहित माणसाला शस्त्रांचा फार शौक होता. तो पिस्तुलं, बंदुका सुरे विकत घेई अन् आपल्या भिंतीवर ती शस्त्रे अडकवून ठेवून परिचितांना दाखवी. त्यांच्याबद्दल त्याला अभिमान वाटे आणि पिस्तुलाच्या रचनेचा तो तज्ज्ञ होता. विचार करीत न बसता, मीत्या सरळ त्याच्याकडे गेला, आणि दहा रुबलकरिता आपली पिस्तुले त्याने गहाण ठेवण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्या अधिकाऱ्याला आनंद झाला अन् ती विकतच देण्याबद्दल त्याचे मन वळविण्याचा तो प्रयत्न करू लागला. पण मीत्या कबूल होईना, तेव्हा त्या तरुण माणसाने त्याला दहा रुबल दिले, पण त्यावर व्याज घेण्याला आपण काही झाले तरी तयार नाही असे त्याला सांगितले. मित्र बनून त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला.

मीत्या घाईत होता; तो फ्योदर पावलोविचच्या घराकडे मागच्या वाटेने घुसला, त्याच्या लता-कुंजाकडे गेला, तिथे त्याला शक्य तितक्या लवकर स्मिर्दयाखफला गाठायचे होते. अशा रीतीने ती विशिष्ट घटना घडण्यापूर्वी (त्याविषयी मी मागाहून सांगेन) तीन की चार तास, मीत्याजवळ एक फार्दिंगही नव्हता, आणि दहा रुबलकरिता आपली मोलाची मानलेली वस्तू त्याने गहाण ठेवली, ही गोष्ट सिद्ध झाली, आणि तरी, तीन तासांनंतर, त्याच्यापाशी हजारो झाले...पण हे मी पुढचे अगोदरच बोलतो आहे. फ्योदर पावलोविचच्या घराजवळच राहाणाऱ्या मार्या-कोन्द्रात्येवनाकडून त्याला स्मिर्दयाखफच्या आजाराची अतिशय त्रस्त करून सोडणारी बातमी कळली. तो तळघरात खाली पडला, त्याला फिट आली, डॉक्टर आले, फ्योदर पावलोविचना काळजी वाटली, ही सर्व हकीकत त्याला कळली; इवान त्या दिवशी सकाळी मॉस्कोला रवाना झाल्याचेही त्याने लक्ष देऊन ऐकले.

"तर मग तो माझ्या अगोदरच वोलोव्यावरून गाडीत बसून गेला असला पाहिजे," दमीत्रिला वाटले, पण स्मिर्दयाखफच्या बातमीने तो भयंकरच त्रस्त झाला होता. "आता कसं व्हायचं? माझ्याकरिता आता पहारा कोण ठेवणार? मला येऊन बातमी कोण देणार?" त्याच्या मनात आले. त्याने बायांना आदल्या दिवशी संध्याकाळी काही पाहिले काय असे अधीरपणे विचारायला सुरुवात केली. त्याला काय शोधून काढायचे आहे ते त्यांच्या चांगले लक्षात आले अन् त्यांनी त्याला पूर्ण निश्चित केले. कोणी आलेले नव्हते. रात्री इवान आला होता; सर्व काही नेहमीप्रमाणे व्यवस्थित होते. मीत्या विचार करू लागला. आपल्याला आज खात्रीने पहारा ठेवावा लागेल, पण कुठे? इथे की सॅमसोनोवच्या फाटकापाशी? इथे अन् तिथे दोन्हीकडे लक्ष ठेवायचे असे त्याने ठरविले, अन् मधल्या काळात... मधल्या काळात... अडचण ही होती की, त्याने परतीच्या प्रवासात जो नवा बेत योजून ठेवला होता तो त्याला अमलात आणायचा होता. तो सिद्धीस जाणार याबद्दल त्याला खात्री होती, पण तो अमलात आणायला आता वेळ होणे कामाचे नव्हते. मीत्याने त्याकरिता एक तास खर्ची घालायचे ठरविले. "एका तासात मला सर्व

काही समजेल, मी सर्व काही मिटवून टाकीन, आणि मग, मग पहिल्या प्रथम सॅमसोनोवच्या इथं. ग्रूशिंका तिथं आहे का याची चौकशी करीन आणि पुन्हा लगेच इकडे परत येईन, अकरापर्यंत थांबेन, आणि पुन्हा सॅमसोनोवच्या इथं तिला आणायला जाईन." असे त्याने ठरविले.

तो घरी धावत गेला, त्याने तोंड धुतले, केस विंचरले, आपले कपडे साफ केले, ते अंगात चढविले आणि मादाम होहलाहोवाकडे तो गेला. दुःखाची गोष्ट ! त्याने आपल्या सर्व आशा तिच्यावर आधारल्या होत्या. तिच्याकडून तीन हजार उसने घ्यायचे त्याने ठरविले होते. आणि विशेष म्हणजे, ती आपल्याला नाही म्हणणार नाही अशी त्याला एकदम खात्री वाटू लागली होती. इतकी खात्री वाटत होती, तर तो तिच्याकडेच अगोदर का नाही गेला, ज्या सॅमसोनोवला तो ओळखीत नव्हता, जो त्याच्या वर्गाचा नव्हता आणि ज्याच्याशी कसे बोलावे याचे त्याला मुळीच ज्ञान नव्हते त्याच्याकडे तो का गेला, असा प्रश्न येईल.

पण वस्तुस्थिती अशी होती की त्याचा मादाम होहलाहोवाशी कधीच चांगला परिचय झालेला नव्हता, आणि तिच्यासंबंधी गेल्या महिन्यात त्याला काही कळलेले नव्हते, आणि ती आपल्याला थारा देणार नाही हे त्याला माहीत होते. तिला त्याच्याविषयी पहिल्यापासून तिटकारा होता. कारण त्याचे कतिरीना इवानोवनाशी लग्न ठरले होते. तिला, काही कारणामुळे, अशी इच्छा उत्पन्न झाली होती की कतिरीनाने त्याला टाकून द्यावे अन् "देखण्या, दिलदार सुसंस्कृत अन् उत्कृष्ट रीतभात असणाऱ्या इवान"शी लग्न करावे. मीत्याच्या रीतिभातीबद्दल तिला तिटकारा होता. मीत्या सरळ तिला हसत असे, आणि एकदा तिच्याबद्दल तो असे म्हणाला होता की ती जितकी असंस्कृत आहे तितकीच रंगेल अन् ऐषआरामी आहे. पण त्यादिवशी सकाळी गाडीत एक झकास कल्पना त्याच्या एकदम मनात आली : "जर मी कतिरीना लग्न करू नये अशी तिची इच्छा असेल. (आणि त्याबाबतीत ती नक्कीच डोकेफिरू होती हे त्याला माहीत होते.) तर मला कात्याला सोडता यावे अन् तिच्यापासून मी कायमचे दूर निघून जावे यासाठी मला आता तीन हजार तिने का न द्यावे? या वरच्या वर्गाच्या लाडावलेल्या स्त्रियांनी जर एखादी गोष्ट मनात घेतली तर, आपली लहर तृप्त करण्याकरिता वाटेल तेवढा खर्च करायला त्या मागंपुढं पाहात नाहीत. शिवाय, ती इतकी श्रीमंत आहेच." मीत्याने मनाशी युक्तिवाद केला.

त्याच्या 'बेता'विषयी बोलायचे तर तो पूर्वीचा होता तसाच होता; चेरमाश्न्यावरचे हक्क देऊ करायचे– पण सॅमसोनोवप्रमाणे व्यापारी उद्देशाने नव्हे. त्या महिलेला सहासात हजार नफा होण्याच्या शक्यतेची लालूच दाखविण्याचा प्रयत्न करून नव्हे तर फक्त त्या कर्जाची जमानत म्हणूनच. या नव्या कल्पनेवर तो जसजसा विचार करू लागला, तसतसा तो त्या कल्पनेवर खूष झाला, पण त्याने

हाती घेतलेल्या सर्वच कामांच्या बाबतीत, त्याच्या एकाएकी घेतलेल्या सर्वच निर्णयांच्या बाबतीत, हीच त्याची नेहमी स्थिती असे. प्रत्येक नव्या कल्पनेत तो उत्साहाच्या भरात वाहून जाई. तरी मादाम होहलाहोवाच्या घराच्या पायऱ्या चढताना त्याला त्याच्या पाठीच्या कण्यातून भयाची एक झिणझिणी जाणवून गेली. त्या क्षणी त्याला दोन न् दोन चार इतके चक्क दिसून आले की, हा प्रयत्न जर मोडून पडला तर "त्या तीन हजारांकरिता कुणालातरी लुबाडणं अन् मारून टाकणं" याशिवाय जगात दुसरे काही उरलेले नव्हते. त्याने दारावरची घंटी वाजविली, तेव्हा साडेसात झाले होते.

पहिल्या प्रथम दैव त्याच्यावर प्रसन्न असल्यासारखे वाटले. तो आल्याचे कळवले जाताच खूपच त्वरेने त्याचे स्वागत झाले. "जणू ती माझी वाटच पाहात असावी" असे मीत्याला वाटले, आणि त्याला दिवाणखान्यात नेऊन बसवितात न् बसवितात तोच घरमालकीण धावतच आली, आणि आपण त्याची वाटच पाहात होतो असे तिने सांगितले.

"मी तुमची वाटच पाहात होते!" तुमची मी अपेक्षाच करीत होते! अर्थात् तुम्ही मला भेटायला याल असं मी मानायचं काहीच कारण नव्हतं, हे तुम्हीसुद्धा कबूल कराल. तरीसुद्धा मी तुमची वाट पाहात होते. माझ्या या अंतः-प्रेरणेचं, दमीत्रि, तुम्हाला नवल वाटेल, पण सकाळभर सारखी माझी खात्री होती की तुम्ही येणार."

"हे खरंच विलक्षण म्हटलं पाहिजे, बाईसाहेब," अलगदपणे बसत मीत्या म्हणाला, "पण मी तुमच्याकडं एका अतिशय महत्त्वाच्या कामाकरिता आलो आहे... माझ्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाचं असं ते काम आहे... म्हणजे माझ्यापुरतं, बाईसाहेब... अन् मी लगेच..."

"मला माहीत आहे, दमीत्रि, तुम्ही अतिशय महत्त्वाच्या कामाकरिता आला आहात ते, काही आगाऊ भाकीत करण्याची ही गोष्ट नाही, चमत्कारांचा मागोवा घेत जाण्यासारखी मागासलेपणाची ही गोष्ट नाही (धर्मगुरू झसीमफांच्या-बद्दल तुम्ही ऐकलंत का?) ही गोष्ट अगदी दोन न् दोन चारची आहे; कतिरीना जे सर्व घेतलं त्यानंतर तुम्हाला आल्यावाचून राहवणं शक्यच नव्हतं, शक्यच नव्हतं ते तुम्हाला, शक्यच नव्हतं, ती अगदी गणितासारखी खात्रीची गोष्ट आहे."

"प्रत्यक्ष जीवनातली ही वास्तविकता आहे, बाईसाहेब, तीच आहे ही. पण मी जरा समजावून सांगतो..."

"वास्तविकता खरीच, दमीत्रि. माझं मत आता वास्तविकतेकडंच झुकलेलं आहे. मी चमत्कार फार पाहिले. फ़ादर झसीमफ वारले ते तुम्ही ऐकलंच असेल?"

" नाही, बाईसाहेब, पहिल्या प्रथमच मी हे ऐकतोय." मीत्या काहीसा चकित झाला. आल्योशाची मूर्ती त्याच्यापुढे उभी राहिली.

" काल रात्रीच. अन् नुसती कल्पना करा..."

" बाईसाहेब," मीत्या म्हणाला, " मी एका अगतिक अवस्थेत सापडलो आहे, अन् जर तुम्ही मला मदत केली नाही तर प्रत्येक गोष्टीचा परिणाम दुःखात होणार अन सर्वांअगोदर मी त्याला बळी पडणार आहे, याखेरीज मला दुसऱ्या कशाचीही कल्पना करवत नाही. माझ्या भाषेच्या सामान्यपणाबद्दल मला क्षमा करा, पण मी अगदी पराकोटीच्या उत्कंठेच्या अवस्थेत आहे..."

" हो हो, तुम्ही अतिशय उत्कंठेच्या अवस्थेत आहात हे मी जाणते. तसे तुम्ही असणारच, अन् तुम्ही काही जरी मला म्हणालात तरी, मला ते अगोदरच माहीत आहे. मी तुमच्या भवितव्याबद्दल फार काळापासून विचार करीत आले आहे, दमीत्रि फ्योदरोविच, मी बारकाईनं ते पाहात आले आहे अन् त्याचा अभ्यास केला आहे... हो, खरं सांगते, मी मनाची अनुभवी डॉक्टर आहे, दमीत्रि."

" बाईसाहेब, आपण जर अनुभवी डॉक्टर असाल, तर मी खात्रीनं अनुभवी रोगी आहे," मीत्या सौजन्ययुक्त होण्याचा प्रयत्न करीत म्हणाला, " आणि जर तुम्ही या रीतीनं माझ्या भवितव्याचं बारकाईनं निरीक्षण करीत असाल, तर माझ्या नाशाच्या वेळी तुम्ही माझ्या मदतीला याल, आणि म्हणून जी योजना घेऊन मी तुमच्याकडं येण्याचं साहस केलं आहे ती, अन् तुमच्याकडून मी काय आशा बाळगली आहे ते तुम्हाला निदान समजावून सांगण्याची मला परवानगी द्या... मी, बाईसाहेब, आलो आहे..."

" काही समजावून सांगू नका. त्याला दुय्यम महत्त्व आहे. पण मदतीबद्दल म्हणत असाल तर दमीत्रि, माझी मदत घेणारे काही तुम्ही पहिलेच नाही. तुम्ही माझी चुलत बहीण मादाम बेल्मेझफबद्दल बहुधा ऐकलंच असेल. तिच्या नवऱ्याचा असाच सत्यानाश झाला होता, तुम्ही मोठ्या मार्मिकपणे म्हणालात तसं तो ' दुःखाला बळी पडला होता.' मी त्याला घोडे पाळण्याची सूचना केली अन् आता त्याचं छान चाललंय. तुम्हाला घोडे पाळण्यासंबंधीची काही माहिती आहे, दमीत्रि ?"

" मुळीसुद्धा नाही, बाईसाहेब, अगदी मुळीसुद्धा नाही!" मीत्या बावचळल्यासारखा होऊन बसल्या जागेवरून जवळ जवळ उठून म्हणाला, " माझी तुम्हाला हात जोडून विनंती आहे, बाईसाहेब, की मी काय म्हणतो ते ऐकून घ्या. मला फक्त दोन मिनिटं मोकळेपणं बोलू द्या की लगेच मी तुम्हाला सर्व काही खुलासेवार सांगतो. जी काही योजना मी घेऊन आलो आहे ती सांगतो. शिवाय मला वेळ फारच कमी आहे. मी भयंकर घाईत आहे," मीत्या, ती पुन्हा आता बोलायला सुरुवात करणार

असे वाटून तिला मध्येच थांबविण्याकरिता झटका आल्याप्रमाणे ओरडून म्हणाला. "मी निराश होऊन...अगदी निराशेच्या शेवटच्या अवस्थेला पोचून तुमच्याकडं तीन हजाराची रक्कम कर्ज म्हणून मागण्याकरिता आलो आहे. त्याला सुरक्षित, अत्यंत सुरक्षित अशी जमानत, अत्यंत विश्वासार्ह हमी, बाईसाहेब, मी देतो आहे! फक्त मला खुलासा करू द्यां..."

"ते तुम्ही मला मागाहून, मागाहूनच सांगितलं पाहिजे!" मादाम होहलाहोवा आपल्या बाजूने त्याला गप्प राहण्याची खूण करीत म्हणाली, "अन् तुम्ही जे काही मला सांगणार ते मी आगाऊच जाणते आहे; मी ते तुम्हाला अगोदरच सांगितलं. तुम्ही अमुक एक रक्कम तीन हजाराची, मागता आहात पण मी तुम्हाला त्याहून अधिक, अमाप, अधिक देऊ शकेन, मी तुम्हाला वाचवीन, दमीत्रि पण तुम्ही माझं ऐकून घेतलं पाहिजे."

मीत्या बसलेला पुन्हा एकदम उठला.

"बाईसाहेब, खरोखर तुम्ही इतक्या थोर आहात?" तो तीव्र भावनावशतेने म्हणाला, "अहाहा, तुम्ही मला वाचवलंत! तुम्ही एका माणसाला अत्याचारी मरणातून, बंदुकीच्या गोळीतून वाचवलंत...मी तुमचा कायमचा कृतज्ञ..."

"मी तुम्हाला अधिक, तीन हजाराहून असंख्य पटींनं अधिक देईन!" मीत्याच्या भावनाविवशतेकडे प्रसन्न स्मित करून पहात मादाम होहलाहोवा म्हणाली.

"असंख्य पटींनं? पण मला तेवढ्याची गरज नाही. मला फक्त ते तीन हजारच पाहिजेत, अन् माझ्या बाजूनं मी तुमचा अपार कृतज्ञ राहून त्या रकमेकरिता तारण देऊ शकेन, आणि मी एक योजना मांडू इच्छितो..."

"पुरे, दमीत्रि, मी बोलले आहे अन् ते करीन." मादामहोहलाहोवानंन परोपकाराच्या अल्प विजयाच्या भावनेने त्याला मध्येच थांबविले. "मी तुम्हाला वाचवण्याचं वचन दिलंय, अन् मी तुम्हाला वाचवीन. जसं मी बेस्येसोवला वाचवलं तसं तुम्हाला वाचवीन. त्या सोन्याच्या खाणीच्याबद्दल तुम्हाला काय म्हणायचंय, दमीत्रि?"

"सोन्याच्या खाणीबद्दल बाईसाहेब? मी कधीच त्याबद्दल काही विचार केलेला नाही."

"पण मी तुमच्याकरिता विचार केलाय ना. त्या बाबतीत पुनःपुन्हा विचार केलाय. गेला महिनाभर माझं तुमच्याकडं लक्ष आहे. तुम्ही माझ्या जवळून जाताना शंभरवेळा मी तुमच्याकडे लक्ष लावून पाहिलं आहे, अन् मनाशी विचार केला. हा मनुष्य असा आहे की, जो सोन्याच्या खाणीपाशी असला पाहिजे. तुमची चालण्याची ढब मी पाहिली अन् अशा निर्णयाला आले की, हा मनुष्य असा आहे की, जो सोनं शोधून काढील."

"माझ्या चालण्याच्या ढबीवरून, बाईसाहेब?" मीत्या स्मित करून म्हणाला.

" होय, तुमच्या चालण्याच्या ढबीवरून. माणसाचा स्वभाव त्याच्या चालण्याच्या ढबीवरून सांगता येतो हे तुम्ही खचित नाकबूल करणार नाही, दमीत्रि? शास्त्रात या कल्पनेला आधार आहे. मी आता पूर्णपणे शास्त्र अन् वास्तवता मानायचं ठरवलंय. फादर झसीमफांचा हा सारा प्रकार बघितल्यानंतर मी अगदी भांबावून गेले आहे अन् अगदी आजपासूनच मी वास्तववादी बनले आहे आणि स्वतःला व्यावहारिक उपयुक्ततेला वाहून घ्यायचं ठरवलं आहे. मी रोगमुक्त झाले आहे. ' बस्स ! ' असं तुर्गनेव म्हणतो तसं."

" पण, बाईसाहेब, तुम्ही मला इतक्या उदार बुद्धीनं तीन हजार उसने देण्याचं वचन दिलंय ते..."

" ते तुमचेच आहेत, दमीत्रि," मादाम होहलाहोवा मध्येच म्हणाली. " ती रक्कम तुमच्या खिशातच आहे समजा. अहो, तीन हजारच काय तीस लाख समजा एका क्षणभरात, दमीत्रि फ्योदरोविच. मी तुम्हाला एक कल्पना भेट देते. ती ही की, तुम्ही सोन्याच्या खाणी शोधून काढायच्या, लक्षावधी मिळवायचे, परत यायचं अन् समाजात पुढारी व्हायचं अन् आम्हाला जागं करून चांगल्या स्थितीला न्यायचं. हे सारं काय ज्यूंच्याच हाती आपण सोपवायचं? तुम्ही अनेक संस्था अन् नानाप्रकारचे उद्योगधंदे स्थापन कराल. तुम्ही गरिबांना मदत कराल अन् ते तुम्हाला दुवा देतील. हे आगगाडीचं युग आहे, दमीत्रि. तुम्ही सुप्रसिद्ध व्हाल अन् अर्थखात्याचं तुमच्यावाचून चालायचं नाही, आज ते फारच वाईट स्थितीत आहे. रुबलचा भाव घटलाय्, त्यानं रात्री मला झोप येत नाही, दमीत्रि; लोकांना माझी ही बाजू माहीत नाही..."

" बाईसाहेब, बाईसाहेब ! " दमीत्रिने तिला थांबवलं, त्याला पुढं काही अनिष्टाची कल्पना येऊन तो अस्वस्थ झाला. " मी खरोखरच तुमच्या सल्ल्या-प्रमाणं वागेन कदाचित्, तुमच्या सल्ला शहाणपणाचा आहे, बाईसाहेब,....मी कदाचित् जाईन....त्या सोन्याच्या खाणीकडं....मी तिकडून परत येईन न् त्याबद्दल तुम्हाला पुन्हा भेटेन....पुष्कळ वेळा भेटेन बरं....पण ते तीन हजार जे तुम्ही इतक्या उदारपणे....हा, त्यानं मी मोकळा होईन, जर म्हटलं...तुम्ही ते मला आज...हो, मला एक मिनिटाचीही फुरसत नाही आज...."

" पुरे, दमीत्रि, पुरे ! " मादाम होहलाहोवाने जोराने त्याला मध्येच थांबविले. " प्रश्न असा आहे की तुम्ही त्या सोन्याच्या खाणीकडं जाणार की नाही; तुम्ही आपल्या मनाचा पक्का निश्चय केला आहे काय? मला होय की नाही उत्तर द्या."

" मी जाईन, बाईसाहेब, मागाहून....तुम्ही म्हणाल तिकडं मी जाईन... पण आत्ता...."

" थांबा ! " मादम होहलाहोवा म्हणाली. आणि एकदम उठून अन् एका-सुरेख कपाटाकडे धावत जाऊन त्या कपाटाला असलेल्या अनेक खणांपैकी एकामागून एक ती बाहेर ओढून अतिशय अधीरपणाने काही तरी शोधू लागली.

" ते तीन हजार, " मीत्त्या विचार करू लागला, त्याचे हृदय जवळ जवळ बंदच झाले, " अन् इतक्या चट्कन्....काही कागदपत्र किंवा कायदेशीर तरतुदी न करता....हे म्हणजे सभ्यपणाच्या रीतीनं व्यवहार करणं झालं ! ही बाई छानच आहे बुवा, फक्त तिनं इतकी बडबड करायला नको होती ! "

" सापडलं ! " मादाम होहलाहोवा ओरडून म्हणाली अन् ती आनंदभरानं मीत्याकडे परत धावत आली, " हे बघा, जे मी शोधीत होते ते मिळालं ! "

एका दोरीवर असलेली ती एक चिमुकली चांदीची मूर्ती होती, कधी कधी क्रूसाच्या बरोबर अंगावर लटकावतात तसली.

" ही कीवची आहे, दमीत्रि फ्योदरोविच, " ती पूज्यभावनेने पुढं म्हणाली, " संत हुतात्मा वार्वाराच्या अवशेषातली. ती तुमच्या गळयात मला घालू द्या, अन् त्याचबरोबर नव्या जीवनाकडे, नव्या भरभराटीच्या व्यवसायाकडं मला तुम्हाला अर्पण करू द्या."

अन् तिने ती दोरी खरोखरच त्याच्या गळयात घातली अन् ती व्यवस्थित बसवू लागली. मीत्त्या, खूप गोंधळून जाऊन, खाली वाकला अन् तिला त्याने मदत केली, आणि ती शर्टाच्या खाली नेकटायच्या अन् कॉलरच्या मागे छातीवर त्याने ती बसविली.

" आता तुम्ही निघू शकता," मादाम होहलाहोवा आपल्या जागेवर परत विजयी मुद्रेने बसून उद्गारली.

" बाईसाहेब, मी इतका भारावून गेलो आहे. तुमचे या अनुग्रहाबद्दल कसे आभार मानावेत हे खरंच मला कळत नाही. ... पण माझी वेळ किती बहुमोलाची आहे हे तुम्ही लक्षात घेतलंत तर किती बरं होईल... ती तेवढी रक्कम.... त्याबद्दल मी तुमच्या उदारपणाबद्दल कृतज्ञ राहीन... अहाहा, बाईसाहेब, ज्याअर्थी तुम्ही इतक्या ममतेनं मला वागवलंत, इतके हृदयस्पर्शी औदार्य मला दाखविलेत (मीत्त्या भावनावेगाने बोलत होता), त्याअर्थी मला तुम्हाला एक गोष्ट उघड करून सांगू द्या, (अर्थात् ती तुम्हाला फार दिवसांपासून माहीत आहे.) ती ही की माझं इथल्या एका माणसावर प्रेम आहे... मी कात्याशी... अंहं, कातिरीना इवानोवना मी म्हटलं पाहिजे, तिच्याशी मी बेइमानीनं वागलो.... अरेरे, मी अमानुषपणे, तिचा अपमान होईल अशा रीतीनं वागलो, पण मी इथं दुसऱ्या एका स्त्रीच्या प्रेमात पडलोय्, त्या स्त्रीचा, बाईसाहेब, तुम्ही कदाचित् तिरस्कार करीत असाल. कारण तुम्हाला सर्व अगोदरच माहीत आहे, पण तिला मी कोणत्याही कारणाकरिता सोडू शकत नाही, आणि म्हणून ते तीन हजार आता..."

"सर्व सोडून द्या, दमीत्री," मादाम होहलाहोवा अत्यंत निश्चित [illegible] त्याला थांबवून बोलली, "सर्व काही सोडा, विशेषतः स्त्रिया. सोन्याच्या खाणी हे तुमचं साध्य, अन् तिथं स्त्रियांना स्थान नाही. मागाहून, जेव्हा तुम्ही श्रीमंत अन् प्रसिद्ध होऊन परत याल, तेव्हा तुम्हाला सर्वांत उच्च समाजातली मनपसंत मुलगी मिळेल. ती आधुनिक मुलगी असेल, शिक्षण घेतलेली नू पुढारलेल्या विचारांची. त्या वेळेपर्यंत आता डोकं वर काढीत असलेला स्त्रियांचा प्रश्न [illegible], अन् बळी स्त्री गेलेली प्रकट झालेली असेल."

"बाईसाहेब, मुद्दा तो नाही, छेः छेः, तो मुद्दा मुळीच नाही..." मीत्त्याने विनवणीच्या स्वरूपात आपले हात जोडले.

"नाही कसा, आहे, दमीत्री, तुम्हाला हवा तोच तो आहे; तुम्ही ज्याकरिता [illegible] आहा तीच ती गोष्ट आहे, फक्त तिची तुम्हाला कल्पना नाही इतकंच. मी आजच्या स्त्री चळवळीच्या मुळीच विरुद्ध नाही, दमीत्रि. स्त्रीचा विकास, अन् [illegible] काळात स्त्रीची राजकीय मुक्ती–हेच माझे ध्येय आहे. मला एक मुलगी आहे, दमीत्रि फ्योदरोविच, लोकांना ही माझी बाजू माहीत नाही. त्या लेखक श्चेद्रिनला या विषयावर मी एक पत्र लिहिलं होतं. त्यानं मला इतकं शिकवलं, स्त्रीच्या व्यवसायासंबंधानं इतकं शिकवलं म्हणता. तेव्हा गेल्या वर्षी मी त्याला एक निनावी दोन ओळींचं पत्र लिहिलं. मी, आधुनिक स्त्रीच्या वतीनं, तुमचं चुंबन घेते नू तुम्हांला आलिंगन देते, माझ्या गुरो. चिकाटी धरा. अन् मी खाली सही केली 'एक आई' 'एक समकालीन आई' अशी सही करायचं माझ्या मनात होतं, पण मी थबकले, पण साध्या 'आई'लाच चिकटून राहिले; त्यात फार नैतिक सौंदर्य आहे, दमीत्रि फ्योदरोविच. अन् त्या 'समकालीन' शब्दानं त्याला 'समकालीन' ह्या नियतकालिकाची आठवण झाली असती– सरकारी सेन्सरशिपमुळं ती आठवण दुःखदायक होती...अगं बाईग, काय झालं? हो?"

"बाईसाहेब!" मीत्त्या एकदम उठून उभा राहिला अन् आर्जवपूर्वक हात जोडून म्हणाला, "जर तुम्ही इतक्या उदारपणे मला जे देऊ केलंत त्याला आता उशीर लावाल तर मला रडू येईल..."

"हां हां, रडा, दमीत्रि. अवश्य रडा! ती उदात्त भावना आहे... अशा [illegible] मार्ग तुमच्यापुढं खुला आहे! अश्रूंनी तुमचं हृदय मोकळं होईल. अन् मागाहून तुम्ही आनंदभरित होऊन परताल. तुम्ही सैबेरियाहून मुद्दाम आपल्या आनंदात मला वाटेकरी करायला धावत याल..."

"पण मलासुद्धा बोलू द्या!" मीत्त्या एकदम ओरडून म्हणाला. "आता [illegible] मी तुमचे आर्जव करीत आहे, मला सांगा, तुम्ही मला वचन दिलंत ती रक्कम आज मला मिळणं शक्य आहे काय? आज शक्य नसेल तर मी केव्हा [illegible]करिता येऊ?"

"कोणती रक्कम दमीत्रि ?"

"तुम्ही इतक्या उदार मनानं कबूल केलेली तीन हजारांची..."

"तीन हजार ? रुबल ? छे, छेः, माझ्याकडं तीन हजार नाहीत." मादाम होहलाहोवाने गांभीर्यपूर्ण आश्चर्याने उद्गार काढले. मीत्या स्तंभितच झाला.

"म्हणजे ? तुम्ही आत्ताच म्हणालात... म्हणालात... तुम्ही म्हणालात की ते तुमच्या हातातच आहेत असं समजा..."

"छेः छेः, तुमचा गैरसमज झाला, दमीत्रि. तसं असेल तर तुमचा गैरसमजच झाला. मी त्या सोन्याच्या खाणीबद्दल बोलत होते. मी तुम्हाला त्याहून जास्त, कितीतरी पटीनं जास्त देण्याचं वचन दिलं ते खरं. ते सारं आता मला आठवतं, पण माझ्या मनात त्या सोन्याच्या खाणी होत्या..."

"पण तो पैसा ? ते तीन हजार ?..." मीत्या अवघडून उद्गारला.

"हं तुमच्या मनात पैसा असेल तर तो नाही माझ्यापाशी. माझ्याकडं एक पेनीसुद्धा नाही, दमीत्रि. मी माझ्या मुनिमाशी त्याबाबतीत तर भांडते आहे, आणि मी आत्ताच मिउझोवकडून पाचशे रुबल स्वतः उसने आणले आहेत. छेः छेः, माझ्याकडं पैसा नाही. अन् माहीत आहे तुम्हाला दमीत्रि, जर माझ्याकडं पैसा असताच, तर मी तो तुम्हाला कर्जाऊ दिला नसता. पहिली गोष्ट, मी कधी पैसे कर्जाऊ देत नाही. पैसे कर्जाऊ देणं म्हणजे मित्र गमावणं. अन् ते मी खास तुम्हाला तर देणारच नाही. ते मी तुम्हाला देणार नाही, कारण मला तुम्ही आवडता न् तुम्हाला वाचवावं अशी माझी इच्छा आहे, कारण तुम्हाला जी गरज आहे ती सोन्याच्या खाणीची, सोन्याच्या खाणीची, सोन्याच्या खाणीची !"

"हाय रे सैताना ?" मीत्या गरजला, आणि आपल्या साऱ्या शक्तीनिशी त्यानं आपली मूठ जोरानं टेबलावर आपटली.

"आई ग ! आई ग !" मादाम होहलाहोवा भयभीत होऊन ओरडली, आणि ती त्या दिवाणखान्याच्या दुसऱ्या टोकाकडं पळाली.

मीत्या जमिनीवर थुंकला, अन् ढांगा टाकीत त्या खोलीतून, त्या घरातून बाहेर रस्त्यावर अंधारात आला ! तो एखाद्या झपाटलेल्या माणसाप्रमाणे चालू लागला, अन् जिथे दोन दिवसांपूर्वी त्याने, आल्योशाची रस्त्यावर अंधारात शेवटची भेट घेतली होती, तिथेच आपल्या छातीवर मारून घेतले. त्याच ठिकाणी, छातीवर असे ठोसे मारण्याने काय दर्शविले अन् त्याचा तसे करण्यात काय हेतू होता– हे, काही काळ, रहस्यच होते, ते जगात कोणालाही माहीत नव्हते अन् आल्योशालासुद्धा ते सांगितलेले नव्हते. पण ते रहस्य त्याला दुर्लौकिकाहूनही अधिक वाटत होते; त्याचा अर्थ होता सर्वनाश, आत्मघात.

जे तीन हजाराचे कतिरीनाचे देणे देऊन टाकून आपल्या छातीवरचा, आपल्या छातीवरच्या त्या विशिष्ट ठिकाणचा, आपण वागवीत असलेला अन्

आपल्या सदसद्‌विवेकबुद्धीला भार झालेला काळिमा आपण पुसून टाकू, हे तीन हजार जर आपल्या हाती लागले नाहीत तर आत्मघात करण्याचाच त्याने निश्चय केला होता. याचा सर्व खुलासा वाचकाला मागाहून होईल. पण आता जेव्हा त्याची शेवटची आशा नष्ट झाली तेव्हा हा इतका मजबूत दिसणारा माणूस, होहलाहोवाच्या घराकडून चार पावलांवर गेल्यावर एखाद्या लहान मुलासारखा स्फुंदून स्फुंदून रडू लागला. तो चालू लागला, अन् आपण काय करतो आहो हे न समजताच त्याने आपल्या मुठीने आपले अश्रू पुसून टाकले. अशा रीतीने तो चौकापर्यंत पोचला, अन् एकदम त्याला जाणीव झाली की आपण कशाशी तरी ठेचकाळलो. त्याने एका म्हाताऱ्या स्त्रीची किंकाळी ऐकली, तिला त्याने जवळ जवळ धक्का देऊन पाडलेच होते.

"देवा देवा, तू मला जवळ जवळ ठारच मारलंस की रे! आपण कुठं चाललोय तुला दिसत नाही, नालायक माणसा?

"आं, तू आहेस!" मीत्या अंधारात तिला ओळखून एकदम ओरडला. सॅमसोनोवच्या तैनातीला असणारी ती म्हातारी मोलकरीण होती, मीत्याने तिला आदल्या दिवशी विशेष नजरेने पाहून ठेवले होते.

"अन् तुम्ही कोण, साहेब?" ती म्हातारी अगदी वेगळ्या स्वरात म्हणाली. "मला अंधारात तुम्ही ओळखू येत नाही."

"तू कुझमा कुझमिचकडं राहतेस ना? तिथं तू कामाला आहेस ना?"

"होय साहेब, मी प्रोहोरिचकडं गडबडीनं निघाले होते...पण मी तुम्हाला ओळखत नाही."

"भल्या बाई, मला सांग, आग्राफेना तिथं आता आहे का?" मीत्या शंकाकुलतेने स्वतःवरचा ताबा गमावून म्हणाला. "थोड्या वेळापूर्वी मी तिला तिथपर्यंत पोचवलं होतं!"

"ती तिथं होती, साहेब. ती तिथं थांबली थोडावेळ अन् मग निघून गेली."

"काय? निघून गेली?" मीत्या ओरडला. "केव्हा गेली ती?"

"केव्हा म्हणजे, ती आली न् लगेच. ती फक्त एक मिनिटभर थांबली. तिनं कुझमा कुझमिचला एक गोष्ट सांगितली. त्यानं त्यांना हसू आलं, अन् मग ती धावत निघून गेली."

"तू खोटं बोलते आहेस, पाजी कुठची!" मीत्या गरजला.

"आई, आई ग!" ती म्हातारी किंचाळली, पण मीत्या केव्हाच अदृश्य झाला होता.

तो ग्रूशिंका राहात होती त्या घराकडे आपल्या साऱ्या शक्तीनिशी पळत गेला. तो ज्या वेळी तिथे पोचला त्या वेळी ग्रूशिंका मोक्रोयच्या मार्गावर होती. ती तेथून निघून गेल्याला पाव तासाहून जास्त वेळ झाला नव्हता.

हा 'कॅप्टन' जेव्हा घरात शिरला तेव्हा फेनिया आपली आजी मात्र्योना म्हणजे ती म्हातारी स्वैपाकीण, तिच्याशी बोलत बसली होती. त्याला बघताच फेनियाने एक कानठळ्या बसवणारी किंकाळी फोडली.

"तू किंचाळतेस?" मीत्या गरजून म्हणाला, "कुठं आहे ती?"

पण भयाने गर्भगळित झालेल्या फेनियाला एक शब्द उच्चारण्याची सवड देण्यापूर्वीच तो एकदम कोसळून तिच्या पायाशी पडला.

"फेनिया, ख्रिस्ताची शपथ आहे, मला सांग, ती कुठं आहे?"

"मला माहीत नाही. दमीत्रि, मला माहीत नाही. तुम्ही मला मारून टाकलंत तरी मी तुम्हाला सांगू शकणार नाही." फेनियानं शपथपूर्वक सांगितले.

"तुम्ही स्वतःच तिला आपल्या बरोबर नुकतेच नव्हता का घेऊन गेलात?"

"ती परत आली!"

"खरोखरच नाही आली. देवाची शपथ ती परत आली नाही."

"तू खोटं बोलते आहेस!" मीत्या ओरडला.

"तुला भय वाटतंय त्यावरूनच मला समजलं ती कुठं आहे ते."

तो पिसाटासारखा निघून गेला. भयभीत झालेल्या फेनियाला आपण इतक्या सहजासहजी सुटलो याचा आनंद झाला. पण आपण सुटलो याचे कारण तो इतक्या घाईत होता म्हणून, नाही तर आपली धडगत नव्हती हे ती चांगलेच जाणून होती. पण तो जसा पळाला तशी त्याने फेनिया अन म्हातारी मात्र्योना या दोघींना ही आश्चर्य वाटेल अशी एक अनपेक्षित कृती केली. टेबलावर एक पितळेचा खल होता. त्यात बत्ता– एक पितळेचाच लहान बत्ता होता. तो बत्ता सहा इंचापेक्षा जास्त लांब नव्हता. मीत्याने एका हाताने ज्या वेळी दार उघडले त्याच वेळी दुसऱ्या हाताने तो बत्ता उचलला अन् आपल्या बाजूच्या खिशात कोंबला.

"देवा रे देवा! हा कुणाचा तरी खून करणार!" फेनिया हातवारे करीत ओरडली.

४
अंधारात

तो कुठं धावत चालला होता? "ती फ्योदर पावलोविचाशिवाय दुसरीकडं कुठं असणार? ती सॅमसोनोवकडून थेट तिथंच जाऊन पोचली असली पाहिजे, हे आता स्पष्ट आहे. हे सारं कपट कारस्थान, ही सारी फसवणूक उघड होती..." असे विचार भिरभिरत त्याच्या डोक्यात शिरले. तो मार्या कोन्द्रात्येवनाच्या इथे गेला नाही. "तिथं जाण्याची काही गरजच नव्हती... लेशमात्र गरज नव्हती...

आपण भीतीचा ओरडा उठू देता कामा नये...ते लगेच धावत जाऊन सांगतील... मार्था कोन्द्रात्येवना या कटात सामील असली पाहिजे हे स्पष्ट आहे, स्मिर्दायाकफसुद्धा, सगळे विकत घेतले गेले असले पाहिजेत !"

काय करायचं याचा त्याने दुसराच बेत केला. तो फ्योदर पावलोविचच्या घराला प्रदक्षिणा घालणाऱ्या लांबच्या वाटेने गल्ली ओलांडून दमीत्रिवस्की रस्त्यावरून धावत जाऊन नंतर त्या लहानशा पुलावरून थेट मागील बाजूच्या निर्जन बोळाकडे आला. तो बोळ रिकामा अन् बिनराबता होता. त्याच्या एका बाजूला शेजाऱ्याच्या परसाच्या बगिच्याचे गराड्याचे कुंपण होते अन् दुसऱ्या बाजूला फ्योदर पावलोविचच्या सगळ्या बागेभोवतालच्या भरभक्कम उंच कुंपणाची भिंत होती. इथे त्याने एक ठिकाण निवडले, जिथून लिझावेता एकदा चढून आत गेल्याचे त्याला ऐकून माहीत होते. तेच ते ठिकाण होतं. "जर तिला त्यावरून चढून जाता आलं तर मी खात्रीनंच जाऊ शकेन" असा विचार, कसा ते देव जाणे, त्याच्या मनात आला. त्याने खरोखरच त्यावर उडी मारली आणि तात्काळ त्या कुंपणाची वरची बाजू कौशल्याने पकडली, मग त्याने आपले शरीर जोराने वर खेचले आणि तो भिंतीवर चढून बसला, त्या बागेत जवळच न्हाणीघर होते, पण कुंपणाच्या भिंतीवरून त्याला घराच्या खिडक्यांतुन येणारा प्रकाशही दिसत होता.

"हो, म्हाताऱ्याच्या झोपायच्या खोलीत दिवा आहे. ती तिथंच आहे !" आणि त्याने भिंतीवरून खाली बागेत उडी टाकली. ग्रिगरी आजारी आहे अन् बहुतकरून स्मिर्दायाकफसुद्धा आजारी असावा आणि आपली चाहूल ऐकण्याजोगे कोणी इथे नाही. हे जरी त्याला माहीत होते तरी तो लपला, गुपचूप उभा राहिला अन् कानोसा घेऊ लागला. पण तिथे सगळीकडे अगदी सामसूम होते, जणू आगाऊच ठरवावे त्याप्रमाणे, पूर्ण शांतता होती, वाऱ्याची झुळुकसुद्धा नव्हती.

"कुजबुजणाऱ्या शांततेखेरीज काहीच नाही" ही ओळ का कुणास ठाऊक त्याला आठवली. "माझी कुंपणावरून टाकलेली उडी कुणी ऐकली नाही म्हणजे मिळवली ! मला वाटतं ऐकली नसावी." एक मिनिटभर तसाच उभा राहून तो मांजराच्या पावलांनी बागेतल्या गवतावरून, झाडे अन् झुडपे टाळीत, चालला. तो मंदगतीने चालत होता. पावलागणिक हळूच सरपटत होता, आणि आपल्याच पावलांचा आवाज ऐकत होता. जिथून प्रकाश येत होता त्या खिडकीपाशी पोचायला त्याला पाच मिनिटे लागली. त्या खिडकीखालीच दाट अन् उंचशी एल्डर अन् शुभ्र बीमची झाडं-झुडपं होती. घरातून बागेत येण्याचा डाव्या बाजूकडचा दरवाजा बंद होता; जाता जाता त्याने ते काळजीपूर्वक जाणूनबुजून पाहून ठेवले होते. शेवटी तो त्या झुडपांजवळ पोचला अन् त्यांच्यामागे दडून राहिला. आपला श्वास त्याने रोखून धरला. तो मनाशी म्हणाला, "आता वाट पाहिली पाहिजे, त्यांनी जर माझ्या पावलांचा आवाज एखादेवेळी ऐकला असला अन् ते कानोसा घेत

असले तर त्यांना निश्चिंती वाटली पाहिजे...मला खोकला किंवा शिंक मात्र येऊ नये."

तो दोन मिनिटे थांबला. त्याची छाती मोठमोठ्याने धडधडत होती आणि केव्हा केव्हा तर त्याला श्वासही घेता येत नव्हता. अं हं, माझ्या हृदयाचं हे धडधडणं थांबणार नाही," तो मनाशी म्हणाला. "आता अधिक वेळ वाट पाहणं शक्य नाही." तो अंधारात एका झुडुपामागे उभा राहिला. खिडकीतून येणारा उजेड त्या झुडुपाच्या पुढच्या बाजूवर पडत होता.

"शुभ्र बीम झाडाचीह फळं किती लालभडक आहेत!" तो पुटपुटला, का ते त्याला कळले नाही. चोरपावलांनी, आवाज न करता, एकेक पाऊल टाकीत, तो त्या खिडकीच्या जवळ जाऊन पोचला. आणि आपल्या चवड्यावर उभा राहून तो उंच झाला. फ्योदर पावलोविचचे शय्यागृह सबंध त्याच्यापुढे दिसत होते. ती फारशी मोठी खोली नव्हती, आणि एका लाल पडद्याने तिचे दोन भाग पाडण्यात आले होते. फ्योदर पावलोविच त्या पडद्याला चिनी पडदा म्हणे. 'चिनी' हा शब्द मीत्याच्या मनात एकदम चमकून गेला, "अन् या पडद्याच्या पाठीमागं ग्रुशेंका आहे," मीत्या मनात म्हणाला. तो फ्योदर पावलोविचकडे न्याहाळून पाहू लागला, त्याने नवा पट्ट्यापट्ट्याचा रेशमी झगा घातला होता, तो मीत्याने कधीच पाहिला नव्हता, आणि गोंडे असलेली रेशमी दोरी कमरेभोवती बांधली होती. त्या झग्याच्या कॉलरच्या खालून स्वच्छ, भपकेदार सुरेख कापडाचा सोनेरी बटने असलेला शर्ट डोकावत होता. डोक्याला फ्योदर पावलोविचने तेच लाल बँडेज, जे आल्योशाने पाहिले होते ते, बांधलेले होते.

"हे सज्ज झालेले दिसतात." मीत्याच्या मनात आले.

त्याचा बाप खिडकीपाशी उभा होता, बहुधा विचारमग्न असावा. एकाएकी गर्रकन त्याने आपली मान मागे वळविली, क्षणभर ऐकल्यासारखे केले अन् काहीच ऐकू न आल्यामुळे, तो टेबलापाशी गेला, सुरईतून अर्धा पेलाभर ब्रँडी त्याने ओतली अन् ती तो प्याला. नंतर त्याने दीर्घ निःश्वास टाकला. पुनः तो क्षणभर स्तब्ध राहिला, निष्काळजीपणे भिंतीवरच्या आरशापर्यंत गेला, उजव्या हाताने आपल्या कपाळावरचे लाल बँडेज थोडे वरती सरकविले, आणि आपल्या जखमा न् ओरखडे तपासू लागला, ते अजून बुजले नव्हते.

"हा एकटाच आहे," मीत्या मनात म्हणाला, "बहुतकरून एकटाच आहे."

फ्योदर पावलोविच आरशापासून बाजूला होऊन एकदम खिडकीपाशी गेला अन् त्याने बाहेर पाहिले. मीत्या चटकन् सावलीत सरकला.

"ती कदाचित् पडद्याच्या मागे असेल. कदाचित् या वेळी ती झोपली असेल," असे त्याच्या मनात आले, त्याने त्याच्या हृदयाला वेदना झाल्या.

फ्योदर पावलोविच खिडकीपासून बाजूला गेला. "तो तिच्याकरिता खिडकीच्या-बाहेर पाहतो आहे, त्या अर्थी ती इथं नाही. त्यानं बाहेर अंधारात का टक लावावी? तो अधीर होऊन भडकला आहे."... मीत्या चटकन् मागे सरकला अन् त्याने खिडकीकडे पुन्हा पाहणे चालू केले. तो म्हातारा टेबलापाशी जाऊन बसला होता, त्याची निराशा झालेली दिसत होती. शेवटी त्याने आपले कोपर टेबलावर टेकले, आणि आपला उजवा गाल हातावर विसावला. मीत्या त्याच्याकडे अधीरतेने पाहू लागला.

"हा एकटा आहे, एकटा आहे!" तो पुनःपुन्हा बोलला. "ती जर इथं असती, तर त्याचा चेहरा काही वेगळाच झाला असता."

आणि विचित्र असे की, ती इथे नाही या विचाराने त्याच्या अंतःकरणात एक चमत्कारिक, अविचारी चीड उत्पन्न झाली. त्याने लगेच स्वतःची समजूत घातली की, "ती इथं नाही म्हणून मला असं वाटतंय असं नाही तर ती इथं आहे की नाही हे निश्चितपणे मी सांगू शकत नाही, म्हणून माझ्या मनाची अशी अवस्था झाली आहे." मीत्याला पुढे आठवले की, त्याचे मन त्या वेळी अगदी स्वच्छ होते, अगदी बारीकसारीक तपशिलासुद्धा प्रत्येक गोष्ट त्याच्या लक्षात येत होती आणि एकही महत्त्वाचा मुद्दा तो चुकत नव्हता. पण व्यथेची जाणीव, अनिश्चितपणाच्या अन् अनिश्चयाच्या व्यथेची जाणीव, त्याच्या अंतःकरणात क्षणोक्षणी वाढत होती. "ती इथं आहे की नाही?" हा राग आणणारा संशय त्याच्या अंतःकरणाला व्यापून टाकीत होता, अन् एकदम आपल्या मनाचा निर्धार करून, त्याने आपला हात पुढे केला अन हळूच खिडकीच्या तावदानावर ठोठावले. त्या म्हाताऱ्याने स्मिर्दाखफला सांगून ठेवलेला दोनदा सावकाश अन मग तीन वेळा झटझट, हा संकेत त्याने दिला, या संकेताचा अर्थ 'ग्रूशिंका इथं आहे!" असा होता.

म्हातारा एकदम दचकला, त्याने चटकन आपली मान वळविली, आणि त्वरेने उडी मारून तो खिडकीकडे धावला. मीत्या अंधारात सटकला. फ्योदर पावलोविचने खिडकी उघडली अन आपले संबंध डोके बाहेर काढले.

"ग्रूशिंका, तू आहेस का? तू आहेस?" तो कापणाऱ्या अर्धस्फुट स्वरात म्हणाला. कुठं आहेस तू, माझ्या जीवा, कुठं आहेस तू?" तो भयंकर अस्वस्थ होऊन धापा टाकीत होता.

"तो एकटाच आहे तर," मीत्याचा निश्चय झाला.

"कुठं आहेस तू?" म्हातारा पुनः म्हणाला; आणि त्याने आपले डोके आणखी पुढे काढले, खांद्यापर्यंत ते पुढे काढून तो डावीकडे–उजवीकडे–सगळीकडे पाहू लागला. "इकडं ये, एक छोटासा नजराणा मी तुला देणार आहे. ये, तुला दाखवतो..."

" म्हणजे ते तीन हजार." मीत्याच्या मनात आले.

" पण तू आहेस कुठं ? तू दरवाज्याकडे आहेस का ? आता तो उघडतो हं."

आणि म्हातारा खरोखर खिडकीवर चढून बाहेर होऊन उजव्या बाजूला जिकडं बागेत जाण्याचा दरवाजा होता तिकडे डोकावून अंधारात पाहण्याचा प्रयत्न करू लागला. दुसऱ्याच क्षणी तो ग्रूशिंकाच्या उत्तराची वाट न पाहता दरवाजा उघडण्याकरिता खात्रीने धावलाच असता.

मीत्याने मुळीच हालचाल न करता आपल्या बाजूने त्याच्याकडे पाहिले. ज्याचा मीत्याला मनस्वी तिटकारा होता, ते त्या म्हाताऱ्याचे सबंध थोबाड, त्याचा खालचा लोंबता गळ्याचा घोटा, त्याचे बाकदार नाक, लालसायुक्त अपेक्षेने हसणारे त्याचे ओठ, हे सर्व खोलीतून डाव्या बाजूवर पडणाऱ्या तिरप्या दीपकिरणांनी चांगलेच उजळून दिसत होते. द्वेषाची भयंकर ज्वाला मीत्याच्या अंतःकरणात भडकली : " हा माझा प्रतिस्पर्धी इथं आहे, ज्यानं मला उलथं पालथं भाजलं, माझ्या आयुष्याचं मातेरं केलं तो !" त्या अकस्मात उठणाऱ्या भयंकर आवेगाच्या सूड भावनेच्या क्रोधाचा हा झपाटा होता. आगाऊ चाहूल लागावी त्याप्रमाणं आल्योशाला बोलला होता. त्या वेळी आल्योशानं त्याला प्रश्न केला होता की, " आपल्या वडिलांना आपण ठार मारू असं तू कसं म्हणू शकतोस ? " त्या वेळी तो म्हणाला होता, " मला माहीत नाही, मला माहीत नाही. कदाचित मी त्याला मारणार नाही. कदाचित मारीनही. तो त्या वेळी एकदम मला शिसारी आणील अशी मला भीती वाटते. त्याची ती दुहेरी हनुवटी, त्याचं नाक, त्याचे डोळे, त्याचं ते निर्लज्ज दात काढणं याची मला अगदी शिसारी येते. मला अगदी आतून तिटकारा वाटायला लागतो. मला भीती वाटते ती त्या गोष्टीची, तेच मला असह्य होईल..." हा आतूनच वाटणारा तिटकारा असह्य होत चालला होता. मीत्याचा स्वतःवर ताबा राहिला नाही. त्याने एकदम तो पितळेचा बत्ता आपल्या खिशातून बाहेर ओढून काढला.

. . . .

" ईश्वर त्या वेळी माझ्याकडे पाहत होता." असे मीत्याच मागाहून म्हणाला. बरोबर त्याचवेळी आजारी ग्रिगरी आपल्या अंथरुणावर जागा झाला. स्मिर्दाखफने इवानला वर्णन करून सांगितला होता तो उपचार याच्याअगोदर संध्याकाळी त्याने करून घेतला होता. त्याने काहीतरी अतिशय परिणामकारक अशा तऱ्हेचे औषध मिसळलेली व्होडका आदल्या सबंध अंगाला चोळली होती. त्या मिश्रणातून जे राहिले होते ते तो प्याला होता. आणि त्याच्या बायकोने त्याच्याजवळ बसून " एक विशेष प्रार्थना " म्हटली होती. त्यानंतर तो झोपी गेला होता.

मार्फा इग्नात्येवनानेसुद्धा ते मिश्रण चाखले होते अन् तिला कडक मद्याची सवय नसल्यामुळे ती आपल्या नवऱ्याशेजारी मेल्यासारखी झोपून गेली होती.

पण ग्रिगरी रात्री अगदी अचानकपणे जागा झाला, आणि क्षणभर मनाशी विचार करून, जरी त्याच्या पाठीतून कळ येत होती तरी, तो अंथरुणात उठून बसला. नंतर पुन्हा त्याने विचार केला, आणि उठून त्याने झटपट कपडे घातले. कदाचित् 'अशा धोक्याच्या वेळी' घर असुरक्षित टाकून आपण झोपलो या विचाराने त्याची मनोदेवता अस्वस्थ झाली असावी. स्मिर्द्याकफ फिटमुळे थकून गेल्याने शेजारच्या खोलीत निश्चेष्ट पडलेला होता. मार्फा इग्नात्येवना हलली नाही. ग्रिगेरीने तिच्याकडे नजर टाकली अन् "ते औषध या म्हातारीला बरंच जड गेलंय" असे मनात म्हणून कुरकुरत तो बाहेर पायऱ्यांकडे गेला. तिथूनच बाहेर फक्त दृष्टी टाकण्याचा त्याचा विचार होता यांत शंका नाही, कारण त्याला चालवत नव्हते, पाठीतली अन् उजव्या पायातली कळ त्याला असह्य होत होती. पण त्याला एकदम आपण आज संध्याकाळी बागेत जाण्याच्या लहान फाटकाला कुलूप घातले नाही याची आठवण झाली. तो एक अत्यंत नियमित अन् चोखपणे काम करणारा माणूस होता, त्याची नित्याची चाकोरी कधी बदलायची नाही अन् सवयी वर्षानुवर्षे तशाच चालायच्या. लंगडत अन् वेदनेने व्याकुळ होत तो पायऱ्या उतरून खाली गेला अन बागेकडे चालला, अरे, खरेच, फाटक सताड उघडे होते. यंत्रवत त्याने बागेत पाऊल टाकले. कदाचित् त्याच्या डोक्यात काही आले असावे, कदाचित् काही आवाज त्याने ऐकला असेल, अन् डावीकडे नजर टाकताच त्याला मालकाची खिडकी उघडी दिसली. त्यावेळी त्यातून कुणीच बाहेर पाहात नव्हते.

"ही उघडी का? हा काही आता उन्हाळा नाही," ग्रिगरीच्या मनात आले, आणि एकदम, त्याच क्षणी समोर बागेत काही तरी विलक्षण त्याच्या दृष्टीस पडले. त्याच्यापासून चाळीस पावलांवर एक माणूस आपल्या समोर अंधारात पळत असलेला, एक छाया अतिशय जलदीने धावत असलेली त्याला दिसली.

"बाप रे!" ग्रिगरीचा स्वतःवरचा ताबा जाऊन तो ओरडला, आणि आपल्या पाठीतली कळ विसरून तो त्या धावत्या आकृतीला उडविण्याकरिता झटपट पुढे झाला. त्याने मधलीच वाट धरली, अर्थातच त्याला बागेची अधिक चांगली माहिती होती; ती धावणारी आकृती न्हाणीघराकडे गेली, त्याच्यामागे धावत जाऊन बागेच्या कुंपणाकडे घुसली. ग्रिगरी त्याच्या मागोमाग, त्याच्यावरची दृष्टी न काढता, गेला आणि सर्व काही विसरून धावू लागला. तो मनुष्य कुंपणावर चढत असतानाच बरोबर तो तिथे जाऊन पोचला. ग्रिगरी भान विसरून मोठ्याने ओरडला आणि त्या माणसावर त्याने झडप घालून त्याची तंगडी त्याने आपल्या दोन्ही हातांत पकडून धरली.

होय, दुर्दैवाची जी आगाऊ जाणीव त्याला झाली होती ती खोटी ठरली नाही. त्याने त्याला ओळखले, तोच होता तो, " राक्षस," तो " पितृघातकी."

" पितृघातक्या ! " तो म्हातारा इतक्या मोठ्याने ओरडला की साऱ्या आजूबाजूला ऐकू जावे, पण त्याला जास्त ओरडण्याला संधीच मिळाली नाही, तो विजेचा धक्का बसावा तसा एकदम खाली कोसळला.

मीत्त्याने परत बागेत उडी मारली अन् पडलेल्या माणसावर तो वाकला. मीत्त्याच्या हातात पितळेचा बत्ता होता, आणि त्याने तो अजाणता गवतात टाकून दिला. तो बत्ता ग्रिगरीपासून दोन पावलांवर जाऊन पडला, गवतात नव्हे तर वाटेवर, एका अत्यंत स्पष्ट दिसण्यासारख्या जागी. काही क्षण त्याने आपल्यापुढं पालथ्या पडलेल्या त्या शरीराचे निरीक्षण केले. त्या म्हाताऱ्या माणसाचे डोके रक्ताने भरलेले होते. मीत्त्या आपला हात पुढे करून ते चाचपू लागला. आपण त्या म्हाताऱ्याची कवटी फोडली की फक्त त्याला बत्त्याचा तडाखा देऊन मूर्च्छित केले याची खात्री करून घेण्याकरिता आपण अतिशय उत्सुक झालो होतो, मागाहून त्याला स्पष्टपणे आठवले. पण रक्त फार वाहात होते, आणि एका क्षणात मीत्त्याची बोटे गरम रक्ताने ओलीचिंब झाली होती. मादाम होहलाहोवाच्या भेटीला जाताना आपल्याबरोबर घेतलेला पांढरा स्वच्छ हातरुमाल आपण बाहेर काढला होता अन् तो त्या म्हाताऱ्याच्या डोक्यावर ठेवून बेअकलीपणानं त्याच्या तोंडावरून अन् कानशीलांवरून रक्त पुसण्याचा प्रयत्न केला होता, पण तो हातरुमाल लगेच रक्ताने भिजून गेला होता, ह्याची त्याला आठवण झाली.

" बाप रे ! हे मी कशासाठी करतो आहे ? " मीत्त्याच्या मनात आले, त्याने लगेच स्वतःला सावरले. " मी जर त्याची कवटी फोडली असली तर ती आता मला कशी समजणार ! आणि आता फरक तरी काय पडणार आहे ? " तो आशा सोडून देऊन म्हणाला. " मी जर त्याला ठारच केलं असेल तर ठार केलं... तुझा शेवट दुःखात झाला, म्हाताऱ्या, तेव्हा आता असाच पडून राहा ! " तो मोठ्याने म्हणाला. आणि एकदम कुंपणाच्या भिंतीकडे वळून त्याने तिच्यावरून छलांग उडी टाकून तो बोळात उतरला अन् पळू लागला– तो रक्ताने चिंब झालेला हातरुमाल तसाच चुरगळून उजव्या हाताच्या मुठीत त्याने ठेवला होता, आणि धावताना त्याने तो आपल्या कोटाच्या मागच्या खिशात कोंबला. तो नाकासमोर पळत होता अन् जे थोडे त्या वाटेने जाणारे लोक त्याला अंधारातून रस्त्यात दिसले त्यांना नंतर आठवले की आपल्याला त्या रात्री एक माणूस पळत असलेला दिसला होता. तो परत मोरोझोव विधवेच्या घराकडे पळत गेला.

त्या दिवशी संध्याकाळी तो तिथून निघून जाताच फेनियाने मुख्य चौकीदार नाझर इवानोविच, याच्याकडे लगेच जाऊन अजीजीपूर्वक विनंती केली होती की

कृपा करून " त्या कॅप्टनला आज किंवा उद्या पुनः आत येऊ देऊ नको." नाझर इवानोविचने आश्वासन दिले होते, पण त्याच्या मालकिणीने त्याला लगेच बोलावले होते, म्हणून तो वरच्या मजल्यावर गेला होता, आणि तिथे त्याचा पुतण्या वर जाताना वाटेत भेटला. वीस वर्षांचा एक मुलगा, नुकताच खेड्यातून आलेला होता तो, त्याला आपली जागा घ्यायला सांगितले होते, पण 'कॅप्टन' बद्दल बोलायचे तो विसरूनच गेला होता. मीत्या फाटकापर्यंत धावत धावत आला अन् त्याने दार ठोठावले. त्या पोराने लगेच त्याला ओळखले, कारण मीत्याने त्याला अनेक वेळा चिरीमिरी दिलेली होती. फाटक उघडून त्याने लगेच त्याला आत घेतले, अन् चांगुलपणाने हसत लगेच त्याला सांगितले, " आग्राफेना या वेळी घरात नाहीत, बरं का."

" मग कुठे आहे ती, प्रोहोर ? " मीत्याने लगेच थांबून विचारले.

" त्या आजच संध्याकाळी, साधारण दोन तासांपूर्वी, तिमोफीबरोबर मोक्रोयला निघून गेल्या."

" कशाकरिता ? " मीत्याने ओरडून विचारलं.

" ते मी कसं सांगणार ? कोणा हपिसराला भेटायला कुणी तरी त्यांना बोलावलं न् त्यांना नेण्यासाठी घोडागाडी पाठवली होती."

मीत्याने त्याला सोडले अन् तो वेड लागलेल्या माणसासारखा फेनियाकडे पळत गेला.

५

एकदम केलेला निश्चय

ती आपल्या आजीबरोबर स्वैपाकघरात बसली होती; त्या दोघी झोपायला जाण्याच्याच विचारात होत्या. नाझर इवानोविचवर त्या विश्वासून होत्या. त्यामुळे त्या कुलूप लावून आत बसल्या नव्हत्या. मीत्या आत धावत गेला, त्याने फेनियावर झडप घातली अन् तिचा गळा धरला.

" बोल झटपट ? कुठं आहे ती ? कुणाबरोबर आहे आत्ता ती मोक्रोयत ? " तो विक्राळपणे गरजला.

दोन्ही बायांनी किंकाळ्या फोडल्या,

" अयाई ! अहो, मी सांगते. अयाई, प्यारे दमीत्रि, तुम्हाला मी सगळं सगळं सांगते हो, काही लपवून ठेवत नाही," फेनिया भीतीने ठार होऊन त...त प.. प करीत म्हणाली; " ती मोक्रोयला गेली आहे, तिच्या हपिसराकडं."

" कुठला हपिसर ? " मीत्या गरजला.

" तिचा हपिसर, तिच्या ओळखीचा होता तो, ज्यानं तिला पाच वर्षांमागं

टाकून दिलं होतं तो," फेनिया केकाटत जितक्या जलदीने सांगता येईल तितक्या जलदीने सांगू लागली,

मीत्त्याने तिचा गळा दाबलेले हात मागे घेतले. तो तिच्यासमोर तोंड करून उभा राहिला. तो पालीसारखा पांढरा फटक पडला होता, एक शब्द त्याला उच्चारवेना, पण त्याच्या डोळ्यांवरून दिसले की त्याने सर्व काही, अगदी सर्व, पहिल्या शब्दावरूनच ओळखले आणि साऱ्या स्थितीची त्याला कल्पना आली. त्याला समजले की नाही ते पाहण्याच्या स्थितीत त्या क्षणी गरीब बापडी फेनिया नव्हती. ती खोलीत जेव्हा धावत आली त्यावेळी जशी ट्रंकेवर बसली होती तशीच बसून राहिली, तिचे सर्वांग कापत होते, आणि आपले हात तिने जणू स्वतःचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करण्याकरिता करावेत तसे पुढं केले होते. ती त्या अवस्थेत जणू ताठूनच राहिली होती. तिचे विस्फारलेले, भयाकुल डोळे त्याच्यावर खिळून राहिले होते. आणि आणखी भरीत भर म्हणजे त्याचे दोन्ही हात रक्ताने बरबटलेले होते. पळत असताना वाटेत त्याने त्यांचा आपल्या कपाळाला घाम निपटण्याकरिता स्पर्श केला असला पाहिजे, त्यामुळं त्याच्या कपाळावर आणि उजव्या गालावर रक्ताचे ठिपके दिसत होते. वाताचा झटका आल्याप्रमाणं फेनिया ओरडण्याच्या बेतात होती. ती म्हातारी स्वैपाकीण दचकून उठली आणि भयाने बेभान होऊन एखाद्या वेड्या बाईसारखी त्याच्याकडे टक लावून पाहात राहिली.

मीत्त्या क्षणभर उभा राहिला, अन् मग अजाणता एकदम फेनियाच्या शेजारच्या खुर्चीत कोसळला. तो बसला तो विचार करून नव्हे तर जणू भयाच्या तडाख्याने बधीर होऊन. तरी सर्व काही सूर्यप्रकाशासारखे स्पष्ट दिसत होते; तो हपिसर ! त्याच्याबद्दल त्याला माहीत होते, तो सर्व काही पूर्णपणे जाणत होता, त्याला ते खुद्द ग्रूशिंकाकडूनच कळले होते, हेही कळले होते की त्याच्याकडून एक महिन्यापूर्वी पत्र आलं आहे. म्हणजे महिनाभर, सबंध महिनाभर हा नवा माणूस इथे येऊन पोचेपर्यंत, आपल्या नकळत हे चालले होते म्हणायचे, अन् आपण त्याचा कधी विचारच केला नाही ! पण आपण त्याचा विचार कसा नाही केला, कसा नाही केला ? या अधिकाऱ्याला आपण असे विसरलो हे झालं कसं, त्याच्याबद्दल आपण ऐकलं न् लगेच विसरून गेलो ? हा प्रश्न एखाद्या भयावह गोष्टीसारखा त्याच्यापुढे उभा राहिला होता. आणि तो त्या भयावह प्रश्नाकडे भयाकुल होऊन, भयाने गारठून जाऊन, पाहात होता.

पण एकदम तो, एखाद्या गरीब अन् मायाळू मुलाइतक्याच गरीबपणाने न् सौम्यपणाने फेनियाशी बोलू लागला. नुकतेच त्याने तिला भयभीत न् जायबंदी करून सोडले होते ते तो जणू पुरते विसरूनच गेला असावा. तो फेनियाला प्रश्न करू लागला, ते अतिशय बारकाव्याचे होते अन् त्याच्या तशा स्थितीतल्या माणसाने ते विचारावे हे आश्चर्यच होते, आणि ती मुलगी जरी त्याच्या त्या रक्त माखल्या हातांकडे

भयचकित होऊन पाहात होती तरीसुद्धा नवल वाटण्यासारख्या तत्परतेने न् त्वरेने त्याच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देत होती. जणू ती त्याच्यापुढे संपूर्ण सत्य अन् केवळ सत्य तेच ठेवायला अधीर झाली होती. थोडी थोडी करीत, नव्हे एक प्रकारचा आनंद घेत, ती प्रत्येक बारीक सारीक गोष्ट त्याला समजावून सांगू लागली, अन् त्याला यातना देण्याच्या इच्छेने नव्हे तर, जणू त्याच्या उपयोगी पडता येईल तितके पडण्याच्या उत्कंठेने ती सारे सांगत होती. त्या सर्व दिवसाची हकीकत तिने त्याला तपशीलवार सांगितली : राकितीन आणि आल्योशा कसे आले होते, आपण (म्हणजे फेनिया) कसे पाळतीवर राहिलो होतो, बाईसाहेब कशा निघाल्या होत्या आणि त्यांनी खिडकीतून आल्योशाला हाक मारून तुम्हाला, म्हणजे मीत्याला, आपला प्रेमपूर्ण निरोप द्यायला सांगून, " मी त्याच्यावर एक तास प्रेम केलं होतं हे सदोदित त्याला लक्षात ठेवायला सांग." असं सांगितलं होतं ते सर्व तिनं सांगितलं.

हा निरोप ऐकून मीत्या एकदम हसला, आणि त्याच्या फिकट गालांवर लाली आली. त्याच वेळी आता चौकसखोर व्हायला मुळीसुद्धा न भिता, फेनिया त्याला म्हणाली,

" दमीत्रि, तुमच्या हाताकडं बघा. ते रक्तानं माखलेले आहेत ! "

" होय," मीत्या अभावितपणे म्हणाला. त्यानं बेपर्वाईनं आपल्या हातांकडे पाहिले अन् तत्काळ ते अन् फेनियाचा प्रश्न तो विसरून गेला.

तो पुन्हा स्तब्धतेत मग्न झाला. तो धावत आत आला, त्याला आता वीस मिनिटे होऊन गेली होती. त्याचा पहिला भयाचा धसका ओसरला होता. पण कोणत्या तरी नव्या निश्चयाने त्याच्या मनाचा ताबा घेतला असावेसे दिसत होते. तो स्वप्नाळूपणे हसत एकदम उठून उभा राहिला.

" हे काय झालं तुम्हाला, साहेब ? " फेनियाने त्याच्या हाताकडे पुन्हा बोट दाखवून म्हटले. ती सहानुभूतिने बोलत होती, जणू ती आता त्याच्या दुःखात त्याच्या अधिक निकट आली होती. मीत्याने परत आपल्या हातांकडे पाहिले.

" हे रक्त आहे, फेनिया," तो तिच्याकडे एका विचित्र आविर्भावाने पाहात म्हणाला. " हे माणसाचं रक्त आहे, अन्, हाय रे देवा ! कशाकरिता ते सांडलं ? पण...फेनिया... इथं एक कुंपणाची भिंत आहे. (तो तिच्याकडं एखादं कोडं घालावं तसं पाहात म्हणाला), उंच भिंत आहे, अन् दिसायला भयानक आहे. पण उद्या उजाडायच्या वेळेला, सूर्य उगवेल तेव्हा, मीत्या त्या कुंपणावरून उडी टाकून जाणार आहे... तुला कसलं कुंपण काही माहीत नाही ना, नसू दे... उद्या तू ऐकशील अन् तुला समजेल... अन् आता राम राम. मी तिच्या वाटेत आडवा येणार नाही. मी बाजूला होईन, बाजूला कसं व्हायचं ते मला माहीत आहे. माझ्या

आनंदा, राहा... तू एक तास माझ्यावर प्रेम केलंस, अशीच सदोदित मित्येन्का कारामाझफची आठवण ठेव... ती मला नेहमी मीत्त्येन्का म्हणून बोलवायची, आठवतं तुला ! ''

आणि एवढे बोलून तो लगेच त्या स्वैपाकघराच्या बाहेर पडला. तो एकदम आत घुसून आला अन् त्याने तिच्यावर हल्ला केला. त्यावेळी जितकी घाबरली नव्हती, तितकी त्याच्या या एकदम निघून जाण्यानं फेनिया घाबरली.

दहाच मिनिटांनी दमीत्रि, प्योत्र इल्यिच पेरहोतिनच्या घरी गेला. त्याच्याकडं त्याने आपली पिस्तुलं गहाण ठेवली होती. तो तरुण अधिकारी होता. या वेळी साडेआठ झाले होते आणि प्योत्र इल्यिचने आपला संध्याकाळचा चहा संपवून ' मेत्रोपोलिस ' मध्ये बिलियर्ड्स खेळायला जाण्याकरिता पुन्हा नुकताच कोट चढविला होता. मीत्त्याने त्याला बाहेर येत असतानाच गाठले.

त्याचा चेहरा संबंध रक्ताने माखलेला बघून त्या तरुण माणसाच्या तोंडून आश्चर्योद्‌गार बाहेर पडला.

" बापरे ! काय झालं काय ? "

" मी माझ्या पिस्तुलांसाठी आलो आहे," मीत्त्या म्हणाला, " अन् तुमचे पैसे आणले आहेत. तुमचा मी फार आभारी आहे. प्योत्र इल्यिच, मी फार घाईत आहे, कृपा करून लौकर आटपा."

प्योत्र इल्यिच जास्त जास्तच चकित झाला; त्याची दृष्टी एकदम मीत्त्याच्या हातातील बँक नोटांच्या पुडक्याकडं गेली आणि विशेष हे की,तो त्या नोटा हातात धरून अशा रीतीनं आत आला होता की, कोणीही तसा येणार नाही. अन् कोणीही तसा पैसा वागविणार नाही; त्याने त्या आपल्या उजव्या हातात घेतल्या होत्या आणि जणू मुद्दाम दाखविण्याकरिता पुढे कराव्यात तशा पुढे पुढे धरून तो आला होता. पेरहोतिनचा नोकर मुलगा जो त्याला वाटेत भेटला होता, त्याने नंतर सांगितले की, तो वाटेतसुद्धा असाच नोटा हातात पुढे धरून, चालत होता, म्हणजे तो रस्त्यानेसुद्धा असाच त्या घेऊन जात असला पाहिजे. त्या सगळ्या सप्तरंगी शंभर शंभर रुबलांच्या नोटा होत्या, आणि त्या धरणारी बोटे रक्ताने भरलेली होती.

जेव्हा प्योत्र इल्यिचला नंतर ते पैसे किती होते असे विचारण्यात आले तेव्हा तो म्हणाला की दृष्टिक्षेपात ते ठरविणे कठीण होते, पण त्या दोन हजारांच्या, किंवा कदाचित् तीन हजारांच्याही असतील, पण ते मोठे, चांगले ' लठ्ठ ' पुडके होते. त्याने नंतर साक्षीत सांगितले की " दमीत्रि फ्योदरोविच काही ओळखू येत नव्हता. तो दारूच्या नशेत नव्हता, पण जणू भावनावेशानं धुंद झाल्यासारखा होता, त्याला कसलंही भान नव्हतं, पण त्याचबरोबर जणू गुंग झाल्यासारखा, जणू कशाचातरी चिंतन करीत न् शोध घेत आहे; पण निर्णय करू शकत नाही असा तो दिसत होता.

" पण तुम्हाला झालंय काय? काय बिघडलंय? " प्योत्र इल्यिच आपल्या पाहुण्यांकडे अस्वस्थपणे पाहून ओरडला. " तुमचं सगळं अंग रक्तानं कसं काय भरलंय? पडला-बिडलात काय? स्वतःकडं पाहा बरं! "

त्यानं त्याच्या कोपराला धरून त्याला आरशापुढं नेलं.

आपला रक्तानं भरलेला चेहरा पाहून मीत्या एकदम चमकला अन् रागाने त्याने कपाळाला आठ्या घातल्या.

" सत्यानाश! कंबरडं मोडणारी ही शेवटची काडी." तो रागानं पुटपुटला. त्याने आपल्या उजव्या हातातल्या नोटा चटकन् डाव्या हातात घेतल्या. अन् अभावितपणे खिशातून खसकन हातरुमाल बाहेर ओढला. पण हातरुमालसुद्धा रक्ताने भिजून गेलेला आढळला. (त्यानं ग्रिगरीचं तोंड पुसण्यासाठी वापरलेला तो हातरुमाल होता.) त्यावर पांढरी अशी जागाच राहिली नव्हती. अन् तो नुसता सुकूच लागला नव्हता तर चुरगळून जाऊन चेंडूसारखा ताठर झाला होता अन् उलगडतच नव्हता. मीत्याने तो रागाने जमिनीवर फेकून दिला.

" अं:, मरू दे तो! " तो म्हणाला, " तुमच्याकडं एखादं छोटंसं फडकं मला तोंड पुसायला... नाही का? "

" म्हणजे तुमच्यावर फक्त रक्ताचे डाग पडलेत, जखम झालेली नाही? तुम्ही तोंड धुऊनच टाका." प्योत्र इल्यिच म्हणाला. " हे इकडं धुण्याचं भांड आहे. मी तुमच्या हातावर पाणी घालतो."

" धुण्याचं भांडं! छान, छान....पण हे मी कुठं ठेवू? "

अत्यंत विचित्र वाटणाऱ्या गोंधळाच्या आविर्भावाने त्याने आपले शंभराशंभराच्या नोटांचे पुडके दाखवले. अन् प्योत्र इल्यिचकडे पृच्छा करीत असल्यासारखे पाहिले, जणू मीत्याने आपल्या पैशाचे काय करायचे हे त्याने ठरवायचे होते.

" तुमच्या खिशात, किंवा इथं टेबलावर. त्या जाणार नाहीत."

" माझ्या खिशात? हो हो, माझ्या खिशात. बरं बरं... पण, हं:, हा सारा मूर्खपणा झाला, " तो म्हणाला. जणू आपल्या गुंगीतून तो एकदम आता भानावर येत असावा. " हे पाहा, आपण प्रथम त्या पिस्तुलांचं काम मिटवून टाकू. ती मला परत द्या. हे तुमचे पैसे... कारण मला त्यांची फार गरज आहे... अन् मला आत्ता एक क्षणाची, क्षणाचीसुद्धा फुरसत नाही."

आणि त्या पुडक्यातली अगदी वरचीच नोट काढून त्यानं ती प्योत्र इल्यिचपुढे धरली.

" पण माझ्याकडं पुरेशी मोड मिळणार नाही. यापेक्षा कमीची नोट नाही का? "

"नाही," मीत्या म्हणाला, त्यानं पुन्हा आपल्या पुडक्याकडे पाहिले अन् आपल्याच शब्दांवर विश्वास नसल्याप्रमाणे त्याने अगदी वरच्या तीन–चार नोटा उलटून पाहिल्या.

"अहं, त्या सगळ्या एक सारख्याच आहेत,'? तो म्हणाला, अन् त्याने पुन्हा प्रश्नार्थक दृष्टीने प्योत्र इल्यिचकडे पाहिले.

प्योत्र इल्यिचने त्याला विचारले, "इतके श्रीमंत कसे काय झालात? थांबा, मी माझ्या नोकराला प्योत्र निकोवकडं पाठवतो– त्यांचं दुकान उशिरा बंद होतं– त्यांच्याकडं मोड मिळते का पाहू. मिशा, ए मिशा!" त्याने वाटेकडे तोंड करून हाक मारली.

"प्लोतनिकोवच्या दुकानात–उत्तम!" मीत्या ओरडला, जणू एखादी कल्पना एकदम त्याच्या डोक्यात आली असावी. "मिशा" तो त्या नोकरमुलाला आत येताना पाहून त्याच्याकडे वळून म्हणाला, "हे बघ, प्लोतनिकोवकडे धावत जा अन् त्यांना म्हणावं दमीत्रि फ्योदरोविचनं आपला नमस्कार सांगितलाय अन् आता लगेच ते तिकडं येताहेत...पण ऐक, ऐक, त्यांना म्हणावं मी येण्यापूर्वी तीन डझन शांपेनच्या बाटल्या तयार ठेवा अन् मोक्रोयला जशा नेल्या होत्या तशा चांगल्या बंदिस्त करून ठेवा. मी त्या वेळी चार डझन माझ्याबरोबर नेल्या होत्या (हे तो एकदम प्योत्र इल्यिचला उद्देशून म्हणाला). त्यांना ते सर्व काही माहीत आहे, तू तसदी घ्यायचं कारण नाही, मिशा," तो पुन्हा त्या मुलाकडे वळून म्हणाला. "थांब, ऐक; त्यांना सांग चीज, स्ट्रास्बूर्ग पाय, धूर दिलेले मासे, डुकराचं मांस, कॅविएर, अन् सगळं, सगळं जे काही त्यांच्याकडं असेल ते, शंभर रुबलांपर्यंत, किंवा पूर्वीसारखं एकशेवीस रुबलांपर्यंत, घाला म्हणावं....पण थांब : मुखशुद्धीचे पदार्थ– म्हणजे मिठाई, पेअर, कलिंगडं दोन, तीन, किंवा चार– नको नको, एकच पुरे, अन् चाकोलेट, खडीसाखर, टॉफी, फोन्डान्ट हे सर्व; म्हणजे, मी मागच्या खेपेला मोक्रोयला नेलं होतं ते सर्व, शांपेन धरून तीनशे रुबलपर्यंत...पुनः तेवढंच असू दे सगळं. अन् लक्षात ठेव मिशा, तुला मिशाच म्हणतात ना, याचं नाव मिशाच आहे ना हो?" त्याने प्योत्र इल्यिचकडं पुन्हा वळून विचारले.

"जरा थांबा," प्योत्र इल्यिचने त्याचे बोलणे ऐकत असताना न् अस्वस्थपणे त्याला न्याहाळीत असताना, मध्येच त्याला थांबवून म्हटले. "तुम्ही स्वतः जावं अन् त्याला सांगावं हे बरं. तो गोंधळ करील."

"करील, तो हे काम करीलसं मला दिसतं! अं, मिशा! अरे, या कामगिरीबद्दल मी तुझं चुंबन घेण्याच्या बेतात होतो...जर तू चूक नाही केलीस तर हे दहा रुबल तुला बक्षीस, जा, पळ, जलदी कर...शांपेन ही मुख्य बरं का, त्यांनी शांपेन घेऊन यावं, अन् ब्रँडी पण, आणि लाल न् सफेद वाईन, आणि त्या वेळी जे मी नेलं होतं ते सारं...त्यांना माहीत आहे मी काय नेलं होतं ते."

" पण ऐकून घ्या ! " प्योत्र इल्यिच काहीशा अधीरतेने त्याला थांबवून म्हणाला, " माझं म्हणणं, त्यानं फक्त पळत जाऊन मोड घेऊन यावी अन् त्यांना दुकान बंद करू नका म्हणून सांगावं, अन् तुम्ही जाऊन स्वतः त्यांना सांगावं...ती तुमची नोट त्याच्याकडं द्या. जा, मिशा ! धावत जाऊन पळत ये ! "

प्योत्र इल्यिचनं मिशाला मुद्दामच घाईने पाठवून दिले असावे, कारण तो पोरगा तोंड अन् डोळे फाडून पाहत उभा राहिला होता, त्याला मीत्याचे हुकूम कळत होते की नाही कुणास ठाऊक. त्याच्या त्या रक्तमय चेहेऱ्याकडे अन् नोटा धरलेल्या थरथरणाऱ्या रक्तमय बोटांकडे तो आश्चर्याने न् धडकी भरल्यासारखा पाहतच राहिला होता.

" ठीक, आता इकडं या अन् तोंडबींड धुवा," प्योत्र इल्यिच म्हणाला. " ते पैसे ठेवा टेबलावर किंवा तुमच्या खिशात...अस्से, या इकडं. पण तुमचा कोट काढा."

आणि त्याला कोट काढायला तो मदत करायला लागला. तोच तो ओरडला,

" हे काय, तुमचा कोटसुद्धा रक्तानं भरलाय की ! "

" ते ...कोटावर नाही. ते फक्त इथं बाहीवर थोडंसंच आहे...अन् इथंच तो हातरुमाल ठेवला होता. त्यानं ते सारं शोषून घेतलं असलं पाहिजे. फेनियाच्या तिथं मी त्या रुमालावरच बसलो होतो वाटतं, अन् ते रक्त त्यातून आलं," मीत्यानं एकदम बालकासारख्या अजाणपणानं जो खुलासा केला, तो आश्चर्यकारक होता. प्योत्र इल्यिचने ऐकून घेतले अन् कपाळाला आठ्या घातल्या.

" हं, तुम्ही काही तरी भानगडीत होता वाटतं; तुम्ही कुणाशी तरी मारामारी केलेली दिसते," तो पुटपुटला.

ते हात धुवायला लागले. प्योत्र इल्यिच भांड्याने पाणी ओतू लागला. मीत्याने, अतिशय घाईत, आपले हात साबण लावून धुतले न धुतलेसे केले (ते थरथर कापत होते, आणि प्योत्र इल्यिचला मागाहून ते आठवले). पण त्या अधिकाऱ्याने त्याला अधिक साबण लावून आणि जास्त चोळायला लावून ते धुण्याचा आग्रह केला. जसजसा वेळ गेला तसतसा तो मीत्यावर अधिकाधिक ताबा चालवू लागलासे दिसले. तो करड्या स्वभावाचा तरुण होता हे जाता जाता लक्षात घेतले जावे.

पाहा, तुमची नखं स्वच्छ नाहीत. आता तुमचं तोंड चोळा; इथं तुमच्या कपाळावर, कानापाशी... हाच सदरा घालून तुम्ही जाणार ? कुठं जाणार ? पाहा, तुमच्या उजव्या बाहीचा शेवटचा कफाचा भाग रक्तानं भरलाय."

" होय, सगळा रक्तानं भरलाय," मीत्या आपल्या सदऱ्याच्या कफाकडे पाहून म्हणाला.

" मग सदरा बदला."

" मला वेळ नाही. बघा मी..." मीत्या त्याच विश्वासक निरागसपणाने म्हणाला, त्याने आपले तोंड अन् हात टॉवेलाने पुसले, आणि अंगात कोट घातला. " मी तो मनगटावर फिरवून घेईन. कोटाखाली ते दिसणार नाही...... बघितलंत ? "

" हं आता मला सांगा, कसल्या खेळात गुंतला होता तुम्ही ? तुम्ही कुणाशी मारामारी करीत होता काय ? त्या खाणावळीत, पूर्वीसारखी ? त्या कॅप्टनला पुन्हा बडवलंत की काय ? " प्योत्र इल्यिचने ठपका देण्याच्या स्वरात विचारले, ' या वेळी कुणाला ठोकलंत... की ठार केलंत, बहुधा ? "

" काही तरीच ! " मित्या म्हणाला.

" ' काही तरीच ' का ? "

" जाऊ द्या," मीत्या म्हणाला, अन् तो एकदम हसला. " मी आताच एका म्हाताऱ्या बाईला बाजारपेठेत चेचून टाकलं."

" चेचून टाकलं ? एका म्हातारीला ? "

" एका म्हाताऱ्याला ! " मीत्या सरळ प्योत्र इल्यिचच्या तोंडाकडे पाहत, हसत अन् तो जणू बहिरट असावा अशा रीतीने मोठ्याने ओरडून म्हणाला.

" जाऊ दे खड्ड्यात ! म्हातारी काय, म्हातारा काय... तुम्ही कुणाला तरी ठार केलंत ना ? "

" आम्ही मिटवून टाकलं. आमचा काही झगडा होता– अन् तो भागवून टाकला. आम्ही दोस्त होऊन निरोप घेतला. मूर्ख कुठचा... त्यानं मला क्षमा केली... या वेळपर्यंत त्यानं मला जरूर क्षमा केली असली पाहिजे... तो जर उठला असता तर त्यानं मला क्षमा केली नसती–" मीत्यानं एकदम डोळा मारला. " काही नाही, मी म्हणतो, प्योत्र इल्यिच, नरकात जाऊ दे त्याला ! त्याची काही चिंता करू नका ! मला आता करावीशी वाटत नाही ! " मीत्याने ताडकन् बोलून त्याला उडवून लावले.

" अशी प्रत्येकाशी भांडणं कशाला काढीत असता तुम्ही... ? ते तुम्ही उगीच क्षुल्लक कारणासाठी त्या कॅप्टनशी काढलंत तसं... तुम्ही मारामारी करीत होता. अन् आता तुम्ही दारूची मजा उडवायला घाईघाईनं चाललात– असं आहे हे सारं तुमचं ! तीन डझन शांपेन बाटल्या– इतकं सारं कशाला हवं आहे तुम्हाला ? "

" शाबास ! आता माझी पिस्तुलं तेवढी द्या. शपथ सांगतो मला अगदी वेळ नाही. तुमच्याबरोबर गप्पा मारायला मला बरं वाटेल. प्यारे दोस्त, पण मला तेवढा वेळ नाही. अन् त्याची गरजही नाही. आता बोलायची वेळ पार टळून गेली आहे. कुठं आहेत माझे पैसे ? कुठं ठेवले मी ते ? " तो म्हणाला अन् आपले हात त्यानं खिशात कोंबले.

"तुम्ही ते टेबलावर ठेवलेत... स्वतःच... हे पहा ते. विसरलात? पैसा म्हणजे तुम्हाला पाण्यासारखा किंवा मातीसारखा वाटत असावासं दिसतं. ही तुमची पेस्तुलं. मोठं विचित्रच आहे, सहा वाजता तुम्ही दहा रुबलकरिता ती गहाण टाकलीत अन् आता तुमच्यापाशी हजारो आहेत. दोन–तीन हजार असावेत."

"तीन असतील, पैज मारा." मीत्त्या हसला, त्याने त्या नोटा आपल्या विजारीच्या बाजूच्या खिशात कोंबल्या.

"तशा ठेवल्यात तर त्या पडतील. तुम्हाला एखादी सोन्याची खाण सापडली आहे की काय?"

"खाणी? सोन्याच्या खाणी?" मीत्त्या बेंबीच्या देठापासून आवाज चढवून ओरडला आणि खो खो करीत मोठमोठ्याने हसत सुटला. "तुम्हाला त्या खाणीकडं जायचंय, पेऱ्होतिन? इथं एक बाई आहेत. त्या तुम्ही जायचं म्हटलंत तर तुम्हाला तीन हजार रोख देतील. तिनं तसं माझ्याकरिता केलं, इतका तिला सोन्याच्या खाणीचा विलक्षण छंद आहे. मादाम होहलाहोवाला तुम्ही ओळखता?"

"मी तिला ओळखीत नाही, पण मी तिच्याबद्दल ऐकलं आहे अन् तिला पाहिलं आहे. खरंच तिनं तुम्हाला तीन हजार दिले? खरोखर तिनं दिले?" प्योत्र इलियच त्याच्याकडे संशयाने नजर टाकीत म्हणाला.

"उद्या सूर्य उगवताच तो चिरतरुण सवितादेव ईश्वराची स्तुतिस्तोत्रं न् गौरव-गीत गात वर वर झेप घेऊ लागेल त्याच वेळी तुम्ही तिच्याकडं, या मादाम होहलाहोवाकडं जा, आणि तिनंच ते तीन हजार दिले की नाही ते तिला विचारा. प्रयत्न करा अन् शोधून काढा."

"तुमचे संबंध कसे आहेत ते मला माहीत नाही... तुम्ही ज्या अर्थी इतक्या निश्चितपणे सांगताहात, त्याअर्थी तिनं ते तुम्हाला दिले असतील असं मी समजतो. तो पैसा तुमच्या हातात आला आहे, पण सायबेरियाला जाण्याऐवजी तुम्ही तो सगळा खर्च करीत आहा... खरंच तुम्ही या वेळी कुठं निघाला आहात, अं?"

"मोक्रोयला."

"मोक्रोयला? पण आता तर रात्र आहे!"

"एकेकाळी या तरुण पोराजवळ सर्व होतं, आता त्याच्यापाशी काही नाही," मीत्त्या एकदम म्हणाला.

"'काही नाही' कसं म्हणता? इतके हजार हातात आहेत म्हणता ना!"

"मी हजारांविषयी नाही बोलत. हजार गेले मसणात! मी स्त्रीच्या स्वभावाविषयी बोलतो आहे.

नारीचं हृदय किती चंचल आहे, किती दगाबाज अन् दुराचारानं भरलेलं आहे! युलिसिसशी मी सहमत आहे. तो हेच म्हणतो."

"तुम्ही काय बोलता मला समजत नाही!"

" मी नशेत आहे काय ?"

" नशेत नाही, पण त्याहून वाईट अवस्थेत आहात."

" माझा आत्मा नशेत आहे, प्योत्र इल्यिच, माझा आत्मा नशेत आहे! पण बस्स झालं!"

" तुम्ही काय करताहात, पिस्तुलात गोळी भरताहात?"

" पिस्तुलात गोळी भरतो आहे."

पिस्तुलाची पेटी ढिली करून, मीत्याने खरोखरच दारूची नळी उघडली, आणि गोळीच्या जागेत काळजीपूर्वक दारू भरली. मग त्याने गोळी घेतली अन् ती आत सारण्यापूर्वी दोन बोटांत मेणबत्तीपुढे धरली.

" गोळीकडं असं का पाहत आहात?" प्योत्र इल्यिचने त्याला विचारले, मनात अस्वस्थ होऊन तो चौकसपणे त्याला न्याहाळीत होता.

" हं, एक गंमत. अहो, जर ती गोळी तुम्ही तुमच्या मेंदूत ठेवणार असलात तर तुम्ही तिच्याकडं पाहाल की नाही?"

" पाहायची कशाला?"

" ती माझ्या मेंदूत जाणार, तेव्हा ती आहे कशी हे पाहणं मनोरंजकच नाही का? पण हा मूर्खपणा आहे, एका क्षणाचा मूर्खपणा. हां, हे आता झालं," तो ती गोळी आत घालून अन् सळीनं आत बरोबर बसवून म्हणाला. " प्योत्र इल्यिच, माझ्या प्रिय मित्रा, हा सारा बेअकलीपणा आहे, सगळा बेअकलीपणा, आणि कसला बेअकलीपणा ते जर तुम्हाला माहीत असतं तर! मला एक कागदाचा कपटा आता द्या."

" हे इथं काही कागद आहेत."

" अंहं, मला नवा स्वच्छ कागद, लिहायचा कागद हवा. हां, ठीक."

आणि टेबलावरून टाक घेऊन मीत्याने भरभर दोन ओळी खरडल्या, त्या कागदाची चौपट घडी केली, आणि तो आपल्या बंडीच्या खिशात कोंबला. त्याने ती पिस्तुले त्यांच्या पेटीत ठेवली, तिला कुलूप घातले, अन् ती आपल्या हातात ठेवली. मग त्याने प्योत्र इल्यिचकडे मंद, विचारपूर्ण स्मित करीत पाहिले.

" चला, आता जाऊ." तो म्हणाला.

" कुठं जायचं आपण? छे, मिनिटभर थांबा... तुमचा काय ती गोळी आपल्या मेंदूत ठेवण्याचा विचार आहे?" प्योत्र इल्यिचने बेचैन होऊन विचारले.

" मी गोळीवरून गंमत करीत होतो! मला जगायचं आहे. माझं जीवनावर प्रेम आहे! त्याची तुम्ही खात्री बाळगा. मला त्या सुवर्णकेशी सवित्याबद्दल अन् त्याच्या ऊबदार प्रकाशाबद्दल प्रेम वाटतं.... प्रिय प्योत्र इल्यिच, बाजूला कसं सरावं ते तुम्हाला माहीत आहे का?"

" 'बाजूला सरावं' म्हणजे तुम्हाला काय म्हणायचंय ?"

"दुसऱ्याला वाट करून देणं. प्रिय जीवाकरिता, अन् ज्याचा मी द्वेष करतो त्याच्याकरिता, वाट करून देणं. आणि ज्याचा मी द्वेष करतो त्याचा प्रिय होऊ देणं (हा त्या 'वाट करून देण्या'चा अर्थ आहे) अन् त्यांना म्हणणं की, ईश्वर तुमचं भलं करो, तुम्ही आपल्या मार्गानं जा, चला पुढं, अन् मी..."

"अन् तुम्ही?"

"पुरे झालं, चल्रू या."

"शपथ आहे माझी तुम्हाला. मी कोणाला तरी तुम्हाला तिकडं जाताना थांबवायला सांगेन," प्योत्र इल्यिच त्याच्याकडे पाहून म्हणाला, "तुम्ही मोक्रोयला या वेळी कशासाठी जात आहा ?"

तिथं एक स्त्री आहे, स्त्री, एवढं तुम्हाला पुरं आहे. तुम्ही तोंड बंद करा."

"ऐका, तुम्ही इतके जंगली असलात तरी मला नेहमीच आवडता... मला काळजी वाटते."

"आभार, दोस्त. मी जंगली माणूस आहे, तुम्ही म्हणता, जंगली माणसं, जंगली माणसं ! हे तर मी सतत म्हणत आलो आहे. जंगली माणसं ! अरे, हा पहा मिशा आला ! त्याला मी विसरूनच गेलो होतो."

मिशा धावतच आत आला, मोड म्हणून मिळालेल्या नोटांनी त्याची मूठ भरली होती, त्यानं येऊन सांगितलं की प्लोतनिकोवच्या इथं प्रत्येकजण धामधुमीत आहे. "ते बाटल्या, मासे अन् चहा खाली नेताहेत; ते सारं लग्गेच तयार होईल." मीत्यानं दहा रुबलची एक नोट पकडली न् ती प्योत्र इल्यिचकडं दिली, अन् दुसरी दहा रुबलची नोट त्यानं मिशाकडं उडविली.

"असला काहीं प्रकार करू नका !" प्योत्र इल्यिच ओरडून म्हणाला, "माझ्या घरात मी हे चालू देणार नाही, ही वाईट, नीतिभ्रष्ट करणारी सवय आहे. तुमचे पैसे काढून घ्या, इथं, इथं ठेवा ते, उगीच का उधळून टाकता ? उद्या ते कामाला येतील, अन् मी खात्रीनं सांगतो उद्या तुम्ही माझ्याकडे पुन्हा दहा रुबल उसने मागायला याल. त्या नोटा तुम्ही तुमच्या एका बाजूच्या खिशात कोंबण्याचा का प्रयत्न करताहा ? अहो, गमावाल तुम्ही त्या !"

"माझ्या दोस्ता, माझं म्हणणं आहे आपण एकत्रच मोक्रोयला जाऊ या."

"मी कशाला यावं ?"

"माझं म्हणणं आपण आत्ताच एक बाटली फोडू या अन् जीवनाच्या नावानं पिऊ या ! मला पिण्याची इच्छा झाली आहे, अन् विशेषतः तुमच्याबरोबर. मी तुमच्याबरोबर कधीच प्यालेलो नाही, प्यालोय ?"

" बरं तर, आपण 'मेत्रापोलिस' मध्ये जाऊ. मी तिकडंच आता निघालो होतो."

" मला तेवढी सवड नाही. आपण प्लोतानिकोवच्या इथंच मागच्या खोलीत बसून पिऊ या. मी तुम्हाला एक कोडं घालू का ? "

" खुशाल घाला-"

मीत्याने आपल्या आतल्या बंडीच्या खिशातून तो कागदाचा कपटा काढला, त्याची घडी उलगडली अन् तो दाखविला. मोठ्या मोठ्या अन् सुट्या अक्षरात लिहिले होते–

" माझ्या सबंध जीवनाकरिता मी स्वतःला शिक्षा करून घेत आहे, माझ्या सबंध जीवनाला मी शिक्षा करीत आहे ! "

" मला हे कुणाला तरी सांगितलंच पाहिजे. मी हा चाललो," प्योत्र इल्यिच तो कागद वाचून म्हणाला.

" माझ्या लाडक्या मित्रा, तुम्हांला सवड मिळणार नाही, चला, पेय घेऊ या. आगेकूच ! "

प्लोतानिकोवचे दुकान रस्त्याच्या कोपऱ्याला, प्योत्र इल्यिचचे घर सोडून दुसरे होते. ते आमच्या शहरातले सर्वांत मोठे वाणसामानाचे दुकान होते, अन् चांगले बऱ्यापैकी होते, काही श्रीमंत व्यापाऱ्यांच्या मालकीचे होते. पीटर्सबर्गच्या दुकानात जे काही मिळू शके ते सर्व त्यांनी इथं ठेवले होते– सर्व प्रकारचे वाण सामान, 'एलिसेयेव बंधूच्या बाटल्या'तील दारू, फळं, सिगार, चहा, कॉफी, साखर वगैरे. तिथे तीन मदतनीस अन् दोन निरोप्ये सदोदित कामावर नेमलेले असत. जरी आमचा भाग हा पूर्वीच्या मानाने अधिक गरीब झालेला होता, जमीन मालक निघून गेलेले होते, अन् व्यापार धंदा बसला होता, तरी वाणदुकाने पूर्वीसारखीच भरभराटीत होती, दरसाल त्यांचे उत्पन्न वाढतच होते; त्यांच्या मालांना चांगलेच गिऱ्हाईक असे.

ते दुकानात मीत्याची उत्सुकतेने वाट पाहात होते. त्याने तीन–चार आठवड्यांपूर्वी दारू अन् इतर जिनसांची कित्येकशे रुबलाची जी रोखीने खरेदी केली होती (त्यांनी उधारीने कधीच त्याला माल दिला नसता, हे निश्चित) त्याची त्यांना चांगलीच आठवण होती. त्यावेळी, आताप्रमाणेच, त्याच्या हातात शंभर-शंभरच्या नोटांचं पुडके होते, अन् घासाघीस न करता, विचार न करता, किंवा इतक्या दारूचा अन् सामानाचा आपल्याला काय उपयोग हेही मनात आणण्याची पर्वा न करता तो त्या वाटेल तशा विखरून टाकीत होता हे त्यांना आठवत होते. शहरभर ज्याच्या त्याच्या तोंडी ही कथा होती की त्या वेळी ग्रूशिंकाबरोबर गाडीत बसून मोक्रोयला गेल्यावर त्याने " एका रात्रीत अन् दुसऱ्या दिवशी तीन हजार खर्च केले होते अन् तिथून मौजमजा करून तो परत आला त्यावेळी त्याच्या जवळ

एक पेनीही नव्हती, " त्याने जिप्सींची एक टोळीच्याटोळी आपल्याबरोबर नेली होती (त्यावेळी त्यांचा आमच्या शेजारच्या भागात मुक्काम होता), दोन दिवस तो दारूत धुंद असताना त्यांना त्याच्याकडून वाटेल तसा पैसा मिळाला होता, अन् बिनासंकोच उंची दारू प्यायला मिळाली होती. त्याने घाणेरड्या हातांच्या शेतकऱ्यांना शांपेन कशी दिली, अन् खेड्यातल्या बायकांना न् मुलींना मेवामिठाईची अन् स्ट्रासबुर्ग पायची मेजवानी कशी दिली ते मीत्याची चेष्टा उडवून, लोक सांगत असत. जरी मीत्याच्या तोंडावर त्याला हसणे हे जोखमीचे काम होते, तरी त्याच्या माघारी लोक त्याला खूप हसले, विशेषतः त्या खाणावळीत, त्यानेच जेव्हा भाबडेपणाने सगळ्यांदेखत सांगितले की या ' अफाट साहसा 'तून आपल्याला ग्रूशिंकाकडून " फक्त तिच्या चरणाचं चुंबन घेण्याची परवानगी मिळाली, अन् तेवढंच तिनं आपल्याला जास्तीत जास्त करू दिलं." तेव्हा लोक त्याच्यामागे त्याला खूप हसले होते.

मीत्या अन् प्योत्र इल्यिच त्या दुकानी पोचले त्या वेळी त्यांना लहान घंटा छातीवर लावलेले तीन घोडे जोडलेली गाडी आणि त्या गाडीचा गाडीवान आंद्रे दारापाशी मीत्याची वाट पाहात असलेला दिसला. दुकानात त्यांनी सामानाची एक पेटी जवळजवळ बांधून पक्की केलेली होती अन् आता फक्त मीत्याच्या येण्याची ते वाट पाहत होते; तो आला की खिळे ठोकून बंद करून ती गाडीत ठेवायची. प्योत्र इल्यिच चकितच झाला.

" इतक्या घाईत ही गाडी कुठून आली ? " त्याने मीत्याला विचारले.

" मी तुमच्याकडे पळत येत असताना मला आंद्रे भेटला होता, त्याला मी थेट इथं दुकानात गाडी घेऊन यायला सांगितलं होतं. वेळ घालवायला सवडच नाही. गेल्या खेपेला तिमोफी मला घेऊन गेला होता, पण तिमोफी यावेळी अगोदरच त्या सटवीबरोबर गेलाय. आपल्याला फार उशीर होईल का, आंद्रे ? "

" ते आपल्या अगोदर फार तर एक तास पोचतील, कदाचित तितकेही ते अगोदर पोचणार नाहीत. मी आलो तेव्हा तिमोफी निघण्याच्या तयारीत होता. तो कसा जाईल मला माहीत आहे. आमच्या वेगासारखा त्यांचा वेग असणार नाही, दमीत्रि फ्योदरोविच. तो कसा असेल ? ते एक तास काही अगोदर पोचायचे नाहीत ? " आंद्रेने उत्साहपूर्ण उत्तर दिले; तो काटकुळा, लालसर केसांचा, मध्यम वयाचा गाडीवान होता; त्याने घेरदार कोट घातला होता, आपल्या हातावर त्याने लांब सदरा टाकलेला होता.

" आपण फक्त एक तासच जर त्यांच्या मागं असलो, तर व्होडकासाठी पन्नास रुबल माझ्याकडे लागले."

" ती वेळ बरोबर संभाळीन, दमीत्रि- हेः, ते आमच्या अगोदर अर्धा ताससुद्धा पोचणार नाहीत, तास तर सोडूनच द्या."

मीत्याने जरी जिनसा पाहण्याची धामधूम केली, तरी तो पाहिजे असलेल्या वस्तूंची मागणी चमत्कारिकपणे, कशाचा कशास पत्ता नाही अशा तऱ्हेने अन् तुटक तुटक अशी करीत होता. तो एखाद्या वाक्याची सुरुवात करी अन् त्याचा शेवट विसरून जाई. प्योत्र इल्यिचला त्याच्या मदतीला धावणे आपले कर्तव्य वाटले.

" चारशे रुबलचा माल, त्यापेक्षा थोडासुद्धा कमी चालणार नाही, जसा त्यावेळी होता तसा," मीत्याने हुकूम केला. " चार डझन शांपेनच्या बाटल्या, एकही बाटली कमी नाही."

" इतक्या कशाला ? कशाकरिता हे ? थांबा ! " प्योत्र इल्यिच म्हणाला. " हीं कसली पेटी ? काय आहे तिच्यात ? त्यात खात्रीनं चारशे रुबल किंमतीचा माल नाही ? "

कर्तव्यतत्पर दुकानदार खुशामतखोर सौजन्याने समजावून सांगू लागला की या पहिल्या पेटीत शांपेनच्या फक्त अर्धाच डझन बाटल्या आहेत, अन् फक्त ' अतिशय निकडीच्या जिनसा ' उदाहरणार्थ, स्वादिष्ट वस्तू, मिठाई, टॉफी वगैरे त्यात आहेत, पण मागणी केलेल्या मालांपैकी मुख्य भाग पक्का बांधून एका खास तीन घोड्यांच्याच भरधाव जाणाऱ्या गाडीतून, मागच्या खेपेप्रमाणे पाठविण्यात येईल, म्हणजे दमीत्रि फ्योदरोविच स्वतः पोचतील त्यानंतर एका तासापेक्षा जास्त उशीर तिला पोचायला लागणार नाही.

" एका तासापेक्षा जास्त नाही हं ! एका तासापेक्षा जास्त नाही ! अन् टॉफी न् गोळ्या जास्त घाला. तिथल्या पोरींना त्या इतक्या आवडतात," मीत्याने अती उत्कटतेने पुन पुन्हा सांगितले.

" गोळ्या ठीक आहेत. पण शांपेन चार डझन कशाला ? एक डझन पुरे होईल की," प्योत्र इल्यिच जरा रागाने म्हणाला. त्याने किंमतीबद्दल घासाघीस करायला सुरुवात केली, मालाचे बिल मागितले, अन् आकारलेले पैसे त्याला योग्य वाटेनात. पण जास्तीत जास्त तो शंभर रुबल वाचवू शकला. शेवटी ठरले की फक्त तीनशे रुबल किंमतीचाच माल पाठवावा.

" जाऊ द्या, तुम्ही खड्ड्यात गेलात तरी मला काय करायचंय ? तुमचा पैसा उधळून टाका, कारण तुम्हाला त्याबद्दल काहीच मोजावं लागलेलं नाही," प्योत्र इल्यिच मागाहून विचार करून म्हणाला.

" इकडं ये माझ्या अर्थशास्त्रज्ञ मित्रा, इकडं ये, असा रागावू नकोस," मीत्याने त्याला त्या दुकानाच्या मागील बाजूच्या खोलीत नेले. " ते आपल्याला एक बाटली इथं लगेच देतील. आपण तिचा आस्वाद घेऊ. हं, प्योत्र इल्यिच, चला माझ्याबरोबर, कारण तुम्ही छान गृहस्थ आहात, अशा प्रकारची माणसं मला आवडतात."

मीत्या वेताच्या खुर्चीवर एका लहानशा टेबलापुढे बसला, त्यावर एक घाणेरडी जेवणाच्या वेळची चादर घातलेली होती. प्योत्र इल्यिच त्याच्या समोर बसला, आणि थोड्याच वेळात वेळात शांपेन आली अन् ' कालवं (शिंपल्यातली मच्छी) हवी का ' असे त्यांना विचारण्यात आले." उत्कृष्ट कालवं आहेत, साहेब, अगदी ताजा माल."

" खड्डयात गेली तुझी कालवं. मी कालवं खात नाही. अन् आम्हाला काही नको आहे," प्योत्र इल्यिच रागावल्यासारखा होऊन म्हणाला.

" कालवं खायला वेळ नाही," मीत्या म्हणाला. " अन् मला भूकही नाही. तुम्हाला माहीत आहे, दोस्त," तो एकदम भावनाभराने म्हणाला, " मला ही सारी अव्यवस्था कधीच आवडली नसती."

" कुणाला आवड आहे? शेतकऱ्यांसाठी तीन डझन शांपेन, म्हणजे, देवाशपथ, सांगतो कुणालाही राग आणणारीच गोष्ट आहे ! "

" मला ते म्हणायचं नाही. मी याहून उच्च व्यवस्थेसंबंधी बोलत आहे. माझ्या जीवनात काहीच सुव्यवस्था नाही, काहीच उच्च व्यवस्था नाही. पण... ते सारं संपलं आहे. त्यासंबंधानं दुःख करण्याची गरज नाही. त्याला फार उशीर झालाय. जाऊ दे ! माझं सारं आयुष्य म्हणजेच गोंधळ आहे, अन् गोंधळ माणसानं सावरला पाहिजे. ही कोटी झाली का ? "

" तुम्ही बरळत आहात, कोट्या नाही करीत ! "

" ' स्वर्गस्थ ईश्वराचा गौरव असो, आत्मस्थ ईश्वराचा गौरव असो... "

ही कविता एके काळी माझ्या अंतःकरणापासून यायची. ती कविता नाही, अश्रू आहेत ते... ती मी स्वतःच केली आहे... त्या कॅप्टनची दाढी ओढताना नाही मात्र..."

" एकदम त्याला कशाला मध्ये आणलंत ? "

" त्याला कशाला मध्ये आणलं ? मूर्खपणा ! सर्व गोष्टींचा अंत होतो; सर्व गोष्टी समान केल्या जातात. हेच त्याचं तात्पर्य आहे."

" बरं का, मी पिस्तुलाचाच विचार करीत राहिलो आहे."

" तोही सारा मूर्खपणाच आहे ! प्या, उगीच कल्पना करीत राहू नका. मला जीवन आवडतं. मी जीवनावर खूपच प्रेम केलं. लाज वाटावं इतकं केलं. पुरे ! प्रिय मित्रा, आपण जीवनाच्या नावानं पिऊ या. मी टोस्ट सुचवितो. मी माझ्यावरच इतका का खूष आहे ? मी बदमाष आहे, पण मी माझ्यावर संतुष्ट आहे. मी बदमाष आहे या विचारानं मला यातना होतात. पण माझ्यावर मी संतुष्ट आहे. मी सृष्टीला दुवा देतो. मी मनापासून ईश्वराला अन् त्याच्या सृष्टीला दुवा द्यायला तयार आहे. पण... मला— एका उपद्रवी कीटकाला— त्यानं सरपटत जाऊन इतरांच्या आयुष्याचं मातेरं करू नये म्हणून, मारलं पाहिजे... प्रिय भाई आपण

जीवनाच्या नावानं पिऊ या. जीवनापेक्षा अधिक मोलाचं काय असू शकेल? काहीच नाही ! जीवनाच्या अन् एका राण्यांच्याही राणीच्या नावानं हा घोट !"

" जीवनाच्या अन् तुम्हाला हवं तर, तुमच्या राणीच्या नावानं पिऊ या."

त्यांनी प्रत्येकी एक एक पेला रिता केला. मीत्या उद्दीपित अन् आनंदी अवस्थेत असला तरी तो खिन्नही होता. जणू काही अवजड, असह्य काळजीचे ओझे त्याच्या मनावर पडले होते.

" मिशा... हा तुमचा मिशा आला ! मिशा, ये इकडं. माझ्या मुला, अन् हा पेला सवितादेवाचं, त्या सुवर्णकेशीचं नाव घेऊन पिऊन टाक. त्या उद्या सकाळच्या..."

" त्याला कशाला तो देता आहा ? " प्योत्र इल्यिच चिडून ओरडला.

" होय, होय, होय. देऊ दे त्याला ! मला द्यायचा आहे ! "

" हे: ! "

मिशाने तो पेला रिता केला न् तो बाहेर पळाला.

" त्याला त्याची मागाहून आठवण होईल." मीत्या म्हणाला. " स्त्री ! माझं स्त्रीवर प्रेम आहे ! स्त्री म्हणजे काय ? भूतमात्रांची राणी ! माझं हृदय दुःखी आहे, माझं हृदय दुःखी आहे. प्योत्र इल्यिच. तुम्हाला हॅम्लेट आठवतो ? ' मला फार दुःख वाटतं, भल्या होरेशिओ ! अरेरे, गरीब बापडा योरिक ! ' कदाचित तो योरिक मीच असेन ! होय, मीच यावेळी योरिक आहे, अन् पुढं कवटी."

प्योत्र इल्यिच मुकाट्याने ऐकत राहिला. मीत्याही थोडा वेळ स्तब्ध राहिला.

" हा इथं तुमच्याकडं असलेला कुत्रा कोणता आहे ? " त्याने एक सुरेखसे कुलंगी काळ्या डोळ्यांचे कुत्रे कोपऱ्यात बसले होते त्याच्याकडे पाहून सहज दुकानदाराला विचारले.

" तो वार्वारा अलेक्झेवनांचा म्हणजे या दुकानाच्या मालकीणबाईंचा आहे," कारकुनाने उत्तर दिले. " त्याला इथं घेऊन आल्या अन् इथंचविसरल्या. त्याला परत त्यांच्याकडं नेलं पाहिजे."

" याच्या सारखाच मी एक... सैन्याच्या तुकडीत बघितला होता..." मीत्या स्वप्नात असल्याप्रमाणे पुटपुटला, " मात्र त्याची मागची तंगडी मोडली होती... बरं, प्योत्र इल्यिच, मला तुम्हाला एक विचारायचं होतं– तुम्ही कधी आपल्या आयुष्यात चोरी केली होती का ? "

" काय हा प्रश्न ! "

" अं हं, माझ्या मनात दुसरं काही नव्हतं. कुणाच्या तरी खिशातून म्हणा ना. मी सरकारचा पैसा म्हणत नाही, तो तर प्रत्येक जणच चोरतो, अन् तुम्हीसुद्धा तो निःसंशय चोरताच..."

" मसणात जा तुम्ही."

" मी विचारतोय ती इतर लोकांच्या पैशाची चोरी. सरळ खिशातून काढून घेणं म्हणा, किंवा पर्समधून काढून म्हणा, अं ? "

" मी नऊ वर्षांचा असताना माझ्या आईचे वीस कोपेक चोरले होते. मी ते टेबलावरून हळूच घेतले, अन् हातात घट्ट धरून ठेवले."

" बरं, मग काय झालं ? "

" हं:, काही नाही. ते मी तीन दिवस ठेवले, मग माझी मलाच लाज वाटली, मी चोरी कबूल केली अन् ते परत केले."

" अन् मग ? "

" अर्थात्च मला फटके बसले. पण तुम्ही का विचारता आहा ? तुम्ही काही चोरी केलीय ? "

" होय," मीत्या हळूच डोळा मारून म्हणाला.

" काय चोरलंत ? " प्योत्र इल्यिचनं कुतूहलाने विचारले.

" मी नऊ वर्षांचा असताना माझ्या आईचे वीस कोपेक चोरले आणि तीन दिवसांनंतर ते तिला परत दिले."

बोलत बोलत मीत्या एकदम उठून उभा राहिला.

" दमीत्रि आता निघणार नाही का ? " दुकानाच्या दारातून आंद्रेने हाक दिली.

" तुझी तयारी झाली ? आलोच आम्ही ! " मीत्या निघाला. " आणखी दोन शेवटचे शब्द अन्...आंद्रे, निघताना व्होडकाचा एक पेला घे, त्याला थोडी ब्रँडीही द्या ! ती पेटी (पिस्तूल असलेली) माझ्या बैठकीखाली ठेवा. नमस्ते, प्योत्र इल्यिच, माझ्या विषयी मनात वाईट काही धरू नका हं."

" पण तुम्ही उद्या परत येताहात ना ? "

" अर्थात."

" हे छोटसं बिल आपण आताच भागवून टाकता ना ? " कारकून एकदम पुढे होऊन म्हणाला.

" अरे हो, बिल भागवायचं नाही का ? अर्थातच."

त्यानं ते नोटांचे पुडके परत आपल्या खिशातून बाहेर काढले, त्यातून तीनशे रूबल उचलून कौंटरवर फेकले, अन् घाईघाईने तो दुकानाच्या बाहेर पडला. प्रत्येक-जण त्याला वाकून नमस्कार करीत अन् त्याला सुदैव चिंतीत त्याच्या पाठोपाठ बाहेर पडला. आंद्रे झटकन् उडी घेऊन गाडीच्या पुढच्या पेटीवर जाऊन बसला; नुकत्याच घेतलेल्या ब्रँडीच्या घोटामुळे त्याला ठसका लागला होता. पण मीत्या आपल्या जागेवर जाऊन बसणार इतक्यात एकदम त्याला समोर फेनिया दिसली अन् तो चकित झाला. ती धापा टाकीत पळत आली, तिने रडत रडत त्याच्यापुढे आपले हात जोडले, अन् धाडकन् त्याच्या पायावर पडली.

" दमीत्रि फ्योदरोविच, प्रिय सज्जन दमीत्रि माझ्या मालकिणीला दुखापत करू नका हो. अन् मीच त्या संबंधात तुम्हाला सारं सांगितलं, अन् त्याचा खून करू नका, तो तिचा पहिला प्रियकर होता, तो तिचा आहे! तो आता आग्राफेनाशी लग्न करणार आहे. त्याकरिताच तो सायबेरियाहून परत आलाय. दमीत्रि फ्योदरोविच, साहेब, आपल्या एका मानवबंधूची हत्या नका करू!"

" चू चू चू! हे प्रकरण आहे होय? म्हणजे तुम्ही तिकडं गडबड उडवून द्यायला निघाला आहात!" प्योत्र इल्यिच तोंडातल्या तोंडात म्हणाला. " आता सगळं स्पष्ट झालं, सूर्यप्रकाशासारखं स्पष्ट झालं. दमीत्रि फ्योदरोविच, तुम्हाला माणसासारखं वर्तन करायचं असेल तर ती तुमची पिस्तुलं एकदम माझ्याकडे देऊन टाका," तो मीत्याला ओरडून म्हणाला. " ऐकू आलं का, दमीत्रि?"

" पिस्तुलं? थोडं थांब, भाई, मी ती वाटेतल्या डबक्यात फेकून देईन," मीत्याने उत्तर दिले. " फेनिया, ऊठ, माझ्यापुढं गुडघे टेकू नकोस. मीत्या कुणाच्या केसालाही धक्का लावणार नाही, तो महामूर्ख पुनः कुणालाही दुखापत करणार नाही. पण फेनिया, एक सांगतो," तो आपल्या जागेवर बसून ओरडून म्हणाला, " मी आत्ताच तुला दुखापत केली, मला क्षमा कर, माझी कीव कर, या बदमाषाला क्षमा कर...पण तू नाही क्षमा केलीस तरी हरकत नाही. आता सारं सारखंच. हं, चलो, आंद्रे आता गाडी भरधाव सोड."

आंद्रेने घोड्यांवर चाबूक ओढला, अन् घंटा रुणझुण वाजू लागल्या.

" नमस्ते, प्योत्र इल्यिच! माझा शेवटचा अश्रू तुझ्या नावानं!..."

" हा दारूनं झिंगलेला नाही, पण एखाद्या पागलासारखा बडबडत राहिलाय," प्योत्र इल्यिच तो जात असताना त्याच्याकडं पाहत मनात म्हणाला. त्याच्या अर्धवट असे मनात आले की उरलेल्या दारूच्या बाटल्या अन् जिनसा गाडीत बरोबर व्यवस्थितपणे ठेवल्या जातात की नाही हे आपण पाहावे, ते मीत्याला फसविणार अन् दगा देणार हे त्याला माहीत होते. पण लगेच स्वतःचाच राग येऊन तो एक शिवी हासडून तिथून लगेच फिरला अन् खानावळीकडे बिलियर्ड्स खेळायला गेला.

जात असताना त्याच्या मनात आले, " हा मूर्ख आहे, पण मनाचा सज्जन आहे. मी त्या अधिकाऱ्याबद्दल, ग्रूशिंकाच्या पूर्वीच्या प्रियकराबद्दल, ऐकलंय. हं, तो जर असला...हंः, ती पिस्तुलं! मरू दे सारं. मी काही त्याला संभाळणारी दाई नाही! त्यांना हवं ते त्यांनी करावं! शिवाय, यातून काहीच निघणार नाही. हे सगळे भांडखोर लोक, दुसरं काय? ते दारू झोकणार अन् मारामारी करणार, मारामारी करून पुनः मित्र होणार, खरं काही करणारी ही माणसं नव्हेत. ' मी बाजूला होत आहे, मी स्वतःला शिक्षा करून घेत आहे ' याचा अर्थ काय बरं?

काही होणार नाही ! असा दम त्यानं हजार वेळा, खाणावळीत दारू पिऊन, भरलाय्. पण या वेळी तो नशेत नव्हता. 'आत्म्याच्या नशेत' तो म्हणाला–या खलपुरुषांना चांगले चांगले शब्द वापरायचा नाद असतो. मी काय त्याचा सांभाळ करणारा आहे ? तो मारामारी करून आला असला पाहिजे, त्याचा चेहेरा सारा रक्तानं लिडबिडला होता. पण कुणाशी ? 'मेत्रोपोलिस'मधे शोधून काढू. अन् त्याचा हातरुमाल रक्तानं चिंब झाला होता...तो तिथं माझ्या घरातच अजून पडलाय्...मरू दे !"

तो खाणावळीत पोहोचला तो मनाच्या अप्रसन्न अवस्थेत अन् एकदम एक डाव त्याने जिंकला. त्या डावाने त्याचे मन आनंदित झाले. तो दुसरा डाव खेळला, अन् एकदम आपल्या एका गड्याला सांगू लागला की दमीत्रि पुन्हा रोकड घेऊन आला होता–साधारणपणे तीन हजार रुबल असावेत, अन् पुन्हा ग्रूशिंकासह ते उडवायला मोक्रोयला गेलाय्...या बातमीने त्याच्या श्रोत्यांनी कान टवकारले. ते सगळे त्यासंबंधाने बोलू लागले, पण चेष्टेने हसून नव्हे तर एक प्रकारच्या विलक्षण गांभीर्याने त्यांनी डाव टाकूनच दिला.

"तीन हजार ? पण हे तीन हजार त्याला मिळाले तरी कोठून ?"

प्रश्न विचारले गेले. मादाम होहलाहोवाच्या नजराण्यासंबंधीची कहाणी कोणीच मनावर घेतली नाही.

"त्यानं आपल्या म्हाताऱ्या बापाला तर लुबाडले नसेल, प्रश्न हा आहे !"

"तीन हजार ! काही चमत्कारिक असं वाटतंय यात."

"त्यानं मोठ्यानं फुशारकी मारली होती की, मी बापाला ठार मारीन; ते आपण इथंच ऐकलंय. अन् तो तीन हजारांबद्दलच बोलत होता..."

प्योत्र इल्यिच ऐकत होता. एकदम त्याची उत्तरे तुटक अन् रूक्ष येऊ लागली. त्याने मीत्याच्या चेहेऱ्यावरच्या अन् हातावरच्या रक्ताबद्दल चकार शब्दही काढला नाही, अर्थात त्याबद्दल सांगावे असे पहिल्याप्रथम त्याच्या मनात होते.

त्यांनी तिसरा डाव सुरू केला, अन् हळूहळू मीत्याविषयीच्या गप्पा बंद पडत गेल्या. पण तिसरा डाव संपायला आला, तेव्हा प्योत्र इल्यिचची बिलियर्ड्स खेळण्याची इच्छा उडाली; त्याने खेळण्याची काठी खाली ठेवली, अन् पूर्वी योजले होते त्याप्रमाणे जेवण न घेताच तो त्या खाणावळीतून बाहेर पडला. बाजारपेठेत पोचला तेव्हा स्वतःच स्वतःविषयी आश्चर्य करीत तो तिथे गोंधळलेल्या मनःस्थितीत उभा राहिला. त्याच्या लक्षात आले की, आपल्या मनात फ्योदर पावलोविचच्या इथं जाऊन तिथे काही घडलंय की काय हे शोधायचे आहे. "काही तरी मूर्खपणाची अर्थशून्य गोष्ट मनात धरून– अन् तसंच तिथं आढळून येणार– मी काय साऱ्या घरादाराला जागं करू अन् अफवेला वाव करून देऊ ? फूः, मरू दे ते, त्यांची काळजी घेणं हे काय माझं काम आहे ?"

अतिशय वाईट मनःस्थितीत तो सरळ घरी निघाला, अन् एकदम त्याला फेनियाची आठवण झाली. "हातिच्या! मी तिला तिथंच विचारायला हवं होतं," त्याच्या मनात आले, अन् तो त्रस्त झाला, "मला सर्व काही ऐकायला मिळालं असतं." आणि तिला भेटण्याची अन् समजून घेण्याची इच्छा इतकी जबरदस्त अन् निकडीची झाली की, घराकडच्या वाटेवर अर्धा आला असताना एकदम तो वळला अन् ग्रूशिंका जिथे राहात होती त्या घराकडे गेला. दरवाज्यापाशी जाऊन त्याने ठोठावले. रात्रीच्या त्या शांत वातावरणात त्या ठोठावण्याच्या आवाजाने त्याला भानावर आणले अन् त्याला कसेसेच वाटले. कोणी उत्तर दिले नाही; घरात सगळे झोपी गेले होते.

"यामुळं मी उगाच गडबड गोंधळ उडविल्यासारखे होईल," अस्वस्थपणाची अगदी स्पष्ट जाणीव होऊन त्याने मनाशी विचार केला. पण तिथून पूर्णपणे काढता पाय घेण्याऐवजी तो पुन्हा आपल्या शक्तीनिशी दारावर ठोठावू लागला, त्यामुळे रस्त्यावर आवाज निनादू लागला.

"कोणी येत नाही? ठीक आहे, त्यांना ठोसेच लगावतो की," तो प्रत्येक धक्क्याला पुटपुटत होता अन् स्वतःशीच क्षुब्ध होत होता, पण त्या बरोबरच त्याने दारावरचे आपले ठोके दुप्पट जोराने सुरूच ठेवले.

६

"मी पण येत आहे!"

इकडे दमीत्रि फ्योदरोविच वाटेने भरधाव चालला होता. मोक्रोय अदमासे पंधरा मैलांहून थोडे जास्त होते, पण आंद्रेचे तीन घोडे अशा वेगाने दौडत होते की, एवढे अंतर सव्वा तासाच्या आत तोडणे शक्य होते. गाडीच्या वेगाने मीत्याच्या अंगात नवजीवन आले. हवा कशी ताजी अन् थंड होती, आकाशात मोठे तारे चमचमत होते, ज्या वेळी आल्योशा तिकडे भूमीवर पालथा पडून परमानंदाने तिच्यावर सदासर्वकाळ प्रेम करण्याची शपथ घेत होता. ती रात्र अन् ती घटकाही बहुधा तीच होती.

मीत्याच्या मनात सारा गोंधळच गोंधळ माजला होता, अनेक गोष्टी त्याच्या अंतःकरणाला टोचीत होत्या, तरी त्या वेळी त्याचे सारे अंतःकरण तिच्यासाठी, त्याच्या राणीसाठी, तळमळत होते, अन् तिला शेवटचे पाहण्यासाठी तो धावत चालला होता. एक गोष्ट मात्र मी खात्रीपूर्वक सांगू शकतो; त्याचे हृदय क्षणभरसुद्धा विचलित झाले नव्हते. या मत्सरी प्रेमिकाला, त्याचा हा जो नवा प्रतिस्पर्धी कुठून पाताळातून एकदम वर आल्यासारखा प्रकट झाला होता त्याच्याविषयी यत्‌किंचितसुद्धा मत्सर वाटत नव्हता. असं जर मी म्हटलं तर कदाचित् कोणी

त्याच्यावर विश्वास ठेवणार नाही. जर कोणी दुसरा असा पुढे आला असता, तर त्याला एकदम त्याचा मत्सर वाटला असता, अन् त्याच्या रक्ताने त्याने आपले हात कदाचित् भरले असते. पण तो त्या रात्री वेगाने चालला असता, त्याच्या अंतःकरणात तो तिचा पहिला प्रियकर होता त्याच्याविषयी, कसलाही हेवादावा नव्हता, विरोधीभावसुद्धा नव्हता...हे खरे की त्याने त्याला अजून पाहिले नव्हते.

"इथं वादाला जागाच नव्हती; तो तिचा न् त्याचा हक्कच होता; तिचं हे पहिले प्रेम होतं आणि पाच वर्षांनंतरसुद्धा ती ते विसरली नव्हती; म्हणजे तिनं पाच वर्षं फक्त त्याच्यावर प्रेम केलं होतं, अन् मी, मी यात येतो कुठं ? मला काय अधिकार आहे ? मीत्या, बाजूला हो अन् वाट सोड ! आता मी कोण ? तो अधिकारी असो नसो जरी तो आला नसता तरीसुद्धा सर्व काही संपणार आहे, सर्व काही संपणार आहे...."

या शब्दांनी स्थूलपणे त्याची भावना प्रकट झाली असती, अर्थात् त्याला युक्तिवाद करण्याची शक्ती असती तर. पण त्या वेळी त्याला युक्तिवाद करण्याची शक्तीच नव्हती. तो अवेळी कृती करायला निघाला होता, तो कसलाही तर-तम विचार न करता. फेनियाच्या पहिल्या शब्दासरशी एकदम हा बेत भावनेतून त्याला स्फुरला होता आणि त्याचे परिणाम काय होतील ते होवोत असे म्हणून झटकन त्यानं तो हाती घेतला होता. जरी त्याचा निर्धार झाला होता तरीसुद्धा त्याच्या अंतःकरणात गोंधळ, दुःखद गोंधळ माजला होता; त्याच्या निर्धाराने त्याला शांती मिळाली नव्हती. त्याच्यामागे त्याला यातना देणारे आणखी बरेच होते. आणि त्यानंच कागद न् लेखणी घेऊन "मी स्वतःला शिक्षा करून घेत आहे" अशी स्वतःला दिलेली शिक्षा लिहिली होती. त्याचा विचार मनात येऊन मधून मधून त्याला विचित्र वाटत होते. तो कागद त्याच्या खिशातच पडलेला होता; पिस्तुल भरलेले होते। दुसऱ्या दिवशी सकाळी आपण 'सुवर्णकेशी सविता देवाच्या' पहिल्या उष्ण किरणाची कशी भेट घ्यायची ते त्याने अगोदरच ठरवून टाकले होते.

आणि तरी तो भूतकाळातून, जे काही त्याने मागे ठेवले त्यातून, मुक्त होऊ शकत नव्हता आणि त्याच्या त्याला यातना होत होत्या. त्याची त्याला दुःखद जाणीव होत होती, आणि तो विचार निराशेने त्याच्या अंतःकरणात खोल खोल जात होता. एक क्षण असा आला की आंद्रेला थांबवावे, गाडीतून खाली उडी मारावी, भरलेले पिस्तूल बाहेर ओढून काढावे, अन् पहाट होण्याची वाट न पाहताच आपला अंत करून टाकावा, असा आततायी विचार त्याच्या मनात आला. पण तो क्षण ठिणगीसारखा निघून गेला. घोडे 'अंतर गिळून' दौडत होते, आणि जसा तो आपल्या ठरलेल्या स्थळाच्या जवळ चालला, तसा पुन्हा तिच्या, अन् केवळ तिच्याच, विचाराने त्याच्या अंतःकरणाचा वाढत्या प्रमाणात पुरता ताबा घेतला अन् जी भयंकर भुते पिंगा घालीत होती त्यांचा पाठलाग करून त्यांना हाकलले.

अहाहा, तिच्याकडे एक क्षण का होईना, दुरून का होईना, पाहण्यासाठी तो किती आसुसला होता !

त्याच्या मनात आले, "ती आता 'त्याच्या' जवळ असेल, ती त्याच्याजवळ, तिच्या पहिल्या प्रियकराजवळ कशी दिसते हे मला पाहायचे आहे, तेवढीच माझी इच्छा आहे." त्याच्या जीवनावर एवढा अर्थपूर्ण प्रभाव माजविणाऱ्या त्या स्त्रीविषयी त्याच्या हृदयात यापूर्वी एवढे प्रेम, इतकी नवीन अन् अननुभूत भावना कधीच उद्‌भवली नव्हती. ती त्याची त्यालाच आश्चर्यकारक वाटत होती. सहज भक्तीत अन् तिच्यापुढं आत्मविलोपनात रूपांतर व्हावे, अशी ती भावना होती ! "मी माझं अस्तित्व पुसून टाकीन !" वाताच्या उन्मादात यावे तसा तो आवेशाने बोलला.

ते जवळ जवळ एक तासभर दौडत होते. मीत्या स्तब्ध होता, आणि आंद्रे हा एरवी बडबड करणारा शेतकरी होता तरी त्यानेसुद्धा तोंडातून एक शब्दही काढला नाही. तो बोलायला जणू भीत असावा. तो फक्त आपल्या तीन काटकुळ्या, पण पाणीदार पिंगट रंगाच्या घोड्यांना काडकन् चाबूक मारीत होता. मीत्या अचानकपणे भयंकर चिंतेच्या स्वरात ओरडला,

"आंद्रे ! ते जर झोपले असले तर ?"

एखादा आघात व्हावा तसा हा विचार त्याच्यावर कोसळला. तो पूर्वी त्याच्या मनात आला नव्हता.

"ते आता झोपी गेलेले असणार असा संभव आहे, दमीत्रि."

मीत्याने जणू वेदनेने कपाळाला आठ्या घातल्या. खरंच...आपण तिकडं गर्दीनं धावत आहोत....अशा भावनाकुलतेनं...अन् ते तिकडं झोपी गेलेले आहेत ...तीसुद्धा कदाचित् झोपी गेलेली असणार...एक क्रोधाची भावना त्याच्या चित्तात उसळली.

"हाण, हाण, आंद्रे ! हाकल त्यांना जलद ! जलदी कर !" स्वतःचा ताबा गमावून तो ओरडला.

"पण कदाचित् अजून ते झोपी गेलेही नसतील !" आंद्रे थोडा वेळ थांबून म्हणाला, "तिमोफी म्हणत होता की पुष्कळ मंडळी तिथं जमलेली आहेत म्हणून..."

"गाड्या थांबतात त्या अड्ड्यावर ?"

"अड्ड्यावर नव्हे, पण प्लास्तुनोवच्या इथं, म्हणजे त्या खाणावळीत जिथं घोडीसुद्धा भाड्यानं देतात तिथं."

"माहीत आहे मला. तेव्हा तिथं पुष्कळ जण जमले आहेत म्हणतोस ? ते कसं काय ! कोण आहेत ते !" या अनपेक्षित बातमीने चकित होऊन मीत्याने विचारलं.

" हं, तिमोफी म्हणत होता की ते सगळे सभ्य लोक आहेत. दोन आपल्या शहरातले– ते कोण मला नाही सांगता येणार–अन् दोन आणखी आहेत, परके आहेत, त्याखेरीज कदाचित् आणखीही असतील. मी जास्त बारकाईनं चौकशी केली नाही. ते पत्ते खेळायला बसले आहेत असं तिमोफी म्हणत होता."

" पत्ते ? "

" हं, म्हणून जर पत्ते खेळत असले तर झोपी गेले नसतील कदाचित्. आता अकरापेक्षा जास्त वेळ झाला नसला पाहिजे."

" जलद, आंद्रे ! याहून जलद ! " मीत्या अस्वस्थ होऊन पुनः ओरडला.

" साहेब आपल्याला एक विचारू का ? " आंद्रे थोडे थांबून म्हणाला. " आपल्याला कदाचित राग येईल अशी भीती वाटते, साहेब."

" काय ? "

" नाही, फेनिया नुकतीच तुमच्या पायावर पडली अन् तिनं आपल्या मालकिणीला, अन् दुसऱ्याही कुणाला तरी दुखापत करू नका अशी तुमची विनवणी केली... तेव्हा, साहेब, म्हणजे काय आहे की .. मीं तुम्हाला तिकडं घेऊन चाललोय... माफ करा साहेब, पण माझी मनोदेवता... त्याबद्दल मी बोलणं कदाचित् बुद्दूपणाचं असेल..."

मीत्याने त्याच्या खांद्यांना मागूनच धरले.

" तू गाडीवान आहेस ? " त्याने माथेफिरूपणाने विचारले.

" होय, साहेब..."

" तर मग तुला माहीत आहे की माणसाला वाट करून द्यावी लागते. जो गाडीवान कुणालाही वाट न देता गाडी दामटीत नेऊन लोकांना चिरडून टाकतो अशा गाडीवानाला तू काय म्हणशील ? अं हं, गाडीवानानं लोकांना गाडीखाली चिरडता कामा नये. कोणी दुसऱ्या माणसाला पालथं पाडून जाणं योग्य नाही. कुणालाही इतरांच्या जीवनाचं मातेरं करण्याचा अधिकार नाही. आणि जर कुणी तसं मातेरं केलं असेल तर – त्यानं स्वतःला शिक्षा केली पाहिजे.... जर कुणी मातेरं केलं असेल, जर कुणी दुसऱ्याचं आयुष्य बरबाद केलं असेल– तर त्यानं स्वतःला शिक्षा करून घेऊन निघून गेलं पाहिजे."

हे शब्द मीत्याच्या तोंडून जवळजवळ भारलेल्या अवस्थेत बाहेर पडले. आंद्रे त्याच्या बोलण्याने चकित झाला, तरी त्याने बोलणे सुरू ठेवले.

" हे बरोबर, दमीत्रि, तुमचं म्हणणं अगदी बरोबर, कुणीही दुसऱ्या माणसाला म्हणा, किंवा कोणाही प्राण्याला म्हणा, चिरडता कामा नये किंवा यातना देता कामा नये, कारण प्रत्येक प्राणिमात्र ईश्वरानं निर्माण केला आहे. घोडाच उदाहरणादाखल घ्या, कारण काही माणसं, आमच्यातलेच गाडीवानसुद्धा, कसे घोडे तसे हाकतात. काही झालं तरी ते थांबणार नाहीत, ते दामटीत जाणार."

"नरकाकडं ?" मीत्या मध्येच म्हणाला, अन् एकदम नेहमीप्रमाणे झटक्याने हसला. "आंद्रे, साध्याभोळ्या माणसा," पुन्हा त्याच्या खांद्यांना पकडून तो म्हणाला, "मला सांग, दमीत्रि फ्योदरोविच् कारमाझफ नरकात जाईल की नाही, तुला काय वाटतं ?"

"मला माहीत नाही, ते तुमच्यावर अवलंबून आहे, कारण तुम्ही.... बरं का, साहेब, जेव्हा ईश्वराचा पुत्र क्रूसावर खिळ्यांनी ठोकला गेला अन् मेला, तेव्हा क्रूसावरनं सरळ खाली नरकात गेला, अन् त्यानं तिथं वेदना भोगत असलेल्या सर्व पाप्यांना मुक्त केलं. आणि सैतान हायहाय करायला लागला, कारण त्याला वाटलं आपल्याकडं आता नरकात पापी येणार नाहीत. आणि ईश्वर त्यावेळी त्याला म्हणाला, "दुःख करू नकोस, कारण पृथ्वीवरचे सारे प्रतापी लोक, राज्यकर्ते, मुख्य न्यायाधीश, अन् धनवान् लोक तुला मिळतील, आणि आतापर्यंत जसा तुझा नरक भरलेला होता तसा तो सर्व युगं भरलेला राहील, मी पुन्हा येईपर्यंत ! हे त्याचे स्वतःचे शब्द होते...."

"शेतकऱ्याची दंतकथा ! उत्कृष्ट ! त्या डावीकडच्याला हाण, आंद्रे !"

"तेव्हा, साहेब, नरक कुणाकरिता आहे पाहिलंत," आंद्रे डावीकडच्या घोड्याला चाबूक हाणून म्हणाला, "पण तुम्ही लहान मुलासारखे आहात.... आम्हाला तुम्ही असेच दिसता... अन् तुम्ही जरी तापट असलात, साहेब, तरी ईश्वर तुम्हाला तुमच्या दयाळू अंतःकरणामुळं क्षमा करील."

"अन् तू, तू मला क्षमा करतोस, आंद्रे ?"

"मी कशाबद्दल तुम्हाला क्षमा करू, साहेब ? तुम्ही माझं कधीच कसलं नुकसान केलं नाहीये."

"नव्हे, प्रत्येकाकरिता, प्रत्येकाकरिता, तू इथं एकटा या रस्त्यावर आहेस, तू मला प्रत्येकाकरिता क्षमा करशील ? बोल, साध्या सरळ शेतकरी मनाच्या माणसा !"

"बापरे, साहेब ! तुम्हाला गाडीतून न्यायची मला भीती वाटते, तुमचं बोलणं इतकं विचित्र आहे."

पण मीत्याला ते ऐकू गेले नाही. तो भावनावेगाने स्वतःशीच प्रार्थना करीत अन् पुटपुटत होता.

"देवा, माझा बेबंदपणा कितीही असला तरी मला पदरी घे, आणि माझा धिक्कार करू नकोस. तुझ्या न्यायनिवाड्याप्रमाणं मला चालू दे....माझा धिक्कार करू नकोस, कारण मीच माझा धिक्कार केला आहे, माझा धिक्कार करू नकोस, कारण, हे देवा, माझं तुझ्यावर प्रेम आहे. मी पापी चांडाळ आहे, पण माझं तुझ्यावर प्रेम आहे. तू जर मला नरकात पाठवलंस, तर तिथंही मी तुझ्यावर प्रेम करीन आणि तिथूनही माझं तुझ्यावर सदासर्वकाळ प्रेम आहे असं ओरडत राहीन....पण मला

शेवटपर्यंत आता इथंच फक्त पाचच तास...तुझ्या दिवसाचे पहिले प्रकाशकिरण येईपर्यंत...मला प्रेम करू दे...कारण माझ्या हृदयाच्या राणीवर माझं प्रेम आहे. माझं तुझ्यावर प्रेम आहे अन् प्रेम केल्यावाचून माझ्यानं राहवत नाही. तुला माझं सगळं हृदय दिसतं...मी दौडत जाईन, मी तिच्या पायांवर पडेन अन् म्हणेन, 'तू निघून गेलीस अन् मला सोडलंस ते बरोबरच केलंस. शेवटचा नमस्कार, तुला जो बळी गेला त्याला विसरून जा...त्याच्याबद्दल कधी खंत वाटून घेऊ नकोस!'"

"मोक्रोय!" आंद्रे आपल्या चाबकाच्या टोकाने पुढं दाखवीत ओरडला.

रात्रीच्या फिकट अंधारातून इमारतींचा एक भरीव काळ्या रंगाचा पुंज त्या विस्तीर्ण मैदानात, जणू फेकून दिलेला असावा असा, अंधुकसा दिसत होता. मोक्रोयच्या या खेड्यात दोनएक हजार माणसे राहात होती, पण या वेळी ती सर्व झोपी गेलेली होती, आणि फक्त कुठे कुठे तरी थोडा प्रकाश चमकत असलेला दिसत होता.

"हाकल, आंद्रे मी आलो!" मीत्या अतिशय अस्वस्थ होऊन ओरडला.

"ते झोपलेले नाहीत," आंद्रे आपला चाबूक प्लास्तुनोवच्या खाणावळीकडे दाखवीत पुन्हा बोलला, ती खेड्याच्या तोंडालाच होती. रस्त्याच्या बाजूच्या सर्व सहा खिडक्यांवर झगझगीत प्रकाश पडलेला होता.

"ते झोपलेले नाहीत," मीत्या आनंदभराने पुन्हा म्हणाला. "जलद, आंद्रे! दौडव! वेगानं हाण गाडी! घंटा वाजत राहू देत! मी आलोय हे सर्वांना कळू दे. मी आलोय! मीसुद्धा आलोय!"

आंद्रेने त्या थकून गेलेल्या घोड्यांना चाबकाचे तडाखे देऊन दौडायला लावले, ते वेगाने आत घुसले अन् त्याने त्या वाफा निघत असलेल्या, थापा टाकणाऱ्या घोड्यांना उंच पायऱ्यांपाशी एकदम आवरून धरले.

खाणावळवाला झोपायला निघाला होता तो कोण आलंय हे पाहाण्याच्या कुतूहलाने वरून डोकावून पाहात असताना मीत्याने गाडीतून खाली उडी मारली.

त्रिफोन बोरिस्सोविच, तुम्हीच आहात का?"

खाणावळवाला खाली वाकला, त्याने बारीक डोळे करून बघितले, पायऱ्या उतरून तो खाली धावत आला आणि खुशामतखोर आनंदाने आलेल्या पाहुण्याकडे वेगाने गेला.

"दमीत्रि फ्योदरोविच, आपण साहेब! मी पुन्हा आपल्यालाच पाहत आहे काय!"

त्रिफोन बोरिस्सोविच हा जाडजूड, धडधाकट प्रकृतीचा, मध्यम उंचीचा शेतकरी होता, त्याचा चेहरा गुबगुबीतसा होता. मुद्रा उग्र अन् हट्टी दिसत होती, विशेषतः ती मोक्रोयच्या शेतकऱ्यांच्या बाबतीत असावी, पण जेव्हा हांजीहांजीची मुद्रा आपल्या पथ्यावर पडणारी आहे असे त्याला मनातून वाटे त्याबरोबर

तोंडावर अत्यंत हांजीखोरपणा आणण्याचे सामर्थ्यही त्याच्यात होते. त्याचा पोषाख रशियन पद्धतीचा होता. त्याने सदरा घातला होता त्याला एका बाजूला खालपर्यंत बटने होती, अन् त्याने पूर्ण घोळाचा कोट घातला होता. त्याने बरीच माया केलेली होती. पण सतत आपली स्थिती सुधारण्याची त्याला स्वप्ने पडत. अर्ध्याहून अधिक शेतकरी त्याच्या पकडीत होते. जवळपासचा प्रत्येकजण त्याचा देणेकरी होता. शेजारच्या जमीन मालकाकडून त्याने जमिनी खरेदी करून त्या खंडाने लावल्या होत्या, आणि त्यावर शेतकरी कष्ट करीत अन् त्याचे कर्ज फेडत, पण त्यातून ते कधीच मोकळे होत नसत. त्याला बायको नव्हती, चार मोठ्या वयाच्या मुली होत्या. त्यांतली एक पूर्वीच विधवा झालेली होती अन् ती आपल्या दोन मुलांसह, म्हणजे त्याच्या नातवांसह त्याच खाणावळीत राहात असे, आणि त्याच्याकडे एखाद्या मोलकरणीसारखी काम करीत असे. त्याच्या दुसऱ्या एका मुलीचे एका हलक्या दर्जाच्या अधिकाऱ्याशी लग्न झाले होते, आणि त्या खाणावळीच्या एका खोलीत भिंतीवर, कुटुंबाच्या इतर अनेक फोटोंमध्ये या अधिकाऱ्याचा गणवेषात अन् हुद्द्याच्या चिन्हात काढलेला एक लहानसा फोटो दृष्टीला पडे. धाकट्या दोन मुली, चर्चचा सणाचा दिवस असला, किंवा कुणाला भेटायला जायचे असले म्हणजे डौलदार निळ्या किंवा हिरव्या रंगाचा, मागच्या बाजूला तंग बसणारा अन् मागे वारभर लांब घोळ असलेला पोषाख घालीत. पण दुसऱ्या दिवशी त्या नेहमीप्रमाणे पहाटे उठत, झाडूने खोली झाडून स्वच्छ करीत, घाण पाण्याची भांडी ओतून टाकीत, आणि भाडेकरूंचे झाले म्हणजे स्वतः स्वच्छ होत.

त्रिफोन बोरिस्सोविचने हजारो रुबल जरी साठविले असले तरी त्याला दारूने झिंगलेल्या गिऱ्हाइकांचे खिसे रिते करण्याची फार आवड होती, अन् नुकते महिन्यापूर्वीच ग्रूशिंकाला घेऊन पळून आला असताना आपण त्याच्याकडून दोनशे काय तीनशे रुबल, चोवीस तासांत काढले याची आठवण होऊन, तो आता त्याचे अगत्याने स्वागत करीत पुढे गेला; मीत्या पायऱ्यांपाशी गाडी घेऊन आला म्हणताच त्याला आपल्या भक्ष्याचा वास आला.

"दमीत्रि फ्योदरोविच, प्रिय महाशय, आम्ही पुन्हा एकदा आपल्याला पाहात आहो!"

"थांबा, त्रिफोन बोरिस्सोविच," मीत्या म्हणाला, "पहिली अन् महत्त्वाची गोष्ट, ती कुठं आहे?"

"आग्राफेना अलेक्झांद्रोवना?" खाणावळवाल्याला मीत्याचा चेहेरा पाहाताच चटकन् लक्षात आले. "तीसुद्धा इथंच आहे..."

"कोणाबरोबर? कोणाबरोबर?"

"कोणी परकी लोक आहेत. एक अधिकारी गृहस्थ आहे, त्याच्या बोलण्यावरून तो पोल असावा. त्यानंच इकडून तिच्याकरिता घोडे पाठविले; अन्

त्याच्याबरोबर दुसरा एक आहे. त्याचा मित्र किंवा प्रवासी सोबती असावा, काही सांगता येत नाही. त्यांचा पोषाख साध्या नागरिकांच्यासारखाच आहे."

"ठीक, त्यांची मेजवानी चालली आहे? त्यांच्याकडं पैसे आहेत?"

"कसली मेजवानी म्हणायची! काही फुशारकीनं सांगण्यासारखी नाही, दमीत्रि."

"फुशारकीनं सांगण्यासारखी नाही? अन् ते दुसरे कोण आहेत?"

"ते दोघे शहराहून आलेले सद्‌गृहस्थ आहेत... ते चेर्नीहून परत आले आहेत, अन् इथं त्यांचा मुक्काम आहे. एकजण अगदी तरुण मनुष्य आहे, मिऊझोवचा कोणी आप्त असला पाहिजे, पण त्याचं नाव मी विसरलो. अन् मला वाटतं दुसऱ्याला तुम्ही ओळखालसुद्धा, मॅक्झिमफ? नाव आहे त्याचं. तो शहरातल्या मठाच्या यात्रेला गेला होता म्हणे, असं तो सांगतो. तो मिऊझोवच्या या तरुण आप्ताबरोबर प्रवास करतो आहे."

"एवढेच सगळे मिळून?"

"होय."

"थांबा, ऐकून घ्या, त्रिफोन बोरिस्सोविच, मला मुख्य गोष्ट सांगा : तिच्याबद्दल काय? ती कशी आहे?"

"हं:, ती आता नुकतीच आलीय. ती त्यांच्याबरोबर बसली आहे."

"ती आनंदात आहे? हसत खेळत आहे?"

"अहं, मला वाटतं ती फारशी हसत नाही. ती खिन्न बनून बसली आहे. त्या तरुण सद्‌गृहस्थाचे केस विंचरते आहे."

"त्या पोलचे-त्या अधिकाऱ्याचे?"

"तो तरुण नाही अन् तो अधिकारीही नाही, साहेब त्या तरुण सद्‌गृहस्थाचे म्हणजे मि. मिउझोवच्या आप्ताचे...त्याचं नाव मी विसरलो."

"काल्गानफ?"

"हा, बरोबर, काल्गानफ!"

"बरं, ते मी स्वतःच पाहून घेईन. ते पत्ते खेळत आहेत का?"

"ते खेळत होते, पण त्यांनी तो खेळ सोडून दिला. ते चहा पीत आहेत, हुद्देदार सद्‌गृहस्थानं मद्य मागविले आहे."

"थांबा, त्रिफोन बोरिस्सोविच, भल्या गृहस्था थांब. मी स्वतःच पाहून घेईन. आता आणखी एका प्रश्नाचं उत्तर द्या. जिप्सी इथं आहेत का?"

"या वेळी तुम्हाला जिप्सी मिळणं शक्य नाही, दमीत्रि फ्योदरोविच. अधिकाऱ्यांनी त्यांना इथून पिटाळून लावलंय. पण इथं ज्यू आहेत ते गावात झांजा न् फिडल वाजवतात, तेव्हा त्यांना बोलावून आणता येईल. ते येतील."

"मग त्यांना बोलवणं पाठवा. जरूर त्यांना बोलावणं पाठवा!" मीत्या म्हणाला. "अन् मागच्या वेळी जशा तुम्ही मुली गोळा केल्या होत्या तशा आताही करू शकाल? विशेषतः मार्या स्तेपानिदासुद्धा अन् अरीना. वृंदसंगीतासाठी दोनशे रुबल!"

"ओहो, एवढ्या रकमेत मी साऱ्या गावाला गोळा करू शकेन, अर्थात् या वेळी ती झोपलेली आहेत. एवढ्या कृपेला आमच्या इथले हे खेडूत काय किंवा मुली काय लायकआहेत? असल्या ओबड धोबड अन् अडाणी कार्यक्रमावर एवढी रक्कम खर्च करणं म्हणजे काय झालं! खेडूताला सिगार ओढायला देण्यात काय, लाभ वास मारणारा दांडगट तो! अन् पोरी साऱ्या उवांनी भरलेल्या. शिवाय मी माझ्या मुलींना एवढी रक्कम तर राहूच द्या, काही न घेता उठवतो की. त्या नुकत्याच तर झोपायला गेल्या आहेत, एक लाथ दिली की त्या गायला लागतील तुमच्यापुढं. त्या दिवशी तुम्ही शेतकऱ्यांना शांपेन पाजली होती नाही?"

मीत्याच्या कणवेबद्दल एवढं ढोंग त्यानं केलं तरी मागच्या खेपेला त्यानं अर्धा एक डझन शांपेनच्या बाटल्या दडवून ठेवल्या होत्या, अन् टेबलाखाली पडलेली शंभर रुबलांची नोट उचलून घेतली होती अन् ती त्याच्या पकडीतच राहिली होती.

"त्रिफोन बोरिस्सोविच, गेल्या वेळी मी एक हजाराहून जास्त हवेत उडवले होते, आठवतं तुम्हाला?"

"हो हो, तुम्ही उडवले होते खरे. मला ती आठवण असणारच. तुमच्यापाशी नंतर तीन हजारच राहिले असतील."

"ठीक, तेच पुन्हा करायला मी आलो आहे, पाहिलंत?"

आणि त्याने आपले नोटांचे पुडके बाहेर काढले अन् त्या खाणावळवाल्याच्या नाकापुढे धरले.

"आता, ऐकून घ्या अन् लक्षात ठेवा. एका तासाच्या आत मद्य येईल, मेवा मिठाई, पाय हे सर्व येईल– सर्वांना एकदम बोलावून आणा. ती आंद्रेकडं असलेली पेटी, तीही वर आणायला लावा. ती उघडा, अन् लगेच शांपेन द्या. अन् त्या पोरी आम्हांला पाहिजेच, विशेष म्हणजे मार्या."

तो गाडीकडे वळला अन् पिस्तुलांची पेटी त्याने पुढं ओढली.

"हे बघ, आंद्रे, आपण तुझं देणं मिटवून टाकू. गाडी हाकण्याबद्दल हे पंधरा रुबल, अन् पन्नास व्होडकासाठी... तू लगेच तयार झालास म्हणून, तुझ्या प्रेमाबद्दल...कारमाझफची आठवण ठेव!"

आंद्रे अडखळत म्हणाला, "अं, साहेब, माफ करा, पण आणखी पाच रुबल द्या, मात्र आणखी जास्त मी मागणार नाही. त्रिफोन बोरिस्सोविच, तुम्ही साक्षी आहात. मी गाढवासारखं काही तरी बोललो त्याबद्दल मला क्षमा करा..."

"तुला एवढी भीती कशाची वाटते?" मीत्या थारकाईने त्याच्याकडे

पाहत म्हणाला. "ठीक, एवढंच असेल तर हे घे, मर !" त्याच्याकडं पाच रुबल फेकून तो ओरडला- "आता, त्रिफोन बोरिस्सोविच, आता गाजावाजा न करता मला वर घेऊन चला अन् मला प्रथम त्यांच्याकडं पाहू द्या, मात्र असं की त्यांनी मला पाहू नये. कुठं आहेत ते ? निळ्या खोलीत ?"

त्रिफोन बोरिस्सोविचने मीत्याकडे शंकित नजरेने पाहिले, पण एकदम सांगितले तसे आज्ञाधारकपणे केले; त्याला वाटेवरून घेऊन जाऊन तो स्वतः पहिल्या मोठ्या खोलीत गेला. आणि तिथला दिवा त्याने उचलून बाजूला केला; त्या खोलीच्या लगतच्याच खोलीत पाहुणे मंडळी बसलेली होती. मग त्याने हळूच मीत्याला आत नेले अन् अंधारात एका कोपऱ्यात उभे केले. तिथून त्याला स्वतः न दिसता आतली मंडळी मोकळेपणाने न्याहाळून पाहता येत होती. पण मीत्या फार वेळ पाहात राहिला नाही. आणि खरे म्हणजे तो त्यांना पाहूच शकला नाही. त्याने तिला पाहिले, त्याचे हृदय जोराने धडधडू लागले. अन् त्याच्या डोळ्यांपुढे अंधारी आली.

ती टेबलाच्या एका बाजूला एका बसक्या खुर्चीवर बसली होती. आणि तिच्या शेजारी, कोचावर तो देखणा तरुण काल्गानफ होता. तिने त्याचा हात धरला होता अन् ती हसत असलेली दिसत होती. आणि तो चिडून तिच्याकडे न पाहता मॅक्सिमोमफ काही तरी मोठ्याने सांगत होता; मॅक्सिमफ मेजाच्या दुसऱ्या बाजूला ग्रूशिंकाकडे तोंड करून बसला होता. मॅक्सिमफ कशावरून तरी खो खो करून हसत होता. कोचावर 'तो' बसला होता. आणि कोचाजवळच्या एका खुर्चीवर दुसरा एक परका माणूस होता. कोचावर बसला होता तो मागे रेलून पाईप ओढीत होता. आणि मीत्याच्या मनावर एका लठ्ठशा, रुंद चेहेऱ्याच्या, बुटक्या माणसाचे चित्र उमटले. तो कशावरून तरी रागावल्यासारखा दिसत होता. त्याचा मित्र, तो दुसरा परका माणूस मीत्याला भलताच उंच वाटला. पण त्याला याहून अधिक काही कळू शकले नाही. त्याने आपला श्वास रोखून धरला. त्याला मिनिटभरसुद्धा ते सहन होईना. त्याने ती पिस्तुलाची पेटी एका कपाटावर ठेवली. अन् धडधडत्या हृदयाने तो चालू लागला. आपले सर्वांग गार पडेलसे त्याला वाटले. तो गेला तो थेट त्या निळ्या खोलीत जमलेल्या मंडळींना तोंड देण्याकरिता.

"अग आई ग !" ग्रूशिंका किंचाळली, तिनेच प्रथम त्याला पाहिले.

७ :

पहिला नि हक्क असलेला प्रियकर

आपल्या लांब न् जलद ढांगा टाकीत, मीत्या सरळ टेबलाकडे गेला.

"सद्गृहस्थ हो," तो ओरडल्यासारख्या मोठ्या आवाजात, पण प्रत्येक

शब्दाला अडखळत, बोलला, " मी...नाही, मी अगदी ठीक आहे! घाबरू नका!" तो उद्‌गारला, " मी–अं–काही विशेष नाही, " तो एकदम ग्रूशिंकाकडे वळला, ती आपल्या खुर्चीत काल्गानफच्या बाजूला गोळा होऊन पडली होती, अन् त्याचा हात तिने घट्ट आवळून धरला होता. " मी...मी पण आलो आहे. मी इथं उद्या सकाळपर्यंत आहे. सद्‌गृहस्थहो, मी तुमच्याबरोबर उद्या सकाळपर्यंत राहू का? फक्त उद्या सकाळपर्यंत, अगदी शेवटचं, याच खोलीत?"

त्याने आपले बोलणे कोचांवर बसलेल्या लठ्ठशा, तोंडात पाइप असलेल्या बुटक्या माणसाकडे वळून संपविले. त्या माणसाने आपल्या तोंडातून पाइप ऐटीने बाजूला केला अन् तो करडेपणे उद्‌गारला;

" महाशय, आम्ही इथं खासगी बसलो आहोत. तिकडं दुसऱ्या खोल्या आहेत ना?"

" ओ हो, दमीत्रि फ्योदरोविच, तू! काय, म्हणतोस काय?" काल्गानफने एकदम प्रत्युत्तर केले. " इथं बैस ना आमच्याबरोबर. कसं काय?"

" प्यारे...अन् मोलाच्या दोस्ता, तुला भेटताना किती आनंद होतोय, मला नेहमी तुझी खूप आठवण येते, " मीत्याने आनंदभराने न् उत्कटतेने उत्तर दिले, आणि टेबलावर आडवे होऊन त्याचा हात धरला.

" आई ग! किती आवळून धरलास! माझी बोटं मोडली की, " काल्गानफ हसून म्हणाला.

" हा नेहमी अस्साच आवळतो, नेहमी, " ग्रूशिंका गमतीने म्हणाली, तिच्या तोंडावर भित्रे हसू होते, पण मीत्याच्या चेहेऱ्यावरून तिची एकदम खात्री झाली की हा इथे काही प्रसंग करविणार नाही. ती त्याच्याकडे अतिशय उत्सुकतेने अन् तरी काहीशी बेचैन होऊन पाहात होती. त्याला पाहून कशाची तरी तिच्यावर छाप पडली, आणि खरे म्हणजे, तो अशा वेळी इथे येईल अन् असे काही बोलेल याची तिला कल्पनाही नव्हती.

" नमस्कार, " मॅक्सिमफने डावीकडून सौजन्याने म्हणण्याचे धाडस केले. मीत्या त्याच्याकडेही धावत गेला.

" नमस्कार. तुम्हीसुद्धा इथं आहात का! तुम्हालासुद्धा इथं बघून मला किती आनंद होतोय सांगू! सद्‌गृहस्थहो, सद्‌गृहस्थहो, मी...(तो पुनः तोंडात पाइप घातलेल्या त्या पोलिश सद्‌गृहस्थाला उद्देशून म्हणाला, अर्थात् तो त्यालाच तिथे हजर असलेल्या सर्वांत अधिक महत्त्व असलेला इसम मानीत होता हे उघड आहे.) मी इथं धावत आलो...माझा शेवटचा दिवस, माझी शेवटची घटका या खोलीत, याच खोलीत घालवावी अशी मला इच्छा झाली...कारण इथं...मीसुद्धा माझ्या राणीवर विलक्षण प्रेम केलं...माफ करा मला, महाशय!" तो बेफाम जंगलीपणे ओरडून म्हणाला, " मी इथं धावत आलो अन् शपथ घेतली...अं हं, भिऊ नका,

माझी ही शेवटची रात्र आहे ! आपण एकमेकांतल्या चांगल्या समजूतदारपणाला स्मरून पिऊ या. आत्ता ताबडतोब मद्य येईल...हे मी माझ्याबरोबर आणलं आहे " (कशामुळे तरी प्रेरित होऊन त्याने आपले नोटांचे पुडके बाहेर काढले.) " आपली परवानगी असावी, महाशय, मला इथं वाद्य, संगीत, मद्यपान यांची पूर्ती जशी उडविली, तशी धमाल उडवून द्यायची आहे. पण हा जंतू, हा नको असलेला जंतू पोटावर सरपटत निघून जाईल, अन् त्याचं पुन्हा नाव ऐकू येणार नाही. माझा आनंदाचा दिवस मी माझ्या या शेवटच्या रात्री संस्मरणीय रीतीने साजरा करणार आहे."

त्याचा गळा भरून आल्यासारखा झाला. त्याला इतके, इतके बोलायचे होते, पण केवळ चित्र विचित्र उद्‌गार तेवढेच त्याच्या तोंडून बाहेर पडले. तो पोलिश मनुष्य त्याच्याकडे, त्याच्या हातातल्या नोटांच्या पुडक्याकडे टक लावून पाहत होता; त्याने ग्रूशिंकाकडे बघितले, तो गोंधळल्यासारखा झाला होता हे उघड होते.

" जर आमच्या सौरभूम बाईसाहेबांची परवानगी असेल तर..." तो बोलू लागला.

" 'सौरभूम' म्हणजे ? 'सार्वभौम' वाटतं, अं ? " ग्रूशिंकाने मध्येच विचारले. " तुम्ही ज्या रीतीनं बोलता त्याचं मला हसू आल्याशिवाय राहत नाही. खाली बैस, मीत्त्या, तू कशाबद्दल बोलतो आहेस ? कृपा करून आम्हांला भिववू नकोस, भिवविणार नाहीस ना ? होय ना ? जर नसलास, तर तुला भेटायला मला आनंद वाटेल..."

" मी, मी तुला भिवविणार ? " मीत्त्या कळवळ्याने म्हणाला, " अं हं, मला विसरून जा, तुझ्या वाटेनं तू जा, मी तुला अडथळा करणार नाही ! "

अन् एकदम भिरकन् तो एका खुर्चीवर जाऊन आदळला; त्याचे डोळे अश्रूंनी डबडबले, त्याने आपले तोंड भिंतीकडे केले, खुर्चीची पाठ, जणू मिठी मारावी तशी, हातांनी घट्ट दाबून धरली. सर्वांनाच, अन् खरोखर त्याचे त्याला-सुद्धा याचं आश्चर्य वाटले.

" चल, चल, काय माणूस आहेस तू ! " ग्रूशिंका त्याला ठपका देत म्हणाली. " मला भेटायला हा असा येतो— बोलायला लागतो अन् याला काय म्हणायचंय ते मला समजतच नाही. मागं एकदा असाच हा रडला होता, अन् आता पुन्हा रडतो आहे ! हे शरम आणणारं आहे ! तुला रडायला काय झालं ? जसं रडण्याजोगंच तुला काही झालंय ! " ती कोड्यात बोलावे तसे, प्रत्येक शब्दावर काहीशा चिडखोरपणाने जोर देत बोलली.

" मी... मी रडत नाही... ठीक, गुड ईव्हिनिंग ! " त्याने झटकन् खुर्चीत पाठ फिरविली, अन् तो एकदम हसला, ते त्याचे नेहमीचे तोटके, नीरस हसू नव्हते, चांगले दीर्घ, कंप असणारे, अस्पष्टसे, अस्वस्थपणाचे हसू होते.

"हा, आता कसं... चल, असा मजेत ये, आनंदी हो!" ग्रूशिंका त्याचे मन ताळ्यावर आणण्याच्या दृष्टीने आर्जवाने म्हणाली, "तू आलास, मला फार बरं वाटलं, फार बरं वाटलं, मीत्या, ऐकलंस का, मला फार आनंद झाला. त्यानं इथं आपल्याबरोबर राहावं अशी माझी इच्छा आहे," ती साऱ्या मंडळींना उद्देशून हुकमी आवाजात म्हणाली, अर्थात् तिचे बोलणे कोचावर बसलेल्या त्या माणसाला उद्देशूनच होते. "माझी तशी इच्छा आहे! अन् जर तो निघून गेला तर मी सुद्धा जाईन!" तिने चमकत्या डोळ्यांनी सांगितले.

"माझी राणी जे म्हणेल तो कायदा!" तो पोल सन्मानपूर्वक ग्रूशिंकाच्या हाताचे चुंबन घेऊन उद्‍गारला. "महाशय, मी तुम्हाला अगत्याची विनंती करतो की तुम्ही या मंडळीत सामील व्हावं," तो सभ्यतेने मीत्याला उद्देशून बोलला.

मीत्या एकदम उठून दुसरे एक आवेशपूर्ण भाषण ठोकण्याच्या विचारात असला पाहिजे, पण त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडला नाही.

"आपण पिऊ या महाशय," भाषण करण्याऐवजी एवढेच त्याच्या तोंडून बाहेर पडले. सगळे हसले.

"बाई ग! मला वाटलं हा पुन्हा बोलायला सुरुवात करतो की काय!" ग्रूशिंका घाबरून उद्‍गारली. "ऐकलंस का, मीत्या?" ती आग्रहपूर्वक म्हणाली, "तू इकडं तिकडं नाचू नकोस, पण तू शांपेन आणलीस ते फार बरं केलस. मला स्वतःला थोडी हवी आहे, मला ती लिकर सोसत नाही. अन् सगळ्यांत उत्तम गोष्ट म्हणजे, तू स्वतःच आलायस. आम्हाला इथं अतिशय कंटाळवाणं झालं होतं...तू पुनः दारूची पार्टी करण्यासाठी आला आहेस वाटतं? पण तुझे पैसे तुझ्या खिशात राहू देत. इतकं घबाड कुठून आणलंस?"

हा सारा वेळ मीत्या आपल्या हातात ते चुरगळलेलं नोटांचं पुडकं धरून बसला होता, आणि सर्वांचे, विशेषतः त्या पोलिश गृहस्थांचे, डोळे त्यावर खिळलेले होते. घाईगर्दीने त्याने ते आपल्या खिशात कोंबले. तो लाजला. त्याचवेळी खाणावळवाल्याने बूच काढलेली शांपेनची बाटली अन् पेले एका तबकात ठेवून आत आणले. मीत्याने झटकन् ती बाटली काढून घेतली, पण तो इतका गोंधळून गेला की तिचं काय करावे ते त्याला समजेना. काल्गानफने ती त्याच्या हातातून काढून घेतली अन् पेल्यात शांपेन ओतली.

"दुसरी! दुसरी बाटली आणा!" मीत्या त्या खाणावळवाल्याला ओरडला, आणि ज्या पोलला उद्देशून तो 'आपण आपल्या चांगल्या समजूतदारपणाला स्मरून पिऊ या' म्हणाला होता त्याच्या पेल्याशी आपल्या पेल्याचा किणकिण आवाज करण्याचे विसरून जाऊन त्याने कुणाचीही वाट न पाहता सगळा पेला पिऊन टाकला. त्याचा सबंध चेहरा एकदम बदलला. जी गंभीर अन् रडकी मुद्रा घेऊन तो आत आला होता ती पूर्णपणे बदलली अन् बालकासारखा काहीसा भाव त्याच्या चेहऱ्यावर

प्रकट झाला. तो एकदम सौम्य अन् मृदू झालासा दिसला. त्याने संकोचाने अन् आनंदी वृत्तीने प्रत्येकाकडे पाहिले. तो सारखा थोडे थोडके संकोचाने हसत होता. अन् त्याच्या चेहऱ्यावर एखाद्या कुत्र्याने काही आगळीक केलेली असावी, अन् त्याला शिक्षा करून मग माफी केलेली असावी, तसा धन्यतेचा भाव होता. तो सर्व काही विसरून गेला असावा, आणि प्रत्येकाकडे तो बालकासारखे आनंदी स्मित करीत पाहात होता. ग्रूशिकाकडे तर तो एकसारखा पाहत होता, अन् एकसारखा हसत होता, त्याने आपली खुर्ची तिच्या जवळ नेली. हळूहळू त्याला त्या दोन पोलिश गृहस्थांची काही कल्पना आली, अर्थात् अजून त्याचे त्यांच्या-विषयी निश्चित असे काही मत बनले नाही.

कोचावर बसलेल्या त्या पोलिश गृहस्थाची त्याच्या प्रतिष्ठित वागण्यामुळे त्याच्या बोलण्यातल्या पोलिश वळणामुळे, अन् विशेष म्हणजे त्याच्या पाइपमुळे त्याच्यावर विशेष छाप पडली. " हं, त्याला काय झालं? तो पाइप ओढतोय ना, चाललं आहे," त्याने विचार केला. त्या पोलिश माणसाचा फुगीर, मध्यम वयीन चेहरा, त्यावरचे त्याचे ते चिमुकले नाक अन् अतिशय बारीक, टोकदार, कलप लावलेल्या अन् उद्दाम वाटणाऱ्या मिशा यांनी अजून मीत्याच्या मनात यत्किंचितही दबाव उत्पन्न केला नव्हता. त्या माणसाच्या डोक्यावरच्या सैबेरियात बनविलेल्या फरच्या विचित्र दिसणाऱ्या टोपाचे अन् खुळचटपणाने मुद्दाम विंचरून पुढे कपाळा-वर आणलेल्या कुरळ्या जटांचेही त्याला तसे विशेष काही वाटले नाही. " तो ठीक चालतो आहे, ठीकच आहे " असा संतुष्ट विचार करीत तो मनाशी म्हणाला. दुसरा वयाने जरा लहान दिसणारा पोलिश गृहस्थ, जो या मंडळीकडे उद्धटपणें अन् भांडखोरीच्या दृष्टीने एकसारखा पाहात राहिला होता अन् त्यांचे संभाषण काही न बोलता तिटकाऱ्याने ऐकत होता, त्याची मीत्यावर जी छाप पडली ती फक्त त्याच्या फार मोठ्या उंचीचीच. कोचावर बसलेल्या पोलिश गृहस्थाच्या तुलनेने तो विशेषच वाटत होता. " हा जर उभा राहिला तर सहा फूट तीन इंच तरी भरेल," हा विचार मीत्याच्या मनात येऊन गेला. हा माणूस त्या दुसऱ्याचा मित्र, किंवा ' अंगरक्षका 'सारखा, असावा असेही त्याच्या मनात येऊन गेले आणि तो मोठा भीम त्या बुटक्या पाइपवाल्या पोलच्या आज्ञेत असलेला दिसला ह्यात शंका नाही. अन् हे सारे मीत्याला पूर्णपणे योग्य अन् शंका न घेण्यासारखे वाटले. कुत्र्या-च्या शरणागतीच्या त्याच्या त्या मनोवस्थेत प्रतिस्पर्धीपणाची सारी भावना मरून गेली होती.

ग्रूशिकाची मनोवस्था अन् तिनं उच्चारलेल्या शब्दांचे कोड्यासारखे स्वरूप त्याला आकलन करणे पूर्णपणे अशक्य होते. त्याला समजले ते इतकेच की, ती त्याच्याशी ममतेने वागते आहे. तिने आपल्याला क्षमा केली आहे, अन् स्वतः-चा म्हणून घेतले आहे; तेवढ्याने त्याच्या हृदयात आनंदाच्या लहरी उसळल्या.

आनंदाने तो स्वतःला विसरला. ती पेल्यातून शांपेनचे घुटके घेत होती ते तो लक्ष लावून पाहत होता. तथापि मंडळीमध्ये पसरलेली स्तब्धता कशाने तरी त्याला जाणवली असावी अन् तो सभोवार प्रत्येकाकडे अपेक्षेच्या नजरेने पाहू लागला.

"सद्गृहस्थहो, आपण इथं असे का बसून राहिलो आहोत? काहीतरी करायला का लागत नाही?" असे जणू त्याचे हसरे डोळे विचारीत असावे.

जणू त्याच्या मनातले हे जाणूनच की काय काल्गानफने मॅक्झिमफकडे बोट करून एकदम बोलायला सुरुवात केली, "हा काहीतरी बडबडत राहिला होता, आणि आम्ही सगळी हसत होतो."

मीत्या चटकन् काल्गानफकडे अन् मग मॅक्झिमफकडे पाहू लागला.

"हा काहीतरी बडबडतो?" तो नेहमीप्रमाणे तोटके, बावळट हास्य करीत म्हणाला, जणू कशानेतरी त्याला प्रसन्न वाटले असावे—"हा, हा!"

"हो; त्याचं म्हणणं असं की, आपल्या घोडदळातल्या वीस ते तीस वयाच्या सगळ्या अधिकाऱ्यांनी पोलिश स्त्रियांशी लग्नं करावीत. हे भयंकरच बोलणं आहे, नाही का?"

"पोलिश स्त्रियांशी?" मीत्या आनंदाने उत्तेजित होऊन म्हणाला.

मीत्याला ग्रुशिंकाविषयी काय वाटते त्याची काल्गानफला पूर्णपणे जाणीव होती, अन् त्या पोलिश माणसाविषयीही त्याला कल्पना आली होती, पण त्याचे त्याला विशेष जवळ जवळ काहीच; महत्त्व वाटत नव्हते; त्याला महत्त्व होते ते मॅक्झिमफचे. तो अचानकच मॅक्झिमफबरोबर इथे आला होता, अन् त्याला हे पोल या खाणावळीत त्याच्या आयुष्यात पहिल्या प्रथमच भेटले होते. ग्रुशिंकाशी त्याचा पूर्वी परिचय झालेला होता, अन् कोणाबरोबर तरी तो एकदा तिला भेटायला गेला होता; पण तिला तो आवडला नव्हता. परंतु इथे मात्र ती त्याच्याकडे अतिशय प्रेमळपणाने पाहात होती. मीत्या येण्यापूर्वी ती त्याचे बरेच कौतुक करीत होती, पण तो कसा कोण जाणे त्याने चळला नव्हता. तो एक पोरगा होता, वय विसाच्यावर नव्हते, त्याने झकपक पोशाख केला होता, त्याचा चेहेरा अतिशय मोहक गोरा गोरा होता, अन् सुरेख दाट पिंगट केस होते. त्याच्या चेहेऱ्यावर सुंदर निळसर झाक असलेले डोळे उठून दिसत होते, अन् त्या डोळ्यात बुद्धिमत्तेचा अन् केव्हा केव्हा त्याच्या वयाला खरोखर न शोभण्यासारखा असा खोल भावही दिसून येई, अर्थात् तो तरुण केव्हा केव्हा एखाद्या बालकासारखा दिसे अन् बोले, आणि त्याची त्याला स्वतःला जाणीव होई त्यावेळीसुद्धा त्याला बिलकुल लाज वाटत नसे. स्वभावाने तो स्वच्छंदी, अगदी लहरी होता. तथापि तो नेहमी स्नेहभावाने वागे. केव्हा केव्हा त्याच्या चेहेऱ्यावरच्या भावात दृढ अन् आग्रही असे काही दिसे. तो तुमच्याकडे पाहात ऐकत असेल, पण त्याचे चित्त दुसऱ्याच

कसल्यातरी विचारात सतत गुंतलेले असे. पुष्कळ वेळा तो विमनस्क अन् सुस्त असे, तर इतर वेळी तो लगेच, कित्येक वेळा अगदीच क्षुद्र दिसणाऱ्या गोष्टींनी उत्तेजित होई.

"नाही, विचार कर, मी याला गेले चार दिवस माझ्यासोबत हिंडवतो आहे," तो पुढे बोलू लागला, त्याचा स्वर सुस्तावून ओढल्यासारखा येत होता, पण त्यात कृत्रिमता वाटत नव्हती, अगदी स्वाभाविक असा वाटत होता. "म्हणजे तुझ्या भावानं त्याला गाडीतून खाली काढलं अन् जोरानं ढकलून दिलं. आठवतंय, तेव्हापासून. त्या वेळी मला त्याच्याविषयी आस्था वाटू लागली, अन् मी त्याला माझ्याबरोबर खेड्यापाड्यात नेलं, पण हा असलं काही घाणेरडं—साणेरडं बोलतो की मला त्याच्याबरोबर राहायची लाज वाटते. मी त्याला परत नेणार आहे."

"या सद्गृहस्थांनी पोलिश स्त्रियांना पाहिलेलं नाही, अन् जे अशक्य ते हे बोलताहेत," पाइपवाला पोल मॅक्झिमफला उद्देशून म्हणाला.

तो रशियन भाषा छान बोलत होता, निदान तो दाखवीत होता त्याहून किती तरी चांगली बोलत होता. रशियन शब्द वापरताना तो ते नेहमी पोलिश स्वरूपात विकृत करून बोले.

"पण माझं स्वतःचंच एका उच्च दर्जाच्या पोलिश स्त्रीशी लग्न झालं होतं," मॅक्झिमफ तोंडातल्या तोंडात हसून म्हणाला.

"पण तुम्ही घोडदळात नोकरी केलीत का? तुम्ही घोडदळासंबंधी बोलत होता. तुम्ही घोडदळात अधिकारी होता?" मध्येच काल्गानफने विचारले.

"हा खरंच घोडदळात अधिकारी असेल? हा हा!" मीत्या म्हणाला. तो उत्कंठेने ऐकत होता. अन् आपले चौकस डोळे बोलताना तो प्रत्येकाकडे, जणू त्या प्रत्येकाकडून काय ऐकायला मिळेल कुणास ठाऊक, अशा आविर्भावाने वळवीत होता.

"नाही, पण असं पहा," मॅक्झिमफ त्याच्याकडे वळून म्हणाला, "माझं म्हणणं असं की त्या सुरेख पोलिश स्त्रिया... जेव्हा त्या आमच्या ऊलानाच्या बरोबर मझर्का नाच करीत... जेव्हा त्यांच्यातली एक ऊलानाबरोबर मझर्का नाच करते ना तेव्हा ती एखाद्या मांजराच्या पिलाप्रमाणं... छोट्याशा पांढऱ्या शुभ्र पिलाप्रमाणं एकदम त्याच्या मांडीवर उडी घेते...अन् तिचा पोलिश बाप अन् पोलिश आई पाहत राहतात अन तसं करू देतात... ते ते करू देतात... अन् दुसऱ्या दिवशी तो ऊलान जातो अन् तिचं पाणिग्रहण करण्याची मागणी करतो... असं हे आहे... आपला हात तिच्यापुढं करण्याचं तंत्र, हॅ हॅ!" असे हसून आपले बोलणे त्याने संपवले.

"हे महाशय गांवढळ आहेत!" खुर्चीवर बसलेला तो ताडमाड पोल एकदम गुरकावून बोलला आणि आपला एक पाय त्याने दुसऱ्या पायावर आडव

ठेवला. त्याचा तो चरबी चोपडलेला अवाढव्य बूट अन् त्याचा जाड, घाणेरडा तळ मीत्याच्या नजरेने एकदम टिपला. त्या दोघाही पोल माणसांचे पोषाख ओशट असल्यासारखे वाटले.

" हं, आता हा गावंढळ काय ? हा इतका टाकून का बोलतो आहे ? " ग्रूशिंका एकदम चिडून म्हणाली.

" बाईसाहेब आग्रीप्पिना, या सद्गृहस्थानं पोलंडमध्ये बघितल्या त्या मोल-करणींच्या मुली, चांगल्या कुळातल्या स्त्रिया नव्हेत," पाईपवाला पोल ग्रूशिंकाला म्हणाला.

" तुम्ही हे खरं मानून चाला." तो उंच पोल तिरस्कारानं फिसकारला.

" पुढं काय आणखी ? बोलू द्या त्याला ! लोक बोलतात, त्यांना अडवा कशाला ? त्यामुळं तर बोलणं मजेशीर होतं." ग्रूशिंका रागावून म्हणाली.

" मी त्यांना अडवीत नाही, बाईसाहेब." टोप घातलेला पोल ग्रूशिंकाकडे एक दीर्घ दृष्टी टाकून म्हणाला, अन् संभावितपणे स्तब्ध राहून तो आपला पाइप फिरून ओढू लागला.

"नाही, नाही; हे पोलिश सद्गृहस्थ जे म्हणाले ते खरं आहे." काल्गानफ पुनः उत्तेजित झाला, जणू हा काही फार महत्त्वाचाच प्रश्न असावा. "तो कधीच पोलंडमध्ये नव्हता. तेव्हा त्याला त्यासंबंधानं कसं बोलता येईल ? मला वाटतं, तुमचं लग्न पोलंडमध्ये नव्हतं झालं. होय ना ? "

" नाही, स्मोलेन्स्क प्रांतात झालं. एका ऊलानानं तिला रशियात आणलं होतं. म्हणजे माझ्या भावी पत्नीला. तिच्याबरोबर तिचे आईबाप अन् दुसरी एक आप्तबाई तिच्या मोठ्या वयाच्या मुलासह आले होते. त्यानं तिला थेट पोलंडमधून आणलं होतं अन् माझ्याशी तिचं लग्न लावून दिलं. तो आमच्या तुकडीत लेफ्टनंट होता, फार छान तरुण माणूस. प्रथम तर तोच तिच्याशी लग्न करणार होता. पण त्यानं केलं नाही, कारण ती लंगडी असल्याचं मागाहून कळलं."

" म्हणजे तुम्ही एका लंगड्या स्त्रीशी लग्न केलंत ? " काल्गानफ ओरडून म्हणाला.

" होय. त्या दोघींनीही मला त्यावेळी थोडंसं ठकवलं, अन् माझ्यापासून ते छपवून ठेवलं. मला वाटतं ती उड्या मारीत चालत असावी; ती उड्या मारीतच चाले...मला वाटलं ती गंमत करीत असेल."

" तुमच्याशी लग्न करायचं म्हणून इतका तिला आनंद झाला ! " काल्गानोव दणाणून टाकणाऱ्या पोरसवदा आवाजात किंचाळला.

" होय, इतका तिला आनंद झाला. मागाहून, म्हणजे आमचं लग्न झाल्यानंतर, त्याच संध्याकाळी, तिनं कबूल केलं आणि अतिशय आर्ततेनं क्षमा

मागितली. ' मी लहान असताना एका डबक्यावरून उडी मारली तेव्हा माझ्या पायाला दुखापत झाली.' असं तिनं सांगितलं.' हॅ-हॅ ! ''

काल्गानफला एखाद्या पोराप्रमाणे अतोनात हसू लोटलं अन् तो कोचावर आडवा झाला. ग्रूशिंकाही हसू लागली. मीत्याला आपण सुखाच्या शिखरावर आहोत असे वाटले.

" समजलं का, हे खरं आहे, तो या वेळी खोटं बोलत नाही," काल्गानफ मीत्याकडे वळून उद्गारला; " अन् माहीत आहे तुम्हाला, याचं दोनदा लग्न झालंय. हे पहिल्या बायकोविषयी यानं सांगितलं. पण त्याची दुसरी बायको, बरं का, पळून गेली अन् ती जिवंत आहे."

" हे शक्य आहे ? " मीत्या चटकन् मॅक्झिमफकडे वळून अतिशय आश्चर्याचा आविर्भाव आणून म्हणाला.

" होय. ती पळाली खरी. मला तो कटू अनुभव आहे," मॅक्झिमफने विनयपूर्वक कबूली दिली. " ती एका फ्रेंच माणसाबरोबर पळून गेली. आणि सर्वात वाईट म्हणजे, तिनं माझी जी काय थोडीशी मिळकत होती ती अगोदरच आपल्या नावावर करून घेतली होती. ' तुम्ही चांगले शिकलेले आहात ', ती मला म्हणाली. ' तुम्हाला आपली उपजीविका सहज चालविता येईल.' असं म्हणून तिनं माझं काम मिटवून टाकलं. एक आदरणीय धर्मगुरू एकदा मला म्हणाले, ' तुमच्या बायकांपैकी एक लंगडी होती, पण ही दुसरी चांगली चपळ निघाली ! हॅ-हॅ ! "

" ऐका, ऐका ! " काल्गानफ खो खो हसत म्हणाला, " हा जर खोटं बोलत असेल-- अन् तो नेहमीच खोटं बोलतो-- तर ते आपणा सर्वांना रिझविण्यासाठीच, बरं का. त्यात काही नुकसान नाही, नाही का ? मला हा काही वेळा आवडतो, अगदीच हलकट बोलतो, पण ते त्याच्या बाबतीत स्वाभाविक आहे, नाही ? तुम्हाला नाही असं वाटत ? काही माणसं हलकट होतात ती स्वार्थीपणामुळे, पण तो हलकट आहे तो केवळ स्वभावामुळंच. नव्हे, कल्पना करा, तो म्हणतो की गोगोलनं ' मृतात्मे ' लिहिलं ते त्याच्यावरूनच (हे तो काल रस्ताभर युक्तिवाद करून मला सांगत होता). त्यात मॅक्झिमफ नावाचा एक जमीन मालक आहे, त्याला नोझद्योवनं मारलं होतं, आठवतं तुम्हाला ? त्याच्यावर आरोप होता की ' लोखंडी सळ्यांनी त्यानं जमीन मालक मॅक्झिमफला झिंगलेल्या अवस्थेत शारीरिक इजा केली, ' हे आठवतं तुम्हाला ? तो मॅक्झिमफ आपण अन् आपल्यालाच त्यानं ठोकलं होतं असं हा दावा करून सांगतो, विश्वास बसेल तुमचा ? असं असू शकेल ? चिचिकोवनं जो प्रवास केला तो, जास्तीत जास्त अलीकडं म्हटलं तरी, अठराशे वीस नंतरच्या दशकाच्या सुरुवातीला, म्हणजे या तारखा जमत नाहीत. याला त्या वेळी मारलं असणं शक्य वाटत नाही, शक्य नाही, नाही का ? "

काल्गानफ एवढा उत्तेजित का झाला हे समजणे कठीण होते, पण त्याचा प्रक्षोभ मनापासूनचा होता. मीत्याने सरळ त्याची री ओढली.

" ठीक, पण त्यांनी त्याला मारलं असलंच तर ? " तो हसत म्हणाला.

"त्यांनी मला अगदी मारलंच असं नाही, पण मला असं म्हणायचं आहे..." मॅक्झिमफ मध्येच म्हणाला.

" तुम्हाला काय म्हणायचंय ? तुम्हाला त्यांनी एकतर मारलं असलं पाहिजे किंवा मारलं तरी नसलं पाहिजे."

" किती वाजले मित्रा ? " पाइपवाल्या पोलने आपल्या उंच मित्राला कंटाळा आल्याचा आविर्भाव करून विचारले. त्याने उत्तरादाखल आपले खांदे उडविले. दोघांपैकी कुणाकडेच घड्याळ नव्हते.

" बोलायला का नको ? दुसऱ्या लोकांना बोलू द्या की, तुम्हाला कंटाळा आला म्हणून काय इतरांनी बोलू नये ? " ग्रूशिंका तक्रार करण्याच्या उद्देशाने त्याच्यावर उखडली, मीत्याच्या मनात पहिल्यांदाच एकदम काही चमकून गेल्यासारखे झाले. यावेळी त्या पोलिश गृहस्थाने लक्षात येण्यासारख्या चिडीने उत्तर दिले.

" बाईसाहेब, मी काही अडथळा केला नाही. मी काहीच बोललो नाही."

" ठीक आहे तर मग. चला, तुमची गोष्ट आम्हाला सांगा," ग्रूशिंका मॅक्झिमफला म्हणाली., " तुम्ही सारे गप्प का ? "

" सांगण्यासारखं काहीच नाही, ते सारं अगदीच खुळचटपणाचं आहे," मॅक्झिमफ, संतोष प्रकट करून, जरा अडखळतच म्हणाला. " शिवाय, गोगोलच्या गोष्टीत सारं आहे ते रूपकाच्या स्वरूपात आहे, कारण त्यानं सर्व नावांना अर्थ आहे असं दाखवलं आहे. नोझद्र्योवचं खरं नाव होतं नोसोव, आणि कुवशिनिकोवचं काही वेगळंच नाव होतं, ते होतं श्कोर्नेव. फेनार्डीला मात्र फेनार्डीच म्हणत, फक्त तो इतालियन नव्हता, रशियनच होता, आणि मामसेल फेर्नादी ही देखणी मुलगी होती, तिचे सुरेख छोटे छोटे पाय तंग विजारीत असायचे, आणि तिच्या अंगात वर भिंग असलेला लहानसा आखूड गोल झगा असायचा. ती अशी गोल गोल फिरत राहायची, अर्थात् चार तास नाही फक्त चार मिनिटंच, अन् ती प्रत्येकाला जादूनं भारून टाकायची..."

" पण तुम्हाला मारलं ते कशाकरिता ? " काल्गानफनं मोठ्याने विचारले.

" पिरॉंकरिता ! " मॅक्झिमफने उत्तर दिले.

" पिरॉं कोण ? " मीत्याने विचारले.

" प्रसिद्ध फ्रेंच लेखक पिरॉं. आम्ही सगळे त्या वेळी पीत होतो, त्याच जत्रेत एका खाणावळीत आम्ही बरीच जण मंडळी जमलो होतो. त्यांनी मला निमंत्रण दिलं होतं, अन् सर्वांत प्रथम मी काही कविता म्हणून दाखवायला लागलो. ब्वालो, रे तूच का ? काय तुझा वेष ! ' अन् ब्वालो उत्तर करतो की मी चाललो आहे एका

मुलखत्यांच्या नाचाला– 'म्हणजे स्नानगृहाकडं बरं का' हॅ हॅ! अन् त्यांनी स्वतःलाच लावून घेतलं, तेव्हा ती लगेच दुसरी कविता, अतिशय व्यंगात्मक अन् सर्व शिक्षित लोकांना चांगली माहीत असलेली म्हणू लागलो.

"होय, आम्ही सगळे अन् फॅओं आहोत, पण एका दुःखानं मी भारावलो आहे. तुम्हाला समुद्राकडची वाट माहीत नाही."

यू डोन्ट नो युवर वे टु दी सी.

ते त्यानं अधिकच दुखावले गेले अन् अगदी न शोभेलशा रीतीनं मला ते शिव्या देऊ लागले. अन् दुर्दैव असं की वातावरण सुधारावं म्हणून मी पिरॉंबद्दल एक अत्यंत सुसंस्कृत प्रसंग सांगू लागलो, त्याला फ्रेंच अकादमीत कसं घेतलं नाही, अन् आपला सूड उगवण्याकरिता त्यानं स्वतःचाच मृत्युलेख–

इथे पिरॉं पडला आहे, तो कोणीही नव्हता, तो फ्रेंच अकादमीचा सभासद सुद्धा नव्हता.

असा लिहिला. हे ऐकताच त्यांनी मला धरले अन् टोकलं."

"पण का म्हणून? का म्हणून?"

"मी शिकलो होतो म्हणून लोक काय एखाद्याला कशाकरिताही मारू शकतात." मॅक्झिमफने थोडक्यात अन् एखादे नीतितत्त्व सांगितल्याप्रमाणे आपले बोलणे संपविले.

"शीः, पुरे झालं! सारा चघळचोथा आहे, मला नाही ऐकायचं. मला वाटलं काही गमतीचं असेल." ग्रूशिंकाने एकदम त्यांना मध्येच तोडले.

मीत्या चपापला, अन् एकदम तो हसायचा थांबला. तो उंच पोलिश माणूस उठून उभा राहिला, अन् कंटाळून गेल्याचा अन् आपण भलत्याच ठिकाणी आपडलो असा उद्दाम आविर्भाव आणून तो त्या खोलीच्या या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्याकडे आपले हात मागे घेऊन फेऱ्या मारू लागला.

"हं, याला स्वस्थ बसवत नाही," ग्रूशिंका त्याच्याकडे बघून तिरस्काराने म्हणाली. मीत्याला चिंता वाटू लागली. दुसरी एक गोष्ट त्यानं बघितली की कोचावरचा पोलिश माणूस त्याच्याकडं चिडखोरपणानं पाहात होता.

"महाशय!" मीत्या म्हणाला, "चला आपण पिऊ या! अन् तुम्ही दुसरे साहेब, तुम्हीही या. आपण पिऊ या."

झटकन् त्याने तीन पेले आपल्याकडे ओढून घेतले अन् ते शांपेनने भरले.

"पोलंडचं स्मरण करून, महाशय, मी तुमच्या पोलंडच्या गौरवाप्रीत्यर्थ पितो!" मीत्या म्हणाला.

"मोठ्या आनंदानं, महाशय" तो कोचावरचा पोल संभावितपणे अन् आपला तोरा विसरून मनमिळाऊपणे म्हणाला, अन् त्याने आपला पेला घेतला.

"अन् हे दुसरे महाशय काय त्यांचं नाव ? प्या, अत्यंत सन्मान्य महाशय, तुमचा पेला घ्या !" मीत्याने विनंती केली.

"महाशय व्रुब्लेवस्की" कोचावरच्या पोलने उत्तर दिले.

महाशय व्रुब्लेवस्की आपले हात हलवीत चालत टेबलाकडे आला.

"पोलंडच्या नावानं, महाशय !" मीत्या आपला पेला वर करून म्हणाला, हुर्रा !"

तिघेहीजण प्याले. मीत्याने बाटली पकडली अन् पुन्हा तीन पेले भरले.

"आता, रशियाच्या नावानं, महाशय, अन् आपण भाऊ भाऊ बनू या !"

"माझ्यासाठी थोडी ओत," ग्रूशिंका म्हणाली, "मी पण रशियाच्या नावानं घेते !"

"मी पण," काल्गानफ म्हणाला.

"अन् मी सुद्धा.... रशियाच्या, म्हाताऱ्या आजीच्या नावानं... घेईन," मॅक्झिमफ हसत हसत म्हणाला.

"सगळे घ्या ! सगळे घ्या !" मीत्या ओरडून म्हणाला," त्रिफोन बोरिस्सोविच, आणखी बाटल्या आणा !"

मीत्याने आणलेल्या आणखी तीन बाटल्या टेबलावर ठेवण्यात आल्या. मीत्याने पेले भरले.

"रशियाच्या नावानं ! हुर्रा !" तो पुन्हा ओरडून म्हणाला. सर्वजण तो घोट प्याले, फक्त ते पोल तसेच राहिले, ग्रूशिंकाने एकदम एका घोटात सबंध पेला रिकामा केला. पोलांनी आपल्या पेल्यांना हातही लावला नाही.

"असं का बरं महाशय ?" मीत्या म्हणाला, "तुम्ही नाही पिणार ?"

व्रुब्लेवस्कीने पेला घेतला, तो वर केला अन् घुमविणाऱ्या आवाजात तो म्हणाला—

"१७७२ च्या पूर्वीच्या रशियाच्या नावानं."

"हां, हे छान !" तो दुसरा पोल बोलला, अन् त्या दोघांनी एकदम आपले पेले रिकामे केले.

"तुम्ही मूर्ख आहात, तुम्ही महाशय," मीत्याच्या तोंडून एकदम शब्द बाहेर पडले.

"साबहे" दोघेही पोल धमकीच्या सुरात ओरडले, कोंबड्याच्या जोडीप्रमाणे ते मीत्यापुढे पवित्र्यात उभे राहिले. व्रुब्लेवस्की विशेष करून चवताळला,

"स्वतःच्या देशावर प्रेम केल्याशिवाय कोणी राहील काय ?" तो ओरडून म्हणाला.

"गप बसा ! भांडू नका ! मला भांडण मुळीच खपायचं नाही !" ग्रूशिंका प्रभावी स्वराने म्हणाली, अन् तिने आपला पाय जमिनीवर आपटला. तिचा चेहेरा चमकू लागला, तिचे डोळे तेजाळले. आत्ता प्यालेल्या पेल्याचे परिणाम तिच्यावर स्पष्ट दिसत होते. मीत्या भयंकर घाबरून गेला.

"महाशय, माफ करा मला ! माझ्याकडून अपराध घडला, मला वाईट वाटतं. व्रुब्लेवस्की, व्रुब्लेवस्की, मला खेद होतो."

"जीभ आवर तुझी, तू तरी निदान ! खाली बैस, बावळटा !"

ग्रूशिंका संतापाने चिडून उखडली.

प्रत्येकजण खाली बसला, सगळे एकमेकांकडे पाहत चूप राहिले.

"सद्गृहस्थहो, या सर्वाचं कारण मी आहे," मीत्याने पुन्हा सुरू केले, ग्रूशिंकाच्या शब्दांचा काहीही बोध त्याला झाला नाही. "चला, आपण इथं का बसलो आहोत? आपण...पुन्हा स्वतःची करमणूक करून घेण्यासाठी काय करू या?"

"हे:, यात करमणुकीचा अंशसुद्धा नाही," काल्गानफ जडपणे तोंडातल्या तोंडात बोलला.

"आत्ता आपण जसे खेळत होतो तसा पैसे लावून पत्ते खेळू या,"मॅक्झिमफ एकदम गालातल्या गालात हसत म्हणाला.

"पत्त्याचा डाव? छान !" मीत्या म्हणाला. "फक्त जर महाशय यात.."

"आता उशीर झालाय," कोचावरच्या पोलने जणू नाखुषीनेउत्तर दिले.

"उशीर? "खरं आहे," व्रुब्लेवस्कीने टेकू दिला. 'उशीर' म्हणजे काय?" ग्रूशिंकाने विचारले.

"उशीर, बाईसाहेब ! 'बराच वेळ झालाय' असं मला म्हणायचंय," कोचावरच्या पोलनं खुलासा केला.

"यांना आपला नेहमी उशीर होत असतो. एक गोष्ट कधी यांच्या हातून होत नाही !" ग्रूशिंका रागाने कर्कशपणे ओरडली. "आपण स्वतः मद्दड, तेव्हा दुसऱ्यांनीही मद्दड व्हावंसं यांना वाटतं. तू येण्यापूर्वी, मीत्या, ते अस्सेच गप्प अन् माझ्याकडं पाहून नाके वर करीत होते."

"माझ्या देवते !" कोचावरचा पोल म्हणाला, "माझ्यावर तुझी कृपादृष्टी नाहीसं मला दिसतं, म्हणूनच मी खिन्न आहे. मी तयार आहे, साहेब– तो मीत्याकडे बघून म्हणाला.

"सुरुवात करा, साहेब," मीत्याने रुकार दिला, त्याने आपल्या नोटा खिशातून बाहेर ओढल्या अन् त्यातल्या दोनशे रुबलच्या टेबलावर ठेवल्या. "तुम्ही मला आज खूप हरवावं अशी माझी इच्छा आहे. घ्या पत्ते. "बँक बनवा."

"आपण खाणावळवाल्याकडून पत्ते घेऊ या, महाशय," तो बुटका पोल गंभीरपणे अन् जोर देऊन म्हणाला.

"फारच उत्तम मार्ग," व्रुब्लेवस्कीने त्याची री ओढली.

"खाणावळवाल्याकडून? उत्तम, समजलं मला, त्याच्याकडून घेऊ. पत्तेSS!" मीत्याने ओरडून खाणावळ मालकाला आज्ञा केली.

खाणावळवाल्याने नवा कोरा जोड आणला अन् मीत्याला सांगितले की मुली तयार होऊ लागल्या आहेत, अन् ज्यू मंडळी त्यांच्या झांजासह लवकरच येण्याचा संभव आहे; पण सामानाची गाडी मात्र अजून आलेली नाही. मीत्या एकदम टेबलाजवळून उठला अन् दुसऱ्या खोलीत सूचना देण्याकरिता गेला, पण फक्त तीनच मुली आलेल्या होत्या, आणि मार्या काही अजून आलेली नव्हती. अन् आपण काय सूचना देणार अन् आपण बाहेर का धावत आलो हे त्याचे त्याला कळले नाही. त्याने फक्त पेटीतून मुलींच्याकरिता आणलेली बक्षिसे, म्हणजे मेवा, मिठाई, टॉफी, चॉकोलेट वगैरे, बाहेर काढायला सांगितली. "अन् आंद्रेला व्होडका द्या, आंद्रेला व्होडका द्या!" असेतो घाईघाईत ओरडला. "मी आंद्रेशी फार कठोरपणानं वागलो!"

अचानक मॅक्झिमफ, त्याच्या मागोमाग बाहेर आला अन् त्याने त्याच्या खांद्याला स्पर्श केला.

"मला पाच रुबल द्या." तो मीत्याला हलक्या स्वरात म्हणाला, "मी सुद्धा डावात काही लावीन म्हणतो, हॅ—हॅ!"

"छान! उत्तम! हे दहा घ्या!"

पुन्हा त्याने आपल्या खिशातून सगळ्या नोटा काढल्या आणि त्यांतली दहा रुबलची एक उचलली.

"आणि ही जर तुम्ही हरलात, तर पुन्हा या, पुन्हा या."

"फार छान," मॅक्झिमफ आनंदाने उद्गारला, अन् तो परत धावत आत गेला. मीत्याही परतला, अन् त्याने त्यांना थांबून ठेवल्याबद्दल क्षमा मागितली. ते पोल अगोदरच खाली बसले होते, त्यांनी पत्त्यांचा जोड उघडला. ते पूर्वीपेक्षा जास्त मिसळणारे, नव्हे जवळजवळ अगत्यशील दिसले. कोचावरच्या पोलने दुसरा पाइप शिलगावला होता अन् तो पत्ता टाकण्याच्या तयारीत होता. त्याच्या चेहेऱ्यावर गांभीर्य पसरलेले होते.

"सभ्य गृहस्थ हो, आपापल्या जागी बसा," व्रुब्लेवस्की बोलला.

"अहं, मी पुढं खेळणार नाही," काल्गानोव म्हणाला, "मी आताच पन्नास रुबल यांना हरलो आहे."

"नशीब लागलं नाही, कदाचित आता लागेल," तो कोचावरचा पोल त्याच्याकडे बघून म्हणाला.

" बँकेत किती आहेत? बोलीला जुळण्याइतके?" मीत्याने विचारले.

" तितके आहेत, महाशय, शंभर असतील, कदाचित दोनशे असतील, जेवढे तुम्ही लावाल तेवढे आहेत."

" दहा लाख?" मीत्या हसत म्हणाला.

" महाशय, कॅप्टननी पोद्विसोत्स्कीबद्दल ऐकलं असावं बहुधा?"

" कोण पोद्विसोत्स्की?"

" वॉरसॉमध्ये एक बँक होती अन् कोणीही येई अन् तिच्याविरुद्ध पैसे लावी. पोद्विसोत्स्की आला, त्यानं हजार सोन्याचे तुकडे पाहिले, अन् बँकेविरुद्ध पैसे लावले. तो बँकवाला म्हणाला, "महाशय पोद्विसोत्स्की, तुम्ही सोनंच, ठेवणार आहात की तुमच्या पतीवर आम्ही विश्वास ठेवावा?' पोद्विसोत्स्कीनं सांगितलं 'माझ्या पतीवर, महाशय, तितकंच अधिक बरं.' बँकवाल्यानं फासा टाकला. पोद्विसोत्स्कीनं जिंकला. 'हे घ्या, महाशय,' तो बँकवाला म्हणाला, अन् खण उघडून त्यानं दहा लाख त्यला दिले. 'घ्या, महाशय, तुमचा हा लाभ आहे.' बँकेत दहा लाख होते. 'मला ते माहीत नव्हतं,' पोद्विसोत्स्की म्हणाला. 'पोद्विसोत्स्की, तुम्ही आपली पत पणाला लावलीत, आम्ही आमची लावली' असं तो बँकवाला म्हणाला. पोद्विसोत्स्कीनं दहा लाख घेतले."

" हे खरं नाही," काल्गानफ म्हणाला.

" महाशय काल्गानफ, सभ्य गृहस्थांच्या मैफलीत असं कोणी बोलत नाही."

" पोलिश जुगारी म्हणे दहा लाख देऊन टाकतो!" मीत्या म्हणाला, पण लगेच त्याने स्वतःला आवरले. " माफ करा, महाशय, पुन्हा माझ्याकडून अपराध घडला, तो स्वतःच्या शब्दाकरिता, पोलिश इभ्रतीकरिता दहा लाख देऊन टाकील. मी पोलिश भाषा कशी बोलतो पाहिलंत, हा-हा! हं, मी दहा रुबल लावले, गुलाम पुढं आहे."

" आणि मी राणीवर एक रुबल लावतो, लाल बदामची राणी, सुरेख, तरुण चिमुकली हे-हे!" मॅक्झिमफ हसून म्हणाला, त्याने आपली राणी बाहेर काढली आणि जणू ती कोणालाही दिसू नये असा प्रयत्न करीत तो अगदी उजवीकडे सरला अन् त्याने घाईघाईने मेजाखाली स्वतःवर क्रूसाची खूण केली. मीत्याने जिंकली. रुबलही जिंकला.

" कोंडी!" मीत्या म्हणाला.

" मी दुसरा रुबल लावतो, माझा 'सिंगल स्टेक,'" मॅक्झिमफ रंगात येऊन पुटपुटला, एक रुबल जिंकल्याने तो आनंदाने बेहोष झाला होता.

" हरला!" मीत्या ओरडला. " सत्यावर 'डबल'!"

सत्त्याही हरला.

" थांब!" काल्गानफ अचानक ओरडला.

"डबल ! डबल !" मीत्याने आपली बोली दुप्पट केली, अन् ज्या ज्या वेळी त्याने आपली बोली दुप्पट केली त्या त्या वेळी पोलांनी ती जिंकली. रुबलवर लावलेली बोली सारखी जिंकतच राहिली.

"डबलवर !" मीत्या आवेशाने ओरडला.

"तुम्ही अगोदरच दोनशे हरला आहात, महाशय. दुसरे शंभर लावणार काय ?" कोचावरच्या पोलने विचारले.

"काय ? दोनशे हरलो ? मग आणखी दोनशे ! सर्व डबल !"

अन् आपले पैसे खिशातून बाहेर काढून मीत्या राणीवर दोनशे रुबल फेकून देणार इतक्यात काल्गानफने त्यावर आपला हात ठेवला.

"एवढं बस्स !" तो आपल्या घुमणाऱ्या आवाजात ओरडला.

"काय झालं ?" मीत्या त्याच्याकडे पाहातच राहिला.

"हे पुरे ! तू यापुढं खेळावंसं असं मला वाटत नाही. खेळू नको !"

"का ?"

"कारण मला तू खेळावंसं असं वाटत नाही. झक मारू दे ते. बाजूला हो त्यातनं. माझी इच्छा म्हणूनच मी तुला पुढं खेळू देणार नाही."

मीत्या त्याच्याकडे चकित होऊन बघू लागला.

"सोडून दे ना मीत्या. त्याचं म्हणणं कदाचित् रास्त असेल. नाहीतरी तू पुष्कळ घालवलं आहेस," ग्रूशिंका म्हणाली, तिच्या आवाजात एक चमत्कारिक झाक होती. दोघेही पोल अत्यंत दुखावले गेल्याचा आविर्भाव करीत आपल्या जागेवरून उठले.

"तुम्ही मस्करी चालविली आहे काय, महाशय ?" तो बुटका मनुष्य काल्गानफकडे करडेपणे पाहात म्हणाला.

"हिंमत कशी झाली तुमची ?" महाशय व्रुब्लेवस्कीही काल्गानफवर गुरगुरला.

"असं ओरडून बोलण्याचं साहस करू नका, तुम्ही कोंबड्यांनो," ग्रूशिंका ओरडून म्हणाली.

मीत्या दरेकाकडे आळीपाळीने पाहू लागला. पण ग्रूशिंकाच्या चेहऱ्यावर एकदम त्याला काही तरी दिसून आले, अन् त्याच क्षणी त्याच्या मनात काहीतरी नवीन चमकून गेले– एक विलक्षण नवा विचार !

"बाईसाहेब ॲग्रिप्पिना," तो बुटका पोलने रागाने लाल होऊन बोलू लागला, तोच मीत्या चटकन् त्याच्याजवळ गेला अन् त्याने त्याच्या खांद्यावर थोपटले.

"बडे साहेब तुमच्याशी दोन शब्द बोलायचे आहेत."

"काय पाहिजे तुम्हाला ?"

" शेजारच्या खोलीत. मला तुमच्याशी दोन शब्द बोलायचे आहेत, तुम्हाला आनंद वाटेल असे, अत्यंत खूष करणारे. तुम्हाला ऐकून आनंद वाटेल."

तो बुटका माणूस हे ऐकून थक्कच झाला अन् त्याने शंकेच्या नजरेने मीत्त्याकडे पाहिले. तथापि तो एकदम कबूल झाला, एका शर्तीवर की व्रुब्लेवस्की आपल्याबरोबर आला पाहिजे.

" अंगरक्षक ? येऊ दे त्यांना, अन् त्यांनीही यावं अशी माझी इच्छा आहे. ते पाहिजेतच !" मीत्त्या म्हणाला. " महाशय, चला !"

" कुठं चाललात तुम्ही ?" ग्रूशिंकाने चिंततेने विचारले.

" आम्ही एका मिनिटात परत येतो," मीत्त्याने उत्तर दिले.

त्याच्या डोळ्यांत एक प्रकारचा धीटपणा, एकदम आलेला आत्मविश्वास चमकत होता. तासापूर्वी तो आला त्याहून त्याचा चेहेरा या वेळी वेगळाच दिसत होता.

त्याने त्या पोलांना नेले, मोठ्या खोलीत नाही, तिथे मुलींचा वृंद जमत होता अन् टेबल ठेवले जात होते, पण उजवीकडच्या झोपण्याच्या खोलीत, जिथे ट्रंका न् गहे ठेवले होते तिथे. तिथे दोन मोठे बिछाने होते अन् प्रत्येकावर उशांची एक एक चवड पडलेली होती. एका कोपऱ्यात लहानशा देवदारी लाकडाच्या टेबलावर पेटविलेली मेणबत्ती होती. या टेबलापाशी तो बुटका माणूस अन् मीत्त्या एकमेकांकडे तोंड करून बसले, अन् तो धिप्पाड व्रुब्लेवस्की त्याच्या शेजारी आपले हात मागे घेऊन उभा राहिला. पोल कठोर दिसत होते, पण त्यांच्या चेहऱ्यावर उत्सुकताही दिसत होती.

" आपली काय इच्छा आहे, महाशय ?" तो बुटका पोल अशुद्ध भाषेत बोलला.

" हं, हे पहा, महाशय, मी काही तुम्हाला फार वेळ तिष्ठत ठेवणार नाही. हे मी तुमच्यापुढं पैसे ठेवीत आहे," त्याने आपल्या नोटा बाहेर काढल्या. " तीन हजार तुम्हाला पसंत आहेत ? घ्या अन् चालायला लागा."

तो पोल डोळे विस्फारून मीत्त्याकडे चौकस नजरेने पाहू लागला.

" तीन हजार, ?" त्याने व्रुब्लेवस्कीशी नेत्रपल्लवी केली.

"तीन, महाशय तीन ! ऐका, मला तुम्ही समजूतदार गृहस्थ दिसता. तीन हजार घ्या अन् मसणात जा, तुम्ही अन् तुमचे हे व्रुब्लेवस्की— ऐकलंत ? पण लगेचच्या लगेच, या क्षणी, अन कायमचे. समजलात का, महाशय कायमचे, हा दरवाजा, इथून तुम्ही चालू लागायचं. तिकडं तुमचं काय आहे, बगला, फरकोट ? तो मी तुम्हाला इथं आणून देतो. ते लगेच तुम्हाला घोडी देतील, अन् मग नमस्ते !"

एक प्रकारच्या आत्मविश्वासाने मीत्या उत्तर मिळण्याची वाट पाहू लागला. त्याला शंका राहिलेली नव्हती. त्या पोल गृहस्थाच्या चेहेऱ्यावर विलक्षण निर्धाराचा भाव येऊन गेला.

"अन् तो पैसा महाशय ?"

"पैसा महाशय ? पाचशे रुबल मी आता इथं तुम्हाला प्रवासाकरिता, पहिला हप्ता म्हणून देतो, आणि दोन हजार पाचशे उद्या, शहरात—मी माझा शब्द देऊन शपथपूर्वक सांगतो, ते मी मिळवीन, ते मी काहीही करून मिळवीन !" मीत्या म्हणाला.

त्या पोलांची पुन्हा नेत्रपल्लवी झाली. बुटक्या माणसाचा चेहेरा अधिक त्रासिक दिसला.

"सातशे, पाचशे नव्हे आत्ता एका रकमेनं सातशे, नगद !" मीत्या काही बिनसते आहे असं बघून म्हणाला. "काय झालं महाशय ? तुमचा माझ्यावर विश्वास नाही ? मी लगेच काही तुम्हाला सगळे तीन हजार देऊ शकणार नाही. ते मी आता दिले तर उद्या तुम्ही पुन्हा तिच्याकडं याल... शिवाय, ते तीन हजार या वेळी माझ्यापाशी नाहीतही. ते शहरात घरी माझ्याकडं आहेत," मीत्या अडखळत बोलला, प्रत्येक शब्दाला त्याचे धैर्य हळूहळू कमीकमी होत होते. "शपथेवर सांगतो, तो पैसा तिकडं दडवून ठेवलेला आहे."

एका क्षणात त्या बुटक्या माणसाच्या चेहेऱ्यावर आत्मप्रतिष्ठेची विलक्षण जाणीव दिसू लागली.

"पुढं काय ?" त्यानं औपरोधिकपणे विचारले. "लाज नाही वाटत ?" अन् तो जमिनीवर थुंकला. व्रुब्लेवस्कीही थुंकला.

"तुम्ही असं वागता महाशय, ते आपण ग्रूशिंकाकडून अधिक काढू शकू अशी तुम्हाला आशा वाटते म्हणून ? अरे, तुम्ही खच्ची केलेले कोंबडे आहात दोघं, खच्ची केलेले कोंबडे. समजलात ?" आता सारे संपले अशा निराशेच्या भावनेने मीत्या बोलला.

"हा भयंकर अपमान आहे !" तो बुटका पोल खेकड्यासारखा लाल झाला, अन् पुढे एकही शब्द ऐकून घेण्याची इच्छा नाही अशा आविर्भावाने तो तुरूतुरू खोलीच्या बाहेर गेला. व्रुब्लेवस्की त्याच्या मागे डुलत डुलत गेला, आणि त्यांच्या मागोमाग मीत्या गोंधळलेला अन् चीत झाल्यासारखा होऊन बाहेर पडला. त्याला ग्रूशिंकाची भीती वाटली, हा माणूस बाहेर जाऊन एकदम आरडाओरडा करील अशी भीती वाटली. आणि त्याने तसा केलाच. त्या पोलाने खोलीत प्रवेश केला अन् नाट्यमय आविर्भावाने तो एकदम ग्रूशिंकाकडे धावला.

"बाईसाहेब अग्रिप्पिना, माझा भयानक अपमान झाला आहे !" तो

ओरडून म्हणाला. पण ग्रूशिंका एकदम चवताळून उठली, जणू तिच्या मर्मावरच त्यांनी आघात केला.

" रशियन भाषेत बोल ! रशियन भाषेत बोल ! " ती ओरडून म्हणाली, " पोलिशचा एक शब्द उच्चारू नकोस ! तू रशियन चांगलं बोलत होतास. पाच वर्षांत काही तू ते विसरलेला नाहीस."

ती संतापाने लाल होऊन गेली.

" बाईसाहेब आग्रिप्पिना....."

" माझं नाव आहे आग्राफेना, ग्रूशिंका रशियन बोल, नाहीतर मी मुळीच ऐकून घेणार नाही ! "

त्या पोलाने आपल्या प्रतिष्ठेला धक्का लागल्याच्या भावनेने दम टाकला, अन् बडेजावाने मोडक्या रशियन भाषेत आपलं म्हणणं मांडलं.

" बाईसाहेब आग्राफेना, मी इथं आलो तो मागचं विसरावं अन् त्याची क्षमा करावी, आजपर्यंत जे काय घडलं त्याची क्षमा करावी . . ."

" क्षमा ? मला क्षमा करायला आलास ? " ग्रूशिंकानं एकदम खुर्चीवरून उठून मधेच त्याला तोडले.

" बरोबर, बाईसाहेब, मी काही भेकड नाही, चांगला उदार मनाचा आहे. पण तुमचे प्रियकर मी बघितले मी तेव्हा आश्चर्यचकित झालो. मीत्त्यानं मला, तिकडच्या खोलीत इथून निघून जाण्याकरिता म्हणून, तीन हजार देऊ केले. मी त्या महाशयांच्या तोंडावर थुंकलो."

" काय ? त्यानं माझ्याकरिता तुम्हाला पैसे देऊ केले ? " ग्रूशिंका उन्मादाने ओरडून म्हणाली. " मीत्त्या, हे खरं आहे ? हिंमत कशी झाली तुला ? मी काय विक्रीला काढलेली आहे ? "

" साहेब, साहेब ! " मीत्त्या आक्रंद करीत म्हणाला, " ती शुद्ध अन् झगमगणारं सोनं आहे अन् मी कधीही तिचा प्रियकर नव्हतो ! हे खोटं आहे..."

" त्याच्यापुढं माझा बचाव करण्याची हिंमत कशी करवते तुला ? " ग्रूशिंका किंचाळून म्हणाली. " सच्चारित्र्यानं मी शुद्ध राहिले असं नाही, मला कुणाचं भय वाटत होतं असंही नाही, तर याला भेटेन त्या वेळी माझी मान मला ताठ ठेवून, तू बदमाष आहेस ' असं मला त्याला सांगता आलं पाहिजे म्हणून मी शुद्ध राहिले. अन् त्यानं खरोखर पैसा घ्यायचं नाकारलं का ? "

" त्यानं ते घेतले ! त्याने ते घेतले ! " मीत्त्या म्हणाला; " फक्त त्याला ते तीन हजार आत्ताच्या आत्ता पाहिजे होते, अन् मी फक्त त्याला लगेच सातशेच देऊ शकत होतो."

" अस्सं; त्याला माझ्याकडं पैसा आहे हे कळलं, अन् म्हणून इथं तो माझ्याशी लग्न करायला आला ! "

"बाईसाहेब, आग्रीप्पिना!" बुटका पोल म्हणाला, "मी एक सरदार आहे. मी उमराव आहे, एखादा लुंगासुंगा गावंढेकरी नाही. मी इथं आलो तो तुला माझी पत्नी करण्याकरिता अन् आलो तो तू मला एक वेगळीच स्त्री, उलट्या काळ-जाची नि निर्लज्ज स्त्री, दिसून आलीस."

"अरे, जा जिकडून आलास तिकडं! मी त्यांना तुला हाकलून द्यायला सांगितलं की ते तुला हाकलून देतील," ग्रूशिंका भयंकर संतापून म्हणाली. "ही पाच वर्षे मी कष्टात काढली, अगदी मी मूर्ख, मूर्ख होते! अन् हे त्याच्याकरिता नव्हे, माझ्या क्रोधानं मला दुःखी बनवलं होतं. अन् हा तर तो मुळीच नव्हे! तो काय असा होता? तो याचा बाप असेल कदाचित! तुला हा केसांचा टोप कुठनं मिळाला? तो ससाणा होता, हे बदक आहे. तो मला हसवी अन् गाऊन दाखवी... अन् मी ही पाच वर्षे रडून काढली, मी किती शतमूर्ख, नीच अन् निर्लज्ज होते म्हणायची!"

ती आपल्या बैठ्या खुर्चीत कोसळली अन आपले तोंड तिने हातांनी झाकून घेतले. त्याचवेळी मोक्रोयच्या मुलींच्या वृंदाने डावीकडच्या खोलीत गायला सुरुवात केली. ते धांगडधिंग्याचे नृत्यगीत होते.

"अगदी कुंटणखाना!" व्रुब्लेवस्की एकदम गरजला. "मालक, त्या निर्लज्ज पोरट्यांना हकलून द्या!"

खाणावळवाला काही वेळापासून एकसारखा चौकसपणानं दारातून आत डोकावून पाहात होता, तो आरडाओरडा ऐकून अन् आपले पाहुणे भांडताहेत हे ताडून एकदम त्या खोलीत आला.

"तुम्हाला ओरडायला काय झालं? तुम्हाला तुमचा घसा फाडायचा आहे काय?" तो व्रुब्लेवस्कीला उद्देशून आश्चर्य वाटण्याजोग्या उद्धटपणाने म्हणाला.

"पशू!" व्रुब्लेवस्की किंचाळला.

"मी पशू! अन् आतापर्यंत तुम्ही खेळत होता ते पत्ते कोणत्या प्रकारचे होते रे? मी तुम्हाला जोड दिला तो तुम्ही दडवून ठेवलात. तुम्ही खुणा केलेल्या पत्त्यांनी खेळलात ना! खोट्या पत्त्यांनी खेळल्याबद्दल मी तुम्हाला सैबेरियाला पाठवू शकेन, काय समजलात, खोटे पत्ते म्हणजे खोट्या बँक नोटाप्रमाणेच आहेत..."

आणि कोचापाशी जाऊन त्याने आपली बोटे कोचाची पाठ अन् गादी यांच्यामध्ये खुपसली. आणि न फोडलेला पत्त्यांचा जोड बाहेर ओढून काढला.

"हे बघा मी दिलेला जोड न फोडता राहिलेला!"

त्याने तो वर करून खोलीतल्या सर्वांना दाखविला. "जिथं मी उभा होतो तिथून त्यानं माझा जोड हळूच दूर सारल्याचं अन त्याच्याजागी आपला घेतल्याचं मी पाहिलं-- तुम्ही ठग आहात, सभ्य लोक नाही!"

आणि मी दोनदा या साहेबांना पत्ता बदलताना पाहिलं !" काल्गानफ म्हणाला.

"किती लाजिरवाणं ! किती लाजिरवाणं !" ग्रूशिंका आपले हात आवळून अन् खरोखरीच्या लज्जेने लाल होऊन उद्गारली. "परमेश्वरा, हा ह्या पायरीला येऊन पोचला अं ?"

"मलाही तसंच वाटलं !" मीत्या. पण तो हे शब्द पुरते उच्चारायच्यापूर्वी, म्याक्सिमोवस्कीनं, बावरलेल्या न् भडकलेल्या चेहेऱ्याने, ग्रूशिंकापुढे आपली मूठ वळून दाखविली अन् तो ओरडला,

"हलकट वेश्या तू !"

मीत्या लगेच त्याच्याकडे धावला, त्याने आपल्या दोन्ही हातांनी त्याला घट्ट धरले, वर उचलले अन् क्षणात त्याला उजवीकडच्या खोलीत जिथून ते नुकतेच आले होते तिथे नेले.

तिकडून लगेच परत येऊन भावनावेशानं धापा टाकीत तो मोठ्याने म्हणाला, "मी तिथं त्याला जमिनीवर आडवा पाडून आलो. तो धडपडतोय, बदमाष ! पण तो आता परत इकडं यायचा नाही, ती भीती नाही !"...

त्यानं दरवाज्याची एक फळी झाकली, अन दुसरी उघडी धरून बुटक्या पोलला हाक मारून तो म्हणाला :

"बडेसाहेब आपणही कृपा करून निघून जाल का !"

"प्यारे दमीत्रि फ्योदरोविच," त्रिफोन बोरिस्सोविच म्हणाला, "तुम्ही हरलात तो पैसा त्यांना द्यायला लावा. तो तुमच्याकडून त्यांनी चोरल्यासारखाच आहे."

"मला माझे पन्नास रुबल परत नको आहेत," काल्गानफने एकदम जाहीर केले.

"मलाही माझे दोनशे नको आहेत," मीत्या म्हणाला," काही झालं तरी मी ते घेणार नाही ! त्याला समाधान म्हणून ते राहू देत त्याच्याकडं."

"शाब्बास मीत्या ! तू दिलदार आहेस, मीत्या !" ग्रूशिंका बोलली, अन् तिच्या त्या उद्गारात भयानक रागाची छटा होती.

तो बुटका गृहस्थ, रागाने लालबुंद होऊन, आणि तरी त्यातही स्वतःच्या प्रतिष्ठेची जाणीव ठेवून, दरवाज्याकडे निघाला पण मध्येच तो थांबला अन् ग्रूशिंकाला उद्देशून एकदम बोलला :

"बाईसाहेब, माझ्या बरोबर तुम्हाला यायचं असलं तर चला. नसेल तर, रामराम."

संतापाने अन् आत्मप्रतिष्ठेच्या भावनेने फुलून जाऊन तो दरवाज्याकडे गेला. हा चारित्र्यवान् मनुष्य होता. स्वतःविषयी त्याचे इतके चांगले मत होते

की, इतके घडल्यानंतरसुद्धा, ती आपल्याशी लग्न करील अशी अजून त्याची कल्पना होती. मीत्याने तो जाताच दरवाजा धाडकन् लावला.

"कुलूप लाव," काल्गानधं म्हणाला; पण दुसऱ्या बाजूने किल्ली फिरल्याचा आवाज आला, त्यांनी तिकडूनच तो बंद केला होता.

"हे उत्तम झालं!" ग्रूशिंका कठोरपणे बोलली, "छान प्रायश्चित्त मिळालं!"

८

भ्रम

यानंतर जे घडले तो सारा दारू पिऊन केलेला मौजमजेचा धिंगाणा होता, मेजवानी होती न् तिला सर्वांना निमंत्रण होते. पहिल्या प्रथम ग्रूशिंकाने दारू मागविली.

"मला पिण्याची इच्छा आहे. मला पिऊन अगदी बेहोष व्हावंसं वाटतंय, जसे आपण मागं झालो होतो तसं. आठवतं तुला मीत्या, आपण गेल्या खेपेला इथंच कशी दोस्ती केली होती. आठवतं तुला?"

मीत्या स्वतःच जवळ जवळ उन्मादवायू झाल्याच्या अवस्थेत होता. आपले सुख आता हाताशी आहे असे त्याला वाटत होते. पण ग्रूशिंका त्याला एकसारखे आपल्यापासून दूर पाठवीत होती.

"जाऊन मौज कर. त्यांना नाचायला, मजा करायला सांग. जसं आपण गेल्या खेपेला करायला लावलं होतं ना तसं. घरादारासकट सारं नाचायला लागू दे," ती एकसारखे म्हणत राहिली. ती अत्यंत उत्तेजित झालेली होती. अन् मीत्या तिचा शब्द खाली पडू देत नव्हता. वृंदगायन शेजारच्या खोलीत चालले होते. त्या वेळपर्यंत ते ज्या खोलीत बसले होते ती फारच लहान होती, आणि मध्ये कापडाचे पडदे लावून तिचे दोन भाग केले होते, त्या पडद्यांमागे एक भला मोठा बिछाना होता आणि त्यावर पिसांची फुगीर गादी आणि रूई भरलेल्या उशांची रास होती. खाणावळीत आलेल्या गिऱ्हाइकांकरता चार खोल्यांत बिछाने होते. ग्रूशिंकाने दारातच आपली बैठक मांडली. मीत्याने तिच्याकरिता आरामखुर्ची आणून ठेवली. त्याच जागी ती 'मागच्या खेपेला' नाच न् गाणे पाहायला बसली होती, अन् त्यांनी मौजमजा केली होती. या वेळी आलेल्या सगळ्या मुली त्याही वेळी आलेल्या होत्या; फिड्ल् अन् तंतुवाद्ये यांच्यासह ज्यूंचा ताफाही आला होता, आणि बराच वेळ जिच्या वाटेकडे डोळे लागले होते ती गाडीही अखेर मद्य अन् इतर सामान घेऊन येऊन पोचली.

मीत्या इकडेतिकडे धावपळ करीत होता. सर्व तऱ्हेचे लोक, शेतकरी अन् त्यांच्या बायका ते सर्व पाहण्यासाठी त्या खोलीत यायला लागले होते; त्या सर्वांना

झोपेतून उठविले होते आणि एक महिन्यापूर्वी जशी अतिशय मजेदार करमणूक त्यांना लुटायला मिळाली होती तशीच दुसऱ्यांदा लुटायला मिळेल अशा आशेने त्यांना इकडे ओढून आणले होते. मीत्याला त्यांचे चेहरे आठवत होते, तो ज्यांना ओळखीत होता. त्या प्रत्येकाचे स्वागत करून त्यांना भेटत होता. तो बाटल्यांची बुचे काढून जो कोणी पुढे येई त्या प्रत्येकाला दारू ओतून देत होता. फक्त मुली तेवढ्या शांपेनसाठी उत्कंठित होत्या. पुरुष रम्, ब्रँडी आणि सर्वांहून अधिक म्हणजे गरम पंच पेय पसंत करीत होते. मीत्याने चाकोलेट पेय सर्व मुलींच्याकरिता तयार करून ठेवले होते, आणि चहा अन् पंच प्रत्येकाने आपल्याला हवे तसे घ्यावेत याकरता तीन समोवार रात्रभर उकळत ठेवायला सांगितले होते.

मग शेंडाबुडखा नसलेला अस्ताव्यस्त असा गडबड गोंधळ माजला, पण मीत्या अगदी आपल्या नैसर्गिक रंगात होता, अन् जितका मूर्खपणा त्या गोंधळात येत होता तितकी त्याच्या उत्साहाला भरती येत होती. त्यावेळी खेडुतांनी जर त्याच्याकडे पैसे मागितले असते तर त्याने आपल्या नोटा बाहेर काढल्या असत्या अन् त्यांना वाटेल तशा वाटून टाकल्या असत्या. आणि म्हणूनच बहुधा खाणावळ मालक, त्रिफोन बोरिस्सोविच, त्याचे रक्षण करण्याकरिता त्याच्या भोवती भोवती सारखा राहात होता. त्याने त्या रात्री झोप घेण्याचा विचारच सोडून दिला असावा; त्याने थोडेसे मद्य घातलेले सरबत घेतले, अन् आपल्या परीने तो मीत्याचे हितरक्षण करण्यासाठी दक्ष राहू लागला. तो बरोबर वेळेला मध्ये पडे अन् नम्रपणे मीत्याची मिनतवारी करून ' सिगार अन् व्हाइन मद्य ' अन् सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पैसे शेतकऱ्यांना, मागच्या सेवेप्रमाणे, वाटेल तसे न वाटण्याबद्दल त्याचे मन वळवी. शेतकऱ्यांच्या पोरी मद्य पीत होत्या अन् मिठाई खात होत्या याचाही त्याला राग येत होता.

" त्यांच्या केसात उवा भरल्या आहेत, दमीत्रि फयोदरोविच, " तो म्हणाला. " त्यांना एकेकीला मी लाथ देईन अन् त्यात आपला बहुमान झाला असं त्या मानतील हीच त्यांची लायकी ! "

मीत्याला पुन्हा आंद्रेची आठवण झाली, अन् त्याने त्याच्याकडे मद्य घातलेले सरबत पाठवायला सांगितले. " मी मघाशी त्याच्याशी उर्मटपणाने वागलो." तो खोल गेलेल्या, मृदू आवाजात एकसारखा म्हणत राहिला. काल्गानफला प्यायची मुळीच इच्छा नव्हती, आणि पहिल्या पहिल्याने त्या मुलींच्या गाण्याची तर त्याला मुळीच फिकीर वाटली नाही; पण शांपेनचे दोन पेले झोकल्या-नंतर त्याला विलक्षण उत्साह आला, तो खोलीत इकडे तिकडे फिरू लागला, वाद्य-संगीताचे न् गाण्याचे हसत हसत कौतुक करू लागला, प्रत्येकाची न् प्रत्येक गोष्टीची प्रशंसा करू लागला. मॅक्झिमफ पिऊन ढेर झाला होता, त्याने आपली जागा सोडली

नाही. ग्रूशिंकासुद्धा पिऊन बेहोष व्हायला लागली होती. काल्गानफकडे बोट करून ती मीत्याला म्हणाली,

"किती प्यारा प्यारा मोहक पोरगा आहे !"

आणि मीत्या आनंदून काल्गानफचे अन् मॅक्झिमफचे चुंबन घ्यायला धावला. अहाहा, केवढ्या त्याच्या आशा फुलल्या होत्या ! ती अजून काहीच बोलली नव्हती, आणि खरोखर मुद्दामच बोलण्याचे टाळीत असावीसे दिसत होते. पण मधून मधून ती त्याच्याकडे लाडिक अन् प्रेमपूर्ण नजरेने पाहात होती. शेवटी तिने एकदम त्याचा हात पकडला अन् त्याला जोराने आपल्याकडे ओढले. ती त्यावेळी दाराजवळच्या बैठ्या खुर्चीवर बसली होती.

"तू या वेळी कसा आलास रे ? कसा तू आत आलास !...मला बाई भीतीच वाटली. तेव्हा मला त्याला देऊन टाकणार होतास, होय ना ! खरंच तुझी तशी इच्छा होती ?"

"मला तुझ्या सुखात बिघाड आणायचा नव्हता !" मीत्या अत्यानंदाने अडखळत बोलत होता. पण तिला त्याचे उत्तर नकोच होते.

"बरं, जा अन् मौज कर..." तिने त्याला परत आपल्यापासून दूर पाठवून दिले. "रडायचं नाही, मी तुला परत बोलावीन ना."

तो धावत जाई, आणि ती गाणे ऐके अन् चाललेला नाच पाही, पण तिचे डोळे तो जिकडे जिकडे जाई तिकडे त्याच्या मागोमाग जात. पंधरा मिनिटे झाली की ती पुन्हा त्याला बोलावी अन् तो पुन्हा तिच्याकडे धावत येई.

"ये, माझ्याजवळ बैस, मला सांग, तुला माझ्याबद्दल, अन् मी काल इकडं आले ते कसं कळलं ? कुणाकडून पहिल्यांदा तू ते ऐकलंस ?"

आणि मीत्या तिला सर्व हकीकत तुटक तुटक, असंबद्ध, आवेगाने सांगू लागला. तो विचित्रपणे पुष्कळ वेळा कपाळाला आठ्या घालून अन् मध्येच थांबत, बोलत होता.

"तू कपाळाला आठ्या कशासाठी घालतो आहेस ?" तिने विचारले.

"काही नाही... मी तिकडं एका माणसाला आजारी सोडून आलोय. तो बरा व्हावा म्हणून, तो बरा आहे हे कळण्यासाठी, माझ्या आयुष्याची दहा वर्षे द्यायला मी तयार आहे !"

"बरं, तो आजारी असला तरी काळजी करू नको. म्हणजे तू उद्या स्वतः स्वतःवर गोळी झाडून घेणार होतास म्हणायचा ! किती मूर्ख रे मुलगा तू ! कशासाठी ? मला तुझ्यासारखी अविचारी माणसं भारी आवडतात," ती बोबडे बोबडे अडखळत्या जिभेने बोलत होती. "हं, म्हणजे तू माझ्यासाठी वाट्टेल ते करशील, नाही का रे, खुळ्या ! अहं, थोडा वेळ थांब. मी तुला उद्या काही तरी सांगेन. आज नाही सांगणार, उद्या हं. तुला मी ते आज सांगावं वाटतंय ? अहं,

मला नाही ते आज सांगायचं. चल, जा आता तिकडं अन् करमणूक करून घे स्वतःची."

पण एकदा तिने त्याला जणू कोड्यात पडल्याप्रमाणे अन् अस्वस्थ होऊन बोलावले.

" तू इतका दुःखी का आहेस ? तू दुःखी आहेस असं मला दिसतं... होय, खरंच दिसतं," ती जिव्हाळ्याने त्याच्या डोळ्यात डोळे भिडवून म्हणाली, " जरी तू त्या खेडूताचं चुंबन घेत असलास अन् आरडाओरडा करीत असलास, तरी मला काही तरी दिसतंय. अंहं, आनंदित हो. मी कशी आनंदात आहे; तूही आनंदित हो... माझं इथं कुणावर तरी प्रेम आहे. कोण आहे ते ओळख. अरेरे, बघ, तो माझा पोरगा झोपी गेला. गरीब बापडा, तो पिऊन बेहोष झाला आहे."

ती काल्गानफविषयी बोलत होती.तो खरोखरच पिऊन बेहोष झाला होता अन् क्षणभर त्याला कोचावर बसल्या बसल्या झोप लागली होती. पण तो केवळ मद्यान् पेंगुळला नव्हता; त्याला एकदम उदासवाणे, किंवा तो म्हणाला तसे ' कंटाळून गेल्याप्रमाणं ' वाटत होते. तो त्या मुलींच्या गाण्यांनी अतिशयच निरुत्साही झाला होता, अन् पिणे जसे-जसे चालू राहिले तसतशी ती गाणी अधिक नीरस अन् अधिक बनेल होऊ लागली. अन् नाचही तितकेच वाईट होते. दोन मुलींनी अस्वलांचा वेष बेताल होता आणि स्तेपानिदा नावाची एक चलाख मुलगी, आपल्या हातात छडी घेऊन दरवेश्याची भूमिका बजावीत होती अन् " त्यांचा तमाशा ' दाखवीत होती.

" मार्या, चलाखी कर, नाहीतर तुला छडी मिळेल ! "

ती अस्वले शेवटी जमिनीवर लोळू लागली, ती अगदीच न शोभणाऱ्या रीतीने, पण दाटीवाटीने जमलेल्या स्त्री-पुरुषांच्या जमावातून मात्र मोठमोठ्याने हसण्याचे फवारे उडत होते.

" हसू दे त्यांना, हसू दे ! " अर्थपूर्ण रीतीने ग्रूशिंका म्हणाली, तिच्या मुद्रेवर उद्दीपित भावनेचा ठसा उमटलेला होता. " त्यांना मौजमजा करायला कधी मिळत नाही, लोकांनी आनंद का लुटू नये ? "

काल्गानफ जणू आपण घाणीत लिडबिडलो असावे असा चेहरा करून होता.

" हा खेडूतांचा सारा वेडगळपणा ओंगळ आहे," तो तिथून बाजूला होत पुटपुटला; " उन्हाळ्यात जेव्हा रात्रभर प्रकाश असतो तेव्हा खेळायचे हे खेळ."

त्याला विशेषतः एका नाचाच्या चालीवर बसविलेले ' नव 'गीत आवडले नाही. त्यात एक गृहस्थ येतो अन् मुलींच्या बाबतीत आपलं नशीब अजमावतो, त्या आपल्यावर प्रेम करतात की नाही ते तो पाहतो, असे वर्णन होते.

" धनी मुलींना अजमावया आला
त्या माझ्यावर प्रेम करतील का, की नाहीत करणार ?

पण मुलींचे धन्यावर प्रेम बसले नाही.

“ निष्ठुरतेनं मारील मजला
नको ग बाई दादला असला ! ”

मग एक जिप्सी येतो अन् तोही प्रयत्न करू पाहतो.

“ जिप्सी मुलींना अजमावया आला
भाळतील मज की पळतील म्हणाला ? ”

पण त्यांना तो जिप्सीसुद्धा आवडला नाही.

“ भय वाटे तो चोरची असेल
मम नयनातून पाणी काढील ”

आणि अशी पुष्कळ माणसे आपले नशीब अजमावयाला येऊन गेली, त्यात एक लष्करातला शिपाई होता.

“ शिपाई मुलींना अजमावया आला,
भाळतील मज की पळतील म्हणाला ? ”

पण शिपायाला त्या तिटकाऱ्याने झिडकारून टाकतात ते दोन अश्लील कडव्यांत सांगितले आहे, कसलाही आडपडदा न ठेवता ती कडवी म्हटली जातात. अन् श्रोतृ–समुदायात हसण्याचा एकच कल्लोळ उसळतो. या गाण्याच्या शेवटी एक व्यापारी येतो.

“ व्यापारी मुलींना अजमावया आला,
भाळतील मज की पळतील म्हणाला. ”

अन् तो त्यांचे प्रेम जिंकतोसे दिसते, कारण,

“ व्यापारी मजला सोने देईल आणून
आनंदाने मी राणी तयाची होईन ”

काल्गानफला खरोखर संताप चढला.

“ हे गाणं मागच्या काळातलं आहे,” तो मोठ्याने म्हणाला. “ कोण असल्या गोष्टी यांच्यासाठी लिहितो ? यात आपलं नशीब मुलींच्या बाबतीत अजमावायला एक रेल्वेचा माणूस आला किंवा एक ज्यू आला असंही घालता आलं असतं; त्यांना साऱ्यावरच मात करता आली असती की.”

आणि, जणू हा स्वतःचा वैयक्तिक अपमान असावा तसे त्याने तिथल्या तिथेच आपण अगदी कंटाळून गेलो असे सांगितले. अन् तो कोचावर बसला आणि लगेच झोपी गेला. त्याचे सुरेख चिमुकले तोंड मागे कोचाच्या उशीवर पडले तेव्हा ते काहीसे फिके दिसले.

“ बघ किती सुरेख दिसतो आहे तो,” ग्रूशिंका मीत्याला त्याच्यापाशी घेऊन जाऊन म्हणाली. “ आत्ताच मी त्याचे केस विंचरीत होते; त्याचे केस कसे तागाच्या धाग्यासारखे आहेत, अन् इतके दाट...”

अन् त्याच्या तोंडावर ममतेने वाकून, तिने त्याच्या कपाळाचे चुंबन घेतले. काल्गानफने पटकन् डोळे उघडले, तिच्याकडे पाहिले, तो उभा राहिला, अन् अतिशय काळजीच्या स्वरात त्याने मॅक्झिमफ कुठे आहे याची चौकशी केली.

" म्हणजे तुला तो हवा आहे, " ग्रूशिंका हसली. " माझ्यापाशी मिनिट-भर थांब. मीत्या, पळ अन् याचा मॅक्झिमफ शोधून आण."

मॅक्झिमफला मुलींच्यापासून दूर व्हावेसे वाटत नव्हते असे दिसले, तो मधून मधून स्वतःसाठी पेल्यात दारू ओतून घ्यायलाच तेवढा धावत होता. त्याने चाकोलेट पेयाचे दोन पेले घेतले होते. त्याचा चेहरा लाल झाला होता, अन् नाक लालसर झाले होते. डोळे ओलसर झाले होते, अन् शिसारी येण्याइतकं प्रेमळ दिसत होते. त्याने धावत येऊन जाहीर केले की आपण 'सॅबोतियेर' नाच नाचून दाखवणार आहोत.

" मी लहान असताना हे सारे सुसंस्कृत, उच्च दर्जाचे नाच शिकलो होतो..."

" जा, जा त्याच्याबरोबर मीत्या, मी इथूनच तो कसा नाचतो ते पाहते, " ग्रूशिंका म्हणाली.

" नाही, नाही, मी पण पाहायला येणार आहे." काल्गानफ म्हणाला, ग्रूशिंकाने त्याला आपल्याजवळ बसायला सांगितले. ते त्याने अत्यंत अकृत्रिम सहजपणे बाजूला सारले. ते सगळेच पाहायला गेले. मॅक्झिमफने नाच करून दाखविला. पण मीत्याखेरीज तो कुणालाच कौतुक करण्याजोगा वाटला नाही. त्यात उड्या मारणे न् लंगडणे, पाय झाडणे या खेरीज काहीच नव्हते, अन् प्रत्येक उडीला मॅक्झिमफ आपल्या पायाच्या वर केलेल्या तळव्यावर थापड मारी. काल्गामफला तर तो बिल्कूल आवडला नाही, पण मीत्याने त्याचे चुंबन घेतले.

" आभार, तुम्ही थकले असाल कदाचित! काय पाहाताहात तुम्ही इकडे? तुम्हाला काही मिठाई हवी? की सिगार पाहिजे?"

" एक सिगारेट."

" एखादं पेय नको का?"

" मी फक्त थोडी लिकर घेईन...तुमच्याकडं, चाकोलेटे आहेत का?"

" हो, तो तिकडं टेबलावर ढीग पडलाय त्यांचा. कोणतंही घे, माझ्या प्रिय जीवा."

" मला व्हॅनिलाचं आवडतं....म्हाताऱ्याकरिता असतं ते, हॅ—हॅ!"

" नाही, भाई, तसली खास प्रकारची नाहीत आमच्याकडं."

" हे पहा, " तो म्हातारा मीत्याच्या कानात हळूच काही सांगण्याकरिता खाली वाकला, " ती तिकडे पोरगी आहे ती छोटी मार्या, हॅ—हॅ! तिच्याशी माझी मैत्री जमवून द्यायला तुम्हाला कसं वाटेल?"

"हं, म्हणजे तुम्हाला ते हवंय तर! अहं, भाई, ते नाही चालायचं!"

"मी कुणालाही मुळीसुद्धा धक्का लावणार नाही," मॅक्झिमफ अस्वस्थ होऊन तोंडातल्या तोंडात म्हणाला.

"हां, ठीक आहे, ठीक आहे. त्या इथं फक्त नाच करण्यासाठी अन् गाण्यासाठी येतात, समजलं भाई. पण मरू दे सारं, थोडं थांबा! ...तोवर खा, प्या मजा करा, तुम्हाला पैसे नकोत?"

"पुढं लागतील, कदाचित" मॅक्झिमफ हसून म्हणाला.

"बरं, बरं..."

मीत्त्याचे डोळे जळजळत होते. तो बाहेरच्या लाकडी बाल्कनीकडे गेला, ती बाल्कनी त्या इमारतीच्या आतल्या बाजूला सभोवार होती अन् तिच्या पुढ्यात अंगण होते. बाहेरच्या ताज्या हवेने त्याला उल्हसित वाटले. तो एकटाच अंधाऱ्या कोपऱ्यात उभा राहिला, अन् एकदम त्याने आपले डोके आपल्या हातांनी दाबून धरले. त्याचे विस्कळित झालेले विचार एकत्र आले; त्याच्या मनःसंवेदना एकात एक मिळून त्यांचे एक पूर्ण चित्र बनले अन् अकस्मात एक प्रकाश—किरण त्याच्या अंतःकरणात पडला. भीतिदायक अन् भयंकर होता तो प्रकाश! "मला जर स्वतःवर गोळी झाडून घ्यायची असेल तर ती आताच का नाही?" त्याच्या मनात येऊन गेले. "आत जाऊन पिस्तुलं घ्यावीत, ती इथं आणावीत, आणि इथं या अंधारात, या घाणेरड्या कोपऱ्यात स्वतःचा अंत का करून घेऊ नये?" जवळजवळ एक मिनिटभर तो तसाच अनिश्चित मनःस्थितीत राहिला. काही तासांपूर्वी तो जेव्हा मोक्रोयकडे वेगाने येत होता, तेव्हा एक कलंक, त्यानं चोरी केली होती हा, अन् ते रक्त, ते रक्त! त्याचा पाठलाग करीत येत होतं.....पण त्या वेळी त्याला इतके ते दुःसह झाले नव्हते. त्या वेळी सर्व काही संपले होते. तो तिला पूर्णपणे मुकला होता, तिची आशा त्याने सोडून दिली होती. ती त्याच्या हातातून कायमची निघून गेली होती हं; त्या वेळी त्याची देहांत शिक्षा त्याला सुसह्य होती; निदान ती आवश्यक, अपरिहार्य वाटत होती. कशासाठी जगात आपण जिवंत राहायचं!

पण आता? त्यावेळची परिस्थिती आता होती का? या वेळी एक कल्पनेचे भूत, एक भय तरी निदान संपलेले होते. तो तिच्यावर हक्क असलेला पहिला प्रियकर, ती आपले नशीब ठरवून टाकणारी आकृती नाहीशी झाली होती, तिची खूणसुद्धा मागे राहिली नव्हती. ते भयंकर कल्पनेचे भूत अत्यंत तुच्छ, अत्यंत हास्यास्पद ठरले होते; त्याला झोपण्याच्या खोलीत नेऊन तिथेच कुलुपात बंद करण्यात आले होते. ते आता कधीच परत येणार नव्हते. तिला शरम वाटली होती. अन् तिच्या डोळ्यांवरून तिचे आता कुणावर प्रेम आहे हे त्याला कळत होते. आता जीवन सुखी करण्याजोगे सर्व काही त्याच्यापाशी होते...पण त्याला जिवंत राहणे शक्य नव्हते, शक्य नव्हते; अरेरे, नरकवास! "हे प्रभो! मी कुंपणाच्या भिंतीपाशी हाणलं त्या माणसाला

जिवंत ठेव! हा भयानक पेला माझ्यापासून दूर जाऊ दे! पण तो म्हातारा जिवंत असला तर काय? हा, मग तो दुसरा कलंक मी पुसून काढीन. मी तो चोरलेला पैसा परत देईन. तो मी परत करीन; मी तो कसाही मिळवीन... त्या लाजिरवाण्या कृत्याचा मागमूसही हायचारानाही, फक्त तो माझ्या अंतःकरणात मात्र चिरकाल राहील! पण नाही, नाही; आः, कधी खरी न होणारी भ्याडपणाची स्वप्नं! अरेरे, नरकवास!"

तरी त्याच्या या अंधारात एक प्रकाशाचा अन् आशेचा किरण होता. त्याने उसळी मारली अन् तो खोलीकडे धावत गेला. तिच्याकडे,– तिच्याकडे, त्याच्या चिरकालच्या राणीकडे! तिच्या एक क्षणाच्या प्रेमावरून सारे आयुष्य, कलंकाच्या यातना होत असतानासुद्धा, ओवाळून टाकण्यासारखे नाही का? या अविचारी प्रश्नाने त्याच्या अंतःकरणाची पकड घेतली. "ती, तीच सर्वस्व, तिला पाहणं, तिचं बोलणं ऐकणं, दुसऱ्या कशाचाही विचार न करणं, सगळं विसरून जाणं, मग ते या रात्रीपुरतं, एका तासापुरतं, एक क्षणापुरतं का असेना!" तो बाल्कनीकडून परत फिरून वाटेवर येत असतानाच त्याला खाणावळीचा मालक, त्रिफोन बोरिस्सोविच भेटला. तो खिन्न अन् त्रस्त दिसत असल्यासारखा वाटला, अन् आपल्यालाच तो शोधीत आला असावा असे त्याला वाटले.

"काय आहे, त्रिफोन बोरिस्सोविच? तुम्ही मला पाहाताहात काय?"

"नाही, साहेब." तो खाणावळवाला घाबरलेला दिसत होता. "तुम्हाला कशाला पाहायला येऊ? तुम्ही कुठं होता?"

"तुम्ही इतके खिन्न का दिसता? तुम्ही रागावलात तर नाही? थांबा थोडं, तुम्हाला लवकरच झोपायला जाता येईल...किती वाजले?"

"तीन वाजले असतील...तीन वाजून गेले असतील कदाचित."

"आम्ही लवकरच जाऊ, आम्ही जाऊ हं."

"ते बोलू नका; त्याचं काही नाही. तुम्हाला हवं तितका वेळ तुमचं चालू द्या..."

"याला काय झालंय?" मीत्याला क्षणभर शंका वाटली अन् तो जिथे मुली नाचत होत्या तिकडे धावत गेला. पण ती तिथे नव्हती. ती निळ्या खोलीतही नव्हती; तिथे काल्गानफशिवाय कोणीच नव्हते. तोच एकटा कोचावर झोपी गेला होता. मीत्याने पडद्याच्या मागे डोकावून बघितले— ती तिथे होती. ती कोपऱ्यात एका ट्रंकेवर बसलेली होती. पुढे वाकून तिने आपले डोके अन् हात बिछान्यावर झुळविले होते, ती ढसढसा रडत होती, आपले हुंदके कोणाला ऐकू जाऊ नयेत म्हणून दाबून धरण्याचा ती आटोकाट प्रयत्न करीत होती. मीत्याला पाहाताच तिने त्याला आपल्याकडे बोलावले, अन् तो तिच्याकडे धावत जाताच तिने त्याचा हात आवळून धरला.

"मीत्या, मीत्या, माझं त्याच्यावर प्रेम होतं रे. ही पाच वर्षं, इतका काळ मी त्याच्यावर किती प्रेम केलं! माझं त्याच्यावर प्रेम होतं की माझ्या क्रोधावर? नाही, त्याच्यावर, त्याच्यावर! माझं माझ्या क्रोधावर प्रेम होतं, त्याच्यावर नव्हतं हे खोटं आहे. मीत्या, मी त्या वेळी फक्त सतरा वर्षांची होते; तो माझ्याशी इतका प्रेमळपणानं, इतक्या मजेनं वागे; तो मला गाणी म्हणून दाखवी... किंवा तसं निदान माझ्यासारख्या वेडपट मुलीला वाटत होतं.... अन् आता, देवा देवा, तो तो माणूस नाही. त्याचा चेहेरासुद्धा तसा राहिलेला नाही; तो पूर्णपणे बदलून गेलाय. मी त्याला ओळखलंसुद्धा नसतं रे. मी इथं तिमोफीच्या गाडीतून आले, अन् रस्ताभर त्याला कसं भेटावं, कसं त्याच्याशी बोलावं, एकमेकांकडं कसं पाहावं, असा माझा विचार चालला होता. माझा जीव कसा गुदमरल्यासारखा झाला होता, आणि एकाएकी त्यानं जणू माझ्यावर घाण पाण्याचं भांडं रितं करावं तसं झालं. तो माझ्याशी एखाद्या पंतोजीप्रमाणं बोलला, अगदी गंभीरपणे अन् विद्वत्तापूर्ण; तो मला इतक्या गंभीर चेहेऱ्यानं भेटला की मी आश्चर्यानं थक्कच झाले. त्याचा एक शब्दसुद्धा माझ्या कानात उतरला नाही. पहिल्याप्रथम मला वाटलं, त्याला त्या ताडमाड पोलपुढं बोलायची लाज वाटत असेल. मी त्याच्याकडं टक लावून पाहात बसले अन् आता एक शब्दसुद्धा त्याच्याशी बोलावंसं मला का वाटत नाही याचं मला नवल वाटतं. त्याच्या बायकोनं त्याचा सत्यानाश केला असला पाहिजे; माहीत आहे, त्यानं लग्न करण्याकरिता मला टाकून दिलं. तिनंच त्याला असा बदलून टाकला. मीत्या, किती हे लाजिरवाणं रे! मीत्या, मला लाज वाटते, मला भयंकर लाज वाटते! जळली, मेली ती पाच वर्षं!"

आणि पुन्हा तिचे डोळे पाण्याने भरले, पण मीत्याच्या हाताला ती घट्ट धरून राहिली अन् तिने तो सोडला नाही.

"मीत्या, लाडक्या, थांब ना, जाऊ नकोस ना. मला एक तुला सांगायचंय," ती हळूच कुजबुजली, अन् चटकन् आपले तोंड वर करून ती म्हणाली, "ऐक, कुणावर बरं माझं प्रेम आहे? माझं इथल्या एका माणसावर प्रेम आहे. कोण बरं तो माणूस? ते मला तू सांगितलं पाहिजेस."

रडून रडून सुजलेला तिचा चेहेरा स्मिताने उजळला अन् तिचे डोळे त्या अर्धवट अंधारात चमकू लागले.

"एक ससाणा एकदम आत घुसला अन् माझं हृदय खचलं. 'खुळे! हाच तो माणूस तू प्रेम करतेस तो!' असं माझं हृदय एकदम माझ्याशी कुजबुजलं. तू आत आलास अन् सारं कसं झगझगीत झाल्यासारखं वाटलं. हा भितो कशाला? असं मला वाटलं. कारण तू भ्याला होतास; तुला बोलवत नव्हतं. त्यांचं नाही याला भय वाटत—कुणाचं कधी तुला भय वाटलंय? हा मलाच भितो आहे, मलाच, असं माझ्या मनात आलं. हं, म्हणजे फेनियानं तुला सांगितलं का, काय रे

वेड्या खुळ्या, मी आल्योशाला खिडकीतून हाक मारून सांगितलं की मी मित्येन्कावर एक तास प्रेम केलं होतं अन् आता मी प्रेम करायला चालले आहे.... दुसऱ्यावर म्हणून! मीत्या, मीत्या तुझ्यावर प्रेम केल्यानंतर दुसऱ्यावर प्रेम करणं मला शक्य आहे असं माझ्या मनात येण्याइतकी मूर्ख मी कशी रे झाले? मला क्षमा करशील, मीत्या? मला तू क्षमा करशील की नाही? तुझं माझ्यावर प्रेम आहे? तुझं माझ्यावर प्रेम आहे?" ती एकदम उठून उभी राहिली न् आपल्या दोन्ही हातांनी तिने त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला धरले. मीत्याने हर्षोन्मादाने चुंबन घेऊन, तिच्या डोळ्यांत नजर लावली. तिच्या मुखाकडे पाहिले, तिचे स्मित पाहिले, अन् एकदम आपल्या बाहूंत तिला कवटाळून तिची आवेगाने चुंबने घेतली.

"तुझा छळ केल्याबद्दल मला तू क्षमा करशील? मी खुनशीपणानं तुम्हा सर्वांचा छळ केला. खुनशीपणामुळंच मी त्या म्हाताऱ्याचं माथं भडकवलं...आठवतं तुला एक दिवस तू माझ्याकडं कसा प्यालास अन् ग्लास कसा फोडलास ते? मला ते आठवलं अन् मी आज एक ग्लास फोडला अन् 'माझ्या नीच हृदयाच्या' नावानं प्याले. मीत्या, माझ्या ससाण्या, माझं चुंबन का नाही घेत तू? एकदाच चुंबन घेतलं, अन् आता हा तोंड मागं घेऊन पाहातोय अन् ऐकतोय. माझं काय ऐकायचंय? मुका घे माझा, मुका घे ना माझा दाबून, अस्सा. जर तू प्रेम करतोस, तर मग कर प्रेम! मी आता तुझी दासी, आयुष्यभर तुझी दासी होईन. दासी होणं फार चांगलं. माझं चुंबन घे! मला मार, मला वाटेल तसं वागव, माझं काय हवं ते कर. ते सारं सोसण्याच्याच लायकीची मी आहे. अं हं, जरा थांब, मागाहून, आता नाही ते..." तिनं त्याला एकदम दूर ढकलून दिलं. "जा, मीत्या मी तिकडं येते न् थोडी दारू घेते, मला झिंगून जायचं आहे, मला पिऊन झिंगायचं आहे अन् नाचायचं आहे; हो, हो!" तिनं त्याच्यापासून स्वतःला दूर केले अन् ती पडद्याच्या मागे गेली. मीत्या दारू प्यालेल्या माणसासारखा तिच्या मागे गेला.

"हो, काय वाटेल ते होवो– काय वाटेल ते आता झालं, तरी एका मिनिटाकरीता मी सारी दुनिया द्यायला तयार आहे," त्याच्या मनात आले. ग्रूशिंकाने खरोखरच शांपेनचा एक सबंध ग्लास एकाच घोटात खलास केला, अन् ती एकदम बेहोष झाली. ती पूर्वीप्रमाणे त्याच खुर्चीवर जाऊन बसली, तिच्या चेहऱ्यावर अतिसंतुष्टतेचे स्मित होते. तिचे गाल चकाकत होते, तिचे ओठ जळत होते, तिचे चमकणारे डोळे ओले झाले होते; तिच्या नजरेत विकारांना आवाहन होते. काल्गानफलासुद्धा अंतःकरणात चळल्यासारखे वाटले अन् तो तिच्याकडे गेला.

"आत्ता तू झोपला होतास तेव्हा मी तुझं चुंबन घेतलेलं तुला कळलं?" ती जड स्वरानं बोलली. "मी आता झिंगलेली आहे, हो, झिंगलेलीच आहे.... अन् तू नाही झिंगलास? अन् मीत्या का नाही पीत? तू का नाही पीत रे मीत्या? मी पिऊन झिंगले, अन् तू नाही पीत...."

"मी झिंगलोय ! तसा मी झिंगलेलोच आहे... तुझ्या प्रेमाने झिंगलोय... अन् आता मी दारू घेऊन झिंगतो."

त्याने दुसरा एक पेला घेतला, आणि – त्याचे त्यालाच आश्चर्य वाटले–त्या पेल्याने तो पूर्ण बेहोष झाला. त्या वेळेपर्यंत तो भानावर होता त्याची त्याला आठवण होती, पण तो एकदम बेहोष झाला. त्या क्षणापासून वात झाल्याप्रमाणे सारे काही त्याच्या भोवती गरगर फिरू लागले. तो इकडे तिकडे गेला, हसू लागला, प्रत्येकाशी बोलू लागला, आपण काय करतो आहो हे न समजताच तो हे सारे करीत होता. फक्त एक अव्याहत जळती संवेदना सतत त्याला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत होती, "एखाद्या लालभडक निखाऱ्यासारखी अंतःकरण जाळीत होती" असे त्याने मागाहून सांगितले. तो तिच्यापाशी गेला, तिच्याजवळ बसला, तिच्याकडे त्याने पाहिले, तिचे बोलणे ऐकले.... ती फार बडबडायला लागली होती, प्रत्येकाला आपल्याकडे सारखी बोलावीत होती, अन् त्या मेळ्यातल्या निरनिराळ्या मुलींच्या नावाने हाका मारीत होती. ती मुलगी तिच्याकडे आली की ती तिचे चुंबन घेई किंवा तिच्यावर क्रूसाचे चिन्ह करी. दुसऱ्याच क्षणी ती रडायलाही लागली असती. 'त्या बुटक्या म्हाताऱ्या'ची तिला अतिशयच करमणूक झाली – म्हणजे मॅक्झिमफची. तो क्षणाक्षणाला तिच्या हाताचे, 'प्रत्येक नाजूक बोटाचं' चुंबन घ्यायला धावे. शेवटी एका जुन्या गाण्यावरचा दुसरा एक नाच त्याने सुरू केला. गाणे तो स्वतःच म्हणत होता. पुढच्या पालुपदावर विशेष जोर देऊन तो नाचत होता :

"चिमकुलं डुक्कर म्हणतं – म्हूं ! म्हूं ! म्हूं !
चिमकुलं वासरू म्हणतं – मू, मू, मू,
चिमकुलं बदक म्हणतं – क्वॅक, क्वॅक, क्वॅक,
चिमकुला हंस म्हणतो – गा, गा, गा,
कोंबडी कमानीखालून पकपक करीत जाते.
टूरू – रू – रू – रू – रू – रू, ती म्हणते,
टूरू – रू – रू – रू – रू – रू, म्हणते !"

"मीत्या, त्याला काही तरी दे," ग्रूशिंका म्हणाली, "त्याला काही इनाम दे, तो गरीब आहे, माहीत आहे तुला. अरेरे, ते बिचारे, ते अपमानित.... माहीत आहे तुला, मीत्या, मी जोगिणींच्या मठात जाणार आहे. अंहं, एक दिवस खरंच मी जाईन. आल्योशा आज जे काही मला म्हणाला ते मी माझ्या आयुष्यभर लक्षात ठेवीन.... हो... पण आज मात्र आपण नाचू या. उद्या मठात, पण आज आपण नाचायचं. भल्या लोकांनो, मला आज खेळावंसं वाटतंय, अन् त्याला काय झालं ? ईश्वर आपल्याला क्षमा करील. मी जर ईश्वर असते तर प्रत्येकाला क्षमा

केली असती. मी म्हणाले असते; माझ्या लाडक्या पाप्यांनो, आज या दिवसापासून मी तुम्हाला क्षमा करते.' मी क्षमेची भीक मागणार आहे : 'भल्या माणसांनो, मला क्षमा करा, मी एक वेडगळ पोरगी आहे. मी पशू आहे, हो, मी पशूच आहे. पण मला प्रार्थना करायची आहे. मी एक लहानसा कांदा दिलाय. मी दुष्ट होते, मला प्रार्थना करायची आहे. मीत्त्या, त्यांना नाचू दे, त्यांना थांबवू नको. जगात प्रत्येकजण भला आहे. प्रत्येकजण - अगदी त्यांच्यातला सर्वांत वाईट असेल तो सुद्धा. हे जग फार चांगलं ठिकाण आहे. आपण वाईट असलो तरी जग अगदी चांगलं आहे. आपण चांगले अन् वाईट आहोत, चांगले अन् वाईट... या अन् मला सांगा, मला तुम्हाला काही विचारायचं आहे; तुम्ही प्रत्येकजण इकडं या, 'अन् मी तुम्हाला विचारते : मी इतकी चांगली का? मी चांगली आहे हे तुम्हाला ठाऊक आहे. मी फार चांगली आहे.... बोला, मी इतकी चांगली का?"

ग्रूशिंका अशी बरळत राहिली, अन् अधिक अधिक पीत राहिली. शेवटी तिने जाहीर केले आपणसुद्धा नाचणार म्हणून. ती खुर्चीवरून लटपटत उठली. "मीत्त्या, मला आता बिलकुल दारू देऊ नकोस. मी मागितली तरी देऊ नकोस. दारू काही शांती देत नाही. सगळं कसं गरगर फिरतंय, ती चूलं अन् सगळं सगळं. मला नाचायचं आहे. मी कशी नाचते सगळेजण पाहा.... मी किती सुंदर नाच करते ते यांना पाहू दे...."

तिच्या मनात खरोखरचं नाचायचे होते. तिनं आपल्या खिशातून पांढरा तलम हातरुमाल बाहेर काढला, अन् त्याचा एक कोपरा आपल्या उजव्या हातात तिने नाचताना हलविण्यासाठी म्हणून धरला. मीत्त्या मागे-पुढे धावत होता, मुली गप्प होत्या, आणि पहिला इशारा मिळताच नाचाच्या गाण्याला एकदम सुरुवात करायला तयार होऊन बसल्या होत्या. ग्रूशिंका नाचायचे म्हणते ते कळताच, मॅक्सिमफ हर्षाने किंचाळला, अन् तिच्यापुढे उड्या मारीत धावत आला, तोंडाने तो गुणगुणत होता :

> "इतक्या सडपातळ पायांनी न् डौलदार अंगांनी
> आणि एवढीशी शेपटी करूनि वाकडी"

पण ग्रूशिंकाने आपला हातरुमाल हलवून त्याला तिथून घालवून दिले.

"इश! मीत्त्या, ही माणसं का नाही येत? प्रत्येकाला येऊ दे,...बघायला. ज्यांना कुलुपात टाकलंय त्यांनाही बोलवा आत...त्यांना आत कशाला कुलूप लावून ठेवलंस? सांग त्यांना, म्हणावं मी नाच करणार आहे. त्यांनाही बघत राहू दे..."

मीत्त्या अडखळत्या पावलांनी कुलूप लावलेल्या दारापाशी गेला अन् दारावर आपल्या मुठीनं ठोठावून आतल्या पोलांना बोलावू लागला.

"ओ, तुम्ही... पोव्हिसोत्स्क्यांनो! या, ती नाच करणार आहे. ती तुम्हांला बोलावते आहे."

"गावंढळ!" त्यातल्या एका पोलने उत्तरादाखल ओरडून उद्‌गार काढला.

"तूच स्वतः गावंढळ आहेस! तू एक क्षुद्र बदमाष आहेस. बदमाष आहेस तू."

"पोलंडचा उपहास करण्याचं सोडून दे," काल्गानफ ठसक्यात बोलला; तोही बेहोष झालेला होता.

"शांत हो, पोरा! त्याला मी बदमाष म्हटलं म्हणजे काही साऱ्या पोलंडला तसं म्हटलं नाही. एक गावंढळ म्हणजे काही पोलंड होत नाही. शांत हो, माझ्या मोहक पोरा, मिठाई खा."

"शी, कसली माणसं? ही जणू माणसं नव्हेतच. त्यांना मिळतं का नाही घेता येत?" ग्रूशिंका म्हणाली, अन् नाचण्यासाठी पुढे झाली. वृंद संगीत एकदम सुरू झाले—"अहा, माझ्या घराची कमान, माझ्या घराची नवी नवी कमान!" ग्रूशिंकाने आपले डोके एकदम मागे टाकले, आपले ओठ अर्धवट उघडले, ती हसली, आपला हातरुमाल तिने उडविला, आणि एकदम एका बाजूला झुकून जाऊन ती खोलीच्या मध्यावर जाऊन स्तब्ध उभी राहिली, ती गोंधळल्यासारखी दिसत होती.

"मला गळून गेल्यासारखं वाटतंय...." ती थकल्या स्वरात म्हणाली. "माफ करा मला....मला गळून गेल्यासारखं वाटतंय, नाही नाचू शकत....मला वाईट वाटतं."

तिने वाकून मेळ्याला वंदन केले आणि मग सर्व दिशांना ती वाकत सुटली.

"मला वाईट वाटतं... माफ करा...."

"बाई सारख्या पीत आहेत. सुरेख बाई सारख्या पीत आहेत," जिकडून तिकडून आवाज येऊ लागले.

"बाई फार प्यालेल्या आहेत," मॅक्झिमफने गालातल्या गालात हसत मुलींना समजावले.

"मीत्या, माझ्या हाताला धरून... मला ने," ग्रूशिंका असहाय होऊन म्हणाली. मीत्याने तिच्यावर झडप घालली, तिला आपल्या बाहूंत उचलून धरले अन् तो मोलाचा भार त्याने पडद्याआड नेला.

"बरं, आता आपण जावं," काल्गानफच्या मनात आले, अन् त्या निळ्या खोलीतून तो बाहेर पडला न् त्याने आपल्या मागे दाराच्या दोन्ही फळ्या लावल्या. पण मोठ्या खोलीतला धिंगाणा चालूच राहिला अन् तो अधिकाधिक मोठा मोठा होत गेला. मीत्याने ग्रूशिंकाला बिछान्यावर ठेवले अन् तिच्या ओठांचे चुंबन घेतले.

"मला हात लावू नको..." ती अडखळत, विनवणीच्या स्वरात त्याला

म्हणाली, 'मी तुझी होईपर्यंत मला हात नको लावूस... मी सांगितलं तुला मी तुझीच आहे म्हणून, पण मला हात लावू नकोस... दया कर माझ्यावर... ती मंडळी इथं आहेत, ती अगदी जवळच असताना, नको. तो इथं आहे. इथं कसं गलिच्छ आहे...."

"तुझी आज्ञा प्रमाण! मी ते मनातही आणणार नाही... तू माझी देवता आहेस!" मीत्या हलक्या स्वरात म्हणाला. "होय, इथं गलिच्छ वाटतं, अगदी नक्कोसं वाटतं."

अन् तशीच तिला आपल्या बाहूंत ठेवून, त्यानं त्या बिछान्यापाशी हळूहळू खाली गुडघे टेकले.

"मला माहीत आहे तू जरी पशू असलास तरी तू उदात्त मनाचा आहेस," ग्रूशिंका कष्टाने एक एक शब्द उच्चारीत होती. "ते प्रतिष्ठितपणानं झालं पाहिजे... ते भविष्यकाळी प्रतिष्ठितपणानंच होईल... अन् आपण इमानदार होऊ, आपण सद्गुणी होऊ, जनावरं नव्हे, सज्जन होऊ... मला घेऊन जा, दूर कुठंतरी घेऊन जा, ऐकलंस का? मला ते इथं नको व्हायला, दूर दूर कुठंतरी..."

"हो, बरोबर, बरोबर, तसंच झालं पाहिजे!" मीत्या तिला आपल्या बाहूंत कवटाळीत म्हणाला. "मी तुला घेऊन जाईन अन् आपण दूरदूर निघून जाऊ... ओ:, मी माझं सारं जीवन एका वर्षाकरता द्यायला तयार आहे, पण तेवढं त्या रक्ताबद्दल मला कळू दे!"

"कसलं रक्त?" ग्रूशिंकाने बावरून जाऊन विचारलं.

"काही नाही," मीत्या आपले दात घट्ट दाबून धरून म्हणाला. "ग्रुशा, तू म्हणतेस आपण इमानदार व्हायचं, पण मी तर चोर आहे. मी कात्याचे पैसे चोरले.... लांच्छन, केवढं लांच्छन!"

"कात्याचे, त्या तरुण बाईचे? अं हं, तू ते चोरले नाहीस. ते तिला परत देऊन टाक, माझ्याकडून घे...उगीच का त्याचा एवढा गाजावाजा करतोस? आता माझं जे काही आहे ते सारं तुझंच आहे. पैशाची काय एवढी मातबरी? आपण ते एवीतेवी उडवणारच आहोत. आपल्यासारखी सामान्य माणसं तो उडवणारच. पण आपण जाऊ या अन् शेतांत राबू या. मला माझ्या हातांनी जमीन खणायची इच्छा आहे. आपण काम केलं पाहिजे, ऐकलंस का? आल्योशा तसं म्हणाला. मी तुझी घरधनीण नाही होणार, तुझी गुलाम होईन, तुझ्यासाठी मी काम करीन. आपण त्या तरुण बाईकडं जाऊ अन् दोघं मिळून तिच्यापुढं वाकून तिला विनवू की आम्हाला क्षमा कर. अन् मग आपण निघून जाऊ. अन् जर तिनं नाही आपल्याला क्षमा केली ना, तरी आपण जाऊच. माझ्याकडं आहेत ते पैसे घे अन् माझ्यावर प्रेम कर... तिच्यावर नको प्रेम करू...तिच्यावर यापुढं प्रेम नको करूस. तू तिच्यावर प्रेम केलंस तर मी तिचा गळा दाबीन...मी तिचे दोन्ही डोळे सुईनं फोडून टाकीन...."

"माझं तुझ्यावर प्रेम आहे. माझं फक्त तुझ्यावरच प्रेम आहे. मी सैबेरियातसुद्धा तुझ्यावर प्रेम करीन...."

"सैबेरियात का? हरकत नाही, तुझी इच्छा असेल तर सैबेरियात. मला फिकीर नाही...आपण काम करू....सैबेरियात बर्फ असतं....बर्फात गाडी हाकणं मला आवडतं....अन् घंटा असल्या पाहिजेत बरं का....ऐकलीस, घंटा वाजते आहे ती? ही घंटा कुठं वाजते आहे? कुणीतरी माणसं येताहेत...आता ती थांबली."

तिने आपले डोळे थकून जाऊन मिटले, अन् एकदम ती क्षणभर झोपी गेली. घंटेचा आवाज दुरून येत होता खराच, पण तो आवाज थांबला होता. मीत्याने आपले डोके तिच्या छातीवर पडू दिले. घंटा वाजत असलेली थांबली हे त्याच्या लक्षात आले नाही, किंवा गाणी थांबली, अन् गाण्यांऐवजी अन् झिंगलेल्यांची बडबड कानी येण्याऐवजी घरात सामसूम झालेली आहे तेही त्याच्या लक्षात आले नाही. ग्रूशिंकाने आपले डोळे उघडले.

"काय हे? मी झोपले होते? हो...एक घंटा....मी झोपले होते अन् मला स्वप्न पडत होतं. मी बर्फावरून गाडी घेऊन चालले आहे, अन् मला डुलकी लागली. माझ्या प्रेमाच्या कोणातरी माणसाबरोबर, तुझ्याबरोबर मी होते. अन् दूर दूर होतो आपण. मी तुला घट्ट धरलं होतं न् तुझी चुंबनं घेऊन तुझ्या कुशीत आत-आत शिरत होते. मी गारठले होते, अन् बर्फ चकाकत होतं....रात्री चंद्र उगवला म्हणजे बर्फ कसं चकाकतं माहीत आहे तुला. मी जणू पृथ्वीवर नव्हतेच. जागी झाले न् बघते तर माझा प्रियकर माझ्या जवळच आहे. किती गोड...."

"तुझ्या लगत," मीत्या तिच्या अंगावरच्या कपड्याचे, तिच्या वक्षः-स्थळाचे, तिच्या हातांचे चुंबने घेत पुटपुटला. अन् एकदम एक विलक्षण कल्पना त्याच्या डोक्यात आली..ती सरळ आपल्या नाकासमोर बघते आहे, आपल्याकडे नव्हे, आपल्या तोंडाकडे नव्हे, तर आपल्या डोक्याच्या पलीकडे, अगदी एकाग्र, गूढ निश्चय दृष्टीने पाहात आहे. आश्चर्याचा, नव्हे भीतीचाच, भाव तिच्या चेहऱ्या-वर उमटला आहे.

"मीत्या, आपल्याकडं ते कोण बघतं आहे?" ती हळू आवाजात म्हणाली.

मीत्याने वळून पाहिले, आणि खरोखरच कोणीतरी पडदा बाजूला करून आपल्याला न्याहाळीत आहे असे त्याला दिसले. अन् तो एकच माणूस नव्हता.

तो एकदम उठून उभा राहिला अन् चटकन् त्या आगंतुकाकडे गेला.

"इकडं, आमच्याकडं ये, चल इकडं ये," मोठा नसला तरी खंबीर अन् हुकुमी आवाज बोलला.

मीत्या पडद्याच्या पलीकडे गेला अन् ठोकळ्यासारखा निश्चल झाला. खोलीत

माणसे जमलेली होती, पण ती पूर्वीची नव्हती. एक सणक त्याच्या पाठीतून उठली, अन् तो शहारला. त्याने त्या सर्व लोकांना एकदम ओळखले. ओव्हरकोट अन् वर फीत लावलेली सैनिकी टोपी घातलेला तो उंच धिप्पाड वृद्ध मनुष्य पोलिस कॅप्टन मिखाईल मकारोविच होता. अन् तो 'क्षयीसारखा' दिसणारा फक्कडराव– "ज्याचे बूट नेहमीच चकचकीत असतात तो– दुय्यम सरकारी वकील होता." त्याच्याकडं एक चारशे रुबल किंमतीचं घड्याळ आहे, ते त्याने मला दाखविले होते. अन् तो छोटासा तरुण चष्मेवाला...मीत्या त्याचे आडनाव विसरला, त्याला तो ओळखीत होता, अन् त्याला त्याने पाहिलेही होते. तो 'तपास करणारा वकील,' 'कायदे-शास्त्राच्या विभागातील' होता, तो नुकताच या शहरात आला होता. अन् हा माणूस– पोलिस इन्स्पेक्टर. मिखाईल मकारोविच होता, त्याला तो चांगला ओळखत होता. आणि ते लोक पितळी चपरास लावून आलेले, ते इथं कशाला आलेत ? आणि ते दुसरे दोघे...शेतकरी दिसतात...आणि दरवाज्यापाशी काल्गा-नफ अन् त्रिफोन बोरिस्सोविच उभे आहेत.

"सद्गृहस्थहो ! हा काय प्रकार आहे ?" मीत्याने विचारले, पण अचानक जणू स्वतःचा ताबा गमावून, आपण काय करतो आहो हे न समजता, तो बेंबीच्या देठापासून मोठ्यानं ओरडला :

"क–ळ–लं–म–ला !"

तो चष्मेवाला तरुण चटकन् पुढे झाला, अन् मीत्यापुढे पाऊल टाकून शिष्टाचाराने पण घाईने तो बोलू लागला.

"आम्हाला चौकशी करायची आहे...थोडक्यात म्हणजे, तुम्ही या-इकडं, इकडं कोचाकडं यावं अशी माझी तुम्हाला विनंती आहे...तुम्ही खुलासा करणं हे अत्यंत अगत्याचं आहे."

"तो म्हातारा !" मीत्या पिसाटल्यासारखा म्हणाला. "तो म्हातारा अन् त्याचं रक्त !...आलं लक्षात माझ्या."

अन् तो जवळच्या खुर्चीवर जणू विळयानं कापावं तसा गळला अन् जवळ जवळ खाली कोसळलाच.

"लक्षात आलं ? याच्या लक्षात आलं म्हणे ! राक्षसा अन् पितृघातक्या ! तुझ्या बापाचं रक्त तुझ्याविरुद्ध आक्रोश करीत आहे !" तो वृद्ध पोलिस अधिकारी मीत्याकडे पाऊल टाकून एकदम गरजला.

"हे अगदी गैरवाजवी आहे !" तो छोटा तरुण मनुष्य म्हणाला. "मिखाईल मकारोविच, मिखाईल मकारोविच, हे चालणार नाही !...तुम्ही मला बोलू द्यावं अशी माझी विनंती आहे. अशा तऱ्हेची वर्तणूक तुमच्याकडून मी कधीच अपेक्षिली नव्हती..."

" ही वातातली बडबड आहे, सद्गृहस्थहो, ही वातातली बडबड आहे," तो पोलिस अधिकारी म्हणाला; " याच्याकडे पाहा तरी; पिऊन तर्र झालाय, रात्रीच्या या वेळी, एका दुर्लौकिक असलेल्या बाईच्या सहवासात, आपल्या बापाचं रक्त आपल्या हातांवर घेऊन...ही वाताची बडबड आहे !"

" सन्मान्य मिखाईल मकारोविच, आपण आपल्या भावना आवराव्यात अशी माझी आपल्याला अत्यंत कळकळीची विनंती आहे," तो सरकारी वकील हलक्या आवाजात त्या वृद्ध पोलिस अधिकाऱ्याला भराभर बोलला, " नाही तर मला...."

पण त्या छोट्या वकिलाने त्याचे बोलणे पुरते होऊ दिले नाही. तो मीत्त्याकडे वळला अन् मोठ्या, खंबीर, अन् गंभीर आवाजात त्याला सांगायचे होते ते त्याने जाहीर केले.

" माजी लेफ्टनंट कारामाझफ, तुमचे वडील फ्योदर पावलोव्हिच कारमाझफ यांचा आज रात्री खून केल्याचा आरोप तुमच्यावर ठेवण्यात आला आहे हे तुम्हाला कळविणं माझं कर्तव्य आहे."

तो आणखीही काही बोलला, अन् सरकारी वकिलाने काही भर घातली; पण मीत्त्याने त्यांचे बोलणे ऐकले तरी त्याला ते समजले नाही. तो त्या सर्वांच्याकडे बेभान डोळ्यांनी पाहतच राहिला.

विभाग ९ वा

प्राथमिक तपासणी

१

ऱ्होतिनच्या अधिकार–कारकीर्दीला प्रारंभ

प्योत्र इल्यिच ऱ्होतिनला आपण मोरोझफ ह्या विधवा बाईच्या घराचे भक्कम कुलुपबंद फाटक ठोठावताना सोडून दिले होते, त्याने शेवटी आपला आवाज ऐकायला लावलाच. फेनियावर दोन तासांपूर्वी ज्या भीतीने पगडा बसवला होता तिने ती अजूनही पछाडलेली होती अन् खूपच अस्वस्थ असल्यामुळे झोपी जाणे तिला शक्य नव्हते. तिच्या कानी हे फाटकावरचे जोरजोराचे ठोठावणे येताच भीतीने तिची गाळण उडाली. जरी तिने स्वतः त्याला गाडीत बसून जाताना पाहिले होते, तरी तिला वाटले दमीत्रिच पुन्हा फाटक ठोठावतो आहे, इतक्या जंगली-पणाने दुसरे कोण ठोठावणार? ती दरवाज्याकडे धावली. तो अगोदरच जागा झाला होता अन् फाटकाकडे गेला होता, त्याला ती ते उघडू नको म्हणून विनवू लागली. पण प्योत्र इल्यिचची विचारपूस केल्यानंतर अन् 'काही अत्यंत महत्त्वाच्या कामाकरिता' फेनियाला त्याला भेटायचे आहे हे कळल्यानंतर त्या माणसाने शेवटी फाटक उघडण्याचे ठरविले. प्योत्र इल्यिचला फेनियाच्या स्वैपाक घरात नेण्यात आले, पण त्या मुलीने दरवानाला तिथे हजर राहण्याची परवानगी देण्याची अजीजी केली, "कारण माझ्या मनात शंका आहेत" असे ती म्हणाली. त्याने तिला प्रश्न विचारायला सुरुवात केली अन् अत्यंत महत्त्वाची गोष्ट एकदम त्याला कळली की, दमीत्रि जेव्हा ग्रूशिंकाला शोधण्यासाठी बाहेर धावत गेला होता त्या वेळी त्याने जाताना खलातून बत्ता काढून नेला होता, अन् जेव्हा तो परत आला होता तेव्हा तो बत्ता त्याच्या हातात नव्हता अन् त्याचे हात रक्ताने भरलेले होते.

"अन् रक्त त्याच्या हातातून नुसतं वाहात होतं, सारखं ठिबकत होतं!" फेनिया एकसारखे सांगत होती. ही तपशिलाची भयंकर बाब तिच्या अस्ताव्यस्त कल्पनेचीच केवळ निर्मिती होती. पण जरी ते 'ठिबकत' नसले तरी प्योत्र इल्यिचने स्वतः ते हात रक्ताने डागळलेले बघितले होते अन् त्याने ते धुवायला मदत केली होती. शिवाय ज्या मुद्याची त्याला निश्चिती करायची होती, तो ते रक्त किती लवकर वाळलं

हा नसून दमीत्रि तो बत्ता घेऊन गेला होता कुठे या प्रश्नाची किंवा खरोखर म्हणजे फ्योदर पावलोविचकडेच तर तो गेला नव्हता ना या प्रश्नाची आणि त्याचे उत्तर आपल्याला समाधानकारकपणे कसे मिळविता येईल याची. याच प्रश्नाकडे तो एकसारखा वळत होता, आणि जरी त्याला निर्णायक असे त्यातून काहीच समजले नाही, तरी दमीत्रि आपल्या बापाच्या घराखेरीज दुसरीकडे कुठे गेला असणे शक्यच नाही, आणि तिथेच काहीतरी घडले असले पाहिजे असा त्याच्या मनाचा निर्णय झाला.

"आणि तो जेव्हा परत आला," फेनिया उत्तेजित अवस्थेत पुढे म्हणाली, "तेव्हा मी त्याला सर्व हकीकत सांगितली आणि त्याला विचारायला लागले; 'तुमच्या हातांवर रक्त कसं आलं, दमीत्रि ?' अन् त्याने उत्तर दिलं की ते माणसाचं रक्त आहे, अन् आपण आत्ता कुणाला तरी ठार मारलं आहे. त्यानं सारं माझ्यापुढं कबूल केलं, आणि एकाएकी पागलाप्रमाणं निघून गेला. मी खाली बसून विचार करायला लागले, आत्ता हा पागलासारखा कुठं धावत गेला असेल ? तो मोक्रोयलाच जाणार अन् तिथं माझ्या मालकिणीला ठार मारणार, असं मला वाटलं. त्यानं तिला मारू नये असं त्याला विनविण्यासाठी मी बाहेर धावत गेले. मी त्याच्या बिऱ्हाडाकडं धावत चालले होते, पण प्लोतनिकोवच्या दुकानाकडं माझी नजर गेली अन् तो नुकताच निघत असल्याचं मला दिसलं अन् त्यावेळी त्याच्या हातावर रक्त नव्हतं." (फेनियानं ते बघितलं होतं अन् तिनं ते लक्षात ठेवलं होतं.) तिनं दिलेली साक्ष फेनियाच्या आजीनं तिला शक्य होतं तितकी खरी म्हणून सांगितली. आणखी थोडे प्रश्न विचारून प्योत्र इल्यिच त्या घरातून निघाला. त्यावेळी त्याची मनःस्थिती तो त्या घरात शिरताना होती त्याहून अधिकच व्यग्र अन् अस्वस्थ अशी झाली होती.

आता अगदी सरळ अन् सर्वांत सहज अशी गोष्ट त्याने करायला पाहिजे होती ती म्हणजे थेट फ्योदर पावलोविचच्या घरी जाऊन तिथे काही घडले का अन् काय घडले ते पाहून घेणे आणि मगच पोलिस अधिकाऱ्याकडे जाऊन त्याला वर्दी देणं. वस्तुस्थितीसंबंधी स्वतःचे समाधान करून घेतल्यानंतर तसेच करायचे प्योत्र इल्यिचच्या मनात निश्चितपणे होते. पण रात्र फार अंधारी होती, फ्योदर पावलोविचचे फाटकाचे दरवाजे भक्कम होते, अन् त्याला पुनः ठोठवावे लागणार होते. त्याची फ्योदर पावलोविचशी थोडी फारच ओळख होती, आणि समजा, आपण ठोठावीत राहिल्यानंतर त्यांनी फाटक आपल्याला उघडले, आणि काहीच जर घडले नसले, तर उद्या फ्योदर पावलोविच त्याच्या चेष्टेखोर रीतीने साऱ्या गावभर सांगत सुटणार की ऱ्होतिन नावाचा कोणी एक अनोळखी माणूस, मध्यरात्री एकदम आपल्या पुढे येऊन उभा राहिला अन् कोणी तुम्हाला ठार केले काय म्हणून विचारू लागला.

त्याने गावभर आपली बदनामी होणार आणि प्योत्र इल्यिचला जगात तेर कशाची जास्त भीती वाटत असेल तर ती बदनामीची.

तरी त्याच्यावर स्वार झालेली भावना इतकी तीव्र होती की त्याने रागाने आपला पाय जमिनीवर आपटला अन् स्वतःला शिव्या दिल्या, तरी तो पुनः निघाला तो फ्योदर पावलोविचकडे नव्हे तर मादाम होहलाहोवाकडे. त्याने मनाशी ठरविले की जर तिने आपल्याला आत्ताच दमीत्रिला तीन हजार रुबल दिल्याचे नाकारले तर आपण सरळ पोलिस अधिकाऱ्याकडे जायचे, पण जर तिने ते पैसे दिल्याचे कबूल केले, तर घरी जायचे अन् उद्या सकाळपर्यंत ही बाब आहे तशीच राहू द्यायची.

अर्थात हे तितकेच खरे होते की रात्री अकरा वाजता एका उच्च वर्गातल्या महिलेकडे आपण – एका अगदी परक्या माणसाने जाणे अन् कदाचित तिला झोपेतून उठवून विचित्र प्रश्न विचारणे हे फ्योदर पावलोविचकडे जाण्यापेक्षा अधिक बदनामीकारक होण्याचा संभव होता. पण कित्येक वेळा, विशेषतः सदर प्रकरणा-सारख्या प्रकरणाच्या बाबतीत, अत्यंत काटेकोर अन् थंड स्वभावाच्या भावनेच्या लोकांच्या निर्णयांच्या बाबतीत हे असेच नेमके होते. प्योत्र इल्यिच त्या वेळी असा थंड मुळीच नव्हता. एका झपाटल्यासारख्या अस्वस्थपणाने आपल्या मनाचा ताबा कसा घेतला होता अन् तो पुढे जास्तच जास्त वेदनाकारक होऊन आपली इच्छा नसताना त्याने आपल्याला कसे पुढे रेटीत नेले ते त्याला आयुष्यभर आठवत राहिले. अर्थात तो स्वतःला या बाईच्याकडे जात असल्याबद्दल रस्ताभर शिव्या देतच राहिला. पण “ या गोष्टीचा मी छडा लावल्याशिवाय राहणार नाही, छडा लावीनच लावीन ! ” असे तो दात-ओठ खात स्वतःशीच शंभर वेळा म्हणाला, अन् त्याने आपला उद्देश तडीस नेला.

तो मादाम होहलाहोवाकडे पोचला तेव्हा बरोबर अकरा वाजले होते. त्याला अंगणात फार झटकन् प्रवेश मिळाला, पण त्याने, बाई अजून जाग्या आहेत का, असे विचारले तेव्हा त्या यावेळी नेहमी झोपी जातात, या खेरीज अधिक काहीच उत्तर दरबान देऊ शकला नाही.

“ जिन्याने वरती जाऊन विचारा. जर बाईंना तुमची भेट घ्यायची असली तर घेतील, नसली तर घेणार नाहीत.”

प्योत्र इल्यिच वर गेला, पण तिथं त्याला परिस्थिती इतकी सोपी आढळली नाही. नोकर त्याचे नाव घेऊन आत जायला कबूल होईना, पण शेवटी त्याने एका मोलकरणीला बोलावले. प्योत्र इल्यिचने तिला तिच्या बाईसाहेबांकडे जाऊन पेरोतिन नावाचा ह्या शहरात राहणारा एक सरकारी अधिकारी, एका विशेष कामाकरिता आला आहे, आणि जर ते काम फार महत्त्वाचे नसते तर आपण येण्याचे साहस केले नसते,” असे त्यांना कळविण्याची सभ्यतापूर्वक पण आग्रहाची

विनंती केली. " याच शब्दांत, तंतोतंत याच शब्दांत सांग " असे त्याने त्या मुलीला सांगितले.

ती निघून गेली. तो दारातच वाट पाहत थांबला. मादाम होहलाहोवा आपल्या शय्यागृहात केव्हाच गेली होती, तरी ती झोपलेली नव्हती. मीत्या येऊन भेटून गेल्यापासून ती अस्वस्थ झालेली होती, अन् अशा स्थितीत नेहमी आपली डोकेदुखी उद्भवते अन् ती आपल्याला रात्रभर त्रास दिल्याशिवाय राहणार नाही अशी भीती तिच्या मनाला होती. मोलकरणीने आणलेल्या निरोपाने ती चकित झाली. तथापि तिने त्रासिकपणे त्याला भेटण्याचे नाकारले. तरी, असल्या अपरात्री, आणि, अनोळखी असलेल्या शहरात राहणाऱ्या एका ' सरकारी अधिकाऱ्याच्या ' या अनपेक्षित भेटीच्या निरोपाने तिची स्त्रीसुलभ जिज्ञासा जागी झाली. पण प्योत्र इल्यिच या वेळी एखाद्या खेचराइतका अडेल होऊन राहिला होता. त्याने त्या मोलकरणीला अजीजीने विनंती केली की, " मी अत्यंत महत्त्वाच्या कामासंबंधी आलो आहे अन् मादाम होहलाहोवानी जर आत्ता माझी भेट घेण्याचे नाकारले तर त्यांना मागाहून पश्चात्ताप होण्याचा संभव आहे. याच शब्दांत माझा निरोप सांग."

" मी अगदी विचार न करता उडी घेतली," त्याने मागाहून या घटनेचे वर्णन केले.

ती मोलकरीण, त्याच्याकडे आश्चर्याने बघून परत त्याचा निरोप घेऊन गेली. मादाम होहलाहोवा प्रभावित झाली. तिने थोडा विचार केला, तो कसा दिसतो असे तिने विचारले, अन् तिला कळले की " तो चांगला पोषाख केलेला आहे, तरुण अन् अगदी सभ्य आहे. " जाता जाता इथे आम्ही एक नमूद करतो की प्योत्र इल्यिच हा तसा दिसायला चांगला तरुण होता, अन् त्याची त्याला चांगली जाणीव होती. मादाम होवलाहोवाने त्याला भेटायचे ठरवले. तिने झोपण्याच्या वेळचा झगा घातला होता अन् पायात सपाता होत्या, पण तिने आपल्या अंगावर एक शाल टाकली. ' त्या अधिकाऱ्या'ला दिवाणखान्यात चलायला सांगण्यात आले, म्हणजे जिथे मीत्याला थोड्याच वेळापूर्वी ती भेटली होती तीच खोली. भेटायला आलेल्या गृहस्थाकडे ती बाई आली ती कठोर चौकस मुद्रा करून आली, आणि त्याला बसा म्हणून न सांगताच तिने एकदम विचारायला सुरुवात केली,

" आपल्याला काय पाहिजे ? "

" बाईसाहेब, मी आपल्याला त्रास देण्याचे जे धारिष्ट केले आहे ते आपणा दोघांच्याही परिचयाचे जे दमीत्रि फ्योदरोविच त्यांच्या संबंधीच्या एका बाबी विषयी." पेऱ्होतिनने सांगायला सुरुवात केली,

त्याने ते नाव उच्चारले न उच्चारले तेवढ्यात बाईच्या चेहऱ्यावर तीव्र

खिडीची चिन्हे दिसायला लागली. ती जवळ जवळ कर्कशपणेच ओरडून संतापाने मध्येच म्हणाली,

"त्या भयंकर माणसाचा आणखी किती वेळ मला त्रास होणार आहे ?" ती झटक्याने म्हणाली. "आपल्याला धारिष्ट कसं झालं, महाशय, एका स्त्रीला तिच्याच घरात अशा चमत्कारिक वेळी येऊन त्रास देण्याचं....अन् एका माणसासंबंधानं बोलण्याकरता तिच्या डोक्यावर येऊन बसण्याची हिंमत तरी तुम्हाला कशी झाली ! हा माणूस नुकताच तीन तासांपूर्वी इथं, याच दिवाणखाण्यात, माझा खून करायला आला होता, अन् इथून पाय आपटीत निघून गेला, सभ्य माणसांच्या घरातून असं कोणी जात नाही. मी आपल्याला सांगून ठेवते महाशय, मी तुमच्याविरुद्ध तक्रार गुदरीन, मी हे प्रकरण असंच सोडून देणार नाही. कृपा करून एकदम येथून निघून जा...मी एक आई आहे....मी...मी."

"खून ! म्हणजे त्याने तुमचाही खून करण्याचा प्रयत्न केला ?"

"म्हणजे ? त्याने आणखी कुणाचा खून केलाय काय ?" मादाम होहलाहोवाने आवेगाने विचारले.

"बाईसाहेब, जर आपण कृपा करून अर्धएक मिनिट माझं बोलणं ऐकून घेतलंत तर मी आपल्याला चार-दोन शब्दांत सर्व उलगडून सांगेन." पेऱ्होतिन खंबीरपणे म्हणाला. आज तिसऱ्या प्रहरी पाच वाजता दमीत्रि माझ्याकडून दहा रुबल उसने घेतले, अन् मला नक्की माहीत आहे की त्यावेळी त्याच्याकडं मुळीच पैसे नव्हते. असं असताना तो रात्री नऊ वाजता मला भेटायला आला तेव्हा शंभर-शंभराच्या नोटांचं पुडकं त्याच्या हातात होतं, साधारणतः दोन ते तीन हजार रुबल रक्कम असेल. त्याचे हात अन् तोंड सर्व रक्तानं माखलेलं होतं अन् तो एखाद्या डोकं फिरलेल्या माणसासारखा दिसत होता. इतके पैसे तुम्हाला कुठून मिळाले असं जेव्हा मी त्याला विचारलं, तेव्हा तो म्हणाला की ते नुकतेच तुमच्याकडून त्याला मिळाले, तुम्ही त्याला सोन्याच्या खाणीकडे जाण्याकरिता म्हणून तीन हजारांची रक्कम दिलीत..."

मादाम होहलाहोवाच्या चेहेऱ्यावर तीव्र अन् वेदनायुक्त क्षुब्धता प्रकट झाली.

"परमेश्वरा ! त्यानं आपल्या म्हाताऱ्या बापाला मारलं असलं पाहिजे !" ती आपले हात घट्ट आवळून ओरडली. "मी त्याला कधीच पैसे दिले नाहीत, कधीही नाहीत ! अहो, पळा, पळा !...एक शब्दसुद्धा बोलू नका ! त्या म्हाताऱ्याला वाचवा....त्याच्या बापाकडं धावा....पळा !"

"माफ करा, बाईसाहेब, म्हणजे तुम्ही त्याला पैसे दिले नाहीत तर ? तुम्हाला नक्की आठवतंय की तुम्ही त्याला काहीही पैसे दिले नाहीत ?"

"नाही, नाही, नाही ! मी त्याला ते देण्याचं नाकारलं, कारण मी सुचवलं

ते त्याला आवडलं नाही. तो संतापानं, पाय आपटीत बाहेर निघून गेला. तो माझ्या अंगावर धावून आला, पण मी निसटले....अन् आता तुम्हाला सांगते, कारण तुमच्यापासून काहीही लपवून ठेवण्याची माझी इच्छा नाही, तो प्रत्यक्ष माझ्या अंगावर थुंकला. कल्पना तरी करवते का तुम्हाला ? पण आपण उभे का आहोत ? हाः, खाली बसा....माफ करा, मीः..पण नको, धावा—पळा, तुम्ही पळत जाऊन त्या गरीब म्हाताऱ्याला भयंकर मरणातून वाचवलं पाहिजे ! "

"पण त्यानं त्याला अगोदरच ठार मारलं असलं तर ? "

"बाई ग, देवा देवा, खरंच ! मग आपण आता काय करायचं ? आपण आता काय करावं असं तुम्हाला वाटतं ? "

एवढ्या वेळात तिने प्योत्र इल्यिचला खाली बसायला लावले होते अन् ती स्वतः त्याच्यासमोर बसली. थोडक्यात, पण बऱ्याच स्पष्ट स्वरूपात, प्योत्र इल्यिचने या प्रकरणाचा जेवढा भाग प्रत्यक्ष पाहिला होता तेवढा तिला सांगितला. त्याने आपण फेनियाकडे गेलो होतो तेही वर्णन करून सांगितले अन् त्या बत्त्याविषयी सांगितले. या सर्व बारीक सारीक वर्णनाचा त्या घाबरट बाईवर प्रचंड परिणाम झाला. ऐकत असताना ती किंचाळत होती अन् हातांनी आपले तोंड झाकून घेत होती...

"तुम्हाला खरं तरी वाटेल, अहो, मी हे सारं अगोदरच हेरलं होतं ! माझ्यामधे ती खास शक्ती आहे, जे जे होईल असं मला वाटतं ते ते घडून येतं. आणि कितीतरी वेळा त्या भयंकर माणसाकडं मी पाहिलंय अन् नेहमी मनात म्हटलेय की हा माणूस अखेर माझा खून करणार अन् आता तसंच घडून आलं.... म्हणजे त्यानं माझा खून नाही केला, आपल्या बापाचाच केला, केवळ ईश्वरी कृपेमुळेच माझं रक्षण झालं, अन् विशेष म्हणजे, त्याला माझा खून करण्याची शरम वाटली, कारण, याच जागी, मी त्या संत हुतात्मा वार्वाराच्या अवशेषातली पवित्र प्रतिमा त्याच्या गळ्यात घातली... अन् त्या वेळी मी मृत्यूच्या जबड्यात की हो होते, मी अगदी त्याच्या जवळ गेले होते अन् त्यानं आपली मान माझ्यापुढं केली होती ! ... तुम्हाला माहीत आहे, प्योत्र इल्यिच, (तुमचं नाव प्योत्र इल्यिचच तुम्ही म्हणालात ना !) माझा चमत्कारांवर विश्वास नाही, पण ती प्रतिमा अन् हा आता माझ्या बाबतीत घडलेला अचूक चमत्कार— यानं मी हादरून गेले आहे, अन् तुम्ही म्हणाल त्यावर विश्वास ठेवायला माझी तयारी आहे. तुम्ही बाबा झसीमफांविषयी ऐकलंय का !... पण मी काय बोलते आहे ते माझं मलाच समजत नाही.... अन् कल्पना करा, त्याच्या गळ्यात ती प्रतिमा असताना तो माझ्या अंगावर थुंकला.... तो नुसता थुंकलो, त्यानं माझा खून केला नाही हे खरं... अन् एकदम निघून गेला ! पण आता काय करावं, काय केलं पाहिजे ? तुम्हाला काय वाटतं ? "

प्योत्र इल्यिच उठला, अन् आपण सरळ पोलिस कॅप्टनकडे जाऊन त्याला हे सर्व सांगणार, मग पुढे त्याला काय योग्य वाटेल ते तो करील, असे तो म्हणाला.

" हां, तो फार छान मनुष्य, फार छान ! मिखाईल मकारोविच ना, मी ओळखते त्याला. अर्थात् त्याच्याकडंच गेलं पाहिजे. तुम्ही किती व्यवहारकुशल आहात, प्योत्र इल्यिच ! प्रत्येक गोष्टीचा तुम्ही किती विचार करून ठेवला आहे ! तुमच्या जागी मी असते तर मला काही हा विचार सुचला नसता ! "

" विशेष म्हणजे माझी त्या पोलिस कॅप्टनशी ओळखही आहे," प्योत्र इल्यिच म्हणाला. तो अजून उभाच होता, अन् या लहरी बाईपासून शक्य तितक्या लवकर निसटण्याला तो अर्थात् उतावीळ झाला होता, पण ती त्याला निरोप घेऊन जाऊ द्यायला तयार नव्हती.

" आणि बरं का," ती बडबडतच राहिली, " तुम्ही पुनः माझ्याकडं परत आलं पाहिजे अन् तुम्हाला तिथं जे दिसेल, अन् जे कळेल...ज्या गोष्टी उजेडात येतील....ते त्याची चौकशी कशी करणार आहेत, अन् त्याला काय शिक्षा होणार आहे हे सगळे मला सांगितलं पाहिजे. मला सांगा, आपल्याकडे देहान्ताची शिक्षा नाही, होय ना ? पण निश्चितपणे या हं, मग मध्यरात्रीचे तीन वाजू देत, चार, साडे-चार वाजू देत...मला जागी करायला, जागी करायला सांगा, मी उठले नाही तर मला हलवायला सांगा . पण देवा रे देवा ! मला आता झोप कुठली ! थांबा, मी तुमच्याबरोबर आलेलं बरं नाही का ? "

" न–नको. पण आपण दमीत्रि फ्योदरोविचला पैसे दिले नाहीत अशा तीन एक ओळी तुम्ही तुमच्या हातानं लिहून दिल्यात तर कदाचित् त्याचा उपयोग होईल...गरज पडली तर अर्थात...."

" जरूर ! " मादाम होखलाकोवा आनंदून पटकन् आपल्या टेबलाकडे नेली. " अन् तुमच्या या हिकमतीपणाचं, या असल्या बाबतीत जी अक्कल हुशारी तुमच्यात आहे तिचं मला मोठं नवल वाटतं. तुम्ही इथं सरकारी नोकरीत आहात काय ? तुम्ही इथं नोकरीत आहात याचा मला मोठा आनंद वाटतो ! " आणि असेच बोलत तिने नोट पेपराच्या अर्ध्या भागावर पुढील ओळी खरडल्या,

" मी माझ्या आयुष्यात कधीसुद्धा दमीत्रि फ्योदरोविच कारमाझफ या दुर्दैवी मनुष्याला (कारण काही झालं तरी तो दुर्दैवीच आहे) आज तीन हजार रुबल उसने दिलेले नाहीत. मी त्याला कधीच पैसा दिलेला नाही, कधीच ! हे मी मला पवित्र असलेल्याची शपथ घेऊन सांगते आहे !

के. होखलाकोवा."

" ही घ्या चिठ्ठी ! " ती चटकन् प्योत्र इल्यिचकडे वळून म्हणाली. " जा, त्याला वाचवा. तुमचं हे फार थोर कृत्य आहे ! "

आणि तिने त्याच्यावर तीन वेळा क्रूसाचे चिन्ह केले. ती त्याला बाहेरच्या वाटेपर्यंत पोचवायला तत्परतेने गेली.

"मी तुमची फार फार कृतज्ञ आहे! तुम्ही प्रथम माझ्याकडे आलात त्याबद्दल मी तुमची किती कृतज्ञ आहे याची तुम्हाला कल्पना येणार नाही! मी यापूर्वी तुम्हाला कशी बरं भेटले नाही? ह्यापुढं तुम्ही माझ्या घरी येऊन मला भेटलात तर मला त्याचा अभिमान वाटेल. तुम्ही इथं राहाताहात ही किती आनंदाची गोष्ट आहे!... इतका बारकावा! इतकं व्यवहार कौशल्य!... लोकांना तुमचं कौतुक वाटलं पाहिजे, त्यांनी तुमची किंमत केली पाहिजे. जर मला काही करण्याजोगं असलं तर माझ्यावर भरवसा ठेवा.... हो, मला तरुण माणसं आवडतात! तरुणांवर माझं फारच प्रेम आहे! तरुण पिढीच आमच्या या दुःखी देशाचा एकमेव आधार. त्यांची एकच एक आशा ... हो हो, जा, जा!"

पण प्योत्र इल्यिच तिचे बोलणे संपण्यापूर्वीच निघून गेला होता, नाही तर तिने त्याला इतक्या लवकर जाऊ दिले नसते. तरी मादाम होहलाहोवाची त्याच्यावर अनुकूल अशीच छाप पडली, त्यामुळे या असह्य नकोशा वाटणाऱ्या कामात ओढले गेल्याची त्याला वाटणारी खंत काहीशी कमी झाली. आपल्याला माहीत आहे की, रूची वेगळ्या वेगळ्या असतात. "तशी ती काही फार प्रौढ नाही," तो खूष होऊन आपल्याशीच म्हणाला, "उलट, मी तिला तिची मुलगीच समजलो असतो."

मादाम होहलाहोवाबद्दल बोलायचे तर ती त्या तरुण माणसाने भारल्यासारखीच झाली. "इतकी अक्कल! इतका बिनचूकपणा! इतक्या तरुण वयात! या आमच्या काळी! आणि हे सारं इतक्या सभ्यतेनं न् स्नेहाभावानं! लोक म्हणतात आजचे तरुण निरुपयोगी आहेत, पण हे पाहा उदाहरण!" वगैरे वगैरे. त्यामुळे ती हे "भयंकर प्रकरण" विसरूनच गेली, अन् जेव्हा ती अंथरुणावर पडली तेव्हा एकदम तिला 'आपण मृत्यूच्या किती जवळ होतो' याची आठवण झाली अन् ती उद्‌गारली: "आई ग, भयंकर आहे, बाई, भयंकर!"

पण लगेच तिला गाढ, गोड झोप लागली.

त्या तरुण अधिकाऱ्याची तशा मुळीच प्रौढ नसलेल्या त्या विधवेशी जी ही विचित्र भेट झाली ती पुढं त्या व्यवहारकुशल अन् काटेकोर तरुण मनुष्याच्या सबंध भावी जीवनाचा पाया ठरली नसती तर मी जो इतक्या क्षुल्लक अन् गैरलागू तपशिलात शिरलो तो मुळीच शिरलो नसतो. आजही आमच्या शहरात लोक त्यांच्या कहाणीची आश्चर्याने आठवण काढतात. अन् कारमाझफ बंधूंची ही माझी दीर्घ इतिहास-कथा मी संपवीन तेव्हा कदाचित त्यासंबंधाने सांगण्यासारखे माझ्याकडे काही असेल.

२

भयसूचक ओरडा

आमचा पोलिस अधिकारी, मिखाईल मकारोविच मकारोव हा एक निवृत्त लेफ्टनंट – कर्नल होता. तो तीन वर्षांच अगोदर आमच्या शहरात आला होता, पण सर्वांचा प्रेमादर त्याने संपादन केला होता, त्याचे मुख्य कारण म्हणजे त्याला "समाजाला सुव्यवस्थित कसं ठेवायचं याचं ज्ञान होतं." त्याच्याकडे भेटायला माणसे आली नाहीत असे कधी झाले नाही, आणि त्याच्या वाचून त्यांचे चालूच थांकले नसते. कोणी ना कोणी त्याच्याबरोबर जेवायला असायचेच; पाहुण्याशिवाय तो कधी जेवायला बसला नाही. तो नाना प्रसंगी मेजवान्या पण देई, अन् कधी कधी तर त्या आश्चर्य वाटण्यासारख्या असत. खाद्य पदार्थ मोठे निवडक असत असे नाही, तरी ते विपुल असत. "फिशपाय" अतिशय छान होत, अन् मद्याची जात जरी फार चांगली नसली तरी त्याची भरपाई मुबलकपणाने होई.

त्याच्याकडे आलेली पाहुणे मंडळी ज्या पहिल्या खोलीत प्रवेश करीत ती एक चांगली सज्ज केलेली बिलियर्ड खेळण्याची खोली होती. भितींवर काळ्या चौकट्यांतून शर्यतीच्या इंग्लिश घोड्यांची चित्रं लावलेली होती. सभ्य माणसाच्या बिलियर्ड खोलीत ही एक अत्यंत आवश्यक सजावट असते हे आपणा सर्वांना माहीतच आहे. त्याच्या घरी रोज संध्याकाळी पत्त्यांचा खेळ चाले, अर्थात तो एकाच टेबलावर चाले. पण मधून मधून बऱ्याच प्रसंगी, आमच्या शहरातला सर्व समाज, त्यात आमाता अन् तरुण स्त्रिया, त्याच्या घरी नाचाकरिता जमत. जरी मिखाईल मकारोविच हा विधुर होता, तरी तो एकटा राहात नव्हता. त्याची विधवा झालेली मुलगी आपल्या दोन अविवाहित मुलींसह त्याच्याबरोबर राहत होती, मुली वयाने मोठ्या होत्या आणि त्यांचे शिक्षण पुरे झालेले होते. त्या दिसायला बऱ्यापैकी आणि उत्साही स्वभावाच्या होत्या, आणि जरी प्रत्येकाला माहीत होते की आपल्याला हुंडा मिळणार नाही, तरी त्यांच्या ओढीने सर्व उच्च वर्गाचे तरुण त्यांच्या आजाच्या घरी येत.

मिखाईल आपल्या कामात काही फार मोठा कर्तबगार होता असे नाही, तरी तो आपली कर्तव्ये इतर अनेकांपेक्षा काही वाईट करीत नसे. स्पष्ट बोलायचे तर तो साधारण, तुटपुंजे शिक्षण असलेला माणूस होता. आपल्या कारभार-विषयक सत्तेच्या मर्यादा काय आहेत या संबंधीच्या त्याच्या ज्ञानावर नेहमीच विसंबता येत नव्हते. चालू कारकीर्दीत ज्या काही सुधारणा कायद्याने करण्यात आलेल्या होत्या त्यांचे तितकेसे आकलन त्याला झालेले नव्हते हे विशेष नव्हते तर त्यांचा अर्थ लावण्यात तो ज्या घोडचुका करी ते विशेष जाणवत असे. त्याच्यात

बुद्धिमत्तेचा काही विशेष अभाव असल्यामुळे हे होत असे असे नाही तर निष्काळजी-पणा मुळे होत असे, कारण त्याला नेहमी इतकी विलक्षण घाई होई की तो त्या विषयांच्या आत शिरतच नसे.

"माझं अंतःकरण सामान्य नागरिकापेक्षा सैनिकाचं आहे असं म्हणणं अधिक बरोबर होईल," असे तो स्वतःपाशी म्हणे. जमिनीवरच्या गुलाम कुळांच्या मुक्तीशी संबंधित असलेल्या सुधारणांच्या मूलभूत तत्त्वाविषयी काही निश्चित कल्पनाही त्याच्या डोक्यात तयार झालेली नव्हती, आणि वर्षावर्षाला अनुभवाने आपले ज्ञान अनायासे वाढवीतच एकप्रकारे त्याने ती उचलली होती. बरे, तरी तो स्वतः एक जमीन मालक होता. मिखाईल मकारोविचकडे आपल्याला या संध्याकाळी त्याला भेटायला येणाऱ्यांपैकी काही लोक भेटणार हे प्योत्र इल्यिचला नक्की माहीत होते, पण कोण ते त्याला माहीत नव्हते. कर्मधर्मसंयोग असा की त्याच वेळी त्या पोलिस कॅप्टनच्या घरी सरकारी वकील, अन् नार्विन्स्की, म्हणजे आमचे जिल्ह्याचे डॉक्टर एक पत्त्याचा खेळ खेळंत बसले होते; हा डॉक्टर म्हणजे एक तरुण गृहस्थ होता, पीटर्सबर्गहून अकादमी ऑफ मेडिसिनमधून उत्तम रीतीनं पदवी घेऊन तो नुकताच आमच्याकडे आलेला होता. इप्पोलित किरिलोविच हा सरकारी वकील (तो खरे म्हणजे दुय्यम सरकारी वकील होता, पण आम्ही नेहमी त्याला सरकारी वकीलच म्हणत असू) एक विशेष प्रकारचा माणूस होता. तो साधारण पस्तीस एक वर्षांचा असेल. त्याला क्षयाची भावना होती. त्याचे एका लठ्ठ स्त्रीशी लग्न झाले होते, पण त्यांना मूलबाळ नव्हते. तो गर्विष्ठ अन् चिडखोर होता, पण त्याची बुद्धी चांगली होती. अन् अंतःकरणही प्रेमळ होते. त्याच्यात जे काही वैगुण्य होते ते हे की त्याच्या कर्तबगारीच्या मानाने तो स्वतःला अधिक शहाणा समजत असे आणि त्यामुळे तो नेहमी अस्वस्थ असलेला दिसे. आणखी म्हणजे, त्याची मानसशास्त्राकडे काहीशी अधिक उच्च प्रकारची, कलात्मक म्हटली तरी चालेल, अशी प्रवृत्ती होती : उदाहरणार्थ, त्याला मानवी हृदयाचा खास अभ्यास, गुन्हेगाराचे अन् त्याच्या गुन्ह्यांचे विशेष ज्ञान होते. त्यामुळे त्याची नेहमी अशी तक्रार असे की नोकरीत आपल्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, वरच्या वर्तुळात आपले योग्य रीतीने चीज केले गेले नाही आणि तिथे आपले हित-शत्रू आहेत अशी त्याच्या मनाची समजूत झाली होती. मनाच्या खिन्न अवस्थेत असला म्हणजे तो आपली नोकरी सोडून देऊन फौजदारी खटल्यात बॅरिस्टरीचा व्यवसाय सुरू करण्याची धमकीची भाषाही बोले. अनपेक्षितपणे पुढे आलेल्या कारमाझफ खटल्याने त्याचे मनःस्वास्थ्य पार बिघडवून टाकले. "हा असा खटला आहे की साऱ्या रशियाभर बोलबाला होण्याचा संभव आहे." पण हे मी पुढली गोष्ट आधी सांगितल्यासारखे होत आहे.

निकोलाय पारफेनोविच नेल्युदोव हा तपासणी करणारा तरुण वकील होता.

तो नुकताच दोन महिन्यांपूर्वी पीटर्सबर्गहून आला होता, आणि तो त्या पलीकडच्या खोलीत तरुण स्त्रियांबरोबर बसला होता. लोक मागाहून त्या खटल्याबद्दल बोलू लागले तेव्हा आश्चर्य करू लागले की तो 'गुन्हा' घडला त्या संध्याकाळी सर्वच सद्गृहस्थ जणू सहेतुकपणेच, सरकारी अमलदाराच्या घरी कसे काय जमले होते? तथापि ती अगदी साधी घटना होती आणि अगदी सहजच घडून आली होती.

इप्पोलित किरिलोविचच्या बायकोचा दात गेले दोन दिवस दुखत होता, अन् तिच्या विव्हळण्यातून सुटावे म्हणून त्याला बाहेर पडणे अवश्यच होते. डॉक्टरना त्यांचा स्वभावच तसा असल्यामुळे, संध्याकाळी पत्ते खेळल्यावाचून चैनच पडत नसे. नेल्युदोवच्या मनात गेले तीन दिवस मिखाईल मकारोविचकडे या संध्याकाळी, म्हणायला सहजच, जावं अशी इच्छा होती, पण त्याच्या मनातला हेतू मोठी नात ओल्गा मिहायलोवना हिला, तुझं गुपित मला माहीत आहे, तुझा आज वाढदिवस आहे, अन् तू तो मुद्दामच लपवण्याचा प्रयत्न करीत आहेस, कारण आपल्याला नाच करून दाखवावा लागेल, असे हळूच सांगून बिचकवावे हा होता. तिच्या वयासंबंधाने गंमतीशीर थट्टा मस्करी, ते उघड सांगायला तिला वाटणारी भीती, आपल्याला तिचे हे गुपित माहीत आहे अन् आपण ते सर्वांना सांगणार आहोत, आणि अशाच प्रकारच्या खूप गमती-जमती त्याने मनात योजून ठेवल्या होत्या. अशा प्रकारे खिजविण्यात हा मोहक तरुण बराच पटाईत होता; स्त्रीवर्गाने त्याचे नावच 'खट्याळ माणूस' असे ठेवले होते, अन् त्याला त्या नावात आनंद वाटत होतासे दिसले. तथापि तो अत्यंत सुसंस्कृत, चांगल्या कुळातला, चांगले शिक्षण झालेला अन् सौजन्यशील असा मनुष्य होता, तो आणि जरी सुखवस्तूपणाचे जीवन घालवीत असला, तरी त्याची थट्टा नेहमी निरुपद्रवी अन् सदभिरुचीची असे. तो बुटकासा अन् दिसायला नाजूक होता. त्याच्या गोऱ्या, बारीक, छोट्या बोटांवर नेहमी टपोऱ्या अन् चमकणाऱ्या अंगठ्या असत. आपल्या नेमलेल्या कामात तो गुंतलेला असला म्हणजे तो अतिशय गंभीर असे, आपल्या हुद्द्याची अन् आपल्यावर टाकण्यात आलेल्या कर्तव्याच्या पावित्र्याची त्याला जाणीव असलेली दिसे. चौकशीच्या वेळी शेतकरी वर्गातील खुन्यांना अन् इतर गुन्हेगारांना घाबरवून सोडण्याचा एक खास गुण त्याच्यात होता, आणि जरी त्याने त्यांचा आदर मिळविला नाही तरी त्यांचा आपल्याविषयी अचंबा जागृत करण्यात त्याला खात्रीने यश मिळे.

प्योत्र इल्यिच पोलिस कॅप्टनकडे गेला तेव्हा तो अगदी आश्चर्यचकितच होऊन गेला. प्रत्येकाला हे प्रकरण माहीत झालंय असे त्याला चटकन् दिसून आले. त्यांनी खरोखर आपले पत्ते खाली टाकून दिले होते आणि सगळेजण उभे राहून बोलत होते. निकोलाय पारफेनोविचसुद्धा तरुण मुलींना सोडून आत पळत आला होता. तो उत्साही अन् कार्यतत्पर असल्यासारखा दिसत होता. तिथे प्योत्र इल्यिचला,

म्हाताऱ्या फ्योदर पावलोविचचा खरोखर त्याच संध्याकाळी त्याच्याच घरात खून झाला आणि खून होऊन चोरीही झाली, ही चकित करून सोडणारी बातमी मिळाली. ती त्या मंडळींकडे नुकतीच पुढीलप्रमाणे येऊन पोचली होती—

जोराच्या फटकाऱ्यामुळे कुंपणापाशी बेशुद्ध होऊन पडलेल्या म्हाताऱ्या ग्रिगरीची बायको मार्फा इग्नात्येवना ही आपल्या अंथरुणात गाढ झोपली होती आणि ती तो औषधाचा घुटका घेतल्यानंतर तशीच सकाळपर्यंत झोपून राहिली असती. पण एकाएकी ती जागी झाली. तिला जाग आली ती अर्थात स्मिर्द्याखफने फिट येत असताना जी भयानक किंकाळी फोडली होती त्यामुळे; तो शेजारच्याच खोलीत बेशुद्ध होऊन पडून राहिलेला होता. फिट यायची असली की तो नेहमी अगोदर किंकाळी फोडी आणि नेहमी मार्फा इग्नात्येवनाला भयभीत अन् अस्वस्थ करून सोडी. त्या किंकाळीची तिला कधीच सवय झाली नाही. ती एकदम उडी मारून उठली आणि अर्धवट जाग आलेल्या अवस्थेत स्मिर्द्याखफच्या खोलीकडं धावली. पण तिथे काळोख होता, आणि तो असहाय्य माणूस धापा टाकू लागल्याचे अन् धडपड करीत असल्याचे फक्त तिला ऐकू आले. मग ती स्वतःच किंचाळली. अन् ती आपल्या नवऱ्याला हाक मारणार इतक्यात एकदम तिच्या लक्षात आले की आपण उठलो त्यावेळी तो अंथरुणात आपल्या शेजारी नव्हता. ती परत आपल्या बिछान्याकडे गेली अन् हातांनी चाचपून पाहू लागली, पण बिछाना खरोखरच रिकामा होता. हं, तेव्हा हा बाहेर गेला असला पाहिजे. पण कुठं ? ती पायऱ्यांकडे धावत गेली अन् तिने त्याला हाका मारल्या. तिला अर्थात उत्तर मिळाले नाही, पण दुरून बागेतून त्या अंधारात तिच्या कानावर कण्हण्याचे आवाज पडले. तिने कान दिला. कण्हणे सुरूच होते अन् ते बागेतून येत होते हे उघड होते.

"देवा रे देवा! लिझावेता च्यावेळी जसं झालं तस्संच हे!" ती घाबरून म्हणाली. ती भीत भीत पायऱ्या उतरून खाली गेली आणि तिला बागेचा दरवाजा उघडा असलेला दिसला.

"हे तिकडे बाहेर गेलेत वाटतं, बिचारे," तिच्या मनात आले. ती फाटकापर्यंत गेली अन् एकदम तिला ग्रिगरीने "मार्फा! मार्फा!" अशा क्षीण विव्हळत्या भयानक अशा आवाजात मारलेल्या हाका स्पष्टपणे ऐकू आल्या.

"देवा, इडापिडा टळो, अमंगळ पळो!" ती पुटपुटली, अन् त्या आवाजाच्या दिशेने ती धावत गेली, अन् अशा रीतीने तिला ग्रिगरी सापडला. पण तिला तो कुंपणाजवळ जिथे त्याला फटकारा मारून खाली पाडले होते तिथे आढळला नाही तर तिथून वीस पावले दूर आढळला. मागाहून असे दिसून आले की तो भानावर आल्यावर हळू हळू सरपटत निघाला, अन् मध्ये अनेक वेळा बेशुद्ध पडल्याने इथे येऊन पोचायला त्याला बराच वेळ लागला असला पाहिजे. तो रक्ताने

भरला आहे असे तिला एकदम दिसले अन् तिने जोरात ओरडा केला. ग्रिगरी असंबद्धपणे तोंडातल्या तोंडात बडबडत होता,

" त्यानं खून केलाय...आपल्या बापाचा खून केलाय...कशाला ओरडतेस...मूर्ख...पळ... कुणाला तरी बोलावून आण..."

पण मार्फा किंचाळतच राहिली अन् आपल्या धन्याची खिडकी उघडीच आहे, अन् खिडकीत मेणबत्ती लावलेली आहे, हे पाहून ती तिकडे धावत गेली अन् फ्योदर पावलोविचला हाका मारू लागली. पण खिडकीतून आत पाहिल्यावर तिला एक भयानक देखावा दिसला. तिचा धनी जमिनीवर उताणा निश्चेष्ट पडलेला होता. त्याचा फिक्या रंगाचा झोपण्याच्या वेळचा झगा अन् पांढरा सदरा रक्ताने चिंब झालेला होता. टेबलावरच्या मेणबत्तीच्या उजेडाने ते रक्त अन् फ्योदर पावलोविचचा निश्चल मृत चेहेरा उजळला होता. भयाकुल होऊन, मार्फा खिडकीपासून एकदम दूर झाली, बागेच्या बाहेर पळत गेली, मोठ्या फाटकाचा अडसर तिने काढला, आणि सुसाट पळत मागच्या रस्त्याने ती शेजारी मार्या कोंद्रात्येवनाकडे गेली. आई अन् मुलगी दोघी झोपलेल्या होत्या. पण मार्फाच्या बेफाट अन् एकसारख्या किंकाळ्यांनी आणि दारावरच्या ठोठावण्यांनी त्या जाग्या झाल्या. मार्फाने आरडत—ओरडत असंबद्ध रीतीने मुख्य घटना कशीबशी त्यांना सांगितली अन् मदतीची याचना केली. फोमा त्यावेळी आपली फिरती करून परत आला होता अन् रात्री तिथेच थांबला होता. त्यांनी त्याला चटकन् उठविले आणि तिघेजण गुन्ह्याच्या त्या जागी धावत पळत गेली. वाटेत मार्या कोंद्रात्येवनाला आठवण झाली की, साधारण आठ वाजता आपण एक भयानक किंकाळी बागेतून ऐकली, आणि ती खात्रीने ग्रिगरीचीच होती. मीत्याची तंगडी पकडून धरली तेव्हा तो " पितृघातक्या ! " असं मोठ्याने ओरडला होता.

" कोणी तरी ओरडलं होतं न् मागाहून सामसूम झालं," मार्या कोन्द्रात्येवना धावत जाताना सांगत होती. ग्रिगरी पडला होता त्या जागी धावत जाऊन त्या दोन बायांनी फोमाच्या मदतीनं त्याला त्याच्या घराकडे नेले. त्यांनी मेणबत्ती लावली तेव्हा रिमर्याखफची तब्येत बरीच बिघडली आहे, तो आचके देऊन आळोखेपिळोखे देत आहे, त्याच्या डोळ्यांची बुबुळे नाकाच्या कडेपाशी स्थिर झालीं आहेत, अन् त्याच्या तोंडातून फेस येत आहे असे त्यांना दिसले. त्यांनी ग्रिगरीचे कपाळ पाण्यात शिर्का (व्हिनिगर) मिसळून त्याने ओले केले अन् त्यामुळे त्याला एकदम शुद्ध आल्यासारखा झाला. त्याने लगेच विचारले,

" धन्याचा खून झाला का ? "

मग फोमा अन् त्या दोन्ही स्त्रिया त्या मुख्य घराकडे धावत गेल्या आणि त्यावेळी त्यांना दिसले की खिडकीच नव्हे तर बागेत जाणारा दरवाजासुद्धा सताड उघडा होता; फ्योदर पावलोविच तर गेला आठवडाभर दररोज रात्री स्वतः कुलूप

लावून बसत असे आणि त्याने ग्रिगरीलासुद्धा कोणत्याही सबबीवर आत येऊ दिले नव्हते. तो दरवाजा उघडा पाहून, ते आत फ्योदर पावलोविचकडे जायला भ्याले, कदाचित् मागाहून काही झालंबिलं तर," अशी त्यांना भीती वाटली. आणि जेव्हा ते परत ग्रिगरीकडे आले तेव्हा त्या म्हाताऱ्याने त्यांना थेट पोलिस कॅप्टनकडे जायला सांगितले. मार्फा कोन्द्रात्येवना तिकडे धावत गेली अन् तिने पोलिस कॅप्टनच्या इथे जमलेल्या सर्व मंडळींना ही भयानक वार्ता पोचविली. ती प्योत्र इल्यिचच्या अगोदर पाचच मिनिटे तिथे आली होती, त्यामुळे त्याची हकीकत ही त्याने स्वतः काढलेला तर्क अन् बसविलेला सिद्धान्त म्हणून न राहता गुन्हेगार कोण असावा त्या संबंधाने सर्वांनी जे अनुमान केले होते, त्याला प्रत्यक्ष पाहणाऱ्याकडून पाठिंबा मिळालासे झाले. हे अनुमान मान्य करायला त्या क्षणापर्यंत तो मनाने तयार नव्हता.

झटपट कामाला लागले पाहिजे असा निर्णय घेण्यात आला. चार साक्षीदार घ्यावेत, फ्योदर•पावलोविचच्या घरात प्रवेश करावा अन् तिथे, ठरलेल्या पद्धतीनुसार जागेवरच चौकशीला सुरुवात करावी, असा हुकूम शहराच्या दुय्यम पोलिस इन्स्पेक्टरला देण्यात आला. ती पद्धती काय त्यात मी इथं जात नाही. जिल्ह्याचा डॉक्टर हा कामसू माणूस होता; तो आपल्या कामात नवीन होता; पोलिस कॅप्टनच्या सरकारी वकिलाच्या अन् तपासणी करणाऱ्या वकिलाच्या बरोबर आपण येणार असा त्याने जवळ जवळ आग्रह धरला.

घडले ते थोडक्यात मी नमूद करतो— फटकाऱ्यांनी डोक्याची कवटी फुटल्यामुळे फ्योदर पावलोविच मरून पडलेला आढळला. पण फटकारे कशाचे? बहुत करून ज्या हत्याराने ग्रिगरीवर मागाहून हल्ला करण्यात आला त्याच हत्याराचे आणि तत्काळ ते हत्यार सापडले. ग्रिगरीला ताबडतोब शक्य ती सर्व वैद्यकीय मदत देण्यात आली, आणि त्याने दुबळ्या अन् खचलेल्या आवाजात आपणाला कसे मारून पाडण्यात आले ते वर्णन करून सांगितले. त्यांनी कंदील घेऊन कुंपणावर शोधले अन् त्यांना तो पितळी बत्ता बागेच्या वाटेवर एका अगदी लक्षात येण्यासारख्या जागी टाकलेला आढळला. फ्योदर पावलोविच जिथे पडला होता त्या खोलीत काहीच गडबड झाल्याची चिन्हे नव्हती. पण पडद्याच्या मागे बिछान्याजवळ त्यांनी जमिनीवरून एक मोठे अन् जाडजूड पाकीट उचलले, त्यावर "माझी देवता ग्रुशिंका हिला, ती यायला कबूल झाली तर तीन हजार रुबलांचं हे इनाम," असे लिहिलेले होते. आणि खाली फ्योदर पावलोविचने आणखी लिहिले होते: "माझ्या चिमुकल्या पाखरास". त्या पाकिटावर लाल लाखेची तीन सिले होती, पण ते फोडण्यात आलेले होते अन् रिकामे होते; त्यातला पैसा काढून घेण्यात आला होता. गुलाबी रंगाच्या ज्या फितीने ते पाकीट घट्ट बांधण्यात आले होते तीही त्यांना खाली जमिनीवर मिळाली.

प्योत्र इल्यिचच्या एका पुराव्याची सरकारी वकिलावर अन् तपासणी मॅजिस्ट्रेटवर चांगलीच छाप पडली, तो म्हणजे, दमीत्रि पहाट होण्यापूर्वीच स्वतःवर गोळी घालून घेईल, त्याने तसा निश्चय केला होता, तसे तो प्योत्र इल्यिचजवळ बोलला होता, त्याने पिस्तुले बरोबर घेतली होती, आणि त्याच्या देखतच ती भरली होती, एक पत्र लिहिले होते अन् स्वतःच्या खिशात ठेवले होते वगैरे. प्योत्र इल्यिचचा अजून त्यावर विश्वास बसला नव्हता, पण त्याने जेव्हा ही आत्महत्या भासा शी म्हणून आपण कुणाला तरी हे सांगू म्हणून धमकी दिली तेव्हा मीत्त्या हसून म्हणाला होता : "त्याला फार उशीर झालेला असेल." म्हणून त्यांनी मोक्रोयला जाऊन गुन्हेगाराने खरोखर स्वतःवर गोळी झाडून घेण्यापूर्वी, त्याला शोधून काढण्याची घाई करणे अवश्य होते.

"हे अगदी स्पष्ट आहे, अगदी स्पष्ट आहे!" सरकारी वकील अतिशय प्रक्षुब्ध होऊन पुनःपुन्हा म्हणाला. "याच्यासारख्या पागलांची हीच तऱ्हा असते, म्हणे मी उद्या स्वतःला मारणार आहे तर आता आपण मरेपर्यंत मौज करू!"

त्याने दारू अन् इतर सामान कसे खरेदी करून नेले या हकीकतीने तर सरकारी वकील पूर्वीपेक्षा अधिकच अस्वस्थ झाला.

"मंडळी, तो ओल्सुफिव नावाच्या व्यापाऱ्याचा खून करणारा माणूस तुम्हाला आठवतो का? त्यानं पंधराशे चोरले, लगेच आपले केस कुरळे करून घ्यायला तो गेला, आणि नंतर, तो पैसा न छपविता अशाच रीतीने तो अगदी आपल्या हातात वागवीत तो बायांच्याकडं गेला."

पण ती चौकशी, तपास आणि फयोदर पावलोविचच्या घरात इतर साऱ्या ज्या कायदेशीर गोष्टी वगैरे करायच्या त्या करण्यात सर्वांनाच उशीर झाला. त्यात वेळ गेला आणि त्यामुळे, निघण्याच्यापूर्वी दोन तास, त्यांनी मोक्रोयला ग्रामीण पोलिस विभागाचा अधिकारी मावरिकी मावरिक्येविच श्मेल्सोव याला पुढे पाठवून दिले. तो आदल्यादिवशी सकाळी आपला पगार घेण्याकरिता म्हणून शहरात आलेला होता. त्याने मोक्रोयला पोचल्यानंतर लोकांत त्याच्यामुळे भीतीचा ओरडा उठेल तो टाळावा पण योग्य ते अधिकारी तेथे येईपर्यंत 'गुन्हेगारा'वर सतत नजर ठेवावी, धरपकडीकरिता साक्षीदारही मिळवून ठेवावेत, पोलिस शिपाई ठेवावेत इ. इ. सूचना त्याला देण्यात आल्या. मावरिकी मावरिक्येविचने त्याला सांगितल्याप्रमाणे केले, त्याने आपला गुप्तवेष तसाच ठेवला आणि आपला जुना परिचित त्रिफोन बोरिस्सोविच याच्याखेरीज कोणालाही आपल्या गुप्त कार्याचा पुसटसासुद्धा पत्ता लागू दिला नाही. मीत्त्याचा अंधारात शोध घेत असता खाणावळवाल्याला तो बाल्कनीत भेटला त्यापूर्वी नुकताच त्याला तो हे बोलला होता; मीत्त्याला लगेच त्रिफोन बोरिस्सोविचच्या चेहेऱ्यात अन् आवाजात फरक दिसून आला. पण मीत्त्याला किंवा दुसऱ्या कोणालाही त्याच्यावर पाळत ठेवण्यात आली

आहे हे कळले नाही. पिस्तुलांची पेटी त्रिफोन बोरिस्सोविचने नेऊन योग्य त्या ठिकाणी ठेवली. चार वाजून गेल्यानंतरच, म्हणजे जवळजवळ सूर्योदयाला, सर्व अधिकारी मंडळी, तो पोलिस कॅप्टन, सरकारी वकील, तपास करणारा वकील, हे दोन गाड्यांत बसून आले; प्रत्येक गाडीला तीन तीन घोडे जोडलेले होते. फ्योदर पावलोविचच्या प्रेताची दुसऱ्या दिवशी मरणोत्तर तपासणी करण्याकरिता म्हणून डॉक्टर मागेच राहिला. पण त्याचे लक्ष नोकर स्मिर्दाखफ याच्या अवस्थेकडे विशेष होते.

"अशा जबर अन् दीर्घकाल राहणाऱ्या अपस्माराच्या मूर्च्छा, चोवीस तास एकसारख्या येत राहणाऱ्या फार क्वचित आढळतात, अन् शास्त्राच्या दृष्टीनं त्या लक्ष घालण्याजोग्या आहेत," तो आपल्या सोबत्यांना उत्साहाने म्हणाला, आणि ते तिथून निघाले तेव्हा त्यांनी हसून त्याच्या महत्त्वाच्या शोधाबद्दल त्याचे अभिनंदन केले. सरकारी वकिलाला अन् तपास करणाऱ्या वकिलाला डॉक्टरने स्पष्टपणाने सांगितले की स्मिर्दाखफ आजची रात्र काही काढणार नाही, ते त्यांच्या चांगले स्मरणात राहिले.

इतक्या लांबलचक, पण माझ्या मते आवश्यक स्पष्टीकरणानंतर आपल्या गोष्टीचा धागा जिथे सोडला होता तिथे आपण परत येऊ.

३

आत्म्याच्या यातना– पहिले दिव्य

अशा रीतीने मीत्या आपल्या सभोवतालच्या लोकांकडे वेड्यासारखा पाहात राहिला. आपल्याशी कोण काय बोलते आहे हे त्याला समजतच नव्हते. एकाएकी तो उठून उभा राहिला, आपले हात त्याने उंच केले अन् मोठ्याने ओरडून म्हणाला,

"मी अपराधी नाही ! मी त्या खुनाबद्दल अपराधी नाही ! माझ्या बापाच्या खुनाबद्दल मी अपराधी नाही... माझ्या मनात त्याला तर मारावं असं होतं खरं पण मी तो गुन्हा केलेला नाही. मुळीच केलेला नाही."

पण तो हे बोलतो न बोलतो इतक्यात ग्रुशिंका पडद्यामागून धावत पुढे आली आणि एकदम पोलिस कॅप्टनच्या पायाशी पडली.

"तो माझा दोष आहे ! माझा ! माझा दुष्टपणा !" ती हृदयाला घरे पडावीत अशा आवाजात, अश्रूंनी भिजून जाऊन आपले आवळून धरलेले हात त्यांच्या पुढे करून ओरडून म्हणाली, "माझ्यामुळं त्यानं हे केलं. मी त्याचा छळ केला अन् त्याला ते दुष्कृत्य करायला लावलं. जो मेला त्या गरीब म्हाताऱ्या माणसाचाही मी

दुष्टपणानं छळ केला, आणि त्याला या दशेला आणलं! हा माझा अपराध आहे, अगोदर माझा, सर्वात जास्त माझा, माझा अपराध आहे हो!"

"होय, तुझाच अपराध! तूच मुख्य गुन्हेगार आहेस! चांडाळणी! बाजारबसवे! तूच सर्वात अधिक अपराधी आहेस!" पोलिस कॅप्टन आपल्या हाताने तिला धाक दाखवीत ओरडला. पण त्याला पटकन् अन् खंबीरपणे दडपण्यात आले. सरकारी वकिलाने त्याला धारेवर धरलेच.

"हे अगदी बेकायदेशीर आहे, मिखाईल मकारोविच!" तो म्हणाला, "तुम्ही चौकशीला अडथळा आणीत आहात.... तुम्ही प्रकरण बिघडवीत आहात..."तो जवळ जवळ धापा टाकू लागला.

"कायदेशीर मार्गानं चला! कायदेशीर मार्गानं चला!" निकोलाय पारफेनोविच म्हणाला, तोही अतिशयच प्रक्षुब्ध झालेला होता. "नाहीपेक्षा हे अगदी अशक्य होईल!..."

"आमचा दोघांचा एकत्र न्याय करा!" ग्रूशिंका आवेगाने म्हणाली, अजूनही तिने गुडघे टेकलेलेच होते. "आम्हा दोघांना एकत्र शिक्षा द्या, मी आता त्याच्याबरोबर जाईन, मग मरणाकडं जायचं असलं तरी असो!"

"ग्रुशा, माझ्या पंचप्राणा, माझ्या रक्ता, माझ्या देवते!" मीत्याने तिच्या शेजारी एकदम गुडघे टेकले अन् तिला आपल्या बाहूंत कवटाळून धरले. "तिच्यावर विश्वास ठेवू नका," तो म्हणाला, "ती कशाबद्दलही दोषी नाही, कुठल्याही खुनाबद्दल, कशाकशाबद्दल नाही!"

मीत्याला मागाहून आठवले की अनेक लोकांनी आपल्याला तिच्यापासून जबरदस्तीने दूर ओढून नेले, तिला बाहेर नेण्यात आले, आणि आपण भानावर आलो तेव्हा एका टेबलापाशी बसलेलो होतो. त्याच्या बाजूला अन् मागे धातूचे बिल्ले अंगावर लावलेली माणसे उभी होती. टेबलाच्या पलीकडच्या बाजूला त्याच्याकडे तोंड करून निकोलाय पारफेनोविच हा तपास करणारा वकील बसला होता. तो एकसारखे टेबलावर ठेवलेल्या पेल्यातून थोडे थोडे पाणी पिण्यासाठी त्याचे मन वळवीत होता.

"त्यानं तुम्हाला हुषारी वाटेल, त्यानं तुम्हाला शांतपणा येईल. शांत व्हा, घाबरू नका," तो त्याला अत्यंत सौजन्यपूर्वक म्हणाला. मीत्याचे लक्ष एकदम त्याच्या मोठ्यामोठ्या अंगठ्यांकडे तीव्रतेने गेले (हे मागाहून त्याला आठवले), त्यांतली एक अस्मानी रंगाचा खडा असलेली अन् दुसरी पारदर्शक चकचकीत पिवळ्या रंगाचा अत्यंत तेजस्वी खडा असलेली होती. आणि दोन अंगठ्यांवर आपले सारे लक्ष, ती भयंकर चौकशी चालली असताना सारा वेळ, कसे खिळून राहिले होते, इतके की त्याच्यापासून स्वतःला दूर करणे अन् आपल्यासारख्या दर्जाच्या माणसाला ज्यांच्याशी काही कर्तव्य नाही अशा या वस्तू आहेत असे समजून त्यांना मनातून काढून टाकणे आपल्याला अगदी अशक्य झाले होते याचे त्याला पुढे

पुष्कळ दिवसांनी साश्चर्य स्मरण झाले होते. मीत्याच्या डाव्या बाजूला, जिथे संध्याकाळी सुरुवातीला मॅक्झिम र बसला होता, तिथे आता सरकारी वकील बसला होता, अन् मीत्याच्या उजव्या बाजूला जिथे ग्रूशिंका होती तिथे आता एक गुलाबी गालाचा तरुण मनुष्य गबाळा शिकारी कोट घालून बसला होता, त्याच्यापुढे कागद अन् शाई होती. हा त्या तपास करणाऱ्या वकिलाचा सेक्रेटरी होता, त्याने त्याला आपल्या बरोबर आणले होते. पोलिस कॅप्टन यावेळी खोलीच्या दुसऱ्या टोकाला, काल्गानफ जिथे बसला होता तिथे त्याच्या शेजारी उभा होता.

"थोडं पाणी घ्या," तो तपास करणारा वकील मार्दवाने दहाव्यांदा म्हणाला।

"मी प्यालो ते, सद्गृहस्थ हो, पण मी...पण...चला, सद्गृहस्थहो, मला चिरडून टाका, शिक्षा करा, माझ्या नशिबाचा एकदाचा निकाल लावा!" मीत्या आपले विस्फारलेले डोळे तपास करणाऱ्या वकिलावर भयंकर रीतीने रोखून म्हणाला.

"म्हणजे तुम्ही निश्चितपणे सांगता की तुम्ही आपले वडील फ्योदर पावलोविच यांचा खून केला नाही, अं?" तपास करणाऱ्या वकिलाने मृदूपणे पण जोराने विचारले.

"मी अपराधी नाही. मी अपराधी आहे तो दुसऱ्या एका म्हाताऱ्याचे रक्त सांडल्याबद्दल. माझ्या वडिलांचे नाही. अन् मला त्याचे रडू येते! मी मारले, मी त्या म्हाताऱ्याला ठार मारले अन् ठोसा लगावून खाली पाडले...पण त्याबद्दल दुसऱ्याचा खून झाल्याची जबाबदारी घेणे मला शक्य नाही, हा भयानक खून आहे, तो मी केलेला नाही....हा भयानक आरोप आहे, सद्गृहस्थहो, अगदी खलास करणारा आघात आहे. पण माझ्या वडिलांना मारले कुणी, कुणी त्यांना मारले? जर मी मारले नसले तर कुणी मारले असावे? हे आश्चर्यकारक, विलक्षण, घटित आहे."

"होय, कुणी बरं मारलं असावं?" तपास करणारा वकील बोलणार होता, पण सरकारी वकील इप्पोलित किरिलोविच त्याला डोळ्याने खूण करून मीत्याला उद्देशून म्हणाला :

"तुम्ही त्या म्हाताऱ्या नोकराबद्दल– ग्रिगरी वासिल्येविचबद्दल चिंता करू नका. तो जिवंत आहे, तो शुद्धीवर आला आहे, आणि त्याच्या स्वतःच्या अन् तुमच्या पुराव्यानुसार तुमच्याकडून त्याच्यावर भयंकर प्रहार झाले असले तरीसुद्धा तो आता जगेल यात संशय नाही, असं निदान डॉक्टर म्हणतात."

"जिवंत आहे? तो जिवंत आहे?" मीत्या आपले हात हवेत उडवीत मोठ्याने म्हणाला. त्याचा चेहेरा उजळला. "देवा, माझ्याकरिता, एका पापी अन् दुश्चरित माणसाकरिता तू हा जो चमत्कार घडवून आणलास त्याबद्दल तुझा मी कृतज्ञ आहे. माझ्या प्रार्थनेला हे उत्तर आहे. मी रात्रभर प्रार्थना करीत होतो."

आणि त्याने तीन वेळा स्वतःवर क्रूसाचे चिन्ह केले. त्याचा श्वास कोंडल्यासारखा झाला.

"तेव्हा या ग्रिगरीकडूनच तुमच्या संबंधानं आम्हाला असा महत्त्वाचा पुरावा मिळाला आहे की..." सरकारी वकील पुढे बोलला असता, एवढ्यात मीत्या झटकन् आपल्या खुर्चीवरून उठला.

"एक मिनिट, सभ्य गृहस्थहो, मेहेरबानी करून, एक मिनिट; मी तिच्याकडं धावत जातो—"

"माफ करा, या वेळी तर ते अगदी अशक्य आहे," निकोलाय जवळजवळ किंचाळलाच. तोही चटकन् आपल्या जागेवरून उठला. मीत्याला धातूचे बिल्ले लावलेल्या माणसांनी धरले, पण तो आपण होऊनच खाली बसला....

"सद्गृहस्थहो, काय दुर्दैव ! मला तिला फक्त एक मिनिटभरच भेटायचं होतं; तिला मला सांगायचं होतं की ते धुतलं गेलं, साफ झालं, जे रक्त सबंध रात्रभर माझ्या अंतःकरणावर ओझं होऊन राहिलं होतं ते साफ झालं, अन् आता मी खुनी नाही ! सद्गृहस्थहो, ती माझी वाग्दत्त पत्नी आहे !" तो भावनावेगाने अन् सन्मानपूर्वक म्हणाला अन् त्याने सभोवार त्या सर्वांकडे पाहिले. "अहाहा, मी आभारी आहे, सद्गृहस्थहो ! अहाहा, एका क्षणात तुम्ही मला नवीन जीवन, नवीन हृदय दिलंत !.... तो म्हातारा गृहस्थ मला आपल्या हातांवर वागवीत असे हो, मंडळी. मी तीन वर्षांचं मूल असताना, सर्वांनी मला टाकून दिलं असताना, तो मला टबात बसवून आंघोळ घालीत असे, तो मला माझ्या बापासारखा होता !...."

"अन् म्हणून तुम्ही..." तो तपास करणारा वकील पुढे बोलू लागला.

"सद्गृहस्थहो, एक मिनिट, आणखी एकच मिनिट मला द्या," मीत्या मध्येच म्हणाला, त्याने आपले कोपर टेबलावर ठेवले अन् आपले तोंड हातांनी झाकून घेतले. "एक क्षणभर मला विचार करू द्या, मला जरा दम घेऊ द्या, सद्गृहस्थहो, हे सारं मला भयंकरच अस्वस्थ करणारं आहे, भयंकर. माणूस म्हणजे काही ढोलकं नव्हे हो, मंडळी !"

"आणखी थोडं पाणी प्या," निकोलाय हळूच म्हणाला.

मीत्याने चेहेऱ्यावरचे हात काढले अन् तो हसला. त्याच्या डोळ्यात आत्मविश्वास दिसू लागला होता. तो एका क्षणात पार बदलून गेल्यासारखा दिसला. त्याचे सबंध रूपच पालटले; तो परत त्या माणसांच्या बरोबरीचा झाला, जणू ते आदल्याच दिवशी जेव्हा काहीच घडलेले नव्हते तेव्हा, एखाद्या सार्वजनिक बैठकीच्या ठिकाणी सर्वजण एकत्र जमलेले असावेत तसा. त्या सर्वांशी त्याचा परिचय होताच. जाता जाता आम्ही हे नमूद करतो की, पोलिस कॅप्टनच्या इथे मीत्या प्रथम गेला तेव्हा त्याचे फार चांगले स्वागत झाले होते, पण पुढे विशेषतः शेवटच्या महिन्यात

मीत्या त्यांच्याकडे फारसा गेलाच नव्हता, अन् जेव्हा पोलिस कॅप्टन त्याला रस्त्यात किंवा कुठे म्हणा भेटला, तेव्हा मीत्याला असं दिसलं की, त्याच्या कपाळाला आठ्या पडतात अन् तो फक्त शिष्टाचार म्हणून मान वाकवितो. त्याची सरकारी वकिलाशी ओळख कमी होती, अर्थात तो कधीकधी त्याच्या बायकोला शिष्टाचार म्हणून जाऊन भेटत असे, का ते त्याचे त्यालाच माहीत नव्हते. ती एक अस्वस्थ मनाची नि लहरी स्वभावाची बाई होती, ती त्याचे नेहमी कृपाळूपणे स्वागत करी अन् काय कारण असेल ते असो, शेवटपर्यंत तिला त्याच्याबद्दल आस्था वाटत होती. त्याची त्या तपास करणाऱ्या वकिलाशी जरी भेट झाली होती अन् दोनदा त्यांचे बोलणे प्रत्येक वेळी स्त्रियांच्या विषयी, झाले होते, तरी त्याची चांगली ओळख करून घ्यायला त्याला सवड झाली नाही.

"निकोलाय पारफेनोविच, तुम्ही फार कुशल वकील आहातसे दिसते," मीत्या मजेने हसून म्हणाला, "पण आता माझी तुम्हाला मदत होऊ शकेल. काय सांगू, सद्गृहस्थहो, मला मी नवाच मनुष्य झालो असल्यासारखं वाटतंय, अन् मी तुम्हाला असं साधेपणानं अन् सरळपणानं संबोधून बोलतोय, यानं तुम्ही दुखावल्यासारखे होऊ नका. मी काहीसा धुंदही झालेलो आहे, हे मी तुम्हाला मोकळेपणाने सांगतो. निकोलाय पारफेनोविच, तुम्हाला भेटण्याचा सन्मान अन् आनंद मला वाटतं मी माझे नातेवाईक मिऊझोव यांच्या इथं भोगला आहे. सद्गृहस्थहो, सद्गृहस्थहो, मी तुमच्या बरोबरीचा आहे असा आव मी आणणार नाही. मी इथं कोणत्या नात्यानं तुमच्यापुढं बसलो आहे याची अर्थात मला जाणीव आहे. हंः जर ग्रिगरीनं साक्ष दिली असेल तर माझ्यावर एक भयंकर संशय टांगता आहे खराच. ...भयंकर संशय! तो भयंकर आहे, भयंकर आहे, ते मला समजतं! पण, आता कामाला लागू या; सद्गृहस्थहो, मी तयार आहे, आणि आपण एका क्षणात त्याचा निकाल करून टाकू; कारण, ऐका, सद्गृहस्थहो, ऐका! ज्याअर्थी मी निरपराधी आहे हे मला माहीत आहे, त्याअर्थी आपल्याला एका मिनिटात त्याचा शेवट करता येईल, नाही का?"

आपले श्रोते हे आपले निकटचे मित्रच आहेत असंच जणू निश्चितपणे मानून मीत्या उद्दंड अन् भरभर, बावरल्या मनाने अन् आपले हृदय ओतून बोलला.

"तर मग, तूर्त, आम्ही इतकंच लिहितो की तुम्ही तुमच्यावर केलेला आरोप पूर्णपणे अमान्य करताहात," निकोलाय पारफेनोविच परिणामकारकपणे बोलला, आणि आपल्या सेक्रेटरीच्या बाजूला वाकून त्याने काय लिहायचे ते त्याला हलक्या स्वरात सांगितले.

"लिहून घेणार? तुम्हाला ते लिहून घ्यायचं आहे? ठीक, लिहा; माझी संमती आहे, माझी पूर्ण संमती मी देत आहे, सद्गृहस्थहो, फक्त इतकंच... बरं का... थांबा, थांबा, हे लिहा : अव्यवस्थित वर्तणुकीबद्दल मी अपराधी आहे, एका

गरीब म्हाताऱ्या माणसावर अत्याचार केल्याबद्दल मी अपराधी आहे. अन् माझ्या मनात अंतःस्थ आणखी एक गोष्ट आहे, तिच्याबद्दलही मी अपराधी आहे–पण ते तुम्ही लिहून घ्यायचं कारण नाही. (तो एकदम सेक्रेटरीकडं वळून म्हणाला) ती माझी खाजगी जीवनातली बाब आहे, मंडळी, तिचा तुमच्याशी संबंध नाही, म्हणजे माझ्या अंतःस्थ मनात आहे त्याबद्दल मी म्हणतोय पण माझ्या वृद्ध वडिलांच्या खुनाबद्दल म्हणाल तर मी अपराधी नाही. ही कल्पनाच भयंकर आहे. ही अगदी बेफाट कल्पना आहे! ... ते मी तुम्हाला सिद्ध करून देईन अन् तुमची तत्काळ खात्री पटेल... तुम्ही हसालच मंडळी, हा संशय घेतल्याबद्दल तुम्हाला हसूच येईल..."

"शांत व्हा, दमीत्रि फयोदरविच," तपास करणारा वकील म्हणाला, मीत्याचे अस्वस्थ चित्त आपल्या स्वतःच्या शांतपणाने थंड करण्याचा अर्थात त्याचा प्रयत्न होता. "आमच्या तपासणीला सुरुवात करण्यापूर्वी, तुम्ही उत्तर द्यायला कबूल असाल तर, तुम्हाला आपले वडील, फयोदर पावलोविच यांच्याबद्दल नावड होती, त्यांच्याशी तुमचे नेहमी झगडे चालत, या विधानाला तुमची पुष्टी आहे हे मला समजलं तर बरं होईल. इथं तरी निदान तुम्ही पाव तासापूर्वीच उद्‌गार काढलेत की मला त्यांना ठार मारायचं होतं; तुम्ही म्हणालात, 'मी त्यांना मारलं नाही, पण मला त्यांना ठार मारायचं होतं'!"

"असं मी उद्‌गारलो का? हुंः असेल तसं, सद्‌गृहस्थहो! होय, दुर्दैवानं मला त्यांना ठार मारण्याची इच्छा होती....पुष्कळ वेळा मला तशी इच्छा व्हायची ...दुर्दैवानं, दुर्दैवानं!"

"तुम्हाला इच्छा व्हायची. तुमच्या मनात आपल्या वडिलासंबंधानं अशी द्वेषभावना निर्माण व्हायला नक्की कारणं काय होती हे स्पष्ट करायला तुम्ही संमती द्याल का?

"यात स्पष्ट करण्यासारखं काय आहे, मंडळी?" मीत्याने उद्विग्नपणे आपले खांदे उडविले अन् त्याने आपली दृष्टी खाली वळविली. "मी माझ्या भावना कधीच लपवलेल्या नाहीत. त्या संबंधी साऱ्या शहराला माहिती आहे– खाणावळीतील प्रत्येकजण ते जाणतो. नुकत्याच मी त्या बाबा झसीमफांच्या मठात जाहीर केल्या... आणि त्याच दिवशी सायंकाळी मी माझ्या वडिलांना मार दिला. मी जवळजवळ त्यांना ठारच केलं, आणि त्या वेळी मी शपथेवर म्हणालो की, मी पुन्हा येईन अन् त्यांना साक्षीदारांच्या समोर... हो हो, हजार साक्षीदारांच्या समोर, ठार मारीन! गेला महिनाभर मी हे मोठमोठ्यानं ओरडत आहे, कोणीही हे तुम्हाला सांगू शकेल... सत्यस्थिती तुमच्या समोर उभी आहे, खुद्द तिच्यातूनच काय कळायचं ते कळतं. ती मोठ्यानं आक्रोश करून सांगते, पण भावना, सद्‌गृहस्थहो, भावना ही वस्तू वेगळी आहे. सद्‌गृहस्थहो, (मीत्या कपाळाला आठ्या घालून

म्हणाला,) भावनांसंबंधानं मला असं वाटतं की, तुम्हाला मला विचारण्याचा काही हक्क नाही. तुम्ही तुमच्या सरकारी बंधनांनी बांधलेले आहात हे मी जाणतो. मला ते चांगलं समजतं, पण ती माझी बाब आहे, माझी खासगी, अगदी वैयक्तिक बाब आहे, तरी.... माझ्या भावना मी पूर्वी लपवून ठेवलेल्या नाहीत... उदाहरणार्थ खाणावळीत मी प्रत्येकाशी बोललो आहे, म्हणून....म्हणून मी ती बाब आता गुप्त ठेवू इच्छीत नाही. सद्गृहस्थहो, लक्षात घ्या की, या प्रकरणी माझ्या विरुद्ध भयंकर पुरावे आहेत हे मी जाणतो. मी प्रत्येकाला म्हटलं होतं की, मी त्यांना ठार मारीन, आणि आता, एकाएकी, ते मारले गेले आहेत. अर्थात मारणारा मीच असलो पाहिजे! हां हां! मी तुमची बाजू समजू शकतो, सद्गृहस्थहो, मी तुमची बाजू समजू शकतो! मी स्वतःच ह्या आघातानं कोसळून पडलो आहे कारण मी जर खून केला नसेल तर कुणी केला असणार? निष्कर्ष हाच निघतो, नाही का? जर मी नसेल, तर दुसरा कोण असू शकेल, कोण? सद्गृहस्थहो, मला हे जाणून घ्यायचं आहे, मला हे कळलंच पाहिजे!" तो एकदम उद्गारला. "त्यांचा खून कुठं झाला? कसा झाला? कसा अन् कशानं करण्यात आला? सांगा मला." त्याने त्या दोन्ही वकिलांकडे पाहात भरभर विचारले.

"ते आम्हांला त्यांच्या खाजगी खोलीत आढळले, ते जमिनीवर उताणे पडले होते आणि त्यांचं डोकं फुटलेलं होतं." सरकारी वकील म्हणाला.

"भयानक!" मीत्याच्या अंगावर शहारे आले, अन् आपले कोपरे टेबला-वर ठेवून त्याने आपल्या उजव्या हाताने आपले तोंड झाकून घेतले.

"आपण पुढं चालू करूया," निकोलाय पारफेनोविच मध्येच म्हणाला. तुमच्या मनात ही द्वेषभावना निर्माण होण्याला कारण काय झालं? मला वाटतं तुम्ही जाहीर रीतीनं बोललेले आहात की त्याचं मूळ कारण मत्सर हे होतं म्हणून?"

"हं? होय, मत्सर, आणि फक्त मत्सरच नव्हे."

"पैशाबाबतचे वाद?"

"हो, पैशाबाबतचे सुद्धा."

"तुमचा, मला वाटतं, तीन हजार रुबलसंबंधीचा वाद होता, तो तुम्ही आपल्या वारशाचा हिस्सा म्हणून मागितले होते?"

"तीन हजार? जास्तच, जास्तच," मीत्या तापून म्हणाला. "सहा हजारांहून जास्त, दहा हजारांहून ही कदाचित जास्त. मी प्रत्येकाला तसं सांगितलं होतं, सर्वांपुढं ओरडून बोललो होतो. पण मी ते तीन हजारांवर तोडून टाकायचं ठरवलं होतं. मला त्या तीन हजारांची जिवाच्यापलीकडं गरज होती... म्हणून तीन हजारांच्या नोटांचं जे पुडकं त्यांनी आपल्या उशाखाली ग्रूशिंकाकरिता तयार ठेवलं असल्याचं मला माहीत होतं ते माझेच चोरलेले आहेत असं मी समजलो. होय, सद्गृहस्थहो, ते मी माझेच, माझीच स्वतःची मालमत्ता असं समजत होतो.

सरकारी वकिलानें अर्थपूर्ण दृष्टीने तपासणी करणाऱ्या वकिलाकडे पाहिले, आणि तेवढयातल्या तेवढयात त्याने हळूच त्याला डोळा घातला.

"आपण त्या विषयाकडं मागाहून वळू," वकील तत्परतेने म्हणाला, "हा मुद्दा लक्षात घेऊन आम्हाला नमूद करण्याची तुम्ही परवानगी द्यावी; की तुम्ही तो पैसा आपलीच मालमत्ता म्हणून समजत होता. होय ना?"

"बेशक लिहून घ्या. मला माहीत आहे की ही अशी आणखी एक बाब आहे की जी माझ्या विरुद्ध जाणार आहे, परंतु मला सत्य गोष्टीचं भय वाटत नाही आणि त्या मी माझ्याविरुद्ध असल्या तरी तुम्हाला सांगतो. ऐकलंत?" तो पुढे एकदम म्लान अन् खिन्न होऊन म्हणाला, "सद्गृहस्थहो, तुम्ही मला मी जसा आहे त्याहून वेगळ्या प्रकारचा माणूस मानता आहा हे तुमच्या लक्षात आलंय का?" "तुम्हाला एका नेकीच्या माणसाशी, अत्यंत उच्च नेकी असलेल्या माणसाशी व्यवहार करायचा आहे. हा असा मनुष्य आहे की ज्यानं अनेक वाईट गोष्टी केल्या असल्या तरी मुळात, त्याच्या अंतरात तो नेहमी नेकीचा राहिला आहे, आणि अजूनही तसाच आहे. ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट दृष्टीआड करू नका. ते कसं सांगावं मला समजत नाही. त्यामुळंच तर मी साऱ्या आयुष्यभर दुर्दैवी राहिलो आहे, नेकीच्या राहण्याबद्दल माझ्या मनात तळमळ असायची, एक प्रकारे नेकीच्या भावनेला मी बळीच गेलेला होतो म्हणा ना, ती भावना हातात कंदील घेऊन, डायोजिनिसचा कंदील घेऊन, मी शोधीत होतो, अन् तरी आयुष्यभर, सद्गृहस्थहो, मी आपणा सर्वांप्रमाणेच वाईट गोष्टी करीत आलो आहे...ते मात्र माझंच वैशिष्ट्य म्हणावं लागेल. हीच चूक होती, अन् तेही माझंच वैशिष्ट्य, माझंच वैशिष्ट्य!...सद्गृहस्थहो, माझं डोकं दुखू लागलं आहे..." त्याच्या भिवया वेदनेनं आवळल्या. "बरं का सद्गृहस्थहो, मला त्याचं दर्शन सहन होत नसे. अधम, उद्दाम, जे जे पवित्र असेल ते ते तुडविणारं, नाक मुरडून तिरस्कार करणारं, अनादरकारक, उबग आणणारं, अगदी उबग आणणारं असं काहीतरी त्याच्यात होतं. पण आता ते वारले आहेत, आता मला वेगळं वाटतं आहे."

"म्हणजे तुम्हाला काय म्हणायचंय?"

"माझी भावना वेगळी झालेली नाही, पण मला वाटतं मी त्यांचा इतका द्वेष केला नसता तर बरं झालं असतं."

"पश्चात्ताप वाटतो?"

"नाही, पश्चात्ताप नाही वाटत, तसं लिहू नका. मी स्वतः कुठं चांगला आहे, मी देखील फारसा देखणा नाही, म्हणून त्यांच्याविषयी तिटकारा वाटण्याचा मला काहीच अधिकार नव्हता, असा माझ्या म्हणण्याचा अर्थ. तुम्हाला वाटलं तर ते लिहून घ्या."

असं बोलून मीत्या फार शोकमग्न झाला. ही तपासणी जसजशी पुढे चालली

तसतसा तो अधिकाधिक मलूल होत चालला होता.

त्याचवेळी दुसरा एक अनपेक्षित प्रकार घडला. जरी ग्रूशिंकाला तेथून बाजूला काढण्यात आले होते, तरी तिला फार दूर नेण्यात आले नव्हते. निळ्या खोलीच्याशेजारी असलेल्या खोलीच्या पलीकडच्या खोलीतच तिला ठेवण्यात आले होते, चौकशी निळ्या खोलीत चालू होती. ती एक लहानशी खोली होती, तिला फक्त एकच खिडकी होती, ही खोली जिथे ते नाचले होते न् इतके भरमसाट खाल्ले-प्याले होते त्या मोठ्या खोलीच्या पलीकडचीच होती. ती तेथे बसली होती अन् मॅक्झिमफखेरीज तिथे दुसरे कोणीही नव्हते. तो अतिशय उदासवाणा, अतिशय भयभीत होऊन गेला होता अन् जणू आपले रक्षण व्हावे म्हणून तो तिला धरून राहिला होता. त्यांच्या दारावर एक खेडूत छातीवर धातूचा बिल्ला लावून उभा होता. ग्रूशिंका रडत होती, अन् एकाएकी तिचे दुःख तिला अनिवार झाले, ती एकदम उठली, आपले हात तिने एकदम पुढे केले अन् दुःखाचा एक केविलवाणा आवाज काढून ती खोलीच्या बाहेर त्याच्याकडे, तिच्या मीत्याकडे धावली, अन् हे इतक्या अनपेक्षितपणे की त्यांना तिला अडवायला सवडच मिळाली नाही. तिचा आक्रंद ऐकून मीत्या कापू लागला, तो एकदम उठला आणि दुःखाची एक आरोळी ठोकून, आपण काय करतो आहो हे न समजता तिला भेटण्याकरिता अतिशय आवेगाने धावला. पण त्यांना एकत्र येऊ दिले गेले नाही, फक्त त्यांनी एकमेकाला पाहिले तेवढेच. त्यांनी त्याच्या दंडांना धरले. त्याने धडपड केली अन् स्वतःला सोडवून घेण्याचा प्रयत्न केला. त्याला धरून ठेवायला तीन-चार माणसे लागली. तिलाही धरून ठेवण्यात आले, आणि ती आपल्याकडे हात पसरते आहे अन् तिला ते दूर घेऊन जात असताना ती मोठ्याने रडत आहे हे त्याने पाहिले. हे दृश्य संपले अन् तो पुनः भानावर आला, परत तो आपल्या पूर्वीच्या जागी, त्या तपास करणाऱ्या वकिलाच्या समोर तोंड करून बसला, अन् त्यांना ओरडून म्हणाला.

" तिच्याकडून तुम्हाला काय हवं आहे ! तिला का उगाच छळता ? तिनं काहीच केलेलं नाही, काहीच केलेलं नाही !. .."

वकिलांनी त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. अशी दहा मिनिटे गेली. शेवटी मिखाईल मकारोविच– तिथे हजर नव्हता तो, घाईघाईने त्या खोलीत आला अन् सरकारी वकिलाला मोठ्या अन् क्षुब्ध आवाजात म्हणाला,

" तिला इथून हलवलं आहे, ती खाली आहे. सद्गृहस्थहो, त्या दुर्दैवी मनुष्याशी एक शब्द बोलायची तुम्ही मला परवानगी द्याल ? तुमच्याच समोर, अर्थात्, तुमच्याच समोर."

" बेशक, मिखाईल मकारोविच," तो तपासणी करणारा वकील म्हणाला, " सदर प्रकरणी आमची तसं करण्याला ना नाही."

" ऐक, दमीत्रि फ्योदरोविच, माझ्या प्रिय मित्रा," तो पोलिस कॅप्टन बोलू लागला. त्याच्या भावनोद्दीपित मुद्रेवर या दुर्दैवी कैद्यासंबंधी एक प्रकारच्या सहानुभूतीचा, जवळजवळ पितृवात्सल्याचा भाव होता. " मी तुझ्या आग्राफेना अलेक्झांड्रोवनाला स्वतःच खाली घेऊन गेलो अन् तिची काळजी घेण्याकरिता तिला खाणावळ मालकाच्या मुलींच्या स्वाधीन केले; आणि तो म्हातारा मॅक्झिमफ सारखा तिच्याजवळ आहे. मी तिचं सांत्वन केलं. ऐकलंस का? मी तिचं सांत्वन केलं न् तिला शांत केलं. मी तिला हे पटवून दिलं की, तुला आपली सफाई द्यायची आहे. म्हणून तिनं तुला अडथळा करता कामाचा नाही. तुला नाउमेद करता कामाचं नाही, नाही तर तू आपलं भान गमावून आपल्या साक्षीत भलतंच काही बोलशील. म्हणजे, मी तिच्याशी बोललो अन् तिची समजूत पटली. माझ्या मुला, ती समजूतदार मुलगी आहे. सहृदय मुलगी आहे, तुझ्याकरिता मदतीची याचना करण्यासाठी तिनं माझ्या या म्हाताऱ्या हाताचं चुंबन घेतलं असतं. तिनं स्वतःच मला तुला सांगायला पाठवलं आहे की, माझी चिंता करू नकोस. अन् माझ्या प्रिय मित्रा, मला जाऊन तिला सांगितलं पाहिजे की तू शांत आहेस. अन् तिच्याविषयी निश्चिंत आहेस. म्हणून तू शांत झालं पाहिजे, समजलास का? मी तिच्याशी चांगला नाही वागलो; ती धार्मिकवृत्तीची आहे. सद्गृहस्थहो, होय, मी तुम्हाला सांगतो ती मृदू अंतःकरणाची आहे अन् कशाबद्दलही तिला दोष लावता येणार नाही. तेव्हा मग दमीत्रि तिला जाऊन मी काय सांगू, तू शांत बसणार की नाही? "

तो सुस्वभावी पोलिस कॅप्टन असे पुष्कळ बोलला की जे कायद्यात बसणारे नव्हते, पण ग्रूशिंकाच्या यातनांनी, एका मानवजीवनाच्या यातनांनी, त्याच्या सद्भावपूर्ण हृदयाला स्पर्श केला होता, अन् त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. मीत्या एकदम उठला अन् त्याच्याकडे धावला.

" माफ करा, सद्गृहस्थहो, मला परवानगी द्या, मला परवानगी द्या! " तो ओरडून म्हणाला. " तुम्हाला देवानं देवदूताचं अंतःकरण दिलं आहे, मिखाईल मकारोविच, मी तिच्याबद्दल तुमचे आभार मानतो. मी खरंच शांत होईन, प्रसन्न होईन. तुम्ही प्रेमळपणानं तिला सांगा की मी प्रसन्न आहे, अगदी प्रसन्न आहे, अन् तिला तुमच्यासारखा देवदूत संभाळीत आहे हे जाणून मी मिनिटभरात हसू लागेन. मी हे सारं ताबडतोब आटोपणार आहे, अन् मोकळा होताच मी तिच्याकडं येईन, मै तिला दिसेल, तिनं वाट पाहावी. सद्गृहस्थहो," तो त्या दोन वकिलांकडे वळून म्हणाला, " आता मी माझे सारं अंतःकरण तुमच्यापुढं मोकळं करीत आहे; मी सर्व काही रितं करीत आहे. आपण हे लवकरच संपवून टाकू, मजेमजेनं संपवून टाकू. शेवटी आपण याकडं पाहून हसू, नाही का? पण, सद्गृहस्थहो, ही स्त्री माझी हृदयाची राणी आहे. होय, ते मला तुम्हाला सांगितलं पाहिजे. ती एक गोष्ट मी तुम्हाला आता सांगतो...मला असं दिसतं आहे की मी सन्मान्य माणसात आहे.

ती माझा प्रकाश आहे, ती माझी देवता आहे, अन् तुम्हाला माहीत आहे ? तिचा आक्रोश तुम्ही ऐकलात ? 'मी तुझ्याबरोबर मृत्यूला कवटाळायला तयार आहे,' ती म्हणाली आणि मी कोण, एक अत्यंत निर्धन भिकारी, मी तिच्याकरिता काय केलंय ? माझ्यावर तिचं इतकं प्रेम का ? माझ्यासारख्या बेढब, कुरूप पशूची, माझा चेहरा असा ओंगळ असताना, असलं प्रेम करून घ्यायची काय लायकी की ती माझ्याबरोबर हद्दपारी भोगायला सुद्धा तयार होते ? ती आत्ताच पहा माझ्याकरिता तुमच्या पायाशी कशी पडली ?.... अन् तरी ती स्वाभिमानी आहे अन् तिनं काहीच केलेलं नाही ! तिची पूजा केल्यावाचून मला कसं राहवेल ? आक्रोश करीत तिच्याकडं जसा आत्ता मी धावत गेलो तसं गेल्यावाचून मला कसं राहवेल ? सद्गृहस्थहो, मला क्षमा करा ! पण आता, आता माझं मन शांत झालं आहे."

आणि तो परत आपल्या खुर्चीत गळून पडला अन् आपले तोंड त्याने हातांनी झाकून घेतले, आणि एकदम त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. पण ते सुखाचे अश्रू होते. त्याने लगेच स्वतःला सावरले. तो म्हातारा पोलिस कॅप्टन खूप खूष झालेला दिसला, तसेच ते वकीलही. त्यांना वाटले ही तपासणी एका नव्या अवस्थेत प्रवेश करीत आहे. पोलिस कॅप्टन बाहेर गेल्यानंतर, मीत्या खरोखरच आनंदी बनला.

"हं, आता, सद्गृहस्थहो, मी आपल्यापुढं सादर आहे, सर्वस्वी तुमच्या स्वाधीन आहे. आणि ह्या इतक्या साध्या क्षुल्लक बारीक बारीक गोष्टी नसत्या तर एका मिनिटात आपण एकमेकाला समजून घेतलं असतं. पुनः मी त्या तपशिलाकडं वळतो. सद्गृहस्थहो, मी तुमच्या हाती आहे, पण मी सांगू इच्छितो की आपला परस्परांवर विश्वास असला पाहिजे, तुमचा माझ्यावर अन् माझा तुमच्यावर, नाहीतर याला अंतच राहणार नाही. मी तुमच्या हिताच्या दृष्टीनं बोलत आहे. चला, सद्गृहस्थहो, आपण कामाला लागू या. माझ्या अंतरात्म्याचा झाडा घेऊ नका; क्षुल्लक तपशील विचारून मला सतावू नका, फक्त सत्य काय घडलं त्याविषयी अन् महत्त्वाचं असेल त्याविषयी विचारा, की मी तुमचं पट्कन् समाधान करीन. तपशील जाऊ दे खड्डयात !"

असं मीत्या म्हणाला, आणि तपासणीला पुन्हा सुरुवात झाली.

४

दुसरं दिव्य

"दमीत्रि फयोदरोविच, तुम्ही उत्तर द्यायला तयार झाल्यानं आम्हाला केवढं उत्तेजन मिळालं त्याची कल्पना तुम्हाला येणार नाही."

निकोलाय पारफेनोविच उत्साहाचा भाव दर्शवीत म्हणाला, नुकताच त्याने

आपला चष्मा काढला होता आणि त्याच्या अत्यंत उठावदार, दूरचे न दिसणाऱ्या घाऱ्या डोळ्यांत समाधान तरळत असलेले स्पष्ट दिसले, आणि आपण परस्परांवर विश्वास ठेवला पाहिजे असे तुम्ही काढलेले उद्‌गार अगदी रास्त आहेत, जर संशयित असामीला स्वतःचा बचाव करण्याची आशा अन् इच्छा असेल आणि तो करणं त्याला शक्य असेल तर, असल्या महत्त्वाच्या प्रकरणांच्या बाबतीत परस्पर विश्वासावाचून पुढं जाणं केव्हा केव्हा खरोखर अशक्य होऊन बसतं. आम्ही आमच्या बाजूनं आमच्या हातात आहे तेवढं सर्व करू, आणि आम्ही हा खटला कसा चालवितो ते तुमचं तुम्हीच पाहू शकाल. तुम्हाला मान्य आहे ना हे, इप्पोलित किरिलोविच ? " तो सरकारी वकिलाकडं वळून म्हणाला.

" हो, निःसंशय," सरकारी वकिलाने उत्तर केले. त्याचा स्वर, पारफेनोविचच्या भावनावेगाशी तुलना करता काहीसा थंड होता.

मी कायमचेच एकदा सांगून टाकतो की निकोलाय पारफेनोविच हा आमच्या इकडे नुकताच आलेला होता, आणि त्याला इप्पोलित किरिलोविच, म्हणजे आमचा सरकारी वकील, याच्याबद्दल पहिल्यापासूनच खास आदरभाव होता, आणि तो त्याचा जवळ जवळ जानी दोस्तच बनला होता. इप्पोलित किरिलोविचमध्ये मानसशास्त्रज्ञ अन् वक्ता म्हणून असलेल्या अलौकिक बुद्धिगुणांविषयी तसेच त्याची जी तक्रार होती तिच्या रास्तपणाविषयी त्याला नितान्त विश्वास होता. त्याने त्याच्यासंबंधी पीटर्सबर्गमध्ये असतानाच ऐकले होते. उलटपक्षी तरुण निकोलाय पारफेनोविच हाच एकटा इसम साऱ्या जगात असा होता की ज्याच्याविषयी आमच्या " कदर न झालेल्या " सरकारी वकिलाला मनापासून प्रेम वाटत होते. मोक्रोयकडे जाताना वाटेत चालू प्रकरणासंबंधी एकमेकांत काही गोष्टी आपसांत ठरवून घेण्याला त्यांना सवड मिळाली होती. आणि आता ते टेबलापुढे बसले असताना तल्लख बुद्धीचा धाकटा वकील आपल्या वडील व्यवसायबंधूच्या चेहेऱ्यावरचा प्रत्येक इषारा, अर्ध्या शब्दावरून, नुसत्या दृष्टिक्षेपावरून किंवा डोळा घालण्यावरून पकडून घेत होता अन् त्याचा अर्थ लावीत होता.

" सभ्य गृहस्थहो, मला फक्त माझी हकीकत सांगण्याची मुभा द्या आणि मधेच क्षुल्लक प्रश्न विचारून मला व्यत्यय आणू नका म्हणजे मी तुम्हाला एक क्षणात सर्व काही सांगतो," मीत्या उद्दीपित होऊन म्हणाला

' उत्कृष्ट ! आभार. पण तुम्ही जे सांगणार आहा ते ऐकून घ्यायला लागण्यापूर्वी आम्हाला महत्त्वाची वाटणारी दुसरी एक लहानशी गोष्ट मी तुम्हाला विचारू का ? म्हणजे तुम्ही काल साधारणतः पाच वाजता तुमचे स्नेही प्योत्र इलियिच पेऱ्होतिन यांच्याकडे आपली पिस्तुलं गहाण ठेवून जे दहा रुबल्स उसने घेतलेत त्यासंबंधी मला कळून घ्यायचं आहे."

" सद्‌गृहस्थहो, मी ती गहाण ठेवली होती, मी ती दहा रुबल्सकरिता गहाण

ठेवली होती. आणखी काय पाहिजे? त्यासंबंधानं एवढंच आहे. शहरात परत जाताच मी ती गहाण ठेवली."

"तुम्ही शहरात परत गेलात? म्हणजे तुम्ही शहराच्या बाहेर गेला होता?"

"होय, मी खेड्यापाड्यांत तीस एक मैल प्रवास करीत गेलो होतो. तुम्हांला माहीत नाही?"

सरकारी वकिलाची अन् पारफेनोविचची नेत्रपल्लवी झाली.

"ठीक, तुम्ही काल सकाळपासून पुढं काय काय केलंत याचं व्यवस्थेशीर वर्णन करूनच जर तुमच्या हकिकतीला सुरुवात केलीत तर कसं? उदाहरणार्थ, आम्हाला अशी चौकशी करायची आहे की तुम्ही शहरातून बाहेर का गेला होता, अन् तुम्ही नक्की केव्हा गेलात आणि केव्हा परत आलात ही सर्व माहिती."

"तुम्ही असं मला आरंभापासूनच विचारायला हवं होतं," मीत्या मोठ्याने हसत म्हणाला, "आणि, तुम्ही म्हणत असाल तर, आपण कालपासून सुरुवात न करता परवाच्या सकाळपासून सुरुवात करू; म्हणजे मग तुम्हाला मी कसा, का, अन् कुठं गेलो ते कळेल. सद्‌गृहस्थहो, मी परवा दिवशी आपल्या शहरातल्या सॅमसोनोव नावाच्या व्यापाऱ्याकडे तीन हजार रुबल सुरक्षित तारणावर उसने काढण्याकरिता म्हणून गेलो होतो. ती अगदी निकडीची बाब होती, एका-एकी निर्माण झालेली ती आवश्यकता होती."

"अं, मी जरा तुम्हाला व्यत्यय आणतो हं." सरकारी वकील सौजन्याने म्हणाला. "तुम्हाला बरोबर तेवढ्याच रकमेची– तीन हजारांची– निकडीची गरज का वाटली?"

"हां हां, सद्‌गृहस्थहो, तुम्हाला कसं, का आणि केव्हा या तपशिलात अन् अगदी एवढेच पैसे का, अन् इतके का नाहीत वगैरे वगैरे आलतू फालतू गोष्टीत जाण्याची गरज नाही. अशानं तीन ग्रंथ भरतील अन् मग तुम्हाला एक शेवटची पुस्ती जोडावी लागेल!"

मीत्या हे सर्व बोलला ते समग्र सत्य सांगायला उत्सुक अन् सद्‌हेतु असलेल्या अशा माणसाच्या सुस्वभावी पण जरा उतावळेपणाच्या सलगीने बोलला.

"सद्‌गृहस्थहो!" लगेच घाईघाईने दुरुस्त करीत तो म्हणाला, "मी उतावीळ झालो म्हणून तुम्ही माझ्यावर राग करू नका. मी तुम्हाला पुन्हा विनवणी करतो. आणखी एकदा माझ्यावर विश्वास ठेवा. मला तुमच्याबद्दल फार मोठा आदर आहे अन् वस्तुस्थितीची मला कल्पना आहे मी पिऊन बेहोष झालो आहे असं समजू नका. मी या वेळी अगदी चांगला शुद्धीवर आहे. अन् शिवाय, प्यात्यानं सुद्धा काही अडथळा येण्यासारखा नाही. 'तो शुद्धीवर असतो तेव्हा मूर्खपणानं वागतो, तो प्यालेला असतो तेव्हा शहाणा

असतो ' असं जसं म्हणतात ना तशी माझी स्थिती आहे. हँ हँ पण, सद्गृहस्थहो, मला माहीत आहे की तुमच्यापुढं थट्टा-मस्करी करणं हे बरोबर नाही, म्हणजे आपला सर्व खुलासा होईपर्यंत अन् मला माझ्याही प्रतिष्ठेनं वागले पाहिजे ना! आत्ता यावेळी तुमच्या माझ्यात असलेलं अंतर मी पूर्णपणे जाणतो. मी काही म्हटलं तरी, एका गुन्हेगाराच्या भूमिकेत इथं आहे, अन् म्हणून, तुमच्याशी बरोबरीचं नातं मला ठेवता येणार नाही. अन् माझ्यावर नजर ठेवणं हे तुमचं काम आहे. मी ग्रिगरीशी जे वर्तन केलं त्याबद्दल तुम्ही माझी पाठ थोपटावी -अशी अपेक्षा मला करता येणार नाही. कारण म्हाताऱ्या माणसांची डोकी खुशाल फोडावी अन् त्या-बद्दल शिक्षा होऊ नये असे होऊ शकणार नाही. त्याच्यावरच्या हल्ल्याकरिता मला मला तुम्ही सहा महिने, कदाचित वर्ष बंदिशाळेत टाकाल अशी माझी समजूत आहे. काय शिक्षा असते ती मला माहीत नाही—पण ती माझ्या दर्जाचे हक्क न गमा-वता, माझा दर्जा न गमावता, होईल, नाही का? तेव्हा, सद्गृहस्थहो, तुमच्या-माझ्या मधले अंतर मी जाणतो...पण तुम्ही हे लक्षात घेतलं पाहिजे की असल्या प्रश्नांनी तुम्ही खुद्द ईश्वरालासुद्धा कोड्यात टाकू शकाल. ' तुम्ही पाऊल कसं टाकलं? कुठं टाकलं? केव्हा टाकलं? कशावर टाकलं? ' असं तुम्ही करीत गेलात तर मी गोंधळून जाईन अन् तुम्ही ते सारं कागदावर उतरून घ्याल. अन् ते माझ्या विरुद्ध जाईल. अन् याच्यातून निघणार काय? काहीच नाही? अन् जरी मी आता बोलतो आहे ती व्यर्थ बडबड असली तरी ती मला संपवू द्या, आणि तुम्ही, सद्गृहस्थहो, प्रतिष्ठित अन् सुसंस्कृत माणसं असल्यामुळं, मला क्षमा कराल! म्हणून सद्गृहस्थहो चौकशी करण्याची तुमची जी परंपरागत पद्धती आहे ती सोडून देण्याची मी तुम्हाला शेवटी विनंती करतो. म्हणजे, मी उठलो कसा, सकाळच्या न्याहारीला काय होतं, मी थुंकलो कसा न् कुठं, अशा काहीतरी अगदीच क्षुल्लक गोष्टीपासून सुरुवात करायची अन् अशा रीतीनं गुन्हेगाराचं लक्ष भलतीकडं नेऊन एकदम त्याला ' तू कुणाचा खून केलास? कुणाची चोरी केलीस? अशा घाबरून सोडणाऱ्या प्रश्नानं त्याला बधिर करून सोडायचं. हा, हा! ही तुमची घालून दिली गेलेली पद्धत आहे, तिथंच तुमची सारी हुशारी कामी येते. तुम्ही खेडवळांना असं बेसावध करू शकाल, मला नाही. मला या युक्त्या माहीत आहेत. मीसुद्धा सैन्यात होतोच की. हा, हा, हा! तुम्ही रागावलात तर नाही ना, मंडळी? माझ्या उद्दामपणाची मला क्षमा कराल?" त्याने मोठ्याने विचारले, अन् अशा सद्भावाने त्याने त्यांच्या कडे पाहिले की चकित व्हावे. "हा मीत्या कारमाझफ आहे, बरं का, तेव्हा तुम्ही ते दुर्लक्ष करा. शहाण्यासुर्त्या माणसाच्या बाबतीत असं बोलणं अक्षम्य ठरेल, पण मीत्याला त्याबाबतीत तुम्ही क्षमा करू शकाल. हा, हा!"

निकोलाय पारफेनोविचने हे ऐकले अन् तोही हसला. तो सरकारी वकील जरी हसला नाही, तरी त्याने आपले डोळे तीक्ष्णपणे मीत्यावर रोखले होते, जणू तो

बोलत असताना एकही अक्षर, एवढीशीसुद्धा हालचाल, त्याच्या चेहेऱ्यावर पड-णारी एवढीशी सुरकुतीसुद्धा आपल्या नजरेतून सुटू नये, याबद्दल तो दक्ष असावा.

" आम्ही पहिल्यापासून तुम्हाला असंच वागवीत आलो आहे." निकोलाय म्हणाला, तो अजूनही हसत होता. " तुम्ही सकाळी उठलात केव्हा अन् तुमच्या न्याहारीला काय होतं असं विचारून आम्ही तुमचं लक्ष चळविण्याचा प्रयत्न केला नाही. नव्हे, आम्ही तर तुम्हाला अत्यंत महत्त्वाचे प्रश्न विचारूनच सुरुवात केली."

" होय, होय! मला ते दिसून आलं अन् आवडलं, अन् आत्तासुद्धा तुम्ही जी सहानुभूती दाखवीत आहा तिची मी कदर करतो. ही तुमची ममता अपूर्व आहे, तुमच्या थोर अंतःकरणांना साजेशी आहे. आपण तिघे इथं आहोत ती कुलीन माणसं आहोत, अन् आपली प्रत्येक गोष्ट शिक्षण, सुसंस्कृती अन् उच्च कुळात जन्म अन् प्रतिष्ठा हे सामान्य नातं असलेल्या माणसांच्या परस्परविश्वासाच्या पायावर होऊ द्या. काही असलं तरी, माझ्या आयुष्याच्या या क्षणी, माझ्या अब्रूचे धिंडवडे निघत असताना, तुम्हाला माझे उत्तम स्नेही म्हणून मानण्याची मला परवानगी द्या. सद्‌गृहस्थहो, त्यानं तुमचा अपमान तर नाही ना होणार?"

" उलट आहे, दमीत्रि फ्योदरोविच, तुम्ही हे सारे फारच चांगल्या रीतीनं व्यक्त केलंत, पारफेनोविचने गौरवयुक्त प्रशंसेने उत्तर दिले.

" अन् ते क्षुल्लक प्रश्न, सद्‌गृहस्थहो, ते सर्व फसवणुकीचे प्रश्न पुरे करा!" मीत्या मोठ्या उत्साहाने बोलला. " नाहीतर आपण कुठं जाऊ ते समजणारच नाही! होय की नाही?"

" मी तुमचा शहाणपणाचा सल्ला संपूर्णपणे अमलात आणीन," सरकारी वकील मीत्याला उद्देशून मध्येच म्हणाला, " पण तरी मी माझा प्रश्न मागं घेत नाही. तुम्हाला ती रक्कम, म्हणजे बरोबर तीन हजारच कशाकरिता हवे होते हे निश्चितपणे समजून घेणे आमच्या दृष्टीनं यावेळी अत्यंत महत्त्वाचं आहे."

" मला कशाकरिता हवे होते?...हो, या ना त्या गोष्टीकरिता...बरं, ते एक कर्ज चुकविण्याकरिता पाहिजे होते."

" कुणाचं कर्ज?"

" त्याचं उत्तर देण्याचं मी पूर्णपणे नाकारतो, मंडळी. म्हणजे मला ते उत्तर देता येणार नाही, मी ते द्यायला धजणार नाही, किंवा मला ते नुकसानकारक होईल, म्हणून नव्हे, कारण ती काय अगदीच यःकश्चित अन् क्षुल्लक बाब आहे, पण मी उत्तर देणार नाही कारण तो तत्त्वाचा प्रश्न आहे. म्हणून ती माझी खाजगी जीवनातली बाब आहे, अन् मी माझ्या खाजगी जीवनात कोणालाही हस्तक्षेप करू द्यायला तयार नाही. हे माझं तत्त्व आहे. तुमच्या प्रश्नाचा चालू प्रकरणाशी काही संबंध नाही, अन् ज्या गोष्टीचा या प्रकरणाशी संबंध नाही ती माझी खासगी बाब आहे. मला

एक कर्ज चुकवायचं होतं. ते कर्ज प्रतिष्ठेची बाब होती, पण ते कुणाचं हे मी सांगणार नाही."

"ते मला टिपून घेऊद्या तर मग," सरकारी वकील म्हणाला.

"बेशक. लिहा की, मी सांगायला तयार नाही, मी सांगणार नाही. ते सांगणं अप्रतिष्ठितपणाचं आहे असं मला वाटतं. असं लिहा. हं;! तुम्ही ते खुशाल लिहून घ्या; तुम्हाला तरी तुमच्या वेळेचा दुसरा काय उपयोग करायचा आहे!"

सरकारी वकील मनावर छाप पडेल अशा एका विशिष्ट अन् करड्या आवाजात त्याला म्हणाला, "मला तुम्हाला सावधगिरीची सूचना द्यायची आहे अन् तुम्हाला कल्पना नसेल तर तुम्हाला जाणवून द्यायचं आहे, महाशय, की जे प्रश्न आता तुम्हाला विचारले गेले त्यांची उत्तरं न देण्याचा तुम्हाला पूर्ण अधिकार आहे, अन् तुम्ही जर या ना त्या कारणाकरिता उत्तर देण्याचं नाकारलंत तर ते तुमच्याकडून जबरदस्तीनं काढण्याचा आमच्या बाजूनं आम्हाला काही अधिकार नाही. ही बाब सर्वस्वी तुम्ही स्वतःच ठरवायची आहे. पण त्या बरोबरच प्रस्तुत-सारख्या प्रकरणी, तुम्ही हा किंवा तो जो काही पुराव्याचा भाग असेल तो देण्याचं नाकारलंत तर तुमचं स्वतःचंच किती नुकसान होईल ते तुम्हाला समजावून देऊन तुमच्यापुढं मांडणं हेही आमचं कर्तव्य आहे. यानंतर मी तुम्हाला तुमचं बोलणं सुरू करायला विनंती करतो."

"सद्गृहस्थहो, मला राग नाही...मी..." मीत्या काहीशा अस्वस्थ आवाजात तोंडातल्या तोंडात पुटपुटला. "ठीक सद्गृहस्थहो, ज्या सॅमसोनोवकडं मी त्यावेळी गेलो..."

त्यानं जे काय सांगितलं ते आम्ही इथं पुनः सांगत नाही; ते वाचकांना अगोदरच माहीत आहे. यःकश्चित्सुद्धा तपशील गाळला जाऊ नये याकरिता मीत्या कटाक्षानं जपत होता. त्याचबरोबर हे सर्व एकदा लवकर आटोपावं अशीही त्याला घाई होती. परंतु जसा तो साक्ष देत होता तशी ती लिहून घेतली जात होती आणि त्यामुळे त्यांना एकसारखे त्याला थांबवावे लागत होते. मीत्याला ते आवडत नव्हते, पण त्याने मान वाकविली; तो रागावत होता, पण तरी सद्भाव ठेवून. मात्र तो मधून मधून, "सद्गृहस्थहो, एखाद्या देवदूताचासुद्धा या रीतीनं संयम सुटेल!" किंवा, "सद्गृहस्थहो, तुम्ही मला संतापविण्यात काही अर्थ नाही," असे उद्गार काढी.

पण जरी असे उद्गार तो काढीत असला तरी काही काळ त्याने आपली वृत्ती बरीच मनमिळाऊ राखली. त्याने त्याना सॅमसोनोवने आपल्याला दोन दिवसांपूर्वी कसे उल्लू बनविले ते सांगितले. (आपण चांगलेच उल्लू बनवले गेलो होतो हे त्याला पूर्णपणे आता कळून आले होते.) त्या प्रवासाकरिता त्याने आपले घड्याळ सहा रुबलला विकले ही गोष्ट त्या वकिलांना नवलाईची वाटली. त्या गोष्टीकडे

एकदम त्यांचे लक्ष बरेच वेधले, आणि, त्यावेळी एक फार्दिंगसुद्धा त्याच्या खिशात नव्हता. या परिस्थितीला आणखी एक पुष्टी म्हणून त्यांना, मीत्याला अतिशय संताप वाटला तरी, ते लिहून घेणे महत्त्वाचे वाटले. हळूहळू मीत्या चिडखोर बनू लागला. नंतर ल्यागेवीला भेटण्याकरिता केलेला प्रवास, गुदमरून टाकणाऱ्या त्या झोपडीत काढलेली ती रात्र, इत्यादी वर्णन करून सांगितल्यानंतर तो आपण परत शहराकडे आलो येथवर आला. इथे त्याने, त्याला खास विनंती केली गेली नसतानासुद्धा, ग्रुशिंकाच्या बाबतीत आपण ज्या मत्सराच्या वेदना भोगल्या त्या अगदी बारकाव्याने सांगितल्या.

स्तब्ध राहून त्यांनी सर्व लक्षपूर्वक ऐकले. ग्रुशिंकावर नजर ठेवण्यासाठी आणि स्मिर्दायाकोफला बातमी आणून पोचविण्यासाठी फ्योदर पावलोविचच्या बागेच्या पिछाडीला असलेल्या मार्या कोन्द्रात्येवनाच्या घरात लपून बसण्याची जी जागा त्याने काढली होती त्याबद्दल त्यांनी विशेष करून विचारले. त्यांनी त्यावर विशेष भर दिला. अन ते नमूद करून घेतले. आपल्या मत्सरासंबंधाने तो तापून अन् सविस्तर बोलला, आणि जरी त्याला आपल्या अगदी अंतरातल्या भावना एक प्रकारे "लौकिक बेअब्रू"करिता उघड होत असल्याची लाज वाटत होती, तरी त्याने सत्य सांगण्याकरिता ती लाज गिळून टाकल्यासारखी दिसली. तो आपली कहाणी सांगत असताना तो तपासणी करणारा वकील आणि त्याच्याहूनही अधिक तो सरकारी वकील ज्या स्नेहशून्य कठोरपणाने त्याच्याकडे टक लावून पाहात राहिला होता, त्याने शेवटी तो बराच अस्वस्थ झाला.

"हा पोरगा, निकोलाय पारफेनोविच, ज्याच्याशी मी नुकत्या थोड्याच दिवसांपूर्वी स्त्रियांच्या संबंधाने काही तरी बकत होतो तो, आणि हा रोगट सरकारी वकील, मी त्यांना हे सांगावं अशा लायकीचे नाहीत," विषण्ण होऊन तो मनाशी म्हणाला, "हे बदनामीकारक आहे. 'धीर धर, नम्र हो, शांत राहा! हे वचन आठवून त्यानं आपली भावना गुंडाळून ठेवली. पण त्याने पुन्हा आपली हकीकत पुढे चालू करण्याकरिता आपले बळ एकवटले. आपली मादाम होहलाहोवाशी झालेली भेट सांगण्यापर्यंत जेव्हा तो आला, तेव्हा त्याचा उत्साह पुन्हा परत आला अन् त्या बाईसंबंधीचा एक छोटासा किस्सा– ज्याचा त्या प्रकरणाशी काही संबंध नव्हता तो– सांगण्याचेही त्याच्या मनात आले. पण तपासणी करणाऱ्या वकिलाने त्याला थांबविले, अन् सौजन्याने त्याला सूचना केली की त्याने 'अधिक महत्त्वाच्या बाबी' कडे वळावे आणि शेवटी आपल्या निराशेचे वर्णन करून मादाम होहलाहोवाचे घर सोडल्यानंतर ते तीन हजार मिळविण्याकरिता आपल्याला कुणाचा तरी खून करावा लागेल" असा विचार आपल्या मनात कसा आला हे जेव्हा त्याने सांगितले, तेव्हा त्यांनी त्याला पुन्हा थांबविले अन् टिपून घेतले की त्याच्या "मनात कोणाचा तरी खून करण्याचे होते." मीत्याने हरकत न घेता त्यांना ते लिहू दिले.

गोष्टी तो आपल्या हकिकतीतील, ग्रूशिंकाने आपल्याला फसविले, आणि आपण तिला सॅमसोनोवकडे सोडल्यावर ती आपण तिथे मध्यरात्रीपर्यंत राहू असे म्हणाली होती तरी ती तिथून लगेच परतली होती हे आपल्याला कळले, या मुद्द्यापर्यंत येऊन पोचला.

"सद्गृहस्थहो, मी फेनियाला त्यावेळी ठार केलं नाही ते मला वेळ नव्हता एवढ्याच कारणानं" असे आपल्या हकिकतीतील त्या मुद्द्याच्या वेळी चटकन् त्याच्या तोंडून बाहेर पडले तेही दक्षतापूर्वक टिपले गेले. मीत्या खिन्नपणे थांबून राहिला, अन् आता तो आपण आपल्या बापाच्या बागेत कसे धावत गेलो ते सांगू लागणार इतक्यात तपासणी करणाऱ्या वकीलाने त्याला एकदम थांबविले अन् त्याच्या जवळच्या कोचावर असलेली मोठी बॅग उघडून त्याने तो पितळी बत्ता बाहेर काढला.

"ही वस्तू तुम्ही ओळखता का ?" त्याने तो मीत्याला दाखवीत विचारले.

"हो हो," तो खिन्नपणे हसून म्हणाला, "मी ओळखतो तर काय झालं. मला जरा तो पाहू द्या...मरू दे, काही हरकत नाही !"

"तुम्ही त्याचा उल्लेख करायला विसरलात," तपासणी करणारा वकील उद्गारला.

"अरेच्चा, तुमच्यापासून ते लपवायचं माझ्या मनात नव्हतं. त्याच्यावाचून माझं काम भागलं असतं असं का तुम्ही समजता ? पण मी ते पार विसरून गेलो."

"हा तुमच्या हाती कसा आला ते तुम्ही आम्हाला नेमकं सांगितलंत तर बरं होईल."

"जरुर तुम्हाला सांगेन, सद्गृहस्थहो."

अन् मीत्याने आपण तो बत्ता कसा घेतला अन् पळालो ते वर्णन करून सांगितले.

"अशा हत्यारानं सज्ज होण्यात तुमच्या डोळ्यांपुढं काय बरं हेतू होता ?"

"हेतू ? काहीच नव्हता. मी आपला तो उचलला अन् पळालो इतकंच."

"हेतू नव्हता तर उचललात का ?"

मीत्याचा क्रोध भडकला. त्याने डोळे बारीक करून 'त्या पोरा'कडे पाहिले अन् विषण्णपणे अन् खुनशीपणे तो हसला. या 'असल्या लोकां'ना आपण आपली सगराची कथा इतक्या कळकळीने अन् उत्स्फूर्तपणे सांगितली याची त्याला अधिकाधिकच लाज वाटायला लागली.

"बत्ता गेला खड्डयात !" त्याच्या तोंडून एकदम बाहेर पडले.

"तरी पण..."

"हां, कुत्र्यांना हाणण्याकरिता... हां, अंधार होता म्हणून... काही झालंबिलं तर."

" पण तुम्ही पूर्वी जेव्हा बाहेर जात होता तेव्हा कधी अंधाराची भीती वाटली म्हणून, एखादं हत्यार घेऊन बाहेर पडत होता ? "

" शीः ? गेलं सारं खड्ड्यात, सभ्य गृहस्थांनो ! तुमच्याशी खरोखर बोलणं करणं शक्य नाही ! " सहनशक्ती संपुष्टात येऊन मीत्या ओरडला. आणि सेक्रेटरी-कडे वळून, रागानं लाल होऊन तो भरभर बोलू लागला, त्याच्या आवाजात एक प्रकारची धार आली होती.

" लिहून घे चटकन्... चटकन्... की 'मी तो बत्ता झटकन् उचलून घेतला तो जाऊन माझ्या बापाला— फयोदर पावलोविचला ठार मारण्याकरिता... त्या बत्त्यानं त्याच्या डोक्यावर प्रहार करावा म्हणून !' ठीक, आता झालं तुमचं समाधान, सद्‌गृहस्थांनो ! तुमच्या मनाला बरं वाटलं ना ? " तो त्या वकिलांकडे उद्धटपणे नजर लावून म्हणाला.

" तुम्ही हे विधान आता आमच्यावर आणि आम्ही केलेल्या प्रश्नांनी संतापून जाऊन केलं आहे हे आम्ही जाणून आहो. ते प्रश्न तुम्हाला क्षुल्लक वाटतात पण खरं म्हणजे ते फार महत्त्वाचे आहेत." तो सरकारी वकील रूक्षपणे बोलला.

" बरं तर, शपथेवर सांगतो, काय घडणार होतं मी बत्ता घेतला होता तर ? अशा वेळी कोणी वस्तू बाळगतात ती कशासाठी ? मला तरी माहीत नाही. मी तो उचलला अन् पळालो इतकंच. मला लाज वाटते, पण चौकशी पुढे चालू द्या.. या बाबतीत मात्र मी एक शब्दही जास्त सांगणार नाही हे निश्चित."

आपली कोपरे टेबलावर ठेवून अन् डोके हाती धरून तो बसला. तो त्यांच्या एका बाजूला बसला अन् भिंतीकडे त्याने नजर लावली, आपल्या मनातल्या शिसारीशी तो झगडत होता. नव्हे खरे म्हणजे तिथून उठावे अन् " एक शब्दही आपण आता बोलणार नाही, वाटलं तर फाशी द्या " असे सांगावे अशी त्याला विलक्षण इच्छा झाली.

शेवटी तो कसेबसे स्वतःला आवरून म्हणाला, " बरं का, सभ्य गृहस्थहो, असं पाहा. मी तुमचं बोलणं ऐकलं अन् एका स्वप्नानं पछाडल्यासारखा झालो आहे...हे स्वप्न मला कधी कधी पडतं, बरं का...पुष्कळ वेळा मी ते स्वप्न पाहतो— नेहमी ते एकसारखंच असतं...असं की कोणीतरी अंधारात माझ्या मागं लागलं आहे, त्या कोणाला तरी मी भयंकर भीत आहे....तो अंधारात, रात्री माझ्या मागं लागला आहे....माझा मागोवा घेतो आहे, आणि मी त्याच्यापासून कुठंतरी लपलो आहे, एखाद्या दाराच्या किंवा कपाटाच्या पाठीमागं, अगदी कमीपणा आणणाऱ्या रीतीनं लपतो आहे, अन् त्यातली सगळ्यांत वाईट गोष्ट ही की, त्याला मी कुठं आहे ते नेहमी ठाऊक असतं, पण तो मी कुठं आहे ते माहीत नाही असं मुद्दाम सोंग करतो, माझ्या यातना लांबविण्याकरिता, माझ्या झालेल्या

थरकापाची मौज लुटण्याकरिता...हेच या वेळी तुम्ही करता आहा. हे त्यासारखंच आहे!"

"तुम्हाला अशा प्रकारचं स्वप्न पडतं काय?" सरकारी वकिलाने विचारले.

"होय, अशाच प्रकारचं. ते लिहून घ्यावंसं वाटत नाही तुम्हाला?" मीत्या छद्मी हास्याने म्हणाला.

"नाही, ते लिहून घेण्याची जरूर नाही. पण तरी तुम्हाला चमत्कारिक स्वप्नं पडतात हं."

"सभ्य गृहस्थहो, या वेळी हा स्वप्नांचा प्रश्न नाही—इथं हे साक्षात् आहे, इथं प्रत्यक्ष जीवन आहे! मी लांडगा आहे अन् तुम्ही शिकारी आहात.बरं आहे, करा माझी शिकार!"

"अशा उपमा तुम्ही देणं चुकीचं आहे..." निकोलाय अत्यंत मृदू स्वरात म्हणाला.

"अहं, चुकीचं नाही, मुळीच चुकीचं नाही!" मीत्या पुन्हा भडकला, अर्थात् त्याचा राग बाहेर पडल्याने सहजच त्याच्या हृदयावरचा भार कमी झाला. तो हरेक शब्दागणिक अधिक मनमिळाऊ बनला. "तुम्ही एखाद्या गुन्हेगारावर किंवा तुमच्या प्रश्नांनी हैराण झालेल्या चौकशी चाललेल्या माणसावर विश्वास नका ठेवू फारतर, पण एका सन्मान्य माणसावर, अंतःकरणाच्या सन्मान्य उमाळ्यांवर—हे मी निर्भीडपणे म्हणतो!— छेः! त्यावर तुम्ही विश्वास ठेवलाच पाहिजे; तुम्हाला अधिकारच नाही खरोखर...पण—माझ्या हृदया, स्तब्ध राहा, धीर धर, नम्र हो, शांत राहा, बरं चलू मी पुढं?" तो मध्येच विषण्णपणे म्हणाला.

"हो, कृपा करून," निकोलाय पारफेनोविचने उत्तर दिले.

५

तिसरे दिव्य

मीत्या जरी रागावून बोलत होता, तरी आपल्या कथेचा एकही तपशील विसरू नये किंवा सुटू नये यासाठी तो फार प्रयत्न करीत होता. आपण कुंपणाच्या भिंतीवरून आत वडिलांच्या बागेत कशी उडी मारली; खिडकीपाशी कसे गेलो; खिडकीखाली असताना काय काय घडले ते सर्व त्याने त्यांना सांगितले. ग्रुशिंका आपल्या वडिलांच्या सोबत आहे की नाही हे जाणून घेण्याची भयंकर उत्कंठा असताना बागेतल्या त्या तेवढ्या काळात आपल्याला त्रस्त करणाऱ्या भावनांचे त्याने वर्णन केले. पण गंमत ही की, दोघेही वकील या वेळी विलक्षणच मुग्धतेने ऐकत होते. त्याच्याकडे ते भावनाशून्य दृष्टीने पाहात होते, त्यांनी फार थोडे प्रश्न विचारले. त्यांच्या चेहऱ्यांवरून मीत्याला काही अदमास लागेना.

"रागावलेले न् दुखावलेले दिसतात," त्याच्या मनात आले. "जाऊ दे, मरू देत."

बापाने खिडकी उघडावी याकरिता शेवटी आपण त्याला ग्रूशिंका आल्याचा 'तो संकेत' करण्याचे कसे ठरविले याचे जेव्हा त्याने वर्णन केले तेव्हा त्या वकिलांनी 'संकेत' या शब्दाकडे काहीच लक्ष दिले नाही, जणू त्यांना त्या शब्दाचा या संदर्भात अर्थच लक्षात आला नसावा; इतके दुर्लक्ष त्यांनी केले की मीत्याच्या ते नजरेला आले. शेवटी, आपल्या बापाला खिडकीतून बाहेर डोकावताना पाहून आपली द्वेषभावना भडकली आणि आपण आपल्या खिशातून तो बत्ता बाहेर काढला या प्रसंगापर्यंत तो आला अन् एकदम जणू पूर्वविचार करूनच तो थांबला. तो भिंतीकडे पाहात राहिला, त्यांचे डोळे आपल्याकडे लागले आहेत याची त्याला जाणीव झाली.

"बरं?" तो तपास करणारा वकील म्हणाला, "तुम्ही ते हत्यार बाहेर काढलंत आणि...मग काय घडलं?"

"मग? मग काय, मी त्याचा खून केला...त्याच्या डोक्यावर हाणलं अन् त्याची कवटी फोडली...मला वाटतं, हीच तुमची गोष्ट असणार. हीच ना!"

त्याचे डोळे एकदम चमकले. त्याचा धुमसत असलेला क्रोधाग्नी अंतःकरणातल्या असामान्य हिंसावृत्तीने भडकला.

"आमची गोष्ट?" निकोलाय पारफेनोविचने त्याचेच शब्द पुन्हा उच्चारले. "ठीक आणि तुमची?"

मीत्याने आपले डोळे खाली वळविले आणि बराच वेळ तो स्तब्ध राहिला.

"माझी गोष्ट, सद्गृहस्थहो! ती अशी होती," तो मृदू स्वरात बोलू लागला. "कोणाचे तरी अश्रू असतील, किंवा माझ्या आईनं परमेश्वराला आळवलं असेल, किंवा कोणा भल्या देवदूतानं त्याच क्षणी माझं चुंबन घेतलं असेल, मला माहीत नाही काय ते. पण सैतान परास्त झाला. मी खिडकीपासून वेगानं निघालो अन् कुंपणाकडं धावत गेलो. माझे वडील घाबरले, आणि पहिल्याप्रथमच त्यांनी मला त्यावेळी पाहिलं, ते मोठ्यानं ओरडले, अन् खिडकीतून ते एकदम मागं फिरले. मला ते चांगलं आठवतं. मी बाग ओलांडून कुंपणाच्या भिंतीकडं गेलो...अन् तिथं ग्रिगरीनं मला, मी भिंतीवर बसलो असताना पकडलं..."

या ठिकाणी त्यानं शेवटी आपली नजर वर केली अन् आपल्या श्रोत्यांकडे पाहिले. ते त्याच्याकडे बिलकुल लक्ष चळू न देता टक लावून पाहत होते. संतापाच्या आवेगाने मीत्याच्या अंतःकरणाचा ताबा घेतला.

"अं, यावेळी तुम्ही माझ्याकडं बघून हसताहात, सद्गृहस्थहो!" तो एकदम म्हणाला.

"असं तुम्हाला कशावरून वाटतं?" निकोलाय पारफेनोविचने विचारले.

"माझ्या एका शब्दावरही तुमचा विश्वास बसत नाही—त्यावरून मी महत्त्वाच्या मुद्द्याला येऊन ठेपलो आहे हे मला कळतं. तो वृद्ध मनुष्य तिकडं त्यावेळी कवटी फुटून मरून पडला आहे, आणि मी—त्याला मारावंसं मला कसं वाटलं, अन् मी तो बत्ता कसा झटकन् उचलून घेतला याचं नाट्यपूर्ण वर्णन केल्या-नंतर—मी एकदम खिडकीपासून दूर पळून जातो, काय अद्‌भुतरम्य कथा! काव्य! कोणी अशा माणसाच्या शब्दावर विश्वासच ठेवील जणू. हा, हा! सद्‌गृहस्थहो तुम्ही उपहास करणारे आहात!"

आणि तो आपल्या खुर्चीवर गर्रकन् फिरला त्याबरोबर ती करकरली.

"तो सरकारी वकील मीत्त्याची प्रक्षुब्ध अवस्था न पाहिल्यासारखी करून एकदम म्हणाला, "तुम्ही जेव्हा खिडकीपासून दूर पळालात तेव्हा बागेत जायचा दरवाजा उघडा होता की नाही हे तुम्ही पाहिलंत? हे तुम्ही पाहिलंत?

"नाही, तो उघडा नव्हता."

"उघडा नव्हता?"

"तो बंद होता. अन् तो कोण उघडणार? अरे हो, तो दरवाजा म्हणता? थांबा हं जरा!" तो एकदम स्वतःशी विचार करू लागला, अन् एकद्म दचकल्या-सारखा होऊन म्हणाला,

"अं? तुम्हाला तो दरवाजा उघडा आढळला?"

"होय, तो उघडा होता."

"अं? तो जर तुम्हीच स्वतः तो उघडला नसेल तर दुसरा कोण उघड-णार?" मीत्त्या अतिशय चकित होऊन म्हणाला.

"तो दरवाजा उघडा होता, अन् तुमच्या वडिलांचा खून करणारा इसम निःसंशय त्या दरवाज्यातून आत गेला असला पाहिजे, आणि तो गुन्हा करून तो त्याच दरवाज्यानं परत बाहेर गेला असला पाहिजे," सरकारी वकील, जणू प्रत्येक शब्द वेगळा वेगळा कोरून काढून ठाशीव रीतीने उच्चारीत होता. "हे अगदी स्पष्ट आहे. खून त्या खोलीतच केला गेला आणि **खिडकीतून नाही**; जी तपासणी करण्यात आली आहे, तीवरून, ते शरीर पडलं होतं त्या अवस्थेवरून आणि इतर गोष्टीवरून ही गोष्ट अगदी निश्चित आहे. त्या घटनेसंबंधानं कसलाही संशय असू शकत नाही."

मीत्त्या आश्चर्याने अगदी थक्कच होऊन गेला.

"पण ते तर सर्वस्वी अशक्य आहे!" पूर्णपणे गोंधळून जाऊन तो ओरडून म्हणाला. "मी...मी तर आत गेलोच नाही... मी खात्रीपूर्वक तुम्हाला सांगतो; तो दरवाजा मी बागेत असेपर्यंत अन् मी बागेतून बाहेर पळालो तेव्हासुद्धा निश्चित-पणे बंद होता. मी फक्त खिडकीपाशी उभा होतो अन् त्यांना मी खिडकीतूनच पाहिलं. बस्स, एवढंच...मला अगदी शेवटच्या क्षणापर्यंतची आठवण आहे आणि जरी मला

आठवलं नाही समजा, तरी त्यात काही फरक पडत नाही. मला ते माहीत आहे, कारण स्मिर्द्याखफ, मी अन् मेलेला माणूस यांच्याखेरीज इतर कुणालाही या संकेताची माहिती नव्हती. आणि तो संकेत मिळाल्याशिवाय त्यांनी जगातला कोणीही आला असता तरी त्याला दरवाजा उघडला नसता."

"संकेत ? कसले संकेत ?" सरकारी वकिलाने हावरेपणाने, नव्हे जवळ वाताचा झटका यावा तशा उत्सुकतेने विचारले. त्याला एकदम आपल्या अलिप्ततेचा अन् प्रतिष्ठेचा पूर्ण विसर पडला. त्याने तो प्रश्न पायात शेपूट घातल्यासारख्या भित्रेपणाने विचारला. आपल्याला काहीच माहीत नसलेल्या अशा एका महत्त्वाच्या गोष्टीचा त्याला त्यात वास आला, अन् मीत्या कदाचित् ती उघड करून सांगायला तयार होणार नाही अशा भयाने तो अगोदरच घाबरून गेला.

"म्हणजे तुम्हाला माहीत नाही !" मीत्याने त्याच्याकडे खुनशी अन् विडंबक हास्य करीत डोळे मिचकावले. समजा मी तुम्हाला नाही सांगितलं तर ? कुणाकडून तुम्हाला कळणार आहे ? माझे वडील, स्मिर्द्याखफ आणि मी यांखेरीज कुणालाही त्या संकेतांसंबंधानं माहिती नव्हती, बस इतक्यांनाच. परमेश्वराला अर्थात् माहीत होतं, पण तो तुम्हांला सांगणार नाही. पण ती एक मनोरंजक वस्तुस्थिती आहे. त्यावर तुम्ही काय काय रचाल ते सांगता नाही येणार हा, हा ! निश्चिंत व्हा, सद्गृहस्थहो ! मी ती तुम्हाला उघड करून सांगतो. तुमच्या मनात काही मूर्खपणाच्या कल्पना आहेत. तुमचा ज्याच्याशी संबंध आहे त्या माणसाला तुम्ही ओळखीत नाही ! तुमचा अशा कायद्याशी संबंध आहे की जो स्वतःच्याच विरुद्ध, स्वतःला घातक होईल अशी साक्ष देत आहे ! होय, कारण मी एक नेकीचा माणूस आहे अन् तुम्ही—नाही."

सरकारी वकिलाने काही कुरकूर न करता ते गिळले. ती नवी गोष्ट ऐकण्याकरिता तो अधीर होऊन कापत होता. मीत्याने त्यांना बारकाव्याने अन् सविस्तरपणे फ्योदर पावलोविचने स्मिर्द्याखफकरिता जे संकेत बनवून ठेवले होते ते त्यासंबंधी सर्व काही सांगितले. खिडकीवर केलेली प्रत्येक टक टक म्हणजे काय ते त्याने त्यांना जसेच्या तसे सांगितले अन् टेबलावर ते संकेत वाजवून दाखविले, आणि निकोलाय पारफेनोविच जेव्हा त्याला म्हणाला की तुम्ही, वडिलांना जेव्हा टक टक करून कळवलं तेव्हा 'ग्रूशिंका आली आहे' हेच कळवलं असलं पाहिजे असं मला वाटतं, तेव्हा त्याने नेमके उत्तर दिले की आपण 'ग्रूशिंका आली आहे' असाच संकेत वाजविला होता.

"आता तुम्ही तुमचा डोलारा रचू शकता," मीत्या बोलून गप्प झाला, अन् त्याने तिरस्काराने पुन्हा त्यांच्याकडे पाठ फिरविली.

"म्हणजे या संकेताबद्दल तुमचे वडील, तुम्ही अन् नोकर स्मिर्द्याखफ

याच्याशिवाय दुसऱ्या कोणालाही माहिती नव्हती म्हणता ? " निकोलायने पुन्हा एकदा विचारले.

" होय, स्मिर्द्याखफ अन् परमेश्वर. परमेश्वर म्हणून लिहा. तेही उपयोगी पडेल. शिवाय, तुम्हालाही ईश्वराची गरज पडेलच."

आणि ते अर्थात् ते लिहून घ्यायला लागलेच होते. पण ते लिहीत असतानाच सरकारी वकिलाच्या डोक्यात एक नवीन कल्पना आल्यासारखी होऊन तो एकदम म्हणाला,

" पण जर स्मिर्द्याखफलाही संकेतांची माहिती होती आणि तुम्ही आपल्या वडिलांच्या मृत्यूसंबंधाची सर्व जबाबदारी पूर्णपणे नाकारता, तर कदाचित् त्यानंच ठरविण्यात आलेला संकेत वाजविला असेल, तुमच्या वडिलांना आपल्याकरिता दरवाजा उघडायला लावलं असेल, आणि मग...तो गुन्हा केला असेल, असं कशावरून नाही ? "

मीत्याने त्याच्यावरून अत्यंत औपरोधिक अन् तीव्र द्वेषपूर्ण दृष्टी फिरविली. त्याची निःशब्द नजर इतका वेळ त्याच्यावर राहिली की त्यामुळे तो सरकारी वकील आपल्या डोळ्यांची उघडझापच करू लागला.

" पुन्हा तुम्ही कोल्हा पकडलात (कावेबाजपणा धरलात) मीत्या शेवटी उद्गारला; " तो शेपटीकडून तुमच्या हाती आला. हा, हा ! वकीलसाहेब, मला तुमचं बिंग चांगलं कळतंय्. तुम्हाला अर्थात असं वाटलं की तुम्ही तसं म्हटल्याबरोबर मी एकदम आनंदानं उडी मारीन, तुमची सूचना पकडून धरीन आणि अगदी बेंबीच्या देठापासून ओरडेन 'अरे, स्मिर्द्याखफचंच ते काम, तो खुनी आहे.' असाच विचार तुमच्या मनात आला की नाही, कबूल करा, कबूल करा, म्हणजे मी पुढं जाईन."

पण सरकारी वकिलाने कबूल केले नाही. तो गप्प बसून वाट पाहत राहिला.

" तुमची चुकीची समजूत आहे. 'स्मिर्द्याखफचंच ते काम' असं मी ओरडणार नाही." मीत्या म्हणाला.

" अन् तुम्हाला त्याचा अंदेशासुद्धा येत नाही ? "

" अं, तुम्हाला त्याचा अंदेशा येतो ? "

" त्याच्यावरही संशय आहेच."

मीत्याने आपली नजर जमिनीवर खिळबिली.

" थट्टा सोडून देऊ," तो खिन्नपणानं म्हणाला, " ऐका. अगदी सुरुवातीपासून, जेव्हा मी त्या पडद्यामागून तुमच्याकडं धावत आलो त्या क्षणापासून माझ्या मनात स्मिर्द्याखफचाच विचार आहे. मी इथं बसलो आहे, अन् एक सारखा मी निरपराधी आहे असं ओरडतो आहे आणि एकसारखा माझ्या मनात 'स्मिर्द्याखफ' आहे ! माझ्या डोक्यातून स्मिर्द्याखफचा विचार जात नाही. नव्हे, खरं म्हणजे माझ्या-

सुद्धा मनात आता स्मिर्दीखफचाच विचार आला; पण क्षणभरच. लगेच जवळ जवळ माझ्या मनात आलं. अंहं, स्मिर्दीखफचं हे काम नाही.' त्याचं हे काम नाही, सद्-गृहस्थांनो ! "

"तसं असेल तर दुसऱ्या आणखी कोणाचा तुम्हाला संशय आहे? " निकोलाय जपून विचारले.

"दुसरं कोणी असू शकेल की काय, हा ईश्वराचा हात की सैतानाचा, ते मला माहीत नाही, पण... स्मिर्दीखफ नाही," मीत्या एकदम मागे वळून निश्चित स्वरात म्हणाला.

"पण इतकं आत्मविश्वासानं अन् निश्चयपूर्वक तुम्ही तो नाही म्हणून सांगता ते कशाच्या आधारावर?"

"माझ्या मनाच्या खात्रीनं, माझा जो समज आहे त्यावरून. स्मिर्दीखफ हा अत्यंत नीच शीलाचा अन् भ्याड माणूस आहे. तो नुसता भ्याड नाही, जगातल्या साऱ्या भ्याडपणाची मूस ओतून बनविलेला तो दोन पायांचा भ्याडपणाचा पुतळा आहे. त्याचं अंतःकरण पराकाष्ठेचं भित्रं आहे. तो माझ्यापुढं बोलायचा तेव्हा मी त्याला ठार मारीन की काय अशा भयानं तो नेहमी थरथर कापायचा, अर्थात् मी कधीही त्याच्यावर हात उगारला नाही. तो माझ्या पायावर पडायचा अन् गयावया करायचा; माझ्या या बुटांचे अक्षरशः मुके घेऊन त्यानं मला भिववू नका हो, अशी माझी विनवणी केली आहे. ऐकलंत, 'मला भिववू नका' अशी. काय विनवणी पण ! अहो, मी त्याला पैसे देऊ केले. ची ची करणारं कोंबडीचं पिल्लू ते–रोगट, अपस्मारी, दुबळ्या मनाचं, त्याला आठ वर्षाचं पोर मारील. त्याच्यात म्हणण्यासारखं काहीच चारित्र्य नाही. ते स्मिर्दीखफचं काम नाही, गृहस्थहो. त्याला पैशाची पर्वा नाही; तो माझी बक्षिशी घेत नसे. आणखी असं बघा, त्या म्हाताऱ्या माणसाला मारण्यात त्याचा हेतू काय असणार आहे? अहो, तो त्यांचा मुलगा असण्याचा फार मोठा संभव आहे, समजलात, त्यांचा अनौरस मुलगा. हे माहीत आहे तुम्हाला?"

"ही दंतकथा आमच्या कानी आली आहे. पण तुम्हीसुद्धा तुमच्या वडिलांचे पुत्र आहात ना? तरी तुम्ही ज्याला त्याला मी त्यांना मारणार आहे म्हणून सांगत होता."

"चांगला टोला हाणलात ! अन् गलिच्छ हलकट टोला ! मी भीत नाही ! काय हो, महाशय, हे माझ्या तोंडावर म्हणणं तुमचा अधमपणा नाही काय? हे अधमपणाचं आहे, कारण मीच तर ते तुम्हाला सांगितलं. मला त्यांचा खून करण्याची नुसती इच्छा नव्हती, तर मी तो केलाही असता. आणि विशेष म्हणजे, चाकोरीबाहेर जाऊन मी आपणाहून तुम्हाला सांगितलं की मी जवळजवळ त्यांना ठार मारलंच होतं. पण मी त्यांना मारलं नाही; माझ्या संरक्षक देवदूतानं मला

बाबबलं ते तुम्ही लक्षात घेतलं नाहीत. आणि म्हणून तुमचा हा नीचपणा आहे. कारण मी त्यांना मारलेलंच नाही, मी मारलेलं नाही ! ऐकलंत, मी त्यांना मारलं नाही."

तो गुदमरल्यासारखा झाला. सबंध तपासणीत तो इतका कधी हादरून गेला नव्हता.

"अन् त्यानं तुम्हाला काय सांगितलंय–म्हणजे स्मिर्द्याखफनं ?" त्यानं थोडा वेळ थांबून एकदम प्रश्न केला. "हा प्रश्न मी करू का ?"

तुम्ही कोणतेही प्रश्न विचारू शकता," सरकारी वकील भावनाशून्य कठोरतेने म्हणाला, "या प्रकरणाच्या वस्तुस्थितीशी संबंध असलेले कोणतेही प्रश्न, अन् मी पुनः सांगतो, तुम्ही विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर द्यायला आम्ही बांधलेले आहोत. ज्या स्मिर्द्याखफविषयी तुम्ही विचारलंत तो आम्हाला त्याच्या बिछान्यावर बेभान अवस्थेत, अत्यंत भयंकर अशा अपस्माराच्या मूर्च्छेत पडलेला आढळला, ती पुनः पुन्हा अशी बहुधा दहा वेळा आली असावी. आमच्याबरोबर असलेल्या डॉक्टरांनी त्याला तपासल्यानंतर सांगितलं की तो आजची रात्र कदाचित् काढणार नाही."

"अस्सं, तसं जर असेल, तर सैतानानंच त्यांना मारलं असावं", मीत्याच्या तोंडून एकदम उद्गार निघाला, या क्षणापर्यंत जणू तो स्वतःलाच विचारीत होता की "स्मिर्द्याखफचंच हे काम असेल की नाही ?"

"स्मिर्द्याखफचंच हे काम असेल की नाही ?"

"आपण त्याकडं मागाहून येऊ." निकोलाय पारफेनोविच ठरवून म्हणाला : "आता, तुम्ही आपलं निवेदन पुढं चालू करता ना ?"

मीत्याने आरामाची विनंती केली. त्याची विनंती सौजन्यपूर्वक मान्य करण्यात आली. विसाव्यानंतर, त्याने आपली कथा पुढे चालू केली. पण तो गळून गेल्यासारखा झाला होता. तो थकून गेला होता, निस्तेज झाला होता अन् मनाने लेचापेचा झाला होता. त्यात भरीस भर सरकारी वकिलाने जणू जाणून बुजूनच 'क्षुल्लक मुद्द्यां'संबंधीचे त्रासदायक प्रश्न विचारून त्याला हैराण करून सोडले होते. म्हाताऱ्या ग्रिगरीने आपला डावा पाय पकडला असताना, भिंतीवर बसून आपण त्याच्या डोक्यावर बत्त्याने कसे हाणले, अन् नंतर आपण त्याला पाहण्यासाठी खाली कशी उडी घेतली हे मीत्याने वर्णन करून सांगितले न सांगितले तेवढ्यात सरकारी वकिलाने त्याला थांबविले अन् तो भिंतीवर कसा बसला होता त्याचे बरोबर वर्णन करायला त्याला सांगितले. मीत्याला आश्चर्य वाटले.

"कसं म्हणजे, मी हा असा दोन्हीकडं दोन पाय टाकून बसलो होतो."

"आणि तो बत्ता ?"

"बत्ता माझ्या हातात होता."

" खिशात नव्हता ? तुम्हांला ते नक्की आठवतंय ? तुम्ही त्याला दिलात तो जोराचा तडाखा होता ? "

" तो जोराचाच असावा. पण तुम्ही हे का विचारता ? "

" तुम्ही त्यावेळी जसे भिंतीवर बसला होतात तसे आता खुर्चीवर बसून, तुम्ही हात कसा हालविलात अन् कोणत्या दिशेनं ते जरा दाखविता का ? "

" तुम्ही काय माझी गंमत चालविली आहे ? "

मीत्याने विचारणाऱ्याकडे रागाने बघून विचारले, पण वकील मुळीच डग-मगला नाही.

मीत्या एकदम वळला, खुर्चीवर दोन्हीकडे दोन पाय टाकून बसला अन् त्याने आपला हात हलवून दाखविला.

" असा मी त्याच्यावर प्रहार केला ! अस्सं मी त्याला ठोसा मारून खाली पाडलं ! आणखी काय तुम्हाला हवं ? "

" आभार ! आता, तुम्ही खाली उडी का मारलीत, कोणत्या हेतूनं, आणि तुमच्या डोळ्यांपुढं त्यावेळी काय होतं, हे स्पष्ट करण्याची तुम्ही तसदी घ्याल ? "

" हंः, खड्डयात गेलं ते !...मी खाली उडी मारली ती ज्याला मी दुखापत केली त्याला पाहण्यासाठी...कशाला होतं. पाहायचं ते मला माहीत नाही ! "

" त्यावेळी तुम्ही इतके क्षुब्ध मनोवृत्तीत होता अन् पळून जात होता तरीसुद्धा ? "

" होय, जरी मी क्षुब्ध होतो अन् पळून चाललो होतो तरी. "

" त्याला मदत करण्याची तुमची इच्छा होती ? "

" मदत !...हां, कदाचित् त्याला मदत करावीशी मला वाटली असेल... मला आठवत नाही. "

" तुम्हाला आठवत नाही ? तर मग तुम्ही काय करीत होता त्याचं तुम्हाला भान होतंच असं नाही तर ? "

" तसं मुळीच नाही. मला प्रत्येक गोष्ट, प्रत्येक बारीक सारीक गोष्ट आठवते. मी त्याला पाहण्याकरिता खाली उडी टाकली, अन् त्याचं तोंड माझ्या हातरुमालानं पुसलं. "

" आम्ही तुमचा हातरुमाल बघितला आहे. त्याला पुन्हा शुद्धीवर आणू अशी तुम्हाला आशा वाटली काय ? "

" आशा वाटली की काय ते मला माहीत नाही. तो जिवंत आहे की नाही एवढी खात्री करून घेण्याचीच फक्त माझी इच्छा होती. "

" हं ! म्हणजे तुम्हाला खात्री करून घ्यायची होती ? बरं, पुढं ? "

" मी काही डॉक्टर नाही. मला कसं ठरविता येणार ? त्याला मी ठार मारलं असं समजून मी पळालो. अन् आता तो बरा झाला आहे. "

" उत्तम ", सरकारी वकिलाने शेरा मारला. " आभार. मला तेवढंच पाहिजे होतं. कृपा करून पुढं चला. "

अरेरे ! आपण परत खाली उडी मारली ती कीव येऊन मारली, अन् पाय लांब करून पडलेल्या त्या आकृतीपाशी उभे राहून आपण " तुझ्यावर दुःख ओढवलं, म्हाताऱ्या त्याला काही इलाज नाही. ठीक आहे, तुला तिथंच पडून राहिलं पाहिजे " असे पस्ताव्याचे काही उद्गारही काढले, याची मीत्त्याला आठवण असून सुद्धा ते त्यांना सांगण्याचं त्याच्या डोक्यात मुळीच आले नाही.

सरकारी वकील सहजच हाच एक निष्कर्ष काढणार की या मनुष्यानं अशा वेळी आणि अशा क्षुब्ध अवस्थेत परत उडी टाकली तर ती आपला गुन्हा पाहणारा एकच एक साक्षीदार मेला की नाही याची खात्री करून घेण्याच्या उद्देशानंच टाकली असणार; म्हणजे हा मनुष्य मोठ्या शक्तीचा, थंड डोक्याचा, चटकन् निर्णय घेणारा आणि अशावेळीसुद्धा दूरदर्शीपणा असणारा असला पाहिजे "...वगैरे, सरकारी वकिलाचे समाधान झाले की, " या बावरलेल्या वृत्तीच्या माणसाला मी ' क्षुल्लक गोष्टी ' विचारून चिडविलं आणि तो त्याच्या मनात होतं त्याहून अधिक बोलला."

अतिशय कष्टाने मीत्त्याने आपली हकीकत पुढे चालू केली. पण यावेळी त्याला पारफेनोविचने लगेच खेचले,

" तुमचे हात असे रक्तानं भरलेले, आणि, दिसून येतं त्यावरून, तुमचं तोंडही रक्तानं भरलेलं असताना, फेरोसिया मारकोवना या मोलकरणीकडं धावत जायचं तुमच्या मनात कसं आलं ? "

" कसं म्हणजे ? ते रक्त त्यावेळी माझ्या दृष्टीलाच पडलं नाही, " मीत्त्याने उत्तर दिले

" हे अगदी शक्य आहे. असं कधी कधी घडतं." सरकारी वकिलाने पारफेनोविचशी नेत्रपल्लवी केली.

" माझ्या नजरेलाच ते आलं नाही. तुमचं म्हणणं अगदी बरोबर आहे, वकीलसाहेब." मीत्त्याने एकदम अनुमती दिली.

नंतर आली ' बाजूला होण्या 'च्या अन् त्यांच्या सुखाला वाट करून देण्याच्या मीत्त्याने एकाएकी केलेल्या निश्चयाची हकीकत. पण पूर्वीप्रमाणे त्यांच्यापुढे आपले अंतःकरण मोकळे करावे आणि त्यांना ' आपल्या जीवाच्या राणी 'बद्दल सांगावे याविषयी त्याच्या मनाचा निर्धार होऊ शकला नाही. ही थंडगार माणसे " जी त्याला ढेकणासारखी चिकटून बसली होती " त्यांच्यापुढे तिच्यासंबंधी बोलणे त्याला आवडले नाही. आणि म्हणून त्यांनी पुनःपुन्हा विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतांना तो त्रोटक अन् तुटक बोलला.

" हं, मी आत्महत्या करायचं ठरवलं. ज्याकरिता मी जगावं असं काय शिल्लक राहिलं होतं ? हा प्रश्न माझ्याकडे टवकारून पाहत होता. तिचा पहिला

हक्कदार प्रियकर परत आला होता, या माणसानं तिचं नुकसान केलं होतं, पण तो आपलं प्रेम देण्याकरिता आणि लग्न करून त्या नुकसानीची भरपाई करण्याकरिता पाच वर्षांनी धावत परत आला होता... त्यामुळं मी ओळखलं की आता आपलं सारं संपलं आहे... आणि माझ्या मागं होती दुष्कीर्ती, अन् होतं ग्रिगरीचं रक्त... मी जगायचं कशासाठी? म्हणून ती गहाण ठेवलेली पिस्तुलं परत मिळवावीत, भरावीत अन् उद्या आपल्या डोक्यात गोळी उडवावी याकरिता मी गेलो."

"आणि त्यापूर्वी रात्री एक मोठी मेजवानी?"

"हो, एक मोठी मेजवानी अगोदरच्या रात्री. जाऊ दे हे सारं खड्डयात. सद्‌गृहस्थहो; हे लवकर संपवा बुवा. इथून फार दूर अंतरावर नसलेल्या खेड्याच्या पलीकडंच स्वतःला गोळी घालून घ्यायचं माझ्या मनात होतं, आणि मी तो बेत पहाटे पाच वाजता पार पाडायचं योजलं होतं. आणि माझ्या खिशात अगोदरच मी एक चिठ्ठी ठेवली होती. मी ती पेऱ्होतिनच्या घरी माझी पिस्तुलं भरली तेव्हा लिहिली होती. हे पाहा ते पत्र. वाचा ते! ते तुमच्याकरिता नाही हे लक्षात ठेवा," तो तिरस्कारानं म्हणाला, त्यानं ते आपल्या जाकिटाच्या खिशातून काढले अन् टेबलावर फेकले. वकिलांनी ते कुतूहलाने वाचले आणि रीतीप्रमाणे ते त्या प्रकरणाशी संबंधित असलेल्या कागदांत दाखल केले.

"अन् पेऱ्होतिनच्या इथं आपले हात धुवावेत असंसुद्धा तुमच्या मनात आलं नाही? आपल्याविषयी संशय जागा होईल याची तुम्हाला भीती नाही वाटली?".

"कसला संशय? संशय येवो न येवो, काही झालं तरी मला इथं दौडत यायचंच होतं अन् पाच वाजता गोळी घालून घ्यायचीच होती, अन् काहीही करायला तुम्ही वेळेच्या आत आलाच नसता. माझ्या वडिलांच्या बाबतीत जे काय घडलं ते घडलं नसतं तर तुम्हाला यासंबंधानं काहीच कळलं नसतं, अन् इथं आलाच नसतात. हं; हे सैतानाचं काम आहे. सैतानानंच वडिलांचा खून केला, त्याच्या साहाय्यानंच तुम्हाला त्याचा इतक्या लवकर सुगावा लागला. तुम्ही इतक्या जलदीनं इथं कसे काय येऊन पोचलात? हे आश्चर्यकारक आहे, स्वप्नासारखं आहे!"

"पेऱ्होतिन यांनी आम्हांला सांगितलं की, जेव्हा तुम्ही त्यांच्याकडं गेला होता तेव्हा तुम्ही आपल्या हातात...तुमच्या रक्तानं भरलेल्या हातात... तुमचे पैसे...खूपच पैसे...शंभर शंभराच्या नोटांचं एक पुडकं धरलं होतं, अन् त्यांच्या नोकरमुलानं सुद्धा ते पाहिलं."

"ते खरं आहे, सद्‌गृहस्थहो, तसं झालं हे मला आठवतं."

"आता एक लहानसा मुद्दा इथं निर्माण होतो," निकोलाय पारफेनोविचनं अतिशय सौजन्याने बोलायला सुरुवात केली, "तुम्ही आम्हाला हे सांगू शकाल का की हा इतका पैसा तुम्हाला एकाएकी कुठून मिळाला? वस्तुस्थितीवरून आणि वेळेचा जर हिशेब केला तर असं दिसतं की, तुम्ही आपल्या घरी गेला नव्हता."

हा प्रश्न इतक्या स्पष्टपणाने करताच सरकारी वकिलाच्या भुवया आवळल्या, पण त्याने पारफेनोविचला अडथळा केला नाही.

"हो, मी घरी गेलो नाही," मीत्याने वरून अगदी शांतपणाने-पण जमिनी-कडे दृष्टी लावून उत्तर दिले.

"तर मग मला पुन्हा एकदा माझा प्रश्न विचारू द्या." निकोलाय पारफेनोविच जणू त्या विषयाकडे हळूहळू सरपटत जात असल्याप्रमाणे चालला. "ही एवढी रक्कम एकदम मिळवणं तुम्हाला शक्य कसं झालं? तुम्हीच तर कबूल केलंत की त्याच दिवशी पाच वाजता तुम्ही..."

"मला दहा रुबलांची गरज होती अन् माझी पिस्तुलं मी पेऱ्होतिनकडं ओलीस ठेवली अन् मी मादाम होहलाहोवाकडं तीन हजार कर्जाऊ मागण्याकरिता गेलो, ते ती मला देईना, वगैरे ते सर्व पुढं झालं." मीत्याने त्यांना मध्येच तोडून उत्तर दिलं. "होय, सद्गृहस्थहो, मला त्यांची गरज होती अन् एकदम हजारो पुढं आले, हे कसं, अं! सद्गृहस्थहो, तुम्हाला भय वाटतंय, होय ना, की 'याला हे कुठं मिळाले ते जर यानं सांगितलं नाही तर?' बरोबर आहे. सद्गृहस्थहो, मी ते तुम्हाला मुळीच सांगणार नाही. तुमचा तर्क बरोबर आहे. तुम्हाला ते कधीच कळणार नाही." मीत्या प्रत्येक शब्द चांगला तासून काढावा तसा, असाधारण निश्चयाने बोलला. दोघे वकील क्षणभर गप्प राहिले.

"कारमाझफ, हे आम्हाला समजणं अतिशय महत्त्वाचं आहे, हे तुम्हाला समजायला हवं," पारफेनोविच दृढपणे अन् भाषेत माधुर्य आणून म्हणाला,

"मला समजतं, पण तरी मी तुम्हाला सांगणार नाही."

सरकारी वकीलही मध्ये पडला, आणि पुन्हा त्याने त्याला जाणवून दिले की, कैद्याला जर प्रश्नांना उत्तर न देणे आपल्या हिताचे आहे असे वाटत असेल तर तसे करण्याचे त्याला स्वातंत्र्य आहे वगैरे. परंतु तो गप्प बसण्याने त्याचे स्वतःचेच, विशेषतः अशा महत्त्वाच्या खटल्यात, नुकसान होईल वगैरे वगैरे...

"वगैरे वगैरे, सद्गृहस्थहो, वगैरे. पुरे झालं! मी ही बकबक पूर्वी ऐकली आहे," पुन्हा मीत्या मध्येच म्हणाला, "हे किती महत्त्वाचं आहे, अन् हा अग-त्याचा मुद्दा आहे हे माझं मला दिसतंच आहे, तरी मी ते सांगणार नाही."

"आमचं काय जातं? हे काही आमचं काम नाही, तुमचं आहे. तुम्ही आपलंच नुकसान करून घेत आहा," पारफेनोविच बिचकतं म्हणाला.

"हे पहा, सद्गृहस्थहो, थट्टा बाजूला राहू द्या." मीत्याने आपली नजर वर केली अन् त्या दोघांकडे स्थिरपणे पाहात तो म्हणाला, "मला पहिल्यापासूनच वाटून वाटतं आहे की या मुद्द्यावर आपली टक्कर होणार. पण पहिल्यांदा, जेव्हा मी माझी साक्ष द्यायला सुरुवात केली तेव्हा हे सारं फार लांब अन् धुरकट होतं; हे

सारं तरंगत असल्यासारखं होतं, आणि मी इतका बावळट होतो की मी असं धरून चाललो की आपणा उभयतांत परस्पर विश्वास आहे. पण आत्ता माझं मलाच दिसतं आहे की, असा विश्वास शक्यच नाही, कारण काही झालं तरी आपण या अडथळ्यापाशी येऊन थडकणारच. अन् आता आपण तिथं येऊन थडकलो आहोत! ते अशक्य आहे अन् गोष्ट इथंच संपली! पण मी तुम्हाला दोष देत नाही. तुम्ही केवळ माझा शब्द मानून काही विश्वास ठेवू शकणार नाही. मला ते अर्थात समजतं."

तो विषण्ण मनाने स्तब्ध झाला.

"मुख्य मुद्द्यासंबंधी गप्प राहण्याचा आपला निश्चय न सोडता तुम्हाला अत्यंत धोकादायक असणाऱ्या या आणीबाणीच्या क्षणी उत्तर द्यायचं जो जबरदस्त हेतू मनात धरून तुम्ही नाकारता आहा, त्या हेतूच्या स्वरूपासंबंधानं काही ओझरती अशी कल्पना तुम्ही आम्हाला नाही का देऊ शकणार?"

मीत्याने स्वप्नात असल्याप्रमाणे खेदाने स्मित केले.

"सभ्य गृहस्थहो, तुम्ही समजता त्यापेक्षा मी बराच सज्जन आहे. आणि, जरी तुमची ती लायकी नाही तरी, का त्याचं कारण सांगतो अन् कल्पनाही तुम्हाला देतो. सद्गृहस्थहो, मी त्यासंबंधानं बोलू इच्छीत नाही. कारण तो माझ्या इभ्रतीवर डाग होईल. तो पैसा मला कुठं मिळाला या प्रश्नाचं उत्तर मी दिलं तर वडिलांचा खून करून त्यांना लुबाडल्याच्या दुर्लौकिकाहूनही फार मोठा असा माझा दुर्लौकिक होईल, अर्थात् जर मी त्यांचा खून करून त्यांना लुबाडलं असतं तर. काय सद्गृहस्थहो, ते तुम्ही लिहून घेणार?"

"होय, आम्ही ते लिहून घेणार." निकोलाय पारफेनोविच अडखळत म्हणाला.

"तुम्ही 'दुर्लौकिका'बद्दल लिहून घेणं योग्य होणार नाही. ते मी फक्त तुम्हाला माझ्या हृदयातील सद्भावनेनं सांगितलं. मी ते सांगायची गरज नव्हती. मी ती एकप्रकारे तुम्हाला भेट म्हणून दिली, अन् तुम्ही लगेच त्यावर झडप घालताहात. हं, ठीक लिहा– तुम्हाला वाटेल ते लिहा." तो तिरस्कारयुक्त शिसारीने शेवटी म्हणाला. "मला तुमची भीती वाटत नाही अन् मी अजूनही तुमच्यापुढं माझी मान ताठ ठेवू शकतो."

"अन् त्या 'दुर्लौकिका'चं स्वरूप काय ते नाही का तुम्ही सांगू शकणार?" पारफेनोविचने विचारण्याचे धाडस केले.

सरकारी वकिलाने कपाळाला खूपच आठ्या घातल्या.

"नाही नाही. ते संपलं. उगाच त्रास घेऊ नका. आपले हात घाण करून घेण्यात काही अर्थ नाही. झालंय तेवढ्यानंच मुळी तुमच्यामुळं मी भरपूर बरबटला गेलोय. तुमची ती लायकी नाही– कोणीच लायक नाही... बस झालं, सद्गृहस्थहो, मी आता पुढं बोलणार नाही."

हे त्याने अतिशय हुकमी स्वरात म्हटले. निकोलाय पारफेनोविचने पुढे आग्रह धरला नाही, पण इप्पोलित किरिलोविचच्या नजरेवरून त्याने आशा सोडून दिलेली नाही असं त्याला दिसलं.

" निदान तुम्ही ज्या वेळी पेऱ्होतिनच्या घरी गेलात त्या वेळी तुमच्या हातात किती रक्कम होती– नक्की किती रुबल्स होते– तेवढं तरी सांगू शकाल की नाही ? "

" मला ते तुम्हाला सांगता येणार नाही."

" मला वाटतं, तुम्ही पेऱ्होतिनजवळ बोललात की मादाम होहलाहोवाकडून तुम्हाला तीन हजार मिळालेत."

" बोललो असेल कदाचित. पुरे झालं सद्‌गृहस्थहो. माझ्यापाशी किती रुबल्स होते ते सांगण्याची माझी इच्छा नाही."

" तर मग तुम्ही इथं कसे आलात आणि आल्यापासून काय काय केलंत ते कृपा करून सांगाल ? "

" हं, ते तुम्ही इथल्या लोकांना विचारू शकता. पण तुम्हाला वाटलं तर मी सांगतो."

तो ते सांगू लागला, पण ती हकीकत आम्ही येथे पुन्हा सांगत नाही. त्याने ती नीरसपणे अन् तुटकपणे सांगितली. आपल्या प्रेमाच्या भावनावेगासंबंधाने तो काहीसुद्धा बोलला नाही, पण 'या प्रकरणी नवीन गोष्टी निर्माण झाल्यामुळं' आपण आपल्यावर गोळी घालून केलेला निश्चय सोडून दिल्याचे त्याने त्यांना सांगितले. त्याने ती हकीकत हेतू किंवा तपशील यात न शिरता सांगितली. आणि यावेळी वकिलांनी त्याला फारसा त्रास दिला नाही. या बाबतीत त्यांना लक्षात घेण्याजोगा महत्त्वाचा काही मुद्दा वाटला नाही हे उघड होते.

" आम्ही हे सर्व तपासून घेऊ. साक्षीदारांच्या तपासणीच्या वेळी आम्ही पुन्हा इकडे बघू. ती अर्थात तुमच्या समक्षच होईल." निकोलाय पारफेनोविच संपवून म्हणाला. " आणि आता माझी तुम्हाला विनंती आहे की तुमच्यापाशी जे जे काही यावेळी असेल ते, विशेषतः तुमच्याकडं जो काही पैसा अजून असेल तो सर्व इथं टेबलावर काढून ठेवा."

" माझा पैसा म्हणता सद्‌गृहस्थहो ? खरंच. ते आवश्यकच आहे हे मला समजतं. मला खरोखर आश्चर्यच वाटतं की यापूर्वी तुम्ही त्याबद्दल कशी चौकशी केली नाहीत. मी कुठं जाऊ शकत नव्हतो हेही तितकंच खरं म्हणा. मी अशा ठिकाणी बसलो आहे की मी सहज दिसावा. पण हे घ्या माझे पैसे–मोजून घ्या. एवढेच, मला वाटतं.

त्याने आपला सर्व खिसा उलटा केला; अगदी बारीक चिल्लर–त्याच्याकडे वीस वीस कोपेकची जी दोन नाणी होती ती त्याने आपल्या जाकिटाच्या खिशातून

बाहेर काढून ठेवली. त्यांनी तो पैसा मोजला, तो आठशे छत्तीस रुबल अन् चाळीस कोपेक भरला.

"सारं एवढंच ना?" तपासणी करणाऱ्या वकिलाने विचारले.

"होय."

"तुम्ही आत्ताच आपल्या साक्षीत सांगितलंत की तुम्ही प्लोत्निकोवकडे तीनशे रुबल्स खर्चलेत. पेऱ्होतिनला तुम्ही दहा दिलेत, गाडीभाडं वीस, इथं तुमचे दोनशे गेले, नंतर..."

निकोलाय पारफेनोविचने सगळे मिळून मोजले. मीत्याने त्याला तत्परतेने मदत केली. त्यांनी फार्दिंग न् फार्दिंग आठवला अन् तो त्या हिशेबात मिळविला. पारफेनोविचने झटझट बेरीज केली.

"हे आठशे धरून तुमच्याकडं प्रथम अदमासे पंधराशे रुबल्स असले पाहिजेत नाही का?"

"असतील" मीत्या तडकून म्हणाला.

"याहून पुष्कळच जास्त होते असं सर्वचजण खात्रीपूर्वक सांगतात हे कसं?"

"त्यांना सांगू द्या."

"पण तुम्ही स्वतःही खात्रीपूर्वक म्हणालात."

"होय, मीही म्हणालो."

"ज्यांची अजून तपासणी केलेली नाही त्या इतर इसमांच्या साक्षीशी आम्ही ही सर्व ताडून पाहू. तुमच्या पैशाची चिंता करू नका. त्याची यथायोग्य काळजी घेतली जाईल अन् ज्याची आता सुरुवात होणार....ते संपलं म्हणजे....जर असं आढळून आलं, किंवा असं सिद्ध झालं म्हणा की तुमचा त्यावर निर्विवाद हक्क आहे, तर ते परत तुमच्या ताब्यात दिले जातील. ठीक, अन् आता..."

निकोलाय पारफेनोविच एकदम उठून उभा राहिला, अन् मीत्याला त्याने निश्चयी सुरात बजावले की, "तुमच्या कपड्यांची अन् इतर सर्व वस्तूंची बारकाईनं अन् झाडून झडती घेणं आमचं कर्तव्य आहे, ते आमच्यावर बंधनकारक आहे..."

"खुशाल घ्या ना, सद्गृहस्थहो तुम्हाला वाटलं तर, माझे सर्व खिसे मी उलटे करतो."

आणि, खरोखरच, त्याने आपले खिसे उलटवायला सुरुवात केली.

"तुमचे कपडे अंगावरून काढणंसुद्धा आवश्यक आहे."

"काय! सगळे कपडे काढायचे? अं:, मी जसा आहे तसा माझा झाडा नाही का घेणार? ते शक्य नाही का?"

"ते अगदी अशक्य आहे, दमीत्रि फ्योदरोविच, तुम्हाला सगळे कपडे काढावे लागतील."

"तुम्ही म्हणता तसं," मीत्याने विषण्णपणे मान वाकविली; "फक्त कृपा करून इथं नको, पडद्याच्या मागं. ते कोण तपासणार?"

"अर्थात पडद्याच्या मागंच."

निकोलाय पारफेनोविचने संमतिदर्शक मान हलविली. त्याच्या एवढ्याशा चेहेऱ्यावर एक विशिष्ट प्रकारच्या गांभीर्याची छटा आली होती.

६

सरकारी वकील मीत्याला कोंडीत पकडतो

यानंतर जे घडले ते मीत्याला अगदीच अनपेक्षित अन् आश्चर्यजनक असे होते. आपल्याशी, मीत्या कारमाझफशी, कोणी अशा रीतीने वागू शकले असते अशी, एका मिनिटापूर्वीसुद्धा, त्याला कधी कल्पनाही आली नसती. सर्वांत वाईट हे होते की, या वागणुकीत काहीतरी अपमानकारक आणि त्यांच्या बाजूने काहीतरी 'मगरुरीचं अन् तिरस्कारदर्शक' असे होते. कोट काढणे यात विशेष काही वाटण्यासारखे नव्हते, पण पुढे त्याला आणखी कपडे काढायला सांगण्यात आले. सांगण्यात काय आले, 'हुकूम करण्यात' आला, तेही तो समजू शकला. अभिमानाने अन् तुच्छतेने एक शब्दही न बोलता तो मुकाट्याने कबूल झाला. अनेक खेडूत त्या वकिलांच्या मागोमाग गेले अन् पडद्याच्या आतल्या बाजूला गोळा झाले. "सक्ती करावी लागली तर तयारी असावी म्हणून, किंवा दुसरंही काही कारण असेल कदाचित्" मीत्याच्या मनात आले.

"बरं, माझा सदराही काढायचा का?" त्याने तीक्ष्ण स्वरात विचारले, पण निकोलाय पारफेनोविचने उत्तर दिले नाही. तो सरकारी वकिलाबरोबर कोट, विजार, जाकीट अन् टोपी तपासण्यात अगदी गढून गेला होता; आणि त्या दोघांचे त्या कामातील लक्ष गुंतले होते हे उघड होते. "त्यांना त्याचं काहीच वाटत नाही," मीत्या मनात म्हणाला, "अगदी साधा शिष्टाचारसुद्धा हे ठेवीत नाहीत."

"मी तुम्हाला दुसऱ्यांदा विचारतो– मी हा माझा सदरा काढणं जरुरीचं आहे का नाही?"

"तुम्ही काही तसदी घेऊ नका. काय करायचं ते आम्ही सांगू," निकोलाय पारफेनोविच म्हणाला, आणि त्याचा स्वर नक्कीच हुकूमवजा होता, निदान मीत्याला तसा वाटला.

दरम्यान त्या दोन वकिलांत हळूहळू काही मसलत झाली. त्या कोटावर, विशेषतः पाठीमागे डावीकडे एक भला मोठा रक्ताचा ठिपका, सुकलेला अन्

अजूनही कडक असा आढळून आला. विजारीवरही रक्ताचे डाग होते. शिवाय निकोलाय पारफेनोविच त्या खेडूत साक्षीदारांच्या देखत त्या कोटाच्या कॉलरवरून, कफावरून अन् कोटाच्या अन् विजारीच्या शिवणीवरून आपली बोटं फिरवीत होता, तो त्यात काहीतरी अर्थात् पैसाच शोधत होता, हे उघड होते. मीत्या आपल्या कपड्यात पैसे शिवायलासुद्धा कमी करणार नाही असा आपला संशय त्याने त्याच्यापासून दडविलाही नाही.

"हा मला एक लष्करी अधिकारी म्हणून नव्हे तर चोर म्हणून वागवीत आहे," मीत्या स्वतःशी पुटपुटला. त्यांनी आपल्या कल्पना एकमेकांना विलक्षण स्पष्ट भाषेत सांगितल्या. उदाहरणार्थ, तो सेक्रेटरी त्या पडद्याच्या मागे गेला होता अन् इकडे तिकडे गडबड करीत अन् ऐकत होता, त्याने निकोलाय पारफेनोविचचे लक्ष त्या टोपीकडे वेधले, तीही ते बोट फिरवून तपाशीत होते.

"तुम्हाला तो नकला काढणारा कारकून, ग्रिग्रेन्को आठवत असेल," तो सेक्रेटरी म्हणाला. "गेल्या उन्हाळयात सगळ्या कचेरीचा पगार त्याच्याकडं आला, अन् आपण दारूच्या नशेत असताना तो पैसा हरवला अशी त्यानं बतावणी केली. अन् तो कुठं सापडावा ? कुठं काय, त्याच्या टोपीतल्या या असल्या मगजीतच तो होता. शंभर शंभर रुबलांच्या नोटा सुरळ्या करून या मगजीत शिवून टाकलेल्या होत्या."

दोघांही वकिलांना ग्रिग्रेन्कोचे प्रकरण पूर्ण आठवले, अणि म्हणून त्यांनी मीत्याची टोपी बाजूला ठेवली अन् त्याच्या सर्वच कपड्यांची मागाहून जास्त कसून पाहणी करावी असे ठरविले.

"माफ करा," निकोलाय पारफेनोविच एकदम ओरडून म्हणाला. त्याला मीत्याच्या सदऱ्याचा उजवा कफ आत वळविलेला अन् रक्ताने भरलेला दिसला, "माफ करा, हे काय आहे, रक्त ?"

"होय," मीत्याने झटकन् ती घडी उलगडली.

"म्हणजे, कुठलं रक्त.... अन् हा कफ आत का वळवला होता ?"

मीत्याने त्याला ग्रिगरीची आपण काळजी घेत असताना बाही रक्तानं कशी भरली होती अन् पेऱ्होतिनच्या इथे आपण आपले हात धूत असताना आत कशी वळविली होती ते सांगितले.

"तुम्हाला तो सदरासुद्धा काढला पाहिजे. महत्त्वाचा पुरावा म्हणून तो अतिशय महत्त्वाचा आहे."

मीत्या लाजेने लाल झाला आणि संतापाने भडकला.

"म्हणजे ? मी काय उघडा उभा राहू ?" तो ओरडून म्हणाला.

"वैतागू नका. आम्ही दुसरी काही सोय करू. अन् तोपर्यंत तुमचे मोजे काढा."

" तुम्ही चेष्टा तर करीत नाही ? हे खरोखर आवश्यकच आहे काय ?" मीत्याचे डोळे चमकू लागले.

" आम्ही चेष्टा करण्याच्या मनःस्थितीत नाही," पारफेनोविच करडेपणे म्हणाला.

" बरं, काढलेच पाहिजे तर..." मीत्या पुटपुटला, अन् बिछान्यावर बसून त्याने आपले पायमोजे काढले. त्याला अगदी कसेतरीच वाटायला लागले. सर्वांच्या अंगावर कपडे होते अन् तो तेवढा उघडा होता, अन् चमत्कारिक असे की कपडे काढल्यानंतर त्याला त्यांच्यासमक्ष आपण कसे का होईना गुन्हेगार आहोत असे वाटायला लागले, अन् आपण त्यांच्यापेक्षा कमी प्रतीचे आहोत, आणि आता त्यांना आपली छीःथू करण्याचा पूर्ण अधिकार आहे, असे स्वतःसंबंधी मानायला तो तयार झाल्यासारखा झाला.

" सगळेच जेव्हा नागवे असतात, तेव्हा आपल्याला तितकीशी लाज वाटत नाही, पण आपण एकटेच जेव्हा नागवे असतो अन् सगळेजण पाहत असतात, तेव्हा ते मानहानिकारक होतं," तो आपल्याशी वरचेवर म्हणत राहिला. ' हे स्वप्नासारखं आहे. अशा मानहानिकारक अवस्थेत आपण असल्याची स्वप्नं मी पुष्कळ वेळा बघितली आहेत." आपले पायमोजे काढून टाकणे हे त्याला कष्टदायक झाले. ते फारच गलिच्छ होते, तसेच त्याचे आतले कपडेही होते, आणि आता प्रत्येकाला ते दिसणार होते. आणि सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे त्याला स्वतःचे पाय बिलकुल आवडत नव्हते. आयुष्यभर त्याला आपल्या दोन्ही पायांचे अंगठे हिडिस वाटायचे. विशेषतः उजव्या अंगठ्यावरच्या खडबडीत, चपट्या अन् पुढं वाकड्या झालेल्या नखांची त्याला शिसारी येई, आणि आता प्रत्येकजण ते पाहणार होता. असह्य अशा शरमेने तो एकदम अन् हेतुपुरस्सर असभ्य झाला. त्याने आपणहूनच आपला सदरा ओढून काढला.

" तुम्हाला संकोच वाटत नसेल तर आणखी कुठं पाहायची इच्छा आहे का ?"

" नाही, त्याची तूर्त तरी गरज नाही."

" बरं, मी असा उघडंच राहायचं का ?" त्याने भडकून विचारले.

" होय, तूर्त त्याला इलाज नाही... कृपा करून थोडावेळ बसा इथं. ही बिछान्यावरची ती रजई अंगाभोवती गुंडाळून घ्या, हे सारं मी पाहीन."

सर्व वस्तू साक्षीदारांना दाखविण्यात आल्या. झडतीचा पंचनामा तयार करण्यात आला, अन् शेवटी निकोलाय पारफेनोविच बाहेर गेला अन् ते कपडे त्याच्या मागोमाग नेण्यात आले. इप्पोलित किरिलोविचही बाहेर गेला. मीत्या त्या शेतकऱ्यांबरोबर एकटा राहिला, ते गप्प उभे राहिले होते, त्यांनी एकदाही आपली नजर त्याच्यावरून काढली नाही. मीत्याने आपल्याभोवती रजई गुंडाळून घेतली.

त्याला थंडी वाजू लागली. त्याचे उघडे पाय बाहेर राहिले अन् ते झाकून घेण्याकरिता त्याला ती रजई ओढता येईना. निकोलाय पारफेनोविच बराच वेळ, 'अगदी असह्य होण्याइतका वेळ,' बाहेर गेलासा वाटला. "मला तो कुत्र्याचं पिल्लू समजतो की काय?" मीत्या आपले दात करकरवीत स्वतःशी म्हणाला. "तो साला सरकारी वकीलही गेला, तो तिरस्कार करतोच आहे यात शंका नाही. मला नागवं पाहण्याची त्याला किळस वाटते आहे!"

पण मीत्याला वाटले की आपल्या कपड्यांची तपासणी झाल्यानंतर ते आपल्याला परत केले जातील. पण निकोलाय पारफेनोविच जेव्हा एका शेतकऱ्याजवळ दुसरेच कपडे देऊन त्याला घेऊन आला तेव्हा त्याचा संताप काय वर्णावा?

"हे तुमच्यासाठी कपडे आणले आहेत," तो मजेनं म्हणाला, आपले काम यशस्वी झाल्याचे जणू त्याला समाधान वाटत असावे. "काल्गानफनी मेहेरबानीनं हा चमत्कारिक प्रसंग पाहून ते दिले आहेत, अन् स्वच्छ सदराही दिला आहे. सुदैवानं हे सारे त्यांच्या ट्रंकेत होते. तुम्ही तुमचे स्वतःचे पायमोजे अन् कपडे तुमच्यापाशी ठेवू शकता."

मीत्याचा राग भडकला.

"मला दुसऱ्यांचे कपडे नकोत!" तो धमकीवजा स्वरात ओरडला, "माझेच मला द्या!"

"ते शक्य नाही!"

"माझे मला द्या. काल्गानफ न् त्याचे कपडे गेले मसणात!"

त्याचे मन वळवायला त्यांना बराच वेळ लागला. पण त्याला शांत करण्यात त्यांना कसेबसे यश आले. त्याचे कपडे रक्ताने डागाळलेले असल्यामुळे 'इतर महत्त्वाच्या पुराव्यात ते दाखल' केले पाहिजेत, आणि ....या खटल्याचा संभाव्य निकाल लक्षात घेता आता ते तुम्हाला घेऊ देण्याचा आम्हाला अधिकारही नाही, असे त्यांनी त्याच्या मनावर ठसविले. मी त्याला शेवटी ते पटले. त्याचा आवेश ओसरून तो विषण्ण मनाने स्तब्ध झाला अन् त्याने झटपट ते कपडे चढविले. ते चढवीत असतांना, ते आपल्या जुन्या कपड्यांपेक्षा बरेच चांगले आहेत अन् 'या बदलाचा लाभ घेणं आपल्याला बरे वाटत नाही. एवढेच तो बोलला. शिवाय, ते हसू येण्यासारखे आखूड होते. "मला काय तुम्ही तुमच्या करमणुकीकरिता मूर्खासारखे कपडे घालता आहा?"

त्यांनी पुन्हा त्याला आर्जवाने समजविले की, "तुम्ही अतिशयोक्ती करीत आहा, काल्गानफ तुमच्यापेक्षा थोडासाच उंच आहे, त्यामुळे विजारच फक्त तुम्हाला थोडीशी मोठी होईल." पण कोट मात्र खरोखरच खांद्यावर तंग होऊ लागला.

"खड्डयात गेलं सारं! मला बटनंसुद्धा नीट लावता येत नाहीत," मीत्या

कुरकुरला. "मेहरेबानी करून काल्गानफला सांगा की, मी काही त्यांचे कपडे मागितले नाहीत, अन् एखाद्या विदूषकासारखा मला जो पोषाख चढवला आहे तो काही माझ्या सांगण्यावरून नाही."

"त्यांना ते सर्व माहीत आहे, अन् त्यांना त्याबद्दल वाईट वाटतंय...म्हणजे तुम्हाला कपडे द्यायला वाईट वाटत नाही, पण या साऱ्या प्रकाराविषयी वाईट वाटतं," पारफेनोविच पुटपुटला.

"आग लागू दे त्याच्या वाईट वाटण्याला! बरं, आता कुठं, की मी इथंच बसून राहायचं आहे?"

त्याला त्या 'दुसऱ्या' खोलीत जायला सांगण्यात आलं. मीत्या तिकडं रागानं फणफणत अन् कोणाकडंही न बघण्याचा प्रयत्न करीत गेला. दुसऱ्याच्या कपड्यात त्याला त्या शेतकऱ्यांच्या अन् त्रिफोन बोरिस्सोविचच्या देखत स्वतःची फजिती झाल्यासारखी वाटली; त्रिफोन बोरिस्सोविचचा चेहेरा, कोणत्या का कारणाकरिता असेना, दारात एकदा उगवला अन् लगेच नाहीसा झाला. "मला असे कपडे घातलेला पाहण्याकरिता तो आला होता," मीत्या मनात म्हणाला. तो त्याच खुर्चीवर पूर्वीप्रमाणे बसला. त्याला विचित्र भयंकर स्वप्नासारखे, जणू आपल्याला वेड लागले आहे की काय असे, वाटू लागले.

"बरं, आता काय? तुम्ही काय मला फटके मारणार आहा? तेच तुम्ही करायचं आता उरलं आहे," तो आपले दात आवळीत सरकारी वकिलाला उद्देशून म्हणाला. त्याने निकोलाय पारफेनोविचकडे वळून बघितलेसुद्धा नाही, जणू काही त्याला त्याच्याशी बोलण्याचा वीट आला होता.

"तो माझ्या पायमोज्यांकडं कसा निरखून पाहात होता, अन् ते किती घाणेरडे आहेत सर्वांना दिसावं म्हणून त्यानं आतली बाजू मुद्दाम उफराटी केली—बदमाष बेकाम!"

"बरं, आता आपल्याला साक्षीदारांची तपासणी करण्याच्या कामाला लागलं पाहिजे," पारफेनोविच, जणू मीत्याच्या प्रश्नाला उत्तरादाखल बोलला.

"होय," सरकारी वकील विचारपूर्वक, जणू कशाचे तरी चिंतन करीत असल्याप्रमाणे बोलला.

"आमच्या हाती होतं तेवढं तुमच्या हितासाठी केलं आहे, दमीत्रि फयोदरोविच" निकोलाय पारफेनोविच म्हणाला, "पण तुमच्या अंगावर आढळलेला पैसा तुम्ही कोठून मिळविलात याचा आमच्या जवळ खुलासा करण्याला तुम्ही अगदीच नकार दिलेला असल्यामुळं, आम्हाला, यावेळी..."

"तुमच्या अंगठीतला हा खडा कोणत्या प्रकारचा आहे हो?" मीत्याने मध्येच विचारले, जणू तो कोणत्या तरी विचारतरंगातून एकदम जागा झाला असावा.

त्याने निकोलाय पारफेनोविचच्या उजव्या हातावर शोभणाऱ्या तीन मोठ्या अंगठ्यांपैकी एकीकडे बोट दाखविले.

"अंगठी?" पारफेनोविचने आश्चर्याने विचारले.

"होय, ती....तुमच्या मधल्या बोटात आहे ती, आत बारीक रेषा असलेली, तो कोणता खडा आहे?" मीत्या एखाद्या चिडखोर लहान पोराप्रमाणे एकसारखे विचारू लागला.

"तो धुरकट पुष्कराज आहे" पारफेनोविच हसून म्हणाला. "तुम्हांला तो पाहायचा आहे? काढून देतो..."

"नको, काढू नका," मीत्या एकदम जागा झाल्यासारखा होऊन अन् स्वतःवर संतापून, आवेशाने म्हणाला, "काढू नका... काही गरज नाही.... मसणात जाऊ दे....सद्गृहस्थहो, तुम्ही माझ्या हृदयाला बट्टा लावलात! मी माझ्या वडिलांना खरोखरच जर मारलं असतं तर मी ते तुमच्यापासून छपवीन, काहीतरी घालमेल करीन, खोटे बोलेन अन् लपून राहीन असं तुम्हाला वाटतं? नाही, हे दमीत्रि कारमाझफच्या स्वभावाला साजेसं नाही. ते तो करणार नाही अन् मी जर अपराधी असतो तर शपथपूर्वक सांगतो की, मी तुमच्या येण्याची किंवा पहिल्याप्रथम माझ्या मनात होतं तशी सूर्योदयाची वाट पाहिली नसती. मी त्यापूर्वीच स्वतःला गोळी घालून घेतली असती. एवढं आता मी स्वतःसंबंधी जाणतो. या चांडाळ रात्रीत जेवढं मला गवसलं, तितकं वीस वर्षांत मी शिकू शकलो नसतो!...आणि मी खरोखर जर माझ्या वडिलांचा खुनी असतो तर या रात्री, याक्षणी मी असा असतो? असा तुमच्याबरोबर बसलो असतो? असा मी तुमच्याशी बोलू शकलो असतो? अशी हालचाल करू शकलो असतो? असा तुमच्याकडं अन् जगाकडं पाहू शकलो असतो? अहो, ग्रिगरी अकस्मात आपल्या हातून मारला गेल्याच्या नुसत्या विचारानं मला रात्रभर शांती मिळाली नाही– भीतीनं नव्हे! छेः, तुमच्या शिक्षेची भीती वाटून मुळीच नव्हे, त्या कृत्याच्या काळिम्याच्या विचारानं! अन् मीतुमच्यासारख्या उपहास करणाऱ्यांच्या पुढं, ज्यांना काही दृष्टी नाही, ज्यांचा कशावर विश्वास नाही, जे चिचुंद्रीसारखे आंधळे अन् निव्वळ निंदक आहेत अशांच्यापुढं मोकळ्या मनानं बोलावं अन् मी दुसरी जी एक घाणेरडी गोष्ट दुसरी काळिमा लावणारी गोष्ट, केली आहे ती तुम्हाला सांगावी अशी अपेक्षा करता? भले त्यामुळं तुमच्या आरोपातून माझी सुटका झाली तरी काय झालं! छेः, त्यापेक्षा सैबेरिया पत्करला! ज्या माणसानं माझ्या वडिलांकडं जाणारा दरवाजा उघडला अन् जो त्या दारानं आत गेला, त्यानंच त्यांना मारलं, त्यांना लुबाडलं. तो कोण होता? मी माझ्या डोक्याच्या शिरा ताणतो आहे पण कोण ते लक्षात येत नाही. पण तो दमीत्रि कारमाझफ नव्हता हे मी तुम्हाला सांगू शकतो, अन् तेवढंच मी तुम्हाला सांगू शकेन अन् ते पुरेसं आहे, पुरेसं आहे. मला एकट्याला राहू द्या. मला काळ्या पाण्यावर पाठवा, शिक्षा करा, पण आता मला

अधिक त्रास देऊ नका. मी आता काही बोलणार नाही. बोलवा तुमचे साक्षीदार!"

मीत्याने हे आपले स्वगत भाषण जणू आपण यापुढे पूर्णपणे स्तब्ध राहणार असा निश्चय करून केले होते. तो बोलत असताना सरकारी वकील एकसारखा त्याच्याकडं टक लावून पाहत होता अन् जेव्हा तो बोलायचा थांबला, तेव्हा जणू ही अगदी नित्याची बाब असल्याप्रमाणे अत्यंत भावनाशून्यपणे अन् स्वस्थतेचा आविर्भाव आणून तो म्हणाला,

"हां, ज्या उघड्या दरवाजासंबंधी तुम्ही आता बोललात ना, त्या संबंधानंही जाता जाता आम्हाला तुमच्या तसंच आमच्याही दृष्टीनं अतिशय महत्त्वाचा असा एक पुराव्याचा भाग, तुमच्या कानावर घालायला हरकत वाटत नाही, तो आम्हाला ग्रिगरीच्याकडून, म्हणजे तुम्ही ज्या म्हाताऱ्याला जखमी केलंत त्याच्याकडून मिळाला. तो शुद्धीवर आल्यानंतर त्यानं स्पष्टपणे अन् निश्चितपणे आमच्या प्रश्नांना उत्तर म्हणून सांगितलं की, आपण जेव्हा पायऱ्यांवर आलो अन् बागेत गडबड ऐकली तेव्हा, (तुम्ही आम्हाला पूर्वीच सांगितलं आहे त्याप्रमाणं) खिडकीत तुम्ही आपल्या वडिलांना पाहिलंत अन् तिथून अंधारात पळून चाललात ते त्यानं पाहण्या-पूर्वी, त्यानं त्या लहानशा फाटकातून बागेत जाण्याचं ठरवलं. ते फाटक उघडं होतं. ग्रिगरीनं डावीकडं दृष्टी टाकली अन् ती उघडी खिडकी पाहत असताना, त्याचवेळी तो दरवाजा (जो त्याच्या अधिक जवळ होता तो) सताड उघडा असलेला पाहिला— आपण बागेत असताना सारा वेळ बंद होता असं तुम्ही म्हणता ना तो. ग्रिगरी खुद्द खात्रीपूर्वक सांगतो अन् आपण साक्षी आहे म्हणतो की तुम्हीच त्या दरवाज्यातून पळाले असावेत, अर्थात् ते त्यानं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिलेलं नाही, कारण त्यानं जे तुम्हाला प्रथम पाहिलं ते बागेत काहीशा अंतरावर, कुंपणाच्या भिंतीकडं पळत होता तेव्हा."

हे भाषण अर्धे झा`े न झाले तेवढ्यात मीत्या आपल्या बैठकीवरून एकदम उडून उभा राहिला.

"बेवकूफ बोलणं!" तो एकदम आवेशात येऊन किंचाळून ओरडला, "धडधडीत खोटं. त्याला तो दरवाजा उघडा दिसणंच शक्य नव्हतं कारण तो बंदच होता. तो खोटं बोलतो!"

"तो आपलं विधान पक्केपणानं करतो आहे हे पुन्हा सांगणं मी माझं कर्तव्य समजतो. त्याच्यात बिलकुल चलबिचल नाही. तो त्याला चिकटून आहे. आम्ही त्याची पुष्कळ उलटतपासणी केली."

"बरोबर. मी त्याची अनेकदा उलटतपासणी केली," पारफेनोविचनं उत्साहाने पुष्टी दिली.

"हे खोटं आहे, खोटं आहे! हा माझी बदनामी करण्याचा तरी प्रयत्न आहे, किंवा एका पागलाला झालेला चित्तभ्रम तरी आहे," मीत्या तरीही ओरडून

म्हणाला. "तो, त्याचं रक्त गेल्यामुळं, जखमेमुळं निव्वळ काहीतरी बरळतो आहे. तो जेव्हा शुद्धीवर आला तेव्हा त्यानं तशी कल्पना केली असली पाहिजे. तो बरळतो आहे."

"होय, पण त्यानं तो दरवाजा उघडा बघितला तो त्याला दुखापत झाली त्यानंतर नव्हे, त्याच्या अगोदर, तो आपल्या घरातून बागेत आल्याबरोबर लगेच."

"पण ते खोटं आहे, खोटं आहे! तसं असणं शक्य नाही! तो खुनशीपणानं माझी बदनामी करीत आहे. ... त्याला तो दिसणंच शक्य नव्हतं... मी दारातून आलो नाही," मीत्या धापा टाकीत म्हणाला.

सरकारी वकील पारफेनोविचकडे वळला अन् त्याला ठाशीवपणे म्हणाला, "ते यांना दाखवा."

"ही वस्तू तुम्ही ओळखता?"

निकोलाय पारफेनोविचने टेबलावर एक मोठे अन् जाड सरकारी पाकीट ठेवले. त्यावर तीन सिले अजूनही जशीच्या तशी होती. ते पाकीट रिकामे होते अन् एका टोकाला फाडून उघडे केले होते. मीत्या डोळे फाडून त्याकडं पाहतच राहिला.

"हे...हे माझ्या वडिलांचं पाकीट असलं पाहिजे. ज्या पाकिटात ते तीन हजार रुबल होते...ते. आणि मला बघू द्या. जर त्यावर 'माझ्या चिमुकल्या प्रियेकरितां असं लिहिलेलं असेल...होय, तीन हजार!" तो ओरडला, "पाहिलंत, तीन हजार आहेत, हे पाहिलंत?"

"अर्थात, आम्ही पाहिलंच आहे. पण आम्हाला त्यात ते पैसे आढळले नाहीत. ते रिकामं होतं, पडद्याच्या मागं, बिछान्यापाशी जमिनीवर पडलेलं होतं."

काही क्षण मीत्या थक्क होऊन गप्प झाला.

"सद्गृहस्थहो, हे स्मिर्द्याखफचं काम!" तो एकदम बेंबीच्या देठापासून ओरडला. "त्यानंच त्यांचा खून केला! त्यानंच त्यांना लुबाडलं! दुसऱ्या कोणालाही त्या म्हाताऱ्यानं हे पाकीट कुठं ठेवलंय ते माहीत नव्हतं. हे स्मिर्द्याखफचंच काम, हे अगदी स्पष्ट आहे आता!"

"पण तुम्हालादेखील या पाकिटासंबंधानं अन् ते उशीच्या खाली होतं हे माहीत होतं."

"मला कधीच माहीत नव्हतं. मी ते कधीच पाहिलेलं नाही. हे मी पहिल्याप्रथमच पाहातो आहे. ते मी स्मिर्द्याखफकडून फक्त ऐकलं होतं... त्या म्हाताऱ्यानं ते कुठं लपवून ठेवलं होतं ते माहीत असणारा फक्त तो एकटाच होता, मला माहीत नव्हतं..." मीत्याला अतिशय दम लागला.

"पण तुम्हीच तर आम्हाला सांगितलंत की, ते पाकीट मयत वडिलांच्या उशीखाली होतं म्हणून. तुम्ही ते उशीखाली होतं असं स्पष्टपणे सांगितलंत, त्याअर्थी ते तुम्हाला माहीत असलं पाहिजे."

"आम्ही ते लिहून घेतलं आहे," पारफेनोविचनं पुष्टी दिली.

"काहीतरीच ! हे काही तरीच बोलणं आहे ! ते उशीखाली आहे याची मला कल्पनाही नव्हती. आणि कदाचित ते उशीखाली नसेलही... हा आपला एक एकदम मनात आलेला तर्क आहे. स्मिर्द्याखफ काय म्हणतो ? ते कुठं होतं हे त्याला तुम्ही विचारलंत ? स्मिर्द्याखफ काय म्हणतो ? हा मुख्य मुद्दा आहे...आणि मी कारण नसताना माझ्याविरुद्ध खोटं सांगितलं....मी विचार न करता तुम्हाला सांगितलं की ते उशीखाली होतं. आणि आता तुम्ही... हंः, मनात नसतानासुद्धा माणूस चुकीचं कसं बोलतो ते तुम्हाला माहीत आहे. स्मिर्द्याखफखेरीज, दुसऱ्या कुणालाही त्याची माहिती नव्हती, फक्त स्मिर्द्याखफच, दुसऱ्या कुणाला नाही.... ते कुठं होतं ते त्यानं मलासुद्धा सांगितलं नाही ? पण हे त्याचंच कृत्य आहे, त्याचंच कृत्य; त्याविषयी शंका नको, त्यानं त्यांचा खून केला, हे आता अगदी सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट आहे," मीत्या अधिकाधिकच चेवून मोठ्याने उद्गारला. तो तेच तेच शब्द असंबद्धपणे उच्चारीत होता, आणि अधिकाधिक संतापून आणि क्षुब्ध होत होता. "तुम्ही हे लक्षात घेतलं पाहिजे अन् त्याला ताबडतोब अटक केली पाहिजे... मी पळून जात असतांना आणि ग्रिगरी बेशुद्धावस्थेत असताना त्यानं त्यांना ठार मारलं असलं पाहिजे, हे आता स्पष्ट आहे... त्यानं तो संकेत दिला अन् वडिलांनी दार उघडलं.... कारण त्याच्या एकट्याखेरीज दुसऱ्या कुणालाही त्या संकेताची माहिती नव्हती. अन् संकेतावाचून वडिलांनी दरवाजा कधी उघडलाच नसता."

"पण," सरकारी वकील आपला निग्रह कायम ठेवून पण विजयाच्या स्वरात म्हणाला, तुम्ही तिथं म्हणजे बागेत असताना दरवाजा जर अगोदरच उघडा राहिलेला होता तर संकेत देण्याची काहीच गरज नव्हती, ही गोष्ट तुम्ही पुनः विसरता आहा."

"दरवाजा, तो दरवाजा !" मीत्या पुटपुटला, आणि तो काही न बोलता सरकारी वकिलाकडे पाहात राहिला. तो असहाय होऊन खुर्चीत गळून पडला. सगळे स्तब्ध झाले.

"होय, तो दरवाजा !.... हे एक भयंकर स्वप्न आहे ! ईश्वर माझ्याविरुद्ध आहे !" तो पूर्णपणे जडमूढ होऊन समोर टक लावून पाहात उद्गारला.

"इकडं पहा," सरकारी वकील शिष्टतापूर्ण रीतीने पुढं म्हणाला, अन् तुमचं तुम्हीच ठरवा, दमीत्रि फ्योदरोविच. एका बाजूला, ज्या दरवाज्यातून तुम्ही आमच्याकडं पळत बाहेर गेलात त्या उघड्या दरवाज्याचा पुरावा आमच्याकडं आहे, अन् ही वस्तुस्थिती अशी आहे की, जिच्यापुढं तुमचं किंवा आमचं काही चालत नाही. तर दुसऱ्या बाजूला, तुमच्या हाती इतक्या एकाएकी जो पैसा दिसला तो तुम्ही कुठून पैदा केलात याविषयी तुमचे न समजण्यासारखे, आग्रही अन्

हट्टीपणा म्हणण्यासारखे मौन; कारण, तुमच्याच सांगण्याप्रमाणं, तीनच तासांपूर्वी, दहा रुबल करिता तुम्ही तुमची पिस्तुलं ओलीस ठेवली होती! या सर्व गोष्टी लक्षात घेऊन तुम्हीच काय तो निर्णय करा. आम्ही कशावर विश्वास ठेवावा अन् कशावर विसंबून राहावं? आणि आम्ही भावनाशून्य, दुष्ट, उपहास करणारे लोक आहोत, तुमच्या हृदयाच्या उदार प्रवृत्तीवर विश्वास ठेवण्याची आमच्यात शक्ती नाही.... वगैरे आरोप आमच्यावर करू नका.... तुम्ही आमच्या जागी आहात असे समजून विचार करण्याचा प्रयत्न करा..."

मीत्या इतका अस्वस्थ झाला की, सांगता येत नाही. तो पांढराफेक पडला.

"ठीक आहे!" तो एकदम उद्गारला, "तुम्हाला मी माझं रहस्य सांगतो. मला पैसा कुठून मिळाला ते मी तुम्हांला सांगतो...माझी लाज मी तुमच्यापुढं उघडी करतो, म्हणजे यापुढं मला स्वतःला किंवा तुम्हाला दोष देण्याचं कारण मला पडणार नाही."

"आणि दमीत्रि फ्योदरविच," निकोलाय पारफेनोविच जवळजवळ गहिवरल्या आनंदाच्या स्वरात म्हणाला, "माझ्यावर विश्वास ठेवा की या क्षणी तुम्ही जी मनापासून अन् पुरती कबुली द्याल तिचा पुढं तुम्हाला अनुकूल असा फार मोठा परिणाम होण्याचा संभव आहे, आणि शिवाय त्यायोगानं..."

पण सरकारी वकिलाने त्याला टेबलाखाली हळूच डिवचले अन् त्याने वेळीच स्वतःला आवरले. मीत्याने मात्र त्याचे बोलणे ऐकलेच नव्हते.

७

मीत्याच्या महान् रहस्याचा उपहास

"सद्गृहस्थ, हो" त्याने अजूनही तशाच क्षुब्ध अवस्थेत सांगायला सुरुवात केली, "मला पुरता कबुली जबाब द्यायचा आहे; तो पैसा **माझा स्वतःचा** होता."

वकिलांचे चेहेरे पाहण्यासारखे झाले. हे तर त्यांची अपेक्षा होती त्याहून अगदीच वेगळे होते.

"ते कसे काय?" निकोलाय, पारफेनोविचने अडखळत विचारले, "कबुली प्रमाणे त्याच दिवशी पाच वाजता जेव्हा..."

"खड्डयात गेले त्या दिवशीचे पाच वाचता अन् माझी कबुली. आता त्याच्याशी काही कर्तव्य नाही! तो पैसा माझा स्वतःचा होता, स्वतःचा, म्हणजे मी चोरलेला...माझाच नव्हे, पण मी चोरलेला होता, आणि ते पंधराशे रुबल होते, आणि ते सतत माझ्या अंगावरच होते, सतत..."

"पण ते तुम्हांला मिळाले कुठं?"

"मी ते माझ्या गळ्यातून काढून घेतले, सद्गृहस्थहो, याच गळ्यातून...

ते इथं होते, माझ्या गळ्याभोवती, एका चिंधीत शिवलेले, अन् ते माझ्या गळ्याभोवती बराच काळपर्यंत होते, तें माझ्या गळ्याभोवती ठेवल्याला मला महिना झाला... मला शरम आणणारी अन् लांच्छनास्पद गोष्ट आहे ती !"

" अन् तुम्ही ते कुणाचे दाबलेत...?"

" म्हणजे तुम्हाला 'चोरलेत' म्हणायचं आहे ? आता स्पष्टच बोला की. होय, मी ते चोरल्यासारखेच होते असं मी समजतो, पण तुम्हाला 'दाबले' म्हणायचं असेल तर मी ते 'दाबले' मी ते चोरले असं मानतो आणि काल रात्री मी ते शेवटी चोरले."

" काल रात्री ? पण तुम्ही तर म्हणालात की एक महिना झाला तुम्ही.... ते मिळविलेत म्हणून ?"

" होय, पण माझ्या वडिलांचे नव्हेत. माझ्या वडिलांचे नव्हेत. असे बेचैन होऊ नका. मी ते माझ्या वडिलांचे चोरले नाहीत, पण तिचे. मध्ये व्यत्यय आणू नका. आता मला तुम्हाला सांगू द्या. ते सांगणं कठीण आहे, बरं का. पण एक महिन्यापूर्वी मला कतिरिना इवानोवनानं बोलावून घेतलं, ती माझी पूर्वीची वाग्दत्त वधू होती, तुम्ही ओळखता तिला ?"

" होय, अवश्य."

" तुम्ही ओळखता हे मला माहीत आहे. ती थोर मनाची आहे, थोराहूनही थोर. पण तिनं माझा कितीतरी दिवसांपासून द्वेष चालविला आहे, हं:, कितीतरी दिवसांपासून...आणि द्वेष करायला तिला कारणही होतं, कारणही होतं !"

" कातिरिना इवानोवना !" निकोलाय पारफेनोविच आश्चर्य व्यक्त करून उद्‌गारला. सरकारी वकीलही पाहत राहिला.

" हां, उगीच तिचं नाव घेऊ नका ! तिला या प्रकरणात आणणारा मी बदमाष आहे. होय, ती माझा द्वेष करते हे मला दिसून आले आहे...पुष्कळ दिवसांपासून....अगदी पहिल्यापासून, म्हणजे माझ्या बिऱ्हाडी आली होती अगदी त्या संध्याकाळपासून...पण ते जाऊ द्या, जाऊ द्या. तुम्ही ते समजून घेण्याच्या लायकीचेही नाही. ते सांगण्याची काही गरज नाही....फक्त एवढंच सांगायला पाहिजे की एक महिन्यापूर्वी तिनं मला बोलावणं पाठविलं, मॉस्कोतल्या आपल्या बहिणीला अन् आणखी एका आप्ताला पाठविण्याकरिता तीन हजार रूबल माझ्याकडं दिले (जणू तिला स्वतःला ते पाठविता येतच नव्हते !), आणि मी...माझ्या आयुष्यातल्या अगदी याच घातक क्षणी मी... हं :, दुसरीवर प्रेम करायला लागलो. ती पायेळी खाली बसली आहे, त्या ग्रूशिंकावर त्यावेळी मी तिला इकडं मोक्रोयला आणली अन् दोन दिवसांत त्या तीन हजारांतला अर्धा हिस्सा इथं उधळला, पण दुसरा अर्धा मी माझ्यापाशीच ठेवला. हं, तो दुसरा अर्धा हिस्सा, ते पंधराशे रूबल एखाद्या ताईतप्रमाणं माझ्या गळ्याभोवती ठेवले होते, पण काल ते मी काढले अन्

खर्च केले. त्याच्यातले जे उरले, आठशे रुबल, ते आता तुमच्या हाती आहेत, निकोलाय पारफेनोविच. माझ्याकडं काल असलेल्या पंधराशेची ती मोड आहे."

" माफ करा. हे कसं काय ? अहो, एका महिन्यापूर्वी तुम्ही इथं आला होता त्यावेळी तीन हजार खर्च केलेत, पंधराशे नव्हे, प्रत्येकाला ते माहीत आहे."

" कुणाला माहीत आहे ? कुणी मोजले ते पैसे ? मी कुणाला मोजायला दिले होते ? "

" का, तुम्हीच तर प्रत्येकाला सांगत होता की मी बरोबर तीन हजार खर्च केले म्हणून. "

" ते खरं, मी सांगत होतो. मी तसं साऱ्या शहराला सांगितलं, अन् सारं शहर तसं म्हणू लागलं. आणि इथं, मोक्रोयमध्येसुद्धा प्रत्येकानं ते तीन हजारच मानले: तरी मी तीन हजार खर्च केले नाहीत, पंधराशेच केले. आणि ते दुसरे पंधराशे मी एका लहानशा पिशवीत शिवून ठेवले. झालं हे असं झालं, सद्गृहस्थहो. मला काल जे पैसे मिळाले ते असे..."

" हा जवळजवळ चमत्कारच आहे " पारफेनोविच पुटपुटला.

सरकारी वकील शेवटी म्हणाला, " मला एक विचारायचं आहे, या परिस्थितीसंबंधी तुम्ही पूर्वी कोणाजवळ काही सांगितलं होतं ? म्हणजे माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की एक महिन्यापूर्वी तुमच्याजवळ पंधराशे रुपये होते हे तुम्ही कुणाला सांगितलं होतं का ? "

" कुणालाही नाही."

" हे विलक्षण आहे. अगदी कुणालाच नाही असं तुम्हाला म्हणायचं आहे ?"

" बिलकुल कुणालाही नाही. कुण्णाकुण्णाला नाही."

" असं मौन पाळण्यात तुमचा हेतू काय होता ? त्याबाबतीत एवढी गुप्तता ठेवण्यात तुमचा हेतू काय होता ? आणखी स्पष्टपणे बोलायचं तर तुम्ही शेवटी हे तुमचं तुमच्याच म्हणण्याप्रमाणं ' इतकं अगदी कलंकरूप ' असलेलं रहस्य आम्हाला सांगितलंत, पण वास्तविक म्हणजे अर्थात् तुलनात्मक बोलायचं तर—हे कृत्य, म्हणजे हे दुसऱ्या कुणाच्यातरी मालकीचे असलेले तीन हजार रुबल्स दाबणं, अर्थात काही काळापुरते, हे माझ्या मतानं तरी केवळ अतिशय अविचाराचं कृत्य आहे आणि तुमचा स्वभाव लक्षात घेतला तर मोठा कलंक लावणारं वगैरे काही नाही...हे कृत्य अत्यंत दूषणीय आहे हे जरी कबूल केलं तरीसुद्धा ' दूषणीय ' म्हणजे ' कलंक रूप ' नव्हे...या गेल्या महिन्याच्या काळात, अनेक लोकांनी कातीरिना इवानोवनाचे हे जे तीन हजार रुबल्स तुम्ही खर्च केलेत त्याबद्दल यापूर्वीच तर्क केलेला आहे, आणि तुम्ही कबूल केलंत ते सोडून द्या पण ही कथा मीही ऐकली आहे....उदाहरणार्थ, मिखाईल मकारोविच यांनीही ती ऐकली आहे, म्हणजे खरोखर आता ती कथा न राहता साऱ्या शहराच्या तोंडी असलेला विषय झाला

आहे. माझी जर गैर समजूत असेल तर, तुम्ही हे, म्हणजे हा पैसा कातिरिना इवानोवनाचा होता हे, कुणापाशी तरी क़बूलही केलंत अशी कुणकुण आहे, आणि म्हणून आतापर्यंत चालू क्षणापर्यंत, तुम्ही आपल्याजवळ ठेवले म्हणता त्या पंधराशेचं इतकं अगदी विलक्षण रहस्य तुम्ही करून ठेवता आणि त्या रहस्याशी सरळ भयानकतेची भावना एकप्रकारे जोडून ठेवता, याचं मला अतिशयच आश्चर्य वाटतं...असलं रहस्य कबूल करण्यात तुम्हाला इतकी व्यथा होऊ शकेल यावर सहजासहजी विश्वास ठेववत नाही...तुम्ही आत्ताच म्हणालात की हे कबूल करण्याऐवजी सैबेरिया बरा...."

सरकारी वकील बोलायचा थांबला. तो डिवचला गेला होता. आपला त्रस्तपणा, जो जवळजवळ संतापाच्याच स्वरूपाचा होता तो, त्यानं छपविला नाही, आणि आतापर्यंत साठून राहिलेल्या पित्ताला भडकायला त्याने वाव दिला, त्यात त्याने शब्दांची निवडही केली नाही, असंगत आणि असंबद्ध असे तो बोलला.

"हे पंधराशे रुबल कलंक नाही, तर त्या तीन हजारांतून उरलेले मी बाजूला काढून ठेवले हा कलंक आहे," मीत्या दृढपणे म्हणाला.

"तो कसा ! सरकारी वकील चिडके हास्य करून म्हणाला. "तुम्ही जे तीन हजार रुबल 'दोषास्पद' रीतीनं, तुम्हांला वाटलं तर 'लांच्छनास्पद' रीतीनं म्हणू, दाबलेत त्यातला अर्धा हिस्सा तुम्ही बाजूला काढून ठेवलात यात तुमच्या दृष्टीनं, कलंककारक काय आहे? तुम्ही ते तीन हजार घेतलेत हे तुम्ही त्याचं काय केलंत यापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. अन् जाताजाता विचारतो, तुम्ही ते का केलंत– तुम्ही तो अर्धा हिस्सा बाजूला का काढून ठेवलात, कोणत्या उद्देशानं तुम्ही ते केलंत? त्याचा खुलासा तुम्ही आम्हांला करू शकाल?"

"हां, सद्‌गृहस्थहो, 'उद्देश' हाच तर सारा मुद्दा आहे!" मीत्या म्हणाला. "मी ते बाजूला ठेवले कारण मी नीच होतो, म्हणजे, हिशोबी होतो, आणि अशा बाबतीत हिशोबी असणं म्हणजे नीचपणाच.... अन् तो नीचपणा सबंध महिनाभर चालू होता."

"हे काही लक्षात येत नाही."

"मला तुमचं आश्चर्य वाटतं. पण ते मी अधिक स्पष्ट करतो. कदाचित ते खरोखरच कळण्यासारखं नसेल. असं पाहा, मी काय म्हणतो तिकडं लक्ष द्या. माझ्या विश्वासावर सोपवून दिलेले तीन हजार रुबल मी हडप करतो, ते मी मौजमजेत उडवतो, मी ते सर्व करतो, अन् दुसऱ्या दिवशी सकाळी तिच्याकडं जाऊन म्हणतो, 'कात्या, मी चूक केली आहे. मी तुझे तीन हजार उधळून टाकले आहेत.' अं, हे बरोबर आहे? नाही, ते बरोबर नाही—ती बेइमानी अन् भ्याडपणा होईल, मी पशू झालो, एखाद्या पशूपेक्षा जास्त संयम माझ्यात नाही असं होईल, नाही का? पण तरी मी चोर होत नाही! सरळ सरळ चोर होत नाही, हे तुम्ही

कबूल कराल ! मी ते उधळले, पण मी ते चोरले नाहीत. आता दुसरा, जरा अधिक अनुकूल असा पर्याय– मी काय म्हणतो ते काळजीपूर्वक लक्षात घ्या हं, नाही तर पुन्हा माझ्या डोक्यात गोंधळ उडेल – माझं डोकं गरगरतं आहे– आता दुसरा पर्याय– मी इथं त्या तीन हजारांपैकी फक्त पंधराशे खर्च करतो, म्हणजे अर्धी रक्कम. दुसऱ्या दिवशी मी ती अर्धी रक्कम तिच्याकडं घेऊन जातो अन् म्हणतो: ‘ कात्या, हे पंधराशे माझ्याकडून घे, मी एक नीच पशू आहे, आणि विश्वास ठेवण्याला नालायक बदमाष आहे, कारण मी अर्धे पैसे फुकट खर्च केले आहेत, आणि हे सुद्धा मी फुकट घालवीन, म्हणून मला मोहातून वाचव ! ” पहा, हा पर्याय कसा वाटतो ? मी पशू असेन, बदमाष असेन, किंवा तुम्ही म्हणाल तो असेन, पण चोर नाही, पुरता चोर नाही, नाहीतर उरलेले होते ते मी परत नेले नसते, तेही ठेवून घेतले असते. तिला एकदम दिसून येईल की ज्याअर्थी अर्धे पैसे मी परत आणले, त्याअर्थी मी खर्च केलेले परत दिले पाहिजेत, मी ते परत देण्याचा प्रयत्न कधीही सोडता कामा नये, मी ते मिळविण्याकरिता अन् परत करण्याकरिता कष्ट केले पाहिजेत. तेव्हा त्या परिस्थितीत मी बदमाष होईन, पण चोर होणार नाही, तुम्हाला काय वाटेल ते तुम्ही म्हणाल, पण चोर नाही म्हणणार ! ”

“ दोहोत थोडाबहुत भेद आहे हे मी मान्य करतो,” सरकारी वकील उसने स्मित करीत म्हणाला, “ पण तुम्हाला एवढा जमीनअस्मानाचा फरक दिसतो हे आश्चर्यकारक आहे.”

“ होय, मला जमीन-अस्मानाचा फरक दिसतो ! प्रत्येक माणूस बदमाष असू शकेल, कदाचित प्रत्येक माणूस बदमाष असतोच, पण प्रत्येक माणूस चोर असू शकत नाही, तो होण्याला अट्टल बदमाषच पाहिजे. हं, अर्थात् हे सूक्ष्म भेद कसे करायचे ते माहीत नाही...पण चोर हा बदमाषापेक्षा जास्त नीच असं माझं निश्चित मत आहे. ऐका, मी तो पैसा संबंध महिना वागवतो, कदाचित तो उद्या परत करायचा असा माझ्या मनाचा निश्चय होऊ शकेल, आणि मी मग बदमाष राहणार नाही, पण माझ्या मनाचा निश्चय होऊ शकत नाही, समजलं, जरी रोज मी निर्धार करतो आणि रोज स्वतःला ते करण्याला प्रवृत्त करतो तरी संबंध महिनाभर काही ते माझ्या हातून घडत नाही, लक्षात आलं. तुमच्या विचारसरणीला हे योग्य वाटतं का, हे योग्य आहे ? ”

“ निश्चितच हे योग्य नाही, ते मला चांगले समजू शकतं, अन् ते मी नाकारीत नाही, ” सरकारी वकील हातचे राखून म्हणाला. “ आपण आता या सूक्ष्म विचारांची अन् भेदांची सर्व चर्चा सोडून देऊ, अन् कृपा करून मूळ मुद्द्या-कडं वळू या. तो मुद्दा असा की, आम्ही विचारलं असतानासुद्धा तुम्ही अजून आम्हांला हे सांगितलं नाहीत की, तुम्ही ती रक्कम अर्धी अर्धी का केलीत, अर्धी उधळून टाकलीत अन् अर्धी लपवून ठेवलीत ते का ? कोणत्या विशिष्ट उद्देशानं तुम्ही

ती लपवून ठेवलीत, त्या पंधराशेचा काय उपयोग करायचं तुमच्या मनात होतं ? या प्रश्नाबद्दल माझा आग्रह आहे, दमीत्रि फ्योदरोविच."

"होय, असणारच !" मीत्या आपल्या कपाळावर हात मारून म्हणाला, "माफ करा, मी तुम्हाला त्रास देत आहे, अन् मुख्य मुद्द्याचा खुलासा करीत नाही, नाहीतर तुम्हाला एका मिनिटात समजून येईल, कारण हे करण्यामागचा जो उद्देश आहे तोच कलंकरूप आहे ! या साऱ्याचा संबंध त्या म्हाताऱ्याशी, माझ्या मृत वडिलांशी आहे. ते अग्राफेना अलेक्झांद्रोवनाला सारखे त्रास द्यायचे, आणि मी मत्सरग्रस्त झालो; त्यावेळी माझ्या मनाला वाटले की आम्हा दोघांच्या बाबतीत तिची चलबिचल चालली असावी. म्हणून मी रोज असा विचार करीत राहिलो की, समजा, तिनं एकदम आपल्या मनाचा निर्धार करायचा म्हटलं, समजा, मला छळण्याचं सोडून द्यायचं तिच्या मनात आलं अन् अचानक जर ती मला म्हणाली, 'माझं तुझ्यावर प्रेम आहे, त्याच्यावर नाही; मला जगाच्या कोपऱ्यात कुठंही घेऊन चल.' तर माझ्याजवळ काय होतं, फक्त चाळीस कोपेक होते; तिला मी कसा घेऊन जाणार, काय करू शकणार ? छेः, माझा सत्यानाश होईल. मी त्यावेळी तिला ओळखलं नव्हतं, मी तिचं मन जाणलं नव्हतं, मला वाटलं तिला पैसा पाहिजे, अन् माझं दारिद्र्य ती खपवून घेणार नाही. म्हणून मी आसुरी वृत्तीनं त्या तीन हजारांतली अर्धी रक्कम मोजून घेतली, ती शिवून टाकली, त्यावर विसंबून राहून मी ती दारू पिऊन बेहोष होण्यापूर्वीच शिवून टाकली, अन् ती शिवल्यानंतर मी बाकीची रक्कम घेऊन पिऊन धुंद व्हायला गेलो, होय, तो हलकटपणा होता. आता समजलं तुम्हाला ?"

दोघेही वकील खो खो करून हसले.

"तुम्ही ते सर्व पैसे जर उधळून टाकले नसते तर मी ते शहाणपणानं नू नैतिक म्हटलं असतं," हसून पारफेनोविच म्हणाला, "कारण नाहीतरी शेवटी परिणाम काय ?"

"का, मी ते चोरले, असं नाही का झालं ? अं देवा देवा, तुम्हाला समजत नाही हे मला भयंकरच वाटतं ! ते शिवून टाकलेले पंधराशे रुबल माझ्या गळ्याभोवती होते त्या प्रत्येक दिवशी, प्रत्येक दिवशी अन् प्रत्येक घटकेला मी स्वतःला म्हणे, 'तू चोर आहेस ! तू चोर आहेस !' अहो, त्यामुळंच तर सबंध महिना मी इतक्या जंगलीपणानं वागलो, त्यामुळंच मी त्या खाणावळीत झगडा केला, त्यामुळंच मी वडिलांच्यावर हल्ला केला, हे सर्व मी चोर आहे असं मला वाटत होतं म्हणून झालं. त्या पंधराशे रुबलबद्दल माझा भाऊ आल्योशा याला सांगण्यालासुद्धा माझं मन घेईना, मला धारिष्ट होईना. मला वाटे मी असा हा बदमाष आहे, असा हा खिसेकापू आहे. पण नाहीत आहे, ते पैसे वागवीत असताना त्याच वेळी घटकोघटकी मी स्वतःशी म्हणे : नाही, दमीत्रि फ्योदोरविच, अजूनही तू चोर ठरणार नाहीस ! कसा ? कारण

दुसऱ्या दिवशी मी कात्याकडं जाऊन तिला ते पंधराशे परत करू शकलो असतो. आणि कालच मी तो ताईत फेनियाकडून पेऱ्होतिनकडं जाण्याच्या वाटेवर गळ्यातून फाडून काढण्याचा निर्धार केला. त्या क्षणापर्यंत ते करण्याला माझ्या मनाची तयारी मी करू शकलो नव्हतो. आणि जेव्हा मी तो फाडून काढला तेव्हाच मी खराखुरा चोर बनलो, माझ्या साऱ्या आयुष्यभर मी चोर अन् बेइमानी माणूस झालो. कसा? कारण त्यानं मी कात्याकडं जाऊन तिला 'मी बदमाष आहे पण चोर नाही!' असं म्हणण्याचं माझं स्वप्न नष्ट केलं! आता तुम्ही समजलात? तुमच्या लक्षात आलं?"

"कालच् तसं ठरवायचं काय कारण झालं?" पारफेनोविचने मध्येच विचारले.

"काय म्हणजे काय? विचित्रच आहे हे विचारणं. कारण आज सकाळी इथं, पहाटे पाच वाजता स्वतःला ठार करायचं मी ठरवलं होतं म्हणून. मी चोर म्हणून मेलो काय किंवा सन्मान्य मनुष्य म्हणून मेलो काय त्यात काही फरक पडत नाही असं मला वाटतं. पण तसं नाही असं मला आता दिसतं, त्यात फरक अवश्य पडतो असं कळून येतंय्. मी खरं सांगतो सद्गृहस्थहो, गेल्या रात्री मला जर कशाच्या जास्तीत जास्त यातना झाल्या असतील तर त्या, त्या म्हाताऱ्या नोकराला मी मारलं, आणि आता माझ्या प्रेमाला फळ येण्याच्या अन् स्वर्गाची दारं मला पुन्हा खुली होण्याच्या क्षणीच मला सैबेरियाला जावं लागण्याचा धोका आहे या विचारानं नव्हे; हो, त्यानं मला यातना झाल्या खऱ्या पण तितक्या नाहीत जितक्या मी तो नष्ट पैसा शेवटी माझ्या छाताडावरून फाडून घेतला अन् तो खर्च केला आणि सरळ सरळ चोर झालो या आतल्या नतद्रष्ट विवेकबुद्धीनं झाल्या. हाय, हाय, सभ्यगृहस्थहो, मी पुन्हा तुम्हाला रक्तबंबाळ हृदयानं सांगतो, मी या रात्री फारच शिकलो. मी हे शिकलो की, बदमाष म्हणून जगणं शक्य नाही. एवढंच नव्हे तर बदमाष म्हणून मरणंही शक्य नाही... होय सद्गृहस्थहो, माणसानं प्रामाणिक राहूनच मरावं..."

मीत्या पांढराफटक पडला. तो इतका क्षुब्ध झाला असूनसुद्धा त्याचा चेहरा ओढल्यागत अन् गळून गेल्यासारखा झाला.

"तुम्ही काय म्हणता ते मला कळायला लागलं, दमीत्रि फ्योदरोविच," सरकारी वकील मृदू अन् कळवळ्याच्या स्वरात धीमे धीमे बोलला, "मी बोलतो याबद्दल मला माफ करा, पण हा माझ्या मतानं मज्जातंतूंचा खेळ आहे....तुमच्या मज्जातंतूंवर गैरवाजवी ताण पडला, हे त्याचं कारण आहे. उदाहरण म्हणून म्हणतो, जवळ जवळ एक महिनाभर तुम्ही जी ही यातना भोगली ती, ज्या बाईनं तुमच्याकडं ती रक्कम दिली होती तिच्याकडं जाऊन अन् ते पंधराशे तिला परत करून तुम्हाला वाचविता नसती आली? आणि तिला तुम्हाला सारं काही समजावून

मागता नसतं आलं, आणि तुमची जी स्थिती तुम्ही फार भयंकर झाली म्हणून सांगता ती लक्षात घेता, कुणाच्याही मनात साहजिकपणे जो उपाय आला असता तो अमलात आणणं तुम्हाला शक्य नसतं झालं ? म्हणजे, आपल्या चुका तिच्यापुढं कबूल करून तुम्हाला तुमच्या खर्चाकरिता आवश्यक असणारी रक्कम उसनी म्हणून तिच्याकडून मागता नसती आली ? ती तिनं उदार हृदयानं तुमच्या आपत्तीच्या वेळी खात्रीनं नाकारली नसती, विशेषतः जर त्याकरिता काही हमी दिली गेली असती, किंवा तुम्ही त्या व्यापारी सॅमसोनवला, मादाम होहलाहोवाला जे तारण तुम्ही देऊ केलं होतं ते देऊनसुद्धा ती रक्कम तुम्हाला घेता आली असती. मला वाटतं तेच तारण मोलाचं आहे असं अजूनही तुम्ही मानतां, होय ना ? ”

मीत्या एकदम लाल झाला.

“ खरोखर तुम्ही मला इतका पक्का बदमाष समजता की काय ? तुम्ही मनापासून बोलत नसला पाहिजे ! ” तो सरळ सरकारी वकिलाच्या चेहेऱ्याकडे पाहात आणि आपल्या कानांवर विश्वास नसल्याप्रमाणे, रागाने बोलला.

“ मी अगदी मनापासून बोलत आहे याची मी तुम्हाला खात्री देतो…मी गंभीर नाही असं तुम्हाला का वाटतं ? ”

आश्चर्य करण्याची आता सरकारी वकिलाची पाळी होती.

“अहो, किती अधमपणाचं झालं असतं ते सभ्य गृहस्थहो, तुम्ही मला यातना देत आहात समजलात ! मी तुम्हाला प्रत्येक गोष्ट सांगून टाकतो, होऊन जाऊ द्या. माझ्या साऱ्या सैतानी दुष्टतेची मी कबुली देतो पण त्यानं तुम्हाला लाज वाटेल, आणि मनुष्यामधली विकारांची ही सरमिसळ अप्रतिष्ठेच्या किती खालच्या पातळीला जाऊन पोचते याचं तुमचं तुम्हीच आश्चर्य कराल. तसा बेत मी स्वतःच अगोदर केलेला होता जो बेत तुम्ही आत्ताच बोललात, वकीलसाहेब ! होय, गृहस्थहो, मी सुद्धा या सबंध महिनाभर माझ्या मनात हाच विचार करीत होतो, आणि मी कात्याकडं जायचं ठरविण्याच्या बेतात होतो— इतका मी नीच झालो, पण तिच्याकडं जायचं, तिला माझ्या बेइमानीबद्दल सांगायचं, आणि त्या बेइमानीकरिता, ती अमलात आणण्याकरिता त्या बेइमानीच्या खर्चाकरिता, कात्याकडून पैशाची भिक्षा मागायची (भिक्षा, ऐकलंत, भिक्षा) आणि तिच्याकडून निघून थेट त्या दुसरीला, तिच्या दावेदारिणीला, जिनं तिचा द्वेष केला अन् तिचा अपमान केला तिला घेऊन पळून जायचं— विचार तरी करा ! वकीलसाहेब, आपण पागल असला पाहिजे ! ”

“ पागल तर मी नाही, पण मी विचार न करता, घाईनं बोललो हे खरं, स्त्रियांच्या मत्सराचा— म्हणजे जर या प्रकरणात तुम्ही खात्रीपूर्वक सांगता तसा मत्सराचा भाग असेल तर त्याचा— मी विचार केला नाही, तसं काही असण्याचा संभव आहे खरा.” सरकारी वकील हसून म्हणाला.

“ पण ते किती बदनामीकारक झालं असतं ! ” मीत्याने जोराने आपली

मूठ आपटली. "ती सर्वांत गलिच्छ गोष्ट झाली असती! होय, तिनं मला तो पैसा कदाचित् दिला असता, हो, तिनं तो दिलाही असता; तिनं तो खात्रीपूर्वक दिला असता, पण माझा सूड घेण्यासाठी; आपली सूडाची तृप्ती करून घेण्यासाठी, माझ्याविषयीचा आपला तिटकारा दर्शविण्यासाठी तिनं तो दिला असता, कारण तिचाही स्वभाव अत्यंत दुष्ट आहे, ती भयंकर तापट स्त्री आहे. मी तो पैसा घेतलाही असता, अं:, मी तो घेतला असता; मी तो घेतला असता, आणि मग साऱ्या आयुष्य-भर...बाप रे! माफ करा, सद्‌गृहस्थहो, मी हा असा ओरडा करतो आहे, कारण हा विचार माझ्या मनात इतक्या अलीकडं, नुकताच परवाच्या दिवशी, म्हणजे त्यावेळीशी माझी झकझक सुरू होती त्या रात्री, अन् नंतर काल, काल सबंध दिवसभर होता, तो. मला आठवतं, ती घटना घडेपर्यंत...."

"काय घडेपर्यंत?" पारफेनोविचने जिज्ञासेने मध्येच विचारले, पण मीत्याने ते ऐकले नाही.

"मी तुमच्यापुढं ही भयंकर कबुली दिली आहे," मीत्या शेवटी विषण्ण होऊन म्हणाला. "तुम्ही त्याची कदर करावी, आणि विशेष हे की, तुम्ही त्याचा आदर करावा, कारण जर तो तुम्ही केला नाहीत, जर तुमच्या अंतःकरणाला त्याचा स्पर्शही झाला नाही, तर, सद्‌गृहस्थहो, तुम्हाला माझ्याविषयी आदर नाही इतकाच त्याचा अर्थ. मी ते तुम्हाला सांगितलं, अन् ते तुमच्यासारख्या माणसांपुढं मी उघड केलं या लाजेनं मला मरावंसं वाटेल! हो, मी स्वतःला गोळी घालून घेईन! होय, मला दिसतंय, तुमचा माझ्यावर विश्वास नाही, हे मी बघतोच आहे. काय! हेही तुम्ही लिहून घेणार?" तो आश्चर्याने ओरडला.

"होय, जे तुम्ही आत्ताच बोललात ते," निकोलाय पारफेनोविच त्याच्या-कडे चकित होऊन पाहात म्हणाला, "म्हणजे त्या शेवटच्या घटकेपर्यंत, तुम्ही अजूनही कतिरीना इवानोवनाकडं ती रक्कम मागण्याकरिता जाण्याचा विचार करीत होता तेथपर्यंत...मी खात्रीनं सांगतो, दमीत्रि फ्योदरोविच, हा आमच्या दृष्टीनं फारच महत्त्वाचा पुरावा आहे, म्हणजे सगळ्या खटल्याच्या दृष्टीनं...आणि विशेषतः तुमच्या दृष्टीनं, तुमच्या दृष्टीनं त्याचं विशेष महत्व आहे."

"दया करा, सद्‌गृहस्थहो!" मीत्या आपले हात वर उडवीत म्हणाला. "काही झालं तरी ते लिहू नका; काही शरम बाळगा. इकडं मी माझं हृदय तुमच्यापुढं फाडून उघडं करून दाखवलं, आणि तुम्ही ती संधी साधून माझ्या जखमा दोन्ही अर्ध्या भागांत बोटे खुपसून तपासता आहा...हाय रे देवा!"

निराशेने त्याने आपले तोंड हातांनी झाकून घेतले.

"इतका त्रास करून घेऊ नका, दमीत्रि फ्योदरोविच," सरकारी वकील म्हणाला, "जे जे काही इथं लिहिलं जाईल ते ते सर्व तुम्हाला नंतर वाचून दाखवलं जाईल, आणि ज्याला तुमची संमती नसेल ते आम्ही तुमच्या मर्जीप्रमाणं बदलू पण

मी तुम्हाला एक ल्हानसा प्रश्न दुसऱ्यांदा विचारतो. तुम्ही शिवून ठेवलेल्या पैशा-संबंधानं कुणालासुद्धा अगदी कुणालासुद्धा, तुमच्याकडून कळलेलं नाही ? यावर विश्वास ठेवणं, मी तुम्हाला सांगतो. जवळ जवळ अशक्य आहे."

"कुणालाही नाही, कुणालाही नाही, हे मी तुम्हाला पूर्वीच सांगितलंय नाहीतर मग तुम्हाला काहीच समजलं नाही म्हटलं पाहिजे ! मला एकटं राहू द्या !"

"ठीक आहे, या बाबीचा केव्हातरी खुलासा होईलच, अजून त्याला पुष्कळ वेळ आहे, पण दरम्यान विचार करा, तुम्ही इथं तीन हजार रुबल खर्च केले हे तुम्ही स्वतःच बाहेर पसरविलंत, नव्हे जवळ जवळ सगळींकडं ओरडून सांगितलंत असं सांगणारे डझन एक साक्षीदार तरी आमच्याकडे असतील; तीन हजार बरं, पंधराशे नव्हे; आणि आतासुद्धा काल तुमच्याकडे असलेले पैसे जेव्हा तुम्ही हाती धरलेत, तेव्हासुद्धा तुम्ही पुष्कळांचा असा समज करून दिलात की तुम्ही आपल्याबरोबर तीन हजार आणले होते."

"तुमच्याकडे डझन नव्हे, शेकडो साक्षीदार असतील, दोनशे असतील, दोनशेंनी ते ऐकलंय, हजारोंनी ऐकलंय !" मीत्या म्हणाला.

"हं, ते सगळे याला साक्षी आहेत. आणि 'सगळे' या शब्दाला काही अर्थ आहेच."

"त्याला काही अर्थ नाही. मी काय वाटेल ते बरळलो, अन् प्रत्येकजण तेच पुन्हा पुन्हा बोलायला लागला."

"पण तुम्ही ते काय वाटेल ते" म्हणता ते बोलायची काय गरज होती ?"

"सैतान जाणे. फुशारकीनं असेल कदाचित्...की इतका पैसा मी उडविला कदाचित् तो मी शिवून ठेवलेला पैसा विसरून जाण्याचा प्रयत्न करण्यासाठी असेल. होय, म्हणूनच....जाऊ दे मसणात... किती वेळा तुम्ही तो प्रश्न मला विचारणार ? हो, मी थाप मारली, अन् ती बाब तिथंच संपली, एकदा मी ते बोलल़ो होतो, ते दुरुस्त करण्याची मी फिकीर केली नाही. मनुष्य काही वेळा खोटं का बरं बोलतो ?"

"माणूस कशामुळं खोटं बोलायला प्रवृत्त होतो हे ठरविणं फार कठीण आहे दमीत्रि फ्योदरविच." सरकारी वकील ठाशीवपणे बोलला. "तरी मला हे सांगा, ज्याला तुम्ही 'ताइत' म्हणता तो तुमच्या गळ्यात मोठा दिसत होता."

"नाही, मोठा नव्हता."

"किती मोठा, उदाहरणार्थ ?"

"तुम्ही शंभर रुबलच्या नोटेची जर निम्मी घडी केलीत तर जेवढा आकार होईल, तेवढाच."

"तुम्ही जे फाडलं म्हणता त्याचे उरलेले तुकडे-बिंकडे आम्हाला दाखविलेत तर बरं होईल. तुमच्याकडं कुठं तरी ते असतील."

" मसणात ! काय बोलताय ? मला माहीत नाही कुठं आहेत. "

" पण माफ करा हं; तुम्ही तो ताईत आपल्या गळ्यातून कुठ अन् केव्हा काढलात ? तुमच्याच साक्षीवरून तुम्ही घरी काही गेला नव्हता."

" मी फेनियाकडून पेऱ्होतिनकडं चाललो असताना वाटेत तो मी माझ्या गळ्यातून फाडून काढला अन् ते पैसे बाहेर काढले."

" अंधारात ? "

" मला उजेडाची गरज काय ? एका मिनिटात मी ते माझ्या बोटांनी उरकलं."

" कात्रीशिवाय, रस्त्यात ? "

" बाजारपेठेत असावे बहुधा. कात्री कशाला ? ती एक जुनी चिंधी होती. ती एका मिनिटात फाटली."

" ती नंतर तुम्ही कुठं ठेवलीत ? "

" ती मी तिथंच टाकली."

" नक्की कुठं ? "

" बाजारपेठेत, बाजारपेठेत ? सैतानाला माहीत कुठं ते. हे तुम्हाला समजून करायचंय काय ? "

" ते फारच महत्त्वाचं आहे, दमीत्रि फ्योदरोविच. तो तुमच्या बाजूनं महत्त्वाचा पुरावा होईल. तुम्हाला हे कसं समजत नाही ? महिन्यापूर्वी ते शिवायला तुम्हाला कुणी मदत केली ? "

" कुणीच मदत केली नाही. माझं मीच शिवलं."

" तुम्हाला शिवता येतं ? "

" शिवावं कसं ते सैनिकाला माहीत असावंच लागतं. ते करायला काही ज्ञान लागत नाही."

" तुम्हाला ही वस्तू, म्हणजे जिच्यात तुम्ही ते पैसे शिवलेत ती चिंधी, कुठं मिळाली ?

" तुम्ही काय माझी मस्करी करताहा ? "

" मुळीच नाही. अन् आम्ही मस्करी करण्याच्या मनःस्थितीत नाही, दमीत्रि फ्योदरोविच."

" ती चिंधी मी कुठून मिळविली ते मला माहीत नाही. कुठून तरी मिळविली, मला वाटतं."

" ते तुम्ही विसरू शकला नसाल असं मला वाटत होतं."

" शपथपूर्वक सांगतो, मला आठवत नाही. मी माझ्या कपड्याचा तुकडा फाडून घेतला असेल कदाचित."

" लक्षात घेण्याजोगी बाब आहे ही. आम्हाला उद्या तुमच्या बिऱ्हाडी तो

सदरा किंवा ज्याच्यातून तुम्ही तो तुकडा फाडून घेतलात ते साक्षात मिळेल कदाचित. कसल्या प्रकारची चिंधी होती ती. सुती की तागी ?"

"कुणाला माहीत कसली होती ते. थांबा हं... मला वाटतं मी ती फाडून नाही घेतली कशातून. तो एक मलमलीचा तुकडा होता... मला वाटतं माझ्या घरधनिणीच्या टोपीत मी ते पैसे शिवले."

"तुमच्या घरधनिणीच्या टोपीत ?"

"होय, मी ती तिच्याकडून घेतली."

"ती तुम्हाला कशी मिळाली ?"

"एकदा चिंधी म्हणून मी टोपी घेतल्याचं मला आठवतं. माझं पेन पुसण्यासाठी म्हणून मी ती न विचारताच घेतली. कारण ते पटकूरच होतं. मी ती फाडली, नोटा काढल्या आणि त्या त्यात शिवल्या. मला वाटतं त्याच चिंधीत मी त्या शिवल्या. जुना मलमलीचा तुकडा होता तो. हजार वेळा धुतलेला."

"अन् तुम्हाला ते यावेळी निश्चितपणे आठवतं ?"

"निश्चितपणे की काय ते मला माहीत नाही. मला वाटतं मी त्या टोपीतच त्या नोटा शिवल्या. त्याचं काय एवढं मोठं ?"

"तसं असेल तर तुमच्या घरधनिणीला ती वस्तू हरवल्याचं आठवत असेल ?"

"नाही. तिला आठवणार नाही. तिला ती नसल्याचं जाणवलंच नाही. मी सांगतो तुम्हाला, ती एक जुनी तर चिंधी ! फार्दिंग किंमतीचीसुद्धा ती नसेल."

"अन् तुम्हाला सुई अन् दोरा कुठं मिळाला ?"

"आता मी थांबतो. मी आता पुढं बोलणार नाही. बस्स झालं हो !" मीत्या शेवटी रागावून म्हणाला.

"ते तुकडे तुम्ही बाजारपेठेत कुठं टाकलेत हे तुम्ही संपूर्णपणे विसरून गेलात हे विचित्र आहे."

"ती बाजारपेठ उद्या झाडून काढायचा हुकूम द्या म्हणजे कदाचित ती तुम्हाला सापडेल." मीत्या उपहासाने म्हणाला. "पुरे सद्गृहस्थहो पुरे !" त्याने थकल्या स्वरात ठरवून टाकले. "तुमचा माझ्यावर विश्वास नाही हे मला दिसतंय ! एका शब्दावरही विश्वास नाही ! तो माझा दोष. तुमचा नाही. मी इतकं तत्पर व्हायला नको होतं का, का मी तुमच्यापुढं माझं रहस्य कबूल करून स्वतःची नाचक्की करून घेतली ! तुम्हाला ती थट्टा वाटते. ते तुमच्या डोळ्यांवरूनच मला दिसलं. तुम्हीच मला हे करायला लावलंत, वकीलसाहेब ! हवं तर एक विजयगीत गा... थूः तुमची [illegible]कांनो !"

त्याने आपले डोके खाली केले अन् आपले तोंड हातात लपविले. वकील [illegible] स्तब्ध बसले. एका मिनिटाने त्याने आपले डोके वर उचलले अन् त्यांच्याकडे

जवळ-जवळ शून्य दृष्टीने पाहिले. त्याच्या चेहेऱ्यावर यावेळी मूर्तिमंत निराशा दिसत होती, तो मुकाट्याने निष्क्रिय बसून राहिला, काय चालले आहे याची त्याला जणू शुद्धच नव्हती. दरम्यान, त्यांनी जे काम हाती घेतले होते ते त्यांना संपवून टाकायचे होते. त्यांना ताबडतोब साक्षीदारांची तपासणी सुरू करायची होती. यावेळी सकाळचे आठ वाजले होते. दिवे बऱ्याच वेळापूर्वी विझविण्यात आले होते. मिखाईल मकारोविच आणि काल्गानफ, चौकशी चालली असताना खोलीतून एकसारखे आतबाहेर करीत होते, ते पुन्हा बाहेर गेले होते. वकीलसुद्धा फार थकल्यासारखे दिसत होते. ती अगदी उदासवाणी सकाळ होती, आकाश भरून आलेलं होतं, आणि पाऊस एकसारखा धो धो कोसळत होता. मीत्यानं उदासपणे खिडकीबाहेर पाहिले.

"मी खिडकीबाहेर पाहू का?" त्याने एकदम निकोलाय पारफेनोविचला विचारले.

"हो, वाटेल तितके," त्याने उत्तर दिले.

मीत्या उठला अन् खिडकीकडं गेला. पाऊस खिडकीच्या लहानशा हिरवट तावदानांवर येऊन आपटत होता. खिडकीच्या खालीच त्याला राड झालेला रस्ता दिसत होता, आणि तिथून पुढे, पावसाच्या धुक्यात दरिद्री, काळ्या, उदासवाण्या झोपड्या पावसात अधिकच काळ्या अन् दरिद्री दिसत होत्या. मीत्याला 'सुवर्ण केशी सवितादेवा'ची आठवण झाली, अन् त्याच्या पहिल्या किरणासरशी आपण स्वतःला गोळी घालून घ्यायचा मनसुबा कसा केला होता ते आठवले. "कदाचित् ते कृत्य अशा प्रकारच्या सकाळीच अधिक चांगलं," त्याने हसून विचार केला, आणि एकाएकी आपला हात एकदम खाली झटकून तो आपल्या 'छळवाद्यां'च्या कडं वळला.

"सद्गृहस्थहो," तो म्हणाला, "मी तर बरबाद झालेला दिसतोच आहे! पण ती? तिच्याबद्दल मला सांगा, मी विनवणी करतो तुमची. माझ्याबरोबर तिनं बरबाद होण्याची निश्चितच गरज नाही, नाही का? तुम्हांला माहीत आहे की ती निरपराधी आहे, ती काल रात्री 'हा सर्व माझा दोष आहे!' असं जेव्हा ओरडली तेव्हा ती भानावर नव्हती. तिच्या हातून काहीच घडलेलं नाही."

"दमीत्रि फ्योदरोविच, त्या बाबतीत तुम्ही पूर्णपणे निश्चिंत राहा." सरकारी वकिलाने तत्परतेने चटकन् उत्तर दिले.

"ज्या बाईंच्या विषयी तुम्हाला इतकी आस्था वाटते त्यांना तकलीफ द्यायला आतापर्यंत तरी आम्हाला काही कारणं आढळली नाहीत. या प्रकरणाला पुढं जे काय रूप येत जाईल त्यातसुद्धा हीच परिस्थिती बहुधा राहील असा मला विश्वास वाटतो...उलट, त्या बाबतीत आम्हाला जे काही करता येईल ते सर्व आम्ही करू. तुम्ही अगदी निश्चिन्त राहा."

" सद्‌गृहस्थहो, आभारी आहे मी तुमचा. काही जरी झालं तरी तुम्ही प्रामाणिक, सरळ मनाचे लोक आहात हे मला माहीत होतं. तुम्ही माझ्या मनावरचं मोठं ओझं हलकं केलंत....बरं, आता आपण काय करायचं ? मी तयार आहे."

" ठीक, आपल्याला घाई केली पाहिजे. विलंब न लावता आपल्याला साक्षीदारांच्या तपासणीला लागलं पाहिजे. ते तुमच्या समक्षच झालं पाहिजे आणि म्हणून... "

" आपण अगोदर थोडा चहा घेऊ या का ?" पारफेनोविच मध्येच म्हणाला, " मला वाटतं तेवढ्या किंमतीचं काम आपण केलं आहे ! "

खाली चहा जर तयार असेल तर एक एक कप घ्यावा आणि मग 'चक्र सुरू करावं.' न्याहारी करायची ती पुढं वेळ सापडला म्हणजे करू, असे त्यांनी ठरविले. (मिखाईल मकारोविच काही कप आणायला खाली गेलाच होता.) चहा खरे म्हणजे खाली तयारच होता, आणि तो लगेच आणण्यात आला. निकोलाय पारफेनोविचने सौजन्याने पुढे केलेला कप मीत्यानं प्रथम नाकारला, पण मागाहून त्याने स्वतःच तो मागितला अन् हावरेपणाने पिऊन टाकला. आश्चर्य वाटण्याइतका तो थकलेला दिसत होता. एक रात्र यथेच्छ दारू ढोसल्यामुळे अन् त्याबरोबर अतिशय, जबरदस्त भावनावेगाला बळी पडल्यामुळे, त्याच्यावर फारसा परिणाम झाला नसेल अशी त्याच्या जबरदस्त ताकदीवरून समजूत झाली असती. पण खरे म्हणजे त्याला आपले डोके पेलून धरवत नव्हते, आणि मधून मधून भोवतालच्या वस्तू उठून डोळ्यांपुढं नाचत असल्यासारख्या त्याला दिसत होत्या. " आता आणखी थोडं जास्त झालं तर मला वेड लागेल." तो आपल्याशी म्हणाला.

८

साक्षीदारांच्या साक्षी– 'बछडं'

साक्षीदारांच्या साक्षींना सुरुवात झाली. पण आम्ही आमची कथा पूर्वी-सारख्या तपशिलाने आता सांगणार नाही. आणि म्हणून, निकोलाय पारफेनोविचने प्रत्येक साक्षीदाराला आपला जबाब सत्याला अन् सदसद्विवेकबुद्धीला धरून दिला पाहिजे, आपला जबाब मागाहून त्याला शपथेवर पुन्हा सांगावा लागेल, हे कसे सांगितले, प्रत्येक साक्षीदाराला आपल्या जबाबाच्या अस्सल प्रतीवर सही करायला कसे लावण्यात आले वगैरे वगैरे गोष्टी आम्ही सांगत बसणार नाही. फक्त एवढेच नमूद करतो की तपासणीत ज्या मुद्द्यावर मुख्यत्वे भर देण्यात आला तो त्या तीन हजार रुबलचा प्रश्न होता. म्हणजे ती रक्कम इथे, मोक्रोयमध्ये, मीत्याकडून एक महिन्यापूर्वी पहिल्या प्रसंगी खर्च करण्यात आली होती का, ती तीन हजार होती की पंधराशे होती ? दुःखाची गोष्ट अशी की प्रत्येकाने जो जबाब दिला तो मीत्याच्या

विरुद्ध होता. त्याच्या बाजूने एकही जबाब झाला नाही, आणि काही साक्षीदारांनी तर मीत्याने सांगितलेल्या, हकिकतीला विरोधी अशा नव्या, जमीनदोस्त करण्यासारख्या गोष्टी त्यात आणल्या.

पहिला साक्षीदार त्रिफोन बोरिस्सोविच याची तपासणी झाली. तो वकिलांच्यापुढे उभा राहताना बिलकुल संकोचला नाही. उलट, आरोपीच्याविषयी कडक अन् कठोर संताप त्याच्या मनात असल्याचा त्याचा आविर्भाव होता, त्यामुळं त्याला एक सच्चेपणाचे अन् आत्मगौरवाचे रूप आले होते. तो बोलला थोडे, अन् तेही निग्रहपूर्वक, प्रश्न विचारण्याची तो वाट पाही, अन् उत्तरे जेवढ्यास तेवढी अन् विचारपूर्वक देई. दृढपणे अन् डळमळीत न होता त्याने अशी साक्ष दिली की, "महिन्यापूर्वी खर्च झालेली रक्कम तीन हजारांपेक्षा कमी असणे शक्य नाही. इथले आजूबाजूचे सगळे खेडूत साक्ष देतील की खुद्द दमीत्रि फ्योदरोविच यांनीच तीन हजार रकमेचा उल्लेख केलेला आपण ऐकला. त्या नुसत्या जिप्सी मुलींच्यावरच त्यांनी कितीतरी पैसा उडविला. त्यांच्यावरच त्यांनी एक हजार घालविले असतील, हे मी नक्की सांगतो."

"मी त्यांना पाचशे रुबल्स दिले असं मला वाटत नाही," असं मीत्या यावर म्हणाला. "मी त्यावेळी ते पैसे मोजले नाहीत, ही दुर्दैवाची गोष्ट, पण मी त्यावेळी पिऊन बेहोष झालो होतो..."

मीत्या एका बाजूला पडद्याकडे पाठ करून बसला होता. तो विषण्ण मनाने आणि खिन्न अन् थकलेल्या चेहेऱ्याने, अशा आविर्भावात ऐकत होता की जणू त्याला म्हणायचे होते:

"हं, मनाला येईल ते बोला. आता त्यात काय फरक पडायचा आहे!"

"हजाराहून जास्त रुबल्स त्यांच्यावर खर्च झाले, दमीत्रि फ्योदरोविच," त्रिफोन बोरिस्सोविचने निश्चयपूर्वक उलट उत्तर केले. "तुम्ही ते वाटेल तसे त्यांच्या अंगावर फेकीत होता अन् त्या उचलून घेत होत्या. ते लेकाचे बदमाष, चोरटे लोक, घोडेचोर, त्यांना इथून हाकलण्यात आलं, नाहीतर तुमच्याकडून त्यांना किती मिळाले ते त्यांनीच सांगितलं असतं. मी ती रक्कम स्वतःच तुमच्या हातात बघितली. मी ती मोजली नाही हे खरं पण तुम्ही मला ती मोजू दिली नाहीत, पण ती दिसत होती त्यावरूनच मी म्हणेन की ती पंधराशेहून....हो. हो, पंधराशेहून...कितीतरी जास्त होती! अहो, आम्हीही पैसा पाहिलाय. आम्हाला रकमेची बरोबर कल्पना येऊ शकते..."

आदल्या दिवशी खर्च केलेल्या रकमेसंबंधाने त्याने सांगितले की दमीत्रि फ्योदरोविचनी इथे माझ्याबरोबर आपल्याला सांगितले की, आपण आपल्याबरोबर तीन हजार रुबल्स आणले आहेत.

" चला, खरं आहे हे, त्रिफोन बोरिस्सोविच?" मीत्या उत्तरला. " मी तीन हजार रुबल्स आणलेत म्हणून इतक्या निश्चितपणानं, खात्रीनं सांगितलं नाही!"

" तुम्ही निश्चितपणे तसं म्हणालात, दमीत्रि फ्योदरोविच. तुम्ही ते आंद्रे-पुढं बोललात. आंद्रे खुद्द अजून इथं आहे. बोलवा त्याला. आणि दिवाणखान्यात तुम्ही वृंदवादकांचं आगतस्वागत करीत होता, त्या वेळी तुम्ही सरळ ओरडलातच की आपण इथं आपला सहावा हजार टाकून जाणार आहो, म्हणजे मागचे तुम्ही खर्च केलेले धरून हे आपण लक्षात घेतलं पाहिजे स्तेपान अन् सिमोन यांनी ते ऐकलं, अन् काल्गानफसुद्धा त्या वेळी तुमच्या शेजारी उभे होते. त्यांनासुद्धा कदाचित आठवेल..."

' सहाव्या ' हजाराविषयीच्या विधानाची दोन वकिलांवर विलक्षण छाप पडली. तीन न् तीन सहा या मोजण्याच्या नव्या रीतीची त्यांना गंमत वाटली, त्या वेळी तीन हजार आणि आताचे तीन हजार मिळून सहा हजार, हे स्पष्ट होते.

त्रिफोन बोरिस्सोविचने सुचविलेल्या सर्व खेडूतांना, स्तेपान, सिमोन, गाडी-वान आंद्रे अन् काल्गानफ यांना, प्रश्न करण्यात आले. खेडूतांनी आणि गाडीवान आंद्रेनं न डळमळता त्रिफोन बोरिस्सोविचच्या साक्षीला पुष्टी दिली. आंद्रेचे मीत्याशी प्रवासात जे संभाषण झाले त्याचा आंद्रेनं सांगितलेला वृत्तांत विशेष काळजीपूर्वक टिपून घेण्यात आला. ' मी दमीत्रि फ्योदरोविच, कुठं चाललो आहे स्वर्गात की नरकात, अन् परलोकात मला क्षमा होईल की नाही, असं ते म्हणाले," असे त्याने सांगितले.

मानसशास्त्रवेत्त्या इप्पोलित किरिलोविचला हे ऐकून बारीक हसू आले, आणि त्याने हे उद्‌गार– दमीत्रि फ्योदरोविच आपण कुठे जाणार म्हणाल्याचे– खटल्यात दाखल करून घ्यावेत " अशी शिफारस केली.

काल्गानफला बोलावण्यात आले तेव्हा तो नाखुषीने कपाळाला आठ्या घालून अन् रागारागाने आत आला, आणि तो वकिलांशी अशा रीतीने बोलला की जणू तो आयुष्यात पूर्वी कधी त्यांना भेटला नव्हता. खरे म्हणजे ते परस्परांच्या परिचयाचे होते आणि त्यांना तो पूर्वी खूप दिवस दररोज भेटत असे. " मला यासंबंधीची काही माहिती नाही आणि करून घ्यायची इच्छा नाही," असे म्हणून त्याने सुरुवात केली. पण असे दिसून आले की, त्याने त्या " सहाव्या ' हजाराचा उद्‌गार ऐकला होता, आणि आपण त्यावेळी अगदी जवळच उभे होतो हे त्याने कबूल केले. त्याला जितके दिसले त्यावरून मीत्याच्या हातात किती पैसा होता हे त्याला "ठाऊक नव्हतं." त्याने खात्रीपूर्वक सांगितले की त्या पोल माणसांनी पत्त्याच्या खेळात त्याला फसविले होते. पुन्हा पुन्हा प्रश्न विचारल्यानंतर उत्तर देताना त्याने सांगितले की त्या पोलांना घालवून दिल्यानंतर मीत्याची आग्राफेना अलेक्झांद्रोवनाबाबतची भूमिका

निश्चितपणे सुधारली, आणि 'माझं तुझ्यावर प्रेम आहे' असं ती त्याला म्हणाली. तो आग्राफेना अलेक्झांद्रोवनासंबंधाने संयमपूर्वक अन् आदर राखून जणू ती अतिशय उच्च कुळातील महिला असावी, तसे बोलला, आणि एकदाही त्याने 'ग्रूशिंका' असा तिच्यासंबंधी उल्लेख तोंडातून येऊ दिला नाही. या तरुणाची साक्ष घ्यायला उघड उघड नाखुषी असतांना मुद्दा, इप्पोलित किरिलोविचने त्याची बरीच लांबलचक साक्ष घेतली, अन् त्या रात्री मीत्याचा जो 'अद्भुतरम्य प्रसंग' घडला त्याबद्दलचा सारा तपशील त्याच्याकडूनच त्याला कळला. मीत्याने एकदासुद्धा काल्गानफला मध्ये हटकले नाही. शेवटी त्यांनी त्या तरुणाला सोडले, आणि तो आपला उद्वेग न लपविता तिथून निघून गेला.

त्या पोल गृहस्थांचीही तपासणी करण्यात आली. ते जरी आपल्या खोलीत अंथरुणावर पडले होते, तरी सबंध रात्रभर त्यांना झोप लागली नव्हती, आणि पोलिस अधिकारी आल्यावर आपल्याला बोलावणे येणार हे जाणून झटपट कपडे घालून ते तयार झाले. त्यांनी आपला जबाब प्रतिष्ठितपणे पण काहीशा अस्वस्थपणाने दिला. बुटका पोल हा बाराव्या दर्जाचा निवृत्त अधिकारी असल्याचे आणि सैबेरियात त्याने गुरांचा डॉक्टर म्हणून नोकरी केल्याचे आढळून आले. त्याचे नाव मुस्स्यालोविच असे होते. महाशय व्रुब्लेव्स्की हा प्रमाणपत्र नसलेला दंतवैद्य असल्याचे बाहेर पडले. ते खोलीत आल्यानंतर त्यांना प्रश्न जरी निकोलाय पारफेनोविच विचारीत होता तरी ते आपली उत्तरे एका बाजूला उभ्या असलेल्या मिखाईल मकारोविचला उद्देशून देत होते. आणि अज्ञानामुळे त्यालाच सर्वात वरिष्ठ आणि हुकूमत करणारा अधिकारी समजून प्रत्येक शब्दागणिक "कर्नलसाहेब" असे म्हणत होते. खुद्द मिखाईल मकारोविचनेच त्यांना अनेक वेळा ताकीद दिली, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की त्यांनी आपली उत्तरे निकोलाय पारफेनोविचला उद्देशून द्यायला हवी होती. त्यांना रशियन अगदी शुद्ध बोलता येत होते. मात्र काही शब्दांवर जोर देण्याची त्यांची पद्धत वेगळी होती असे आढळून आले. ग्रूशिंकाचे आपले पूर्वीचे अन् आताचे असलेले संबंध सांगताना मुस्स्यालोविच अभिमानाने अन् सहृदयतेने बोलला, त्यामुळे मीत्या एकदम खवळला. अन् म्हणाला की माझ्यादेखत या 'बदमाषाला' मी असं बोलू देणार नाही! मुस्स्यालोविचने लगेच 'बदमाष' या शब्दाकडे लक्ष वेधले, आणि तो तपासणीच्या कागदात दाखल करावा अशी विनंती केली. मीत्या संतापाने जळफळला.

"तो बदमाष आहे! बदमाष! तुम्ही लिहून घ्या. आणि हेही लिहून घ्या की, खटल्याच्या कागदात काही असलं नसलं तरी मी जाहीरपणे सांगतो की हा बदमाष माणूस आहे!" तो ओरडून म्हणाला.

निकोलाय पारफेनोविचने हे कागदपत्रात घातलं खरं, पण त्यात त्याने अतिशय स्तुत्य असी हिकमत न् चलाखी दाखविली. मीत्याला कडकपणे ताकीद देऊन त्याने

त्या प्रकरणाच्या अद्‌भुतरम्य अंगाची सर्व पुढची चौकशी एकदम आखडती घेतली, आणि जेवढे आवश्यक तेवढ्याकडेच तो चटकन् वळला. त्या पोलनी दिलेल्या साक्षीतील एका गोष्टीकडे त्या वकिलांचे लक्ष विशेष वेधले. ती गोष्ट म्हणजे, त्याच खोलीत मीत्याने मुस्त्यालोविचला पैसे देऊन मार्गातून दूर करण्याचा कसा प्रयत्न केला, आणि आपले हक्क सोडून देण्याकरिता तीन हजार रुबल कसे देऊ केले, त्यातले सातशे रुबल रोख आणि बाकीचे दोन हजार तीनशे 'दुसरे दिवशी शहरात द्यावयाचे' कसे ठरविले, तो भाग होता. त्याने त्यावेळी शपथपूर्वक सांगितले होते की सगळी रक्कम काही आपल्याकडे इथे मोक्रोयमध्ये नाही, पण आपला पैसा शहरात आहे. मीत्याने भडकून सांगितले की बाकीचे पैसे आपण दुसऱ्या दिवशी शहरात देऊच असे म्हटलं नव्हतं, पण रुब्लैवस्कीने त्या विधानाला पुष्टी दिली, आणि मीत्याने क्षणभर विचार करून त्रासिकपणाने मान्य केले की पोल म्हणतात तसंच झालं असलं पाहिजे, आपण त्यावेळी अस्वस्थ मनःस्थितीत होतो आणि तसं आपण म्हटलं असेल, खरोखर म्हटलं असेल.

सरकारी वकिलानं साक्षीच्या या भागावर झडपच घातली. फिर्यादी पक्षाच्या दृष्टीने त्यातून ही गोष्ट सिद्ध होत होती की मीत्याच्या हाती जे तीन हजार रुबल्स आले होते त्याचा अर्धा भाग किंवा काही भाग खरोखरच शहरात कुठेतरी किंवा इथे मोक्रोयतच कुठेतरी दडवून ठेवलेला असला पाहिजे (आणि आपलं हे अनुमान त्यांनी खरोखर त्यावरच आधारले.) मीत्याच्या हाती फक्त आठशे रुबल्सच कसे आढळावेत याचे त्यांना पडलेले कोडे या योगाने सुटत होते. हा परिस्थितिजन्य पुरावा, जो मुळात बिनमहत्त्वाचा होता, तो काही अंशी आतापर्यंत मीत्याला अनुकूल असा होता. त्यांच्या बाजूचा असलेला हा एक पुरावा आता मोडून पडला होता. सरकारी वकिलाने मीत्याला विचारले की, आपल्याकडं पंधराशेपेक्षा जास्त रक्कम असल्याचं तुम्ही स्वतःच नाकारलंत तर उरलेले दोन हजार तीनशे रुबल्स तुम्हाला कुठं मिळणार होते? त्याला मीत्याने ठाम उत्तर दिले की, आपल्या मनात या 'बुटक्या'ला पैसे देऊ करायचे नव्हते तर चेरमाश्न्या गावावरच्या आपल्या हक्कांचे कायदेशीर विक्रीखत आपण करून देणार होतो. हे हक्क आपण पूर्वी सॅमसोनोवला आणि मादाम होहलाकोवाला देऊ केले होते. सरकारी वकिलाला या 'हिकमतीच्या बावळटपणाचं' हसू आल्याशिवाय राहिले नाही,

आणि यांनी दोन हजार तीनशे रुबल्स रोख घेण्याऐवजी असं खत स्वीकारलं असतं अशी तुम्ही कल्पना केलीत?"

"त्यानं ते खात्रीनं स्वीकारलं असतं." मीत्या तापून म्हणाला. "अहो, असे पाहा, त्यानं दोन हजार नाही चार किंवा सहा हजार त्यातून मटकावले असते ना! त्यानं आपले पोल म्हणा, ज्यू म्हणा, वकील या कामी लावले असते, अन् त्याला तीन हजार काय, त्या म्हाताऱ्याच्या हातून सबंध मालमत्ता मिळाली असती ना."

मुस्स्यालोविचची साक्ष अर्थात जाब-जबाबात अगदी संपूर्ण तपशीलवार नमूद करण्यात आली. मग त्यांनी त्या पोलना रजा दिली. पत्त्यांच्या डावात फसवणूक केल्याच्या घटनेला स्पर्शच करण्यात आला नाही. जे काय झालं तेवढ्या-वरूनच, निकोलाय पारफेनोविच त्यांच्यावर फारच खूष झाला होता, आणि त्यांना क्षुल्लक गोष्टींनी उगीच त्रास देण्याची त्याची इच्छा नव्हती; शिवाय, ते काय पत्त्याच्या डावातले मूर्खपणाचे, धुंदीतले भांडण. त्या रात्री, पिणे अन् भांडणे काय कमी होती? तेव्हा ते दोनशे रुबल्स त्या पोलांच्याच खिशात राहिले.

मग वृद्ध मॅक्झिमफला बोलावण्यात आले. तो भीत भीत आत आला, छोटी छोटी पावले टाकीत पुढे आला. तो अस्ताव्यस्त अन् नाउमेद दिसत होता. आतापर्यंत सारा वेळ त्याने खाली ग्रूशिंकासोबत आसरा घेतला होता, तिच्याशेजारी तो मुखस्तंभ होऊन बसून राहिला होता, आणि "मधून मधून तिच्या बाबतीत वाकडे तोंड करून रडू लागत होता अन् निळ्या चौकटीच्या हातरुमालाने आपले डोळे पुसत होता." असे मागाहून मिखाईल मकारोविचने त्याचे वर्णन केले. तेव्हा ती स्वतःच त्याला शांत करून दिलासा देण्याचा प्रयत्न करू लागली. त्या म्हाताऱ्याने तत्काळ कबूल केले की आपल्याकडून चूक घडली, आपण 'दरिद्री असल्यामुळं दहा रुबल्स' दमीत्रि फ्योदरोविचच्या रकमेतून उसने घेतले आणि ते आपण परत करायला तयार आहोत. निकोलाय पारफेनोविचने त्याला सरळ प्रश्न केला की, "तुम्ही ती नोट दमीत्रि फ्योदरोविचच्या हातातून घेतली तेव्हा ती रक्कम कोणाही-पेक्षा अधिक चांगल्या रीतीने तुम्हाला पाहता आली असली पाहिजे. तेव्हा त्यांनी आपल्या हातात किती पैसे धरून ठेवले होते हे तुम्ही पाहिलेत का?" त्याला मॅक्झिम-मफने अगदी निश्चित रीतीने सांगितले की वीस हजार होते.

"तुम्ही पूर्वी कधी वीस हजाराची रक्कम पाहिली तरी आहे काय?" पारफेनोविचने हसून विचारले.

"खात्रीनं पाहिली आहे, वीस हजार नाही पण सात हजार. जेव्हा माझ्या बायकोनं माझी लहानशी मिळकत गहाण टाकली त्यावेळी. माझ्यापुढं त्याविषयी फुशारकी मारून तिनं मला फक्त दुरूनच ती रक्कम पाहू दिली. ते फार जाड असं पुडकं होतं, सगळ्या सप्तरंगी नोटा. आणि दमीत्रि फ्योदरोविचच्यासुद्धा सर्व सप्तरंगीच..."

त्याला फार वेळ ठेवून घेण्यात आले नाही. शेवटी ग्रूशिंकाची पाळी आली. तिच्या चेहऱ्यावरच्या भावाचा मीत्यावर काय परिणाम होईल याची निकोलाय पार-फेनोविचला साहजिकच चिंता वाटत होती, आणि तो त्याला ताकीद देणारे चार शब्द हळूच बोलला, पण मीत्याने आपले डोके मुकाट्याने लववले. "आपण काही तमाशा करणार नाही" असे त्याने त्याला दर्शविले. मिखाईल मकारोविचने स्वतः ग्रूशिंकाला आत आणले. ती आत आली तेव्हा तिचा चेहरा कठोर अन् उदास होता, तो गंभीर

असल्यासारखा दिसत होता. ती येऊन निकोलाय पारफेनोविचने तिच्यापुढे केलेल्या खुर्चीवर शांतपणे बसली. ती अतिशय फिकी झाली होती. तिला थंडी वाजत असावीसे दिसत होते, आणि तिने आपल्या सुंदर काळ्या शालीने स्वतःला घट्ट लपेटून घेतले होते. तिला थोडीशी तापाची थंडी वाजत होती. त्या रात्रीनंतर जो बऱ्याच दिवसांचा आजार तिला जडला त्याचे ते पहिले लक्षण होते. तिचा गंभीर आविर्भाव, तिची सरळ कळकळीची नजर अन् शांत वागणूक यांनी प्रत्येकाच्या मनावर फार अनुकूल परिणाम केला. निकोलाय पारफेनोविच तर काहीसा 'मुग्ध'ही झाला. त्यासंबंधाने मागाहून बोलताना त्याने स्वतःच कबूल केले की, याचवेळी आपण 'ही बाई किती सुंदर आहे' हे पाहिले, कारण जरी त्याने यापूर्वी तिला अनेक वेळा बघितले होते, तरी 'गावंढ्या भागातली एक गणिका' या दृष्टीनेच नेहमी तिच्याकडे पाहिले होते. "तिचं वागणं, बोलणं अत्यंत उच्च समाजातील आहे" असे तो, स्त्रियांच्या एका घोळक्यात तिच्याबद्दल गप्पा मारताना उत्साहाने म्हणाला, पण या उद्‌गारांचा त्या महिलांना उघड उघड राग आला आणि त्यांनी त्याला लगेच 'खट्याळ माणूस' म्हटले. त्यामुळे तो अगदी खूष झाला.

खोलीत प्रवेश करताना, ग्रूशिंकाने मीत्याकडे एक क्षणभरच नजर टाकली, तो तिच्याकडे अस्वस्थ मनाने पाहत होता. पण तिचा चेहेरा पाहून त्याला लगेच धीर आला. पहिल्या ठराविक अशा प्रश्नानंतर आणि ताकिदीनंतर, निकोलाय पारफेनोविचने तिला, थोडेसे संकोचाने, पण अत्यंत सौजन्ययुक्त रीतीने विचारले, "निवृत्त लेफ्टेनंट दमीत्रि फ्योदरोविच कारमाझफ यांच्याशी तुमचं कशाप्रकारचं नातं होतं?" याला ग्रूशिंकाने ठामपणे अन् संथपणे उत्तर दिले,

"त्याचा माझा परिचय होता. गेला महिना तो एक परिचित म्हणून मला भेटायला येई." पुढे त्याने विचारलेल्या चौकस प्रश्नांना तिने स्पष्टपणे अन् अगदी मोकळेपणाने उत्तर दिले की, "जरी कित्येक वेळा तो तिला आकर्षक वाटत असे, तरी तिचे त्याच्यावर प्रेम नव्हते, पण त्याचे अन् त्याच्या म्हाताऱ्या वडिलांचे अंतःकरण तिने "तिच्या वाईट खुनशीपणाने" जिंकून घेतलं होतं; मीत्या हा फ्योदर पावलोविचचा अन् इतर प्रत्येकाचा अतिशय मत्सर करतो हे आपण पाहिलं होतं, पण त्याची फक्त आपल्याला गंमत वाटत असे. फ्योदर पावलोविचकडं जाण्याचं आपल्या मनात कधीच नव्हतं, आपण त्याला निव्वळ हसत असू. "गेला सबंध महिनाभर माझ्या मनात यांच्यापैकी कोणाचाच विचार नव्हता. माझ्यावर ज्यानं अन्याय केला होता त्या दुसऱ्याच माणसाची मी वाट पाहत होते. पण मला वाटतं," ती शेवटी म्हणाली, "त्यासंबंधानं चौकशी करण्याचं तुम्हाला कारण नाही, मलाही उत्तर देण्याची गरज नाही, कारण ती माझी व्यक्तिगत बाब आहे."

निकोलाय पारफेनोविचने या इशाऱ्याची तत्काळ दखल घेतली. त्याने या प्रकरणातला अद्‌भुतरम्य भाग बाजूला सारला आणि गंभीर भागाकडे तो वळला,

म्हणजे तीन हजार रुबलांचा जो अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होता तो त्याने घेतला. मोक्रोय येथील पहिल्या मद्यपानाच्या कार्यक्रमाच्या वेळी तीन हजार रुबल खर्च झाले असले पाहिजेत, आणि जरी आपण स्वतः ते पैसे मोजले नाहीत, तरी दमीत्रि फ्योदरोविच याच्याच तोंडून तीन हजार खर्च झाल्याचं आपण ऐकलं होतं, अशी ग्रूशिंकाने त्या विधानाला पुष्टी दिली.

"त्यांनी ते तुम्हालाच एकटीला सांगितलं की, इतर कोणाच्या समोर सांगितलं, की तुमच्या देखत त्यांनी ते दुसऱ्या कोणाला सांगताना तुम्ही ते ऐकलंत ?" सरकारी वकिलाने चटकन् विचारले.

याला ग्रूशिंकाने उत्तर दिले की इतर लोकांच्यापुढं तसं बोलताना तिने ऐकले होते, आणि आम्ही एकटे असतानाही त्याला तसे म्हणताना ऐकले होते.

" त्यांनी ते तुम्हाला एकटीला एकदा सांगितलं की अनेक वेळा ?" सरकारी वकिलाने विचारले, आणि त्यांना माहिती मिळाली की त्याने ग्रूशिंकाला तसे अनेक वेळा सांगितले.

किरिलोविचला साक्षीतल्या या भागाने फारच संतोष झाला. आणखी पुढच्या तपासणीतून असे कळले की हा पैसा कुठून आला, तो कतिरीना इवानोवनाकडून दमीत्रि फ्योदरोविचने मिळविला होता, हेही तिला माहीत होतं.

आणि महिन्यापूर्वी खर्च झालेला पैसा तीन हजार रुबल नव्हता, कमी होता, आणि दमीत्रि फ्योदरोविचनी त्यातली अर्धी रक्कम आपल्या स्वतःच्या उपयोगाकरिता राखून ठेवली होती हे तुम्ही एकदाही कधी ऐकलं नाहीत ?"

" नाही, मी ते कधीच ऐकलं नाही,' ग्रूशिंकाने उत्तर दिलं.

उलट आपल्यापाशी एक फार्दिंगही नाही असे मीत्या तिच्याजवळ अनेक वेळा बोलला होता, असा तिने पुढे आणखी खुलासा केला.

" आपल्या वडिलांकडून काही पैसा मिळेल अशी तो नेहमी अपेक्षा करीत असे." ग्रूशिंका शेवटी म्हणाली.

निकोलाय पारफेनोविचने मध्येच एकदम विचारले, "हा कधी तुमच्यापुढं... सहजगत्या म्हणा, किंवा रागाच्या भरात म्हणा, आपल्या वडिलांच्या जिवावर उठण्याचा प्रयत्न करण्याचं आपल्या मनात आहे असं म्हणाले नव्हते ?"

" हंः, तो तसं म्हणालाच होता," ग्रूशिंकाने दुःखाचा निःश्वास टाकून म्हटलं.

" एकदा की अनेकदा ?"

" त्यानं त्याचा अनेकदा उल्लेख केला, प्रत्येक वेळी रागात येऊन.."

" अन् ते तसं करतील असं तुम्हाला वाटलं ?"

" नाही, मी त्यावर कधीच विश्वास ठेवला नाही," तिने ठामपणे उत्तर दिले. " माझा त्याच्या अंतःकरणातील उदारतेवर विश्वास होता."

" सद्‌गृहस्थहो," मीत्या एकदम म्हणाला, " मला आग्राफेना अलेक्झांद्रोवनाशी, तुमच्या देखत एक शब्द बोलण्याची परवानगी द्या."

" बोला, निकोलाय पारफेनोविचने संमती दिली.

" आग्राफेना अलेक्झांद्रोवना !" मीत्या आपल्या खुर्चीवरून उठून म्हणाला, " ईश्वरावर अन् माझ्यावर विश्वास ठेव, मी माझ्या वडिलांचा खून करण्याचा गुन्हा केलेला नाही !"

एवढे शब्द उच्चारून मीत्या पुन्हा आपल्या खुर्चीवर बसला. ग्रूशिंका उठून उभी राहिली आणि तिने भक्तिभावाने प्रतिमेपुढे स्वतःवर क्रूसाचे चिन्ह केले.

'प्रभो, तुला धन्यवाद' भावनाकंपित स्वरात ती म्हणाली, आणि उभी राहिल्या राहिल्या निकोलाय पारफेनोविचकडे वळून ती म्हणाली,

" तो आता जे बोलला, त्यावर विश्वास ठेवा ! मी त्याला ओळखते. तो थट्टेनं किंवा हट्टानं काय वाटेल ते बोलेल, पण तो आपल्या सद्‌विवेकबुद्धीला विरोध करून तुम्हाला कधीही फसवणार नाही. तो तुम्हाला संपूर्ण सत्य सांगत आहे, तुम्ही त्यावर विश्वास ठेवावा."

" आभार, अग्राफेना अलेक्झांद्रोवना, तू मला नवं धैर्य दिलंस," मीत्याने तिला कंपित स्वराने प्रतिसाद दिला.

आदल्या दिवशी जो पैसा खर्च झाला होता त्यासंबंधी तिने सांगितले की ती किती रक्कम होती हे आपल्याला माहीत नाही, पण अनेक लोकांना तो सांगत असलेले आपण ऐकले की त्याच्यापाशी तीन हजार आहेत. आणि हा पैसा त्याला कुठे मिळाला या प्रश्नावर ती म्हणाली की, " आपण तो कतिरीना इवानोवनाचा चोरला." असं त्यानं मला सांगितलं, आणि त्याला मी उत्तर दिलं की त्यानं तो चोरलेला नाही, आणि त्यानं तो उद्या परत केला पाहिजे. सरकारी वकिलानं तिला ठामपणे विचारलं की, आपण कतिरीना इवानोवनाचा चोरला असे ज्या पैशाबद्दल तो म्हणाला तो त्याने काल इथे जो खर्च केला तो होता, की एक महिन्यापूर्वी त्यानं जो इथे उधळला तो होता. त्याला उत्तर म्हणून ती म्हणाली की एक महिन्यापूर्वी खर्च केलेला तो होता, असा त्याच्या म्हणण्याचा अर्थ होता आणि मी तसंच समजले.

ग्रूशिंकाला शेवटी सोडून देण्यात आले, आणि निकोलाय पारफेनोविचने तिला आवेगपूर्ण रीतीने सांगितले की " तुम्ही तावडतोब शहराकडं परतायला हरकत नाही आणि जर माझी तुम्हाला काही मदत, उदाहरणार्थ घोड्याविड्यांची लागणार असेल, किंवा तुम्हाला जर सोबत वगैरे हवीशी वाटत असेल तर मी... यायला...

" ह्याबद्दल मी तुमचे मनापासून आभार मानते," ग्रूशिंका त्याच्यापुढे लवून म्हणाली, " मी या वृद्ध गृहस्थांच्या बरोबर जात आहे, मी त्यांना माझ्याबरोबर

गाडीतून परत घेऊन जाते आहे, आणि दरम्यान, तुमची परवानगी असेल तर, तुम्ही दमीत्रि फ्योदरोविच यांच्यासंबंधानं काय ठरवीत आहात ते ऐकण्याकरता मी खाली थांबेन."

ती बाहेर गेली. मीत्या शांत होता, आणि तो अधिक प्रसन्न दिसत होता, पण फक्त एकच क्षण. त्याला विलक्षण शारीरिक अशक्तपणाचा त्रास जास्त जास्त जाणवू लागला. त्याचे डोळे श्रमाने मिटू लागले. साक्षीदारांची तपासणी शेवटी संपली. लिहून घेतलेल्या जाबजबाबांवर शेवटचा हात फिरविण्याकडे ते लागले. मीत्या उठला, आपल्या खुर्चीकडून पडद्याजवळच्या कोपऱ्यापर्यंत सरकला, तिथे एक मोठी पेटी कांबळयाने झाकलेली होती. तिच्यावर जाऊन पडला आणि लगेच झोपी गेला.

त्याला एक विलक्षण स्वप्न पडले, ते त्या स्थळकाळाशी पूर्णपणे विसंगत असे होते.

फार पूर्वी त्याची जिथे नेमणूक करण्यात आली होती, त्या गवताळ पठाराच्या भागात कुठेतरी तो गाडीतून चालला होता. दोन घोडे जोडलेल्या गाडीतून एक शेतकरी त्याला बर्फातून अन् हिमवर्षावातून नेत होता. तो गारठला होता, नोव्हेंबरचे ते पहिले दिवस होते, आणि बर्फाच्या मोठमोठ्या ओल्या कपच्या पडत होत्या आणि जमिनीचा स्पर्श होताच वितळत होत्या. आणि तो शेतकरी त्याला झपाट्यानं नेत होता. त्याला पांढरी, लांब दाढी होती. तो म्हातारा नव्हता, पन्नाशीच्या जवळपास होता, आणि त्याच्या अंगावर एक करड्या रंगाचा शेतकऱ्याचा अंगरखा होता. जवळच एक खेडे होते, तिथल्या काळ्या झोपड्या त्याला दिसत होत्या, आणि निम्म्या झोपड्या जळालेल्या होत्या, त्यांच्या कोळसा झालेल्या तुळया तेवढ्या उभ्या होत्या. गाडी आत जात असताना रस्त्याच्या बाजूला खेडूत बाया जमा झाल्या, त्या बऱ्याच होत्या. सबंध रस्त्याच्या कडेने उभ्या होत्या. सगळ्या रोड अन् फिक्या. त्यांचे चेहेरे साधारणतः गव्हाळी रंगाचे होते. विशेषतः त्यातली एक अगदी टोकाला असलेली, उंचेली हाडकुळी बाई होती. ती दिसायला चाळीस वर्षांची, पण असेल वीसच वर्षांची. तिचा चेहेरा उभट, सुकलेला होता. आणि तिच्या हातात एक लहानसं मूल रडत होतं. आणि तिचे स्तन इतके सुकलेले दिसत होते की, त्यात दुधाचा एक थेंबही नसेल. आणि ते मूल एकसारखं रडत होतं आणि आपले चिमुकले हात पसरीत होतं, त्याच्या हाताच्या मुठी थंडीनं निळ्या-काळ्या पडल्या होत्या.

"ती का रडताहेत? का रडताहेत? ते त्यांच्या जवळून मजेत पुढं पुढं जात असता मीत्यानं विचारलं,

"त्या बछड्यासाठी," गाडीवानानं उत्तर दिलं, "ते बछडं रडतं आहे."

त्याच्या त्या खेडवळ वळणाच्या 'बछडं' या शब्दानं मीत्याचं हृदय हललं,

अन् त्याला त्या शेतकऱ्यानं 'बछडं' म्हणून म्हटलेलं आवडलं. त्यातील कणवेचा भाव अधिक वाढला.

"पण ते रडतंय का?" मीत्या पुनःपुन्हा मूढपणे विचारीत होता, "त्याचे चिमुकले हात उघडे का आहेत? त्यांनी ते कपड्यात का गुंडाळले नाहीत?"

"ते बछडं गारठलंय, त्याचे चिमुकले कपडे गारठले आहेत अन् त्यातून त्याला ऊब मिळत नाही."

"पण का? का?" मूढ मीत्या अजूनही विचारीत राहिला.

"का म्हणजे? ती गरीब माणसं आहेत, त्यांची घरं-दारं जळाली आहेत. त्यांना खायला भाकरी नाही. ते भीक मागताहेत कारण त्यांचं सर्व जळून गेलं आहे."

"नाही, नाही," मीत्याला जणू अजून समजत नव्हतं. "त्या बापड्या आया तिथं का उभ्या आहेत सांग. लोक गरीब का? ते बछडं गरीब का? हे पठार उजाड का? ते एकमेकाला घट्ट आलिंगन देऊन चुंबन का घेत नाहीत? ते आनंदानं गाणी का गात नाहीत? दारुण दैन्यानं ते इतके काळे का पडले? त्या बछड्याला ते खाऊ का घालीत नाहीत?"

त्याला जाणवलं की, जरी आपले प्रश्न गैरवाजवी अन् अर्थशून्य होते, तरी आपल्याला तेच विचारावेसे वाटले, अन् ते त्याच रीतीनं विचारावेसे वाटले. आणि त्याला जाणवलं की, आपल्या अंतःकरणात पूर्वी कधी न अनुभवलेला असा एक करुणेचा आवेग उसळतो आहे. आपल्याला रडावंसं वाटत आहे, त्या सर्वांच्या करिता असं काहीतरी करावंसं वाटतं आहे की, ज्यामुळं त्या बछड्यानं फिरून रडू नये, ज्यामुळं काळ्या पडलेल्या चेहेऱ्याच्या, सुकून गेलेल्या आईनं रडू नये, त्या-क्षणापासून कोणीही पुन्हा अश्रू गाळू नयेत, अन् ते त्याला चटकन्, अगदी चटकन् काहीही अडथळे न जुमानता कारमाझफ कुटुंबाच्या स्वभावातल्या बेधडकपणानं करायचं आहे.

"अन् मी तुझ्याबरोबर येत आहे. माझ्या आयुष्यभर मी तुला सोडणार नाही, मी तुझ्याबरोबर येत आहे," असे सांगणारा ग्रूशिंकाचा भावनेने थरारणारा कोमल आवाज आपल्या जवळच त्याने ऐकला. आणि त्याचे हृदय प्रफुल्लित झाले, तो प्रकाशाकडे जाण्याची धडपड करू लागला, आणि जगावे म्हणून, जगावे आणि त्या नव्या, हाक देणाऱ्या प्रकाशाकडे पुढे पुढे जात राहावे, ताबडतोब, आत्ता, एकदम, यासाठी तो तळमळू लागला!

"काय! कुठं?" आपले डोळे उघडून तो एकदम उद्गारला, त्या मोठ्या पेटीवर तो एकदम उठून बसला, आपण एका मूर्च्छेतून जागे झालोय् त्याला वाटले, तो प्रसन्नपणाने हसला. निकोलाय पारफेनोविच त्याच्याकडे पाहत उभा होता, आणि त्याला म्हणत होता की लिहिलेले जाबजबाब मोठ्याने वाचले जातील. ते तुम्ही ऐकून घ्या अन् त्यावर सही करा. मीत्याने तर्क केला की, आपण तासभर किंवा त्याहून

जास्त झोपलेलो होतो, पण निकोलाय पारफेनोविच काय म्हणाला ते त्याने ऐकले नाही. त्याला आपल्या डोक्याखाली उशी आहे हे पाहून एकदम आश्चर्य वाटले, तो ज्यावेळी थकून जाऊन त्या पेटीवर आडवा पडला त्यावेळी ती तिथे नव्हती.

"ही उशी माझ्या डोक्याखाली कुणी ठेवली बरं? कोणी इतकी माया दाखविली?" तो एक प्रकारच्या कृतज्ञतेने भारावून, आणि सद्‌गदित होऊन म्हणाला. हा आपल्यावर मोठाच अनुग्रह झालासे जणू त्याला वाटले.

हा मायाळू माणूस कोण ते त्याला कधीच कळले नाही, कदाचित शेतकरी साक्षीदारांपैकी कोणाला, किंवा निकोलाय पारफेनोविचच्या छोट्या सेक्रेटरीला त्याच्या डोक्याखाली उशी ठेवावी असा कळवळ्याचा विचार आला असेल, पण त्यामुळे त्याचा सारा अंतरात्मा सद्‌गदित होऊन थरथरला. तो टेबलापाशी जाऊन म्हणाला, "तुम्हांला वाटेल त्यावर मी सही करायला तयार आहे."

"मला एक छान स्वप्न पडलं, सद्‌गृहस्थहो," तो विलक्षण स्वरात म्हणाला. त्याच्या बदललेल्या चेहऱ्यावर एक नवा प्रकाश, जणू आनंदाचा प्रकाश चमकत होता.

९

मीत्याला घेऊन जातात

जबाबांच्या कागदावर सही झाल्यानंतर पारफेनोविच गंभीरपणे कैद्याकडे वळला आणि त्याने त्याला 'अटकेचा हुकूम' वाचून दाखविला; त्यात अमुक सालाच्या अमुक दिवशी अमुक ठिकाणी अमुक अमुक जिल्हा-कोर्टाच्या तपासणी वकिलाने अमुक अमुक गुन्हे केलेल्या (येथे सर्व आरोप व्यवस्थित लिहिले होते) आरोपी अमुक अमुकची (म्हणजे मीत्याची) तपासणी केली, आरोपीने त्याच्यावर आरोपित केलेले गुन्हे नाकबूल केले पण त्यासंबंधी स्वसमर्थनार्थ काहीही पुरावा दिला नाही, तर अमुक अमुक साक्षीदारांनी दिलेल्या साक्षी आणि अमुक अमुक परिस्थितिजन्य पुरावे त्याच्या विरुद्ध सिद्ध करतात, हे लक्षात घेता कायद्याच्या अमुक अमुक कलमानुसार वगैरे (मी) तपासणी वकील हुकूम देतो की, सदर आरोपीला पुढील तपासणी अन् निर्णय चुकविण्याच्या सर्व साधनांपासून अलग ठेवण्याकरिता अमुक अमुक तुरुंगात स्थानबद्ध करून ठेवावे; सदर हुकुमाची दखल या नोटिशीद्वारा सदर आरोपीला देण्यात येत आहे आणि त्याची एक प्रत दुय्यम सरकारी वकिलाकडे पाठविण्यात येत आहे, वगैरे वगैरे.

थोडक्यात, म्हणजे मीत्याला कळविण्यात आले की या क्षणापासून तो कैदी आहे, आणि त्याला ताबडतोब गाडीतून शहराकडे नेले जाईल आणि तिथे अतिशय अप्रिय वाटणाऱ्या जागेत बंदी करून ठेवण्यात येईल. मीत्याने ते लक्षपूर्वक ऐकले अन् आपले खांदे उडविले.

" ठीक आहे, सद्‌गृहस्थहो, मी तुम्हाला दोष देत नाही. मी तयार आहे... मला वाटतं तुम्हाला आता आणखी काही करायचं राहिलेलं नाही."

निकोलाय पारफेनोविचने त्याला सौजन्याने सांगितलं की तुम्हाला ग्रामीण पोलिस अधिकारी मावरिकी मावरिक्येविच ताबडतोब आपल्या देखरेखीखाली घेऊन जाईल, तो इथे हजरच आहे...

" थांबा," मीत्याने एकदम त्याला मधेच थांबविले, आणि अनावर भावनेने जोर केल्यामुळे तो खोलीत असलेल्या सर्वांना उद्देशून मोठ्याने म्हणाला :

" सद्‌गृहस्थहो, आपण सारे निष्ठुर आहोत, आपण सारे राक्षस आहोत, आपण सारे माणसांना, आयांना अन् त्यांच्या अंगावर पिणाऱ्या अर्भकांना रडायला लावतो, पण आत्ता इथंच हे ठरून जाऊ द्या की मी सर्वांत, सर्व अधमांतअधम असा सर्प आहे ! मी सुधारण्याची शपथ घेतली अन् रोज मी त्याच त्या गलिच्छ गोष्टी केल्या. मला आता समजतं की माझ्यासारखी जी माणसं असतात त्यांना एक आघात लागतो. फास टाकल्याप्रमाणं त्यांना पकडण्याकरिता आणि बाहेरच्या एखाद्या शक्तीनं बांधण्याकरिता दैवाचा एखादा दणका लागतो. मी आपणहून कध्धी कध्धी वर उठलो नसतो ! पण आकाशीचं वज्र कोसळलं आहे. आरोपाच्या यातना आणि माझी लोकांत छीः थू झाल्याच्या यातना, मी स्वीकारतो, मला त्या सहन करायच्या आहेत आणि सहन केल्यानं मी शुद्ध होईन. कदाचित माझी शुद्धी होईल बरं, सद्‌गृहस्थहो ! पण ऐका पुन्हा शेवटचं सांगतो की, मी माझ्या वडिलांचं रक्त सांडल्याचा गुन्हा केलेला नाही. मला होणारी शिक्षा मी स्वीकारतो ती मी त्यांना ठार मारलं म्हणून नव्हे तर मारण्याचा माझा हेतू होता म्हणून, आणि कदाचित् खरोखर मी त्यांना मारलंही असतं म्हणून. तरी मी तुमच्याशी झगडणार आहे, मी तुम्हाला हे अगोदरच सांगून ठेवतो. मी त्याबद्दल तुमच्याशी शेवटपर्यंत झगडून निकाल लावून घेणार आहे, आणि मग ईश्वरच निर्णय देईल. नमस्कार, सद्‌गृहस्थहो, तपासणी चालली असताना मी तुमच्या अंगावर ओरडलो याबद्दल माझ्यावर राग मात्र धरू नका. हंः, त्या वेळपर्यंतही मी तितकाच मूर्ख होतो... पुढल्याच क्षणी मी एक कैदी होईन, पण आता एक स्वतंत्र मनुष्य म्हणून मी दमीत्रि कारमाझफ शेवटचा म्हणून आपला हात तुमच्यापुढं करतो. तुम्हाला रामराम, सर्व माणसांना माझा रामराम."

त्याचा स्वर कंप पावला आणि त्याने आपला हात पुढे केला. पारफेनोविच त्याच्या जवळच योगायोगाने उभा होता, पण त्याने एकदम जवळजवळ बावरल्यासारखा होऊन आपले हात आपल्या मागे लपविले. मीत्याच्या ते तत्काळ नजरेला आले, आणि तो दचकला. त्याचा पुढे केलेला हात एकदम खाली गळला.

" प्राथमिक चौकशी अजून संपलेली नाही," निकोलाय पारफेनोविच अडखळला, तो काहीसा गोंधळला. " आम्ही ती शहरात पुढं चालविणार आहो, आणि

अर्थात् मी माझ्याकडून..तुमच्या बचावात तुम्हाला यश मिळावं अशी इच्छा करायला तयार आहे....दमीत्रि फ्योदरोविच, खरं सांगायचं तर माझ्या मनाची प्रवृत्ती नेहमीच तुम्हाला दोषी म्हणण्यापेक्षा एका परीनं अत्यंत दुर्दैवी समजण्याकडं राहिली आहे. आम्ही इथं असलेले सगळे, जर सगळ्यांच्या वतीनं बोलण्याचं धाडस मी करायचं म्हटलं तर, आम्ही सगळे तुम्ही मुळात एक अब्रूदार तरुण गृहस्थ आहात, पण दुःखाची गोष्ट म्हणजे भावनावेगांनी काहीशा अतिरेकाला गेलेले आहात, हे कबूल करायला तयार आहोत..."

निकोलाय पारफेनोविचची लहानशी आकृती त्याने आपले बोलणे संपविले त्या वेळी निश्चितच उमदी दिसली. मीत्याच्या एकदम मनात आले की, दुसऱ्याच क्षणी हा 'पोरगा' आपला हात धरून आपल्याला दुसऱ्या एका कोपऱ्यात घेऊन जाईल अन् आपले 'मुली'च्या संबंधाचे बोलणे पुढे चालू करील. पण फाशीकडे जातानासुद्धा पुष्कळ, अगदी विसंगत अन् अप्रासंगिक विचार कैद्याच्याही मनात केव्हा केव्हा येतात.

"सद्गृहस्थहो, तुम्ही सज्जन आहात, तुम्ही दयाळू आहात, शेवटचा निरोप घ्यायला मी 'तिला' भेटू शकेन का?" मीत्याने विचारले.

"खात्रीनं पण, विचार करता, अं, खरं म्हणजे... ही गोष्ट आमच्या देखतच..."

"हो हो, तसं म्हणाल तर तसं!"

ग्रूशिंकाला आत आणण्यात आले, पण निरोप घेणे थोडक्यात आणि थोडक्या शब्दांत आटोपले अन् त्यानं निकोलाय पारफेनोविचचे बिलकूल समाधान झाले नाही. ग्रूशिंकाने मीत्याला अतिशय लवून प्रणाम केला.

"मी तुला म्हटलं आहे की मी तुझी आहे, अन् मी तुझीच राहीन. मी निरंतर तुझ्या मागं येईन, मग ते तुला कुठंही पाठवोत. नमस्कार, तुझ्या सर्व नाशाचं कारण तुझा तूच असलास, तरी तू निरपराध आहेस."

तिचे ओठ थरथरू लागले, तिच्या डोळ्यांतून अश्रू गळू लागले.

"क्षमा कर मला, ग्रूशा मी तुझ्यावर प्रेम केलं याबद्दल मला क्षमा कर, माझ्या प्रेमानं मी तुझाही सर्वनाश केला याबद्दल मला क्षमा कर."

मीत्या काही बोलला असता, पण त्याने एकदम बोलणे थांबविले अन् तो बाहेर गेला. त्याच्यावर नजर ठेवून असणाऱ्या लोकांनी लगेच त्याला वेढले. आदल्या दिवशी ज्या पायऱ्यांच्या तळाशी तो आंद्रेच्या तीन घोड्यांची गाडी घेऊन दिमाखाने आला होता, तिथे आता दोन गाड्या तयार होऊन राहिल्या होत्या. मावरिकी मावरिक्येविच, एक मजबूत जाडजूड मनुष्य, चेहेऱ्यावर सुरकुत्या पडलेला, कशामुळे तरी बिथरला होता, काही तरी चूक झालेली होती. तो रागाने मोठ-

मोठ्याने ओरडत होता. त्याने मीत्याला काहीशा फाजील कठोरपणाने गाडीत चढून बसायला सांगितले.

"या माणसाला मी खाणावळीत दारू पाजीत होतो, त्यावेळी याचा मुखवटा काही वेगळा होता," आत शिरताना मीत्याच्या मनात आले. फाटकापाशी लोकांची गर्दी जमली होती, त्यात शेतकरी, स्त्रिया अन् गाडीवान होते. त्रिफोन बोरिस्सोविचही पायऱ्या उतरून खाली आला. सर्वजण मीत्याकडे पाहत राहिले.

"मी जातो, मला माफ करा, भल्या लोकांनो!" मीत्या गाडीतून एकदम ओरडून म्हणाला.

"आम्हालाही माफ करा!" दोन तीन आवाज त्याने ऐकले.

"तुमचाही निरोप घेतो, त्रिफोन बोरिस्सोविच!"

पण त्रिफोन बोरिस्सोविचने मागे वळूनसुद्धा पाहिले नाही. तो कदाचित फार कामात असावा. तोही कशाबद्दल तरी ओरडत अन् गडबड करीत होता. दुसऱ्या गाडीत सर्व काही अजून तयार नव्हते असे दिसले, त्या गाडीतून दोन पोलिस-शिपायांसह मावरिकी मावरिक्येविच जाणार होता. ती दुसरी गाडी हाकून नेण्याचा ज्याला हुकूम करण्यात आला होता तो आपला डगला चढविताना 'आता माझी पाळी नाही, आकीमची आहे' असे मोठमोठ्याने, आग्रहाने सांगत होता. पण आकीम कुठेच दिसत नव्हता! त्याला पाहण्यासाठी लोक धावले. त्या शेतकऱ्याने हट्टच धरला आणि 'थांबा' म्हणून त्यांना विनवणी केली.

"कसे आमचे हे खेड्यातले लोक आहेत पाहा, मावरिक्येविच, त्यांना काही लाजलज्जा नाही!" त्रिफोन बोरिस्सोविच उद्गारला. "आकिमनं तुला पंचवीस कोपेक परवा दिवशी दिले. त्याची तू सर्व दारू प्यालास, अन् आता तू रडतोस होय, आमच्या या हलकट खेडूतांशी तुमचा हा सज्जनपणाचा व्यवहार बघून मला खरोखर आश्चर्य वाटतं,मावरिक्येविच, एवढंच मी म्हणतो झालं."

"पण आपल्याला दुसऱ्या गाडीची गरज काय?" मीत्या म्हणाला. "एकीतूनच आपण जाऊ या, मावरिकी मावरिक्येविच. मी दंगामस्ती करणार नाही, मी पळून जाणार नाही, म्हातारबुवा. आपल्याला बरोबर शिपाई असण्याची गरज काय?"

"माझ्याशी कसं बोलावं हे तुम्ही जर कधी शिकला नसाल तर मला ते तुम्हाला शिकण्याची तसदी द्यावी लागेल. महाशय, तुम्ही मला 'म्हातारबुवा' म्हणण्याचं कारण नाही, आणि तुमचा सल्ला दुसऱ्या कुणाला तरी देण्यासाठी तुमच्यापाशीच ठेवा!" मावरिकी जंगलीपणाने तोडून बोलला, जणू त्याला आपला राग काढण्याचा आनंद वाटत होता.

मीत्या गप झाला. त्याचा सबंध चेहरा लाल झाला. क्षणभरातच त्याला

एकदम अतिशय थंडी वाजू लागली. पाऊस थांबला होता, पण कोंदटलेले आकाश अजून ढगांनी भरलेले होते, अन् झोंबणारा वारा सरळ तोंडावर येऊन आपटत होता.

"मला थंडी वाजून आली आहे." मीत्या आपले खांदे आखडून मनाशी म्हणाला.

शेवटी मावरिकी मावरिक्येविचही गाडीत चढला, बोजडपणे बसला, आणि जणू लक्ष न दिल्याप्रमाणे मीत्याला त्याने कोपऱ्यात रेटले. खरी गोष्ट अशी की, त्याचा मिजास गेलेला होता आणि त्याच्यावर लादण्यात आलेले हे काम त्याला मुळीच आवडले नव्हते.

"नमस्कार, त्रिफोन बोरिस्सोविच!" मीत्या पुन्हा ओरडला, आणि त्याचे त्यालाच वाटले की, या खेपेला आपण ओरडलो ते भलेपणाने नव्हे तर तिरस्काराच्या भावनेने आपसुक ओरडलो.

पण त्रिफोन बोरिस्सोविच ताठरपणे उभा होता, त्याने आपले दोन्ही हात मागं घेतले होते, आणि तो मीत्याकडे सरळ नजर लावून कठोर अन् रागीट चेहेऱ्याने पाहत होता, त्याने प्रत्युत्तर केले नाही.

"नमस्कार, दमीत्रि फ्योदरोविच, नमस्कार!" एकदम त्याला काल्गानफचा आवाज ऐकू आला, तो एकदम घुसून पुढे आला होता. गाडीपाशी धावत येऊन त्याने मीत्यापुढे आपला हात केला. त्याच्या डोक्यावर टोपी नव्हती. मीत्याला त्याचा हात धरून दाबण्याला सवड मिळाली.

"नमस्कार, दोस्ता! तुझा उदारपणा मी विसरणार नाही," तो प्रेमाने म्हणाला.

पण गाडी चालू झाली आणि त्यांचे हात सुटले. घंटी वाजू लागली अन् मीत्या गाडीतून भरधाव चालला.

काल्गानफ पळत परत गेला, पण एका कोपऱ्यात जाऊन बसला, आपली मान त्याने खाली केली, आपल्या हातांनी तोंड झाकून घेतले, आणि तो ओक्साबोक्शी रडू लागला. बराच वेळ तो तसाच रडत बसला होता. जणू तो वीस वर्षांचा तरुण नसून लहान बालक होता. अरेरे, तो मीत्याला जवळजवळ निःसंशयपणे गुन्हेगार मानीत होता.

"काय हे लोक? असं झालं तर माणसांचं पुढं काय होणार? तो असंबद्धपणे, कडवट नाउमेदीने, निराश झाल्यासारखा होऊन उद्गारला. त्या क्षणी त्याची जगण्याची इच्छाच मावळली.

"जगण्यात काय अर्थ आहे? जगण्यात काय अर्थ आहे?" दुःखावेगाने तो तरुण उद्गारला.

भाग चौथा

विभाग १० वा

मुले

१

कोल्या क्रासोत्कीन

नोव्हेंबर महिन्याची सुरुवात होती. कडक थंडी पडली होती. तापमान अकरा डिग्री रोमर होते. बर्फ नव्हते, पण रात्री गारठलेल्या जमिनीवर थोडेसे कोरडे बर्फ पडले होते. आणि झोंबणारा कोरडा वारा ते बर्फ उचलून घेऊन आमच्या शहराच्या रस्त्यांवरून उडवून नेत होता. विशेषतः बाजारपेठेत. सकाळ उदासवाणी वाटत होती पण बर्फ पडायचे थांबले होते.

बाजारपेठेपासून जवळच प्लोत्निकोवच्या दुकानालगत एक लहानसे घर होते. ते आतून न् बाहेरून अगदी स्वच्छ होते.ते घर मादाम क्रासोत्कीनचे होते. ती विधवा होती आणि तिचा नवरा हा माजी प्रांत—सचिव होता. तो मरून आता चौदा वर्षे झाली होती. ही बत्तीस वर्षांची विधवा बाई दिसायला सुंदर होती; आणि आपल्या टुमदार घरात स्वतःच्या खाजगी उत्पन्नावर राहत होती. ती अब्रूदार रीतीने एकटी राहत होती; ती मृदू पण बरीच आनंदी वृत्तीची होती. तिचा नवरा मेला त्यावेळी ती साधारणपणे अठरा वर्षांची होती. तिचे लग्न होऊन नुकतेच वर्ष झाले होते अन् त्याच्यापासून तिला एक मुलगा झालेला होता. पतीचा मृत्यू झाला त्या दिवसापासून तिने आपल्या बहुमोल ठेव्याचा सांभाळ अन् पालनपोषण करण्यासाठी आपले सर्वस्व वाहिले होते. तिच्या मुलाचे नाव होते कोल्या. ही चौदा वर्षे जरी तिने त्याच्यावर अतिशय प्रेम केले होते, तरी त्याने तिला सुखाऐवजी बरेचसे दुःखच दिले होते. जवळजवळ दररोज त्याच्यामुळे तिचा भयाने थरकाप होई अन् तिला घेरी आल्यासारखी होई. तो आजारी पडेल, त्याला सर्दी होईल, तो काही तरी खोडकरपणा करील, खुर्चीवर चढेल अन् खाली पडेल अशी नाना प्रकारची भीती तिला वाटे. कोल्या शाळेत जाऊ लागला तेव्हा तिने स्वतः त्याच्याबरोबर सर्व विषयांचा अभ्यास करायला सुरुवात केली. हेतू हा की त्याला मदत व्हावी, अन् त्याचे धडे त्याच्याबरोबर करावे. तिने लागलीच शिक्षकांच्या अन् त्यांच्या बायकांच्या ओळखी करून घेतल्या. त्याच्या शाळकरी सोबत्यांच्याही ओळखी करून घेतल्या.

आणि त्यांचे लाडही केले. अशा आशेने की, कोल्याला त्यांनी सतावू नये. त्याची हुर्यो करू नये किंवा त्याला मारू नये. ती इथपर्यंत गेली की तिच्या या करण्यामुळे मुले त्याला चिडवू लागली अन् त्याला 'आईचं लाडकं' म्हणून टोमणे मारू लागली.

पण या मुलाला स्वतःचे कर्तृत्व होते. तो निश्चयी स्वभावाचा मुलगा होता, भयंकर दणकट म्हणून त्याची त्याच्या वर्गात ख्याती होती, अन् लवकरच त्याचा प्रत्यय आला. तो चपळ, प्रबळ इच्छाशक्तीचा आणि उद्दाम अन् धाडसी स्वभावाचा होता. तो आपल्या अभ्यासात चांगला होता. आणि शाळेत अशी बोलवा होती की तो आपले शिक्षक दार्दानेलोव यांचा गणित अन् जागतिक इतिहास या विषयात पराभव करू शकेल. तो जरी प्रत्येकाकडे तुच्छतेने पाही, तरी तो चांगला सवंगडी होता आणि तोरा मिरविणारा नव्हता. शाळासोबती त्याला जो आदर दाखवीत तो योग्यच आहे असे समजून तो त्याचा स्वीकार करी, त्यांच्याशी दोस्तीने वागे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याला मर्यादा कुठं संपते हे चांगलं समजे. प्रसंगी तो स्वतःला आवर घालू शके, आणि आपल्या शिक्षकांच्याशी संबंध ठेवतांना ज्या मर्यादेच्या पलीकडे गेले की मस्करीला अक्षम्य शिस्तभंगाचे रूप येते, ती उघड न दिसणारी अंतिम मर्यादा तो कधीही ओलांडीत नसे. पण शाळेतल्या लहानात लहान मुलाप्रमाणेच जमेल तिथे खोडी काढण्याची त्याला आवड होती आणि खोडी काढण्याकरिता म्हणूनच नव्हे पण गडबड उडवून देण्याकरिता म्हणून तो काही तरी शोधून काढी, काही परिणामकारक अन् नजरेत भरेल असे करी. तो अतिशय गर्विष्ठ होता, आपल्या आईलासुद्धा आपल्यापुढे कसे वाकायला लावावे ते त्याला माहीत होते. तिच्यावर आपले वर्चस्व ठेवण्याच्या बाबतीत तो अगदी हुकूमशहा होता. ती त्याच्यापुढे वाके, काय सांगावे, ती वर्षानुवर्षे त्याच्यापुढे वाकतच आली होती. असह्य असा एकच विचार तिच्या मनात होता. तो म्हणजे आपल्या मुलाचे आपल्यावर फारसे प्रेम नाही हा. तिच्या मनात नेहमी येई की कोल्याला आपल्याबद्दल काही वाटत नाही आणि कधी कधी, ओक्साबोक्शी रडत ती त्याला त्याच्या सहानुभूतिशून्यतेबद्दल खूप बोले. मुलाला ते आवडायचे नाही, आणि त्याने माया दाखवावी म्हणून जितका ती अधिक आग्रह धरी तितका तो मुद्दाम अधिक दुर्लक्ष करी. हे तो जाणून बुजूनच करीत होता असे नव्हे, ते सहजच होत होते— तो त्याचा स्वभावच होता. या बाबतीत त्याच्याबद्दल त्याच्या आईची गैरसमजूत होती; खरे म्हणजे त्याला आईचा फारच लळा होता. त्याला फक्त 'नेभळट हळवेपणा'चा तिटकारा होता, तशा शब्दात आपल्या शाळकरी भाषेत हे तो प्रकट करी.

त्या घरात एक पुस्तकांचे कपाट होते, त्यात त्याच्या बापाची काही पुस्तके होती. कोल्याला वाचनाचा नाद होता, आणि त्यातली अनेक पुस्तके त्याने आपण होऊन वाचली होती. त्याच्या आईची त्याला हरकत नव्हती, आणि कित्येकवेळा

तो मुलगा खेळायला जाण्याऐवजी तासन् तास त्या कपाटापाशी उभे राहून एखाद्या पुस्तकात रमलेला पाहून तिला आश्चर्यच वाटे. आणि अशा रीतीने कोल्याने त्याच्या वयाला न साजेशा अशा काही गोष्टी वाचल्या.

खोड्या करताना मर्यादा कुठे आखायची हे जरी त्या मुलाला हमखास माहीत होते, तरी अलीकडे तो अशा वात्रटपणाच्या गोष्टी करू लागला होता की त्यामुळे त्याच्या आईने धसकाच घेतला. तो जे करी त्यात दुष्टपणा नसे हे खरं, पण त्यात एक पिसाट अविचार असे.

त्या वर्षीच्या जुलै महिन्यात, उन्हाळ्याच्या सुटीच्या दिवसांत, आई अन् मुलगा, पंचेचाळीस मैलांवरच्या दुसऱ्या जिल्ह्यात एका दूरच्या नातेवाईक बाईकडे एक आठवडाभर राहायला म्हणून गेले होते, त्या बाईचा नवरा रेल्वे स्टेशनावर एक अधिकारी होता (आमच्या शहराला सर्वांत जवळचे असे हेच स्टेशन होते अन् यानंतर एक महिन्याने इवान फ्योदरोविच कारमाझफ याच स्टेशनावरून मॉस्कोला गेला होता.) तिथे कोल्याने रेल्वेशी संबंधित असलेल्या बारीकसारीक गोष्टींची माहिती करून घ्यायला सुरुवात केली. आपण घरी परत गेलो म्हणजे आपल्या शाळेतल्या सोबत्यावर आपल्या या नव्या मिळविलेल्या ज्ञानाने वजन मारू हे त्याला माहीत होते. पण तिथे दुसरी काही मुले त्याला भेटली. त्यांच्याशी लवकरच त्याची दोस्ती झाली. त्यांतली काही स्टेशनात राहात होती, दुसरी काही शेजारच्या भागात राहत होती; ती सहा की सात मुले होती, सगळी बारा ते पंधरा वर्षांच्या दरम्यानची अन् त्यांतले दोघे आमच्या शहरातलेच होते. ही मुले एकत्र खेळत आणि कोल्याच्या स्टेशनावरच्या मुक्कामातल्या चौथ्या की पाचव्या दिवशी, त्या मूर्ख पोरांनी एक वेडगळ पैज मारली. कोल्या हा त्यांच्यातला जवळजवळ सर्वांत धाकटा अन् त्यामुळे सर्वांच्याकडून जरा अवहेलनेनेच पाहिला जायचा, त्याच्या अंगात प्रौढीने म्हणा किंवा बेफिकीर बढाईखोरीने म्हणा संचार झाला आणि त्याने दोन रुबलांची पैज मारली की जेव्हा रात्रीची अकरा वाजताची गाडी येते त्यावेळी आपण दोन रुळांत पडून राहू आणि गाडी आपल्यावरून भरवेगाने निघून जाईपर्यंत तिथे न हलता पडून राहू. त्यांनी अगोदर जाऊन तपास करून ठेवला होता त्यावरून, असे आढळून आले होते वरून जरी गाडी गेली तरी अंगाला स्पर्श होणार नाही अशा रीतीने रुळांच्यामध्ये जमिनीसरशी पडून राहणे शक्य आहे पण जरी तसे तिथे पडून राहाणे म्हणजे काही थट्टा नव्हती! आपण पडून राहूच असे कोल्या सांगत राहिला. पहिल्याप्रथम ती मुले त्याला हसली, त्याला त्यांनी खोटारडा म्हटले, भंपक म्हटले, पण त्याने तो अधिकच चेवला. त्याचे माथे जास्तीत जास्त भडकले ते, या पंधरा वर्षांच्या पोरांनी त्याच्याकडे बघून फारच तोऱ्याने नाके उडविली अन् त्याला प्रथम 'एक चिमुरडं पोरगं,' आमच्यात मिसळण्याची याची लायकी नाही असे म्हणून त्याला वागवायला सुरुवात केली त्यामुळे.

आणि म्हणून असे ठरविण्यात आले की, त्या दिवशी संध्याकाळी, स्टेशनापासून अर्धा मैल दूर जायचे, म्हणजे गाडीला पुरता वेग यायला वेळ मिळालेला असेल. मुले जमली. ती अगदी अंधारी अमावास्येची रात्र होती. ठरलेल्या वेळी, कोल्या दोन रूळांच्या मध्ये जाऊन पडून राहिला. ज्या इतर पाच जणांनी पैज लावली होती ती मुले रेल्वेच्या बाजूला खाली झुडुपात वाट पाहात राहिली, त्यांच्या छातीत पुढच्या भीतीने धडधड होत होती, अन् त्यांना भयंकर धसका बसून पश्चात्ताप होत होता. शेवटी गाडीने स्टेशन सोडल्याचा धडधडाट दुरून त्यांच्या कानांवर आला. अंधारात दोन लाल दिवे चमकले; ते धूड जवळ येऊ लागले तसे भयंकर गरजू लागले.

"पळ, पळ, रूळातून ऊठ" मुले कोल्याला उद्देशून त्या झुडुपातून ओरडली, भीतीने त्यांचा श्वास कोंडला. पण आता फारच उशीर झाला होता; गाडी वेगाने आली अन् त्याला ओलांडून पुढे निघून गेली. मुले कोल्याकडे धावत गेली. तो बिलकुल हालचाल न करता पडला होता. ती त्याला ओढू लागली, उचलू लागली. तो एकदम उठून उभा राहिला अन् एक शब्दही न बोलता चालू लागला. नंतर त्याने सांगितले की आपण तिथे त्यांना भिवविण्याकरिता बेशुद्ध होऊन पडून राहिल्याचे सोंग केले होते. पण खरी गोष्ट अशी होती की त्याची शुद्धी खरोखरच गेली होती, त्याने बऱ्याच दिवसांनी मागाहून आपल्या आईजवळ ते कबूल केले. अशा रीतीने 'साहसी महापुरुष' म्हणून त्याची कायमची प्रसिद्धी झाली. तो स्टेशनाकडे घरी परतला तेव्हा पालीसारखा पांढरा फटक पडला होता. दुसऱ्या दिवशी त्याला मज्जातंतूंवर ताण पडल्याचा थोडासा ताप आला, पण तो खूप उत्साहात होता अन् स्वतःवर फार खूष होता. ही घटना काही लगेच सर्वांना कळली नाही, पण ते जेव्हा परत शहरात आले तेव्हा ती शाळेत हळू हळू पसरली, अन् शिक्षकांच्याही कानी गेली. पण मग कोल्याची आई लगेच आपल्या मुलाची बाजू घेऊन शिक्षकांचे आर्जव करण्याकरिता गेली, आणि शेवटी दार्दानेलोव, जे प्रतिष्ठित अन् वजनदार शिक्षक होते, त्यांनी त्याच्या बाजूने आपले वजन खर्च केले, आणि ती बाब दृष्टीआड केली गेली.

दार्दानेलोव हे मध्यमवयीन अविवाहित गृहस्थ होते, गेली अनेक वर्षे क्रासोत्कीनवर त्यांचे उत्कट प्रेम जडलेले होते, आणि यापूर्वी, म्हणजे एक वर्षापूर्वी एकदा त्यांनी भीत भीत अन् आपल्या भावना उघड करण्याच्या संकोचाने कापत कापत अत्यंत आदरपूर्वक तिच्याशी लग्न करण्यास आपण तयार आहोत, असे सांगण्याचे धाडस केले होते. पण त्यांच्याशी लग्न करणे म्हणजे आपल्या मुलाशी बेइमानी करण्यासारखे आहे, अशा भावनेने तिने त्यांना निग्रहाने नकार दिला होता; मात्र काही सूक्ष्म लक्षणांवरून त्या मोहक पण अत्यंत सच्छील अन् सहृदय विधवेला आपण नकोसे वाटत नाही असे मानण्याला जागा आहे असे दार्दानेलोवना

वाटत होते. कोल्याच्या माथेफिरू खोडीने मधला संकोचाचा आडपडदा दूर झाल्या-सारखा झाला, आणि त्यांनी केलेल्या मध्यस्थीचे काही आशादायक चिन्हांनी बक्षिस मिळाले. ही चिन्हे अस्पष्ट होती हे खरं, पण दार्दानेलोव हे शुद्धतेच्या अन् सभ्यतेच्या बाबतीत इतके उच्च आदर्शवादी गृहस्थ होते की तेवढ्यानेच ते काही काळ पुरते संतुष्ट झाले. त्यांना त्या मुलाचा लळा होता, परंतु त्याला आपलेसे करण्याचा प्रयत्न करणे हे त्यांना न शोभेसे वाटले असते, आणि म्हणून ते वर्गात त्याच्याशी कडकपणे अन् करडेपणाने वागत. कोल्याही त्यांच्याशी बेताबेतानेच वागत असे. तो आपला अभ्यास अत्यंत व्यवस्थित करी; तो आपल्या वर्गात दुसरा होता. दार्दानेलोवशी तो संकोचाने वागे, आणि साऱ्या वर्गाचे दृढ मत होते की कोल्या जागतिक इतिहासात इतका चांगला आहे की दार्दानेलोवांचासुद्धा तो पराभव करू शकेल; कोल्यानं खरोखरच एकदा त्यांना प्रश्न विचारला होता. की " ट्रॉय कोणी स्थापन केलं ? " याला दार्दानेलोवनी अतिशय गुळमुळीत असे उत्तर दिले होते, त्यांनी वेगवेगळ्या मानववंशांच्या हालचालींचा अन् त्यांच्या देशांतरांचा, तो काळ फार प्राचीन असल्याचा, अन् पौराणिक कथांचा, उल्लेख केला पण " ट्रॉय शहर कुणी स्थापन केलं ? " म्हणजे कोणा व्यक्तींनी, ते त्यांना सांगता आले नाही, आणि तो प्रश्नही त्यांना निरुपयोगी अन् निरर्थक वाटला. पण मुलांचे मात्र निश्चित मत झाले की दार्दानेलोवना ट्रॉय कुणी स्थापन केले हे माहीत नाही. कोल्याने स्माराग्दोवच्या इतिहासात ट्रॉयचे संस्थापक कोण ते वाचले होते, ते पुस्तक त्याच्या वडिलांच्या पुस्तकांच्या कपाटात होते. शेवटी सर्वच मुलांना, ट्रॉय कुणी स्थापन केले या प्रश्नात औत्सुक्य उत्पन्न झाले, पण क्रासोत्कीन आपले गुपित फोडायला तयार नव्हता, आणि ज्ञानाच्या बाबतीतला त्याचा लौकिक कायम राहिला.

आगगाडीचा तो प्रसंग घडल्यानंतर कोल्याच्या आपल्या आईशी वागण्यात एक विशेष प्रकारचा फरक पडला. ॲना फ्योदरोवना (मादाम क्रासोत्कीन)ने आपल्या मुलाचा पराक्रम ऐकला, तेव्हा भीतीने ती वेडीच झाल्यासारखी झाली. तिला वाताचे असे भयंकर झटके येऊ लागले, अन् मधून मधून दिवसाच्या दिवस टिकून राहू लागले की कोल्या शेवटी अतिशय घाबरून गेला, आणि त्याने शपथपूर्वक वचन दिले की अशा खोड्या आपण पुन्हा कधी करणार नाही. त्याने, मादाम क्रासोत्कीनच्या सांगण्यावरून देवीच्या मूर्तीसमोर गुडघे टेकून आणि आपल्या वडिलांचे स्मरण करून शपथ घेतली, आणि एवढा 'मर्द' कोल्या पण एखाद्या सहा वर्षांच्या पोरासारखा रडू लागला. तो सारा दिवस आई आणि लेक एक-सारखी एकमेकांना मिठी मारून रडत राहिली. दुसऱ्या दिवशी कोल्या पूर्वीप्रमाणेच 'बेदरकार' होऊन उठला, पण तो अधिक मूक, अधिक करडा अन् अधिक विचारी झाला होता.

सहा आठवड्यांनंतर, तो दुसऱ्या एका प्रसंगात सापडला ही गोष्ट खरी.

त्याने त्याचे नाव आमच्या शहराच्या 'जस्टिस ऑफ द पीस' यांच्या कानापर्यंतही गेले, पण हा प्रसंग अगदी वेगळ्या स्वरूपाचा, गंमतीदार, मूर्खपणाचा होता अन् त्यात त्याचा प्रमुख भाग नसून तो फक्त त्यात गोवला गेला होता, असे दिसून आले. पण त्यासंबंधी मागाहून सांगू. त्याची आई पुन्हा रागावली, भयाने कापू लागली; पण जितकी अधिक अस्वस्थ ती होई, तितक्या दार्दानेलोवच्या आशा वाढत. दार्दानेलोवच्या मनात काय आहे हे कोल्याला समजत होते अन् त्याने ते हेरले होते हे लक्षात घेतले पाहिजे. आणि अर्थातच त्यांच्यातल्या त्या 'भावनां' मुळे त्याला त्यांचा विलक्षण तिरस्कारही वाटला. यापूर्वी आपला हा तिरस्कार आपल्या आईच्या पुढ्यात दाखविण्याचा अव्यवहारीपणा तो करीत असे. दार्दानेलोव कशाच्या मागे आहेत हे आपल्याला माहीत आहे हे त्याने संदिग्ध रीतीने सूचित केले होते. पण आगगाडीचा प्रसंग घडल्यानंतर त्याची या बाबतीतली वागणूकही बदलली; त्याने चुकूनही त्या विषयाचा आपल्याकडून उल्लेख होऊ दिला नाही आणि आपल्या आईपुढे तो दार्दानेलोवसंबंधी अधिक आदरपूर्वक बोलू लागला. त्या संवेदनशील मनाच्या स्त्रीला फार बरे वाटले आणि अतिशय कृतज्ञताही वाटली. पण कोल्याच्या देखत एखाद्या पाहुण्याने दार्दानेलोव यांचा नुसता उल्लेख करताच तिच्या गालावर गुलाबांची लाली येऊ लागली. अशावेळी कोल्या चिडखोर मुद्रेने खिडकीच्या बाहेर पाहू लागे किंवा आपले बूट कसे आहेत ते पाहू लागे, किंवा आपला मोठा, केसाळ, खरजुला कुत्रा 'परेझ्वोन' याला रागारागाने ओरडून हाका मारू लागे; हा कुत्रा त्याने एक महिन्यापूर्वी रस्त्यातून उचलून घरी आणला होता अन् काही कारणाने घरातच लपवून ठेवला होता, आपल्या शाळेतल्या कोणाही मुलांना त्याने तो दाखविला नव्हता. तो त्याला भयंकर त्रास देई, नाना तऱ्हेचे खेळ त्याला शिकवी, त्यामुळे तो शाळेत गेलेला असला म्हणजे ते गरीब बापडे कुत्रे सूर काढून ओरडत राही, आणि जेव्हा तो येई तेव्हा आनंदाने केविलवाणा आवाज काढून रडे, वेडे झाल्याप्रमाणे त्याच्या भोवती भोवती धावे, तोंड वर करी, मेल्याचे सोंग करून जमिनीवर पडून राही वगैरे वगैरे; नव्हे, त्याने त्याला शिकविलेले सर्व खेळ करामतीने करून दाखवी, त्याच्या हुकुमाने नव्हे तर आपल्या उत्फुल्ल अन् कृतज्ञ अंतःकरणाच्या आतुरतेने.

हो, मी हे सांगायचं विसरलोच की कॅप्टन स्नेगिर्योवचा मुलगा म्हणून ज्याची वाचकाला यापूर्वीच ओळख झाली आहे त्याने ज्या मुलावर चाकूचा वार केला होता. तो मुलगा कोल्या क्रासोत्कीन होता. इल्यूशा आपल्या बापाचा बचाव करीत होता अन् त्यावेळी शाळेतली पोरे, 'झाडूचा कुंचा' या टोपणनावाने ओरडून त्याची हुर्ये करीत होती.

२

मुले

त्या नोव्हेंबरातल्या, एका बर्फाळ, वादळी दिवशी कोल्या क्रासोत्कीन घरी बसला होता. त्या दिवशी रविवार होता अन् शाळा नव्हती. नुकतेच अकरा वाजले होते आणि तो 'अतिशय निकडीच्या कामा' करिता बाहेर जाण्याच्या फिकिरीत होता. पण त्याच्या एकट्यावरच घराची जबाबदारी पडलेली होती. कारण योगायोगाने असे झाले होते की, घरातली सर्वच वडील मंडळी काही आकस्मिक अन् विशेष प्रसंगामुळे बाहेर गेलेली होती. मादाम क्रासोत्कीनने आपल्या घरातल्या दोन लहानशा खोल्या एका डॉक्टरच्या बायकोला भाड्याने दिल्या होत्या आणि ती आपल्या दोन लहान मुलांना घेऊन तिथे राहत होती. या खोल्या अन् बाकीचे घर यांच्यामध्ये वाट होती. ही बाई ॲना फ्योदरोव्हनाच्याच वयाची होती अन् तिची फार जवळची मैत्रीण होती. तिचा डॉक्टर नवरा बारा महिन्यांपूर्वी निरोप घेऊन गेला होता. तो प्रथम ओरेनबुर्गला अन् नंतर ताश्कंदला गेला होता. पण गेले सहा महिने त्याच्याकडून एक अक्षरही तिला कळले नव्हते. मादाम क्रासोत्कीनशी तिची मैत्री होती म्हणून बरे, तेवढा त्या परित्यक्त स्त्रीच्या मनाला काहीसा विरंगुळा होता, नाही तर त्या बाईचे आयुष्य खात्रीने अश्रू गाळीत सरले असते. आणि आता तिच्या दुर्दैवात भर म्हणूनच की काय, तिची एकुलती एक नोकर बाई कतिरीना हिनं एकदम येऊन आपल्या मालकिणीच्या कानांवर घातले की उद्या सकाळच्या आत आपल्याला मूल होणार आहे; मालकीण चकितच झाली. आपल्याला या गोष्टीचा पूर्वीच काही कसा सुगावा लागला नाही याचा प्रत्येकाला चमत्कारच वाटला. चकित झालेल्या डॉक्टरच्या बायकोने अजून, वेळ आहे तोपर्यंत शहरात एका सुईणीने अशा प्रसंगाकरिता काढलेल्या दवाखान्यात कातिरीनाला हलवावे असे ठरविले. तिला आपल्या नोकराणीची फार किंमत वाटत असल्यामुळे तिने हा बेत तत्काळ अंमलात आणला. आणि ती तिच्या देखरेखीकरिता तिकडे राहिली. मादाम क्रासोत्कीनला तिच्याबद्दल स्नेहयुक्त सहानुभूती होतीच, म्हणून त्या भावनेने व तिच्यात उत्साह असल्यामुळे तिला स्वतः मदत करण्याकरिता व त्या कामी कोणाची मदत मागण्याकरिता तीही सकाळी तिकडे गेली.

त्यामुळं दोन्ही स्त्रिया घरात नव्हत्या; क्रासोत्कीनची नोकर बाई आगाफ्या बाजारात गेली होती, आणि एकटा कोल्या काही काळ घरात 'छोट्या मुलां'ना संभाळण्याकरिता म्हणून राहिला होता; "छोटी मुलं" म्हणजे डॉक्टराच्या बायकोचा मुलगा अन् मुलगी. ती दोघे एकटीच घरात राहिली होती. कोल्याला घराकडे लक्ष ठेवण्याची भीती वाटत नव्हती; शिवाय त्याच्याकडे परेझ्वोन

होताच, त्याला त्याने दिवाणखान्यांमधल्या बाकाखाली न हालता भुईसपाट पडायला सांगितले होते; त्या कुत्र्याने आपले डोके नाखुषी दाखविण्याकरिता हालविले, आणि आपल्या शेपटीचे दोन मोठे अन् याचना करणारे सपाटे जमिनीवर मारले, पण दुःखाची गोष्ट ! त्याची सुटका करणारी शीळ वाजली नाही. त्या दुर्दैवी कुत्र्याकडे कोल्याने डोळे वटारून बघितले, त्या बरोबर तो परत आज्ञाधारकपणाने त्या अवघडलेल्या अवस्थेत पडून राहिला. कोल्याला चिंता वाटत होती ती त्या ' छोट्या मुलां ' ची. कातिरीनावर आकस्मिक आलेल्या प्रसंगासंबंधाने त्याला अर्थात् अतिशयच तिरस्कार वाटत होता, पण त्याला त्या एकाकी पडलेल्या 'छोट्यां' चा फार लळा होता, अन् त्याने त्यांना एक चित्राचे पुस्तकसुद्धा नेऊन दिले होते. मोठी मुलगी नास्त्या आठ वर्षांची होती. तिला वाचता येत होते आणि मुलगा कोस्त्या सात वर्षांचा होता. त्याला तिने आपल्याला वाचून दाखवावे अशी आवड होती. याहून अधिक लक्ष वेधणारी करमणुकीची साधने क्रासोत्कीनला त्यांना देता आली असती. त्याला त्यांना जोडीजोडीने उभे करून त्यांच्याशी शिपायांचा खेळ खेळत आला असता, किंवा त्यांना लपंडावाच्या खेळात घरभर लपू देता आले असते. त्याने तसे पूर्वी अनेक वेळा केले होते आणि आतासुद्धा तो ते करू शकत नव्हता असे नाही. इतके की एकदा शाळेत वार्ता पसरली होती की क्रासोत्कीन बिऱ्हाडातल्या लहान पोरांबरोबर घोडा घोडा खेळतो आणि लगाम लावलेल्या घोड्याप्रमाणे आपले तोंड एका बाजूला करून ऐटीत चालतो. पण क्रासोत्कीनने हा टोला परतवून लावला, तो म्हणाला, की आपल्याच वयाच्या म्हणजे तेरा वर्षांच्या मुलाशी घोडा घोडा खेळणे हे 'आजमितीला' निश्चितच लज्जास्पद होईल, पण मी ते 'छोट्या मुलां' च्यासाठी खेळतो, कारण मला ती मुले आवडतात आणि माझ्या भावनांबद्दल मला हटकण्याचा कुणालाही काही अधिकार नाही. ती दोन 'छोटी मुलं' तर त्याच्यावर विलक्षण प्रेम करीत.

पण यावेळी मात्र तो खेळायच्या मनःस्थितीत नव्हता. त्याच्यापुढे एक फार महत्त्वाचे असे, काहीतरी गूढ असल्यासारखे त्याचे स्वतःचे काम होते. मध्यंतरी वेळ तर चालला होता अन् अगाफ्या, जिच्याकडे त्याला त्या मुलांना सोपवून जाता आले असते, ती बाजारातून परत आली नव्हती. त्याने अनेक वेळा मधली वाट ओलांडून, बिऱ्हाडकरूंचे दार उघडून मुलांच्याकडे काळजीने पाहिले होते. ती ते पुस्तक पाहत बसली होती, त्यानेच त्यांना तसे सांगितले होते. त्याने दार उघडले की ती हसून त्याच्याकडे पाहात. त्यांना वाटे तो आत येईल अन् काहीतरी मजेदार अन् आनंददायक असं करील. पण कोल्या अगोदरच त्रासला होता, तो आत गेला नाही.

शेवटी अकराचे टोले पडले आणि त्याने आपल्या मनाशी निश्चितपणे ठरवले की जर अगाफ्या दहा मिनिटांत परत आली नाही तर तिची वाट न पाहता बाहेर

जायचे. अर्थात् त्या पोरांच्याकडून 'वचन' घ्यायचे की आपण बाहेर गेलो असताना ती भिणार नाहीत, खोड्या करणार नाहीत, भीतीने रडणार नाहीत. असा विचार करून त्याने आपला मांजरीच्या कातड्याची मऊ मऊ कॉलर असलेला थंडीचा ऊबदार अंगरखा अंगात चढवला, आपले पाकीट खांद्यावर अडकविले, आणि त्याच्या आईने वरचेवर विनवणी करून अशा थंडीच्या दिवसात नेहमी गलोशबूट घालीत जा म्हणून सांगितलेले असतानासुद्धा ते न मानता त्याने तो दिवाणखाना ओलांडून जातांना त्या बुटांकडे तुच्छतेने पाहिले आणि फक्त आपले नेहमीचे बूट घालून तो बाहेर गेला. त्याला बाहेर जाताना त्या पोषाखात बघून परेझ्वोन अस्वस्थपणाने आपली शेपटी जमिनीवर जोरजोराने आपटू लागला. सगळे अंग आखडून घेऊन तो केकाटलासुद्धा. पण कोल्याने आपल्या कुत्र्याची ही विलक्षण चुळबूळ बघून हा शिस्तीचा भंग आहे असे म्हटले आणि आणखी एक मिनिटभर त्याला त्या बाकाखाली तसेच ठेवले, आणि बाहेरच्या वाटेवर जाण्याकरिता जेव्हा त्याने दार उघडले तेव्हांच त्याने त्याला शीळ घातली. त्या कुत्र्याने एखाद्या पिसाळलेल्या जनावराप्रमाणे झेप घेतली अन् आनंदातिरेकाने त्याच्यापुढे उडी मारून तो धावला.

कोल्याने दार उघडून त्या छोट्या मुलांकडे पाहिले. ती दोघे पूर्वीप्रमाणेच टेबलाशी बसली होती, ती वाचीत नव्हती पण कशावर तरी जोरजोराने वाद करीत होती. ही मुले पुष्कळ वेळा जीवनातल्या उचंबळून टाकणाऱ्या निरनिराळ्या प्रश्नां-वर एकत्र बसून चर्चा करीत, अन् नास्त्या ही मोठी असल्यामुळे तिचेच म्हणणे शेवटी खरे ठरत असे. जर कोल्याला तिचे म्हणणे पटले नाही तर तो बहुधा पुष्कळदा कोल्या क्रासोत्कीनपुढे आपला वाद नेई अन् त्याचा निकाल ते दोघेही बिनचूक म्हणून मान्य करीत. या वेळची त्या छोट्यांची चर्चा क्रासोत्कीनला मजेदार वाटली, आणि तो ती ऐकत वाटेतच स्तब्ध उभा राहिला. तो ऐकतो आहे हे मुलांनी पाहिले अन् त्यामुळे ती आपला वाद अधिकच उत्साहाने करू लागली.

नास्त्या म्हणत होती, "म्हाताऱ्या बायांना परसातल्या बागेत, कोबींच्या वाफ्यात बाळं सापडतात. हे मला मुळ्ळी, मुळ्ळीसुद्धा खरं वाटत नाही. आत्ता हा हिवाळा आहे अन् बागेत कोबी पण नाही अन् म्हणून म्हातारीनं कतिरीनाला मुलगी आणून दिली असेल हे शक्य नाही.

कोल्या आपल्याशीच शीळ घालीत राहिला.

"नाहीतर असं असेल की त्या कुठून तरीं बाळं आणीत असतील, पण ज्यांचं लग्न झालं असेल त्यांनाच ती देत असतील."

कोल्या नास्त्याकडं टक लावून पाहात ऐकत होता, त्याचा काही गंभीर विचार चालला होता.

" नास्त्या, किती वेडी तू, " तो अखेर निश्चयपूर्वक अन् शांतपणे म्हणाला, " कातिरीनाचं लग्नच झालं नाही तर तिला ग कसं बाळ मिळणार ? "

नास्त्याला राग आला.

" तुला त्यातलं काही समजत नाही," ती चिडून ताडकन् त्याला म्हणाली. " तिला नवरा असेलच. फक्त तो तुरुंगात असेल एवढंच, म्हणून आता तिला बाळ मिळालं."

" पण तिचा नवरा तुरुंगात तरी आहे का ? " व्यवहारी कोस्त्याने गंभीरपणे विचारले.

" नाही तर, मी सांगते तुला काय ते." नास्त्या एकदम काही मनात येऊन त्याला मध्येच म्हणाली, तिने पहिल्यांदा जे जे मनात धरले होते ते पूर्णपणे बाजूला सारले न ती ते विसरून गेली. " तू म्हणतोस ते बरोबर, तिला नवरा नाही पण तिला लग्न करायचंय, अन् म्हणून ती किनई लग्न करायचा सारखा विचार करतेय. अन् त्याचा विचार करता करता तिला तो मिळाला, नवरा नव्हे, बाळ. "

" हं, तसंच असेल. " कोस्त्यानं पूर्णपणे पराजित होऊन कबूल केलं. " पण तू अगोदर तसं म्हणाली नव्हतीस. मग मला ग कसं सांगता येणार ? "

" अरे, पोरांनो, " कोल्या खोलीत पाऊल टाकीत म्हणाला, " तुम्ही भयंकर लोक आहात बुवा."

" अन् तुझ्याबरोबर परेझ्वोन ! " कोस्त्या हसून म्हणाला, अन् चुटक्या वाजवून तो परेझ्वोनला बोलावू लागला.

" मी एका अडचणीत आहे छोट्यांनो, " कोल्या गंभीर चेहेरा करून म्हणाला, " अन् तुम्ही मला मदत केली पाहिजे. अगाफ्या अजून आली नाही त्याअर्थी तिचा पाय मोडला असला पाहिजे, हे निश्चित. मला बाहेर गेलं पाहिजे. मला जायला तुमची परवानगी आहे का ? '

मुले सचिंत होऊन एकमेकांकडे बघू लागली. त्यांच्या हसऱ्या चेहेऱ्यांवर अस्वस्थपणाची चिन्हे दिसू लागली, पण आपल्याकडून याला काय पाहिजे याची त्यांना अजून पुरती कल्पना आली नव्हती.

" मी गेलो तर तुम्ही खोड्या नाही ना करणार ? कपाटावर चढून पाय मोडून नाही ना घेणार ? आम्ही एकटेच म्हणून भिऊन रडणार तर नाही ना ? "

मुलांच्या चेहेऱ्यावर अतिशय उदासपणाची छाया पसरली.

" अन् त्याचं बक्षिस म्हणून मी तुम्हाला एक जंमत दाखवीन, एक लहानशी तांब्याची तोफ-खऱ्या दारूनं उडवता येते ती. "

मुलांचे चेहेरे लगेच उजळले. " ती तोफ दाखव ना आम्हाला. " कोस्त्या अतिशय आनंदून म्हणाला.

कासोत्कीननं आपला हात आपल्या गळयातल्या पाकिटात घातला, अन् एक छोटीशी ब्रांझची तोफ बाहेर काढून टेबलावर ठेवली.

"हं, तुम्ही ते विचारणारच! बघा, ही चाकांवर आहे हं." त्यानं ते खेळणे टेबलावर फिरविले. "अन् ही उडवतासुद्धा येते बरं का. हिच्यात गोळी भरून ती उडवायची.'

"अन् हिनं कोणालाही मारता येतं?"

"कुणालाही मारता येतं; कुणावर तरी नेम मात्र धरला पाहिजे." आणि कासोत्कीनने दारू कुठे भरायची असते, गोळी कुठे सारायची असते, ते समजावून सांगितले अन् जिथे बत्ती लावतात त्या जागी एक चिमुकले भोक होते ते दाखवून ती उडाली की एकदम झटका बसतो म्हणून सांगितले.

"तुझ्याकडं दारूची पूड आहे?" नास्त्याने विचारले.

"हो."

"आम्हाला तीसुद्धा दाखव ना रे!" ती हेल काढून अन् आर्जवाचे हसू आणून म्हणाली.

कासोत्कीनने पुनः आपला हात पाकिटात घातला अन् एक लहानसे उभट भांडे बाहेर काढले, त्यात खरोखरीची थोडीशी बंदुकीची दारू होती. त्याच्याकडे काही गोळ्याही एका कागदाच्या सुरळीत होत्या. त्याने त्या भांड्याचे बूच काढून त्यातली थोडीशी दारू आपल्या तळहातावर घेतली.

"याची फार काळजी घ्यावी लागते बरं का, आजूबाजूला कुठं आग असता कामा नये, नाहीतर ही कार्‌दिशी उडून आपणा साऱ्यांना ठार मारून टाकील," कासोत्कीनने त्यांना अद्‌भुत वाटेल अशा रीतीने ताकीद दिली.

मुले त्या दारूकडे भयभीत नजरेने पाहू लागली, त्याने त्यांना अधिकच गंमत वाटली. पण कोस्त्याला दारूपेक्षा ती गोळी जास्त आवडली.

"अन् या गोळीनं भाजतं का रे?" त्याने विचारले.

"अंहं, भाजत नाही."

"मला एक लहानशी गोळी दे ना." त्याने विनवणीच्या स्वरात मागणी केली.

"मी तुला एक लहानशी गोळी देईन; ही बघ, ही घे, पण मी परत येईपर्यंत ती तुझ्या आईला नको दाखवू हं; नाहीतर ती तिला खात्रीनं बंदुकीची दारू समजेल. अन् अगदी घाबरून जाईल, अन् तुम्हाला चांगला मार बसेल."

"आई आम्हाला कधीच मारीत नाही," नास्त्या एकदम म्हणाली.

"मला माहीत आहे, मी ते फक्त वाक्य पुरं करायचं म्हणून बोललो. अन् मी परत येईपर्यंत एवढी गोष्ट सोडून, तुम्ही आपल्या आईला कधी फसवू नका बरं

का, आणि आता, छोट्यांनो, मी बाहेर जाऊ? मी गेल्यावर तुम्ही भिणार नाही न् रडणार नाही ना?"

"आम्ही रडणारच," कोस्त्या हेल काढून, अगोदरच रडकुंडीला येऊन म्हणाला.

"आम्ही रडू, आम्ही खात्रीनं रडू," नास्त्याने भीतभीत धाईने त्याचीच री ओढली.

"अरे, मुलांनो, तुमचं आयुष्य किती धोक्यांनी भरलंय रे! काही इलाज नाही, पिल्लांनो, मला तुमच्यापाशी राहिलंच पाहिजे, किती वेळ कुणास ठाऊक! अन् वेळ तर चाललाय, वेळ तर चाललाय, ऊः ऽऽ!"

"पेरेझ्वानला मेल्यासारखं पडायला सांग की रे!" कोस्त्याने विनंती केली.

"काही इलाज नाही, पेरेझ्वोनचाच आसरा घेतला पाहिजे. चलो, पेरेझ्वोन." अन् कोल्या त्या कुत्र्याला हुकूम देऊ लागला अन् कुत्रा आपल्या साऱ्या करामती दाखवू लागला.

तो राठ केस असलेला मध्यम आकाराचा कुत्रा होता. त्याचे केस फिकट जांभळ्या रंगाचे होते. तो डाव्या डोळ्याने आंधळा होता अन् त्याचा डावा कान फाटलेला होता. भौंव भौंव करीत तो उड्या मारू लागला, आपल्या मागच्या पायांवर उभं राहून चालू लागला, उताणं पडून आपले पंजे त्याने वर केले, अन् मेल्यासारखा ताठ पडून राहिला. हा शेवटचा खेळ चालला असतानाच दरवाजा उघडला अन् मादाम क्रासोत्कीनची नोकर बाई आगाफ्या दारात उभी राहिली. ती चाळीस वर्षांची चांगली धिप्पाड बाई होती. तिच्या चेहेऱ्यावर देवीचे वण होते. ती बाजारातून परत आली होती अन् सामानाने भरलेली पिशवी तिच्या हातत होती. ती पिशवी आपल्या डाव्या हातात धरून ती त्या कुत्र्याकडे पाहत तशीच उभी राहिली. कोल्या जरी ती परत येण्याची उत्सुकतेने वाट बघत होता, तरी त्याने चाललेला खेळ लगेच संपवला नाही, अन् पेरेझ्वोनला नेहमीच्या वेळेइतके मेलेला ठेवल्यानंतर शेवटी त्याने त्याला शिटी घातली. कुत्रा चटकन् उठला अन् आपली कामगिरी केल्याच्या आनंदात तो इकडे तिकडे उड्या मारू लागला.

"कुत्रं, पण कसं आहे!" आगाफ्या मार्मिकपणे उद्गारली.

"तुला इतका वेळ का लागला, बये?" क्रासोत्कीनने करडेपणाने विचारले.

"बया, अं! चाललंय ते चालू दे तुझं पोरट्या."

"पोरट्या?"

"होय, होय, पोरट्या. मला वेळ झाला तर तुझं काय जातंय? मला वेळ झाला असला तर त्याला तसंच कारण होतं समजलास" आगाफ्या तोंडातल्या तोंडात म्हणाली, आणि ती आपल्या चुलीपासच्या कामाला लागली, तिच्या चेहऱ्या-

वर रागाचा किंवा नाखुषीचा लेशही नव्हता. नव्हे आपल्या आनंदी छोट्या धन्याशी झटापट करण्याचा आनंदच ती खरोखर उपभोगीत होती.

"ऐक, ए बेवकूफ म्हातारे," कासोत्कीन कोचावरून उठत तिला म्हणाला, "जगात जे काही म्हणून तुला पवित्र वाटतं त्याची अन् दुसऱ्या आणखी कशाची शपथ घेऊन माझ्या गैरहजेरीत या पोरांवर दक्षतेनं लक्ष ठेवीन असं सांगशील का? मी बाहेर चाललोय."

"अन् मी शपथ कशाला घ्यायची ती?" आगाफ्या हसून म्हणाली, "शपथ न घेतासुद्धा मी लक्ष ठेवीन की."

"नाही, तू तुझ्या शाश्वत मोक्षाची शपथ घेतली पाहिजेस. नाहीतर मी नाही जाणार."

"मग नको जाऊस तर. मला काय त्याचं? बाहेर किती थंडी आहे. घरातच बैस."

"छोट्यांनो," कोल्या त्या मुलांकडे वळून म्हणाला, "मी किंवा तुमची आई परत येईपर्यंत ही बाई तुमच्यापाशी राहील हं, कारण याच्या कितीतरी आधी तिनं परत यायला हवं होतं, ती तुम्हाला काही खायलाही देईल हं. तू यांना काहीतरी देशील ना, आगाफ्या? अं?"

"तेवढं करीन मी."

"बराय पिल्लांनो, आता मी निश्चिंत मनानं जातो आणि ए आजीबाई," तो आगाफ्याच्या जवळून जाताना हलक्या आवाजात गंभीरपणे तिला म्हणाला, "तू त्यांची कोवळी वयं लक्षात घेऊन कातिरीना संबंधानं तुझ्या आजीबाईच्या बेअकलीपणाच्या गोष्टी त्यांना सांगणार नाहीस अशी मी आशा करतो. इकडे ये पेरेझ्वोन!"

"चल चालता हो!" या वेळी आगाफ्या मात्र खरंच त्याच्यावर खेकसून म्हणाली, "आचरट पोरटा! असल्या गोष्टी मला सांगतोस, तुला झोडपूनच काढलं पाहिजे, हो, तेच तुला पाहिजे!"

३

शाळकरी पोर

पण ती काय बोलली ते कोल्याने ऐकले नाही. अखेर आपल्याला जायला तरी मिळाले. तो बाहेर फाटकापाशी गेला तसे त्याने भोवती बघितले, आपले खांदे उडविले अन् "गारठा पडलाय" असे म्हणून सरळ रस्त्याने चालत जाऊन उजवीकडे बाजारपेठेच्या बाजूला वळला. बाजारपेठेच्या अलीकडच्या दुसऱ्या घरापाशी जाताच तो फाटकापाशी थांबला, त्याने खिशातून शिटी काढली आणि

आपल्या साऱ्या शक्तीनिशी ती जोराने फुंकली. जणू त्याने काही संकेत दिला. एक मिनिटभरच त्याला वाट पाहावी लागली असेल नसेल तेवढ्यात गुलाबी गालांचा एक अकरा वर्षांचा मुलगा–अंगात उबदार, नीटनेटका, नव्हे चांगलाच फॅशनेबल कोट घातलेला–त्याला भेटायला तीरासारखा बाहेर आला. हा स्मुरोव नावाचा प्राथमिक वर्गातला (म्हणजे कोल्या क्रास्सोत्किनच्या खाली दोन वर्ग) मुलगा होता. चांगल्या सधन अधिकाऱ्याचा तो मुलगा होता. त्याला त्याच्या आईबापांनी बहुधा क्रासोत्कीनची संगत करायला मनाई केली असावी, कारण तो अविचारी खोडकर मुलगा म्हणून प्रसिद्ध होता. म्हणूनच स्मुरोव अर्थातच चोरून बाहेर निसटला होता. वाचक जर विसरले नसतील तर इल्यूशावर दोन महिन्यांपूर्वी ज्यांनी दगड मारले होते त्या टोळक्यातला हा एक मुलगा होता. यानेच आल्योशा कारमाझफला इल्यूशाबद्दल सांगितले होते.

"एक तास झाला मी तुझी सारखी वाट बघतोय क्रासोत्कीन." आपला राग बाहेर न दर्शविता स्मुरोव म्हणाला, आणि ती मुले बाजारपेठेकडे निघाली.

"मला उशीर झाला." क्रासोत्कीन उत्तरला. "परिस्थितीमुळं मला थांबावं लागलं. माझ्याबरोबर आलास म्हणून तुला मार तर मिळणार नाही ना?"

"चल, मला मार कधीच मिळत नाही, समजलास! अन् पेरेझ्वोनला तू बरोबर आणलं आहेस?"

"हो."

"त्यालाही तू घेऊन चलणार?"

"हो."

"अहाहा, हा झुचका असता तर!"

"ते अशक्य आहे. झुचका आता जगात नाही. झुचका अज्ञाताच्या धुक्यात हरपला आहे."

"हं, आपल्याला असं नाही का करता येणार?" स्मुरोव एकदम निश्चळ उभा राहिला. "बरं का, इल्यूशा म्हणतो की झुचका केसाळ, करड्या रंगाचा, धुरकट दिसणारा असा पेरेझ्वोनसारखाच कुत्रा होता. हा झुचकाच आहे असं तू त्याला नाही का सांगू शकणार? तो तुझ्यावर विश्वास ठेवील."

"वेड्या, खोटं बोलू नये, ही एक गोष्ट; चांगल्या उद्देशानंसुद्धा, ही दुसरी. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, मी येणार म्हणून तू त्यांना सांगितलेलं नाहीस असं मी समजतो."

"नाही रे बाबा! मी काय करतोय ते मला माहीत आहे. पण तू पेरेझ्वोनला दाखवून त्याचं समाधान करणार नाहीस तर." स्मुरोव उसासा टाकून म्हणाला. "त्याचे वडील, ते कॅप्टन, 'झाडूचा कुंचा' तुला माहीत आहेत, त्यांनी आम्हाला सांगितलं की ते त्याला एक काळ्या नाकाचं जातिवंत पहाडी कुत्र्याचं पिलू आज

भाणून देणार आहेत. त्यानं इल्यूशाला बरं वाटेल असं त्यांना वाटतं; पण मला शंकाच आहे.''

"अन् इल्यूशाचं कसं आहे?"

"हं:, फार वाईट तब्येत आहे त्याची, फार वाईट आहे! मला वाटतं त्याला क्षय झालाय; तो चांगला शुद्धीवर आहे, पण त्याचा तो श्वास! त्याचा श्वासोच्छ्वास नीट नाही चालत. परवा त्यानं, 'माझे बूट माझ्या पायात घाला अन् मला खोलीभर हिंडवा.' असं सांगितलं. त्यानं चालायचा प्रयत्न केला, पण त्याला उभंसुद्धा राहता येईना. तो म्हणाला, 'हं:, बाबा, मी तुम्हाला अगोदरच सांगितलं की हे बूट चांगले नाहीत, ते घालून मला कध्धी चांगलं चालता येत नाही.' त्याला वाटलं आपल्या बुटांमुळंच आपण अडखळतो आहो, पण खरं म्हणजे त्याच्या अंगात ताकदच नव्हती. तो पुढचा आठवडा काही जगणार नाही. हर्झेनस्तुब त्याच्यावर देखरेख करताहेत. आता ते पुन्हा श्रीमंत झाले आहेत– त्यांच्याकडं ढिगावारी पैसा आहे."

"ते चोर आहेत लेकाचे."

"कोण चोर आहेत?"

"डॉक्टर अन् वैदू लोकांची सारी टोळी, अन् अर्थात् त्यातला दरेक जणसुद्धा. माझा औषधावर मुळीच विश्वास नाही. ती अगदी निरुपयोगी पद्धत आहे. त्या सर्वांत मला लक्ष घालायचंच आहे. पण तुमचा एवढा मनाचा हळवेपणा का त्याच्या बाबतीत आहे? सगळा वर्ग रोज तिथं जात असलेला दिसतो."

"सगळा वर्ग नाही काही; आम्ही फक्त दहाजणच त्याला बघायला रोज जात असतो. त्यात विशेष काही नाही."

"या सर्वांत अलेक्सी कारमाझफचं का अंग आहे ते मला कळत नाही. त्याच्या भावावर उद्या की परवा केवढ्या गुन्ह्याकरिता खटला चालायचाय, आणि तरी याला मुलांबरोबर हळवेपणाने वागायला इतका वेळ आहे?"

"त्यात हळवेपणा वगैरे काही नाही. तू स्वतः आता इल्यूशाशी समेट करायला चाललाच आहेस की!"

"त्याच्याशी समेट करायला! काय भलतेच शब्द! पण माझ्या वागण्याची शहानिशा मी कोणालाच करू देत नसतो."

"तुला बघून इल्यूशाला किती आनंद होईल! तू येणार ह्याची त्याला काहीच कल्पना नाही. का बरं इतके दिवस तू येत नव्हतास?" स्मुरोव एकदम भावनावश होऊन म्हणाला.

"माझ्या मुला, तो माझा प्रश्न आहे, तुझा नाही. मी आपणहूनच जातो आहे, कारण माझ्या मनालाच वाटतं आहे म्हणून, पण तुम्हा सर्वांना तिथं अलेक्सी कारमाझफनं ओढून नेलंय–या दोहोंत फरक आहे, समजलास. अन् तुला

काय माहीत ? मी कदाचित् मुळींच समेट करणार नाही. हे बेअकलीपणाचं बोलणं आहे."

" हे कारमाझफचं काम मुळीच नाही; त्यानं ते मुळीच केलेलं नाही. आम्ही मुलं आपणहूनच तिथं जाऊ लागलो. हो, ते पहिल्या प्रथम कारमाझफ बरोबर गेले खरे. अन् त्यात तसला काही, म्हणजे मूर्खपणाचा, प्रकार नाही बरं का. पहिल्यांदा एकजण गेला, आणि मग दुसरा गेला. त्याच्या वडिलांना आम्ही गेलो त्याचा अतिशय आनंद झाला. इल्यूशा जर मेला ना तर त्यांचं डोकंच फिरेल. इल्यूशा मरणार हे त्यांना दिसतं आहे. आणि आम्ही इल्यूशाशी मिटवून घेतलं त्याचा त्यांना किती आनंद झालेला दिसतो. इल्यूशानं तुझी चौकशी केली, इतकंच. तो फक्त चौकशी करतो, अन् पुढं काही बोलत नाही. त्याच्या बापाला वेड तरी लागेल, नाहीतर तो स्वतःला फास तरी लावून घेईल. तो पूर्वी वेड लागलेल्या माणसासारखा वागत होता. तुला माहीत आहे तो फार सभ्य मनुष्य आहे. आपण त्यावेळी चूक केली. ज्यानं त्याला मारलं त्या खुनी माणसाचा हा सगळा दोष आहे."

" कारमाझफ हा एक मला कोडंच आहे. मी त्याच्याशी ओळख पूर्वीच करून घेतली असती, पण काही बाबतीत योग्य स्वाभिमान असलेला मला बरा वाटतो. शिवाय, मी एक त्याच्यासंबंधी सिद्धान्त बांधलेला आहे तो मला पुरता बसवून अजमावून पाहिला पाहिजे."

कोल्याने गंभीरपणाने स्तब्धता स्वीकारली. स्युरोवही स्तब्ध राहिला. स्युरोव तर क्रासोत्कीनला अक्षरशः पुजत होता अन् स्वतःला त्याच्या बरोबरीचे मानण्याचे त्याच्या स्वप्नातही कधी आले नाही. आपण ' स्वतःहून ' इल्यूशाला भेटायला जात आहोत असे जे कोल्या म्हणाला त्याचे आता त्याला खूपच कुतूहल वाटू लागले. कोल्याच्या डोक्यात एकदम आज त्याच्याकडे जाण्याचे जे आले आहे त्यात काही तरी रहस्य असले पाहिजे असे त्याला वाटले. त्यांनी बाजारपेठ ओलांडली, या वेळी तिथे खेड्यापाड्यांतून मालाने भरलेल्या पुष्कळ गाड्या आलेल्या होत्या. तशीच खूप कोंबडी-बदकं होती. बाजारातल्या बायका आपापल्या पालातून पेळू, कापूस अन् सूत वगैरे विकीत होत्या. ह्या रविवारच्या बाजाराला शहरातले सामान्य लोक ' जत्रा 'च म्हणत, अन् अशा जत्रा वर्षातून अनेक भरत.

पेरेझ्वोन इकडे तिकडे निव्वळ उंडारत होता, एकदा या बाजूला जाऊन हुंगे, एकदा त्या बाजूला. दुसरी कुत्री भेटली की ती कुत्रीसमाजाच्या शिष्टाचाराला धरून एकमेकांचा मनापासून रीतसर वास घेत.

" ही असली वास्तविक दृश्यं पाहायला मला फार आवडतं, स्युरोव, " कोल्या एकदम म्हणाला. " कुत्री भेटली म्हणजे कशी एकमेकाला हुंगतात बघितलंस तू ? हा त्यांचा निसर्गधर्मच दिसतो."

" हो, फार गमतीशीर आहे ही त्यांची सवय."

" नाही, गंमतीशीर नाही; तुझं हे म्हणणं चुकीचं आहे. निसर्गात गमतीचं काही नसतं, मग माणसाला त्याच्या पूर्वग्रहामुळं त्यात भले कितीही गमतीशीर वाटो. कुत्र्यांना जर विचारशक्ती असती अन् टीका– टिप्पणी करता आली असती तर त्यांना आपण माणसं– जे त्यांचे धनी– त्यांच्या परस्पर संबंधात तितकंच, किंबहुना जास्त, गमतीशीर आढळून येईल यात शंका नाही. मी म्हणतो जास्तच आढळून येईल. मी तसं म्हणतो कारण आपल्यात त्यांच्यापेक्षा खूपच मूर्खपणा भरलेला आहे अशी माझी खात्री आहे. ही राकीतीनची कल्पना आहे–लक्षात घेण्याजोगी कल्पना आहे. मी समाजवादी आहे, स्युरोव."

" समाजवादी म्हणजे ? " स्युरोव म्हणाला.

" म्हणजे ज्यात सगळे सारखे असतात, सगळयांची मालमिळकत समाईक असते, लग्नं नसतात. प्रत्येकाला उत्तम वाटेल तो त्याचा धर्म अन् त्याचा कायदा, अन् असंच बाकीचं सगळं. हे समजण्याइतका मोठा झाला नाहीस तू अजून. ए किती थंडी पडली आहे रे."

" हो. शून्याखाली बारा डिग्री आहे. बाबांनी आताच थर्मामीटर पाहिलं."

" तू पाहिलं आहेस का स्युरोव, की आता हिवाळयाच्या आरंभाला एकदम शून्याखाली बारा डिग्री तपमान उतरलेलं आहे. अन् विशेषतः फारसं बर्फ नाही. अशा वेळी वाटते आहे तशी इतकी थंडी आपल्याला हिवाळयाच्या अगदी मध्यात शून्याखाली पंधरा ते अठरा डिग्री असतानासुद्धा वाटत नाही. याचं कारण थंडीला लोक सरावलेले नसतात म्हणून. माणसाच्या बाबतीत प्रत्येक गोष्ट सरावावर अवलंबून असते. अगदी त्यांच्या प्रत्येक सामाजिक अन् राजकीय संबंधांच्या बाबतीतसुद्धा. सवय ही एक फार मोठी प्रेरक शक्ती आहे. तो शेतकरी बघ कसा गमतीदार दिसतोय ! "

एक उंचेला, चेहऱ्यावरून सुस्वभावी दिसणारा अंगात मेंढीच्या कातडीचा लांब कोट घातलेला, खेडूत आपल्या गाडीपाशी उभा होता, तो आपले हात गरम करण्यासाठी चोळीत होता, त्याच्या हातात ओबडधोबड कातडी मोजे होते. त्याची लांब दाढी बर्फाने पांढरीसफेत झाली होती.

"त्या शेतकऱ्याची दाढी गारठली आहे." कोल्या त्याच्या जवळून जाताना मोठ्याने खिजविणाऱ्या आवाजात म्हणाला.

"पुष्कळ लोकांच्या दाढ्या गारठल्यात." तो शेतकरी शांतपणे अन् मार्मिकपणे उत्तरला.

" त्याला उगीच खिजवू नकोस," स्युरोव म्हणाला.

" काही काळजी करू नको; तो रागावणार नाही; तो छान स्वभावाचा माणूस आहे. नमस्ते, मातव्ये."

"नमस्ते"

"तुमचं नाव मातव्ये काय ?"

"होय, तुला माहीत नव्हतं ?"

"नाही, मला माहीत नव्हतं. मी आपलं तर्कानं बोललो."

"खरंच म्हणतोस ? तू शाळेत जातोस, मला वाटतं ?"

"हो."

"तुला फटके मिळतात, मला वाटतं ?"

"म्हणण्यासारखे नाहीत, कधी कधी."

"त्यानं तुला दुखापत होते ?"

"अं, हो, होते."

"हेः, कसलं हे आयुष्य !" त्या शेतकऱ्याने अगदी अंतःकरणापासून सुस्कारा सोडला.

"नमस्ते, मातव्ये !"

"नमस्ते, तू मोठा चांगला छोकरा आहेस हं."

मुलं पुढं चालली.

"तो चांगला होता शेतकरी," कोल्या स्युरोवला म्हणाला. "मला खेडुतांशी बोलायला आवडतं, अन् त्यांच्याशी रास्तपणानं वागण्यात मला नेहमी आनंद वाटतो."

"तू त्याला खोटं का सांगितलंस, आम्हाला मार मिळतो म्हणून ?" स्युरोवने विचारले.

"त्याला खूष करण्याकरिता मला तसं बोलावं लागलं."

"म्हणजे काय ?"

"स्युरोव, मला एकच गोष्ट दोनदा विचारलेली आवडत नाही, समजलास. ता म्हटलं की माणसानं ताकभात ओळखावा. काही गोष्टी समजावून देता येण्यासारख्या नसतात. खेडुतांची कल्पना असते की शाळेतल्या मुलांना फटके देतात, अन् दिलेच पाहिजेत फटके. दिले नाहीत तर शाळेत जाणारा मुलगा कसला ? अन् मी जर त्याला म्हटलं असतं की मला फटके मिळत नाहीत, तर त्याची निराशा झाली असती. पण तुला ते समजायचं नाही. खेडुतांशी कसं बोलायचं ते समजावं लागतं."

"पण कृपा करून त्यांना चिडवू नकोस, इतकंच, नाहीतर मागं त्या बदकाच्या बाबतीत जसा अडचणीत सापडला होतास तसा पुनः सापडशील."

"हं, म्हणजे तुला भीती वाटते म्हणायची ?"

"हसू नको, कोल्या. अर्थातच मला भीती वाटते. माझे वडील भयंकर रागावतील. मला तुझ्याबरोबर बाहेर जाण्याची सक्त मनाई आहे."

उगीच बेचैन होऊ नकोस, या वेळी तसं काही होणार नाही. ओ हो, नताशा!" तो एका पालात बसलेल्या बाईला ओरडून म्हणाला.

"मला नताशा म्हणतोस? आणि पुढं काय? माझं नाव आहे मार्या," ती मध्यम वयाची बाई त्याच्यावर ओरडली.

"मार्या आहे हे ऐकून मला आनंद झाला. नमस्ते!"

"हं:, बदमाष पोरटं! तुझ्यासारख्या पोरानं अन् असं वागावं?"

"मी फार घाईत आहे. मला आता थांबता येत नाही. पुढच्या रविवारी सांगा." कोल्याने तिच्याकडे बघून हात हालविला, जणू त्याने तिची खोडी केली नव्हती तर तिनेच त्याची खोडी केली होती.

"पुढच्या रविवारी मला काही सांगायचं नाही तुला. माझ्या वाटेला तू जातोस, काय रे उर्मट माकडा. मी तुला काही म्हणाले नाही," मार्या ओरडत ओरडत म्हणाली. "तुला फटकेच पाहिजेत, हो, फटकेच पाहिजेत, उद्धट कार्टं कुठलं!"

तिच्या अवतीभोवती बाजारात बसलेल्या इतर बायामंडळींत एकदम हशा उसळला. अकस्मात् एक मनुष्य रागाने काळानिळा होऊन दुतर्फा दुकाने असलेल्या कमानीखालच्या रस्त्यातून तीरासारखा धावत पुढे आला. तो तरुण होता. या शहरात राहणारा नव्हता. त्याचे केस काळे अन् कुरळे होते आणि त्याचा चेहरा उभट, फिका असून त्यावर देवीचे वण होते. त्याने अंगात लांब निळा कोट अन् डोकीवर टोकदार टोपी घातली होती. अन् एखाद्या गुमास्त्यासारखा तो दिसत होता. तो बावळटपणाने चेकाळल्यासारखा दिसत होता अन् कोल्याकडे पाहून तो आपली मूठ हालवीत होता.

"मी ओळखतो तुला! मी ओळखतो तुला!" तो रागानं ओरडला.

कोल्याने त्याच्याकडे रोखून पाहिले. या माणसाशी आपले केव्हा भांडण झाले असावे ते त्याला आठवेना. पण रस्त्यात त्याची इतकी भांडणे होत की सगळीच त्याच्या लक्षात राहणे शक्यच नव्हते.

"असं?" तो औपरोधिकपणानं म्हणाला.

"मी ओळखतो तुला! मी ओळखतो तुला!" तो मनुष्य वेडगळपणाने पुन्हा म्हणाला.

"बरंच झालं. ठीक, माझी जायची वेळ झाली आहे. नमस्ते."

"तू पुन्हा तुझ्या पोरचेष्टा करायला लागलास, अं?" तो मनुष्य ओरडून म्हणाला. "पुन्हा पोरचेष्टा करायला लागलास? मला माहीत आहे, पुन्हा तू त्या करायला लागलास!"

"मी पुन्हा पोरचेष्टा करायला लागलो असलो तर, भाई तुला त्याच्याशी काय करायचंय?" कोल्या शांत उभा राहून त्याला न्याहाळीत म्हणाला.

" मला काय करायचंय ? "

" हो, तुला त्याच्याशी काही कर्तव्य नाही."

" मग कुणाला कर्तव्य आहे ? कुणाला कर्तव्य आहे रे ? अं, कुणाला कर्तव्य आहे ? "

" ते त्रिफोन निकितिच यांचं काम आहे, तुझं नव्हे."

" कोण त्रिफोन निकितिच ? " त्या तरुण माणसाने कोल्याकडे आडमुठेपणाचे आश्चर्य दाखवून, पण तरी पूर्वीइतक्याच रागाने डोळे वटारून पाहत विचारले.

कोल्याने डोळे बारीक करून त्याच्याकडे गंभीरपणे पाहिले.

" तुम्ही कधी असेन्शन चर्चला गेला होता का ? " त्याने एकदम त्याला करडेपणे जोराने विचारले.

" कसलं असेन्शन चर्च ? कशासाठी ? नाही, मी गेलो नाही." तो तरुण मनुष्य जरा चकितच होऊन म्हणाला.

" तुम्हाला साबानेयेव माहीत आहे ? " कोल्या अधिकच जोराने अन् अधिकच करडेपणे विचारू लागला.

" कोण साबानेयेव ? नाही, मला तो माहीत नाही."

" तर मग, मसणात जा तुम्ही." कोल्या म्हणाला, त्याने चाललेला संवाद मध्येच तोडला आणि लगेच उजवीकडे वळून तो चटकन आपल्या वाटेने चालू लागला. जणू ज्या माणसाला साबानेयेवसुद्धा माहीत नाही अशा बुद्दूशी काय बोलायचं असा तिरस्काराचा आव त्याने आणला.

" थांब, ए ! कोण साबानेयेव म्हणतोस तू ? " तो तरुण मनुष्य आपल्या क्षणिक बेभान अवस्थेतून जागा झाला अन् पूर्वीप्रमाणेच प्रक्षुब्ध झाला. " हा काय म्हणाला ? " बाजारात बसलेल्या बायांकडे वळून बावळटपणे टक लावून त्याने विचारले.

त्या स्त्रिया हसल्या.

" त्याच्या मनात काय असेल ते कधी समजायचं नाही." त्यांतली एक म्हणाली.

" तो बोलत होता तो कोण साबानेयेव ? " त्या तरुणाने पुन्हा विचारले, तो अजूनही क्रुद्ध होऊन आपला उजवा हात परजीत होता.

" तो कुझमिच्योवकडे काम करीत होता ना तो साबानेयेव असेल, तोच असला पाहिजे," एका बाईने सुचविले.

तो तरुण तिच्याकडे अर्थशून्य नजरेने पाहत राहिला.

" कुझमिच्योवकडे ? " दुसरी बाई म्हणाली. " पण त्याचं नाव काही त्रिफोन नव्हतं. त्याचं नाव कुझमा आहे, त्रिफोन नाही; पण हा पोर म्हणाला त्रिफोन निकितिच, अर्थात् ते दोघं एक नसावेत."

"त्याचं नाव त्रिफोनही नाही न् साबानेयेवही नाही, ते आहे चिझोव," तिसरीच एक बाई अचानकपणे म्हणाली, ती आतापर्यंत गंभीरपणाने ऐकत गप्प बसली होती. "अलेक्सी इवानिच हे आहे त्याचे नाव. चिझोव अलेक्सी इवानिच."

"शंकाच नको, ते चिझोवच आहे," चौथ्या बाईने या विधानाला जोराने पुष्टी दिली.

तो गोंधळलेला तरुण एकीच्या तोंडाकडून दुसरीच्या तोंडाकडे पाहू लागला.

"पण त्यानं कशाकरिता हे विचारावं, कशाकरिता भल्या माणसांनो?" तो हताश झाल्यासारखा होऊन म्हणाला. 'तुम्हाला साबानेयेव माहीत आहे का?' तो विचारतो. अन् कुणा लेकाला माहीत कोण साबानेयेव ते?"

"तुम्ही मठ्ठ आहात. मी सांगते तुम्हाला तो साबानेयेव नाही, चिझोवच आहे, अलेक्सी इवानिच चिझोव, तोच तो आहे!" एक बाई जोराने त्याच्यावर ओरडली.

"कोण चिझोव? कोण आहे तो? तुला माहीत असलं तर सांग मला."

"तो उंच, शेंबडा माणूस, उन्हाळ्यात बाजारात येऊन बसायचा तो."

"अन् तुमच्या चिझोवचं माझ्याशी काय काम, भल्या माणसांनो अं?'

"त्याचं तुझ्याशी काय काम हे मी कसं सांगणार?" दुसरी बाई म्हणाली, "त्याच्याशी तुला काय करायचंय ते, तू इतका त्याच्याबद्दल ओरडा करतो आहेस तर, तुझं तुलाच माहीत असलं पाहिजे. तो तुझ्याशी बोलत होता, आमच्याशी नाही, मूर्खा. तुला खरोखरच तो माहीत नाही?"

"कोण माहीत नाही?"

"चिझोव"

"मसणात जावो, तो चिझोव अन् त्याच्याबरोबर तूही. त्याला मी रट्टेच देणार आहे, जरूर देणार. माझ्याकडं बघून हसतोय काय!"

"चिझोवला रट्टे देणार! तोच तुला देईल कदाचित. तू मूर्ख आहेस. मूर्ख आहेस तू!"

"चिझोवला नव्हे, चिझोवला नव्हे, ए खुनशी द्वाड बये. त्या पोराला मी मार देणार आहे. धरा, धरा त्याला, माझ्याकडं बघून हसत होता!"

त्या बाया खोखो करून हसत सुटल्या. पण एव्हांना कोल्या खूप दूर गेला होता, विजयी मुद्रेने पावले टाकीत तो जात होता. स्मुरोव त्याच्या शेजारून चालला होता, तो मागे बघून दूर ओरडत असलेल्या टोळक्याकडे पाहत होता. जरी कोल्याच्या संगतीत कसल्या तरी आपत्तीत आपण सापडू असे अजून त्याला भय वाटत होते, तरी त्याला सुद्धा चेव चढला होता.

"कोण साबानेयेव तू म्हणालास?" त्याने कोल्याला विचारले, त्याचे उत्तर काय असेल ते आगाऊच अर्थात त्याने जाणले.

"मला काय माहीत? आता त्यांच्यात दिवसभर ओरडा चालेल. मला

लोकांच्या प्रत्येक वर्गातल्या मूर्खांना हलवून सोडावंसं वाटतं. तिथं दुसरा एक बुद्दू माणूस आहे, तो बघ तो शेतकरी. असं म्हणतात की ' बावळट फ्रेंच माणसापेक्षा अधिक बावळट कुणीच नसतो, माहीत आहे तुला, पण बावळट रशियनाच्या चेहेऱ्यावर तितकाच बावळटपणा स्पष्ट दिसतो. तो गाढव आहे हे त्याच्या चेहेऱ्यावरच तुला नाही दिसत, अं ? "

" जाऊ दे, कोल्या, आपण चलू या पुढं."

" एकदा माझ्या डोक्यात आलं की कशानंही मी थांबणार नाही. हो, नमस्कार, शेतकरी बाबा ! '

एका धडधाकट दिसणाऱ्या, गोल, साध्या भोळ्या मुद्रेच्या अन् करड्या रंगाची दाढी असलेल्या जवळून चाललेल्या शेतकऱ्याने आपली मान वर उचलून या मुलाकडे पाहिले. तो ठीक शुद्धीवर असावा असे दिसले नाही.

" जर माझी थट्टा उडवीत नसलास तर मीही नमस्कार करतो." उत्तर देतांना तो जोर देऊन म्हणाला.

" अन् जर थट्टा करीत असलो तर ? " कोल्या हसत म्हणाला.

" ठीक आहे, थट्टा ती थट्टाच. हस बापडा. मला काही वाटत नाही. थट्टेनं काही बिघडत नाही."

" मी तुमची क्षमा मागतो, भाऊ, ती थट्टाच होती."

" हं, ईश्वर तुला क्षमा करो ! "

" तुम्हीसुद्धा मला क्षमा करता ना ? "

" मी तुला बेशक क्षमा करतो. सुखानं जा."

" बरं का, तुम्ही हुशार शेतकरी दिसता."

तुझ्यापेक्षा जास्त हुशार," त्या शेतकऱ्याने अनपेक्षितपणे त्याच गांभीर्याने उत्तर दिले.

" मला शंका आहे," कोल्या जरा चकित होऊन म्हणाला.

" तरीपण ते खरं आहे."

" असेल कदाचित्."

" आहेच, भाऊ."

" नमस्ते, शेतकरी बाबा ! "

" नमस्ते."

थोडा वेळ गप्प राहून कोल्या स्युरोवला म्हणाला,

" किती तरी प्रकारचे शेतकरी असतात. हुशार शेतकऱ्याशीच माझी गाठ पडली हे मी कसं सांगू शकणार ? शेतकरी वर्गात बुद्धी असते हे मानायला मी नेहमीच तयार असतो."

दूर कथीड्रलच्या घड्याळात साडेअकराचे ठोके पडले. या मुलांनी घाई केली

आणि ती कॅप्टन स्नेगिर्योवच्या घरापर्यंत, म्हणजे बरंचसं अंतर, जलद जलद अन् जवळ जवळ मुकाट्याने चालली. त्या घरापासून वीस पावलांवर कोल्या थांबला आणि त्याने स्मुरोवला पुढे जाऊन कारमाझफला बाहेर आपल्याकडे यायला सांग म्हणून सांगितलं.

" माणसानं प्रथम आपल्या भोवती थोडंसं हुंगून वास घेतला पाहिजे," तो स्मुरोवला म्हणाला.

" त्यालाच कशाला बाहेर यायला सांगायचं ? " स्मुरोव विरोध दर्शवून म्हणाला, " तू आत जा; त्यांना तुला बघून खूपच आनंद होईल. इथं बाहेर बर्फात दोस्ती करण्यात काय हशील आहे ? "

" इथं बाहेर बर्फात त्याला मला का भेटायचं आहे ते मला माहीत आहे," कोल्याने त्याला मध्येच जरबेच्या आवाजात गप्प केले, 'लहान पोरा'शी अशाच स्वरात बोलायची त्याला सवय होती, त्यानं सांगितल्याप्रमाणं करायला स्मुरोव धावत गेला.

४

झुचका-हरवलेला कुत्रा

कोल्या ऐटीनं कुंपणाला टेकून, आल्योशा येण्याची वाट पाहात उभा राहिला. आल्योशाला भेटण्याची त्याला पुष्कळ दिवसांपासून इच्छा होती हे खरे होते. मुलांकडून त्याने त्याच्याविषयी बरेच ऐकले होते, पण आतापर्यंत त्याचे नाव निघाले म्हणजे तो नेहमी तिरस्कारदर्शक बेपर्वाईचा देखावा करीत असे, अन् त्याने आल्योशाबद्दल जे काय ऐकले होते त्यावर त्याने 'टीका' ही केली होती. पण मनातून त्याला त्याची ओळख करून घेण्याची खूप इच्छा होती; आल्योशासंबंधी त्याला जे सांगण्यात आले होते त्यात सर्वांत सहानुभूतीचे अन् आकर्षक असे काही होते. म्हणून आताचा क्षण महत्त्वाचा होता; पहिली गोष्ट म्हणजे आपला श्रेष्ठपणा दिसून आला पाहिजे, आपला स्वतंत्रपणाही दिसला पाहिज. " नाहीतर तो मला इतरांसारखाच एक तेरा वर्षांचा पोरगा म्हणून समजेल. अन् या सगळ्या मुलांशी त्याचं नातं कसं आहे ? त्याची ओळख झाली म्हणजे मी त्याला विचारीन. पण मी इतका बुटका आहे हे वाईट आहे. तुझिकोव माझ्यापेक्षा लहान आहे, पण माझ्यापेक्षा पाच बोटे अधिक उंच आहे. पण मी चेहऱ्यावरून हुशार वाटतो. मी काही सुरूप नाही. मी कुरूप आहे हे मला माहीत आहे, पण माझ्या चेहऱ्यावर बुद्धीचे तेज दिसते. मी जास्त मोकळेपणानं बोलता कामाचं नाही; जर मी त्याच्या एकदम मिठीत जाऊन पडलो तर त्याला वाटेल...शीः ! त्याला जर वाटलं... किती भयंकर ! "

आपल्या चेहेऱ्यावर अगदी स्वतंत्रपणाचा आविर्भाव ठेवण्याचा जाम प्रयत्न करीत असताना असे विचार कोल्याला प्रक्षुब्ध करीत होते. त्याला जर सर्वांत जास्त कशाचे दुःख वाटत असेल तर ते आपण इतके बुटके असल्याबद्दलचे; आपण बुटके आहोत याची त्याला जितकी खंत होती तितकी ' कुरूप ' असल्याबद्दलची नव्हती. घरी एका कोपऱ्यात भिंतीवर आदल्या वर्षी आपली उंची दाखविणारी पेन्सिलीची एक खूण त्याने करून ठेवली होती, अन् त्यानंतर दर दोन महिन्यांनी तो तिला लागून उभे राहून आपली उंची किती वाढली आहे. हे सचिंत होऊन पाहात असे, पण दुःखाची गोष्ट अशी होती की त्याची वाढ फार मंदपणे होत होती, त्यामुळे तो कधी कधी निराश झाल्यासारखा होऊन बसे. त्याचा चेहेरा, खरं म्हटलं तर, तसा काही ' कुरूप ' नव्हता; उलट, तो आकर्षकच होता, त्याची कातडी गोरी, फिक्कट होती आणि त्यावर फिक्कट डाग होते. त्याच्या बारीक, पाणीदार घाऱ्या डोळ्यांत निर्भयपणाची झाक होती, अन् भावनेने ते नेहमी चमकत, त्याची गालाची हाडे वर आलेली होती, जिवणी लहानसर, लाल चुटुक, पण फार जाड नव्हती. त्याचे नाक अपरे होते अन् त्याचा शेंडा चांगलाच वर वळलेला होता. " माझं नाक चक्क चपटं आहे, चक्क चपटं " असं तो जेव्हा आरशात पाही तेव्हा आपल्याशीच म्हणे, अन् निघून दूर होताना त्याचे मन नेहमी उद्विग्न होई. " कदाचित माझा चेहेरा तरतरीतही नसेल " असे त्याला त्याविषयीसुद्धा शंका येऊन वाटे. पण यावरून त्याचे मन आपल्या चेहेऱ्यात अन् उंचीतच गुरफटून राहात असे, असे समजण्याचे कारण नाही. उलट, आरशासमोरचे क्षण कितीही कटू असले तरी ते तो चटकन् विसरून जाई, आणि हा विसर आपण " विचारांना अन् खऱ्याखुऱ्या जीवनाला सर्वस्वी वाहिल्यामुळं " आपल्याला दीर्घ काळ पडतो. असे एक गणित त्याने त्यासंबंधी स्वतःशी ठरविले होते.

आल्योशा चटकन बाहेर आला अन् घाईघाईने कोल्याकडे गेला. तो त्याच्यापर्यंत पोचण्यापूर्वीच कोल्याला त्याच्या चेहेऱ्यावर आनंद दिसला. " मला भेटायचा त्याला इतका आनंद वाटत असेल ? " कोल्या खूष होऊन मनाशी म्हणाला. आम्ही जाता जाता इथे नमूद करतो की आपण यापूर्वी आल्योशाला पाहिले होते. त्यानंतर त्याचे रूप संपूर्णपणे बदलून गेले होते. त्याने आपल्या मठातल्या झग्याचा त्याग केला होता आणि आता छान बेतून शिवलेला कोट अन् मऊ गोल हॅट, त्याने घातली होती, आणि त्याचे केस बारीक कापलेले होते. त्याला हे सारे शोभून दिसत होते, अन् तो अतिशय सुंदर दिसत होता. त्याच्या मोहक चेहऱ्यावर नेहमीच सुस्वभावाची झाक असे; पण त्याच्या सुस्वभावात एक प्रकारचे मार्दव अन् गांभीर्य असे. आल्योशा त्याच्याकडे आला तो आपला ओव्हर कोट न घालता जसा होता तसाच आला याचे कोल्याला आश्चर्य वाटले. तो उघडच घाईघाईने आला होता. त्याने एकदम कोल्यापुढे आपला हात केला.

" आलास बाबा एकदाचा! तुला भेटायला आम्ही किती उत्सुक होतो!"

" त्याला काही कारणं होती. ती लवकरच तुला समजतील. काही असो, तुझी ओळख झाल्याचा मला आनंद वाटतो. या संबंधीची मी फार दिवस आशा बाळगून होतो, अन् तुझ्याविषयी मी पुष्कळ ऐकलं आहे." कोल्या काहीशा अधीरपणे तोंडातल्या तोंडात बोलला.

" काही असो, आपण भेटायला हवं होतं. तुझ्या संबंधानंसुद्धा मी बरंच ऐकलं आहे; पण तुला इथं यायला बरेच दिवस लागले."

" कशी काय परिस्थिती आहे, मला सांग!"

" इल्यूशा फारच आजारी आहे. खरोखरच मरणाच्या दारात आहे."

" किती भयंकर! औषधं म्हणजे एक फसवणूक आहे हे तुला कबूल केलं पाहिजे कारमाझफ," कोल्या जरा गरम होऊन म्हणाला.

" इल्यूशानं तुझं नाव, झोपेत, वातात बरळतानासुद्धा, पुष्कळ वेळा, फारफार वेळा, घेतलं, बरं! त्या...त्या...चाकूच्या प्रसंगापूर्वी...तू त्याचा फार फार लाडका होतास हे सहज दिसून येतं...शिवाय, दुसरंही एक कारण आहे... हा तुझा कुत्रा का रे?"

" होय, पेरेझ्वोन त्याचं नाव."

" हा झुचका नव्हे?" आल्योशाने कोल्याकडे करुणेने नजरेने पाहिले. " तो कायमची गेला का रे?"

" हा झुचकाच असेल तर तुम्हा सर्वांना आवडेल हे मला माहीत आहे. मी त्यासंबंधाने सगळं ऐकलंय." कोल्या गूढपणे हसला. " ऐक, कारमाझफ, मी ते सारं काही तुला सांगतो. त्यासाठीच मी आलोय; त्यासाठीच मी तुला इथं बाहेर बोलावून घेतलं, आपण आत जाण्यापूर्वी सारी कहाणी तुला खुलासेवार सांगायची आहे म्हणून," तो आतुरतेने सांगू लागला. " बरं का, कारमाझफ, इल्यूशा गेल्या एप्रिलात प्रिपेरेटरी वर्गात आला. प्रिपेरेटरी वर्ग म्हणजे काय तुला माहीतच आहे– सगळी लहान लहान मुलं असतात. त्यांनी लगेच इल्यूशाला त्रास द्यायला सुरुवात केली. मी त्यांच्यापुढं दोन वर्ग आहे, त्यामुळं अर्थात् मी त्यांच्याकडं दुरूनच पाहणार. हा मुलगा छोटा अन अशक्त आहे हे मी पाहिलं, पण तो त्यांना हार जात नव्हता; तो त्यांच्याशी झगडे. तो अभिमानी होता अन् त्याचे डोळे जणू आग ओकीत. मला अशी मुलं आवडतात. त्यामुळं तर मुलं त्याला अधिकच त्रास देऊ लागली. सर्वांत वाईट म्हणजे त्या वेळी इल्यूशाचा पोषाख फारच भयंकर होता, त्याची विजार फार आखूड होती, अन् बुटाला भोकं पडलेली होती. त्याबद्दल ती त्याला चिडवीत, ती त्याची हुर्यो करीत. मला ते सहन होईना. मी त्याची बाजू घेऊन पुढं झालो अन् एकेकाला चांगलं चोपून काढलं. मी त्यांना मारलं खरं, तरी ती मला फार मानतात, माहीत आहे तुला, कारमाझफ?" कोल्या अभिमानाने

म्हणाला, “ पण मला मुलांचा फार लळा आहे. आता माझ्या देखरेखीखाली घरी दोन पिलं आहेत– म्हणूनच मला यायला उशीर झाला. तेव्हा त्यांनी इल्यूशाला मारायचं सोडून दिलं अन् मी त्याला माझ्या छत्राखाली घेतलं. तो मुलगा अभिमानी आहे असं मला दिसलं. मी तुला सांगतो आहे खरं की, हा मुलगा अभिमानी आहे म्हणून, पण शेवटी तो गुलामासारखा माझ्या भजनी लागला. माझी थुंकी झेली, मला जणू देव मानून. तो माझी आज्ञा पाळी, माझं अनुकरण करण्याचा प्रयत्न करी. वर्गात मधली सुटी झाली की, तो चटकन माझ्याकडं धावत येई, अन् मी त्याला घेऊन इकडं तिकडं जाई. अगदी रविवारी सुद्धा. अशी एखाद्या मोठ्या मुलानं त्याच्यासारख्या लहान मुलाशी दोस्ती केलेली बघून लोक हसतात, पण तो त्यांचा खोटा ग्रह आहे. जर ती माझी आवड असेल, तर असू दे की. मी त्याला शिकवतो आहे, त्याला हळूहळू वाढवतो आहे. मला जर तो आवडत असेल तर मी त्याला का वाढवू नये ? इथं, कारमाझफ, तू या घरट्यातल्या सर्व पिलांना आपल्या हाती घेतलं आहेस. तुला या लहान पिढीवर संस्कार करायचे आहेत, त्यांना वाढवायचं आहे, त्यांच्या उपयोगी पडायचं आहे, असं मला दिसतंय, अन् तुझ्या स्वभावातली ही ठेवण मला ऐकून माहीत झाली आहे, अन् मी तुला खरं सांगतो, इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा त्यानं मी जास्त आकर्षित झालो. पण आपण आपल्या मुद्द्याकडं येऊ. या मुलात एक प्रकारचा मऊपणा अन् भावुकपणा येऊ लागलाय असं मला दिसलं. अन् मला अशा नेभळट भावुकपणाचा अतिशय राग आहे, अन् तो भावुकपणा एका लहान पोराला माझ्याविषयी होता. त्याच्यात परस्परविरोधी गोष्टी सुद्धा होत्या. तो मानी होता, पण तो गुलामासारखा माझा अगदी अंकित होऊन गेला होता, आणि तरी एकदम त्याचे डोळे चमकू लागत अन् माझ्याशी सहमत व्हायला तो नकार देई; तो माझ्याशी वाद घाली, संतापे. मी केव्हा केव्हा काही विचार त्याला सांगे, ते विचार त्याला पटायचे नाहीत. एवढ्याच कारणानं नव्हे, तर त्याच्या लाडिकपणाला मी उत्तेजन देत नसे, म्हणून तो माझ्याविरूद्ध बंड करून उठे, असं मला दिसून येई. आणि म्हणून त्याला योग्य तऱ्हेचं वळण लावण्याकरिता, जितका तो मऊ होई, तितका मी त्याच्याशी बेपर्वाईनं वागे. मी तसं मुद्दामच वागत होतो; मी तसा विचारच करून ठेवलेला होता. मनात त्याचं व्यक्तित्व घडवावं, त्याला एका साच्यात ढाळावं, त्याला एक मर्द माणूस बनवावं... आणि शिवाय...मी काय म्हणतो ते तुला समजलंच असेल. अचानक लागोपाठ तीन दिवस तो मला खिन्न अन् उदास दिसला, मी बेपर्वाईनं वागत होतो म्हणून नव्हे पण दुसऱ्याच काही कारणामुळं, काही महत्त्वाच्या कारणामुळं. काय दुःखाची घटना घडली बुवा, असं मला वाटलं. मी त्याच्या मनातलं जाणून घेण्याचा प्रयत्न केला अन् मला असं आढळलं की त्याची कशी का असेना स्मिर्द्याकफशी म्हणजे तुझ्या वडिलांचा तो हुजऱ्या आहे ना, त्याच्याशी ओळख झाली. अर्थात तुझे वडील

मरण्यापूर्वी आणि त्यानं या खुळचट पोराला एक मूर्खपणाची गंमत– म्हणजे एक क्रूर, दुष्ट गंमत शिकवली. एक ब्रेडचा तुकडा घ्यायचा, त्याच्यात एक टाचणी टोचायची अन् तो तुकडा एखाद्या भुकेल्या कुत्र्यापुढं टाकायचा. अशी कुत्री त्यांच्यापुढं टाकलेलं न चावता एकदम गट्ट करून टाकतात, आणि मग त्यांची काय गंमत होते ती पाहायची, असं करायला त्याने त्याला सांगितले. आणि असा एक तुकडा त्यांनी तयार केला अन् तो झुचका म्हणून ज्या केसाळ कुत्र्यासंबंधानं इतका गाजावाजा चाललाय त्याच्यापुढं टाकला. ज्या घरातलं ते कुत्रं होतं तिथली माणसं ते दिवसभर भुंकत राही तरी त्याला कधीच खाऊ घालीत नसत. ते पिसाट भुंकणं तुला आवडतं, कारमाझफ? मला तर ते बिलकुल सहन होत नाही बघ. ते कुत्रं त्या भाकरीकडं धावत गेलं, त्यानं ती गिळली, अन् ते केकाटायला लागलं; ते गोल गोल गिरक्या घेऊ लागलं, अन् पळून गेलं, पळून नाहीसं होत असताना ते एकसारखं केकाटत होतं. ही इल्यूशानं स्वतःच सांगितलेली हकीकत आहे. त्यानं ते माझ्यापुढं कबूल केलं, अन् तो ओक्साबोक्सी रडला. त्यानं मला घट्ट मिठी मारली, त्याचं सारं शरीर गदगदा हालत होतं. तो एकसारखं 'ते केकाटत पळालं रे' असं म्हणत होता, ते दृश्य सारखं त्याला सतावीत होतं. पश्चात्तापानं तो तडफडत होता, मला ते स्पष्ट दिसत होतं. मी ती बाब गंभीर मानली. मी त्याला याबरोबरच इतरही काही गोष्टींचा धडा द्यायचं ठरवलं. म्हणून मला कबूल केलं पाहिजे की मी तितका सरळपणानं वागलो नाही, आणि मला जेवढा खरा राग आला होता त्यापेक्षा जास्त आलासं मी ढोंग केलं. 'तू अगदीच वाईट गोष्ट केलीस' मी त्याला म्हटलं, 'तू बदमाष आहेस. मी त्याबद्दल कुठं बोलणार नाही खरा, पण तुझ्याशी मी काही दिवस मुळीच संबंध ठेवणार नाही. मी विचार करीन अन् स्मुरोवबरोबर (स्मुरोव म्हणजे माझ्याबरोबर आत्ता आलेला मुलगा; तो माझ्यासाठी वाटेल ते करायला तयार असतो.) पुढं तुझ्याशी संबंध ठेवायचा की नाही, की बदमाष म्हणून तुझा संबंध कायमचा सोडायचा ते कळवीन.' तो तर भयंकरच बेचैन झाला. मला मी बोलत असतानाच वाटलं की आपण जरा वाहवलो हे मला कबूल केलं पाहिजे. पण आता काही इलाज नव्हता. मला त्या वेळेला जे सर्वांत योग्य वाटलं ते मी केलं. एक दोन दिवसांनी मी स्मुरोवबरोबर सांगून पाठवलं की, मी तुझ्याशी पुन्हा गट्टी करणार नाही. जेव्हा आम्ही शाळेतली मुलं एकमेकाशी पुढं काही संबंध ठेवायचा नाही असं ठरवतो तेव्हा असंच म्हणतो. त्याला काही दिवस असंच बाजूला ठेवायचं आणि मग, त्याच्याशी पश्चात्तापाची चिन्हं दिसली की पुन्हा गट्टी करायची, असं माझ्या मनात होतं. असाच माझा उद्देश होता. पण काय घडलं असं तुला वाटतं? त्यानं स्मुरोवकडून निरोप ऐकला. त्याच्या डोळ्यांत तेज चमकलं. 'क्रासोत्कीनला माझा निरोप सांग' तो म्हणाला, 'म्हणावं, मी सर्व कुत्र्यांना– सर्व सर्व कुत्र्यांना टाचण्या घालून ब्रेड चारीन!' 'हं, स्वारी जरा चढलेली दिसते. त्याचा जाम

उतरविला पाहिजे.' आणि मी त्याला तिरस्कारानं वागवू लागलो. ज्या ज्या वेळी तो भेटला त्या त्या वेळी मी त्याच्यापासून तोंड फिरवी किंवा औपरोधिकपणे हसू लागे अन् त्याच वेळी त्याच्या वडिलांचं ते प्रकरण घडलं. आठवतं ना तुला ते? अगोदरच जे झालं होतं त्याचा त्याच्या मनावर भयंकर परिणाम झाला होता हे तू लक्षात घेतलं पाहिजेस. मी त्याला सोडलंय म्हणताना मुलं त्याच्या मागं लागली अन् त्याला 'झाडूचा कुंचा, हो, झाडूचा कुंचा!' असं ओरडून चिडवू लागली. अन् त्याच्या त्यांच्याशी चक्क चकमकी घडू लागल्या, मला त्याबद्दल फार वाईट वाटतं. त्यांनी त्याला एकदा चांगलाच मार दिलासं मला वाटतं. एके दिवशी ती शाळेच्या बाहेर येत असताना तो त्यांच्या अंगावर धावून गेला. मी थोड्या अंतरावरच पाहत उभा होतो. अन् मी शपथपूर्वक सांगतो. मी हसलोसं मला आठवत नाही; उलट झालं, मला त्याच्याबद्दल भयंकर वाईट वाटायला लागलं, लगेच मी त्याची बाजू घ्यायला धावून जाणार होतो. पण इतक्यात त्याचे डोळे माझ्या डोळ्यांना भिडले. त्याची काय कल्पना झाली कुणास ठाऊक; पण त्यानं चाकू बाहेर काढला अन् माझ्या अंगावर तो धावून आला, माझ्या मांडीवर इथं माझ्या उजव्या पायावर, त्यानं तो खुपसला. मी जागचा हललो नाही. केव्हा केव्हा माझ्यात शौर्य येतं हे कबूल करायला मला हरकत वाटत नाही, कारमाझफ! मी त्याच्याकडं निव्वळ तिरस्काराच्या नजरेनं बघितलं, जणू मी त्याला म्हटलं, 'हे माझ्या सगळ्या भलाईचं बक्षीस म्हणायचं? तुला वाटलं तर पुन्हा मला तसंच कर, मी त्याला तयार आहे.' पण त्यानं पुन्हा मला चाकू खुपसला नाही; तो एकदम रडायला लागला, त्यानं जे केलं त्यामुळं तो घाबरला. त्यानं चाकू फेकून दिला, तो रडत रडत पळून गेला. मी काही अर्थात् त्याची चहाडी केली नाही, अन् मी त्या सर्वांना ते गुपचूप ठेवायला सांगितलं, नाहीतर ते शिक्षकांच्या कानांवर जायचं. मला लागलेलं बरं होईपर्यंत मी आईलाही पत्ता लागू दिला नाही. अन् जखम केवढीशी, ओरखड्यासारखीच होती. अन् मग मला कळलं की त्याच दिवशी तो दगड मारीत होता अन् तुझ्या बोटाला तो चावला म्हणून. पण तो त्या वेळी कोणत्या अवस्थेत होता हे आता तुला कळलं ना! हं; आता त्याला इलाज नाही; तो आजारी पडला तेव्हा त्याच्याकडं येऊन त्याला मी क्षमा केली नाही म्हणजे त्याच्याशी गट्टी केली नाही—हा माझ्याकडून मूर्खपणा झाला. आता मला त्याचं वाईट वाटतं. पण मला तसं करायला खास कारण होतं तेव्हा आता तुला मी हे सगळं सांगितलं...पण माझ्याकडून हा मूर्खपणाच झाला असं मला वाटतं."

"अरेरे," आल्योशा कळवळून म्हणाला. तुझे त्याच्याशी कसे संबंध आहेत हे मला अगोदर कळलं नाही ही किती दुःखाची गोष्ट आहे. नाही तर मीच यापूर्वी तुझ्याकडं येऊन तुला त्याच्याकडं चलण्याची विनवणी केली असती. खरोखर सांगतो, त्याला ताप चढला म्हणजे वातात तो तुझ्या संबंधीच बोलायचा.

तुझ्याबद्दल त्याला इतकं वाटत होतं हे मला माहीत नव्हतं! अन् ते कुत्रं तुम्हाला सापडलं नाही का? त्याचे वडील अन् ही मुलं शहरभर त्याला धुंडाळताहेत. खरोखर सांगतो, तो आजारी पडल्यापासून डोळ्यांत पाणी आणून 'बाबा, मी झुचकाला मारलं म्हणूनच मी आता आजारी पडलो, देव मला त्याबद्दल शिक्षा करतो आहे.' असं त्याला असं तीन वेळा बोलताना मी ऐकलंय. त्याच्या डोक्यातून तो विचार काही केल्या जात नाही. अन् ते कुत्रं जर सापडलं अन् जिवंत आहे असं नक्की झालं, तर त्याच्या आनंदानंच तो बरा होऊन जाईल असं समजायला हरकत नाही. तुझ्यावरच आम्ही आमच्या साऱ्या आशा ठेवल्या आहेत."

"मीच त्याला शोधून काढीन अशी आशा तुम्हाला वाटण्याचं कारण काय सांग?" कोल्यानं मोठ्या उत्सुकतेनं विचारलं. "इतरा कुणापेक्षा माझ्यावरच तुम्ही इतके विसंबून का?"

"तू त्या कुत्र्याचा शोध करतो आहेस, अन् तुला ते मिळालं की तू आणशील, असं कळलं होतं. स्मुरोवच असं काही म्हणाला होता. ते कुत्रं जिवंत आहे, अन् ते दिसलं असं इल्यूशाच्या मनावर ठसविण्याचा आमचा सारखा प्रयत्न आहे. मुलांनी त्याच्याकडं एक जिवंत ससा आणला; त्यानं त्याच्याकडं बारीकसं हसून नुसतं बघितलं, आणि त्याला मैदानात मोकळं सोडा असं सांगितलं अन् तसं आम्ही केलं, त्याचे वडील आत्ताच घरी आले आहेत, त्याच्यासाठी त्यांनी एक थोराड कुत्र्याचं पिलू आणलंय; त्यानं तरी त्याला बरं वाटेल असं त्यांना वाटतं; पण त्यानं त्याची स्थिती अधिकच बिघडते असं मला वाटतं."

"कारमाझफ मला सांग, हे त्याचे वडील कशा प्रकारचे आहेत बरं? मी त्यांना ओळखतो पण त्यांचं स्वरूप कसं वाटतं तुला–ढोंगी वैदू, विदूषक?"

"छेः छेः, काही अत्यंत तीव्र भावनाशील अशी माणसं कशामुळं तरी चिरडली जातात. त्यांच्यातला विदूषकपणा हा ज्यांच्यापुढं ते सत्य बोलू धजत नाहीत त्यांच्याविरुद्ध तिरस्कारयुक्त उपरोध या स्वरूपात असतो. ही माणसं त्यांच्याकडून वर्षानुवर्षे अपमानित झालेली असतात, त्यांच्या दहशतीखाली असतात. मी खरं सांगतो, क्रासोत्कीन, अशा तऱ्हेचा विदूषकपणा हा कित्येकवेळा अतिशय शोकजनक असतो. या माणसाचं सारं जीवन या वेळी इल्यूशामध्ये केंद्रित झालं आहे, अन् जर इल्यूशा मेला ना, तर हा माणूस एकतर दुःखानं वेडा होईल किंवा आत्महत्या करील. आता त्याच्याकडं पाहिलं की मला तशी जवळ जवळ खात्री वाटते."

"तू काय म्हणतोस ते मला समजतं, कारमाझफ. तुला मनुष्यस्वभाव समजतो असं दिसतं," कोल्या जिव्हाळ्याच्या भावनेने म्हणाला.

"तू कुत्र्याला घेऊन येताना पाहताच, मला वाटलं तू झुचकालाच आणलं आहेस."

"थांब, कारमाझफ, कदाचित ते आपल्याला अजून सापडेल; पण हा पेरेझ्वोन आहे. याला मी आता आत सोडून देतो, कदाचित हा त्या मोठ्या पिलापेक्षा इल्यूशाची जास्त करमणूक करील. थांब हं, कारमाझफ तुला एका मिनिटात काय ते समजेल. पण, अरेच्या, मी तुला इथंच उभं करून ठेवलं की !" कोल्या एकदम म्हणाला. "या कडक थंडीत तुझ्या अंगात ओव्हरकोटदेखील नाही. मी किती अप्पलपोटा आहे बघितलंस ! हं :, आपण सारेच असे स्वतःपुरतं पाहाणारे आहोत कारमाझफ !"

"काही काळजी करू नकोस; थंडी आहे, पण मला नेहमीच सर्दी होते असं नाही. पण आता आपण आत जाऊ या, बरं पण तुझं नाव काय रे ? तुला कोल्या म्हणतात मला माहीत आहे, पण दुसरं नाव काय ?"

"निकोलाय- निकोलाय इवानोविच क्रासोत्कीन, किंवा सरकारी कागद पत्रात म्हणतात ना तसं 'क्रासोत्कीनचा मुलगा,' कोल्या काही कारणाने हसला, पण लगेच म्हणाला, "पण मला माझं नाव मुळीच आवडत नाही."

"का बरं ?"

"ते अगदीच क्षुद्र, अगदीच सामान्य आहे."

"तू तेरा वर्षांचा ना ?" आल्योशाने विचारले.

"नाही, चौदा—म्हणजे आता पंधरा दिवसांतच मी चौदा वर्षांचा होईन. ही तुझी माझी पहिलीच भेट आहे, अन् माझा स्वभाव तुला चटकन् कळून यावा म्हणून माझा एक दोष मी कबूल करतो, कारमाझफ, फक्त तुझ्यापुढंच हं, मला कुणी माझं वय विचारलेलं मुळीच आवडत नाही, अन् त्याहून जास्त म्हणजे...अन् खरोखरच... माझ्या विषयी एक बदनामीकारक गप्प पसरलेली आहे की मी प्राथमिक शाळेतल्या मुलांच्या बरोबर गेल्या आठवड्यात चोरीचोरीचा खेळ खेळलो म्हणून. मी खेळलो ही गोष्ट खरीच, पण मी तो फक्त माझ्याच करमणुकीखातर खेळलो असं म्हणणं म्हणजे माझी पूर्ण बदनामी आहे. तुझ्या कानावर ती गोष्ट आली असेल असं समजायला मला कारणं आहेत; पण मी माझ्या करमणुकीकरता खेळत नव्हतो, मुलांच्या करिता म्हणून खेळत होतो, कारण त्यांना स्वतःला काय करावं हे सुचत नव्हतं. पण लोकांना काय, त्यांच्या तोंडी नेहमी काहीतरी मूर्खपणाची गप्प असते. गप्पांच्या बाबतीत हे शहर भयंकरच आहे, सांगतो तुला."

"पण समज तू जरी तुझ्याच करमणुकीकरता खेळत असतास तरी काय झालं असतं, त्यात काय बिघडत होतं ?"

"बरं तर, माझ्या करमणुकीकरिता म्हण ! तू घोडा घोडा खेळतोस ? खेळतोस का ?"

"पण तू या गोष्टीकडं या दृष्टीनं बघावंस," आल्योशा हसत म्हणाला, "मोठी माणसं नाट्यगृहात जातात, अन् तिथं नाना प्रकारच्या वीरपुरुषांचे पराक्रम दाखविले

जातात– कधी कधी नाटकातून चोर, दरोडेखोर अन् लढायासुद्धा असतात– या गोष्टी त्या खेळांसारख्याच नव्हेत काय, अर्थात् निराळया स्वरूपात? आणि मुलांनी आपल्या खेळाच्या वेळात केलेले शिपायांचे किंवा चोर-दरोडेखोरांचे खेळ ही पहिल्या अवस्थेतली कला आहे. मुलांच्या वाढत्या उपजत कलात्मक वृत्तीतूनच ते खेळ निघतात. आणि केव्हा केव्हा हे खेळ नाट्यगृहातल्या खेळांपेक्षा कितीतरी चांगले असतात, त्यात फरक इतकाच की नाट्यगृहात लोक नटांना पाहायला जातात, तर अशा खेळात मुलं स्वतःच नट बनतात. पण ते अगदी स्वाभाविक आहे."

"असे तुझे विचार आहेत? ही तुझी विचारसरणी आहे?" कोल्याने त्याच्याकडे एकाग्र दृष्टीने पाहिले. "वाः, हा एक लक्षात घेण्याजोगा दृष्टिकोण आहे हं. घरी गेलो की मी त्यावर पुन्हा विचार करीन. मला वाटतच होतं की मला तुझ्याकडून काहीतरी शिकायला मिळेल, हे मी कबूल करतो. तुझ्याकडून शिकण्यासाठी मी आलो आहे कारमाझफ," कोल्या उत्स्फूर्त भावनावश स्वरात बोलला.

"आणि मी तुझ्याकडून," आल्योशा हसत त्याचा हात दाबून म्हणाला.

कोल्या आल्योशावर फार खूष झाला. त्याच्या जास्त लक्षात भरले ते त्याने त्याला अगदी बरोबरीचा म्हणून वागविले आणि तो जणू 'चांगला मोठ्या वयाचा' आहे अशा रीतीने त्याच्याशी बोलणे केले ते.

"मी आत्ताच तुला काहीतरी दाखवितो कारमाझफ, तोसुद्धा नाट्यगृहातलाच एक खेळ आहे," तो संकोचून हसत म्हणाला. "त्याकरताच मी आलोय."

"प्रथम आपण घरची मंडळी इकडं डाव्या बाजूला आहेत त्यांच्याकडं जाऊ. सगळी मुलं आपले कोट तिथं ठेवतात, कारण ती खोली लहान आहे अन् गरम आहे."

"हो, मी एका मिनिटात येतो हं. माझा ओवरकोट मी अंगावरच ठेवतो. पेरेझ्वोन इथं वाटेतच थांबेल अन् मेल्यासारखा पडून राहील. चलो, पेरेझ्वोन, पड इथं अन् मर! बघितलंस, तो कसा मेल्यासारखा झाला. मी अगोदर आत जाऊन शोध घेतो, मग मला जर ठीक वाटलं तर मी शीळ घालीन अन् पहा तो कसा पिसाळल्यासारखा आत घुसेल. फक्त स्युरोवनं दार त्या वेळी उघडं ठेवावं. ते मी सारं जमवतो अन् तुला काही गंमत दिसेल."

५

इल्यूशाच्या बिछान्यापाशी

नोकरीतून निवृत्त झालेल्या कॅप्टन स्नेगिर्योवचे कुटुंब राहत असलेली खोली वाचकांना यापूर्वी माहीत झालेलीच आहे. त्या वेळी त्या खोलीत भेटीला

आलेले बरेच लोक दाटीवाटीने बसलेले होते. अनेक मुलं इल्यूशापाशी बसली होती, आणि आपल्याला आल्योशाने इथे आणले अन् त्यानेच आपली इल्यूशाशी गट्टी जमवून आणली ही गोष्ट स्युरोवप्रमाणेच सगळे जरी अमान्य करीत असले तरी तीच खरी गोष्ट होती. त्यानं जी काय कला उपयोगात आणली ती म्हणजे एकेकाला 'नेमळट भावुकता' उत्पन्न न करता इल्यूशाकडं न्यायचे, जणू ते सहज अन् काही बेत न करता घडले आहे अशा रीतीने. इल्यूशाला त्याच्या यातना विसरायला लावण्याकरिता हे फार उपयोगी पडले. ही जी मुले त्याची वैरी होती, त्यांनी दाखविलेल्या कोमल ममताळूपणाने अन् सहनुभूतीने त्याचे अंतःकरण अगदी विरघळून गेले. एकटा क्रासोत्कीनच काय तो यायचा राहिला होता अन् तो आला नाही हे इल्यूशाच्या मनावर एक फार मोठे दडपण होते. आणि त्याच्या मनात राहून गेलेली सर्वांत कटू गोष्ट म्हणजे, क्रासोत्कीन हा एकटाच त्याचा मित्र अन् संरक्षक असताना, त्याने त्याच्यावर चाकूचा वार केला होता ती. छोट्या हुशार स्युरोवने पहिल्याप्रथम इल्यूशाशी गट्टी केली, इल्यूशाच्या मनात हे दुःख आहे, असे त्याला वाटले. पण आल्योशा काही कारणाकरिता तुझ्याकडं भेटायला येणार आहे असे जेव्हा स्युरोवने सुचवले तेव्हा त्याने त्याला मध्येच थांबवून सांगितले की त्या 'कारमाझफ'ला जाऊन सांग, म्हणावं, मला काय करायचं ते चांगलं समजतं,' मला कुणाच्या सल्ल्याची गरज नाही, अन् मला जर इल्यूशाला भेटायला जायचं असलं तर मी योग्य वाटेल त्या वेळी जाईन कारण माझी तशीच काही कारणे आहेत.

ही गोष्ट या रविवारच्या पूर्वी पंधरा दिवस घडली होती. म्हणूनच आल्योशाच्या मनात असूनही तो त्याच्याकडे भेटायला गेला नव्हता. परंतु जरी तो वाट पाहत होता तरी त्याने स्युरोवला पुन्हा दोनदा त्याच्याकडे पाठविले. दोन्ही वेळा क्रासोत्कीनने त्याला तुसडेपणाने अन् रागाने नकार दिला होता अन् आल्योशाला निरोप पाठविला होता की, मला यापुढं उगीच त्रास देऊ नकोस, अन् जर तू स्वतः आलास तर मी इल्यूशाकडे मुळीच जाणार नाही.' कोल्याच्या मनात त्या दिवशी सकाळी इल्यूशाकडे जायचं आहे हे अगदी आदल्या दिवसापर्यंत स्मुरोवला माहीत नव्हते. आणि अगदी आदल्या संध्याकाळी स्युरोवचा निरोप घेताना त्याने त्याला उद्या सकाळी घरी माझी वाट पाहा, तुझ्याबरोबर मला स्नेगिर्योवच्या घरी यायचं आहे; असे अचानकपणे सांगितले होते, पण 'मी येणार आहे असं मुळीसुद्धा बोलू नकोस, कारण जाताजाता सहज त्याच्याकडं मी चक्कर टाकीन,' असे त्याला बजावले होते. स्युरोवने आज्ञा पाळली. हरवलेले कुत्रे कोल्या शोधून परत आणील अशी स्युरोवची कल्पना झाली होती कारण ते कुत्रं जिवंत असेल आणि तरी ते शोधणाऱ्यांना सापडत नसेल तर ते गाढव असले पाहिजेत" असे कोल्याने उद्गार काढले होते. स्युरोवने जेव्हा, संधी पाहून भीत भीत त्याला आपला त्या कुत्र्याबद्दलचा तर्क सांगितला होता तेव्हा क्रासोत्कीन जाम संतापला

होता. "माझा स्वतःचा कुत्रा असताना दुसऱ्यांची कुत्री शोधत गावभर फिरत बसण्याइतका मी गाढव नाही ! अन् टाचणी गिळल्यानंतर कुत्रं जिवंत राहू शकेल अशी तुमची कल्पना तरी कशी होते ? नेभळट हळवेपणा, दुसरं काय ? "

कोपऱ्यातल्या मूर्तीच्या खाली असलेला आपला छोटा बिछाना गेला पंधरवडाभर इल्यूशाने सोडला नव्हता. तो ज्या दिवशी आल्योशाला भेटला अन् त्याचे बोट चावला त्या दिवसापासून तो शाळेला गेला नव्हता. त्याच दिवशी तो आजारी पडला, नंतर एक महिना तो कधी कधी अंथरुणावरून उठून खोलीत अन् बाहेरच्या वाटेवर अर्थात थोडा फिरे. पण अलीकडे त्याला इतका अशक्तपणा आला होता की त्याला आपल्या बापाच्या मदतीशिवाय हालताच येईनासे झाले होते. त्याच्या बापाला त्याच्याबद्दल भयंकर चिंता वाटत होती. त्याने दारू पिण्याचे सोडले होते. अन् आपले पोर मरणार या धास्तीने तो वेडा झाल्यासारखा झाला होता. आणि पुष्कळ वेळा, विशेषतः त्याला आपल्या हाताचा आधार देऊन खोलीभर चालवून परत बिछान्यावर निजविल्यानंतर तो वाटेतल्या एका अंधाऱ्या कोपऱ्यात जाई आणि आपले डोके भिंतीला टेकून आपल्या रडण्याच्या आतल्या उसळीला वाट करून देई. आपले हुंदके इल्यूशाच्या कानावर जाऊ नयेत म्हणून ते तो दाबून टाकी.

खोलीत परत येऊन तो नेहमी आपल्या जिवलग मुलाची करमणूक करण्यासाठी अन् त्याला बरे वाटावे म्हणून काहीतरी करू लागे; तो त्याला गोष्टी, म्हणजे मजेदार कथा सांगे, किंवा आपल्याला भेटलेल्या मजेदार माणसांची नक्कल करून दाखवी, नव्हे जनावरांचे आवाज अन् ओरडणे यांचीसुद्धा नक्कल करी. पण इल्यूशाला आपल्या बापाचे हे मस्करी अन् विदूषकासारखे चाळे सहन होत नव्हते. आपल्याला ते आवडत नाही हे दिसू नये असा जरी तो पोरगा प्रयत्न करी, तरी आपला बाप हेटाळणीला पात्र बनतो हे पाहून त्याचे हृदय फाटे आणि 'झाडूचा कुंचा' या हेटाळणीची अन् त्या 'भयंकर दिवसा'ची आठवण त्याला एकसारखी सतावी.

इल्यूशाची मृदू अंतःकरणाची, अपंग बहीण नीना, तिलाही आपल्या बापाचे हे विदूषकी चाळे आवडत नव्हते (वार्वारा काही दिवसांपूर्वी पीटर्सबर्गला विद्यापीठात अभ्यास करण्याकरिता गेली होती). पण त्यांच्या अर्धवट वेड्या आईला मात्र, तिचा नवरा इकडे तिकडे उड्या मारू लागला किंवा काही चाळे करू लागला की फारच गंमत वाटे अन् ती मनापासून हसत सुटे. या एवढ्या एकाच रीतीने तिची करमणूक होई, इतर सर्व वेळ ती सारखी, आपल्याला सगळे विसरून गेले आहेत, कुणी आपल्याला विचारीत नाही, आपला तिरस्कार करतात वगैरे कुरकुर अन् तक्रार करीत राही. पण गेल्या काही दिवसांत मात्र तिच्यात फारच बदल झाला होता. ती एकसारखी कोपऱ्यातल्या इल्यूशाच्या बिछान्याकडे पाहत राहून विचारात

गढून स्वतःला विसरून जाऊ लागली. ती पूर्वीपेक्षा अधिक गप्प, अधिक शांत झाली, आणि जर ती रडलीच तर कुणाला ऐकू न जाईल असे मुकाट्याने रडू लागे. तिच्यात घडून आलेला हा बदल कॅप्टनला दिसला अन् तो दुःखाने बावरून गेला. मुले भेटायला येऊ लागली याचा तिला आधी राग येत असे, पण मागाहून त्यांच्या खेळकर आरडा-ओरड्याने अन् गोष्टींनी तिची करमणूक होऊ लागली, आणि अखेर तिला ती इतकी आवडू लागली की जर मुले येईनाशी झाली असती, तर त्यांच्यावाचून तिला सुने सुने वाटले असते. मुलांनी एखादी गोष्ट सांगितली किंवा ती एखादी खेळ खेळली की ती हसू लागे अन् टाळ्या वाजवी. ती त्यांच्यापैकी काहींना आपल्यापाशी बोलवी अन् त्यांचे चुंबन घेई. तिला स्मुरोव विशेष आवडे.

कॅप्टनविषयी बोलायचे तर, इल्यूशाचे मन रिझविण्याकरिता त्याच्या खोलीत येणाऱ्या मुलांच्या हजेरीने पहिल्यापासून त्याचे मन उत्कट आनंदाने भरून जात होते. आता इल्यूशाची खिन्नता निघून जाईल, अन् त्याने तो लवकर बरा होईल. अशी आशाही त्याला वाटू लागली. इल्यूशाबद्दल धास्ती वाटत असूनसुद्धा, अगदी आतापर्यंत आपला मुलगा शेवटी बरा होईल याविषयी त्याला यत्किंचितसुद्धा शंका वाटत नव्हती.

त्याने आपल्या घरी आलेल्या छोट्या पाहुण्यांना भेटताच नमस्कार केला, त्यांची तत्परतेने ऊठबस केली. त्यांचा घोडा व्हायला अन् त्यांना आपल्या पाठीवर बसू द्यायलासुद्धा तो तयार झाला, पण इल्यूशाला तो खेळ आवडला नाही म्हणून तो सोडून देण्यात आला. तो त्यांच्याकरिता जिंजर, ब्रेड, बदाम अशांसारख्या वस्तू विकत घेऊन येऊ लागला, त्यांना तो चहा अन् सँडविच बनवून देऊ लागला. यावेळी त्याच्याकडे बराच पैसा होता हे लक्षात घेतले पाहिजे. आल्योशाने अंदाज केला होता. त्याप्रमाणे त्याने कतिरीना इवानोवनाने दिलेले दोनशे रुबल्स घेतले होते. आणि नंतर त्यांच्या परिस्थितीसंबंधी आणि इल्यूशाच्या आजारीपणासंबंधी कळल्यामुळे कतिरीना इवानोवना स्वतः त्यांना भेटायला गेली होती, त्या कुटुंबाशी तिने परिचय करून घेतला होता अन् त्या अर्धवट आईला वश करण्यात तिला यश आले होते. त्या वेळेपासून ती त्यांना अगदी सढळ हाताने मदत करू लागली होती, आणि आपला मुलगा कदाचित् मरण पावेल या विचाराने भयभीत होऊन कॅप्टन आपला अभिमानही विसरला होता आणि तिने दिलेली मदत नम्रपणे घेत होता.

हे सर्व दिवस कतिरीना इवानोवनाच्या सांगण्यावरून डॉक्टर हर्झेनस्तुबे नियमाने एक दिवसाआड येत होते, पण त्यांच्या येण्याचा फारसा काही उपयोग होत नव्हता आणि ते आजारी पोराला निर्दयपणे औषधाचे डोस पाजीत होते. पण त्या रविवारी सकाळी एक नवीन डॉक्टर यायचा होता; तो मॉस्कोहून आला होता. तिथं त्याचा चांगला लौकिक होता. कतिरीना इवानोवनाने त्याला खूप पैसे खर्च करून मॉस्कोहून आणवले होते, खास इल्यूशाकरिताच नव्हे, दुसऱ्या काही कारणा-

करिता, कशाकरिता ते पुढे योग्य त्या ठिकाणी सांगितले जाईल. पण तो आला असल्यामुळं, तिने त्याला इल्यूशालाही बघायला सांगितले होते, आणि कॅप्टनला 'त्यांची वाट पाहा' म्हणून सांगण्यात आले होते. कोल्या क्रासोत्कीन येणार याची कॅप्टनला जरासुद्धा कल्पना नव्हती, अर्थात् इल्यूशा ज्याच्याकरिता जीव टाकीत होता त्या मुलाने येऊन भेटावे अशी त्याची पुष्कळ दिवसांपासून इच्छा होती ही गोष्ट खरी.

दरवाजा उघडून क्रासोत्कीन आत गेला. त्या वेळी कॅप्टन अन् सर्व मुले इल्यूशाच्या बिछान्याभोवती गोळा होऊन मॅस्टिफॉ जातीच्या कुत्र्याच्या चिमुकल्या पिलाकडे पाहत होती. ते आदल्या दिवशीच जन्मलेले होते, अर्थात इल्यूशाला बरे वाटावे अन् त्याची करमणूक व्हावी म्हणून कॅप्टनने एका आठवड्यापूर्वीच त्याच्याबद्दल सांगून ठेवलेले होते. इल्यूशा अजूनही त्या हरवलेल्या, अन् कदाचित मरून गेलेल्या झुचकाबद्दल तळमळत होता. इल्यूशाला तीन दिवसांपूर्वीच कळले होते की, त्याला एक कुत्र्याचे पिलू बक्षीस मिळणार आहे, साध्या कुत्र्याचे नव्हे तर जातिवंत मॅस्टिफ कुत्र्याचे (हा अर्थात फार महत्त्वाचा मुद्दा होता), त्या वेळी त्याने, दुसऱ्याच्या भावनेची बूज राखण्याकरिता म्हणून, आपल्याला आनंद झाल्याचे वरून दर्शविले होते. पण या पिलाने त्याच्या चिमुकल्या हृदयात त्याने मारलेल्या दुर्दैवी कुत्र्याचा विचारच पुन्हा जागृत केला, हे त्याच्या वडिलांना अन् मुलांना दिसल्यावाचून राहिले नाही. ते पिलू त्याच्या शेजारीच पडून होते, कसेबसे हलत होते आणि तो दुःखित अंतःकरणाने हसून आपल्या बारीक, रक्तहीन, क्षीण झालेल्या हाताने त्याला थोपटीत होता. त्याला ते पिलू आवडलं होतं हे स्पष्टच होते, पण.... ते झुचका नव्हते; त्याला जर झुचका कुत्रे अन् हे पिलूही मिळाले असते तर फारच संतोष झाला असता.

" क्रासोत्कीन ! " एक मुलगा एकदम ओरडला. त्यानेच त्याला येताना पहिल्या प्रथम पाहिले होते.

क्रासोत्कीनच्या येण्याने सर्वांतच एक चुळबुळ सुरू झाली, त्याला इल्यूशा पुरता दिसावा याकरिता ती सर्व मु॰ दूर होऊन बिछान्याच्या दोन्ही बाजूंना उभी राहिली. कोल्याला भेटण्यासाठी कॅप्टन उत्कंठेने पुढे धावला.

" ये, ये... तू आलास, फार बरं झालं ! " तो घाईघाईने बोलला. " इल्यूशा, क्रासोत्कीन तुला भेटायला आले आहेत ! "

पण क्रासोत्कीनने त्याच्याशी घाईघाईने हस्तांदोलन करून उच्च दर्जाच्या समाजाच्या चालीरीतीचे आपल्याला उत्तम ज्ञान आहे हे तात्काळ दाखवून दिले. तो पहिल्या प्रथम कॅप्टनची बायको आरामखुर्चीत बसली होती तिच्याकडे वळला, ती त्या वेळी फार चिडक्या अवस्थेत होती आणि आपल्या अन् इल्यूशाच्या बिछान्याच्यामध्ये मुले येत आहेत अन् आपल्याला ते नवे पिलू पाहू देत नाहीत अशी

कुरकुर करीत होती. आपले पाय पायपुसण्याला पुसून त्याने अतिशय सौजन्यपूर्वक तिला अभिवादन केले आणि मग, नीनाकडे वळून, तीच दुसरी स्त्री तिथे असल्यामुळे तिला तसेच अभिवादन केले. या त्याच्या सभ्य वागणुकीची त्या वेडगळ बाईवर फारच चांगली छाप पडली.

"पाहा, हा तरुण मुलगा चांगल्या संस्कारात वाढला आहे असं चटकन् तुम्हाला दिसून येईल," ती आपले हात वर करून मोठ्याने म्हणाली; "पण आमच्याकडं येणारी दुसरी मुलं पाहा, ती एकाच्या अंगावरून एक येतात."

"म्हणजे काय आई, 'एकाच्या अंगावरून एक म्हणजे कसं?" कॅप्टन ममतेच्या स्वरात हळूच म्हणाला, अर्थात् तिच्याबद्दल तो थोडा सचिंत होता.

"असे ते कुरघोडी करून येतात. मधल्या वाटेत ते एकमेकांच्या खांद्यावर चढतात अन् चांगल्या खानदानी कुटुंबात उड्या टाकीत शिरतात. विचित्रच आहेत हे भेटायला येणारे!"

"पण तसं कोण येतं, आई?"

"कोण म्हणजे, तो मुलगा त्या मुलाच्या पाठीवर बसून अन् हा त्या मुलाच्या पाठीवरून आत आला."

ह्या वेळापर्यंत कोल्या इल्यूशाच्या बिछान्यापाशी पोचला होता. त्या आजारी मुलाचा चेहेरा जास्तच फिक्कट पडलेला दिसला. त्याने आपले अंग अंथरुणातून वर उचलून कोल्याकडे उत्कटतेने पाहिले. कोल्याने आपल्या या छोट्या दोस्ताला दोन महिन्यांत पाहिले नव्हते, अन् त्याला पाहताच कोल्या पार दडपून गेला. इतका क्षीण, पिवळट चेहेरा, इतके मोठे मोठे, तापाने चमकणारे डोळे अन् इतके बारीक हात आपल्याला दिसतील अशी त्याला कल्पनाही नव्हती. त्याला इल्यूशाचा जलद, कष्टाने चालणारा श्वासोच्छ्वास अन् सुकलेले ओठ पाहून आश्चर्य अन् दुःख वाटले. तो पाऊल पुढे टाकून त्याच्याजवळ गेला, त्याचा हात त्याने हाती घेतला अन्, सद्‌गदित झाल्यासारखा होऊन, तो म्हणाला,

"हं, दोस्ता....कसं काय आहे?" पण त्याच्या आवाजाने दगा दिला, त्याला स्वस्थपणाचे सोंग ठेवता आले नाही; त्याच्या चेहेऱ्याचे स्नायू कंप पावले अन् त्याचे ओठ थरथरले. इल्यूशा केविलवाणे हळूच हसला, अजून त्याच्या तोंडून शब्द उमटू शकत नव्हता. कोल्याच्या मनात काहीतरी येऊन त्याने आपला हात उचलला अन् तो त्याच्या केसांवरून फिरवू लागला.

"काही चिंता करू नको!" तो त्याला उत्साह आणण्याकरिता मंद स्वरात मृदूपणे म्हणाला, किंवा आपण तसे का बोललो ते न समजूनही कदाचित तो बोलला असेल. एक मिनिटभर ते पुन्हा स्तब्ध राहिले.

"ओहो, तुला नवं पिलू मिळालं वाटतं?" कोल्या एकदम, अत्यंत बेपर्वा स्वरात म्हणाला.

"हो-य," इल्यूशा मंदपणे आवाज ओढत अन् कष्टानं श्वास घेत म्हणाला.

"नाक काळं आहे, म्हणजे तो चवताळणारा आहे, चांगला आहे घरगुती कुत्रा," जणू त्याला पर्वा वाटणारी गोष्ट म्हणजे ते पिल्लू अन त्याचे काळे नाक एवढीच असावी त्याप्रमाणे, गंभीरपणे अन थंडपणे कोल्या म्हणाला. पण खरे म्हणजे आपल्या भावनांचा स्फोट होऊन लहान मुलासारखे आपल्याला एकदम रडू फुटू नये याकरिता अजूनही त्याला आटोकाट प्रयत्न करावा लागत होता. "ते मोठं होईल तेव्हा त्याला तुम्हाला साखळीनं बांधूनच ठेवावं लागेल असं मला वाटतं."

"तो फार मोठ्ठा कुत्रा होईल!" त्या मुलांपैकी कोणी ओरडून म्हणाली.

"होणारच", "अरे तो मॅस्टिफ आहे", "केवढा मोठा", "एवढा", "चांगला वासराएवढा", असे अनेक उद्‌गार निघाले.

"चांगला वासराएवढा, अगदी खरोखर वासराएवढा" कॅप्टनने पुष्टी दिली. "मी एवढा मोठ्ठा आणला तो मुद्दामच, फार भयंकर जात आहे ही, अन् त्याचे आईबाप खूप धिप्पाड अन अतिशय भयंकर आहेत, ते उभे राहिले म्हणजे जमिनीपासून इतके उंच होतात, .. ये इकडं येऊन बैस, इल्यूशाच्या बिछान्यावर, किंवा इथे बाकावर बैस. तू आलास फार छान झालं, आम्ही किती दिवसांपासून तुझी वाट पाहतो आहोत... अलेक्सी फ्योदरोविच यांच्याबरोबर तू येण्याची कृपा केलीस, अं?"

बिछान्याच्या कडेवर इल्यूशाच्या पायथ्याशी क्रासोत्कीन बसला. संभाषण कसं मोकळेपणानं अन् सहज सुरू करायचं, ते येत असताना वाटेत जरी त्याने योजून ठेवले होते, तरी यावेळी त्याला तो धागाच गवसेनासा झाला.

"नाही... मी पेरेझ्वोन बरोबर आलो. माझ्याकडं आता एक कुत्रा आहे, त्याचे नाव पेरेझ्वोन. स्लाव भाषेतलं नाव आहे. तो तिकडं बाहेर आहे...मी शीळ घातली की तो धावत आत येईल." तो एकदम इल्यूशाकडं बघून म्हणाला, "मी एक कुत्राही आणलाय. तुला झुचका आठवतो का, दोस्त?" त्याने एकदम प्रश्नाची तोफ डागली.

इल्यूशाचे एवढेसे तोंड थरथरले. त्याने कोल्याकडे कळवळलेल्या नजरेने बघितले. आल्योशा दारापाशी उभा होता, त्याने रागावून कोल्याला झुचकाविषयी बोलू नको म्हणून खुणावले, पण त्याने ते पाहिलेच नसावे किंवा पाहण्याची त्याची इच्छा नसावी.

"कुठं आहे...झुचका?" इल्यूशाने पिचक्या आवाजात विचारले.

"हं:, ठीक, दोस्त, झुचका हरवला अन् खतम झाला!"

इल्यूशा बोलला नाही, पण त्याने पुन्हा एकदा उत्कटतेने कोल्याकडे टक लावून बघितले. आल्योशाने कोल्याची नजर पकडून, त्याला जोरजोराने पुन्हा

खुणावले, पण त्याने आपली नजर दुसरीकडे वळविली अन् जणू बघितलेच नाही असे सोंग केले.

"तो पळून गेला असावा अन् कुठंतरी मेला असावा. तसलं खाणं खल्ल्या-नंतर तो मेलाच असला पाहिजे," कोल्या निष्ठूरपणे बोलला, अर्थात् त्याला थोडा दम लागल्यासारखा झाला, "पण माझ्याकडं एक कुत्रा आहे, पेरेझ्वोन, स्लाव नाव आहे ते...त्याला मी तुला दाखविण्यासाठी आणलाय."

"मला नको तो !" इल्यूशा एकदम बोलला. छेः छेः, तू खरोखर त्याला बघितलंच पाहिजेस...तो तुझी करमणूक करील. मी त्याला मुद्दाम तर आणलाय, तो तसाच केसाळ कुत्रा आहे... त्या कुत्र्याला आत मी आणू का, बाईसाहेब ?" त्यानं एकदम मादाम स्नेगिर्योवला उद्देशून प्रश्न केला, त्याच्या हावभावात एक प्रकारची गूढ उत्तेजना होती.

"मला तो नको, मला तो नको !" इल्यूशा ओरडला, त्याच्या आवाजात शोकाचा पिचकेपणा आला होता. त्याच्या डोळ्यात निंदेची चमक होती.

कॅप्टन भिंतीजवळच्या पेटाऱ्यावर नुकताच जाऊन बसला होता तिथून एकदम उठून म्हणाला, "तू ...तू पुनः कधीतरी..." पण कोल्याला आवरणे शक्य नव्हते. त्याने घाईघाईने स्मुरोवला ओरडून सांगितले, "दार उघड", अन् ते उघडताच त्याने आपली शीळ वाजविली. पेरेझ्वोन तीरासारखा आत घुसला.

"उडी मार, पेरेझ्वोन, मार ! मार !" कोल्या एकदम उठून ओरडला, आणि तो कुत्रा इल्यूशाच्या बिछान्यापाशी आपल्या मागच्या दोन पायांवर ताठ उभा राहिला. या पाठोपाठ जे घडले त्याने सर्वजण चकितच झाले. इल्यूशा चमकला, एका अंगावर तो जोराने पुढे झाला, पेरेझ्वोनच्या बाजूला खाली वाकला अन् त्याच्याकडे टक लावून त्याने बघितले. मनाच्या अनिश्चित अवस्थेत त्याला घेरी आल्यासारखी झाली.

"अरे, हा.... तर झुचका !" तो अचानकपणे एकाच वेळी आनंदाच्या अन् यातनांच्या स्वरात ओरडला.

"अन् नाहीतर दुसरा कोण तुला वाटला ?" क्रासोत्किन आपल्या साऱ्या शक्तीनिशी दणाणून टाकणाऱ्या, आनंदोत्सवाच्या आवाजात ओरडला, आणि खाली वाकून त्याने त्याला वर उचलून इल्यूशाच्या जवळ नेले.

"बघ, दोस्ता, पाहिलंस, एका डोळ्यानं आंधळा अन् डावा कान फाटका, आहेत ना तूच मला सांगितल्यास त्या खुणा ? या खुणांनीच तर मी त्याला शोधून काढलं. मी त्याला लगेच शोधून काढलं. त्याचा धनी कुणीच नव्हता !" त्याने कॅप्टनकडे अन् त्याच्या बायकोकडे, आल्योशाकडे अन् परत इल्यूशाकडे वळून खुलासा केला. "हा फेदोतोवच्या मागच्या परसात राहात असे. जरी त्यानं आपलं घर तिथं केलं होतं, तरी ते काही त्याला खायला घालीत नसत. खेड्यातनं पळून

आलेलं हे एक अनाथ कुत्रं होतं... मला ते सापडलं... समजलास....दोस्ता, तू जे त्याला खायला दिलंस ना, ते त्याला गिळताच आलं नसलं पाहिजे. ते त्यानं गिळलं असतं तर तो मेलाच असता, खात्रीनं मेला असता ! म्हणजे तो ते बाहेर ओकला असला पाहिजे, कारण तो जिवंत आहे. तो ओकताना तू त्याला पाहिलं नाहीस. पण ती टाचणी त्याच्या जिभेला टोचली, त्यामुळं तो केकाटला. तो केकाटत केकाटत पळून गेला अन् तुला वाटलं त्यानं ती गिळली. अरे, तो केकाटणारच, कारण कुत्र्यांच्या तोंडाचं कातडं किती नाजूक असतं... माणसांच्या कातड्यापेक्षा फार नाजूक, फारच नाजूक ! " कोल्या कळवळयाने बोलत होता, त्याचा चेहेरा आनंदाने झळाळत अन् चकाकत होता. इल्यूशा बोलू शकेना. पालीसारखा पांढरा पडून तो आ वासून कोल्याकडे पाहात राहिला, त्याचे मोठे मोठे डोळे खोबणीतून बाहेर पडतात की काय असे वाटले. आणि क्रासोत्कीनला जर अशा प्रसंगाचा आजारी मुलाच्या प्रकृतीवर किती घातक अन् अनर्थकारी परिणाम होतो हे माहीत असते, तर त्याला अशा रीतीने चकविण्याची बुद्धीच त्याला झाली नसती, त्याला तशी यत्किंचितसुद्धा शंका आली नाही. पण त्या खोलीत आल्योशाच असा होता की ज्याच्या ते लक्षात आलं. कॅप्टनविषयी बोलायचे तर तो लहान पोरासारखाच वागत होता.

" झुचका ! हा झुचका ! " तो आनंदभराने ओरडला, " इल्यूशा, हा झुचका आहे, तुझा झुचका ! आई, हा झुचका ! " तो अगदी रडायच्या बेताला आला.

" अन् मला कधी कल्पनाही नाही आली," पश्चात्तापाने स्युरोव म्हणाला, " शाब्बास, क्रासोत्कीन, मी म्हणालोच की हा कुत्रा शोधून काढणार अन् हा पाहा त्यानं तो शोधून आणला."

" हा पाहा त्यानं शोधून आणला," दुसरा एक मुलगा तसंच म्हणाला.

" क्रासोत्कीन म्हणजे कमाल आहे हं ! " इतर मुले ओरडून म्हणाली आणि त्यांनी टाळ्या वाजवायला सुरुवात केली.

" अरे, थांबा, थांबा, " क्रासोत्कीन त्यावर सगळ्यांच्यावर आवाज चढविण्याचा कमालीचा प्रयत्न करीत होता." हे कसं झालं ते सांगतो. तो तर मुख्य मुद्दा आहे. मला तो सापडला, मी त्याला घरी नेलं अन् चटकन् दडवून ठेवलं. मी त्याला घरातच डांबून ठेवलं अन् कोणालाही आजतागायत दाखवलं नाही. फक्त स्युरोवला गेला पंधरवडा ते माहीत होतं, पण मी त्याला खातरी देऊन सांगितलं या कुत्र्याचं नाव पेरेझ्वोन आहे, अन् त्याला कल्पना आली नाही. आणि इतके दिवस मी त्याला नाना तऱ्हेची कसरत शिकवली. तो काय काय करतो ते एकदा तुम्ही पाहिलेच पाहिजे ! मी त्याला असा तयार केला आहे की तुझ्या पुढं दोस्ता, एक चांगला तयार झालेला, चांगला धडधाकट कुत्रा आणावा

अन् मला तुला म्हणता यावं, ‘बघ, दोस्त, तुझा छुचका आता कसा झालाय तो !’ तुमच्याकडं एखादा मांसाचा तुकडा जर असला तर तो तुम्हाला अशी गंमत करून दाखवील की हसून हसून तुमची पोटं दुखू लागतील. एक मांसाचा तुकडा हवा, आहे का तुमच्याकडं ?”

मधली वाट पार करून कॅप्टन मालकिणीकडे धावत गेला, तिथे स्वैपाक होत असे. मोलाचा वेळ वाया जाऊ नये म्हणून कोल्या, अतिशय घाईने पेरेझ्वोनला ओरडून म्हणाला, “मेल्यासारखा पड.” अन् तो कुत्रा लगेच गोल फिरला अन् पाठीवर उताणा पडून त्याने आपले चारी पंजे वर केले. मुले हसली, इल्यूशा पूर्वीप्रमाणेच रडवेले हसला, पण त्या कुत्र्याच्या या करामतीने सर्वांत जास्त जर कुणाला आनंद झाला असेल तर तो ‘आई’ला. ती त्या कुत्र्याला उद्देशून हसली आणि आपल्या चुटक्या वाजवून ती त्याला “पेरेझ्वोन, पेरेझ्वोन !” असे बोलावू लागली.

“काही करा तरी तो उठणार नाही, काही करा !” कोल्या विजयी मुद्रेने म्हणाला, त्याला आपल्या यशाचा अभिमान वाटत होता. “आरडा-ओरडा करून घर जरी डोक्यावर घेतलंत तरी तो जागचा हलणार नाही, पण मी त्याला बोलावण्याचा अवकाश, तो चटकन उडी मारील. चलो, पेरेझ्वोन !” तो कुत्रा झपकन झेप घेऊन उठला. आणि आवतीभोवती उड्या मारून आनंदानं भों भों करू लागला. कॅप्टन एक शिजविलेला मांसाचा तुकडा घेऊन धावत परत आला.

“तो गरम तर नाही ना ?” तो हातात घेताना लगेच व्यावहारिकपणाचा भाव आणून कोल्याने विचारले. “कुत्र्यांना गरम पदार्थ चालत नाहीत. नाही, हा ठीक आहे. बघा, प्रत्येकजण बघा, इल्यूशा, दोस्ता, दोस्ता, बघ; तू का बघत नाहीस ? त्याला मी आणलं तर आता हा त्याच्याकडं बघतच नाही.”

“ही नवी करामत म्हणजे त्या कुत्र्याला त्याचे नाक पुढे करून अगदी निश्चळ उभे करायचे अन् एक खमंग मांसाचा घास त्याच्या बरोबर नाकावर ठेवायचा. त्या बिचाऱ्या कुत्र्याने नाकावर तो मांसाचा तुकडा घेऊन, त्याचा धनी त्याला जितका वेळ निश्चळ ठेवू पाहील तितका वेळ, कदाचित् अर्धा तासमुद्धा, न हलता उभे राहायचे होते. पण त्याने पेरेझ्वोनला क्षणभर तसे उभे केले असेल नसेल.

“संपलं !” कोल्या ओरडला, अन् तो तुकडा पटकन् त्या कुत्र्याच्या नाकावरून तोंडात गेला. पाहणाऱ्यांना अर्थात् फारच गंमत अन् आश्चर्य वाटले.

“इतके दिवस तू इकडं येणं लांबणीवर टाकलंस ते खरोखर निव्वळ या कुत्र्याला शिकवून तयार करण्याकरिता का ?”

आल्योशा एकदम उद्‌गारला, त्याच्या आवाजात नकळत एक प्रकारची निर्भर्त्सनेची झाक होती.

" निव्वळ त्याचकरिता ! " कोल्या अगदी निर्व्याजपणे म्हणाला. " मला त्याला त्याच्या साऱ्या ऐटीसकट दाखवायचं होतं."

" पेरेझ्वोन ! पेरेझ्वोन ! " इल्यूशा एकदम ओरडून म्हणाला, आपल्या हाताने चुटक्या वाजवीत त्याने त्या कुत्र्याला बोलावले.

" असं काय ? त्याला अंथरुणावरून उडी मारून येऊ द्या ! चलो पेरेझ्वोन !" कोल्याने आपला हात अंथरुणावर आपटला अन् पेरेझ्वोन तीरासारखा इल्यूशा-पाशी धावत आला. त्या मुलाने आपले दोन्ही हात त्याच्या मानेभोवती टाकले अन् पेरेझ्वोनने चटकन त्याचा गाल चाटला. इल्यूशा सरकत अगदी त्याच्याजवळ गेला. आपले पाय पूर्ण पसरले अन् आपले तोंड त्या कुत्र्याच्या खरबरीत दाट केसांत लपविले.

" गंमत आहे, गंमत आहे ! " कॅप्टनच्या तोंडून उद्‌गार निघत राहिले. कोल्या फिरून अंथरुणाच्या कडेवर टेकला.

" इल्यूशा, तुला आणखी एक गंमत दाखवितो. मी तुझ्यासाठी एक छोटीशी तोफ आणली आहे. तुला आठवतं, मी तुला मागं तिच्याबद्दल सांगितलं होतं आणि तू आपल्याला ती जरूर दाखव असं म्हणाला होतास. ही पाहा मी ती आणली आहे."

आणि कोल्याने घाईघाईने आपल्या दप्तरातून ती छोटी ब्रॉंझची तोफ बाहेर काढली. त्याला घाई झाली होती कारण त्याला स्वतःलाच मोठा आनंद झाला होता. दुसऱ्या वेळी तो कदाचित्, पेरेझ्वोनने जी एक गडबड उडवून दिली होती ती शमेपर्यंत, थांबला असता, या वेळी त्याने सर्व विचार सोडून घाईघाईने ही दुसरी गंमत काढली.

त्याच्या मनाला वाटले, " तुम्ही या वेळी सगळे आनंदात आहात, तर तुम्हाला आणखी जास्त आनंद देण्याजोगं मी दाखवतो ! " तो स्वतःच पूर्ण भारल्यासारखा झाला होता.

" पुष्कळ दिवसांपासून मी या वस्तूच्या मागं लागलो होतो, ही तुझ्याकरिता आहे, दोस्त, ही तुझ्याकरिता आहे. ही मोरोझोवच्या मालकीची होती, त्याला तिचा काही उपयोग नव्हता, त्याला ती त्याच्या भावाकडून मिळाली होती. मी माझ्या वडिलांच्या पुस्तकांच्या कपाटातले एक पुस्तक देऊन ही घेतली, त्या पुस्तकाचं नाव आहे 'महमदचा एक नातलग, अथवा हितकर मूर्खपणा' एक नालस्ती करणारं पुस्तक आहे, शंभर वर्षांपूर्वी मॉस्कोत प्रसिद्ध झालेलं, त्या वेळी सरकारी नियंत्रण वगैरे नव्हतं, अन् मोरोझोवला असल्या गोष्टींची चटक आहे. त्याला तर माझे उपकारच वाटले.... "

कोल्याने ती तोफ आपल्या हातात अशी धरली की ती सर्वांना दिसावी अन् सर्वांनी वाहवा करावी. इल्यूशाने आपले डोके वर उचलले, अन् आपला उजवा हात तसाच कुत्र्याच्या गळ्याभोवती ठेवून, तो मोहित होऊन अनिमिष दृष्टीने त्या खेळण्याकडे पाहू लागला. आपल्याकडे दारूसुद्धा आहे अन् ती घालून ही तोफ उडविता पण येईल. " मात्र स्त्रियांना भीती तर वाटणार नाही ना ? " असं कोल्या म्हणाला, तेव्हा कुतूहल अधिक वाढले. ' आई ' ने लगेच ते खेळणं अधिकच जवळून पाहण्याकरिता मागितले अन् तिची विनंती मान्य करण्यात आली. ती चाकावर ठेवलेली लहानशी ब्राँझ तोफ बघून ती खूप खूष झाली अन् आपल्या मांडीवर ती फिरवू लागली. आपल्याला काय विचारले याची तिला कल्पना आलेली नव्हती पण तिनं तात्काळ दारू घालून ती उडवायला परवानगी दिली, कोल्याने ती भुकटी अन् गोळी दाखवली. कॅप्टन स्वतः लष्करातला माणूस असल्यामुळे, त्याने ती आत ठासण्याचे काम आपल्याकडे घेतले अन् चिमूटभर भुकटी त्यात घातली. गोळी उडवून दाखवायचे काम पुनः केव्हातरी करावे असे त्याने सुचविले. तोफ खाली जमिनीवर ठेवण्यात आली, तिचा नेम खोलीच्या रिकाम्या भागावर धरण्यात आला, तिच्या कानात तीन ग्रेन भुकटी ठासण्यात आली अन् तिला काडी लावण्यात आली. एक सुरेख स्फोटाचा आवाज झाला. आई एकदम दचकली, पण लगेच आनंदाने हसू लागली. मुले जिंकल्याच्या अभिमानाने स्तब्ध होऊन पाहात राहिली. पण इल्यूशाकडे पाहून, कॅप्टन कुणाहीपेक्षा अधिक भारला गेला. कोल्याने ती तोफ उचलली अन् तात्काळ इल्यूशाला भेट म्हणून दिली, तिच्याबरोबर दारूची भुकटी अन् गोळीही त्याने दिली.

" मी ही तुझ्यासाठी खास तुझ्यासाठी मिळविली बरं का ! तुझ्याकरिता मी ती किती दिवस सांभाळून ठेवली होती, म्हणतोस !" तो आनंदाने पुन्हा एकदा त्याला म्हणाला.

" आं, मला दे ती ! अं अं, मला दे ती तोफ ! " आई एखाद्या लहान पोरासारखी मागू लागली. आपल्याला ती मिळणार नाही अशी एक केविलवाणी भीती तिच्या मुद्रेवर दिसत होती. कोल्या अस्वस्थ झाला. कॅप्टनची अस्वस्थपणाने चुळबूळ सुरू झाली.

" आई, आई, " तो धावत तिच्याकडे जाऊन म्हणाला, " ती तोफ तुझीच आहे, पण ती इल्यूशाला घेऊ दे, कारण त्याला ती भेट मिळाली आहे, पण ती तुझी असल्यासारखीच आहे, बरं का. इल्यूशा तुला नेहमी ती खेळायला देत जाईल, ती तुम्हा दोघांची राहील हं, तुम्हा दोघांची राहील."

" नाही, ती दोघांची नको, माझी एकटीचीच हवी, इल्यूशाची नाही," आईने हट्ट धरला, तिच्या डोळ्यात आसवे येण्याच्या बेतात होती.

" ही घे आई, ही घे, ठेव ! " इल्यूशा मोठ्याने म्हणाला. " क्रासोत्कीन,

मी ती आईला देऊ का?" त्याने क्रासोत्कीनकडे वळून आर्जवी मुद्रा करून विचारले, आपण दिलेली भेट दुसऱ्या कोणालातरी देण्याने त्याचे मन कदाचित दुखावेल अशी त्याला जणू भीती वाटली.

"हो हो, जरूर," क्रासोत्कीनने मनापासून संमती दिली, आणि ती तोफ इल्यूशाकडून घेऊन त्याने ती नम्रपणाने वाकून आईच्या हाती दिली. ती इतकी विरघळून गेली की तिला रडूच आले.

"लाडका इल्यूशा, आपल्या आईवर प्रेम आहे हो त्याचं!" ती प्रेमळपणे म्हणाली, अन् लगेच ती तोफ ती आपल्या मांडीवर मागेपुढे फिरवू लागली.

"आई, मला तुझ्या हाताचं चुंबन घेऊ दे." कोल्या तिच्याकडे तीरासारखा धावला अन् त्याने तिच्या हाताचं चुंबन घेतलं.

"अन् या छान मुलाइतका मोहक मुलगा मी कधीच पाहिला नाही," ती कृतज्ञतेने भारावलेली बाई क्रासोत्कीनकडे बोट करून म्हणाली.

"मी तुला वाटेल तितकी भुकटी आणून देईन, बरं का इल्यूशा. आम्ही स्वतःच हल्ली ती बनवतो. ती कशी बनवायची ते बोरोविकोवला समजलं आहे– सोरामीठ चोवीस भाग घ्यायचं, दहा भाग गंधक अन् सहा भाग लोणारी कोळसा हे सारं एकत्र कुटून पूड करायची, पाणी घालून तिची खळ करायची अन् एका गोल चाळणीतून रगडून खाली ते पाडायचं– असं ते करतात."

"स्मुरोवनं मला तुझ्या या भुकटीबद्दल सांगितलं होतं, पण बाबा म्हणतात ती खरी दारू नव्हे," इल्यूशा बोलला.

"खरी नव्हे?" कोल्या शरमला. "ती पेटते. मला अर्थात माहीत नाही हं."

"छे: छे:, माझ्या म्हणण्याचा तसा अर्थ नव्हता," कॅप्टन अपराधल्यासारखा चेहेरा करून मध्येच म्हणाला, "मी फक्त एवढंच म्हटलं की, खरी दारू अशी करीत नाहीत, पण त्यात काही नाही एवढं, ती तशीही करता येईल."

"मला माहीत नाही, तुम्हाला आमच्यापेक्षा जास्त माहीत. आम्ही एका पोमॅटमच्या भांड्यात ती पेटविली तर ती छान पेटली, ती जळून जळून शेवटी चिमूट-भर राख उरली. पण ती नुसती खळच होती. ती जर रगडून...पण अर्थात् तुम्हाला ते जास्त माहिती, मला माहीत नाही...आणि बुल्किनच्या वडिलांनी या भुकटीवरून त्याला मारलं, तुला कळलं?" त्याने इल्यूशाकडे वळून विचारले.

"होय," इल्यूशाने उत्तर दिले. तो कोल्याचे बोलणे अतिशय लक्षपूर्वक अन् रस घेऊन ऐकत होता.

"आम्ही सबंध बाटलीभरून ती केली होती आणि ती तो आपल्या अंथरुणाच्या खाली ठेवीत असे. त्याच्या वडिलांनी ती बघितली. 'ती उडाली-बिडाली

म्हणजे मम? असं ते म्हणाले अन् त्यांनी त्याला तिथल्या तिथं ठोकलं. ते माझ्याविरुद्ध शिक्षकांच्याकडं तक्रार करणार होते. त्याला आता माझ्याबरोबर येण्याची परवानगी नाही, आता कुणालाच माझ्या संगतीत राहण्याची परवानगी नाही. स्मुरोवलासुद्धा परवानगी नाही. सगळीकडं माझं नाव बद्दू झालंय. मी एक 'बेफाम माणूस' आहे म्हणतात," कोल्या तिरस्कारपूर्वक हसला. "या साऱ्याची सुरुवात त्या आगगाडीच्या प्रसंगापासून झाली."

"ओः, तुझा तोही पराक्रम आम्ही ऐकलाय," कॅप्टन म्हणाला, "कसा रे बाबा तू त्या रुळाच्यामध्ये पडून राहिलास? आगगाडीखाली गपचीप पडून राहताना तुला मुळीच भीती वाटली नसेल हे शक्य तरी आहे? तू घाबरला नाहीस?"

कोल्याची खुशामत करताना कॅप्टन अगदी पामर बनून गेला.

"न-नाही, तसा काही खास घाबरलो नाही," कोल्याने बेपर्वाईने उत्तर दिले. "माझं नाव विशेष बद्दू झालं ते दुसऱ्या कशापेक्षा त्या बदकप्रकरणामुळे." तो परत इल्यूशाकडे वळून म्हणाला, पण जरी बोलत असताना त्याने बेपर्वाईचा आव आणला होता, तरी त्याला स्वतःवर ताबा ठेवता आला नाही, अन् जो एक स्वर ठेवायचा त्याचा प्रयत्न होता. तो सारखा चुकत होता.

"हो! मी ऐकलंय त्या बदकाबद्दल!" इल्यूशा मोठ्याने हसला, त्याचा चेहेरा सबंध उजळला. "लोकांनी मला सांगितलं खरं, पण मला चांगलं समजलं नाही. त्यांनी खरोखरच तुला कोर्टात नेलं का?"

"अगदीच मूर्खपणाची, फुसकट गोष्ट, पण त्यांनी राईचा पर्वत केला, नेहमीचीच सवय आहे त्यांची ती," कोल्या बेपर्वाईने बोलू लागला. 'इकडं बाजारपेठेत मी एक दिवस हिंडत होतो, त्याच वेळी काही लोकांनी बदकं हाकीत हाकीत तिथं आणली. मी थांबलो अन् ती बघू लागलो. एकाएकी एक इसम माझ्याकडं बघून म्हणाला, 'बदकांकडं तू का म्हणून बघतो आहेस?' हा माणूस हल्ली प्लोतनिकोवच्या इथं गडी आहे. मी त्याच्याकडं बघितलं, तो वीस एक वर्षांचा गोल अन् बावळट चेहेऱ्याचा इसम होता. मी नेहमी शेतकरी लोकांचा कैवार घेतो, तुला माहीत आहे. मला त्यांच्याशी बोलायला आवडतं...आपण शेतकरी वर्गाला मागं टेवलं आहे— ती आता अगदी सिद्ध अशी गोष्ट आहे. तू हसतोयस वाटतं, कारमाझफ?"

"छेः छेः, भलतंच काही तरी, मी ऐकतो आहे," आल्योशा अतिशय सद्भाव दर्शवीत म्हणाला, आणि हळव्या भावनेच्या कोल्याचे लगेच समाधान झाले.

"बरं का कारमाझफ, माझा सिद्धान्त स्पष्ट अन् साधा आहे," तो खूष होऊन घाईघाईने पुढे बोलू लागला, "माझा सर्वसामान्य लोकांवर विश्वास आहे, अन् त्यांचं देणं त्यांना देऊन टाकण्यात मला नेहमी आनंद वाटतो, पण त्यांचे लाड करावेत अशा मताचा मात्र मी नाही, ही तितकीच अनिवार्य अट आहे...हो, पण

मी तुम्हाला त्या बदकासंबंधानं सांगत होतो. तेव्हा मी त्या मूर्खाकडं वळलो अन् त्याला म्हणालो, ' हे बदक कशाचा बरं विचार करीत असेल याचा मी विचार करीत होतो. ' त्यानं माझ्याकडं वेडपटासारखं बघितलं अन् विचारलं, ' बदक कशाचा रे बाबा विचार करणार ? ' ' ती ओटधान्य भरून आलेली गाडी बघितलीस ? ' मी त्याला विचारलं, ' ओटचे दाणे पोत्यातून खाली सांडताहेत, अन् बदकानं आपली मान ते मटकावण्यासाठी बरोबर चाकाच्या खाली घातली आहे, बघितलीस ? ' तो म्हणाला, ' हो, बघितली.' मी म्हटलं, ' समज, गाडी जर जरा पुढं सरली तर त्या बदकाची मान मोडेल की नाही ? " ' ती खात्रीनंच मोडेल, ' असे म्हणून तो खूप हर्ष होऊन तोंड पसरून हसला. ' चल तर, आपण पाहू या ' मी म्हटलं. अन् तशी जुळवाजुळव करायला आम्हाला फार वेळ लागला नाही. तो कुणाच्याही दृष्टीला न पडता लगामाच्या जागी उभा राहिला. अन् मी त्या बदकाला पुढं हुसकायला एका बाजूला उभा राहिलो. मालक काही पाहत नव्हता, तो कुणाशी तरी बोलत होता, त्यामुळं मला काहीच करावं लागलं नाही. बदकानं आपली मान ओट खाण्याकरिता पुढं गाडीच्या खाली, बरोब्बर तिच्या चाकाखाली सारली. मी त्या पोरग्याला डोळा घातला, त्यानं लगाम खेचला, अन् कच ! त्या बदकाच्या मानेचे दोन भाग झाले, आणि, दुर्दैव असे की, सगळ्या शेतकऱ्यांनी त्याच वेळी आम्हाला बघितलं आणि त्यांनी एकदम ओरडा करायला सुरुवात केली. ' तू ते मुद्दाम केलंस ! ' ' नाही, मुद्दाम केलं नाही. ' ' होय, तू केलंसच मुद्दाम ! ' आणि ते ओरडून म्हणाले, याला मॅजिस्ट्रेटकडे घेऊन चला ! ' अन् मलाही ते घेऊन गेले. ते म्हणाले, ' तूही तिथं होतास, तू मदत केलीस, बाजारात तू सगळ्यांना माहीत आहेस आणि कशा-मुळं का असेना, मी बाजारात खरोखरच सर्वांना माहीत झालेलो आहे, " कोल्या फुशारकीने म्हणाला. " आम्ही सगळे गेलो त्या अधिकाऱ्याकडं, त्यांनी ते बदकंही तिथं आणलं. तो गडी अतिशय घाबरून रडत होता, अगदी एखाद्या बायलीसारखा भोकाड पसरून रडत होता. आणि तो शेतकरी एकसारखा आरडाओरडा करून म्हणत होता की तू अशी वाटेल तितकी बदकं मारशील. अर्थात साक्षीदार तेथे होतेच. अधिकाऱ्यानं एका मिनिटात बाब मिटवून टाकली, ती अशी की त्या शेतकऱ्याला त्या बदकाबद्दल एक रूबल द्यायचा, अन् त्या गड्याला ते बदक देऊन टाकायचं. त्याला, पुनः असला फाजिलपणा करू नकोस, अशी ताकीद देण्यात आली. आणि तो गडी बाईसारखा बडबडत रडत होता. ' मी नाही हे केलं, यानं मला चिथावलं.' अन् त्यानं माझ्याकडं बोट दाखवलं. मी अगदी थंडपणानं उत्तर दिलं, ' मी काही त्याला चिथावलं बिथावलं नाही, मी फक्त एक सर्वसाधारण सिद्धान्त सांगितला, एक कल्पना सांगितली. ' तो अधिकारी हसला पण हसल्याबद्दल एकदम स्वतःवरच रागावला. ' मी तुझ्याबद्दल तुझ्या शिक्षकांकडं तक्रार करीन, म्हणजे पुढं तरी निदान तू आपली पुस्तकं घेऊन अभ्यास करण्याचं सोडून असल्या

सर्वसाधारण सिद्धान्तात आपला वेळ दवडणार नाहीस.' त्यानं शिक्षकांकडं तक्रार केली नाही, ते आपलं त्यानं उगीच गमतीनं म्हटलं, पण या गोष्टीचा बाहेर बराच गवागवा झाला अन् ते शिक्षकांच्या कानांवर गेलं. त्यांचे कान लांब असतात, तुला माहीतच आहे! वर्गशिक्षक कोल्बास्निकफ यांना विशेषेकरून धक्का बसला, पण दार्दानेलोवनी पुन्हा माझी सुटका केली. पण कोल्बास्निकफ हल्ली गाढवाच्या पिलासारखे ज्याच्या त्याच्यावर लाथा झाडत असतात. तुला माहीत आहे, इल्यूशा, नुकतंच त्यात लग्न झालंय, एक हजार रूबलांचा हुंडा त्यांना मिळालाय, त्यांची बायको म्हणजे अगदी फडतूस आहे. तिसऱ्या वर्गाच्या पोरांनी यावर एक कविताच रचली आहे.

'नवल ऐका काय वर्तले
कोल्बास्निकफ गद्धा झाले'

वगैरे वगैरे, विलक्षण गमतीदार, मी ती तुला केव्हातरी आणून दाखवीन. दार्दानेलोवांच्या विरुद्ध माझं काही म्हणणं नाही, ते विद्वान गृहस्थ आहेत, यात काडीमात्र शंका नाही. त्यांच्यासारख्या माणसाबद्दल मला आदर वाटतो अन् तो त्यांनी माझी बाजू घेतली म्हणून नव्हे.''

"पण ट्रॉय शहराच्या संस्थापकांच्या बाबतीत तू त्यांची चांगलीच जिरवलीस!" स्मुरोव एकदम मध्येच बोलला, अशा वेळी त्याला क्रासोत्कीनचा निःसंदेह अभिमान वाटे. बदकाबाबतच्या गोष्टीने तर तो विशेष खूष झाला होता.

कॅप्टनने खुशामतीच्या स्वरात विचारले, "ट्रॉय कुणी स्थापन केलं या प्रश्नावरून तू खरोखरच त्यांची जिरवलीस? आम्ही त्या संबंधानं ऐकलंय. इल्यूशानं त्या वेळी मला त्या संबंधानं सांगितलं होतं."

"त्याला सर्व काही माहीत आहे. बाबा, आम्हा कुणाहीपेक्षा त्याला जास्त माहिती आहे!" इल्यूशा मध्येच म्हणाला; "तो आपला उगीच तस सोंग करतो, पण तो प्रत्येक विषयात खरोखर सर्वांत वरती असतो...."

इल्यूशाने कोल्याकडे अतीव संतोषाने पाहिले.

"हे:, ती ट्रॉयची गोष्ट अगदीच मूर्खपणाची, काही अर्थ नाही त्यात. मी तो बिन महत्त्वाचा प्रश्न समजतो," कोल्या साभिमान विनयाने म्हणाला. त्याने या वेळपर्यंत आपला आत्मगौरव पूर्णपणे परत मिळविला होता, अर्थात अजूनही तो थोडासा अस्वस्थ होताच. आपण फारच उत्तेजित झालो. उदाहरणार्थ, त्या बदकाबद्दल आपण बोललो ते फारच कमी संयम ठेवून बोललो, आल्योशा गंभीर दिसतो आहे अन् आतापर्यंत एक शब्दही तो बोलला नाही, हे त्याच्या मनाला जाणवले. आणि त्या गर्विष्ठ मुलाच्या मनात हळूहळू एक सलणारी भीती वाढू लागली की आल्योशा गप्प बसला आहे तो आपल्याविषयी त्याला तिरस्कार वाटू लागला

आहे म्हणून, आणि आपण त्याच्यापुढे डौल मिरवतो आहो असे त्याला वाटू लागले आहे. तसा काही विचार त्याच्या मनात येऊ तर दे, आपण...

"हा प्रश्न मी अगदीच क्षुद्र मानतो" तो पुन्हा अभिमानाने ताडदिशी बोलला.

"मला माहीत आहे ट्रॉय कुणी स्थापन केलं ते," आतापर्यंत बोलला नव्हता असा एक मुलगा एकदम उद्‌गारला, आणि सर्वांना आश्चर्य वाटले. तो तर अबोल अन् लाजाळू असा वाटत होता. तो साधारण अकरा वर्षाचा सुरेख दिसणारा मुलगा होता, त्याचे नाव कार्ताशोव होते. तो दरवाज्याजवळ बसला होता. कोल्या त्याच्याकडे शिष्ट आश्चर्याने बघू लागला.

गंमत अशी होती की ट्रायचे संस्थापक कोण ही साऱ्या शाळेत एक रहस्यमय गोष्ट झाली होती, या रहस्याचा उलगडा फक्त स्माराग्दोवचा ग्रंथ वाचल्यानेच होणार होता, अन् तो ग्रंथ कोल्याशिवाय दुसऱ्या कुणाकडे नव्हता. एके दिवशी कोल्याची पाठ फिरताच कार्ताशोवने घाईघाईने स्माराग्दोवचे ते पुस्तक उघडले, ते कोल्याच्या इतर पुस्तकांत ठेवलेले होते, ते उघडताच एकदम त्याच्या नजरेला ट्रॉयच्या संस्थापनेसंबंधीचाच उतारा पडला. या गोष्टीला बरेच दिवस झाले होते, पण त्याला अस्वस्थता वाटत होती अन् ट्रॉय कुणी स्थापन केले त्याची आपल्यालाही माहिती आहे हे जाहीरपणे सांगायला तो धजत नव्हता, काय होईल कुणास ठाऊक, क्रासोत्कीन काहीतरी करून आपली फजिती करील अशी त्याला भीती वाटत होती. पण आता त्याला ते बोलल्याशिवाय राहवेना. किती तरी आठवडे तो ते बोलायची वाट पाहत होता.

कोल्याने त्याच्याकडे वळून उद्धट मिजासखोरपणाने विचारले, "हं, सांगा बरं कुणी स्थापन केलं?" त्या मुलाच्या चेहेऱ्यावरून कोल्याला दिसले की याला खरोखरच माहिती आहे आणि लगेच त्याने त्याचा कसा समाचार घ्यायचा हे मनाशी ठरवून टाकले. एक प्रकारे, आतापर्यंत जे एक सुसंवादी वातावरण होते त्यात हा बेसूर सूर उमटला.

"ट्रॉय हे ट्यूसर, दार्दानुस, इलिया अन् ट्रॉस यांनी स्थापन केलं." त्या मुलाने ताडकन् उत्तर दिले, अन् लगेच तो लाजला. इतका लाजला, इतका लाजला की त्याच्याकडे बघून कीव वाटावी. पण सारी मुले त्याच्याकडे टक लावून पाहू लागली, एक मिनिटभर ती तशी टक लावून पाहात राहिली, आणि मग ते रोखलेले डोळे एकदम तिथून फिरले अन् कोल्यावर स्थिर झाले, तो अजूनही त्या उद्दाम मुलाचे तिरस्कारयुक्त थंडपणाने निरीक्षण करीत होता.

"त्यांनी ते स्थापन केलं म्हणजे काय केलं?" तोंडून शेवटी उद्‌गार निघाले. "शहर किंवा राज्य स्थापन करणं म्हणजे काय? त्यांनी काय केलं?— त्यांनी जाऊन काय एक एक वीट रचली? काय केलं काय?"

सगळे हसू लागले. त्या अपराधी चेहऱ्यावरचा रंग गुलाबी होता तो लाल झाला. तो गप झाला अन् त्याचे डोळे पाण्याने भरणारसे दिसू लागले. कोल्याने त्याला एक मिनिटभर असेच थोपवून धरले.

"एका राष्ट्राचा पाया घालण्यासारख्या ऐतिहासिक घटनेविषयी बोलण्यापूर्वी त्याचा अर्थ काय हे आधी समजून घेतलं पाहिजे." त्याने त्याची कठोर तीव्र स्वरात खरडपट्टी काढली. "पण माझ्या दृष्टीनं या म्हाताऱ्या आजीबाईंच्या गोष्टींना काही महत्त्व नाही अन् सर्वसाधारणपणे मला जगाच्या इतिहासासंबंधानं फारसं काही वाटत नाही." तो सर्वच मंडळींना सर्वसाधारणपणे उद्देशून बोलला.

"जगाचा इतिहास?" कॅप्टनने जणू घाबरल्यासारखे होऊन प्रश्न केला.

"होय, जगाचा इतिहास! मनुष्य जातीनं एकामागून एक केलेल्या मूर्ख-पणाच्या कृत्यांचा तो अभ्यास आहे, दुसरं काही नाही. मला आदराचे वाटणारे विषय म्हणजे गणित अन् निसर्गशास्त्र एवढेच आहे," कोल्या म्हणाला. तो दिमाखाने बोलत होता अन् त्याने तिरक्या नजरेने आल्योशाकडे पाहिले, त्याच्याच एकट्याच्या मताची त्याला त्या सर्व मंडळींत भीती वाटत होती. पण आल्योशा अजून गप्प अन् पूर्वीइतकाच गंभीर होता. तो जर एक शब्द बोलला असता तर कोल्याचे बोलणे थांबले असते, पण तो गप्प होता आणि "हे गप्प बसणं कदाचित् तिरस्काराचंही असेल," अन् कोल्या शेवटी चिडला तो या विचाराने.

"प्राचीन भाषा घ्या, त्या सुद्धा... त्या म्हणजे निव्वळ वेडेपणा आहे, दुसरं काही नाही. पुन्हा माझ्याशी तुझा मतभेद दिसतो, कारमाझफ?"

"मी या मताशी सहमत नाही," आल्योशा मंद स्मित करून म्हणाला.

"माझं जर मत विचाराल तर, प्राचीन भाषांचा अभ्यास म्हणजे, निव्वळ पोलिसी कारवाई आहे, निव्वळ त्याचकरिता तो अभ्यास आमच्या शाळांत घालण्यात आला आहे." हळूहळू कोल्या पुन्हा दम टाकू लागला. "लॅटिन अन् ग्रीक या भाषा अभ्यासात ठेवल्यात कारण त्या कंटाळवाण्या आहेत आणि त्यांनी बुद्धी जड होऊन जाते. अभ्यास अगोदरच कंटाळवाणा होता, तो अधिक कंटाळवाणा करायला आणखी काय करता येईल? तो पूर्वी भरपूर निरर्थक होता, तो अधिक निरर्थक करायला आणखी काय करता येईल? तेव्हा त्यांना ग्रीक अन् लॅटिन सुचलं. हे माझं मत आहे, अन् मी ते कधी बदलेन असं मला वाटत नाही," कोल्याने आपले बोलणे मध्येच थांबविले. त्याचे गाल लाल झाले होते.

"हे बरोबर आहे," त्याचे बोलणे पटल्यासारख्या खणखणीत आवाजात स्मुरोव एकदम म्हणाला. त्याने त्याचे बोलणे लक्षपूर्वक ऐकले होते.

"अन् तरी तो स्वतः लॅटिनमध्ये पहिला आहे." त्या मुलांतला एकजण एकदम म्हणाला.

" होय, बाबा, तो असं म्हणतो पण तो लॅटिनमध्ये पहिला आहे," इल्यूशाने तेच सांगितले.

" म्हणून काय झालं ? " कोल्याला जरी ही आपली स्तुती आवडली तरी स्वतःचे समर्थन करणे त्याला योग्य वाटले. " मला लॅटिनकरिता कष्ट करावे लागतात, कारण मला ते केलेच पाहिजेत, कारण मी परीक्षेत पास होईन असं मी माझ्या आईला वचन दिलंय, आणि जे काही करायचं ते चांगलं करावं हेच योग्य असं मला वाटतं म्हणून. पण माझ्या मनाच्या गाभ्यात मला प्राचीन भाषा अन् ती सारी फसवेगिरी याबद्दल पराकाष्ठेचा तिटकारा आहे...तुझं तसं मत नाही, कारमाझफ?"

" ' फसवेगिरी ' कशी ? " आल्योशाने पुन्हा हसून विचारले.

" पाहा, प्राचीन भाषांतल्या सर्व ग्रंथांची सर्व भाषांत भाषांतरं झालेली आहेत, तेव्हा प्राचीन साहित्याचा अभ्यास करावा म्हणून काही त्यांनी लॅटिन भाषा अभ्यासांत घातली नाही, तर निव्वळ पोलिस कारवाई म्हणून, बुद्धीला मंद करण्याकरिता म्हणूनच, ती घातली आहे. तेव्हा याला फसवेगिरी म्हणायचं नाही तर दुसरं काय ? "

" हं. कुणी शिकवलं हे सारं तुला ? " शेवटी आल्योशा आश्चर्यचकित होऊन म्हणाला.

" पहिली गोष्ट, कुणी न शिकविता माझी मला विचार करण्याची शक्ती आहे. शिवाय प्राचीन साहित्याची भाषांतरं होत असल्यासंबंधी जे मी आता बोललो ते आमचे शिक्षक कोल्बास्निकफ तिसरीच्यासबंध वर्गापुढं बोलले आहेत."

" डॉक्टर आले ! " आतापर्यंत गप बसून होती, ती नीना ओरडून म्हणाली.

मादाम होहलाहोवाची गाडी फाटकापर्यंत आली. कॅप्टन सकाळपासून डॉक्टरांची वाट पाहत होता तो त्यांना घेण्याकरिता सुसाट धावला. ' आई ' सावरून बसली अन् तिने मोठेपणाचा चेहऱ्यावर आव आणला. आल्योशा इल्यूशापाशी गेला अन् त्याच्या उशा वगैरे नीट करू लागला. नीना आपल्या अपंगांच्या खुर्चीत बसून तो अंथरूण साफसूफ करीत असताना त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहत राहिली. मुलांनी भराभर निरोप घेतला. काहींनी पुन्हा आपण संध्याकाळी येऊ म्हणून सांगितले. कोल्याने पेरेझ्वोनला हाक दिली अन् तो अंथरुणावरून उडी मारून खाली आला.

" मी जात नाही, मी जात नाही हं," कोल्या घाईघाईने इल्यूशाला म्हणाला. " मी बाहेर वाटेतच थांबतो, डॉक्टर गेले म्हणजे येईन, पेरेझ्वोनला घेऊन येईन."

पण तेवढ्यात डॉक्टर आत आले; ते एक वजनदार दिसणारे, लांब, काळे कल्ले ठेवलेले अन् दाढी केल्यामुळे गुळगुळीत चकाकणारी हनुवटी असलेले गृहस्थ होते; त्यांच्या अंगावर अस्वलाच्या कातड्याचा कोट होता. ते उंबरा ओलांडून आत

येताच चकित होऊन एकदम थांबले; आपण चुकून दुसऱ्याच एखाद्या ठिकाणी आलो की काय असे त्यांना वाटले असावे. " हे काय ? कुठं आलोय मी ? " ते पुटपुटले, त्यांनी आपला कोट किंवा आपली पुढे पट्टी असलेली सील माशाच्या कातड्याची टोपी होती तीही काढली नाही. ती गर्दी, खोलीत दिसणारं दारिद्र्य कोपऱ्यातल्या दोरीवर वाळत घातलेले कपडे, यांनी ते गोंधळून गेले. कॅप्टन दुप्पट खाली वाकून त्यांच्यापुढे प्रणाम करीत होता.

" इकडं यावं, साहेब इकडं यावं," तो अतिशय आर्जवाने तोंडातल्या तोंडात बोलला; " इकडंच, आपण बरोबर आला आहात, आपण आमच्याकडंच येणार होता...."

" स्ने–गि–र्योव ? " डॉक्टर मोठ्याने अन् डौल दाखवीत म्हणाले. " स्नेगिर्योव, तुम्हीच का ते ? "

" मीच तो, साहेब ! "

" हं ! " डॉक्टरांनी खोलीत पुन्हा एकदा आजूबाजूला तिटकाऱ्याच्या चर्येने पाहिले, आणि आपला कोट दूर भिरकावला. त्यामुळे त्यांच्या गळ्याजवळचे सुंदर मानाचे चांद सर्वांच्या दृष्टीस पडले. कॅप्टनने तो केसाळ कोट एकदम आपल्या हातात झेलून घेतला, आणि डॉक्टरांनी आपली टोपी काढली.

" पेशंट कुठं आहे ? " त्यांनी जोराने विचारले.

६
अकाल प्रौढत्व

" डॉक्टर त्याला बघून काय म्हणतील असं तुला वाटतं ? " कोल्याने पटकन् विचारले. " किती किळसवाणा चेहेरा आहे नाही याचा ? मला औषधाचं नाव घेतलं की चीड येते ! "

" इल्यूशाचे मरण जवळ आलं आहे, असं मला नक्की वाटतं." आल्योशा दुःखी स्वरात म्हणाला.

" हे ठग आहेत ! औषध म्हणजे फसवणूक आहे ! पण तुझी ओळख झाली हे छान झालं असं मला वाटतं, कारमझफ ! कित्ती दिवसांपासून मला ती व्हावीशी वाटत होती. वाईट इतकंच वाटतं की ती अशा दुःखाच्या वातावरणात होते आहे."

कोल्याला याहीपेक्षा अधिक जिव्हाळ्याचे अन् अधिक भाव प्रकट करणारे शब्द बोलण्याची इच्छा होती, पण त्याला ते बरे वाटले नाही. आल्योशाने ते पाहिले, तो हसला अन् त्याने त्याचा हात दाबला.

" तू एक विरळा माणूस म्हणून तुझ्याविषयी मी फार दिवसांपासून आदर बाळगायला शिकलो आहे," कोल्या हलक्या स्वरात, अडखळत अन् अनिश्चित

मनानं बोलला. " तू गूढवादी आहेस अन् मठात होतास असं मी ऐकलंय. तू गूढवादी आहेस हे मला माहीत आहे, पण .... त्यानं काही मी तुला भेटायचं लांबणीवर टाकलं असं नाही. प्रत्यक्ष जीवनाशी संपर्क आला की तू सुधारशील... तुझ्यासारख्या स्वभावाच्या लोकांच्या बाबतीत नेहमी असंच घडतं."

" गूढवादी म्हणजे तुला काय म्हणायचंय ? मी सुधारेन म्हणजे काय ?" आल्योशाला एक प्रकारे आश्चर्य वाटले.

" हेच, गूढवादी म्हणजे देवबीव वगैरे मानणारा."

" म्हणजे, तुझा देवावर विश्वास नाही ?"

" हं:, तसं देवाच्या बाबतीत माझं काही विरुद्ध मत नाही. अर्थात् देव म्हणजे केवळ एक मानीव कल्पनाच आहे, पण.... त्याची गरज आहे हे मी कबूल करतो... जगाची व्यवस्था वगैरे करिता.... अन् जर देव नसताच तर तो निर्माण करावा लागला असता," कोल्या लाजत लाजत म्हणाला. आपण आपल्या ज्ञानाचे प्रदर्शन करण्याचा अन् आपण ' मोठे झाल्याचं ' सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो आहोत असे आल्योशाला कदाचित् वाटेल असे एकदम त्याच्या मनात आले. " माझं ज्ञान याच्यापुढं मिरविण्याची मला मुळीच इच्छा नाही" उद्वेगानं कोल्या मनाशी म्हणाला. आणि एकाएकी तो अतिशय त्रस्त झाल्यासारखा झाला.

"असल्या चर्चेत पडणं आपल्याला जमत नाही, हे मला कबूल केलं पाहिजे," तो विषय संपविण्याच्या आविर्भावानं तो मनुष्य म्हणाला. "देवावर विश्वास नसणारा मनुष्य मानवजातीवर प्रेम करू शकतो, असं नाही तुला वाटत? व्हॉल्तेरचा देवावर विश्वास नव्हता अन् तो मानवावर प्रेम करीत होता." (" पुनः मी तिकडंच चालली," तो स्वतःशी म्हणाला.)

" व्हॉल्तेरचा देवावर फार मोठा विश्वास नसला तरी थोडा होता, असं मला वाटतं, आणि त्याचं मानवजातीवरही मोठंसं प्रेम होतं असं मला वाटत नाही," आल्योशा संथपणे, सौम्यपणे, अन् जणू आपण आपल्याच बरोबरीच्याशी किंवा आपल्याहून वडील असलेल्याशी बोलतो आहो, इतक्या सहजपणे म्हणाला. कोल्याच्या मनावर विशेष परिणाम झाला तो व्हॉल्तेरसंबंधीच्या आपल्या मताविषयी आल्योशाला उघड उघड वाटणाऱ्या साशंकतेचा. त्याने जणू तो प्रश्न सोडवायचे छोट्या कोल्याकडेच सोपविले.

" तू व्हॉल्तेर वाचलायस ? " आल्योशाने शेवटी विचारले.

"अं, नाही, ' वाचलाय ' म्हणण्यासारखा नाही...पण मी ' कांदीद 'चं रशियन भाषांतर वाचलंय ..कसलं ते हास्यास्पद, हेंगाडी, जुनं भाषांतर..." (' चालली मी पुन्हा तिकडं ! ")

" अन् तुला ते समजलं ? "

" हो, सगळं....म्हणजे...पण मला ते समजणार नाही असं तुला का वाटलं ?

त्यात अर्थात खट्याळपणा बराच आहे...अर्थात् ती तत्त्वज्ञानात्मक कादंबरी आहे अन् एका विचाराचा प्रचार करण्याकरिता लिहिलेली आहे हे मला समजू शकतं... कोल्या आता गुरफटत चालला होता. "मी समाजवादी आहे, कारमाझफ, मी पक्का समाजवादी आहे," तो एकदम उद्गारला, त्या उद्गारांचा कशाशीच संबंध नव्हता.

"समाजवादी ?" आल्योशा हसला. "पण समाजवादी व्हायला तुला वेळ तरी केव्हा मिळाला ? अरे, मी तर तुला फक्त तेरा वर्षांचाच समजलो."

कोल्या चपापला.

"पहिली गोष्ट म्हणजे मी तेरा वर्षांचा नाही, चौदा वर्षांचा आहे. ह्या पंधरवड्यात मला चौदा पुरी होतील." तो रागाने लाल होऊन म्हणाला, "अन् दुसरी गोष्ट, माझ्या वयाशी त्याचा काय संबंध हे मला मुळीच कळत नाही. प्रश्न आहे तो माझी मतं काय आहेत हा, माझं वय काय हा नाही, नाही का ?"

"तू मोठा झालास म्हणजे वयाचा मतावर काय परिणाम होतो ते तुझं तुलाच समजून येईल. मला असंही वाटलं की, तू तुझे स्वतःचे विचार बोलून दाखवीत नाही आहेस," आल्योशा गंभीरपणे पण विनयाने म्हणाला, पण कोल्याने संतापून मध्येच त्याला थांबविले.

"चल, तुला आज्ञाधारकपणा अन् गूढवाद पाहिजे. तुला हे कबूल करावं लागेल की, खिश्चन धर्म हा केवळ खालच्या वर्गांना गुलामीत ठेवायला श्रीमंतांना न् सत्ताधाऱ्यांना उपयोगी पडला आहे; असंच आहे की नाही, बोल ?"

"हंः, तू हे कुठं वाचलंस ते मला माहीत आहे, अन् खात्रीनं तुला हे कुणी तरी सांगितलंय," आल्योशा मोठ्यानं म्हणाला.

"मी हे वाचलंय असं तू कशावरून म्हणतोस ? अन् कुणीही हे मला मुळीच सांगितलेलं नाही. मी स्वतः विचार करू शकतो....तुला ते बरं वाटत असेल तर मी सांगतो की, मी खिस्ताचा विरोधक नाही. तो अत्यंत माणुसकी असणारा मनुष्य होता, आणि जर आज तो जिवंत असता, तर तो क्रांतिकारकांच्या पंक्तीतच आढळला असता, अन् कदाचित् त्यानं त्यांच्यात प्रमुखपणानं भाग घेतला असता...त्यात बिलकुल शंका नाही."

"अरे, कुठून, कुठून घेतलंस हे सारं तू ? कुणा मूर्खाशी तुझी दोस्ती झाली आहे ?" आल्योशा मोठ्याने उद्गारला.

"चल, खरं काय ते तुला सांगून टाकतो ! योगायोगानं असं घडलं की मी राकीतीन यांच्याशी अर्थात् पुष्कळदा बोललो आहे. पण...वृद्ध बेलिन्स्कीसुद्धा असंच म्हणाला असं सांगतात."

"बेलिन्स्की ? मला आठवत नाही. त्यानं कुठंच तसं लिहिलेलं नाही."

" त्यानं लिहिलं नसलं तर तो ते बोलला आहे असं सांगतात. मी ते ऐकलं एका...पण जाऊ दे."

" आणि तू बेलिन्स्की वाचला आहेस ? "

" अं, नाही...मी त्याचं सर्व काही वाचलं नाही, पण...मी तात्याना विषयीचा उतारा, म्हणजे ती ऑन्येगिनबरोबर का गेली नाही त्यासंबंधीचा वाचला."

" ऑन्येगिनबरोबर ती गेली नाही ? एवढ्यातच तुला... ' त्या 'संबंधी समजायला लागलं की काय ? "

" म्हणजे, तू काय मला छोटा स्मुरोव समजतोस की काय," कोल्या चिडखोरपणे हसून म्हणाला; " पण कृपा करून मी तसा क्रांतिकारी आहे असं समजू नकोस. माझी मतं पुष्कळ वेळा राकीतीनशी जुळत नाहीत. मी जरी तात्यानाचा उल्लेख केला, तरी मी स्त्रियांच्या मुक्तीच्या बाजूचा मुळीच नाही. स्त्री ही परतंत्र जात आहे अन् तिने हुकुमातच राहिलं पाहिजे हे मला मान्य आहे. स्त्रियांनी विणत बसावं, असं नेपोलियन म्हणे." कोल्या काही कारणाने हसला. " आणि त्या प्रश्नाच्या बाबतीत तरी निदान मी त्या उगीचच मोठ्या मानलेल्या पुरुषाशी सहमत आहे. मला असंही वाटतं की आपला देश सोडायचा अन् अमेरिकेला पळून जायचं हे हलकटपणाचं—हलकटपणापेक्षासुद्धा वाईट—मूर्खपणाचं आहे. इथल्या मानव-समाजाच्या जर आपणाला खूप उपयोगी पडता येत असेल तर अमेरिकेला कशाला जा ? विशेषतः यावेळी आपल्या पुढं केवढे तरी उपयुक्त कामाचे ढीग पडले आहेत ? हेच उत्तर मी दिलं."

" म्हणजे काय ? कुणाला उत्तर दिलंस ? तुला कुणी यापूर्वी अमेरिकेला जाण्याची सूचना केली का ?"

" मला कबूल केलं पाहिजे की ते मला तिकडं जाण्याचा आग्रह करीत होते, पण मी नाकारलं. पण कारमाझफ, हे अगदी तुझ्या — माझ्यात आहे असं समजायचं हं, ऐकलंस ? कुणालाही एक शब्ददेखील समजता कामा नये. मी हे फक्त तुलाच बोलत आहे. मला गुप्त पोलिसांच्या तावडीत जाऊन पडायची अन् चेन पुलापाशी धडे घेण्याची मुळीच इच्छा नाही.

" उभी आहे ती इमारत चेन पुलापाशी
निगडीत स्मृती तिच्या लोखंडी गजांशी "

हे आठवतं तुला ? छान आहे. तू हसतोस का ? मी थाप मारतो आहे असं तर तुला वाटत नाही ?" (" बाबांच्या पुस्तकांच्या कपाटात ' दि बेल ' मासिकाचा तो एकच अंक माझ्यापाशी आहे अन् त्यापेक्षा जास्त मी काही वाचलेलं नाही, असं

जर त्याला आढळून आलं तर काय होईल ?" कोल्याच्या मनात आलं अन् त्याचा थरकाप झाला.)

"छे:, मी मुळीच हसत नाही अन् तू खोटं बोलत आहेस असं मी क्षणभरही समजत नाही. अंहं, खरोखरच मला तसं समजता येत नाही. कारण, दुःखाची गोष्ट आहे की हे सारं पूर्णपणे खरं आहे. पण मला सांग, तू पुश्किन वाचलाहेस ? उदाहरणार्थ, ऑन्येगिन् ?....तू आत्ताच तात्यानाबद्दल बोललास."

"नाही, मी अजून ते वाचलं नाही, पण मला ते वाचण्याची इच्छा आहे. माझ्या मनात पूर्वग्रह काही नाहीत, कारमाझफ; मला दोन्ही बाजू ऐकून घ्यायच्या आहेत. तू का म्हणून विचारलंस ?"

"अं, काही नाही."

"कारमाझफ, तुला माझ्याविषयी भयंकर तिरस्कार वाटतो का ? सांग मला." कोल्याने एकदम तडकून विचारले अन् तो आल्योशापुढे जाऊन जणू कवायतीत उभा असल्याप्रमाणे ताठ उभा राहिला. "कृपा करून मोघम न ठेवता मला स्पष्ट स्पष्ट सांग."

"मला तुझ्याविषयी तिरस्कार ?" आल्योशा त्याच्याकडं आश्चर्याने पाहून म्हणाला. "का म्हणून ? मला फक्त वाईट वाटतं ते याचं की तुझ्या आयुष्याला अजून सुरुवात व्हायची आहे त्यापूर्वीच तुझ्या स्वभावासारखा सुंदर स्वभाव असल्या सान्या अर्ध्याकच्च्या बेअकली कल्पनांनी विकृत व्हावा."

"माझ्या स्वभावाची काळजी करू नकोस," कोल्या मध्येच म्हणाला, अर्थात् त्याला प्रसन्नता वाटल्यावाचून राहिली नाही.

"पण मी मूर्खपणा वाटेल इतका भावनाप्रधान, ओबडधोबड असा भावनाप्रधान आहे, हे खरं आहे. तू मला हसलास, अन् मला वाटलं तू..."

"हं, माझ्या हसण्याचा अर्थ अगदी वेगळा होता. मी का हसलो ते सांगतो. थोड्याच दिवसांपूर्वी एका जर्मनानं आपल्या आजच्या विद्यार्थ्यांवर अन् शाळकरी मुलांवर केलेली टीका मी वाचली; हा जर्मन रशियात राहून गेला होता. तो लिहितो, 'एखाद्या रशियन शाळकरी मुलाला ताऱ्यांचा नकाशा दाखवा, त्याला त्यासंबंधी काहीही माहिती नसते; आणि दुसऱ्या दिवशी तो तुम्हाला तो नकाशा त्यात दुरुस्त्या करून परत आणून देईल.' शून्य ज्ञान अन् अमर्याद गर्व हे त्या जर्मन गृहस्थाला रशियाच्या शाळकरी मुलाविषयी म्हणायचं होतं."

"होय, ते अगदी खरं आहे," कोल्या एकदम हसून म्हणाला, "अगदी बरोबर ! शाब्बास त्या ज-नाची. पण त्यानं चांगली बाजू मात्र पाहिली नाही, तुला काय वाटतं ? गर्व असेल, तो तरुणपणात येतोच, अवश्य तर तो नाहीसा करता येईल, पण उलटपक्षी, बाळपणापासून त्याच्यात एक स्वतंत्र वृत्ती, विचाराचा अन् मताचा धीटपणा असतो, सरकारी अधिकाऱ्यापुढं लोटांगण घालण्याची या भटारखानावाल्यांची

वृत्ती नसते त्यांच्यात...असो, पण काही म्हटलं तरी त्या जर्मनाचं म्हणणं बरोबर आहे. शाब्बास त्या जर्मनाची ! पण काही असो, जर्मनांची मुंडी मुरगाळणं अवश्य आहे. ते विज्ञानात अन् विद्येत पारंगत असले तरी त्यांची मुंडी मुरगळली पाहिजे."

"मुंडी मुरगाळायची ? का म्हणून ?" आल्योशाने हसून विचारले.

"हं मी कदाचित् काही तरी बरळत असेन, मला कबूल आहे. मी कित्येक वेळा भयंकरच पोरकट होतो, अन् जेव्हा मी कशामुळं तरी खूष होतो तेव्हा माझं स्वतःवर नियंत्रण राहात नाही अन् मी काय वाटेल ते बोलायला लागतो. पण इथं आपण उगीचच गप्पा मारीत वेळ घालवतो आहो, अन् तो डॉक्टर बराच वेळ झाला आत आहे. कदाचित् तो आईला अन् त्या बिचाऱ्या अपंग नीनाला तपाशीत असेल. मला ती नीना आवडली, बरं का. मी इकडं येताना ती मला हळूच म्हणाली : 'तू या अगोदर का रे नाही आलास ?' अन् अशा आवाजात इतका ठपका देऊन ! ती फारच छान अन् कीव वाटायला लावणारी मुलगी आहे."

"होय, होय ! पण तू यापुढे पुष्कळ वेळा इथे येशील. तेव्हा ती कशी आहे ते तुला दिसेल. अशा रीतीनं लोकांना समजून घेणं, लोकांना समजून घेतल्यानंतर त्यांच्यात जे आपल्याला आढळून येईल त्याला खूप किंमत द्यायला शिकणं यानं तुझं पुष्कळ भलं होईल," आल्योशा उत्साहभराने म्हणाला. "त्याचा तुझ्यावर इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा जास्त परिणाम होईल."

"अरेरे, मी यापेक्षा अगोदर का आलो नाही याचा मला पश्चात्ताप होतोय, त्याबद्दल मी स्वतःला दोष देतो !" कोल्या व्यथित अंतःकरणाने उद्‌गारला.

"होय, फार दुःखाची गोष्ट झाली ती. त्या बापड्या पोराला तुला बघून किती आनंद झाला ते तू बघितलंसच. अन तू यावंस म्हणून तो किती बरं झुरत होता !"

"बोलू नकोस ! त्यानं मला अधिकच वाईट वाटते ! पण मला ती योग्य शिक्षा आहे. इथं येण्याच्या आड आला माझा तोरा, माझा अहंकारी गर्विष्ठपणा, अन् पाशवी माथेफिरूपणा. सारा जन्म मी त्याच्याशी एकसारखा झगडतो आहे तरी त्यातून कधी माझी सुटका होणार नाही. हे मला आता समजतं. मी कितीतरी प्रकारांनी पशूसारखा वागतो कारमाझफ !"

"नाही, तुझा स्वभाव फार चांगला आहे. फक्त तो विकृत झालाय, अन् या उदार, रोगट, हळव्या प्रकृतीच्या मुलावर तुझा इतका प्रभाव का पडला हे मला पूर्णपणे समजतं," आल्योशा आत्मीयतेने म्हणाला.

"अन् हे तू मला सांगतोस !" कोल्या म्हणाला; "अन् तुला खरं तरी वाटेल, मला वाटत होतं – इथं आल्यापासून मला पुष्कळ वेळा वाटलं – की तू

माझा तिरस्कार करतोस ! तुझ्या मताची मला केवढी किंमत वाटते हे तुला कळलं तर !"

" पण खरोखरच तू इतका भावनाप्रधान आहेस ? एवढ्या या वयात ! तुला खरं तरी वाटेल, आत्ताच तू जेव्हा तुझी हकीकत सांगत होतास तेव्हा, तुझ्याकडं बघत असताना, मला वाटलं की तू फार भावनाप्रधान असला पाहिजेस !"

" तुला तसं वाटलं ? खरंच, किती सूक्ष्म दृष्टी आहे तुझी ! मी पैजेनं सांगतो तुला ते जे वाटलं ना ते मी जेव्हा त्या बदकाबद्दल बोलत होतो तेव्हा, बरोबर त्याच वेळी माझ्या मनात आलं की मी आपला दिमाख दाखविण्याला इतका उतावीळ झाल्याबद्दल तुला माझा फार तिरस्कार वाटत असला पाहिजे, अन् क्षणभर त्या मुळे मला तुझ्याबद्दल अगदी द्वेष वाटला, अन् मी एखाद्या मूर्खासारखा बोलायला लागलो. त्यानंतर तसं माझ्या मनात आलं ते आताच इथं जेव्हा मी म्हणालो की, " जर ईश्वर नसेल तर तो निर्माण करावा लागेल " तेव्हा विशेषतः ते वचन एका पुस्तकातून मला मिळालं होतं ना, म्हणून मला आपल्या ज्ञानाचं प्रदर्शन करायची अतिशय घाई झाली होती. पण शप्पथ सांगतो मी डौल दाखवीत होतो ते पोकळ गर्वामुळं नव्हे अर्थात् कशामुळं ते खरोखर मला माहीत नाही, कारण मी इतका खूष झालो होतो, हां, मी इतका खूष झालो होतो म्हणूनच तसं झालं असेल ..अर्थात् मन खूष झालं की लगेच माणसानं उचंबळून यावं हे कोणालाही मुळीच शोभणारं नाही, हे मी जाणतो. पण आता माझी खात्री झाली की तू माझा तिरस्कार करीत नाहीस; ती सारी माझ्या मनची कल्पनाच होती. हंः, कारमाझफ, मी अतिशय दुःखी आहे. कित्येक वेळा माझ्या मनात नाना तऱ्हेच्या गोष्टी येतात, प्रत्येक जण– सारं जग, मला हसतं आहे असं मला वाटतं, अन् मग सर्व उलथंपालथं करून टाकावं अशी माझ्या मनाची प्रवृत्ती होते."

" अन् तू आपल्या भोवतीच्या प्रत्येकाला काळजी करायला लावतोस," आल्योशा स्मित करून म्हणाला.

" होय मी माझ्या आजूबाजूच्यांना, विशेषतः माझ्या आईला, काळजी करायला लावतो. कारमाझफ मला सांग, मी या वेळी फार हास्यास्पदपणे वागतो आहे का ?"

" तू त्याबद्दल विचार करू नको, त्याचा मुळी विचारच करू नकोस तू !" आल्योशा म्हणाला. " आणि 'हास्यास्पद' म्हणजे रे काय ? प्रत्येकजणच सतत हास्यास्पद असत नाही काय किंवा दिसत नाही काय ? शिवाय जवळजवळ हल्ली सगळे हुशार लोक आपण हास्यास्पद होतो की काय याविषयी अतिशय भीत असतात, अन् त्यामुळं ते दुःखी होतात. मला सर्वांत आश्चर्य वाटतं ते इतक्या लवकर तुला तसं वाटायला लागावं याचं. अर्थात् ते मी आत्ता थोडावेळच पाहिलंय, अन् ते फक्त तुझ्यातच नव्हे. हल्ली लहान लहान मुलंसुद्धा या भावनेने पछाडायला

लागली आहेत. हे एक प्रकारचं वेडच आहे. सैतानानं या अहंगडाचं रूप घेतलंय अन् तो साऱ्या पिढीत घुसलाय; हा अहंगड म्हणजे सैतान आहे," आल्योशा म्हणाला, ते म्हणताना त्याच्या तोंडावर हसू दिसेल असे त्याच्याकडे टक लावून पाहत असलेल्या कोल्याला वाटले होते, पण त्याची छटासुद्धा त्याच्या चेहऱ्यावर उमटली नाही. आपले बोलणे संपविताना आल्योशा म्हणाला, "इतर सर्वांसारखाच तू आहेस, म्हणजे इतर अनेकजण असतात तसा. फक्त तू तसा होऊ नयेस, एवढंच मला म्हणायचं आहे."

"जरी सगळेच तसे असले तरी?"

"होय, तरी तू एकटाच त्यांच्यासारखा नसलेला असा हो खरोखरच तू इतर सर्वांसारखा नाहीस. तुला स्वतःत जे वाईट दिसलं अन् हास्यास्पद असंसुद्धा दिसलं ते कबूल करण्याची तुला आता लाज वाटली नाही अन् या काळात इतकी कबुली कोण देतो? कोणी नाही. स्वतःवर टीका करण्याची प्रेरणाच लोक गमावून बसले आहेत. तू इतरांसारखा होऊ नकोस, मग तसा तू एकटा एक राहिलास तरी बेहेत्तर."

"छान! तुझ्याबद्दलची माझी समजूत चुकीची नाही ठरली तर. दुसऱ्याचं समाधान कसं करावं हे तुला चांगलं समजतं हं. अहा, तुझी ओळख व्हावी म्हणून मी किती दिवस आतुर होतो म्हणून सांग. कारमाझफ आपल्या या भेटीसाठी मी फार दिवस उत्सुक होतो. तुझ्या मनातसुद्धा माझ्याविषयी विचार आला असेल हे शक्य आहे? तू सुद्धा माझ्याविषयी विचार करीत होतास असं आत्ताच तू म्हणालास."

"होय, मी तुझ्याविषयी ऐकलं होतं अन् तुझा विचार माझ्या मनात होताही... अन् हे तू विचारतो आहेस याच्यामागं जरी काहीसा अहंपणा असला, तरी काही हरकत नाही, असू दे."

"कारमाझफ, आपलं हे बोलणं म्हणजे एकमेकांविषयीच्या प्रेमाचं निवेदनच झालं, नाही का?" कोल्या लाजऱ्या अन् हृदय विरघळून टाकणाऱ्या स्वरात म्हणाला, "हे हास्यास्पद नाही, होय ना?"

"मुळीच हास्यास्पद नाही, अन् समजा असलं, तरी काही हरकत नाही, कारण ती एक चांगली गोष्ट आहे." आल्योशा प्रसन्नपणे हसला.

"पण बरं का कारमाझफ, तुला कबूल केलं पाहिजे की तुला स्वतःलाच यावेळी थोडी लाज वाटते आहे... मला ते तुझ्या डोळ्यांवरून दिसतं आहे." कोल्या एक प्रकारच्या चोरट्या आनंदाने हसला.

"लाज कशाची?"

"हं, मग तू लाजतोयस का?"

"तूच मला लाजायला लावलंस," आल्योशा मोठ्याने हसून म्हणाला, अन् तो खरोखरच लाजला. "हं, थोडी लाज वाटली खरी, का कुणास ठाऊक मला नाही कळत..." तो गोंधळल्यासारखा होऊन तोंडातल्या तोंडात बोलला.

"अहाहा, तू काहीसा लाजलास म्हणूनच यावेळी मला तू फार आवडू लागला आहेस अन् मला तुझी प्रशंसा करावीशी वाटते आहे! कारण तू अगदी माझ्यासारखाच आहेस," कोल्या अक्षरशः भावनावेशात येऊन म्हणाला. त्याच्या गालावर लाली आली न् डोळ्यांत तेज चमकले.

"बरं का, कोल्या, तू आयुष्यात फार दुःखी होणार आहेस," कशामुळे तरी आल्योशाच्या तोंडून एकदम उद्‌गार निघाले.

"मला माहीत आहे, मला माहीत आहे. तुला हे सगळं आगाऊ कसं रे कळतं?" कोल्या एकदम त्याच्याशी सहमत होऊन म्हणाला.

"पण काही झालं तरी एकूण तू आपलं जीवन सार्थकी लावशील."

"बरोब्बर, ओ हो! तू भविष्यवादी आहेस अं? आपलं दोघांचं चांगलं जमेल, कारमाझफ! तुला माहीत आहे मला सर्वात जास्त आनंद होतो तो तू मला अगदी आपल्या बरोबरीचा म्हणून वागवतोस ना त्याचा. पण आपण बरोबरीचे नाही. अं हं, आपण मुळीच बरोबरीचे नाही, तू जास्त चांगला आहेस! पण आपलं जमेल. माहीत आहे तुला, गेला सबंध महिना मी आपल्या मनाशी म्हणतो आहे, 'आम्ही दोघे एकदम एकमेकांचे कायमचे मित्र तरी होऊ, किंवा मरेपर्यंत शत्रू म्हणून राहू!"

"अन् असं म्हणूनसुद्धा तू माझ्यावर प्रेम करीत होतास," आल्योशा मजेने हसू लागला.

"हो, माझं तुझ्यावर विलक्षण प्रेम होतं. मी तुझ्यावर प्रेम करीत होतो अन् तुझ्याविषयीच विचार करीत होतो. अन् हे सारं तुला अगोदरच कसं बरं कळलं? अरे, हे पाहा डॉक्टर आले. बापरे! ते काय सांगणार आहेत बरं? त्यांच्या चेहऱ्याकडं पाहा!"

७

इल्यूशा

डॉक्टर फिरून त्या खोलीतून बाहेर आले, त्यांनी आपला फरकोट अंगात घातला होता. अन् आपली टोपी डोक्यावर घातली होती. त्यांचा चेहेरा रागावल्यासारखा अन् उबगल्यासारखा दिसत होता, जणू आपल्या अंगाला घाण लागेल अशी त्यांना भीती वाटत असावी. त्यांनी वाटेवर ओझरती दृष्टी टाकली, ती टाकताना त्यांनी आल्योशाकडे न् कोल्याकडे करड्या नजरेने पाहिले. आल्योशाने

दारातून गाडीवानाला हाताने बोलावले, अन् ज्या गाडीतून डॉक्टर आले होते ती दारापुढे आली. कॅप्टन डॉक्टरच्या मागून धावत आला, अन् क्षमायाचनेच्या स्वरूपात त्यांच्यापुढे वाकून शेवटचे त्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी त्याने त्यांना थांबविले. तो बापडा पुरता चिरडून गेल्यासारखा दिसत होता; त्याच्या नजरेत भयाची छटा दिसत होती.

"साहेब, साहेब....असं होईल?" तो बोलू लागला, पण त्याला पुढं बोलवेना अन् निराशेने त्याने आपले हात आवळून धरले तरी तो अजूनही आर्जव-पूर्वक डॉक्टरांच्याकडे पाहात राहिला, जणू काही त्यांच्या एका शब्दाने त्या गरीब पोराचे नशीब अजूनही बदलणार होते.

"मला काही करता येत नाही, मी काही परमेश्वर नाही!" डॉक्टरने बेमुर्वतपणे, पण सराईत गांभीर्याने उत्तर दिले.

"डॉक्टर....महाराज....अन् हे लवकर–लवकरच होणार का हो?"

"जे काही होईल त्याला तुम्ही आपल्या मनाची तयारी ठेवली पाहिजे." डॉक्टर स्पष्ट अन् तीव्र स्वरात म्हणाले, आपली नजर खाली करून ते गाडीत चढण्याच्या तयारीत होते.

"साहेब, दया करा," भयग्रस्त झालेल्या कॅप्टनने पुन्हा त्यांना थांबविले. "साहेब! कशानं, कशानंच का हो आता तो वाचणार नाही?"

"ते आता माझ्या हातात नाही," डॉक्टर उतावीळ होऊन म्हणाले, "पण हां.." ते एकदम थांबले. "जर तुम्ही, समजा, तुमच्या रोग्याला....एकदम, उशीर न करता....('एकदम', 'उशीर न करता' हे शब्द डॉक्टरांनी अशा काही रागीट कडकपणाने उच्चारले की कॅप्टन एकदम दचकलाच) सिराक्यूसला पाठवलंत, तर त्या नव्या हितकर हवा बदलाने कदाचित चांगला परिणाम...."

"सिराक्यूसला!" कॅप्टन एकदम ओरडला, ते काय म्हणाले ते जणू त्याच्या डोक्यातच शिरले नाही.

"सिराक्यूस सिसिलीत आहे," कोल्या स्पष्टीकरण म्हणून एकदम बोलला. डॉक्टरांनी त्याच्याकडे पाहिले.

"महाराज, सिसिली!" कॅप्टन अडखळत म्हणाला, "पण आपण पाहलंत ना?" आपली परिस्थिती त्याने आपले हात पसरून फिरवीत दाखविली, "मम्मा अन् माझं कुटुंब?"

"अं हं, सिसिली हे कुटुंबाकरिता ठिकाण नव्हे, कुटुंबानं कॉकेशसला वसंत-ऋतूच्या सुरुवातीला जावं...तुमच्या मुलीनं कॉकेशसला गेलं पाहिजे, अन्....कॉकेशसमध्ये संधिवाताकरिता पाण्याचा उपचार घेतल्यानंतर...तुमच्या बायकोला थेट पॅरिसला मानसशास्त्रज्ञ लेपेलेत्येर यांच्याकडं पाठवलं पाहिजे; मी त्यांना एक पत्र देऊ शकेन, आणि मग....फरक पडण्याचा संभव आहे...."

" डॉक्टर, डॉक्टर ! पण आपण पाहाताहात ! " कॅप्टन आपले हात पुन्हा निराशेच्या आविर्भावानं पुढं करून मधल्या वाटेच्या उघड्या लाकडी भिंती दाखवीत उद्गारला.

" हे बघा, त्याच्याशी मला काही कर्तव्य नाही," डॉक्टर दात काढून म्हणाले. " मी आपलं तुम्हाला कोणते उपचार शक्य आहेत या प्रश्नाचं वैद्यक शास्त्राच्या दृष्टीने उत्तर दिलं. बाकीच्या बाबतीत, मला खेद वाटतो...."

" भिऊ नका, कंपौंडर, माझा कुत्रा काही तुम्हाला चावणार नाही ! " दारातच उभ्या असलेल्या पेरेझ्वोनकडं डॉक्टरांनी काहीशी भित्री नजर टाकलेली पाहून कोल्या मोठ्याने तीव्र स्वरात एकदम बोलला. त्याच्या आवाजात, रागाची छटा होती. त्याने ' डॉक्टर 'ऐवजी ' कंपौंडर ' असा शब्द मुद्दामच वापरला. आणि मागाहून त्याने खुलासा केला की, " मी तो त्याचा अपमान करण्याकरिता वापरला."

" काय म्हणतो हा ? " डॉक्टरांनी कोल्याकडे आश्चर्याने पाहत आपली मान उंचावली. " कोण आहे हा ? " त्यांनी आल्योशाला विचारले, जणू त्याच्याकडून ते खुलासा मागत होते.

" मी त्या पेरेझ्वोनचा धनी आहे, माझ्याबद्दल चिंता करू नका," कोल्या पुन्हा तिखट स्वरात म्हणाला.

" पेरेझ्वोन ? म्हणजे, घंटांचा नाद ? " डॉक्टरनी गोंधळून तो शब्द पुन्हा उच्चारला.

" तो घंटा ऐकतो, पण ती कुठं आहे ते त्याला सांगता येत नाही. नमस्ते, आपण सिराक्यूममध्ये भेटू."

" कोण आहे हा ? कोण आहे हा ? " डॉक्टर भयंकर संतापाने म्हणाले.

" तो एक शाळेतला विद्यार्थी आहे, डॉक्टर, तो खोडकर मुलगा आहे; त्याच्याकडं लक्ष देऊ नका," आल्योशा कपाळाला आठ्या घालून अन् भरभर बोलत म्हणाला. " कोल्या, गप बैस बरं ? " तो क्रासोत्कीनला ओरडून म्हणाला. " त्याच्याकडं लक्ष देऊ नका, डॉक्टर, " तो पुन्हा काहीशा उतावळीने म्हणाला.

" त्याला चोप पाहिजे, चांगला चोप पाहिजे ! " डॉक्टर पूर्ण संतापाच्या भरात पाय आपटीत,म्हणाले.

" अन् मग, बरं का कंपौंडर, माझा पेरेझ्वोन चावेल कदाचित ! " कोल्या, फिका पडून कंपित आवाजाने अन् चमकणाऱ्या डोळ्यांनी म्हणाला. " चलो, पेरेझ्वोन ! "

" कोल्या, एक शब्द अधिक बोललास तर मी तुझ्याशी संबंध ठेवणार नाही," आल्योशा हुकमी आवाजात म्हणाला.

" असा जगात एकच मनुष्य आहे की जो निकोलाय क्रासोत्कीनला आज्ञा

करू शकेल. अन् तो हा आहे." (कोल्याने आल्योशाकडे बोट केले) "मी त्याची आज्ञा मान्य करतो. नमस्ते !"

त्याने पाऊल पुढे टाकले, दार उघडले अन् तो चटकन् आतल्या खोलीत गेला. पेरेझ्वोन त्याच्या मागोमाग धावत गेला. चकित होऊन पाच सेकंद आल्योशाकडे पाहत डॉक्टर तसेच उभे राहिले; मग एक शिवी हासडून पुढील शब्द मोठ्यानं बोलत बोलत ते झरझर गाडीपाशी गेले : "हे...हे...म्हणजे....हे काय आहे ते मला समजत नाही !" कॅप्टन त्यांना गाडीत बसविण्याकरिता पुढे धावला. आल्योशा कोल्याच्या मागोमाग खोलीत गेला. तो केव्हाच इल्यूशाच्या अंथरुणापाशी जाऊन पोचला होता. तो आजारी मुलगा आपला हात वर करून आपल्या वडिलांना हाका मारीत होता. एका मिनिटाने कॅप्टनही परत आत आला.

"बाबा, बाबा, या....आपण..." इल्यूशा भावनेच्या जबरदस्त उद्रेकाने अडखळला, पण पुढे बोलणे शक्य होत नाहीसे पाहून त्याने आपले क्षीण हात आपल्या बापाच्या अन् कोल्याच्या भोवती टाकले, त्या दोघांनाही त्यानं एकाच मिठीत एकत्र केले, अन् त्यांना जितक्या जोराने आवळता येईल तितक्या जोराने छातीशी आवळले. कॅप्टनचे शरीर एकदम अस्फुट हुंदक्यांनी गदगदू लागले, अन् कोल्याचे ओठ अन् हनुवटी वेडीवाकडी होऊ लागली.

"बाबा, बाबा ! मला तुमच्याबद्दल किती वाईट वाटतं !" इल्यूशा अत्यंत शोकपूर्ण स्वरात म्हणाला.

"इल्यूशा,...लाडक्या....डॉक्टर म्हणाले...तू चांगला बरा होशील... आपण सुखी होऊ....डॉक्टर..." कॅप्टन सांगू लागला.

"हंः, बाबा, ते नवे डॉक्टर माझ्याबद्दल काय म्हणाले मला समजलं... मला दिसलं !" इल्यूशा म्हणाला. अन् पुनः त्याने त्या दोघांना आपल्या साऱ्या बळानिशी छातीशी घट्ट धरले, अन् आपले तोंड बापाच्या कुशीत लपविले.

"बाबा रडू नका, अन् मी मरेन तेव्हा दुसरा एक चांगला मुलगा, मिळवा...त्या सर्वांतून एक चांगलासा निवडा. त्याला इल्यूशा म्हणा अन् माझ्याऐवजी त्याच्यावर प्रेम करा..."

"चूप, दोस्ता, तू बरा होशील," क्रासोत्कीन एकदम म्हणाला, त्याचा आवाज रागीट झाल्यासारखा वाटला.

"पण मला कधी विसरू नका, बाबा," इल्यूशा पुढे म्हणाला, "माझ्या थडग्याकडे येत जा... अन्, बाबा, मला किनई त्या मोठ्या दगडापाशी, जिथं आपण फिरायला जात होतो ना तिथं पुरा, अन् तिथं संध्याकाळी क्रासोत्कीन बरोबर... अन् पेरेझ्वानबरोबर माझ्याकडं येत जा... मी तुमची वाट पाहत जाईन हं,.... बाबा बाबा !"

त्याचा आवाज क्षीण झाला. ते तिघेही गप्प झाले, तिघेही अजून एका मिठीत होते. नीना मूकपणे आपल्या खुर्चीत रडत होती, आणि शेवटी, सर्वचजण रडताहेत हे पाहून 'आई 'लासुद्धा रडू आले.

"इल्यूशा ! इल्यूशा !" ती ओरडली.

क्रासोतकीनने एकदम स्वतःला इल्यूशाच्या मिठीतून सोडवूनघेतले.

"नमस्ते, दोस्त, माझी आई जेवणाकरिता वाट पाहत आहे," तो घाई-घाईने म्हणाला. "मी तिला सांगून आलो असतो तर किती बरं झालं असतं ! ती फार काळजी करीत असेल... पण जेवण झाल्यावर मी परत तुझ्याकडे येईन अन् सारा दिवस, सारी संध्याकाळभर राहीन, अं ? आणि मी तुला खूप गोष्टी सांगेन, नाना तऱ्हेच्या गोष्टी. अन् मी पेरेझ्वोनलाही आणीन, पण आत्ता त्याला मी बरोबर घेऊन जातो, कारण मी गेलो तर तो रडायला लागेल अन् तुम्हाला त्रास देईल. नमस्ते !"

आणि तो धावत बाहेरच्या वाटेवर गेला. त्याला रडायचे नव्हते, पण वाटेवर जाताच त्याला रडू कोसळले. आल्योशा आला तेव्हा त्याला तो रडत असताना दिसला.

कोल्या, तू आपला शब्द पाळून परत आलं पाहिजेस हं, नाहीतर त्याची फारच निराशा होईल," आल्योशा दृढपणे म्हणाला.

"अवश्य येईन ! अरेरे, याच्या अगोदर आलो नाही याबद्दल मी स्वतःला किती शिव्या देऊ ?" कोल्या रडत आपल्याशीच पुटपुटला, रडण्याची यावेळी त्याला लाज वाटली नाही.

याचवेळी कॅप्टन खोलीतून बाहेर आला, एकदम त्याने आपल्यामागे दार बंद करून घेतले. त्याचा चेहरा पिसाटासारखा दिसत होता, त्याचे ओठ थरथरत होते. तो त्या दोन मुलांच्या पुढं येऊन उभा राहिला अन् आपले हात वर करून म्हणाला :

"मला नको कोणी चांगला मुलगा ! मला नको दुसरा मुलगा !" तो, आपले दात गच्च आवळून, अगदी हलक्या आवाजात अर्थशून्य शब्दात तोंडातल्या तोंडात बोलला, "जेरुसलेम, तुला जर मी विसरलो तर ही माझी जीभ...." त्याला एकदम हुंदका फुटला अन् तो तिथल्या लाकडी बाकड्यापुढे गुडघ्यांवर कोसळला. आपल्या मुठी आपल्या डोक्यावर दाबीत तो वेडेवाकडे आवाज काढून, पण ते आत खोलीत ऐकू जाऊ नयेत असा आटोकाट प्रयत्न करीत, हुंदके देऊ लागला.

कोल्या रस्त्यावर पळाला.

"नमस्ते, कारमाझफ ! तू स्वतः येणार का ?" तो आल्योशाला तीक्ष्ण-पणे अन् रागीटपणे म्हणाला.

" मी नक्कीच संध्याकाळी येणार आहे."

" ते जेरुसलेमबद्दल काय म्हणाले ?... त्यांना काय म्हणायचं आहे ?"

" ते एक बायबलमधलं वाक्य आहे. ' हे जेरुसलेम, तुला जर मी विसरलो,' म्हणजे मला जे काही सर्वश्रेष्ठ मूल्याचं वाटतं ते जर मी विसरलो,' त्याची जागा जर मी दुसऱ्या कोणत्याही वस्तूला घेऊ दिली तर..."

" समजलं मला, तेवढं पुरे ! तू यायचं लक्षात ठेव हं ! चलो, पेरेझ्वोन ! " तो कुत्र्यावर अगदी जोराने ओरडला, अन् झपाझप ढांगा टाकीत घराकडे गेला.

विभाग ११ वा

इवान

१

ग्रूशिंकाच्या घरी

आल्योशा कथीड्रल चौकाकडं विधवा बाई मोरोझोव हिच्या घरी ग्रूशिंकाला भेटायला गेला; तिने अगदी सकाळी फेनियाला पाठवून आपल्याकडे येण्याबद्दल विनवणी करणारा निकडीचा निरोप त्याला पाठविला होता. फेनियापाशी चौकशी करता, आल्योशाला कळले की तिची मालकीण आदल्या दिवसापासून विशेष दुःखात आहे. मीत्याला पकडल्यानंतरच्या दोन महिन्यांच्या काळात आल्योशा बऱ्याच वेळा विधवा मोरोझोवबाईच्या घरी, आपण होऊन तसेच मीत्यासाठी निरोप घेण्याकरिता म्हणून गेला होता. मीत्याच्या अटकेनंतर तीन दिवसांनी, ग्रूशिंका फार आजारी पडली अन् ती जवळजवळ पाच आठवडे आजारी होती. सबंध एक आठवडा ती बेशुद्धच होती. तिच्यात खूपच बदल झाला होता— पूर्वीपेक्षा ती अधिक रोड अन् थोडीशी फिकट झाली होती, तथापि गेला पंधरवडा ती बाहेर जाण्या-येण्याइतपत बरी झाली होती. पण आल्योशाला तिचा चेहेरा पूर्वीपेक्षा अधिकच आकर्षक वाटू लागला होता. आणि आता तिच्याकडे गेल्यानंतर तिच्या डोळ्यांशी डोळे भिडविताना त्याला बरे वाटे. तिच्या मुद्रेवर दृढता अन् उद्दिष्टा-विषयीची सजाण निश्चितता दिसू लागली होती. तिच्यात अंतरातून आमूलाग्र बदल झाल्याची चिन्हे दिसत होती, आणि एक स्थिर, सूक्ष्म अन् नम्र निर्धार— जो कशानेही बदलणार नाही असा— तिच्यात दिसून येत होता. तिच्या भुवयांच्या मध्ये एक बारीकशी उभी रेषा उमटली होती, त्यामुळे तिच्या मोहक चेहऱ्याला एकाग्र विचारमग्नतेचे रूप आले होते. पहिल्या दृष्टिक्षेपाला तो उग्रसा भासे. पूर्वीच्या तिच्या थिल्लरपणाचा मागमूससुद्धा तिच्यात उरलेला नव्हता.

या बिचाऱ्या मुलीवर जे संकट ओढवले होते, एकमेकांशी विवाहबद्ध होण्याच्या वेळीच जवळ जवळ, ज्याला तिने मनाने वरले होते त्या माणसाला एका भयानक गुन्ह्याकरिता अटक झाली होती. असे असूनसुद्धा, तसेच ती आजारी पडली होती अन् मीत्यावर जवळ जवळ अटळ अशी शिक्षा टांगली होती असे असूनसुद्धा

ग्रूशिंकाचा तारुण्यसुलभ आनंदीपणा नाहीसा झाला नव्हता. याचेही आल्योशाला मोठे नवल वाटले. एके काळी गर्वाने चढलेल्या डोळ्यांत एक मृदू तेज आले होते. अर्थात पूर्वीपेक्षाही आता अधिक प्रखर झालेला असा एक त्रस्त करणारा विचार जेव्हा तिच्या अंतःकरणात येई तेव्हा तिचे डोळे कधी कधी पूर्वीच्या सूडाच्या ज्वालेने चमकू लागत ही गोष्ट खरी. त्या तिच्या अस्वस्थतेचे कारणही तेच पूर्वीचे होते. कातिरीना इवानोवना; ग्रूशिंका वातात बेशुद्ध असतानासुद्धा तिच्याबद्दलच बरळत होती. तिच्याबद्दल तिला भयंकर मत्सर वाटत होता हे आल्योशा जाणून होता. कतिरिना इवानोवना– तिच्या मनात असते तर– मीत्याला तुरुंगात भेटू शकली असती तरी ती एकदाही त्याला भेटून आली नव्हती. तिला वाटेल त्यावेळी ती भेटून येऊ शकली असती. आल्योशाला हा सर्व एक अवघड प्रश्न होऊन बसला होता, कारण तोच एकटा असा होता की ज्याच्यापुढे ग्रूशिंका आपले हृदय उघडे करी आणि त्याच्याकडून सतत सल्ला घेई. कधी कधी त्याला काही बोलणेच शक्य होत नसे.

निश्चित मनाने त्याने तिच्या बिऱ्हाडात प्रवेश केला. ती घरी होती. अर्ध्या तासापूर्वीच ती मीत्याला भेटून आली होती, आणि ज्या उतावीळपणे ती आपल्या खुर्चीवरून एकदम उठून त्याला भेटायला पुढे झाली त्यावरून ती आपली अत्यंत उत्कंठेने वाट पाहात होती हे त्याला दिसून आले. पत्त्यांचा एक जोड 'गेम ऑफ फूल्स' (मूर्खांचा डाव) मांडून टेबलावर पडलेला होता. पलीकडल्या बाजूला कातडी कोचावर अंथरुण टाकलेले होते अन् त्यावर मॅक्झिमफ अर्धवट कलून पडला होता. त्याने अंगात झोपण्याच्या वेळचा गाऊन आणि सुती टोपी घातली होती, आणि तो उघडच आजारी अन् अशक्त असल्यासारखा दिसत होता, तथापि तो प्रसन्न मुद्रेने स्मित करीत होता. दोन महिन्यांपूर्वी हा घरदार नसलेला वृद्ध माणूस मोक्रोयहून जेव्हा ग्रूशिंकाबरोबर परत आला, तेव्हा तो साहजिकच तिच्याकडे मुक्कामाला आला अन् अजूनपर्यंत तिच्याकडेच राहिला होता. तो तिच्याबरोबर आला तो पावसातून अन् बर्फातून येऊन तो कोचावर बसला, तेव्हा तो भिजून चिंब झालेला अन् भयभीत अवस्थेत होता, अन् तिच्याकडे तो मूकपणे भित्रे अन् आर्जवी स्मित करीत पाहत बसला होता. ग्रूशिंका त्यावेळी दारुण दुःखात आणि तापाच्या पहिल्या अवस्थेत होती, आल्याबरोबर पहिल्या अर्ध्या तासात तिला जे काही करायचे होते ते सर्व करण्यात ती त्याचे अस्तित्वच जणू विसरून गेली होती. अकस्मातच तिची नजर त्याच्यावर एकाग्र झाली; तो दया येईल अशा असहाय रीतीने हसला. तिने फेनियाला बोलावले अन् त्याला काहीतरी खायला द्यायला सांगितले. तो सर्व दिवस तो एकाच ठिकाणी, जवळ जवळ न हलता, बसून राहिला. अंधार झाला अन् खिडक्यांची दारे लागली तेव्हा फेनियाने आपल्या मालकिणीला विचारले.

"हे सद्गृहस्थ रात्री इथं राहणार आहेत का बाईसाहेब ?"

"होय, त्यांच्याकरिता कोचावर अंथरुण करून दे." ग्रूशिंकाने सांगितले.

त्याच्याशी अधिक प्रश्नोत्तरे केल्यानंतर ग्रूशिंकाला कळले की त्याला जायला अक्षरशः कुठे ठिकाणच नव्हते. आणि काल्गानफ माझा उपकारकर्ता खरा पण त्यानं मला सरळ सांगितलं की 'मी तुला पुन्हा माझ्या सोबत घेऊन जाणार नाही' आणि त्यानं मला पाच रुबल काढून दिले.

"बरं तर, ईश्वराची इच्छा, तुम्ही आता इथंच राहा." ग्रूशिंकाने दुःखात असतानाच ठरविले अन् दयाबुद्धीने हसून त्याच्याकडे बघितले. त्या हसण्याने त्या वृद्धाचे अंतःकरण पिळवटले अन् त्याचे ओठ थरथरून त्याच्या डोळ्यांत पाणी भरले. अशा रीतीने तो अनाथ फिरस्ता तेव्हापासून तिच्याकडेच राहिला होता. ती आजारी होती तरीसुद्धा त्याने ते घर सोडले नव्हते. फेनिया अन् तिची स्वैंपाकाचे काम करणारी आजी, यांनी त्याला घराबाहेर काढून लावले नाही. उलट त्याला त्या जेवू घालीत राहिल्या अन कोचावर अंथरूण घालून देऊ लागल्या. ग्रूशिंकाला आता त्याची सवय झाली होती. अन् मीत्याला भेटून परत आल्यावर चांगली बरी होण्यापूर्वीच त्याला तुरुंगात जाऊन भेटण्याला तिने सुरुवात केली होती. ती खाली बसे अन् आपल्या दुःखाचा विसर पडण्याकरिता इकडच्या तिकडच्या फालतू गोष्टी विषयी 'मॅक्झिमफ'शी बोलणे सुरू करी. कधी कधी तो म्हातारा चांगल्या गोष्टी सांगणारा आहे असे आढळून येई. त्यामुळे तो तिला आवश्यकच होऊन बसला. ग्रूशिंका आल्योशाव्यतिरिक्त क्वचितच कोणाला भेटत असे, आणि तोही तिच्याकडे रोज जात नसे अन् फार वेळ बसत नसे. तिचा तो म्हातारा व्यापारी या वेळी फार आजारी होता. शहरात त्या लोकांच्या भाषेत "शेवटचा श्वास घेत होता" अन् खरोखरच तो मीत्याच्या खटल्यानंतर एक-आठवड्याने वारला. मृत्यूपूर्वी तीन आठवडे आपला अंत जवळ आला आहे हे ओळखून त्याने आपल्या मुलांना, सुनांना, नातवंडांना अखेर एकदाचे माडीवर आपल्याकडे यायला लावले अन् आपल्याला पुन्हा सोडून जाऊ नका असे बजावले. त्या क्षणापासून त्याने आपल्या नोकरांना कडक हुकूम देऊन ठेवले की ग्रूशिंकाला माझ्याकडं आत येऊ देऊ नका आणि ती आली तर तिला सांगा की धन्यांनी तुला दीर्घायुष्य अन् सुख चिंतलं आहे. अन् मला विसरून जा म्हणून सांगितलं आहे." पण ग्रूशिंका बहुधा रोजच्या रोज त्याची विचारपूस करायला कोणाला तरी पाठवीत असे.

"आलास तू अखेर!" आल्योशाचे स्वागत करीत हातातले पत्ते टाकून देऊन ती मोठ्याने म्हणाली. "अन् मॅक्झिमफ मला भीती दाखवीत होते की तू कदाचित येणारच नाहीस म्हणून. हॅः मला तुझी किती गरज आहे! इथं टेबलापाशी बैस. काय घेशील– कॉफी?"

"हो, कृपा करून दे." आल्योशा टेबलाजवळ बसून म्हणाला, "मला फार भूक लागली आहे."

" छान, फेनिया, फेनिया, कॉफी आण," ग्रूशिंकाने ओरडून सांगितले. " तुझ्यासाठी ती केव्हापासून तयार करून ठेवली आहे. अन् थोडसं पाईपण आण, गरम गरम पाहिजेत हं. या पाईवरून आज आमच्यात मोठं वादळ माजलं, माहीत आहे? मी ते त्याच्यासाठी तुरुंगात नेले अन् खरं वाटेल तुला, त्यानं ते परत माझ्याकडं फेकून दिले; खाणार नाही म्हणाला. त्यानं एक त्यातला भुईवर फेकला अन् पायाखाली तुडवला. तेव्हा मी त्याला म्हटलं, 'मी ते वॉर्डरपाशी ठेवून जाते; तू जर संध्याकाळपर्यंत ते खाल्ले नाहीस, तर तुझा विषारी खुनशीपणाच तुला पुरेसा वाटतोय असा त्याचा अर्थ होईल!' असं म्हणून मी निघून आले, खरं वाटेल तुला? आम्ही पुन्हा भांडलो, जेव्हा जेव्हा मी जाते तेव्हा तेव्हा आमची भांडणं होतात."

ग्रूशिंका हे सारे अस्वस्थपणाने एका दमात बोलली. मॅक्झिमफ संकोचल्यासारखा होऊन किंचित हसला अन् खाली जमिनीकडे पाहू लागला.

" या खेपेला भांडायला कारण काय झालं?" आल्योशाने विचारले.

" भांडण होईल असं मला मुळीच वाटत नव्हतं. बघ ना, त्याला त्या पोलचा मत्सर वाटतोय, त्याला तू का संभाळला आहेस? असं तो म्हणाला, 'म्हणजे तू त्याला संभाळायला लागली आहेस म्हणायची.' असा तो मत्सरी झालाय, सदोदित माझा मत्सर करतो, खाताना अन् झोपतानासुद्धा! गेल्या आठवड्यात कुझमाचासुद्धा मत्सर करायचं त्याच्या डोक्यानं घेतलं."

" पण त्याला त्या पोलबद्दल पूर्वी माहीत होतंच!"

" हो, पण तरी असं आहे. त्याला अगदी पहिल्यापासून त्याच्याविषयी माहिती आहे, पण आज तो एकदम उठला अन त्याच्या बाबतीत नाही नाही ते बोलू लागला. तो जे काय म्हणाला त्याचा पुनः उच्चार करण्याची मला लाज वाटते. वेडपट माणूस! मी बाहेर आले तसा राकीतीन आत गेला. कदाचित राकीतीन त्याला चिथावीत असावा. काय वाटतं तुला?" ती बेपर्वाईने म्हणाली.

" त्याचं तुझ्यावर प्रेम आहे, हाच त्याचा अर्थ आहे. तो तुझ्यावर अतिशय प्रेम करतो. अन या वेळी तो विशेष चिंताग्रस्त आहे."

" हो, त्याचा खटला उद्या चालायचा ना, तेव्हा तो चिंतेत असणारच. हे मला समजतं. आणि उद्याबद्दल काही बोलण्याकरिता म्हणूनच मी त्याच्याकडं गेले, कारण उद्या काय होईल याची मला फारच भीती वाटते. तू म्हणतोस तो चिंताग्रस्त आहे, पण मी किती चिंताग्रस्त आहे! अन तो पोल संबंधानं बोलतो! अगदी मूर्ख आहे तो! अजून त्याला मॅक्झिमफचा मत्सर वाटायला लागलेला नाही हे नशीब!"

" माझी बायको माझ्याबद्दलसुद्धा फार मत्सरी होती," मॅक्झिमफने मध्येच आपले पिलू सोडले.

"तुमच्याबद्दल मत्सरी?" ग्रूशिंका हसू न आवरून मोठ्याने हसली. "तिला कुणाचा मत्सर वाटला बाई?"

"मोलकरीण मुलींचा."

"गप बसा, मॅक्झिमफ, मी आता हसण्याच्या वृत्तीत नाही, मी रागावलेली आहे. पाईकडं तिरक्या नजरेनं पाहू नका. मी तुम्हाला एकसुद्धा देणार नाही, तुमच्या प्रकृतीला त्या चांगल्या नाहीत, अन् मी तुम्हाला व्होडकाही देणार नाही. मला याचीसुद्धा काळजी घ्यावी लागते, जणू मी इथं भिकारीघरच चालवलं आहे," ती हसली.

"तुझ्या दयेला मी पात्र नाही, मी एक क्षुद्र जंतू आहे," मॅक्झिमफ सद्गदित आवाजाने म्हणाला. "तू आपली ममता माझ्यापेक्षा जास्त उपयोगी माणसांकडे वळवलीस तर बरं होईल."

"हे का? प्रत्येकाचा उपयोग आहे, मॅक्झिमफ, अन् कुणाचा जास्तीत जास्त उपयोग आहे हे आपण कसं सांगणार? तो पोल जर अस्तित्वातच नसता तर? आल्योशा, त्यानंसुद्धा आज आजारी पडायचं डोक्यात घेतलं आहे. त्यालाही मी भेटायला गेले होते. आणि त्याच्याकडंही मी अगदी मुद्दाम काही पाइ पाठविणार आहे. मी त्याला मुळीच पाठविले नव्हते, पण मीत्त्यानं ते पाठविल्याचा आरोप माझ्यावर केला, तेव्हा आता मी काही पाइ पाठवणारच! अरे, ही फेनिया पत्र घेऊन आली! हां, हे त्या पोलांच्याकडून आलेलं दिसतं–पुनः भीक मागणारं!"

पॅन मुस्स्यालोविचने खरोखरच तिला एक लांबलचक अन् विलक्षण बोलके पत्र पाठविले होते अन् त्यात तिच्याकडून तीन रुबल उसने मागितले होते. त्या पत्राबरोबर त्या तीन रुबलांची पावतीही पाठविली होती अन् तीन महिन्यांच्या आत आपण ते परत करू असे वचन दिले होते, खाली पॅन व्रुब्लेवस्कीचीही सही होती. ग्रूशिंकाला तिच्या या पूर्वीच्या प्रियकराकडून अशी बरीच पत्रे अन् त्यासोबत अशा पावत्या ती आजारातून बरी होत असतानाच्या पंधरवड्यात आल्या होत्या. पण तिला माहीत होते की ते दोघे पोल ती आजारी असताना तिची विचारपूस करून गेले होते. ग्रूशिंकाला त्यांच्याकडून जे पहिले पत्र आले होते ते लांबलचक होते, एका मोठ्या नोटपेपरवर ते लिहिले होते. अन् त्यावर उठविलेल्या मोहरेवर त्यांच्या घराण्याचे मोठे चिन्ह होते. ते पत्र इतके दुर्बोध अन् अलंकारिक होते की ग्रूशिंकाने ते अर्धे वाचून होण्यापूर्वीच खाली ठेवले, त्यातले तिला काहीसुद्धा कळले नाही. ती त्या वेळी पत्रांची उत्तरे देऊ शकत नव्हती. या पहिल्या पत्राच्या मागून दुसरे दिवशी दुसरे पत्र आले त्यात पॅन मुस्स्यालोविचने तिच्याकडून दोन हजार रुबल फार थोड्या मुदतीकरिता कर्जाऊ मागितले होते. त्याही पत्राचे ग्रूशिंकाने उत्तर दिले नाही. मग रोज एक याप्रमाणे एकामागून एक अनेक पत्रे आली, सगळी अशीच अवडंबराने

अन् अलंकारिक शब्दांनी भरलेली, पण मागितलेल्या कर्जाची रक्कम प्रत्येक पत्रात हळूहळू कमी कमी होत शंभर रुबलांवर, मग पंचवीस, मग दहा अन् आता शेवटी आलेल्या या पत्रात त्या पोलांनी फक्त एक रुबल मागितला होता अन् त्याची दोघांच्या सहीचीच पावती सोबत पाठविली होती.

मग ग्रूशिंकाला त्यांच्याबद्दल अतिशय वाईट वाटले, अन् संध्याकाळच्या वेळी ती स्वतःच त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी गेली. तिला ते दोघे पोल अतिशय दारिद्र्यावस्थेत, जवळ जवळ भुकेकंगालीत असल्याचे आढळले, ना अन्न ना इंधन. सिगारेटसुद्धा नाहीत अन् घरमालकिणीचे त्यांना कर्ज झाले आहे असे तिला आढळले. मोक्रोयला त्यांनी मीत्याकडून लुबाडलेले दोनशे रुबल केव्हाच नाहीसे झाले होते. पण ग्रूशिंकाशी अशा ताठर ऐटीने आणि हेकेखोरपणाने, शिष्टाचाराचे नियम अगदी बारकाव्याने पाळून अन् बढाईखोर भाषणे करून ते वागले की तिला आश्चर्यच वाटले. ती फक्त हसली, अन् आपल्या पूर्वीच्या त्या चाहत्याला तिने दहा रुबल दिले. मग, हसत हसत मीत्याला तिने त्याबद्दल सांगितले अन् त्याला बिलकुल मत्सर वाटला नाही. पण तेव्हापासून ते पोल ग्रूशिंकाला चिकटले अन् रोज तिच्याकडे पैशाच्या मागण्यांचा त्यांनी मारा चालविला आणि तिने त्यांना सतत लहान लहान रकमा पाठविल्या. आणि त्या दिवशी मीत्याच्या डोक्यात भयंकर मत्सराचे वारे शिरले.

"मीत्याकडं जाताना वाटेत एक मिनिटभर मी मूर्खासारखी त्याच्याकडे गेले, कारण तो म्हणजे माझा पोल सुद्धा आजारी आहे," ग्रूशिंका पुनः अस्वस्थपणे भरभर सांगू लागली. "मी हसत हसत हे मीत्याला सांगितलं. 'गंमत बघ,' मी त्याला म्हटलं, 'माझ्या पोल गृहस्थाच्या मनात असा एक छान विचार आला की आपली जुनी गाणी सितारवर मला म्हणून दाखवावी. त्याला वाटलं माझं अंतःकरण हालेल अन मी त्याच्याशी लग्न करीन!' मीत्या शिव्याशाप देतच एकदम उठला... म्हणूनच, मी त्यांना ते पाइ पाठविणार आहे! फेनिया, त्यांनी तीच छोटी पोरगी पाठविली आहे का? हे घे, तिला तीन रुबल दे अन एक डझनभर पाइ कागदात बांधून देऊन तिला ते घेऊन जायला सांग. अन आल्योशा, तू मीत्याला खरंच सांग की मी पाइ पाठविले म्हणून."

"मी काही झालं तरी सांगणार नाही," आल्योशा स्मित करीत म्हणाला.

"हा! तुला वाटतं त्यामुळं तो दुःखी होतो होय? हंः, तो हेतुपूर्वक मत्सर करतो. त्याला पर्वा नाही." ग्रूशिंका कडवटपणे बोलली.

"हेतुपूर्वक?" आल्योशाने विचारले.

"आल्योशा, तू खरोखर वेडा आहेस बघ. इतका तू हुषार खरा, पण तुला असल्या गोष्टींच्या बाबतीत समजत नाही. तो माझ्यासारख्या मुलीबद्दल मत्सर करतो याचं मला काही वाटत नाही. तो मत्सर न करता ना, तरच मला वाईट वाटलं

असतं. अशीच आहे मी. मला मत्सराचं काही वाटत नाही. माझं अंतःकरणही तसं भयंकर आहे. मी स्वतः मत्सरी होऊ शकते. माझं मन दुखावतं ते त्याचं माझ्यावर बिलकूल प्रेम नाही त्यामुळं. मी तुला सांगते तो यावेळी मत्सर करतो आहे तो हेतू मनात ठेवून. मी काय आंधळी आहे होय? मला दिसत नाही? आता तो माझ्याशी त्या स्त्रीबद्दल– म्हणजे कतिरीनाबद्दल– बोलायला लागला. म्हणाला, ती अशी आहे न् तशी आहे. आपल्याकरिता म्हणजे त्याला वाचविण्याकरिता तिनं मॉस्कोहून कसा डॉक्टर बोलावलाय, तिनं उत्तम, अत्यंत विद्वान असा वकीलसुद्धा कसा बोलावलाय, ते तो सांगायला लागला. तेव्हा त्याचं तिच्यावर प्रेम आहे. तो माझ्या तोंडावर तिची स्तुती करू लागला, त्याची शरम वाटली पाहिजे त्याला! त्यानंच मला अतिशय वाईट रीतीनं वागविलं. पण माझीच पहिली आगळीक असं दाखवून द्यायला अन् माझ्यावरच सगळं लोटून त्यानं माझ्यावर हल्ला चढवला. 'माझ्या अगोदर त्या तुझ्या पोलपाशी तू होतीसच, तेव्हा कतिरीनाबद्दल मला तुला दोष देता येणार नाही.' असा एकंदर त्याच्या म्हणण्याचा भावार्थ. सारा दोष माझ्यावरच त्याला टाकायचाय. त्यानं मुद्दामच माझ्यावर हल्ला चढवला, मुद्दामच सांगते तुला, पण मी..."

पण आपण काय करणार ते ती पुरते सांगू शकली नाही. आपल्या डोळ्यांवर हातरुमाल धरून ती जोरजोराने हुंदके देऊ लागली.

"त्याचं कतिरीना इवानोवनावर प्रेम नाही." निश्चयी स्वरात आल्योशा म्हणाला.

"हं, तिच्यावर त्याचं प्रेम आहे की नाही हे माझं मीच लवकर शोधून काढीन." ग्रूशिंका डोळ्यांवरून हातरुमाल काढून म्हणाली. तिच्या आवाजात धमकीचा स्वर होता. तिचा चेहरा विकृत झाला होता. सौम्य अन् गंभीर होण्याऐवजी तो क्रुद्ध अन् खुनशी झालेला बघून आल्योशाला वाईट वाटले.

"पुरे झाला हा खुळचटपणा." ती एकदम म्हणाली; "याकरिता काही मी तुला बोलावणं पाठवलं नव्हतं. लाडक्या आल्योशा, उद्या–उद्या रे काय होईल? त्याचाच मला त्रास होतोय! अन् फक्त मलाच त्याचा त्रास होतोय! मी प्रत्येकाकडं पाहते पण कुणालाच त्याचं काही वाटत नाही; कुणालाच त्याची चिंता नाही. तू तरी त्याबद्दल विचार करतोयस का? उद्या त्याचा खटला चालणार, माहीत आहे ना? मला सांग, तो कसा चालेल? तुला माहीत आहे तो हुजऱ्याच दोषी आहे त्या हुजऱ्यानंच त्याला ठार मारलंय! अरे देवा! त्या हुजऱ्याच्याऐवजी ते त्याला शिक्षा करतील अन् कोणीच त्याची बाजू घेऊन उभं राहणार नाही? त्यांनी त्या हुजऱ्याला मुळीसुद्धा हात लावलेला नाही, नाही का?"

"त्याची कसून उलट तपासणी करण्यात आलीय." आल्योशा विचारमग्न होऊन म्हणाला; "पण प्रत्येकजण अशाच निर्णयाला येऊन पोचला की खुनी तो

नाही. आता तो अतिशयच आजारी होऊन पडला आहे. झटका आल्यापासूनच तो आजारी आहे. खरोखरच आजारी आहे," आल्योशा म्हणाला.

बरं का, तू स्वतः त्या वकिलाकडं जाऊन सारी हकीकत त्याला सांगू शकणार नाहीस का ? पीटर्सबर्गहून त्याला तीन हजार रुबल्स देऊन आणवले आहे, म्हणतात."

"आम्ही तिघांनी मिळून ते तीन हजार दिले. इवाननं, कतिरीना इवानोवनानं अन् मी– पण मॉस्कोच्या एका डॉक्टरला तिनं एकटीनंच दोन हजार दिले. फेत्यूकोविच वकिलानं अधिक फी मागितली असती, पण हे प्रकरण साऱ्या रशियाभर गाजलंय, सगळया वर्तमानपत्रांत अन् नियतकालिकांत त्याची चर्चा चालू आहे; हे प्रकरण इतके गाजलं असल्यामुळंच त्याच्यातून मिळणाऱ्या प्रसिद्धीकरिता फेत्यूकोविच इकडं यायला अधिक तयार झाला."

"मी काल त्याला भेटलो होतो."

"असं? त्याच्याशी तू बोललास? ' ग्रूशिंकाने उत्कंठेने विचारले.

"माझं बोलणं त्यानं ऐकून घेतलं पण तो काही बोलला नाही. आपण आपलं मत अगोदरच बनवलं आहे असं त्यानं मला सांगितलं. पण त्यानं माझ्या बोलण्याचा विचार करण्याचं आश्वासन मात्र दिलं."

"विचार ! हंः, ही माणसं लफंगी असतात ! ते त्याला पार धुळीला मिळवितील. अन् तिनं डॉक्टरला का म्हणून बोलावून आणलं ?"

"एक तज्ज्ञ म्हणून. त्यांना असं सिद्ध करायचं आहे की मीत्या हा वेडा आहे अन् आपण काय करतो हे न समजून त्यानं तो खून केला !" आल्योशा सौम्यपणे हसला; "पण मीत्या त्याला कबूल नाही."

"होय, पण जर त्यानं त्याचा खून केला असेल तर ते खरंच असलं पाहिजे ! ग्रूशिंका मोठ्याने म्हणाली. "तो त्या वेळी वेडाच होता, पूर्ण वेडा, अन् त्याचा दोष माझ्याकडे येतो, इतकी नीच आहे मी ! पण अर्थात् त्यानं ते काम केलेलं नाही ! आणि ते सगळे त्याच्याविरुद्ध आहेत, सारं शहर. नव्हे, फेनियाची साक्षसुद्धा त्यानंच ते केलं असं सिद्ध करते. अन् त्या दुकानातली माणसं, तो अधिकारी, अन् तिथं उपहारगृहातसुद्धा, पूर्वी, लोकांनी त्याला तसं म्हणताना ऐकलंय ! ते सगळे, सगळे त्याच्याविरुद्ध आहेत, सगळे त्याच्याविरुद्ध ओरडताहेत."

"होय, भीती वाटावा इतका पुरावा गोळा झाला आहे," आल्योशा अती गंभीरपणे म्हणाला.

"अन् ग्रिगरी–ग्रिगरी वासिल्येविच–दरवाजा उघडा होता याच अ पल्या मुद्दयाला चिकटून आहे, आपण तो पाहिला असल्याचे तो निक्षून सांगतो. त्याला त्याच्या भूमिकेपासून हलविणं शक्य नाही. मी स्वतःच त्याच्याकडं जाऊन त्याच्याशी बोलून आले. त्या बाबतीत तो उद्धटपणेही बोलतो."

"होय, त्याच्या विरुद्ध तो सर्वांत बळकट असा पुरावा होण्यासारखा आहे," आल्योशा म्हणाला.

"अन् मीत्या वेडा असल्याबद्दल बोलायचं तर तो आता या वेळी तसाच दिसतोय." ग्रूशिंका म्हणाली, तिच्या चेहेऱ्यावर एक विशिष्ट सचिंततेचा अन् गूढ असा भाव होता.

"तुला माहीत आहे, आल्योशा, त्याबद्दल तुझ्याशी बोलायचं बऱ्याच दिवसांपासून माझ्या मनात होतं. मी दररोज त्याच्याकडं जाते अन् त्याला बघून मला अगदी नवल वाटतं. तो नेहमी कशाबद्दल बोलत असेल असं तुला वाटतं? तो एकसारखा बोलत असतो अन् मला त्यातलं काहीसुद्धा समजत नाही. मला वाटलं तो बौद्धिक असं काही बोलतो आहे अन् मला वेडीला ते काही समजायचं नाही. तो एकदम माझ्याशी एका बछड्यासंबंधानं बोलू लागला— म्हणजे एका लहान मुलासंबंधानं. "ते मूल गरीब का?" तो म्हणतो, 'त्या मुलाकरिता मी आता सैबेरियाला जातो आहे. मी खुनी नाही, पण मला सैबेरियाला गेलं पाहिजे!' याचा अर्थ काय, ते मूल कोण मला काही रे बाबा मुळी म्हणजे मुळीसुद्धा कळत नाही." ते तो इतकं सुरेख रीतीनं म्हणाला, जेव्हा हे म्हणाला ना तेव्हा मला अगदी रडू आलं, कारण तो स्वतःही रडला अन् मी पण रडले. त्यानं एकदम माझं चुंबन घेतलं अन् माझ्यावर क्रूसाचं चिन्ह केलं. त्याचा अर्थ काय आल्योशा? सांग बरं. हे मूल कोण?"

"हे राकीतीनचं काम दिसतं, तो रोज त्याच्याकडं हल्ली जातो ना," आल्योशा हसून म्हणाला, "तरी.... हे राकीतीनचं काम नसावं. मी मीत्याला काल भेटलो नाही. आज भेटेन."

"अं हं, हे राकीतीनचं काम नव्हे; त्याचा भाऊ इवान फ्योदरोविच त्याला भडकवतो आहे. तो त्याला भेटायला जातो त्यामुळंच हे होतंय." ग्रूशिंका बोलली अन एकदम तिने जीभ चावली. आल्योशा तिच्याकडे चकित होऊन पाहात राहिला.

"इवान जातो? तो त्याला भेटायला गेला होता? इवान एकदाही आपल्याकडं आला नाही असं खुद्द मीत्यानंच मला सांगितलं."

"छेः छेः! काय मुलगी आहे मी! बोलायचं नाही ते बोलून जाते!" ग्रूशिंका उद्‌गारली, गोंधळल्यासारखी होऊन ती एकदम लाजली. "थांब, आल्योशा, चूप! आता इतकं मी बोलले आहे, तर मला सारं सत्य तुला सांगू दे— तो त्याला भेटायला दोनदा गेला होता, पहिल्या प्रथम तो इथं येऊन पोचल्याबरोबर गेला होता. तो मॉस्कोहून दौडत इथं आला, हे अर्थात मी आजारी पडण्यापूर्वी; अन दुसऱ्यांदा तो गेला तो एका आठवड्यापूर्वी. तुला हे काही झालं

तरी सांगू नको, कुणालाच खरं म्हणजे सांगू नको, असं त्यानं मीत्याला सांगितलं होतं, तो गुप्तपणे आलाय."

आल्योशा कशाची तरी कल्पना येऊन विचारमग्न झाला. या बातमीचा त्याच्या मनावर परिणाम झाला हे उघडच होते.

"मीत्याच्या प्रकरणासंबंधात इवान माझ्याशी बोलत नाही," तो सावकाश-पणे म्हणाला. "गेल्या दोन महिन्यांत तो माझ्याशी फारच कमी बोलला आहे; आणि जेव्हा जेव्हा मी त्याला भेटायला जातो तेव्हा तेव्हा तो माझ्या येण्यानं त्रस्त झालासा दिसतो. त्यामुळं गेल्या तीन आठवड्यांत मी त्याच्याकडं गेलोच नाही. हं!.... तो जर एका आठवड्यापूर्वी तिथं गेलेला असेल... या आठवड्यात मीत्यामध्ये बदल झालेला आहे खाचित."

"बदल झालेलाच आहे," ग्रूशिंका झटकन् रुकारात्मक बोलली. "त्याचं काही तरी रहस्य आहे. रहस्य आहे! मीत्यानंच खुद्द मला सांगितलं की काही रहस्य आहे, आणि ते असं रहस्य आहे की त्यामुळे मीत्याला स्वस्थपणाच नाही. त्यापूर्वी, तो आनंदी असायचा अन् खरोखर, तो या वेळी तसा आनंदीच आहे— पण जेव्हा तो असं असं आपलं डोकं हलवतो अन् खोलीत फेऱ्या मारायला लागतो अन् आपल्या उजव्या कपाळावरचे केस आपल्या उजव्या हातानं ओढीत राहतो, तेव्हा मी समजते की त्याच्या मनावर कसलंतरी त्रासदायक दडपण आहे... मला ते कळतं! तो पूर्वी आनंदी असे, अर्थात आताही तो आनंदी आहेच म्हणा."

"पण तू म्हणालीस की तो त्रस्त आहे म्हणून."

"होय, तो त्रस्त तर आहेच आणि तरी आनंदी आहे. एक मिनिटभर तो चिडखोर होतो आणि मग आनंदी होतो अन् पुनः चिडखोर होतो. आणि बरं का, आल्योशा, इतकी भयंकर गोष्ट त्याच्यावर टांगती असताना, तो असल्या क्षुद्र गोष्टींवर एखाद्या छकुल्या पोरासारखा हसतो—मला राहून राहून त्याचं नवल वाटतं."

"अन् खरोखरच त्यानं तुला इवानबद्दल मला सांगू नको म्हणून सांगितलं? 'त्याला सांगू नको' असं तो म्हणाला?"

"होय, तो मला म्हणाला, "त्याला सांगू नकोस! मीत्या जास्तीत जास्त भितो तो तुलाच. कारण ते रहस्य आहे. तो स्वतःच 'ते रहस्य आहे' असं म्हणाला. लाडक्या, आल्योशा, त्याच्याकडं जाऊन ते रहस्य काय आहे ते शोधून काढ अन् मला सांगायला ये," ग्रूशिंकाने अकस्मात उत्कंठेने त्याला विनविले. "माझ्यापुढं काय वाढून ठेवलंय हे मला समजलं म्हणजे माझं मन तरी स्वस्थ राहील. एवढ्या-करिताच मी तुला बोलावणं पाठवलं."

"ते जे काय आहे त्याच्याशी तुझा संबंध आहे असं तुला वाटतं? जर तसा असता तर त्यानं तुला ते 'रहस्य' आहे म्हणून सांगितलं नसतं."

"मला ठाऊक नाही. कदाचित् त्याला मला ते सांगायचं असेल पण तो

सांगू धजत नसेल. त्यानं मला आगाऊ सूचना देऊन ठेवली आहे. तो म्हणतो, 'एक रहस्य आहे,' पण ते काय आहे, ते तो मला सांगत नाही."

"तुला स्वतःला काय वाटतं?"

"मला काय वाटतं? हा माझा शेवट आहे, असं मला वाटतं. ते तिघे मिळून माझा शेवट करण्याचा कट रचताहेत; कारण कतिरीना त्यात आहे. हे सर्व कतिरीनाचं कारस्थान आहे, ती या साऱ्याचं मूळ आहे. 'ती अशी आहे न् तशी आहे' याचा अर्थ मी तशी नाही. तो हे मला आगाऊ सांगतो आहे– पूर्वसूचना देतो आहे. तो मला फेकून द्यायचा बेत करतो आहे, हेच ते रहस्य आहे. त्यांनी त्या तिघांनी, मीत्या, कतिरीना अन् इवान फ्योदरोविच यांनी मिळून हा बेत केला आहे. आल्योशा, बरेच दिवसांपासून मी तुला विचारीन म्हणते. एका आठवड्यापूर्वी एकाएकी त्यानं मला सांगितलं की इवानचे कतिरीनावर प्रेम आहे; कारण तो वरचेवर तिला भेटायला जातो. त्यानं मला खरं सांगितलं की खोटं? अगदी स्वतःच्या मनोदेवतेला स्मरून सांग, मग ते कितीही वाईट असो."

"मी तुला खोटं सांगणार नाही. इवानचं कतिरीना इवानोवनावर प्रेम नाही असं मला वाटतं."

"हां, मलाही असंच वाटलं! तो माझ्याशी खोटं बोलला, निर्लज्ज फसव्या, नाही तर काय अन् आताच तो माझा मत्सर करीत होता म्हणजे मागाहून सारा दोष माझ्यावर ढकलता यावा. तो मूर्ख आहे, आपण काय करतो ते त्याला दडविता येत नाही; तो इतका मोकळ्या मनाचा आहे, माहीत आहे तुला पण मी त्याला दाखवीन बरोबर दाखवीन 'मी तो खून केला असं तुला वाटतं?' तो म्हणाला. हे तो मला म्हणाला हं, मला. असं म्हणून त्यानं मला ठपका दिला! देवा, क्षमा कर त्याला. बघच तू, खटला चालेल तेव्हा मी कतिरीनाच्या नाकी दम आणीन! त्या वेळी मी एकच शब्द बोलेन.... त्यावेळी सारं काही मी सांगून टाकीन!"

अन् पुन्हा ती ओक्साबोक्सी रडू लागली.

"एवढं मी तुला खात्रीपूर्वक सांगू शकेन, ग्रूशिंका," आल्योशा उठत म्हणाला, "पहिली गोष्ट म्हणजे त्याचं तुझ्यावर प्रेम आहे, जगात कोणाहीपेक्षा त्याचं तुझ्यावर अन् तुझ्यावरच सर्वांत अधिक प्रेम आहे. माझ्यावर विश्वास ठेव. मला ते माहीत आहे– अगदी पक्कं माहीत आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, त्याचं जे काय रहस्य असेल ते त्याच्याकडून काढून घेण्याची माझी इच्छा नाही. पण जर तो ते आपण होऊनच आज मला सांगेल, तर मी त्याला सरळ सांगीन की मी ते तुला सांगण्याचं कबूल केलंय. मग मी आज तुझ्याकडं येईन अन् तुला सांगीन. एवढंच... की, मला वाटतं... कतिरीना इवानोवनाचा त्याच्याशी काही संबंध

नाहीं, अन् ते रहस्य दुसऱ्यांच कशाबद्दलचं तरी आहे. हे नक्की. ते कतिरीना विषयी असण्याचा संभव मला तरी वाटत नाही. तूर्त नमस्ते."

आल्योशाने तिच्याशी हस्तांदोलन केले. ग्रूशिंका अजूनही रडत होती. आपल्या सांत्वनपर शब्दांवर तिचा मुळीच विश्वास बसला नाही हे त्याने पाहिले. पण आपले दुःख प्रगट केल्यामुळे, ते बोलून टाकल्यामुळे तिला बरे वाटले. तिला मनाच्या तशा अवस्थेत सोडून जाताना त्याला वाईट वाटले, पण त्याला घाई होती. त्याला अजून पुष्कळ गोष्टी करायच्या होत्या.

२

दुखावलेला पाय

त्यातली पहिली गोष्ट मादाम होहलाहोवाच्या घरी करायची होती, आणि ती शक्य तितक्या जलदीने उरकावी अन् मीत्त्याकडे जायला फार उशीर होऊ नये म्हणून तो घाईने तिकडे निघाला. मादाम होहलाहोवा गेले तीन आठवडे काहीशी आजारी होती; तिचा पाय कशाने तरी सुजला होता, आणि ती जरी अंथरुणावर पडून नव्हती, तरी ती दिवसभर आपल्या आतल्या खोलीत पलंगावर तक्क्याला टेकून पाय सोडून एक भपकेबाज पण सभ्यतेला साजेसा झगा घालून पडलेली असे. आल्योशाच्या एकदा असं लक्षात आलं होतं की, आजारी असूनसुद्धा, मादाम होहलाहोवा ही जरा पोशाखी बनत चालली होती- माथ्याच्यावर केसांचा अंबाडा, रिबिनी, ढिले गाऊन असे प्रकार आता दिसू लागले होते, आणि त्याची त्याला सहज गंमत वाटली होती; आणि त्याचं कारण काय असावं याची काहीशी कल्पना त्याला आली होती, अर्थात असल्या कल्पना थिल्लर म्हणून त्यानं त्या आपल्या मनातून काढून टाकल्या होत्या. गेले-दोन महिने तरुण अधिकारी पेऱ्होतिन त्या घरी नियमितपणे येऊ लागला होता.

आल्योशा चार दिवस भेटायला गेला नव्हता अन् त्याला लिझाला भेटायची घाई होती, कारण तिच्याशीच त्याला बोलायचे होते. लिझाने आदल्या दिवशी एका नोकरबाईला त्याच्याकडे पाठविले होते अन खास विनंती केली होती की, "काही अतिशय महत्त्वाचं काम आहे, येऊन जा." ही अशी विनंती होती की त्यासंबंधी काही कारणामुळं आल्योशाला विशेष अगत्य वाटत होते. पण नोकरबाई त्याचे नाव घेऊन आत लिझाकडे गेली असता, मादाम होहलाहोवाने तो आला आहे हे कुणाकडून तरी ऐकलं, अन 'फक्त एक मिनिट' आपल्याकडे येऊन जाण्याबद्दल आर्जवाची विनंती करणारा निरोप त्याला पाठविला. आल्योशाने मनात विचार केला की आईच्या विनंतीला मान दिलेला बरा, नाहीतर लिझाच्या खोलीत आपण आहोत तोवर क्षणाक्षणाला तिचे निरोप येत राहतील. मादाम होहलाहोवाही पलंगावर पडली

होती. तिने विशेष झकपक पोषाख केलेला होता अन ती अतिशय घाबरलेल्या प्रक्षुब्ध अशा अवस्थेत होती. तिने अत्यानंदाच्या उद्गारांनी आल्योशाचे स्वागत केले.

"तुला भेटून युगं, युगं लोटली बाबा ! एक सबंध आठवडा गेला– म्हणजे बघ बरं ! हो, पण तू चारच दिवसांपूर्वीच, बुधवारीच, इथं येऊन गेलास. तू लिझाला भेटायला आलायस. मला ऐकू न येईल अशा बेतानं चोरपावलांनी तू हळूच तिच्या खोलीत सटकणार होतास मला ठाऊक आहे. माझ्या लाडक्या, अती लाडक्या अलेक्सी फ्योदरोविच, तिच्याबद्दल मला किती काळजी वाटत आहे हे तुला कसं कळणार ! पण त्याबद्दल मागाहून बोलू, ती अर्थात अतिशयच महत्त्वाची गोष्ट आहे, पण ती मागाहून. लाडक्या अलेक्सी फ्योदरोविच, लिझाच्या बाबतीत माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. झसीमफ वारले– ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो ! (तिने स्वतःवर क्रूसाचे चिन्ह केले)– मी तुला मठवासीच मानते, अर्थात् या तुझ्या नव्या सुटात तू सुरेख दिसतोस हं. इतका छान शिंपी तुला या भागात कुठं भेटला ? अं हं, मुख्य गोष्ट बोलायची ती ही नाही– त्या संबंधानं मागाहून. तुला मी केव्हा केव्हा आल्योशा म्हणून म्हणते त्याबद्दल मला क्षमा कर हं; माझ्यासारख्या म्हातारीनं एवढी मुभा घेतली तर चालण्यासारखी आहे, ती लाजत मुरकत हसली; " पण ते सुद्धा मागहून. महत्त्वाची गोष्ट ही की महत्त्वाचं काय ते मी विसरता कामा नये. कृपा करून तूच त्याची मला आठवण करून दे. मी विषय सोडून बोलू लागले की मला म्हण, " महत्त्वाची गोष्ट ? " छीः ! आता मला कसं कळणार मला महत्त्वाचं काय बोलायचं होतं ते ! आपलं पोरकट वचन– तुझ्याशी लग्न करण्याबद्दलचं आपलं वचन–पोरकट वचन हं, अलेक्सी फ्योदरोविच, लिझानं मागं घेतलं. लक्षात अर्थात् आलंच की एका आजारी पोरीची ती एक खेळकर कल्पनाच होती, ती इतके दिवस त्या खुर्चीलाच जखडून राहिली होती–बरं झालं, ईश्वराची कृपा, तिला आता चालायला यायला लागलंय ! कात्यानं तुझ्या दुर्दैवी भावाकरिता मॉस्कोहून तो नवा डॉक्टर आणवलाय ना, तुझ्या भावाचं उद्याच....पण उद्याचं कशाला बोला ? उद्याच्या नुसत्या विचारानंच माझ्या जिवाची घालमेल होते. काय होणार या विचारानं...तो डॉक्टर काल आमच्याकडं आला होता अन त्यानं लिझाला तपासलं...त्याबद्दल मी त्याला पन्नास रुबल दिले. पण मुद्दा तो नाही, मुद्दा दुसराच आहे. बघितलंस, मी सगळ्या गोष्टींचा कसा गडबड गोंधळ करते ते ! अशी मला घाई झाली आहे. मला घाई का व्हावी काही कळत नाही. काही समजायची माझी ताकदच हळूहळू कमी व्हायला लागली आहे हे भयंकर आहे. सारं काही एक प्रकारच्या गुंतागुंतीत सरमिसळ होऊन जातं. मला वाटतं तुला इतका कंटाळा आलाय की तू ताडकन उठून चालायला लागणार अन एवढंच तुझ्या भेटीतून माझ्या हाती पडणार. छेः बाई ! आपण इथं बसलोय अन कॉफी नाही ? यूलिया, ए ग्लाफिरा, कॉफी आणा ! "

आल्योशाने घाईघाईने तिचे आभार मानले, अन् आपण नुकतीच कॉफी घेतल्याचे तिला सांगितले.

"कुठं ?"

"आग्राफेना अलेक्झांद्रोवनाच्या इथं."

"त्या...त्या बाईकडं ? हं, याच बाईनं साऱ्यांचा सत्यानाश केलाय. अर्थात् मला त्यासंबंधानं माहिती काहीच नाही. ती आता मोठी संत झाली आहे म्हणे, करून करून भागली न् देवपूजेला लागली. तशी ती अगोदरच झाली असती तर बरं झालं असतं. आता काय त्याचा उपयोग ? पुरे, पुरे अलेक्सी फयोदरोविच, मला इतकं तुला सांगायचं आहे की मी काहीच सांगणार नाही की काय अशी भीती मला वाटते. हा भयंकर खटला... मी निश्चितच खटला पहायला जाणार, तशी व्यवस्था मी करून ठेवते आहे. माझ्या खुर्चीत बसूनच मी तिथं जाईन; शिवाय, मला बसता यायला लागलंय. माझ्या बरोबर माणसं असतील. अन् मी एक साक्षीदार आहे, हे माहीत आहे तुला. मी कशी बोलणार, कशी बोलणार ? मी काय सांगेन काही कळत नाही. तिथं शपथ घ्यावी लागते, नाही ?"

"होय, पण मला नाही वाटतं तुम्ही जाऊ शकाल."

"मला बसता येतंय, तू माझी साखळी तोडलीस ! हां हा, खटला, हे भयंकर कृत्य, अन् मग त्या साऱ्यांची सैबेरियाला रवानगी, काही जणांची लग्नं होणार अन् हे सगळं इतक्या जलदीनं, इतक्या जलदीनं, घडतंय, प्रत्येक गोष्ट बदलते आहे, अन् शेवटी– काऽही नाही. सगळे म्हातारे होतात, मरण पावतात अन् पुढची वाट पाहतात. ठीक आहे, तसंच होऊ दे ! मी थकले बाबा. ही कात्या, (इतकी मन-मोहक मुलगी) हिनं माझ्या सगळ्या आशा मारून टाकल्या. आता ही तुझ्या भावांपैकी एकाबरोबर सैबेरियाला जाणार आहे, अन् तुझा दुसरा भाऊ, तो तिच्या मागोमाग जाणार आहे, अन् अगदी नजीकच्या गावात राहणार आहे, आणि ती सगळी एकमेकांना छळीत राहाणार. माझं डोकं तर फिरायची पाळी आली आहे. सगळ्यांत वाईट गोष्ट म्हणजे याचा चाललेला गाजावाजा. हे प्रकरण मॉस्कोत अन् पीटर्सबर्गमध्ये सगळ्या वर्तमानपत्रांत लाख वेळा जाहीर झालं आहे. हं ! आणि हो, तुला खरं तरी वाटेल, त्यात एका परिच्छेदात म्हटलंय की मी तुझ्या भावाच्या....ची – तो भयानक शब्दसुद्धा मला उच्चारवत नाही. मी प्रिय मैत्रीण होते. कल्पना कर, नुसती कल्पना कर !"

"अशक्य ! कुठं आलाय तो मजकूर ? काय म्हटलंय त्यात ?"

"तुला मी दाखवतेच. मी ते वर्तमानपत्र मिळवलं अन् काल वाचलं. हे पहा, पीटर्सबर्गचं वर्तमानपत्र 'गावगप्पा' हे पत्र या वर्षापासूनच निघायला लागलंय. मला गावगप्पांचा विलक्षण षोक आहे. म्हणून मी ते घेते, अन् आता

मला त्याचा चांगला मोबदला मिळाला, असा होतो गावगप्पांचा परिणाम ! हा पहा, हा तो मजकूर वाच."

आणि तिने आल्योशाला आपल्या उशाखालून एक वर्तमानपत्राचे पान काढून दिले.

ती गडबडली होती असं नक्की सांगता नाही येणार, ती दडपून गेल्यासारखी झाली होती, अन् कदाचित तिच्या डोक्यात सगळ्या गोष्टींचा खरोखरच गोंधळ झाला असावा. तो मजकूर अतिशय नमुनेदार होता, अन् त्यामुळे तिला फार मोठा धक्का बसला असला पाहिजे. पण सुदैवाने म्हणा, तिचं मन त्या वेळी कोणत्याच एका विषयावर स्थिर राहत नव्हते, अन् त्यामुळे एका मिनिटात ते दुसरीकडे धावून त्या वर्तमानपत्राबद्दल विसरून जाणे शक्य होते.

या भयंकर खटल्याची हकीकत साऱ्या रशियाभर पसरली आहे, हे आल्योशाला चांगलेच माहीत होते. आणि बापरे ! आपल्या भावाबद्दल, कारमाझफ-बद्दल आणि स्वतःबद्दल गेल्या दोन महिन्यांत इतर विश्वासार्ह गोष्टींबरोबर त्याने किती भरमसाट अफवा वाचल्या होत्या. एका पत्राने तर असेही म्हटले होते की, आपल्या भावाच्या गुन्ह्याचा धसका घेऊन तो एका मठात जाऊन मठवासी झाला आहे. दुसऱ्या पत्राने ते खोटे ठरवून म्हटले होते की तो आणि त्याचा गुरू झसीमफ यांनी मठाची तिजोरी फोडून "मठातून पोबारा केला आहे." 'गावगप्पा' पत्रातला तो मजकूर "स्को तो प्रिगोन्येवस्क (हे आमच्या शहराचे नाव बरे. मी ते आतापर्यंत लपवून ठेवले होते.) येथील कारमाझफ प्रकरण" या मथळ्याखाली होता. तो त्रोटक होता, अन मादाम होहलाकोवाचा प्रत्यक्ष उल्लेख त्यात नव्हता. खरे म्हणजे नावे कुणाचीच दिलेली नव्हती. त्यात फक्त इतकेच म्हटले होते की ज्या गुन्हेगाराच्या आगामी खटल्याबद्दल इतकी खळबळ झाली आहे तो एक सैन्यातला निवृत्त अधिकारी, आळशी, बढाईखोर आणि प्रतिगामी गुंड आहे. नेहमीच इष्कबाजीच्या लफड्यात गुंतलेला असे, आणि काही वरच्या वर्गातल्या स्त्रियांत तो विशेष प्रिय होता, त्या स्त्रिया 'एकांतात झुरायच्या.' अशी एक महिला, जी झुरणारी विधवा आहे, अन् जिला एक चांगली मोठी मुलगी असूनसुद्धा जी तरुण दिसण्याचा प्रयत्न करते, ती त्याच्यावर इतकी भाळून गेली होती की हा गुन्हा घडण्यापूर्वी फक्त दोन तास तिनं त्याला तीन हजार रुबल देऊ केले होते आणि ते अशा अटीवर की त्याने तिला बरोबर घेऊन सोन्याच्या खाणीकडे पळून गेले पाहिजे. पण या गुन्हेगाराने, शिक्षा चुकविता येईल अशा समजुतीने आपल्याकरिता झुरणाऱ्या या महिलेची मध्यमवयाची मोहकता स्वीकारून सैबेरियाची वाट धरण्यापेक्षा आपल्या बापाचा खून करून ते तीन हजार रुबल मिळवलेले बरे असा विचार केला. या गमतीदार परिच्छेदाच्या शेवटी अर्थात् पितृ-घाताच्या दुष्टपणाबद्दल आणि नुकत्याच नष्ट करण्यात आलेल्या गुलाम-कुळांच्या

संस्थेबद्दल नक्राश्रू ढाळले होते. तो परिच्छेद कुतूहलाने वाचल्यावर आल्योशाने त्या पत्राची घडी करून ते मादाम होहलाहोवाच्या हाती दिले.

"अं, ती मीच असली पाहिजे," ती पुन्हा घाईघाईने बोलू लागली. "तो माझाच उल्लेख आहे हे उघडच आहे. जेमतेम एका तासापूर्वी मी त्याला सोन्याच्या खाणीबद्दल सुचविले अन् यात हे म्हणतात, 'मध्यमवयाची मोहकता' जणू माझ्या मनात तोच हेतू होता! त्यानं ते खुनशीपणाने लिहिलंय! देवा परमेश्वरा, 'मध्यमवयाची मोहकता' लिहिल्याबद्दल त्याला मी जशी त्याला क्षमा करते तशी तूही कर! क्षमा कर, बरं का, हा....हा कोण आहे माहीत आहे तुला? हा तुझा दोस्त राकीतीन.'

"असेल कदाचित्" आल्योशा म्हणाला, "पण मी त्यासंबंधानं काही ऐकलेलं नाही."

"त्याचंच हे काम, अगदी त्याचंच! कदाचित बिदाचित् नाही. मी त्याला घराबाहेर हाकलून दिला होता. माहीत आहे ना... तुला माहीत आहे ते सारं प्रकरण, होय ना?"

"तुम्ही त्याला यापुढं आपल्याला भेटू नकोस असे म्हणून सांगितलंत, हे मला माहीत आहे, पण त्याचं कारण मात्र मी ऐकलं नाही... निदान तुमच्याकडून."

"हां, तर मग तू ते त्याच्याकडून ऐकलंयस! मला वाटतं, तो मला शिव्या देतो, भयंकर शिव्या देतो, होय ना?"

"होय, देतो खरा; पण तशा तर तो प्रत्येकालाच देतो. पण तुम्ही त्याला का हाकलून दिलंत ते मी त्याच्याकडून ऐकलं नाही. हल्ली, खरं म्हणजे, आमची क्वचितच गाठ पडते. आम्ही मित्र नाही."

"ठीक, तर, मी तुला त्यासंबंधानं सारं सांगते. त्यावाचून इलाजच नाही, कारण त्यात एक मुद्दा असा आहे की त्याबद्दल माझ्यावर दोष येतो आहे. फक्त अगदी एवढासा मुद्दा, इतका लहान की तो कदाचित खिसगणतीतही घेऊ नये. बरं का, माझ्या प्रिय मुला -" मादाम होहलाहोवा एकदम लबाड दिसू लागली अन् मोहक पण गूढ असे हसू तिच्या ओठांवर खेळू लागले—बरं का, पण मला संशय येतो पण मला माफ कर हं आल्योशा...मी तुला आईसारखी...छेः छेः अगदी उलट. मी आत्ता तुझ्याशी बोलत आहे ती जणू तू माझ्या वडिलांसारखा आहेस अशा रीतीनं—'आई' हा शब्द इथे लागूच पडत नाही हं, हे जणू झसीमफांच्या पुढं पाप निवेदन करण्यासारखं आहे, तसंच म्हणेनास. मी तुला आत्ताच मठवासी म्हटलं. हां, तो बिचारा तरुण, तुझा मित्र राकीतीन (देव दया करो! मी त्याच्यावर राग करू शकत नाही. मला राग येतो, पण फार नाही), तो थिल्लर तरुण, त्यानं माझ्यावर प्रेम करायचं डोक्यात घेतलेलं दिसतं, खरं तरी वाटेल तुला? हे माझ्या लक्षात उशिरा आले. पहिल्यांदा

एक महिन्यापूर्वी, तो मला वरचेवर भेटायला येऊ लागला, जवळ जवळ रोज. अर्थात् आमची पूर्वी ओळख होतीच. मला त्याबद्दल काही माहिती नव्हती... अन् एकदम माझ्या डोक्यात प्रकाश पडला, आणि ज्या ज्या गोष्टी माझ्या नजरेस पडायला लागल्या त्यांनी मी चकित होऊ लागले. बरं का, दोन महिन्यांपूर्वी ते मर्यादशील, आकर्षक, सुरेख तरुण गृहस्थ, प्योत्र इल्यिच पेर्होतिन माझ्या घरी नियमितपणे येऊ लागले; ते इथं सरकारी नोकरीत आहेत. तू स्वतः त्यांना इथं कितीतरी वेळा भेटला आहेस. अन् ते एक सुरेख, कळकळीचे तरुण गृहस्थ आहेत, नाही का? ते दर तीन दिवसांतून एकदा येतात, रोज येत नाहीत (अर्थात् ते रोज आले तर मला आनंदच होईल), अन् नेहमी कसे छान छान पोशाख करून येतात. काही म्हण, आल्योशा, मला तुझ्यासारखे बुद्धिमान् मर्यादशील तरुण आवडतात. आणि या गृहस्थाचं मन म्हणजे एखाद्या राजकारणी मुत्सद्द्यासारखं आहे, अन् ते इतकं आकर्षक रीतीनं बोलतात, मी खरंच त्यांच्याकरिता बढती मिळविण्याचा प्रयत्न करणार आहे. ते पुढं राजकारणी पुरुष होणार. त्या भयंकर दिवशी रात्री ते आले अन् मला त्यांनी जवळ जवळ मरणातून वाचवलं म्हणेनास. अन् तुझा मित्र तो राकीतीन असले असले बूट घालून येतो अन् नेहमी आपले गालिचावर पाय पसरतो.... तो आपली भावना संकेतांनी दर्शवू लागला. अन् एके दिवशी, जाताना त्यानं आपला माझा हात भयंकर जोरानं दाबला. असा त्यानं हात दाबल्यावर लगेच माझा पाय सुजायला लागला. तो प्योत्र इल्यिचना इथं पूर्वी भेटला होता, अन् तुला खरं तरी वाटेल, तो नेहमी त्यांना टोमणे मारतो, त्यांच्यावर गुरगुरतो, का कुणास ठाऊक. ज्या रीतीने त्या दोघांचं वागणं चालू राहिलं, त्याकडं मी आपली पाहतच राहिले अन् मनातल्या मनात हसले. तेव्हा मी इथं अशी एकटी बसले होते– नाही आजारी पडले होते बरं! मी एकटी इथं पडले होते. अन् एकदम हा राकीतीन आत आला, अन् गंमत काय सांगू! त्यानं स्वतः माझ्या दुखावलेल्या पायावर रचलेले काही काव्यचरण– छोटीशी कविताच म्हणेनास– बरोबर आणली, म्हणजे त्यानं माझ्या पायाचं एका कवितेत वर्णन केलं. थांब हं थोडासा– काय बरं तिची सुरुवात?

'ए कॅप्टिव्हेटिंग लिट्ल् फूट' (एक मोहक चिमुकला पाय) अशी काहीशी त्याची सुरुवात होती. मला कवितेची म्हणून कधी आठवण राहत नाही. ती आहे माझ्याकडे. नंतर तुला दाखवीन. पण मोठी मोहक आहे हं, मोहक आहे; अन् ती नुसत्या पायावरच नाही, त्यात एक नैतिक बोधही आहे, एक सुरेख कल्पना आहे, मात्र ती मी विसरले; खरोखर ती अल्बम्‌मध्ये घालून ठेवण्यासारखी वस्तू आहे. तेव्हा अर्थात् मी त्याचे आभार मानले, अन् तो फुशारलाही. मी त्याचे आभार मानते एवढ्यात प्योत्र इल्यिच आत आले, अन् राकीतीनचा चेहेरा रात्रीच्या काळोखासारखा काळा ठिक्कर पडला. प्योत्र

इल्यिच मध्ये आले हे मी ओळखलं. कारण ती कविता दिल्यानंतर राकीतीनच्या मनात काही बोलायचं होतं. मला त्याची आगाऊच कल्पना आली होती; पण प्योत्र इल्यिच आले मी प्योत्र इल्यिचना त्या कवितेच्या ओळी दाखविल्या पण त्या कुणी रचल्या ते सांगितलं नाही. पण माझी खात्री आहे, त्यांनी अंदाज केला असावा अर्थात् ते आज तारखेपर्यंत ते कबूल करणार नाहीत, आणि म्हणतील आपल्याला नाही बुवा काही कल्पना. पण तसं ते हेतुपुरस्सर म्हणतात. प्योत्र इल्यिचनी एकदम हसायला सुरुवात केली, अन् त्यावर टीका करू लागले. 'भिकार काव्य' ते म्हणाले, 'कुठल्या तरी धर्मशास्त्राच्या विद्यार्थ्यानं लिहिलेलं असलं पाहिजे!', अन् इतक्या आवेशानं, इतक्या आवेशाने बोलले म्हणतोस! मग क य, तुझा तो मित्र हसण्या-ऐवजी संतापानं भडकला, 'बाई ग!' मी मनात म्हटलं, 'आता हे एकमेकांवर तुटून पडणार.' 'ते काव्य मी केलेलं आहे' तो म्हणाला, 'मी ते एक गंमत म्हणून लिहिलं, कारण कविता लिहिणं हे मी कमी प्रतीचं मानतो... पण ते चांगलं काव्य आहे. बायकांच्या पायांवर लिहिल्याबद्दल लोक तुमच्या पुश्किनचं स्मारक करू इच्छितात अन् मी तर एका नैतिक हेतूनं लिहिलं, अन् तुम्ही भूदास पद्धतीचे पुरस्कर्ते आहात, तुम्हाला मानवतेच्या काय कल्पना असणार! तुमच्यात आधुनिक प्रबुद्ध भावना नाहीत, प्रगतीचा तुमच्यावर काही परिणाम झालेला नाही, तुम्ही आहात एक निव्वळ सरकारी नोकर, अन् तुम्ही लाच घेता, असं तो म्हणाला. मग मी ओरडू लागले अन् त्यांची विनवणी करू लागले. अन् प्योत्र इल्यिच काही लेचापेचा माणूस नाही. त्यांनी तत्काळ अत्यंत सभ्यतेचा सूर धरला, त्याच्याकडं औपरोधिकपणे बघितलं, ऐकून घेतलं अन् त्याची माफी मागितली. 'मला कल्पना नव्हती' ते म्हणाले. 'मला जर माहीत असतं तर मी तसं बोललो नसतो. मी स्तुती केली असती. कवी सगळे असेच चिडखोर असतात,' ते म्हणाले. थोडक्यात म्हणजे, अत्यंत सभ्यतेच्या सुराच्या बुरख्याखाली ते त्याला हसले. त्यांनी मला मागाहून सांगितलं की हे सारं औपरोधिक होतं. ते मनापासून बोलले असं मला वाटलं. मी अशी, आता तुझ्यापुढं पडली आहे तशी, पडलेली असताना माझ्या मनात विचार आला, 'माझ्या घरात मला भेटायला आलेल्या माणसावर इतक्या उद्धटपणे ओरडल्याबद्दल राकीतीनला हाकलून देणं हे योग्य ठरेल की अयोग्य ठरेल?' अन् खरंच सांगते, मी अशी इथं पडले होते. मी डोळे मिटले अन् विचार करू लागले की ते योग्य होईल की नाही. मी डोकं शिणवलं, अन् माझ्या हृदयाचे ठोके पडू लागले. अन् आपण ओरडून सांगावं की नाही याचा माझ्या मनाचा निश्चय होईना. एक आवाज मला सांगत होतासं वाटलं की 'बोल' अन् दुसरा म्हणत होता की 'नको, बोलू नको.' अन् दुसऱ्या आवाजानं तसं मला सांगितलं न सांगितलं तेवढ्यात मी ओरडले अन् मला घेरी आली. अर्थात्, मग धामधूम झाली. मी एकदम उठले अन् राकीतीनला म्हटलं, 'मला सांगायला अतिशय दुःख होतं, पण

पुन्हा माझ्या घरात पाऊल टाकू नका.' अशा रीतीनं मी त्याला हाकलून लावलं. हं: ! अलेक्सी फ्योदरोविच, मला माहीत आहे मी चूक केली. मी फक्त आव आणला होता. मी खरी म्हणजे त्याच्यावर मुळीच रागावले नव्हते; पण एकदम माझ्या मनात आलं की हा किती छान प्रसंग होईल. अन् त्यातूनच हे घडलं... अन् तरी खरं सांगते, फक्त विलक्षण असं काही नव्हतं. कारण मी खरोखर मागाहून अश्रू ढाळले अन् काही दिवस मी रडत होते. आणि एकदम, एके दिवशी तिसऱ्या प्रहरी, मी त्या संबंधानं सर्व काही विसरून गेले. तेव्हा त्याला आता इथं येऊन पंधरा एक दिवस होऊन गेले. अन् पुन्हा तो येईल की नाही याचा मी विचार करीत राहिले होते. कालसुद्धा माझ्या मनात तोच विचार चालला होता. अन् अचानक हे 'गावगप्पा' पत्र काल रात्री आलं. मी ते वाचलं अन् माझा श्वासच कोंडला. कुणी बरं लिहिलं असावं ते ? अर्थात त्यानंच. तो घरी गेला, बसला, तिथल्या तिथं त्यानं ते लिहून काढलं. पाठवलं, अन् त्यांनी ते यात छापलं. ही पंधरा दिवसांपूर्वीची गोष्ट आहे, समजले. पण आल्योशा, भयंकरच बाई. अरे, मी बोलत राहिले आहे अन् मला जे सांगायचे आहे ते मी सांगतच नाही. हं: ! शब्द कसे आपोआप बाहेर पडतात."

"मला माझ्या भावाला भेटायचं आहे. त्याकरिता मला वेळेत हजर राहणं फार महत्त्वाचं आहे." आल्योशा अडखळत म्हणाला.

"हो हो, खरंच ! भेटून आल्यावर सारं मला सांगायला ये. ऐक, बुद्धिभ्रंश म्हणजे काय रे ?"

"कसला बुद्धिभ्रंश ?" आल्योशाने चकित होऊन विचारले.

"कायदेशीर अर्थानं, रे. बुद्धिभ्रंश म्हटलं की सर्व काही क्षम्य होतं. तुम्ही काहीतरी केलं असलं तरी त्यातून एकदम तुमची सुटका होते."

"म्हणजे तुम्हाला काय म्हणायचंय ?"

"सांगते. ही कात्या आहे ना.... अहा ! ती भारी भारी मोहक आहे, मात्र तिचं मन कुणावर बसलंय ते मला कधीच कळलं नाही. ती काही दिवसांपूर्वी माझ्याकडं आली होती पण मला तिच्याकडून काहीच काढता आलं नाही कारण ती माझ्याशी आता वरवरच बोलते. ती नेहमी माझ्या प्रकृतीबद्दल बोलते, दुसरा विषयच काढत नाही, अन् अशा काही स्वरात बोलते म्हणतोस. मी आपली माझ्या मनाशी म्हटलं. "बरं, तसंच होऊ दे. मला नाही पर्वा '....हो, मी बुद्धिभ्रंशाबद्दल बोलत होते, नाही का ! हा डॉक्टर आता आला आहे. डॉक्टर आला आहे तुला माहीत आहे ना ? खात्रीनंच तुला माहीत असलं पाहिजे– कुणी वेडा आहे की काय ते शोधतो तो. तू त्याच्याबद्दल पत्र लिहिलं होतंस. नाही, नाही, तू नव्हे, कात्यानं. हे सर्व कात्याचं काम तेव्हा, काय म्हणत होते मी, माणूस पूर्ण अक्कलहुशारीनं असताना एकदम त्याला बुद्धिभ्रंश होतो. तो शुद्धीवर असेल आणि आपण

काय करतो ते त्याला कळत असेल तरी बुद्धिभ्रंशाच्या अवस्थेत असू शकेल. आणि दमीत्रि फ्योदरोविचला बुद्धिभ्रंश झाला होता यात शंका नाही. न्यायालयांची जशी सुधारणा झाली तशी बुद्धिभ्रंशाची दखल घेण्यात येऊ लागली. हा सारा सुधारलेल्या न्यायालयांचा सुपरिणाम आहे. हा डॉक्टर माझ्याकडं आला अन् मला त्या संध्याकाळबद्दल, सोन्याच्या खाणीबद्दल प्रश्न विचारू लागला त्यानं मला विचारलं, 'तो त्यावेळी कसा दिसत होता?' तो बुद्धिभ्रंशाच्या अवस्थेत असला पाहिजे. 'पैसा, पैसा, तीन हजार! मला तीन हजार द्या!' असं तो ओरडत आला होता अन् मग तो इथून गेला अन् लगेच त्यानं तो खून केला. 'मला त्याचा खून करायचा नाही.' तो म्हणाला, अन् लगेच तो गेला अन त्यानं त्याचा खून केला. म्हणूनच ते त्याला सोडून देतील, कारण तो त्या कल्पनेविरुद्ध झगडला अन तरी त्यानं त्याला मारलं."

"पण त्यानं त्याचा खून केलाच नाही." आल्योशाने तीक्ष्णपणे मध्येच तिला थांबवून म्हटले. चिंतेमुळे अन् घाईमुळे त्याला त्या बोलण्याचा अधिकाधिकच वीट आला.

"हो, हो, त्या म्हाताऱ्या ग्रिगरीनं त्याचा खून केला, मला माहीत आहे."

"ग्रिगरी?" आल्योशा मोठ्याने म्हणाला.

"हो, हो, ग्रिगरीनंच. दमीत्रि फ्योदरोविचनं त्याच्यावर घाला हाणला तेव्हा तो खाली पडून राहिला, अन् मग उठला, त्यानं तो दरवाजा उघडा असलेला पाहिला, तो आत गेला अन फ्योदरपावलोविचचा त्यानं खून केला."

"पण का म्हणून, का म्हणून?"

"बुद्धिभ्रंश झालेला होता म्हणून. दमीत्रि फ्योदरोविचने त्याच्या डोक्यावर टोला हाणला त्यातून जेव्हा तो उठला, तेव्हा त्याला भ्रम झालेला होता; तो गेला अन् त्यानं खून केला. आपण खून केला नाही असं तो म्हणतो तर त्याला ते आठवत नसावं असा संभव आहे. मात्र, बरं का, जर दमीत्रि फ्योदरोविचनं त्याचा खून केला असला तर ते बरं होईल, पुष्कळच बरं होईल. आणि जरी मी आता ग्रिगरीचं नाव घेत असले तरी झालं असलं पाहिजे तसंच. हे दमीत्रि फ्योदरोविचचंच काम, अन् तेच बरोबर आहे. अगदी ठीक! अं हं, मुलानं आपल्या बापाला मारावं हे योग्य असे नाही मला म्हणायचं, त्याचं मी समर्थन नाही करीत. मुलांनी आपल्या आईबापांचा मान ठेवलाच पाहिजे, तरीपण त्यानंच जर ते केलं असेल तर ते अधिक बरं, मग रडायला ओरडायला कारण राहणार नाही कारण भानावर नसताना त्यानं खून केला असला पाहिजे किंवा तो भानावर असेल पण आपण काय करतो ते. त्याला कळत नसलं पाहिजे. त्यांनी त्याला सोडावं. ते माणुसकीला धरून होईल आणि त्यामुळं सुधारलेली न्यायालयं हे कसं वरदान झालं आहे ते दिसून येईल. मला त्यातलं काही माहीत नाही, पण असं म्हणतात की बऱ्याच काळापासून न्यायालयं

अशीच आहेत. मी काल जेव्हा हे ऐकलं, तेव्हा मला त्याचं इतकं आश्चर्य वाटलं की लगेच तुला बोलावणं पाठवावंसं मला वाटलं आणि जर त्याला मुक्त करण्यात आलं, तर त्याला न्यायालयातनं सरळ माझ्याकडं जेवायला घेऊन या, मी मित्रांना बोलावून एक मेजवानीचा समारंभ करीन, अन् आपण सुधारलेल्या न्यायालयांच्या नावानं मद्य पिऊ. मला नाही वाटत तो काही तरी भयंकर करील असं; शिवाय, मी बऱ्याच मित्रांना बोलावीन, म्हणजे जरी त्यानं काही केलं तरी त्याला केव्हाही बाहेर घेऊन जाता येईल. आणि मग त्याला दुसऱ्या शहरात 'जस्टिस ऑफ द पीस' किंवा असंच काहीतरी देण्यात येईल, कारण ज्यांनी दुःख भोगलेलं असतं तेच उत्तम न्यायाधीश होतात. अन्, शिवाय, हल्ली बुद्धिभ्रंश कुणाला होत नाही ?– तू, मी, सगळे आपण बुद्धिभ्रंशाच्या अवस्थेत आहोत, अन् अशी त्याची आणखी कितीतरी उदाहरणं आहेत; कोणी गाणं गात बसलेला असतो, एकदम कशानं तरी तो त्रस्त होतो, तो पिस्तुल घेतो अन् जो पहिला माणूस भेटेल त्यांच्यावर ते झाडतो, त्याबद्दल कोणी त्याला दोष देत नाही. मी अलीकडेच याबद्दल वाचलंय, अन् सगळ्या डॉक्टरांनी त्याला पुष्टी दिली आहे, डॉक्टर लोक नेहमी पुष्टी देतात, ते कशालाही पुष्टी देतात. अरे, काय सांगावं, माझी लिझासुद्धा बुद्धिभ्रंशाच्याच अवस्थेत आहे. तिनं काल पुन्हा, अन् परवासुद्धा मला रडवलं, अन् आज एकदम मी ओळखलं हे सारं बुद्धिभ्रंशामुळं होतंय. हंः, ही लिझा मला इतकं दुःख देते. मला वाटतं ती अगदी पागल आहे. तिनं तुला कशासाठी बोलावणं पाठवलं ? तिनं तुला बोलावणं पाठवलं की तू आपण होऊन आलास ? "

तिनं बोलावणं पाठवलं म्हणून आलो, अन् आता मी तिच्याकडे चाललो." आल्योशा दृढ निश्चयाने उठला.

"हो प्रिय अलेक्सी फ्योदरोविच, अतिशय महत्त्वाचं असं जे मी म्हणत होते ते हेच असावं कदाचित," मादाम होहलाहोवा एकदम डोळयांत अश्रू आणून म्हणाली. "ईश्वर साक्ष मी लिझाला मनापासून तुझ्यावर सोपविली आहे, अन् तिनं चोरून, आपल्या आईला न सांगता, तुला बोलावणं पाठवलं तर त्यात विशेष काही नाही. पण माफ कर हं, माझी मुलगी मी तुझा भाऊ इवान याच्याकडं मात्र अशी सहजासहजी सोपवणार नाही बरं. पण मी त्याला अजूनही अत्यंत स्त्रीदाक्षिण्य असलेला तरुण म्हणून मानते हं. पण मजा पाहा, तो लिझाला भेटायला आला होता अन् मला त्याबद्दल काहीसुद्धा कळलं नाही !"

"आं ? कसा ?" आल्योशाला अतिशय आश्चर्य वाटले. तो पुनः खाली बसला नाही, उभ्या उभ्याच ऐकू लागला.

"सांगते तुला, त्याकरिताच बहुतेक मी तुला बोलावलं असावं, कारण मी तुला कशाकरिता यायला सांगितलं ते आता मला आठवत नाही. हं, इवान मॉस्कोहून परत इकडे आला, त्यानंतर दोन वेळा मला भेटून गेला.

पहिल्या खेपेला तो मित्र म्हणून मला भेटायला आला अन् दुसऱ्या खेपेला कात्या इथं होती आणि ती इथं आहे हे त्याला कळलं म्हणून तो आला. अर्थात् मी त्यानं वरचेवर इथं यावं अशी अपेक्षा ठेवली नव्हती, कारण आहे या परिस्थितीत म्हणजे हे प्रकरण अन् तुझ्या वडिलांचं भीषण मरण या परिस्थितीत, त्याला किती काम असणार ? पण अचानकपणे मला कळलं की, तो पुन्हा इथं येऊ गेला—मला भेटायला नव्हे, लिझाला भेटायला. त्याला आता सहा दिवस झाले. तो आला, पाच मिनिटं थांबला अन् निघून गेला. अन् हे मला त्यानंतर तीन दिवसांनी कळलं; कळलं ते ग्लाफिराकडून, तेव्हा मला मोठा धक्काच बसला. मी लिझाला लगेच बोलावणं पाठविले. ती हसली. 'त्याला वाटलं तू झोपली असशील' ती म्हणाली, 'म्हणून तो माझ्याकडं तुझ्या प्रकृतीबद्दल विचारायला आला.' अर्थात् असंच ते घडलं. पण लिझा, लिझा, परमेश्वरा दया कर आमच्यावर, किती त्रास देते मला ती ! तुला खरं तरी वाटेल, चार दिवसांपूर्वी तू तिला भेटून गेलास ना त्यानंतर लगेच, एका रात्री तिला फिट आली. वाताच्या झटक्याच्या किंकाळ्या अन् किंचाळ्या ! मला का कधी वाताचा झटका येत नाही ? मग दुसऱ्या दिवशी दुसऱ्यांदा फिट अन् तसंच तिसऱ्या दिवशी आणि कालसुद्धा, आणि काल तो बुद्धिभ्रंश. ती एकदम किंचाळून म्हणाली, 'मला इवान फ्योदरोविचचा तिटकारा वाटतो. त्याला कधी तू पुन्हा घरी येण्याची परवानगी देऊ नकोस, मी निक्षून सांगतेय.' या तिच्या आश्चर्यकारक उद्‌गारांनी मी तर बाई गारच होऊन गेले. अन् म्हटलं 'अशा उत्तम तरुण मनुष्याला, इतका शिकलेलाही आहे तो, अन् इतका बिचारा दुर्दैवी, त्याला कोणत्या कारणांनी भेटू नको म्हणू ? दुर्दैवी नाही तर काय ? हे सारं झालेलं दुर्दैवच नव्हे काय ? ' ती या माझ्या शब्दांनी खो खो करून हसू लागली, अन् अगदी उद्धटपणे, बरं का. मला बरं वाटलं, म्हटलं मी तिची करमणूक केली अन् तिचे झटके आता निघून जातील, नाहीतरी इवान फ्योदरोविचला भेटायचं काहीही करून मला नाकारायचंच होतं, कारण मला न कळू देता त्याच्या अशा विचित्र भेटी व्हायला लागल्या आणि त्याला जाब विचारावा असं मला वाटलं. पण आज अगदी सकाळी लिझा जागी झाली आणि युलियावर भयंकर संतापली, अन् तुला खरं वाटणार नाही पण तिनं तिच्या मुस्कुटात मारली. हे भयंकर आहे, मी माझ्या नोकर माणसांशी नेहमी सभ्यतेने वागते. आणि एका तासानंतर ती युलियाचे पाय उराशी धरून त्यांचं चुंबन घेऊ लागली. तिनं मला निरोप पाठविला की मी तुझ्याकडं मुळीच येणार नाही, आणि कधीच येणार नाही अन् तुला पुनः भेटणार नाही, आणि मी जेव्हा कष्टानं पाय उचलीत खाली तिच्याकडं गेले, तेव्हा ती आली की धावत माझ्याकडं अन् माझं चुंबन घेऊन रडायला लागली, अन् जसं तिनं माझं चुंबन घेतलं तसं मला तिनं एक शब्दही न बोलता खोलीबाहेर ढकलून दिलं, त्यामुळं काय झालं ते ही मला कळले नाही. प्रिय अलेक्सी आता माझ्या सगळ्या

आशा तुझ्यावर आहेत, अन् अर्थातच माझं सारं आयुष्य तुझ्या हातात आहे. माझी तुला हात जोडून विनवणी आहे की लिझकडं जा अन् तिच्याकडून सगळं काढून घे, तूच ते करू शकशील, अन परत येऊन मला सांग– मला, तिच्या आईला हं, कारण हे असंच जर चालू राहिलं तर बघ माझं मरण आहे; अगदी माझं मरण आहे, नाही तर मी पळत जाईन. मला आता सहन करवत नाही. माझ्यात सहनशक्ती आहे, पण आता ती कदाचित् टिकून राहणार नाही. अन् मग... मग काहीतरी भयंकर घडून येईल. अग बाई ! हे प्योत्र इलियच आले ! " मादाम होहलाहोवा पेऱ्होतिननं खोलीत प्रवेश करताच आनंदानं उत्फुल्ल होऊन म्हणाली. " तुम्ही उशीर केलात, उशीर केलात ! या बसा, आम्हाला टांगत्या अवस्थेतून काढा. वकील काय म्हणतात ? अलेक्झी फ्योदरोविच, तू कुठं चाललास ? "

" लिझाकडं."

" अरे हो. खरंच. मी तुला काय सांगितलं विसरणार नाहीस ना ? नाही ना विसरणार ? हा माझ्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे ! "

माझ्याकडून शक्य होईल तितकं मी अर्थात विसरणार नाही...पण मला फारच उशीर झालाय, " आल्योशा झटपट पाय मागे घेत तोंडातल्या तोंडात पुटपुटला.

" अंहं इकडं येच; ' शक्य झालं तर ' म्हणू नकोस. आला नाहीस तर मी मरेन, " मादाम होहलाहोवाने त्याला हाक दिली पण आल्योशा अगोदरच निघून गेला होता.

२

छोटी राक्षशीण

लिझाकडे तो गेला तेव्हा चालता येत नव्हतं त्यावेळी तिला ज्या चाके असलेल्या खुर्चीतून फिरवून आणले जाई, त्या खुर्चीत ती अर्धवट रेलून पडलेली त्याला आढळली. त्याला भेटण्याकरिता तिने काही हालचाल केली नाही, पण तिने तिखट तीक्ष्ण डोळे त्याच्या चेहऱ्यावर रोखलेले होते. तिच्या डोळ्यांत ज्वराची छटा होती, तिचा चेहरा फिका अन् पिवळट पडला होता. तिच्यात तीन दिवसांत हा एवढा फरक पडलेला बघून आल्योशा चकित झाला. ती नक्कीच अधिक रोड झाली होती. तिने आपला हात त्याच्यापुढे केला नाही. तिच्या अंगातल्या कपड्यांवर तिची जी बारीक, लांबसडक बोटे पडली होती, त्यांना त्याने स्पर्श केला आणि मग तो एक शब्द ही न बोलता तिच्यापुढे तोंड करून बसला.

" तुला तुरुंगात जायची घाई आहे आणि आईनं तुला तासन् तास ठेवून

घेतलं हे मला माहीत आहे," लिझ तुटकपणानं म्हणाली. ती आत्ता तुला माझ्या-विषयी अन् युलियाविषयी सांगत होती."

" तुला कसं कळलं ? " आल्योशाने विचारले.

" मी ऐकत होते. माझ्याकडं डोळे करून काय बघतोस ? मला ऐकायचं आहे अन् मी ऐकणार, त्यात काही बिघडत नाही. मी माफी मागणार नाही."

" कशानं तरी तुझं मन अस्वस्थ झालेलं आहे ? "

" उलट आहे. मी फार खुषीत आहे. मी तुला नाकारलं अन् मी तुझी बायको होणार नाही हे किती छान झालं याचा मी आत्ताच तिसाऱ्यांदा विचार करीत होते. तू नवरा व्हायला लायक नाहीस. मी जर तुझ्याशी लग्न केलं अन् तुझ्यानंतर एखाद्या-वर प्रेम करून त्याच्याकडं द्यायला तुला जर मी चिठ्ठी दिली, तर ती तू खुशाल घेऊन जाशील अन् हमखास ती त्याला देऊन त्याचं उत्तर माझ्याकडे घेऊन येशील. चाळीस वर्षांचा जरी झालास, तरी माझ्याकरिता तू माझी प्रेमपत्रं घेऊन जात राहशील."

ती एकदम हसू लागली.

" तुझ्या स्वभावात सूडबुद्धी आहे अन् तरी तो किती मोकळा आहे," आल्योशा तिच्याकडे बघून हसून म्हणाला.

" हा मनाचा मोकळेपणा तुझ्यापुढं मला लाजल्यासारखं वाटत नाही, यामुळं आहे. आणखी म्हणजे, तुझ्यापुढं, फक्त तुझ्यापुढं, मला लाज बाळगायचीच नाही. आल्योशा, मला तुझ्याबद्दल आदर का बरं वाटत नाही ? मला तू भारी आवडतोस, पण मला तुझ्याबद्दल आदर वाटत नाही. जर मी तुझ्याबद्दल आदर बाळगला तर लाज न वाटता मी तुझ्याशी बोलणारच नाही, बोलेन का ?"

" नाही."

" पण तुझ्यापुढं मला लाजल्यासारखं वाटत नाही हे तुला खरं वाटतं का ?"

" नाही, मला तसं वाटत नाही."

लिझा पुन्हा संकोचून हसली; ती भराभर बोलू लागली.

" मी तुझ्या भावाला, दमीत्रि फ्योदरोविचला तुरुंगात काही मेवामिठाई पाठविली. आल्योशा, बरं का, तू फार सुरेख दिसतोस ! तुझ्यावर प्रेम न करण्याची तू मला इतक्या झटपट परवानगी दिल्याबद्दल मी तुझ्यावर भयंकर प्रेम करीन."

" मला तू आज का बोलावणं पाठवलंस, लिझ ? "

" माझ्या मनात जी एक तीव्र इच्छा आहे ती मला तुला सांगायची होती. मला कुणीतरी छळावं, माझ्याशी लग्न करावं अन् मग छळावं, मला फसवावं अन् निघून जावं हे मला आवडेल. मला सुखी नाही व्हायचं."

" तुझं अंदाधुंदीवर प्रेम आहे ? "

" होय, मला अंदाधुंदी हवी. घराला आग लावावी असं मला सारखं

वाटत असतं. मी रांगत रांगत जाईन अन् हळूच घराला आग लावीन, अशी कल्पना मी करीत राहते, मात्र ते चोरून हो. लोक आग विझवायचा प्रयत्न करतील, पण ती पेटतच राहील. अन् मला ते कळेल अन् मी काही बोलणार नाही. हं! काय वेडपटपणा! अन् किती कंटाळून गेले आहे मी!"

कंटाळ्याच्या आविर्भावाने तिनं आपला हात झटकला.

"त्याला कारण तुझं हे ऐष आरामाचं जीवन." आल्योशा मृदूपणे म्हणाला.

"मग गरीब असणं बरं का?"

"हो, ते अधिक बरं."

"हे तुला तुझ्या मठवासीयानं शिकवलंय, ते खरं नाही. मी श्रीमंत असावं, बाकीच्या सर्वांनी गरीब राहावं. मी मेवामिठाई खाईन, व सुंदी पिईन आणि कुणाला काहीसुद्धा देणार नाही. छट, बोलू नको, काही बोलू नको," आल्योशाने आपले तोंडसुद्धा उघडले नव्हते तरी तिने नको या अर्थानं आपला हात हलविला. "तू पूर्वी मला सगळं काही सांगितलं आहेस, ते मला अगदी पाठ झालंय. मला कंटाळा येतो त्याचा. मी जर सदोदित गरीब राहिले तर मी कुणाचा तरी खून करीन, आणि जरी मी श्रीमंत असले तरी कदाचित मी कुणाचा तरी खून करीन– काहीच करायचं नाही असं का? पण माहीत आहे तुला–मला कापणी करायला, राय धान्य कापायला आवडेल ते? मी तुझ्याशी लग्न करीन, अन् तू शेतकरी होशील, खराखुरा शेतकरी. आपण एक शिंगरू ठेवू, ठेवू ना? तू काल्गानफला ओळखतोस?"

"ओळखतो."

"तो नेहमी कल्पनाराज्यात हिंडत असतो. तो म्हणतो, खऱ्या जीवनात का राहायचं? स्वप्नं पाहणं चांगलं. माणसाला अत्यंत आनंदाची स्वप्नं पाहणं शक्य असतं, तर खरं जीवन हे कंटाळवाणं असतं. पण असं असलं तरी, तो लवकरच लग्न करणार आहे, अन् तो माझ्यावर प्रेम पण करू लागलाय. तुला भोवरे फिरवता येतात का?"

"हो."

"तर तो एखाद्या भोवऱ्यासारखा आहे; आपल्याला कुणी गुंडाळावं अन् भिर्रदिशी गरगर फिरत टाकावं आणि मग चाबकानं तडातड तडातड फटके मारावेत असं त्याला वाटतं. माझं त्याच्याशी लग्न झालं तर मी जन्मभर त्याला असा गरगर फिरत ठेवीन. माझ्या संगतीत राहण्यात तुला लाज तर वाटत नाही?"

"नाही."

"मी धार्मिक गोष्टीविषयी बोलत नाही म्हणून तू माझ्यावर भयंकर रागावलेला आहेस. मला नाही धार्मिक व्हायचं. मोठ्यात मोठं पाप केल्याबद्दल परलोकात काय शिक्षा होते? तुला ते सारं माहीत असेलच."

"ईश्वर तुला दूषण देईल." आल्योशा स्थिर नजरेने तिच्याकडे पाहत होता.

"हां, मला तेच नेमकं आवडेल. मी वर जाईन अन् ते मला दूषणं देतील अन् मी त्यांच्या तोंडावर त्यांना हसेन. मला घराला, आमच्या घराला, आग लावणं अतिशय आवडेल, आल्योशा; तुझा अजून माझ्यावर विश्वास बसत नाही?"

"का?" कशाला तरी आग लावावीशी वाटते. बारा वर्षे वयाची अशी अनेक मुले आहेत ज्यांना ती लावतातही. हा एक प्रकारचा रोग आहे.'

"हे खरं नाही, हे खरं नाही, अशी मुलं असतील, पण मला जे म्हणायचं आहे ते ते नाही."

"तू त्याला भलं समजतेस; ही एक स्थित्यंतराची अवस्था आहे, ती निघून जाणारी आहे, कदाचित हा तुझ्या आजाराचा परिणाम असावा."

"तरी पण तू माझा तिरस्कार करतोसच! मला भलं करायचंच नाही. बस्स. मला वाईटच करायची इच्छा आहे, अन् त्याचा आजाराशी काही संबंध नाही."

"वाईट का म्हणून करायचं?"

"सर्व काही नष्ट होऊन जावं म्हणून. आहा, जर प्रत्येक गोष्ट नष्ट झाली ना तर काय गंमत होईल! बरं का, आल्योशा, काही काही वेळा मला भयंकर असं खूप नुकसान करावं, वाईट असेल ते करावं असं वाटतं, अन् मी ते चोरून बरेच दिवस करीत राहावं अन् अचानक प्रत्येकाला ते समजून यावं. मग सर्वजण माझ्या-भोवती उभे राहातील अन् माझ्याकडं बोट दाखवतील अन् मी त्या सर्वांच्याकडं पाहीन. किती छान होईल ते. ते छान का होईल, आल्योशा?"

"मला काय माहीत? काही चांगलं नष्ट करावं, किंवा तू म्हणतेस तसं, कशाला तरी आग लावून द्यावी याची ही लालसा आहे. असं होतं कधी कधी."

"मी नुसतं म्हणत नाही, मी तसं करणारच आहे."

"माझा तुझ्यावर विश्वास आहे."

"अहाहा, माझा तुझ्यावर विश्वास आहे, असं म्हणालास याबद्दल मला तू किती आवडतोस. आणि तू एवढंसंसुद्धा खोटं बोलत नाहीस. पण कदाचित तुला वाटत असेल की हे सारं मी तुला त्रास द्यावा म्हणून मुद्दाम बोलते आहे?"

"नाही, मला तसं वाटत नाही....पण कदाचित त्यात तसं करण्याची थोडीशी इच्छा असेलही."

"आहे. थोडीशी. मी तुला कधीही खोटं सांगू शकणार नाही," तिनं आवेशपूर्ण स्वरात सांगितले, तिच्या डोळ्यांत एक विलक्षण तेज दिसत होते.

आल्योशाला ज्या गोष्टीचे सर्वांत अधिक आश्चर्य वाटले ती म्हणजे तिची कळकळ. यापूर्वीच्या दिवसांत, तिच्या अतिशय कळकळीच्या बोलण्यांत सुद्धा चेष्टा

अन् गंमत ह्यांची छटा नेहमी असे. पण यावेळी तिच्या चेहेऱ्यावर विनोदाचा किंवा थट्टेचा मागमूस सुद्धा नव्हता.

"केव्हा केव्हा असे क्षण येतात की जेव्हा लोकांना गुन्हा करणं आवडतं." आल्योशा विचारपूर्वक म्हणाला.

"होय, होय! माझ्या मनांतलंच तू बोललास, गुन्हा करणं लोकांना आवडतं, प्रत्येकाला गुन्हा करणं आवडतं, त्यांना ते नेहमी प्रिय असतं, काही क्षण नव्हे बरं का, जणू लोकांनी त्या बाबतीत खोटं बोलण्याचा विडाच उचललेला असतो. अन् नंतर ते सारखं खोटं बोलत असतात. सगळे म्हणतात की आम्हाला पाप आवडत नाही, पण मनातून त्यांना ते आवडतं."

"अजूनही तू घाणेरडी पुस्तकं वाचतेस?"

"होय, वाचते. आई ती वाचते अन् आपल्या उशीखाली लपवून ठेवते अन् मी ती चोरते!"

"आपला नाश करून घेण्याची तुला लाज नाही वाटत?"

"मला माझा नाशच करून घ्यायचा आहे. इथं एक मुलगा आहे. तो वरून आगगाडी जात असताना दोन रूळांच्यामध्ये पडला होता. नशीबवान् बिचारा! ऐक, तुझ्या भावावर आपल्या वडिलांचा खून केल्याबद्दल खटला चालणार आहे आणि प्रत्येकाला त्यानं तो खून केला हे आवडलेलं आहे."

"स्वतःच्या बापाचा मुलानं खून केला हे आवडलं आहे?"

"होय, आवडलं आहे, प्रत्येकाला ते आवडलं आहे! प्रत्येकजण तोंडानं म्हणतो 'किती भयंकर,' पण मनातून त्यांना ते फार आवडतं. मला तर बाई ते आवडलंय."

"प्रत्येकाबद्दल तू जे म्हणालीस त्यात थोडं तथ्य आहे," आल्योशा मृदूपणे म्हणाला.

"ओ हो, काय विचार आहेत तुझे हे!" लिझ आनंदाने ओरडली. अन् तू मठवासी! तू कधी खोटं बोलत नाहीस, म्हणून मला तुझ्याविषयी किती आदर वाटतो ते तुला खरंसुद्धा वाटणार नाही, आल्योशा. हां, तुला माझं एक गंमतीदार स्वप्न सांगायचं आहे. मला कित्येक वेळा भुताखेतांची स्वप्नं पडतात. रात्र झाली आहे, मी माझ्या खोलीत एका मेणबत्तीपाशी बसले आहे आणि एकाएकी साऱ्या खोलीभर भुतं फिरायला लागतात. सगळ्या कोपऱ्यांतून, टेबलाखाली सगळीकडं आणि ती दरवाजा उघडतात. दाराच्या मागं त्यांचा एक थवाच असतो, आणि ती माझ्याकडं येऊन मला धरू पाहातात. अन् ती आता येणार अन् मला धरणार पण मी लगेच स्वतःवर क्रूसाचं चिन्ह करते अन् ती सगळी माघारी फिरतात, अर्थात् ती पूर्णपणे निघून जात नाहीत. ती दारापाशी अन् कोपऱ्यांतून वाट पाहात थांबतात. आणि एकदम माझ्या मनात ईश्वराला मोठ्यानं शिव्या द्याव्यात अशी भयानक इच्छा

उत्पन्न होते, आणि म्हणून मी सुरुवात करते, अन् ती परत माझ्याकडं गर्दी करून येतात. त्यांना हर्ष झालेला असतो, ती मला पुन्हा पकडतात अन् मी पुन्हा स्वतःवर क्रूसाचं चिन्ह करते अन् ती परत सारी निघून जातात. विलक्षण मजा आहे ही, त्यानं माणूस आश्चर्यानं थक्क होतो."

"मलाही अस्संच स्वप्न पडलं होतं," आल्योशा एकदम म्हणाला.

"खरंच?" लिझ आश्चर्यचकित होऊन ओरडली. "आल्योशा, हसू नकोस, पण हे अतिशय महत्त्वाचं आहे. दोन वेगळ्या वेगळ्या माणसांना एकच स्वप्न पडणं शक्य आहे?"

"शक्य आहे असं दिसतं."

"आल्योशा, मी सांगते तुला, ही फार महत्त्वाची गोष्ट आहे." लिझ खरोखर पराकाष्ठेच्या आश्चर्याने म्हणाली. महत्त्वाची म्हणजे ते स्वप्न नव्हे, तर माझ्यासारखंच स्वप्न तुलाही पडावं हे. तू माझ्याशी कधी खोटं बोलत नाहीस, आत्ताही बोलू नकोस; हे खरं आहे का! तू गंमत तर करीत नाहीस?"

"खरं आहे."

लिझच्या मनावर विलक्षण परिणाम झालेला दिसला आणि अर्धा एक मिनिट ती गपच राहिली.

"आल्योशा, माझ्याकडे येत जा अन् मला भेटत जा, यापेक्षा जास्त वेळा येऊन भेटत जा," ती गयावया करण्याच्या स्वरात एकदम त्याला म्हणाली.

"मी नेहमी तुला भेटायला येत जाईन, आयुष्यभर," आल्योशा दृढपणे म्हणाला.

"मी ज्याच्याशी बोलू शकते असा तूच एकटा आहेस, माहीत आहे ना तुला?" लिझ पुढे बोलू लागली, "मी माझ्या स्वतःखेरीज अन् तुझ्याखेरीज कुणाशीही बोलत नाही. साऱ्या जगात फक्त तुझ्याशी अन् माझ्यापेक्षा जास्त तत्परतेनं तुझ्याशी. आणि मला तुझ्यापुढं जरासुद्धा लाजल्यासारखं वाटत नाही, अगदी मुळीसुद्धा. आल्योशा, कसं रे मला तुझ्यापुढं लाजल्यासारखं नाही वाटत? आल्योशा, ईस्टरच्या दिवसांत ज्यू लोक म्हणे मूल चोरतात अन् त्याला मारून टाकतात, खरं आहे हे?"

"मला माहीत नाही."

"इथं एक पुस्तक आहे त्यात मी एक ज्यूवर चाललेला खटला वाचला, त्यानं एक चार वर्षांचं पोर आणलं अन् त्याच्या दोन्ही हातांची बोटं तोडून टाकली. आणि त्याला उभं भिंतीवर धरलं अन् त्याच्या अंगात खिळे ठोकून क्रूसावर दिलं; त्याच्यावर खटला झाला तेव्हा तो म्हणाला, ते मूल लवकरच, चार तासांत, मेलं. हे म्हणे 'लवकर'! तो म्हणाला ते मूल कण्हू लागलं, ते सारखं कण्हत राहिलं आणि आपण त्याची वाहवा करीत राहिलो. छान!"

"छान ?"

"छान, कधी कधी मला वाटतं की मीच त्याला क्रूसावर चढवलं आहे. तो तिथं क्रूसावर कण्हत असेल अन् मी त्याच्या पुढ्यात बसून अननसाचा मुरंबा खात असेन. मला अननसाचा मुरंबा भारी आवडतो. तुला आवडतो का ?"

आल्योशाने न बोलता तिच्याकडे पाहिले. तिचा फिका, पिवळट चेहेरा एकदम आवळला गेला, तिचे डोळे जळजळू लागले.

"बरं का, जेव्हा मी त्या ज्यूबद्दल वाचलं, तेव्हा साऱ्या रात्रभर हुंदक्यांनी मी गदगदा हालत होते. ते एवढंसं पोर कसं रडलं असेल अन् कण्हलं असेल याची मी कल्पना करीत होते (चार वर्षांच्या मुलाला कळतं, बरं का) आणि एकसारखा तो अननसाच्या मुरंब्याचा विचार माझ्या मनात घोळत होता. सकाळी मी एका इसमाला पत्र लिहिलं, त्यात त्याला विशेष आर्जवानं माझ्याकडं येऊन भेटायला सांगितलं. तो आला अन् मी एकदम त्याला त्या मुलाबद्दल अन् अननसाच्या मुरंब्याबद्दल सांगितलं. सगळं सगळं सांगितलं आणि म्हटलं हे छान झालं. तो हसला अन् म्हणाला खरोखरच छान झालं. मग तो उठला अन् निघून गेला. तो फक्त पाच मिनिटं इथं होता. त्यानं माझा तिरस्कार केला असेल का? त्यानं माझा तिरस्कार केला असेल ? सांग. सांग, आल्योशा, त्यानं माझा तिरस्कार केला असेल की नाही ?" ती पलंगावर जाऊन बसली, तिचे डोळे अतिशय चमकत होते.

"मला सांग," आल्योशाने एकदम विचारलं, "तू त्या इसमाला बोलावणं पाठवलं होतंस ?"

"होय, पाठवलं होतं."

"तू त्याला पत्र लिहिलं होतंस ?"

"होय."

"निव्वळ त्याबद्दल, त्या मुलाबद्दल विचारण्याकरिता म्हणून ?"

"नाही, तेवढ्याकरिताच नाही. पण जेव्हा तो आला तेव्हा मी त्याला एकदम त्याबद्दल विचारलं. त्यानं उत्तर दिलं, तो हसला, उठला अन् निघून गेला."

"तो इसम सच्चेपणानं वागला," आल्योशा पुटपुटला.

"त्यानं माझा तिरस्कार केला असेल का ? तो मला हसला असेल का ?"

"नाही, कारण कदाचित् त्याचा स्वतःचाच अननसाच्या मुरंब्यावर विश्वास असेल. तो यावेळी फार आजारीही आहे, लिझ."

"होय, त्याचा त्यावर विश्वास आहे खराच," लिझ म्हणाली. त्यावेळी तिचे डोळे चमकत होते.

"तसा तो कुणाचाच तिरस्कार करीत नाही," आल्योशा पुढं म्हणाला. "मात्र तो कुणावरही विश्वास ठेवीत नाही आणि जर त्याचा लोकांवर विश्वास नसेल, तर अर्थात् तो त्यांचा तिरस्कार करीत असला पाहिजे."

" मग तो माझाही तिरस्कार करतो ? माझा ? "

" तुझासुद्धा."

" ठीक," लिझ जणू आपले दात करकरा घाशीत म्हणाली. " तो जेव्हा हसत बाहेर गेला तेव्हा मला वाटलं तिरस्कृत होणं चांगलंच. त्या पोराची बोटं तुटली तेही चांगलं अन् तिरस्कृत होणं तेही चांगलं..."

आणि ती आल्योशाच्या तोंडावर हसली, हे तिचे हसणे बेचैनीचे, दुष्ट हसणे होते.

" तुला माहीत आहे आल्योशा ? माहीत आहे ? मला आवडेल की .. आल्योशा, मला वाचव रे ! " तिनं एकदम पलंगावरून उडी मारली, ती त्याच्याकडं धावली अन् तिने त्याला दोन्ही हातांनी धरले. " मला वाचव ! " ती जवळ जवळ कण्हत म्हणाली, " जे तुला सांगितलं ते मी ज्याला सांगू शकेन असं जगात दुसरं कोणी आहे का? मी तुला अगदी खरं खरं तेच सांगितलं, मी जीव देईन कारण मला सगळ्या गोष्टींचा वीट आलाय ! मला जगायची इच्छा नाही, कारण मला प्रत्येक गोष्टीचा वीट आलाय. मला प्रत्येक गोष्टीचा वीट आलाय, रे, प्रत्येक गोष्टीचा. आल्योशा, तुझं माझ्यावर एवढंसं सुद्धा कसं रे प्रेम नाही ?" ती वेड्याच्या अवस्थेत असल्यासारखी बोलली.

" पण माझं तुझ्यावर प्रेम आहे ! " आल्योशाने प्रेमभराने उत्तर दिले.

" अन् तू माझ्याबद्दल शोक करशील ? करशील ? "

" हो. "

" मी तुझी बायको होणार नाही म्हणून नव्हे, नुसताच माझ्याबद्दल शोक करशील ? "

" होय. "

" आभार मानते तुझे ! मला फक्त तुझे अश्रू हवेत. दुसरे सगळे मला शिक्षा करतील अन् मला पायाखाली तुडवतील, प्रत्येक जण, प्रत्येक जण, ' कोणी एक ' देखील त्यातनं सुटलेला नाही. कारण माझं कुणावरही प्रेम नाही. ऐकलंस का, कुणावर देखील नाही ! उलट, मी त्याचा द्वेष करते ! जा, आल्योशा, तुझ्या भावाकडं तुला जायचं आहे, वेळ झाली. " ती त्याच्यापासून एकदम दूर झाली.

" अशा स्थितीत तुला सोडून मी कसा जाऊ ? " आल्योशा घाबरून गेल्यासारखा होऊन म्हणाला.

" तुझ्या भावाकडे जा, तुरुंगाची दारं बंद होतील. जा, ही तुझी टोपी घे, मीश्याला माझा प्रेमाचा नमस्कार सांग, जा ! जा ! "

आणि तिने बळे बळे आल्योशाला दाराबाहेर ढकलले. त्याने तिच्याकडे दुस्सह आश्चर्याने पाहिले, अन् त्याला एकदम आपल्या उजव्या हातांत एक पत्र असल्याचे जाणवले, एक छोटंसे पत्र घट्ट घडी केलेले अन् बंद केलेले होते. त्याने

त्यावर नजर टाकली अन् एकदम त्याच्यावरचा पत्ता वाचला. “ इवान फ्योदरोविच कारमाझफ यास. ” त्याने झटकन् लिझकडे पाहिले. तिचा चेहरा धमकावीत असल्यासारखा झाला होता.

“ ते त्याला दे, ते तू त्याला दिलंच पाहिजेस ! ” तिने त्याला फर्मावले, ती थरथर कापत होती अन् देहभानावर नव्हती. “ आजच्या आज, एकदम, नाहीतर मी विष खाईन ! एवढ्याकरिताच मी तुला बोलावलं होतं. ”

आणि तिने झटकन् दरवाजा लावून घेतला. आतला अडसर वाजला. आल्योशाने ते पत्र आपल्या खिशात ठेवले अन् तो सरळ जिना उतरून खाली गेला, तो परत मादाम होहलाहोवाकडे गेला नाही, खरे म्हणजे तो तिला विसरूनच गेला होता. आल्योशा निघून जाताच, लिझने दाराचा अडसर काढला, दरवाजा किलकिला केला, आपले बोट त्या फटीत घातले अन् आपल्या साऱ्या शक्तीनिशी ते दार पुनः जोराने लावले, तिचे बोट त्यात चेपले, दहा सेकंद झाल्यानंतर, आपले बोट सोडवून घेऊन ती आवाज न करता मंदपणे आपल्या खुर्चीकडे गेली, तिच्यात ताठपणे बसली अन् आपल्या काळ्यानिळ्या पडलेल्या बोटाकडं अन् त्याच्या नखातून ठिबकणाऱ्या रक्ताकडं एकाग्रपणे पाहात राहिली. तिचे ओठ थरथरत होते अन् ती स्वतःशीच भरभर बोलत राहिली होती.

“ मी किती नीच आहे, नीच, अगदी नीच ! ”

४

एक स्तोत्र आणि रहस्य

आल्योशानं तुरुंगाच्या फाटकावरची घंटा वाजविली तेव्हा बराच उशीर झाला होता. नोव्हेंबरमध्ये दिवस लहान असतात. अंधार पडू लागला होता. पण आपल्याला विनायास प्रवेश मिळेल हे आल्योशाला माहीत होते. इतर सर्व ठिकाणाप्रमाणेच आमच्या लहान शहरातही गोष्टी जमवून आणणे शक्य होते. अर्थात पहिल्यांदा, प्राथमिक चौकशी संपल्यानंतर, नातेवाईक अन् काही इतर मंडळी यांनाचा फक्त मीत्याशी भेट मिळविता येत होती, त्याकरिता काही अपरिहार्य उपचार करावे लागत. पण पुढे, हे तांत्रिक उपचार जरी कमी झाले नाहीत तरी, मीत्याला भेटायला येणाऱ्यात काहींचे तरी निदान अपवाद करण्यात आले. इतके की कित्येक वेळा कैद्यांची मुलाखत घेण्याकरिता म्हणून स्वतंत्र बाजूला ठेवलेल्या खोलीतील भेटींना खासगी गप्पागोष्टींचे स्वरूप येऊ लागले.

परंतु हे अपवाद संख्येने तसे कमी होते; फक्त ग्रूशिंका, आल्योशा अन् राकीतीन एवढ्यांनाच अशी वागणूक मिळे. पण पोलिस कॅप्टन मिखाइल मिखाइलेविच याचे ग्रूशिंकासंबंधाने फार अनुकूल मत होते. मोक्रोयला त्याने तिच्याविषयी जे

वाईट उद्गार काढले होते ते त्या वृद्धाच्या सदसद्विवेक बुद्धीला टोचणी देत होते, आणि जेव्हा त्याला सर्व हकीकत कळली, तेव्हा त्याचे तिच्याविषयीचे मत पूर्णपणे बदलले. आश्चर्य असे की, जरी त्याचे मीत्याच्या गुन्ह्याबद्दलचे मत पक्के होते, तरी एकदा मीत्या तुरुंगात दाखल झाल्यानंतर, या म्हाताऱ्याच्या विचारात त्याच्या संबंधाने अधिकाधिक सौम्यता येऊ लागली होती. तो मनाशी म्हणाला, "अंतःकरणानं हा सज्जन असावा, पण मद्यपानानं अन् बदफैलीपणानं असा दुःखाच्या अवस्थेत आला असावा." त्याला पहिल्याप्रथम जो उबग आला होता त्याची जागा आता करुणेने घेतली होती. आल्योशाबद्दल बोलायचं तर पोलिस कॅप्टनला त्याच्याविषयी फार प्रेम होते अन् फार दिवसांपासून तो त्याला ओळखत होता. राकीतीन, जो अलीकडे बऱ्याच वेळा कैद्याला भेटायला येऊ लागला होता तो, त्याच्या शब्दात, "पोलिस कॅप्टनच्या तरुण महिलांच्या निकट परिचयाच्या व्यक्तींपैकी एक होता, अन् नेहमी त्यांच्या घराभोवती तो घुटमळत असे. पोलिस सुपरिंटेंडेंटच्या घरातसुद्धा त्याची शिकवण होती, हा सुपरिंटेंडेंट जरी आपल्या कामात कर्तव्यदक्ष असला तरी, दयाळू अंतःकरणाचा वृद्ध मनुष्य होता. आल्योशाचा सुद्धा पुष्कळ दिवसांपासून पोलिस सुपरिंटेंडेंटशी निकटचा परिचय होता, त्याला त्याच्याशी गप्पा मारण्याचा नाद होता, सामान्यपणे धार्मिक विषयांवर. इवान फयोदरोविचबद्दल त्याला आदर होता, आणि जरी स्वतः तो तत्त्वज्ञानाचा अभ्यासू होता अर्थात् 'स्वयंशिक्षित' होता तरी त्याच्या मताबद्दल साश्चर्य आदराचा भाव त्याच्या मनात होता. पण आल्योशाबद्दल त्याला अनिवार आकर्षण होते. गेले वर्ष या वृद्ध मनुष्याने क्षेपक शुभवर्तमानांचा अभ्यास करायला सुरुवात केली होती आणि त्या विषयीची आपली मते तो या आपल्या तरुण मित्राशी मधून मधून बोलून दाखवीत असे. तो मठात जाऊन त्याची गाठ घेई अन् तासन् तास त्याच्याशी अन् इतर संन्याशांशी चर्चा करी, त्यामुळे जरी आल्योशाला तुरुंगाकडे जायला उशीर झाला होता तरी त्याने फक्त सुपरिंटेंडेंटकडे जाण्याचा अवकाश की पुढचे सर्व सरळ होई. शिवाय, तुरुंगातल्या प्रत्येकाशी, अगदी खालच्या वॉर्डरपर्यंत, त्यांची घसट झालेली होती. पहारेकरी अर्थात्, वरच्या अधिकाऱ्यांचे समाधान असल्यानंतर त्याला कशाला त्रास देतील ?

मीत्याला त्याच्या कोठडीतून जेव्हा बोलावून आणले जाई तेव्हा तो नेहमी खालच्या मजल्यावर जिथे मुलाखतीकरिता स्वतंत्र खोली ठेवली होती तिथे जाई. आल्योशाने खोलीत प्रवेश करताच त्याची राकीतीनशी गाठ पडली. तो नुकताच मीत्याचा निरोप घेत होता. ते दोघे मोठमोठ्याने बोलत होते. मीत्या, तो बाहेर पडत असताना मनापासून हसत होता, तर राकीतीन कुरकुरत होता. राकीतीनला आल्योशाला भेटणे, विशेषतः अलीकडे, आवडत नाहीसे झाले होते. तो क्वचितच त्याच्याशी बोले, आणि ताठ मानेने त्याला अभिवादन करी. आल्योशाला यावेळी प्रवेश करताना पाहून त्याच्या कपाळाला आठ्या पडल्या अन् तो दुसरीकडे पाहू

लागला, जणू त्याचे सारे लक्ष आपल्या भल्यामोठ्या गरम पिसांची किनार लावलेल्या ओवरकोटाची बटने लावण्यात सर्वस्वी गुंतले होते. मग तो लगेच आपल्या छत्रीचा शोध घेऊ लागला.

"माझं सामान मी विसरून जात नाही हे मला पाहिलं पाहिजे," तो काही-तरी बोलायचे म्हणून स्वतःशीच पुटपुटला.

"दुसऱ्या लोकांचं सामानसुद्धा तू विसरत नाहीस इकडंही लक्ष ठेव," मीत्या गंमत म्हणून म्हणाला आणि आपल्या कोटीवर त्याचा तोच एकदम हसला. राकीतीन लगेच भडकला,

"हा उपदेश आपण आपल्या कुटुंबातल्या माणसांनाच करा, तुम्ही नेहमी दुसऱ्यांची पिळणूक करणारे सगळे, राकीतीनला कशाला सांगता ?" तो संतापाने कापत एकदम ओरडला.

"अरे काय झालं ? मी थट्टा केली," मीत्या म्हणाला. "जाऊ दे मसणात सारं. हे सगळे असेच आहेत," राकीतीनच्या घाईघाईने दूर चाललेल्या आकृती-कडे पाहून आपली मान हलवून तो आल्योशाकडे वळला. "हा आता इथं हसत-खेळत बसला होता, अन् असा एकदम उकळायला लागला. त्यानं तुला मानेनं अभिवादनसुद्धा केलं नाही. त्याच्याशी तू गट्टी पूर्णपणे तोडलीस वाटतं ? तुला इतका उशीर का झाला ? मी तुझी नुसती वाट नव्हतो पाहात, सबंध सकाळभर तुझ्यासाठी तहानलेला होतो. पण जाऊ द्या. आता आपण त्याची भरपाई करू."

"हा इथं इतक्या वरचेवर का येतो ? तुम्ही काही इतके जीवश्च कंठश्च मित्र खास नाही ?" आल्योशाने विचारले. राकीतीन ज्या दारातून बाहेर पडून दिसेनासा झाला तिकडे बघून त्यानेही मान हलविली.

"राकीतीनशी जीवश्च कंठश्च मैत्री ? छे:, एवढीशी सुद्धा नाही. या असल्या डुकराशी–शक्य तरी आहे ? तो समजतो...मी हलकट माणूस आहे. यांना थट्टा-सुद्धा समजत नाही, हा या लोकांत सर्वांत मोठा दोष आहे. यांना कधी थट्टा कळत नाही, आणि यांचं अंतःकरण शुष्क असतं, शुष्क अन् सपाट; त्यांना पाहून मला, तुरुंगाच्या तटांची आठवण होते, इथं जेव्हा मला पहिल्यांदा आणण्यात आलं तेव्हा मी ते पाहिले. पण हा हुषार माणूस आहे, फार हुषार. असो. अलेक्सी, आता आमचे सारं संपलं आहे."

तो बाकावर बसला अन् आल्योशाला आपल्याशेजारी त्याने बसायला लावले.

"होय, खटला उद्या चालणार. इतकी तू आशा सोडलीस, भाई ?" आल्योशा चिंतेच्या स्वरात म्हणाला.

"कशाबद्दल तू बोलतो आहेस ?" मीत्या त्याच्याकडं काहीशा अनिश्चित-पणाने पाहात म्हणाला. "ओः, तो खटला म्हणतोस ! मसणात गेलं ते सारं !

आतापर्यंत आपण काही महत्त्व नसलेल्या अशा गोष्टींविषयी, या खटल्याविषयी, बोलत झालो, पण मुख्य गोष्टीसंबंधी मी तुझ्याशी एक शब्दही बोललो नाही. होय, खटला उद्या आहे; पण जेव्हा मी 'आता माझं सारं संपलं' असं म्हटलं तेव्हा माझ्या मनात हा खटला नव्हता. इतका बारकाव्यानं का माझ्याकडं पाहतो आहेस?"

"म्हणजे तुला काय म्हणायचंय, मीत्या?"

"विचार, विचार, बस्स! नीतिशास्त्र! नीतिशास्त्र म्हणजे रे काय?"

"नीतिशास्त्र?" आल्योशाने आश्चर्याने विचारले.

"हं, ते शास्त्र आहे काय?"

"होय, असं एक शास्त्र आहे....पण....ते कशा स्वरूपाचं शास्त्र आहे हे मला नाही तुला सांगता येणार हे मी कबूल करतो."

"राकीतीनला माहीत आहे. राकीतीनला बऱ्याच गोष्टी माहीत आहेत, मरो तो! तो काही मठवासी होणार नाही. त्याला पीटर्सबर्गला जायचं आहे. तिथं तो उदात्त प्रवृत्तीवर भाष्य करण्याचा विषय घेणार आहे. कोणाला माहीत, त्याचाही उपयोग होईल अन् तो आपलं नावही त्यात काढील. हं:! हे लोक नाव काढायच्या दृष्टीनं उत्कृष्ट असतात! जळू दे ते नीतिशास्त्र. मी शिणलो, अलेक्सी, देवाच्या माणसा, मी आता थकलो! माझं कुणाहीपेक्षा तुझ्यावर जास्त प्रेम आहे. तुला बघण्यासाठी माझं हृदय तळमळत असतं. कार्ले बर्नार्ड हा कोण होता बरं?"

"कार्ले बर्डि!" पुन्हा आल्योशाने आश्चर्याने विचारले.

"नाही, कार्ले नाही. थांब, मी चूक केली. क्लोद बर्नार्ड. हा कोण होता? रसायन शास्त्रज्ञ की कोण?"

"हा कोणी विद्वान माणूस असला पाहिजे," आल्योशाने उत्तर दिले; "पण मी कबूल करतो की त्याच्याबद्दलसुद्धा मी फारसं तुला काही सांगू शकणार नाही. तो विद्वान असल्याबद्दल मी ऐकलंय, पण कशा स्वरूपाचा ते मला माहीत नाही."

"हं तर मग तो जाऊ दे खड्डयात! मलाही माहीत नाही," मीत्या ठामपणे म्हणाला. "कोणी तरी बदमाष असण्याचा मोठा संभव आहे. ते सगळे बदमाष आहेत. अन् राकीतीन आपला मार्ग काढील. राकीतीन कुठंही गेला तरी पुढं सरेल; तो दुसरा बर्नार्डच आहे. थू: या बर्नार्डच्यावर! सगळीकडं ते पसरले आहेत."

"पण झालं काय?" आल्योशाने पुन: पुन्हा विचारले.

"याला माझ्यावर, माझ्या प्रकरणावर, एक लेख लिहून आपल्या लेखन-कार्याला आरंभ करायचा आहे. तेवढ्यासाठी तो येत असतो; तो स्वत:च तसं म्हणाला. त्याला काही सिद्धान्त सिद्ध करायचा आहे. त्याला म्हणायचं आहे, 'त्याला आपल्या बापाचा खून केल्यावाचून राहणंच शक्य नव्हतं, अवतीभोवतीच्या परिस्थितीनं त्याला बिघडवलं होतं,' वगैरे. त्यानं ते सारं मला समजावून सांगितलं.

आपण त्यात थोडासा समाजवादाचा रंग मिसळणार आहोत असं तो म्हणाला. पण त्याला थोडा रंग आणायचा असेल तर आणू द्या, मला पर्वा नाही. त्याचं इवानशी जमत नाही. त्याचा तो द्वेष करतो. त्याला तू ही आवडत नाहीस. पण मी त्याला हाकलून देऊ शकत नाही, कारण तो हुषार माणूस आहे. अर्थात फारच अहंकारी आहे. आतां मी त्याला म्हटलं: 'कारमाझफ बदमाष नाहीत, तत्त्वज्ञानी आहेत; कारण सगळे सच्चे रशियन तत्त्वज्ञानी असतात, आणि जरी तू अभ्यास केलेला असलास तरी तू तत्त्वज्ञानी नाहीस– तू हलक्या दर्जाचा इसम आहेस.' तो हसला, पण इतक्या चिडीनं मी त्याला म्हणालो,

हे छान नाही वाटत ? मी चांगला साहित्यिक म्हणून गाजेन, तू काय सम-जलास !" मीत्त्या एकदम हसू लागला.

"तुझं आता सारं संपलं आहे असं का? आताच तू असं म्हणालास," आल्योशाने मध्येच विचारले.

"माझं सारं का संपलं? हं ....! त्याचं असं आहे....जर तू समग्रपणे याकडं बघितलंस तर मला ईश्वर हातचा सोडणं दुःखाचं वाटतं–म्हणून."

"'ईश्वराला हातचा सोडणं दुःखाचं' म्हणजे तुला काय म्हणायचंय ? "

"कल्पना कर : आता ज्ञानतंतूत, डोक्यात म्हणजे हे ज्ञानतंतू तिथं मेंदूत असतात...(मसणात जाऊ देत ते !) बारीक बारीक शेपट्यांसारखे त्या ज्ञानतंतूंच्या शेपट्या म्हण, अन् जेव्हा त्या थरथरायला लागतात....म्हणजे बरं का, मी माझ्या डोळ्यांनी एखाद्या वस्तूकडं बघतो की, त्या कंप पावायला लागतात– त्या बारीक बारीक शेपट्या... अन् जेव्हा त्या कंप पावतात, तेव्हा एक चित्र डोळ्यांपुढं येतं... ते एकदम नाही येत, तर एक क्षण, एक सेकंद मधे जातो....अन् मग क्षणासारखं काही पुढं दिसायला लागतं; अंहं, क्षण नव्हे– तो जाऊ दे मसणात !– पण एखादं चित्र दिसायला लागतं; म्हणजे एखादी वस्तू किंवा एखादी कृती म्हण, झक मारू दे ते !– त्यामुळंच मला दिसतं अन् मी विचार करतो, त्या शेपटामुळं बरं का ! मला आत्मा आहे अन मी एक काही प्रतिमा अन् त्यासारखं काही आहे, म्हणून मुळीच नाही. तो सगळा बेअकलीपणा आहे ! राकीतीननं काल मला ते सर्व समजवून दिलं, अन् त्यानं मी पार आउट झालो, भाऊ. हे फार विशाल आहे, आल्योशा, म्हणजे शास्त्र रे ! एक नवा मनुष्य उदयाला येत आहे- ते मला समजतं....अन् तरी ईश्वराला गमवायला माझ्या मनाला दुःख वाटतं ! "

"मग, काही असलं तरी, ही चांगलीच गोष्ट आहे," आल्योशा म्हणाला.

"ईश्वराला गमावण्याचं दुःख होणं ही? हे रसायनशास्त्र आहे, बाबा, रसायनशास्त्र आहे ! त्याला काही इलाज नाही, पूज्य महाशय, रसायनशास्त्राला तुम्ही वाव दिलाच पाहिजे. अन् राकीतीनला ईश्वराची निश्चितपणे आवड आहे. थू: ! त्याला ईश्वराची नावड नाही म्हणे ! या सर्वांच्या बाबतीत हाच तर नाजूक

मुद्दा आहे. पण ते तो दडवून ठेवतात. ते खोटं सांगतात. ते ढोंग करतात. मी त्याला विचारलं, 'तुझ्या टीकात्मक लेखातून हे तू लोकांना सांगशील का?' 'हं, जर मी ते उघडपणे केलं तर ते बाहेर जाऊच देणार नाहीत,' तो म्हणाला. तो हसला. मी त्याला विचारलं, 'मग माणसांची स्थिती काय होईल, ईश्वर अन् अमर जीवन नसेल तर? मग सगळ्या गोष्टी कायदेशीरच, तुम्हाला वाटेल ते तुम्ही करू शकाल!' तो हसत म्हणाला, तुला माहीत नाही? हुषार मनुष्य त्याच्या मनाला येईल ते करू शकतो. हुषार माणसाला आपली वाट काढता येते, पण तू तर खून करून तुझा पाय आत टाकला आहेस, आणि आता तू तुरुंगात खितपत आहेस.' हे तो माझ्या तोंडावर म्हणतो! निव्वळ डुक्कर आहे तो! मी अशा लोकांना लाथेनं उडवून देई, पण हल्ली मी त्यांचं ऐकून घेतो. तो पुष्कळ अकलेच्या गोष्टीही बोलतो. लिहितो चांगलं. त्यानं मला गेल्या आठवड्यात एक लेख वाचून दाखवायला सुरुवात केली. त्यातल्या तीन ओळी मी उतरून घेतल्या आहेत. थांब हं, या बघ त्या."

मीत्यानं आपल्या खिशातून एक कागदाचा कपटा काढला अन वाचला :

"या प्रश्नाची तड लावण्याच्या दृष्टीने, माणसाने आपल्या वास्तव स्थितीच्या विरुद्ध जाऊन आपले व्यक्तिमत्त्व प्रस्थापित करणं हे सर्वांत अगत्याचे आहे.' हे तुला समजतं का?"

"नाही, मला समजत नाही," आल्योशा म्हणाला. त्याने मीत्याकडे पाहिले आणि त्याचे बोलणे तो जिज्ञासेने ऐकू लागला.

"मलाही ते कळत नाही. हे अगम्य अन दुर्बोध आहे, पण बुद्धिमानही आहे. तो म्हणतो, 'हल्ली प्रत्येकजणच असं लिहितो, त्यांच्या सभोवतालच्या वातावरणाचा हा परिणाम आहे.' त्यांना वातावरणाची भीती वाटते. तो कवितासुद्धा लिहितो बरं का, हा पाजी. त्यानं मादाम होहलाहोवाच्या पायाच्या स्मरणार्थ कविता केली आहे. हा, हा, हा!"

"मी ऐकलंय त्याबद्दल." आल्योशा म्हणाला.

"ऐकलंयस? अन् तू ती कविता ऐकली आहेस?"

"नाही."

"माझ्याकडं आहे ती. ही पहा ती. ती मी तुला वाचून दाखवतो. तुला माहीत नाही– मी तुला बोललो नाही – त्याच्या संबंधीची एक चांगली कहाणीच आहे. तो पाजी माणूस आहे! तीन आठवड्यांपूर्वी तो मला सतावू लागलो. 'तू स्वतःला तीन हजारांकरिता मूर्खासारखं गुरफटून घेतलंयस, पण मी तर एक लाख पन्नास हजारांवर डल्ला मारणार आहे. मी एका विधवेशी लग्न करून पीटर्सबर्गमध्ये एक घर खरेदी करणार आहे!' आणि आपण मादाम होहलाहोवाची आराधना करीत असल्याबद्दल तो बोलला. तरुणपणी तिला फारसं डोकं नव्हतं, अन् आता चाळिसाव्या वर्षाला तिच्याकडं जे काही होतं ते तिनं घालवलं आहे. 'पण

ती भलतीच भावुक आहे, त्यातून मी तिला पकडीत घेणार आहे. तिच्याशी माझं लग्न झालं की मी तिला पीटर्सबर्गला घेऊन जाईन अन् तिथं एक वर्तमानपत्र सुरू करीन,' असं तो म्हणतो. अन् त्याच्या तोंडाला नुसतं पाणी सुटलं होतं. त्या पशूच्या, त्या विधवेमुळं नव्हे तर त्या एक लाख पन्नास हजारामुळं, अन् मला तो खरं मानायला सांगत होता. तो मला रोजच्या रोज भेटायला येत होता. 'ती वळणावर यायला लागली आहे,' तो म्हणाला. आनंदानं तो अगदी उजळून गेला होता. मग, एकाएकी त्याला घरातून डच्चू मिळाला. पेऱ्होतिन सर्वस्वी विजय मिळवीत चालला आहे, शाब्बास! त्या खुळचट बुद्दू म्हातारीचं मी तर त्याला घराबाहेर हाकलून दिल्याबद्दल चुंबनच घेईन. अन् त्यानं हा काव्यात्मक चुटका लिहिला आहे. 'काव्य लिहून पहिल्यांदाच मी माझे हात विटाळले आहेत.' तो म्हणाला. 'तिचे हृदय मला जिंकायचं आहे, तेव्हा हे सत्कारणी होत आहे. मला त्या खुळचट स्त्रीचा पैसा ताब्यात मिळाला, की मी समाजाच्या फार उपयोगाचा होऊ शकेन. जी कोणती गलिच्छ गोष्ट ते करतात त्याचं असं सामाजिक दृष्ट्या समर्थन ते देत असतात! काही झालं तरी तुमच्या पुष्किनच्या काव्यापेक्षा ही अधिक चांगली आहे, कारण यातदेखील मी काही बोध सांगण्याचा प्रयत्न केला आहे,' असं तो म्हणाला. तो पुष्किनबद्दल जे म्हणतो ते मी समजू शकतो, तो खरोखरच जर बुद्धीचा मनुष्य असेल अन् त्यानं स्त्रियांच्या पायांविषयीच फक्त लिहिलं असेल तर याच्या म्हणण्यात तथ्यांश मला बरोबर दिसतो. पण राकीतीनला आपल्या काव्यात्मक चुटक्याविषयी भलताच अहंकार नाही काय! काय बघ या लोकांचा पोकळ गर्व! 'माझ्या प्रियतमेचा सुजलेला पाय हळूहळू बरा होण्यावर' असा या कवितेचा मथळा त्याच्या डोक्यात होता. चेष्टेखोर माणूस आहे तो.

तो मोहक चिमुकला पाय.
जरी सुजला आहे, अन् लाल अन् दुखरा झाला आहे.
डॉक्टर येतात अन् प्लास्टरात ठेवतात
तरी ते तिला बरी करू शकत नाहीत.
तथापि मला भय वाटतं ते तिच्या पायाचं नाही–
पुष्किनच्या चिंतनाला तो अधिक लायक विषय आहे–
मला चिंता आहे ती तिच्या पायाबद्दल नव्हे, तिच्या डोक्याबद्दल;
ती अक्कल गमावणार या विचारानं माझा थरकाप होतो!
कारण आश्चर्य असं की, जसा तिचा पाय सुजतो,
तिची बुद्धी मंद होऊ लागते–
अहो, काही उपाय सांगा असा की,
तिचा पाय अन् मेंदू दोन्ही ठिकाणावर राहतील!"

हा डुक्कर आहे, अगदी साक्षात् डुक्कर, पण अतिशय लुच्चा आहे, हा पाजी!

अन् त्यानं खरोखरच एक प्रगतिशील विचार यात घातला आहे. आणि तिनं जेव्हा त्याला घराबाहेर हाकललं तेव्हा तो रागावला नाही काय ? तो आपले दात करकरा खात होता ! ”

“ त्यानं आपला सूड अगोदरच घेऊन टाकला आहे,” आल्योशा म्हणाला. त्यानं मादाम होहलाहोवासंबंधानं एक परिच्छेद लिहिला आहे.”

आणि आल्योशाने त्याला थोडक्यात ‘गप्पा’तील परिच्छेदाबद्दल सांगितले.

“ हे त्याचंच काम, नक्की त्याचंच काम ! ” मीत्याने पुष्टी दिली, त्याला राग आला. “ यानंच ते लिहिलंय ! हे परिच्छेद....मला माहीत आहे...उदाहरणार्थ या अपमानकारक गोष्टी ज्या ग्रूशिंकाबद्दल, अन् कात्याबद्दल, लिहिल्या आहेत ते त्याचंच काम !...हं : ! ”

तो गांजून गेल्याच्या आविर्भावाने खोलीत फेऱ्या घालू लागला.

“ भाई, मला फार वेळ थांबता येणार नाही,” आल्योशा काही वेळाने म्हणाला. “ उद्याचा दिवस तुझ्या दृष्टीनं फार महत्त्वाचा अन् भयंकर होणार आहे, ईश्वराचा न्यायनिवाडा पूर्ण होईल...मला तुझं आश्चर्य वाटतं, तू इथं फेऱ्या घालतो आहेस अन् कशा कशाबद्दल तरी बोलतो आहेस.. ”

“ अं हं, माझं आश्चर्य मानू नकोस,” मीत्या प्रेमभराने म्हणाला. “ मी काय त्या दुर्गंधी कुत्र्याबद्दल बोलू ? त्या खुनीबद्दल ? त्याच्या संबंधानं आपण पुष्कळ बोललो आहो. सडक्या लिझावेताच्या त्या सडक्या मुलाबद्दल मी फार बोलू इच्छीत नाही ! ईश्वरच त्याला मारील. पाहशील तू. गप ! ”

तो भावनावेगाने आल्योश्याच्या जवळ गेला अन् त्याचे त्याने चुंबन घेतले. त्याचे डोळे चमकू लागले.

“ राकीतीनला हे समजणार नाही,” तो एक प्रकारच्या उदात्त अवस्थेत बोलू लागला; “ पण तुला, तुला ते सगळं समजेल. म्हणूनच मी तुझ्याकरिता आसुसलेला होतो. इथं या चिरडणाऱ्या भिंतीच्या आत किती तरी दिवसांपासून मला तुला कितीतरी सांगायचं आहे, पण ज्याचं सर्वांत जास्त महत्त्व त्याबद्दल मी तुला एक शब्दही बोललो नाही; तो क्षणच कधी आला नाहीसं वाटतं. आता मी जास्त वाट पाहू शकत नाही. माझं हृदय तुझ्यापुढं मला रितं केलं पाहिजे. भाई, या गेल्या दोन महिन्यांत मला माझ्यामध्ये एका नव्या माणसाचा साक्षात्कार झाला आहे. एक नवा माणूस माझ्यात उदयाला आला आहे. तो माझ्यात दडलेला होता, पण जर हा अस्मानी आघात माझ्यावर कोसळला नसता तर तो कधीच पृष्ठभागावर आला नसता, मला भीती वाटते ! अन् मला वीस वर्षं खाणीत कच्च्या लोखंडावर घणाचे घाव मारीत कंठावी लागली तरी त्याची काय मला पर्वा ? मला त्याची मुळीच भीती वाटत नाही. मला आता भीती वाटते ती दुसऱ्याच एका

गोष्टीची; ती ही की हा नवा माणूस मला सोडून जाईल. तिकडं खाणीत, जमिनी-खालीसुद्धा, मला माझ्या शेजारी असलेल्या दुसऱ्या गुन्हेगारात अन् खुन्यात कदाचित् माणुसकीचं अंतःकरण सापडेल, अन् मी त्याच्याशी मैत्री करीन, कारण तिथंसुद्धा माणूस जगू शकतो, प्रेम करू शकतो अन् दुःख सोसू शकतो. त्या शिक्षा झालेल्या गुन्हेगारामधल्या थिजलेल्या हृदयाला आपल्याला विरघळविता येईल अन् पुन्हा सजीव करता येईल, वर्षानुवर्षे त्याची सेवा करून, अंती एका उच्च आत्म्याच्या खोल अंधाऱ्या गव्हरातून एक भावनाशील, कष्टी प्राणी वर आणता येईल; एक देव-माणूस आपल्याला जन्माला घालता येईल, एक वीर पुरुष निर्माण करता येईल! तिथं असे कितीतरी असतील, शेकडो असतील. अन् त्यांच्याबद्दल दोषी आम्ही सगळे आहोत. याचवेळी मला त्या 'बछड्या'चं स्वप्न का बरं पडावं? 'ते बछडं इतकं गरीब का?' तो मला त्या वेळी संकेत होता. त्या बछड्याकरिता मी जातो आहे. कारण आपण सगळे सगळ्याकरिता जबाबदार आहोत, सगळ्या 'बछड्यां'करिता, कारण मुलं मोठीही असतात जशी लहान असतात. सगळी 'बछडी'च आहेत. मी सर्वांकरिता जातो आहे, कारण कुणाला तरी सर्वांच्याकरिता गेलं पाहिजे. मी बाबांना मारलं नाही, पण मला जाणं भाग आहे. मला ते शिरोधार्य आहे. हे सारं मला इथं, इथं, या चिरडून टाकणाऱ्या भिंतीच्या आत उमगलं. कितीतरी तसे तिकडे आहेत, शेकडो जमिनी-खाली हातात घण घेऊन आहेत. हां, हे खरं की आम्ही बेड्यात अडकलेले असू अन् आम्हाला स्वतंत्रता नसेल, पण तरी, फार मोठ्या दुःखात सापडलेले आम्ही पुन्हा वर उठून आनंद मिळवू, त्या आनंदावाचून मनुष्य जगू शकत नाही किंवा ईश्वराचं अस्तित्व राहू शकत नाही, कारण ईश्वर आनंद देतो; तो त्याचा विशेष अधिकार आहे– अत्यंत भव्य अधिकार. हो, माणसानं प्रार्थनेत विलीन होऊन– विरघळून जावं! तिथं भूमीखाली ईश्वरावाचून माझी काय स्थिती होईल? राकीतीन हसतो! लोकांनी ईश्वराला पृथ्वीतलावरून हाकलून दिलं तर आम्ही रसातळात त्याला आसरा देऊ. तुरुंगात माणसाला ईश्वरावाचून राहताच येत नाही, ते तुरुंगाबाहेरच्या पेक्षाही अधिक अशक्य आहे आणि मग आम्ही भूमीखालची माणसं पृथ्वीच्या पोटातून ईश्वराची वैभवशाली स्तुतिस्तोत्रं गाऊ, कारण ईश्वराच्या संगतीत आनंद आहे. ईश्वराचं अन् त्याच्या आनंदाचं स्वागत असो! त्याच्यावर माझं प्रेम आहे!"

तोंडातून येईल तसं बोलत असताना मीत्याला जणू धाप लागल्यासारखी झाली. त्याचा चेहरा पांढरा झाला, त्याचे ओठ थरथरू लागले, आणि त्याच्या गालांवरून अश्रू ओघळू लागले.

"होय, जीवन परिपूर्ण आहे, पृथ्वीच्या खालीसुद्धा जीवन आहे," त्याने पुनः बोलायला सुरुवात केली. "तुझा विश्वास नाही बसणार, अलेक्सी. मला आता किती जगावंसं वाटतं, अस्तित्वाची मला केवढी तहान आहे– यावर, पण या चिरडणाऱ्या भिंतींच्या आत माझ्यात एकदम आत्म्याची जाणीव उदय पावली

आहे. राकीतीनला ते समजत नाही; त्याला सारी पर्वा आहे ती एक घर बांधायची अन् ते भाड्यानं देण्याची. पण मी तुझ्याकरिता आतुरतेनं वाट पाहात होतो. दुःख म्हणजे काय ? मला नाही त्याची भीती वाटत, मग ते किती का अपार असेना. आता मी त्याला मुळीच भीत नाही. पूर्वी मला त्याची भीती वाटायची. बरं का, मी कदाचित् खटल्याच्या वेळी उत्तरसुद्धा देणार नाही...अन् आता स्वतःमध्ये मला इतकं बळ वाटू लागलंय की मला वाटतं मी काहीही सहन करू शकेन, केवढेही क्लेश सहन करू शकेन–फक्त मला एवढं म्हणता यावं. अन् क्षणोक्षणी स्वतःशी पुनरुच्चार करता यावा की 'मी आहे.' हजारो वेदना असल्या तरी मी आहे. मला खोड्यात अडकवून पीडा देताहेत तरी मी आहे ! जरी मी एखाद्या तळघरात एकटा बसलेला असलो तरी मी अस्तित्वात आहे ! मी सूर्य पाहतो, अन् जरी मी तो पाहिला नाही तरी तो आहे याचं मला ज्ञान आहे. आणि यात,सूर्य आहे. या ज्ञानात, सगळं जीवन आहे. आल्योशा, माझ्या देव-माणसा, ही जी सारी तत्त्वज्ञानं आहेत त्यात माझं मरणआहे. खड्ड्यात जाऊ देत ती ! भाई इवान...."

"हं भाई इवानचं काय ?" आल्योशा मध्येच म्हणाला, पण मीत्याने ते ऐकलेच नाही.

"बरं का, हे संशय पूर्वी कधीच माझ्या मनात आले नव्हते, पण ते सारे माझ्या अंतरात कुठंतरी दडलेले होते. मी जो प्यायला अन् भांडायला अन् संतापायला लागलो होतो तो बहुधा मला न समजणारे विचार माझ्यात उचंबळत होते म्हणूनच असलो पाहिजे. ते आतल्या आतच गुदमरून टाकावेत, त्यांना गप्प बसवावं; त्यांचा गळा दाबावा याकरिता तसा मी वागत होतो. इवान हा राकीतीन-सारखा नाही, त्याच्यात विचार आहे. इवान हा कोडी घालणारा स्फिंक्स आहे पण तो मूक आहे. तो नेहमी मूक असतो. मला त्रस्त करीत आहे तो ईश्वराचा विचार. तोच एक मला त्रस्त करणारा विषय आहे. तो अस्तित्वातच नसेल तर काय ? राकीतीनचं मत की माणसानं तयार केलेली ती एक कल्पना आहे. हे जर बरोबर असेल तर काय ? जर तो अस्तित्वात नसेल तर मनुष्य हाच पृथ्वीचा, विश्वाचा स्वामी आहे. उत्तम ! पण एवढंच सांगा की ईश्वर नसेल तर माणूस भला कसा होणार हाच प्रश्न आहे. मी फिरून फिरून त्यावरच येतो. मग माणूस कुणाकरिता प्रेम करणार ? कुणाचे तो पाड मानणार ? कुणाची तो स्तुतिस्तोत्रं गाणार ? राकीतीन हसतो. तो म्हणतो, ईश्वर नसला तरी मनुष्यजातीवर प्रेम करता येतं. हं:, एखादा शेंबडा वेडपटच असं म्हणू शकेल. मी ते समजू शकत नाही. राकीतीनचं जीवन साधंसरळ आहे. 'तू नागरी हक्क वाढवून मिळाल्याबद्दल, किंवा मांसाचे दर खाली ठेवण्याबद्दल का होईना, विचार कर, ते अधिक बरं. तत्त्वज्ञानापेक्षा यानं तुझं मानवजातीचं प्रेम अधिक स्पष्टपणे अन् सरळपणे व्यक्त करशील.' मी त्याला उत्तर दिलं, 'ठीक, पण ईश्वर मानणारा नाहीस तो तू, तुला फायद्याचं

वाटलं की मांसाचा दर वाढविण्याचा अन् दर कोपेकवर एक रूबल काढण्याचा जास्त मोठा संभव आहे.' तो रागावला. पण अखेर, भलेपणा म्हणजे तरी काय? याचं मला उत्तर दे, अलेक्सी. भलेपणा मी एक मानतो अन् एखादा चिनी दुसरा मानतो, तेव्हा ही सापेक्ष वस्तू झाली. की ती तशी नाही? ती सापेक्ष नाही? फसवा प्रश्न आहे हा! या प्रश्नानं मला दोन रात्री जागवलं आहे असं जर मी तुला सांगितलं तर हसशील तू. आता मला आश्चर्य असं वाटतं की लोकांना त्यासंबंधानं काही विचार न करता कसं राहता येतं? वृथाभिमान! इवानला ईश्वर नाही. तो विचार मानतो. हे माझ्या बुद्धीपलीकडचं आहे. पण तो गप्प असतो. मला वाटतं तो फ्री मेसन असावा. मी त्याला विचारलं पण तो बोलत नाही. मला त्याच्या आत्म्याच्या स्रोतांचं पान करावसं वाटत होतं पण तो गप्प होता. पण एकदा त्याच्या तोंडून काही बाहेर पडलंच."

"काय म्हणाला तो?" आल्योशाने झटकन् तो धागा उचलला.

"मी त्याला म्हटलं, 'जर असं असेल तर मग प्रत्येक गोष्ट करास्त म्हणायची?' त्यानं कपाळाला आठ्या घातल्या. 'आपले वडील फ्योदर पावलोविच हे सुव्वर होते पण त्यांचे विचार पुष्कळ बरोबर होते.' हे त्याच्या तोंडून बाहेर पडलं. एवढंच तो म्हणाला. राकीतीनपेक्षा हे काहीतरी बरं."

"होय," आल्योशाने सखेद संमती दर्शविली. "तो केव्हा आला होता तुझ्याकडं?"

"ते मागाहून, आत्ता मला दुसऱ्याच एका गोष्टीविषयी बोललं पाहिजे. मी इवानबद्दल पूर्वी तुला काहीच बोललेलो नाही. मी ते शेवटी बोलायला म्हणून ठेवलं. माझं इथलं काम संपलं आणि निकाल जाहीर झाला की मग मी तुला काही सांगेन. मी तुला सर्व काही सांगेन. काहीतरी प्रचंड आपल्या हाताशी आहे... अन् तू त्यासंबंधी मला बरं वाईट निकाल देणारा असशील पण त्याबद्दल आत्ता काही विचारू नकोस; गप्प राहा. तू उद्याबद्दल, त्या खटल्याबद्दल म्हणालास; पण, खरंच सांगतो, मला त्या संबंधानं काही माहीत नाही."

"तू वकिलाशी बोलला आहेस?"

"वकिलाचा काय उपयोग? मी त्या संबंधानं सर्व त्याला सांगितलं. तो नरम, शहरी वातावरणात वाढलेला ठग्या एक बर्नार्ड! पण त्याचा माझ्यावर विश्वासच बसत नाही—एवढासासुद्धा नाही. तो मानतो की मीच तो खून केला, आता पाहा म्हणजे झालं. मला ते दिसतं. 'तसं असेल तर माझी बाजू घ्यायला तुम्ही आलात कशाला?' असं मी त्याला विचारलं. मसणात गेले साले! तिकडं त्यांनी एक डॉक्टरही आणलेला आहे, मी वेडा आहे असं त्यांना सिद्ध करायचं आहे. मी ते चालू देणार नाही! कातिरीना इवानोव्ना आपलं 'कर्तव्य' शेवटपर्यंत करू

इच्छिते, मग ताण कितीही पडो ! " मीत्त्या वेदनापूर्ण हसला. " द्वेषी, क्रूर स्त्री ! मी मोक्रोयला तिच्या विषयी 'ती महाक्रोधी' स्त्री आहे असं म्हटलेलं तिला कळलं आहे. त्यांनी ते पुन्हा पुन्हा सांगितलं. होय, माझ्याविरुद्धच्या गोष्टी समुद्रातल्या वाळू-सारख्या असंख्य झाल्या आहेत. ग्रिगरी आपला मुद्दा घट्ट धरून बसला आहे. ग्रिगरी इमानी आहे, पण मूर्ख आहे. पुष्कळ माणसं इमानी असतात, कारण ती मूर्ख असतात; हा राकीतीनचा विचार बरं का ! ग्रिगरी माझा शत्रू आहे. अन् काही माणसं अशी असतात की ती मित्र असण्यापेक्षा शत्रू म्हणून असलेली बरी. कातिरीना इवानोवनासंबंधी मी हे म्हणतो. ते चार हजार दिल्यानंतर ती कशी जमिनीपर्यंत लवली ते ती सांगेल अशी मला भीती वाटते, होय, मला भीती वाटते. ती त्याची शेवटच्या फर्दिंगपर्यंत फेड करून घेईल. मला तिचा त्याग नको आहे; हे लोक खटल्यात माझ्या तोंडाला काळं लावणार. मला ते कसं सहन होणार कळत नाही. आल्योशा, तिच्याकडं जाऊन तिला सांग की कोर्टात हे बोलू नकोस, तू जाऊ नाही शकणार ? पण, जाऊ दे ते सारं मसणात, काही होवो मी कसातरी त्यातून निभावून जाईन. मी तिची कीव करीत नाही. हे तिनंच करून ठेवलेलं आहे. तिला जे मिळत आहे ते तिला योग्य प्रायश्चित्त आहे. मीही माझी हकीकत सांगेनच, अलेक्सी." तो पुन्हा वेदनायुक्त हसला. " एक...एक आहे " ग्रूशा, ग्रूशा ! परमेश्वरा ! तिला का या वेदना सहन कराव्या लागाव्यात ? " तो एकदम डोळ्यात पाणी आणून उद्गारला. " ग्रूशा मला मारून टाकते आहे; तिचा विचार मला मारून टाकतो आहे, अगदी मारून टाकतो आहे. ती आताच इथं येऊन गेली...."

" तू तिला आज फार दुःख दिलंस असं तिनं मला सांगितलं."

" होय, जळो माझा स्वभाव ! हा मत्सर आहे. मला दुःख झालं, ती चालली तेव्हा मी तिचं चुंबन घेतलं. मी तिला क्षमा कर म्हटलं नाही."

" का नाही म्हटलंस ? " आल्योशाने विचारले. एकदम मीत्त्या जणू उल्हासाने मोठ्याने हसला.

" आपण प्रेम करीत असलेल्या स्त्रीची एखाद्या चुकीबद्दल क्षमा मागणं ! त्यापासून परमेश्वर वाचवो तुला, माझ्या लाडक्या मुला. जिच्यावर आपण प्रेम करतो ना, तिची विशेषतः क्षमा मागणं म्हणतोय मी, मग आपला अपराध किती का मोठा असेना. कारण स्त्री म्हणजे स्त्रीचं काही कळणं अत्यंत कठीण ! काही असो मला मात्र त्याचं थोडं फार कळतं बरं का. पण एखाद्या स्त्रीला 'माझी चूक झाली' अशी कबुली देऊन पाहा. म्हण 'अरेरे, मला क्षमा कर,' की शिव्यांचा भडीमार होईल तुझ्यावर ! ती काही झालं तरी तुला स्पष्ट रीतीनं अन् सरळपणानं क्षमा नाही करायची, ती तुला धूळ खायला लावील, कधी न घडलेल्या गोष्टी उभ्या करील, नाही नाही त्या गोष्टींची आठवण करून देईल, काही विसरणार नाही,

आपल्या पदरचं तिखटमीठ लावील, आणि मग क्षमा करील. आणि त्यांच्यातल्या अगदी श्रेष्ठ घे, त्यासुद्धा असं करतात. ती सारी सालं खरवडून काढून तुझ्या डोक्यावर लादेल. त्या तुम्हाला उभं सोलून काढायला कमी करणार नाहीत, मी सांगतो तुला, अगदी सगळ्या एकजात, ज्याच्यावाचून आपण जगू शकत नाही त्या या सगळ्या देवता बरं! लाडक्या मुला, मी तुला स्पष्टपणानं न् अगदी झाकून न ठेवता सांगतो की प्रत्येक मर्यादशील पुरुषानं कोणीतरी स्त्रीच्या आज्ञेत असणं अवश्य आहे. हे माझं निश्चित मत– नुसतं निश्चित मत नव्हे अनुभूती समज. माणसानं उदारमनाचं असावं, ते काही त्याला दूषणास्पद नाही.! कोणाही वीर पुरुषाला, सीझर असला तरी त्यालासुद्धा ते दूषण नाही! पण म्हणून काही कशाही करिता स्त्रीची क्षमा कधी मागू नकोस. हा नियम तुला तुझा भाऊ मीत्या, जो स्त्रियांच्यामुळं धुळीला मिळाला, तो देत आहे. छेः, कसंही करून ग्रूशाशी तिची क्षमा न मागता मी मिळतं करून घेतलेलं बरं, तिची मी पूजा करतो, अलेक्सी, पूजा करतो. मात्र तिला ते दिसत नाही. हं अजूनही तिला वाटतंय की मी तिच्यावर पुरेसं प्रेम करीत नाही. अन् ती माझा छळ करते, आपल्या प्रेमानं मला छळते. मागं झालं ते काहीच नाही! मागं तिच्या आसुरी स्वभावातली वक्रता मला यातना देई, पण आता तिचा संपूर्ण आत्मा मी माझ्या आत्म्यात मिसळून टाकला आहे. अन् तिच्यामुळे मी स्वतःच माणूस बनलो आहे. ते आमचं लग्न करून देतील का? जर नाही दिलं तर मी मत्सरानं मरून जाईन. रोज काही ना काही माझ्या डोक्यात येतं... ती तुला माझ्याबद्दल काय म्हणाली?"

आल्योशाने त्या दिवशी ग्रूशिंका त्याला जे म्हणाली होती ते सर्व जसेच्या तसे सांगितले. मीत्याने ऐकून घेतले, पुनः पुन्हा काही गोष्टी सांगायला लावल्या, अन् त्याचे मन संतुष्ट झालेसे दिसले.

"म्हणजे मी मत्सर करतो याबद्दल ती रागावलेली नाही तर?" तो म्हणाला. "ती पुरेपूर स्त्री आहे! 'माझंही हृदय भयंकर आहे' अं? अहा, अशा भयंकर हृदयांवरच माझं प्रेम जडतं, अर्थात् कोणी माझा मत्सर केलेला मला खपणार नाही. मी तो सहन करू शकणार नाही. आम्ही मारामारी करू. पण मी तिच्यावर प्रेम करीन. तिच्यावर अपार प्रेम करीन. आमचं ते लग्न करून देतील का रे? शिक्षा झालेल्यांना ते लग्नाची परवानगी देतात का? हा प्रश्न आहे. अन् तिच्यावाचून मी जगूच शकणार नाही"...

मीत्या क्षुब्ध होऊन खोलीत इकडून तिकडे फेऱ्या घालू लागला. आता जवळ जवळ अंधार पडला होता. तो एकदम भयंकर त्रस्त झाल्यासारखा झाला.

"तेव्हा काहीतरी रहस्य आहे, ती म्हणते ना? आमचा तिच्याविरुद्ध काही कट आहे, आणि कात्या त्यात सामील आहे, असं तिला वाटतं. नाही, भल्या

ग्रूशिंका, तसं ते नाही ग. तुझ्या मूर्खपणाच्या बायकी पद्धतीनं तू अगदीच नेम चुक-लीस. आल्योशा, लाडक्या, मी सांगतो ! आमचं रहस्य काय ते मी सांगतो ' ”

त्याने आजूबाजूला बघितले, चट्कन् तो आल्योशाच्या अगदी जवळ गेला, तो त्याच्यापुढेच उभा होता, आणि रहस्याच्या आविर्भावात त्याच्या कानाशी बोलला, अर्थात् त्यांचे ऐकायला खरे म्हणजे तिथे कोणी नव्हते; म्हातारा वॉर्डर कोपऱ्यात डुलक्या घेत होता अन् एक शब्दही पहाऱ्यावर असलेल्या शिपायांच्या कानी जाणे शक्य नव्हते.

“ मी तुला आमचं रहस्य काय आहे ते सांगतो, ” तो त्याच्या कानात घाईघाईने कुजबुजला. “ तुला मी नंतर सांगावं म्हटलं होतं, कारण काहीही ठरवायचं झालं तरी तुझ्याशिवाय कसं ठरविणार ? तू माझं सर्वस्व आहेस. जरी मी इवान आपणांपेक्षा श्रेष्ठ आहे असं म्हटलं तरी तू माझा देव आहेस. तुझाच निर्णय होईल तसं ते ठरणार. कदाचित् तूच श्रेष्ठ असशील, इवान नाही. बरं का, हा सदसद्विवेक बुद्धीचा प्रश्न आहे, उच्च पातळीवरच्या विवेक बुद्धीचा— हे रहस्य इतकं महत्त्वाचं आहे की ते माझं मी ठरवू शकत नाही, आणि ते मी तुझ्याशी बोले-पर्यंत लांबणीवर टाकलं आहे. पण काही असलं तरी ते आता निश्चित करणं फार अवेळी होईल, कारण आपण निकालाची वाट पाहिली पाहिजे. निकाल दिला गेला की लगेच तू माझं भवितव्य ठरवायचं. आता ठरवू नकोस आता तुला सांगतो. तू ऐकून घे, पण निर्णय करू नकोस. स्वस्थ अन् गप्प राहा. मी तुला सर्व काही सांगतो मी फक्त तुला कल्पना काय आहे ती सांगतो, तपशील सांगत नाही, अन् तू गप राहा. प्रश्न करू नकोस. हालचाल करू नकोस. कबूल ? पण, खरंच या तुझ्या डोळ्यांचं काय करायचं ? तू जरी बोलला नाहीस तरी तुझे डोळे तुझा निर्णय बोल-तील अशी मला भीती वाटते. बाप रे ! मला भीती वाटते ! आल्योशा, ऐक ! इवान मी पळून जावं म्हणतो. मी कसं, काय, ते काही सांगत नाही; ते सारं विचार करून त्यानं ठरवलं आहे; ते सर्व जमवता येईल. खबरदार, निर्णय करू नकोस. मी ग्रुशाला घेऊन अमेरिकेला जायचं. ग्रूशाशिवाय मी जगू शकत नाही तुला माहीत आहे. त्यांनी जर तिला माझ्या मागून सैबेरियाला नाही येऊ दिलं तर काय? शिक्षा झालेल्यांना ते लग्न करू देतात का ? इवानला वाटतं देत नाहीत. अन् जर ग्रूशा नसेल तर मी तिथं भुयारात घण घेऊन काय करू ? मी फक्त त्या घणानं माझं डोकं फोडून घेईन ! पण, उलट, माझी सदसद्विवेक बुद्धी ? मी क्लेश सोसण्यापासून दूर पळालो असं होईल. एक इषारा मिळाला, अन् मी तो दूर सारला. मला मुक्तीचा एक मार्ग मिळाला अन् मी त्याकडं पाठ फिरवली. इवान म्हणतो की अमेरिकेत ' धंदा एकदा प्रस्थापित झाला ' म्हणजे, मी जमिनीखालच्या पेक्षा जास्त उपयोगी होऊ शकेन. पण मग आमच्या पृथ्वीच्या पोटातून करायच्या स्तुतिस्तोत्रांचं काय ? अमेरिका म्हणजे काय ? अमेरिका म्हणजे पुनः तोच वृथाभिमान ! आणि

अमेरिकेत सुद्धा फसवणूक मोठ्या प्रमाणात असावी असं मला वाटतं. मी क्रूसावर चढण्यापासून पळालो असं होईल ! मी हे तुला सांगतो आहे, अलेक्सी, कारण हे ज्याला समजू शकतं असा तूच एकटा आहेस. दुसरा कोणी नाही. इतरांना हा मूर्खपणा, पागलपणाच वाटतो, जे मी तुला स्तुतिस्तोत्रासंबंधी सांगितलं ते सारं. ते मला डोकं फिरलेला किंवा मूर्खच म्हणतील. माझं डोकं फिरलेलं नाही अन् मी मूर्खही नाही. इवानलाही त्या स्तुतिस्तोत्राचं महत्त्व कळतं. त्याला कळलं, पण तो जबाब देत नाही. तो बोलतच नाही. त्याचा त्या स्तोत्रावर विश्वास नाही. बोलू नको, बोलू नको. तुझी मुद्रा मला दिसते ! तू ठरवूनच चुकला आहेस. ठरवू नकोस, दया कर ! मी ग्रूशावाचून जगू शकत नाही. खटला होऊन जाईपर्यंत थांब ! "

बोलणं संपवलं तेव्हा मीत्या देहभान विसरला होता. त्याने आल्योशाचे दोन्ही हात घेऊन आपल्या खांद्यावर ठेवले, आणि त्याचे आर्जवी, तप्ती डोळे त्याच्या भावाच्या डोळ्यांवर खिळून राहिले.

" शिक्षा झालेल्यांना ते लग्न करू देत नाहीत, नाही का ? " त्याने पुन्हा तिसऱ्यांदा अजीजीच्या स्वरात विचारले.

आल्योशाने कमालीच्या आश्चर्याने ते ऐकले अन् त्याचे अंतःकरण अत्यंत द्रवले.

" एक गोष्ट मला सांग," तो म्हणाला, " इवान्चा तसा फार आग्रह आहे का, अन् ही कल्पना कोणाची ? "

" त्याचीच, त्याचीच, अन् त्याचा त्या बाबतीत आग्रह आहे. तो प्रथम मला भेटायला आला नाही, मग एक आठवड्यापूर्वी तो एकाएकी आला अन् त्यानं लगेच त्यासंबंधी भांडायला सुरुवात केली त्या बाबतीत त्याचा भयंकर आग्रह आहे. तो मला विचारीतच नाही, पळून जायचं म्हणून हुकूमच करतो. मी त्याचं मानीत का नाही या विषयी मनात शंकाही तो धरीत नाही, तरी मी जसं तुझ्यापुढं माझं अंतःकरण उघडं केलं तसं त्यालाही उघडं करून दाखवलं, अन् त्याला त्या स्तोत्रासंबंधीही बोललो. तो म्हणाला पळून जाण्याचं आपण जमवू; त्यानं सर्व काही शोध घेऊन ठेवला आहे. पण त्या विषयी मागाहून. तो अगदी त्यावर हट्टून बसला आहे. हा सारा पैशाचा मामला आहे; तो मी निसटून जावं या करिता दहा हजार खर्चणार आहे आणि मला अमेरिकेला जाण्याकरिता वीस हजार देणार आहे. दहा हजारांत आपण निसटून जाण्याचं व्यवस्थित जमवू असं त्याचं म्हणणं आहे "

" आणि त्यानं काही झालं तरी हे मला न सांगण्याबद्दल सांगितलं ? " आल्योशाने परत विचारले.

" कुणालाच न सांगण्याबद्दल, विशेषतः तुला न सांगण्याबद्दल, काही झालं तरी तुला न बोलण्याबद्दल त्यानं सांगितलं. तू माझ्यापुढं माझ्या विवेकबुद्धीच्या

रूपानं उभा राहाशील याची त्याला भीती वाटते यात संशय नाही. मी तुला सांगितलं म्हणून तू त्याला बोलू नकोस. काही झालं तरी त्याला सांगू नकोस."

"बरोबर आहे तुझं म्हणणं." आल्योशाने आपले मत सांगितले; "खटला पुरा होण्यापूर्वी काहीही ठरवणं अशक्य आहे. खटल्यानंतर तुझं तूच ठरवशील. त्या वेळी तुला स्वतःमध्येच तो नवा माणूस आढळेल अन् तो ठरवील."

"नवा माणूस, की पंडित जो पंडिती पद्धतीनं ठरवील, कारण मला वाटतं मी स्वतःच एक तिरस्करणीय पंडित आहे." मीत्या कडवटपणे हसून म्हणाला.

"पण, भाऊ, तर मग सुटका होण्याची तुला काही आशा नाहीच का?"

मीत्याने अस्वस्थपणे आपले खांदे उडविले अन् नकारार्थी आपले डोके हलविले.

"लाडक्या आल्योशा, तुझी जायची वेळ झाली," तो एकाएकी घाई करीत म्हणाला, "तो सुपरिंटेंडंट तिकडं यार्डात बोंबलतो आहे. तो तत्काळ इकडं येईल. आपण फार वेळ बसलो आहो; हे नियमाविरुद्ध आहे. मला झटकन् आलिंगन दे. माझं चुंबन घे! माझ्यावर क्रूसाचं चिन्ह कर, लाडक्या, तो क्रूस मला उद्या घेऊन जावा लागणार आहे."

त्यांनी एकमेकांना मिठी मारली अन् एकमेकांचे चुंबन घेतले.

"मीत्या एकदम म्हणाला, इवान मला पळून जायला सांगतो आहे, पण त्याच्या मनात मी ते दुष्ट कृत्य कलं, असंच खात्रीनं आहे."

दुःखपूर्ण स्मित त्याच्या ओठांवर चमकले.

"त्याचा त्यावर विश्वास आहे का हे तू त्याला विचारलंस?" आल्योशाने विचारले.

"नाही, मी नाही विचारलं. माझी इच्छा होती, पण मी विचारू शकलो नाही. मला तेवढं धैर्य झालं नाही. पण मला ते त्याच्या डोळयांवरून दिसलं. ठीक, नमस्ते!"

पुन्हा एकदा त्यांनी एकमेकांची चुंबने घेतली, आणि आल्योशा बाहेर पडणार एवढ्यात मीत्याने त्याला एकाएकी परत बोलावले.

"माझ्या समोर उभा राहा! हा असा!" अन् पुन्हा त्यानं आल्योशाचे हात धरले आणि ते आपल्या खांद्यावर ठेवले. त्याचा चेहरा पार फिका झाला. इतका की आता पडत चाललेल्या अंधारातसुद्धा तो भयंकर रीतीने उठून दिसत होता. त्याचे ओठ कंप पावले, त्याचे डोळे आल्योशावर रोखले गेले.

"आल्योशा, मला अगदी खरं खरं सांग, जणू तू परमेश्वरापुढं उभा आहेस असं मानून सांग. मी ते कृत्य केलं असं तू मानतोस? अगदी मनोमन तुला तसं वाटतं? पुरं पुरं सत्य सांग, खोटं बोलू नकोस!" जिवावर उदार झाल्यासारखा होऊन तो ओरडला.

आल्योशाला आपल्यापुढे सर्व काही वर वर उचलले जाते आहे असे वाटू लागले, अन् छातीत कुणी भोसकावे तसे त्याला झाले.

" रस ! तुझ्या काय मनात आहे ? " तो असहायपणे चाचपडत बोलला.

" पुरं पुरं सत्य, अगदी पुरं पुरं, बिल्कूल खोटं सांगायचं नाही ! " मीत्या पुन्हा म्हणाला.

" तू खुनी आहेस असं चुकूनसुद्धा मी कधी माझ्या मनात मानलेलं नाही ! " आल्योशाच्या हृदयाच्या गाभ्यातून कंपित स्वरात हे शब्द बाहेर पडले अन् त्याने आपला उजवा हात, जणू आपल्या शब्दांना ईश्वर साक्षी आहे असं सांगण्याकरिता, वर केला.

मीत्त्याचा चेहेरा प्रसन्नतेने उजळून गेला.

" धन्यवाद ! " त्याच्या तोंडून आस्ते उद्गार बाहेर पडला, जणू मूर्च्छा येऊन गेल्यानंतर माणसाने निःश्वास सोडावा तसा. " आता तू मला नवं जीवन दिलं आहेस. तुला खरं तरी वाटेल, या क्षणापर्यंत तुला हे विचारायची मला भीती वाटत होती, तुला, अगदी तुलासुद्धा. ठीक, आता जा ! मला उद्यासाठी तू बळ दिलं आहेस ईश्वर तुझं भलं करो ! जा, हं ! इवानवर प्रेम कर ! " मीत्याने शेवटचे शब्द उच्चारले.

आल्योशा अश्रुभरल्या डोळ्यांनी बाहेर पडला. मीत्यामध्ये आलेला हा अविश्वास, आपल्यावर—आल्योशावरसुद्धा त्याचा विश्वास बसू नये, या सर्वांमुळे आल्योशाच्या डोळ्यांपुढे आपल्या दुर्दैवी भावाच्या अंतरात जे असाध्य दुःख अन निराशा दाटलेली होती, तिची खोली स्पष्टपणे उघड झाली. प्रगाढ अमर्याद करुणेने तत्काळ त्याचे हृदय व्याकूळ होऊन गेले. त्याच्या विदीर्ण हृदयात एक मर्मभेदक वेदना होती. " इवानवर प्रेम कर "—त्याला एकदम मीत्त्याच्या शब्दांची आठवण झाली. आणि तो इवानकडेच चालला होता. दिवसभर त्याला इवानला भेटण्याची उत्कंठा लागून राहिली होती. त्याला जितकी मीत्याची चिंता वाटत होती, तितकीच इवानची वाटत होती आणि आता जर जास्तच.

५

तू नव्हेस, तू नव्हेस !

इवानकडे जाताना वाटेत त्याला कतिरिना इवानोवनाच्या घरावरून जावे लागत होते. खिडकीतून प्रकाश दिसत होता. तो अचानक थांबला अन् त्याने आत जाण्याचे ठरविले. एक आठवडा झाला तो कतिरिना इवानोवनाला भेटला नव्हता. पण आत्ता एकदम त्याच्या मनात आले की, इवान तिच्याकडे असेल, विशेषतः उद्याच्या त्या भयंकर दिवसाच्या या आदल्या रात्री तो तिथे गेलाच

असेल. घंटी वाजवून तो जिना चढून जाऊ लागला; जिन्यावर एक मिणमिणता चिनी कंदील लावलेला होता; चढत असताना त्याला कोणी मनुष्य खा ी येत असलेला दिसला अन् ते जसे एकमेकांना भेटले तसे त्याने आपल्या भावाला ओळखले. म्हणजे हा नुकताच कतिरिना इवानोवनाकडून निघाला होता म्हणायचा.

" अं ? तू आहेस होय ? " इवान शुष्क स्वरात म्हणाला. " ठीक, नमस्ते ! तू तिच्याकडं चालला आहेस ? "

" होय."

" तू जाऊ नयेस असा माझा तुला सल्ला आहे; ती अस्वस्थ मनःस्थितीत आहे अन तू तिला आणखी अस्वस्थ करशील."

इतक्यात वरचा एक दरवाजा खाड्कन उघडला गेला अन एकदम एक आवाज मोठ्याने बोलला.

" नाही, नाही ! अलेक्सी तू त्याच्याकडं जाऊन आलास काय ? "

" होय, मी त्याच्याकडंच होतो."

" त्यानं काही निरोप मला पाठवलाय ? वर ये आल्योशा, अन इवान तुम्हीपण परत आलं पाहिजे. आलंच पाहिजे ऐकलंत का ? "

कात्याच्या आवाजात असा काही हुकुमीपणा होता की इवानने, एक मिनिट मनाशी आढेवेढे घेतल्यानंतर, आल्योशाबरोबर परत जायचे ठरविले.

" ती ऐकत होती तर," तो स्वतःशीच रागाने पुटपुटला, पण आल्योशाने ते ऐकले.

दिवाणखान्यात जाताच इवान म्हणाला, " मी माझा ओवरकोट तसाच अंगावर ठेवल्याबद्दल माफ कर, मी बसणार नाही. एक मिनिटापेक्षा जास्त वेळ मी थांबणार नाही."

" अलेक्सी बैस खाली," कतिरीना म्हणाली, पण ती स्वतः उभीच राहिली. एवढ्या काळात तिच्यात फारसा फरक पडलेला नव्हता, पण तिच्या काळ्य भोर डोळ्यांत एक प्रकारची अनिष्टसूचक ठिणगी होती. त्या क्षणी ती आपल्याला विशेष मोहक जाणवल्याचे आल्योशाच्या मागाहून स्मरणात राहिले.

" मला त्यानं काम सांगायला तुला सांगितलंय ? "

" फक्त एक गोष्ट," आल्योशा निर्भीडपणे तिच्याकडे पाहून म्हणाला, " ती ही की तू उपकार करावेस अन् खटल्याच्या वेळी तुझ्यात.... अन् त्याच्यात (तो थोडासा गोंधळल्यासारखा झाला) ... तुमच्या पहिल्या ओळखीच्या प्रसंगी... त्या शहरात.... जे काही झाले त्यासंबंधी काही बोलू नयेस."

" हं ! त्या पैशासाठी मी खाली जमिनीपर्यंत त्याच्यापुढं लवले ते ! " ती एकदम कडवटपणे हसली. " का बरं, त्याला माझ्याबद्दल भीती वाटते की स्वतः-

बद्दल ? तो मला उपकार करण्याबद्दल सांगतो— कुणावर ? त्याच्यावर की माझ्यावर ? सांग, अलेक्सी ! ”

आल्योशा तिला समजण्याचा प्रयत्न करीत एकाग्रपणे तिच्याकडे पाहत राहिला.

“ दोघांवर— त्याच्यावर अन् तुझ्यावर, ” तो हलक्या स्वरात म्हणाला.

“ ऐकून मला आनंद वाटतो, ” ती खुनशीपणाने ताड्कन् बोलली अन् पटकन् शरमली.

“ तू अजून मला ओळखत नाहीस अलेक्सी फ्योदरोविच. ” ती धाकाच्या स्वरात म्हणाली. “ अन् मी स्वतःला अजून ओळखत नाही. कदाचित उद्या माझी तपासणी झाल्यानंतर तुम्ही मला पायांखाली तुडवू इच्छीत असाल. ”

“ तू आपली साक्ष प्रतिष्ठेला साजेल अशी द्यावी एवढीच इच्छा आहे. ” आल्योशा म्हणाला.

“ बायका नेहमीच प्रतिष्ठा सोडून वागतात. ” ती गुरकावून म्हणाली. “एक तासापूर्वीच मी मनात म्हणत होते की त्या राक्षसाला स्पर्श करायची मला भीती वाटत होती... जणू तो भयंकर सर्प असावा तशी... पण नाही, अजून तो माझ्या बाबतीत मनुष्यप्राणी आहे म्हणायचा ! पण ते कृत्य त्यानं केलं काय ? तो खुनी आहे काय ? ” ती अचानकपणे वाताचा झटका आल्याप्रमाणे चटकन इवानकडे वळून ओरडून म्हणाली. हा प्रश्न अगोदर तिने इवानला कदाचित आपण आलो त्यापूर्वी एक मिनिटच, अन् पहिल्यांदाच नव्हे तर शंभराव्यांदा विचारलेला असावा. आणि त्यांचे शेवटी भांडण झाले असावे हे आल्योशाला चटकन दिसून आले.

“ मी स्मिर्द्याखफला भेटायला गेले होते... त्यानं आपल्या बापाचा खून केला असं माझ्या मनात तुम्ही, तुम्हीच भरवलंत. तुमच्यावरच मी विश्वास ठेवला ! ” ती पुढे म्हणाली, अजून ती इवानला उद्देशूनच बोलत होती. तो तिच्याकडे पाहून ओढून ताणून आणल्याप्रमाणं हसला. तिच्या स्वराने आल्योशा एकदम दचकला. त्यांच्यात इतकी सलगी असल्याचा त्याला कधी संशय आला नव्हता.

“ हं, काही असो, झालं हे पुष्कळ झालं. ” इवानने संभाषण मध्येच तोडले. “ मी चाललो, उद्या येईन. ” अन् एकदम मागे फिरून तो खोलीच्या बाहेर पडला, अन् सरळ खाली उतरला.

हुकमी आविर्भावात कतिरिना इवानोवनाने आल्योशाचे दोन्ही हात धरले.

“ त्याच्या मागोमाग जा ! त्याला गाठ ! एक मिनिटभर त्याला एकटं सोडू नकोस ! ” ती घाईघाईने हलक्या स्वरात म्हणाली, “ त्याचं डोकं फिरलंय. त्याचं डोकं फिरलंय तुला माहीत नाही ? तो तापात आहे. मज्जातंतूच्या तापात. डॉक्टरांनी मला तसं सांगितलंय. जा, पळ त्याच्या मागं... ”

आल्योशानं झेप टाकली अन् तो इवानच्या मागे धावत गेला, तो पन्नास पावले काही गेला नव्हता.

"काय हवं तुला ?" आल्योशा आपल्यामागे धावत येतो आहे हे पाहून तो चटकन मागे वळून म्हणाला. तिनं तुला मला गाठायला सांगितलं ना, कारण माझं डोकं फिरलंय. मला ते सारं पाठ झालंय."

"तिची समजूत चुकीची आहे अर्थात, पण तू आजारी आहेस हे तिचं म्हणणं बरोबर आहे." आल्योशा म्हणाला. "मी तुझ्या चेहऱ्याकडे आता पाहत होतो. तू फार आजारी दिसतोस इवान."

इवान न थांबता चालू लागला. आल्योशा त्याच्या मागोमाग चालला.

"अन् तुला माहीत आहे का, अलेक्सी, लोकांची डोकी कशी फिरतात ते ?" इवानने अचानकपणे संथ आवाजात त्रासिकपणाचा मागमूसही न दर्शविता, अगदी साध्याभोळ्या जिज्ञासेच्या स्वरात विचारले.

"नाही, मला माहीत नाही. वेडेपणाचे नाना प्रकार असतात अशी माझी समजूत आहे."

"अन् आपण वेडे झालो आहोत हे ज्याचं त्याला पाहता येतं ?"

"तशा परिस्थितीत स्वतः स्वतःला स्पष्टपणे माणूस पाहू शकत नाही अशी माझी कल्पना आहे." आल्योशाने चकित होऊन उत्तर दिले.

इवान अर्धा एक मिनिट गप्प राहिला.

"जर तुला माझ्याशी बोलायची इच्छा असेल तर कृपा करून विषय बदल." तो एकदम म्हणाला.

"हो, त्याचा मी विचार करतो, तोवर हे पत्र तुझ्यासाठी आहे," आल्योशा भीतभीत म्हणाला, अन् त्याने लिझाचे पत्र आपल्या खिशातून काढून इवानपुढे धरले. ते यावेळी एका दिव्याच्या खांबाखाली आले होते. इवानने चटकन् हस्ताक्षर ओळखले.

"हं, त्या छोट्या राक्षशिणीकडून होय !" तो खुनशीपणाने हसला, आणि ते पाकीट न उघडताच त्यानं त्याचे तुकडे तुकडे करून ते हवेत फेकून दिले. ते तुकडे वाऱ्याने इकडे तिकडे विखुरले.

"अजून सोळा वर्षांची झाली नाही, मला वाटतं, अन् एवढ्यात स्वतःला देऊ करते," तो रस्त्यावरून ढांगा टाकीत जात जात तिरस्काराने म्हणाला.

"'स्वतःला देऊ करते' म्हणालास, त्याचा अर्थ काय ?" आल्योशा एकदम उद्गारला.

"स्वेच्छाचारी स्त्रिया जशा स्वतःला देऊ करतात तसंच, दुसरं काय ?"

"असं कसं बोलवतं तुला, इवान कसं बोलवतं ?" आल्योशा दुःखपूर्ण स्वरात रागाने म्हणाला. "ती लहान मुलगी आहे; तू लहान मुलीचा अपमान करतो

आहेस ! ती आजारी आहे; तीसुद्धा फार आजारी आहे. तीही कदाचित् वेडी होण्याच्या बेतात आहे...तुझ्याकडून मी काही ऐकण्याची आशा बाळगली होती.. त्यानं ती वाचेल."

"माझ्याकडून तुला काही ऐकायला मिळणार नाही. ती कुक्कुलं बाळ असेल तर मी काही तिची दाई नव्हे. शांत हो, अलेक्सी. तिच्या संबंधानं बोलणं वाढवू नकोस. त्याबद्दलचा विचारही माझ्या मनात नाही."

ते क्षणभर पुन्हा स्तब्ध झाले.

"ती आता रात्रभर प्रभूच्या मातेपुढे उद्या खटल्याच्या वेळी कसं वागावं त्याचा मार्ग दाखव म्हणून प्रार्थना करीत राहील." तो तीक्ष्ण स्वरात अन् पुन्हा रागावून म्हणाला.

"तू... तू कतिरीना इवानोवनाविषयी म्हणालास ?"

"होय. आपण मीत्त्याला वाचवायचं की धुळीला मिळवायचं, याबद्दल वरून आपल्याला प्रकाश मिळावा अशी ती प्रार्थना करील. तिला स्वतःला निश्चय करता येत नाही, तिला अजून ठरवायला वेळ मिळाला नाही. ती सुद्धा मला आपली दाई समजते. मी तिला अंगाई गीत म्हणून झोपवावं अशी तिची इच्छा आहे."

"कतिरिना इवानोवनाचं तुझ्यावर प्रेम आहे, भाऊ." आल्योशा दुःखित स्वरात म्हणाला.

"असेल; पण मी काही तिच्यावर लक्ष लावून बसलेलो नाही."

"ती क्लेश भोगते आहे. केव्हा केव्हा तू... अशा गोष्टी का बोलतोस की, ज्यामुळं तिला आशा वाटावी ?" आल्योशा भीतभीत ठपका देत म्हणाला. "तू तिला आशा दाखविली आहेस हे मला माहीत आहे. असं मी तुला बोलतो आहे याबद्दल मला क्षमा कर," तो पुढे म्हणाला.

"मी तिच्याशी जसं वागलं पाहिजे तसं वागू शकत नाही. पूर्णपणे तोडून टाकायचं अन् तसं तिला सरळ सरळ सांगून टाकायचं," इवान त्रासिकपणे म्हणाला. "खुनी माणसाला शिक्षा दिली जाईपर्यंत मला थांबलं पाहिजे. आताच जर मी तिचा संबंध तोडला, तर ती त्या बदमाषाचा उद्या खटल्याच्या वेळी सर्वनाश करून त्याचा माझ्यावर सूड घेईल, कारण ती त्याचा द्वेष करते अन् आपण द्वेष करतो हे तिला माहीत आहे. हा सारा खोटेपणा आहे— एका खोट्यावर दुसरं खोटं ! जोपर्यंत मी तिच्याशी संबंध तोडलेला नाही, तोपर्यंत ती आशा करीत राहील, अन् ती त्या राक्षसाचा सत्यानाश करणार नाही, त्याला मी आपत्तीतून किती वाचवू इच्छितो हे तिला माहीत आहे. फक्त तो निकाल बाहेर पडला पाहिजे !"

'खुनी माणूस' अन् 'राक्षस' या शब्दांचा वेदनाजनक प्रतिध्वनी आल्योशाच्या अंतःकरणात उमटला.

"पण ती कसा काय मीत्याचा सत्यानाश करणार ?" त्याने इवानच्या उद्‌गारांचा विचार करीत विचारले. "असा कोणता पुरावा ती देऊ शकणार की ज्यामुळं मीत्याचा नाश होईल ?"

"तुला अजून ते माहीत नाही. तिच्या हाती मीत्याच्या स्वतःच्या हस्ताक्षरातला एक कागद आहे, त्यावरून त्यानंच फ्योदर पावलोविचचा खून केला असं पुरतं सिद्ध होणार आहे."

"ते अशक्य आहे !" आल्योशा म्हणाला.

"का अशक्य ? तो कागद मी स्वतः वाचलाय !"

"असा कागद असणंच शक्य नाही !" आल्योशा गरम होऊन म्हणाला. "तो असूच शकत नाही, कारण तो खुनी नाही. बाबांचा खून त्यानं केलेला नाही, त्यानं केलेला नाही !"

इवान एकदम थांबला.

"मग, तुझ्या म्हणण्याप्रमाणं, खुनी कोण ?" त्याने वर वर बेदरकारी दाखवून विचारले. त्याच्या स्वरात एक प्रकारचा उद्दामपणाही होता.

"तुला माहीत आहे कोण तो," आल्योशा हलक्या पण आरपार घुसणाऱ्या स्वरात उद्‌गारला.

"कोण ? तो चक्रम् वेडा, तो फेपरं येणारा, स्मिर्दाकफ म्हणतोस तू ?"

आल्योशाला आपले सर्वांग थरथर कापत आहेसे जाणवले.

"तुला माहीत आहे, कोण," न आवरून त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले. त्याचा श्वास रुंधल्यासारखा झाला.

"कोण ? कोण ?" इवान जणू वाघासारखा हिंस्र होऊन ओरडला. त्याचा सारा संयम पार नाहीसा झाला.

"मला एक गोष्ट फक्त माहीत आहे," आल्योशा, अजूनही कुजबुजत्या स्वरात बोलल्याप्रमाणे, बोलू लागला,

"वडिलांचा खून तू केलेला नाहीस."

"तू केलेला नाहीस ! 'तू केलेला नाहीस' म्हणजे तुला काय म्हणायचंय !" इवान दिङ्मूढ होऊन म्हणाला.

"वडिलांचा खून तू केलेला नाहीस, तू केलेला नाहीस !" आल्योशा दृढपणे पुन्हा म्हणाला.

अर्धा एक मिनिट स्तब्धता पसरली.

"मला माहीत आहे मी केलेला नाही ते. तू बरळतो आहेस काय ?"

इवान फिके, विरूप स्मित करून म्हणाला. त्याचे डोळे आल्योशावर खिळले होते. ते पुन्हा एका दिव्याच्या खांबाखाली उभे राहिले होते.

"नाही, इवान, तू अनेक वेळा स्वतःला म्हणाला आहेस की मी खुनी आहे."

"केव्हा म्हटलं मी असं? मीं तर मॉस्कोत होतो...केव्हा म्हटलं मी असं?" इवान असहाय्यपणे चाचपडत बोलला.

"या गेल्या दोन भयानक महिन्यांत एकटाच असताना तू असं स्वतःशी अनेक वेळा म्हणाला आहेस," आल्योशा पूर्वीप्रमाणेच हलक्या पण स्पष्ट आवाजात बोलत राहिला. तथापि या वेळी तो बोलत होता ते जणू त्याचे स्वतःचे शब्द नव्हते, जणू स्वतःच्या इच्छेने तो बोलत नव्हता, तर दुर्निवार अशा कोण्या आज्ञेचे तो पालन करीत होता. "तू स्वतःला आरोप लावून घेतला आहेस अन् स्वतःशी कबुली दिली आहेस की तू खुनी आहेस, दुसरा कुणी नाही. पण तू तो खून केलेला नाहीस; तुझी समजूत चुकीची आहे; तू तो खुनी नाहीस. ऐकतोस ना तू? तो तू नाहीस! तुला तसं सांगायला ईश्वरानं मला पाठवलं आहे."

ते दोघे स्तब्ध होते. ती स्तब्धता सबंध एक मिनिट राहिली. ते दोघेही निश्चल, एकमेकांच्या डोळ्यात न्याहाळून पाहत उभे होते. ते दोघेही फिके पडले होते. अचानक इवानचे सर्वांग कापू लागले, अन् त्याने आल्योशाचा खांदा घट्ट पकडला.

"तू माझ्या खोलीत आला होतास!" तो घोगऱ्या स्वरात पुटपुटला. "तो आला तेव्हा तू रात्री तिथं आला होतास....कबूल कर....तू त्याला पाहिलंस, तू त्याला पाहिलंस?"

"कुणाला म्हणतोस? मीत्याला?" आल्योशाने गोंधळून जाऊन विचारलं.

"तो नव्हे, तो राक्षस जाऊ दे मसणात!" इवान उन्मादात ओरडला. "तो मला भेटतो हे तुला माहीत आहे? तुला कसं समजलं? बोल!"

"कोण आहे तो? तू कुणाबद्दल बोलतो आहेस ते मला माहीत नाही," आल्योशा अडखळत म्हणाला, त्याला आता भय वाटू लागले.

"होय, तुला माहीत असलंच पाहिजे...नाहीतर तुला कसं...? तुला माहीत नाही हे शक्य आहे."

एकाएकी त्याने स्वतःला रोखले. तो स्तब्ध उभा राहिला अन् विचारात पडल्यासारखा झाला. विचित्र हास्याने त्याचे ओठ वेडेवाकडे झाले.

"भाई," आल्योशा पुन्हा कापऱ्या आवाजात बोलू लागला, "मी तुला हे बोललो कारण तू माझ्या शब्दावर विश्वास ठेवशील, मला माहीत आहे ते. मी तुला एकदाच शेवटचं सांगतो की तो तू नाहीस. ऐकलंस, शेवटचं! हे तुला

सांगावं म्हणून परमेश्वराने माझ्या अंतःकरणात ते घातलं, मग त्यामुळं तू माझा या घटकेपासून द्वेष करू लागलास तरी हरकत नाही."

पण एवढ्या वेळात इवानने आपला स्वतःवरचा ताबा परत मिळविला होता.

"अलेक्सी, फ्योदरोविच," तो भावनाशून्य स्मित करीत म्हणाला, "प्रेषितांना न् अपस्मार झालेल्यांना–विशेषतः ईश्वराचा संदेश घेऊन आलेल्यांना मी खपवून घेऊ शकत नाही अन्' हे तुला चांगलंच माहीत आहे. या क्षणापासून तुझा माझा संबंध संपला अन् बहुधा कायमचा संपला समज. या वळणावर तू मला कृपा करून सोडून निघून जा. तुझ्या बिऱ्हाडाकडंही जायला तिथून वाट आहे. अन् माझ्याकडं आज यायचं नाही हे विशेषेकरून लक्षात ठेव! ऐकलंस?"

तो वळला अन् खंबीर पावले टाकीत मागे न पाहाता तो चालू लागला.

"भाई," आल्योशा त्याला मागून हाक मारून म्हणाला, "जर तुला आज काही झालं तर कुणाकडंही जाण्यापूर्वी माझ्याकडं ये!"

पण इवानने उत्तर दिले नाही. आल्योशा, इवान अंधारात दिसेनासा होई-पर्यंत चौरस्त्यावर त्या दिव्याच्या खांबाखाली उभा राहिला. मग तो वळून हळूहळू घराकडे चालला. आल्योशा अन् इवान दोघे भाड्याने खोल्या घेऊन राहिले होते. फ्योदर पावलोविचच्या रिकाम्या घरात राहायला दोघांपैकी एकही तयार नव्हता. आल्योशाला कोणा कामकरी लोकांच्या घरात आवश्यक तेवढे सामान असलेली खोली मिळाली होती. इवान त्याच्यापासून काही अंतरावर राहत होता. त्याने एका सरकारी अधिकाऱ्याच्या विधवा, सुखवस्तू बाईच्या सुरेख घराला लागून एक सुखसोयींनी युक्त असा हवाशीर बंगला होता, त्यात एक खोली घेतली होती. त्याची एकच एक नोकर म्हातारी बाई होती ती बहिरी अन संधिवात झालेली होती. ती संध्याकाळी सहा वाजले की झोपी जाई अन् सकाळी सहा वाजता उठे. अलीकडे इवानचे स्वतःच्या सुखसोयीकडे विशेष दुर्लक्ष झालेले होते अन त्याला एकान्तात एकटे बसण्याचा नाद लागला होता. तो स्वतः राहत असलेल्या त्या एका खोलीत स्वतःच स्वतःचे सारे करीत असे, अन त्याच्या बंगल्याच्या इतर खोल्यांपैकी कोणाच्याही खोलीत तो क्वचितच जात असे.

तो त्या घराच्या फाटकापाशी पोचला आणि त्याने घंटीवर हात ठेवला अन एकदम तो थांबला. आपण संतापाने थरथर कापतो आहोत असे त्याला वाटले. एकदम त्याने घंटीवरचा हात काढला, एक शिवी हासडून तो मागे वळला, आणि त्वरित गतीने पावले टाकीत उलट्या दिशेने चालला. तो दीड एक मैल चालून एका लहानशा, ढळत्या, लाकडी घराकडे– घराकडे म्हणण्यापेक्षा झोपडीकडे गेला; तिथे मार्या कोन्द्रात्येवना राहात होती, ती फ्योदर पावलोविचच्या घराच्या शेजारी राहत असे अन त्याच्या स्वैपाकघराकडे सूप घेऊन जाण्याकरिता येत असे; स्मेर्दियाकानं एकदा हिलाच आपली गाणी गिटारवर म्हणून दाखविली होती,

तिने आपले ते लहानसे घर विकून टाकले होते अन् आता आपल्या आईबरोबर ती इथे राहत होती. स्मिर्याखफ आजारी अन् मरणोन्मुख झाला होता तो फ्योदर पावलोविचच्या मृत्यूनंतर त्यांच्याचकडे राहात होता. त्याच्याकडेच इवान या वेळी एका अकस्मात अन दुर्विचार प्रेरणेने, चालला होता.

६

स्मिर्याखफशी पहिली मुलाखत

ही इवानची मॉस्कोहून परत आल्यानंतरची स्मिर्याखफला तिसऱ्यांदा भेट होती. पहिल्या खेपेला तो त्याला भेटून त्याच्याशी बोलला होता तो इथे आल्याच्या पहिल्या दिवशी, मग एका पंधरवड्यानंतर तो पुन्हा एकदा त्याला भेटला होता. पण या दुसऱ्या भेटीनंतर तो पुन्हा त्याला भेटायला आला नव्हता, म्हणजे आता त्याला भेटून त्याला महिन्यावर काळ होऊन गेला होता, आणि त्याची बातमीही त्याला काही ऐकायला मिळाली नव्हती.

इवान आपल्या बापाच्या मृत्यूला पाचच दिवस झाल्यानंतर परत आला होता, त्यामुळे तो दफनाच्या वेळी हजर नव्हता. ते तो परत आला त्याच्या आदल्या दिवशीच होऊन गेले होते. त्याला यायला विलंब लागला याचे कारण आल्योशाला त्याच्या मॉस्कोचा पत्ता माहीत नसल्यामुळे कतिरीना इवानोवनाला त्याला तार करून कळविण्याला विनंती करावी लागली होती. आणि तिलाही त्याचा पत्ता माहीत नसल्य मुळे, तिने आपल्या बहिणीला अन् मावशीला तार करून कळविले होते, असा अंदाज मनात धरून की इवान मॉस्कोला पोचताच त्यांना भेटायला जाईल. पण तो तिथे पोचल्यानंतर चार दिवस त्यांच्याकडे गेलाच नाही. त्याला तार मिळ-ताच अर्थात तो ताबडतोब इकडे यायला त्वरेने निघाला. त्याला पहिला भेटला तो आल्योशा. अन् इवानला, शहरात जे एक सर्वसामान्य मत पसरले होते त्याच्या विरूद्ध आल्योशा दिसला अन् त्याला आश्चर्य वाटले; त्याने मीत्याच्या बाबतीत संशय बाळगण्याला साफ नकार दिला. अन् स्मिर्याखफ हाच खुनी आहे असे उघडपणे सांगितले. पुढे पोलिस कॅप्टनला अन् सरकारी वकिलाला भेटल्यानंतर, आणि आरोपाचा अन् अटकेचा तपशील ऐकल्यानंतर त्याला आल्योशाबद्दल अधिकच आश्चर्य वाटले आणि त्याचे ते मत त्याच्या मीत्याविषयीच्या अतिरेकी बंधुप्रेम मुळे अन् सहानुभूतीमुळे झाले असले पाहिजे असा त्याने त्याचा अर्थ लावला; आल्योशाला मीत्याचा फार लळा होता हे इवानला माहीत होते.

जाता जाता,एकदोन शब्द इवानच्या दमीत्रिसंबंधीच्या भावनेबद्दल सांगायचे आहेत. त्याला त्याच्याविषयी निश्चितपणे नावड होती, जास्तीत जास्त म्हटले तर केव्हातरी त्याच्याबद्दल दयाबुद्धी वाटत होती, तरी त्यातसुद्धा मोठ्या अंशाने

तिटकारा, नव्हे जवळ जवळ उबग मिसळलेला असायचा. मीत्याचे सबंध व्यक्तित्व नव्हे त्याचे रूपसुद्धा, त्याला खूपच अनाकर्षक वाटे. कतिरीना इवानोवनाला आपल्या भावाविषयी वाटणाऱ्या प्रेमाकडे तो उद्वेगाने पाही. तरी तो आल्याबरोबर पहिल्या दिवशी मीत्याला भेटायला गेला, आणि त्या भेटीने, इवानचे त्याच्या अपराधीपणाविषयीचे मत डळमळीत होण्याऐवजी उलट ते अधिक दृढच झाले. त्याला त्याचा भाऊ खळबळत्या, घाबरून प्रक्षुब्ध असलेल्या मनःस्थितीत दिसला. मीत्या बडबडत पुष्कळ होता, पण त्याचे लक्ष ठिकाणावर नव्हते अन तो असंगत बोलत होता. तो शिव्याशापाची भाषा वापरीत होता, स्मिर्द्याखफवर आरोप करीत होता, अन त्याच्या डोक्यात भयंकर गोंधळ उडालेला होता. तो मुख्यतः त्या तीन हजार रुबलांविषयी बोलत होता, ते आपल्या बापाने आपले 'चोरले' असे तो म्हणाला

"तो पैसा माझा होता, तो माझा पैसा होता," मीत्या एकसारखा हेच बोलत होता. "जरी मी तो चोरला असता तरी माझा त्याच्यावर हक्कच होता."

आपल्या विरुद्ध असलेल्या पुराव्याविषयी त्याने हरकत घेतली नाही, आणि जर एखाद्या गोष्टीचा स्वतःला लाभ करून घेण्याचा त्याने प्रयत्न केला असला तरी तो मूर्खपणाच्या अन् असंबद्ध रीतीने केला. इवानपुढे किंवा आणखी कुणापुढे स्वतःचा बचाव करण्याची इच्छा त्याने व्यक्त केलीच नाही. उलट त्याच्याविरुद्ध केलेल्या आरोपांनी त्याला राग येत होता अन् तो त्यांचा अहंकारयुक्त तिरस्कार करीत होता; तो एकसारखा आग ओकीत होता अन् प्रत्येकाला शिव्या देत होता. तो फक्त ग्रिगरीच्या उघड्या दरवाज्याविषयीच्या साक्षीला तुच्छतापूर्वक हसला आणि म्हणाला की 'तो सैतानानं उघडला असला पाहिजे.' पण तो त्या वस्तुस्थितीचा काही सुसंबद्ध असा खुलासा पुढे ठेवू शकला नाही. त्याने इवानच्या पहिल्या मुलाखतीत तर त्याचा अपमानसुद्धा करायला कमी केले नाही, तो त्याला तीक्ष्ण शब्दात म्हणाला की 'प्रत्येक गोष्ट कायदेशीर आहे' असे म्हणणाऱ्या लोकांनी आपल्याविषयी शंका घेणे आणि आपली झडती घेणे हे त्यांचे काम नाही." एकंदरीने त्या प्रसंगी तो इवानशी काही मित्रत्वाने वागला नाही. मीत्याशी झालेल्या त्या मुलाखतीनंतर, इवान पहिल्यांदाच स्मिर्द्याखफला भेटायला गेला.

मॉस्कोहून परत येताना वाटेत आगगाडीत तो स्मिर्द्याकफचा विचार अन् तिथून जाण्यापूर्वी आदल्या सायंकाळी त्याच्याशी झालेले आपले संभाषण मनात घोळवीत आला होता. अनेक गोष्टी त्याला कोड्यात टाकण्यासारख्या अन् शंकास्पद वाटत होत्या. पण जेव्हा त्याने तपासणी वकिलापुढे आपली साक्ष दिली, त्या वेळी तो त्या संभाषणासंबंधी तूर्त काही बोलला नाही. स्मिर्द्याखफला भेटेपर्यंत त्याने ते पुढे ढकलले, स्मिर्द्याखफ त्या वेळी इस्पितळात होता.

डॉक्टर हर्झेनस्तुब व त्याला इस्पितळात भेटलेले डॉक्टर वार्विन्स्की यांनी इवानच्या पुन्हा पुन्हा विचारलेल्या प्रश्नांना विश्वासपूर्वक उत्तर दिले की स्मिर्द्याखफचा अपस्माराचा झटका हा निश्चितपणे खरा होता. आणि त्या अनर्थाच्या दिवशी त्याने ढोंग केले नसेल कशावरून ? या इवानच्या प्रश्नाचे त्यांना खरोखरी आश्चर्यच वाटले. हा झटका अपवादात्मक असा होता, कारण फिट्स बराच वेळ टिकत होत्या अन् त्या फार वेळा पुन्हा पुन्हा येत होत्या, त्यामुळे रोग्याच्या जीवाला निश्चितपणे धोका होता, अन् त्यांनी उपाययोजना केल्यानंतर आताच कुठे त्यांना विश्वासपूर्वक रोगी वाचेल असे सांगणे शक्य झाले होते. डॉक्टर हर्झेनस्तुब म्हणाले की, "त्याच्या बुद्धीवरसुद्धा त्याचा बराच काळपर्यंत वाईट परिणाम होण्याचा मोठा संभव आहे, कायमची गेली नाही म्हणजे मिळविली." म्हणजे या वेळी तो वेडा झाला आहे असे समजायचे का ? या इवानने उतावळीने विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी सांगितले की तसा पूर्ण अर्थाने वेडा म्हणण्यासारखी, अजून तरी स्थिती नाही, तरी काही विचित्र लक्षणे दिसून येतात. ती विचित्र लक्षणे काय हे इवानने स्वतःच शोधून काढण्याचे ठरविले.

इस्पितळात त्याला रोग्याला भेटण्याची चटकन् परवानगी मिळाली. स्मिर्द्याखफ एका अलग दालनात एका चाके लावलेल्या पलंगावर पडलेला होता. त्या खोलीत दुसरा फक्त एकच बिछाना होता, आणि त्यावर शहरातील एक व्यापारी पडलेला होता, जलोदराने तो सुजला होता, तो जवळ जवळ मृत्युपंथाला लागलेला होता; त्यांच्या संभाषणात त्याची अडचण होण्याचा संभव नव्हता. इवानला पाहून स्मिर्द्याखफ साशंकपणे हसला, अन् सकृद्दर्शनी घाबरलेला दिसला. निदान इवानला तरी तसे वाटले. पण ते फक्त क्षणिकच होते. पुढे मग सर्व वेळ तो स्मिर्द्याखफच्या स्थिरवृत्तीने उलट चकितच झाला. पहिल्या दृष्टिक्षेपातच तो फार अशक्त झाला होता; तो सावकाशीने बोलला होता, त्याची जीभ कष्टाने हालत असावी असे वाटत होते; तो पूर्वीपेक्षा अधिक बारीक अन् पिवळट झाला होता. त्यांच्या वीस मिनिट चाललेल्या सबंध मुलाखतीभर तो आपले डोके दुखत असल्याची अन आपल्या सर्वांगात कळा येत असल्याची तक्रार करीत होता. त्याचा बारीक बायकी चेहरा फारच लहान झाल्यासारखा वाटत होता; त्याचे केस विस्कटलेले होते, आणि त्याच्या कुरळ्या केसांच्या पुढे आलेल्या बटांच्या पातळ जटा वळल्या होत्या. पण त्याचा डावा डोळा, जो आकसलेला अन् काही वक्रता दर्शवीत असल्यासारखा होता, त्यात स्मिर्द्याखफ बदललेला नाही याचे दर्शन होत होते. "हुशार मनुष्याशी बोलणं नेहमीच फायद्याचं असतं." इवानला एकदम त्याच्या या उद्‌गारांची आठवण झाली. तो त्याच्या पायथ्याशी असलेल्या स्टुलावर बसला. स्मिर्द्याखफने, वेदनापूर्ण कष्टाने आपली अंथरुणावरची कूस बदलली, पण पहिल्यांदा तो बोलला नाही. तो गप्प राहिला, आणि फारशी आस्थाही त्याने दाखविली नाही.

"तुला माझ्याशी बोलता येईल का ?" इवानने विचारले. "मी तुला फार थकवा येण्याजोगं करणार नाही."

"अवश्य बोलू शकेन," स्मिर्द्याखफ अस्पष्ट आवाजात तोंडातल्या तोंडात बोलला. "आपल्याला परत येऊन बरेच दिवस झाले का ?" एखाद्या भेटीला आलेल्या बुजऱ्या माणसाला उत्तेजनपर बोलावे तशा रीतीने तो बोलला.

"मी आजच आलोय....इथं तुम्ही जो सारा गोंधळ करून ठेवलाय तो बघायला."

स्मिर्द्याखफने उसासा टाकला.

"तू का उसासा टाकतोस ? तुला याची पहिल्यापासून माहिती होतीच !" इवान तोडून बोलला.

स्मिर्द्याखफ थोडा वेळ काही भावना न दर्शविता स्तब्ध राहिला.

"मला माहिती झाल्यावाचून कसं राहील ? ते अगोदरच स्पष्ट होतं. पण त्याला असं रूप येईल हे मी कसं सांगू शकलो असतो ?"

"काय रूप येईल ? उगीच चुकवाचुकवीची विधानं करू नकोस ! तू अगोदरच बोलला होतास की मला फिट येईल, खाली तळघरात जाताना– माहीत आहे ना ? तू अगदी स्थळसुद्धा बोलला होतास."

"तुम्ही आतापर्यंतच्या तपासणीत असंच सांगितलं आहे काय ?" स्मिर्द्याखफने स्वस्थचित्ताने विचारले.

इवानला एकदम राग आला.

"नाही, अजून मी सांगितलेलं नाही, पण सांगणार यात शंका नाही. शहाण्या माणसा, तू पुष्कळ खुलासा केला पाहिजेस, अन् मी तुला सांगून ठेवतो की मी तुला माझ्याशी चाळे करू देणार नाही."

"मी कशाला तुझ्याशी चाळे करू ? मी तर माझा सारा विश्वास सर्वशक्तिमान परमेश्वरावर टाकतात तसा तुमच्यावर टाकला आहे !" स्मिर्द्याखफ त्याच थंड मनोवृत्तीने, फक्त एक क्षणभर आपले डोळे मिटून, म्हणाला.

"पहिली गोष्ट म्हणजे," इवान म्हणाला, "अपस्माराच्या फिट्स केव्हा येतील हे अगोदर सांगणं शक्य नसतं. त्याची मी चौकशी केली आहे, मला फसवण्याचा प्रयत्न करू नकोस. त्याबद्दलचा दिवस अन् ताससुद्धा अगोदर सांगता येत नसतो. तू कसा मला तो दिवस अन् तो तास, आणि त्या तळघराबद्दलसुद्धा, अगोदर सांगितलंस ? तू जर जाणूनबुजून फिटचं ढोंग आणलं नव्हतंस तर आपण फिट येऊन तळघराच्या पायऱ्यांवरून खाली पडू असं तुला कसं सांगता आलं ?"

"काही म्हटलं तरी मला तळघराकडं दिवसातून अनेकदा जावं लागतच होतं की नाही," स्मिर्द्याखफ मुद्दाम ओढून आवाज काढीत बोलला. "मी असाच एक वर्षापूर्वी माळ्यावरून खाली पडलो होतो. फिटसंबंधानं दिवस अन् वेळ

आगाऊ सांगता येत नाही हे अगदी खरं आहे, पण आपल्याला आगाऊ त्याची सूचना मिळते."

" पण तू अगदी दिवस अन् ताससुद्धा आगाऊ सांगितलास ! "

" माझ्या अपस्माराच्या बाबतीत, साहेब, आपण इथल्या डॉक्टरांच्याकडं चौकशी केलीत तर अधिक बरं. ही खरी फिट होती की ढोंगाची होती हे आपण त्यांना विचारू शकता; मी त्यासंबंध नं अधिक बोलण्यात काही हशील नाही."

" अन् तळघर म्हणालास ते ? तुला तळघराची जाणीव अगोदरच कशी रे झाली ? "

" तुम्ही त्या तळघराविषयीच्या शंकेतून बाहेर पडू शकत नाहीसं दिसतं ! मी तळघराकडं खाली उतरत असताना, माझं मन अतिशय भीतीनं अन् शंकेनं व्यापून गेलं होतं. मला सर्वांत जास्त भय वाटलं ते याचं की तुमचा मला वियोग होणार अन् जगात माझं संरक्षण करणारं असं कोणी राहणार नाही. त्यामुळं मी तळघरात उतरत असताना विचार करीत होतो, ' पहा, ती येणार, ती आता लगेच माझ्यावर येऊन कोसळणार, मी पडेन की काय ? ' अन् या भीतीनंच मला एकदम तो नेहमी येणारा झटका जाणवला... अन् मी खाली कोसळलो. हे सर्व आणि मी तुम्हाला आदल्या दिवशी संध्याकाळी मी किती घाबरून गेलो आहे त्याबद्दल सांगितलं होतं ते अन् त्या तळघरासंबंधानं फाटकापाशी बोललो ते सारं संभाषण, मी डॉक्टर हर्झेनस्तुब यांना अन् निकोलाय पारफेनोविच, ते तपासणी करणारे वकील, यांना सांगितलं अन् ते सगळं जाबजबाबांच्या कागदपत्रात नमूद केलेलं आहे. आणि इथले डॉक्टर, वार्विन्स्की यांनी त्या सर्वांना खात्रीपूर्वक सांगितलं की त्या कल्पनेमुळंच म्हणजे मी पडणार या भीतीमुळंच ते घडून आलं. बरोबर त्याचवेळी फिटनं मला घेरलं. आणि तसं त्यांनी टिपून घेतलं आहे की मला भय वाटल्यामुळंच ही गोष्ट घडून आली असली पाहिजे म्हणून."

बोलणे संपल्यानंतर स्मिर्दाखफने थकून गेल्याप्रमाणे एक दीर्घ श्वास घेतला.

" तेव्हा तू हे सारं तुझ्या साक्षीत सांगितलं आहेस ? " इवान काहीसा चकित होऊन म्हणाला. आपले झालेले संभाषण मी सांगीन असा धाक दाखवून आपण त्याला घाबरवून सोडू असे त्याच्या मनात होते. पण स्मिर्दाखफने अगोदरच स्वतःच ते सर्व सांगितलेले दिसले.

" मला भीती कशाची ? संपूर्ण सत्य त्यांनी खुशाल लिहून घ्यावं," स्मिर्दाखफ खंबीरपणे म्हणाला.

" अन् तू त्यांना फाटकापाशी झालेल्या आपल्या संभाषणातला शब्द न् शब्द सांगितलास ? "

" नाही, शब्द न् शब्द कसं म्हणता येईल ? "

" अन् त्या वेळी तू जी फुशारकी मारली होतीस की आपल्याला खोट्या फिट्स सुद्धा आणता येतात, ते सुद्धा तू त्यांना सांगितलंस ? "

" नाही, तेही मी त्यांना सांगितलं नाही."

" आता मला सांग, त्या वेळी तू मला चेरमाश्न्याला का पाठवलंस ? "

" तुम्ही मॉस्कोला निघून जाल अशी मला भीती वाटली, चेरमाश्न्या त्या मानानं जवळच की नाही ? "

" तू खोटं बोलतोयस, मी जावं असं तूंच मला सुचवलंस; तू मला सांगितलंस की, तुम्ही संकटाच्या मार्गातून बाजूला व्हावं."

" ते फक्त आपुलकीमुळं अन् तुमच्याविषयी मला मनापासून वाटणाऱ्या भक्तीमुळं, घरावर काही संकट येणार हे अगोदर समजून, तुम्हाला वाचवावं म्हणून. मात्र स्वतःला वाचविण्याची इच्छा त्याहूनही जोराची होती. म्हणूनच तर मी तुम्हाला धोक्याच्या वाटेतून बाजूला व्हायला सांगितलं, कारण त्यावरून घरात काही संकट उपस्थित होणार हे तुम्हाला कळले, अन् स्वतःच्या वडिलांचं संरक्षण करण्याकरिता तुम्ही घरीच राहाल."

" हे तुला जास्त स्पष्टपणे नसतं का सांगता आलं, गद्ध्या ! " इवान चटकन् भडकून म्हणाला.

" त्या वेळी मी ते इतक्या स्पष्टपणे कसं म्हणू शकलो असतो ? फक्त मला भीती होती तिच्यामुळंच मी बोललो, अन् शिवाय तुम्ही रागावलाही असता. दमीत्रि दंगामस्ती करील अन् तो पैसा घेऊन जाईल. कारण तो पैसा आपलाच असल्यासारखा समजत होता, एवढी भीती मी मानणं साहजिक होतं, पण त्याचा शेवट असा खुनात होईल हे कोण सांगू शकलं असतं ? मला वाटलं होतं की, तो धनीसाहेबांच्या गादीखाली पाकिटात घालून ठेवलेले तीन हजार फक्त घेऊन निघून जाईल, अन् त्यानं तर त्यांचा खून केला. त्याचासुद्धा अगोदर तर्क कसा करता येणार, साहेब ? "

" पण तूच जर म्हणतो आहेस की, तसा तर्क अगोदर करणं शक्य नव्हतं म्हणून, तर मी कसा तर्क करू शकलो असतो अन् घरी राहिलो असतो ? तुझ्या बोलण्यातच परस्परविरोध आहे ! " इवान विचार करीत म्हणाला.

" मी तुम्हाला मॉस्कोला न जाऊ देता चेरमाश्न्याला पाठवलं त्यावरून तुम्हाला तर्क करता आला असता."

" त्यावरून हा तर्क कसा करता आला असता ? "

स्मिर्दायाकफ बराच थकलेला दिसला, अन् तो पुन्हा मिनिटभर स्तब्ध राहिला.

" तुम्ही मॉस्कोला जाऊ नये, चेरमाश्न्याला जावं, या माझ्या सांगण्यावरून तुम्ही जवळपास असावं अशी माझी इच्छा होती. याचा तुम्हाला तर्क करता आला

असता, कारण मॉस्को फार लांब पडतं, अन् दमीत्रि तुम्ही फार दूर गेलेले नाही हे जाणून इतका धीट झाला नसता, आणि जर काही घडलं असतं, तर तुम्ही माझंही संरक्षण करण्याकरिता आला असता, कारण मी तुम्हाला आगाऊ सूचना दिली होती की, ग्रिगरी आजारी आहे, अन् मला फिट येण्याचा संभव आहे. आणि जेव्हा मी तुम्हाला त्या ठोक्यांविषयी समजावून सांगितलं, आणि दमीत्रि फ्योदरोविचला माझ्यामार्फत ते सर्व कळलेले आहेत, त्या खुणांनी तुमच्या वडलांकडे जाता येतं हे मी सांगितलं तेव्हा तुमचा तुम्हीच तो खात्रीनं काहीतरी करणार असा तर्क कराल, अन् चेरमाश्न्यालासुद्धा तुम्ही जाणार नाही, थांबाल असं मला वाटलं."

'हा अतिशय सुसंबद्ध बोलतो आहे.' इवानच्या मनात विचार आला, 'अर्थात् अडखळत बोलतो आहे; हर्झेनस्तुब याच्या बुद्धीत बिघाड झाला आहे म्हणाला तो कोणता?'

"तू माझ्याशी लबाडी करतो आहेस, धिक्कार असो तुझा!" तो रागावून ओरडला.

"पण तुम्हाला पुरती कल्पना आली असं त्यावेळी मला वाटलं," स्मिर्द्याखफने अत्यंत साधेभोळेपणाचा आव आणून उत्तर देण्याचे चुकविले.

"मला कल्पना आली असती तर मी मागे राहिलो असतो." इवान म्हणाला.

"म्हणजे, मला तर वाटलं की तुम्हाला कल्पना आली म्हणूनच तुम्ही इतक्या घाईघाईनं निघून गेलात, भानगडीतून दूर राहण्याकरिता, पळून जाऊन, भिऊन स्वतःला वाचविण्याकरिता गेलात."

"तुला वाटतं प्रत्येकजण तुझ्यासारखाच भागूबाई आहे?"

"माफ करा, मला वाटलं तुम्ही माझ्यासारखेच आहात."

"खरंच आहे, मला कल्पना यायला हवी होती," इवान वैतागून म्हणाला, "आणि मला कल्पना जरूर आली की तुझ्याकडून काहीतरी आगळीक होणार आहे... तू खोटं बोलतो आहेस, तू पुन्हा खोटं बोलत आहेस," तो पुनः काही आठवून ओरडला. "तू माझ्या गाडीकडं कसा धावत आलास आणि मला म्हणालास की 'हुषार माणसाशी बोलणं नेहमी फायद्याचं असतं,' आठवतं तुला? माझी तू स्तुती केलीस, तेव्हा मी निघून चाललोसं बघून तुला आनंद झाला, होय ना?"

स्मिर्द्याखफ पुनः पुन्हा निःश्वास टाकू लागला. एक लाल छटा त्याच्या चेहेऱ्यावर आली.

"जर मला आनंद झाला असला तर तो फक्त तुम्ही मॉस्कोला न जाता चेरमाश्न्याला जाण्याचं कबूल केलंत म्हणूनच झाला," तो काहीसा दम टाकीत एक एक शब्द बोलला. "कारण ते काही झालं तरी जवळ ना. मात्र जेव्हा मी ते

शब्द तुम्हाला बोललो, तेव्हा ते तुमची स्तुती म्हणून नव्हे, ठपका म्हणून बोललो, तुम्हाला ते कळलं नाही."

"कसला ठपका?"

"कसला म्हणजे? अशा प्रकारचं संकट आगाऊ कळलं असताना तुम्ही आपल्या वडिलांना सोडून दिलंत, आणि आमचे रक्षण करायला तयार झाला नाहीत, कारण ते तीन हजार चोरल्याबद्दल मला केव्हाही पकडण्यात आलं असतं."

"मसणात गेलास तू!" इवानने पुन्हा शिवी हासडली. "थांब तू त्या सरकारी वकिलाला अन् तपासणी करणाऱ्या वकिलाला त्या ठोक्यांसंबंधानं सांगितलंस काय?"

"मी जसं होतं तसं सर्व काही त्यांना सांगितलं."

इवान मनातल्या मनात चकित झाला.

"त्यावेळी जर काही माझ्या मनात आलं असेल तर तूच काहीतरी दुष्ट कृत्य करणार हेच आलं होतं." तो पुढं बोलू लागला, "दमीत्रि त्याला मारील, पण तो चोरी करील– हे मी त्यावेळी मानीत नव्हतो.... पण तुझ्याकडून काहीही दुष्कृत्य होईल असं मी समजून चाललो होतो. तू स्वतःच मला आपण फिटचं ढोंग करू शकतो म्हणून सांगितलंस. ते तू मला का म्हणून सांगितलंस?"

"तो केवळ माझा बावळटपणाच होता, मी आयुष्यात कधी मुद्दाम होऊन फिटचं ढोंग आणलेलं नाही. अन् त्या वेळी मी ते तुम्हाला म्हणालो ते तुमच्यापुढं फुशारकी मारण्याकरिता. तो केवळ एक वेडगळपणाच होता. त्या वेळी मला तुम्ही फार आवडत होता अन् म्हणून मी इतका तुमच्याशी मोकळ्या मनानं वागत होतो."

"माझा भाऊ सरळ तुझ्यावर खुनाचा अन् चोरीचा आरोप करीत आहे."

"दुसरं काय करायचं त्याला उरलंय?" स्मिर्द्याकफ कडवटपणे हसून म्हणाला. "अन् इतका पुरावा त्याच्या विरुद्ध असताना त्याच्यावर विश्वास कोण ठेवील? ग्रिगरी वासिल्येविचला तो दरवाजा उघडा दिसला. त्यावर तो काय म्हणू शकतो? पण त्याच्याकडं लक्ष देण्याचं कारण नाही! तो स्वतःला वाचविण्याच्या फिकिरीत आहे."

तो हळूहळू बोलायचा थांबला, अन् एकदम जणू काही एक विचार केल्यासारखा, पुढे म्हणाला,

"अन् पुनः असं पाहा. त्याला तो गुन्हा माझ्यावर टाकायचा आहे आणि हे माझ्या हातांचं कृत्य आहे असं सिद्ध करायचं आहे, हे मी यापूर्वीच ऐकलेलं आहे. पण मी फिटचं ढोंग आणण्यात हुषार आहे याबद्दल सांगायचं तर– जर तुमच्या वडिलांविरुद्ध अशा तऱ्हेचा कट खरोखर माझ्या डोक्यात असता तर मला फिटचं ढोंग करता येतं हे मी तुम्हाला अगोदरच सांगणं योग्य होतं काय? मी जर असा खून करायचं योजलं असतं, तर माझ्याच विरुद्ध असा पुरावा आगाऊ देण्याइतका

मी मूर्ख झालो असतो काय? अन् तोही त्याच्या मुलाला! खरोखर, हे शक्य तरी आहे काय? समजा ते शक्य मानलं, तरी अशी गोष्ट कधीच घडलेली नाही. आपलं हे संभाषण यावेळी प्रत्यक्ष परमेश्वराखेरीज कोणी ऐकत नाही, अन् जर तुम्ही त्या संबंधी सरकारी वकिलाला अन् निकोलाय पारफेनोविचला सांगायचं म्हटलंत तर तसं करण्यानं तुम्ही माझा बचावच कराल, कारण जर गुन्हेगार आगाऊच इतका उघड्या मनाचा असेल तर तो गुन्हेगार तरी कसा असू शकेल? कोणालाही ते दिसू शकेल."

"बरं," असं म्हणून इवान ते संभाषण संपविण्याच्या हेतूने उठला, स्मिर्द्याखफच्या शेवटच्या मुद्द्याने तो प्रभावित झाला होता. "मला तुझ्याविषयी शंका मुळीच नाही, अन् तुझी शंका घेणं हे खरोखर मूर्खपणाचं होईल असं मला वाटतं. उलट, माझं मन तू निश्चित केलंस याबद्दल मी तुझा कृतज्ञच आहे. आता मी जातो, पण मी पुन्हा येईन. तोवर, नमस्ते. बरा हो. तुला काही हवं आहे?"

"मी प्रत्येक गोष्टीबद्दल अतिशय ऋणी आहे. मार्फा इग्नात्येवना मला विसरलेली नाही, अन् तिच्या दयाळूपणाला शोभेल अशा रीतीनं मला हव्या असलेल्या गोष्टी ती मला पुरवीत असते. सज्जन माणसं दररोज मला भेटून जातात."

"नमस्ते, पण तुला फिटचं सोंग आणता येतं याबद्दल मी काही बोलणार नाही, अन् तूही बोलावंस असं म्हणणार नाही," कोणत्या तरी प्रेरणेने इवानच्या तोंडून एकदम गेले.

"मी बरोबर समजतो. अन् जर तुम्ही त्याबद्दल बोलत नसाल, तर मी आपल्याला फाटकाजवळच्या संभाषणाबद्दल काही बोलणार नाही."

असे झाले की इवान बाहेर पडला, अन् जाण्यायेण्याच्या वाटेवर दहा-बारा पावलेच तो गेला असेल, एवढ्यात चटकन् त्याच्या लक्षात आले की स्मिर्द्याखफच्या शेवटच्या शब्दांत अपमानाचे द्योतक असे काही आहे. तो जवळजवळ परत फिरण्याच्या बेतात होता, पण तो क्षणिक आवेग होता, "मूर्खपणा!" असे पुटपुटत तो इस्पितळाच्या बाहेर पडला.

खून करणारा स्मिर्द्याखफ नाही, मीत्या आहे या गोष्टीमुळे त्याला बरे वाटले ही त्याच्या मनातली प्रमुख भावना होती, अर्थात याच्या उलट त्याला वाटावे अशी अपेक्षा त्याच्या बाबतीत सहजच वाटली असती. या भावनेची कारणमीमांसा करण्याची त्याला इच्छा नव्हती, नव्हे, आपल्या संवेदनांचे मंथन करण्याच्या बाबतीत त्याला चक्क कंटाळा वाटला. जणू काहीतरी विसरण्याची घाई आपल्याला करावीशी वाटते असे त्याला भासले. पुढच्या काही दिवसांत मीत्याच्या विरुद्ध असलेल्या पुराव्याचा सर्व भक्कमपणा समजून आल्यानंतर त्याला त्याच्या गुन्ह्याची खात्री पटली होती. काही महत्त्व नसलेल्या अशा लोकांच्या साक्षी त्यात होत्या. उदाहरणार्थ फेनिया अन् तिची आई. पण त्यांचा परिणाम मात्र जबरदस्त असल्यासारखा होता.

पेऱ्होतिन खाणावळीतली अन् प्लोत्निकोवच्या दुकानातली माणसे, तसेच मोक्रोय येथील साक्षीदार, त्यांच्या साक्षी हे सर्व निर्णायक दिसत होते. त्यातल्या बारीक सारीक बाबी होत्या त्याच शिक्षेला पात्र ठरविणाऱ्या होत्या. ग्रिगरीचा उघड्या दरवाज्याचा पुरावा जितका वकिलांच्या मनावर छाप पाडणारा होता, तितकेच ठोक्यांच्या संकेताचे रहस्य छाप पाडणारे होते. ग्रिगरीची बायको मार्फा इवानच्या प्रश्नांना उत्तर देताना स्वच्छ म्हणाली की, स्मिर्दियाखफ मधल्या आडभिंतीच्या पलीकडच्या बाजूला रात्रभर पडून राहिलेला होता, "तो आमच्या अंथरुणापासून तीन पावलंसुद्धा दूर नव्हता," आणि जरी ती गाढ झोपी जाणारी होती तरी ती अनेक वेळा जागी होत होती अन् त्याचे कण्हणे तिच्या कानावर येत होते, "तो एकसारखा सतत कण्हत होता."

हर्झेनस्तुबशी बोलताना स्मिर्दियाखफ काही वेडा झालेला नाही, फक्त काहीसा अशक्त झालेला आहे असे आपले मत त्याने त्यांना सांगताच तो वृद्ध गृहस्थ फक्त बारीकसे हसला.

"तो हल्ली आपला वेळ कसा घालवतो माहीत आहे तुम्हाला?" त्यांनी विचारले, "तो फ्रेंच शब्दांच्या याद्याच्या याद्या पाठ करतो. त्याने आपल्या उशी-खाली एक वही ठेवून दिली आहे, त्यात कुणी तरी त्याला रशियन अक्षरात फ्रेंच शब्द लिहून दिलेले आहेत; हॅ, हॅ, हॅ!"

इवानचे सर्व संशय नाहीसे झाले. दमीत्रिविषयी तिरस्कारावाचून त्याच्या मनात दुसरी भावना येऊ शकत नव्हती. मात्र एक गोष्ट विचित्र होती. आल्योशा आग्रहपूर्वक म्हणत होता की, दमीत्रिने खून केलेला नाही, अन् 'बहुतांशी' स्मिर्दियाखफने केलेला असावा. आल्योशाच्या मताचे आपल्या मनाला फार महत्त्व वाटते असे इवानला नेहमी भासे, अन् त्याला आता त्याबद्दल आश्चर्य वाटू लागले. दुसरी एक विचित्र गोष्ट म्हणजे आल्योशाने इवानशी मीत्यासंबंधाने बोलण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही. त्याने तो विषय कधीच काढला नाही अन् फक्त तो त्याच्या प्रश्नांना उत्तरे देत राहिला. याचीही इवानच्या मनावर विशेष छाप पडली.

परंतु त्यावेळी तो याहून अगदीच वेगळ्या गोष्टीत अगोदर अतिशय गुंतला होता. मॉस्कोहून परत आल्यावर. तो कतिरीना इवानोवनाविषयीच्या पिसाट अन् जाळून टाकणाऱ्या आपल्या विकारावेगात असहाय्यपणे वाहात चालला होता. इवानच्या या नव्या आवेगासंबंधाने सांगण्याची ही वेळ नव्हे, पण त्या आवेगाची त्याच्या सबंध जीवनावर खूण राहून गेली. तो एका दुसऱ्या कादंबरीचा विषय होऊ शकेल, ती मी कदाचित् कधीच लिहिणार नाही. पण इथे हे नमूद करण्याचे मला टाळता येणार नाही की, मी पूर्वीच कथन केल्याप्रमाणे, कतिरीना इवानोवनाच्या घरून आल्योशाबरोबर निघाल्यावर तो त्याला म्हणाला, "मी तिच्या बाबतीत बांधील नाही;" पण ते संपूर्ण असत्य होते. त्याचे तिच्यावर पिसाट प्रेम होते, अजून

खोलीकडे गेला, ती खोली स्मिर्दाखफकडे होती. त्या खोलीत वर फरशी असलेली एक चूल होती अन् ती धगधगत होती. भिंतींना निळा कागद लावलेला असल्यामुळे त्या बऱ्या दिसत होत्या, पण तो कागद बराच जुना झाला होता आणि त्याच्यात पडलेल्या चिरांमधून विलक्षण संख्येने झुरळे फिरत होती, त्यामुळे एकसारखा सरसर आवाज होत होता. लाकूड सामान फार तोटके होते, प्रत्येक भिंतीच्या पुढे दोन बाके आणि टेबलापाशी दोन खुर्च्या ठेवलेल्या होत्या. साध्या लाकडाच्या त्या टेबलावर एक कापड पसरलेले होते अन् त्यावर गुलाबी खडी काढलेली होती. दोन लहान लहान खिडक्या होत्या. त्या प्रत्येकीत एक एक जिरेनियम झुडपाची कुंडी ठेवली होती. कोपऱ्यात एक देव्हारा होता, व त्यात देवमूर्ती होती. टेबलावर एक लहानसा तांब्याचा समोवार होता. त्याला अनेक पोचे गेलेले होते, आणि एक तबक होते, त्यात दोन पेले होते. पण स्मिर्दाखफने चहा पिऊन संपवला होता अन् समोवार विझलेला होता. तो टेबलाजवळ एका बाकावर बसला होता. तो एका वहीत पाहत होता अन् लेखणीने हळूहळू लिहीत होता. त्याच्याजवळ शाईची एक दौत होती अन् एक बसते लोखंडी मेणबत्तीपात्र होते, पण त्यात अनेक फाटे असलेली मेणबत्ती होती. स्मिर्दाखफच्या चेहऱ्यावरून इवानला पटकन् कळून आले की, तो आजारातून पूर्ण बरा झालेला आहे. त्याचा चेहरा पूर्वीपेक्षा टवटवीत, भरलेला दिसत होता आणि त्याचे केस त्याने रंगेलपणे पुढे आणून कपाळाच्या दोन्ही बाजूंना पक्के बसविले होते. तो एक बहुरंगी, रूदार पण काहीसा मळका अन् चोळवटलेला गाऊन घालून बसला होता. त्याच्या नाकावर चष्मा होता, इवानने त्याला चष्मा घातलेला पूर्वी कधी पाहिला नव्हता. या क्षुल्लक बनावाने इवानचा राग दुप्पट भडकला. "क्षुद्र लेकाचा अन् चष्मा घालतोय!"

स्मिर्दाखफने हळूहळू आपली मान वर केली आणि चष्म्यातून त्याने आपल्याला भेटायला आलेल्या पाहुण्याकडे एकाग्र दृष्टीने पाहिले; मग त्याने चष्मा हळूहळू बाजूला केला आणि तो बाकावरून उठला, पण आदरभावाने मात्र नाही. सुस्तपणे, सर्वसामान्य शिष्टाचार म्हणून जे कमीत कमी करणे शक्य तेवढे करावे म्हणून. इवानच्या मनावर चटकन् त्याचा परिणाम झाला, त्याने ते सारे पाहून घेतले अन् एकदम लक्षात ठेवले– सर्वांत जास्त म्हणजे स्मिर्दाखफच्या डोळ्यांतल्या छटा– त्या निश्चितच द्वेषपूर्ण, उद्दाम अन् अहंकारपूर्ण होत्या. "तुला यात नाक खुपसायचं काय कारण?" "आपण त्यावेळी सर्व काही मिटवलं आहे, मग पुन्हा का आलास?" असेच जणू ते डोळे विचारीत असावेत. इवानने कसेबसे स्वतःला आवरले.

"इथं फारच उकडतंय!" तो उभ्या उभ्याच म्हणाला अन् आपल्या ओव्हर कोटाची बटने त्याने काढली.

"तुमचा कोट काढा!" स्मिर्दाखफने परवानगी दिली.

इवानने आपला कोट काढून कापऱ्या हातांनी एका बाकावर फेकला. त्याने एक खुर्ची घेतली, ती झटकन् टेबलापाशी सरकवली अन् तो तिच्यावर बसला. स्मिर्द्याखफने त्याच्या आधीच झटपट आपल्या बाकावर बैठक मारली.

"पहिली गोष्ट, आपण एकटेच आहोत ना?" इवानने कडक स्वरात अन् आवेगाने विचारले. "तिकडं कोणाच्या कानावर आपलं बोलणं जाईल काय?"

"कोणाला काही ऐकू जाणार नाही. तुम्ही स्वतःच बघितलंत. मध्ये एक रस्ता आहे."

"ऐकून घे, भल्या माणसा, इस्पितळातून मी बाहेर पडतेवेळी तू तोंडातल्या तोंडात जे बोललास ते काय? तू म्हणालास की, तुला फिटचं सोंग करण्याची कला चांगली अवगत आहे. याविषयी जर मी काही बोललो नाही, तर आपण फाटकापाशी जे बोललो ते सगळं तूही तपासणी करणाऱ्या वकिलाला सांगणार नाहीस, होय ना? 'सगळं' म्हणजे तुला काय म्हणायचंय? त्याचा तुझ्या मनात काय अर्थ असू शकेल? मला तू धमकी दिलीस काय? तुझ्याशी मी काही संगनमत केलेलं आहे काय? तुला मी भितो असं समजतोस काय?"

इवान हे भयंकर संतापाने बोलला, त्याला त्याने उघडच सहेतुकपणे जाणवून दिले की, कोठल्याही कपटकारस्थानचा किंवा आडव्यवहाराचा आपल्याला तिरस्कार आहे आणि जे आहे ते सारे आपल्याला उघड करायचे आहे. स्मिर्द्याखफचे डोळे चिडीने चमकले. त्याच्या डाव्या डोळ्याची पापणी लवली, जणू तो म्हणत होता. "तुम्हाला प्रत्येक गोष्ट उघडपणे व्हायला पाहिजे काय, ठीक तर तशीच होईल." अन् त्याने आपल्या नेहमीच्या थंडपणाने अन् विचारपूर्ण रीतीने एकदम आपले उत्तर दिले.

"त्यावेळी माझ्या मनात जे होतं ते असं होतं, अन् त्याचं कारण हे होतं की, आपल्या वडिलांचा हा खून होणार हे अगोदर माहीत असताना तुम्ही त्यांना त्यांच्या नशिबावर सोडून दिलंत, आणि लोकांनी त्यावरून तुमच्या भावनांविषयी अन् कदाचित आणखी दुसऱ्या कशातरी विषयीसुद्धा काही वाईट निष्कर्ष काढू नये म्हणून ते मी अधिकाऱ्यांना न सांगण्याचं वचन दिलं."

जरी स्मिर्द्याखफ घाई न करता अन स्वतःला आवरीत असल्यासारखा बोलला तरी त्याच्या आवाजात असे काहीतरी होते की, जे निर्धाराचे अन स्पष्ट तिरस्कार दर्शविणारे अन उद्दामपणे आव्हान देणारे होते. त्याने उद्धटपणे इवानकडे बघितले. पहिल्या क्षणी इवानच्या डोळ्यांपुढे धुके येऊन गेल्यासारखे झाले.

"म्हणजे काय? तुझं डोकं तर फिरलं नाही?"

"माझी सर्व अक्कल-बुद्धी पूर्णपणे माझ्या ताब्यात आहे."

"खुनाबद्दल मला माहिती होती असं तू समजतोस?" इवान शेवटी

ओरडून म्हणाला अन् त्याने आपली मूठ जोराने टेबलावर आपटली. "'आणखी दुसरंसुद्धा काही' म्हणजे तुला काय म्हणायचंय ? बोल हरामखोरा !"

स्मिर्दयाखफ गप्प राहिला आणि तरी तो तशाच उद्दाम नजरेने इवानला आपाद-मस्तक न्याहाळीत राहिला.

"बोल, कुजक्या शठा, ते 'आणखी दुसरंसुद्धा काही' काय ते सांग."

"ते 'आणखी दुसरं' म्हणजे बहुधा तुम्हालासुद्धा आपल्या वडिलांच्या मृत्यूची तीव्र इच्छा असावी हे माझ्या मनात होते."

इवान एकदम उठला आणि त्याने त्याच्या खांद्यावर आपल्या साऱ्या शक्तीनिशी ठोसा लगावला, त्याबरोबर तो एकदम मागे भिंतीवर आपटला. तत्काळ त्याच्या चेहऱ्यावरून अश्रू ओघळू लागले. "आजारी माणसाला मारणं ही शरमेची गोष्ट आहे, साहेब" असे म्हणत त्याने निळ्या रेघारेघाच्या अत्यंत घाणेरड्या हातरुमालाने आपले डोळे पुसले अन आतल्या आत रडत बसला. एक मिनिट असेच गेले.

"बस्स ! सोडून दे," इवान परत बसून हुकुमी आवाजात म्हणाला. "माझ्या सहनशक्तीचा आता अंत पाहू नको."

स्मिर्दयाखफने आपल्या डोळ्यांवरून ते फडके दूर केले. त्याच्या सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्यावरची प्रत्येक रेषा नुकत्याच झालेल्या त्याच्या अपमानाची ग्वाही देत होती.

"म्हणजे तुला त्यावेळी असं वाटलं काय रे हरामखोरा, की दमीत्रिशी संगतमत करून माझ्या वडिलांना मारायचं माझ्या मनात होतं म्हणून ?"

"तुमच्या मनात त्यावेळी काय विचार होते मला कसे माहीत असणार ?" स्मिर्दयाखफ चिडखोरपणे म्हणाला; "म्हणून तर मी तुम्हाला फाटकापाशी त्यावेळी थांबवलं, याच मुद्द्यावर तुमचा अंदाज घेण्याच्या हेतूनं."

"कशाचा अंदाज ? काय म्हणालास ?"

"कशाचा म्हणजे ? याच की तुम्ही आपल्या वडिलांचा खून व्हावा असं इच्छिता की काय याचा !"

इवानला सर्वांत जास्त संताप आला तो स्मिर्दयाखफने सतत जो चढाईचा उद्धट स्वर ठेवला होता त्याचा.

"त्यांचा खून तू केलास ?" तो एकदम ओरडला.

स्मिर्दयाखफ तुच्छतेने हसला.

"तुम्हाला स्वतःला सत्य म्हणून माहीत आहे की खून करणारा मी नव्हतो. अन अक्कल असलेल्या माणसाला पुन्हा त्याविषयी बोलण्याची गरज पडू नये असं मला वाटतं."

" पण तुला त्यावेळी तसा संशय माझ्याविषयी का म्हणून, का म्हणून आला ?"

" तुम्हाला माहीतच आहे, केवळ भीतीमुळे. कारण मी अशा अवस्थेत होतो, इतका भयभीत होतो की मला प्रत्येकाचा संशय येत होता. तुम्हालाही चाचपून पाहावं असं मी ठरवलं, कारण तुम्हालाही तुमच्या भावासारखं घडावंसं वाटत असेल, तर मग सोक्षमोक्षच लागल्यासारखा झाला अन माझाही एखाद्या माशीसारखा चोळाचुरगळा होणार, असं मला वाटलं."

" ए, हे बघ, हे तू पंधरा दिवसांपूर्वी नव्हता बोललास."

" तुमच्याशी मी इस्पितळात बोललो तेव्हा माझ्या मनात हेच होतं, फक्त मला एवढंच वाटलं की उगीच शब्द खर्च न करता तुम्हाला ते समजेल, अन् इतके तुम्ही समजूतदार असल्यामुळं त्यासंबंधानं उघडपणे न बोललं तरी तुम्हाला त्याचं काही वाटणार नाही."

" बरं पुढं काय ? बोल, चटकन् उत्तर दे, तू सांगितलंच पाहिजे– असला हीन संशय तुझ्या हलकट मनात राहण्यासारखं माझ्याकडून काय झालं होतं... असं काय होतं ?"

" खुनाविषयी म्हणत असाल, तर तुम्ही तो करणं शक्य नव्हतं अन तुमची तशी इच्छाही नव्हती, पण दुसऱ्या कोणीतरी तो करावा याविषयी म्हणाल, तर बरोबर तुम्हाला तेच हवं होतं."

" कसा बेरडासारखा बोलतोय ! पण मला तसं व्हावंसं वाटण्याचं कारण काय ? ते घडावं अशी इच्छा करायला मला कारण काय होतं ?"

" तुम्हाला कारण काय होतं ? वारशाची बाब काय थोडी आहे ?" स्मिर्दयाकफ औपरोधिकपणे अन् जणू सूड घेण्याच्या बुद्धीने, म्हणाला. " अं ? तुमच्या वडिलांच्या मृत्यूनंतर तुमच्यापैकी प्रत्येकाला चाळीस चाळीस हजार तरी निदान येणारच होते, कदाचित् जास्तच, पण जर फ्योदरपावलोविचनी त्या वेळी त्या बाईशी– आग्राफेना अलेक्झांद्रोवनाशी-लग्न केलं असतं, तर लग्नानंतर तिनं सगळं भांडवल सरळ आपल्या नावावर करून घेतलं असतं, कारण ती चांगली अक्कलवंत बाई आहे, मग तुमच्या वडिलांनी तुम्हा तीन भावांत वाटायला दोन रूबलसुद्धा शिल्लक ठेवले नसते. अन् त्यांचं लग्न व्हायला काय उशीर होता ? जरासुद्धा नाही; त्या बाईनं संमतिदर्शक आपले नाजूक बोट–वर करण्याचाच अवकाश की ते आपली जीभ बाहेर काढून तिच्या मागून धावत चर्चकडं गेले असते."

इवानने मोठ्या कष्टाने स्वतःला आवरले.

" ठीक आहे," तो अखेर बोलला, " बघ, मी काही उठलो नाही, तुला ठोसा देऊन खाली पाडलं नाही, तुला ठार केलं नाही. बोल पुढं. तेव्हा, तुझ्या मतानं, मी त्या संबंधानं दमीत्रिशी ठरवलं, मी त्याच्यावर भिस्त ठेवली होय ना ?"

"म्हणजे हे 'अक्कलवान माणसाशी बोलणं नेहमीच फायद्याचं असतं.' असंच म्हणण्यासारखं ना?" इवान गुरकावून म्हणाला.

"तुम्ही बरोबर हेरलंत, हं. आणि तुम्ही अक्कलवान होणं बरं."

इवान एकदम उठला, संतापानं त्याचे सर्वांग थरथरत होते. त्याने आपला कोट चढविला, अन् स्मिर्द्याखफला आणखी प्रत्युत्तर न करता नव्हे त्याच्याकडे नजरसुद्धा न टाकता तो त्या झोपडीच्या झटकन् बाहेर पडला. संध्याकाळच्या थंडगार हवेने त्याच्यात ताजेपणा आला. आकाशात चंद्र प्रकाशत होता. विचारांच्या अन् संवेदनांच्या कुस्वप्नांनी त्याच्या चित्तात धुमाकूळ मांडला होता. "एकदम पोलिसाकडं जाऊन स्मिर्द्याखफबद्दल वर्दी द्यावी काय? पण वर्दी तरी मी काय देणार? काही म्हटलं तरी तो गुन्हेगार नाही. उलट, तो मलाच गुन्हेगार म्हणेल. अन् खरोखर मी त्यावेळी चेरमाश्न्याला जायला का बरं निघालो? का म्हणून? कशाकरिता?" इवानने स्वतःला प्रश्न केला. "होय, मी काही तरी अपेक्षीत होतो यात शंका नाही अन् त्याचं म्हणणं बरोबर आहे...." आणि पुनः शंभराव्यांदा त्याने आपण आपल्या बापाच्या घरी शेवटच्या रात्री जिन्यावर जाऊन कसा कानोसा घेत होतो त्याची आठवण केली. पण यावेळी त्या आठवणीबरोबर अशी एक मनस्तापाची भावना त्याच्या मनात निर्माण झाली की तो जणू कोणी ठोसा मारावा तसा जागच्या जागीच उभा राहिला. "होय, त्यावेळीच ते मी अपेक्षीत होतो, हे खरं आहे! मला तो खून व्हायला हवा होता, मला तो खून जरूर हवा होता! मला खून हवा होता? मला तो हवा होता? स्मिर्द्याखफला मला बरं केलंच पाहिजे! आता जर मी स्मिर्द्याखफला मारण्याची हिंमत केली नाही, तर जगण्यात अर्थ तरी काय?"

इवान घरी गेला नाही, तो थेट कतिरीना इवानोवनाकडे गेला. त्याला बघून ती एकदम घाबरली. तो एखाद्या वेड्यासारखा दिसत होता. त्याने स्मिर्द्याखफशी झालेले आपले सारे संभाषण, अगदी अक्षर न अक्षर, परत सांगितले. तिने त्याचे कितीतरी सांत्वन करण्याचा प्रयत्न केला, तरी तो शांत होऊ शकला नाही. तो खोलीभर एकसारखा फिरत राहिला— विलक्षण, असंबद्ध असे काही बोलत. शेवटी तो खाली बसला, आपली कोपरे त्याने टेबलावर ठेवली, हातांनी आपले डोके धरले अन हे विलक्षण वाक्य त्याच्या तोंडून बाहेर पडले : "जर दमीत्रि नव्हे स्मिर्द्याकफ खुनी असेल, तर त्याच्या गुन्ह्यात मी भागीदार आहे, कारण मी त्याला तो करायला प्रवृत्त केलं. मी ते केलं की नाही ते अजून मला कळत नाही. पण तो जर खुनी असेल, दमीत्रि नसेल, तर अर्थात् मीसुद्धा खुनी आहे."

कतिरीना इवानोवनाने जेव्हा हे ऐकले, तेव्हा ती एक शब्दही न बोलता आपल्या जागेवरून उठली, आपल्या लिहिण्याच्या टेबलाकडे गेली, टेबलावर असलेली एक पेटी तिने उघडली, त्यातून एक कागद बाहेर काढला अन तो इवानपुढे

ठेवला. हाच तो कागद ज्याच्याविषयी इवान आल्योशाला मागाहून दमीत्रिने आपल्या वडिलांना मारल्याचा ‘ निश्चयात्मक पुरावा ’ म्हणून सांगितले. मीत्त्याने कतिरीना इवानोवनाला लिहिलेले ते पत्र होते, ते त्याने आल्योशा मठाकडे जात असताना चौरस्त्यावर भेटला होता त्याच संध्याकाळी तो प्यालेला असताना लिहिलेले होते. कातिरीना इवानोवनाच्या इथे ग्रूशिंकाने तिचा अपमान केल्याचा जो प्रसंग घडला तीच ती संध्याकाळ होती. नंतर आल्योशाला सोडून निघाल्यानंतर मीत्त्या ग्रूशिंकाकडं धावला होता. तो तिला भेटला की नाही मला माहीत नाही, पण सायंकाळी तो ‘ मेत्रोपोलिस ’ हॉटेलात गेला होता अन् तिथे खूप त्याने झोकली होती. नंतर त्याने कागद अन् लेखणी मागून घेतली आणि त्याच्या स्वतःच्या दृष्टीने फारच महत्त्वाचा असलेला असा तो दस्तैवज त्याने लिहिला. ते एक शब्दबंबाळ, असंबद्ध, उन्मादाचे पत्र, खरे म्हणजे दारूच्या धुंदीत लिहिलेले पत्र होते. एखादा झिंगलेला माणूस घरी परत आल्यावर आपल्या बायकोला किंवा घरातल्या कोणा माणसाला आपला आत्ता कसा अपमान झाला, कोणा हलकटानं माझा अपमान केला, पण तसं बघितलं तर तो किती छान मनुष्य आहे, मी त्या बदमाषाचा कसा बदला घेतो पाहा, असं मोठ्या आवेशाने सांगायला लागावा, अन ते अतिशय पाल्हाळाने, अतिशय उत्तेजित होऊन अन् असंबद्धपणे, आणि डोळ्यांत दारूच्या धुंदीतले अश्रू आणून अन् टेबलावर मुठी आपटून त्यानं बोलावं, तशा बरळण्यासारखे ते पत्र होते. ते पत्र अगदीच हलक्या प्रकारच्या साध्या कागदाच्या एका घाणेरड्या कपट्यावर लिहिलेले होते. खाणावळवाल्याने त्याला तो कागद दिलेला होता अन् त्याच्या मागच्या बाजूला आकडे गिरगटलेले होते. त्याच्या धुंदीतल्या वाक्प्रपंचाला त्यात फारशी जागा नव्हती, आणि मीत्त्याने बाजूची समासाची जागासुद्धा लिहून भरून काढली होती, इतकेच नव्हे तर शेवटची ओळ त्याने सर्व ओळींच्यावर तिरकी लिहिली होती. ते पत्र खालीलप्रमाणे होते :

“ घातकी कात्या ! उद्या मला पैसे मिळतील अन् तुझे तीन हजार मी देऊन टाकीन अन् शेवटचा राम राम, जबर क्रोधी स्त्रिये, पण तशीच माझ्या प्रिये ! आपण संपवू या ! उद्या मी ती रक्कम कोणाहीकडून घेण्याचा प्रयत्न करीन, अन् जर ती मला उसनी मिळू शकली नाही, तर मी माझा शब्द देऊन तुला सांगतो की मी माझ्या बापाकडं जाईन आणि त्याचं डोकं फोडीन आणि उशाखालून ते पैसे काढून घेईन, मात्र इवान गेलेला असा पाहिजे. त्यासाठी मला सैबेरियाला जावं लागलं तरी मी तुझे तीन हजार परत देईन. राम राम. तुला माझा जमिनीवर लवून नमस्कार, कारण मी तुझ्याशी बदमाषगिरीनं वागलो. क्षमा कर मला ! नाही, क्षमा न केलेलीच बरी, तू तितकी अधिक सुखी होशील अन् मी पण ! तुझ्या प्रेमापेक्षा सैबेरिया जास्त बरी, कारण माझं दुसऱ्या स्त्रीवर प्रेम आहे अन् आज तिला जाणण्याचा तुला चांगला प्रसंग आला, तर तू क्षमा कशी करणार ? मला ज्या

माणसानं लुबाडलं त्याचा मी खून करीन ! मी सारं तुला सोडून जाईन अन् पुन: कोणाला भेटू नये याकरिता पूर्वेकडे निघून जाईन. तिलासुद्धा, कारण तूच एक मला छळणारी नाहीस, तीसुद्धा आहे. शेवटचा नमस्कार ! ”

“ ता. क.– मी तुला अपशब्द लिहिला, तरी मी तुझी पूजा करतो ! ती माझ्या हृदयात मला ऐकू येते. एक तार राहिली आहे अन् ती झंकारते. माझं हृदय फाडून त्याचे दोन तुकडे केलेस तर बरं ! मी स्वतःला मारून टाकीन, पण सर्वांत अगोदर त्या पाजीला. त्याच्याकडून तीन हजार मी ओरबाडून घेईन अन् तुझ्याकडं फेकून देईन. जरी मी तुझ्याशी बदमाषगिरी केली असली तरी मी चोर नाही ! तू तीन हजारांची अपेक्षा ठेवू शकतेस. तो पाजी ते आपल्या गादीखाली गुलाबी रिबिनीत बांधून ठेवतो. मी चोर नाही, पण मी माझी चोरी करणाऱ्याचा खून करीन. कात्या, तिरस्काराच्या नजरेनं पाहू नकोस. दमीत्रि चोर नाही; पण खुनी आहे ! त्यानं आपल्या बापाचा खून केलाय अन् स्वतःचं वाटोळं करून घेतलंय. तुझा गर्विष्ठपणा सहन करण्यापेक्षा स्वतःचं खरं करण्याकरिता. अन् त्याचं तुझ्यावर प्रेम नाही.

“ पुनश्च ता. क.– तुझ्या चरणांचं मी चुंबन घेतो, राम राम !

आणखी ता. क.– कात्या, ईश्वराची प्रार्थना कर की कुणी तरी मला पैसे द्यावेत. मग मी रक्तात भरणार नाही, अन् जर कुणी दिले नाहीत, तर भरीन ! मारून टाका मला !

तुझा दास अन् दुश्मन
द. कारमाझफ.”

हा महत्त्वाचा कागद वाचल्यानंतर इवानची खात्रीच झाली. तर मग हे आपल्या भावाचे काम, स्मिर्द्याखफचे नव्हे तर. आणि जर स्मिर्द्याखफचे नाही, तर मग माझे, इवानचेही नाही. या पत्राला त्याच्या दृष्टीने लगेच तर्कसंगत पुराव्याचे स्वरूप आले. यानंतर मीत्याच्या दोषीपणासंबंधाने यत्किंचितही संशय राहू शकत नव्हता. जाता जाता सांगायचे तर, इवानच्या डोक्यात अशी शंका आली नाही की मीत्याने तो खून स्मिर्द्याखफशी संगनमत करून केलेला असण्याचा संभव आहे, आणि खरोखर अशा प्रकारचा अनुमानित निष्कर्ष वस्तुस्थितीशी जमण्याजोगा नव्हताही. इवानची पूर्ण खात्री झाली. दुसऱ्या दिवशी सकाळी स्मिर्द्याखफची अन् त्याच्या टोमण्यांची त्याला केवळ तुच्छतापूर्ण आठवणच राहिली. काही दिवसांनंतर तर त्याला आपण आपल्या संशयांनी इतके भयानक रीतीने कसे त्रस्त झालो याचे चक्क आश्चर्यच वाटू लागले. त्याने त्याला तुच्छतेने मनातून काढून टाकण्याचे अन् विसरून जाण्याचे ठरविले. अशा रीतीने एक महिना गेला. त्याने पुढे स्मिर्द्याखफची

काही चौकशी केली नाही, पण दोनदा त्याच्या कानांवर आले की तो फार आजारी आहे अन् त्याचे डोके ठिकाणावर नाही.

"हा वेडा होऊन मरणार," तरुण डॉक्टर वार्विन्स्की त्याच्या संबंधाने म्हणाले होते आणि इवानला त्यांची आठवण झाली. त्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात इवानला स्वतःलाच बरे वाटेनासे झाले. तो मॉस्कोच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यायला गेला, या डॉक्टरला कतिरीना इवानोव्हनाने या खटल्यासाठी म्हणूनच बोलावून आणले होते. आणि बरोबर याच वेळी त्याचे कतिरीना इवानोवनाशी संबंध फार ताणले गेले होते. एकमेकांच्या प्रेमात पडलेल्या दोन शत्रूंसारखी त्यांची स्थिती होती. कतिरीना इवानोवनाचे मीत्याकडे 'परत वळणं', म्हणजे एकाएकी तिची त्याच्याबद्दलची भावना उलटून ती त्याला अनुकूल होणे, याने इवानच्या संतापाचा पारा भलताच चढला. सांगायचे नवल असे की, वर वर्णन केलेला तो शेवटचा प्रसंग घडेपर्यंत, ज्या वेळी आल्योशा मीत्याकडून कतिरीना इवानोवनाकडे आला; त्या वेळी, इवानला द्वेष वाटत असलेली तिची 'परत त्याच्याकडं वळण्या'ची वागणूक चालू असतानासुद्धा, त्याने त्या महिन्यात, तिच्या तोंडून मीत्याच्या अपराधीपणाविषयी शंका व्यक्त करण्याजोगा एकही शब्द एकदाही कधी ऐकला नव्हता. ही एक विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट हाती की आपण मीत्याचा दिवसेंदिवस अधिकाधिक द्वेष करीत आहो याची त्याला जाणीव होत होती, तरी कात्याच्या त्या 'परत वळण्या'मुळं आपण त्याचा द्वेष करीत आहो असे नसून तो आपल्या बापाचा खुनी आहे यामुळेच आपण त्याचा द्वेष करीत आहो असे त्याला कळून आले. त्याला त्याची जाणीव झाली होती आणि स्वतःशी त्याने त्याची पूर्ण दखल घेतली होती.

असे असूनसुद्धा तो मीत्याला खटला सुरू होण्यापूर्वी दहा दिवस भेटायला गेला अन् त्याने त्याला निसटून जाण्याची एक योजना सुचवली– या योजनेचा त्याने अर्थातच पुष्कळ दिवस विचार करून ठेवलेला होता. हे करण्याला तो प्रवृत्त झाला तो स्मिर्द्याकफने एक वाक्य जे उच्चारले होते की, तुमच्या भावाला शिक्षा होणे तुमच्या पथ्यावर पडण्याजोगे आहे, कारण त्याने वारशाने तुमच्या अन् आल्योशाच्या वाट्याला येणारी रक्कम चाळीस हजारावरून साठ हजारावर जाणार आहे, त्या वाक्याने त्याच्या अंतःकरणात कुठे तरी जखम केली होती. त्याने मीत्याच्या पळून जाण्याची योजना करण्यावर तीस हजारांचा होम करण्याचे ठरविले. त्याला भेटून परत आल्यानंतर तो फार शोकाकुल अन् उदासवाणा झाला; त्याला एकदम वाटू लागले की, आपण मीत्याच्या निसटून जाण्याविषयी जे इतके उत्सुक आहोत ते ती अंतःकरणातली जखम तीस हजारांचा होम करून भरून काढण्याकरिताच केवळ नव्हे तर दुसऱ्या एका कारणाकरिता. "मी मनानं त्याच्याइतकाच खुनी आहे म्हणून तर मी हे करीत नसेन?" त्याने स्वतःला विचारले. त्याच्या अंतरात अगदी खोलात

काही तरी जाळीत अन् सलत असल्यासारखे त्याला वाटले. सर्वात मुख्य म्हणजे त्या साऱ्या महिनाभर त्याच्या अभिमानाला जबरदस्त धक्का बसलेला होता. पण त्या विषयी नंतर...

आल्योशाशी बोलल्यानंतर जेव्हा इवानने आपल्या घराच्या घंटेवर हात असताना एकदम स्मिर्दाखफकडे जाण्याचे ठरविले, तेव्हा त्याच्या अंतःकरणात एकाएकी उद्भवलेल्या एका विशिष्ट प्रेरणेचा हुकूम त्याने मानला. कतिरीना इवानोवना आल्योशाच्या देखत, "तुम्ही, तुम्ही मला तो (म्हणजे मीत्या) दोषी असल्याचं मत बनवायला लावलंत !" असे नुकतेच त्याला ओरडून म्हणाली त्याचे त्याला स्मरण झाले. ते स्मरण होताच इवान दिङ्मूढ झाला. मीत्या खुनी आहे असे तिचे मत बनविण्याचा त्याने एकदाही कधी प्रयत्न केला नव्हता; उलट, तिच्या समक्ष, तो स्मिर्दाखफकडून परत आला तेव्हा, स्वतःविषयीच शंका घेणारे बोलला होता. तो 'कागद' जो काढून दिला तो तिनं, अन् तिने आपल्या भावाचा दोषीपणा सिद्ध केला होता. अन् आता ती एकदम उद्गारते : "मी स्वतः स्मिर्दाखफकडं जाऊन आले आहे !" केव्हा ती त्याच्याकडे गेली होती ? इवानला त्यासंबंधी काही माहीत नव्हते. म्हणजे तिला मीत्याच्या दोषीपणाची खात्री मुळीच नव्हती ! अन् स्मिर्दाखफने तिला काय सांगितले असणार ? तो तिला काय म्हणाला, काय बरं म्हणाला असेल ? इवानचे अंतःकरण भयंकर संतापाने जळू लागले. त्याला समजेना की अर्ध्याच तासापूर्वी आपण ते शब्द बाहेर कसे पडू दिले अन् त्याच क्षणी ओरडलो कसे नाही. त्याने घंटेवरचा हात काढला अन् तो स्मिर्दाखफच्या घराकडे त्वरेने निघाला. "यावेळी मी कदाचित् त्याला मारूनच टाकीन," वाटेत त्याच्या मनात विचार आला.

८

स्मिर्दाखफशी तिसरी अन् शेवटची मुलाखत

तो अर्ध्या वाटेवर असतानाच, झोंबणारा कोरडा वारा-जो अगदी पहाटेपासून वाहू लागला होता, तो पुनः उठला, अन् सुरेख सुके बर्फ जाड जाड थरांनी पडू लागले. ते जमिनीवर पडून राहत नव्हते, वाऱ्याने भुर्रदिशी उडविले जात होते, अन पुढे सरळ बर्फाचे वादळच झाले. स्मिर्दाखफ ज्या भागात राहात होता तिथे खांबावरचे दिवे जवळ जवळ नव्हतेच. इवान अंधारात लांब लांब ढांगा टाकीत एकटाच चालला, त्याला वादळ चाललेले कळतच नव्हते, तो अंतःप्रेरणेने वाट काढीत चालला होता. त्याचे डोके दुखू लागले होते अन् त्याच्या कानशिलाच्या भागात शिरा उडून वेदना होत होत्या. आपल्या हातांना झटके येऊन ते वळत आहेत असे त्याला जाणवले. मार्या कोन्द्रात्येवनाच्या झोपडीच्या जवळच इवानला

एकदम एकटाच एक प्यालेला कोणी शेतकरी भेटला. त्याच्या अंगात जाड्याभरड्या कापडाचा ठिगळे असलेला कोट होता, अन् तो नागमोडी चालीने, घुरघुरत अन् स्वतःला शिव्या घालीत चालला होता. मध्येच तो घोगऱ्या झिंगलेल्या आवाजात गाऊ लागे.

"हाय रे, वान्या गेलाय पीटर्सबर्गला,
तो परतेपर्यंत मी त्याची वाट बघणार नाही."

पण तो प्रत्येकवेळी दुसऱ्या चरणावर अडथळे अन् पुन्हा शिव्या देऊ लागे; मग पुन्हा तो ते गाणे सुरू करी. इवानच्या डोक्यात त्याचा विचार घुसण्यापूर्वीच त्याला त्याच्याविषयी तीव्र द्वेष वाटू लागला. एकाएकी त्याला त्याचे अस्तित्व जाणवले. अन् त्याला ठोसा मारून खाली पाडण्याची अनिवार इच्छा त्याला झाली. त्याच क्षणी त्या दोघांची गाठ पडली, अन् तो शेतकरी एकदम जबर झोकांडी खाऊन इवानच्या सपशेल अंगावर येऊन पडला, अन् इवानने त्याला संतापाने मागे ढकलून दिले. तो शेतकरी मागे कोलमडत गेला अन् गोठलेल्या जमिनीवर ठोकळ्यासारखा पडला. त्याच्या तोंडून 'ऊ. हूं' असा एक रडका स्वर निघाला अन् तो गप्प झाला. इवान त्याच्यापाशी गेला. तो उताणा पडला होता, त्याची काहीच हालचाल किंवा शुद्धी दिसत नव्हती. "हा गारठून जाणार." इवानच्या मनात आले, अन तो आपल्या वाटेने स्मिर्द्याखफकडे गेला.

अंगणातल्या वाटेत, मार्या कोन्द्रात्येवना त्याला म्हणाली की, स्मिर्द्याखफ फार आजारी आहे; ती हातात मेणबत्ती घेऊन धावत धावत दार उघडायला आली होती. "तो अंथरुणावर पडून आहे असं नाही, पण त्याचं डोकं ठिकाणावर नाही असं दिसतं अन त्यानं आम्हाला चहासुद्धा परत घेऊन जायला सांगितलं; घेणार नाही म्हणाला."

"असं? तो आरडाओरडा करतोय का?" इवानने घोगऱ्या स्वरात विचारले.

"नाही हो, अगदी उलट आहे, तो अतिशयच शांत आहे. मात्र कृपा करून त्याच्याशी फार वेळ बोलू नका हं." मार्या कोन्द्रात्येवनाने त्याला विनवणी केली. इवानने दार उघडले अन् आत पाऊल टाकले.

त्या खोलीत पूर्वीप्रमाणेच भलता उकाडा होत होता, पण तिच्यात बदल झालेले होते. भिंतीकडेला असलेले एक बाक तिथून काढण्यात आले होते अन् त्याच्या जागी एक मोठा कातडे आच्छादलेला शिसवी कोच ठेवण्यात आला होता, त्यावर अंथरूण घालण्यात आले होते अन् बऱ्याच स्वच्छ उशा ठेवण्यात आल्या होत्या. स्मिर्द्याखफ तोच आपला घरात वापरण्याचा गाऊन घालून त्या कोचावर बसला होता. टेबल त्या कोचाच्या पुढयात आणून ठेवलेले होते, त्यामुळे इकडे तिकडे सरकायलासुद्धा फारशी जागा राहिली नव्हती. टेबलावर एक जाडजूड ग्रंथ पिवळया

पुठ्ठयाचा पडलेला होता, पण स्मिर्ग्राखफ तो वाचीत नव्हता. तो काही न करता बसलेला दिसत होता. इवान येताच त्याने त्याच्याकडे सावकाश मूक नजरेने पाहिले, आणि तो आल्याचे त्याला मुळीच आश्चर्य वाटले नाहीसे दिसले. त्याच्या चेहऱ्यावर बराच बदल झालेला होता; तो अधिकच क्षीण अन पिवळट झाला होता. त्याचे डोळे आत खोल गेलेले होते अन त्यांच्या खालच्या बाजूला निळे निळे डाग पडलेले होते.

"अरे, तू खरोखरच आजारी आहेस?" इवान पुढे बोलायचा एकदम थांबला. "तुला मी फार वेळ ताटकळत ठेवणार नाही, माझा कोटसुद्धा मी काढीत नाही. इथं कुठं बसावं बरं?"

तो त्या मेजाच्या दुसऱ्या टोकाकडे गेला, एक खुर्ची त्याने सरकवून घेतली अन् तिच्यावर तो बसला.

"तू न बोलता असा माझ्याकडं बघत काय राहिलास? मी फक्त एक प्रश्न घेऊन आलो आहे, अन् शपथपूर्वक सांगतो त्याचं उत्तर घेतल्याशिवाय मी इथून जाणार नाही. ती तरुण बाई कतिरीना इवानोवना तुझ्याकडं आली होती काय?"

स्मिर्ग्राखफ अजूनही गप्पच होता, पूर्वीसारखीच मुकाट्याने इवानकडे त्याची दृष्टी लागलेली होती. एकदम, आपला हात हलवून त्याने आपले तोंड दुसरीकडे वळविले.

"काय झालंय तुला?" इवान म्हणाला.

"काही नाही."

"'काही नाही' म्हणजे?"

"होय, ती आली होती. तुम्हाला काय त्याचं? मला एकटं राहू द्या."

"नाही, मी तुला एकटं राहू देणार नाही. ती केव्हा इथं आली होती, सांग?"

"हं, मी तिच्याबद्दलचं पूर्ण विसरून गेलोय." स्मिर्ग्राखफ तिरस्काराने स्मित करून म्हणाला, आणि आपले तोंड पुन्हा इवानकडे करून त्याने त्याच्याकडे पिसाट द्वेषाच्या नजरेने रोखून पाहिले, तीच ती नजर जी त्याने एक महिन्यापूर्वी त्यांच्या शेवटच्या मुलाखतीत त्याच्यावर रोखली होती.

"तुम्ही स्वतःच फार आजारी असलेले दिसता, तुमचा चेहेरा खंगलेला दिसतो; तुमचं रूप ओळखू येत नाही," तो इवानला म्हणाला.

"माझी तब्येत दे सोडून, मी विचारतो ते मला सांग."

"पण तुमचे डोळे का इतके खोल गेले? आतला पांढरा भाग अगदी पिवळा झालाय. इतकी तुम्हाला वेदना होते आहे?" त्याने तुच्छतेने स्मित केले अन मग एकाएकी सरळ मोठ्याने तो हसला.

"ऐक, मी तुला सांगितलंय मी उत्तर घेतल्यावाचून जाणार नाही." इवान अतिशय चिडून ओरडला.

"मला असे का छळता? का अशा यातना देता?" स्मिर्याखफ क्लेश होत असल्याचे दर्शवून म्हणाला.

"मसणात जा! मला तुझ्याशी काही कर्तव्य नाही. फक्त माझ्या प्रश्नाचं उत्तर दे की, मी चाललो."

"माझ्याकडं काही उत्तर नाही तुम्हाला द्यायला," स्मिर्याखफ पुन्हा खाली पाहत म्हणाला.

"लक्षात ठेव मी तुला उत्तर द्यायला लावीन!"

"तुम्ही इतके बेचैन का?" स्मिर्याखफ त्याच्याकडे, केवळ तुच्छतेनेच नव्हे तर जवळ जवळ शिसारी आल्याच्या नजरेने पाहत राहिला. "खटला उद्या सुरू होणार म्हणून का? तुम्हाला काहीसुद्धा होणार नाही, शेवटी हा विश्वास तुम्हाला वाटत नाही? घरी जा, अंथरूणावर पडा अन शांतपणे झोपा, कशाची भीती धरू नका."

"मला तुझं कळतच नाही...मला उद्याचं भय का म्हणून वाटावं?" इवान आश्चर्याने उद्गारला, आणि एकाएकी भयाची शिरशिरी खरोखरच त्याच्या अंतरात येऊन गेली. स्मिर्याखफने आपल्या नजरेने वरखाली त्याला पाहिले.

"तुम्हाला समजत नाही?" तो ठपका देत ओढल्या स्वरात म्हणाला, अक्कलवंत माणसानं अशा तऱ्हेचं नाटक करण्याचं मनात आणावं हे विचित्रच आहे!"

इवानने त्याच्याकडे निरुत्तर होऊन पाहिले. जो माणूस पूर्वी त्याचा हुजऱ्या होता त्याचा असा हा दचकायला लावणारा, विश्वास बसणार नाही इतका उद्दाम स्वर म्हणजेच एक आश्चर्य होते. त्यांच्या मागच्या भेटीतही असा स्वर त्याने काढला नव्हता.

"मी सांगतो, तुम्हांला भीती वाटण्याचं काही कारण नाही. मी तुमच्या-बद्दल काही बोलणार नाही, तुमच्याविरुद्ध काही पुरावा नाही. अहो, तुमचे हात किती कापताहेत. तुमची बोटं अशी का हलताहेत? घरी जा, तुम्ही नाही त्यांचा खून केलात."

इवान दचकला. त्याला आल्योशाची आठवण झाली.

"मला माहीत आहे तो मी नाही म्हणून," तो अडखळत म्हणाला.

"असं?" स्मिर्याखफने पुनः त्याला पकडले.

इवान एकदम उठला अन् त्यानं त्याचा खांदा पकडला.

"सगळं सांग, सर्पा! सगळं मला सांग!"

स्मिर्दयाखफ मुळीच म्याला नाही. त्याने फक्त आपले डोळे इवानवर पिसाट द्वेषाने रोखले.

" ठीक, जर तेच हवं असलं तर, तुम्ही त्याचा खून केलात," तो क्षुब्धतेने हलक्या स्वरात बोलला.

इवान, कशाचा तरी विचार करीत, परत खुर्चीवर बसला. तो खुनशीपणाने हसला.

" म्हणजे मी निघून गेलो ते म्हणतोस तू? त्या संबंधाने गेल्या खेपेला तू बोलला होतास ते?"

" तुम्ही गेल्या खेपेला माझ्या पुढे उभे राहिला अन् सर्व काही समजलात, अन आताही ते समजतांहात."

" मी समजतो ते म्हणजे तू पागल आहेस."

" तुम्हाला याचा कंटाळा नाही का आला? इथं आता आपण समोरा-समोर आहोत; एकमेकांपुढे नाटक करीत राहण्याचं काय प्रयोजन? ते सर्व माझ्यावर टाकण्याचा, माझ्या तोंडावर फेकण्याचा, अजून तुमचा प्रयत्न आहे? तुम्ही त्याचा खून केलात; तुम्ही खरे खुनी आहात, मी फक्त तुमचं साधन होतो, तुमचा इमानी नोकर, अन् तुमच्या शब्दांचं अनुकरण करायचं म्हणून मी ते केलं."

" केलं? तू त्यांचा खून केलास?"

इवान थंडगार पडला. आपल्या मेंदूत काही तरी तुटले असं त्याला वाटले, आणि त्याचे सर्वांग थंडीने हुडहुडी भरल्यासारखे थरारले. मग स्मिर्दयाखफच त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागला; बहुधा इवानला वाटलेल्या भयाकुलतेतील खरेपणाचा त्याच्यावर परिणाम झाला असावा.

" तुम्हाला खरोखरच माहीत नव्हतं असं तर तुम्हाला म्हणायचं नाही?" तो अविश्वासाने आणि बळेबळे स्मित करून त्याच्या डोळ्याकडे पाहत, अडखळत म्हणाला. इवान अजूनही त्याच्याकडे पाहात राहिला होता, अन त्याच्या तोंडून शब्द उमटत नव्हतासे दिसले.

" हाय रे, वान्या गेलाय पीटर्सबर्गला.
तो परतेपर्यंत त्याची वाट बघणार नाही."

या ओळी एकदम त्याच्या डोक्यात उठल्या.

" तू एक स्वप्न, एक पिशाच आहेस अन् माझ्या शेजारी बसलाहेस असं मला वाटतं," तो पुटपुटला.

" इथं पिशाचबिशाच काही नाही. फक्त आपण दोघेच आहोत अन आणखी एक आहे. तो तिसरा इथं आपल्या दोघांच्यामध्ये आहे यात संशय नाही."

" कोण तो? कोण इथं आहे! कुठला तिसरा इसम!" इवान घाबरून

जाऊन, आपल्या भोवती पाहत ओरडला, त्याचे डोळे भरभर कोपऱ्या कोपऱ्या-तून शोध घेऊ लागले.

"तो तिसरा साक्षात् ईश्वर, विधाता. तो तिसरा आता आपल्यामध्ये आहे. मात्र त्याला शोधू नका, तुम्हाला सापडणार नाही."

"तू त्यांना मारलंस हे खोटं आहे!" इवान बेफामपणे ओरडला. "तू पागल झाला आहेस, किंवा पुन्हा मला छळतो आहेस!"

स्मिर्द्याखफने पूर्वीप्रमाणेच त्याला कुतूहलाने न्याहाळून पाहिले, त्याच्यात भीतीचे कसलेही चिन्ह नव्हते. अजून त्याच्या मनातला अविश्वास मावळला नव्हता; अजून त्याची कल्पना होती की इवानला सर्व काही माहीत आहे अन् 'ते सर्व आपल्यावर, आपल्या तोंडावर फेकण्याचा' त्याचा प्रयत्न आहे.

"क्षणभर थांबा," तो शेवटी क्षीण स्वरात म्हणाला, अन एकदम आपला डावा पाय टेबलाखालून वर घेऊन, तो आपल्या विजारीचा पाय वळवीत वळवीत वर घेऊ लागला. त्याने पायात लांब पायमोजे अन जोडे घातले होते. त्याने हलके हलके आपले मोजावरचे बंद काढून घेतले अन पायमोजाच्या तळाशी चाचपू लागला. इवान त्याच्याकडे पाहत राहिला, आणि एकदम भयाच्या धसक्याने थरारला.

"अरे, हा वेडा झाला?" तो ओरडला, अन त्वरेने उठून तो मागे सरला, त्याबरोबर त्याचे डोके मागच्या भिंतीला थडकले अन तो तिला टेकून ताठ अन सरळ उभा राहिला. तो विलक्षण भयाने स्मिर्द्याखफकडे पाहत राहिला, पण स्मिर्द्याखफ, त्यांच्या भयग्रस्ततेने बिलकुल न डगमगता, आपल्या पायमोजात चाचपत राहिला, जणू तो आपल्या बोटांनी काहीतरी पकडून बाहेर ओढून काढू पाहत होता. शेवटी त्याच्या हाती ती वस्तू आली अन तो ती बाहेर काढू लागला. इवानला तो एक कागद, किंवा कागदांची सुरळी, असावीसे दिसले. स्मिर्द्याखफने ती बाहेर काढली अन टेबलावर ठेवली.

"पाहा," तो संथपणे म्हणाला.

"काय आहे हे?" इवानने कापत कापत विचारले.

"मेहेरबानी करून ते पाहा," स्मिर्द्याखफ उत्तरला, त्याचा आवाज पूर्वी-प्रमाणेच खर्जातला होता.

इवान टेबलापाशी गेला, त्याने ती सुरळी हाती घेतली अन ती तो उलगडू लागला पण एकदम त्याने आपली बोटे, जणू एखाद्या बीभत्स सरपटणाऱ्या प्राण्याला लागणार, अशा भीतीने मागे खेचली.

"तुमच्या हातांना झटके येताहेत," स्मिर्द्याखफ म्हणाला, अन त्याने स्वतःच सावकाश ते पुडके उलगडले. वरच्या आच्छादनाखाली शंभर शंभर रूबलच्या नोटांची तीन पाकिटे होती.

"ती सगळी रक्कम, ते तीन हजार रूबल, हे आहेत; तुम्ही ते मोजायचं कारण

नाही. ते घ्या," स्मिर्दाखफने त्या नोटांकडे मानेने इषारा करून इवानला सुचविले. इवान परत आपल्या खुर्चीत गोळा होऊन बसला. तो पालीसारखा पांढरा पडला.

"तू मला घाबरून सोडलंस.... तुझ्या पायमोजांनी," तो विचित्र रीतीने हास्य करून म्हणाला.

"खरोखर तुम्हांला आतापर्यंत माहीत नव्हतं हे शक्य आहे?" स्मिर्दाखफने पुन्हा एकदा विचारले.

"नाही, मला माहीत नव्हतं. मी दमीत्रिचाच विचार करीत राहिलो होतो. भाई, भाई! अरेरे!" त्याने एकदम दोन्ही हातांनी आपले डोके धरले.

"ऐक. तू एकट्यानंच त्यांना मारलंस? माझ्या भावाची मदत घेऊन की न घेता?"

"फक्त तुमच्या, तुमच्याच मदतीनं, मी त्यांना मारलं, अन दमीत्रि पूर्ण निरपराधी आहे."

"बरं, बरं. माझ्याबद्दल मागाहून सांग. मी असा थरथर कापत का आहे? मला नीट बोलताही येत नाही."

"तुम्ही त्या वेळी चांगले धीट होता. तुम्ही म्हणालात, 'सर्व काही कायदेशीर आहे,' अन आता तुम्ही किती भ्यालेले आहात," स्मिर्दाखफ आश्चर्याने पुटपुटला. "थोडं लिंबाचं सरबत घेता का? मी लगेच थोडं मागवतो. त्यानं चांगला तकवा येईल. मात्र हे अगोदर मला लपवलं पाहिजे."

अन त्याने पुन्हा त्या नोटांकडे इषारा केला. तो उठून दरवाज्यातून मार्या कोन्द्रात्येवनाला थोडेसे लिंबाचे सरबत करून आणायला ओरडणार होता, पण त्या नोटा तिच्या दृष्टीस पडू नयेत म्हणून त्यांच्यावर काहीतरी झाकण्याकरिता पाहत असताना त्याने प्रथम आपला हातरुमाल बाहेर काढला, आणि तो अतिशय गलिच्छ आहे असे पाहून तो मोठा पिवळा ग्रंथ जो इवानने प्रथम टेबलावर पडलेला पाहिला होता तो उचलला, अन त्या नोटांवर ठेवला. तो ग्रंथ होता– 'सीरियाचे धर्मशील बाबा इसाक यांची वचने.' इवानने ते नाव यंत्रवत् वाचले.

"मला सरबत नको," तो म्हणाला. "माझ्याबद्दल नंतर बोल. खाली बैस अन तू कसं कसं केलंस ते मला सांग. त्या संबंधानं सगळं सांग."

"तुम्ही तुमचा ओव्हरकोट काढलात तर बरं, नाही तर तुम्हाला फार उकडेल."

इवानने, जणू त्याच्या आत्ताच लक्षात आल्याप्रमाणे, आपला ओवरकोट काढला, अन आपल्या खुर्चीवरून न उठता, बाकावर फेकला.

"बोल, मेहेरबानी करून बोल."

तो जरा शांत झालासा दिसला. तो थांबला, स्मिर्दाखफ आता आपल्याला त्यासंबंधाने सर्व काही सांगणार अशी त्याला खात्री वाटली.

" कसं केलं !" स्मिर्द्याखफने उसासा सोडला. " अत्यंत स्वाभाविक रीतीनं, तुमच्याच शब्दांचं अनुसरण करीत, ते केलं."

" माझ्या शब्दांबद्दल नंतर," इवान मध्येच पुन्हा बोलला, स्वतःला त्याने जणू पूर्ण सावरले असावे, त्याने खंबीरपणे शब्द उच्चारले, पूर्वीप्रमाणे तो ओरडला नाही. " फक्त मला तू ते कसं कसं केलंस ते तपशीलवार सांग. जसं घडलं तसं सगळं. काहीही विसरू नकोस. तपशील, सर्वांत मुख्य म्हणजे तपशील सांग, मी तुझी विनवणी करतो."

" तुम्ही निघून गेलात, मग मी तळघरात पडलो."

" फिटनं की फिटचं सोंग आणून ?"

" सोंग आणूनच अर्थात्. ते सगळं मी सोंग आणलं होतं. मी हळूच पायऱ्या उतरून खाली अगदी तळाशी गेलो अन् तिथं मुकाट्यानं पडून राहिलो, अन जसा मी पडून राहिलो तशी एक किंकाळी फोडली, अन हातपाय झाडत राहिलो तो त्यांनी मला बाहेर नेईपर्यंत."

" थांब ! आणि हे तुझं सोंग नंतर, अन इस्पितळात, सतत सुरूच होतं ?"

" नाही, मुळीच नाही. दुसऱ्या दिवशी, सकाळी, त्यांनी मला इस्पितळात नेण्यापूर्वी, मला खराच झटका आला होता, अन तो कित्येक वर्षे आला नव्हता इतका जोराचा होता. दोन दिवस मी बेशुद्ध होतो."

" बरं, बरं. पुढं सांग."

" त्यांनी मला अंथरुणावर निजवलं. मी आडभिंतीच्या दुसऱ्या बाजूला असेन हे मला माहीत होतं, कारण जेव्हा जेव्हा मी आजारी पडलो होतो तेव्हा तेव्हा मार्फा इग्नात्येवना मला तिथं, त्यांच्याजवळ ठेवीत असे. ती नेहमी, अगदी माझ्या जन्मापासून, माझ्याशी प्रेमानं वागत असे. रात्री मी कण्हत असे पण शांतपणे. मी दमीत्रि येण्याची अपेक्षा धरून होतो."

" त्याची अपेक्षा ? तुझ्याकडं येण्याची ?"

" माझ्याकडे नव्हे. तो घरात येईल अशी माझी अपेक्षा होती, कारण तो त्या रात्री येणार याविषयी मला शंका नव्हती, कारण मी नसल्यामुळं अन् काही बातमी न मिळाल्यामुळं, तो येणारच अन् नेहमी येत असे त्याप्रमाणं कुंपणावर चढून येणार अन् काहीतरी करणारच अशी मला खात्री होती."

" अन् जर तो आला नसता तर ?"

" तर मग काहीच घडलं नसतं. मी माझी तशी अवस्था त्याला सोडून कधीच करणार नव्हतो."

" बरं, बरं...जरा समजेल असं बोल, घाई करू नकोस; सर्वांत मुख्य म्हणजे त्यातलं काहीही सोडू नकोस !"

" तो फ्योदर पावलोविचला मारायला येणार अशी माझी अपेक्षा होती. ते

मला खात्रीनं वाटत होतं, कारण मी त्याला तसं तयार केलं होतं....गेल्या काही दिवसांच्या काळात...त्याला ठोक्यांसंबंधानं माहिती होती, ती मुख्य गोष्ट. त्याचा तो संशयितपणा अन् त्याच्यात इतके दिवस वाढत जात असलेला संताप यांनी, तो त्या ठोक्यांच्या आधारानं घरात प्रवेश केल्यावाचून राहणारच नव्हता. ते अटळ होतं, म्हणून मी त्याची अपेक्षा करीत होतो."

"थांब," इवानने मध्येच त्याला थांबविले, "जर त्यानं त्याला मारलं असतं तर त्यानं तो पैसा घेतला असता अन् आपल्याबरोबर तो घेऊन गेला असता; तू त्याचा विचार केलाच असला पाहिजेस. मग तुला त्यात काय मिळालं असतं? मला कळत नाही."

"पण त्याला तो पैसा सापडलाच नसता. मी तो पैसा गादीच्या खाली आहे म्हणून सांगितलं तेवढंच त्याला माहीत. पण ते खरं नव्हतं. तो एका पेटीत ठेवलेला होता. आणि फक्त माझ्यावरच त्यांचा विश्वास असल्यामुळं नंतर मी फ्योदर पावलोविचना ते नोटांचं पाकीट प्रतिमांच्या पाठीमागच्या कोपऱ्यात लपवून ठेवा असं सुचवलं, कारण ती जागा कोणाच्याही लक्षात आली नसती, विशेषतः जेव्हा लोक घाईनं येतात तेव्हा. तेव्हा ते पाकीट तिथं होतं, त्या प्रतिमांच्या मागच्या कोपऱ्यात. ते गादीखाली ठेवणं विचित्रच झालं असतं. पेटीला नाही तरी कुलूप घालता येतं. पण सर्वांना असं वाटतंय की, ते गादीखालीच होतं. मूर्खपणाची समजूत. तेव्हा जर दमीत्रि फ्योदरोविचनं खून केला असता तर, काही न मिळाल्यामुळं, खून करणाऱ्यांच्या बाबतीत नेहमीच घडतं तसं तो प्रत्येक आवाजाला भिऊन, घाईघाईत पळून तरी गेला असता, किंवा तो पकडला गेला असता. मग मी केव्हाही प्रतिमांपर्यंत कसातरी धडपडत गेलो असतो अन् दुसऱ्या दिवशी किंवा त्या रात्रीसुद्धा ते पैसे काढून घेतले असते, अन् ते सारं दमीत्रि फ्योदरोविचच्या नावे लागलं असतं. त्यावर मी विसंबून राहू शकत होतो."

"पण जर त्यानं त्याला ठार केलंच नसतं, फक्त ठोशांनी खाली पाडलं असतं तर?

"जर मारलं नसतं, तर अर्थात् मी ते पैसे घेण्याचं धाडस केलं नसतं, अन् काहीच घडलं नसतं. पण मी अदमास केला की, तो त्यांना मारून बेशुद्ध करील, अन् मला ते काढून घेण्याइतका वेळ मिळेल, अन् मग मी फ्योदर पावलोविचच्या मनात भरवून देईन की, तुम्हाला ठोकल्यानंतर दमीत्रि फ्योदरोविचखेरीज दुसऱ्या कुणीही तो पैसा नेलेला नाही म्हणून."

"थांब...माझा गोंधळ होतोय. म्हणजे मग दमीत्रिनंच त्यांना मारलं म्हणायचं, तू फक्त तो पैसा घेतलास, अं?"

"छेः छेः, त्यानं त्यांना नाही मारलं. हं, मी तुम्हाला आत्ता तो खुनी आहे असं सहज सांगू शकलो असतो...पण आता मला तुमच्याशी खोटं बोलायचं नाही,

कारण, कारण जर तुम्हाला खरोखरच आतापर्यंत समजलेलं नसेल, अन तसंच मला दिसतंय, आणि तुम्ही तुमचा गुन्हा माझ्यावर, माझ्या तोंडावर टाकण्याकरिता ढोंग करीत नसाल तरी, तुम्हाला त्या खुनासंबंधी माहिती होती अन तो करण्याचं माझ्यावर तुम्ही सोपवलं होतंत अन् हे समजून उमजून तुम्ही निघून गेलात, आणि म्हणून त्या सर्वाला तुम्ही जबाबदार आहात. म्हणून मला आज या संध्याकाळी तुमच्या तोंडावर सिद्ध करायचं आहे की या साऱ्या प्रकरणात खरे खुनी तुम्ही आहात, मी खरा खुनी नाही, मी त्याला मारलं असलं, तरी तुम्ही न्यायानं खुनी आहात."

"का, का म्हणून मीच खुनी? हा:, अरे देवा!" इवान शेवटी स्वतःला आवरू न शकल्यामुळे ओरडला, हे संभाषण संपेपर्यंत स्वतःसंबंधी चर्चा करायची नाही ही गोष्ट तो विसरूनच गेला. "अजून तुझ्या मनात ते चेरमाश्न्याच आहे? थांब, मला सांग, जर खरोखर चेरमाश्न्याला मी जाणं हीच माझी संमती तू धरून चालला होतास तर माझी साक्षात् संमती तुला कशाला हवी होती? त्याचा खुलासा काय?"

"तुमच्या संमतीची खात्री मिळाल्यानं, मला हे कळलं असतं की तुम्ही ते तीन हजार हातचे गेल्याबद्दल, जरी द्मीत्रि फ्योदरोविच ऐवजी किंवा त्याचा हस्तक म्हणून, माझा संशय असता तरी तुम्ही आरडा-ओरडा केला नसता; उलट इतरांपासून माझं तुम्ही रक्षण केलं असतं ..अन् तुमच्या वारशाचे पैसे तुम्हाला आल्यानंतर तुम्ही साऱ्या आयुष्यभर समर्थ बनल्यामुळं मला बक्षिशी दिली असतीत. कारण तुम्हांला तुमच्या वारशाचे पैसे माझ्यामुळंच मिळाले असते, जर त्यांनी आग्राफेना अलेक्झांद्रोवनाशी लग्न केलं असतं, तर तुम्हाला एक फार्दिंगही मिळाला नसता हे तुम्ही जाणलं असतं."

"हं! म्हणजे नंतर साऱ्या आयुष्यभर मला त्रास देत राहण्याचं तुझ्या मनात होतं," इवान गुरकावून म्हणाला, "आणि समज मी त्यावेळी गेलोच नसतो, अन् तुझ्याविरुद्ध खबर दिली असती तर?"

"तुम्ही काय खबर देणार? की मी चेरमाश्न्याला जायला तुमचं मन वळवलं म्हणून? तो सारा मूर्खपणा आहे. शिवाय, आपलं संभाषण झाल्यानंतर तुम्ही एकतर गेला असतात किंवा राहिला असतात. जर राहिला असतात, तर काहीच घडलं नसतं. मी समजलो असतो की तुम्हाला ते व्हायला नको आहे, म्हणून मी तसा प्रयत्नच केला नसता. ज्याअर्थी तुम्ही गेलात, त्या अर्थी तुम्ही खटल्याच्या वेळी माझ्याविरुद्ध खबर द्यायला जाणार नाही, अन् मी ते तीन हजार घेतले ते नजरेआड कराल, अशी मला हमी दिलीत. अन् खरोखरच मागाहून तुम्ही माझ्यावर खटला भरूच शकला नसता, कारण मग मी सर्व काही कोर्टात सांगितलं असतं; म्हणजे, मी ते तीन हजार चोरले किंवा मी त्यांना ठार मारलं हे नव्हे— ते मी

बोललोच नसतो– पण तुम्ही मला चोरी करायला अन् खून करायला प्रवृत्त केलंत, माझी त्याला संमती नव्हती तरी, असं मी सांगितलं असतं. म्हणूनच तर मला तुमच्या संमतीची गरज होती, म्हणजे माग हून तुम्ही मला अडचणीत आणलं नसतंत, कारण तुमच्याजवळ काय पुरावा असणार होता ? मी तुम्हाला केव्हाही अडचणीत टाकू शकलो असतो, तुमची तुमच्या वडिलांच्या मृत्यूविषयीची उत्कंठा बाहेर फोडली असती, अन् मी तुम्हांला सांगतो, लोकांनी त्यावर विश्वास ठेवला असता, आणि सबंध आयुष्यभर तुमच्या तोंडाला काळोखी लागली असती."

"इतका मी त्यावेळी उत्कंठित होतो, इतका होतो ?" इवान पुनः गुरकावून बोलला.

"खात्रीनं सांगतो तुम्ही होता, अन आपली संमती देऊन मुकाट्यानं माझ्या कृतीला मंजुरी दिलीत." स्मिर्डयाखफनं दृढपणे इवानकडे पाहिले. तो फार अशक्त झाला होता अन् सावकाशीने अन् कष्टाने बोलत होता, पण कोणती तरी आतली शक्ती त्याला पुढे पुढे ढकलीत होती. त्याच्या मनात अर्थात् काही बेत असावा. इवानला त्याची जाणीव झाली.

"चल पुढं," तो म्हणाला. "त्या रात्री काय घडलं ते सांग."

"आणखी काय सांगायचं आहे ! मी तिथं पडून होतो अन् मला वाटलं मालक ओरडताहेत असं मी ऐकलं. आणि त्यापूर्वी ग्रिग्ररी वास्सिल्येविच एकदम उठला होता अन् बाहेर गेला होता, आणि त्यानं एकदम किंकाळी फोडली, अन् मग सर्व शांत अन सामसूम झालं. मी तिथं वाट पाहत पडलो होतो, माझी छाती धडधडत होती; मला ते सहन होईना. शेवटी मी उठलो, बाहेर गेलो. मला डाव्या बाजूची बागेकडची खिडकी उघडी दिसली आणि मी डावीकडं सरून ते तिथं जिवंत बसलेले आहेत की काय याचा कानोसा घेऊ लागलो, आणि मला मालक इकडंतिकडं फिरत असल्याचं, उसासा टाकीत असल्याचं ऐकू आलं, त्यावरून ते जिवंत आहेत हे मी जाणलं. अरेरे ! माझ्या मनात आलं. मी खिडकीपाशी गेलो अन् धनीसाहेबांना ओरडून म्हणालो, मी आहे तो.' अन् ते मला ओरडून म्हणाले, 'तो आला होता; तो आला होता, तो पळाला.' त्यांना म्हणायचं होतं दमीत्रि फ्योदरोविच आला होता. 'त्यानं ग्रिग्ररीला ठार केलं !' 'कुठं ?' मी हलक्या आवाजात विचारलं. 'तिथं, त्या कोपऱ्यात.' त्यांनी बोट दाखवलं. तेही हळूच बोलत होते. 'जरा थांबा' मी म्हटलं. मी बागेच्या त्या कोपऱ्याकडं बघण्याकरिता गेलो, अन् तिथं मला ग्रिगरी वास्सिल्येविच भिंतीपाशी पडलेला, रक्तानं भरलेला अन् बेशुद्ध अवस्थेत दिसला. म्हणजे दमीत्रि फ्योदरोविच इथं येऊन गेला हे खरंच तर, असा विचार माझ्या डोक्यात आला, आणि मी या प्रकारचा शेवट करण्याचा तिथल्या तिथं निश्चय केला, कारण ग्रिग्ररी वास्सिल्योविच, जरी जिवंत असला तरी यावेळी तो काही पाहणारा नव्हता, कारण तो तिथं बेभान होऊन पडलेला होता.

एकच धोका होता तो मार्या इग्नात्येवना कदाचित उठेल त्याचा. मला तो त्या क्षणी जाणवला, पण ती गोष्ट करून टाकण्याची आस मला इतकी लागून राहिली की मला श्वास घेता येईना. मी परत खिडकीपाशी धन्यांच्याकडं गेलो आणि म्हटलं, 'ती इथं आली आहे, ती आली आहे; आग्राफेना अलेक्झांद्रोवना आली आहे, आत येऊ द्यावं अशी तिची इच्छा आहे.' अन ते एखाद्या लहान पोराप्रमाणं हरखले, 'कुठं आहे ती?' त्यांना श्वासही घेता येईना, पण त्यांचा विश्वास बसेना. 'ती तिकडं उभी आहे,' मी म्हटलं. 'दार उघडा,' त्यांनी खिडकीतून माझ्याकडं पाहिलं, अर्धवट विश्वासाने अर्धवट अविश्वासानं, पण दार उघडायला त्यांना धीर होईना. 'अरेच्चा, यांना आता माझी भीती वाटते आहे,' माझ्या मनात आलं. आणि गंमत पाहा, माझ्या एकदम मनात आलं खिडकीच्या तावदानावर ग्रूशिंका आली आहे. याचा संकेत म्हणून आमच्यात ठरलेले ते ठोके, त्यांच्या हुजूर, त्यांच्या डोळ्यांदेखत, वाजवावेत. त्यांचा माझ्या शब्दांवर विश्वास बसला नाही, पण जसे त्यांनी ते ठोके ऐकले तसे ते लगेच तो दरवाजा उघडण्याकरिता पळाले. त्यांनी तो उघडला. मी आत गेलो असतो, पण ते मी आत जाईन म्हणून दारातच उभे राहिले. 'कुठं आहे ती? कुठं आहे ती?' त्यांनी माझ्याकडं पाहिलं, त्यांचं सर्वांग थरथर कापत होतं. हं, माझ्या मनात आलं, जर यांना माझ्याबद्दल इतकी भीती वाटते, तर हे वाईट लक्षण आहे! अन् माझे पाय—ते मला आत येऊ देणार नाहीत किंवा हाका मारतील, किंवा मार्या इग्नात्येवना धावत येईल, किंवा काहीतरी घडेल, या भीतीनं लटलटायला लागले. मला आता आठवत नाही, पण त्यांच्यासमोर उभं राहिल्यानं मी फिका पडलो असलो पाहिजे. मी त्यांना कुजबुजलो: 'असं काय, ती तिथं आहे, तिथं, खिडकीखाली, तुम्हाला दिसत नाही असं कसं?' मी म्हणालो. 'मग आण की तिला, आण तिला.' मी म्हटलं, "ती या आवाजानं घाबरली आहे, ती झुडुपात दडली आहे; तिकडं अभ्यासखोलीत जाऊन तिला स्वतःच हाक मारा ना.' ते खिडकीकडं धावत गेले, त्यांनी मेणबत्ती खिडकीत ठेवली. 'ग्रूशिंका', ते ओरडले, 'ग्रूशिंका, तू आली आहेस?' जरी ते तसे ओरडले तरी त्यांना खिडकीतून खाली वाकायचं नव्हतं, त्यांना माझ्यापासून बाजूला व्हायचं नव्हतं, कारण ते भयग्रस्त झालेले होते; ते इतके भ्याले होते की ते माझ्याकडं पाठ करायला तयार नव्हते. 'अं, इथं ती आहे', मी म्हटलं. मी खिडकीपाशी गेलो अन् अगदी बाहेर खाली वाकलो. 'ती इकडं आहे, त्या झुडुपात ती आहे, तुमच्याकडं बघून हसते आहे, तुम्हांला दिसत नाही?' एकदम त्यांचा विश्वास बसला; त्यांचं सगळं अंग कापू लागलं— ते तिच्यासाठी विलक्षण वेडे झाले होते— अन् ते सरळ खोलीतून खाली वाकले. मी त्यांच्या टेबलावरून ते लोखंडी कागदावर ठेवण्याचं वजन झटकन् उचललं; आठवतं तुम्हाला ते, तीन पौंड वजनाचं असेल ते. मी जोरानं खाली आणून त्याचा कोपरा, त्यांच्या डोक्याच्या कवटीवर हाणला. ते ओरडलेसुद्धा

नाहीत. ते एकदम गोळा होऊन पडले, आणि मी पुन्हा एकदा अन् आणखी तिसऱ्यांदा हाणलं. आणि तिसऱ्या वेळी मला समजलं की मी त्यांची कवटी फोडली आहे. ते तत्काळ आपल्या पाठीवर वळले, अन् तोंड वर करून पडले; ते रक्तानं भरून गेलं होतं. मी आजूबाजूला बघितलं. माझ्या अंगावर कुठं रक्त नव्हतं, एक डागसुद्धा नव्हता. मी ते वजन पुसलं, परत ठेवलं, प्रतिमा होत्या तिथं गेलो, पाकिटातून पैसे बाहेर काढले, आणि ते पाकीट जमिनीवर भिरकावलं अन त्याच्याच शेजारी ती गुलाबी रिबन. सर्वांग लटलट कापत असताना मी बाहेर बागेत गेलो, सरळ त्या सफरचंदाच्या झाडाकडं गेलो, त्याला एक ढोली आहे. ती माहीत आहे ढोली तुम्हाला? मी ती फार दिवसांपासून हेरून ठेवलेली होती. आणि त्यात एक फडकं अन कागदाचा तुकडा तयार ठेवून दिला होता. मी त्या सर्व नोटा त्या फडक्यात गुंडाळल्या अन् त्या भोकात अगदी खोलात खोचून टाकल्या. आणि त्या तिथं पंधरा एक दिवस राहिल्या. मी इस्पितळातून आल्यानंतर त्या काढून घेतल्या. मी माझ्या अंथरुणाकडं परत गेलो, पडलो अन विचार करू लागलो; 'जर ग्रिगरी वासिल्येविच सरळ मारला गेला असेल, तर ते माझ्या दृष्टीने बिघडणार आहे, पण जर तो मारला गेला नसेल आणि बरा होईल तर सोळा आणे काम होईल, कारण तो मग दमीत्रि फ्योदरोविच इथं आला होता आणि त्यानं त्यांना मारून पैसा नेला असला पाहिजे याला साक्ष राहील! मग मी अनिश्चयाच्या अन अधीरपणाच्या अवस्थेत मोठमोठ्यानं ओरडू लागलो, शक्य तितक्या लवकर मार्या इग्नात्येवनाला उठवावं हा हेतू. शेवटी ती उठली, अन धावत माझ्याकडं आली, पण जेव्हा तिला ग्रिगरी वासिल्येविच तिथं नाही असं दिसलं, तेव्हा ती बाहेर धावत गेली, अन मी तिची बागेतून फोडलेली किंकाळी ऐकली. अन मग पुढचं सारं सुरू झालं अन माझं मन निश्चिंत झालं.

तो थांबला. इवान आतापर्यंत अगदी गुपचूप हालचाल न करता किंवा त्याच्यावरून आपली नजर न काढता ऐकत होता. आपली हकीकत सांगत असताना स्मिर्दियाकफ मधून मधून त्याच्याकडे दृष्टिक्षेप करीत होता, पण बहुतेक वेळ तो नजर चुकवीत होता. त्याने जेव्हा कहाणी संपविली तेव्हा तो बेचैन झालेला दिसला आणि त्याचा श्वास जोराने चालला होता. घामाचे थेंब त्याच्या चेहऱ्यावर डबडबले होते. पण ते पश्चात्तापाचे दुःख होते की काय होते हे सांगणे अशक्य होते.

"थांब!" इवान विचार करीत म्हणाला. "त्या दरवाज्याचं काय? जर त्यांनीच तुला दरवाजा उघडला म्हणतोस, तर ग्रिगरीला तो पूर्वी उघडलेला कसा दिसला? कारण तू जाण्यापूर्वी ग्रिगरीनं तो पाहिला होता."

इवान अगदी समजुतीनं, वेगळ्याच स्वरात, पूर्वीप्रमाणे न रागावता, बोलत होता हे विशेष होते, आणि जर कोणी त्याच वेळी दरवाजा उघडून आत त्यांच्याकडं

डोकावून पाहिले असते, तर त्याचा निश्चितपणे असा समज झाला असता की ते कोणत्या तरी नेहमीच्या, पण मजेदार विषयासंबंधी शांतपणे बोलत आहेत.

"त्या दरवाज्यासंबंधानं आणि ग्रिगरी वास्सिल्येविचनं तो उघडा बघितला होता त्यासंबंधानं बोलायचं तर ती फक्त त्याची भ्रामक कल्पना आहे," स्मिर्दीयाकफ वक्र हास्य करून म्हणाला. "मनुष्यप्राणी नाही, मी खात्रीपूर्वक सांगतो, तो हट्टी खेचर आहे. त्यानं तो पहिला नव्हता, पण पाहिला अशी त्यानं कल्पना केली, अन त्याला हलवणं शक्यच नाही. त्यानं ती कल्पना आपल्या डोक्यात घेतली हे आमचं सुदैवच, कारण त्यानंतर दमीत्रि फ्योदरोविचला ते शिक्षा केल्यावाचून राहणारच नाहीत."

"ऐकून घे..." इवान म्हणाला, त्याच्या डोक्यात पुन्हा गोंधळ व्हायला लागलासे दिसले आणि तो काहीतरी लक्षात आणण्याचा प्रयत्न करीत होता. "ऐक. मला तुला बरेच प्रश्न विचारायचे आहेत, पण मी ते विसरतोय.... मी सारखा विसरतोय अन सारा गोंधळ होतोय. हा, मला एवढं निदान सांग, तू ते पाकीट उघडून तिथं जमिनीवरच का टाकून दिलंस? तू ते स्वतः बरोबरच का घेऊन गेला नाहीस?.... तू जेव्हा मला सांगत होतास तेव्हा मला वाटलं तू जणू तेच करणं योग्य अशा रीतीनं त्यासंबंधी बोलतो आहेस.... पण का, ते मला समजत नाही..."

"मी ते योग्य कारणाकरिता केलं. कारण जर एखाद्या माणसाला त्या संबंधी सर्व माहिती असती, जशी उदाहरणार्थ मला होती, जर त्यानं त्या नोटा पूर्वी पाहिलेल्या असल्या अन् कदाचित स्वतःच त्या पाकिटात घालून ठेवल्या असल्या, आणि ते पाकीट सीलबंद करून त्यावर पत्ता लिहिलेला स्वतःच्या डोळ्यांनी पाहिला असता, जर अशा मनुष्यानं तो खून केला असता, तर त्याला मागाहून ते पाकीट, विशेषतः अशा जीवघेण्या घाईत असताना, फाडून उघडण्याचं काय कारण होतं? कारण त्याला नक्की माहीत होतं की त्या नोटा त्या पाकिटात असल्याच पाहिजेत. जर तो चोर कोणी माझ्यासारखाच असता तर त्यानं ते पाकीट सरळ आपल्या खिशात ठेवलं असतं अन ते घेऊन तो शक्य तितक्या जलदीनं निसटला असता. पण दमीत्रि फ्योदरोविचच्या बाबतीत स्थिती अगदी वेगळ्या प्रकारची असणार. त्याला त्या पाकिटाबद्दलची माहिती फक्त ऐकून होती; त्यानं ते कधी बघितलेलं नव्हतं, अन जर समजा त्याला ते गादीखाली सापडलं असतं, तर त्यानं त्या नोटा त्यात आहेत की नाही याची खात्री करून घेण्याकरिता ते शक्य तितक्या त्वरेनं फाडून उघडलं असतं. अन् त्यानं ते पाकीट खाली फेकून दिलं असतं, हा आपल्याविरुद्ध पुरावा होईल एवढा विचार करायला त्याला सवडच मिळाली नसती. कारण तो काही सराईत चोर नव्हे अन त्यानं पूर्वी अशी सरळ चोरी कधीच केलेली नव्हती, कारण तो जन्मजात सभ्य माणूस आहे, अन जर तो चोरी करायला प्रवृत्त झाला असता तर तिला चोरी म्हणतात तशी ती होणार नाही, जे त्याचंच होतं ते फक्त त्यानं घेतलं

असंच ते होणार, कारण त्यानं पूर्वी सगळ्या शहराला आपण ते करणार असं सांगितलं होतं, आणि प्रत्येकापुढं अशी शेखीही मिरवली होती की आपण जाऊन आपली मिळकत फ्योदर पावलोविचकडून घेऊ म्हणून. माझी तपासणी झाली तेव्हा मी ते उघडपणे तसं सरकारी वकिलाला सांगितलं नाही, पण अगदी उलट मी सूचकपणानं त्याच्या नजरेला ते आणलं, असं की जणू माझ्या ते लक्षातच आलं नाही, त्याच्या स्वतःच्याच ते जणू लक्षात आलं, मी काही ते त्याला सुचविलेलं नाही; त्यामुळं माझ्या सूचनेनं सरकारी वकील महाशयांच्या तोंडाला चक्क पाणी सुटलं."

"पण हे सारं तिथल्या तिथंच तुझ्या मनात येणं शक्य आहे?" इवान आश्चर्याने थक्क होऊन म्हणाला. तो पुनः स्मिर्द्याखफकडं भयभीत होऊन पाहू लागला.

"बापरे! इतक्या जीवघेण्या घाईत इतका सारा विचार करणं कुणाला शक्य तरी आहे? हे सर्व आगाऊ विचार करून योजण्यात आलं होतं."

"हं.... हं, सैतानानं तुला हात दिला!" इवान पुनः म्हणाला. "तू बुद्दू नाहीस, मी समजलो होतो त्यापेक्षा तू फारच हुषार आहेस...."

तो उठला, अर्थात् खोलीत येरझारा घालण्याचा त्याचा विचार होता. त्याला भयंकर पीडा होत होती. पण त्या टेबलाने त्याचा मार्ग अडविल्यामुळे अन् टेबल व भिंत यांच्यामधून जायला फारसा वाव नसल्यामुळे, तो जिथे उभा होता तिथेच फिरला अन् पुन्हा खाली बसला. कदाचित् हलणे शक्य न झाल्याचीही त्याला चीड आली असावी, कारण तो एकदम जवळजवळ पूर्वीइतक्याच आवेशाने ओरडलाः

"ऐक, नीच, तिरस्करणीय किड्या! लक्षात घे की मी तुला ठार मारीत नाही तर ते फक्त तू उद्या खटल्याच्या वेळी जबाब द्यावास याकरिता तुला जिवंत ठेवायचं म्हणून ईश्वर साक्ष आहे," इवान आपला हात वर करून म्हणाला, "कदाचित् मीसुद्धा त्यात गुन्हेगार असेन; कदाचित् खरोखरच माझ्या मनात माझ्या वडिलांच्या... मरणाची इच्छा गुप्तपणे घर करून असेल, पण मी शपथपूर्वक सांगतो की मी तू समजतोस तितका गुन्हेगार नाही, अन् कदाचित् मी तुला मुळी प्रेरणाही दिली नसेल. छेः छेः, मी मुळीच तुला प्रेरणा दिली नाही! पण हरकत नाही, मी उद्या खटल्याच्या वेळी माझ्याविरुद्ध साक्ष देईन. तो माझा निश्चय झाला आहे! मी अगदी सर्व, सर्व सांगेन. पण आपण दोघे एकदमच उभे राहू. अन् तू खटल्याच्या वेळी जे काही माझ्याविरुद्ध बोलशील, कोणताही पुरावा तू देशील, त्याला मी तोंड देईन, मला तुझं भय वाटत नाही. मी ते आपण होऊन कबूल करीन! पण तूसुद्धा कबूल केलं पाहिजेस! तू केलंच पाहिजेस, केलंच पाहिजेस, आपण दोघे मिळूनच जाऊ. असंच हे होईल!"

इवान हे गंभीरपणे अन निश्चयाने म्हणाला, आणि त्याच्या चमकणाऱ्या डोळ्यांवरूनच तो तसे करणार हे सहज दिसून येत होते.

"तुम्ही आजारी आहात, मला दिसतंय, तुम्ही फार आजारी आहात. तुमचे डोळे पिवळे झाले आहेत," स्मिर्द्याखफ उद्‌गारला. त्याच्या आवाजात उपरोध मुळीच नव्हता, उलट खरे म्हणजे कणवच होती.

"आपण मिळूनच जाऊ," इवान पुन्हा म्हणाला. "आणि जर तू आला नाहीस, तरी हरकत नाही, मी एकटा जाईन."

स्मिर्द्याखफ थांबला, जणू तो विचार करीत असावा.

"तसं काही होणार नाही, अन् तुम्ही जाणार नाही," तो शेवटी निश्चयपूर्वक म्हणाला.

"तुला माझं म्हणणं समजत नाही," इवान ठपका देण्याच्या स्वरात उद्‌गारला.

तुम्ही जर ते सर्व कबूल केलंत, तर तुम्हाला खूपच शरम वाटेल. अन् दुसरं म्हणजे, त्याचा मुळीच उपयोग होणार नाही, कारण मी सरळ सांगेन की मी असं काही यांना कधीच बोललो नव्हतो, अन् हे एकतर आजारी असले पाहिजेत (तसे असल्यासारखे दिसताही तुम्ही.) किंवा यांना आपल्या भावाविषयी इतकं वाईट वाटतं आहे की त्याला वाचविण्याकरिता ते स्वतःचं बलिदान करायला तयार झाले आहेत, अन् त्यांनी माझ्याविरुद्ध हे कुभांड रचलेलं आहे, कारण यांनी मला चिलटापेक्षा जास्त महत्त्व कधीच दिलं नव्हतं. आणि तुमच्या बोलण्यावर कोण विश्वास ठेवील, अन् तुमच्याकडं एकतरी पुरावा काही आहे का?"

"ऐक, तू आत्ताच या नोटा मला खात्री पटविण्याकरिता दाखविल्यास."

"स्मिर्द्याखफनं ते पुस्तक नोटांवरून उचललं अन् बाजूला ठेवलं.

"हा पैसा तुम्ही आपल्याबरोबर घेऊन जा," स्मिर्द्याखफने उसासा सोडला.

"अर्थात तो मी घेऊन जाणारच. पण तू जर त्याकरता खून केलास तर तो तू मला का देत आहेस?" इवानने अत्यंत आश्चर्याने त्याच्याकडे पाहिले.

"मला तो नको आहे," स्मिर्द्याखफ 'नको' असे खुणेने दर्शवून कंपित आवाजात स्पष्टपणे बोलला; "माझ्या मनात हा पैसा घेऊन मॉस्कोत किंवा त्याहून चांगलं म्हणजे बाहेर देशात, नवीन जीवन सुरू करावं अशी कल्पना होती खरी. माझं तसं स्वप्न होतं खरं, त्याचं मुख्य कारण म्हणजे 'सर्व काही चालण्यासारखं आहे' हे तुम्ही जे मला शिकवलंत ते अगदी बरोबर आहे, कारण तुम्ही त्यासंबंधानं माझ्याशी खूप बोललेले आहात. कारण जर सनातन ईश्वर म्हणून कोणी नसेल, तर मग सद्‌गुण अशी वस्तूच नाही, अन त्याची गरजही नाही. तुमचं ते म्हणणं बरोबर होतं. तेव्हा मी त्या दृष्टीनं त्याकडं पाहिलं."

"या निष्कर्षाला तुझा तू आलास काय?" इवानने वक्र स्मित करून विचारले.

"तुमच्या मार्गदर्शनानं."

"आणि आता, मला वाटतं तू ईश्वर मानतो आहेस, कारण तू हा पैसा परत देतो आहेस?"

"नाही, मी मानीत नाही," स्मिर्द्याखफ तोंडातल्या तोंडात बोलला.

"मग तू तो का परत देत आहेस?"

"जाऊ दे....बस्स झालं!" स्मिर्द्याखफने पुन्हा आपला हात 'नको' अशा अर्थी हलविला. "तुम्हीच स्वतः म्हणत असा की, सर्व काही रास्त आहे, तर मग तुम्हीसुद्धा का इतके बेचैन झाला आहात? तुम्ही स्वतःच स्वतःविरुद्ध साक्ष द्यायला निघालात...मात्र तसं काही होणार नाही. हे सोडून द्या! तुम्ही साक्ष द्यायला जाणार नाही," स्मिर्द्याखफने खात्रीपूर्वक सांगितले.

"पाहशील तू." इवान म्हणाला.

"ते शक्य नाही. तुम्ही फार बुद्धिमान आहात. तुम्हाला पैशाचे प्रेम आहे, मला ते माहीत आहे. तुम्हाला स्वतःचा मानसन्मान झालेला आवडतो, कारण तुम्ही अतिशय गर्विष्ठ आहात; तुम्हाला स्त्रियांच्या मोहकतेचंही भयंकर आकर्षण आहे, आणि सर्वांत म्हणजे तुम्हाला निर्विघ्नपणे, कुणावरही अवलंबून न राहता जीवन कंठणं महत्त्वाचं वाटतं– त्याची तुम्हाला सर्वांत जास्त फिकीर असते. असला कलंक स्वतःला लावून घेऊन कायमचं आपलं जीवन बरबाद करण्याची तुमची इच्छा असणार नाही. तुम्ही फ्योदर पावलोविच सारखे आहात, त्यांच्या दुसऱ्या कोणत्याही मुलांपेक्षा तुम्ही त्यांच्या वळणावर जास्त आहात; त्यांच्यासारखेच तुमचे अंतरंग आहे."

"तू मूर्ख नाहीस तर," इवान थक्क झाल्यासासारखा होऊन म्हणाला. त्याच्या तोंडावर रक्ताची लाली चढली. "तू आता गंभीर मनःस्थितीत आहेस!" तो स्मिर्द्याखफकडे एकदम वेगळ्याच एका स्वरूपात पाहून उद्‌गारला.

"मी मूर्ख आहे असं तुमच्या गर्विष्ठपणामुळं तुम्ही समजलात. घ्या हे पैसे."

इवानने नोटांची ती तीन पुडकी उचलली अन् ती कशातही न गुंडाळता तशीच आपल्या खिशात घातली.

"त्या मी उद्या कोर्टात दाखविणार आहे," तो म्हणाला.

"कोणी तुमच्यावर विश्वास ठेवणार नाही, कारण तुमच्या स्वतःचा तुमच्याजवळ पुष्कळ पैसा आहे; तुम्ही हा फक्त तुमच्या पैशाच्या पेटीतून बाहेर काढलात अन् कोर्टात आणलात असं नसेल कशावरून?"

इवान आपल्या जागेवरून उठला.

" पुन्हा तुला सांगतो," तो म्हणाला, " मी तुला ठार केलं नाही याचं एकच कारण की उद्या तुझी मला गरज आहे, लक्षात ठेव, विसरू नकोस ! "

" बरं तर, मारा मला, आत्ता मारा मला," स्मिर्द्याकफ अचानकपणे इवानकडे विचित्र नजरेने पाहून म्हणाला. " तेही तुमच्या हातून होणार नाही ! " तो कडवटपणे स्मित करून पुढे म्हणाला. " तुम्ही इतके धैर्यवान असलेले, आता काहीही करू धजणार नाही ! "

" उद्या भेटू," इवान मोठ्याने म्हणाला, अन् बाहेर जाण्याकरिता निघाला.

" एक मिनिट थांबा... त्या नोटा मला पुन्हा दाखवा."

इवानने त्या नोटा बाहेर काढल्या आणि त्याला दाखविल्या. स्मिर्द्याकफ त्यांच्याकडे एक सेकंदभर पाहत राहिला.

" ठीक, तुम्ही जाऊ शकता," आपल्या हाताने खूण करून तो म्हणाला.

" इवान फ्योदरोविच," त्याने पुन्हा त्याला हाक मारली.

" तुला काय हवं ? " इवान न थांबता वळून म्हणाला.

" नमस्ते ! "

" उद्यापर्यंत ! " इवान पुन्हा म्हणाला, आणि तो त्या घराच्या बाहेर पडला.

बर्फाचे वादळ बाहेर अजून जोरात होते. तो पहिली चार पावले धिटाईने चालला, पण एकदम त्याचे पाय अडखळू लागले. " काही तरी शरीरात बिघाड आहे." तो हसून मनाशी म्हणाला. आनंदासारखी काही भावना त्याच्या चित्तात उसळत होती. अमर्याद निर्धार असल्याची त्याला जाणीव होती; अलीकडे त्याला इतकी पीडा देणाऱ्या चलबिचलीचा तो आता शेवट करणार होता. आपला निर्धार त्याने गृहीत धरला, " त्यात आता बदल होणार नाही." तो आपल्या मनाशी म्हणाला, अन् त्याला बरे वाटले. त्याच क्षणी तो कशाला तरी ठेचकाळला अन् खाली पडता पडता वाचला. एकदम थांबून त्याने पाहिले तो त्याने ठोसा मारून पाडलेला तो शेतकरी त्याच्या पायाशी होता, तो तसाच बेशुद्ध अन् निश्चल पडलेला होता. बर्फाने त्याचा चेहरा जवळजवळ झाकला होता. इवानने त्याला धरले अन् आपल्या बाहूंनी त्याला उचलले. उजव्या बाजूच्या एका घरात उजेड बघून तो तिकडे गेला, दाराच्या झडपांवर त्याने आवाज केला, आणि त्या घराच्या मालकाला त्या शेतकऱ्याला पोलिस चौकीवर न्यायला आपल्याला मदत करण्याची विनंती केली, त्याने त्याला तीन रुबल देऊ केले. तो मनुष्य तयार झाला अन् बाहेर आला. इवानने ठरविल्याप्रमाणे पुढे काय काय केले, त्या शेतकऱ्याला तो पोलिस चौकीवर कसा घेऊन गेला, तिथे तावडतोब डॉक्टरकडून त्याची तपासणी करण्याची कशी त्याने व्यवस्था केली, खर्चाकरिता त्यांना आपला हात कसा सढळ सोडला वगैरे वर्णन मी करीत बसत नाही. एवढेच सांगतो की हे सर्व उरकायला त्याला एक सबंध

तास लागला, पण इवानला त्याने फार समाधान झाले. त्याचे मन भरकटून एक-सारखे कल्पना करू लागले.

"मी जर उद्याबद्दलचा निर्णय इतक्या खंबीरपणे घेतला नसता तर त्या शेतकऱ्याची चिंता वाहण्याकरिता मी एक सबंध तास थांबलो नसतो. त्याला सोडून, तो गारठून चाललाय याची पर्वा न करता, पुढं चालता झालो असतो." तो संतुष्ट मनाने विचार करू लागला. "म्हणजे, स्वतःचं निरीक्षण करण्याची माझ्यात चांगली शक्ती आहे म्हणायची," त्याच क्षणी त्याच्या मनात हा विचार आला, अन् त्याला अधिकच संतोष वाटला : "अन् मला म्हणतात तुमचं डोकं ताळ्यावर राहीनासं झालंय."

स्वतःच्या खोलीत प्रवेश करताना आपल्या काळजाला बर्फाचा स्पर्श व्हावा तसे त्याला काही जाणवले, एखादी आठवण व्हावी तसे, किंवा अधिक नेमके म्हणायचे तर, त्या खोलीत आता त्या क्षणी जे काहीतरी वेदनाजनक अन् गर्हणीय असे होते, अन् जे पूर्वीही तिथे होते, ते मनात येऊन व्हावे तसे. तो थकून आपल्या कोचावर पडला. त्या म्हातारीने त्याच्याकरिता समोवार आणला; त्याने चहा बनविला, पण त्याला हात लावला नाही. तो कोचावर बसून राहिला अन् त्याला सुन्न झाल्यासारखे झाले. त्याला वाटले आपण आजारी आहोत, असहाय झालो आहोत. त्याला झोप यायला लागली, पण तो एकदम अस्वस्थपणे उठला अन् आपली पेंग घालविण्याकरिता खोलीत येरझाऱ्या घालू लागला. मधून मधून त्याला भ्रमात असल्यासारखे वाटे, पण त्याच्या मनात सर्वांत जास्त विचार होता तो आजाराचा नव्हे. पुन्हा खाली बसून, तो इकडेतिकडे पाहू लागला, जणू कशाचा तरी तो शोध घेत असावा. हे अनेक वेळा झाले. शेवटी त्याचे डोळे एका बिंदूवर पक्के स्थिरावले. इवान हसला, पण रागाच्या लालीने त्याचा चेहेरा भरून टाकला. तो आपल्या जागी बराच वेळ आपले डोके दोन्ही हातांवर धरून, बसून राहिला, तरी तो बाजूला पुढच्या भिंतीपाशी ठेवलेल्या कोचाकडे, त्या एकाच बिंदूकडे, पाहत होता. तिथे अर्थात असे काहीतरी होते, अशी वस्तू होती की जी त्याला सतावीत होती, त्रस्त करीत होती अन् व्यथा देत होती.

९

पिशाच– इवानचे भयंकर स्वप्न

मी काही कोणी डॉक्टर नव्हे, पण तरी मला वाटते की वाचकाला मी इवानच्या आजाराच्या स्वरूपासंबंधीची काही माहिती देणं अगदी अवश्य आहे अशी वेळ आली आहे. पुढच्या घटनांविषयीची आगाऊ कल्पना करून मला एक गोष्ट तरी निदान म्हणता येईल; ती ही की, इवान त्या वेळी मेंदूच्या ज्वराच्या तडाख्यात सापडण्याच्या

बेतात होता. जरी त्याच्या तब्येतीवर बऱ्याच दिवसांपासून परिणाम झालेला होता, तरी तिने आतापर्यंत खंबीरपणे त्या तापाशी झगडा दिला होता, पण शेवटी त्याने त्याच्या तब्येतीवर पूर्णपणे मात केली. मला जरी औषधाची काही माहिती नसली, तरी त्याने कदाचित् खरोखरच इच्छाशक्तीच्या जबरदस्त प्रयत्नाने त्या तापाचा हल्ला काही काळ थोपवून धरण्यात यश मिळविले होते ही समजूत प्रकट करण्याचं मी धाडस करतो. तो हल्ला पूर्णपणे हटविण्याची त्यानं आशा बाळगली होती यात शंका नाही. आपली प्रकृती बरी नाही हे त्याला माहीत होते, पण या सर्वनाशाच्या वेळी, आपल्या आयुष्यातील आणीबाणीचा काळ येत असताना, आपल्याला जे काय म्हणायचे आहे ते निर्भयपणे अन् निर्धाराने म्हणण्याकरिता आणि "आपलं आपल्याशी समर्थन करण्याकरिता" आपल्या सर्व अक्कलहुषारीची त्याला गरज होती. अशा वेळी आजारी पडण्याचा विचार त्याला अप्रिय वाटला.

तथापि कतिरीना इवानोवनाने काही विलक्षण कल्पनेने– तिचा उल्लेख मी यापूर्वीच केला आहे– मॉस्कोहून आणविलेल्या नव्या डॉक्टरला त्याने आपली प्रकृती दाखवून त्याचा सल्ला घेतला होता. इवानचे म्हणणे ऐकून घेऊन आणि त्याची प्रकृती तपासल्यानंतर डॉक्टर अशा निष्कर्षाला आले की त्याचा आजार खरोखर मेंदूच्या विकृतीचा आहे आणि इवानने नाइलाजास्तव ज्या काही गोष्टींची कबुली दिली, त्यांचे डॉक्टरांना मुळीच आश्चर्य वाटले नाही. "तुमच्या अशा स्थितीत भ्रामक दृश्यं दिसणं अगदी संभवनीय आहे, तरी त्यांची सप्रमाण निश्चिती करून घेणं अधिक बरं... तुम्ही क्षणाचाही विलंब न करता झटकन् उपाययोजना करणं अवश्य आहे, नाहीतर परिणाम फार वाईट होईल," असे त्यांनी आपले मत दिले. पण डॉक्टरांचा हा सुयोग्य सल्ला इवानने अमलात आणला नाही अन् अंथरुणावर पडून त्याने उपचार करून घेतले नाहीत. "मी हिंडतोफिरतो आहे, तेव्हा चांगला धडधाकट आहे. जर पडलोच, तर गोष्ट वेगळी, मग ज्या कोणाला वाटेल तो येऊन माझी शुश्रूषा करील," असे त्याने ठरवून तो विषय मनातून काढून टाकला.

आणि असा तो स्वतःला वातभ्रम होत असल्याचे जवळजवळ समजण्याच्या स्थितीत, आणि मी नुकतेच सांगितल्याप्रमाणे, समोरच्या भिंतीपुढच्या कोचावरील कोणत्यातरी वस्तूकडे एकसारखा पाहत असा बसला होता. कोणीतरी तिथे बसल्या-सारखे दिसत होते, कुणाला माहीत ते तिथे कसे आले ते, कारण इवान जेव्हा स्मिर्द्याखफकडून खोलीत परत आला तेव्हा ते तिथे नव्हते. ही कोणीतरी एक व्यक्ती होती, किंवा अधिक बिनचूकपणे बोलायचे तर, एका विशिष्ट तऱ्हेचा रशियन सद्गृहस्थ होता, तसा तो तरुण नव्हता की फ्रिझे ला सँकान्तेन ('ज्यानी पन्नाशी गाठलीय') असे म्हणावे.

त्याचे केस काहीसे लांब, खूप दाट आणि काळे होते. कुठे कुठे तुरळक करड्या रंगाची झाक होती, आणि त्याला लहानशी टोकदार दाढी होती. त्याच्या

अंगात पिंगट रंगाचे तंग जाड जाकीट होते, साधारण गबाळग्रंथीच होते, तरी कोणा चांगल्या शिंप्याने शिवलेले असले पाहिजे, अन् कमीत कमी तीन वर्षांच्या तरी जुन्या पुराण्या फॅशनचे ते होते, असली फॅशन फॅशनेबल अन् सुखवस्तू लोकांनी गेली दोन वर्षे टाकून दिलेली होती. त्याचे कपडे अन् त्याचा लांब रुमालासारखा नेकटाय हे असे होते की, जे ऐटबाज राहण्याचा नेम असणाऱ्या लोकांच्या अंगावर दिसतील, पण जरा जवळ जाऊन न्याहाळून पाहिले तर त्याचे कपडे फारसे स्वच्छ नव्हते अन् त्याचा गळ्याचा रुंद रुमाल फारच विरविरीत होता. या आलेल्या पाहुण्याची रेघा-रेघाची विजार फार सुरेख बेतलेली होती, पण तिचा रंग फारच फिका होता अन् ती चालू फॅशनच्या मानाने फारच तंग होती. त्याची मऊमऊ पिसाळ पांढरी टोपी चालू ऋतूला विसंगत वाटत होती.

थोडक्यात म्हणजे ओढग्रस्तीच्या स्थितीत असलेल्या उच्च कुलीनाची सर्व कळा तिथे होती. असे दिसत होते की, जणू हा सद्गृहस्थ भूदासाच्या प्रथेच्या काळात चांगल्याच भरभराटलेल्या आळशी जमीन मालकांच्या वर्गाचा असावा. तो केव्हा ना केव्हा चांगल्या अन् फॅशनेबल समाजात असला पाहिजे खास, त्याचे एकेकाळी चांगले संबंध असले पाहिजेत, नव्हे अजूनही त्याने ते राखले असले पाहिजेत, पण तारुण्य रंगेलपणात घालविल्यानंतर भूदास प्रथा नष्ट झाल्यावर हळूहळू तो दरिद्री होत गेला असावा. उच्च वर्गाच्या गरीब नातेवाईकाची अवस्था त्याला येऊन आता एका जुन्या भल्या मित्राकडून दुसऱ्या मित्राकडे असा तो भटकत असावा आणि त्याच्या सहवासयोग्य अन् जमवून घेण्याच्या स्वभावामुळं अन् काही म्हटलं तरी कोणाही बरोबर बसायला सांगावं, पण अर्थात मानाच्या जागी नव्हे, असा सभ्य गृहस्थ तो असल्यामुळं त्याचे त्याच्याकडून स्वागत होत असावे. अशा तऱ्हेची जमवून घेण्याच्या स्वभावाची अन् परावलंबी स्थिती असलेली सज्जन माणसे गोष्ट सांगू शकतात. पत्त्यात एखादा भिडू होऊ शकतात, अन् त्यांच्यावर जर काही कामे लादली तर ती करण्याकडे त्यांची स्पष्ट नावड असते. ही माणसे सामान्यतः एकाकी राहणारी, म्हणजे एकतर लग्न न झालेले ब्रह्मचारी किंवा विधुर अशी असतात. कित्येक वेळा त्यांना मुले असतात, पण जर असली, तर त्यांचे पालनपोषण नेहमी त्यांना दूर ठेवून म्हणजे कोणा आत्या-मावशीकडे असे होत असते, अन् उच्च मंडळीत ही सभ्य माणसे त्यांचा कधी उल्लेख करीत नाहीत, कारण त्यांना त्या नात्याची लाज वाटत असते. हळूहळू ती त्यांची मुले त्यांच्या दृष्टीपुढून नाहीशी होतात, अर्थात मधून मधून त्यांना त्यांच्याकडून वाढदिवसाच्या किंवा नाताळाच्या निमित्ताने पत्रे जातात अन् केव्हा केव्हा उत्तरेही मिळतात.

या अनपेक्षितपणे आलेल्या पाहुण्याचा चेहरा इतकासा मिळते घेण्यासारखा सुस्वभावी अन् प्रसंग येईल तसा चेहऱ्यावर मनमिळाऊ भाव आणायला तत्पर असा दिसत नव्हता. त्याच्यापाशी घड्याळ नव्हते, पण घड्याळाच्या काळ्या स्प्रिंगवर

असलेले कासवाच्या कवचाचे मोठे भिंग होते. त्याच्या उजव्या हाताच्या मधल्या बोटात एक मोठी अंगठी होती अन् तिच्यात एक स्वस्त किंमतीचा स्फटिक बसविलेला होता.

इवान रागाने गप्प बसला होता, तो स्वतःहून संभाषण सुरू करू इच्छीत नव्हता. आलेला पाहुणा वाट पाहत होता अन् एखादा गरीब आप्त जसा आपल्या खोलीतून बाहेर येऊन आपल्या यजमानाला चहाच्या वेळी सोबत करायला म्हणून येऊन बसतो बरोबर तसा तो बसला होता, अन् आपला यजमान रागात आहे अन् विचारात आहे असे पाहून समजूतदारपणे गप्प राहिला होता. पण यजमानाने एखादे मनाला बरे वाटण्याजोगे संभाषण सुरू करताच त्याकरिता तो तयार होता. अकस्मात् त्याच्या चेहऱ्यावर एक चिंतेची झाक दिसू लागली.

"मला असं म्हणायचं आहे," त्याने इवानशी बोलायला सुरुवात केली, "माफ करा, मी फक्त त्या गोष्टीचा तुम्हांला आठवण देण्याकरिता उल्लेख करतो आहे. तुम्ही स्मिर्दयाखफकडं कतिरीना इवानोव्नासंबंधी चौकशी करण्याकरिता गेला होता, पण तिथून त्याबद्दल काहीच न समजता तुम्ही निघून आलात, तुम्ही बहुधा विसरलात...."

"हो, खरंच," इवानच्या तोंडून निघाले, आणि त्याचा चेहरा अस्वस्थपणाने म्लान झाला. "हो, मी विसरलो खरा...पण आता त्याचं काही नाही, काही चिंता नाही, उद्या पर्यंत," तो स्वतःशी पुटपुटला. "अन् महाशय," तो आलेल्या पाहुण्याला उद्देशून पुढे म्हणाला, "मिनिटभरात मलाच स्वतःला त्याची आठवण झाली असती, कारण मला त्रास होत होता तो त्याच गोष्टीचा! तुम्हाला कुणी मध्येच लुडबूड करायला सांगितली, जणू मला वाटावं की तुम्हीच मला ती सुचविलीत, अन् माझी मला ती सुचलीच नव्हती!

"मानू नका तसं तर मग," तो गृहस्थ मनमिळावूपणे स्मित करीत म्हणाला, "आपल्या इच्छेविरुद्ध मानण्यात फायदा काय? शिवाय, मानायचं म्हटलं तर त्याला पुराव्यांची काही मदत होत नाही, पुरावे म्हणजे विशेषतः भौतिक पुरावे. थॉमसनं विश्वास ठेवला तो त्यानं ख्रिस्ताला वर उठताना पाहिलं म्हणून नव्हे, तर पाहण्यापूर्वी विश्वास ठेवण्याची त्याला इच्छा होती म्हणून. उदाहरणार्थ, मृतात्म्यांशी संपर्क ठेवणारे लोक घ्या....मला ते भारी आवडतात...नाही, बघा म्हणजे झालं, त्यांची अशी कल्पना असते की आपण धर्माच्या कार्यालाच उपयोगी पडतो, कारण पिशाचं त्यांना परलोकातून आपली शिंगं दाखवतात. हां, ते म्हणतात, दुसरा लोक असण्याचा एक प्रकारे भौतिक पुरावा आहे. दुसरा लोक अन् त्याबद्दलचे भौतिक पुरावे, आणखी काय पाहिजे? अन् जर त्यावरच तुम्ही आलात, तर पिशाच आहे हे सिद्ध करण्यानं ईश्वर आहे हे सिद्ध होतं? मला आदर्शवादी लोकांत सामील व्हावंसं

वाटतं. मी त्यांच्यात विरोधी बाजूचं पुढारीपण घेऊन मांडेन की मी वास्तववादी आहे, पण भौतिकवादी मात्र नाही, ह्यः ह्यः ! "

" ऐक," इवान टेबलावरून एकदम उठला. " मला वातभ्रम झालाय्सा वाटतो...मला खरोखर वातभ्रम झालाय. तुला कांय वाटेल ती बाष्कळ बडबड तू कर मला फिकीर नाही ! मला मागच्या खेपेप्रमाणं तू संताप चढवू शकणार नाहीस. पण मला कसं का असेना शरमल्यासारखं वाटतं... मला खोलीत फेऱ्या घालाव्याशा वाटताहेत...मला कधीकधी तुझं दर्शन होत नाही अन् गेल्या खेपेला जसा तुझा आवाज ऐकला तसा आवाजही ऐकू येत नाही, पण तू काय बडबडतोस त्याचा मी नेहमी तर्क करतो, कारण तो मी आहे; बोलणारा स्वतः मीच आहे, तू नाहीस. मात्र मागच्या खेपेला मी स्वप्नात होतो की मी खरोखरच तुला पाहिलं, काही समजत नाही. थांब, एक टॉवेल भिजवून आणून डोक्यावर ठेवतो म्हणजे कदाचित् तू हवेत विरून जाशील."

इवान कोपऱ्यात गेला, त्याने एक टॉवेल घेतला अन् तो त्याने भिजविला, अन् तो ओला टॉवेल डोक्यावर ठेवून तो खोलीत येरझारा घालू लागला.

" तुम्ही मला इतक्या सलगीनं वागवता याचा मला आनंद वाटतो," तो पाहुणा म्हणाला.

" मूर्ख " इवान हसून म्हणाला, " तुझ्याशी मी औपचारिकपणे वागेन असं का तू समजतोस ? मी आता चांगला उत्साहात आहे, माझ्या कपाळात अगदी डोक्याच्या वरच्या भागात....वेदना करते आहे तरी. फक्त कृपा करून मागच्या खेपेसारखी तत्त्वज्ञानाची भाषा बोलू नकोस. जर तू निघून जाणार नसलास तर काही गंमत वाटण्याजोगं बोल. गप्पा मार, तू गरीब आप्त आहेस, तू गप्पा मारल्याच पाहिजेस. काय हा भयंकर स्वप्नभ्रम होतोय, पण मला नाही तुझी भीती वाटत. तुझ्यावर मी मात करीन. मला पागलखान्यात नेलं जावं अशी माझी इच्छा नाही."

" गरीब आप्त. सेत नोब्ल, सेंत् शारमां (ते उदात्त अन् आकर्षक आहे.) छान आहे हं. होय मी माझ्या नैसर्गिक स्वरूपात आहे. कारण नाही तरी मी पृथ्वीवर गरीब आप्ताहून अधिक काय आहे ? बरं, एक सांगतो, मी तुमचं ऐकतो आहे आणि तुम्ही मला मागच्या खेपेला जसं कल्पनारूप समजण्याचा हट्ट धरला होता तसं केवळ आपली कल्पना म्हणून मानीत नाही, मी कोणी खराच आहे असं तुम्ही मला मानायला लागला आहात, याचं मला थोडं आश्चर्यच वाटतं..."

" मी कधीही तुला एक मिनिटदेखील सत्यस्वरूप म्हणून मानलेलं नाही, " इवान संतापल्यासारखा होऊन ओरडला. " तू खोटा आहेस, तू माझा आजार आहेस, तू कल्पनेचं पिशाच आहेस. तुझा नाश कसा करायचा तेच मला समजत नाही आणि काही काळ मला तुला चालवून घेतलं पाहिजे असं दिसतं. तू माझा

चित्तभ्रम आहेस. तू माझाच अवतार आहेस, पण फक्त माझ्या एका अंगाचा... माझ्या विचारांचा अन् भावनांचा, त्यातही फक्त जे विचार अन् भावना कम लीच्या खराब अन् मूर्खपणाच्या असतील त्यांचा. त्या दृष्टिकोणातून तुझ्याविषयी मला काही आस्था वाटू शकेल, पण फक्त तुझ्यावर व्यर्थ खर्चण्याइतका मला वेळ हवा..."

"माफ करा, माफ करा, मी तुम्हाला पकडीन. तुम्ही ज्यावेळी आज संध्याकाळी त्या दिव्याच्या खांबाखाली आल्योशाच्या अंगावर खेकसलात अन् ओरडलात की, 'तुला ते त्याच्याकडून कळलं? तो मला भेटतो हे तुला कसं माहीत? त्यावेळी तुम्ही माझा विचार करीत होता. तेव्हा एका तोटक्या क्षणापुरतं का होईना मी खरोखर आहे असं तुम्ही अवश्य मानलंत." तो सद्गृहस्थ सौम्यपणे हसला.

"होय, तो माझ्या दुर्बलपणाचा क्षण होता...पण माझा तुझ्यावर विश्वास बसणं शक्य नव्हतं. गेल्या खेपेला मी झोपेत होतो की जागा होतो कुणास ठाऊक. कदाचित् मी त्यावेळी स्वप्न पाहत असेन अन् तुला खरोखर मी मुळी पाहिलंच नसेल...."

"तुम्ही आता आल्योशावर इतके उखडलात का? तो लाघवी आहे; मी फादर झसीमफांच्या बाबतीत त्याला वाईट रीतीनं वागवलं आहे."

"आल्योशासंबंधी बोलू नकोस! तुझी छाती तरी कशी होते रे, लाळघोट्या!" इवान पुनः हसला.

"मला तुम्ही धमकावता आहात, पण हसता आहात हे बरं लक्षण आहे. पण मागच्या खेपेपेक्षा या खेपेला तुम्ही कितीतरी सभ्य आहात, अन् का ते मी जाणतो; तुमचा तो महान् निर्धार..."

"माझ्या निर्धारासंबंधी शब्द काढू नकोस," इवान भडकून म्हणाला.

"समजतं, समजतं, सेत् नोब्ल सेत् शारमां. आपण फार मोठ्या मनाचे आहात. फार सुरेख अंतःकरणाचे आहात. तुम्ही आपल्या भावाची बाजू घेणार आहात अन् स्वतःचं बलिदान करणार आहात, अहाहा, केवढी आपली वीरवृत्ती...." सेत् शिवलरस्क (अगदी मध्ययुगीन वीर पुरुषासारखी!)

"बंद कर तुझी वाचा, तुला मी लाथेनं उडवीन!"

"मला फारसं वाईट वाटणार नाही, कारण मग माझा हेतू साध्य होईल. तुम्ही मला लाथेनं उडविलंत, तर माझ्या वास्तवतेवर तुम्ही विश्वास ठेवला पाहिजे, कारण लोक पिशाचांना लाथा मारीत नाहीत. थट्टा बाजूला ठेवू या, मला त्याची क्षिती नाही, तुम्ही खुशाल माझ्यावर रागवा, अर्थात् माझ्याशीसुद्धा जरा अधिक सभ्यपणानं वागलात तर बरं. 'मूर्खा, लाळघोट्या! काय हे शब्द!'"

"तुझ्यावर रागावणं म्हणजे मी माझ्यावरच रागावणं आहे," इवान पुनः हसला, "तू म्हणजे मी आहे, मी आहे, फक्त चेहेरा भिन्न. मी ज्याचा विचार

करतो आहे तेच तू बोलतो आहेस....अन् नवीन काही सांगण्याची तुझी शक्ती नाही!"

"जर माझ्या विचारसरणीत मी तुमच्यासारखाच असेन, तर ते सारं माझ्या पथ्यावरच आहे," तो सद्‌गृहस्थ विनीतपणे अन् प्रतिष्ठितपणे म्हणाला.

"तू फक्त माझे अत्यंत वाईट विचार असतील तेवढे, अन् विशेष म्हणजे बेअकलीपणाचे असतील ते निवडून काढतोस. तू बेअकली अन हलकट आहेस. तू भयंकर बुद्‌दू आहेस. छेः, माझं-तुझं जमायचं नाही! काय करू, काय करू रे?" इवान आपले दात कचकचा चावून म्हणाला.

"माझ्या प्रिय मित्रा, काही असलं तरी मी एक सभ्य गृहस्थ म्हणून वागू इच्छितो अन् वागविला जाऊ इच्छितो," तो पाहुणा, बरोबर गरीब नातेवाईकाला साजेलशा रीतीनं, आर्जवपूर्वक राग कमी करण्याचा प्रयत्न करीत अन् साध्या-भोळ्या अभिमानाने म्हणाला, "मी गरीब आहे, पण ..मी फार प्रामाणिक आहे असं म्हणत नाही. पण...लोकात एक सर्वसामान्यपणे मान्य झालेलं सिद्धांतसूत्र आहे की मी एक पतित देवदूत आहे. मला अर्थात् कल्पना करवत नाही की मी कधीकाळी देवदूत असू शकेन. जर मी कधी असतो, तर तो काळ इतका फार पूर्वीचा असला पाहिजे की तो विसरायला हरकत नाही. आता फक्त एक मी सभ्य माणूस असल्याच्या लौकिकालाच किंमत देतो अन् शक्य तितका तसा राहतो, आणि इतरांना रुचण्यासारखा बनण्याचा प्रयत्न करतो. मला खरोखरच माणसांविषयी प्रेम आहे, माझी फारच बदनामी करण्यात आली आहे! इथं तुमच्या सोबत मधून मधून जेव्हा मी राहतो तेव्हा माझ्या जीवनाला एक प्रकारची वास्तवता येते, अन तेच मला सर्वांत जास्त आवडतं. बरं का, तुमच्यासारखीच मला कल्पनेच्या भराऱ्या मारण्याची खोड आहे, आणि म्हणूनच मला या लोकीच्या वास्तवतेविषयी प्रेम आहे, इथं, तुमच्यासोबत, सगळं कसं मर्यादांनी आखलेलं आहे, इथं सगळं सूत्रात गोवलेलं अन् भूमितिबद्ध आहे, नाही, तर आमच्याकडं, गोलम् गोल समीकरणांखेरीज दुसरं काही नाही! मी इथं इकडं तिकडं स्वप्नं पाहत हिंडतो, फिरतो, मला स्वप्नरंजन आवडतं. शिवाय, पृथ्वीवर मी भोळ्या समजुतीवर विश्वास ठेवणारा बनतो. कृपा करून हसू नका, मला तेच नेमकं, भोळ्या समजुतीवर विश्वास ठेवणं, आवडतं मी तुमच्या इथल्या सर्व रूढी-सवयी आत्मसात करतो. मला सार्वजनिक स्नानगृहात जाण्याची आवड वाटू लागली आहे, खरं तरी वाटेल तुम्हाला? तिथं मी जातो अन् व्यापाऱ्यांच्या अन् धर्मोपदेशकांच्या बरोबर वाफारा घेतो. मी जे स्वप्न पाहतो ते असं की कोणा व्यापाऱ्याच्या चांगल्या अडीचशे पौंड वजन असलेल्या बायकोच्या स्वरूपात एकदा कायमचं अन् पुन्हा न बदलणाऱ्या स्वरूपात इथं यावं अन् तिच्या ज्या समजुती असतील त्या आपल्या व्हाव्यात. माझा आदर्श म्हणजे चर्चमध्ये जायचं अन् साध्याभोळ्या श्रद्धेनं एक मेणबत्ती तिथं लावायची, खरंच

सांगतो तो माझा आदर्श आहे.मग माझ्या सर्व क्लेशांचा अंत होईल.माझ्यावर वैद्यकीय उपचार व्हावेत हेही मला आवडतं; गेल्या वसंतऋतूत देवीची साथ पसरली होती तेव्हा एका अनाथ पोरांच्या इस्पितळात मी गेलो अन् तिथं मला देवी टोचण्यात आल्या– मला त्या दिवशी काय मजा वाटली तुम्हाला सांगू ! मी स्लाव लोकांच्या कार्यासाठी दहा रुबल वर्गणी दिली... पण तुम्ही ऐकत नाही वाटतं. तुम्हाला आज संध्याकाळपासून मुळीच बरं वाटत नाही, माहीत आहे ? तुम्ही काल त्या डॉक्टराकडं गेला होता हे मला माहीत आहे... हं, तुमच्या तब्येतीचं काय ? तो डॉक्टर काय म्हणाला ?"

"मूर्ख !" इवान ताडकन् बोलला.

"पण तुम्ही तरी बुद्धिमान आहात. तुम्ही पुन्हा शिव्या द्यायला लागलात ? मी काही दया येऊन विचारीत नाही. तुम्ही उत्तर दिलंच पाहिजे असं नाही. हल्ली संधिवाताची साथ पुन्हा सुरू झाली आहे...."

"मूर्ख !" इवान पुन्हा म्हणाला.

"तुम्ही आपले सारखे तसंच म्हणत राहा; पण मला गेल्या वर्षी संधिवाताचा आजार असा झाला होता की आजतागायत मला त्याची चांगली आठवण राहिली आहे."

"पिशाचाला म्हणे संधिवात !"

"का नाही, जर मी केव्हा केव्हा देहधारी होत असेन तर ? मी देह धारण करतो अन् त्याचे परिणाम स्वीकारतो. 'सेतान सूम ए निहिल ह्यूमान्म अ म एलिनूम पूतो....' "

"काय, काय म्हणालास ? सैतान !" 'सेतान सूम ए निहिल ह्यूमानूम' पिशाचाला काही हे वाईट नाही !"

"तुम्हाला शेवटी मी खूष केलं याचा मला आनंद होतो."

"पण हे तुला माझ्याकडून मिळालं नाही," इवान आश्चर्यचकित झाल्यासारखा होऊन एकदम थांबला. "हे माझ्या डोक्यात कधीच शिरलं नव्हतं, विलक्षणच आहे."

"सेत द्यु नूव्हो; ने स पा ? (हे काही तरी नवंच आहे, नाही का ?) या खेपेला मी प्रामाणिकपणे वागणार आहे अन् तुम्हाला खुलासा करणार आहे. ऐका, स्वप्नात आणि विशेषतः स्वप्नभ्रमात, अपचनामुळं म्हणा किंवा आणखी कशामुळं, माणसाला कित्येक वेळा अशी कलात्मक दृश्यं दिसतात, अशा गुंतागुंतीच्या अन् खऱ्याखुऱ्या प्रत्यक्ष गोष्टी अशा घटना, नव्हे घटनांचं एक सबंध विश्व म्हणा, अशा एका कथासूत्रात गुंफलेलं, अत्यंत उच्च बाबींपासून तो थेट अगदी बाहीच्या कफाबरच्या शेवटच्या गुंडीपर्यंत अनपेक्षित अशा बारीकबारीक तपशिलांनी इतकं भरलेलं दिसतं की लिओ टॉल्स्टॉयलासुद्धा कधी तसं सुचलं नसेल हे मी खात्रीपूर्वक सांगतो.

तरीसुद्धा अशी स्वप्नं चांगले लेखकच नव्हेत तर अत्यंत सामान्य लोक, सरकारी अधिकारी, वृत्तपत्रकार, धर्मोपदेशक सुद्धा कधी कधी पाहतात.... त्यातला विषय म्हणजे एक पुरतं गूढच असतं. नव्हे, एका राजकारणी मुत्सद्दयानं माझ्यापाशी कबूल केलं की, त्याच्या सर्व उत्कृष्ट कल्पना ज्या त्याच्या डोक्यात आल्या त्या तो झोपलेला असताना हं, तेव्हा तीच गत आता इथं आहे, जरी मी तुमचा चित्तभ्रम असलो तरी, भयंकर स्वप्नात होतं त्याप्रमाणं, मी अशा अगदी नव्या गोष्टी बोलतो की ज्या तुमच्या डोक्यात पूर्वी कधी शिरल्या नव्हत्या. तेव्हा मी तुमच्या कल्पनांची पोपटपंची करीत नाही. तरीही मी तुमचा स्वप्नभ्रम आहे, अधिक काही नाही."

"तू खोटं बोलतो आहेस, तुझा उद्देश आपलं स्वतंत्र अस्तित्व आहे. माझा स्वप्नभ्रम म्हणून नाही असं मला पटविण्याचा आहे, आणि आता तू ठासून सांगतो आहेस की आपण स्वप्न आहोत म्हणून."

"प्रिय दोस्त आज मी एक खास पद्धत अवलंबिली आहे, ती तुम्हाला मी मागाहून समजावून सांगेन. थांबा, मी कुठं सोडलं होतं? हां, बरोबर! मला त्यावेळी सर्दी झाली, इथं नव्हे, पलीकडं."

"पलीकडं म्हणजे कुठं? मला सांग, तू इथं बराच वेळ थांबणार आहेस काय? तुला निघून जाता येणार नाही काय?" इवान हताश झाल्याप्रमाणे उद्गारला. त्याने फेऱ्या घालण्याचे थांबविले, तो खाली कोचावर बसला, आपली कोपरे पुनः टेबलावर टेवून त्याने दोन्ही हातांत आपले डोके गच्च दाबून धरले. त्याने तो ओला टॉवेल काढून टाकला अन् चिडून भिरकावून दिला. त्याचा अर्थात् काहीच उपयोग नव्हता.

"तुमचे मज्जातंतू व्यवस्थित नाहीत," तो सद्गृहस्थ, निश्चिन्त स्वस्थतेचा पण पूर्ण सभ्यतेचा, आव आणून म्हणाला. "मला सर्दी होऊ शकली याचासुद्धा तुम्हाला राग आला आहे, पण अर्थात ते अत्यंत नैसर्गिकपणे घडलं. त्या वेळी मी पीटर्सबर्गमधल्या एका उच्च दर्जाच्या महिलेच्या घरी राजकीय चर्चेकरिता घाईनं चाललो होतो, या महिलेचा मंत्रिमंडळात वजन मिळविण्याचा उद्देश होता. हं, सायंकाळचा सूट, पांढरा टाय, हातमोजे हे घालून मी कुठं निघालो होतो देवाला माहीत. तिथून अवकाशातून मला तुमच्या पृथ्वीवर येऊन पोचायचं होतं....अर्थात त्याला एक निमिषमात्रच लागलं, पण तुम्हाला माहीत आहे सूर्यापासून एक किरण इथं यायला पुरती आठ मिनिटं लागतात, अन् कल्पना करा, सायंकाळच्या सुरात अन् उघड्या बास्कोटात यायचं! पिशाचं गारठत नाहीत खरं, पण ती देह धारण करून येतात तेव्हा....हं, थोडक्यात म्हणजे मी विचार केला नाही अन् निघालो, अन् त्या आकाशाच्या, खगोलाच्या वरती असलेल्या जलतत्त्वात इतकं हीव असतं म्हणता...त्याला हीव नाही म्हणता येणार, कल्पना करा, शून्याच्या खाली १५० डिग्री म्हणजे काय झालं! खेड्यातल्या मुली एक खेळ करतात माहीत आहे ना?

त्या बेसावध माणसाला तीस डिग्री हिवात कुऱ्हाड चाटायला सांगतात, जीभ क्षणात त्याला गोठून चिकटते अन् फसलेला तो माणूस कातडी फाडून घेतो अन् त्यातून रक्त निघतं. पण हे झालं ३० डिग्रीत, १५० डिग्रीत मला वाटतं तुम्ही त्या कुऱ्हाडी-वर बोट ठेवण्याचा अवकाश की, संपलंच म्हणून समजा....अर्थात् तिथं ती कुऱ्हाड असू शकल तर हं."

"अन् तिथं कुऱ्हाड असू शकेल ?" इवाननं मध्येच बेपर्वाईने न् तुच्छतेने विचारले. तो त्या इंद्रजालावर विश्वास न ठेवण्याचा, अन् पूर्ण पागलपणाच्या अवस्थेला न उतरण्याचा अगदी कसून प्रयत्न करीत होता.

"कुऱ्हाड ?" पाहुण्याने आश्चर्याने मध्येच विचारलें.

"होय, त्या कुऱ्हाडीचं तिथं काय होईल ?" इवान एकप्रकारच्या बेफाट अन् हट्टीपणाच्या जिद्दीने एकदम ओरडून म्हणाला.

"अवकाशात त्या कुऱ्हाडीचं काय होईल ? काय तरी कल्पना ! ती जर कोणत्याही अंतरावर पडायची म्हटलं तर मला वाटतं, ती पृथ्वीच्या भोवती, कारण न जाणता एखाद्या उपग्रहाप्रमाणं भ्रमू लागेल. ज्योतिर्वेत्ते त्या कुऱ्हाडीचा उदय अन् अस्त यांचा हिशेब करू लागतील, गात्सुक तिला आपल्या पंच गात नोंदील. बस्स."

"तू बुद्दू आहेस, भयंकर बुद्दू आहेस," इवान चिडखोरपणे म्हणाला. "यापेक्षा अधिक बुद्धिचातुर्यानं थापा मार, नाहीतर मी ऐकूनच घेणार नाही. तू वास्तववादानं माझी बुद्धी कुंठित करू पाहत आहेस, आपण आहोत अशी माझी खात्री पटवू पाहत आहेस, पण तू आहेस यावर मी विश्वास ठेवू इच्छीत नाही ! मी मुळीच विश्वास ठेवणार नाही !"

"पण मी थापा कुठं मारतो आहे, मी सत्य सांगतो आहे; सत्य हे दुर्दैवानं कधीच मनोरंजक नसतं. तुम्ही माझ्याकडून काहीतरी बडं अन् कदाचित काहीतरी छान असं अपेक्षिण्याची जिद्द धरली आहसं दिसतं. दुःखाची गोष्ट आहे, कारण मला जे शक्य तेच फक्त मी देणार...."

"तत्त्वज्ञान बोलू नकोस, गद्ध्या !"

"तत्त्वज्ञान, छान, अन् माझं सबंध उजवं अंग बधिर झालेलं असताना अन् मी कण्हत न् हाय हाय करीत असताना. मी सारं वैद्यमंडळ अजमावून पाहिलं; त्यांना सुंदर निदान करता येतं, तुमचा सारा आजार त्यांच्या नखाग्रावर असतो, पण तुम्हांला बरं कसं करायचं त्याची त्यांना कल्पना नसते. इथं एक छोटा उत्साही विद्यार्थी होता, तो म्हणे, "तुम्ही मराल कदाचित्, पण कोणत्या रोगानं तुम्ही मरताहा ते तुम्हांला उत्तम रीतीनं कळेल !' अन् रोग विशेषज्ञांकडं लोकांना पाठ-वायचा त्यांचा मार्ग तरी काय पाहा ! "आम्ही फक्त निदान करतो' ते म्हणतात, 'पण अमक्या अमक्या स्पेशालिस्टकडं जा तो तुम्हाला बरं करील.' तो पूर्वीचा डॉक्टर– जो सर्व प्रकारचे रोग बरे करायचा तो– आता पूर्णपणे नाहीसा झाला आहे,

हे मी खात्रीपूर्वक तुम्हाला सांगतो; आता फक्त विशेषज्ञ आहेत, अन् ते सर्व वृत्त-पत्रांत जाहिराती देतात. तुमच्या नाकाला काही झालं असलं, तर ते तुम्हांला पॅरिसला पाठवतात; तिथं म्हणे एक युरोपियन स्पेशालिस्ट आहे. तो नाकंच बरं करतो. तुम्ही पॅरिसला गेलात, म्हणजे तो तुमच्या नाकाकडं पाहतो; 'मला तुमची फक्त उजवी नाकपुडी बरी करता येईल, कारण मी डावी नाकपुडी बरी करीत नसतो, त्याचं माझं विशेष ज्ञान नाही, पण तुम्ही व्हिएन्नाला जा, तिथं एक स्पेशालिस्ट आहे तो तुमची डावी नाकपुडी बरी करील,' असं तो तुम्हाला सांगेल. तुम्ही काय करणार? मी आपला सामान्य लोकांच्या उपायांकडं वळलो, एका जर्मन डॉक्टरानं मला न्हाणीघरात जाऊन मध अन् मीठ यानं आपलं अंग चोळा म्हणून सांगितलं. निव्वळ एक जादा स्नान घडावं म्हणून मी तिथं गेलो, सर्वांगाला ते फासलं पण त्यानं मला काहीसुद्धा बरं वाटलं नाही. निराश होऊन मी मिलान येथील कौंट मॅत्ती यांना लिहिलं. त्यांनी मला एक पुस्तक अन काही थेंब पाठविले, धन्य त्यांची! आणि बघा, हॉफच्या मॉस्टसत्त्वानं मला बरं वाटलं! ते मी कसं योगायोगानंच खरेदी केलं, दीड एक बाटली घेतली, अन् काय चमत्कार, नाचण्याची ताकद माझ्या अंगाला आली, माझी सर्दी पार पळाली. त्याचे आभार मानणारं पत्र वृत्तपत्रात द्यावं असं मी ठरवलं, इतकी मला कृतज्ञता वाटली, अन् गंमत बघा, पुढं त्रासाला अंतच राहिला नाही; एकही वर्तमानपत्र माझं पत्र घ्यायला तयार होईना. ते म्हणाले, 'हे प्रतिक्रिया उत्पन्न करणारं होईल, कुणाचाही त्यावर विश्वास बसणार नाही. पैशाचिक वगैरे जरासुद्धा अस्तित्वात नसतं. ल द्यिआब्ल नेक्झिस्त प्वाँ. तुम्ही आपले निनावी राहा,' असा त्यांनी मला सल्ला दिला. आभारदर्शक पत्र जर निनावी असलं तर त्याचा उपयोग काय हो? मी त्या वृत्तपत्राच्या कचेरीतील लोकांना हसलो अन् म्हणालो, 'आजच्या काळी ईश्वरावर विश्वास ठेवणं हे प्रतिगामीपणाचं आहे, मी पिशाच आहे, तेव्हा माझ्यावर विश्वास बसेल.' ते म्हणाले, 'आम्हाला ते चांगलं समजतं. पिशाचावर कुणाचा नाही विश्वास बसणार? तरी ते चालणार नाही, त्यानं आमच्या नावलौकिकाला धक्का बसेल. तुम्हाला वाटलं तर विनोद म्हणून घाला.' पण मला वाटलं विनोद म्हणून घालण्यानं ते फारसं गंमतीदार होणार नाही. म्हणून मग ते छापलंच गेलं नाही. अन् मी सांगतो तुम्हाला, त्याची आजवर मला खंत आहे. माझ्या उत्तम भावना, उदाहरणार्थ कृतज्ञता, या निव्वळ माझ्या सामाजिक दर्जामुळं अक्षरशः मला नाकारल्या जातात."

"पुनः तत्त्वज्ञानाचं चिंतन सुरू झालं!" इवान चिडून गुरकला.

"ईश्वर मला त्यापासून दूर ठेवो, पण केव्हा केव्हा माणसाला तक्रार केल्या-वाचून राहवत नाही. नालस्ती झालेला असा मी माणूस आहे. क्षणाक्षणाला तुम्ही मला बुद्दू म्हणून टोमणे हाणता. तुम्ही तरुण आहात हे दिसतंच आहे. माझ्या मित्रा, बुद्धी असली म्हणजे सर्व झालं असं नाही! माझं हृदय स्वभावतः मायाळू

अन् आनंदी आहे. 'मी सुद्धा सर्व प्रकारचे नाचतमाशे लिहितो! मला तुम्ही वृद्ध झालेला खाकोव म्हणून समजतासं दिसतं, पण माझं प्रारब्ध त्याहून खूपच गंभीर असं आहे. काल सुरू होण्यापूर्वी, कोणत्या तरी ईश्वराज्ञेनं, ती काय ते मी कधीच समजू शकलो नाही, पण तिच्या योगानं, माझं काम 'नकाराचं' आगाऊच ठरून गेलं आणि तरी मी खरोखर भल्या मनाचा आहे अन् नकाराकडं माझी मुळीच प्रवृत्ती नाही. 'अं हं, तू जाऊन नकारच दिला पाहिजेस, नकार नाही म्हटलं की टीका नाही आणि टीकेचं सदर नसलं तर त्या नियतकालिकाचं काय होईल?' टीका नसेल तर केवळ स्तुतिपाठाशिवाय त्याचं दुसरं काही स्वरूप राहणार नाही. पण स्तुतिपाठाशिवाय काही नसणं एवढंच जीवनाला पुरेसं नसतं, तो स्तुतिपाठ संशयाच्या मुशीत घातला गेला पाहिजे वगैरे वगैरे, ती शैली ठरलेली आहे. पण मी काही ते उत्पन्न केलं नाही, मी त्याला जबाबदार नाही. हो, त्यांनी त्याच्या बदली दुसरा बळी निवडला आहे, त्यांनी मला टीकेचं सदर लिहायला लावलं अन् अशा रीतीनं जगणं शक्य झालं. आम्हाला तो आनंदपर्यवसायी खेळ समजतो; उदाहरणार्थ मी फक्त माझा नाश मागतो आहे. पण मला म्हणतात, नाही. जग, कारण तू नसलास तर काहीच असणार नाही. जगात जर सर्व काही समजूतदारपणाचं झालं तर काहीच घडणार नाही. तुमच्यावाचून घटनाच घडणार नाहीत, अन् घटना तर घडल्या पाहिजेत. तेव्हा माझ्या स्वभावाच्या विरुद्ध मी घटना घडविण्याकरिता काम करतो आणि बुद्धीला न पटण्यासारखं करतो कारण मला तशी आज्ञा आहे. माणसात निर्विवादपणे बुद्धी असतानाही ती हे हास्यनाट्य एक गंभीर बाब म्हणून समजतात आणि त्यातच त्यांची शोकांतिका आहे. त्यांना, अर्थातच सहन करावं लागतं... पण त्यानं ती जगतात, ती खरं जीवन जगतात, काल्पनिक नव्हे, खरं, कारण दुःख म्हणजे जीवन आहे. दुःखावाचून जीवनाची मजा काय? त्याचं रूप मग कधी अंत न देणाऱ्या चर्चेच्या उपासनेचं होईल; ते धार्मिक होईल, पण कंटाळवाणं होईल. पण माझं काय? मी दुःख सहन करतो, पण तरी, मला अस्तित्व राहात नाही. मी एका अनिश्चित स्वरूपाच्या समीकरणामधला एक क्ष असतो. मी जीवनात एक प्रकारचा आभास मात्र असतो, मला ना आदी ना अंत, इतकंच नव्हे तर मी माझं नावही विसरून गेलेलो असतो. तुम्ही हसत आहा– नाही, तुम्ही हसत नाही, तुम्ही पुनः रागावलात. तुम्ही सदोदित रागावता, तुम्हांला जी काही किंमत आहे ती बुद्धीची, पण मी पुन्हा सांगतो की एखाद्या व्यापाऱ्याच्या अडीचशे पौंड वजनाच्या बायकोच्या आत्म्यात माझं रूपांतर व्हावं अन् मी देव मंदिरात मेणबत्त्या मांडून ठेवाव्यात एवढ्याचकरिता केवळ मी हे नक्षत्रातील जीवन अन् सर्व दर्जा–मानमरातब सोडून देईन."

"तर मग तुझासुद्धा ईश्वरावर विश्वास नाही?" इवान द्वेषपूर्ण स्मित करून म्हणाला.

" काय सांगू– म्हणजे, जर तुम्ही मनापासून..."

"ईश्वर आहे की नाही ?" इवानने त्याच हिरवट तिखटपणाने विचारले.

" हं, म्हणजे तुम्ही मनापासून विचारता आहा ! माझ्या प्रिय मित्रा, खरं सांगतो मला माहीत नाही. झालं ! मी सांगितलं तुम्हाला !"

" तुला माहीत नाही, पण तू देवाला पाहतोस ना ? अंहं, तू कोणी वेगळा नाहीस, मीच तू आहेस, तू तो मी आहे, दुसरं काही नाही ! तू कचरा आहेस, तू माझी कल्पना आहेस !"

" बरं, तुम्हाला तसं वाटत असेल तर तुमच्यासारखंच माझंही तत्त्वज्ञान समजा, तेच खरं. मी विचार करतो त्याअर्थी मी आहे (ज पां दोंक ज सुई). मी तेवढं निश्चितपणे जाणतो,बाकीचं सारं, हे सर्व लोक, ईश्वर आणि सैतान सुद्धा हे सर्व काही सिद्ध झालेलं नाही– माझ्या मनानं तरी. या सर्वाला स्वयंभू अस्तित्व आहे की हा माझ्याच मनाचा खेळ आहे. माझा 'अहं, जो एकमेव चिरकाल राहत आला आहे, त्याचाच ओघानं झालेला हा विकास आहे ? पण मी आता ताबडतोब थांबतो, कारण मला वाटतं तुम्ही चटकन उठून मला ठोकूनच काढाल."

" तू मला एखादा प्रसंग सांगितलास तर बरं !" इवान उदासवाणा होऊन म्हणाला.

" आपल्या चाललेल्या विषयावरच नेमका घडलेला एक प्रसंग आहे, किंवा एक दंतकथा म्हणा, प्रसंग नव्हे. तुम्ही मला नास्तिक म्हणून शिव्या देता, तुम्ही डोळ्यांनी बघतो म्हणता तरी तुम्ही विश्वास ठेवीत नाही. पण, प्रिय मित्रा, मी एकटाच तसा नाही. तिकडं आम्ही आता सगळेच गोंधळात पडलेले आहोत अन् ते सर्व तुमच्या विज्ञानामुळं एकेकाळी अणू, पंचेन्द्रियं, चार मूलतत्त्वं अशी असायची, आणि मग सगळं एकमेकाला धरून कसंतरी तगून होतं. प्राचीन जगात देखील अणू होते पण जेव्हापासून आम्हांला कळलं की तुम्ही रासायनिक परमाणू अन् वनस्पती अन् प्राणी यांच्या जीवनाचं भौतिक मूलतत्त्व (प्रोटोप्लाझम्), अन् कुणाला माहीत आणखी काय काय ते, शोधून काढलंय तेव्हापासून आम्हाला आमची शेखी सोडून द्यावी लागली. आमच्या डोक्यात अगदी गोंधळ, आणि, मुख्य म्हणजे, भोळीखुळी समजूत,निंदा प्रवाद आहे;तुमच्यात जितका निंदाप्रवाद असतो तितकाच आमच्यातही असतो, समजलात; जरा जास्तच म्हणाना, अन् हेरगिरीसुद्धा आहे. कारण आमच्याकडं आमचं गुप्त पोलिस खातं आहे तिथं खासगी बातमी घेतली जाते. तेव्हा, ना शेंडा ना बुडखा अशी ही दंतकथा आमच्या मध्ययुगातली आहे. तुमच्या नव्हे, आमच्या–आणि आमच्यातसुद्धा तिच्यावर कोणी विश्वास ठेवीत नाही, फक्त अडीचशे पौंड वजनाच्या पोक्त बाया विश्वास ठेवतात, तुमच्या पोक्त बाया नव्हेत, मी आमच्या म्हणतो. तुमच्याकडं जे आहे, ते सर्व आमच्याकडं आहे, मी आमच्या गुप्त गोष्टींतली एक तुमच्याकडं उघडी करतो आहे, कारण तुमच्याविषयी मला स्नेह

वाटतो; अर्थात् ते सांगण्याची आम्हाला मनाई आहे. ही दंतकथा नंदनवनासंबंधीची आहे. इथं, पृथ्वीवर, म्हणतात कोणी एक विचारवंत अन् तत्त्वज्ञानी होऊन गेला. त्यानं प्रत्येक गोष्टीचा, 'कायदे, सदसद्विवेकबुद्धी, श्रद्धा' अन् सर्वांत म्हणजे, जन्मानंतरचे जीवन यांचा इन्कार केला. तो मेला; आपण सरळ अंधःकारात अन् सर्वनाशात जाणार अशी त्याची अपेक्षा होती अन् त्याला स्वतःपुढं भावी आयुष्य दिसलं. त्याला भयंकर आश्चर्य वाटलं अन् संताप आला. 'हे माझ्या तत्त्वांच्या विरुद्ध आहे!' तो म्हणाला. अन् त्याला त्याबद्दल शिक्षा झाली....म्हणजे, माफ करा, मी स्वतः जे काय ऐकलं तेच तुमच्यापुढं पुन्हा उच्चारतो आहे, ती केवळ एक दंतकथा आहे... त्याला शिक्षा झाली ती परार्धो किलोमीटर अंधारात चालण्याची. (आम्ही मेट्रिक पद्धती स्वीकारली आहे बरं का!) आणि जेव्हा तो तितके किलोमीटर चालून पूर्ण करील तेव्हा स्वर्गाची दारं त्याला उघडतील अन् त्याला क्षमा होईल..."

"अन तुमच्याकडं परलोकात या परार्धो किलोमीटर चालायला लावण्याखेरीज आणखी कोणत्या कोणत्या यातना आहेत?" इवानने विलक्षण उत्कंठेने विचारले.

"कोणत्या यातना? हंः, विचारू नका. पूर्वीच्या काळी सर्व प्रकार होते, पण हल्ली त्यांनी मुख्यतः नैतिक शिक्षाच स्वीकारल्या आहेत– 'सदसद्विवेकबुद्धीची टोचणी' अन् असलाच सारा बेअकलीपणा. तेसुद्धा आम्ही सर्व तुमच्याकडूनच घेतलंय, तुमच्या चालीरीतीतल्या नरमपणापासून. आणि त्यानं कोणाचा लाभ झाला? फक्त त्यांचाच की ज्यांना सदसद्विवेकबुद्धी नाही, कारण त्यांना सदसद्विवेक बुद्धीच नाही तर मग त्यांना सदसद्विवेकबुद्धीच्या यातना होणार कशा? पण ज्या सभ्य माणसांना सदसद्विवेकबुद्धीची अन् अब्रूची चाड आहे ती बिचारी यातना सहन करतात. सुधारणांकरिता जेव्हा भूमी तयार केलेली नसते, तेव्हा विशेषतः बाहेरदेशाच्या संस्थांची नक्कल करून जेव्हा या सुधारलेल्या संस्था निघतात तेव्हा त्यातून हानीखेरीज दुसरं काही निघत नाही! प्राचीन काळी आगीची शिक्षा होती ती बरी होती. हं, तेव्हा जेव्हा या मनुष्याला परार्धो मैल चालण्याची शिक्षा देण्यात आली तेव्हा तो स्तब्ध उभा राहिला, त्यानं आजूबाजूला पाहिलं अन् रस्त्यावर आडवा पडला. 'मी जाणार नाही, मी तत्त्व म्हणून जाण्याचा इन्कार करतो!' तो म्हणाला. एखाद्या प्रबुद्ध रशियन नास्तिकवाद्याचा आत्मा घ्या अन् तो ईश्वरप्रेषित जोनाह जो तीन दिवस अन् तीन रात्री व्हेल माशाच्या पोटात सुस्तपणे पडून राहिला होता, त्याच्या आत्म्याशी मिसळा की, तुम्हाला रस्त्यावर आडवा पडलेल्या त्या तत्त्वज्ञान्याचा स्वभाव मिळेल."

"तो तिथं कशावर पडून राहिला?"

" हं, मला वाटतं काही तरी पडण्यासारखं तिथं असावं. तुम्ही हसत तर नाही ? "

" वाहवा ! " इवान पूर्वीच्याच विचित्र उत्कंठेने ओरडला. या वेळी तो अनपेक्षित कुतूहलानं ऐकत होता. " बरं आता तो तिथंच पडून आहे का ? "

" तोच तर मुद्दा आहे, तो पडून नाही. तो तिथं हजार एक वर्षं पडून राहिला आणि मग तो उठला अन् चालायला लागला."

" काय गाढव आहे ! " इवान उत्तेजित होऊन हसत आणि अजूनही कशाचा तरी एकाग्र मनाने विचार करीत असावा तसे म्हणाला. " तो तिथं कायम पडून राहिला काय किंवा परार्धो किलोमीटर चालत राहिला काय त्यानं काही फरक पडणार आहे थोडाच ? तितकं चालायला परार्धो वर्षं तरी लागणारच की नाही ? "

" त्याहून जास्त, माझ्याकडं कागद पेन्सिल नाही, नाहीतर मी गणित करून काढलं असतं. पण तो तिथं केव्हाच जाऊन पोचला, अन् तिथूनच या कथेला प्रारंभ होतो."

" काय, तो तिथं जाऊन पोचला ? पण त्याला तिथं पोहोचायला लागणारी परार्धो वर्षं कुठून मिळाली ? "

" का, तुम्ही आपल्या आजच्या पृथ्वीचाच विचार करीत राहाताहात ! पण आपल्या आजच्या पृथ्वीसारख्या पृथ्व्या परार्धोंच्या संख्येनं पुनःपुन्हा झाल्या असतील. हं, ती नष्ट झाली गोठून गेली; तिला चिरा पडून तिचे तुकडे तुकडे झाले, तिच्या मूलतत्त्वात तिचं विसर्जन झालं, पुन्हा 'आकाशाच्यावर असलेलं जलतत्त्व' मग फिरून धूमकेतू, फिरून सूर्य, फिरून त्या सूर्यापासून ही पृथ्वी– अन् असा हा क्रम सतत अनंत वेळा अन् तंतोतंत तश्शाच अत्यंत विरूप अन् सहन न होण्याइतक्या कंटाळवाण्या बारीक सारीक तपशिलानिशी सुरू राहिलेला असेल..."

" बरं, बरं, तो येऊन पोहोचल्यावर काय झालं ? "

" ते काय विचारता, स्वर्गाचे दरवाजे उघडले जाऊन तो आत जाता क्षणी, तिथं तो दोन सेकंद त्याच्या घड्याळाप्रमाणं राहतो न राहतो एवढ्यात तो ओरडला की ती दोन सेकंदं परार्धो किलोमीटर चालण्याच्या नव्हे तर परार्धोंच्या परार्धोंचा परार्ध वर्ग करून चालण्याच्या किंमतीची आहेत. (पण माझ्या मतानं त्याचं घड्याळ तो चालत असताना केव्हाच मूलतत्त्वात विलीन होऊन गेलं असलं पाहिजे !) नव्हे, तो ईश्वराचे पाड गाऊ लागला अन् त्यानं ते इतकं अतिरेकीपणानं केलं की तिथले उदात्त विचारांचे काही लोक पहिल्या प्रथम त्याच्याशी हस्तांदोलन करायलाच तयार होईनात. हा फार झटपट प्रतिक्रांतिवादी झाला असं ते म्हणाले. रशियन माणसाची प्रकृती ! मी पुन्हा सांगतो, ही एक दंतकथा आहे. काय तिची किंमत असेल त्याप्रमाणं घ्या. तेव्हा आमचे अशा विषयावर आजसुद्धा अशा प्रकारचे विचार आहेत."

" पकडलं तुला ! " इवान लहान पोरासारखा आनंदून ओरडला, जणू त्याला काहीतरी आठवायचे होते ते शेवटी आठवले असावे. " परार्धो वर्षांची ही गोष्ट मीच स्वतः रचली होती ! मी त्या वेळी सतरा वर्षांचा होतो, हायस्कुलांत होतो. मी ती गोष्ट रचली अन् कोरोवकिन नावाच्या एका शाळासोबत्याला सांगितली, मॉस्कोमध्ये...ही गोष्ट इतकी वैशिष्ट्यपूर्ण आहे की ती मी दुसरीकडून कुठूनही घेणं शक्य नव्हतं. मला वाटलं मी ती विसरलो....पण नकळत ती मला आठवली. ती माझी मलाच आठवली. ती तू नाही मला सांगितलीस ! याप्रमाणं हजारो गोष्टी, माणसांना जेव्हा देहदंड द्यायला नेतात तेव्हा नकळत आठवतात...ती स्वप्नांत परत माझ्याकडं आली. तू ते स्वप्न आहेस ! तू स्वप्न आहेस, जिवंत प्राणी नव्हेस ! "

" ज्या आवेशानं तुम्ही माझं अस्तित्व नाकारता आहात," तो सद्‌गृहस्थ हसून म्हणाला, " त्यावरून माझी खात्री झाली की तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवता. "

" मुळीसुद्धा नाही ! माझा तुझ्यावर एका ग्रॅमचा शंभराचा हिस्सासुद्धा विश्वास नाही."

" पण एका ग्रेनचा हजाराव्या हिश्शाइतका आहे ना ? होमिओपथीचे डोस असतात ना ते सर्वांत जास्त शक्तीचे असतात. एका ग्रेनच्या हजाराव्या हिश्शानं का होईना विश्वास असल्याचं कबूल करा."

" एक मिनिटभरसुद्धा नाही." इवान आवेशाने ओरडला. " पण तुझ्यावर विश्वास ठेवणं मला आवडेल," तो चमत्कारिकपणे पुढं बोलला.

" आ हा ! ही कबुली आली ! पण मी सुस्वभावी आहे. मी पुन्हा तुमच्या मदतीला येतो. ऐका, पकडलं ते मी तुम्हाला, तुम्ही मला नाही. तुम्ही विसरला होता ती गोष्ट मी तुम्हाला, बुद्धिपुरस्सरच, तुमचा माझ्यावरील विश्वास पूर्णपणे नष्ट करण्याकरिता म्हणून, सांगितली."

" तू खोटं बोलत आहेस. तुझ्या इथं येण्याचा हेतू तुझ्या अस्तित्वाविषयी माझी खात्री पटविणं हा आहे ! "

" अगदी बरोबर. पण चलबिचल, अनिश्चितपणा, विश्वास अन् अविश्वास यांच्यामधे झगडा हे केव्हा केव्हा तुमच्यासारख्या नेकी असलेल्या माणसाला इतके यातना देतात की माणसाला गळफास लावून घेणं बरं असं वाटतं. तुमचा माझ्यावर विश्वास ठेवण्याकडं कल आहे असं पाहून, मी तुम्हाला ती गोष्ट सांगून थोडा अविश्वास आणण्याचा प्रयत्न केला. मी तुम्हाला आळीपाळीनं विश्वासाकडं अन् अविश्वासाकडं घेऊन गेलो, अन् तसं करण्यात माझा काही हेतू होता. ही एक नवी पद्धत आहे. तुमचा माझ्यावर पूर्ण अविश्वास झाला रे झाला की तुम्ही माझ्या तोंडावर मला खात्रीपूर्वक सांगायला लागाल की तू स्वप्न नाहीस, सत्य आहेस. मी

तुम्हाला ओळखतो. मग माझा हेतू साध्य झाल्यासारखा होईल, तो हेतू संभावित-पणाचा आहे. मी तुमच्यात विश्वासाचा फक्त एक चिमुकला दाणा पेरीन की त्याचा वाढून एक ओक वृक्ष होईल– अन् असा ओक वृक्ष की त्यावर बसून तुम्ही 'अरण्यातल्या ऋषींच्या अन् साधुवत् स्त्रियांच्या' पंक्तीत जाऊन बसायला उत्सुक व्हाल, कारण तीच तुमची मनोमन आकांक्षा आहे. तुम्ही जंगली फळांवर राहाल अन् आपल्या आत्म्याचा बचाव करण्यासाठी जंगलात भटकाल !"

"तर मग तू माझ्या आत्म्याच्या मुक्तीकरिता धडपडत आहेस का रे हरामखोरा?"

"माणसानं केव्हा केव्हा सहकार्य करीत असावं. किती संतापला आहात तुम्ही !"

"मूर्खा ! ती जी धर्मशील माणसं जंगली फळं खात होती अन् अरण्यात सतरा सतरा वर्षं तपश्चर्या करीत होती अशी की त्यांच्या देहावर शेवाळ चढायचं, त्यांना कधी तू मोहात पाडलं आहेस ?"

"दोस्ता, मी दुसरं काहीच केलं नाही. आपण तर सारं जग अन् सगळी जगं विसरतो अन् अशा एका संतालाच चिकटून राहतो, कारण तो अत्यंत बहुमोल हिरा असतो. असा एक आत्मा पुष्कळ वेळा सबंध ग्रहमंडळाच्या मोलाचा असतो, माहीत आहे ? आमची एक स्वतःची हिशेब करण्याची रीत आहे, लक्षात आलं ? हा विजय अमोल असावा ! अन् त्यांपैकी काही, शपथेवर सांगतो, संस्कृतीमध्ये तुमच्यापेक्षा कमी प्रतीचे नसताना, अर्थात् तुमचा त्यावर विश्वास बसणार नाही. ते विश्वास अन् अविश्वास यांचं एकाच वेळी इतकं खोलवर चिंतन करू शकतात की केव्हा केव्हा खरोखर असं दिसतं की, नटवर्य गोर्बुनफ म्हणतो त्याप्रमाणं, 'खाली डोकं वर पाय' व्हायला एक केसाचाच फक्त फरक असतो."

"हं, मग तुझं नाक कोणी ओढले का ? (रशियन भाषेत अपयश येण्याच्या अर्थी हा म्हणीसारखा प्रयोग आहे.)

"प्रिय मित्रा," तो पाहुणा परिणामकारकपणे म्हणाला,

"मुळीच नाक नसण्यापेक्षा ते ओढलं गेलेलं बरं की, थोड्याच दिवसांपूर्वी एक पीडलेला इंग्रज सरदार (त्याच्यावर एखाद्या विशेषज्ञानं उपचार केला असावा) त्याचा मंगुरू एक जेसुइट होता त्याला कबुलीदाखल म्हणाला, 'मला माझं नाक परत दे !' अन् त्यानं आपली छाती पिटली. मी त्या वेळी हजर होतो, मोठा मजे-दारच प्रसंग होता. तो धर्मगुरू टाळाटाळ करून म्हणाला, 'माझ्या मुला, सगळ्या गोष्टी विधात्याच्या अगम्य आज्ञेला अनुसरून साध्य होत असतात, आणि जे दुर्दैवसं वाटतं ते कधीकधी विलक्षण, पण उघड न दिसता हित करणारं सुदैव ठरतं. जर रागीट दैवानं तुझं नाक नष्ट केलं असेल, तर ते तुझ्या फायद्याचंच आहे कारण आता

कोणी कधी तुझं नाक धरून ओढणार नाही.' तो निराश झालेला सरदार म्हणाला, 'पवित्र धर्मगुरू, यांना माझं समाधान होणार नाही, माझं नाक माझ्या आयुष्यातल्या प्रत्येक दिवशी ओढलं गेलं तरी मला आनंद होईल, फक्त ते त्याच्या जागी राहिलं म्हणजे झालं.' 'माझ्या मुला,' तो धर्मगुरू निःश्वास सोडून म्हणतो, 'प्रत्येक वरदान तत्काळ मिळावं अशी अपेक्षा करणं बरोबर नाही. हे विधात्याच्या विरुद्ध तक्रार करणं होईल, तो त्यातसुद्धा तुला विसरलेला नाही, कारण तू आता जे कळवळून बोललास ना की तुझं नाक तुझ्या साऱ्या आयुष्यभर ओढून घ्यायला तुला आनंद म्हणून, तर तुझी ती इच्छा अप्रत्यक्षपणे अगोदरच सफळ झालेली आहे, कारण जेव्हा तू आपलं नाक गमावलंस, तेव्हा तुला नाक धरूनच ओढून नेण्यात आलं होतं."

"मूर्ख, केवढा मूर्खपणा!" इवान म्हणाला.

"माझ्या प्रिय मित्रा, मला फक्त तुमचं मनोरंजन करायचं होतं. पण मी खात्रीपूर्वक सांगतो की, हाच जेसुइटांचा दोषादोषविवेक आहे आणि मी शपथपूर्वक सांगतो की, हे शब्द न् शब्द मी जसं सांगितलं तसं घडलं. ते नुकतंच घडलं अन् त्यानं मला बराच त्रास दिला. त्या दुर्दैवी तरुण माणसानं घरी गेल्याबरोबर त्याच रात्री स्वतःवर गोळी झाडून घेतली. त्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत मी त्याच्या शेजारीच होतो. ते जेसुइटांचे कबुलीविधी हे माझ्या उद्विग्न अवस्थेत माझा अत्यंत आनंददायी विरंगुळा होतात. आणखी एक प्रसंग नुकता परवाच घडलेला सांगतो. एक लहान गोरी गोरी वीस वर्षांची नॉर्मन मुलगी– गुटगुटीत, अकृत्रिम सौंदर्यानं संपन्न, तिला बघून तुमच्या तोंडाला पाणी सुटेल अशी– एका म्हाताऱ्या धर्मोपदेशकाकडं येते. ती खाली वाकते आणि जाळीतून आपल्या पापाचा झाडा हलक्या आवाजात देते. 'अं, माझ्या मुली, तू पुन्हा फसलीस?' तो धर्मोपदेशक म्हणतो. 'देवी सांता मारिया, काय ऐकतोय मी हे! आता या वेळी पूर्वीचा तोच मनुष्य नाही, हे किती दिवस चाललं आहे? तुला शरम वाटत नाही?' आहः माँ पेर! (आह माझे वडील) ती पापी मुलगी पश्चात्तापाचे अश्रू आणून उत्तर देते, त्यांना जे इतकं समाधान देतंय आणि मला फक्त एवढंसंच दुःख! (सा लुई फे तान्त द प्लेझीर ए आ म्वाँ सी प द पेन!) गंमत बघा, हे तिचं उत्तर! मी हबकलोच. तो निसर्गाचा आक्रोश होता, निष्पापपणापेक्षासुद्धा तो बरा असं म्हणा हवं तर. मी तिथल्या तिथंच तिला पापातून मुक्त केलं अन् जाण्याकरिता पाठ वळविली, तर मला पुन्हा जबरदस्तीनं मागं वळणं भाग पडलं. त्या जाळीजवळचा तो धर्मगुरू तिला संध्याकाळी आपल्याकडं येऊन भेटायला सांगत होता ते माझ्या कानी आलं. तो माणूस वृद्ध होता अन् गारेसारखा कठीण होता, तरी तो क्षणात पडला! हा निसर्ग होता, निसर्गाच्या सत्यानं आपलं ते खरं केलं! का, तुम्ही आपलं नाक पुन्हा मुरडलंत? पुन्हा रागावलात? मला कळत नाही तुम्हाला कसं खूष करावं ते....'

"मला एकटं राहू दे, माझ्या मेंदूवर एखाद्या पछाडणाऱ्या खराब स्वप्ना-सारखे तुझे हे प्रहार होत आहेत," इवान दीनवाणेपणाने, आपल्या आभासापुढे लाचार होऊन विव्हळत म्हणाला. "मला तुझा कंटाळा आलाय, तुझ्यापासून मला वेदना होताहेत, मला हे असह्य झालंय. तुला झाडून टाकता यावं यासाठी मी वाटेल ते द्यायला तयार आहे!"

"मी पुन्हा तुम्हाला सांगतो, तुमच्या अपेक्षा नेमस्त करा, माझ्याकडून 'महान् अन् उदात्त अशाच प्रत्येक गोष्टीची' मागणी करू नका म्हणजे आपलं किती छान जमेल ते तुम्हांला दिसून येईल," तो सद्गृहस्थ परिणामकारकपणे म्हणाला. "मी तुमच्यापुढं लाल तेजाच्या रूपानं, विजेचा कडकडाट घेऊन, जळक्या पंखांनी असा आलो नाही, या अशा सौम्य स्वरूपात मी तुम्हांला दिसलो म्हणूनच खरोखर तुम्ही माझ्यावर रागावत आहात. पहिली गोष्ट म्हणजे, तुमच्या सौंदर्यरसिक भावनांच्या बाबतीत तुम्ही दुखावले गेलेले आहात, अन् दुसरं म्हणजे, तुमचा अभिमान दुखावला आहे. असलं हलकट पिशाच आपल्यासारख्या मोठ्या माणसाला भेटतंय म्हणजे काय! होय, तुमच्यात तो अद्भुतरम्यतेचा वंशपरंपरागत गुण आहे, ज्याचा बायेलिन्स्कीनं इतका उपहास केलेला होता तो. तरुण गृहस्था, त्याला माझा इलाज नाही; तुमच्याकडं यायला म्हणून मी तयारी करू लागलो तेव्हा एक गंमत म्हणून, ज्यानं कॉकेशसमध्ये नोकरी केली आहे अशा एखाद्या निवृत्त सेनाधिकाऱ्याच्या रूपात, सिंह सूर्य-मुद्रा असलेला चांद कोटावर लावून, येण्याचं माझ्या मनात आलं होतं. पण मला त्याचीच विशेष भीती वाटली, कारण मी, किमान ध्रुव तारा किंवा व्याधाचा तारा लावून येण्याऐवजी सिंह अन् सूर्य ही मुद्रा लावण्याचं धाडस केल्या-बद्दल तुम्ही मला ठोकलं असतंत. अन् तुम्ही मला एकसारखे बुद्दू बुद्दू म्हणत आहात, पण, माफ करा! बुद्धीच्या बाबतीत मी तुमच्या बरोबरीचा असल्याचा दावा मुळीच करीत नाही. मेफिस्तोफेलिसनं फाऊस्टला सांगितलं की मला दुष्कृत्य करण्याची इच्छा होती, पण फक्त सत्कृत्यच केलं. हं, त्याला काय वाटेल ते त्यानं खुशाल म्हणावं, माझी गोष्ट त्याच्या अगदी उलट आहे. सर्व सृष्टीत बहुधा मीच एकटा असा असेन की ज्याचं सत्यावर प्रेम आहे अन् ज्याला मनापासून भलं करण्याची इच्छा आहे. क्रूसावर मेला तो ईश्वरीशब्द जेव्हा आपल्या छातीवर त्या पश्चात्तप्त चोराचा आत्मा घेऊन वर स्वर्गात चढला त्यावेळी मी तिथं होतो. ईश्वरस्तुती गाणाऱ्या अन् पुकार-णाऱ्या देवदूताच्या आनंदाच्या आरोळ्या अन् स्वर्गस्थ देवतांचा निनादून टाकणारा आनंदोन्मादाचा ध्वनी, ज्यानं आकाश अन् सारी सृष्टी गदगदा हालविली, तो, मी ऐकला अन् जे जे पवित्र त्याची शपथ घेऊन मी तुम्हांला सांगतो, त्या गायक-वृंदात जाऊन सामील व्हावं अन् त्या सर्वांच्या बरोबर धन्यतेचा जयध्वनी करावा अशी मला तीव्र इच्छा होती. तसा शब्द माझ्या तोंडून निसटलासुद्धा, माझ्या ओठातून जवळ जवळ बाहेर फुटला.. मी किती सूक्ष्म भावनेचा अन् रसिकतेच्या

दृष्टीनं संस्कारक्षम आहे ते तुम्हाला माहीत आहे. पण व्यावहारिक बुद्धी– हं:, माझ्या स्वभावातील ती अत्यंत दुर्दैवी खोड– तिनं मला योग्य बंधनांच्या आत ठेवलं अन् तो क्षण मी हातचा जाऊ दिला! कारण, मी धन्यतेचा जयध्वनी केला असता तर नंतर काय झालं असतं, असा मी मागाहून विचार केला. पृथ्वीवरचं सर्व काही एकदम अस्तंगत झालं असतं अन् काहीच घटना घडल्या नसत्या. आणि म्हणून, केवळ कर्तव्यभावनेनं अन् माझं समाजातलं स्थान लक्षात घेऊन, मला तो भला क्षण दडपून टाकणं अन् माझ्या ओंगळ कामाला चिकटून राहणं भाग पडलं. कोणी जे काही बरं आहे त्याचं श्रेय स्वतःकडं घेतो, अन् माझ्या वाट्याला फक्त ओंगळपणा खेरीज काही राहत नाही. पण निष्क्रिय ठगबाजीचं जीवन घालवीत असल्याच्या प्रतिष्ठेचा मी हेवा करीत नाही, मी महत्त्वाकांक्षी नाही. जगातल्या सर्व प्राण्यांत माझ्याच नशिबाला सर्व सभ्य लोकांचे शिव्याशाप अन् लाथासुद्धा घेणं का बरं यावं? कारण जर मी मर्त्य देह धारण केला तर कधी कधी लाथासुद्धा मला मिळायच्या चुकणार नाहीत. अर्थात् त्यात एक रहस्य आहे हे मला माहीत आहे, पण मला ते रहस्य सांगणार नाहीत. कारण मग कदाचित्, त्याचा अर्थ लक्षात येऊन, मी परमेश्वराचा जयजयकार पुकारीन, अन् तो अटळ नकार एकदम अंतर्धान पावेल आणि साऱ्या जगभर सद्भावनेचं राज्य सुरू होईल. आणि त्यानं अर्थात् सगळ्याच गोष्टी, मासिकं अन् वर्तमानपत्रंसुद्धा, संपुष्टात येतील, कारण ती कशाला कोण घेईल? मला माहीत आहे की प्रलयाच्या वेळी माझा निकाल लागून जाईल. मी देखील माझे परार्धो किलोमीटर चालू लागेन अन् ते रहस्य जाणून घेईन. पण ते घडून येईपर्यंत मी मनात कुढतो आहे अन् माझ्या वाट्याला आलेलं काम– म्हणजे एकाला वाचविण्याकरिता हजारोंना धुळीला मिळवणं हे – माझ्या प्रकृतीविरुद्ध असलं तरी पूर्ण करीत आहे. ज्या जोबकरिता मला त्यांनी प्राचीन काळी इतकं उपहासपात्र बनवलं, त्या एका पुण्यशील माणसाखातर कितीतरी आत्म्यांची धूळधाण करावी लागली अन् कितीतरी मान्यवर प्रतिष्ठितांची प्रतिष्ठा नष्ट करावी लागली आहे. होय, ते रहस्य उघडं होईपर्यंत, माझ्यापुढं दोन प्रकारची सत्यं आहेत – एक त्यांचं, पलीकडच्यांचं सत्य, ज्याची मला आतापर्यंत काही माहिती नाही आणि दुसरं माझं स्वतःचं आणि यातलं कोणतं चांगलं ठरेल कुणाला माहीत...तुम्ही झोपलात काय?"

"झोपी गेलेलं बरं," इवान रागाने गुरगुरला. "माझ्या साऱ्या मूर्खपणाच्या कल्पना–फाटे फुटलेल्या अन् पूर्वीच पूर्ण चर्चा करून सडक्या प्रेतासारख्या बाजूला फेकून दिलेल्या – त्याच तू मला नव्या म्हणून सांगतो आहेस!"

"तुम्ही काही राजी होत नाही! मला वाटलं माझ्या साहित्यिक शैलीनं तुम्हाला मोहित करावं. आकाशातली ती जयध्वनीची कल्पना खरोखर वाईट होती काय हो? अन् तो हाइनच्या पद्धतीचा उपरोधाचा सूर, अं?"

" अं हं, मी असा लाळघोट्या कधीच नव्हतो ! मग माझ्या अंतरात्म्यानं तुझ्यासारखा असा लाळघोट्या कसा जन्माला घातला ? "

" माझ्या प्रिय मित्रा, मला एक अतिशय देखणा अन् आकर्षक तरुण रशियन सद्‌गृहस्थ माहीत आहे, तो विचारवंत तरुण आहे अन् साहित्याचा अन् कलेचा फार मोठा भोक्ता आहे, त्यानं ' महान धर्मपरीक्षक ' नावाचं एक नाव घेण्याजोगं काव्य लिहिलं आहे. मी त्याचाच विचार करीत होतो ! "

" महान धर्मपरीक्षकाचं नाव काढलं तर खबरदार ! ", इवान शरमेनं लालेलाल होऊन म्हणाला.

" आणि ती ' पृथ्वीचा महाप्रलय ', ती आठवते तुम्हाला ? ती पण एक कविताच होती ! "

" गप बसतोस की मारून टाकू तुला ? "

" तुम्ही मला मारणार ? अंहं, माफ करा, मी बोलणार. ते सुख उपभोगण्याकरिताच तर मी आलो. हाः, माझ्या कळकळीच्या तरुण मित्रांची स्वप्नं मला आवडतात, ती प्रत्यक्षात यायला किती उत्कंठित असतात ! मागच्या वसंतऋतूत, तुम्ही जेव्हा इकडं येण्याचं मनात आणलंत तेव्हा तुम्ही मनाशी ठरवलंत की अशी नवी माणसं आहेत की जी प्रत्येक गोष्ट नष्ट करावी अन् नरभक्षणापासून सुरुवात करावी असं म्हणतात. मूर्ख लेकाचे ! माझा सल्ला त्यांनी विचारला नाही ! कशाचाही नाश करण्याचं कारण नाही, फक्त माणसामधल्या ईश्वरकल्पनेचा नाश करण्याची गरज आहे, अशा रीतीनं आपल्याला कामाला लागले पाहिजे, असं माझं मत आहे. त्यापासूनच आपण सुरुवात केली पाहिजे. अरेरे, माणसांची ही अंध जात, त्यांना काही अक्कलच नाही ! एकूण एक माणसांनी ईश्वराला नाकारलं की विश्वाविषयीची जुनी कल्पना माणसांनी नरभक्षण करायला न लागताच आपोआप गळून पडेल, अन् विशेष म्हणजे, जुने नैतिक आचार वगैरे सर्व नव्यानं सुरू होईल– अन् माझं मत आहे की हा कालखंड, जो भूस्तरयुगांशी मिळताजुळता असेल तो अस्तित्वात येणारच आहे. जीवनातून जे काही मिळेल तेसर्व ग्रहण करायला, पण आजच्या जगातलाच फक्त आनंद अन् सुखच भोगायला माणसं एकत्र होतील. मनुष्य दैवी प्रचंड शक्तीच्या अभिमानानं वर चढेल अन् तो ईश्वरी मनुष्य प्रकट होईल. मनुष्य, आपल्या इच्छाशक्तीनं अन आपल्या विज्ञानानं, घटकेघटकेला निसर्गावर अमाप विजय प्राप्त करीत असताना, त्या कामात त्याला घटकेघटकेला इतका उन्नत आनंद अनुभवायला मिळेल की त्यानं त्याची स्वर्गातल्या आनंदाची सारी जुनी स्वप्नं भरून निघतील. प्रत्येकाला आपण मर्त्य आहोत हे समजेल आणि तो मृत्यूचा देवतेप्रमाणं अभिमानानं न शांतपणानं स्वीकार करील. त्याचा अभिमान त्याला शिकवील की जीवित क्षणभंगुर आहे असा शोक करीत बसणं हे निरुपयोगी आहे, अन् तो कसल्याही मोबदल्याची गरज न धरता आपल्या भावावर प्रेम करील. प्रेम

हे जीवनाच्या फक्त एका क्षणापुरतं पुरेसं असेल, पण ते क्षणजीवी आहे या खुद्द जाणिवेनंच त्या प्रेमाची तीव्रता वाढेल, आज ते मृत्यूनंतरच्या चिरंतन प्रेमाच्या स्वप्नात वाया जात आहे....' वगैरे वगैरे याच सुरातलं सर्व. सुरेख!"

इवाननं आपली नजर जमिनीकडे लावली, त्यानं आपले हात कानांवर दाबून धरले, पण त्याचं सर्वांग लटलट कापू लागले. तो आवाज पुढे बोलू लागला.

"माझ्या तरुण तत्त्वचिंतकानं विचार केला, आता प्रश्न हा आहे की, असा काळ कधी येणार आहे का? तो येणार असेल तर, सर्व काही निश्चित आहे अन् मानवजात कायमची स्थिरावेल. पण मनुष्यामध्ये जुन्या मुरलेल्या मूर्खपणामुळं हे निदान हजार वर्ष तरी घडून येणं शक्य नाही म्हणून ज्यानं आज का होईना सत्य जाणलं असेल त्यानं स्वतःला वाटतं त्याप्रमाणे नव्या तत्त्वांवर आपल्या जीवनाची घडी बसवावी हे रास्त आहे. त्या अर्थानं, त्याला 'सर्व काही कायदेशीर आहे.' आणखी म्हणजे जरी समजा हा काळ कधी आलाच नाही, कारण एरीतेरी ईश्वरही नाही अन् अमर्त्यपणही नाही त्या अर्थी या नव्या मनुष्याला, जरी सबंध जगात तो एकटा एकच राहिला तरी ईश्वरी मनुष्य व्हायला काही हरकत राहू नये, आणि या नव्या स्थितीप्रत चढल्यानंतर त्याला जुन्या गुलाम मानवाच्या जुन्या नैतिक आचार-विचारांच्या मर्यादा, आवश्यक तर सहज ओलांडता येतील. ईश्वराला काही कायदा नाही. जिथं ईश्वर आहे ते स्थान पवित्र आहे. जिथं मी उभा आहे तिथं ते स्थान तत्काळ श्रेष्ठ होईल... 'सर्व काही कायदेशीर आहे' अन् तोच त्याचा शेवट! हे सर्व फार आकर्षक आहे; पण जर तुम्हाला ठकवायचंच असेल तर त्यासाठी तुम्हाला नैतिक पाठिंबा कशाला हवा? पण हा आहे आमचा आधुनिक रशियन माणूस. अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण. नैतिक पाठिंब्याशिवाय ठकविणं त्याच्या मनाला पटत नाही. इतका तो सत्याचा प्रेमात सापडलेला आहे..."

आलेला पाहुणा बोलत होता, स्वतःच्या वक्तृत्वाच्या प्रवाहात स्वतःच तो जणू वाहत होता. त्याचा आवाज अधिकाधिक मोठा होत चालला होता आणि तो आपल्या यजमानाकडे औपरोधिक दृष्टीने पाहात होता. पण तो आपले बोलणे संपवू शकला नाही; इवानने टेबलावरचा एक पेला चटकन् उचलला अन् त्या वाक्पंडिताच्या अंगावर भिरकावला.

"हं: आह, मे सेत् बेत आफँ! (अरे पण हे तर शेवटी जनावरच. शेवटी पशू तो पशूच)" तो पाहुणा एकदम कोचावरून उठून म्हणाला आणि त्याने अंगावर पडलेले चहाचे थेंब झाडून टाकले. "याला ल्यूथरच्या दौतीची आठवण झालेली दिसते! मला तो स्वप्न समजतो अन् स्वप्नावर पेले फेकतो! बाललीला शोभण्यासारखं आहे हे! मला शंका आली की, तुम्ही आपले कान झाकण्याचं फक्त ढोंग करताहात."

एकाएकी खिडकीवर मोठ्याने अन् एकसारखे ठोठावणे ऐकू आले. इवान कोचावरून एकदम उठला.

"ऐकलंत? तुम्ही उघडलेलं बरं," पाहुणा म्हणाला, "हा तुमचा भाऊ आल्योशा अतिशय खूष करणारी अन् आश्चर्यकारक बातमी घेऊन आलाय, मी नक्की सांगतो!"

"गप बैस, फसव्या, तो आल्योशा आहे हे मला माहीत होतं, तो येणार याची मला जाणीव होती; अन् अर्थात् तो उगीच आलेला नाही; त्यानं खात्रीनं 'बातमी' आणलेली असणारच," इवान क्षुब्धपणे ओरडला.

"उघडा, उघडा दार त्याला. बाहेर बर्फाचं वादळ आहे अन् तो तुमचा– मस्यूर, सेतिल ल तांम्प किल फे? सेत आन पा मेत्र अ शिंया दहॉर–" (साहेब, महत्त्व आहे ते वेळेला, प्रसंगाला आहे. मला आत घ्या कुत्र्यासारखं बाहेरच्या बाहेरच घालवून देऊ नका–) भाऊ आहे. महाशय, बाहेर हवा कशी आहे माहीत आहे, कुत्र्यानंसुद्धा फिरकू नये अशी आहे.

बाहेर ठोठावणे सुरूच होते. इवानला खिडकीकडे धावत जावेसे वाटत होते, पण आपल्या हातापायांत बेड्या पडल्या असल्यासारखे त्याला वाटले. त्या तोडण्याचा त्याने आटोकाट प्रयत्न केला, पण व्यर्थ. बाहेर खिडकीवरचे ठोठावणे अधिक मोठे मोठे होऊ लागले. शेवटी त्या बेड्या तुटल्या अन् इवान कोचावरून एकदम उडी मारून उठला. त्याने आपल्या सभोवार काही कळत नसल्याप्रमाणे पाहिले. दोन्ही मेणबत्त्या जवळजवळ जळत आल्या होत्या, त्याने नुकताच पाहुण्याच्या अंगावर भिरकावलेला पेला त्याच्यापुढे टेबलावर होता, अन् समोरच्या कोचावर कोणी नव्हते. खिडकीच्या तावदानावरचे ठोठावणे एकसारखे चालू होते, पण ते त्याला स्वप्नात जितके मोठ्याने वाटले होते तितके मोठ्याने मुळीच नव्हते, उलट, ते हलक्या हातांनी होत होते.

"ते स्वप्न नव्हे! अं हं, खरोखर ते स्वप्न नव्हतं, ते सारं आत्ता प्रत्यक्ष घडलं!" इवान म्हणाला. तो खिडकीकडे धावत गेला अन् त्याने सरकते तावदान उघडले.

"आल्योशा, मी तुला येऊ नको म्हणून सांगितलं होतं," तो क्रूरपणे आपल्या भावावर ओरडून म्हणाला. "दोन शब्दांत बोल, तुला काय हवंय? दोन शब्दांत, ऐकलंस?"

"तासापूर्वी स्मिर्दाखफनं स्वतःला गळफास लावून घेतला," आल्योशाने अंगणातून उत्तर दिले.

"तिकडून पायऱ्या चढून ये, मी दार उघडतो," इवान म्हणाला, आणि तो आल्योशाला दरवाजा उघडायला गेला.

१०

" तो ते म्हणाला "

आल्योशाने आत येताच इवानला सांगितले की जवळ जवळ एक तासापूर्वी मार्या कोन्द्रात्येवना धावत आपल्या खोलीकडे आली अन् स्मिर्द्याकफने आत्महत्या केली असे तिने सांगितले. " मी समोवार घेऊन जाण्याकरिता म्हणून आत गेले तर तो भिंतीला मारलेल्या खिळ्यावर लटकत होता."

" तू पोलिसात वर्दी दिली आहेस का," असे आल्योशाने तिला विचारले असता तिने सांगितले का आपण कुणालाच सांगितलेले नाही; " पण मी थेट तुमच्याकडंच धावत आले, रस्ताभर मी सारखी पळत होते." ती अगदी वेडीपिशी झाल्यासारखी दिसत होती, अन् एखाद्या झाडाच्या पानासारखी थरथरत होती, असे आल्योशा म्हणाला. टेबलावर एक चिठ्ठी ठेवली होती की, " मी स्वखुषीने अन् स्वेच्छेने माझ्या जीवनाचा अंत करीत आहे, त्यामुळं त्याचा दोष कुणावरही नाही." आल्योशाने ती चिठ्ठी तशीच टेबलावर सोडली अन् सरळ पोलिस कॅप्टनकडे जाऊन त्याने त्याविषयी सर्व सांगितले. " अन् त्याच्या इथून सरळ हा मी तुझ्याकडं आलो आहे," असे शेवटी आल्योशा इवानच्या तोंडाकडे एकाग्रपणे पाहात म्हणाला. आपली हकीकत सांगत असताना त्याने आपले डोळे इवानवरून काढले नव्हते, जणू त्याच्या चेहऱ्यावरील भावात त्याला थक्क करणारे असे काही होते.

" भाई," तो एकाएकी उद्गारला, " तू भयंकरच आजारी असला पाहिजेस. तू पाहातो आहेस पण मी तुला सांगतो आहे ते तुला समजत नाहीसं दिसतं आहे."

" तू आलास ते बरं झालं," इवान चिंतन करीत असल्याप्रमाणं म्हणाला, आल्योशाचे उद्गार त्याने ऐकलेच नसावेत. " त्यानं गळफास लावून घेतला तं मला कळलं होतं."

" कुणाकडून ?"

" मला माहीत नाही. पण मला कळलं. कळलं मला ? होय, त्यानं मला सांगितलं. त्यानं आत्ताच मला सांगितलं."

इवान खोलीच्या मध्यभागी उभा राहिला, जमिनीकडे पाहत, त्याच चिंतनमग्न स्वरात तो बोलला.

" कोण तो ?" आल्योशानं स्वाभाविकच इकडेतिकडे पाहत विचारले.

" तो निसटला."

इवानने आपली मान वर केली अन् तो मृदूपणे हसला.

" त्याला तुझी, तुझ्यासारख्या कबुतराची, भीती वाटली. तू 'शुद्ध दैवी

सत्त्व' आहेस. दमीत्रि तुला देवाचा दूत म्हणतो. देवदूत!...उच्च कोटीच्या देवतांचा तो निनादून टाकणारा आनंदोन्माद. या देवता कोण? कदाचित् एक सबंध तारकापुंजच असावा. पण कदाचित् तो तारकापुंज म्हणजे केवळ एक रासायनिक परमाणूच असेल. सिंह अन् सूर्याची एक राशी आहे. माहीत नाही तुला?"

"भाई, खाली बस," आल्योशा घाबरून म्हणाला. "कृपा करून, इथं कोचावर बस! तू भ्रमात बडबडतो आहेस; डोकं उशीवर ठेव, हां अस्सं. ओला टॉवेल तुझ्या डोक्यावर ठेवू का? कदाचित् त्यानं तुला बरं वाटेल."

"तो टॉवेल दे मला; तो खुर्चीवर आहे तो. मी आत्ताच तो तिकडं फेकला."

"तो इथं नाही. चिंता नाही. तो कुठं आहे मला माहीत आहे– इथं आहे," आल्योशा म्हणाला. इवानचे जे वेषभूषा करण्याचे टेबल त्या खोलीच्या दुसऱ्या कोपऱ्यात होते त्याच्याजवळ एक स्वच्छ- घडी केलेला अन् न वापरलेला टॉवेल त्याला मिळाला. इवानने त्या टॉवेलकडे विचित्र नजरेने पाहिले; एक क्षण स्मृती त्याच्यात परत आल्यासारखी झाली.

"थांब" – तो कोचावरून उठला – "एक तास पूर्वी मी हा नवा टॉवेल तिथून घेतला अन् तो ओला केला. तो मी माझ्या डोक्याभोवती गुंडाळला अन् मग तो इथं फेकून दिला.... हा सुका कसा? दुसरा टॉवेलच नव्हता इथं."

"तू हा टॉवेल तुझ्या डोक्याभोवती गुंडाळला होतास?" आल्योशाने विचारले.

"हो तर, आणि एक तासापूर्वीच मी खोलीत येरझाऱ्या घालत होतो... मेणबत्त्या इतक्या जळून कशा गेल्या? किती वाजले?"

"जवळजवळ बारा."

"नाही, नाही, नाही! इवान एकाएकी ओरडला. "ते स्वप्न नव्हतं. तो इथं होता; तो इथं, या कोचावर, बसला होता. तू जेव्हा खिडकीवर ठोठावलंस तेव्हा मी त्याच्या अंगावर पेला फेकला.... हाच तो. थांब हं, मी गेल्या खेपेला झोपलेलो होतो, पण हे स्वप्न काही स्वप्न नव्हतं. ते पूर्वीही घडलंय. अलीकडं मला स्वप्नं पडतात आल्योशा... तरी ती स्वप्नं नव्हंत, खरोखरीच्या घटना आहेत. मी इकडं तिकडं चालतो, बोलतो, पाहतो... झोपेत असलो तरी. पण तो इथं त्या समोरच्या कोचावर, बसला होता ना.... तो भयंकर बुद्दू बरं का, आल्योशा, भयंकर बुद्दू." इवान एकदम हसला अन् खोलीत येरझारा घालू लागला.

"कोण बुद्दू? कुणाविषयी तू बोलतो आहेस, भाई?" आल्योशाने पुन्हा चिंतेने विचारले.

"पिशाच्च रे! तो मला भेटायला येत असतो. तो इथं दोनदा आला होता, नाही तीन वेळा. तू एक साधं पिशाच आहेस, जळत्या पंखांचा, गर्जत न् चमचम

करीत येणारा सैतान नाहीस असं मी रागावून बोलल्याबद्दल तो मला लागून बोलत होता. पण तो सैतान नाही, ते खोटं आहे. तो तोतया आहे. तो निव्वळ एक पिशाच्च आहे. एक क्षुद्र, यःकश्चित पिशाच. तो स्नानगृहात जातो. त्याला जर कपडे काढून उघडा केला, तर त्याला एक लांब, एक यार्ड लांब, भुऱ्या रंगाची डॅनिश कुत्र्याच्या शेपटासारखी गुळगुळीत शेपूट असल्याचं नक्की अ ढळेल....आल्योशा, तू गारठला आहेस. तू बर्फात होतास. तुला थोडा चहा चालेल का? काय? थंडी आहे? तिला थोडा आणायला सांगू? कुत्र्यानंसुद्धा बाहेर फिरकू नये अशी थंडी आहे '

आल्योशा नळापाशी धावत गेला, त्याने तो टॉवेल भिजवून घेतला, इवानला त्याने पुनः समजावून कोचावर बसविले, अन् तो ओला टॉवेल त्याच्या डोक्याभोवती गुंडाळला. तो त्याच्या जवळ बसला.

" तू आता मला लिझाबद्दल काय सांगत होतास ? " इवान पुन्हा बोलू लागला. (तो फार बडबडायला लागला होता.) " मला लिझ आवडतेय. मी तिच्याबद्दल काही घाणेरडं बोललो ते खोटं होतं. मला ती आवडते...मला उद्या-बद्दल कात्याची भीती वाटते. मला दुसऱ्या कशापेक्षा तिचीच जास्त भीती वाटते. पुढं कसं होईल त्याची. ती उद्या मला फेकून देईल अन् पायांखाली तुडवील. तिला वाटतं तिच्याबद्दल मला वाटणाऱ्या मत्सरामुळं मी मीत्याचा सत्यानाश करीन ! होय असंच तिला वाटतं ! पण तसं नाही. उद्या क्रूस आहे, पण फास नाही. अं हं, मी काही गळफास लावून घेणार नाही. मी कधीच आत्महत्या करू शकणार नाही, समजलं आल्योशा ? मी नीच आहे म्हणून का रे ? मी भ्याड नाही. की जगण्याची आसक्ती म्हणून ? स्मिर्दयाखफनं गळफास लावून घेतला हे मला कसं कळलं बरं ? हां, ते त्यानंच मला सांगितलं. "

" आणि इथं कोणीतरी होतं याची तुला पक्की खात्री आहे ? " आल्योशाने विचारले.

" हो, त्या कोपऱ्यातल्या कोचावर होता तो. तू त्याला हाकून लावलं असतंस. तू त्याला हाकून लावलंसच म्हणा. तू आलास त्याबरोबर तो अदृश्य झाला. तुझा चेहेरा मला आवडतो, आल्योशा. तुझ्या चेहेऱ्यावर माझं प्रेम होतं हे माहीत होतं तुला ? अन् तो तो मीच होतो; आल्योशा. म्हणजे माझ्यातलं जे काही अधम आहे ना ते, जे काही क्षुद्र अन् तिरस्करणीय आहे ते सारं होय, मी अद्भुतरम्य आवडणाऱ्या स्वभावाचा आहे खरा. त्यानं ते तर्कानं जाणलं....तरीसुद्धा ती माझी बदनामी आहे. तो भयंकर मूर्ख आहे; पण ते त्याच्या फायद्याचंच आहे. त्याच्यात धूर्तपणा आहे, पशूचा धूर्तपणा— मला कसं चेतवायचं ते त्याला माहीत आहे. मी त्याच्यावर विश्वास ठेवतो याबद्दल तो मला टोमणे मारीत राहिला, अन् अशा रीतीनं त्यानं मला त्याचं बोलणं ऐकत ठेवलं. एखाद्या पोराला फसवावं तसं त्यानं मला फसवलं. तरी त्यानं माझ्याबद्दल मला बरंच सत्य असं सांगितलं. मी ते स्वतःशी

कधीच कबूल केलं नसतं. माहीत आहे, आल्योशा," इवान अत्यंत कळकळीच्या अन् विश्रब्ध स्वरात पुढे म्हणाला, "तो तो होता मी नव्हतो, असं समजण्यात मला विलक्षण आनंद होईल."

"त्यानं तुला अगदी थकवून सोडलंय." आल्योशा आपल्या भावाकडे कणवेने पाहत म्हणाला.

"तो मला सतावत होता. अन् ते तो इतक्या चातुर्यानं, इतक्या चातुर्यानं करतो म्हणतोस. 'विवेकबुद्धी! विवेकबुद्धी म्हणजे काय? ती आपली आपणच बनवीत असतो. तिनं मला पीडा होण्याचं कारणच काय? केवळ सवयीमुळं. सात हजार वर्षं सर्वत्र मनुष्यजातीला ही सवय पडली आहे त्यामुळं. म्हणून ती आपण टाकून देऊ की आपण देव होऊ.' हे तो म्हणाला, तो म्हणाला!"

"आणि तू म्हणाला नाहीस, तू म्हणाला नाहीस?" आपल्या भावाकडे निखालसपणे पाहून, आल्योशाला मोठ्याने बोलल्याशिवाय राहवले नाही. "काही असो, त्याच्याकडं लक्ष देऊ नको, त्याचा संबंध सोडून दे अन् त्याला विसर. अन् आता ज्याबद्दल तू त्याला श्राप देतो आहेस ते सारं त्याला आपल्याबरोबर घेऊन जाऊ दे, अन् तो परत येऊ दे नको!"

"होय, पण तो खुनशी आहे रे. तो मला हसला. तो उद्धटपणे वागला, आल्योशा," इवान म्हणाला, अपमानित झाल्याचा कंप त्याने अनुभवला. "पण तो माझ्याशी अन्यायानं वागला, अनेक गोष्टींसंबंधानं अन्यायानं वागला. त्यानं माझ्या तोंडावर माझ्यासंबंधी खोट्यानाट्या गोष्टी सांगितल्या. 'आहो, तुम्ही काय, आता एक शूरत्वाचं सत्कृत्य करणार आहा — मी माझ्या वडिलांचा खून केला, माझ्या चिथावणीनं त्या हुजऱ्यानं त्यांचा खून केला अशी कबुली तुम्ही देणार आहां—वाहवा!"

"भाई, स्वतःला आवर," आल्योशा मध्येच म्हणाला. "तू त्यांचा खून केलेला नाहीस, ते खरं नाही!"

"तेच तो म्हणतो, होय तो, अन् त्याला ते माहीत आहे. 'तुम्ही शूरत्वाचं सत्कृत्य करणार आहा, अन् तुम्ही तर सद्गुण न मानणारे आहात; त्यानंच तुम्हाला यातना होत आहेत अन् तुम्हाला राग येतो आहे, म्हणूनच तुम्ही इतके सूडबुद्धीचे झालेले आहात.' हे तो माझ्याविषयी म्हणाला अन् आपण काय बोलतो ते तो जाणतो."

"हे तू म्हणतो आहेस; तो नाही," आल्योशा दुःखपूर्ण स्वरात उद्गारला, "अन् तू ते म्हणतोस कारण तू आजारी आहेस, तुला भ्रम झाला आहे, तू स्वतः त्रास करून घेत आहेस."

"नाही, आपण काय म्हणतो ते तो जाणतो. 'तुम्ही अहंकार धरून जात आहात,' तो म्हणतो. 'तुम्ही उभं राहून म्हणणार की त्यांना मी मारलं, मग भयानं

तुमची बोबडी का वळते ? तुम्ही खोटं बोलता ! मला तुमच्या मताबद्दल तिरस्कार आहे, तुमच्या भयाबद्दल तिरस्कार आहे ! ' असं तो माझ्याविषयी म्हणाला. आणि तुला माहीत आहे, " तो गुन्हेगार आहे, खुनी आहे, पण किती हो हा उदारात्मा, त्याला आपल्या भावाला वाचवायचं हातं म्हणून त्यानं कबुली दिली, अशी आपली स्तुती त्यांनी करावी म्हणून तुम्ही आसुसलेले आहात," आल्योशा हे खोटं आहे !" इवान एकदम ओरडून म्हणाला, त्याचे डोळे चमकले. ' मला त्या सटर-फटर लोकांनी केलेली स्तुती नको आहे, मी शपथपूर्वक सांगतो मला ती नको आहे ! ती खोटी गोष्ट आहे ! म्हणून मी तो पेला त्याच्या अंगावर फेकला अन् तो त्याच्या तोंडावर आपटून फुटला."

" भाई, शांत हो, थांब," आल्योशा त्याचे आर्जव करू लागला.

" हाय, माणसाला कसं छळावं ते त्याला चांगलं माहीत आहे. क्रूर आहे तो !" आल्योशाकडे लक्ष न देता इवान बोलत राहिला. " मला पहिल्यापासूनच तो कशाकरिता आलाय याची कल्पना होती. ' तुम्ही अहंकार धरून गेलात हे समजा गृहीत धरलं, तरी तुम्ही मनात आशा ठेवली की स्मिर्द्याखफला शिक्षा होईल अन् त्याला सैबेरियाला पाठवलं जाईल, मीत्याची सुटका होईल, अन तुम्हाला फक्त नैतिक धिक्काराची शिक्षा होईल, ' नैतिक धिक्कार ' म्हणताना तो ' ऐकलंत का ? म्हणून हसला. अन् काही लोक तुमची स्तुती करतील. पण आता स्मिर्द्याखफ मेलाय, त्यानं गळफास लावून घेतलाय, मग तुमच्या एकट्यावर कोण विश्वास ठेवील ? पण तरी तुम्ही जाणार आहात, तुम्ही जाणार आहात, तरीही तुम्ही जाणार; तुम्ही जाण्याचं ठरवलंय. आता जाऊन काय करणार तुम्ही ?' हे भयंकर आहे, आल्योशा. असले प्रश्न मी सहन करू शकत नाही. असले प्रश्न विचारण्याची कुणाची छाती आहे ?"

" भाई," आल्योशा मध्येच बोलला. त्याचे हृदय भयाच्या दडपणाने दबून गेले, पण तरी इवानला समजुतीवर आणू ही त्याला आशा असावी; तो म्हणाला, " मी येण्यापूर्वीच स्मिर्द्याखफच्या मरणाची बातमी त्यानं तुला सांगितली असणं कसं शक्य आहे ? ती कुणालाच माहीत नव्हती अन् कुणाला समजण्याइतका वेळही नव्हता."

" त्यानं मला सांगितली," इवान संशयाला वाव न देता निश्चयपूर्वक म्हणाला. " तेच म्हणत असशील तर तोच त्याच्या साऱ्या बोलण्याचा विषय होता. तो म्हणाला, ' तुमचा जर सद्गुणावर विश्वास असला तर ते बरोबर होईल. लोकांनी जरी तुमच्यावर गैरविश्वास केला, तरी तुम्ही तत्त्वाकरिता जात आहात. पण तुम्ही तर फ्योदर पावलोविचसारखे एक छोटं डुक्कर आहात, अन् तुम्हाला सद्गुणाशी काय कर्तव्य आहे ? तुमच्या बलिदानाचा जर कुणालाच उपयोग होणार नसेल तर लुडबूड करीत राहण्याची तुम्हाला गरज काय ? कारण आपण का जात आहोत हे तुमचं तुम्हालाच माहीत नाही ! खरं म्हणजे, आपण का जातो आहोत हे

समजण्याकरिता तुम्ही काय वाटेल ते द्याल ! अन् तुमच्या मनाचा निर्धार झालेला असणं तरी शक्य आहे ? तुम्ही निर्धार केलेला नाही. जावं की न जावं याचा तुम्ही रात्रभर विचार करीत बसाल. पण तुम्ही जाल, समजलं, तुम्ही जाल. कोणत्याही बाजूनं तुम्ही ठरवा, तो निर्णय तुमच्यावर अवलंबून नाही हे तुम्हाला माहीत आहे. तुम्ही जाणार कारण न जाण्याचं धाडस तुमच्यानं करवणार नाही म्हणून. का नाही ते धाडस तुम्हाला होणार ? ते तुमचं तुम्हीच तर्कानं ओळखा. ते तुमच्यापुढं कोडं आहे !' तो उठला अन् निघून गेला. तू आलास अन् तो गेला. तो मला भ्याड म्हणाला, आल्योशा ! (त्या कोड्याचं उत्तर) हे की मी भ्याड आहे. 'पृथ्वीच्या वरती तरंगणं हे अशा गरुडांचं काम नाही.' हे तो पुढं म्हणाला—तो ! अन् स्मिर्दा-खफ तेच म्हणाला. त्याला ठार केलं पाहिजे ! कात्या माझा तिरस्कार करते ! गेला महिनाभर मी हे बघत आलोय. 'स्तुती व्हावी म्हणून तुम्ही जात आहा.' हे अमानुष असत्य आहे ! अन् तूसुद्धा माझा तिरस्कार करतोस, आल्योशा ! आता पुन्हा मला तुझा द्वेष वाटणार आहे ! अन् मी त्या राक्षसाचाही द्वेष करतो ! मी त्या राक्षसाचा द्वेष करतो ! त्या राक्षसाला वाचविण्याची माझी इच्छा नाही. सडू दे त्याला सैबेरियात ! तो ईश्वराचं स्तोत्र गाऊ लागलाय काय ! हं:, उद्या मी जाईन, त्यांच्यापुढं उभा राहीन अन् त्यांच्या तोंडावर थुंकेन !"

तो वेडापिसा होऊन एकदम उठला, त्याने तो टॉवेल भिरकावून दिला, अन् पुन्हा खोलीत येरझारा घालण्याचे त्याने सुरू केले. तो आत्ता जे म्हणाला ते आल्योशाच्या मनात आले. "मी झोपेतच जागा आहे वाटतं...मी चालतो, बोलतो, पाहतो, पण मी झोपलोय." अगदी तसेच असल्यासारखे आता वाटत होते. आल्योशा त्याला सोडून गेला नाही...डॉक्टरकडे धावत जावे असा विचार त्याच्या मनात येऊन गेला, पण आपल्या भावाला असा एकटाच सोडायला त्याला भीती वाटली; कुणाकडे त्याला सोपवून जायचे ? तेथे कुणीच नव्हते. हळूहळू जात जात इवानची शुद्धी शेवटी संपूर्णपणे गेली. तो अजूनही बोलतच होता, एकसारखा बोलत होता, पण अगदी असंबद्धपणे, अन् त्याचे शब्दसुद्धा कसेबसे तोंडातून बाहेर पडत होते. एका-एकी त्याला जोराची चक्कर आली; पण पटकन् आल्योशाने त्याला धरले. इवानने अंथरुणाकडे त्याला स्वतःला नेऊ दिले. आल्योशाने त्याचे कपडे कसेबसे काढले अन् त्याला झोपविले. तो त्याच्यावर नजर लावून दोन तास बसून राहिला. त्या आजारी मनुष्याला गाढ झोप लागली, तो बिलकूल हालला नाही, त्याचा श्वास मंद-पणे अन् संथपणे चालला. आल्योशाने एक उशी घेतली अन् कपडे न काढता तो कोचावर पडला.

त्याला झोप लागताना त्याने मीत्या अन् इवानविषयी प्रार्थना केली. इवानचा आजार आता त्याला समजू लागला. "गर्विष्ठपणानं निर्धार करणाऱ्या मनाचा हा परिताप आहे. विवेकबुद्धीची ही तळमळ आहे !" ज्या ईश्वरावर त्याची श्रद्धा

नव्हती तो अन् त्याचं सत्य त्याच्या हृदयावर प्रभाव मिळवू लागले होते, पण ते हृदय अजूनही वाकायला तयार होत नव्हते. उशीवर पडलेल्या आल्योशाच्या डोक्यात विचार तरंगू लागला, "होय, जर आता स्मिर्द्याखफ मेला तर इवानच्या जबानीवर कोणीच विश्वास ठेवणार नाही; पण तो जाऊन ती देणार." आल्योशा मृदू हसला. "ईश्वराचा जय होणार!" असे त्याच्या मनात आले. "सत्याचा प्रकाश पडून हा एक तर वर उठेल किंवा.. हा द्वेष भावना ठेवून मरून जाईल, अन् अशा रीतीनं ज्या कार्यावर त्याचा विश्वास नाही त्याच्या उपयोगी पडून तो स्वतःवर अन् प्रत्येकावर सूड उगवील," आल्योशा दुःखित मनानं म्हणाला अन् त्याने पुन्हा इवान-बद्दल प्रार्थना केली.

विभाग १२ वा

उफराटा न्याय

१

घातवार

मागे वर्णन केलेल्या घटनांनंतरच्या दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता, दमीत्रि कारमाझफचा खटला आमच्या जिल्हा न्यायालयात सुरू झाला.

इथल्या इथेच सांगून टाकतो की या खटल्यामध्ये जे जे काय घडले ते पूर्ण तपशिलासह, किंवा प्रत्यक्ष जसे घडत गेले तसतसे सुद्धा, सांगण्याची स्वतःची कुवत मला नाही. मला वाटते प्रत्येक गोष्ट टीका-टिप्पणीसह नमूद करायची म्हणजे एक ग्रंथ, भला मोठा ग्रंथ, भरेल. म्हणून मला जे विशेष वाटले तेच सांगण्याची मर्यादा जर मानली तर त्याबद्दल मला कोणी दोष देणार नाही, असा विश्वास बाळगतो. कदाचित् दुय्यम महत्त्वाच्या असलेल्या गोष्टी फार महत्त्वाच्या म्हणून मी निवडल्या असतील, आणि मी महत्त्वाच्या वगळल्या असतील. पण त्याकरिता क्षमा-याचना न करणेच बरे असे मला दिसते. मी माझ्याकडून कसोशीचा प्रयत्न करीन आणि वाचकाला स्वतःलाच दिसून येईल की मला जेवढे शक्य तेवढे सर्व मी केले आहे.

सुरुवातीला न्यायालयात प्रवेश करण्यापूर्वी, मला त्या दिवशी जे नवलाचे वाटले त्याचा मी उल्लेख करतो. नव्हे, मागाहून दिसून आले त्याप्रमाणे, प्रत्येकालासुद्धा त्याचे आश्चर्य वाटले. आम्हां सर्वांना माहीत होते की या प्रकरणाने फार औत्सुक्य निर्माण केलेले आहे, प्रत्येक जण खटला केव्हा सुरू होणार या अधीरतेने नुसता तडफडतो आहे. स्थानिक मंडळींत गेले दोन महिने हा सर्वांच्या बोलण्याचा, तर्कवितर्कांचा, जोरदार उद्गारांचा अन् शंकाकुशंकांचा विषय झालेला होता. प्रत्येकाला हेही माहीत होतं की ही केस साऱ्या रशियाभर प्रसिद्ध झालेली आहे, पण तरी तिने इतकी उत्कंठा, इतके तीव्र लक्ष प्रत्येकात, आमच्यातल्याच नव्हे तर सबंध रशियाभर प्रत्येकात, उत्पन्न केले असेल अशी आम्हाला कल्पना नव्हती. या दिवशी खटल्याच्या वेळी ते उघड दिसून आले.

आमच्या प्रांताच्याच प्रमुख शहरांतून माणसे आलेली नव्हती तर रशियातल्या

अनेक इतर शहरांतून, अन् मॉस्को आणि पीटर्सबर्गहून सुद्धा आली होती. त्यात वकील होते, महिला होत्या, अन् अनेक सुप्रसिद्ध व्यक्तीसुद्धा होत्या. एकूण एक प्रवेश पत्रिका संपून गेल्या होत्या. त्या तीन न्यायाधीशांच्या टेबलाच्या पाठीमागच्या बाजूला एक खास जागा अत्यंत नामवंत आणि महत्त्वाच्या पुरुष पाहुण्यांच्या करिता राखून ठेवलेली होती; आरामखुर्च्यांची एक रांगच तिथे ठेवण्यात आली होती—ही अपवादात्मक गोष्ट होती, पूर्वी अशी परवानगी कधी देण्यात आलेली नव्हती. मोठा भाग - अन् तो लोकसमुदायाच्या निम्म्याहून अधिक असावा—स्त्री समाजाचा होता. सर्व ठिकाणांहून इतक्या मोठ्या संख्येने वकील लोक आले होते की, त्यांच्या बसण्याची व्यवस्था कुठे करायची हे कळेना; कारण प्रत्येक तिकिटावर केव्हापासूनच उड्या पडल्या होत्या अन् ती वाटली गेली होती. त्या खोलीच्या शेवटाला, व्यासपीठाच्या पाठीमागे, एक खास आडोसा झटपट उभा करण्यात येऊन तिथे सर्व वकील मंडळींना प्रवेश देण्यात आला, आणि तिथे आपल्याला उभे राहायला जागा मिळाली यातच त्यांनी सुदैव मानले, कारण जागा करण्याकरिता सर्व खुर्च्या काढून टाकण्यात आल्या होत्या, आणि त्या आडोशाच्या मागचा तो जमाव खटला चालू असताना सबंध वेळ दाटीवाटीने उभा राहिला होता.

गॅलरीत काही महिला, विशेषत: ज्या दुरून आलेल्या होत्या, त्या सुरेख वेषभूषा करून आलेल्या दिसत होत्या. पण बहुतेक महिलांना वेषभूषेचीही क्षिती नव्हती. त्यांच्या चेहऱ्यांवर वेडीपिशी,. तीव्र, जवळजवळ अस्वस्थ जिज्ञासा दिसत होती. एक विशेष गोष्ट— जी अनेक निरीक्षणांनी मागाहून सिद्ध झाली ती म्हणजे जवळजवळ सर्व महिला, किंवा निदान त्यांच्यातल्या बऱ्याच बहुसंख्य महिला, मीत्याच्या बाजूला होत्या अन् त्याची सुटका व्हावी असे त्यांना वाटत होते. हे बहुधा स्त्री हृदयांना जिंकणारा म्हणून त्याचा जो लौकिक होता त्यामुळे असावे. या खटल्यात दोन प्रतिस्पर्धी स्त्रिया आहेत हे सर्वश्रुत होते. त्यांपैकी एक— कातिरीना इवानोव्हना हिच्याविषयी सर्वांनाच एक प्रकारचे कुतूहल होते. तिच्यासंबंधी नाना प्रकारच्या विलक्षण गोष्टी, मीत्याने गुन्हा केला असला तरीसुद्धा त्याच्याविषयी तिला वाटणाऱ्या प्रेमासंबंधीचे चमत्कार वाटण्याजोगे किस्से सांगितले जात होते. तिचा अभिमानी स्वभाव अन् 'बड्या लोकांशी असलेला संबंध' यावर विशेष करून जोर देण्यात येत होता (ती शहरातल्या कोणालाही फारशी भेटायला गेलेली नव्हती.) लोक म्हणत होते की, सरकारला अर्ज करून गुन्हेगारासोबत सैबेरियाला जाण्याची परवानगी मिळवायची अन् तिकडे खाणीत कुठेतरी त्याच्याशी लग्न करायचे असे तिच्या मनात आहे. ग्रूशिंकाच्या कोर्टात येण्याकडेसुद्धा तितकेच लोकांचे लक्ष लागलेले होते. त्या दोन प्रतिस्पर्धी स्त्रियांच्या— एक अभिमानी उच्च वर्गीय तरुणी अन् दुसरी 'कलावंतीण' यांच्या भेटीकडे लोकांचे औत्सुक्यपूर्ण लक्ष लागलेले होते. पण कातिरीना इवानोव्हनापेक्षा ग्रूशिंका ही या भागातल्या महिलांना जास्त परिचित अशी

व्यक्ती होती. 'फ्योदर पावलोविचचा अन् त्याच्या दुर्दैवी मुलाचा जिनं सत्यानाश केला त्या स्त्रीला त्यांनी यापूर्वी पाहिलेले होते, आणि सर्वांना, अगदी निरपवादपणे सर्वांना, असल्या 'अगदीच सामान्य, दिसायलासुद्धा सुरेख नसलेल्या,' साध्यासुध्या रशियन मुलीच्या प्रेमात बापलेक दोघे कसे पडू शकले याचे आश्चर्य वाटत होते.

थोडक्यात म्हणजे, गप्पांना ऊत आला होता. मला निश्चितपणे माहीत आहे की मीत्यामुळे आमच्या शहरात अनेक कुटुंबांत गंभीर स्वरूपाचे कलह उत्पन्न झाले होते. अनेक महिला आपल्या नवऱ्यांशी या भयंकर प्रकरणाच्या बाबतीत जे त्यांचे मतभेद होत त्यावर कडाक्याने भांडल्या होत्या, आणि या महिलांचे नवरे आरोपी-विषयी अनुकूल मताचे होण्याचे दूरच राहिले, त्याच्याविषयी अत्यंत वाईट ग्रह धरून कोर्टात आले होते हे अगदी स्वाभाविक होते. नव्हे, तेथे जमलेल्या प्रेक्षकांतील पुरुष-वर्ग व स्त्रीवर्ग यातील पुरुषवर्ग हा कैद्याच्या विरुद्ध मत करून घेऊन आलेला होता. तिथे कितीतरी उग्र, तिरसट, नव्हे खुनशीसुद्धा चेहेरे दिसत होते. मीत्याने या शहरातील आपल्या वास्तव्यात अनेक लोकांना दुखवून ठेवलेले होते. आलेल्यांपैकी काही लोक अर्थात् उत्साही वृत्तीचे होते, आणि त्यांना मीत्या या व्यक्तीच्या भवितव्याबद्दल मुळीच काही वाटत नव्हते. पण सर्वांना त्या खटल्यात मात्र गोडी होती, आणि बहुतांश लोकांना गुन्हेगाराला शिक्षा व्हावी अशी अपेक्षा होती यात शंका नाही. याला अपवाद कदाचित वकिलांचा म्हणावा लागेल, त्यांना त्या केसच्या नैतिक बाजूपेक्षा कायद्याच्या बाजूमध्ये विशेष रस होता.

सुप्रसिद्ध वकील फेत्युकोविच याच्या हजेरीने प्रत्येकाची उत्कंठा दुणावली होती. त्याचे वकिलीचे कसब सुप्रसिद्ध होते, आणि अनेक प्रांतांत कुप्रसिद्ध फौजदारी खटले लढविण्याची त्याची काही ही पहिलीच खेप नव्हती, आणि तो बचावाच्या बाजूला असला की तशा खटल्यांची चांगली प्रसिद्धी होई आणि सबंध रशियाभर त्यांची बराच काळ आठवण राही. आमच्या सरकारी वकिलासंबंधी अन् कोर्टाच्या मुख्य न्यायाधीशासंबंधीसुद्धा अनेक गोष्टी प्रचलित होत्या. फेत्युकोविचला भेटताना इप्पोलित किरिल्लोविचला कंप सुटला होता आणि पीटर्सबर्गमध्ये जेव्हा त्यांनी आपल्या व्यवसायाला सुरुवात केली तेव्हापासूनच ते एकमेकांचे शत्रू होते, असं म्हणतात; पीटर्सबर्ग येथे असताना आपल्याला कोणाकडून तरी त्रास झाला, कारण आपल्या बुद्धिकौशल्याचे योग्य चीज तिथे झाले नाही असे नेहमी वाटत असलेल्या आमच्या भावनाशील सरकारी वकिलाची मनःस्थिती या कारमाझफ खटल्याच्या संबंधात जरी प्रक्षुब्ध झाल्यासारखी झाली होती, आणि या खटल्याच्या द्वारा आपल्या डगमगत्या दैवाची पुन्हा उभारणी करण्याची स्वप्ने ही तो पाहत होता, तरी फेत्युकोविच ही त्याला डोकेदुखी झाली होती असे म्हणतात. पण या अफवा मुळीच योग्य नव्हत्या. आमचा सरकारी वकील धोका पाहताच हातपाय गाळणाऱ्या माणसांपैकी नव्हता. उलट, धोका

वाढताच त्याचा आत्मविश्वास अधिक वाढला. येथे हे लक्षात ठेवणे अवश्य आहे की आमचा सरकारी वकील हा सर्वसामान्यपणे फार उतावळा अन् अहितकर होईल इतक्या प्रमाणाते मनावर सहज छाप पाडून घेणारा होता. एखाद्या खटल्यात तो आपले सारे तनमन लावी अन् जणू आपले सारे नशीब अन् भवितव्य त्या खट-ल्याच्या निकालावर अवलंबून आहे इतका तो झटे. कायदेव्यवसायाच्या जगात हा एक उपहासाचा विषय झालेला होता, कारण अगदी याच त्याच्या वैशिष्ट्यामुळे या आमच्या सरकारी वकिलाची त्याच्या सामान्य पदाच्या मानाने व्हावी त्याहून जास्त प्रमाणावर कुप्रसिद्धी झाली होती. विशेषेकरून त्याच्या मानसशास्त्राविषयीच्या आग्रही वृत्तीमुळे लोक त्याला हसत. माझ्या मताने, त्यांची ती चूक होती. आणि आमचा हा वकील सर्वसामान्य समजूत होती त्याहून फार मोठी खोली असलेला मनुष्य होता असे मी मानतो. पण बिचाऱ्याची तब्येत नाजूक असल्यामुळे आपल्या व्यवसायाच्या सुरुवातीलाच आपले नाव काढण्यात त्याला जे अपयश आले त्यातून तो नंतर कधी वर उठलाच नाही.

मुख्य न्यायाधीशासंबंधी बोलायचे तर, मी एवढेच म्हणू शकेन की ते दयाळू अंतःकरणाचे व सुसंस्कृत गृहस्थ होते, त्यांना आपल्या कामाचे व्यावहारिक ज्ञान होते आणि त्यांची मते प्रगतिशील होती. ते काहीसे महत्त्वाकांक्षी होते, तथापि आपल्या भावी आयुष्यातील भरभराटीसंबंधी फारशी चिंता करणारे नव्हते. प्रगति-पर विचारांचा मनुष्य होणे हे त्यांच्या आयुष्यातील महान् ध्येय होते. त्यांचे संबंधही पुष्कळ होते अन् त्यांची चांगली मालमत्ताही होती. या कारमाझफ प्रकरणासंबंधी, आम्हाला मागाहून कळले त्यावरून, त्यांच्या भावना काहीशा तीव्र होत्या, पण त्या सामाजिक दृष्टिकोणातून, वैयक्तिक रागलोभामुळे नव्हे. एक सामाजिक घटना म्हणून म्हणजे आपल्या सामाजिक परिस्थितीतून निघणारा परिणाम, राष्ट्रीय स्वभावाचे नमुनेदार निदर्शक वगैरे वगैरे दृष्टींनी तिथे वर्गीकरण आणि स्वरूप अशा दृष्टिकोणा-तून त्यांना या खटल्यात रस होता. या खटल्याच्या व्यक्तिविषयक बाजूच्या बाबतीत म्हणजे शोकांतकारी महत्त्वाच्या आणि आरोपीसकट त्यात गुंतलेल्या व्यक्ती या संबंधात त्यांची वृत्ती तटस्थ अन् व्यक्तिनिरपेक्ष अशी होती, अन् ते खरोखर योग्यच म्हटले पाहिजे.

न्यायाधीश येण्याच्या अगोदर बराच वेळ न्यायालय ठेचून भरून गर्दी मर्यादेबाहेर गेली होती. आमच्या येथील न्यायालय हा शहरातला सर्वात उत्तम दिवाणखाना आहे. चांगला मोठा, उंच अन् आवाज ऐकू येण्याच्या दृष्टीने योग्य. न्यायाधीश बसण्याची जागा उंच व्यासपीठावर केलेली होती, आणि त्यांच्या उजव्या बाजूला एक टेबल अन् ज्यूरी करिता दोन खुर्च्यांच्या रांगा तयार ठेवलेल्या होत्या. डाव्या बाजूला कैद्याकरिता अन् बचावाच्या वकिलाकरिता जागा होती न्यायालयाच्या मध्यात, न्यायाधीशांच्या लगत एक टेबल होते त्यावर 'पुराव्यांचे

साहित्य ' होते. त्यावर फयोदर पावलोविचचा घरी घालण्याचा पांढरा रेशमी झगा, रक्तानं भरलेला, पितळी बत्ता— ज्याने तो खून म्हणून म्हटलेले कृत्य करण्यात आलें होते तो; मीत्याचा सदरा, ज्याची बाही रक्ताने डागळलेली होती तो, त्याचा कोट ठिकठिकाणी खिशाच्या वर रक्ताने डागळलेला; या खिशात त्याने आपला हातरुमाल ठेवलेला होता; तो खुद्द हातरुमाल रक्ताने कडकडीत झालेला अन् आता अगदी पिवळा पडलेला; पेऱ्होतिनच्या इथे मीत्याने आत्महत्या करण्याच्या दृष्टीने भरलेले अन् त्रिफोन बोरिस्सोविचने मोक्रोय येथे चोरून हळूच त्याच्याकडून काढून घेतलेले पिस्तूल, पाकीट, ज्यात ग्रूशिंकाकरिता तीन हजार रूबल तयार ठेवलेले होते ते; अरुंद गुलाबी फ़ीत जिने ते वरून बांधलेले होते ती, आणि इतर अनेक वस्तू— ज्या आता मला आठवत नाहीत, त्या त्यात होत्या. त्या दालनात काही अंतरावर लोकांना बसण्याकरिता केलेल्या जागा होत्या. पण कठड्याच्या पुढ्यात काही खुर्च्या जे साक्षीदार आपल्या साक्षी दिल्यानंतर कोर्टात थांबतील त्यांना बसण्याकरिता ठेवल्या होत्या.

दहा वाजता ते तीन न्यायाधीश—म्हणजे मुख्य न्यायाधीश, एक अवैतनिक जस्टिस ऑफ द पीस अन् दुसरा एक असे आले. सरकारी वकील अर्थात् लगेच पाठोपाठ आला. मुख्य न्यायाधीश हा पन्नास वर्षांचा बुटका, भरभक्कम, जाडेला, अग्निमांद्य झाल्यासारखा चेहेरा असलेला मनुष्य होता, त्याचे काळे केस करडे होत चाललेले अन् आखूड कापलेले होते; त्याच्या छातीवर एक लाल फीत होती, कोणत्या उच्च दर्जाची निदर्शक ते मला आठवत नाही. सरकारी वकिलाचा चेहेरा मला अन् इतरांनासुद्धा विशेष फिकट, जवळजवळ रोगट, पडलेला असा वाटला. तो एकदम, जणू एका रात्रीत, बारीक झाला असल्यासारखा वाटला, कारण नुकतेच तर दोन दिवसांपूर्वी त्याला मी नेहमीप्रमाणे दिसत असलेला बघितले होते. मुख्य न्यायाधीशांनी कोर्टाला ' सर्व ज्यूरी हजर आहेत का ? ' असा प्रश्न करून कामाला सुरुवात केली.

पण मला हे असे जाता येणार नाही, याचे एक कारण असे की काही गोष्टी मला ऐकू आल्या नाहीत, दुसऱ्या काही गोष्टी मला दिसल्या नाहीत, अन् आणखी काही मी विसरून गेलो आहे, पण सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे, पूर्वी म्हटल्याप्रमाणे, जे जे काही बोलले गेले अन् केले गेले त्या प्रत्येकाचा निर्देश करण्याइतका वेळ किंवा जागाही अक्षरशः माझ्यापाशी नाही. मला एवढे माहीत आहे की कोणत्याही पक्षाने ज्यूरीतल्या पुष्कळशा लोकांना आक्षेप घेतला नाही. ज्यूरीतल्या त्या बारा व्यक्ती मला आठवतात— चार खालच्या दर्जाचे शहरातलेच अधिकारी होते, दोन व्यापारी अन् सहा शहरातले शेतकरी अन् कारागीर होते. खटला सुरू होण्याच्या अगोदर बराच वेळ आश्चर्यपूर्वक, एकसारखी पृच्छा, विशेषतः महिलांच्याकडून, केली जात होती की, " या अशा नाजूक, गुंतागुंतीच्या अन्

मानसशास्त्राशी संबंधित अशा खटल्यात खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांवर, नव्हे शेतकऱ्यांवरसुद्धा निकालाचं सोपवणं कितपत योग्य आहे ? " आणि " अशा कामात सरकारी अधिकाऱ्याला, अन् त्याहूनही शेतकऱ्याला काय समजणार आहे ? " ज्यूरीमधले ते सगळे चारी अधिकारी, खरं म्हणजे, सटर फटर अन् खालच्या दर्जाचे होते. त्यांतला फक्त एक थोडासा तरुण होता, बाकीचे करडी डोकी झालेले, समाजात फारसे माहीत नसलेले, यःकश्चित पगारावर जगणारे; अन् ज्यांच्या बायका कदाचित् वयानं मोठ्या, अन् ओळख करून न देण्यासारख्या अन् ज्यांची भाराभर मुलं कदाचित् पायमोजे अन् वाहाणा सुद्धा न मिळणारी असतील असे ते होते. जास्तीत जास्त म्हणजे त्यांनी आपला फावला वेळ पत्ते खेळण्यात घालविला असेल, अन् एकही पुस्तक कधी वाचलेले नसेल. ते दोन व्यापारी प्रतिष्ठित दिसत होते, पण विचित्र वाटावे असे गपचिप अन् ठोंब्यासारखे बसलेले होते. त्यांच्यापैकी एक बारीक केस कापलेला अन् युरोपीय पद्धतीचा पोषाख केलेला होता; दुसऱ्याला लहानशी, करड्या रंगाची दाढी होती, अन् त्याच्या मानेवर लाल फीत होती अन् तिच्यावर कसलेसे पदक लटकावलेले होते. कारागिरांच्या अन् शेतकऱ्यांच्या संबंधाने बोलायलाच नको. स्कोतोप्रिगोन्येवस्कचे कारागीर हे शेतकरी असल्यासारखेच आहेत, अन, ते शेतातही कामे करतात. त्यांच्यापैकी दोघांच्या अंगावर युरोपीय पोषाख होता, अन् कदाचित म्हणून ते इतरांपेक्षा अधिक घाणेरडे अन् दृष्टी न ओढून घेण्यासारखे होते. त्यामुळे आश्चर्य वाटणे साहजिक होते, अन् त्यांच्याकडे पाहिल्याबरोबर मला तर वाटले की, " या सारख्या माणसांना खटल्यातलं काय कळणार आहे ? " तरी त्यांच्या चेहेऱ्यांनी एक विलक्षण परिणामकारक जवळ जवळ दहशत वाटण्याजोगी, छाप टाकली होती; ते कठोर अन् रागीटसे दिसत होते.

शेवटी मुख्य न्यायाधीशांनी फ्योदर पावलोविच कारमाझफच्या खुनाचा खटला चालू केला. त्यांनी त्याचे वर्णन कसे केले ते मला चांगलेसे आठवत नाही. कोर्टाच्या चोपदाराला आरोपीला आणावयास सांगण्यात आले, आणि मीत्याचे आगमन झाले. कोर्टात सर्वत्र गुपचूप झाले. माशी शिंकलेलीसुद्धा ऐकू आली असती. इतरांचे मला माहीत नाही, पण माझ्यावर मीत्याची छाप अतिशयच प्रतिकूल पडली. अगदी नव्या फ्रॉक कोटात तो विलक्षणच फक्कडराव दिसत होता. त्याने तो या प्रसंगाकरिताच खास आपल्या शिंप्याकडून मॉस्कोहून मागविला होता असे मला मागाहून कळले, या शिंप्याकडे त्याचे माप होते. त्याने हातात बिलकूल डाग नसलेले काळे कोकराच्या कातड्याचे हातमोजे अन् उत्तम प्रकारचे तागी कपडे अंगात घातले होते. तो आपल्या एकेक गज लांबीच्या ढांगा टाकीत आत आला, त्याची दृष्टी कडकपणे-सरळ नाकासमोर होती. आत येऊन तो आपल्या जागेवर अत्यंत अव्यग्र मुद्रेने बसला.

त्याच वेळी बचावाचा वकील, सुप्रसिद्ध फेत्युकोविच, याने प्रवेश केला अन् दबल्या आवाजात एक प्रकारची गुणगुण कोर्टभर पसरली. तो उंचेला, किडकिडीत असा होता, त्याचे पाय लांब अन् बारीक होते अन् पायांची बोटे अतिशयच लांब, बारीक, फिकी होती, त्याचा चेहरा गुळगुळीत हजामत केलेला होता, केस हलकेच विंचरलेले, पण काहीसे आखूड होते, अन् ओठ पातळ होते. ते मधून मधून वक्र होऊन तुच्छता अन् स्मित यांच्यामधले काहीतरी प्रकट करीत होते. तो जवळ जवळ चाळीस वर्षांचा दिसत होता. त्याचे डोळे तसे बारीक अन् भावशून्य होते, पण ते विचित्र रीतीने एकत्र आलेले होते, त्यांच्यामध्ये फक्त पातळसं, लांब नाक होते. ते डोळे सोडले तर त्याचा चेहरा बरा दिसला असता. खरे म्हणजे, त्याच्या चेहऱ्यावर एकदम पक्ष्याचे रूप आठवावे तसे काहीतरी होते. त्याने सायंकाळचा पोषाख करून पांढरा टाय घातला होता.

मुख्य न्यायाधीशांनी मीत्याला त्याचे नाव, धंदा, वगैरे प्राथमिक प्रश्न विचारले ते मला आठवतात. मीत्याने झटपट उत्तरे दिली अन् त्याचा आवाज इतका अनपेक्षितपणे मोठा होता की त्याने मुख्य न्यायाधीश एकदम चपापून आरोपीकडे आश्चर्याने पाहू लागले. मग खटल्याच्या कामी भाग घेणाऱ्या इसमांची– म्हणजे साक्षीदारांची अन् तज्ज्ञांची यादी सांगण्यात आली. ती लांबलचक होती. त्यातले चार साक्षीदार हजर नव्हते–एक मिऊझोव, त्याने प्राथमिक चौकशीत साक्ष दिलेली होती आणि आता तो पॅरिसमध्ये होता; मादाम होहलाहोवा अन् मॅक्झिमफ, हे आजारीपणामुळे गैरहजर होते; अन् स्मिर्द्याखफ एकाएकी मृत्यू पावल्यामुळे गैरहजर होता, त्याच्या मृत्यूबद्दलचे अधिकृत निवेदन पोलिसांकडून दाखल करण्यात आले होते. स्मिर्द्याखफ मेल्याच्या बातमीने कोर्टात एकाएकी हालचाल अन् कुजबूज सुरू झाली. जमलेल्यांपैकी पुष्कळांनी अर्थात् त्याच्या अकस्मात् आत्महत्येबद्दल ऐकलेले नव्हते. लोकांना सर्वांत जास्त विलक्षण वाटले ते मीत्याच्या अकस्मात् ओरडण्याने. स्मिर्द्याखफच्या मृत्यूचे निवेदन केले जाताच तो आपल्या जागेवरून मोठ्याने ओरडून म्हणाला :

"कुत्तरडा होता तो अन् कुत्तरड्यासारखा मेला !"

त्याचा वकील एकदम कसा त्याच्याकडे धावला, अन् मुख्य न्यायाधीशांनी त्याला उद्देशून भाषण करून असे नियमभंगाचे कृत्य पुन्हा झाले तर कडक उपाययोजना करण्यात येईल अशी धमकी कशी दिली ते मला आठवते. मीत्याने होकारार्थी मान डोलावली अन दबल्या आवाजात अनेक वेळा मध्येच आपल्या वकिलाला तो पश्चात्तापाचे चिन्हही न दाखविता पुनःपुन्हा म्हणाला :

"मी पुन्हा नाही बोलणार, पुन्हा नाही. माझ्या तोंडून ते एकदम गेलं. मी पुन्हा तसं करणार नाही."

आणि अर्थात्च या लहानशा प्रसंगाचा परिणाम ज्यूरीवर किंवा लोकांवर त्याच्या भल्याचा झाला नाही, त्याच्या स्वभावाचे प्रदर्शन झाले, अन् तो कसा आहे ते आपोआपच कळले. या प्रसंगाची छाप असतानाच खटल्याच्या प्रारंभीचे निवेदन वाचले गेले. ते थोडकेच, पण मुख्य हकीकत काय ते मांडणारे होते. त्यात आरोपीला का पकडण्यात आले, त्याची चौकशी का केली पाहिजे वगैरे बद्दलची मुख्य कारणेच फक्त नमूद केली होती. तरी त्याचा माझ्या मनावर फार चांगला प्रभाव पडला. कारकुनाने ते मोठ्याने अन् स्पष्टपणे वाचून दाखविले. त्यायोगे ती सबंध शोक घटना आमच्य पुढे एकत्र स्वरूपात, घातक अन् निर्दय पार्श्वभूमीवर ढळढळीतपणे उठून दिसण्याजोगी उलगडली गेली. मला आठवते की ते वाचले गेल्यानंतर लगेच मुख्य न्यायाधीशांनी मीत्याला मोठ्या प्रभावशाली आवाजात विचारले :

" आरोपी, तुला गुन्हा कबूल आहे ? "

मीत्या लगेच आपल्या जागेवरून उठला.

" मी दारू पिऊन धुंद झाल्याचा अन् उधळपट्टी केल्याचा, तसंच आळशी-पणाचा अन् दुराचाराचा आरोप कबूल करतो," तो पुन्हा दचकविणाऱ्या अन उन्मत्तासारख्या आवाजात उद्गारला. "सदा प्रामाणिकपणे वागणारा मनुष्य बनावं असं माझ्या मनात होतं, पण बरोबर त्याच क्षणी दैवानं माझ्यावर जबर प्रहार केला. परंतु मी त्या म्हाताऱ्याची, माझा शत्रू अन बाप होता त्याची, हत्या करण्याचा गुन्हा केलेला नाही. नाही; मुळीच नाही, मी त्याला लुबाडल्याचाही गुन्हा केलेला नाही ! मी करणंच शक्य नव्हतं. दमीत्रि कारमाझफ बदमाष आहे, पण चोर नाही."

तो पुन्हा खाली बसला, त्याचे सर्वांग कापत होते ते स्पष्ट दिसत होते. मुख्य न्यायाधीशांनी पुन्हा थोडक्या शब्दांत पण प्रभावीपणे कानउघडणी करून ' विचारल्या तेवढ्याच प्रश्नांची उत्तरे दे अन् अप्रयोजक उद्गार काढू नको ' असे त्याला बजावले. मग त्यांनी खटला पुढे चालू करायला फर्मावले. सर्व साक्षीदारांना शपथ घेण्याकरिता पुढे आणण्यात आले. त्या वेळी मी त्या सर्वांना एकत्र पाहिले. कैद्याच्या भावांना मात्र शपथ न घेता साक्ष देण्याची परवानगी देण्यात आली. धर्मोपदेशकाच्या अन् मुख्य न्यायाधीशांच्या समजावणीनंतर साक्षीदारांना दूर नेण्यात आले अन् एक-मेकांपासून शक्य तितके वेगवेगळे बसविण्यात आले. मग एकामागून एक त्यांना बोलावण्यात येऊ लागले.

२

धोकेबाज साक्षीदार

मुख्य न्यायाधीशांनी बचावाचे साक्षीदार अन् फिर्यादी पक्षाचे साक्षीदार यांच्या वेगळ्या वेगळ्या तुकड्या केल्या होत्या की काय, आणि त्यांना काही विशिष्ट

क्रमाने बोलवायचे अशी योजना केली होती की काय ते मला माहीत नाही. पण तसे होते यात मात्र शंका नाही. मला एवढे माहीत आहे की फिर्यादी पक्षाच्या साक्षीदारांना अगोदर बोलावण्यात आले. मी पुन्हा सांगतो, सर्व प्रश्न एकामागून एक कसे विचारले गेले ते मी वर्णन करून सांगणार नाही. शिवाय माझे कथन हे काही अंशी वाजवीपेक्षा अधिक होणर आहे, कारण सरकारी वकिलाच्या अन् बचावाच्या वकिलाच्या भाषणात क्रमवार सारा पुरावा एकत्र आणला गेला होता आणि ठसठशीत व अर्थवाहक रीतीने मांडला गेला होता. मी त्या दोन लक्षणीय भाषणांतले काही भाग विस्तारशः उतरून घेतले आणि ते मी योग्य क्रमाने उद्धृत करणारच आहे. आणि त्या बरोबरच एक अतिविलक्षण अन् अगदी अनपेक्षित अशी जी घटना, अंतिम भाषणांच्या पूर्वी घडली अन् जिचा त्या खटल्याच्या अनिष्ट अन् घातक फलनिष्पत्तीवर निःसंशय परिणाम झाला तीही सांगणार आहे.

फक्त एवढेच सांगतो की, चौकशीच्या अगदी सुरुवातीपासून खटल्याचे एक विशेष स्वरूप उठून दिसण्याजोगे होते, आणि जे सर्वांना दिसूनही आले, ते म्हणजे बचावाच्या पक्षाला ज्या मुद्द्यांवर विसंबून राहावे लागले त्यांच्याशी तुलना करता फिर्यादी पक्षाचे बळ प्रचंड होते हे. माहिती सांगणाऱ्या गोष्टी पहिल्या क्षणापासून जसजशा एकाच मुद्द्याच्या भोवती संघटित होऊ लागल्या, आणि तो सारा भयानक अन् क्रूर गुन्हा हळूहळू उलगडत जाऊ लागला तसतशी ही गोष्ट प्रत्येकालाच जाणवली. बहुधा प्रत्येकालाच पहिल्यापासून वाटू लागले की, ही केस वादातीत आहे, तिच्या बाबतीत काही संशयच नाही. त्यासंबंधी खरोखर चर्चा व्हायला जागाच नाही, आणि बचाव म्हणजे आपला नुसता औपचारिक विधी आहे, आरोपी हा अपराधी आहे, सरळ सरळ अन् निश्चितपणे अपराधी आहे. माझी कल्पना आहे की, त्या लक्ष वेधणाऱ्या आरोपीच्या सुटकेबद्दल इतक्या आतुर झालेल्या महिलांचीसुद्धा त्याच वेळी निरपवादपणे त्याच्या अपराधीपणाविषयी खात्री पटली. विशेष म्हणजे, त्याचा गुन्हा जर इतक्या ठामपणे प्रस्थापित करण्यात आला नसता तर त्यांना मेल्याहून मेल्यासारखे झाले असते, कारण त्यामुळे गुन्हेगाराच्या निर्दोष सुटकेच्या शेवटच्या प्रसंगाचा प्रभाव कमी झाला असता, असे मला वाटते. विलक्षण वाटेल पण सर्व महिलांची अगदी शेवटच्या क्षणापर्यंत तो निर्दोषी सुटेल अशीच ठाम समजूत होती. तो दोषी आहे खरा, पण दयाबुद्धीने प्रेरित होऊन नव्या विचारानुसार ज्या नव्या भावना प्रचलित होत आहेत त्यांना धरून, वगैरे वगैरे, त्याची सुटका होईल असे त्यांना वाटत होते. आणि त्यामुळेच त्यांनी कोर्टात इतक्या आतुरतेने गर्दी केली होती. पुरुषमंडळींना सरकारी वकील आणि सुप्रसिद्ध फेत्युकोविच यांच्या मधल्या झकाझकीत विशेष रस होता. सर्वांनाच वाटत होते अन् ते स्वतःशी म्हणत होते की काही आशा नसलेल्या असल्या केसमधून फेत्युकोविचसारखा कुशल वकील झाला तरी काय काढणार आणि म्हणून ते एकाग्र चित्ताने तो जे एकामागून एक

यश मिळवीत चालला होता ते पाहत राहिले होते.

पण फेत्युकोविच हा सर्वांना अगदी शेवटपर्यंत, त्याचे भाषण होईपर्यंत, एक गूढच राहिला. अनुभवी व्यक्तींना शंका आली की त्याने मनात काय योजून ठेवलेले आहे, तो काही एका उद्दिष्टाच्या दिशेने काम करतो आहे, पण ते उद्दिष्ट काय याचा तर्क करणे अशक्य होते. तथापि त्याचा आत्मविश्वास अन् आत्मनिर्भरता निश्चितपणे दिसून येत होती. शिवाय, त्याने, इतक्या अल्पावधीत म्हणजे बहुधा फक्त तीनच दिवसांच्या आमच्या इथल्या मुक्कामात, या केसचे धागेदोरे आपल्या हाती मिळविण्यात आणि 'अगदी त्यातील बारकाव्यांचा अभ्यास करण्यात' जे यश मिळविले ते पाहून प्रत्येकाला मोठा आनंद वाटला. नंतर, लोक मोठ्या चविष्टपणे, त्याने फिर्यादी पक्षाच्या सर्व साक्षीदारांना कशा चातुर्याने 'खाली उतरविलं' आणि जितके शक्य होते तितकी त्यांची कशी गाळण उडवून दिली आणि, विशेष म्हणजे, त्यांच्या नावलौकिकावर शिंतोडे उडवून त्या रीतीने त्यांच्या साक्षींची किंमत कशी उतरविली, याचे वर्णन करीत होते. पण हे त्याने एक प्रकारे खिलाडूपणाच्या वृत्तीने, व्यावसायिक यश मिळविण्याकरिता, मान्य झालेल्या पद्धतीतून काहींही आपण वगळले नाही हे दाखविण्याकरिता, केले असेच मानले जात होते, कारण सर्वांची खात्री होती की साक्षीदारांना अशा रीतीने कमीपणा आणण्याने काही खरे हित साध्य होण्याजोगे नव्हते, अन् कदाचित इतरा कोणापेक्षा याची त्याला स्वतःला जास्त जाणीव असावी, म्हणून त्याने मागे काही एक स्वतःची कल्पना, काही लपवलेले बचावाचे शस्त्र, ठेवून दिलेले असावे, आणि ते तो योग्य वेळ येताच एकदम बाहेर काढणार असावा. पण दरम्यान, स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव ठेवून, तो स्वतःची करमणूक करून घेत असावा.

या दृष्टीने, उदाहरणार्थ, फ्योदर पावलोविचचा जुना नोकर ग्रिगरी याने त्या उघड्या दरवाज्याबद्दलची अत्यंत घात करणारी साक्ष दिली. तेव्हा त्याची तपासणी करताना बचावाच्या वकिलाने, त्याची प्रश्न करण्याची पाळी आली तेव्हा, त्याला चक्क जखडून ठेवले. हे नमूद केले पाहिजे की ग्रिगरीने त्या दालनात प्रवेश केला तो स्वस्थचित्त असल्याच्या अन् गौरवयुक्त आविर्भावाने; न्यायालयाच्या भपक्याने किंवा त्याचे बोलणे ऐकणाऱ्या प्रचंड श्रोतृ-वर्गाला बघून त्याची यत्किंचितही चलबिचल झाली नाही. त्याने साक्ष दिली ती जणू तो आपल्या मार्फाशीच बोलतो आहे इतक्या आत्मविश्वासाने, पण अधिक सन्मानपूर्वक म्हणता येईल अशा रीतीने दिली. याला स्वतःचेच बोलणे फिरवायला लावणे हे अशक्य होते. सरकारी वकिलाने त्याला कारमाझफांच्या कौटुंबिक जीवनाविषयीच्या तपशिलाचे प्रश्न प्रथम विचारले. त्या कुटुंबाचे चित्र अगदी भयानक स्वरूपात उभे राहिले. कानांना अन् डोळ्यांना अगदी स्पष्ट झाले की साक्षीदार निष्कपटी अन् निःपक्षपाती आहे. आपल्या मयत धन्याविषयी गाढ आदरभाव असूनसुद्धा त्याने साक्षीत सांगितले की तो मीत्याशी अन्यायाने

वागला आणि " आपल्या मुलांना जसं वाढवणं अवश्य होतं तसं त्यांनी वाढविलं नाही. मी जर नसतो तर दमीत्रि लहान असताना त्याला उवांनी खाऊन टाकलं असतं," असे त्याने मीत्त्याचे बाळपण वर्णन करीत असताना सांगितले. " मुलाला त्याच्या आईनं ठेवलेली मालमत्ता जी हक्कानं त्याचीच होती ती बापानं लुबाडून घेणं हेही न्यायाचं नव्हतं," असे त्याने सांगितले.

फ्योदर पावलोविचने आपल्या मुलावर त्यांच्या पैशाच्या संबंधात अन्याय केला असे ठामपणे म्हणण्याकरिता तुमच्याकडे पुरावा काय, या सरकारी वकिलाच्या प्रश्नाला उत्तर देताना ग्रिगरी पुढे ठेवण्याजोगा काहीच पुरावा देऊ शकला नाही, याचे सर्वांना आश्चर्य वाटले, पण तरी तो एकसारखे सांगत होता की मुलाशी त्यांनी केलेली भागवाभागवी 'अन्यायाची' होती, आणि त्यांनी मुलाला " आणखी काही हजार रुबल जादा देणं जरुरीचं होतं." जाताजाता मला हे नमूद केले पाहिजे की सरकारी वकिलाने पुढील प्रश्न विचारला : खरोखर फ्योदर पावलोविचने मीत्त्याने वारसात मिळालेल्या पैशाचा भाग आपल्याकडे ठेवून घेतला होता काय ? हा प्रश्न त्याने विशेष आग्रहपूर्वक सर्व साक्षीदारांना, म्हणजे अर्थात् ज्या कोणाला तो विचारणे योग्य होते त्या सर्वांना— त्यातून आल्योशा न् इवानही सुटले नाहीत— विचारला होता, पण कोणा एकाकडूनही त्याला बिनचूक माहिती मिळाली नाही; सर्वांनी तसे होते म्हणून सांगितले, पण त्यासंबंधीचा स्पष्ट पुरावा कोणीच पुढे मांडू शकला नाही. ग्रिगरीने जेवणाच्या वेळी घडलेल्या प्रसंगाचे जे वर्णन केले त्यात दमीत्रि एकदम कसा आत घुसला आणि त्याने आपल्या बापाला ठोकले, आणि त्याने त्याला ठार मारण्याकरिता पुन्हा येणार असल्याची कशी धमकी दिली हे सांगितले. त्याचा कोर्टावर अनिष्ट परिणाम झाला. विशेषतः ते सांगताना त्या म्हाताऱ्या नोकराची अक्षुब्ध वृत्ती, त्याने शब्दांचा काटकसरीने केलेला वापर आणि विशिष्ट भाषासरणी याचा एखाद्या उत्तम वक्तृत्वासारखा परिणाम झाला. तो म्हणाला, मीत्त्याने आपल्याला ठोसा मारून खाली पाडले अन् तोंडावर मारले याबद्दल आपल्याला त्याचा राग नाही; आपण त्याला केव्हाच क्षमा केली आहे. मयत स्मिर्द्यकफसंबंधी बोलताना त्याने स्वतःवर क्रूसाचे चिन्ह करून सांगितले की, चांगला कर्तृत्ववान मुलगा होता तो, पण वेडपट अन् रोगट होता, आणि त्याहूनही वाईट म्हणजे तो पाखंडी होता, आणि असे व्हायला त्याला फ्योदर पावलोविचने अन् त्याच्या एका मोठ्या मुलाने शिकविले होते. पण त्याने स्मिर्द्यकफच्या प्रामाणिकपणाचे कसून समर्थन केले, अन् एकदा स्मिर्द्यकफला धन्याचे पैसे कसे अंगणात सापडले होते, अन् ते लपवून ठेवण्याऐवजी त्याने ते धन्याकडे कसे नेऊन दिले, आणि धन्याने त्याला त्याबद्दल 'सोन्याचा तुकडा' कसा बक्षीस दिला आणि धन्याचा तेव्हापासून पुढं त्याच्यावर कसा अढळ विश्वास बसला, ते सांगितले. त्याने बागेकडच्या बाजूचा दरवाजा उघडा होता असा शेवटपर्यंत आग्रह ठेवला. पण

त्याला इतके प्रश्न विचारण्यात आले की, ते सगळे मला आठवत नाहीत.

शेवटी बचावाच्या वकिलाने त्याची उलट तपासणी घ्यायला सुरुवात केली, आणि पहिला प्रश्न त्याने विचारला तो फ्योदर पावलोविचने ज्या पाकिटात तीन हजार रूबल 'कोणा एका व्यक्तीकरिता' ठेवले होते म्हणतात त्यासंबंधाने "तू जो तुझ्या धन्याच्या इतक्या निकट सेवेत असणारा, त्या तू ते पाकीट कधी पाहिलं आहेस का?" ग्रिगरीने आपण ते पाहिले नव्हते अन् 'ज्याच्या त्याच्या तोंडी ती पैशाची गोष्ट होईपर्यंत' त्या पैशाविषयी कधी ऐकलेही नव्हते असे सांगितले. हा त्या पाकिटाबद्दलचा प्रश्न फेत्युकोविचने ज्या कोणाला त्याची माहिती असण्याचा संभव आहे असे वाटले त्या प्रत्येकाला तितक्याच आग्रहीपणाने पुनः पुन्हा विचारला. जितक्या आग्रहीपणाने सरकारी वकिलाने दमीत्रिच्या वारशासंबंधाने आपला प्रश्न विचारला, आणि सर्वांकडून त्याला तेच उत्तर मिळाले की जरी अनेकांनी त्याबद्दल ऐकलेले होते तरी कुणीही ते पाकीट पाहिलेले नव्हते. अगदी सुरुवातीपासून प्रत्येकाला फेत्युकोविचचा या विषयासंबंधीचा आग्रह दिसून आला.

"आता, तुझ्या परवानगीनं मी तुला एक प्रश्न विचारतो," फेत्युकोविच एकाएकी अन् अनपेक्षितपणे म्हणाला, "प्राथमिक चौकशीवरून जे तेल किंवा काढा म्हणा तू त्या संध्याकाळी आपल्या कमरेला चोळून ती बरी करण्याकरिता म्हणून वापरलंस ते कशाचं केलेलं होतं?"

ग्रिगरी प्रश्न करणाऱ्याकडे गोंधळलेल्या नजरेने पाहत राहिला, अन् थोडा वेळ स्तब्ध राहून तो पुटपुटला, "त्यात केशर होतं."

"केशराशिवाय दुसरं काही नव्हतं? दुसरं काही द्रव्य असल्याचं तुला आठवत नाही?"

"त्यात मिल्फऑइलही होतं."

"अन् कदाचित् मिरीसुद्धा?"

"होय, मिरी पण होती."

"वगैरे वगैरे. अन् सगळी द्रव्यं व्होडकात विरघळविलेली ना?"

"मद्यार्कात."

कोर्टात हास्याचा एक मंद स्वर उमटला.

"बरं, मद्यार्कात. आपल्या पाठीला चोळल्यानंतर मला वाटतं त्या बाटलीत जे काय उरलं होतं ते तू काही धार्मिक प्रार्थना– जी तुझ्या बायकोलाच फक्त माहीत आहे ती– म्हणून प्यालास, होय ना?"

"होय."

"खूप प्यालास का? साधारण अंदाजानं दारूचे एक दोन प्याले?"

"टमलर भरून असेल कदाचित."

"टमलर भरूनही म्हणा. कदाचित दीड एक टमलर?"

ग्रिगरीने उत्तर दिले नाही. त्याला उद्देश समजला असावा.

" दीड एक पेलाभर चांगलं मद्य मुळीच वाईट नाही, नाही का ? त्यानं स्वर्गाची दारं खुली झालेली दिसू शकतात, मग बागेकडचा दरवाजाच काय ? "

ग्रिगरी गप्प राहिला. कोर्टात पुन्हा हास्य पसरलं. मुख्य न्यायाधीशांनी खूण केली.

" तुला नक्की माहीत आहे का, " फेत्युकोविच विचारीत राहिला, " की तू जेव्हा तो उघडा दरवाजा बघितलास तेव्हा तू जागा होतास की नव्हतास ते ? "

" मी चांगला चालत होतो. "

" हे काही तू जागा असण्याचं प्रमाण नव्हे. " (कोर्टात पुनः हशा.) तुला जर त्या क्षणी कुणी प्रश्न विचारला असता – उदाहरणार्थ, कोणतं साल चालू आहे म्हणून, तर तुला उत्तर देता आलं असतं ? "

" मला माहीत नाही. "

" अन् हे आपल्या प्रभूचं कोणतं साल आहे, माहीत आहे तुला ? "

ग्रिगरी गोंधळलेला चेहेरा करून, आपल्याला छळणाऱ्याकडे सरळ पाहत राहिला. आश्चर्याची गोष्ट, ते साल कोणते होते हे त्याला माहीत नव्हते.

" पण तुझ्या हातांना किती बोटं आहेत हे कदाचित् तू सांगू शकशील ? "

" मी एक चाकर आहे, " ग्रिगरी एकदम मोठ्या अन् स्पष्ट आवाजात म्हणाला. " माझ्यापेक्षा चांगल्या स्थितीत असणारे जर माझी थट्टा उडवणं बरं मानीत असतील तर ते सहन करणं मला प्राप्त आहे. "

फेत्युकोविच काहीसा चकित झाला, आणि मुख्य न्यायाधीशांनी मध्ये पडून त्याला, अधिक सुसंबद्ध प्रश्न विचारणं योग्य होईल, अशी ताकीद दिली. फेत्युकोविच गौरवपूर्ण रीतीनं वाकला अन् आपल्याला या साक्षीदाराला आणखी प्रश्न विचारायचे नाहीत म्हणाला. लोकांच्या अन् ज्यूरीच्या मनात अर्थात् ज्या मनुष्याने औषधोपचार करून घेत असताना, ' स्वर्गाची दारं ' पाहिली असतील अन् ज्याला चालू वर्ष काय आहे ते माहीत नाही अशा मनुष्याच्या पुराव्याविषयी थोडासा संशयाचा भाग उत्पन्न झालाच. पण ग्रिगरीने साक्षीदाराचा पिंजरा सोडण्यापूर्वी, दुसरी एक घटना घडली. मुख्य न्यायाधीशांनी कैद्याकडे वळून सदर साक्षीदाराच्या साक्षीबद्दल तुला काही म्हणायचे आहे का असे विचारले.

मीत्या मोठ्या आवाजात म्हणाला, " एक दरवाज्याची बाब सोडून त्याने जे सांगितले ते सर्व खरं आहे. माझ्या डोक्यातून उवा विंचरून तो काढीत असे, याबद्दल मी त्याचा उपकृत आहे; मी ठोसे लगावले त्यांची त्यानं क्षमा केली त्याबद्दल मी त्याचा आभारी आहे. हा वृद्ध माणूस जन्मभर इमानदार राहिला अन् माझ्या वडिलांशी तो सातशे कुलंगी कुत्र्यांइतका निष्ठावान् राहिला. "

" मी कुलंगी कुत्रं नाही, " ग्रिगरी बोलला.

" बरं बरं. मीच कुलुंगी कुत्रं आहे," मीत्या म्हणाला. " तो शब्द जर अपमानकारक असेल तर तो मी परत घेतो अन् त्याची क्षमा मागतो. मी पशू होतो अन् त्याच्याशी क्रूरपणानं वागलो. मी इसॉपशीसुद्धा निर्दयपणानं वागलो."

" कोण इसॉप ? " मुख्य न्यायाधीशांनी पुन्हा कडक होऊन विचारलं.

" हं; पीरो....माझे वडील फ्योदर पावलोविच."

मुख्य न्यायाधीशांनी मीत्याला आपली भाषा काळजीपूर्वक वापरण्याबद्दल पुनः पुन्हा जोरदार शब्दात अन् अतिशय कडकपणे ताकीद दिली.

" तुझा निर्णय करण्याला बसलेल्यांचं मत तू या रीतीनं खराब करतो आहेस." ते म्हणाले.

बचावाच्या वकिलाने राकितीनच्या साक्षीचासुद्धा अशाच चातुर्याने समाचार घेतला. मला सांगितले पाहिजे की राकितीन हा एक प्रमुख साक्षीदार होता आणि सरकारी वकिलाने तो फार मोठ्या महत्त्वाचा मानलेला होता. त्याला सर्व काही माहीत आहे असे दिसले; त्याचे ज्ञान चकित करण्याजोगे होते, तो सर्वत्र गेला होता, सर्व त्याने पाहिले होते, प्रत्येकाशी तो बोलला होता, फ्योदर पावलोविचच्या अन् सर्व कारमाझफांच्या चरित्रांच्या प्रत्येक तपशिलाची त्याला माहिती होती. त्या पाकिटासंबंधाने, त्याने मीत्याकडूनच फक्त ऐकले होते हे खरे. पण त्याने मीत्याचे ' मेत्रोपोलिस ' खानावळीतले पराक्रम, त्याची निंदास्पद कृत्ये अन् बचने बारकाईने वर्णन करून सांगितली; आणि कॅप्टन स्नेगिर्योवच्या ' झाडूच्या कुंचा ' विषयीची हकीकत सांगितली. पण राकितीनलासुद्धा मीत्याच्या वारशासंबंधी निश्चित काही सांगता आले नाही, आणि फक्त तुच्छतापूर्ण सामान्य गोष्टीच तो उगाळीत राहिला.

" त्यांच्यापैकी कुणाला दोष द्यावा अन् कोण कुणाचा ऋणकरी हे, या चक्रम कारमाझफांच्या सर्व गोष्टींचा विचका करण्याच्या रीतीमुळं कोण सांगू शकणार, कोणालाही त्यातून निश्चित काही कळणार नाही." हा जो भयानक गुन्हा घडला त्याचे कारण त्याने युगानुयुगे हाडीमांशी मुरलेली भूदासांची प्रथा अन् सुयोग्य अशा संस्थांचा अभाव असल्यामुळे झालेली रशियाची दुरवस्था हे असल्याचे सांगितले. त्याला खरे म्हणजे बोलण्याचे काहीसे स्वातंत्र्य देण्यात आले. आपण काय करू शकू हे दाखविणारा राकितीनचा हा पहिलाच प्रसंग होता अन् त्याने लोकांचे लक्ष वेधून घेतले. हा साक्षीदार या केसवर एक लेख मासिकात प्रसिद्ध करण्याकरिता तयार करीत आहे हे सरकारी वकिलाला माहीत होते, आणि नंतरच्या भाषणात त्याने त्या लेखातले काही विचार उद्धृत केले, ते कोणते ते मागाहून आपण पाहू, पण त्यावरून त्याने तो लेख पूर्वीच पाहिला होता असे दिसून आले. साक्षीदाराने रेखाटलेले चित्र निराशापूर्ण अन् भयानक होते, अन् त्याने सरकारी वकिलाची बाजू बरीच बळकट केली. एकंदरीने, राकितीनच्या भाषणातील स्वतंत्र

विचारसरणी अन् विचारांची असामान्य उदात्तता यांनी लोक मंत्रमुग्ध होऊन गेले. तो ज्यावेळी भूदास प्रश्न अन् रशियाची दुरवस्था याबद्दल बोलला त्या वेळी तर दोन तीन वेळा टाळ्याही पडल्या.

पण राकितीनने आपल्या तारुण्यसहज आवेशात एक लहानशी चूक केली, तिचा बचावाच्या वकिलाने लगेच चलाखीने फायदा घेतला. ग्रूशिंकासंबंधीच्या काही प्रश्नांना उत्तर देताना, आणि स्वतःच्या भावनांच्या उच्चतेने अन् यशाने– त्या यशाची त्याला अर्थात जाणीव होती–वाहून जाऊन तो येथपर्यंत गेला की आग्राफेना अलेक्झांद्रोवनाबद्दल ती "सामसोनोवची रखेली" आहे असे काहीशा तुच्छतेने तो बोलला. आपले शब्द मागे घेण्याकरिता मागाहून त्याने काय वाटेल ते दिले असते, कारण फेत्युकोविचने एकदम त्याला त्यात पकडले. आणि हे घडलं याचे कारण म्हणजे राकितीनला तो वकील एवढ्या थोडक्या वेळात प्रत्येक बारीक बारीक गोष्टीशी इतका निकटचा परिचय करून घेऊ शकला होता याची कल्पना आली नव्हती.

बचावाच्या वकिलाने अत्यंत मनमिळाऊ, नव्हे आदरपूर्ण स्मित करून विचारायला सुरुवात केली, "मी आपल्याला नम्रपणे विचारू इच्छितो की, 'ख्रिस्तवासी महंत बाबा झसीमफ यांचे चरित्र' ही पुस्तिका जी धर्मसंस्थेच्या अधिकाऱ्यांनी प्रसिद्ध केली, अन् ज्या पुस्तिकेत अत्यंत सखोल अन् धार्मिक विचार-चिंतन भरपूर भरलेलं आहे अन् जिच्यात एक सुरेख अन् भक्तिभावपूर्ण अर्पणपत्रिका बिशप महाशयांना उद्देशून दिलेली आहे– नुकतीच ती मी वाचली अन् मला फार आनंद झाला– त्या पुस्तिकेचे लेखक राकितीन ते अर्थात् आपणच ना?"

"मी ती प्रसिद्धीकरिता लिहिली नव्हती...ती मागाहून प्रसिद्ध करण्यात आली," राकितीन तोंडातल्या तोंडात बोलला, कोणत्या का कारणाने होईना, भीतीने तो अस्वस्थ अन् लाजल्यासारखा झाला.

"असं? उत्कृष्ट! आपल्यासारखा विचारवंत प्रत्येक सामाजिक विषयाचं जास्तीत जास्त विशाल दृष्टीनं अवलोकन करू शकतो, त्यानं खरोखर केलं पाहिजे. बिशप महाशयांच्या कृपेनं आपल्या अत्यंत उद्बोधक पुस्तिकेचा फार व्यापक प्रमाणावर प्रसार झाला आहे, अन् तिचा उल्लेखनीय उपयोग झाला आहे...पण मुख्य गोष्ट मला आपल्याकडून समजून घ्यायची ती ही. आताच आपण सांगितलत की आपला मादाम स्व्येतलोवाचा अगदी निकटचा परिचय आहे." (ग्रूशिंकाचे आडनाव 'स्व्येतलोवा' होते हे इथे नमूद केले पाहिजे. ते मी त्या दिवशी पहिल्यांदाच ती केस चालू असताना ऐकले.)

"माझ्या सर्वच परिचितांकरिता मी जबाब देऊ शकेन असे नाही....मी एक तरुण मनुष्य आहे....अन् आपल्याला भेटणाऱ्या प्रत्येकाच्या बाबतीत कोण जबाबदार राहू शकेल?" हे बोलताना राकितिनचा चेहेरा लाल झाला.

"समजलो, मी पूर्णपणे समजलो," फेत्युकोविच म्हणाला, जणू तोसुद्धा गोंधळल्यासारखा झाला असावा अन् क्षमायाचनेची त्याला घाई झाली असावी. "एखादी तरुण अन् सुंदर स्त्री आजूबाजूच्या भागातील निवडक तरुणांचं तत्परतेनं आगतस्वागत करायला तयार असेल तर तिच्याशी ओळख करून घेण्याकरिता इतर कोणाहीप्रमाणं, आपणालाही आनंद वाटेल हे योग्यच आहे, पण....मला फक्त एवढंच जाणून घ्यायचं होतं....मला असं कळलं आहे की, मादाम स्व्येत्लोवा ही छोटा कारमाझफ, अलेक्सी फ्योदरोविच याच्याशी ओळख करून घेण्याकरिता दोन महिन्यांपूर्वी विशेषकरून उत्सुक होती आणि आपण जर त्याला त्याच्या संन्याशाच्या पोषाखात तिच्याकडं नेलंत तर आपल्याला पंचवीस रुबल देण्याचं तिनं वचन दिलं होतं. आणि ही गोष्ट, ज्या दिवशी हा भयानक गुन्हा, जो चालू तपासणीचा विषय बनलेला आहे तो करण्यात आला, त्या दिवशी सायंकाळी प्रत्यक्षात घडली. आपण अलेक्झी कारमाझफला मादाम स्व्येत्लोवाकडं नेलंत, अन् तिच्याकडून आपल्याला पंचवीस रुबल बक्षिस म्हणून मिळाले का? ते मला आपल्याकडून ऐकायचं होतं."

"ती एक थट्टा-मस्करी होती....ते कळल्यानं तुम्हाला काय मिळणार आहे ते मला समजत नाही...मी ते गंमत म्हणून घेतले...मागाहून ते मी परतच करणार होतो...."

"म्हणजे आपण ते घेतलेत....पण ते अजून आपण परत केलेले नाहीत.... की केले?"

"त्याला काही महत्त्व नाही," राकितीन तोंडातल्या तोंडात म्हणाला, "असल्या प्रश्नांची उत्तरं मी देऊ इच्छीत नाही....अर्थात्च ते मी परत देणार आहे."

मुख्य न्यायाधीश मध्ये दडले, पण फेत्युकोविचने आपल्याला या साक्षीदाराला अधिक प्रश्न विचारायचे नाहीत असे जाहीर केले. राकितीनने साक्षीदाराचा पिंजरा सोडला तेव्हा त्याच्या चारित्र्याला काहीच बट्टा लागला नाही असे झाले नाही. त्याच्या भाषणातील उच्च आदर्शवादाचा जो प्रभाव पडला होता तो काहीसा कमी झाला, आणि तो जात असताना त्याच्याकडे ज्या मुद्रेने फेत्युकोविचने पाहिले त्यावरून, "आरोपीवर आरोप करणाऱ्या उदात्त मनाच्या लोकांचा हा पाहा नमुना" असे जणू लोकांना सूचित झाले. मला आठवते की हा प्रसंगसुद्धा मीत्याच्या तोंडून फटकन् उद्गार निघाल्याखेरीज सुना गेला नाही. राकितीनने ज्या स्वरात ग्रूशिंकाचा उल्लेख केला त्याने संतापून तो एकदम "बर्नार्ड!" (बेरड) म्हणून ओरडला. राकितीनची उलट तपासणी झाल्यानंतर जेव्हा मुख्य न्यायाधीशांनी आरोपीला तुला काही सांगायचे आहे काय, असे विचारले तेव्हा मीत्या मोठ्याने म्हणाला,

"मला अटक झाल्यापासून त्यानं माझ्याकडून पैसे उसने घेतले आहेत! तो

अंगावर थुंकण्यालायक बर्नार्ड आहे अन् संधिसाधू आहे आणि त्याचा ईश्वरावर विश्वास नाही; त्यानं बिशपना फसवलंय !"

अर्थात मीत्त्याची त्याच्या भाषेच्या अमर्यादेबद्दल पुन्हा कानउघडणी करण्यात आली पण राकितीनचे तीनतेरा झाले होते. कॅप्टन स्नेगिर्योवची साक्षसुद्धा अशीच फुसकी ठरली, पण ती एका अगदी निराळ्या कारणाने. तो कोर्टात आला तो चिंध्या झालेले अन् घाणेरडे कपडे, चिखलानं भरलेले बूट अशा थाटात आणि पोलिस अधिकाऱ्यांची सावधानता अन् हुषार देखरेख असताना सुद्धा तो बेफामपणे पिऊन धुंद झालेला निघाला. मीत्याने त्याच्यावर केलेल्या हल्ल्याबद्दल त्याला विचारता त्याने उत्तर देण्याचे नाकारले.

"ईश्वर त्याचं भलं करो. इल्यूशानं मला बोलू नका म्हणून सांगितलंय. ईश्वर माझी परलोकात गेल्यावर भरपाई करील."

"कोणी तुम्हाला सांगू नको म्हणून सांगितलं ? कोणाबद्दल तुम्ही बोलत आहात ?"

"इल्यूशा, माझा छोटा मुलगा. 'बाबा, बाबा, त्यानं किती तुमचा अपमान केला !' असं तो मला त्या फत्तरापाशी म्हणाला. आता तो मरणाच्या वाटेवर आहे..."

कॅप्टन एकदम हुंदके देऊ लागला, अन् मुख्य न्यायाधीशापुढे एकदम आपल्या गुडघ्यांवर कोसळला. लोकांत हशा पिकला असतानाच त्याला घाईघाईने तिथून नेण्यात आले. सरकारी वकिलाने जो प्रभाव पाडण्याची तयारी केली होती तो मुळीच जमून आला नाही.

फेत्युकोविच मिळालेल्या प्रत्येक संधीचा जास्तीत जास्त फायदा घेत चालला होता आणि या केसच्या सूक्ष्म ज्ञानाने तो लोकांना अधिकाधिक चकित करीत होता. उदाहरणार्थ, त्रिफोन बोरिस्सोविचने मोठी छाप पाडली, अर्थातच ती मीत्याला अपायकारक होती. त्याने जवळजवळ आपल्या बोटांवर हिशेब करून सांगितले की, मोक्रोयला मीत्याने पहिली भेट दिली, तेव्हा त्याने तीन हजार रुबल, "किंवा त्याहून, थोडेफार कमी खर्च केले असले पाहिजेत. त्या नुसत्या जिप्सी मुलींच्यावरच त्याने किती उधळले पाहा ना ! अन् आमच्या उवांनी भरलेल्या शेतकऱ्यांच्याबद्दल बोलायचं तर, रस्त्यात एखादा अर्धा रुबल फेकावा तशी ती गोष्ट नव्हती, त्यानं प्रत्येकाला किमान पंचवीस रुबल तरी इनाम दिलं असेल; त्याहून कमी त्यानं दिलं नाही. अन् किती पैसा त्याचा नुसता चोरून घेतला गेला ! अन् जर कोणी चोरी केली, तर तो काय मागं पावती ठेवून जाणार आहे ? हा जर एकसारखा आपला पैसा भिरकावीत होता तर चोराला पकडणं कसं शक्य आहे ? आमचे शेतकरी चोर आहेत, समजलं; त्यांना आपल्या अंतरात्म्याची फिकीर नाही. अन् त्याचं त्या मुलींशी, आमच्या खेड्यातल्या मुलींशी काय ते वागणं ! त्या वेळेपासून त्या

अगदी चढून गेल्या आहेत, पूर्वी त्या किती गरीब असायच्या म्हणता!'' त्याने खर्चाची प्रत्येक बाब आठवण करकरून काढली अन् त्या सर्वांची शेवटी बेरीज केली. तेव्हा फक्त पंधराशेच खर्च केले आणि बाकीचे एका लहानशा पिशवीत बाजूला ठेवले हा बसविलेला सिद्धान्त अग्राह्यच दिसला.

"मी तीन हजार एखाद्या पेनीसारखे स्पष्ट त्याच्या हातात पाहिले, मी ते या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिले; मला वाटतं मला पैसा कसा मोजावा याचं ज्ञान आहे," त्रिफोन बोरिस्सोविच, 'आपल्या वरिष्ठांचं' समाधान करण्याची कोशीस करीत म्हणाला.

फेत्युकोविचला जेव्हा त्याची उलटतपासणी घेण्याची वेळ आली, तेव्हा त्याने त्याच्या पुराव्याचे खंडन करण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही, तर अटक होण्यापूर्वी एक महिना मोक्रोय इथे मद्यपानाची जी पहिली मैफल झाली, त्यावेळच्या एका प्रसंगा-संबंधाने त्याला विचारायला सुरुवात केली. त्या वेळी तिमोफी अन् दुसरा एक आकीम नावाचा शेतकरी यांनी मधल्या वाटेत शंभर रुबल मीत्याच्या हातून तो प्यालेला असता पडलेले जमिनीवरून उचलले होते आणि ते त्रिफोन बोरिस्सोविचला आणून दिले होते, आणि त्याच्याकडून त्यांना त्याबद्दल एक एक रुबल मिळाला होता. "ठीक," त्या वकिलाने विचारले, "ते शंभर रुबल तुम्ही श्री. कारमाझफना परत दिलेत का?" त्रिफोन बोरिस्सोविच हाहूं करू लागला, पण व्यर्थ...त्या शेतकऱ्यांची तपासणी झाल्यानंतर, त्याला ते शंभर रुबल सापडल्याचे कबूल करावेच लागले, तो फक्त पुढे एवढेच म्हणाला की मी ते पाक दिलाने सगळे दमीत्रि फ्योदरो-विचला परत केले होते. "अगदी इमानानं, पण त्याचं अब्रूचं भान त्यावेळी दारूत बुडालेलं असल्यामुळंच त्याला ते आठवणार नाही." पण त्यानं ती शंभर रुबल मिळाल्याची घटना शेतकऱ्यांकडून सिद्ध होईपर्यंत नाकबूलच केली होती. त्यामुळं आपण तो पैसा मीत्याला परत केल्याची त्याची जबानी स्वाभाविकपणे अतिशय संशयास्पद मानली गेली. अशा रीतीनं फिर्यादी पक्षाने पुढे आणलेला एक फार मोठा धोक्याचा साक्षीदार पुन्हा अविश्वसनीय ठरला.

त्या पोलांच्या बाबतीत तसेच घडले. त्यांनी अभिमानाची अन् स्वतंत्रपणाची वृत्ती धरली; त्यांनी मोठमोठ्याने ओरडून सांगितले की आम्ही दोघे बादशहांच्या सेवेत होतो, आणि "पॅन मीत्यानं आमची अब्रू विकत घेण्याकरिता" तीन हजार आम्हाला देऊ केले होते, आणि आम्ही बरीच मोठी रक्कम त्याच्या हातात बघितली होती. पॅन मुस्स्यालोविचने आपल्या वाक्यातून पोलिश शब्द फार मोठ्या संख्येने कोंबले होते, आणि त्यामुळे मुख्य न्यायाधीश व सरकारी वकील यांच्या लेखी आपली किंमत बरीच वाढली आहे असे पाहून, ते अधिकाधिक शेखीखोर बनले अन् शेवटी तर ते चक्क पोलिशमध्येच बोलू लागले. पण फेत्युकोविचने त्यांनासुद्धा आपल्या जाळ्यात पकडले. त्रिफोन बोरिस्सोविचला पुन्हा बोलावण्यात आले आणि

त्याने टाळाटाळी केली तरी त्याला पॅन व्रुब्लेवस्कीने आपण दिलेल्या पत्त्यांच्या जोडाच्या जागी दुसरा जोड बदलला होता, अन् पॅन मुस्स्यालोविचने खेळात फसवा-फसवी केली हे कबूल करणे भागच पडले. काल्गानफने याला पुष्टी दिली, अन् दोघाही पोलांनी साक्षीदाराचा पिंजरा सोडला तेव्हा त्यांची प्रतिष्ठा खतम झाला होती. लोक त्यांना खदखदून हसले.

नंतर तशीच बरोबर गोष्ट जवळजवळ सगळ्याच साक्षीदारांच्या बाबतीत घडली. फेत्युकोविचने त्या सर्वांना बट्टा लावण्यात, अन् काहींशी विटंबना करून त्यांची विल्हेवाट लावण्यात यश मिळविले. वकीलमंडळी अन् कायदेतज्ज्ञ वाहवा करण्यात दंग होऊन गेले, पण यातून कार्य काय सिद्ध होणार हे त्यांना समजेना, कारण, मागे सांगितले तेच मी पुन्हा सांगतो, त्या सर्वांना वाटले की फिर्यादी पक्षाची बाजू काही झाले तरी बाजूला सारता येणार नाही, उलट ती शोकास्पद तऱ्हेने अधिकाधिक गळ्याशी येत आहे. पण त्या 'महान् जादुगाराला' वाटत असलेल्या विश्वासावरून त्यांना दिसून आले की तो अगदी स्थिर आहे, म्हणून ते, 'असा मनुष्य' पीटर्सबर्गहून आलाय तो उगाच आलेला नाही, तो अपयश घेऊन परत जाणारा माणूस नाही असे मनात आणून, प्रतीक्षा करीत राहिले.

३

वैद्यकीय तज्ज्ञ आणि एक पौंड बदाम

वैद्यकीय तज्ज्ञांच्या साक्षीसुद्धा आरोपीच्या उपयोगाच्या झाल्या नाहीत. अन् मागाहून असे दिसून आले की फेत्युकोविच त्यांवर फारसा विसंबून नव्हता. बचावाची ही वैद्यकीय आघाडी कतिरिना इवानोवनाच्या आग्रहावरूनच स्वीकारण्यात आली होती. तिने हेतुपुरस्सर मॉस्कोहून एक प्रसिद्ध डॉक्टर त्याकरिता आणविला होता. बचावाच्या बाजूचे त्याने अर्थात् काहीच नुकसान होण्याजोगे नव्हते, अन् दैवयोगाने झाला तर काही फायदाच होणार होता. तथापि डॉक्टरा-डॉक्टरांत मतभेद उत्पन्न झाल्यामुळे त्यात एक प्रकारचा विनोद आला होता. हे वैद्यकीय तज्ज्ञ म्हणजे मॉस्कोहून आलेला प्रसिद्ध डॉक्टर, आमचे डॉक्टर हर्झेनस्तुब अन् तरुण डॉक्टर वार्विन्स्की होत. हे पुढचे दोघे फिर्यादी पक्षाचे साक्षीदार म्हणूनसुद्धा उभे राहिले होते.

तज्ज्ञ म्हणून पहिल्या प्रथम डॉक्टर हर्झेनस्तुब यांना बोलावण्यात आले. हा एक केस पिकत चाललेला अन् टक्कल पडलेला सत्तर वर्षांचा, मध्यम उंचीचा अन् मजबूत बांध्याचा वृद्ध गृहस्थ होता. त्यांच्याविषयी शहरातल्या प्रत्येकाला खूप प्रेम अन् आदर वाटत होता. ते एक सच्च्या दानतीचे आणि उत्तम आचाराचे धर्मनिष्ठ गृहस्थ होते. पूर्वीच्या सॅक्सन मधील हेर्नहटर किंवा मोरेवियन समाजापैकी ते होते,

कोणत्या ते मला नक्की माहीत नाही. ते आमच्या शहरात पुष्कळ वर्षे झाली राहत होते अन् अतिशय संभावितपणाची अशी त्यांची वागणूक होती. दयाळू अंतःकरणाचे अन् माणुसकी असलेले ते गृहस्थ होते. ते गोरगरिबांना अन् शेतकऱ्यांना मोफत औषधोपचार करीत, त्यांच्या झोपडपट्टीत अन् पत्र्यांच्या घरात जात, अन् औषधाकरता पैसे ठेवून येत. पण स्वभावाने ते अडेलतट्टूसारखे हट्टी होते. एकदा का त्यांनी आपल्या डोक्यात एखादी कल्पना घेतली की मग ती तिथून हलणे अशक्य. जाता जाता एक गोष्ट सांगायची म्हणजे, मॉस्कोहून आलेल्या त्या सुप्रसिद्ध डॉक्टराने आमच्या इथे आल्यावर दोन-तीन दिवसांतच डॉक्टर हर्झेनस्तुबच्या लायकीविषयी अत्यंत अनुदार असे उद्‌गार काढलेले शहरातल्या प्रत्येकाला माहीत झाले होते. जरी मॉस्कोचा हा डॉक्टर एका भेटीला पंचवीस रुबल घेत असे, तरी शहरातले अनेक लोक त्याच्या येण्याचा लाभ घ्यायला उत्सुक होते आणि खर्चाची तमा न बाळगता त्याचा सल्ला घ्यायला धावत होते. हे सगळे अर्थात् पूर्वी डॉक्टर हर्झेनस्तुबचेच पेशंट होते, आणि या नामवंत डॉक्टराने त्यांच्या उपचारांवर कडाडून टीका केली होती. शेवटी शेवटी ते आजाऱ्यांना पाहताच विचारीत, "हं कोण तुम्हांला काढे पाजतोय? हर्झेनस्तुब ना? हॅ-हॅ!" डॉक्टर हर्झेनस्तुब यांच्या कानी अर्थात् हे सारं जातच होतं, आणि आता हे तिन्ही डॉक्टर, एकामागून एक तपासले जायचे होते.

डॉक्टर हर्झेनस्तुबनी परखडपणे सांगितले की आरोपीच्या मानसिक प्रकृतीत झालेली विकृती अगदी उघड आहे. आपल्या या मताबद्दलची कारणे देऊन (ती मी इथे गाळली आहेत) त्यांनी सांगितले की ही विकृती आरोपीच्या मागल्या अनेक कृतींत उघडपणे दिसून येत होती असे नव्हे, तर आता या क्षणीसुद्धा ती त्याच्यात स्पष्ट दिसून येते. ती कशी स्पष्ट दिसून येते याविषयी त्यांना खुलासा विचारता, त्या वृद्ध डॉक्टरांनी साध्या-भोळ्या सरळपणाने दाखवून दिले की आरोपी जेव्हा न्यायालयात आला तेव्हा त्याचा 'अविर्भाव सामान्याहून अगदी वेगळा, अशा परिस्थितीत विलक्षण वाटण्यासारखा' होता; तो "एखाद्या सैनिकासारखा पाय टाकीत, दृष्टी नाकासमोर ठेवून आला, वास्तविक त्यानं आपल्या डाव्या बाजूला जिथं लोकसमुदायात महिला बसल्या आहेत तिकडं पाहणं त्याच्या दृष्टीनं स्वाभाविक झालं असतं, कारण तो स्त्रीजातीवर फार प्रेम करणारा आहे आणि आता आपल्यासंबंधी स्त्रिया काय म्हणत असतील याचा तो अधिक विचार करीत असला पाहिजे," त्या वृद्ध गृहस्थाने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेत असा शेवट केला.

मला हे सांगितले पाहिजे की, ते रशियन भाषा सहज बोलत होते, पण प्रत्येक शब्दप्रयोग जर्मन पद्धतीने बनवून बोलत होते, तथापि, त्याचा त्यांना तसा त्रास होत नव्हता, कारण आपण रशियन उत्कृष्ट बोलतो, रशियनांपेक्षासुद्धा उत्तम बोलतो अशी

त्यांची स्वतःची समजूत. ही त्यांची नेहमीची खोड होती. आणि त्यांना रशियन म्हणी वापरण्याचा भारी छंद होता. ते नेहमी म्हणत की रशियन म्हणी ह्या सगळ्या जगात सर्वोत्कृष्ट अन् अत्यंत अर्थवाहक वचने आहेत. हेही मी जाता जाता बोलून ठेवतो की संभाषणात विसराळूपणाने ते बहुधा अत्यंत नित्याचे शब्द विसरत, त्यांना ते उत्तम रीतीने माहीत असले तरी ते कित्येकवेळा त्यांच्या डोक्यातूनच जात. अशी गोष्ट ते जरी जर्मन बोलत असले तरी होई, आणि अशा वेळी ते आपला हात आपल्या चेहऱ्यापुढं नाचवीत, जणू ते हरवलेला शब्द धरून ठेवण्याचा प्रयत्न करीत असावेत, आणि तो चुकलेला शब्द त्यांना सापडेपर्यंत कोणीही त्यांना 'पुढे चालू द्या' म्हणून सांगू शकत नसे. आरोपीने प्रवेश करताच स्त्रियांच्याकडे पाहायला हवे होते या त्यांच्या उद्‌गारांनी गंमत वाटून श्रोतृवर्गात कुजबुज सुरू झाली. आमच्या सर्व महिलांना आमच्या वृद्ध डॉक्टरांचा फार लळा; त्याही जाणत होत्या की सारे आयुष्य ब्रह्मचारी राहिल्यामुळे अन् ते आदर्श वर्तनाचे धार्मिक वृत्तीचे गृहस्थ असल्यामुळे, त्यांची स्त्रियांकडे पाहण्याची दृष्टी उदात्त होती. त्यामुळे त्यांचे हे अनपेक्षित उद्‌गार सर्वांनाच अत्यंत चमत्कारिक वाटले.

मॉस्को डॉक्टरांची पाळी आली तेव्हा त्यांना प्रश्न विचारला असता त्यांनी निश्चितपणे अन् साफ साफ पुनः सांगितले की, आपण आरोपीची मानसिक स्थिती पराकाष्ठेची लोकविलक्षण मानतो. ते 'मनोविकृती' आणि 'वेडेपणा' यासंबंधी खूप सविस्तर अन् विद्वत्तापूर्ण बोलले, आणि त्यांनी मुद्दा मांडला की जमलेल्या सर्व माहितीवरून, आरोपी हा त्याच्या अटकेपूर्वी कित्येक दिवस मनोविकृतीच्या अवस्थेत होता यात संशय नाही, आणि जर हा गुन्हा त्याच्याकडून झालेला असेल तर जरी त्याला त्याची जाणीव असावी तरीसुद्धा, तो अजाणता झालेल्यासारखा झाला असला पाहिजे, कारण ज्या रोगट आवेगाने त्याला पछाडले होते त्यावर नियंत्रण ठेवण्याची त्याच्यात कुवतच नव्हती.

परंतु आत्ताची तात्कालिक मनोविकृती सोडली तरी, त्याच्यात वेडाची लहर असल्याचे डॉक्टरांनी निदान केले. या लहरीचे, त्यांच्या शब्दांत सांगायचे तर, पुढे पूर्ण वेडात रूपांतर होण्याची लक्षणे आहेत. (हे मी माझ्या शब्दांत सांगत आहे हे लक्षात घेतले पाहिजे, डॉक्टरांनी फार विद्वत्तापूर्ण अन् व्यावसायिक भाषा वापरली होती.) " त्याच्या सर्व कृती या सामान्य अक्कल अन् तर्क यांच्या विरुद्ध आहेत, " असे ते म्हणाले. " मी जे पाहिलेलं नाही, म्हणजे खुद्द तो गुन्हा अन् तो सारा अनर्थ, त्याचा उल्लेख मी करीत नाही, पण परवाच्या दिवशी, तो माझ्याशी बोलत असताना त्याच्या डोळ्यांत एक न सांगता येण्यासारखी रोखलेली नजर होती. हसायचं काही कारण नसताना तो अनपेक्षितपणे हसे. त्याच्यात एकसारखा अन् स्पष्ट करता न येण्याजोगा चिडखोरपणा दिसून येत होता, तो 'बर्नार्ड!' 'नीतिशास्त्र!' आणि असेच अप्रस्तुत असलेले इतर विचित्र शब्द वापरत होता." परंतु

या डॉक्टरांना सर्वात मुख्य वेडगळपणा या गोष्टीत आढळला की आरोपीला ज्या तीन हजार रुबलना आपण फसवले गेलो असे वाटते त्या संबंधी बोलताना भयंकर चीड येऊन बोलण्याखेरीज बोलतासुद्धा येत नव्हते, इतर आपत्तीसंबंधाने अन् गाऱ्हाण्यांसंबंधाने मात्र तो त्या मानानें सहजपणाने बोलू शकत होता. जी सर्व माहिती मिळाली त्यावरून, पूर्वीसुद्धा, जेव्हा जेव्हा हा तीन हजार रुबलचा विषय निघे तेव्हा तेव्हा तो पूर्ण भडकून जात असे, आणि तरी तो तसा अनासक्त अन् निर्लोभी असल्याचे सांगण्यात आले.

शेवटी तो मॉस्कोचा डॉक्टर औपरोधिकपणे म्हणाला, "माझ्या विद्वान् समव्यावसायिकाच्या, आरोपीनं न्यायालयात प्रवेश करताच आपल्या नाकासमोर सरळ न पाहता स्त्रियांच्याकडं स्वाभाविकपणे पाहायला हवं होतं, या मतासंबंधी बोलायचं तर, मी फक्त एवढंच म्हणेन की या कथनातला खेळकरपणा आपण सोडून दिला तरी ते मुळातच अशास्त्रीय आहे. कारण आरोपी ज्या न्यायालयात आपल्या नशिबाचा निकाल लागणार तेथे प्रवेश केल्यानंतर स्वाभाविकरीत्या असा रोखल्या नजरेनं आपल्या नाकासमोर पाहणार नाही, आणि ते खरोखर त्याची अस्वाभाविक मानसिक स्थिती असल्याचं द्योतक आहे, या मताशी जरी मी संपूर्णपणे सहमत असलो तरी, त्याचबरोबर माझं असंही मत आहे की तो स्वाभाविकपणे डाव्या बाजूला स्त्रियांच्याकडं पाहणार नाही, तर, उलट, उजवीकडं, ज्याच्या मदतीवर त्याच्या सर्व आशा विसावल्या आहेत आणि ज्याच्या बचावावर त्याचं भवितव्य अवलंबून आहे त्या आपल्या कायदेशीर सल्लागाराकडं तो पाहील." डॉक्टरांनी आपले मत निश्चितपणे अन् साफ साफ सांगितले.

परंतु डॉक्टर वार्विन्स्कीच्या अनपेक्षित मतप्रदर्शनाने तज्ज्ञांमधील मतभेदाला एक शेवटची विनोदाची छटा मिळाली. डॉक्टर वार्विन्स्कीच्या मताने आरोपी हा आता, आणि पूर्वीपासून आजतागायत पूर्णपणे नेहमीच्या स्वाभाविक स्थितीत आहे, आणि त्याला अटक होण्यापूर्वी जरी तो बावरलेल्या आणि पराकाष्ठेच्या उत्तेजित मानसिक अवस्थेत असला पाहिजे यात शंका नाही, तरी ते उघड उघड दिसून येणाऱ्या मत्सर, राग, एकसारखे मद्यपान वगैरे वगैरे अनेक कारणांमुळे घडणे शक्य आहे. पण या बावरलेल्या अवस्थेत आत्ताच ज्या मनोविकृतीचा उल्लेख केला गेला ती येणार नाही. आरोपीने न्यायालयात प्रवेश केल्यानंतर डावीकडे बघायला पाहिजे होते की उजवीकडे यासंबंधी सांगायचे झाले तर आरोपी न्यायालयात प्रवेश केल्यानंतर साहजिकच आपल्या नाकासमोरच बघणार, अन् तसेच त्याने बघितले, कारण ज्यांच्यावर त्याचे भवितव्य अवलंबून आहे ते न्यायाधीश तिथे बसलेले होते. तेव्हा आपल्यासमोर त्याने बघितले त्यावरूनच त्याची आताची मनाची स्थिती पूर्णपणे नेहमीची स्वाभाविक आहे हे दर्शविते. या तरुण डॉक्टराने आपली 'नेमस्त' साक्ष काहीशा आवेशाने दिली.

"शाब्बास; डॉक्टर!" मीत्या आपल्या जागेवरून ओरडला. "अगदी बरोबर!"

मीत्याला अर्थात गप बसविण्यात आले, पण त्या तरुण डॉक्टराच्या मताचा न्यायाधीशांच्या आणि लोकांच्या मनावर निर्णायक परिणाम झाला, आणि मागाहून दिसून आले त्यावरून, प्रत्येकजण त्याच्या मताशी सहमत झाला. पण डॉक्टर हर्झेनस्तुबना जेव्हा साक्षीदार म्हणून बोलावले तेव्हा ते अनपेक्षितपणे अगदी मीत्याच्या उपयोगी पडल्यासारखे झाले. शहरातले फार जुने नागरिक आणि कारमाझफ कुटुंबाला अनेक वर्षे ओळखणारे या नात्याने त्यांनी फिर्यादीच्या वकिलाला काही फार मोलाची माहिती पुरविली, आणि एकदम, काही आठवल्या-प्रमाणे ते म्हणाले :

"पण या गरीब तरुणाचं अगदी वेगळ्या प्रकारानं आयुष्य गेलं असतं, कारण लहानपणी आणि त्यानंतरसुद्धा त्याचं अंतःकरण फार चांगलं होतं हे मला माहीत आहे. पण ती रशियन म्हण आहे ना – 'माणसाला एक डोकं असलं तर चांगलंच, पण जर दुसरा बुद्धिमान मनुष्य त्याला भेटायला आला, तर ते त्याहूनही चांगलं होईल, कारण मग एकाऐवजी दोन डोकी होतील."

"एक डोकं चांगलं, पण दोन अधिक चांगली," सरकारी वकिलाने चट-कन् सुधारले. त्याला त्या वृद्धाची सावकाशीने अन् विचार करीत बोलण्याची सवय माहीत होती, आपल्याविषयी त्यामुळे लोकांचे काय मत होते आणि आपण किती वेळ लावतो याचे त्यांना भान राहात नसे, आपल्या अळणी, कंटाळवाण्या, जर्मन विनोदाला ते फार महत्त्व द्यायचे आणि त्याबद्दल त्यांना उल्हासयुक्त संतुष्टता वाटायची. त्या म्हाताऱ्याला थट्टाविनोद करण्याचा फार नाद होता.

"होय, असंच माझं म्हणणं आहे," ते आग्रहपूर्वक सांगू लागले. "एक डोकं असलं तर चांगलंच, पण दोन असली तर पुष्कळच चांगलं, पण त्याला शहाण-पणाचं दुसरं डोकंच मिळालं नाही, आणि त्याची अक्कल गेली. कुठं गेली? मी तो शब्द विसरलो." ते आपला हात डोळ्यांपुढं नाचवीत म्हणाले : हां, 'स्पत्सिअरेन'!

"चरायला?"

"हां, चरायला, तेच मला म्हणायचं आहे. त्याची अक्कल चरायला गेली अन् अशा एका खोल गर्तेत जाऊन पडली की तो बेभानच झाला. आणि तरी तो कृतज्ञबुद्धीचा आणि भावनाप्रधान मुलगा होता. हं:, मला तो चांगला आठवतो, एवढा एवढासा छोटा पोरगा, त्याच्या बापानं दुर्लक्ष करून त्याला मागच्या परसात सोडून दिलेला, त्या वेळी तो पायात बूट न घालता अनवाणी पळायचा, अन् त्याची छोटीशी विजार एका बटनावर लोंबत असायची."

करुणेचा अन् मायाळूपणाचा स्वर एकदम त्या वृद्ध माणसाच्या आवाजात

आला. फेत्युकोविच चक्क चपापलाच, जणू त्याला कशाचा तरी वास लागला आणि ते त्याने चटकन् पकडून धरले.

"होय, मी त्या वेळी तरुण होतो... मी असा.... हं, मी त्या वेळी चाळीस एक वर्षांचा होतो, अन् नुकताच इथं आलो होतो. अन् त्या वेळी मला इतकं त्या मुलाविषयी वाईट वाटायचं; मी मनाशी विचार करी की या मुलाला आपण एक पौंड....एक पौंड काय? एक पौंड ?...त्याला काय म्हणतात ते मी विसरलो. मुलांना जे फार आवडतं बघा, काय ते, काय बरं ते ?" डॉक्टर पुन्हा आपले हात तोंडापुढं नाचवू लागले. "ते झाडाला लागतं अन् गोळा करून सर्वांना देतात.

"सफरचंद ?"

"छेः छेः, सफरचंद डझनभर म्हणतात, पौंडावर मोजत नाहीत.... अं हं, पुष्कळ असतात हो ती, अन् सगळी एवढी एवढी. आपण ती तोंडात घालतो अन् कटकन् फोडतो."

"बदाम बी ?"

"बरोबर, बदाम बी," डॉक्टरांनी अत्यंत थंडपणे पुन्हा उच्चार केला, जणू शब्दाची वाण त्यांना पडलीच नव्हती. "आणि मी त्याला पौंडभर बदामबी विकत आणून दिले, कारण कुणीही पूर्वी कधी या मुलाला पौंडभर बदामबी विकत आणून दिलेले नव्हते. आणि मी माझं बोट वर केलं अन् त्याला म्हटलंः "मुला म्हण गॉट डेर फाटर (ईश्वर तुझा पिता) तो हसला अन् म्हणालाः 'गॉट डेर फाटर'... 'गॉट डेर झोन् (ईश्वर तुझा पुत्र) तो पुनः हसला अन् बोबडं बोलला, 'गॉट डेर झोन' 'गॉट डेर हाईलिगअ गाईस्ट.'

मग तो हसला अन् जितकं म्हणता येईल तितक्या उत्तम म्हणाला : 'गॉट डेर हाईलिगअ गाईस्ट ! मी निघून गेलो आणि नंतरदोन दिवसांनी मी तिकडून चाललो असताना हा आपण होऊन मला पाहून ओरडला, 'अंकल गॉट डेर फाटर, गॉट डेर झोन,' तो फक्त 'गॉट डेर हाईलिगअ गाईस्ट' तेवढं विसरला. पण मी त्याला त्याची आठवण करून दिली अन् मला पुनः त्याच्याबद्दल वाईट वाटलं. पण त्याला इथून घेऊन गेले, आणि मी पुन्हा काही त्याला पाहिलं नाही. तेवीस वर्षे होऊन गेली. एके दिवशी सकाळी मी माझ्या अभ्यासिकेत असा बसलो होतो, आता मी पांढरे केस झालेला म्हातारा होतो, तेवढ्यात एक भर ज्वानीतला तरुण आत खोलीत चालत आला, मी त्याला कधीच ओळखलं नसतं, पण त्यानं आपलं बोट वर केलं अन् हसत हसत तो म्हणाला, 'गॉट डेर फाटर गॉट डेर झोन, अन् 'गॉट डेर हाईलिगअ गाईस्ट.' मी आताच येऊन दाखल झालो अन् त्या पौंडभर बदामबीकरता तुमचे आभार मानण्याकरिता आलो आहे, कारण पौंडभर बदामबी मला दुसऱ्या कुणीही कधी विकत आणून दिलेलं नव्हतं; ते आणून देणारे तुम्ही फक्त एक भेटलात.' अन् मला माझ्या त्या सुखी तारुण्याची आणि परसातल्या त्या गरीब मुलाची, ज्याच्या पायात बूट नव्हते

अशा मुलाची, आठवण झाली आणि माझं हृदय विरघळलं; मी त्याला म्हणालो, 'तरुण मुला, तुझ्यात कृतज्ञता आहे बरं, कारण तुला मी तुझ्या बाळपणी विकत आणून दिलेल्या पौंडभर बदामबीची जन्मभर आठवण राहिली आहे! आणि मी त्याला मिठी मारली अन् त्याला शुभ चिंतलं. माझ्या डोळ्यांतून टिपं पडली. तो हसला, पण त्याच्याही डोळ्यांतून टिपं पडली... कारण रशियन माणूस रडायचं असेल तेव्हा हसतो. पण तो खरोखर रडला; मी ते पाहिलं. आणि आता, हाय हाय!..."

"आणि आता मी रडत आहे, जर्मन गृहस्था, आताही मी रडत आहे, साधु पुरुषा," मीत्या एकदम ओरडून म्हणाला.

काही म्हणा, या घटनेने लोकांच्या मनावर काहीशी अनुकूल छाप पडली. पण मीत्याच्या बाजूने अनुकूल अशी खळबळ मुख्यतः कतिरिना इवानोवनाच्या साक्षीने निर्माण केली, ती मी लगेच सांगणार आहे. नव्हे, जेव्हा पूर्वी साक्ष देऊन मोकळे झालेले साक्षीदार, म्हणजे बचावाच्या वकिलानं बोलावलेले, साक्ष देऊ लागले तेव्हा दैव एकाएकी ठळकपणे मीत्याला अधिक अनुकूलसे दिसू लागले, अन् विशेष आश्चर्य म्हणजे, बचावाच्या वकिलालासुद्धा ही गोष्ट नवलाची वाटली. पण कतिरिना इवानोवनाला बोलावले त्यापूर्वी आल्योशाची तपासणी केली गेली, आणि त्याने जी एक गोष्ट आठवण करून सांगितली, तिने फिर्यादी पक्षांच्या एका महत्त्वाच्या मुद्द्याच्या विरुद्ध निश्चित पुरावा मिळाल्यासारखा झाला.

४

दैव मीत्त्यावर प्रसन्न होते

एखादा चमत्कार व्हावा तसेच ते आपल्या डोक्यात आल्याचे खुद्द आल्योशालाही वाटले. त्याला शपथ घेण्याची काही आवश्यकता नव्हती, आणि मला आठवते, दोन्ही पक्षांकडून त्याला फार मार्दवपूर्वक अन् सहानुभूतिपूर्वक प्रश्न विचारण्यात आले. त्याच्या सज्जनतेचा लौकिक तो येण्यापूर्वीच तेथे पसरला होता हे उघड होते. आल्योशाने आपली साक्ष विनयाने अन् संयमाने दिली, पण त्याला आपल्या दुर्दैवी भावाबद्दल वाटत असलेली सहानुभूती स्पष्ट दिसून येत होती. एका प्रश्नाला उत्तर देताना, त्याने आपल्या भावाच्या स्वभावाचे जे चित्र रेखाटले त्यात तो बहुधा संतापी वृत्तीचा अन् आपल्या मनाच्या आवेगात वाहून जाणारा, पण त्याच बरोबर नेकीचा, स्वाभिमानी अन् उदार आणि वेळ पडली तर स्वतःचे बलिदान करू शकणारा असा मनुष्य असल्याचे सांगितले. तथापि त्याने हे कबूल केले की ग्रूशिंकाबद्दलच्या त्याच्या आसक्त प्रेमामुळे अन् वडिलांशी असणाऱ्या त्याच्या प्रतिस्पर्धेमुळे तो अलीकडे बेफाम वृत्तीचा झाला होता. पण त्याने पैशाकरिता

खून केला असेल ही कल्पनाच आल्योशाने उद्वेगाने उडवून लावली, अर्थात तीन हजार रुबल मिळविण्याच्या विचाराने मीत्या झपाटल्यासारखा झाला होता, आपल्या वडिलांनी आपल्या वारशाला आलेल्या ज्या मिळकतीच्या बाबतीत आपली फसवणूक केली, तिचा हा एक भाग म्हणून तो मानीत होता, आणि पैशाच्या बाबतीत सर्वसाधारणपणे जरी तो उदासीन असला तरी त्या तीन हजारां-संबंधी बोलताना संतापल्यावाचून तो बोलत नसे, हे त्याने मान्य केले. त्या दोन ' महिला ' असा ज्यांच्यासंबंधी सरकारी वकिलाने शब्द वापरला त्यांच्या—म्हणजे ग्रूशिंका अन् कात्या यांच्या— प्रतिस्पर्धेसंबंधी आल्योशाने टाळाटाळीची उत्तरे दिली अन् एक-दोन प्रश्नांना तर त्याने मुळी उत्तरच दिले नाही.

" तुमच्या भावानं कोणत्याही रीतीनं तुम्हाला वडिलांचा खून करण्याचा आपला विचार असल्याचं सांगितलं का ? " सरकारी वकिलाने विचारले. " तुम्हाला वाटलं तर तुम्ही या प्रश्नाला उत्तर देण्याचं नाकारू शकता," तो पुढे म्हणाला.

" त्यानं तसं मला प्रत्यक्ष रीतीनं सांगितलं नाही," आल्योशाने उत्तर दिले.

" तर मग ? अप्रत्यक्षपणे सांगितलं का ? "

" तो एकदा मला आमच्या वडिलांविषयी वाटणाऱ्या द्वेषासंबंधानं आणि कटोकटीची वेळ आली तर...आपण पार भडकून गेलो तर, आपण कदाचित त्यांचा खून करू अशी भीती वाटत असल्याचं बोलला होता."

" आणि तुमचा त्याच्यावर विश्वास बसला ? "

" बसला असं मला सांगितलं पाहिजे. पण तशा घातक क्षणी काहीतरी उच्च भावना त्याला नेहमी बचावील याविषयी मला कधी संशय वाटला नाही, कारण माझ्या वडिलांना त्यानं मारलेलं नाही," आल्योशा दृढपणे आणि सगळ्या न्यायालय-भर ऐकू जाईल इतक्या मोठ्या आवाजात म्हणाला.

तुतारीच्या आवाजाने जसा लढाईतला घोडा बिचकावा तसा सरकारी वकील बिचकला.

" तुम्हाला वाटणारी खात्री ही पूर्ण मनापासूनची आहे यावर माझा पूर्ण विश्वास आहे आणि तुम्हाला तुमच्या भावाविषयी वाटणाऱ्या प्रेमानं तसं वाटत आहे असा मी त्याचा अर्थ लावत नाही किंवा ही खात्री अन् तुमचं प्रेम ही एकरूप मी मानीत नाही. या सर्व शोककारक घटनेविषयीचा तुमचा विशिष्ट दृष्टिकोण प्राथमिक तपासणीतून आम्हाला यापूर्वीच कळून आला आहे. तो अतिशयच व्यक्तिगत आहे आणि फिर्यादी पक्षानं गोळा केलेल्या इतर सर्व पुराव्याच्या विरुद्ध जाणार आहे हे मी तुमच्यापासून लपवून ठेवण्याचा प्रयत्न करणार नाही, आणि म्हणून तुमच्या भावाच्या निरपराधीपणासंबंधानं आणि प्राथमिक तपासणीच्या वेळी ज्या मनुष्याच्या विरुद्ध तुम्ही साक्ष दिलीत त्या मनुष्याचा गुन्हा असल्यासंबंधानं तुम्हाला जी खात्री

वाटते ती कशामुळं ते तुम्ही मला सांगावं, असा तुम्हाला आग्रह करणं मला आवश्यक वाटतं."

"मी फक्त प्राथमिक तपासणीच्या वेळी मला विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरं दिली," आल्योशा सावकाशीने अन् थंडपणे म्हणाला. "मी स्मिर्द्याखफवर स्वतः होऊन आरोप केला नाही."

"तरी तुम्ही त्याच्या विरुद्ध साक्ष दिलीत ना ?"

तसं करण्याला मी माझा भाऊ दमीत्रि याच्या शब्दांवरून प्रवृत्त झालो. त्याच्या अटकेच्या वेळी काय घडलं अन् माझी तपासणी होण्यापूर्वी त्यानं स्मिर्द्याखफचं नाव कसं घेतलं हे मला सांगण्यात आलं. माझा असा पूर्ण विश्वास आहे की माझा भाऊ निरपराधी आहे; आणि जर त्यानं खून केलेलाच नसेल, तर..."

"तर स्मिर्द्याखफनं, असंच ना ? स्मिर्द्याखफच का ? आणि आपल्या भावाच्या निरपराधीपणाविषयी इतकी पूर्ण खात्री तुमची का पटलेली आहे ?"

"माझ्या भावावर विश्वास ठेवण्यावाचून मला राहवत नाही. तो माझ्याशी खोटं बोलणार नाही हे मला माहीत आहे. तो खोटं बोलत नाही हे त्याच्या मुद्रेवरून मला दिसलं."

"फक्त त्याच्या मुद्रेवरून ? हाच का सारा पुरावा तुमच्यापाशी आहे ?"

"दुसरा कोणताही पुरावा माझ्यापाशी नाही."

"आणि स्मिर्द्याखफच्या अपराधासंबंधी तुमच्या भावाच्या शब्दाखेरीज आणि त्याच्या चेहऱ्यावरच्या भावाव्यतिरिक्त दुसरा कोणताही तुमच्यापाशी काहीही पुरावा नाही ?"

"नाही, दुसरा कोणताही पुरावा नाही."

सरकारी वकिलाने येथे तपासणी थांबविली. आल्योशाच्या साक्षीने लोकांच्या मनावर झालेला परिणाम अत्यंत निराशाजनक होता. खटल्याच्या सुरुवातीपूर्वी स्मिर्द्याखफसंबंधी बोलवा होतीच; कोणी काही ऐकले होते, कोणी दुसरेच काहीतरी सांगितले होते; आल्योशाने आपल्या भावाच्या निरपराधीपणाचे अन् स्मिर्द्याखफच्या अपराधीपणाचे काही विलक्षण पुरावे जमा केले आहेत असे म्हटले जात होते, आणि शेवटी निघाले काहीच नाही, फक्त काही नैतिक विश्वास, जो भावाला भावाविषयी वाटणे स्वाभाविक आहे, त्यावाचून दुसरा काहीच पुरावा नाही.

पण फेत्युकोविचने आपली उलट तपासणी सुरू केली. त्याने आल्योशाला विचारले, "तुम्हाला आरोपीनं आपल्याला आपल्या वडिलांविषयी द्वेष वाटतो अन् आपण त्यांना कदाचित् मारून टाकू असं केव्हा सांगितलं, आणि तुम्ही ते, उदाहरणार्थ हा अनर्थ घडून येण्यापूर्वी, तुमची त्याची जी शेवटची भेट झाली त्यावेळी ते ऐकलंत का ?" या प्रश्नाला उत्तर देताना आल्योशा एकदम चमकून उठला, जणू

त्याला आत्ताच कशाची तरी आठवण झाली असावी अन् काही लक्षात आले असावे.

"मला एक घटना आत्ता आठवते आहे, ती मी अगदी विसरूनच गेलो होतो. त्या वेळी ती माझ्या स्पष्टपणे लक्षात आली नव्हती, पण आत्ता...."

आणि, उघडच आत्ताच पहिल्या प्रथम एक कल्पना एकदम डोक्यात येऊन त्याने उतावळीने आपली मीत्याशी त्या संध्याकाळी, मठाकडे जाण्याच्या रस्त्यावर त्या झाडाखाली, शेवटची गाठ पडली त्या वेळी मीत्याने आपल्या छातीवर, "म्हणजे छातीच्या वरच्या भागावर" हात मारून, आपली अब्रू परत मिळविण्याचं साधन आपल्यापाशी आहे, ते साधन इथं, इथं या छातीवर आहे असे अनेक वेळा पुनः पुन्हा कसे सांगितले होते ते त्याने सविस्तर सांगितले. "त्यानं जेव्हा आपल्या छातीवर हात मारला त्यावेळी मी समजलो की त्याला आपल्या हृदयात म्हणायचं आहे," आल्योशा पुढे सांगू लागला, "आपल्या हृदयात आपल्यापुढं वाढून ठेवलेल्या कोणत्या तरी भयानक कलंकापासून स्वतःला वाचविण्याची शक्ती आपल्याला मिळेल असं तो म्हणत असावा असं मला वाटलं, तो कलंक कोणता ते माझ्यापाशीसुद्धा कबूल करायला तो धजला नाही. तो आमच्या वडिलांसंबंधीच बोलतो आहे आणि त्याचा थरकाप करून सोडणारा कलंक म्हणजे आमच्या वडिलांच्याकडं जाऊन त्यांच्यावर काही अत्याचार करावा हा विचार असावा असंच त्या वेळी मी समजलो हे मला कबूल केलं पाहिजे. तरी बरोबर त्याचवेळी त्यानं आपल्या छातीवरील कशाकडं तरी निर्देश केला, त्यामुळं, मला आठवतं, त्याचवेळी माझ्या मनात एकदम आलं होतं की हृदय हे छातीच्या जागी नाही, ते खाली आहे, अन् त्यानं तर हृदयाच्या जागेच्या बरंच वर, अगदी मानेच्या खालीच, हात मारला होता अन् त्या जागेकडं तो निर्देश करीत होता. त्यावेळी माझ्या मनात आलेली ही कल्पना मला वेडगळ वाटली, पण त्यावेळी कदाचित् तो पंधराशे रुबल ठेवलेल्या त्या छोट्याशा पिशवीचा निर्देश करीत होतासं वाटतं !"

"अगदी बरोबर," मीत्या आपल्या जागेवरून ओरडला. "तुझं म्हणणं बरोबर आहे, आल्योशा, त्या लहानशा पिशवीवरच मी माझी मूठ मारली होती."

फेत्युकोविच अगदी त्वरेनं त्याच्याकडे धावला अन् त्याने गप्प राहण्याविषयी त्याची विनवणी केली, अन् त्याचवेळी त्याने आल्योशावर झडप घातली. आपल्या या आठवणीने वाहून जाऊन आल्योशाने आवेशानं आपले अनुमान सांगितले की हा कलंक म्हणजे बहुधा ते त्याच्या अंगावर असलेले पंधराशे रुबलच असावेत, ते त्याने कतिरीना इवानोवनाला देणे असलेल्या रकमेचा अर्धा हिस्सा म्हणून देऊन टाकले असते, पण ते तिला परत करायचे नाहीत आणि ते दुसऱ्या एका कारणाकरिता म्हणजे जर ग्रूशिंकाने संमती दिली तर तिला घेऊन पळून जाण्याकरिता– वापरायचे असे त्याने ठरविले असावे.

"असं आहे अन् असंच असलं पाहिजे," आल्योशा एकदम उत्तेजित होऊन मोठ्याने उद्गारला. "माझा भाऊ अनेकदा ओरडून म्हणाला होता की, 'अर्धा कलंक, (तो 'अर्धा' हा शब्द अनेक वेळा म्हणाला) अर्ध्या कलंकापासून मी तत्काळ स्वतःला मुक्त करू शकतो, पण दुर्दैव म्हणजे माझी इच्छाशक्ती इतकी दुबळी आहे की मी ते करीत नाही...ते करण्याची माझी ताकद नाही हे अगोदरच मला कळून चुकलं आहे!"

"आणि तुम्हाला स्पष्टपणे, नक्की आठवतं की त्यानं छातीच्या या भागावरच आपला हात मारला म्हणून?" फेत्युकोविचने अधीरपणे विचारले.

"स्पष्टपणे अन् नक्की, कारण मी त्यावेळी विचार केला, 'हा हृदय खाली असताना तिथं वर का मारून घेतो आहे?' अन् त्यावेळी हा विचार मला मूर्खपणाचा असल्यासारखा वाटला... तो मूर्खपणाचा वाटला असल्याचं मला चांगलं आठवतं ....माझ्या मनात ते एकदम चमकून गेलं. त्याच्यामुळंच मला आता त्याची परत आठवण झाली. हे आतापर्यंत मी विसरून कसा गेलो होतो कुणास ठाऊक! तो जेव्हा आपल्याकडं त्याचं साधन आहे पण ते पंधराशे आपण परत देऊ इच्छीत नाही असं म्हणाला, तेव्हा त्याच्या मनात ती छोटीशी पिशवी होती. आणि जेव्हा त्याला मोक्रोयला पकडण्यात आलं तेव्हा तो ओरडून म्हणाला की, जेव्हा कतिरीना इवानोवनाचं ऋण अर्धं (अर्धं हं, लक्षात घ्या!) फेडण्याचं साधन आपल्या हातात होतं तेव्हा तो पैसा परत करण्याला आपलं मन झालं नाही अन् आपण तो पैसा देऊन टाकण्याऐवजी तिच्या नजरेत चोर म्हणून राहिलो हे माझ्या आयुष्यातलं अत्यंत काळिमा लावणारं कर्म मी मानतो. तो तसं म्हणाल्याचं मला माहीत आहे, मला ते कुणीतरी सांगितलं. अन् ते देणं म्हणजे केवढ्या यातना, केवढ्या यातना त्याला होत्या!" आल्योशा शेवटी उद्गारला.

सरकारी वकिलाने, अर्थात्, मध्येच हस्तक्षेप केला. त्याने आल्योशाला ते सारे कसे कसे घडले ते वर्णन करायला सांगितले आणि पुनः पुन्हा त्याला हा प्रश्न विचारला, "आरोपी कशाकडं तरी निर्देश करतो आहे असं दिसलं का? कदाचित त्यानं आपल्या मुठीनं छातीवर नुसतं मारूनच घेतलं नसेल कशावरून?"

"पण त्यानं मूठ वापरलीच नाही," आल्योशा म्हणाला; "त्यानं आपल्या बोटांनी निर्देश केला अन् निर्देश केला तो इथं, अगदी वरच्या बाजूला... हे मी आता या क्षणापर्यंत कसा विसरलो कुणास ठाऊक!"

मुख्य न्यायाधीशांनी मीत्याला या शेवटच्या साक्षीदाराच्या जबानीवर तुला काही सांगायचं आहे काय असे विचारले. मीत्याने त्याला दुजोरा दिला, तो म्हणाला की मी माझ्या छातीवर म्हणजे गळ्याच्या खाली असलेल्या पंधराशे रुबलकडेच दाखवीत होतो, आणि अर्थात् तो माझा काळिमा होता, "तो काळिमा होता हे मी नाकारू शकत नाही, माझ्या सबंध आयुष्यातलं हे अत्यंत लज्जास्पद

कर्म होतं," मीत्त्या म्हणाला. "मी ते परत करू शकलो असतो पण परत केले नाहीत. ते परत करून टाकण्याऐवजी तिच्या नजरेत मी चोर म्हणून राहणंच पसंत केलं. आणि यातला सर्वांत लज्जास्पद भाग हा की मी ते परत देणार नाही हे माझं-मलाच अगोदर माहीत होतं! तुझं म्हणणं बरोबर आहे, आल्योशा! धन्यवाद, आल्योशा!"

अशी आल्योशाची उलट तपासणी संपली. तिचं महत्त्व अन् तिच्यातील विलक्षणपणा हा की एक सत्यस्थिती तरी निदान तिच्यात गवसली, आणि जरी तो पुराव्याचा अगदीच यःकश्चित भाग होता, पुराव्याचा नुसता इषाराच होता, तरी त्याने, ती पिशवी होती आणि तिच्यात पंधराशे रुबल होते आणि आरोपीने मोक्रोय इथे ते पंधराशे रुबल 'माझे स्वतःचे' होते म्हणून जेव्हा प्राथमिक तपासणीत जबाब दिला तेव्हा तो खोटे बोलला नव्हता, एवढे दाखविण्याच्या दृष्टीने त्याचा काही उपयोग झालाच. आल्योशाला आनंद झाला. उल्हसित चेहेऱ्याने तो त्याच्या-साठी ठेवलेल्या जागेकडे गेला. तो जाताना स्वतःशी पुटपुटत राहिला, "मी असा कसा विसरलो? मी विसरलो हे झालं कसं? अन् आत्ता ते माझ्या डोक्यात आलं ते तरी कसं?"

कतिरीना इवानोवनाला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात बोलावण्यात आले. जसा तिने प्रवेश केला तसे त्या न्यायालयात काही विलक्षण घडले. महिलांनी आपली दूरदर्शी भिंगं अन् दुर्बिणी हाती घेतल्या; पुरुष मंडळीत हालचाल माजली: काहीजण चांगले दिसावे म्हणून उठून उभे राहिले. ती येत आहे हे पाहताच मीत्या "पाली-सारखा पांढरा पडला" असे मागाहून प्रत्येकजण म्हणत होता. तिचा सर्व पोशाख काळ्या कपड्याचा होता, ती विनीतपणे, जवळजवळ भित्रेपणानेच, पुढे पुढे येत होती. तिच्या चेहेऱ्यावरून ती अस्वस्थ आहे की काय हे सांगणे अशक्य होते; पण तिच्या काळ्याभोर अन् उदास डोळ्यांत एक निश्चयाची झाक होती. इथे एक सांगतो की, अनेक लोक ती यावेळी विशेष सुंदर दिसतेय असे बोलले. ती मृदू पण स्पष्ट ऐकू येण्यासारख्या आवाजात बोलली, त्यामुळे न्यायालयभर तिचे बोलणे ऐकू आले. आपले म्हणणे तिने स्वस्थचित्ताने, किंवा निदान स्वस्थचित्त असल्यासारखे दाख-विण्याचा प्रयत्न करीत, मांडले. मुख्य न्यायाधीशांनी आपली तपासणी सुरू केली ती विवेकीपणाने अन् अतिशय सन्मानपूर्वक, जणू 'काही तारांना' स्पर्श करण्याचा त्यांना संकोच वाटत असावा, अन् तिच्या अतिशय दुःखी मनःस्थिती-बद्दल त्यांना सहानुभूती असावी. पण पहिल्या एका प्रश्नाला उत्तर देताना कतिरिना इवानोवनाने दृढपणे उत्तर दिले की आपण आरोपीशी पूर्वी वाग्दत्त वधू म्हणून बांधलेलो होतो पण "त्यानं स्वतः होऊनच मला सोडून दिलं" असे ती पुढे शांतपणे म्हणाली. तिने मीत्याकडे तिच्या आप्तांना टपालाने पाठविण्याकरिता म्हणून सोपविलेल्या तीन हजारांबद्दल जेव्हा तिला विचारण्यात आले, तेव्हा ती दृढपणे

म्हणाली " मी त्याला ते पैसे फक्त पाठवून देण्याकरिता म्हणून दिले नव्हते... त्याला पैशाची फार नड आहे असं त्यावेळी मला भासलं....मी ते तीन हजार त्याला अशा समजुतीवरच दिले की त्यानं ते महिन्याभरात, त्याच्या मनाला वाटलं तर, पोस्टानं पाठवावेत. त्याला त्या कर्जाबद्दल मागाहून स्वतःला चिंता लावून घेण्याचं काही कारण नव्हतं."

तिला विचारलेले सगळे प्रश्न अन् तिने दिलेली उत्तरे विस्तारशः मी येथे देणार नाही. तिच्या जबानीचे तात्पर्य फक्त मी इथे देतो.

" माझी अशी पूर्ण खात्री झालेली होती की त्याच्या वडिलांकडून त्याला पैसे मिळताच ही रक्कम तो पाठवून देईल. त्याचा निर्लोभीपणा अन् प्रामाणिकपणा... पैशाच्या बाबतीतला त्याचा काटेकोर प्रामाणिकपणा... या विषयी माझ्या मनात कधीच शंका नव्हती. आपल्याला आपल्या वडिलांकडून पैसे मिळतील अशी त्याला पूर्ण खात्री वाटत होती, अन् त्यासंबंधी तो मला अनेक वेळा बोलला होता. वडिलांशी त्याचं भांडण होतं हे मला माहीत होतं अन् वडिलांकडून त्याला अन्यायानं वागवलं जात आहे असा नेहमीच माझा समज होता. आपल्या वडिलांविरुद्ध त्यानं काही धमकी उच्चारल्याचं मला आठवत नाही. त्याने तशी धमकी माझ्यादेखत कधीच उच्चारली नव्हती हे निःसंशय. तो जर त्यावेळी माझ्याकडं आला असता, तर मी त्याची, त्याला त्या अपशकुनी तीन हजार रुबलांविषयी वाटणाऱ्या चिंतेपासून सुटका केली असती, पण त्यानं माझ्याकडं यायचं सोडून दिलं होतं...अन् मी स्वतः अशा परिस्थितीत येऊन पडले होते....की मी त्याला बोलावू शकत नव्हते.... आणि खरं म्हणजे त्या पैशाच्या बाबतीत मी काटेकोर व्हावं असा अधिकारही मला नव्हता," ती एकदम म्हणाली, अन् तिच्या आवाजात एक निर्धाराचा सूर होता. " त्यानं मला तीन हजारांहूनही जास्त पैशाची मदत केल्याबद्दल मी एकेकाळी त्याच्या ऋणात होते, आणि जरी त्यावेळी ते त्याचं ऋण पुढं-मागं परत करण्याची माझी स्थिती होईल असं मला दिसत नव्हतं, तरी मी ते घेतले."

तिच्या आवाजात एक प्रकारचा आव्हानात्मक सूर होता. त्याच वेळी फेत्युकोविचनं आपली उलट तपासणी सुरू केली.

" ही गोष्ट इथं नव्हे तर तुमची ज्यावेळी प्रथम ओळख झाली त्यावेळी का घडली ? " फेत्युकोविच सावधपणे, सूचित करीत म्हणाला; त्याला काहीतरी अनुकूल असा वास लागला म्हणून तो आपला मार्ग चाचपीत जात होता. खुलासा म्हणून मध्येच सांगतो की, जरी फेत्युकोविचला पीटर्सबर्गहून खुद्द कतिरिना इवानोवनाच्या सांगण्यावरूनच आणण्यात आले होते, तरी त्याला मीत्याकडून तिला मिळालेल्या पाच हजार रुबलांच्या प्रकरणाविषयी आणि " तिनं त्याला जमिनीपर्यंत लवून नमस्कार केल्याविषयी " काही माहिती नव्हती. तिने ते त्याच्यापासून लपवून ठेवले होते आणि त्याबद्दल काही ती बोलली नव्हती, हे विचित्र होते. तिला स्वतःलासुद्धा या

प्रकरणासंबंधी न्यायालयात आपण बोलू की काय याची शेवटच्या क्षणापर्यंत माहिती नव्हती, हे खात्रीपूर्वक समजून चालण्यास हरकत नाही, ती त्या वेळच्या प्रेरणेवर विसंबून होती.

"छे. छेः, मी ते क्षण कधीच विसरू शकणार नाही," तिने आपली कथा सांगण्यास प्रारंभ केला. मीत्यानं आल्योशाला जे प्रकरण सांगितले होते ते सर्व तिने सांगितले अन् तिने जमिनीपर्यंत लवून नमस्कार केल्याचे अन् त्याला कारण काय घडले ते सर्व सांगितले. तिने आपल्या बापाविषयी तसेच आपण मीत्याकडे गेलो ते सांगितले, आणि एकाही शब्दाने, एकाही संकेताने, सुचवले नाही की मीत्यानेच स्वतः तिच्या बहिणीच्यो मार्फत सुचविले होते की, त्यांनी ते पैसे घेऊन जायला "कतिरिना इवानोवनाला पाठवावे." तिने उदार हृदयाने ते छपविले आणि आपण स्वतःच्याच प्रेरणेने त्या तरुण अधिकाऱ्याकडे, कशावर तरी विश्वसून.... त्या पैशाची याचना करण्याकरिता धावत गेलो, असे सांगण्यात तिने शरम मानली नाही. हे काही तरी अती महान होते! मी तर ते ऐकत असताना थंडीने काकडावा तसा थरथर कापत होतो. न्यायालय गपचिप होते. एक एक शब्द पकडण्याचा प्रयत्न करीत होते. खरोखर काही तोड नाही अशी ही गोष्ट होती. ती इतकी हट्टी आणि दुसऱ्याला तुच्छ लेखणारी गर्विष्ठ मुलगी, पण अशा तरुण मुलीकडून इतकी उघड कबुली, इतका त्याग, इतके आत्मदिव्य खरोखर विश्वास ठेवायला कठीण असे वाटले. आणि कशाकरिता, कुणाकरिता? ज्या माणसाने तिची फसवणूक केली, तिचा अपमान केला त्याला बचावण्याकरिता अन् किती का अल्प प्रमाणात असेना, त्याला अनुकूल अशी मजबूत छाप निर्माण करण्याला मदत करण्याकरिता. आणि खरोखर, त्या तरुण मुलीपुढे मानाने लवून तिला जगात आपले उरलेसुरलेले शेवटचे पाच हजार रुबल देणाऱ्या त्या तरुण अधिकाऱ्याची मूर्ती अतिशय सहानुभूतीच्या अन् आकर्षक स्वरूपात उठून दिसली, पण... माझ्या अंतरात एक दुःखद संशय होता! मला असे भासले की त्यातून मागाहून निंदाप्रवाद उत्पन्न होण्याचा संभव आहे. (आणि तसा तो झाला, खरोखर, झालाच). मागाहून सगळ्या शहरभर तिरस्कारपूर्ण उपहासाबरोबर असे पुनःपुन्हा बोलले गेले की ही कथा कदाचित् अगदी शेवटपर्यंतची नसेलही—म्हणजे, त्या अधिकाऱ्याने त्या "तरुण मुलीनं फक्त मानानं लवून नमस्कार करण्यावरच" तिला जाऊ दिलं असेल असं नाही. यात काहीतरी गाळले गेले आहे असे सूचित करण्यात आले.

"आणि जरी समजा काही गाळण्यात आलेलं नसलं, ही पुरती हकीकत असली," आमच्यातल्या फार मोठ्या आदरणीय महिलांपैकी एक जण म्हणाली, "तरीसुद्धा एका तरुण मुलीनं, आपल्या बापाला वाचविण्याकरिता का होईना, अशा रीतीनं वागणं हे श्रेयस्कर आहे की नाही हे अत्यंत शंकास्पद आहे."

आणि कतिरीना इवानोवनासारख्या बुद्धिमान, रोगट वाटावी इतकी तरल भावना असणाऱ्या मुलीला लोक असे बोलतील हे कळल्यावाचून राहिले असेल काय? तिला समजले असलेच पाहिजे, तरी तिने सर्व काही सांगण्याचा मनाचा निश्चय केला. अर्थात्, तिच्या हकीकतीच्या खरेपणाविषयी हे असे गलिच्छ क्षुद्र मनाचे संशय फक्त मागाहूनच उठले आणि पहिल्या क्षणी सर्वांच्या मनावर तिच्या हकिकतीचा फार खोल परिणाम झाला. न्यायाधीश अन् वकील यांच्याविषयी म्हणायचे तर त्यांनी कतिरीना इवानोवनाची हकीकत सादर, जवळ जवळ लाजेने चूर होऊन, ऐकली. सरकारी वकिलाने त्या विषयावर एकही प्रश्न विचारण्याचे धाडस केले नाही. फेत्युकोविचने तिला लवून नमस्कार केला. ओः! त्यांचा जणू विजय झाला होता! पुष्कळच बाजू सावरली होती. माणसाने आपले सर्वस्व असलेले पाच हजार रुबल एका उदार प्रेरणेने द्यावे अन् त्याच माणसाने तीन हजार लुबाडण्याकरिता आपल्या बापाचा खून करावा— ही कल्पनाच मुळी विसंगत वाटली! फेत्युकोविचला वाटले की आता चोरीचा आरोप तरी निदान खोटा ठरल्यासारखाच झाला. ' या केस 'कडे पाहण्याचा दृष्टिकोणच अगदी बदलला. मीत्याविषयी सहानुभूतीची लाट पसरली. त्याच्याविषयी सांगायचे तर,.... मला असे सांगण्यात आले की कतिरीना इवानोवना आपली साक्ष देत असताना एकदा की दोनदा, तो आपल्या जागेवरून एकदम उठला, पुनः खाली गळून पडला, अन् आपला चेहेरा हातांनी त्याने झाकून घेतला. पण जेव्हा तिने आपली साक्ष संपविली तेव्हा तो गदगदलेल्या स्वरात एकदम ओरडला :

" कात्या, का माझा सत्यानाश केलास?" आणि त्याचे हुंदके साऱ्या न्यायालयात ऐकू आले. पण त्याने लगेच स्वतःला आवरले अन् पुनः तो म्हणाला.

" आता मला शिक्षा मिळून चुकली!"

मग तो आपले दात गच्च आवळून अन् आपले हात छातीवर स्वस्तिकाकार ठेवून आपल्या जागी ताठ बसला. कतिरीना इवानोवना कोर्टातच थांबली आणि ती आपल्या जागेवर जाऊन बसली. ती फिकी झाली होती अन् आपले डोळे खाली करून ती बसली. तिच्याजवळ बसणाऱ्यांनी सांगितले की ती जणू ताप आल्याप्रमाणे थरथर कापत होती.

ग्रूशिंकाला बोलावण्यात आले.

मी आता मीत्याच्या सर्वनाशाला जी आपत्ती शेवटी कारणीभूत झाली असावी त्या आकस्मिक आपत्तीकडे येत आहे. कारण माझी त्याचप्रमाणे सर्वांची खात्री आहे—सर्व वकीलमंडळी नंतर तेच म्हणाली की जर हा प्रसंग घडला नसता, तर आरोपीला निदान दया दाखविण्याची शिफारस करण्यात आली असती. पण त्याबद्दल मागाहून. प्रथम ग्रूशिंकाबद्दल काही सांगतो.

तिनेसुद्धा पोषाख सगळा काळा घातला होता, तिची ती सुरेख दिसणारी शाल तिच्या खांद्यावर रुळत होती. ती आपल्या हलक्या, आवाज न करणाऱ्या पावलांनी, पूर्ण उफाड्याच्या स्त्रियांत सर्वसामान्यपणे जी एक थोडीशी एका बाजूला झुकत चालण्याची लकब असते तशा चालीने साक्षीदाराच्या पिंजऱ्याकडे गेली. तिने स्थिरपणे मुख्य न्यायाधीशांच्याकडे पाहिले, तिने आपली दृष्टी उजवीकडे किंवा डावीकडे कुठेच वळविली नाही. माझ्या मताने ती त्यावेळी फार देखणी दिसत होती, आणि जमलेल्या स्त्रिया मागाहून बोलल्या तशी फिकी मुळीच दिसत नव्हती. त्या असेही म्हणाल्या की, तिच्या चेहेऱ्यावर एकाग्रतेचा अन् तिरस्काराचा भाव होता. मला वाटते ती फक्त काहीशी त्रस्त झालेली होती अन् आमच्या कुचाळीप्रिय लोकसमुदायाच्या तिरस्कारयुक्त अन् विलक्षण नजरांची तिला वेदनायुक्त जाणीव होती. ती मानी होती अन् तिला तिरस्कार सहन होणे शक्य नव्हते. तिरस्काराचे नुसते चिन्ह दिसले तरी भडकून जाणाऱ्या, संतापून जाऊन प्रत्याघात करायला उत्सुक होणाऱ्या लोकांपैकी ती होती. अर्थात् तिच्यात भित्रेपणाचाही काही अंश होता आणि त्या भित्रेपणाबद्दल मनोमन वाटणारी लज्जाही होती, त्यामुळे तिचा आवाज एकसारखा बदलत राहिला यात नवल नाही. एकदा तो रागाचा, तिरस्काराचा अन् उद्धट होई, आणि दुसऱ्या क्षणी त्यात आत्मनिंदेचा मनापासून सूर उमटे. काही वेळा जणू ती जीवावर उदार होऊन उडी घेत आहे, जणू तिला "काय वाटेल ते होवो मला पर्वा नाही, मी ते सांगणार..." असं वाटत असावे अशी ती बोले. फ्योदर पावलोविचशी तिच्या असलेल्या परिचयासंबंधी बोलताना ती तुसडेपणाने उद्गारली : "हा सारा मूर्खपणा आहे, आणि तो मला त्रास देत होता हा काय माझा अपराध?" पण एक मिनिटानंतर ती म्हणाली : "हा सारा माझा दोष, मी त्या दोघांना— त्या म्हाताऱ्याला अन् त्यालासुद्धा हसत असे अन् त्या दोघांना मी या स्थितीला आणून सोडले. हे सारं माझ्यामुळं घडलं."

सॅमसोनोवचे नाव कशामुळे तरी पुढे आले. "त्याच्याशी कुणाला काही कर्तव्य नाही," ती एकदम तोडून बोलली, तिच्या बोलण्यात एक प्रकारची उद्दाम तुच्छता होती. "तो माझा उपकारकर्ता होता; माझ्या पायात जोडाही नव्हता अशा वेळी, माझ्या घरच्या माणसांनी मला घराबाहेर हाकललं होतं. अशा वेळी मला त्यानं आसरा दिला." मुख्य न्यायाधीशांनी तिला अर्थात् अत्यंत मृदूपणाने, बजावले की तिला प्रश्न विचारलेले असतील त्यांचीच सरळ तिने उत्तरे द्यावीत, संबंध नसलेल्या इतर फालतू गोष्टी मध्ये आणू नयेत. ग्रूशिंका लाल झाली अन् तिचे डोळे चकाकले.

नोटा असलेले पाकीट तिने पाहिलेले नव्हते, पण "त्या दुष्ट पाजी माणसाकडून" फक्त ऐकलं होतं की फ्योदर पावलोविचकडे एक पाकीट आत तीन हजारांच्या नोटा घालून ठेवलेले आहे म्हणून. "पण तो सारा मूर्खपणा होता. मी फक्त हसत होते. मी कशाकरतासुद्धा त्याच्याकडं गेले नसते."

" 'तो दुष्ट पाजी माणूस' म्हणून तुम्ही आता कुणाचा उल्लेख केलात?" सरकारी वकिलाने विचारले.

" तो हुजऱ्या स्मिर्दाखफ, ज्यानं आपल्या धन्याचा खून केला अन् काल रात्री स्वतःला फास लावून घेतला तो."

तिला अर्थात् लगेच विचारण्यात आले की, असा निश्चित आरोप करण्याकरिता तिच्यापाशी काय पुरावा आहे? पण तिच्यापाशीसुद्धा तसा काही पुरावा नव्हता असे दिसून आले.

"द्मीत्रि फ्योदरोविचनं स्वतःच मला तसं सांगितलं; त्याच्यावर विश्वास ठेवायला हरकत नाही. आम्हा दोघांच्यामध्ये आलेल्या स्त्रीनं त्याचा घात केला; ती त्या सर्वाचं कारण आहे हे मी सांगते," ग्रूशिंका म्हणाली. ती द्वेष भावनेनं नुसती थरथरत असलेली दिसली, आणि तिच्या आवाजात सूडाचा स्वर होता.

कुणाचा हा उल्लेख तुम्ही करता आहा असे तिला पुन्हा विचारले.

" ती तरुण स्त्री, कतिरीना इवानोवना, तिकडं आहे ती. तिनं मला बोलावणं पाठविलं, मला चाकोलेट देऊ केलं, मला मोहित करण्याचा तिनं प्रयत्न केला. तिला खरी लाज-लज्जा फारशी नाही, हे मी सांगू शकते... "

इथे मुख्य न्यायाधीशांनी तिला कडकपणे एकदम थांबविलं आणि संयमाने भाषा वापरण्याची विनंती केली. पण त्या मत्सरी स्त्रीचे हृदय जळत होते, अन् आपण काय करतो त्याची तिने पर्वा बाळगली नाही.

सरकारी वकिलाने विचारले, "आरोपीला जेव्हा मोक्रोयला पकडण्यात आलं तेव्हा प्रत्येकानं तुम्हाला शेजारच्या खोलीतून धावत जातांना अन् तोंडानं 'हा सगळा माझा दोष, आम्ही दोघं मिळून सैबेरियाला जाऊ!' असं म्हणताना ऐकलं. तेव्हा तुम्हाला त्यानं आपल्या बापाचा खून केला असंच अगोदर वाटत होतं, नाही का?"

" त्यावेळी मला काय वाटत होतं ते आत्ता आठवत नाही." ग्रूशिंकाने उत्तर दिले. " प्रत्येकजण ओरडून म्हणत होता की यानंच आपल्या बापाचा खून केला म्हणून अन् मला वाटलं हा माझाच अपराध, माझ्याचमुळं त्यानं त्याचा खून केला. पण जेव्हा त्यानं मला आपण गुन्हेगार नाही असे सांगितलं, तेव्हा माझा त्याच्यावर चटकन् विश्वास बसला, आणि माझा आताही त्याच्यावर विश्वास आहे अन् पुढंही सतत राहील. तो खोटं बोलणारा माणूस नाही."

फेत्युकोविचने आपली उलट तपासणी सुरू केली. त्याने इतर गोष्टींबरोबर तिला राकितीनबद्दल अन् त्या पंचवीस रुबलबद्दल—" तुम्ही ते त्याला अलेक्सी फ्योदरोविच कारमाझफ यांना तुमच्या भेटीला आणण्याकरिता म्हणून दिलेत ना" असे विचारले, ते मला स्मरते.

" त्याने ते पैसे घेतले यात विचित्र काहीच नव्हतं." ग्रूशिंका रागीट

तिरस्काराने फुस्कारली. “ तो नेहमीच माझ्याकडं पैशाकरिता येत असे; तो दर महिन्याला किमान तीस रुबल माझ्याकडून काढीत असे, मुख्यतः चैनीकरिता; माझी मदत न घेता चरितार्थ चालविण्याइतकं त्याच्याकडं साधन होतं.”

“ तुम्ही इतक्या उदारपणे राकितीनशी वागण्याचं कारण काय ? ” फेत्युकोविचने विचारले, मुख्य न्यायाधीशांच्या अस्वस्थ हालचालीकडे त्याने लक्ष दिले नाही.

“ म्हणजे काय ? तो माझा मावस भाऊ आहे. त्याची आई माझ्या आईची बहीण, पण तो मला नेहमी ही गोष्ट इथं कुणाला सांगू नकोस म्हणून सांगायचा, इतकी त्याला माझी लाज वाटायची.”

ही माहिती म्हणजे प्रत्येकाला आश्चर्याचा धक्काच होता; शहरात म्हणा किंवा मठात म्हणा, मीत्यालासुद्धा त्या संबंधी ठाऊक नव्हते. राकितीन बसल्या जागी लाजेने काळानिळा झाला असे मला सांगण्यात आले. ग्रुशिंकाला ती कोर्टात येण्यापूर्वी कुणाकडून तरी कळले की त्याने मीत्याविरुद्ध साक्ष दिली आहे, त्यामुळे ती क्रुद्ध झाली होती. लोकांवर राकितीनच्या भाषणाचा, त्याच्या उदात्त भावनांचा, त्याच्या भूदास प्रथेवरील अन् रशियातील राजकीय अव्यवस्थेवरील हल्ल्यांचा झालेला सारा परिणाम यावेळी पुरता खलास झाला. फेत्युकोविचला समाधान वाटले; हे दुसरे ईश्वराचे वरदान ठरले. ग्रुशिंकाची उलटतपासणी अर्थात् फार वेळ चालली नाही, तिच्या साक्षीत नवीन विशेष असे काही असणे शक्य नव्हतेच. तिच्या साक्षीचा लोकांच्या मनावर अतिशय प्रतिकूल परिणाम झाला; आपली साक्ष संपवून ती कोर्टातच पुनः, कतिरीना इवानोवनापासून बऱ्याच अंतरावर जाऊन बसली. तेव्हा शेकडो तिरस्काराच्या नजरा तिच्यावर खिळल्या. मीत्या ही साक्ष चालू असताना सारा वेळ गप्प बसला होता. तो जणू फत्तर बनला होता, त्याचे डोळे खाली जमिनीकडे लागले होते.

साक्षीकरिता इवानला बोलावण्यात आले.

५

आकस्मिक संकट

इथे एक नमूद केले पाहिजे की, इवानला आल्योशाच्या अगोदर बोलावण्यात आले होते. पण कोर्टाच्या चोपदाराने मुख्य अध्यक्षांना जाहीर केले की एकदम आजारी झाल्याने किंवा फिट्सारखे काही आल्याने, साक्षीदाराला आता हजर राहणे शक्य नाही, पण त्याला बरे वाटताच तो साक्ष द्यायला तयार आहे. पण हे कुणालाच ऐकू गेले नाहीसे दिसले आणि ते फक्त मागाहून उघडकीस आले.

तो कोर्टात आला हे अगोदर जवळजवळ कुणाच्या लक्षातच आले नाही.

मुख्य साक्षीदार, विशेषतः त्या दोन प्रतिस्पर्धी महिला, यांची अगोदरच तपासणी होऊन गेली होती. लोकांचे कुतूहल तात्पुरते शमले होते; लोकांना एकप्रकारे थकवा आल्यासारखा झाला होता. आणखी अनेक लोकांचे जबाब अजून व्हायचे होते. आतापर्यंत जे काही सांगितले गेले त्याहून अधिक माहिती देण्याजोगे त्यांच्याकडे काय असणार अशी समजूत होती. वेळ चालला होता. इवान फारच मंद पावलांनी चालत आला, त्याने कुणाकडेही दृष्टी टाकली नाही, आणि जणू उदास विचारात गढून गेल्याप्रमाणे मान खाली घालून तो आला. त्याचा पोषाख नावे न ठेवता येण्याजोगा होता, पण त्याच्या चेहेऱ्याचा वेदनायुक्त परिणाम झाला, निदान माझ्यावर तरी. त्या चेहेऱ्यावर एक प्रकारची पारोसेपणाची कळा होती, मरणाऱ्या माणसाच्या चेहेऱ्यावर असावी तशी. त्याचे डोळे निस्तेज होते; त्याने ते वर केले अन् सावकाशीने न्यायालयाच्या सर्व बाजूंना पाहिले. आल्योशा चटकन आपल्या जागेवरून उठला अन् दुःखाने "हाः!" असे उद्गारला, मला ते आठवते, पण ते कुणाच्या लक्षात आले नाही.

मुख्य न्यायाधीशांनी त्याला माहिती देताना सांगितले की, तुम्ही शपथेवर सांगणारे साक्षीदार नाही, तुम्हाला उत्तर द्यायचे असले तर देता येईल किंवा नाकारता येईल, पण, तुम्ही अर्थातच आपल्या सदसद्विवेकबुद्धीला जागून साक्ष दिली पाहिजे, इत्यादी इत्यादी. इवानने ऐकून घेतले अन् त्यांच्याकडे शून्य नजरेने पाहिले, पण त्याचा चेहेरा हळूहळू निवळून त्यावर हसू उमटले, आणि मुख्य न्यायाधीशांनी आश्चर्याने त्याच्याकडे पाहत आपले बोलणे संपविताच तो चक्क मोठ्याने हसला.

"ठीक, आणखी काय?" त्याने मोठ्याने विचारले.

कोर्टात शांतता पसरली; काहीतरी विचित्र झाल्यासारखे सर्वांना वाटले. मुख्य न्यायाधीश अस्वस्थ झालेसे दिसले.

"तुम्ही...तुम्हाला अजूनही बरं वाटत नाही का?" ते म्हणाले, आणि त्यांनी चोपदाराकरता सगळीकडे दृष्टी फिरविली.

"काही चिंता करू नका, न्यायाधीश साहेब, मी चांगला बरा आहे अन् आपल्याला लक्षात घ्यावंसं वाटेल असं काही मी सांगणार आहे," इवानने एकदम शांतपणे अन् आदरपूर्वक उत्तर दिले.

"तुम्हाला काही खास सांगायचं आहे काय?" मुख्य न्यायाधीशांनी विचारले, अजूनही त्यांना विश्वास आला नव्हता.

इवानने खाली पाहिले, तो क्षणभर थांबला, अन् आपली मान उंचावून जवळ जवळ अडखळतच उत्तरला.

"न...नाही... तसं नाही. तसं खास काही नाही."

त्याला प्रश्न विचारायला सुरुवात झाली. तो जणू नाखुषीनेच उत्तरे देत

असावा. ती त्रोटक होती, त्यात एक प्रकारचा उबग होती अन् तो अधिकाधिक लक्षात भरण्याजोगी वाढत जात होती, अर्थात् त्याची उत्तरे समर्पक होती. अनेक प्रश्नांना त्याने आपल्याला माहीत नाही म्हणून उत्तर दिले. त्याच्या वडिलांच्या दमीत्रिशी असलेल्या पैशाच्या व्यवहाराबद्दल त्याला काही माहिती नव्हती. "मला त्या विषयात रस नव्हता," तो म्हणाला. वडिलांचा खून करण्याच्या धमक्या त्याने आरोपीच्या तोंडून ऐकल्या होत्या. पाकिटातील पैशासंबंधी त्याला स्मिर्द्याखफकडून कळले होते.

"तेच तेच पुनः पुन्हा" त्याने थकव्याचा भाव दर्शवून आपले बोलणे मध्येच थांबविले. "मला कोर्टाला विशेष असं काही सांगायचं नाही."

"तुमची प्रकृती बरी दिसत नाही अन् तुमच्या भावना मला समजतात," मुख्य न्यायाधीश म्हणाले.

ते सरकारी वकिलाकडे अन् बचावाच्या वकिलाकडे साक्षीदाराची अवश्य तरच तपासणी करा म्हणून सांगण्याकरिता वळले, तेव्हा इवानने एकाएकी थकल्या आवाजात विनंती केली.

"मला जाऊ द्या, न्यायाधीश महाराज, मला अगदी बरं वाटत नाही."

आणि असे म्हणून, परवानगीची वाट न पाहता, तो कोर्टाच्या बाहेर जाण्याकरिता वळला. पण चार पावले गेल्यावर तो जणू काही निश्चय झाल्याप्रमाणे उभा राहिला, हलकेच हसला अन् परत आला.

"मी त्या शेतकऱ्याच्या मुलीसारखा आहे, न्यायाधीश महाराज.... कसं म्हणते ती? 'मला वाटलं तर मी उभी राहीन, नाही वाटलं तर नाही उभी राहणार.' ते तिला लग्नाकरिता चर्चला घेऊन जाण्यासाठी तिच्या अंगात झगा चढविण्याचा प्रयत्न करीत होते, अन् ती म्हणाली, 'मला वाटलं तर मी उभी राहीन, नाही वाटलं तर नाही उभी राहणार'...शेतकरी वर्गासंबंधीच्या कोणत्या तरी पुस्तकात ते आहे."

"तुम्हाला काय म्हणायचं आहे?" मुख्य न्यायाधीशांनी कडकपणे विचारले.

"हेच, दुसरं काय," इवानने नोटांचे पुडके एकदम बाहेर काढले." हे ते पैसे...त्या पाकिटात घातलेले होते ते (त्याने मेजावर ठेवलेल्या पुराव्यांच्या वस्तूंकडे मानेने खुणावले) ज्यांच्याकरिता आमच्या वडिलांचा खून झाला. हे मी कुठं ठेवू? सुपरिंटेंडंट, घ्या हे."

कोर्टाच्या चोपदाराने ते सबंध पुडके घेतले अन् मुख्य न्यायाधीशांच्या हाती दिले.

"तो पैसा हाच असेल तर हा तुमच्या हाती कसा आला?" मुख्य न्यायाधीशांनी आश्चर्याने विचारले.

"मला तो स्मिर्द्याखफकडून, त्या खुन्याकडून, काल मिळाला...त्यानं स्वतःला गळफास लावून घेण्यापूर्वीच थोडावेळ मी त्याच्याकडं गेलो होतो. आमच्या वडिलांना मारणारा तो होता, माझा भाऊ नव्हता. त्यानं त्यांचा खून केला अन् मी त्याला तो करायला चिथवलं... कुणाला आपल्या बापाचा मृत्यू नको असतो?"

"तुम्ही शुद्धीवर आहात का?" मुख्य न्यायाधीशांच्या तोंडून एकदम आपोआप शब्द बाहेर पडले.

"मला वाटतं मी चांगला शुद्धीवर आहे....तुम्ही....हे सारे बेढब दिसणारे, चेहेरे, जितके शुद्धीवर आहात तितका मी शुद्धीवर आहे." त्याने आपली नजर प्रेक्षकांकडे वळविली. "माझ्या वडिलांचा खून झाला अन् हे आपल्याला धक्का बसल्याचं ढोंग करतात," तो आवेशयुक्त तिरस्काराने गुरकावून बोलला. "हे लोक एकमेकांशी ते ढोंग कायम ठेवतात. खोटारडे! या सर्वांना आपल्या बापांचं मरण हवं असतं. एक सर्प दुसऱ्याला गिळंकृत करतो....जर खून झाला नसता, तर त्यांना राग आला असता अन् ते असंतुष्ट मनानं घरी गेले असते. त्यांना तमाशा बघायला पाहिजे असतो! सर्कसेस! ब्रेड ॲण्ड सर्कसेस! (सरकारच्या खर्चानं करमणूक) त्यातला बोलणारा फक्त मी एक! पाणी आहे का हो? जरा कृपा करून मला पाणी द्या!" त्याने एकदम आपले डोके घट्ट दाबून धरले.

चोपदार चटकन् त्याच्याजवळ आला. आल्योशा एकदम उठून उभा राहिला अन् ओरडला, "तो आजारी आहे. त्याच्यावर विश्वास ठेवू नका; त्याला मेंदूचा ज्वर झाला आहे." कतिरीना इवानोवना उत्स्फूर्तपणे आपल्या जागेवरून उठून उभी राहिली अन् भयाने ताठून जाऊन इवानकडे पाहू लागली. मीत्या उठून उभा राहिला अन् त्याने आतुरतेने आपल्या भावाकडे पाहिले अन् वेड्यासारखे, विचित्र स्मित करून त्याचे बोलणे तो ऐकू लागला.

"काही घाबरू नका. मी वेडा झालेलो नाही, मी फक्त एक खुनी आहे." इवानने पुन्हा बोलायला सुरुवात केली. "खुन्याकडून तुम्ही वक्तृत्वाची अपेक्षा करणार नाहीच," तो कोणत्या तरी कारणाकरता एकदम बोलला आणि चमत्कारिकपणे हसला.

सरकारी वकील उघडच चकित होऊन मुख्य न्यायाधीशांच्या कानाला लागला. ते दुसरे दोघे न्यायाधीश आपापसांत अस्वस्थपणाने कुजबूज करू लागले. फेत्युकोविचने ऐकत असताना आपले कान अधिकच टवकारले. सारे दालन अधीरपणे शांत झाले. मुख्य न्यायाधीशांनी एकदम स्वतःला सावरलेले दिसले.

साक्षीदार, तुमचे शब्द समजण्यासारखे नाहीत. अन् इथं अशक्य वाटतात. शक्य तो तुम्ही शांत व्हा आणि आपली हकीकत सांगा... जर तुम्हाला खरोखरच काही सांगण्यासारखं असेल तर. तुम्ही खरोखरच भ्रमात बोलत नसाल.... तर तुम्ही आता जे बोललात ते सिद्ध कसं करू शकणार आहात?"

" तेच तर आहे. माझ्यापाशी पुरावा नाही. तो पाजी स्मिर्दाखफ काही स्वर्गातून तुम्हाला... एखाद्या पाकिटातून पुरावा पाठविणार नाही. तुमच्या डोक्यात पाकिटाशिवाय दुसरं काही येतच नाही– एक पुरे झालं. माझ्याकडं साक्षीदार नाहीत... मात्र एक आहे म्हणता येईल," तो विचारमग्न होऊन हसला.

" कोण आहे तुमचा साक्षीदार ? "

" न्यायाधीश महाराज, त्याला शेपूट आहे, अन् ते तर निसर्गनियमाला सोडून होणार आहे! ल दिआब्ल नेक्झिस्त प्वॉं (पिशाचाला मुळीच अस्तित्व नाही !) लक्ष देऊ नका; ते एक क्षुद्र, दीन पिशाच्च आहे," तो एकदम म्हणाला. तो हसायचा थांबला. अन् जणू गुह्य सांगावे तशा रीतीने बोलला. " ते इथं कुठंतरी आहे यात शंका नाही. कदाचित पुराव्याच्या वस्तू मांडून ठेवलेल्या त्या मेजाखाली असेल. तिथं नाही तर कुठं ते बसणार ? बरं का, माझं ऐकून घ्या. मी त्याला सांगितलं की, मला गप्प राहायचं नाही, अन् ते भूस्तरांच्या प्रलयासंबंधी बोलू लागलं.... वेडगळ कुठलं ! चला, त्या राक्षसाला सोडून द्या... तो स्तोत्र म्हणतो आहे. याचं कारण त्याचं मन उल्हासी आहे ! रस्त्यावरच्या एखाद्या दारू प्यालेल्या माणसानं 'वान्का पीटर्सबर्गला गेला असं बोंबलावं' तसं हे आहे, अन् मी दोन सेकंद आनंद भोगण्याकरिता परार्धोपरार्ध द्यायला तयार आहे. तुम्हाला मी माहीत नाही ! हुंः, हा सारा मामला किती मूर्खपणाचा आहे ! चला, त्याच्या बदली मला घ्या ! मी उगीच आलो नाही....सारा मूर्खपणा काय सुरू आहे ?... "

आणि तो मंदगतीने, आणि जणू विचारपूर्वक, पुन्हा आपल्याभोवती पाहू लागला. पण कोर्टात यावेळी खळबळ उडाली होती. आल्योशा त्याच्याकडे धावत गेला, पण त्यापूर्वीच कोर्टाच्या चोपदाराने इवानच्या दंडाला धरले होते.

" काय करणार आहेस तू ? " तो त्या माणसाच्या चेहेऱ्याकडे पाहत ओरडला, आणि एकदम त्याच्या खांद्यांना पकडून त्याने त्याला जोराने जमिनीवर फेकून दिले: पण लगेच पोलिस तिथे येऊन दाखल झाले आणि त्याला पकडण्यात आले. तो मोठमोठ्याने ओरडू लागला. आणि त्याला तेथून काढून नेत असताना एकसारखा तो किंचाळत अन् काहीतरी असंबद्ध बडबडत होता.

साऱ्या कोर्टात गोंधळ उडाला. काय काय घडले ते सर्व काही मला आठवत नाही. मी स्वतःच क्षुब्ध झालो होतो अन् काय चाललेय इकडे माझे लक्ष नव्हते. मला फक्त एवढेच माहीत आहे की मागाहून, जेव्हा सर्व स्थिरस्थावर झाले अन् सर्वांना काय घडले ते कळले तेव्हा कोर्टाच्या चोपदाराला ठपका देण्यात आला, परंतु त्याने अतिशय सयुक्तिकपणे खुलासा करून सांगितले की साक्षीदार हा उत्तम स्थितीत होता, एका तासापूर्वी डॉक्टरांनी त्याला पाहिले होते, त्यावेळी डोके बधीर झाल्याची त्याची तक्रार होती, पण तो कोर्टात येईपर्यंत चांगला सुसंगतपणे बोलत

होता, त्यामुळे असे काही घडेल अशी अगोदर कल्पना करणे शक्यच नव्हते– नव्हे, त्याने आपण साक्ष देणार असा आग्रह धरला होता. पण सगळे पूर्णपणे पुन: स्वस्थ होतात अन् या प्रकारातून पूर्वस्थितीवर येतात तत्पूर्वीच दुसरा एक प्रकार लगोलग घडला. कतिरीना इवानोवनाला वाताचा झटका आला. ती हुंदके देऊ लागली, मोठमोठ्याने किंकाळ्या फोडू लागली. पण कोर्टातून बाहेर जाईना, झगडू लागली, अन् आपल्याला तिथून हालवू नका अशी गयावया करू लागली. अचानकपणे ती मुख्य न्यायाधीशांना म्हणाली :

" हा आणखी पुरावा मला ताबडतोब द्यायचा आहे....लगेचच्या लगेच ! हा पहा एक कागद, एक पत्र....हे घ्या, चटकन् वाचा, चटकन वाचा ! हे पत्र त्या राक्षसाकडून– त्या तिथं बसलेल्या माणसाकडून आलेलं आहे ! " तिने मीत्याकडे बोट दाखविले. " त्यानंच आपल्या बापाला मारलं, ते तुम्हाला तत्काळ समजून येईल. त्यानं मला आपण कसे आपल्या वडिलांना मारू ते लिहिलं आहे ! पण तो दुसरा, तो आजारी आहे, तो आजारी आहे हो, तो वातात बडबडतो आहे ! " ती बेभान होऊन तशी ओरडत राहिली.

चोपदाराने तिने पुढे केलेला तो कागद घेऊन मुख्य न्यायाधीशांना दिला, अन् ती आपल्या खुर्चीत गळून पडली. आपला चेहेरा तिने हातांनी झाकून घेतला, झटक्या झटक्यांनी अन् आवाज न करता ती हुंदके देऊ लागली, तिचे सर्वांग गदगदू लागले, आणि आपल्याला कोर्टाबाहेर घालवतील या भीतीने तिने आपला प्रत्येक आवाज दाबून टाकला. तिने दिलेला तो कागद म्हणजे मीत्याने मेत्रोपोलिस खाणावळीत बसून लिहिलेलं पत्र, जे इवानने ' बे दुणे चार 'सारखा पुरावा म्हणून म्हटले होते, ते होते. दुःखाची गोष्ट, की ते ' बे दुणे चारी 'सारखेच निर्णायक- मानले गेले, आणि जर ते पत्र पुढे आले नसते, तर मीत्या आपल्या भावी दुर्गती- तून सुटला असता, किंवा निदान ती दुर्गती कमी भयंकर झाली असती. मी पुन्हा सांगतो, प्रत्येक तपशील पाहणे शक्य नव्हते. पुढे काय झाले त्याचा माझ्या मनात गोंधळच आहे. मुख्य न्यायाधीशांनी, मला वाटते, तो कागद दुसऱ्या न्याया- धीशांच्याकडे, ज्यूरींच्याकडे अन् दोन्ही पक्षांच्या वकिलांच्याकडे दिला असला पाहिजे. त्यांनी साक्षीदारांची तपासणी घ्यायला कशी सुरुवात केली तेवढे मला आठवते. मुख्य न्यायाधीशांनी सौम्यपणे तिला पुरते बरे वाटते आहे का असे विचारले तेव्हा कतिरीना इवानोवना जोराने म्हणाली,

" मी तयार आहे, मी तयार आहे ! तुम्हांला उत्तर द्यायला मी चांगली समर्थ आहे." काहीतरी करून तिला साक्ष देण्याला प्रतिबंध होईल अशी अजूनही तिला भीती असावीसे दिसले. हे पत्र काय आहे अन् कोणत्या परिस्थितीत ते तिला मिळाले याचा सविस्तर खुलासा करायला तिला सांगण्यात आले.

" हे पत्र मला गुन्हा करण्यात आला त्याच्या आदल्या दिवशी मिळालं,

पण ते त्यानं त्याच्याही आदल्या दिवशी लिहिलेलं होतं, त्या खाणावळीत म्हणजे त्यानं तो गुन्हा करण्यापूर्वी दोन दिवस अगोदर. पाहा, ते कसल्यातरी बिलावर लिहिलेलं आहे ! " ती दम घेत म्हणाली, "तो त्यावेळी माझा द्वेष करीत होता, कारण तो माझ्याशी तिरस्करणीय रीतीनं वागला होता अन् त्या भिकारडीच्या मागं लागला होता, कारण तो माझे तीन हजार देणं लागत होता... हं ! त्याच्या स्वतःच्याच हीनपणामुळं त्या तीन हजारांनी त्याची मानहानी झाली होती ! त्या तीन हजारांच्या बाबतीत जे घडलं ते मी सांगते. मी आपल्याला याचना करते, आपल्याला विनवणी करते की माझं ऐकून घ्या. आपल्या बापाचा खून करण्यापूर्वी तीन आठवडे, तो एके दिवशी सकाळी माझ्याकडं आला. याला पैशाची चणचण आहे, अन् त्याला ते कशासाठी पाहिजे आहेत ते मला माहीत होतं. होय, होय— त्या बाईचं मन जिंकायचं अन् तिला घेऊन निघून जायचं यासाठी त्याला ते पाहिजे होते. मला त्यावेळी माहीत होतं की तो माझ्याशी बेइमान झाला आहे आणि मला टाकून द्यायचं त्याच्या मनात आहे. आणि मी, मीच त्याला ते पैसे दिले, मी त्याला ते मॉस्कोला माझ्या बहिणीकडे त्यानं पाठवावे या मिषानं देऊ केले. आणि ते त्याला देत असताना मी त्याच्या मुद्रेकडे पाहिलं आणि म्हटलं की तू ते तुला वाटेल तेव्हा पाठवावेस. 'एक महिन्यापर्यंत पाठविलेस तरी चालेल ! मी त्याला त्याच्या तोंडावर 'तुला पैसा पाहिजे तो माझ्याशी बेइमान होण्याकरिता अन् तुझ्या बाईला घेऊन जाण्याकरिता पाहिजे ना, तर हा तुझ्याकरिता पैसा घे. मी स्वतःच तो तुला देते आहे. तुझ्यात जर तो घेण्याइतका स्वाभिमानच शिल्लक नसेल तर तो घे !' असंच जवळ जवळ म्हणते आहे हे त्याला कळल्यावाचून कसं राहिलं असेल ? कसं शक्य आहे ? तो काय आहे हे त्याला मला सिद्ध करून दाखवायचं होतं, अन् घडलं काय ? त्यानं तो पैसा घेतला, त्यानं तो घेतला, अन् त्या बाईबरोबर एका रात्रीत त्याची उधळपट्टी करून टाकली...पण त्याला माहीत होतं, त्याला माहीत होतं की ते सगळं मला कळलं आहे म्हणून. मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगते की मी तो पैसा त्याची कसोटी पाहण्यासाठी, माझ्याकडून तो घेण्याइतका स्वाभिमान हा गमावून बसला आहे की काय हे पाहण्यासाठी त्याला दिला आहे, हेही त्याला माहीत होतं. मी त्याच्या डोळ्यात पाहिलं अन् त्यानं माझ्या डोळ्यात पाहिलं अन् त्याला ते सारं समजलं आणि त्यानं तो घेतला तो माझा पैसा घेऊन गेला !"

"खरं आहे, कात्या," मीत्या एकदम गरजला, "मी तुझ्या डोळ्यांत पाहिलं आणि तू माझा अपमान करते आहेस हे मला कळलं आणि तरी मी तुझा पैसा घेतला. बदमाष म्हणून माझा तिरस्कार कर, तुम्ही सगळे माझा तिरस्कार करा ! त्याच लायकीचा मी आहे !"

"आरोपी," मुख्य न्यायाधीश ओरडून म्हणाले, "एक शब्द आणखी बोल की मी तुला इथून घेऊन जाण्याचा हुकूम करीन."

कात्या आवेशपूर्ण घाईने पुढे बोलू लागली. "हा पैसा त्याला यातना देत होता. त्याला तो मला परत करण्याची इच्छा होती ही गोष्ट खरी, पण त्याला त्या स्त्रीकरितासुद्धा पैसा हवा होता. म्हणून त्यानं आपल्या बापाचा खून केला, पण त्यानं माझ्या पैशाची फेड केलीच नाही; तिला घेऊन तो त्या खेड्यात गेला, जिथं पुढं त्याला अटक करण्यात आली. तिथं पुनः त्यानं तो पैसा आपल्या बापाचा खून करून चोरलेला उधळूनच टाकला. अन् त्या खुनाच्या आदल्या दिवशी त्यानं हे पत्र मला लिहिलं. ते लिहिताना तो प्यालेला होता. मला ते त्यावेळी चटकन् कळून आलं. त्यानं ते खुनशीपणानं लिहिलं होतं अन् त्याला निश्चितपणानं, अगदी निश्चितपणानं, वाटत होतं की जरी आपण बापाला ठार केलं तरीही ते पत्र कुणालाही दाखविणार नाही. असं त्याला वाटलं नसतं तर त्यानं ते लिहिलं नसतं. कारण मी त्याचा सूड उगविणार नाही, त्याचा सर्वनाश करणार नाही हे त्याला माहीत होतं! पण ते वाचा, ते लक्षपूर्वक वाचा—जरा जास्त लक्षपूर्वक कृपा करून वाचा आणि तुम्हाला दिसून येईल की आपण आपल्या बापाला कसं मारू आणि त्याचा पैसा कुठं ठेवलेला आहे हे सर्व त्यानं, अगोदरच, पत्रात वर्णन करून लिहिलं आहे. पाहा, कृपा करून वरवर पाहू नका, त्यात एक वाक्य आहे, 'इवान निघून जाताच मी त्याला ठार मारीन.' म्हणजे त्याला कसं मारायचं याचा त्यानं अगोदर विचार करून ठेवलेला होता, "कतिरीना इवानोवनाने जहरी अन् द्वेषपूर्ण रीतीने विजयाच्या मुद्रेने न्यायाधीशांच्या ते नजरेस आणले. होय! त्या पत्रातील प्रत्येक ओळीचा तिने बारकाईने अभ्यास केला होता आणि त्यातून निघणाऱ्या प्रत्येक अर्थाचा शोध घेतला होता हे स्पष्ट होते. "तो जर प्यालेला नसता तर त्यानं मला लिहिलं नसतं; पण, पाहा, प्रत्येक गोष्ट त्यात अगोदर लिहिलेली आहे, त्याचप्रमाणे त्यानं मागाहून खून अमलात आणला. त्यात पूर्ण कार्यक्रम आहे!" ती पिसाटासारखी ओरडली.

ती यावेळी स्वतःवर या गोष्टीचे काय परिणाम होतील याबद्दल बिलकुल बेपर्वा होती, अर्थात् तिने एक महिन्यापूर्वीच त्या परिणामांची आगाऊ कल्पना केली होती, कारण, त्या वेळीसुद्धा बहुधा संतापाने थरथरत तिने ते खटल्याचे वेळी दाखवायचे, की नाही दाखवायचे यावर खूप विचार केला होता. आता तिने ती अनर्थकारी उडी घेतली होती. ते पत्र, बहुधा लगेच मागाहून कारकुनाने मोठ्याने वाचून दाखविलेले मला आठवते. त्याने अतिशय जबरदस्त परिणाम केला. त्यांनी मीत्याला ते पत्र लिहिल्याचे कबूल आहे का म्हणून विचारले.

"ते माझं आहे, माझंच आहे!" मीत्या म्हणाला, "मी जर पिऊन धुंद झालेले नसतो तर मी ते लिहिलं नसतं!.... आपण अनेक गोष्टींबद्दल एकमेकांचा द्वेष केलाय, कात्या, पण मी शपथपूर्वक सांगतो. मी जरी तुझा द्वेष करीत होतो तरी त्याचबरोबर तुझ्यावर प्रेम करीत होतो, पण तू माझ्यावर प्रेम करीत नव्हतीस!"

तो आपल्या जागेवर गळून पडला, आणि निराशेने त्याने आपले हात जोडले. असा महत्त्वाचा कागद लपविण्याची आणि आपली साक्ष अगदी थोड्याच वेळापूर्वी एका अगदी वेगळ्या सुरात अन् वृत्तीत देण्याची बुद्धी तिला कशामुळे झाली हे समजावून घेण्याच्या उद्देशाने सरकारी वकिलाने आणि बचावाच्या वकिलाने तिची उलटतपासणी घ्यायला सुरुवात केली.

"होय, होय, मी आता खोट्या गोष्टी बोलत होते. मी माझी अब्रू अन् माझी सदसद्विवेकबुद्धी यांना बाजूला सारून खोटं बोलत होते, पण मला त्याला वाचवायचं होतं, कारण त्यानं माझा इतका द्वेष अन् अतिशय तिरस्कार केलाय!" कात्या पिसाळून म्हणाली. "अहो, त्यानं इतका भयंकर माझा तिटकारा केलाय, तो नेहमीच माझा तिटकारा करीत आला. अन् माहीत आहे, ज्या क्षणी मी त्याच्यापुढं त्या पैशाकरिता खाली वाकले त्या क्षणापासूनच तो माझा तिरस्कार करीत आलाय. मला ते दिसलं... मला ते त्या वेळी चटकन् जाणवलं, पण बराच काळपर्यंत मी त्यावर विश्वास ठेवला नाही. 'काही म्हटलंस तरी तू आपण होऊन माझ्याकडं आली होतीस' हे मी त्याच्या डोळ्यांत किती वेळा तरी वाचलं आहे. हं:, मी त्याच्याकडं का धावत गेले हे त्याला समजलं नाही, त्याला त्याची कल्पना आली नाही, त्याला हलकटपणाखेरीज दुसरी कसलीच शंका आली नाही, त्यानं स्वतःवरून माझी परीक्षा केली, त्याला वाटलं सगळे त्याच्यासारखेच आहेत!" कात्या मोठ्या आवेशानं, पूर्णपणे पिसाट होऊन, फुसकारत होती. आणि त्याला माझ्याशी लग्न करायचं होतं ते फक्त माझ्या वारशाला संपत्ती आली होती म्हणून, त्याकरिता म्हणून बरं, त्याकरिता म्हणूनच! त्याकरिताच ते होतं याची मला नेहमी शंका येई! हं:, तो पशू आहे! त्याला नेहमी खात्रीपूर्वक वाटायचं की मी जन्मभर त्याच्यापुढं शरमेनं थरथर कापत राहीन, कारण मी त्यावेळी त्याच्याकडं गेले होते ना, त्यामुळं माझा त्याकरिता सदोदित तिरस्कार करण्याचा, आणि अशा रीतीनं माझ्याहून श्रेष्ठ होण्याचा आपल्याला हक्क आहे असं त्याला वाटत होतं—याकरिताच त्याला माझ्याशी लग्न करायचं होतं! असं आहे, असं सर्व आहे! मी माझ्या प्रीतीनं त्याला जिंकण्याचा प्रयत्न केला—जिला मर्यादा ठाऊक नाही अशी प्रीती. त्याच्या बेइमानीबद्दल क्षमा करण्याचाही मी प्रयत्न केला; पण त्याला काही काही कळलं नाही! त्याला कळणार नाही कसं म्हणा! तो राक्षस आहे! मला ते पत्र दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मिळालं; माझ्याकडं ते खाणावळीतून कुणीतरी घेऊन आलं. अन् त्या दिवशी सकाळी—सकाळीच मी त्याला सगळ्या गोष्टींची क्षमा करण्याचा विचार केला होता—त्याच्या बेइमानीपणाचीसुद्धा!"

मुख्य न्यायाधीशांनी आणि सरकारी वकिलाने तिला अर्थात् शांत करण्याचा प्रयत्न केला, त्यांना तिच्या उन्मादाचा फायदा घेण्याची आणि अशा कबुल्या ऐकण्याची लाज वाटत असावी असे वाटल्यावाचून राहवत नाही. ते तिला असे

म्हणाल्याचे मला आठवते की, " तुम्हाला हे किती कष्टाचं होतं आहे हे आम्हाला समजतं; आम्हाला तुमच्याबद्दल सहानूभूती वाटते ही खात्री ठेवा." इत्यादी इत्यादी. आणि तरी त्यांनी त्या भ्रमिष्टपणे बडबड करणाऱ्या, उन्माद झालेल्या स्त्रीच्याकडून साक्ष घेतली. तिने शेवटी, इवान गेले दोन महिने " त्या राक्षस खुनीला " त्याच्या भावाला वाचविण्याचा प्रयत्न करीत असताना जवळ जवळ वेडा कसा झाला ते विलक्षण स्पष्टपणाने वर्णन करून सांगितले, असा स्पष्टपणा अशा ताण पडलेल्या मानसिक अवस्थेत जरी केवळ क्षणभर असला तरी, नेहमी पाहायला मिळतो.

ती म्हणाली, " त्यानं अतिशय यातना सोसल्या, तो नेहमीच आपल्या भावाचा अपराधीपणा कमी लेखण्याचा प्रयत्न करी आणि माझ्यापाशी कबूल करी, मीसुद्धा कधी वडिलांच्यावर प्रेम केलं नाही अन् त्यांच्या मरणाची इच्छा धरली. हं:, त्याची सदसद्विवेक बुद्धी कोमल, अतिकोमल आहे हो ! त्याला त्याच्या विवेकबुद्धीच्याच यातना झाल्या ! त्यानं मला सर्व सर्व काही सांगितलं ! तो रोज माझ्याकडं येई अन् आपली एकमेव मित्र म्हणून माझ्याशी बोले. त्याची एकमेव मित्र होण्याचा मान मला लाभला ! " ती एकदम एकप्रकारच्या लढाऊ पवित्र्यात बोलली, अन् तिच्या डोळ्यांत तेज चमकलं. " तो स्मिर्द्याखफला भेटायला दोनदा गेला होता. एक दिवस तो माझ्याकडं आला न् म्हणाला, ' जर माझ्या भावानं नव्हे स्मिर्द्याखफनं तो खून केला असेल (कारण स्मिर्द्याखफनं तो खून केला अशी अफवा सर्वत्र पसरली होती) तर मीसुद्धा त्यात दोषी आहे, कारण स्मिर्द्याखफला माहीत होतं की मला वडिलांच्याविषयी नावड आहे आणि कदाचित् त्याला वाटलं असेल की मला माझे वडील मरावेत अशी इच्छा आहे ! मग मी हे पत्र पुढं काढलं अन् ते त्याला दाखवलं. मग त्याची पुरती खात्री पटली की हे काम आपल्या भावाचंच आहे, अन् त्यानं त्याला पराकाष्ठेचं दुःख झालं. आपला भाऊ पितृहत्यारा आहे हा विचार त्याला सहन होईना ! एक आठवड्यापूर्वीच या विचारानं तो आजारी पडत चालला आहे असं मला दिसलं. गेले काही दिवस तो माझ्यासमक्ष विसंगतपणे बोलत आला आहे. त्याच्या मनाला ताण सहन होईनासा झाल्याचं मला दिसलं. तो बडबड करीत इकडं तिकडं फिरे; तो रस्त्यात आपल्याशीच बोलत असलेला लोकांनी पाहिला. माझ्या विनंतीवरून मॉस्कोच्या डॉक्टरांनी त्याला परवाच्यादिवशी तपासलं आणि ते मला म्हणाले की याला मेंदूचा ज्वर जडण्याचा संभव वाटतो आणि हे सारं त्याच्यामुळं, या राक्षसामुळं ! आणि काल रात्री स्मिर्द्याखफ मेल्याचं त्याला कळलं ! हा एवढा मोठा धक्का त्याला बसला की त्याचं डोकंच फिरलं...आणि हे सारं या राक्षसामुळं, या राक्षसाला बचावण्याकरिता म्हणून हे सारं झालं ! "

ओः ! अशा रीतीनं मनातील भावनांचे खळखळून बाहेर पडणे, अशा प्रकारची कबुली आयुष्यात एकदाच होणे शक्य असते—उदाहरणार्थ, सुळावर

जाताना मरणाच्या दारी ! पण ते कात्याच्या स्वभावातच होते, अन् तिच्या आयुष्यातला तसा हा क्षण होता. ही तीच साहसी कात्या की जिने आपल्या बापाला वाचविण्याकरिता एका दुराचरणी तरुणाच्या दयेवर स्वतःला सोडून दिले होते; ही तीच कात्या जिने थोडक्याच वेळापूर्वी, आपल्या अभिमानाच्या अन् शुद्ध चारित्र्याच्या भरात, या सर्व लोकांसमोर मीत्याच्या उदार वर्तणुकीबद्दल, त्याचं दुर्दैव जरा तरी कमी व्हावे या आशेने, सांगताना, स्वतःचा अन् स्वतःच्या कौमार्यसुलभ लज्जेचा बळी दिला होता. आणि आता पुन्हा तिने स्वतःचा बळी दिला; पण या खेपेस तो त्या दुसऱ्याकरिता होता, आणि बहुधा याचवेळी–कदाचित् त्याच क्षणी–तिला तो दुसरा आपल्याला किती प्रिय आहे याची जाणीव अन् ज्ञान झाले ! तिने त्याच्याबद्दल भय वाटून स्वतःचा बळी दिला, तिला एकाएकी असे वाटले की त्याने, आपल्या भावाने नव्हे आपणच खून केला, अशी कबुली देऊन स्वतःचा सर्वनाश करून टाकला आहे, म्हणून, त्याला त्याचा लौकिक अन् त्याची प्रतिष्ठा यांना वाचविण्याकरिता, तिने स्वतःचे बलिदान केले.

आणि तरी एक भयानक संशय तिच्या मनात आला. आपण मीत्याशी आपले पूर्वीचे संबंध वर्णन करताना खोटे तर बोलल्लो नाही ? हा तिला प्रश्न पडला. छे; मीत्यापुढे आपण वाकलो म्हणून त्याने आपला तिरस्कार केला असे जे आपण ओरडून बोलल्लो त्यात आपण त्याची हेतुपुरस्सर नालस्ती नाही केली ? तिला स्वतःलाच तसे वाटले होते. तसे वागल्यापासून आजतागायत कदाचित् तिची पक्की खात्री झालेली होती की हा साधाभोळा मीत्या, जो त्यावेळीसुद्धा तिला पुजत होता. तो तिचा उपहास अन् तिरस्कार करीत होता. तिने त्याच्यावर प्रेम केले होते ते क्षणिक आवेगातून, केवळ अभिमानातून– दुखावलेल्या अभिमानातून निघालेले ते 'विदीर्ण' प्रेम होते. ते खऱ्या प्रेमासारखे प्रेम नव्हते, सूड घेण्यासारखेच त्याचे स्वरूप होते. अरेरे ! त्या विदीर्ण प्रेमाचे पुढे कदाचित खऱ्या प्रेमात रूपांतर झाले असते, कदाचित कात्याला त्याहून अधिकाची आस नसावी, पण मीत्याच्या बेइमानीपणाने तिच्या हृदयाच्या मर्मावर जबर आघात केला अन् तिचे हृदय त्याला क्षमा करू शकले नाही. सूडाचा क्षण अचानक तिच्यापुढे आला होता, आणि त्या दुखावलेल्या स्त्रीच्या अंतरात इतके दिवस अन् इतक्या व्यथित रीतीने जे साचट आले होते ते एकदम अन् अनपेक्षितपणे बाहेर फुटले. तिने मीत्याचा विश्वासघात केला, पण तसा स्वतःचाही केला. आणि तिच्या भावनांचा बंधारा एकदा पूर्णपणे फुटून जाताच तिच्या मनावरचा ताण अर्थात् संपला आणि तिला लज्जेने घेरले. पुन्हा उन्मादवायू सुरू झाला, ती हुंदके देत अन् ओरडत खाली जमिनीवर पडली. तिला बाहेर नेण्यात आले. त्या क्षणी ग्रूशिंका, शोक-स्वराने, मीत्याकडे धावली. तिला अडविण्याला त्यांना वेळच मिळाला नाही.

"मीत्या," ती आक्रंदन करीत म्हणाली, "तुझ्या नागिणीनं तुझा सत्यानाश

केला रे! पाहिलंस, आपण काय आहोत ते तिनं तुला दाखवलं!" ती संतापाने थरथरत न्यायाधीशांच्याकडे पाहत ओरडली. मुख्य न्यायाधीशांनी खूण करताच त्यांनी तिला धरले आणि तिला कोर्टाच्या बाहेर नेण्याचा प्रयत्न केला. ती ते करू देईना. ती मीत्त्याकडे जाण्याकरिता झगडली अन् धडपडली. मीत्याने मोठ्याने आवाज केला. अन् तो तिच्याकडे जाण्याकरिता धडपडू लागला. त्याला धरून ठेवण्यात आले.

होय, ज्या महिला हे दृश्य पाहण्याकरिता आल्या होत्या त्यांचे समाधान झाले असले पाहिजे. हा तमाशा विविध रंगांनी भरलेला झाला. मग तो मॉस्कोचा डॉक्टर तिथे आल्याचे मला स्मरते. मुख्य न्यायाधीशांनी अगोदरच कोर्टाच्या चोपदाराला इवानला औषधोपचार करण्याची व्यवस्था करण्याकरिता पाठविले होते वाटते. डॉक्टरांनी येऊन न्यायाधीशांना सांगितले की आजारी मनुष्याला मेंदूच्या ज्वराचा धोक्याचा आजार झाला आहे आणि त्याला तत्काळ हलविले पाहिजे. सरकारी वकिलाच्या अन् बचावाच्या वकिलाच्या प्रश्नांना उत्तर देताना ते म्हणाले की रोगी परवाच्या दिवशी स्वेच्छेनेच आपल्याकडे आला होता आणि आपण त्याला असा आजार तुला होणार आहे असे बजावले होते. पण त्याने आपली काळजी घेऊ द्यायला कबुली दिली नव्हती. "तो एरवीच्या मानसिक अवस्थेत नव्हता हे निःसंशय; त्याने स्वतःच मला सांगितलं की आपल्याला जागेपणी दृश्यं दिसतात, आपल्याला रस्त्यात अनेक माणसं भेटली की जी मेलेली आहेत, आणि सैतान रोज संध्याकाळी आपल्याला भेटतो," असे शेवटी डॉक्टरांनी सांगितले. आपला जबाब देऊन ते प्रसिद्ध डॉक्टर निघून गेले. कतिरीना इवानोवनाने दिलेले पत्र पुराव्याच्या वस्तू दाखल करण्यात आले. थोडा विचार-विनिमय केल्यानंतर न्यायाधीशांनी खटला पुढे चालवायचा निर्णय घेतला आणि त्या दोन्ही अनपेक्षित साक्षी (इवानची अन् कतिरीना इवानोवनाची) कागद-पत्रात दाखल करण्याचे ठरविले.

पण मी इतर साक्षीदारांच्या साक्षी तपशीलवार सांगणार नाही, त्यांनी फक्त पूर्वी जे सांगितले गेले होते तेच पुन्हा सांगितले किंवा त्याला दुजोरा दिला, अर्थात् ज्याचे त्याचे वैशिष्ट्य त्यात होतेच. हे सर्व सरकारी वकिलाच्या भाषणात एकत्र गोवले गेले, ते मी आता लगेच घेत आहे. प्रत्येकजण खळबळल्या मनःस्थितीत होता, प्रत्येकावर नुकत्याच घडलेल्या अनर्थाचा विजेसारखा परिणाम झाला होता, आणि सगळे सरकारी वकिलाचे अन् बचावाचे भाषण ऐकण्याकरिता अतिशय उत्कंठित झालेले होते. फेत्युकोविच तर कतिरीना इवानोवनाच्या जबानीने हादरूनच गेल्या-सारखा झाला होता. पण सरकारी वकिलाची मुद्रा विजयाची होती. जेव्हा सर्व साक्षी घेतल्या गेल्या, तेव्हा कोर्ट एक तास तहकूब ठेवण्यात आले. मला वाटते मुख्य न्यायाधीश आपल्या जागेवर परत आले, तेव्हा बरोबर आठ वाजले होते, आणि

आमचे सरकारी वकील, इप्पोलित किरिलोविच यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली.

६

सरकारी वकिलाचे भाषण : स्वभावचित्रण

इप्पोलित किरिलोविचने भाषण करायला प्रारंभ केला तेव्हा तो भावविवशतेने लटलट कापत होता, त्याच्या कपाळावर घाम डबडबला होता, अन् आळीपाळीने त्याला उकडायला लागले होते, अन् थंडी वाजून येत होती. त्याने ते स्वतःच मागाहून सांगितले. हे भाषण म्हणजे आपले Chef of d'oeuvre (प्रमुख कार्य) आपल्या सगळ्या जीवनातील मोठे कार्य, आपली मृत्यूपूर्वीची शेवटची कलाकृती असे तो मानीत होता. तो नंतर नऊ महिन्यांनी जबर क्षयरोगाने वारला, ही गोष्ट खरी. त्यामुळे मागाहून जे घडले त्यावरून, त्याला स्वतःची तुलना आपले शेवटचे गाणे गाणाऱ्या हंसाशी करण्याचा हक्क होता. त्याने आपले सारे तनमन अन् सारी बुद्धी त्या भाषणात खर्ची घातली होती. आणि गरीब बिचाऱ्या इप्पोलित किरिलोविचने अनपेक्षितपणे दाखवून दिले की निदान सार्वजनिक कल्याणाविषयीची आणि 'त्या शाश्वत प्रश्ना'विषयीची काही जाणीव तरी आपल्यात छपून आहे. त्याच्या भाषणाची सर्वोत्कृष्टता जर कशात असेल तर ती त्याच्या कळकळीत होती. त्याला खरोखरच मनापासून आरोपी दोषी आहे असे वाटत होते; तो केवळ आपले सरकारी अधिकाऱ्याचे कर्तव्य म्हणून त्याच्यावर आरोप ठेवीत नव्हता. आणि सूड घेण्याचे आवाहन करताना तो 'समाजाच्या सुरक्षितते'-विषयीच्या खऱ्या कळकळीने थरथर कापत होता. प्रेक्षक वर्गात बसलेल्या स्त्रिया जरी इप्पोलित किरिलोविचला शेवटपर्यंत प्रतिकूल होत्या तरी त्यांनीसुद्धा कबूल केले की, आपल्यावर त्याचा विलक्षण प्रभाव पडला. सुरुवात करताना त्याचा आवाज चिरका झाला होता. पण लगेच त्याला धार चढली आणि त्याने भाषण संपेपर्यंत कोर्ट दणाणून टाकले. पण ते संपताच त्याला घेरी आल्यासारखी झाली.

"ज्यूरीतील सद्गृहस्थहो," सरकारी वकिलाने बोलायला सुरुवात केली, "या खटल्यानं साऱ्या रशियाभर खळबळ माजविली आहे. पण त्यात आश्चर्य करण्यासारखं काय आहे? आपल्याला भयभीत करून टाकण्यासारखं असं विशेष त्यात काय आहे? आपण अशा गुन्ह्यांना कितीतरी सरावलेले आहोत! भयानक आहे ते हे की अशी कृत्यं आपल्याला भिववीनाशी झाली आहेत. हा किंवा तो अशा तुरळक गुन्ह्याचं आपल्याला भय न वाटता आपण त्या गुन्ह्यांना इतके सरावलो आहोत याचंच आपल्याला भय वाटलं पाहिजे. अशा कृत्यांच्या बाबतीत काळाची जी चिन्हं पुढचा भविष्यकाळ काही हेवा करण्यासारखा नाही असं अभद्र

सूचन करणारी आहेत त्यांच्या बाबतीत आपण उदासीन आहोत याची कारणं काय ? मानवाच्या चांगुलपणावर आपल्यात श्रद्धा नाही हे की, जी प्रजा ऐन तारुण्यात असतानासुद्धा कुजत, पिचत चालली आहे त्या प्रजेतील बुद्धीचं अन् प्रतिभेचं अकालीच दिवाळं निघालं हे ? आमच्या नैतिक तत्त्वांना मुळापासूनच जबर धक्का बसला आहे हे त्याचं कारण आहे, की कदाचित् मुळातच या नैतिक तत्त्वांचा आपल्यात पूर्ण अभाव आहे हे ? अशा प्रश्नांना मी उत्तरं देऊ शकत नाही; तरी-सुद्धा ते मनःस्वास्थ्य बिघडविणारे आहेत, अन् प्रत्येक नागरिक त्यांनी पीडला गेलाच पाहिजे, नव्हे या प्रश्नांनी त्याला पीडणं आवश्यकच आहे. आमचा नुकत्याच जन्माला आलेल्या पण अजून भित्र्या असलेल्या वृत्तपत्रांनी लोकांची चांगली सेवा चालविलीच आहे कारण ही वृत्तपत्रं नसती तर आपण बेलगाम अत्याचारांची आणि नैतिक ऱ्हासाची भयानक वर्णनं कधीच ऐकली नसती. ती आम्हाला या वृत्तपत्रांनी सतत माहीत करून दिली आहेत, आणि ती माहिती आजच्या राज्यात स्थापन झालेल्या नव्या ज्यूरी कोर्टात बसणाऱ्यांनाच फक्त दिली गेली आहे असं नाही तर प्रत्येकाला दिली गेली आहे. आणि आपण जवळजवळ रोजच्या रोज काय वाचतो ? अशा गोष्टी की ज्यांच्यापुढं आजची केस फिकी पडेल, अन् अगदीच सामान्य वाटेल. पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे ती ही की आमच्या राष्ट्रात घडणाऱ्या अत्याचारांचे बहुतेक गुन्हे हे व्यापक पसरलेल्या दुराचाराचे द्योतक आहेत, तो दुराचार आपल्यात इतका माजला आहे की त्याच्याशी झगडणं फार कठीण होऊन बसलं आहे.

"एक दिवस आपण पाहतो की उच्च समाजातील एक बुद्धिमान तरुण अधिकारी, आपल्या जीवनक्रमाच्या प्रारंभालाच, भ्याडपणाच्या दगाबाजीनं, मनोदेवतेची यत्किंचितही वेदना न होता, एकेकाळी त्याच्यावर उपकार करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा आणि कामकरी मुलीचा, आपलं त्याच्याकडं असलेलं कर्जखत अन् जो काय रोख पैसा त्याच्यापाशी सापडेल तो चोरण्याकरिता म्हणून खून करतो; 'भपकेबाज जगात मौजमजा उडविण्याकरिता अन् आपल्या भावी जीवनात भरभराट करण्याकरिता हा पैसा बरा उपयोगी पडेल' असं तो म्हणतो. त्यांचा खून केल्यानंतर तो खून केलेल्या प्रत्येक माणसाच्या डोक्याखाली उशा ठेवतो, निघून जातो. दुसरं उदारण, एक तरुण वीरपुरुष, 'शौर्याचं पदक मिळविलेला' आपल्या उपकारकर्त्या वरिष्ठाच्या आईला, एखाद्या वाटमाऱ्या-प्रमाणं, ठार मारतो, आणि आपल्या सोबत्यांना आपल्याला सामील होण्याकरिता विनंती करताना तो ठामपणे सांगतो की 'तिचं माझ्यावर मुलासारखं प्रेम आहे, आणि म्हणून मी सांगेन त्या सूचना ती पाळील आणि कसलीही खबरदारी घेणार नाही.' तो राक्षस आहे मानलं, तरी या काळात मी हे एकच एक उदाहरण आहे असं म्हणू धजत नाही. दुसरा एखादा मनुष्य खून करणार नाही, पण

खुन्यासारखीच भावना अन् विचार करील, तरी तो अंतःकरणानं तितकाच अधम आहे. एकांतात, आपल्या सदसद्विवेकबुद्धीचीच फक्त सोबत त्याला असेल त्यावेळी कदाचित् तो स्वतःला विचारील, इभ्रत म्हणजे हो काय? रक्तपाताचा धिक्कार करणं हा दूषित पूर्वग्रहच नाही काय?'

" कदाचित् लोक माझ्याविरुद्ध ओरडतील की हा रोगट आहे, उन्मादात बोलतो आहे. ही आसुरी निंदा आहे, मी अतिशयोक्ती करीत आहे, असं ते म्हणतील. म्हणू दे त्यांना तसं—अन् परमेश्वरा! जर ती अतिशयोक्ती असेल तर पहिला आनंद मला होईल! हं, माझ्यावर नका विश्वास ठेवू, मला रोगट खुशाल म्हणा, पण माझे शब्द लक्षात ठेवा, मी जे म्हणतो त्याचा दहावा–नव्हे विसावा हिस्सा जरी सत्य असेल–तरी ते महाभयानक आहे! आमची तरुण माणसं कशी आत्महत्या करतात पाहा, ती स्वतःला 'मृत्यूनंतर काय' असा हॅम्लेटसारखा प्रश्नही विचारीत नाहीत, तशा प्रश्नाचं चिन्हही त्यांच्या मनात नसतं, जणू काही आत्म्याशी आणि मृत्यूच्या-नंतर जे आपल्यापुढं वाढून ठेवलं आहे त्याच्याशी संबंधित असलेलं सर्व काही त्यांच्या मनातून पुसून गेलेलं असावं अन् वाळूखाली पुरलं गेलं असावं. आमच्या दुर्व्यसनां-कडे, आमच्या दुराचारी माणसांच्याकडं पाहा. फ्योदर पावलोविच, जो चालू खटल्यातील कमनशिबी बळी आहे, तो यातल्या अनेकांशी तुलना करता निष्पाप अर्भकासारखा म्हणावा लागेल. आणि तरी आपण सारे त्याला ओळखत होतो. आपल्यामध्येच राहत होता ना तो!'...

होय, एक दिवस रशियातले अन् युरोपातले प्रमुख बुद्धिमान लोक कदाचित रशियातील गुन्हेगारीच्या मानसशास्त्राचा अभ्यास करतील असा संभव आहे, कारण तो विषय तशा लायकीचा आहे. पण हा अभ्यास मागाहून, सवडीनं, जेव्हा आजची सर्व उलटीपालटी झालेली स्थिती अधिक मागं पडलेली असेल, तेव्हा होईल, त्यामुळं तिची तपासणी अधिक सूक्ष्म अवलोकनानं आणि मी करू शकेन त्यापेक्षा अधिक निःपक्षपातीपणानं करणं शक्य होईल. आज आपण एक तर भयभीत झालेले आहोत किंवा भयभीत झाल्यासारखं दाखवीत आहोत, तरी खरं म्हणजे आपण ही दृश्यं पाहून मिटक्या मारतो, आणि आमच्या पाखंडी, लाडावलेल्या आळशीपणाला गुदगुल्या करणाऱ्या तीव्र अन् विचित्र संवेदनांवर प्रेम करतो. किंवा, लहान मुलांप्रमाणं, भीतिदायक भूतांना आपण घालवून लावतो अन् उशीत आपली डोकी लपवितो की ती नाहीशी होताच पुनः आपले खेळ अन् मौज मजा सुरूच. पण केव्हा ना केव्हा आपण जीवनाला अत्यंत गंभीरपणे प्रारंभ केलाच पाहिजे, आपण आपल्याकडं समाज म्हणून पाहिलं पाहिजे; आपल्या सामाजिक स्थितीचा काहीतरी अंदाज घेण्याचा प्रयत्न करण्याची किंवा निदान त्या दिशेकडे प्रारंभ करण्याची तरी, आता वेळ आली आहे.

" मागील युगातला एक महान लेखक, (गोगोलचा हा उल्लेख आहे.)

रशियाची कोणा अज्ञात ध्येयाकडं दौडत जाणाऱ्या तीन घोड्यांच्या जलद गाडीशी तुलना करून म्हणतो : ' हे तीन घोड्यांच्या गाडी, पक्षीवेगानं जाणाऱ्या गाडी, तुला कोणी शोधून काढलं बरं ? ' अन् पुढं साभिमान भावनावेशानं म्हणतो की जगातली सर्व प्रजा या अंधपणे दौडणाऱ्या गाडीला जाऊ देण्याकरिता आदरपूर्वक वाट करून द्यायला बाजूला होत असते. कदाचित् तसं असू शकेल, बाजूला होत असतील, आदरपूर्वक किंवा कशा भावनेनं कुणास ठाऊक, पण माझ्या अल्पमतीनं त्या महान लेखकानं आपल्या पुस्तकाचा असा जो शेवट केला तो एकतर पोरकट अन् भोळसट आशावादीपणाला वाव देऊन, किंवा केवळ त्या काळच्या सरकारी वृत्त-नियंत्रणाला भिऊन. कारण जर ही तीन घोड्यांची गाडी सोबाकेविच, नोझद्योव, चिचिकोव हे त्याचे नायक ओढणार असले तर त्या बुद्धिगम्य ध्येयाप्रत पोचणं शक्य नाही, मग ती कोणी का हाकीत असेना. आणि ही तर जुन्या पिढीची दैवतं, आमच्या पिढीची दैवतं तर याहूनही अधिक वाईट नमुन्याची आहेत..."

या ठिकाणी इप्पोलित किरिलोविचच्या भाषणात टाळयांनी व्यत्यय आला. या दृष्टान्ताच्या व्यापक भावार्थाची लोकांनी कदर केली. हे खरे की टाळया फार थोडा वेळ पडल्या, त्यामुळे मुख्य न्यायाधीशांना लोकांना ताकीद देणे अवश्य वाटले नाही, आणि त्यांनी फक्त शिस्त मोडणाऱ्यांच्या दिशेला कडक दृष्टीने पाहिले. पण इप्पोलित किरिलोविचला उत्तेजन मिळाले. त्याला यापूर्वी टाळया कधीच मिळाल्या नव्हत्या ! आयुष्यभर, आतापर्यंत त्याचे कुणी ऐकायलाच तयार नव्हते, आणि आता एकदम त्याला सबंध रशियाचे कान वेधून घेण्याची संधी मिळाली.

त्याने पुढे बोलायला सुरुवात केली : " ज्या कारमाझफ कुटुंबाला, कोणीही इच्छिणार नाही अशी ही कुप्रसिद्धी साऱ्या रशियाभर मिळाली, ते कुटुंब शेवटी काय आहे ? कदाचित माझ्याकडून अतिशयोक्ती होत असेल, पण मला असं दिसतं की आजच्या शिक्षित वर्गाची विशिष्ट प्रकारची मूलभूत रूपरेखा या कुटुंब-चित्रात प्रकट झालेली आहे. अर्थात सूक्ष्म प्रमाणात ' जलबिंदूतील सूर्य जसा.' ज्या दुर्दैवी, दुर्व्यसनी, बेलगाम वृद्ध माणसाचा असा विषादपूर्ण अंत झाला असा मनुष्य एका कुटुंबाचा प्रमुख आहे ! थोर घराण्यात जन्म घेऊन त्यानं आयुष्याला सुरवात केली, पण गरिबीमुळं परावलंबी स्थिती झाली, अशा मनुष्याला अनपेक्षित लग्नामुळं काही थोड्या संपत्तीचा लाभ झाला. हा एक क्षुद्र चाकर, खुशामत्या अन् विदूषक, बरीच चांगली पण न वाढलेली बुद्धी असणारा हा माणूस. पण गंमत अशी की तो पैसे व्याजी लावणारा सावकार झाला आणि त्याची संपत्ती जसजशी वाढत चालली तसतसा तो अधिकाधिक निर्भीड होत गेला. त्याचं दीनवाणं अन् हांजीखोर स्वरूप नाहीसं झालं, त्याचा खुनशी अन् औपरोधिक पाखंडीपणा तेवढाच काय तो शिल्लक राहिला. त्याचं आध्यात्मिक अंग अविकसित राहिलं, तर इकडं त्याचा जोम जबरदस्त वाढला. त्याला आयुष्यात इंद्रियभोगावाचून कशाची

मातब्बरी वाटली नाही, आणि त्यानं आपल्या मुलांना तशाच पद्धतीनं वाढविलं.त्याला बाप म्हणून आपल्या कर्तव्यांविषयी काही जाणीव नव्हती. तो त्या कर्तव्यांचा उपहास करी. त्यानं आपली लहान मुलं नोकरांवर सोपविली, अन् त्याची पीडा गेल्याचा आनंद मानला, त्याची आठवणच तो पूर्णपणे विसरून गेला. त्या म्हाताऱ्या मनुष्याचं ब्रीदवाक्य होतं : आप्रे म्वॉ ल देल्यूज (अब मरे पीछे डुब गयी दुनिया) नागरिक धर्माशी जे जे विरोधी त्याचा तो किल्ला होता, आत्यंतिक स्वरूपाच्या अन् घातकी व्यक्तित्ववादाचा तो आदर्श नमुना होता. 'माझं ठीक चाललं आहे ना, मग जग तिकडं जळेना का, मला काय त्याची पर्वा ?' अन् त्याचं सर्व ठीक होतं. तो संतुष्ट होता, तो त्याच पद्धतीनं आणखी वीस किंवा तीस वर्षे जगण्याची तीव्र इच्छा धरून होता. त्यानं स्वतःच्या मुलाला हातोहात फसवलं आणि त्याचा पैसा– त्याच्या आईकडून वारसात आलेला पैसा– त्याची प्रियकरीण त्याच्याकडून काढण्याचा प्रयत्न करण्यात खर्च केला. अं हं, आरोपीचा बचाव सर्वस्वी माझ्या पीटर्सबर्गच्या विद्वान व्यवसायबंधूकडेच सोपविण्याची माझी इच्छा नाही.खरं आहे ते मीच बोलेन, त्या बापानं आपल्या मुलाच्या हृदयात आपल्याविषयी किती तिटकारा भरून ठेवला असेल ते मी चांगलं समजू शकतो.

पण त्या दुर्दैवी वृद्ध मनुष्याविषयी बोलणं पुरे; त्याला त्याचं प्रायश्चित्त मिळालं. तथापि आपण हे लक्षात घेऊ या की तो बाप होता, अन् अलीकडच्या नमुनेदार बापांपैकी एक होता. खरोखर जेव्हा मी त्याला अनेक आधुनिक बापांच्या नमुन्याचा आहे म्हणतो तेव्हा मी त्या बापांवर अन्याय करतो काय? दु:खाची गोष्ट आहे! त्यांच्यापैकी अनेकजण अशी नास्तिकता उघडपणे बोलत नाहीत. एवढाच फरक आहे, कारण ते त्याच्याहून अधिक सुशिक्षित, अधिक सुसंस्कृत आहेत, पण त्यांचं तत्त्वज्ञान मुळात त्याच्यासारखंच आहे. कदाचित् मी निराशावादी असेन, पण तुम्ही मला क्षमा करण्याचं कबूल केलं आहे. आपण अगोदरच एकमेकांशी ठरवू या, तुम्ही माझ्यावर फार झालं तर विश्वास नका ठेवू, पण मला बोलू द्या. मला जे काय सांगायचं आहे ते सांगू द्या, अन् माझ्या बोलण्यातल्या काही गोष्टींची आठवण तुम्ही ठेवा.

"आता या बापाच्या, या कुटुंब प्रमुखाच्या मुलांसंबंधी. त्यांच्यापैकी एक आपल्यापुढं असलेला आरोपी आहे, माझं पुढचं सारं भाषण त्याच्यासंबंधीच होईल. इतर दोघांसंबंधानं मी फक्त वरवर बोलेन.

"हा सर्वांत थोरला, अत्यंत उत्कृष्ट शिक्षण घेतलेल्या अन् ओजस्वी बुद्धिमत्तेच्या आधुनिक तरुणांपैकी एक आहे, पण त्याची सर्व गोष्टींवरची श्रद्धा उडालेली आहे. त्यानं आपल्या बापाप्रमाणंच अगोदरच पुष्कळसं नाकारलं आहे अन् टाकून दिलं आहे. आपण सर्वांनी त्याची मतं ऐकली आहेत. इथल्या उच्चवर्गीय समाजात त्याचं नेहमीच स्वागत होत असे. त्यानं आपली मतं कधी दडविली

नाहीत, नव्हे त्याच्या उलट आहे, त्यामुळं आता त्याच्याविषयी माझं उघड बोलणं, अर्थात् एक व्यक्ती. म्हणून नव्हे तर कारमाझफ कुटुंबाचा एक घटक म्हणून, अस्थानी ठरणार नाही. या केसशी निकटचा संबंध असलेली दुसरी व्यक्ती आपल्या हातानं काल रात्री इथं मेली. म्हणजे मला तो रोगी वेडा, जो पूर्वी फ्योदर पावलोविचचा नोकर, अन् संभवतः त्याचा अनौरस मुलगा, स्मिर्दाखफ, तो म्हणायचा आहे. प्राथमिक तपासणीत त्यानं एकदम डोळ्यांत अश्रू आणून, तरुण इवान कारमाझफनं आपल्या आध्यात्मिक उद्दामपणानं आपल्याला कसं भयभीत करून सोडलं, ते मला सांगितलं. 'त्याच्या दृष्टीनं जगातलं सर्व काही कायदेशीर आहे, आणि यापुढं कशाचाही निषेध मानता कामा नये– हे त्यानं मला नेहमी शिकविलं.' या सिद्धान्तामुळं त्या वेड्याचं माथं ठिकाणावर राहिलं नसावं, अर्थात अपस्माराचे जे झटके त्याला सारखे येत त्यांनी, आणि या भयानक अनर्थकारी कृत्यानं त्याची बुद्धिशक्ती बिघडण्याला मदत झाली असावी. पण त्यानं एक अतिशय मार्मिक वाक्य उच्चारलं. ते एखाद्या अधिक बुद्धिमान अभ्यासकाला शोभलं असतं, आणि म्हणूनच ते खरोखर मी इथं सांगतो : 'जर या मुलांपैकी कोणी स्वभावानं फ्योदर पावलोविचसारखा असेल तर तो इवान आहे."

या उद्‌गारानं मी त्यांचं स्वभावचित्रण इथं संपवितो. ते याहून अधिक करणं असभ्यपणाचं होईल. हं:, मला यातून अधिक पुढं निष्कर्ष काढायचे नाहीत अन् त्या तरुणाच्या भवितव्याविषयी कावळ्याप्रमाणं काव काव करायची नाही. आज या कोर्टात आपण पाहिलंत की त्याच्या तरुण हृदयात अजूनही चांगल्या भावना आहेत. श्रद्धेच्या अभावानं अन् नास्तिकतेनं त्याच्यातली कुटुंबभावना नष्ट झालेली नाही. ती त्याला स्वतंत्र विचाराच्या अभ्यासानं मिळण्यापेक्षा वारशातूनच त्याच्याकडं आलेली आहे.

आता तिसरा मुलगा. तो तर भाक्तिमान अन् विनीत तरुण मुलगा आहे. आपल्या वडील भावाचा उदासवाणा न् विनाशक जीवन सिद्धान्त तो मानीत नाही. 'लोक भावनां'ना किंवा आमच्या बुद्धिवंत वर्गातील काही मंडळींत त्या नावानं जे काही मानलं जातं त्याला, धरून राहण्याचा त्यानं प्रयत्न केला आहे. तो त्या मठाला चिकटून राहिला, अन् संन्यासीच होण्याच्या बेतात होता. त्याच्यात, माझ्या मतानं, भित्र्या निराशावादाची चिन्हं नकळत अन् इतक्या लहान वयातच दिसून येत आहेत. या निराशावादामुळं अश्रद्धा अन् तिचे मनावर घडणारे दूषित परिणाम यांना भिऊन साऱ्या उपद्रवाचं खापर युरोपीय ज्ञानजागृतीवर फोडणारे जे अनेक लोक आमच्या दुर्दैवी समाजात आहेत ते आपल्या 'मूळ भूमी' कडं (हे त्यांचेच शब्द आहेत) परतायला प्रवृत्त होतात; भ्यालेली मुलं जशी आपल्या जर्जर मातेच्या सुकलेल्या वक्षःस्थलावर झोपी जाण्यासाठी तळमळतात

तसे हे लोक या भयानक गोष्टींपासून बचावण्याकरिताच त्या आमच्या 'मूळ भूमी'च्या कुशीत कायमचं झोपी जाण्याची आस धरतात.

"माझ्या वतीनं मी त्या उत्तम अन् गुणी तरुणाला सुयश चिंतितो; त्याचा तारुण्यसहज आदर्शवाद आणि लोकभावनांकडं त्याची असलेली उपजत प्रवृत्ती, नेहमी घडतं त्याप्रमाणं, अधःपतित होऊन नैतिक बाजूकडं उदासवाण्या गूढवादात आणि राजकीय बाजूकडं अंध अन् संकुचित देशभक्तीत कधीही रूपांतरित न होवो म्हणजे झालं. युरोपीय विचारांविषयी गैरसमजूत अन् विचार न करता केलेला त्यांचा स्वीकार यांनी होणाऱ्या अकाली नाशापेक्षा रशियाला ही दोन तत्त्वं फार मोठ्या प्रमाणात धोकादायक आहेत; असा स्वीकारच त्याच्या ज्येष्ठ भावाला भोवत आहे."

संकुचित देशभक्तीचा अन् गूढवादाचा उल्लेख होताच दोन तीन लोकांनी टाळ्या वाजविल्या. इप्पोलित किरिलोविच खरोखर आपल्याच वक्तृत्व प्रवाहात वाहत गेला. या सर्व गोष्टींचा हाती असलेल्या केसशी काही संबंध नव्हता, शिवाय हे सारे काहीसे मोघम स्वरूपाचे होते ही गोष्ट तर सोडूनच द्या, पण त्या रोगी अन् क्षयी माणसाला आयुष्यात एकदा आपली मते प्रकट करावी अशी असलेली इच्छा आवरता आली नाही. लोक मागाहून म्हणाले की, त्याने जी इवानवर टीका केली ती न शोभणाऱ्या हेतूंची प्रेरित होऊन केली, कारण इवानने पूर्वी एकदा दोनदा वाद करताना त्याच्यावर मात केली होती, आणि ती आठवण ठेवून इप्पोलित किरिलोविचने यावेळी त्याचा सूड घेण्याचा प्रयत्न केला. पण ते खरं की खोटं मला ठाऊक नाही. परंतु हे सर्व केवळ प्रास्ताविक म्हणूनच होते, आणि त्याचे भाषण पुढे त्या केसचा प्रत्यक्ष विचार करण्याकडे वळले.

"पण सर्वांत थोरल्या मुलाकडं आता वळू," इप्पोलित किरिलोविच पुढे बोलू लागला. "तो हा आपल्यापुढं आरोपी म्हणून आहे. आपल्यापुढं त्याचं जीवन अन् त्याची वागणूकही आहे; तो नशीब ठरवणारा दिवस आला आहे आणि सर्व काही उघड झालं आहे. त्याचे भाऊ जर 'युरोपीय तत्त्वज्ञान' अन् 'लोक सिद्धान्त' यांचे प्रतिनिधी म्हणून असल्यासारखे आहेत तर हा आज आहे तशा रशियाचा प्रतिनिधी आहे. मात्र सगळा रशिया नव्हे, सगळा नव्हे हं! तसं असतं तर कंबख्तीच होती! तरी, इथं ही, आपली रशियामाता आहे तिच्या भल्या अन् बुऱ्या स्वरूपात हो, तो स्वयंप्रेरणेच्या आहारी जाणारा आहे, भल्या-बुऱ्याचं विलक्षण मिश्रण त्याच्यात आहे. तो संस्कृतीचा अन् शिलरचा प्रेमी आहे, तरी तो उपाहारगृहात झगडे करतो अन् आपल्या मद्यपी सोबत्यांच्या दाढ्या धरून ओढतो. हं, तोसुद्धा सज्जन अन् उदार होऊ शकतो, पण जेव्हा त्याचं सारं व्यवस्थित असेल तेव्हा. विशेष हे की उदात्त कल्पनांनी तो वाहवून जाऊ शकतो, खरोखर वाहवून जातो, पण त्या

त्याच्या त्याला स्फुरल्या, त्या स्वर्गातून त्याच्यात अवतरल्या तर, जर त्याच्याकरता काही पैसा खर्चावा लागला नाही तर. त्याला कशाकरताही पदरमोड करण्याची नावड आहे, पण घेण्याची फार आवड आहे, अन् हा त्याचा स्वभाव प्रत्येक गोष्टीत आहे. अहो, त्याला जे जे काही जीवनात उत्तम ते द्या (त्याचा कमी प्रतीनं संतोष होणार नाही), आणि त्याच्या मार्गात कसलंही विघ्न आणू नका, की तो आपणही उदारहृदयी होऊ शकतो असं दाखवील. तो लोभी नाही छे: छे:, पण त्याला पैसा हवा असतो, खूप पैसा हवा असतो, आणि मग तुम्ही पाहाल की तो किती उदारपणानं, गलिच्छ अर्थप्राप्तीच्या केवळ्या तिटकाऱ्यानं, तो सारा पैसा एका रात्रीच्या अविचारी भोगतृप्तीत उडवितो. पण त्याच्याजवळ जर पैसा नसेल, आणि त्याची त्याला भयंकर नड असेल तर, तो मिळवायला तो काय करायला तयार होईल हे तो तुम्हाला दाखवील. पण या सर्व गोष्टी मागाहून. आपण घटना जसजशा घडत गेल्या तसतशा घेऊ.

प्रथम, आपल्यापुढं एक गरीब पोरकं पोर, ' पायात बूटसुद्धा न घालता ' परसूच्या अंगणात इकडं तिकडं धावणारं, जसं आमच्या भल्या अन् सन्मान्य अर्थात् मूळ परदेशी असलेल्या नागरिक बंधूनं दुःखपूर्ण रीतीनं आत्ताच प्रकट केलं तसं, आहे. ते मी पुन्हा उच्चारतो, गुन्हेगाराचा बचाव करण्यात मी दुसऱ्या कोणालाही हार जाणार नाही. मी इथं त्याच्यावर आरोप ठेवण्याकरिता उभा असलो तरी त्याचा बचाव करण्यासाठीही उभा आहे. होय, मीसुद्धा माणूसच आहे ! मलासुद्धा स्वभावावर घरच्या वातावरणाचा अन् बाळपणाचा पडणारा प्रभाव अजमावता येतो. पण हा मुलगा वाढतो आणि सैन्यातला अधिकारी होतो; द्वंद्व खेळल्याबद्दल अन् अशाच दुसऱ्या अविचारी वर्तणुकीबद्दल त्याला रशियाच्या अगदी दूरच्या सरहद्दीच्या एका शहरात हद्दपार करण्यात येतं. तिथं त्यानं अधिकारी म्हणून बेकार जीवन घालविलं आहे आणि अर्थातच त्याला पैशाची गरज लागली, सर्वांपेक्षा पैसा त्याला अगोदर पाहिजे झाला, आणि म्हणून बराच काळ वादविवाद केल्यानंतर त्याचा अन् त्याच्या वडिलांचा काही समेट झाला, आणि शेवटचे म्हणून सहा हजार त्याला पाठविले गेले. एक पत्र असं आहे की ज्यात तो राहिलेल्यावरचा आपला हक्क सोडून देतो आणि हे सहा हजार मिळाल्यावर मिळकतीच्या वारशासंबंधीचा वडिलांशी असलेला झगडा मिटवून टाकतो.

" मागाहून येते त्याची एका तरुण मुलीशी घडलेली भेट. ती उच्च शीलाची अन् उत्कृष्ट शिक्षण मिळालेली मुलगी आहे. हं, मी तपशील पुनः सांगण्याच्या भरीस पडत नाही; आत्ताच तुम्ही ते ऐकले आहेत. इज्जत, आत्मबलिदान त्या ठिकाणी दाखवलं गेलं एवढंच सांगतो अन् गप्प राहतो. उथळ मनाचा अन् दुराचारी असा हा तरुण अधिकारी सच्च्या कुलीनतेपुढं अन् उच्च

आदर्शापुढं वंदन करतो असं त्याचं चित्र अतिशय सहानुभूतिपूर्ण पार्श्वभूमीवर आपल्यापुढं दाखविलं गेलं. पण त्या नाण्याची दुसरी बाजू लगेच नंतर याच कोर्टात आपल्यापुढं अनपेक्षितपणे फिरलेली आपल्याला दिसली. पुन्हा मी हे असं का घडलं, याचा तर्कवितर्क करण्याच्या भरीस पडत नाही, पण त्याला कारणं होती. त्याच महिलेनं, फार दिवस दडवून ठेवलेल्या चिडीच्या अश्रूंनी भिजून जाऊन सांगितलं की यानं, दुसऱ्या कोणी नव्हे बरं, या माणसानं, तिच्या त्या कृतीचा धिक्कार केला, ती कृती जरी समजा बेसावधपणे, मी म्हणतो अविचारीपणे, झाली असली, तरी तिच्या मागचा उद्देश किती उच्च अन् उदारपणाचा होता. यानं, यानं-त्या या मुलीच्या वाग्दत्त वरानं तिच्याकडं वेडावणाऱ्या हास्यानं पाहावं, हे तिला दुसऱ्या कोणाच्याही हसण्यापेक्षा जास्त असह्य झालं. आणि यानं आपली प्रतारणा केलीच आहे हे जाणून (त्यानं तिची प्रतारणा केली, आणि आपण जे काही करू ते, अगदी बेइमानीसुद्धा, तिनं सहन करणं प्राप्त आहे असं त्यानं मानलं), तिनं जाणून बुजून त्याला तीन हजार रुबल देऊ केले. अन् हे स्पष्टपणे, अगदी स्पष्ट-पणे, त्याला जाणवून देऊन की माझ्याशी प्रतारणा करण्याकरिता हे मी तुला देत आहे. "पहा तू घेणार आहेस की कसं, इतका तू निर्लज्ज झाला आहेस ? ' हा तिच्या भेदक नजरेत असणारा मूक प्रश्न होता. त्यानं तिच्याकडं पाहिलं, तिच्या मनात काय आहे हे स्पष्ट त्याला दिसलं. (त्याला ते सर्व समजलं हे तिनं आपल्या-पुढं इथं कबूलच केलं), ते तीन हजार साखसूरत हस्तगत केले, अन् आपल्या नव्या प्रीतिपात्राच्या संगतीत दोन दिवसांत उधळून टाकले.

" तेव्हा आपण विश्वास कशावर ठेवायचा ? उदार हृदयाच्या थोर प्रेरणेनं अन् पवित्र चारित्र्याच्या सन्मानार्थ आपल्या जवळचा शेवटचा फार्दिंगसुद्धा होमून टाकणाऱ्या त्या तरुण अधिकाऱ्याची पहिली दंतकथा खरी की हे दुसरं तिरस्करणीय चित्र खरं ? नियम असा आहे की, दोन टोकांमध्ये माणसानं मध्य शोधावा, पण या बाबतीत तो नियम खरा नाही. बहुशः संभव असा आहे की पहिल्या बाबतीत त्यानं खरोखरच थोर मन दाखवलं, अन् दुसऱ्या बाबतीत तितकंच हलकं मन केलं. अन् ते का ? कारण तो ऐसपैस कारमाझफ स्वभावाचा होता–तेच कसं ते मी सांगणार आहे–या स्वभावात अत्यंत विसंगत परस्परविरोधी गोष्टी एकत्र नांदण्याची शक्ती आहे, आणि पराकाष्ठेच्या उच्चतेला अन् पराकाष्ठेच्या तळाला जाण्याची शक्ती आहे. कारमाझफ कुटुंबाला ज्यानं अगदी जवळून पाहिलं आहे त्या तरुण निरीक्षकाचे राकितीनचे, बुद्धिमत्तेचे उद्‌गार लक्षात घ्या; ते म्हणाले, ' अशा अविचारी, असंयमी मनुष्य स्वभावांना स्वतःच्या अधःपाताची जाणीव त्यांच्यातल्या उदात्त औदार्याच्या जाणिवेइतकीच आवश्यक असते. " अन् हे खरं आहे, त्यांना सतत अशा अनैसर्गिक मिश्रणाची गरज असते. एकाच वेळी दोन्ही टोकं पाहिजेत, नाहीतर त्यांना कसंतरी, असमाधानी असल्यासारखं वाटतं, आणि त्यांचं जीवितच

अपूर्ण होतं. ते विशाल, रशिया मातेसारखे विशाल आहेत, त्यांच्या पोटात सर्वांचा समावेश होतो अन् ते सर्व सहन करतात.

"ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, जाताजाता एक गोष्ट सांगायची आहे, आपण आताच तीन हजार रुबलांचा विषय बोललो, अन् मी काही गोष्टींची आगाऊ कल्पना करण्याचं धाडस करतो. तुम्ही कल्पना तरी करू शकाल का की, अशा तऱ्हेचा मनुष्य, ही रक्कम आणि ती अशा रीतीनं, इतका निलाजरेपणा, इतका कलंक, इतकं पराकाष्ठेचं अधःपतन पदरी घेऊन मिळविलेली असताना त्याच दिवशी तिच्यातला अर्धा भाग बाजूला काढून ठेवतो, त्याच दिवशी हे लक्षात घ्या हं, आणि तो एका लहान पिशवीत शिवून सर्व प्रकारचे मोह अन् पैशाची भयंकरग रज बाजूला सारून नंतर सबंध एक महिना स्वतःबरोबर वागवतो, इतकी त्याची शक्ती, इतका चारित्र्याचा खंबीरपणा याच्यात असू शकेल? उपहारगृहात दारूच्या बाटल्यांवर बाटल्या झोकत असताना काय, किंवा आपल्या प्रीतिपात्राला आपल्या बापाकडून पाडल्या जाणाऱ्या मोहाच्या तावडीतून बाजूला करण्याकरिता अत्यंत निकडीनं लागणारा पैसा– देव जाणे कुणाकडून– मिळविण्याचा प्रयत्न करीत खेड्यापाड्यातून धावत असताना काय, तो त्या छोट्या पिशवीला हातसुद्धा लावण्याचं मनात आणीत नाही म्हणे! अहो, ज्या प्रतिस्पर्ध्याविषयी त्याला इतका मत्सर वाटत होता. त्याच्या हाती आपली प्रिया पडू नये एवढ्यासाठीच, त्यानं ती पिशवी खात्रीनं खोलली असती अन् तिच्यावर पाळत ठेवण्याकरिता तो घरीच थांबून राहिला असता, आणि ती आपल्याला 'मी तुझीच आहे' असं केव्हा म्हणेल याची वाट पाहात राहिला असता आणि आपल्या धोक्याच्या परिस्थितीतून दूर तिच्याबरोबर पळून गेला असता, यात शंका काय?

"पण छेः, त्यानं आपल्या त्या ताइताला हात लावला नाही, अन् त्याचं कारण तो काय देतो? मुख्य कारण, मी आत्ताच म्हटलं त्याप्रमाणं, ती जेव्हा आपल्याला 'मी तुझीच आहे, तुला वाटेल तिकडं मला घेऊन चल.' असं म्हणेल तेव्हा तिला घेऊन जाण्याचं काही साधन आपल्याकडं पाहिजे, हे आहे. पण ते पहिलं कारण, आरोपीच्याच शब्दांत, दुसऱ्या कारणापुढं कमी महत्त्वाचं होतं, 'तो पैसा माझ्या अंगावर आहे तोवर मी बदमाष आहे, चोर नाही, कारण मी केव्हाही माझ्या अपमानित वाग्दत्त वधूकडं जाऊ शकतो, अन् मी दगाबाजीनं अफरातफर केलेली अर्धी रक्कम तिच्यापुढं ठेवून तिला मी केव्हाही म्हणू शकतो, हे बघ, मी तुझा अर्धा पैसा उधळून टाकला आहे अन् मी कसा दुर्बल अन् अनीतिमान मनुष्य तुला वाटलं तर बदमाष म्हण, आहे ते दाखवलं आहे. (मी आरोपीचे स्वतःचेच शब्द वापरत आहे), पण जरी मी बदमाष असलो तरी मी चोर नाही, कारण जर मी चोर असतो, तर त्या पैशातली अर्धी रक्कम मी तुझ्याकडं परत आणली नसती, तर जशी ती अर्धी मी घेतली तशी ही घेतली असती! वा रे वा खुलासा! हा

वेडापिसा पण दुबळा माणूस, जो इतका काळिमा पदरी घेऊन ते तीन हजार रुबल स्वीकारण्याचा मोह टाळू शकला नाही, तोच हा मनुष्य एकदम आपल्या अंगी अत्यंत खंबीर विरक्तपणा आणतो. अन् हजार रुबल आपल्या सोबत बाळगतो पण त्यांना स्पर्श करण्याचं धाडस करीत नाही. हे आपण ज्या स्वभावाचं विश्लेषण केलं त्या स्वभावाशी मिळतंजुळतं होतंय का? नाही, आणि खरा दमीत्रि कारमाझफ, जर खरोखर त्यानं तो पैसा दूर ठेवण्याचं आपल्या मनात आणलं असतं तर अशा परिस्थितीत कसा वागला असता ते मी तुम्हाला सांगण्याचं धारिष्ट करतो.

उदाहरणार्थ, पहिल्या मोहाच्या वेळी, ज्या बाईच्या संगतीत त्यानं अर्धा पैसा उधळला तिची आराधना करण्याकरिता त्यानं आपली छोटी पिशवी उसवली असती आणि तिच्यातून काहीशे रुबल काढले असते, कारण त्यानं नेमकी अर्धीच रक्कम, म्हणजे पंधराशे रुबलच, कसे काय काढून घेतले असते; चौदाशे का नाहीत? त्यावेळी तो असंच म्हणाला असता की मी काही चोर नाही, कारण त्यानं चौदाशे रुबल परत आणले. मग दुसऱ्या खेपेला त्यानं पुन्हा ती उसवली असती आणि त्यातून आणखी शंभर काढले असते, अन् तिसऱ्या खेपेला अन् चौथ्या खेपेला असेच काढत काढत महिना संपण्यापूर्वी त्यानं एक नोट शेवटची ठेवून बाकीची काढली असती, आणि मनात म्हटलं की मी जर फक्त शंभरच परत घेऊन गेलो तरी काम भागण्यासारखं आहे, कारण चोर असता तर त्यानं सारेच पैसे चोरले असते, आणि मग त्यानं या शेवटच्या नोटेकडं पाहिलं असतं अन् मनाशी म्हटलं असतं, शंभरच फक्त परत घेऊन जाण्यात खरोखर अर्थ नाही, तेही खर्च करून टाकूया झालं!' खरा दमीत्रि कारमाझफ, जो आपण ओळखतो तो असा वागला असता. या लहानशा पिशवीच्या दंतकथेपेक्षा वस्तुस्थितीशी अधिक विसंगत अशी दुसरी वस्तूच आपण आणू शकत नाही. याहून अधिक असंभाव्य दुसरं काही असू शकत नाही. पण त्याकडं आपण मागाहून येऊ."

चौकशीत बापाच्या अन् मुलाच्या आर्थिक संबंधाविषयी जे बाहेर पडले होते त्याचा थोडा समाचार घेऊन आणि माहीत झालेल्या सत्य गोष्टींवरून यांपैकी कुणाचे चुकीचे होते हे निश्चित करणे अगदीच अशक्य आहे, असे पुनः पुन्हा मांडून इप्पोलित किरिलोविच, मीत्याच्या डोक्यात आपल्याला तीन हजार त्याच्याकडून येणे आहेत हे जे पक्के बसून राहिले होते त्याबाबतीतल्या वैद्यकीय तज्ज्ञाच्या साक्षीकडे वळला.

७

मागील घटनांची तपासणी

"वैद्यकीय तज्ज्ञांनी आम्हाला पटविण्याचा प्रयत्न केला आहे की आरोपीचं

मनं ताळ्यावर नाही, नव्हे तो वेडाच आहे. माझं मत असं आहे की तो चांगला ताळ्यावर आहे, आणि जर तो तसा नसता तर तो अधिक हुषारीनं वागला असता. तो वेडा आहे याबद्दल सांगायचं तर, मी ते मान्य करीन, पण फक्त एका मुद्दयापुरतं, आणि तो म्हणजे, तीन हजारांविषयी त्याच्या डोक्यात घट्ट बसलेली कल्पना. तथापि मला वाटतं त्याची वेडाकडं प्रवृत्ती असण्यापेक्षा त्याहून अधिक साधं कारण मिळण्यासारखं आहे. माझं मत म्हणाल तर मी त्या तरुण डॉक्टराशी पूर्णपणे सहमत आहे, त्यांनी सांगितलं की आरोपीच्या मानसिक शक्ती सततच व्यवस्थित राहत आल्या आहेत, आणि तो फक्त चिडखोर अन् संतापीच झालेला आहे. आरोपीच्या सततच्या अन् जबर रागाचं लक्ष्य खुद्द ती रक्कम हे नव्हतं; त्याच्या मुळाशी एक खास प्रेरक कारण होतं. ते कारण म्हणजे मत्सर !"

इथे इप्पोलित किरिलोविचने आरोपीला ग्रूशिंकाविषयी असलेल्या अनिवार आसक्तीचे सविस्तर वर्णन केले. आरोपी या 'तरुण व्यक्ती'च्या बिऱ्हाडी "तिला मार देण्याकरिता" म्हणून गेला त्या प्रसंगापासून त्यानं सुरुवात केली. "मी त्याचेच शब्द वापरीत आहे" असं त्यानं स्पष्टीकरण केलं– पण तिला मार देण्याऐवजी, तो तिथंच तिच्या पायाशी विसावला. या आसक्त प्रेमाची सुरुवात तिथून आहे. त्याच वेळी आरोपीच्या बापाला त्याच तरुण व्यक्तीचा मोह पडला – एक विचित्र अन् दुर्दैवी योगायोग, कारण त्या दोघांचं एकाच वेळी तिच्यावर मन बसलं, अर्थात दोघंही पूर्वी तिला ओळखत होते. आणि तिच्या बाबतीत दोघांच्याही मनात अगदी जबरदस्त विकार, कारमाझफ वैशिष्ट्यांचा विकार, उत्पन्न झाला. तिनंच आपल्यापुढं तसं कबूल केलं आहे. 'मी त्या दोघांनाही हसत होते' असं ती म्हणते. होय, त्या दोघांचीही चेष्टा करण्याची इच्छा आकस्मिकपणे तिच्या मनात उद्भवली, अन् तिनं दोघांनाही एकाच वेळी जिंकलं. तो म्हातारा पैशाची पूजा करणारा, त्यानं तिच्या एका वेळच्याभेटीकरिता इनाम म्हणून तीन हजार रुबल बाजूला काढून ठेवले, पण त्यानंतर लगेच जर तिनं त्याची रीतसर पत्नी होण्याचं मनात आणलं असतं तर, आपली सारी संपत्ती अन् आपलं नाव तिच्या पायावर त्यानं आनंदानं वाहिलं असतं. त्याबद्दलचा आपल्याकडं पुरावा आहे. आरोपीविषयी बोलायचं तर, त्याच्या नशिबाची शोककथा स्पष्टच आहे; ती आपल्यापुढंच आहे. पण असा हा त्या तरुण व्यक्तीचा 'खेळ' होता. जादुगारिणीनं शेवटच्या क्षणापर्यंत त्या दुर्दैवी मनुष्याला आशा दाखविली नाही, त्यानं तिच्यापुढं गुडघे टेकले होते, अन् अगोदरच आपल्या बापाच्या अन् प्रतिस्पर्ध्याच्या रक्तानं बरबटलेले हात तिच्यापुढं पसरले होते. अशाच स्थितीत त्याला पकडण्यात आलं. 'मला त्याच्याबरोबर सैबेरियाला पाठवा, या अवस्थेला त्याला आणायला मीच कारण आहे, सारा दोष माझाच आहे असा आक्रोश ती बाई त्याच्या अटकेच्या वेळी खऱ्या पश्चात्तापानं करीत होती.

" ज्या बुद्धिमान तरुण गृहस्थाचा मी यापूर्वीच उल्लेख केला आहे, त्या राकितीननं या नायिकेचं स्वभावचित्रण थोडक्यात अन् प्रभावशाली शब्दांत केलं आहे. लहान वयातच तिचा जीवनाविषयी भ्रमनिरास झाला होता, कारण तिचा जो ठरलेला वर होता त्यानं तिला कुमार्गाला लावून तिचा त्याग केला होता अन् अशा रीतीनं तिला फसवून तिचा सर्वनाश केला होता. तिच्या प्रतिष्ठित कुटुंबानं तिचा धिक्कार केला अन् तिची दरिद्रावस्था झाली, तेव्हा एका श्रीमंत वृद्ध गृहस्थानं तिला आश्रय दिला, तथापि त्याला ती अजून आपला उपकारकर्ता मानते. तिच्या तरुण हृदयात बरंच भलेपण असावंसं वाटतं, पण ते हृदय फार लहानपणी कडवट झालेलं होतं. ती शहाणी झाली अन् तिनं पैसा साठवला. तिचं मन समाजाविरुद्ध कटू अन् चिडखोर बनत गेलं. ' तिच्या स्वभावाच्या या चित्रणावरून ती त्या दोघांनाही केवळ कुचेष्टेनं, खुनशीपणानं कशी हसत असेल ते चांगलं समजू शकतं.

" एक महिना आशाभंग करणाऱ्या प्रेमात अन् नैतिक अध:पतनात घालविल्यावर, आणि त्याच काळात आपल्या वाग्दत्त वधूशी बेइमानी करून त्याच्या विश्वासावर सोपविलेल्या पैशाचा अपहार केल्यानंतर आरोपी जवळ जवळ पागलपणाच्या अवस्थेला गेला. सतत मत्सर करीत राहिल्यामुळं तो जवळ जवळ पागल झाला– आणि हा मत्सर कोणाचा? आपल्याच बापाचा! अन् सर्वांत वाईट गोष्ट त्यात ही की, तो चक्रम म्हातारा आपल्या प्रीतिपात्राला लोभ अन् मोह दाखवीत होता तो त्याच तीन हजार रुबलांच्या साधनानं, की जे पैसे मुलगा आपली मालमत्ता त्याच्या आईकडून त्याच्या वारसाला आलेल्या संपत्तीचा भाग म्हणून मानीत होता. अन् आपला बाप त्या बाबतीत आपल्याला फसवतो आहे असा त्याचा समज होता. होय, हे सहन करणं फार कठीणच होतं हे मी मान्य करतो! कोणाही माणसाला त्यामुळं वेड लागलं तर आश्चर्य नाही. पैसा हे त्याचं कारण नव्हतं, तर हा पैसा अशा गर्हणीय निष्ठुरपणानं आपल्या सुखाचा नाश करण्याकरिता वापरला जात आहे हे कारण होतं!"

नंतर सरकारी वकिलानं आरोपीच्या डोक्यात बापाचा खून करण्याचा विचार कसा शिरला याचं वर्णन करून आपलं अनुमान उदाहरणं देऊन स्पष्ट केलं.

" प्रथम तो उपहारगृहात त्यासंबंधानं नुसतं बोलत होता–तो सबंध महिना तो त्यासंबंधानं बोलत होता. हो, त्याला नेहमी माणसांच्या संगतीत राहणं आवडतं, आणि आपपल्या सोबत्यांना सर्व काही, आपल्या अत्यंत सैतानी अन् भयंकर कल्पनासुद्धा, बोलून दाखवणं त्याला आवडतं; आपला प्रत्येक विचार दुसऱ्याला सांगणं त्याला आवडतं, आणि आपण ज्याच्यावर विश्वास टाकतो, त्या माणसानं आपल्याला पूर्ण सहानुभूती दाखवावी अन् आपल्या सर्व अडचणीत अन् चिंतात शिरावं, आपली बाजू घ्यावी अन् आपल्याला विरोध करू नये, अशी कोणत्या का कारणानं होईना, त्याची अपेक्षा असते. तसं झालं नाही की त्याला संताप चढतो

तो उपहारगृहातल्या प्रत्येक वस्तूची तोडफोड करतो. [मग कॅप्टन स्नेनियोंवचा सा येतो.] ज्यांनी आरोपीचे शब्द ऐकले त्यांना शेवटी असं वाटू लागलं की च्या या नुसत्या धमक्या नसाव्यात, अशा तऱ्हेच्या उन्मादानं या धमक्या प्रत्यक्ष ीत उतरण्याचाही संभव आहे.''

इथे सरकारी वकिलाने कारमाझफ कुटुंबातील मंडळींची मठात झालेली भेट, ल्योशाशी झालेले संवाद, आणि आरोपीने आपल्या बापाच्या घरात, नुकतेच चे जेवण झाल्यानंतर, घुसून केलेल्या अत्याचारी वर्तनाचे भयानक दृश्य वर्णन रून सांगितले.

"त्या प्रसंगापूर्वी आरोपीच्या मनात आपल्या बापाचा खून करायचं पणे होतं की काय हे मी निश्चितपणे सांगू शकत नाही. पण ती कल्पना नेक वेळा त्याच्या मनात येऊन गेली होती, अन् त्यानं त्यावर चिंतन केलं होतं. बद्दलची सत्य माहिती, साक्षीदार, अन् त्याचे स्वतःचे शब्दच आपल्यापुढं आहेत. रीतील सद्‌गृहस्थहो, मी कबूल करतो की आज तारखेपर्यंत आरोपीनं त्या बतीत जाणीवपूर्वक पूर्वचिंतन केलेलं होतं असं म्हणावं की काय, याविषयी माझं न डळमळीत होतं खरं. त्यानं त्या घातक प्रसंगाचं चित्र आगाऊ स्वतःपुढं रेखाटलं तं याबद्दल माझ्या मनाची खात्री आहे, पण ते फक्त चित्र होतं. ती शक्यता त्यानं नली होती इतकंच. हा गुन्हा आपण केव्हा अन् कसा करावा यासंबंधी त्यानं श्चितपणे विचार केलेला नव्हता.

"पण मी मात्र डळमळीत होतो तो आज तारखेपर्यंत, तो भवितव्य ठरविणारा गद आताच कोर्टापुढं दाखल होईपर्यंत. तुम्ही स्वतःच त्या तरुण महिलेचा उद्‌-र ऐकलात. 'ही ती पूर्ण योजना, हा जो खुनाचा कार्यक्रम' अशा रीतीनं तिनं दुर्दैवी आरोपीच्या दारूच्या धुंदीतल्या तिरस्करणीय पत्राचं स्वरूप सांगितलं. आणि, खरोखर त्या पत्रावरून खून करायचा ही गोष्ट पूर्वचिंतन केलेली होती असं आपल्याला दिसून येतं. ते पत्र दोन दिवस अगोदर लिहिलेलं होतं, आणि म्हणून आपल्याला आता निश्चितपणे कळतं की, आपली भयानक योजना अमलात आण-याचा पूर्वी अठ्ठेचाळीस तास, आरोपीनं शपथ घेतली होती की, जर आपल्याला द्या ते पैसे मिळू शकले नाहीत, तर आपण, इवान इथून निघून गेल्याबरोबर, ोटा असलेलं ते पाकीट उशीखालून घेण्याकरिता आपल्या वडिलांचा खून रू. 'इवान निघून गेल्याबरोबर'— ऐकलंत ना तुम्ही; म्हणजे त्यानं प्रत्येक गोष्टीचा, प्रत्येक परिस्थितीचा विचार करून ठेवला होता, आणि त्यानं ते कृत्य जसं त्यानं लिहिलं होतं तसं पार पाडलं. पूर्वचिंतनाचा पुरावा निश्चयात्मक आहे; हा गुन्हा पैशाकरिताच केलेला असला पाहिजे, ते स्पष्टपणे नमूद केलेलं आहे, ते लिहून सही केलेली आहे. आरोपीनं आपली सही नाकबूल केली नाही.

"कोणी म्हणतील त्यानं पत्र लिहिलं तेव्हा तो दारू प्यालेला होता. पण

म्हणून काही त्या पत्राची किंमत कमी होत नाही, उलट आहे; त्यानं जे पिऊन लिहिलं ते त्यानं शुद्धीवर असताना आखून ठेवलं होतं. शुद्धीवर असताना जर त्यानं ते आखलेलं नसतं, तर प्यालेला असताना त्यानं ते लिहिलं नसतं. मला विचारलं जाईल की 'मग तो त्याविषयी उपहारगृहात का बोलत होता?' जो मनुष्य अशा गुन्ह्याचं पूर्व चिंतन करतो तो गप्प राहतो अन् आपलं आपल्यापाशी ठेवतो. खरं आहे, पण तो बोलत होता ते ती योजना बनविण्यापूर्वी. त्याला केवळ इच्छा होती तेव्हा. फक्त करावंसं वाटत होतं तेव्हा. मागाहून तो त्या संबंधानं कमी बोलला. त्यानं ज्या संध्याकाळी हे पत्र मेत्रोपोलिस उपहारगृहात लिहिलं, त्या वेळी तो जरी प्यालेला होता तरी, त्याच्या नित्याच्या सवयीच्या विरुद्ध गप्प होता. तो बिलियर्ड्स खेळला नाही, कोपऱ्यात बसून राहिला, कोणाशीही बोलला नाही. त्यानं एका दुकानदाराला त्याच्या जागेवरून उठवलं खरं, पण ते नकळत झाल्यासारखं झालं. कारण तो उपहारगृहात गेला अन् त्यानं दंगा केला नाही असं कधी झालं नाही. त्यानं शेवटचा निर्णय घेतल्यानंतर, आपण आपल्या बेतासंबंधी पूर्वी फार बोललो आहोत, अन् त्यामुळं आपल्याला पकडून मागाहून आपल्यावर खटला होईल, अशी भीती त्याला वाटली असेल हे खरे. पण त्याला आता इलाज नव्हता, तो आपले शब्द काही मागं घेऊ शकत नव्हता, पण त्याच्या नशिबानं पूर्वी त्याला हात दिला होता. आता पुन्हा ते आपल्याला हात देईल असं त्याला वाटलं. त्याचा आपल्या ग्रहावर विश्वास होता बरं! मला हेही कबूल केलं पाहिजे की हे भयानक अनर्थकारी कृत्य टाळण्याचा त्यानं बराच प्रयत्न केला, 'उद्या मी प्रयत्न करून मिळेल त्याच्याकडून पैसे उसने घेईन', असं तो आपल्या विशिष्ट भाषेत लिहितो, आणि जर मला कोणी दिले नाहीत, तर रक्तपात होईल.'

या ठिकाणी इप्पोलित किरिलोविचनं मीत्यानं पैसे उसने काढण्याचे जे जे प्रयत्न केले त्यांचं तपशीलवार वर्णन केलं. तो सॅमसोनोवला भेटला, ल्यागेवीकडं तो गेला होता, हे त्यानं सांगितलं. 'गांजून जाऊन, उपहास होऊन, भुकेजून, या प्रवासाच्या खर्चाकरिता आपलं घड्याळ विकून (आणि तरी तो सांगतो की पंधराशे रुबल आपल्या अंगावर होते– छान कथा आहे!), आपलं प्रीतिपात्र शहरातच आपण सोडून आलो, ती आपल्या गैरहजेरीत फ्योदर पावलोविचकडं जाईल की काय अशा शंकेनं अन् मत्सरानं त्रस्त होऊन, तो शेवटी शहराकडे परत आला, अन् ती आपल्या बापाकडं गेली नाही हे समजून येऊन त्याला आनंद झाला. तो स्वतः तिच्यासोबत तिच्या पालनकर्त्याकडं गेला. (आश्चर्य असं की, त्याला सॅमसोनोवचा मत्सर वाटत होतासं दिसत नाही, मानसशास्त्राच्या दृष्टीनं हे लक्षात घेण्यासारखं आहे.) मग तो घाईघाईनं बागेच्या पिछाडीला आपल्या लपण्याच्या जागी जातो, आणि तिथं त्याला कळतं की स्मिर्द्याखफला फिट आली आहे, तो दुसरा नोकर आजारी आहे– मार्ग मोकळा आहे

आणि त्याला ते 'संकेत' माहीत आहेत– केवढा मोह ! तरीसुद्धा तो मोह आवरतो; तो एका महिलेकडे जातो, ती या शहरात काही दिवसांपासून राहत आहे, आणि आपणा सर्वांना तिच्याविषयी फार प्रेमादर आहे, मादाम होहलाहोवा-मी म्हणत आहे. या बाई आरोपीचा जीवनक्रम फार दिवस बारकाईनं पाहत होत्या, त्यांना त्याच्याबद्दल दया वाटत होती, त्यांनी त्याला अत्यंत विवेकाचा सल्ला देऊन आपल्या जीवनाची व्यर्थ उधळपट्टी, न शोभणारं प्रेमप्रकरण, आपल्या तारुण्याचा अन् जोमाचा दारू गुत्त्यातील दुराचारात अपव्यय हे सर्व सोडून दे आणि सैबेरियाला सोन्याच्या खाणीकडं जा असं सांगितलं. 'तुमच्या उसळी खाणाऱ्या कार्यशक्तींना तुमच्या अद्‌भुत रम्य प्रिय स्वभावाला, तुमच्यातील साहसप्रेमाला हे द्वार मिळेल' असं त्या त्याला म्हणाल्या."

या संभाषणाचा परिणाम अन् ग्रूशिंका सॅमसोनोवकडे थांबली नव्हती हे कळल्यानंतर मत्सराने अन् मानसिक थकव्याने जर्जर झालेल्या त्या दुर्दैवी माणसात तिने आपल्याला फसविले अन् आता ती आपल्या बापाकडे असणार ह्या विचाराने पिसाटपणा कसा आला याचे वर्णन केल्यानंतर, इप्पोलित किरिलोविचने योगायोगाचा निर्णायक प्रभाव किती असतो या विवेचन करून आपला हा मुद्दा पुरा केला. तो म्हणाला: "जर त्या नोकरबाईनं त्याला आपली धनीण मोक्रोयला आपल्या पूर्वीच्या प्रियकराबरोबर गेली आहे असं सांगितलं असतं तर काहीच घडून आलं नसतं. पण तिचं डोकं ठिकाणावर राहिलं नाही, तिला फक्त शपथपूर्वक अन् प्रतिज्ञापूर्वक आपले अज्ञान प्रकट करणं एवढंच शक्य होतं, आणि आरोपीनं तिला तिथल्या तिथंच जर ठार केलं नसेल तर ते तो आपल्या बेइमान प्रियेच्या शोधार्थ धावत निघाला म्हणूनच.

"पण लक्षात घ्या, तो वेडापिसा झाला होता, तरी त्यानं आपल्या बरोबर पितळी पत्ता नेला. तो का? दुसरं एखादं हत्यार का नाही? पण ज्या अर्थी तो आपला बेत योजीत होता अन् स्वतःची त्याकरिता सबंध महिनाभर तयारी करीत होता, त्या अर्थी दृष्टीला पडेल ती हत्यारासारखी कोणतीही वस्तू तो पकडणार, म्हणून त्यानं तत्क्षणी, मागंपुढं न पाहता ओळखलं की, यानं आपलं काम भागेल. तेव्हा त्यानं तो घातक बत्ता उचलला तो काही कोणत्याही रीतीनं अजाणता, निर्हेतुकपणे उचलला नाही. आणि नंतर आपल्याला तो त्याच्या बापाच्या बागेत दिसतो– रस्ता खुला आहे, साक्षीदार कोणी नाहीत, अंधार आहे अन् मत्सराग्नी आहे. ती तिथं, त्याच्या संगतीत, आपल्या प्रतिस्पर्ध्याजवळ त्याच्या बाहूंत आहे अन् कदाचित त्यावेळी आपल्याला उपहासानं हसत आहे या शंकेनं त्याचा जीव उडून गेला. आणि ती फक्त शंका नव्हती, ती फसवणूक उघड, स्पष्ट होती. ती तिथं त्या उजेड असलेल्या खोलीत असली पाहिजे, ती त्या पडद्याच्या मागं असणार; अन् हा दुर्दैवी माणूस– आपण हळूच त्या

खिडकीपाशी गेलो, आदरपूर्वक आत डोकावून पाहिलं अन् विवेकानं मागं फिरलो, नाही तर काहीतरी भयंकर अन् अनैतिक घडेल अशी भीती त्याला वाटली– यावर आम्ही विश्वास ठेवावा म्हणतो. आणि तो त्या विषयी आमचं मन वळवण्याचा प्रयत्न करतो, आमचं की ज्यांना त्याचा स्वभाव माहीत आहे, त्यावेळची त्याची मनःस्थिती माहीत आहे आणि ज्या संकेतांनी त्याला एकदम घरात प्रवेश करणं शक्य होतं त्या संकेताची त्याला माहिती होती हे माहीत आहे, त्यांना तो हे पटवू पाहतो." या ठिकाणी इप्पोलित किरिलोविचने विषयांतर करून स्मिर्द्याखफचा या खुनाशी संबंध असल्याचा जो संशय घेतला जात होता त्याचे यथासांग विवरण केले. त्याने ते अतिशय बारकाव्याने केले, आणि प्रत्येकाला जाणवले की जरी या शंकेला थारा द्यायला तो बिलकूल तयार नव्हता तरी त्याने हा विषय मोठ्या महत्त्वाचा मानला.

८

स्मिर्द्याखफवरील भाष्य

"पहिली गोष्ट, या शंकेला आधार काय?" इप्पोलित किरिलोविचने बोलायला सुरुवात केली. "स्मिर्द्याखफनं हा खून केला असं ओरडणारी पहिली व्यक्ती खुद्द आरोपीच होता, तो तसं आपल्या अटकेच्या वेळी म्हणाला, तरी त्या वेळेपासून आतापर्यंत त्यानं हा आरोप सिद्ध करणारा एकही पुरावा दाखल केला नाही, की पुरावा असल्याचं यत्किंचितसुद्धा सूचित केलेलं नाही. या आरोपाला दुजोरा फक्त तीन माणसांनी दिला आहे.आरोपीचे दोन भाऊ अन् मादाम स्व्येतलोवा या दोघांपैकी थोरल्यानं आपली शंका फक्त आजच व्यक्त केली, अन् त्यावेळी तो मेंदूच्या ज्वरानं आजारी होता हे निःसंशय. पण आपल्याला माहीत आहे की गेले दोन महिने त्यानं आपल्या भावाच्या अपराधीपणाबद्दल आमच्याप्रमाणेच खात्री बाळगली होती अन् या कल्पनेचा प्रतिवाद करण्याचा प्रयत्न केला नव्हता. पण त्यासंबंधी मागाहून. धाकट्या भावानं कबूल केलं आहे की स्मिर्द्याखफच्या अपराधीपणाच्या आपल्या कल्पनेला आधार देणारा यत्किंचितही पुरावा आपल्यापाशी नाही, आणि त्या निष्कर्षाला आपण आरोपीच्या स्वतःच्या शब्दांवरून अन् त्याच्या मुद्रेवरील भावावरून आलो. होय, तो नवलाचा पुरावा त्याच्याकडून आज दोनदा पुढं करण्यात आला. मादाम स्व्येतलोवानं तर त्याहीपेक्षा चकित करून सोडलं. 'आरोपी जे सांगत आहे, ते तुम्ही मानलंच पाहिजे, तो खोटं बोलणारा माणूस नाही असं ती म्हणाली. स्मिर्द्याखफच्या विरुद्ध जो काही सारा पुरावा या तीन माणसांनी मांडला तो हा असा आहे, आणि ही सर्व माणसं आरोपीच्या भवितव्याशी निगडित आहेत. आणि तरी स्मिर्द्याखफच्या अपराधीपणाच्या तर्कानुमानाचा

गाजावाजा केला गेला आहे, ते अनुमान आतापर्यंत मांडलं गेलं आहे अन अजूनही मांडलं जात आहे. ते विश्वासार्ह आहे का ? ते कल्पनेत घेण्याजोगं आहे का ? '

येथे इप्पोलित किरिलोविचला, " ज्यानं वेडाच्या लहरीत आपलं आयुष्य संपुष्टात आणलं." त्या स्मिर्धाखफची व्यक्तिरेखा वर्णन करणे अवश्य वाटले. दुबळ्या बुद्धीचा, वरवर शिक्षण झालेला, त्याच्या पातळीपेक्षा वरचढ. तत्त्वज्ञानाच्या विचारांनी आणि कर्तव्याविषयीच्या विशिष्ट आधुनिक सिद्धान्तांनी मानसिक तोल बिघडलेला, असे त्याचे चित्र त्याने रेखाटले; हे तत्त्वज्ञानाचे विचार आणि कर्तव्या-विषयीचे सिद्धान्त आचारातून शिकला तो. आपल्या धन्याच्या अविचारी जीवन-क्रमातून, हा धनी म्हणजे फ्योदर पावलोविच. हा त्याचा बहुधा बापही असावा. आणि विचारात शिकला तो धन्याचा जो मधला मुलगा इवान फ्योदरोविच त्याच्याशी अनेक वेळा विचित्र तत्त्वज्ञानात्मक संवाद करून. इवान, बहुधा कंटाळा आला म्हणून किंवा या हुजऱ्याच्या निमित्ताने स्वतःची करमणूक करून घेण्याच्या इच्छेने अशा मनोविनोदात खुषीने रममाण होई. इप्पोलित किरिलोविच खुलाशादाखल म्हणाला, " त्यानं स्वतःच मला त्याच्या बापाच्या घरी गेल्या काही दिवसातील आपल्या आंतरिक स्थितीसंबंधी सांगितलं. पण इतरांनीही म्हणजे आरोपी स्वतः, त्याचा भाऊ, अन् नोकर ग्रिगरी यांनी, म्हणजे जे त्याला चांगलं ओळखत होते अशा लोकांनीसुद्धा त्याचा पाठपुरावा केला आहे."

" शिवाय, स्मिर्धाखफची तब्येत अपस्माराच्या वरचेवर येणाऱ्या झटक्यांनी ढासळली होती, त्याच्यात एवढंसंसुद्धा धैर्य नव्हतं. 'तो माझ्या पायांवर पडला अन् त्याचं त्यानं चुंबन घेतलं' असं खुद्द आरोपीनं आपल्याला सांगितलं आहे, अर्थात् ते या आपल्या विधानानं आपलं किती नुकसान होणार आहे हे त्याला कळण्यापूर्वी ' अपस्माराला बळी पडलेलं कोंबडीचं पिल्लू, असं त्यानं आपल्या विशिष्ट भाषेत त्याच्याविषयी सांगितलं. आणि आरोपीनं त्याची आपला विश्वासू म्हणून निवड केली. (आपल्याकडं त्याचा त्याबद्दलचा स्वतःचा जबाब आहे) आणि त्याला घाबरवून टाकून शेवटी आपला हेर म्हणून काम करण्याला संमती द्यायला त्याला भाग पाडलं. त्या रीतीनं स्मिर्धाखफनं आपल्या धन्याची फसवणूक केली, आरोपीला आत नोटा असलेलं पाकीट असल्याचं आणि ज्या संकेतांनी त्याला घरात प्रवेश करता येईल त्या संकेतांबद्दलचं गुपित फोडलं. त्याला खरोखर ते न सांगता राहणं शक्य तरी कसं होतं ? ' त्यानं मला ठार केलं असतं, मला त्यानं ठार केलं असतं हे मला दिसत होतं.' असं तो तपासणीत म्हणाला, आणि जरी त्याला छळणारा त्यावेळी पकडला गेला होता अन् तो त्याला काही करू शकत नव्हता तरी ते सांगतांना आमच्यापुढं तो थरथर कापत होता. ' क्षणोक्षणी तो माझ्याविषयी शंका घेई. भीतीनं अन् थरकाप होऊन मी त्याला शांत करण्याकरिता लगेचच्या लगेच जे काय गुप्त असेल ते सारं सांगत होतो, अशा करिता की मी त्याला फसवत

नाही हे त्याला दिसावं अन् त्यानं मला जिवंत सोडावं.' हे त्याचे स्वतःचे शब्द आहेत. मी ते लिहून घेतले आणि लक्षात ठेवले. 'तो माझ्या अंगावर ओरडू लागला की मी माझे गुडघे टेकून खाली पडे.'

"तो स्वभावतः अतिशय प्रामाणिक होता आणि त्याच्या धन्याचे काही गमावलेले पैसे त्यानं त्याला परत शोधून दिले तेव्हापासून कायम त्यानं आपल्या धन्याचा संपूर्ण विश्वास मिळविला होता. त्यामुळं त्या गरीब बापड्याला आपल्या मालकाला फसविल्याबद्दलच्या पश्चात्तापाच्या वेदना सोसाव्या लागल्या असतील हे आपण समजू शकतो, कारण त्याचं मालकावर आपला उपकारकर्ता म्हणून प्रेम होतं. तीव्र अपस्मारानं पीडलेली माणसं नेहमी स्वतःची सतत अन् अहितकर निंदा करण्याच्या प्रवृत्तीची असतात असं अतिशय जाणते डॉक्टर लोक आपल्याला सांगतात. त्यांना आपल्या 'दुष्टपणा'बद्दल चिंता वाटत असते, सदसद्विवेकबुद्धीच्या टोचणीमुळे ते हैराण असतात, अन् याला पुष्कळ वेळा काही कारण नसतं, ती पराच कावळा करतात अन् पुष्कळ वेळा नाना प्रकारचे दोष अन् गुन्हे कल्पनेनं रचतात. आणि अशा तऱ्हेचा मनुष्य आपल्याला इथं पाहायला मिळतो, तो खरोखर भयानं अन् धाकदपटशानं दुष्कृत्य करायला प्रवृत्त झाला होता.

"खेरीज, त्याच्या मनात आगाऊ एक जबरदस्त भीतियुक्त शंका वावरत होती की आपल्या डोळ्यांपुढं जी परिस्थिती बनत चालली आहे तिचा काही तरी भयानक परिणाम होणार आहे. हा अनर्थकारक प्रकार घडण्यापूर्वी, इवान मॉस्कोला निघाला असताना, स्मिर्द्याखफनं त्याला राहण्याची विनवणी केली, अर्थात् आपल्याला कशाची भीती वाटते हे स्पष्टपणे सांगण्याचं धारिष्ट त्याच्यात नव्हतं. तो फक्त सूचकतेनंच सांगत होता. पण त्याच्या या इशाऱ्यांची समजच कुणाला आली नाही.

"इवानकडं तो एक आपला संरक्षक म्हणून पाहत होता हे लक्षात घेतलं पाहिजे, त्याचं घरात असणंही काही वाकडंतिकडं होणार नाही याची हमी असल्या-सारखी होती. दमीत्रि कारमाझफच्या पत्रातलं ते वाक्य लक्षात आणा: 'मी त्या म्हाताऱ्याला ठार करीन, फक्त इवान इथून गेला पाहिजे. तेव्हा इवानची हजेरी ही प्रत्येकालाच घरात शांतता अन् सुव्यवस्था राहण्याची हमी होती.

"पण तो निघून गेला, अन् स्मिर्द्याखफला त्याचा तरुण मालक जाऊन तास होतो न होतो तेवढ्यात अपस्माराचा झटका आला. पण ते अगदी समजण्याजोगं आहे. याठिकाणी मला हे नमूद केलं पाहिजे की एक प्रकारच्या भयानं अन् निराशेनं गांजून गेलेल्या स्मिर्द्याखफला त्या गेल्या काही दिवसांच्या काळात असं जाणवत होतं की ताण पडला असताना आपल्याला जशा फिटा येतात तशा फिटा पुन्हा आपल्याला यायला लागणार. तशी फिट येण्याचा दिवस अन् घटका काही

अर्थात अगोदर समजत नसते; पण प्रत्येक अपस्माराच्या रोग्याला आपल्याला आता ती येण्याचा संभव आहे असं अगोदर वाटणं शक्य असतं, असं डॉक्टर लोक सांगतात. आणि म्हणून, इवान फ्योदरोविच गाडीत बसून आवाराच्या बाहेर जाताच, स्मिर्दाखफ, आपल्या एकाकी अन् असुरक्षित अवस्थेनं गांगरून जाऊन, तळघराकडं गेला. तो जिन्यावरून उतरत असताना त्याला आपल्याला फिट येणार तर नाही, अन् ती एकदम आली तर काय करायचं असं वाटत होतं. आणि त्या कल्पनेमुळेच, त्या नुसत्या वाटण्यामुळंच त्याच्या घशात अशा फिटा येण्यापूर्वी जसे झटके नेहमी यायला लागतात तसा झटका आला आणि तो बेशुद्ध होऊन तळघरात पडला. आणि या पूर्णपणे नैसर्गिक घटनेविषयी लोक शंका घेऊ पाहतात, तो हेतुपुरस्सर फिट आल्याचं सोंग करीत असला पाहिजे असं सूचन करतात. पण जर ती हेतुपुरस्सर असती, तर मग एक प्रश्न एकदम निर्माण होतो, त्याचा त्यात हेतू काय? त्यानं मनात काय हिशेब बांधला होता? त्याला काय साधायचं होतं? मी वैद्यकशास्त्रासंबंधी काही म्हणत नाही; मला असं सांगण्यात आलं आहे की शास्त्र आडमार्गाला जाऊ शकतं; ढोंग अन् खरं यांतला भेद ओळखून काढणं डॉक्टरांना शक्य झालं नाही. तसं असेल कदाचित्, पण एका प्रश्नाचं मला उत्तर द्या : असं ढोंग करण्यामागं त्याच्या मनात हेतू काय? खून होण्याच्या थोडं अगोदर फिट झाल्यासारखं करून साऱ्या घरादाराचं लक्ष ओढून घेण्याची त्याची इच्छा असू शकेल? तो खुनाचा कट करीत असेल?

"ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, आपण पाहा, खुनाच्या रात्री, फ्योदर पावलोविचच्या इथं पाच माणसं होती— तो स्वतः (पण त्यानं स्वतःला मारलं नाही हे निश्चित); नंतर त्याचा नोकर ग्रिगरी, पण तो स्वतःच जवळ जवळ मारला गेल्यासारखा होता; तिसरी व्यक्ती म्हणजे ग्रिगरीची बायको मार्फा इग्नात्येवना, पण तिनं आपल्या धन्याला मारलं असल्याची कल्पना करणंसुद्धा लज्जास्पद होईल. दोन माणसं राहतात – आरोपी अन् स्मिर्दाखफ. पण जर आपण आरोपीचं म्हणणं, मी खून केला नाही, हे मानायचं म्हटलं, तर मग स्मिर्दाखफनंच खून केला असला पाहिजे, कारण दुसरा काही पर्यायच राहत नाही, दुसरा कोणी आढळात येऊच शकत नाही. काल ज्यानं आत्महत्या केली त्या दुर्दैवी वेड्यावर जो कावेबाजपणाचा विस्मयजनक आळ घेतला जातो त्याचं कारण हे आहे. जर दुसऱ्या कोणावर संशय ठेवायला जागा असती, जर तिथं कोणी सहावी व्यक्ती असती तर आरोपीलासुद्धा स्मिर्दाखफवर आळ घेण्याची लाज वाटली असती अशी माझ्या मनाची समजूत आहे. त्यानं त्या सहाव्या माणसावर आरोप केला असता, कारण स्मिर्दाखफनं तो खून केला आहे असा आरोप करणं हे पूर्णपणे हास्यास्पद आहे.

"सद्‌गृहस्थहो, आपण मानसशास्त्र बाजूला ठेवू. आपण वैद्यकशास्त्र बाजूला ठेवू, आपण तर्कशास्त्रसुद्धा बाजूला ठेवू, आपण फक्त सत्यस्थितीकडे वळूया. अन्

ती काय सांगते हे पाहू या. जर स्मिर्द्याखफनं त्याला मारलं असेल तर ते त्यानं कसं मारलं? एकट्यानं की आरोपीच्या साहाय्यानं? पहिला पर्याय विचारात घेऊ– त्यानं एकट्यानंच ते कृत्य केलं. जर त्यानं त्याला मारलं असेल तर ते कोणत्या तरी हेतूनं, स्वतःचं काही साधण्याकरिता मारलं असलं पाहिजे. पण आरोपीच्या मनात जो हेतू होता– द्वेष, मत्सर वगैरे– त्याचा लवलेशसुद्धा त्याच्यात नसल्यामुळं, स्मिर्द्याखफनं काही लाभाकरिता, त्याच्या धन्यानं त्या पाकिटात जे तीन हजार रुबल ठेवलेले त्यानं पाहिले होते ते हडप करण्याकरताच त्यानं त्याचा खून केला असला पाहिजे. आणि तरी तो दुसऱ्या व्यक्तीला–अशा व्यक्तीला की जिचे हितसंबंध त्यात अतिशय गुंतलेले आहेत, म्हणजे आरोपीला-त्या पैशासंबंधी अन् त्या संकेतांसंबंधी, पाकीट कुठं ठेवलं आहे, त्यावर काय लिहिलं आहे, ते कशानं बांधलेलं आहे, या-संबंधी सांगतो, अन् सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, ज्या संकेतांनी त्याला घरात जाता येईल त्या संकेतासंबंधी त्यानं त्याला सांगितलं आहे. हे त्यानं केलं ते फक्त स्वतःची फसवणूक करण्याकरिताच केलं की, ते पाकीट स्वतःसाठी मिळवायला जो उत्सुक असणार त्याला त्याच साहसात भाग घ्यायला बोलावण्याकरिता केलं? 'होय,' कोणी मनी म्हणतील, 'पण त्यानं भीतीनं तो विश्वासघात केला.' पण याचा खुलासा तुम्ही काय देता? जो मनुष्य अशा साहसी, जंगली कृत्याची कल्पना करू शकतो अन् ती पार पाडू शकतो, तो अशा गोष्टी सांगतो की, ज्या जगात दुसऱ्या कोणालाही माहीत नाहीत अन् जर त्यानं आपलं तोंड उघडलं नसतं तर, कुणाला तर्कानंही कळल्या नसत्या!

"छेः, तो कितीही जरी भ्याड असला तरी, जर त्यानं त्या गुन्ह्याचा कट रचला असला तर काही झालं तरी तो कोणालाही त्या पाकिटासंबंधी अन् संकेता-संबंधी सांगायला प्रवृत्त झाला नसता. कारण ते त्याचं त्यानं स्वतःलाच अगोदर फसविणं झालं असतं. जर त्याला माहिती देण्याची सक्ती झाली असती तर, त्यानं काही तरी बतावणी केली असती, काही तरी खोटं सांगून दिलं असतं, पण त्यानं त्याबद्दलचा पत्ता लागू दिला नसता. कारण, उलटपक्षी जर तो पैशासंबंधी काही बोलला नसता अन् त्यानं खून करून पैसा चोरला असता, तर जगात कोणीही त्याच्यावर चोरीकरिता खुनाचा आरोप ठेवू शकलं नसतं, कारण त्याच्यावाचून दुसऱ्या कुणीही तो पैसा बघितलेला नव्हता. त्याच्यावाचून दुसऱ्या कुणालाही तो घरात असल्याचं माहीत नव्हतं. जरी समजा त्याच्यावर खुनाचा आळ घेतला असता तरी त्यानं तो दुसऱ्या काही हेतूनं केला आहे असंच मनात येणं शक्य होतं. पण ज्याअर्थी कुणालाही त्याच्यात पूर्वी असला कसलाही हेतू दिसून आलेला नव्हता, आणि उलट प्रत्येकाला त्याच्या धन्याचा त्याच्यावर लोभ आहे आणि आपला विश्वास त्याच्यावर ठेवून त्याची प्रतिष्ठा त्यानं ठेवली आहे हे दिसून आलेलं होतं. त्याअर्थी अर्थात त्याचा संशय येणं शक्यच नव्हतं. लोकांनी अगोदर त्या

माणसाचाच संशय घेतला असता ज्याच्या मनात हेतू होता, ज्यानं स्वतःच तसा आपला हेतू असल्याचं जाहीरपणे सांगितलं होतं, त्यानं त्या बाबतीत गुप्त काही ठेवलेलं नव्हतं. त्यांनी खरोखर खून झालेल्या माणसाच्या मुलाचा, म्हणजे दमीत्रि फ्योदरोविचचाच संशय घेतला असता. जर स्मिर्द्याखफनं त्याला ठार मारून त्याची चोरी केली असती, आणि मुलावर आळ घेतला गेला असता, तर ते स्मिर्द्याखफला अनुकूलच झालं असतं. असं असलं तरीसुद्धा खुनाचा कट त्यानं रचला असला तरी त्यानं त्या मुलाला म्हणजे दमीत्रिला त्या पैशासंबंधी, पाकिटा-संबंधी अन् संकेतासंबंधी सांगितलं असं आपण मानायचं काय? हे तर्काला धरून आहे काय? मी काय म्हणतो ते स्पष्ट झालं ना?

स्मिर्द्याखफनं योजलेल्या खुनाचा दिवस आला त्या दिवशी तो जिन्यावरून खाली फिटचं ढोंग करून पडतो. कोणत्या हेतूनं? पहिली गोष्ट म्हणजे, त्या ग्रिगरीनं जो आपला औषधोपचार करण्याचा विचार केलेला होता तो कदाचित पुढं ढकलला असता अन् घराची निगा राखणारं कोणी नाही असं पाहून तो पहाऱ्यावर राहिला असता, आणि दुसरी गोष्ट, मला वाटतं, त्याच्या धन्यानं आपल्या संरक्षणाकरिता कुणीच नाही असं पाहून अन् आपला मुलगा येईल अशी भीती वाटून आपला पहारा अन् घ्यायची काळजी दुप्पट केली असती. आणि, सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मला असं वाटतं की फिटनं पांगळा झालेल्या स्मिर्द्याखफला, जिथं तो नेहमी इतरांच्यापासून बाजूला झोपत असे, अन् जिथून त्याला वाटेल तशी ये जा करणं शक्य होतं त्या स्वैपाकघरातून नेऊन वसतिघराच्या दुसऱ्या टोकाला जिथं ग्रिगरीची खोली होती तिथं ठेवण्यात आलं असतं. तिथं नेहमीच त्याला, त्यांच्या अंथरुणापासून तीन कदमांवर मध्ये एक पडदा ठेवून, ठेवण्यात येत असे. त्याला जेव्हा जेव्हा फिट येई, तेव्हा तेव्हा असे ठेवायचे ही त्याच्या धन्यानं अन् दयाळू अंतःकरणाच्या मार्फा इग्नात्येवनानं घालून ठेवलेली फार जुन्या काळापासूनची प्रव्यवस्था होती. तिथं, त्या पडद्याच्या मागं पडल्या पडल्या, त्यानं, आपलं ते ढोंग कायम ठेवण्याकरता, विव्हळायला सुरुवात करणं प्राप्त होतं. असा मोठा संभव आहे, त्यानं ते दोघं रात्रभर जागे राहिले असते (ग्रिगरी अन् त्याची बायको यांनी तसंच आपल्या साक्षीत सांगितलं आहे.) आणि हे सर्व कशाकरिता, तर आपल्याला साखसुरत उठता यावं अन् आपल्या धन्याचा खून करता यावा म्हणून!

पण त्यानं हा खोटाच आजार हेतुपुरस्सर घेतला होता अशाकरिता की आपला संशय येऊ नये आणि त्यानं आरोपीला त्या पैशाबद्दल आणि संकेताबद्दल सांगितलं ते त्याला खून करण्याचा मोह पडावा म्हणून, आणि त्यानं जेव्हा खून केला अन् तो पैसे घेऊन गेला, तेव्हा मोठा संभव आहे की तो आवाज करीत अन् लोकांना जागं करीतच गेलेला असणार, की लगेच स्मिर्द्याखफ उठला अन् आत गेला, असं मी समजायचं? कशाकरिता? आपल्या मालकाचा पुन्हा दुसऱ्यांदा खून

करण्याकरिता अन् जो पैसा अगोदरच चोरीला गेला आहे तो घेण्याकरिता ? सद्-गृहस्थहो, आपण हसता आहात काय ? या कल्पना मी आपल्यापुढं ठेवतो आहे याची मला लाज वाटते, पण अविश्वासार्ह जरी हे दिसतं, तरी बरोबर तेच हा आरोपी म्हणत आहे. जेव्हा घर सोडून तो गेला, जाताना ग्रिगरीला त्यानं ठोसा देऊन पाडलं, अन् आरडाओरडा केला, तेव्हा स्मिर्याखिफ उठला, आत गेला अन् आपल्या धन्याचा खून करून त्यानं पैसा चोरला, असं तो आपल्याला सांगतो ! स्मिर्याखिफनं अगोदर याचा अंदाज बांधलेला असणं, आणि भडकलेला अन् चिडून गेलेला मुलगा, त्याला ते संकेत माहीत असताना, फक्त आदरपूर्वक आत डोकावण्या-करिताच येईल अन् त्यांच्या लुटीचा पैसा आपल्याला ठेवून मागच्या पावली परत जाईल अशी कल्पना केलेली असणं शक्य वाटत नाही. ज्यूरीतील सद्गृहस्थहो, मी हा प्रश्न तुम्हांला गंभीरपणे विचारतो की स्मिर्याखिफ हा गुन्हा करू शकला असेल तो क्षण कोणता असेल ? तो क्षण सांगा, अन्यथा तुम्हाला स्मिर्याखिफवर आळ घेता येणार नाही.

"पण कदाचित, ती फिट् खरीच असेल, त्या आजारी माणसाला चटकन् बरं वाटलं असेल त्यानं तो ओरडा ऐकला असेल, अन् तो बाहेर गेला असेल. ठीक, पुढं काय ? त्यानं आपल्या आजूबाजूला बघितलं अन् मनाशी म्हटलं : 'आत्ताच जाऊन धन्याचा खून का करू नये ?' आणि त्याला काय घडलेलं आहे याची काय माहिती असणार, कारण त्या क्षणापर्यंत तो बेशुद्धच पडलेला होता ! पण कल्पनेच्या वावड्या उडवायच्या तरी किती ? त्यालाही काही सुमार आहे.

"'बरोबर,' काही मुत्सद्दी माणसं मला म्हणतील, 'पण जर त्यांचं संगनमत असलं तर ? जर त्यांनी मिळून त्याचा खून केला असेल अन् पैसा वाटून घेतला असेल तर ?' विचार करण्याजोगा प्रश्न आहे खरा ! आणि त्याला दुजोरा देणारे पुरावेही चकित करणारे आहेत. एकजण खून करतो अन् सारे कष्ट घेतो तर त्याचा साक्षीदार फिटचं ढोंग करून एका बाजूला पडून राहतो, उघडच प्रत्येकामध्ये संशय उत्पन्न करण्याकरिता त्याच्या धन्याच्या मनात अन् ग्रिगरीच्या मनात धसका उत्पन्न करण्याकरिता. अशा तऱ्हेचा मूर्खपणाचा कट रचण्याला हे दोघे साथीदार कोणत्या हेतूंनी प्रवृत्त झाले असतील हे समजून घेणं मनोरंजक होईल.

"पण कदाचित् स्मिर्याखिफकडून या कामी सक्रिय साथ नसेल, फक्त काही न करता निमूट संमतीचाच प्रकार असेल; कदाचित् स्मिर्याखिफला धमकी दिली गेली असेल आणि त्यानं खुनाला प्रतिबंध न करण्याला संमती दिली असेल, अन् आपल्या धन्याचा आपण खून करू दिला याबद्दल आपल्याला दोष लावला जाईल हे लक्षात येऊन, मदतीकरिता आरडा ओरडा न करता किंवा प्रतिबंध न करता फिटचं ढोंग करून मार्गातून बाजूला राहण्याची परवानगी त्यानं दमीत्रिकडून घेतली असेल— 'तुम्हाला वाटलं तर तुम्ही त्यांचा खून करा; मला त्याचं

काय ' असं तो म्हणाला असेल. पण स्मिर्द्याखफला आलेल्या या फिटनं साऱ्या घरातल्या माणसात गोंधळ उडून जाणं प्राप्तच असल्यामुळं, दमीत्रि कारमाझफनं अशा बेताला कधीच मान्यता दिली नसती. तथापि हा मुद्दा मी बाजूला सारतो. समजा त्यानं मान्यता दिली असली, तरी त्यावरून असंच निघणार की दमीत्रि हाच खुनी अन् चिथावणी देणारा आहे, अन् स्मिर्द्याखफ हा नुसता काही न करता राहणारा साथीदार आहे, अन् साथीदारसुद्धा नव्हे तर फक्त भया मुळं त्याच्या इच्छेविरुद्ध गप्प बसून राहणारा आहे.

" पण आपल्याला काय दिसतं ? आरोपीला पकडताच तो सारा दोष लगेच स्मिर्द्याखफवर टाकतो, तो आपला साथी असा आळ घेऊन नव्हे तर तोच खुद्द खुनी असल्याचा आरोप करून. ' त्याचंच एकट्याचं हे काम, ' तो म्हणतो. ' त्यानं त्यांचा खून केला अन् त्यांना लुबाडलं. हे त्याच्याच हातांचं काम आहे ! एकदम एकमेकांवर गुन्ह्याचा आरोप करायला लागणारे हे विचित्रच साथी म्हणायचे ! आणि कारमाझफवर येणाऱ्या जोखमीचा विचार करा. त्याचा साथीदार तिकडं अंथरुणावर पडलेला असताना खून केल्यानंतर, तो त्याचा दोष त्या आजाऱ्यावर टाकतो, त्यानं तो सहजच धिक्कारला असता आणि आपल्या बचावाकरिता खरं ते कबूल केलं असतं. कारण त्याला हे सहजच दिसून आलं असतं की आपण किती जबाबदार आहो याचा न्यायालय एकदम निर्णय करीलच, आणि म्हणून त्यानं असा अंदाज केला असता की जर आपल्याला शिक्षा झालीच तर ती खऱ्या खुन्यापेक्षा पुष्कळच कमी कडक होईल. पण तशा परिस्थितीत त्यानं कबुलीच खात्रीनं दिली असती, तरी तसं त्यानं केलं नाही. स्मिर्द्याखफनं त्यांचं संगनमत असल्याचं कधीच सूचित केलं नाही, पण प्रत्यक्ष खून करणारा मात्र आग्रहपूर्वक त्याच्यावर आळ घेत होता अन् त्यानंच एकट्यानं तो गुन्हा केला असं सांगत होता.

"दुसरं म्हणजे, स्मिर्द्याखफनं तपासाच्या वेळी स्वतः होऊन असं सांगितलं की आरोपीला त्या नोटांच्या पाकिटाबद्दल अन् संकेताबद्दल सांगितलं ते मी आणि मी नसतो तर त्याला त्याबद्दल काहीच माहीत झालं नसतं. तो जर खरोखरीच गुन्ह्यात सामील असणारा साथीदार असता, तर तपासणीच्या वेळी त्यानं हा जबाब इतक्या तत्परतेनं दिला असता ? उलट, त्यानं ते लपवून ठेवण्याचा, पुरावा वेडावाकडा करण्याचा किंवा त्यांचं महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला असता. पण त्यानं तसा प्रयत्न मुळीच केला नाही. ज्याला साथीदारीचा आरोप आपल्यावर येईल अशी मुळीच भीती नाही अशा निरपराधी माणसाखेरीज दुसरा कोणीही तो वागला तसं वागता ना. आणि आपल्या आजारामुळं आणि या आपत्तीमुळं त्याला वाटणाऱ्या उदासपणानं त्यानं काल गळफास लावून घेतला. त्यानं त्याच्या विशिष्ट भाषेत एक चिठ्ठी लिहून ठेवली की ' मी स्वेच्छेनं आणि स्वतःच्या प्रेरणेनं स्वतःचा नाश करून घेत आहे, तेव्हा याचा दोष कोणावरही

नाही.' त्यानं जर आणखी असं म्हटलं असतं की 'मी खुनी आहे, कारमाझफ नाही.' तर त्याचं काय बिघडत होतं ? पण तसं त्यानं म्हटलं नाही. त्याच्या सद्-सद्विवेकबुद्धीनं त्याला आत्महत्त्या करायला अन् आपला गुन्हा उघड कबूल न करायला प्रवृत्त केलं काय ?

"अन् पुढं काय झालं ? तीन हजार रुबलाच्या नोटा आत्ताच कोर्टात आणण्यात आल्या अन् आम्हाला सांगण्यात आलं की आपल्यापुढं टेबलावर जे पाकीट दिसतं आहे त्यातल्याच नोटा त्या आहेत, आणि साक्षीदाराला त्या स्मिर्दाखफकडून आदल्या दिवशी मिळाल्या म्हणून. पण मी त्या दुःखदायक प्रसंगांची पुन्हा आठवण करून देण्याची गरज नाही, मी फक्त एक दोन गोष्टी सांगणार आहे. अशाच निवडून की, ज्या क्षुल्लक म्हणून सकृत्‌दर्शनी कोणाच्याही सहज नजरेस येणार नाहीत अन् त्यामुळं दृष्टीआड होतील. पहिली गोष्ट, स्मिर्दाखफनं तो पैसा परत दिला असला पाहिजे अन् पश्चात्तापानं त्यानं गळफास लावून घेतला असला पाहिजे. आणि केवळ कालच त्यानं आपला अपराध इवानपाशी कबूल केला, असं इवान आपल्याला सांगतो. तसं जर नसतं तर खरोखर इवान आतापर्यंत गप्प बसण्याचं काय कारण ? आणि म्हणून, जर त्याने कबुली दिली असेल तर मी पुन्हा विचारतो, त्यानं मागं लिहून ठेवलेल्या आल्या चिठ्ठीत हे सारं सत्य कबूल का नाही केलं ? त्याला माहीत होतंच की, निरपराधी आरोपीला दुसऱ्या दिवशी या भयंकर दिव्याला तोंड द्यावं लागणार आहे म्हणून.

पैसा हा एकच पुरावा नाही. एक आठवड्यापूर्वी अगदी दैवगत्या एक गोष्ट मला आणि या कोर्टातील आणखी दोघा इसमांना समजली की, इवान यानं दोन पाच-पाच हजारांची अशी पाच टक्क्यांची कूपनं म्हणजे एकूण दहा हजार झाले, प्रांताच्या मुख्य शहराकडं मोडण्याकरिता म्हणून पाठविली आहेत. हे फक्त इथं मी एवढ्याकरिताच नमूद करतो की, पैसा कुणाकडेही असू शकतो, अन् तेवढ्यावरून या नोटा फ्योदर पावलोविचच्या पाकिटातल्याच आहेत असं सिद्ध करता येणार नाही.

"इवान कारमाझफनं खऱ्या खुनी माणसाकडून इतक्या महत्त्वाचा समाचार काल मिळाल्यानंतर हालचाल का केली नाही ? त्यानं ते एकदम पोलिसांना का नाही कळवलं ? त्यानं ते दुसऱ्या दिवसाच्या सकाळपर्यंत का पुढं ढकललं ? मला वाटतं, त्याच्या कारणासंबंधी तर्क करण्याचा मला हक्क आहे. गेला आठवडाभर त्याच्या तब्येतीत बिघाड चालू आहे, त्यानं एका डॉक्टरला आणि आपल्या अत्यंत जिवलग मित्रांना आपल्याला डोळ्यांपुढं भ्रामक दृश्यं अन् मृतांची पिशाचं दिसतात असं सांगितलं, मेंदूचा ज्वर येण्याच्या बेतातच तो होता आणि आज तो त्यानंच आजारी पडला आहे. अशा स्थितीत त्यानं एकदम स्मिर्दाखफच्या मरणाबद्दल ऐकलं, अन् एकदम त्याच्या मनात आलं, 'हा माणूस तर मेला, मला त्याच्यावर

तो दोष टाकता येईल अन् माझ्या भावाला वाचविता येईल.' तुम्ही म्हणाल हे लज्जास्पद आहे; मृत झाला म्हणून काय झालं, त्याच्यावर निंदास्पद आळ घेणं अन् भावाला का होईना वाचविणं हे नामुष्कीचं आहे. खरं, पण त्यानं हा निंदास्पद आळ जर नकळत घेतला असेल तर? शेवटी हुजऱ्याच्या मृत्यूच्या आकस्मिक बातमीनं डोक्यात फरक झाल्यामुळं, त्यानंच खरोखर खून केला असला पाहिजे असं जर त्याला वाटलं असलं तर? तुम्ही नुकताच घडलेला प्रकार पाहिला आहे; तुम्ही साक्षीदाराची अवस्था पाहिलीतच. तो उभा राहून बोलत होता, पण त्याचं मन कुठं होतं?

"मग येतो तो कागद, आरोपीचं पत्र–जे गुन्हा घडण्यापूर्वी दोन दिवस अगोदर लिहिलेलं आहे अन् ज्यात खुनाचा पुरा कार्यक्रम दिलेला आहे. मग आपण दुसऱ्या कोणत्या तरी कार्यक्रमाचा का शोध घेत आहो? गुन्हा घडला आहे तो नेमका या कार्यक्रमाला धरून, अन् दुसऱ्या कोणाकडूनही नाही तर हे पत्र लिहिणाऱ्या कडून. होय. ज्यूरीतील सद्गृहस्थहो, तो विनाव्यत्यय पार पडला! जरी त्याला पक्की खात्री होती की आपलं प्रीतिपात्र आपल्या बापाच्या संगतीत आहे, तरी तो त्याच्या खिडकीपासून आदरानं न् भीतीनं दूर पळाला नाही. अंहं, ते विसंगत अन् असंभाव्य आहे! तो आत गेला अन् त्यानं त्याचा खून केला. बहुत करून त्यानं घृणा वाटत असलेल्या आपल्या प्रतिस्पर्ध्याला पाहाताच क्रोधानं अन् उकळत्या द्वेषभावनेनं त्याला ठार मारलं असावं. परंतु बहुधा त्या पितळी बत्त्याच्या एका प्रहारानंच त्याला ठार मारल्यानंतर अन् ती तिथं नाही याचा काळजीपूर्वक शोध घेऊन स्वतःची खात्री करून घेतल्यानंतर, तो कदाचित उशीखाली आपला हात घालून ते पाकीट बाहेर काढायला विसरला नसला पाहिजे. ते फाटलेलं पाकीट हे इथं टेबलावर आपल्यापुढं आहे.

"ही गोष्ट मी नमूद करीत आहे ती अशाकरिता की माझ्या मतानं तुम्ही एक वैशिष्ट्यपूर्ण स्थिती लक्षात घ्यावी. तो जर सरावलेला खुनी असता आणि त्यानं तो खून पैशाच्या लोभानंच फक्त केला असता, तर त्यानं ते फाडलेलं पाकीट त्या प्रेताजवळ जसं सापडलं तसं जमिनीवर टाकलं असतं का? जर समजा, स्मिर्द्याखफनं पैसे लुबाडण्याकरिता आपल्या धन्याचा खून केला असता, तर त्यानं ते पाकीटच आपल्याबरोबर नेलं असतं, खून झालेल्याच्या प्रेताशेजारी ते उघडून पाहण्याची तसदी त्यानं घेतली नसती, कारण त्याला नक्की माहीत होतं की त्या नोटा त्या पाकिटात आहेतच– त्या आत घालून त्याच्या देखतच त्यावर सील करण्यात आलं होतं– आणि जर त्यानं ते पाकीट आपल्याबरोबर नेलं असतं, तर कोणालाही ती चोरी झाल्याचं कधी माहीतही झालं नसतं. सद्गृहस्थहो, माझं विचारणं आहे की स्मिर्द्याखफ अशा तऱ्हेनं वागला असता काय? त्यानं ते पाकीट जमिनीवर टाकलं असतं?

" नाही, ही कृती एका पिसाट खुनी माणसाची, अशा माणसाची की जो चोर नव्हता अन् त्यापूर्वी त्यानं कधी चोरी केलेली नव्हती, ज्यानं उशीखालून नोटा हिसकून बाहेर काढल्या त्या एखाद्या चोरानं चोरी करावी तशा पद्धतीनं नाही, तर जणू चोरापासूनच आपली मालमत्ता पकडून ठेवावी तशा रीतीनं. कारण हीच कल्पना त्या पैशाच्या बाबतीत दमीत्रि कारमाझफच्या मनात पिसाटासारखी एकसारखी थैमान घालत होती. आणि त्या पाकिटावर झडप घालून त्यानं त्यात ते पैसे आहेत की नाहीत याची खात्री करून घेण्याकरिता ते फाडून उघडलं, कारण त्यानं ते पूर्वी कधीच पाहिलेलं नव्हतं, त्याच्या हे लक्षातही आलं नाही की त्या फाडलेल्या पाकिटाच्या रूपानं आपण स्वतःच्याच विरुद्ध एक विलक्षण पुरावा सोडून जात आहो. या सर्वांचं कारण तो कारमाझफ होता, स्मिर्दाखफ नव्हता, त्याच्या मनात विचार आला नाही, त्यानं विचार केला नाही, आणि कसा करणार? तो पळून गेला; त्यानं आपल्या मागं नोकराच्या आरोळ्या ऐकल्या; त्या म्हाताऱ्यानं त्याला धरलं, थांबवलं अन् यानं त्याच्यावर त्या पितळी बत्त्याचा प्रहार करून त्याला जमिनीवर लोळवलं.

" आरोपीनं, दयार्द्र होऊन, त्याला पाहण्याकरिता खाली उडी मारली. तो म्हणतो की आपण दयाबुद्धीनं, करुणेनं, आपल्याला त्याच्याकरिता, काही करता येईल का हे पाहण्याकरिता, खाली उडी टाकली; हे तुम्हांला खरं तरी वाटतं? छेः; त्यानं खाली उडी टाकली ती फक्त आपल्या खुनाचा साक्षीदार मेलाय की जिवंत आहे याची खात्री करून घेण्याकरिता. दुसरी कोणतीही भावना, दुसरा कोणताही हेतू अनैसर्गिक ठरेल. त्यानं ग्रिगरीकरिता कष्ट घेतले, त्याचं डोकं आपल्या हातरुमालानं पुसलं, आणि तो मेला अशी खात्री होऊन, तो आपल्या प्रेयसीच्या घरी, दिङ्मूढ झालेल्या अन् रक्तानं भरलेल्या स्थितीत पळत गेला. आपण रक्तानं भरलेले आहोत. अन् तत्काळ आपण सापडू हे कधीच त्याच्या लक्षात कसं आलं नाही? पण आरोपीच आपल्याला खात्री देतो की आपल्या अंगावर रक्त आहे हे त्यानं पाहिलंसुद्धा नाही. त्यावर पाहिजे तर विश्वास ठेवावा, ते अगदी शक्य आहे, गुन्हेगारांच्या बाबतीत अशा वेळी असं नेहमी घडतं. एका बाबतीत ते आसुरी कावेबाजपणा दाखवितात, तर दुसरी बाब त्यांच्या मुळी लक्षातच येत नाही. पण त्याक्षणी तो फक्त एकाच गोष्टीचा विचार करीत होता. ती कुठं आहे? ती कुठं आहे हे त्याला तत्काळ शोधून काढायचं होतं, म्हणून तो तिच्या बिऱ्हाडाकडंच गेला आणि तिथं त्याला अनपेक्षित अन् चकित करणारी बातमी कळली की ती आपल्या पहिल्या प्रियकराला भेटण्यासाठी मोक्रोयला गेली आहे."

९

तीन घोड्यांची दौडणारी गाडी. सरकारी वकिलाच्या भाषणाचा शेवट

इप्पोलित किरिलोविचने विवरणाची ऐतिहासिक मागोव्याची पद्धत निवडली होती. घाबरट वक्त्यांना तीच आवडत असते, तिच्या ज्या मर्यादा आहेत त्यांनी त्यांच्या गाढ अलंकारिक वक्तृत्वावर प्रतिबंध पडलेला त्यांना दिसतो. या वेळी त्यानं ग्रूशिंकाच्या 'पहिल्या प्रियकरासंबंधी' वक्तृत्व गाजवायला सुरुवात केली अन् त्या विषयासंबंधीचे कित्येक मनोरंजक विचार पुढे मांडले.

"प्रत्येकासंबंधी कमालीची असहिष्णुता बाळगणारा कारमाझफ जवळजवळ कोसळूनच पडला, आणि त्यानं त्या पहिल्या प्रियकरापुढं एकदम स्वतःचा लोपच करून टाकला. यात एक अधिकच विचित्रपणा आणणारी गोष्ट ही आहे की त्याच्या डोक्यात या जबरदस्त प्रतिस्पर्ध्याचा विचारच कधी आलेला नसावासं दिसतं. तो फार दूरचा धोका त्यानं मानला होता, आणि कारमाझफ हीं नेहमी वर्तमानात वावरणारा आहे. कदाचित त्यानं त्याला काल्पनिक म्हणूनही मानलं असेल. पण त्याच्या दुखावलेल्या अंतःकरणाला चटकन् समजलं की ही स्त्री या नव्या प्रतिस्पर्ध्याला लपवीत आणि आपल्याला फसवीत आली आहे, कारण तो तिला काल्पनिक नव्हता तर साक्षात् होता, कारण तो तिच्या जीवनातील एकमेव आशास्थान होता. हे चटकन् ओळखून, त्यानं सारी आशा सोडून दिली."

"ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, आरोपीच्या स्वभावातील या अनपेक्षित लकबीचा विचार केल्यावाचून मला राहवत नाही. तो लगेच न्यायाची अनिवार इच्छा दर्शवितो, स्त्रीजातीबद्दल आदर अन् तिच्या प्रेम करण्याच्या हक्काबद्दल मान्यता प्रदर्शित करतो. आणि हे अगदी त्याच क्षणी की जेव्हा त्याचे हात तिच्याकरिता सांडलेल्या त्याच्या बापाच्या रक्तानं डागळलेले असतात! त्यानं सांडलेलं रक्त यापूर्वीच सूडाकरिता आक्रोश करीत असतं हे खरंच, कारण, आपल्या आत्म्याचा अन् या जगातील आपल्या जीवनाचा सत्यानाश करून घेतल्यानंतर त्याच क्षणी त्याला स्वतःला विचारणं भाग पडलं की तू तिचे काय लागत होतास आणि आता तिला, त्या प्रेमदेवतेला, जी तुला तुझ्या स्वतःच्या आत्म्याहून प्रिय वाटत होती तिला, तो जो तिचा पूर्वीचा प्रियकर पश्चात्ताप पावून एकेकाळी दगा दिलेल्या स्त्रीकडं नव्या प्रेमानिशी प्रतिष्ठेची आश्वासनं घेऊन, पुढं सुधारलेलं अन् सुखी जीवन घालविण्याचं आश्वासन घेऊन परत आला आहे त्याच्याशी तुलना करता तू काय लागतोस? आणि तू, दुर्दैवी असलेला तू तिला आता काय देऊ शकणार आहेस, काय देण्याचं आश्वासन देणार आहेस?

"कारमाझफला या सगळ्याची जाणीव झाली, आपल्या गुन्ह्यामुळं सारे मार्ग आता आपल्याला बंद झाले आहेत आणि आपण एक शिक्षा होणारे गुन्हेगार आहोत, उज्ज्वल जीवन स्वतःपुढं असलेले असे आपण नाही हे त्याला कळलं! त्या विचारानं त्याचा चेंदामेंदा झाला. आणि त्यामुळं तो तत्क्षणी एका पिसाट बेताकडं वळला, हा बेत कारमाझफ स्वभावाच्या माणसाला एकच अपरिहार्य मार्ग म्हणून आपल्या भयानक स्थितीतून बाहेर पडण्याकरिता वाटला असला पाहिजे. तो मार्ग म्हणजे आत्महत्या. तो ताबडतोब त्यानं जी पिस्तुलं आपला मित्र पेऱ्होतिन याच्याकडे तारण म्हणून ठेवली होती ती घेण्याकरिता धावत गेला, आणि धावत जात असताना वाटेत, त्यानं आपल्या बापाच्या रक्तानं आपले हात ज्याकरिता लांच्छित करून घेतले होते ते पैसे आपल्या खिशातून बाहेर ओढून काढले. हां, आता त्याला पूर्वी कधी नव्हती तेवढी या पैशाची गरज भासली. कारमाझफ मरेल, कारमाझफ स्वतःला गोळी घालून घेईल अन् त्याची आठवण लोकांना राहिली पाहिजे! खरोखर तो मनानं कवी होता अन् त्यानं आपलं आयुष्य दोन्ही हातांनी उधळून टाकलं होतं. 'तिच्याकडं, तिच्याकडं! तिथंच हो तिथंच, मी साऱ्या जगाला मेजवानी देईन जशी पूर्वी कधी झाली नसेल, तिची लोकांना कायमची आठवण राहील अन् लोक स्तुती करतील! बेफाट मौजमजेच्या ओरड्यात, अविचारी जिप्सी नृत्य-गायनात मी पेला वर करीन अन् माझ्या देवतास्वरूप स्त्रीच्या अन् तिला नव्यानं लाभलेल्या सुखाच्या नावानं पिईन! आणि मग, तिथल्यातिथं, तिच्या पायांशी मी माझा मेंदू तिच्यापुढं बाहेर काढीन अन् स्वतःला प्रायश्चित्त घेईन! ती मीत्या कारमाझफची कधीतरी आठवण काढील, मीत्या तिच्यावर किती प्रेम करीत होता ते तिला दिसेल, तिला मीत्याविषयी भावना दाटून येईल!'

"इथं आपल्याला परिणामाविषयीची आसक्ती, अद्‌भुतरम्य निराशा अन् भावुकता, अन् कारमाझफचा बेफाट अविचारीपणा, अतिरेकानं दिसून येतो. हां, पण आणखी दुसरंही काही आहे, ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, ते जे काही आहे ते अंतरात्म्यात आक्रोश करतं, मनात सतत धडधड करतं आणि हृदयात विष घालून मरण आणतं – ते 'काही' म्हणजे सदसद्विवेकबुद्धी. तिचा निवाडा, तिच्या भयंकर यातना! पिस्तुलानं हे सर्व मिटेल, पिस्तुल हा एकच बाहेर पडण्याचा मार्ग! पण पलीकडं – कारमाझफला त्याक्षणी 'पलीकडं काय' असं वाटलं असेल की नाही, आणि कारमाझफ, हॅम्लेटप्रमाणं, 'पलीकडं काय आहे' याची चिंता करू शकतो की नाही हे मला माहीत नाही. छे, ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, तिकडं त्यांचे हॅम्लेट आहेत, पण अजून आमच्या इकडं कारमाझफच आहेत!"

याठिकाणी इप्पोलित किरिलोविचने मीत्याच्या तयारीचे बारकाव्याने चित्र रेखाटले, पेऱ्होतिनच्या इथला, दुकानात घडलेला, गाडीवानांशी झालेला असे सर्व प्रसंग त्याने वर्णन केले. त्याने कितीतरी शब्द अन् हावभाव, ज्यांना साक्षीदारांनी

आपल्या जबानीत दुजोरा दिला होता, ते जसेच्या तसे वर्णन केले, आणि त्या चित्राचा श्रोतृवर्गावर जबरदस्त परिणाम झाला. या गांजलेल्या अन् जिवावर उदार झालेल्या मनुष्याचा अपराधीपणा, जेव्हा सारी वस्तुस्थिती एकत्र करून सांगण्यात आली तेव्हा, स्पष्ट अन् खात्री पटविणारा झाला.

"त्याला अगोदर खबरदारी घेण्याची गरजच काय होती ? दोन तीन वेळा त्यानं जवळ जवळ कबुली दिल्यासारखीच होती, त्या संबंधीचं सूचित केलं होतं. सगळे तसं उघड बोलले आहेत. (यानंतर साक्षीदारांनी दिलेला पुरावा सांगण्यात आला.) जो गाडीवान शेतकरी त्याला घेऊन चालला होता त्यालासुद्धा तो ओरडून म्हणाला, 'तू एका खुनी माणसाला घेऊन चालला आहेस, माहीत आहे तुला !' पण त्याला उघड बोलणं अशक्य होतं, त्याला मोक्रोयला पोचायचं होतं अन् तिथं आपला अद्भुतरम्य कार्यक्रम पुरा करायचा होता. पण तिथं या दुर्दैवी माणसापुढं काय वाढून ठेवलं होतं ? मोक्रोयला पोचल्या क्षणापासून जवळजवळ त्याला दिसलं की, आपला अजिंक्य प्रतिस्पर्धी वाटला होता तितका कदाचित मुळीच अजिंक्य नाही. उभयतांना नव्यानं लाभलेल्या ज्या सुखाचं अभिनंदन करायचं ती अपेक्षा राहिली नाही आणि ते स्वीकारलेही जाणार नाही. पण ज्यूरीतील सज्जनहो, तुम्हाला प्राथमिक चौकशी-वरून त्या गोष्टी माहीत आहेत. कारमाझफनं आपल्या प्रतिस्पर्ध्यावर पूर्ण विजय मिळविला अन् त्याचा आत्मा एका अगदी नव्याच अवस्थेत गेला, कदाचित् ज्या अवस्थेतून तो आतापर्यंत गेला होता किंवा पुढं जाणार आहे त्या अवस्थेहून अतिशय भयानक अशी ही अवस्था होती.

"ज्यूरीतील सद्गृहस्थहो" सरकारी वकील पुढे म्हणाला, "असं खात्री-पूर्वक म्हणता येईल की, जबरदस्ती झालेला निसर्ग अन् गुन्हेगाराचं अंतःकरण हे आपला सूड इहलोकीच्या कोणत्याही न्यायापेक्षा जास्त पूर्णतेनं उगवतात. आणखी म्हणजे, पृथ्वीवरचा न्याय अन् इथली शिक्षा निसर्गाच्या शिक्षेला निश्चितपणे सौम्य करते आणि गुन्हेगाराच्या आत्म्याला अशा वेळी निराशेतून मुक्ती मिळण्याच्या दृष्टीनं खरोखर ती आवश्यकच आहे. कारण जेव्हा कारमाझफला ती आपल्यावर प्रेम करते, आपल्याकरिता तिनं आपल्या प्रियकराला झिडकारलं, ती आपल्याला नव्या जीवनाचं आवाहन करते आहे, ती आपल्याला सुखाची आशा देत आहे– अन् केव्हा ? जेव्हा त्याचं सारं संपलेलं होतं अन् आता काहीच होणं शक्य नव्हतं अशा वेळी– तेव्हा कारमाझफला केवढा मोठा धक्का बसला असेल अन् मानसिक यातना झाल्या असतील त्याची मी कल्पनाच करू शकत नाही !

"जाता जाता, पुरवणी म्हणून एक महत्त्वाचा मुद्दा, तो आरोपीच्या आताच्या स्थितीवर प्रकाश पाडणारा असल्यामुळं, सांगतो. ही स्त्री, ही त्याची प्रियकरीण, त्या शेवटच्या क्षणापर्यंत, त्याला अटक झाली त्या क्षणापर्यंत त्याला अप्राप्य अशी होती, त्याला कितीही जरी उत्कटतेनं हवी असली तरी अप्राप्य होती.

तरी त्यानं त्यावेळी स्वतःला का मारून घेतलं नाही, त्यानं आपला बेत का सोडून दिला अन् आपलं पिस्तूल कुठं आहे हेसुद्धा तो का विसरला? ती त्याची प्रेमाविषयीची उत्कट इच्छा अन् ती पुरविण्याची आशा यांनी त्याला आवरून धरलं. त्यांची धुंदीतली बडबड चालू असताना तो आपल्या देवतास्वरूप प्रियकरणीच्या जवळच सारखा राहिला होता, ती मेजवानीच्या वेळी त्याच्या संगतीत होती अन् त्याला ती पूर्वीपेक्षा अधिक मोहक आणि भुरळ पाडणारी वाटत होती. त्यानं तिची संगत सोडली नाही, तिच्यापुढं लवण्यात त्यानं स्वतःची प्रतिष्ठाही सोडली.

" त्याच्या आसक्तीनं एक क्षणभर अटकेची भीतीच नव्हे तर विवेकबुद्धीच्या यातनासुद्धा दाबून टाकल्या असाव्यात. पण एक क्षणभर, अगदी एक क्षणभरच. या प्रभावानं अगदी गुलाम करून टाकलेल्या त्याच्या मनाची अवस्था मी माझ्या कल्पनाचक्षूंपुढे रेखाटू शकतो– प्रथम, दारू, तो गोंगाट अन् ती उत्तेजना, तो नृत्याच्या पावलांचा आवाज अन् गाण्याचा तारस्वर यांचा प्रभाव, तसाच तिचा दारूनं लाल झालेल्या तिच्या चेहऱ्याचा, आणि तिच्या गाण्याचा अन् नाचाचा अन् त्याच्याकडं पाहून हसण्याचा प्रभाव ! दुसरी गोष्ट, तो पुढं होणारा शेवट अजून खूप दूर असण्याचा संभव आहे, निदान उद्या सकाळपर्यंत तरी ते येऊन आपल्याला घेऊन जाणार नाहीत ही पार्श्वभूमी म्हणून असणारी आशा. तेव्हा आपल्याला काही तास मिळणार आहेत, अन् तेवढे पुष्कळ आहेत, खूपच आहेत ! काही थोड्या वेळात माणूस पुष्कळ गोष्टींचा विचार करू शकतो. गुन्हेगारांना फाशीकडं नेत असताना जसं वाटत असेल तसं काही तरी त्याला वाटत असावं अशी माझी कल्पना आहे. अजून त्यांना आणखी एक लांबच लांब रस्ता पार करायचा आहे अन् तो चालून पार करायचा आहे हजारो लोकांच्या अंगावरून जाता जाता. मग दुसऱ्या रस्त्याकडं जाण्याचं वळण येईल अन् तो रस्ता संपला म्हणजेच ते फासाचं ठिकाण येईल ! या प्रवासाच्या सुरुवातीला शिक्षा झालेल्या माणसाला, त्या लज्जास्पद गाडीवर असताना, अजून आपल्यापुढं अनंत आयुष्य आहे असंच वाटत असलं पाहिजे असं मला वाटतं. घरं मागं मागं जात आहेत, गाडी पुढं जात आहे– हंः, हे काहीच नाही, अजून दुसऱ्या रस्त्याच्या वळणाकडं जायला बरंच अंतर आहे, असं म्हणून तो आजूबाजूला त्याच्याकडं नजरा लावून पाहणाऱ्या निर्लज्ज कुतूहल असलेल्या हजारो लोकांकडं निर्भीडपणे पाहतो, अन् अजूनही त्याला आपण त्यांच्यापैकीच एक आहोत असं वाटतं. पण आता त्या दुसऱ्या रस्त्याकडं लागणारं वळण येतं. हंः, हे काहीच नाही, काहीच नाही. अजून एक सबंध रस्ता माझ्यापुढं आहे, आणि जरी कितीही घरं त्यानं ओलांडली असली तरी पुष्कळ राहिली आहेत असं अजून त्याला वाटतं. आणि असं अगदी शेवटपर्यंत, अगदी फाशीच्या ठिकाणी जाईपर्यंत वाटत राहतं.

" असंच मला वाटतं, त्यावेळी कारमाझफच्या बाबतीत झालं. ' त्यांना

अजून वेळ आहे ' असं त्याला वाटत असलं पाहिजे. ' अजून मला यातून बाहेर पडण्याचा मार्ग मिळेल, हं, अजून बचावाची काही योजना करायला वेळ आहे, अन् यावेळी, यावेळी ही किती सुरेख दिसते आहे ! '

" त्याचा आत्मा गोंधळानं अन् भयानं भरून गेलेला होता, पण त्यानं आपला अर्धा पैसा कसातरी बाजूला काढून तो कुठंतरी लपविण्याची धडपड केली. याखेरीज मला त्यानं आपल्या बापाच्या उशाखालून नुकत्याच काढून घेतलेल्या तीन हजारांपैकी बरोबर अर्धी रक्कम कशी नाहीशी झाली त्याचा खुलासा होऊ शकत नाही. तो मोक्रोयला पूर्वी अनेक वेळा गेला होता, त्यानं तिथं यापूर्वीच दोन दिवस मौज-मजा उडविली होती, त्या मोठ्या घराच्या वाटा अन् बाहेरची वसतीघरं सर्व त्याला माहीत होती. मला वाटत त्या पैशाचा काही भाग त्या घरात, पकडण्यापूर्वी थोडाच वेळ, लपवून ठेवला असावा, कुठल्यातरी खबदाडात, कुठल्यातरी जमिनी-खाली, कुठल्यातरी कोपऱ्यात, छपराखाली, कुठंही. कोणत्या उद्देशानं ? कोणी मला विचारील. ती आपत्ती अर्थातच एकाएकी येण्याचा संभव होता; तिला कसं तोंड द्यायचं याचा अजून त्यानं विचार केलेला नव्हता, त्याला वेळच मिळाला नव्हता, त्याच्या डोक्यात घाव पडत होते आणि त्याचं हृदय तिच्यापाशी होतं, पण ? पैसे-पैसे कोणत्याही परिस्थितीत अपरिहार्यच होते ! पैसे असले की माणूस हा नेहमी माणूस असतो. अशा या वेळी असा दूरदर्शीपणा तुम्हाला कदाचित् अस्वाभाविक वाटेल, होय ना ? पण तो स्वतःच आपल्याला खात्रीपूर्वक सांगतो की एक महिन्यापूर्वी, अगदी आणीबाणीची अन् मन भडकविणारी वेळ आली असताना, त्यानं आपल्या पैशाचा अर्धा भाग करून तो एका लहानशा पिशवीत शिवून टाकला होता. आणि जरी ती गोष्ट खरी नसली, आम्ही ते तत्काळ सिद्ध करणारच आहोत, तरी ती कल्पना कारमाझफला परिचित अशी होती, त्यानं ती विचारात घेतलेली होती. आणखी म्हणजे, जेव्हा त्यानं तपासणीच्या वेळी सांगितलं की मी पंधराशे रुपये एका पिशवीत ठेवले आहेत (ती पिशवी कधीच अस्तित्वात नव्हती) तेव्हा त्यानं त्यावेळी मनात एकदम आली तशी ती छोट्या पिशवीची कल्पना दडपून दिली, कारण त्यानं दोन तासांपूर्वी आपल्या पैशाची विभागणी केली होती आणि त्यातली अर्धी रक्कम, वेळप्रसंगी लागेल म्हणून, अन् आपल्या स्वतःच्या जवळ ती असू नये एवढ्याकरि-ताच, मोक्रोय इथं सकाळपर्यंत ठेवली होती. ज्यूरीतील सद्गृहस्थहो, दोन टोकं, कारमाझफ दोन टोकांचा विचार, अन् तो एकाच वेळी करू शकतो, हे लक्षात घ्या.

" आम्ही घरात शोध घेतला, पण तो पैसा आम्हाला आढळला नाही. तो अजून तिथंच असेल किंवा तो दुसऱ्या दिवशी नाहीसा झाला असेल आणि आता आरोपीच्या हातीच असेल. काही असो, आरोपी तिच्या बरोबर होता, तिच्यापुढं त्यानं गुडघे टेकले होते, ती अंथरुणावर पडलेली होती. आपले हात त्यानं तिच्यापुढं पसरले होते, आणि तो सर्व काही इतकं विसरून गेला होता की त्यानं आपल्याला

पकडायला माणसं येत आहेत तेसुद्धा ऐकलं नाही. त्याला स्वतःच्या बचावाची काही योजना ठरवायला वेळ मिळाला नाही. तो अचानकपणे पकडला गेला, आणि त्याचं नशीब ठरविणारे जे न्यायाधीश आहेत त्यांच्यापुढं तो उभा झाला.

"ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, आमचं कर्तव्य बजावीत असताना असे काही क्षण येतात की जेव्हा एखाद्या माणसासमोर उभं राहणं आम्हाला भयप्रद असतं–भयप्रद त्याच्या दृष्टीनंदेखील! गुन्हेगार जेव्हा पूर्णपणे हताश होतो, पण तरी धडपडतो, तरी धडपडू पाहातो त्यावेळचे देहस्वभावाला धरून मनात येणाऱ्या भीतीचे क्षण, जेव्हा स्वसंरक्षणाची एकूण एक प्रेरणा त्याच्यात उफाळून उठते अन् तो तुमच्याकडं प्रश्नार्थक अन् क्लेशपूर्ण नजरेनं पाहतो, तुमचं, तुमच्या चेहऱ्याचं, तुमच्या विचारांचं निरीक्षण करतो, कोणत्या बाजूवर तुम्ही प्रहार कराल ते त्याला कळत नाही, आणि त्याचं भ्रान्त झालेलं चित्त एका निमिषात हजारो बेत घडवितं, तरी तो बोलायला भितो, आपल्या मनातलं प्रकट करायला भितो असे क्षण! आत्म्याचा हा नरकवास, स्वसंरक्षणाची असणारी ही देहसहज तृष्णा, मानवी आत्म्याचे हे मानभंग करणारे क्षण, फार भयंकर असतात, आणि कित्येक वेळा त्यातून त्या गुन्हेगाराविषयी वकिलाच्या मनात सुद्धा कंप अन् करुणा उत्पन्न करतात. आणि हेच आम्ही सर्वांनी त्यावेळी पाहिलं.

"प्रथम तो थक्कच होऊन गेला अन् भयभीत अवस्थेत काही अत्यंत कबुली देणारी वाक्यं त्याच्या तोंडून बाहेर पडली. 'मला योग्य प्रायश्चित्त मिळालं!' पण त्यानं लगेच स्वतःला सावरलं. आपण काय बोलायचं, काय उत्तर द्यायचं याची तयारी त्यानं केलेली नव्हती, त्याच्याकडं फक्त नकाराशिवाय दुसरं काही तयार नव्हतं. 'माझ्या वडिलांच्या मृत्यूबद्दल मी दोषी नाही.' हा त्याचा त्यावेळचा बचाव होता आणि त्यामागं कोणत्या तरी प्रकारची तटबंदी उभारण्याची त्यानं आशा बाळगली होती. आपल्या पहिल्या कबुलीच्या उद्‌गारांचा खुलासा त्यानं लगेच असा दिला की मी नोकर ग्रिगरीच्या मरणाला जबाबदार आहे. 'त्या रक्तपाताचा गुन्हा मी केला आहे. पण माझ्या वडिलांना कुणी मारलं, सद्‌गृहस्थ हो, त्यांना कुणी मारलं? जर मी नाही, तर कुणी मारलं असणं शक्य आहे? ऐकलंत का आपण, त्यानं आम्हाला, आम्हाला म्हणजे जे त्याला विचारायला आले होते त्यांना तो प्रश्न करतो! ते एकाएकी घाईनं उच्चारलेलं वाक्य. 'जर मी नाही तर', तुम्ही ऐकलंत? त्यात देहस्वभावानुसार धूर्तपणा आहे, साधेभोळेपणा आहे, कारमाझफी अधीरपणा आहे. 'मी त्यांना मारलं नाही आणि मी मारलं असं तुम्ही मानता कामा नये! मला त्यांना मारण्याची इच्छा होती, सद्‌गृहस्थहो, मला त्यांना मारण्याची इच्छा होती.' तो लगेच कबूल करायला लागतो (त्याला घाई झालेली होती, भयंकर घाई झालेली होती), 'पण तरी मी हा गुन्हा केलेला नाही, मी त्यांचा खून केला नाही.' आपल्याला त्यांचा खून करायचा होता हे तो मान्य करतो, जणू त्याला

म्हणायचं आहे की 'मी किती प्रामाणिक आहे तुमचं तुम्हीच पाहा, त्यामुळं तुम्हाला अधिकच लवकर पटेल की मी त्यांचा खून केलेला नाही.' हं:, अशा प्रकारच्या मामल्यात गुन्हेगार नेहमी उथळ विचाराचा अन् भोळसर असतो.

"याचवेळी एका वकिलानं त्याला एक प्रकारे आकस्मिकपणेच, एक साधा प्रश्न विचारला, 'स्मिर्द्याखफनं तर त्याला मारलं नसेल?' तेव्हा, आम्ही अपेक्षा केल्याप्रमाणं, त्याच्या अगोदर आम्ही त्याच्या मनातलं हेरल्याबद्दल अन् त्याला नकळत पकडल्याबद्दल, तो भयंकर रागावला; स्मिर्द्याखफचं नाव पुढं आणण्याकरिता अत्यंत स्वाभाविक असा क्षण निवडून त्याचा लाभ घेण्याचा मार्ग त्यानं तयार करण्याच्या अगोदर आम्ही ते नाव घेतल्याबद्दल तो रागावला होता. तो लगेच दुसऱ्या टोकाकडं गेला, तसं तो नेहमीच करतो, आणि स्मिर्द्याखफनं त्याला मारलं असणं शक्य नाही, त्याची ती ताकद नाही, असं आम्हाला तो खात्रीपूर्वक सांगू लागला. पण त्याच्यावर विश्वास ठेवू नका, तो त्याचा केवळ कावेबाजपणा होता; उलट, त्याला पुनः पुढं आणण्याचं त्याच्या मनात होतं; कारण, खरं म्हणजे कोणाचं तरी नाव घ्यायला, दुसरं कुणी त्याच्यापुढं नव्हतंच, पण ते तो नंतर करणार होता, कारण त्याक्षणी ती त्याची दिशा हाणून पाडण्यात आली होती. तो त्याला कदाचित दुसरे दिवशी, किंवा काही थोड्या दिवसांनंतर, पुढं आणणार होता, तो संधी शोधून आम्हाला ओरडून सांगणार होता की, 'पाहा, मी स्मिर्द्याखफविषयी तुमच्यापेक्षा जास्त अविश्वासी होतो, तुम्हाला ते आठवतच असेल, पण आता माझी खात्री पटली आहे. त्यानंच त्यांना मारलं, त्यानंच ते केलं असलं पाहिजे!' अन् आज तूर्त तो उदासवाणा अन् चिडखोर नकाराचाच आधार घेत आहे. तथापि आपण वडिलांच्या खिडकीतून कसं पाहिलं अन् तिथून विचारपूर्वक कसे मागं फिरलो याचा त्यानं जो मूर्खपणाचा अन् विश्वास न ठेवण्याजोगा खुलासा केला तो अधीरपणामुळं अन् क्रोधामुळं त्याला स्फुरला. सर्वात वाईट म्हणजे परिस्थितीचं स्वरूप काय आहे याविषयी, ग्रिगरीनं जबाब काय दिला त्याविषयी त्याला काही माहिती नव्हती.

"आम्ही त्याची झडती घ्यायला लागलो. त्या झडतीचा त्याला राग आला, पण तिनं त्याला उत्तेजन मिळालं, ते सगळे तीन हजार त्याच्या अंगावर काही मिळाले नव्हते, फक्त अर्धीच रक्कम मिळाली. आणि बरोबर त्याच क्षणी रागानं तो गप्प बसला असताना त्या लहान पिशवीची काल्पनिक कथा त्याच्या मनात एकदम आली यात शंका नाही. त्या कथेच्या असंभाव्यतेविषयी त्याला स्वतःला जाणीव होती यात शंका नाही, त्यामुळं ती अधिक संभाव्य वाटावी असं करण्याचा, सत्य वाटेल अशी अद्भुतरम्यतेची वीण गुंफून मांडण्याचा त्यानं खूप कष्ट घेऊन प्रयत्न केला. अशा प्रकरणात तपासणी करणाऱ्या वकिलांचं पहिलं कर्तव्य, त्याचं मुख्य काम गुन्हेगाराला तयारी करू द्यायची नाही, अनपेक्षितपणे त्याच्यावर अशी उडी

घालायची की त्यामुळं तो आपल्या मनाशी बाळगलेल्या कल्पना अगदी सरळ साध्या, असंभाव्य अन् असंगत स्वरूपात एकदम बरळू लागेल, हे असतं. गुन्हेगाराला ज्या गोष्टीची पूर्वी काही कल्पना नाही अन् जी त्याला अपेक्षित नाही अशी काही नवी गोष्ट, या केसमध्ये अतिशय महत्त्वाची अशी काही घटना, अचानकपणे अन् दिसायला सहजगत्या कळविण्यानंच त्याला बोलतं करता येतं. आमच्याकडं तशी एक सत्य घटना तयार होती– ती म्हणजे ज्या दरवाज्यातून आरोपी बाहेर पळाला होता त्या उघड्या दरवाज्याविषयीची साक्ष. त्याला त्या दरवाज्याबद्दलची पूर्ण विस्मृती झालेली होती आणि ग्रिगरीनं तो पाहिला असेल अशी शंकासुद्धा त्याला आलेली नव्हती.

"त्याचा परिणाम आश्चर्यजनक झाला. तो एकदम उसळला अन् मोठ्यानं ओरडला, 'मग स्मिर्द्याखफनंच त्यांचा खून केला, स्मिर्द्याखफचंच हे काम!' आणि अशा रीतीनं तो लपवून ठेवीत असलेल्या बचावाचा पाया त्यानं उघड केला, अत्यंत असंभाव्य अशा स्वरूपात त्यानं तो उघड केला, कारण यानं ग्रिगरीला ठोसा मारून पाडल्यानंतर अन् हा पळून गेल्यानंतरच स्मिर्द्याखफ खून करू शकणार. जेव्हा आम्ही त्याला सांगितलं की, ग्रिगरीनं खाली पडण्यापूर्वीच तो दरवाजा उघडा असलेला बघितला होता, अन् आपल्या झोपायच्या खोलीतून बाहेर पडण्यापूर्वी पडद्यामागं स्मिर्द्याखफचं विव्हळणं ऐकलं होतं– तेव्हा कारमाझफ अगदी हताश झाल्यासारखाच झाला. माझे सन्मान्य अन् विनोदी व्यवसायबंधू, निकोलाय पारफेनोविच, मला नंतर सांगत होते की, त्याला बघून आपल्या डोळ्यांत अगदी अश्रू आले. आणि मग सुधारणा करण्याकरिता आरोपीनं चटकन् आम्हाला त्या बऱ्याच बोलल्या गेलेल्या लहानशा पिशवीसंबंधानं सांगितलं– बरं तर, तो अद्‌भुतरम्य किस्सा आता ऐका!

"ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, ही अद्‌भुतरम्य कथा मला नुसती विसंगतच नव्हे तर अशा परिस्थितीत मुळीच पुढं करता न येण्याजोगी अत्यंत असंभाव्य रचलेली गोष्ट का वाटते ते मी आपल्याला यापूर्वीच सांगितलं आहे. जर एखाद्यानं पैज मारून अत्यंत असंभाव्य गोष्ट रचायचा प्रयत्न केला, तर त्याला याहून अधिक अविश्वसनीय गोष्ट सापडणारच नाही. अशा गोष्टींच्या बाबतीत दुर्दैव हे असतं की, ही अद्‌भुत-रम्यता भोगणाऱ्या विजयी व्यक्तींना, वास्तविक जीवन ज्या बारीक सारीक गोष्टींनी संपन्न असतं अशा तपशिलांनीच नेहमी भांबावून सोडता येतं अन् हतबल करून टाकता येतं, कारण हे दुर्दैवी अन् दबावाने गोष्टी सांगणारे, वास्तविक जीवन ज्या बारीक सारीक तपशिलांनं भरलेलं असतं त्या तपशिलाकडं क्षुल्लक म्हणून दुर्लक्ष करतात. हं: त्यांना अशा बारीक सारीक गोष्टींचा विचारच करावासा वाटत नाही. त्याचं मन त्यांनी रचून काढलेल्या एकूण भव्य कथेवर एकाग्र झालेलं असतं आणि त्यांना मध्येच खेचण्याचं धारिष्ट करणाऱ्याला ते क्षुद्र समजतात! पण यातच ते पकडले जातात. आरोपीला असा प्रश्न विचारण्यात आला की, 'तुला त्या छोट्या

पिशवीकरिता कपडा कुठं मिळाला अन् ती तुला कोणी तयार करून दिली? ' ' माझी मीच ती बनविली.' ' पण तुला कपडा कुठं मिळाला? ' आरोपी चक्क दुखावला गेला, असला क्षुद्र प्रश्न आपल्याला विचारणं हे त्याला अपमानास्पद वाटलं, अन् तुम्हाला खरं तरी वाटेल, त्याला मनापासून राग आला! पण हे त्याचं असंच असतं. ' मी तो माझ्या सदऱ्यातून काढून घेतला.' ' मग आम्हाला उद्या तो तुकडा काढून घेतलेला सदरा तुमच्या कपड्यात मिळेलच.' अन् ज्यूरीतील सद्गृहस्थहो, मजा पाहा, आम्हाला जर तो फाटका सदरा खरोखरच आढळला असता आणि तो त्याच्या कपाटाच्या खणात किंवा ट्रंकेत तो मिळाल्याशिवाय कसा राहिला असता? तर ती सत्य गोष्ट, त्याच्या विधानाला पुष्टी देणारी महत्त्वाची गोष्ट ठरली असती! पण असा विचार करणं त्याला जमण्यासारखंच नव्हतं. ' मला आठवलं नाही, माझ्या सदऱ्यातून कदाचित फाडला नसेल, माझ्या घरमालकिणीच्या एखाद्या टोपीत मी शिवलं असेल.' ' कशी होती ती टोपी? ' ' एक तिची जुनी फाटकी सुती टोपी कुठं तरी पडलेली होती.' ' अन् तुला ते स्पष्टपणे आठवतं? ' ' नाही, स्पष्टपणे नाही आठवत.' अन् त्याला राग आला, भलताच राग आला, अन् तरी त्याला आठवत काही नव्हतं, म्हणजे बघा! माणसाच्या जीवनाच्या अत्यंत भयंकर क्षणी, उदाहरणार्थ, जेव्हा त्याला फाशी द्यायला चालवलं असेल अशा वेळी त्याला अगदी अशाच क्षुल्लक गोष्टी आठवतात. तो बाकीचं सारं विसरेल पण रस्त्यानं जाता जाता एखादं हिरवं छप्पर एकदम त्याच्या नजरेला पडलेलं असेल तेच, किंवा क्रूसावर बसलेला कावळाच त्याच्या लक्षात राहील. आपल्या घरच्या सामानातून ती छोटी पिशवी बनविल्याचं त्यानं छपवलं, कोणी तरी आत येईल अन् आपल्या हातात सुई-दोरा पाहील या अपमानजनक भीतीनं, अगदी एवढ्याशा आवाजानं तो पडद्यामागं कसा एकदम सरला, याची त्याला आठवण झाली असावी (त्याच्या खोलीत एक पडदा आहे.)

" पण ज्यूरीतील सभ्य गृहस्थहो, मी हे सारं, हा सारा तपशील, या क्षुल्लक गोष्टी का सांगत आहे? " इप्पोलित किरिलोविच एकदम म्हणाला, " एवढ्याच-करिता की आरोपी चालू क्षणापर्यंत या विचित्र गोष्टीसंबंधी अजून आग्रह धरून आहे. दोन महिन्यांपूर्वीच्या त्या दुर्दैवी रात्रीपासून झालेल्या कशाचाही त्यानं खुलासा दिलेला नाही, त्याच्या पूर्वीच्या बेफाट विधानांत एकाही प्रकाश टाकणाऱ्या सत्य गोष्टींची त्यानं भर टाकलेली नाही; त्या सर्व क्षुल्लक गोष्टी आहेत. ' तुम्ही माझ्या शब्दावर विश्वास ठेवला पाहिजे.' होय तसा विश्वास ठेवायला आम्हाला आनंद वाटेल, नव्हे त्याचा अब्रूचा शब्द म्हणून सुद्धा आम्ही विश्वास ठेवायला उत्सुक आहोत. मनुष्याच्या रक्ताची तहान लागणारे आम्ही काय कोल्हे आहोत? आरोपीला अनुकूल अशी एक का होईना सत्य गोष्ट आम्हाला सांगा की आम्हाला आनंद होईल; पण ती भरीव, खरीखुरी सत्य गोष्ट पाहिजे. त्याच्या भावानंच त्याच्या

चेहऱ्यावरून दिसणाऱ्या भावावरून, किंवा त्यानं जेव्हा आपल्या छातीवर मारून घेतलं तेव्हा त्या छोट्या पिशवीचाच, तोही अंधारात, निर्देश करण्याचं त्याच्या मनात असलं पाहिजे अशासारखे काढलेले निष्कर्ष नकोत. नवीन सत्य स्थिती जर आम्हाला कळली तर आम्ही आनंद मानू, आमचा आरोप बाजूला सारण्याकरिता आम्हीच पहिल्यांदा तयार होऊ, आम्ही चटकन् तो काढून घेऊ. पण यावेळी न्याय आक्रोश करीत आहे आणि आम्ही आग्रह धरून आहोत, आम्हाला काहीही मागं घेणं शक्य नाही."

इप्पोलित किरिलोविच त्याच्या वक्तृत्वाच्या अखेरच्या भागाकडं आला. तो जणू ज्वरात बोलत असल्यासारखा दिसत होता, सूडाकरिता ओरडत असलेल्या रक्ताविषयी, मुलानं चोरी करण्याच्या हलकट उद्देशानं खून केलेल्या बापाच्या रक्ताविषयी, तो बोलला. त्यानं सत्य गोष्टीतील शोकांतिक पण धडधडीत दिसणारी संगती दाखवून दिली.

" बचावाच्या बुद्धिमान अन् नामवंत वकिलांकडून काहीही तुम्ही ऐकलंत, तुमच्या भावनांना कितीही वक्तृत्वपूर्ण अन् हृदयस्पर्शी आवाहन केलं गेलं, तरी लक्षात ठेवा की तुम्ही यावेळी न्यायमंदिरात आहात, आपल्या पवित्र रशियाचे आधारस्तंभ आहात, तो मानीत असलेल्या तत्त्वप्रणालीचे, त्यांच्या कुटुंबसंस्थेचे, जे जे म्हणून तो पवित्र मानतो त्या सर्वांचे ! होय, यावेळी या ठिकाणी तुम्ही रशियाचे प्रतिनिधित्व करीत आहा, आणि तुमचा निकाल या न्यायखंडातच केवळ ऐकला जाणार नाही तर साऱ्या रशियाभर त्याचा प्रतिध्वनी उमटेल, अन् सारा रशिया देश तुम्ही त्याचे आधारस्तंभ, त्याचे न्यायकर्ते म्हणून, तुमचा निकाल ऐकेल, अन् तुमच्या निकालानं त्याचा उत्साह वाढेल किंवा उत्साहभंग होईल. रशियाची अन् त्याच्या अपेक्षांची निराशा करू नका. आमची दुर्दैवी तीन घोड्यांची गाडी आपल्या भरधाव दौडीत कदाचित् कुठंतरी आदळून नाश पावणार आहे, आणि बऱ्याच काळापासून साऱ्या रशियात माणसं विनवणीपूर्वक आपले हात पसरून तिच्या या बेफाम अविचारी चालीला थांबविण्याची हाक देत आले आहेत. आणि जर इतर राष्ट्रे या घोडागाडीच्या मार्गातून बाजूला होत असतील तर त्याचं कारण आदरभाव हे नाही, मग कवींची तशी कितीही भावना असो, तर केवळ भेकडपणा हे आहे. भेकडपणा म्हणा, किंवा उबग म्हणा, आणि ती बाजूला होतात हे बरंच आहे, पण संभव आहे की एक दिवस ती बाजूला होणार नाहीत. अन् धावणाऱ्या या पिशाचाला सामना देणारी भक्कम तटबंदी बनवतील आणि आमच्या बेबंदशाहीची ही उन्मत्त धाव, स्वतःच्या सुरक्षिततेकरिता, ज्ञान प्रबोधनाकरिता अन् सुसंस्कृत जीवनाकरिता अडवितील. आताच युरोपातून आपण धोक्याच्या सूचनांचे आवाज ऐकले आहेत, ते यापूर्वीच सुरू झाले आहेत. त्यांची

आणखी परीक्षा पाहू नका ! मुलानं केलेल्या बापाच्या खुनाचं समर्थन होईल अशी शिक्षा देऊन त्यांच्या वाढत्या द्वेषाची शीग भरू नका ! ''

इप्पोलित किरिलोविच जरी खराखुरा भावनावश झाला होता, तरी त्यानं आपलं भाषण हे काव्यात्म आवाहन करून आवरतं घेतलं — अन् त्याचा जो परिणाम झाला तो विलक्षण होता. आपलं भाषण संपविल्याबरोबर तो घाईघाईनं बाहेर गेला, अन् मी मागं निर्देश केल्याप्रमाणं, शेजारच्या खोलीत जाऊन जवळजवळ मूर्च्छा येऊन पडला. कोर्टात टाळ्या पडल्या नाहीत, पण गंभीरवृत्तीच्या माणसांचं मन संतुष्ट झालं. महिलांचं मात्र इतकंसं समाधान झालं नाही, अर्थात त्याच्या वक्तृत्वावर त्या खूष झाल्या होत्या, विशेषतः त्यांना या खटल्याचा शेवट काय होणार याविषयी काही चिंता नव्हती आणि त्यांचा फेत्युकोविचवर पूर्ण विश्वास होता. " तो शेवटी बोलेल अन् सर्वांना जिंकून घेईल."

प्रत्येकाची दृष्टी मीत्याकडं लागली; सरकारी वकिलाचं भाषण चालत असताना तो सर्व वेळ आपले दात घट्ट आवळून, आपल्या हातांची मिठी घालून अन् आपली मान खाली करून चूप बसला होता. मात्र मधून मधून तो आपलं डोकं वर करी अन् डोके, विशेषतः जेव्हा ग्रूशिंकाचा उल्लेख आला तेव्हा. जेव्हा सरकारी वकिलानं तिच्या विषयीच्या राकितीनच्या मताचा उल्लेख केला, तेव्हा त्याच्या मुद्रेवर तिरस्काराचं मंद हसू अन् क्रोधाची छटा येऊन गेली अन् तो ऐकू येईल अशा आवाजात तोंडातल्या तोंडात बोलला : " ढोंगी विद्वान लैकाचा ! '' इप्पोलित किरिलोविचनं जेव्हा आपण मोक्रोय इथं त्याला प्रश्न विचारून विचारून कसं बेजार केलं हे सांगितलं तेव्हा मीत्यानं आपली मान वर करून अतिशय उत्सुकतेनं सर्व ऐकलं. एका प्रसंगी तर तो चटकन् उठून ओरडण्याच्या बेतात होता, पण त्यानं स्वतःला आवरलं आणि आपले खांदे धिक्कारपूर्वक उडविले. लोक मागाहून भाषणाच्या शेवटच्या भागासंबंधी, मोक्रोय इथं आरोपीची तपासणी करण्यातील त्याच्या करामतीसंबंधी, आपापसांत बोलू लागले अन् इप्पोलित किरिलोविचची त्यांनी चेष्टा उडविली. " आपल्या चातुर्याची फुशारकी मारण्याचा मोह त्याला आवरता आला नाही,'' ते म्हणाले.

कोर्ट तहकूब झालं, पण थोडाच वेळ, पंधरा किंवा वीस मिनिटं फार फार झालं तर. श्रोतृवर्गात आपापसांत हळूहळू बोलण्याचा गुणगुण आवाज होत होता. अन् मधूनमधून मोठ्यानं उद्गार बाहेर पडत होते. मला त्यांतले काही आठवतात.

एका घोळक्यातील एक सद्गृहस्थ " वजनदार भाषण '' असं गंभीरपणे उद्गारला.

" त्यानं मानसशास्त्र फार मध्ये आणलं,'' दुसरा एक आवाज निघाला.

" पण ते सर्व लागू होतं, पूर्ण सत्य होतं ! ''

" हां, तो त्यात प्रवीणच आहे मुळी."

" त्यानं सारं एकत्र गोळा करून सांगितलं."

" होय, त्यानं आम्हालासुद्धा सर्वांना त्यात गुंडाळून घेतलं," दुसऱ्या एकानं री ओढली. " तुम्हांला आठवतं, आपल्या भाषणाच्या सुरुवातीला तो म्हणाला की आपण सारे फ्योदर पावलोविचसारखेच आहोत म्हणून ? "

" अन् शेवटीसुद्धा. पण तो सारा मूर्खपणा होता."

" अन् न कळल्यासारखंसुद्धा."

" तो थोडा फाजीलच वाहवत गेला."

" हा अन्याय आहे, अन्याय आहे."

" छे:, काही म्हणा, मांडणी फार हुशारीची होती. त्याला बराच काळ वाट पाहावी लागली, पण त्यानं त्याला मांडायचं होतं ते बरोबर मांडलं, हॅ-हॅ ! "

" बचावाचा वकील आता काय बोलणार ? "

दुसऱ्या एका घोळक्यात माझ्या कानावर आले.

" त्याला पीटर्सबर्गच्या माणसाला अशी कोपरखळी मारण्याचं काहीच कारण नव्हतं; ' तुमच्या भावनांना आव्हान ' म्हणे, आठवतं ना ? "

" होय, हे त्याला शोभलं नाही."

" फारच उतावीळपणा झाला त्याचा."

" अहो, तो घाबरट मनुष्य आहे."

" आपण इथे हसत आहोत, पण आरोपीच्या मनात काय होत असेल ? "

" होय, मीत्याला काय वाटत असेल ? "

तिसऱ्या एका घोळक्यात

" ती बाई, ती बघा लठ्ठशी, हातात भिंग घेतलेली, अगदी शेवटी बसली आहे, ती कोण आहे ? "

" ती एका सेनाधिकाऱ्याची बायको आहे, पण त्यांची फारकत झाली आहे, मी ओळखतो तिला."

" म्हणूनच तिच्या हातात भिंग आहे."

" ती फारशी चांगली नाही."

" अं हं, ती फार तिखट बाई आहे हं."

" तिच्यापासून दोन जागा सोडून एक गोरटेली लहानशी बाई आहे पहा, ती अधिक सुंदर आहे."

" त्यांनी मोक्रोयला त्याला मोठ्या हुषारीनं पकडलं, नाही ? "

" हो, फार हुषारीनं खरं. आम्ही हे पूर्वी ऐकलंय, त्यानं ही हकीकत सार्वजनिक ठिकाणी कितीतरी वेळा सांगितली आहे ! "

" अन् आतासुद्धा त्याला बोलण्यावर आवर घालणं शक्य झालं नाही. हा पोकळ गर्व आहे."

“ मनात काही तक्रार असलेला माणूस आहे हा, हॅ–हॅ ”

“ होय, अन् चटकन् चिडतो. अन् अलंकारिक वक्तृत्व फारच बुवा, एवढी लांबलचक वाक्यं ! ”

“ होय, तो आम्हांला भिववू पाहतो, आम्हाला भिववायचा त्यानं सारखा प्रयत्न चालविला. तीन घोड्यांच्या गाडीचा तो दृष्टान्त तुम्हाला आठवतो ? ‘ त्यांच्याकडं हॅम्लेट आहेत, पण आमच्याकडं, आतापर्यंत कारमाझफच आहेत ! ’ असं काही म्हणाला तो. ते मात्र त्यानं छान सांगितलं हं ! ”

“ ते उदारमतवाद्यांना खूष करण्याकरिता हो. त्यांना भितो ना तो ? ”

“ होय, अन् तो त्या वकिलालासुद्धा भितो बरं का.”

“ हो, फेत्युकोविच काय बरं बोलले ? ”

“ तो काही बोलला तरी तो आमच्या शेतकरी मंडळींना फसविणार नाही.”

“ तुम्हाला नाही तसं वाटत ? ”

चौथ्या घोळक्यात

“ तो त्या तीन घोड्यांच्या गाडीबद्दल बोलला ते, अन् इतर राष्ट्रांच्या बद्दलचा त्याच्या भाषणातला भाग चांगला होता.”

“ आणि इतर देश ते सहन करणार नाहीत असं तो म्हणाला ते खरं आहे.”

“ म्हणजे तुम्हाला काय म्हणायचं आहे ?”

“ असं पाहा, इंग्लंडच्या पार्लमेंटात गेल्या आठवड्यात एक सभासद उभा राहिला, आणि शून्यवाद्यांच्याबद्दल बोलताना त्यानं मंत्रिमंडळाला विचारलं की आता हस्तक्षेप करून या जंगली लोकांना धडा देण्याची वेळ आलेली नाही काय ? इप्पोलितच्या मनात त्या सभासदाचाच विचार होता. खात्रीनं त्याचाच. तो गेल्या आठवड्यासंबंधानंच बोलत होता.”

“ काही सोपं काम नाही.”

“ सोपं काम नाही ? का नाही ?”

“ म्हणजे काय, आपण क्रोन्स्टाट बंद करून टाकलंय अन् त्यांना काहीही धान्य आणून देत नाही. त्यांना ते कुठून मिळण र ?”

“ अमेरिकेतून. त्यांना ते अमेरिकेतून आता मिळतं.”

“ बेअकलीपणाचं बोलणं.”

पण घंटा वाजली, जो तो आपापल्या जागेकडं धावला. फेत्युकोविच व्याख्यानपीठावर चढला.

१०

बचावाच्या वकिलाचे भाषण : दुधारी प्रतिपादन

त्या सुप्रसिद्ध वक्त्याचे पहिले शब्द निनादू लागताच सगळीकडे गुपचूप झाले. श्रोतृवर्गाच्या नजरा त्याच्यावर खिळल्या. त्याने अगदी साध्या अन् सरळ रीतीने बोलायला सुरुवात केली. त्याच्या मुद्रेवर प्रत्ययाचा भाव होता, पण अहंकाराचा लवलेश नव्हता. त्याने वक्तृत्व गाजविण्याचा, करुणरस उत्पन्न करण्याचा किंवा भावना जागृत करणारी वाक्ये वापरण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही. एखाद्या सलगीच्या अन् सहानुभूती असणाऱ्या मित्रांच्या मेळाव्यात बोलावे तसा तो बोलत होता. त्याचा आवाज नादगंभीर अन् सहानुभूतिपूर्ण असा मोठा छान होता, अन् त्याच्या नुसत्या ध्वनीतच अकृत्रिम अन् साधे असे काहीतरी होते. पण प्रत्येकाला एकदम कळून आले की वक्त्याचा स्वर उंचावून त्यात खराखुरा करुणरस येणार अन् "अकथ्य शक्तीने हृदय छिन्नभिन्न करणार." त्याची भाषा इप्पोलित किरिलोविचच्या भाषेपेक्षा कदाचित अधिक अव्यवस्थित म्हणता येईल, पण त्याच्या भाषणात लंबीचवडी वाक्ये नव्हती अन् खरोखर तो काटेकोरपणाने बोलला. एक गोष्ट स्त्रियांना आवडली नाही. तो एकसारखा पुढे वाकत होता. विशेषतः त्याच्या भाषणाच्या सुरुवातीला, ते खाली लवणे होते असेच म्हणता येणार नाही, पण तो जणू आपल्या श्रोत्यांच्याकडे मुसंडी मारून जाणार अशासारखे वाटत होते; आपला उंचच उंच पाठीचा कणा, जणू मध्ये स्प्रिंग असल्याप्रमाणे जवळ जवळ काटकोन होण्याइतका तो खाली वाकवीत होता.

आपल्या भाषणाच्या सुरुवातीला तो एक प्रकारे तुटकतुटक, काही पद्धत, नसल्याप्रमाणे म्हणता येईल, असे बोलला आणि त्याने घडलेल्या गोष्टींचा समाचार अलग अलग घेतला, अर्थात शेवटी त्या सगळ्या गोष्टींतून एक घटना तयार झाली. त्याच्या भाषणाचे दोन भाग पाडता येतील, एका भागात आरोपाचा इन्कार करणारे भाष्य होते, ते मधून मधून विखारी अन् औपरोधिक होते. परंतु दुसऱ्या भागात त्याने आपला सूर, अन् आपली बोलण्याची रीतसुद्धा पालटली अन् एकदम करुणरस आळविला. श्रोतृवर्ग जणू त्याचीच वाट पाहत होता, अन् तो भावनावेगाने हेलावला.

त्याने सरळ मुद्द्याला हात घातला, आणि सुरुवातच त्याने असे सांगून केली की जरी आपण पीटर्सबर्गमध्ये व्यवसाय करीत असलो, तरी ज्या आरोपींच्या निरपराधीपणाविषयी आपल्याला खात्री आहे किंवा निदान त्याविषयीची अगोदरच कल्पना आली आहे अशा आरोपींचे काम घेऊनच आपण एकदा नव्हे अनेकदा

लहान लहान शहरात गेलो आहोत. " हीच गोष्ट आत्ताच्या केसमध्ये माझ्या बाबतीत घडलेली आहे." त्याने सांगितले. " वृत्तपत्रातील पहिल्या पहिल्या हकिकतीवरूनच माझ्या मनावर चटकन् अशा एका गोष्टीचा परिणाम झाला जिनं आरोपीच्या बाजूनं माझ्या मनाची चांगलीच पकड घेतली. सर्वात जास्त माझं लक्ष वेधून घेणारी गोष्ट अशी होती की वकिलीच्या धंद्यात नित्य अनुभवाला येते, पण मला वाटतं चालू खटल्यासारख्या प्रकरणी जितक्या प्रकर्षानं अन् वैशिष्ट्यपूर्ण रीतीनं ती आली तितकी क्वचितच येते. या वैशिष्ट्याबद्दल पद्धतशीरपणे मी माझ्या भाषणाच्या शेवटीच सांगायला पाहिजे, पण ते मी अगदी सुरुवातीलाच करतो, कारण कामाला सरळ हात घालायचा, मला परिणाम करायचे ते हातचे राखून ठेवायचे नाहीत अन् साधनसामग्रीचा काटकसरीनं वापर करायचा नाही, हा माझ्या स्वभावातील एक दोष आहे. तसं करणं हा कदाचित माझा अदूरदर्शीपणा ठरण्याचा संभव आहे. पण ते निदान मनापासूनचं आहे. माझ्या मनात जे आहे ते हे. आरोपीच्या विरुद्ध असलेली पुराव्यांची मालिका जबरदस्त अशी आहे आणि तरी एकही गोष्ट, जर तिची वेगवेगळी छाननी केली तर टीकेपुढं टिकणारी नाही. मी वृत्तपत्रात जशी ही केस अधिक बारकाईनं वाचीत गेलो तशी माझी कल्पना अधिकाधिक ठाम बनत गेली आणि अचानकपणे आरोपीच्या नातेवाईकांकडून मला त्याचा बचाव हाती घेण्याबद्दल विनंती करण्यात आली. मी ताबडतोब इकडं येण्याची घाई केली. अन् इथं आल्यानंतर माझी पुरती खात्री झाली. ही जी पुराव्यांची भयानक मालिका आहे ती तोडण्याकरिता अन् पुराव्याचा एकेक भाग वेगवेगळा घेतला तर तो कसा नाशाबीत अन् काल्पनिक आहे ते दाखविण्याकरिता मी ही केस हाती घेतली."

अशा रीतीने फेत्युकोविचने सुरुवात केली.

ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो," त्याने एकदम गंभीरपणे निवेदन म्हटले, " मी या भागात नवीन आहे. आगाऊच बांधलेल्या कल्पना मनात धरून मी आलेलो नाही. आरोपी हा भडकणाऱ्या अन् उच्छृंखल स्वभावाचा मनुष्य आहे, पण त्यानं माझा अपमान केलेला नाही. परंतु त्यानं कदाचित या शहरातल्या शेकडो लोकांचा अपमान केलेला असेल, आणि त्यामुळं अनेक लोकांचा त्यानं स्वत:बद्दल अगोदरच दूषित ग्रह करून ठेवला असेल. अर्थात् स्थानिक लोकांच्या नैतिक भावना त्याच्याविरुद्ध भडकलेल्या असणं योग्यच आहे हे मी मानतो. आरोपी हा भडकणाऱ्या अन् अत्याचारी स्वभावाचा आहे. तरीसुद्धा इथल्या समाजात त्याला स्थान मिळालं होतं. माझे विद्वान मित्र, सरकारी वकील, यांच्या कुटुंबातसुद्धा त्याचं स्वागत होत होतं."

(टीप– या शब्दांबरोबर श्रोतृवर्गात दोघांतिघांचं हसणं ऐकू आलं; ते लगेच दाबलं गेलं पण सर्वांच्या ते नजरेला आलं. आम्हां सर्वांना माहीत होतं की सरकारी

वकील मीत्याला आपल्या इच्छेविरुद्ध घरात घेत होता. एकाच कारणानं की कशा-मुळं का होईना त्याच्या पत्नीला त्याच्याविषयी एक प्रकारची आस्था वाटत होती. बाई फार मोठ्या शीलाच्या अन् नैतिक पात्रतेच्या होत्या, पण कल्पना तरंगी, लहरी अन् आपल्या पतीला, विशेषतः क्षुल्लक गोष्टीत, विरोध करण्याची हौस असलेल्या होत्या. परंतु मीत्या त्यांच्याकडं फार वरचेवर जात नसे.)

"असं असलं तरी मी असं सूचित करण्याचं धारिष्ट करतो की माझे प्रति-पक्षी जरी स्वतंत्र मताचे अन् न्यायी स्वभावाचे असले तरी त्यांनी माझ्या दुर्दैवी पक्षकाराविषयी चुकीचा ग्रह मनाशी करून घेतला असण्याचा संभव आहे. हो, ते अत्यंत स्वाभाविक आहे. हा दुर्दैवी मनुष्य असा दुर्ग्रह होण्याऱ्याच लायकीचा आहे. नीतिमत्तेच्या भावनेवर आघात झाला, अन् त्याहूनही सुरुचीवर आघात झाला की ती नेहमी निष्ठुर बनते. आपण विद्वान् सरकारी वकिलांच्या भाषणात आरोपीच्या स्वभावाचं अन् वर्तणुकीचं कठोर विश्लेषण केलेलं ऐकलं, त्यावरून या केसविषयी त्यांची असलेली विवेचक मनोवृत्ती उघड झाली. आणि विशेष म्हणजे, ते मानस-शास्त्रीय बारकाव्यात शिरले, पण जर त्यांच्यात आरोपीविषयी जाणीवपूर्वक अन् द्वेषपूर्व दुर्ग्रह नसता तर ते त्यात शिरू शकले नसते. पण अत्यंत द्वेषपूर्ण अन जाणीव-पूर्वक अन्यायी वृत्तीहूनही अधिक वाईट, नव्हे अशासारख्या प्रकरणी अधिक घातक, अशा दुसऱ्या काही गोष्टी आहेत. कलात्मक प्रेरणेमुळं जर आपण वाहवत गेलो, विशेषतः ईश्वरानं जर आपल्याला मानसशास्त्रीय अंतर्दृष्टी बहाल केली असेल तर एखादी अद्भुतरम्य कथा निर्माण करण्यात म्हणू या, वाहवत गेलो तर ते अधिकच वाईट आहे. इकडे यायला निघण्यापूर्वी, मला पीटर्सबर्गमध्ये अगोदरच सूचना मिळाली होती. अन् मला स्वतःलादेखील त्याची जाणीव होती, की मला इथं एक विद्वान प्रतिपक्षी असा भेटणार आहे की ज्याला त्याच्या मानसशास्त्राच्या अभ्यासामुळं आणि कुशाग्रबुद्धीमुळं अलीकडच्या काळातील कायदेपंडितांच्या मंडळीत एक विशेष प्रसिद्धी प्राप्त झालेली आहे. पण मानसशास्त्र प्रगाढ असलं तरी ती अशी सुरी आहे की ती दोन्ही बाजूंना कापत जाते. (लोकांत हशा) अर्थात् तुम्ही या उपमेबद्दल मला क्षमा करावी; वक्तृत्वाची मला फुशारकी मारता येणार नाही. पण फिर्यादी पक्षाच्या वकिलांच्या भाषणातील कोणताही एक मुद्दा मी उदाहरण म्हणून घेतो.

"आरोपी अंधारात बागेतून पळून जाऊन, कुंपणाच्या भिंतीवर चढला, नोकराकडून धरला गेला, त्याला त्यानं पितळी बत्त्याचा प्रहार करून खाली पाडले. नंतर त्यानं पुन्हा बागेत उडी टाकली आणि त्या मनुष्याला पाहण्यात पाच मिनिटं घालविली. आपण त्याला ठार केलं आहे की, नाही हे शोधण्याचा त्याचा प्रयत्न होता आणि आपण ग्रिगरीकडं करुणेच्या भावनेनं धावत गेलो या आरोपीच्या म्हणण्यावर विश्वास ठेवण्याला सरकारी वकील नकार देतात. ते म्हणतात 'नाही,

अशा प्रसंगी अशा तऱ्हेची मनाची कोमलता ही अशक्य आहे, ती अनैसर्गिक आहे; आपल्या गुन्ह्याचा जो एकमेव साक्षीदार तो मेला आहे की जिवंत आहे हे पाहण्याकरिताच तो धावत गेला, आणि अशा रीतीनं आपण खून केला आहे हे त्यानं दाखवून दिलं, कारण तो दुसऱ्या कोणत्याही कारणाकरिता परतून धावत गेला नसता.'

"इथं मानसशास्त्र येतं; पण आपण तीच पद्धत स्वीकारू अन् ती उलटीकडून लावून पाहू आणि आपल्याला तोही निष्कर्ष तितकाच संभाव्य आढळेल. खुनी मनुष्य सावधगिरी म्हणून साक्षीदार जिवंत आहे की मेला ते पाहण्याकरिता म्हणे खाली उडी मारून उतरला तरी खुद्द सरकारी वकिलांच्या म्हणण्याप्रमाणं त्यानं आपल्या बापाच्या खाजगी खोलीत फाडलेल्या पाकिटाच्या स्वरूपात एक आश्चर्यजनक पुरावा मागं ठेवला होता. त्या पाकिटावर आत तीन हजार रुबल असल्याचं लिहिलेलं होतं. 'जर त्यानं ते पाकीट आपल्याबरोबर नेलं असतं, तर जगात कुणालाही त्या पाकिटाविषयी अन् त्यातल्या नोटांविषयी, अन् तो पैसा या आरोपीनं चोरल्याविषयी कळलं नसतं,' हे सरकारी वकिलांचे स्वतःचे शब्द आहेत. तेव्हा एका बाजूला तुम्हाला सावधगिरीचा पूर्ण अभाव दिसतो, असा एक मनुष्य दिसतो की ज्याचं माथं ठिकाणावर नाही अन् जो भीतीनं पळून जाताना मागं जमिनीवर तो शोधाचा धागा ठेवून जात आहे, आणि दोन मिनिटांनंतर लगेच जेव्हा त्यानं दुसऱ्या मनुष्याला ठार मारलं तेव्हा त्याच्यात पराकाष्ठेचा निर्दय अन् हिशेबी दूरदर्शीपणा आहे असं गृहीत धरण्याला आम्हाला सांगण्यात येतं. पण तसं होतं असं आपण धरून चाललो तरीसुद्धा अमुक परिस्थिती असताना मी एखाद्या कॉकेशस मधल्या गिधाडाइतका रक्तपिपासू अन् तीक्ष्ण दृष्टीचा बनतो तर लगेच पुढं मी एखाद्या चिचुंद्रीइतका भित्रा अन् अंध होतो, असा भेद मला वाटतं, मानसशास्त्रीय सूक्ष्मताच करीत असते. पण जर मी इतका रक्तपिपासू अन् क्रूर हिशेबी असेन की, जेव्हा मी एका माणसाला ठार करतो तेव्हा मी परत पळत येऊन एवढंच पाहतो की, हा माणूस माझ्या विरुद्ध साक्ष देण्याकरिता जिवंत तर राहिलेला नाही ना, तर मी मारलेल्या त्या माणसाची काळजी घेत, इतर कोणा साक्षीदारांशी गाठ पडण्याचा धोका पत्करूनही पाच मिनिटं खर्च का करतो? माझा हातरुमाल त्याच्या डोक्यावरचं रक्त पुसून भिजवून का घेतो? पुढं माझ्याविरुद्ध तो पुरावा व्हावा म्हणून? जर आरोपी इतका निर्दय अंतःकरणाचा अन् हिशेबी असता तर त्यानं त्या नोकरावर त्याच बत्त्यानं पुनः पुन्हा प्रहार करून त्याला पुरता मारून टाकून त्या साक्षीविषयीची सर्व चिंता मिटवून टाकली नसती काय?

"दुसरी गोष्ट, जरी तो साक्षीदार जिवंत आहे का हे पाहण्याकरिता पळत गेला, तरी त्यानं वाटेवर दुसरा एक साक्षीदार ठेवला, तो म्हणजे तो पितळी बत्ता, जो त्यानं त्या दोन स्त्रियांच्या घरातून काढून घेतला होता अन् जो त्यांनी केव्हाही

आपला म्हणून ओळखला असता अन् त्यानं आपल्या इथून तो नेल्याचं त्यांनी शाबीत केलं असतं तो. आणि असं नाही की तो बत्ता तो वाटेवर विसरला, निष्काळजीपणानं किंवा घाईघाईत त्याच्या हातून पडला – नाही, त्यानं आपलं ते हत्यार भिरकावून दिलं, कारण ग्रिगरी जिथं पडला होता त्याच्यापासून पंधरा एक पावलांवर तो पडलेला होता. त्यानं असं का केलं ? हेच कारण की आपण एका माणसाला, जुन्या नोकराला मारलं याचं त्याला दुःख झालं; आणि त्यानं तो बत्ता एक शिवी हासडून एक खुनी हत्यार म्हणून फेकून दिला. असंच ते झालं असलं पाहिजे, नाही तर दुसरं कोणतं कारण त्यानं तो इतका दूर फेकून देण्याचं असू शकेल ? आणि जर त्याला एका मनुष्याला ठार मारल्याबद्दल दुःख अन् कीव वाटू शकते, तर त्यावरून दिसतं की आपल्या बापाचा खून करण्याच्या बाबतीत तो निरपराधी आहे. जर त्यानं त्याचा खून केला असता, तर तो कीव येऊन दुसऱ्या मारलेल्या माणसाकडे धावला नसता, मग त्याची भावना वेगळया प्रकारची झाली असती; त्याचे विचार स्वसंरक्षणावर केंद्रित झाले असते. दया-भावनेचा विचार करायला त्याला सवडच राहिली नसती, यात बिलकुल संशय नाही. उलट, त्याची चिंता वाहण्यात पाच मिनिटं काढण्याऐवजी त्यानं त्याचं डोकं फोडलं असतं. त्याच्या अंतःकरणात करुणेला अन् सद्भावनेला जागा होती याचं कारणच हे की तोपर्यंत त्याची सदसद्विवेक बुद्धी स्वच्छ होती. इथं वेगळया तऱ्हेचं मानसशास्त्र लागू होतं. ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, इथं मी मुद्दामच या पद्धतीचा अवलंब केला आहे, हे दाखविण्याकरिता की या पद्धतीनं काहीही सिद्ध करता येतं. तिचा उपयोग कोण करतो त्यावर ते अवलंबून आहे. मानसशास्त्र हे अत्यंत गंभीर वृत्तीच्या माणसांना सुद्धा अद्‌भुतरम्य कल्पना करण्याचा मोह पाडतं, अन् अगदी नकळत. सद्‌गृहस्थहो, मी मानसशास्त्राच्या दुरुपयोगाबद्दल हे बोलत आहे."

सरकारी वकिलाचा पाणउतारा होत असताना सुद्धा मान्यतेचे आवाज आणि हशा पुन्हा कोर्टात ऐकू आला. मी ते भाषण सविस्तर देणार नाही; त्यातले काही उतारे, काही मुख्य मुख्य मुद्देच फक्त मी येथे उद्‌धृत करतो.

११

पैसा नव्हता नि अर्थात चोरीही नव्हती

फेत्युकोवच्या भाषणातील एक मुद्दा प्रत्येकाला नवीन वाटला. त्याने ते घातक तीन हजार रुबलचे अस्तित्वच मुळी सपशेल अमान्य केले, अन् म्हणून त्यांची चोरी झाल्याची शक्यता अमान्य केली.

"ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो," त्याने बोलायला सुरुवात केली. "चालू केस-मधील एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट कोणाही नवीन अन् पूर्वग्रहानं दूषित न झालेल्या

निरीक्षकाच्या चटकन् मनात येईल ती म्हणजे चोरीचा आरोप अन् चोरण्यासारखं काही होतं हे सिद्ध करण्याची पुरती अशक्यता. आपल्याला सांगण्यात आलं आहे की पैसा—तीन हजार रुबल चोरण्यात आले, पण ते रुबल अस्तित्वात तरी होते का हे कुणालाच माहीत नाही. विचार करा, त्या रकमेबद्दल आपल्या कानी कसं आलं, आणि ती रक्कम कुणी पाहिली आहे? त्या नोटा ज्यानं पाहिल्या, अन् त्या पाकिटात ठेवल्या गेल्या असं ज्यानं सांगितलं तो तो चाकर, स्मिर्द्याखफ होता. तो त्या संबंधानं आरोपीजवळ अन् त्याचा भाऊ इवान फ्योदरोविच याच्याजवळ हा अनर्थ घडण्यापूर्वी बोलला होता. मादाम स्व्येतलोवालाही त्याबद्दल सांगण्यात आलं होतं. पण या तिघांपैकी एकानंही कुणी त्या नोटा प्रत्यक्ष पाहिल्या नव्हत्या, स्मिर्द्याखफाशिवाय त्या कुणीसुद्धा पाहिल्या नव्हत्या.

"इथं प्रश्न उत्पन्न होतो की जर त्या होत्या, अन् स्मिर्द्याखफनं त्या बघितल्या होत्या हे खरं असेल तर त्यानं त्या शेवटी केव्हा पाहिल्या होत्या? त्याच्या धन्यानं अंथरुणाखालून त्या काढून घेतल्या असल्या आणि त्याला न सांगता परत पैशाच्या पेटीत ठेवून दिल्या असल्या तर काय? लक्षात घ्या, स्मिर्द्याखफच्या हकिकती अनुसार त्या नोटा गादीखाली ठेवल्या होत्या; आरोपीनं त्या ओढून बाहेर काढल्या असल्या पाहिजेत, आणि तरी अंथरूण तर जरासुद्धा विसकटलेलं नव्हतं; ही बाब जाबजबाबाच्या कागदपत्रात नमूद आहे. मग त्या नोटा अंथरूण न विसकटता आरोपीला सापडल्या असणं कसं शक्य आहे? जो नीटनेटका अन् डाग न पडलेला कपडा मुद्दाम त्या अंथरुणावर पसरण्यात आला होता त्याला त्याच्या रक्तानं भरलेल्या हातांचे डाग लागल्याशिवाय कसे राहिले असते!

"पण मला विचारतील : त्या जमिनीवरच्या पाकिटात काय? होय, त्या पाकिटासंबंधानं एक दोन शब्द बोलण्याची गरज आहे खरी. अत्यंत विद्वान सरकारी वकिलांनी आत्ताच स्वतःचं मत, स्वतःचं मत हं, लक्षात घ्या हं— जाहीर केलेलं ऐकून मी काहीसा चकित झालो, ते असं की ते पाकीट जर नसतं, ते जर जमिनीवर तसंच टाकून देण्यात आलं नसतं, तर जगात त्या पाकिटाच्या अन् त्यातील नोटांच्या अस्तित्वाविषयी आणि म्हणून ते चोरलं गेल्याविषयी कोणालाही कळलं नसतं. आणि म्हणून तो कागदाचा कपटा हा, सरकारी वकिलांच्या स्वतःच्याच कबुलीवरून, ज्यावर चोरीचा आरोप आधारता येतो असा एकमेव पुरावा आहे, 'नाहीतर चोरीविषयी, अन् बहुधा त्या पैशाविषयीही, कुणाला कळलं नसतं.' पण तो कागदाचा कपटा जमिनीवर पडला होता एवढ्याच एका गोष्टीवरून त्यात पैसे होते अन् ते चोरले गेले हा पुरावा होतो काय? हां, कोणी असा आक्षेप घेतील की, स्मिर्द्याखफनं त्या पाकिटात तो पैसा पाहिला होता. पण केव्हा, त्यानं तो शेवटचा केव्हा पाहिला होता? मी ते तुम्हाला विचारतो. मी स्मिर्द्याखफशी बोललो, आणि त्यानं मला सांगितलं की आपण ते पैसे हा अनर्थ घडण्यापूर्वी दोन दिवस पाहिले होते. मग

म्हाताऱ्या फ्योदर पावलोविचनं, आपल्या प्रीतिपात्राची उतावळीनं अन् उन्मादानं वाट पाहात कोंडून घेतलेल्या स्थितीत आपला वेळ ते पाकीट फोडण्यात अन् आतल्या नोटा बाहेर काढण्यात घालविला असेल अशी कल्पना का करू नये? 'या पाकिटाचा उपयोग काय?' त्यानं स्वतःशीच विचार केला असेल, 'त्यात नोटा आहेत यावर तिचा विश्वासच बसणार नाही, पण मी जेव्हा तिला त्या तीस सप्तरंगी नोटांचं एक पुडकं दाखवीन, तेव्हा त्यानं तिच्यावर अधिक परिणाम होईल, खात्रीनं तिच्या तोंडाला पाणी सुटल्याशिवाय राहणार नाही.' आणि म्हणून तो ते पाकीट फोडतो, आतला पैसा बाहेर काढतो अन् ते पाकिट जमिनीवर भिरकावून देतो, आपणच त्याचे मालक याची त्याला जाणीव आहे अन् पुरावा ठेवून घेत असल्याच्या कोणत्याही भयाचा त्याच्या मनाला त्रास नाही.

"सद्गृहस्थहो, लक्षात घ्या, या तर्काहून अन् अशा कृतीहून अधिक संभवनीय दुसरा तर्क अन् कृती काही असू शकेल काय? हा तर्क विचारात का घेऊ नये? पण जर तसं काही घडलं असेल, तर चोरीचा आरोप सपशेल गळून पडतो; जर पैसाच नसेल तर त्याची चोरीही नाही. जर जमिनीवर पडलेलं पाकीट हा त्यात पैसे होते याचा पुरावा म्हणून मानला जायचा असेल तर मी त्याच्या उलट मत का गृहीत धरू नये की ते पाकीट जमिनीवर पडलं होतं याचं कारण त्यातला पैसा मालकानं बाहेर काढून घेतला होता म्हणून!

पण मला विचारलं जाईल : जर फ्योदर पावलोविचनं त्या पाकिटातून पैसे काढून घेतले असले तर त्या पैशाचं झालं काय? कारण पोलिसांनी घर शोधलं तेव्हा त्यांना ते आढळले नाहीत. पहिली गोष्ट, त्या पैशाचा काही भाग पैशाच्या पेटीत आढळून आला. त्यानं ते त्या दिवशी सकाळी किंवा आदल्या सायंकाळी त्याचा दुसरा काही उपयोग करण्याकरिता कुणाला द्यायला किंवा दूर पाठवायला काढून घेतले असतील; त्यानं आपला विचार त्याला जे काय करायचं होतं त्याचा बेत, पूर्णपणे बदलला असेल, आणि ती गोष्ट अगोदर स्मिर्द्याकफला सांगण्याची त्याला आवश्यकता वाटली नसेल, आणि जर अशा तऱ्हेचा खुलासा होऊ शकतो अशी यत्किंचित जरी शक्यता असेल, तर कैद्यावर चोरीकरिता खून केल्याचा आणि प्रत्यक्ष ती चोरी केल्याचा आरोप इतक्या निश्चितपणे कसा काय करता येईल? हे अद्भुतरम्यतेच्या क्षेत्रात शिरणं झालं. काही तरी चोरलं गेलं आहे असा जर दावा असेल तर ती वस्तू दाखल केली गेली पाहिजे, किंवा निदान त्या वस्तूचं अस्तित्व संशयातीतपणे सिद्ध केलं पाहिजे. आणि या नोटा तरी कोणीही पाहिलेल्या नाहीत.

काही थोड्याच दिवसांपूर्वी पीटर्सबर्गमध्ये एक अठरा वर्षांचा तरुण मुलगाच म्हणा ना, फळ विक्रीचा छोटासा धंदा करणारा, दिवसाढवळ्या एका सराफाच्या दुकानात हातात कुऱ्हाड घेऊन गेला, आणि विलक्षण वैशिष्ट्यपूर्ण धाडसानं त्यानं दुकानाच्या मालकाला ठार मारून पंधराशे रुबल नेले. पाच तासांनंतर त्याला

पकडण्यात आलं, आणि पंधरा रुबल- जे त्यानं पूर्वीच खर्च करून टाकले होते ते-वजा जाता बाकीची सर्व रक्कम त्याच्याकडं मिळाली. शिवाय दुकानातला नोकर- जो त्या खुनानंतर दुकानात परत आला, त्यानं पोलिसांना चोरीला गेलेली बिनचूक रक्कमच सांगितली असं नाही, तर तितक्या रकमेत नोटा किती होत्या अन् सोन्याची नाणी किती होती तेसुद्धा सांगितलं, अन् बरोबर त्याच नोटा अन् नाणी त्या गुन्हेगारापाशी सापडली. त्या मागून खुनी माणसाकडून पूर्ण अन् खराखुरा कबुली जबाबही मिळाला. ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, याला मी म्हणतो पुरावा! त्या केसमध्ये मी तो पैसा ओळखतो, पाहतो, हातात घेतो, अन् त्याचं अस्तित्व मला नाकारताच येत नाही. आपल्या पुढच्या केसमध्ये हीच स्थिती आहे काय? आणि तरी हा जीवन-मरणाचा प्रश्न आहे.

"होय हो, पण तो त्या रात्री पैसे उधळून मद्यपानाची मौजमजा उडवीत होता ना, त्याच्यापाशी पंधराशे रुबल असल्याचं दाखविण्यात आलं होतं-असं मला सांगण्यात येईल; हा पैसा कुठून आला? पण फक्त पंधराशे रुबलच सापडू शकले, आणि त्या रकमेचा दुसरा अर्धा भाग कुठंच शोधून मिळाला नाही , याच खुद्द गोष्टीवरून दिसून येतं की तो अन् तो पैसा एक नव्हता, अन् तो कधीच त्या पाकिटात नव्हता. वेळेचा काटेकोर हिशेब करून प्राथमिक तपासणीच्या वेळी असं सिद्ध झालं की आरोपी हा त्या नोकर बायांच्या तिथून घरी न जाता सरळ पेऱ्होतिनच्या इथं धावत गेला, अन् तो दुसरीकडं कुठंच गेला नाही. तेव्हा हा सारा वेळ तो कुणाच्या तरी संगतीत होता अन् म्हणून त्याला त्या तीन हजाराचा अर्धा अर्धा हिस्सा करून एक अर्धा शहरात दडवून ठेवणं शक्य नव्हतं. याच विचारानं नेमकी सरकारी वकिलांची धारणा अशी झाली की तो पैसा मोक्रोयला कुठं तरी खाचीबिचीत लपविलेला आहे. उदोल्फोच्या किल्ल्यातल्या भुयारात का नाही मग, भल्या गृहस्थांनो? ही समजूतच खरोखर फाजील काल्पनिक अन् फाजील अद्‌भुतरम्य नाही काय? अन् पाहा, जर ही समजूत मोडून पडली, तर चोरीचा सारा आरोपच मुळी पालापाचोळ्यासारखा उडून जातो, कारण तसं असेल तर त्या दुसऱ्या पंधराशे रुबलांचं काय झालं असणं शक्य आहे? कोणता चमत्कार घडून ते नाहीसे झाले? कारण आरोपी दुसरीकडं कुठंच गेला नव्हता असं सिद्ध झालं आहे. आणि अशा कल्पित कथांवरून आपण एका माणसाच्या आयुष्याची नासाडी करायला सिद्ध झालो आहो?

मला कुणी असं म्हणतील की त्याच्याजवळ हे जे पंधराशे होते ते त्याला कुठून मिळाले हे त्याला सांगता आलेलं नाही, आणि आदल्या रात्री त्याच्यापाशी काहीच पैसे नव्हते हे प्रत्येकजण जाणतो. कोण जाणतो, जरा सांगा बरं? आरोपीनं तो पैसा कुठून मिळाला ते स्पष्ट अन् अस्खलित रीतीनं निवेदन केलं आहे, अन् ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, तसंच जर पाहिलं तर, त्या निवेदनाहून अधिक संभाव्यता

असलेली, आणि आरोपीच्या स्वभावाला अन् वृत्तीला अधिक सुसंगत अशी दुसरी गोष्टच असू शकत नाही. सरकारी वकील आपल्याच अद्भुतरम्य कथेनं मुग्ध होऊन गेले आहेत. दुर्बळ इच्छाशक्ती असलेला माणूस, ज्यानं आपल्या वाग्दत्त वधूनं इतक्या अपमानास्पद रीतीनं देऊ केलेले तीन हजार घेण्याइतक्या अवस्थेला स्वतःला नेलं तो, अर्धा भाग बाजूला काढून अन् शिवून ठेवणंच शक्य नाही, तर, जरी समजा त्यानं तो भाग शिवून ठेवलेला असला तरी, दर दोन दिवसांनी तो ती पिशवी उसवेल आणि शंभर काढून घेईल अन् असं करीत करीत महिन्यात सर्व रक्कम संपवून टाकील, असं सांगितलं गेलं. हे सारं तुम्हाला आठवत असेल, अशा स्वरात मांडलं गेलं की त्याला विरोध करताच येणार नाही. पण ही गोष्ट अगदी वेगळ्याच रीतीनं घडली असली तर? तुम्ही एखादी अद्भुतरम्य कथाच, अन् तीसुद्धा अगदी वेगळ्याच प्रकारच्या माणसाच्या विषयी, गुंफत असाल तर? अगदी तसंच आहे, तुम्ही एक वेगळाच माणूस कल्पून उभा केला आहे!

"कोणी कदाचित म्हणेल, त्याच्या वाग्दत्त वधूनं ही दुर्घटना घडण्यापूर्वी एक महिना त्याला दिलेले सगळे तीन हजार त्यानं एका दिवसात खर्च करून टाकले असं सांगणारे साक्षीदार आहेत, तेव्हा त्यानं ती रक्कम अर्धी अर्धी केली असं होणं शक्य नाही. पण कोण आहेत हे साक्षीदार? त्यांच्या पुराव्याची किंमत काय ती कोर्टात यापूर्वीच दाखविण्यात आली आहे. शिवाय, दुसऱ्या मनुष्याच्या हातात रोटीचा वरचा भाग आहे त्याहून नेहमीच मोठा दिसतो, आणि या साक्षीदारांपैकी कोणीही तो पैसा मोजून पाहिला नव्हता; त्यांनी फक्त नजरेनंच ठरवलं. आणि साक्षीदार मॅक्झिमफ यानं जबाब दिला आहे की आरोपीच्या हातात वीस हजार होते. ज्यूरीतील सद्गृहस्थहो, मानसशास्त्र हं दुधारी शस्त्र आहे. आता ती दुसरी धार मी लावतो अन् त्यातून काय निघतं आपण पाहू या.

"ही दुर्घटना घडण्यापूर्वी एक महिना आरोपीकडं कतिरीनाइ वानोवनानं तीन हजार रूबल पोस्टानं पाठवून देण्याकरिता सोपविले होते. पण प्रश्न असा की, ते त्याच्याकडं, आताच जाहीर रीतीनं सांगण्यात आलं त्याप्रमाणं, इतक्या अपमानास्पद अन् लांच्छनास्पद रीतीनं सोपविण्यात आले हे खरं आहे काय? त्या तरुण महिलेनं या विषयासंबंधी जे पहिलं निवेदन केले ते वेगळं होतं, पूर्णपणे वेगळं होतं. दुसऱ्या निवेदनात आपण फक्त धिक्काराचे अन् सूडाचे आक्रंद—फार दिवस लपवून ठेवलेल्या द्वेषाचे आक्रंदच — ऐकले. आणि या साक्षीदारानं आपली पहिली साक्ष चुकीची दिली. एवढ्या गोष्टीवरूनच तिची दुसरी साक्ष तशीच चुकीची झाली असू शकेल असा निष्कर्ष काढण्याचा आम्हाला हक्क राहतो. सरकारी वकील म्हणाले मी त्या हकिकतीला धक्का लावणार नाही, लावू धजणार नाही (त्यांचेच शब्द आहेत हे). ठीक आहे. मी पण तिला धक्का लावणार नाही, पण फक्त एवढंच म्हणण्याचं धाडस करीन की जर एक उदात्त अन् उच्च तत्त्वांची,

व्यक्ती, आणि या अत्यंत आदरणीय तरुण बाई तशा आहेत यात प्रश्नच नाही, जर अशी व्यक्ती मी म्हणतो, आरोपीचा घात करण्याच्याच उघड हेतूनं, कोर्टात आपल्या पहिल्या जबाबाचा एकाएकी प्रतिवाद करण्याची मुभा घेते, तर हे स्पष्ट आहे की हा जबाब निःपक्षपातीपणानं, थंड मनानं दिला गेलेला नाही. या सूडबुद्धीच्या स्त्रीनं बरीच अतिशयोक्ती केली असेल असं गृहीत धरण्याचा आम्हाला हक्क नाही काय? होय, विशेषतः तिनं त्याला जे पैसे देऊ केले त्याविषयीच्या अपमानाबद्दल अन् मानहानीबद्दल तिनं अतिशयोक्तिपूर्ण सांगितलं असल्याची शक्यता आहे. छेः, तो पैसा अशा रीतीनं देऊ करण्यात आला होता की तो स्वीकारायला काहीच हरकत नव्हती. विशेषतः आरोपीसारख्या इतक्या बेपर्वा माणसाला घेणं अवघड वाटलं नाही; सर्वांत महत्त्वाची गोष्ट तसं अवघड न वाटण्याचं कारण म्हणजे तो आपल्या बापाकडून त्याच्या हिशेबानं येणं असलेले तीन हजार रुबल लवकरच मिळतील अशी अपेक्षा धरून होता. हा त्याचा अविचारच होता, पण विचाराच्या अशा बेजबाबदार अभावामुळंच तर त्याला आपला बाप आपल्याला तो पैसा देईल असा भरवसा वाटला की आपल्याला तो पैसा मिळणारच, आणि म्हणून आपण आपल्यावर सोपविलेला पैसा केव्हाही पाठवून देऊ शकू, त्याला वाटलं.

"पण त्यानं त्याच दिवशी अर्धा पैसा बाजूला काढून अन् तो एका लहानशा पिशवीत शिवून ठेवला हे मान्य करण्याचा सरकारी वकील मुळी इन्कारच करतात. तो त्याचा स्वभावच नाही, त्याला तसं मनात येणं शक्य नाही, असं ते सांगतात. पण तरीसुद्धा त्यांनी कारमाझफ घराण्याच्या ऐसपैस स्वभावाचं वर्णन केलं; कारमाझफमध्ये दोन टोकं एकाच वेळी कशी नांदतात हे त्यांनी सांगितलं. कारमाझफ हा बरोबर असा उभयभावी स्वभाव आहे, तो दोन टोकांत हेलावत असतो, उन्मत्त मौजमजेच्या जबरदस्त वासनेनं झपाटलेला असतानासुद्धा, त्याला जर दुसऱ्या बाजूकडं काही विशेष दिसलं तर तो स्वतःला सावरू शकतो. आणि दुसऱ्या बाजूकडं आहे प्रेम– ते नवं प्रेम जे त्याच्या अंतःकरणात प्रज्वलित झालेलं आहे, आणि त्या प्रेमाकरिता त्याला पैशाची गरज आहे. हो, ही गरज आपल्या प्रियेच्या संगतीत मौजमजा करण्याहून फार अधिक आहे. जर ती त्याला म्हणेल की 'मी तुझी आहे, मला फ्योदोर पावलोविच नको.' तर तिला घेऊन जाण्याकरिता आपल्याकडं पैसा पाहिजे. ते मौजमजा करण्यापेक्षा जास्त महत्त्वाचं आहे. कारमाझफला हे समजणं अशक्य आहे काय? त्याला ज्या यातना होत्या त्या या चिंतेच्याच होत्या. त्यानं तो पैसा बाजूला काढावा अन् वेळ आली तर त्याकरिता लपवून ठेवावा यात असंभाव्य असं काय आहे?

"पण दिवस गेले, आणि फ्योदर पावलोविचनं ते अपेक्षित तीन हजार त्याला दिले नाहीत; उलट, आरोपीनं असं ऐकलं की ही रक्कम तो आपण प्रेम करीत असलेल्या स्त्रीला फूस लावण्याकरिता उपयोगात आणू इच्छितो. 'जर फ्योदर

पावलोविच तो पैसा मला न देईल तर कतिरीना इवानोवनापुढं मी चोर म्हणून समजला जाईन ' असं त्याच्या मनात आलं. आणि त्या वेळी त्याच्या मनात ती कल्पना आली की आपण कतिरीना इवानोवनाकडं जावं, तिच्यापुढं ते पंधराशे रुबल, जे तो अजूनही आपल्या गळयाभोवती वागवीत होता ते ठेवावेत, आणि तिला म्हणावं : ' मी बदमाष आहे, पण चोर नाही.' असं या ठिकाणी अगोदरच आपल्याला, त्यानं ती रक्कम डोळयातल्या बाहुलीसारखी का जपावी, त्यानं ती छोटी पिशवी उसवून एकेका वेळी शंभर शंभर असे खर्च का करू नये, याचं कारण मिळतं. आरोपीला आत्मप्रतिष्ठेची जाणीव आहे हे तुम्ही का नाकारावं? होय, त्याला आत्मप्रतिष्ठा आहे, कबूल आहे की ती भलत्या ठिकाणी लागलेली आहे, ती पुष्कळवेळा चुकीच्या स्वरूपात प्रकट झाली आहे, तथापि ती आहे अन् अगदी आवेगरूपानं आहे, अन् त्यानं ते सिद्ध केलेलं आहे.

"आता हे प्रकरण अधिकच गुंतागुंतीचं बनते; त्याच्या मत्सराच्या यातना कळसाला पोचतात, अन् तेच दोन प्रश्न त्याच्या तप्त डोक्याला अधिकाधिक सतावतातः 'जर मी कतिरीना इवानोवनाची परतफेड केली तर ग्रूशिंकाला घेऊन जाण्याचं साधन मला कुठं मिळणार ?' तो जर बेफामपणे वागला असला, खूप पीत सुटला असला, आणि उपहारगृहात जर त्यानं दंगली केल्या असत्या तर त्याचं कारण बहुधा त्याची मनःस्थिती सहनशक्तीच्या पलीकडे विपन्न अन् ताणलेली अशी होती. हे दोन प्रश्न इतके तीव्र बनले होते की त्यातून शेवटी तो निराशेच्या आहारी गेला. त्यानं आपल्या धाकट्या भावाला त्या तीन हजार रुबलांची शेवटी याचना करण्याकरिता पाठविलं, पण उत्तराची वाट पाहत न बसता, तो स्वतःच आत घुसला आणि साक्षीदारांच्या समक्ष शेवटी त्यानं त्या म्हाताऱ्याला ठोकलं. त्यानंतर त्याला तो पैसा कोणाकडून मिळण्याचा काही उपायच राहिला नव्हता; त्या मारठोकीनंतर त्याचा बाप त्याला तो पैसा देणार थोडाच.

"त्याच दिवशी सायंकाळी त्यानं आपल्या छातीवर, म्हणजे छातीच्या वरच्या भागावर जिथं ती छोटी पिशवी होती तिथंच बरोबर हात मारला अन् प्रतिज्ञापूर्वक आपल्या भावाला तो म्हणाला की मी बदमाष नाही हे दाखविण्याचं साधन माझ्यापाशी आहे, पण तरी मी बदमाषच राहणार आहे, कारण त्याला दिसून आलं की ते साधन आपण वापरणार नाही, ते वापरण्याची दानत, ती इच्छाशक्ती आपल्यात असणार नाही. सरकारी वकील अलेक्सी कारमाझफच्या जबाबावर विश्वास ठेवण्याचं का नाकारतात? का इतक्या मनोभावानं अन् खरेखुरेपणानं, इतक्या स्वयंस्फूर्तपणे अन् खात्री पटेल अशा रीतीनं त्यानं ती साक्ष दिली आहे! आणि उलट, तो पैसा त्यानं कुठल्या तरी खाचीखोचीत, कुठल्यातरी उदोल्फोच्या किल्ल्यातल्या भुयारात लपवून ठेवला आहे असं मानण्याची ते माझ्यावर सक्ती का करीत आहेत?

"त्याच सायंकाळी आपल्या भावाशी बोलणं झाल्यानंतर, आरोपीनं ते दुर्दैवी पत्र लिहिलं, आणि ते पत्र हाच आरोपीनं ती चोरी केल्याचा अतिशय अचंबा वाटण्याजोगा मुख्य पुरावा आहे! 'मी सर्वांकडं याचना करीन, आणि जर मला ती रक्कम मिळाली नाही तर मी माझ्या वडिलांचा खून करीन अन् ते वर गुलाबी फीत असलेलं पाकिट, इवान निघून जाताच, त्याच्या गादीखालून काढून घेईन.' खुनाचा पुरता कार्यक्रमच लिहिलाय हा, असं ते सांगतात, म्हणून खून करणारा तोच असला पाहिजे. 'त्यानं जसं लिहिलं तसंच सगळं केलं गेलं आहे.' असं सरकारी वकील म्हणतात.

"पण पहिली गोष्ट म्हणजे, ते पत्र एका दारूच्या धुंदीतल्या माणसाचं आणि अतिशय चिडलेल्या अवस्थेत लिहिलेलं पत्र होतं; दुसरी गोष्ट, त्या पाकिटाबद्दल तो लिहितो तेही पुन्हा स्मिर्दाखफकडून त्यानं जे ऐकलं होतं त्यावरून, कारण त्यानं स्वतः ते पाकीट पाहिलेलंच नाही; आणि तिसरी गोष्ट, त्यानं ते लिहिलं खरं, पण त्यानंच तो खून केला हे कसं काय तुम्ही सिद्ध करू शकता? आरोपीनं ते पाकीट त्या उशीखालून काढलं काय, त्याला पैसा मिळाला काय, पैसा खरोखर तिथं होता तरी काय? आणि तुम्हाला आठवत असेल तर आरोपी पळत सुटला तो काय पैसा मिळविण्याकरिता? तो सपाट्यानं पळत सुटला तो चोरी करण्याकरिता नव्हे, तर ती कुठं आहे, ज्या स्त्रीनं त्याला साफ चिरडून टाकलं होतं ती कुठं आहे, हे शोधून काढण्याकरिता. तो पळत सुटला तो एखादा कार्यक्रम अमलात आणण्याकरिता, त्यानं लिहिलेलं होतं ते पार पाडण्याकरिता नव्हे, म्हणजेच अगोदर ठरवून ठेवलेल्या चोरीचं कृत्य करण्याकरिता नव्हे, तर तो पळत सुटला तो एकाएकी, मनात आल्याबरोबर मत्सराच्या संतापात पळत सुटला. होय, पण तो जेव्हा तिथं पोचला अन् त्यानं त्याचा खून केला तेव्हा त्यानं तो पैसाही हस्तगत केला, असं मला सांगण्यात येईल. पण खरोखर त्यानं खून केला तरी काय? चोरीचा आरोप मी उद्वेगाने नाकारतो. जर माणसानं कशाची चोरी केली हे नेमकेपणानं नमूद करणं शक्य नसेल तर त्या माणसावर चोरीचा आरोप करता येणार नाही हा स्वयंसिद्ध सिद्धान्त आहे. पण चोरी न करता त्यानं त्याचा खून केला काय, नव्हे त्यानं खून तरी केलाय काय? ते सिद्ध करण्यात आलं आहे काय? ती ही एक अद्भुतरम्य कल्पनाच नाही काय?"

१२

आणि खूनही झाला नाही

"ज्यूरीतील सद्गृहस्थहो, नम्रपणे मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की इथं एका माणसाचं जीवित पणाला लागलेलं आहे आणि तुम्ही दक्ष राहिलं

पाहिजे. सरकारी वकिलांनीच खुद्द कबूल केलेलं आपण ऐकलं आहे की आज-तारखेपर्यंत ते आरोपीवर गुन्हा करण्याची पूर्ण अन् जाणीवपूर्वक पूर्व योजना करण्याचा आरोप करण्याला बिचकत होते; ते घातकी धुंदीतलं पत्र जे आज कोर्टात दाखल करण्यात आलं ते पाहीपर्यंत ते बिचकत होते. ' लिहिल्याप्रमाणं सर्व करण्यात आलं.' पण मी पुन: सांगतो, तो धावत गेला तो तिच्याकडं, तिला बघण्याकरिता, ती आहे कुठं हे शोधून काढण्याकरिता. ही वस्तुस्थिती आहे, ती नाकारता येणार नाही. ती जर घरी असती, तर तो धावत गेला नसता, तो तिच्यापाशीच राहिला असता, अन् त्या पत्रात जे करणार म्हटलं ते त्यानं केलं नसतं.. तो अनपेक्षितपणे अन् आकस्मित रीतीनं धावला, अन् त्या वेळी त्याला त्या आपल्या धुंदीतल्या पत्राची शुद्धही नसेल कदाचित. ' त्यानं तो बत्ता चटकन् उचलला ' असं ते म्हणतात, आणि त्या बत्त्याच्या आधारावर मनोव्यापाराची सबंध इमारत कशी उभारण्यात आली ते तुम्हाला आठवत असेल. तो बत्ता हेच आपलं हत्यार असं त्याच्या मनात येणं, अन् त्यानं तो चटकन् उचलून घेणं हे कसं क्रमप्राप्त होतं वगैरे वगैरे. या ठिकाणी एक अगदी सहज सामान्य कल्पना माझ्या मनात येते. जर समजा तो बत्ता नजरेसमोर नसता, ज्या टेबलावरून तो आरोपीनं उचलला तिथं तो पडलेला नसता, कुठं तरी कपाटात ठेवलेला असता तर ? आरोपीच्या दृष्टीला तो आला नसता, आणि तो हत्यार न घेताच, रिकाम्या हातांनी, धावत गेला असता, आणि मग त्यानं अर्थातच कुणाला ठार केलं नसतं. तर मग तो बत्ताही त्याच्या पूर्ण योजनेचा पुरावा म्हणून कसा काय मी मानू शकतो ?

" होय, पण तो उपहारगृहातून आपल्या बापाचा खून करणार असल्या-बद्दल बोलत होता, आणि दोन दिवसांपूर्वी, ज्या सायंकाळी त्यानं ते धुंदीतलं पत्र लिहिलं त्या वेळी, तो शांत होता अन् उपहारगृहातल्या एका विक्रेत्या नोकराशी फक्त भांडला होता, कारण कारमाझफला भांडण केल्यावाचून चैन पडत नाही, हे खरं ! पण माझं त्याला उत्तर हे आहे की जर त्यानं आपल्या पत्रात लिहिल्याप्रमाणं अशा तऱ्हेचा खून करण्याची आखणी केली असती तर तो विक्रेत्या नोकराशीसुद्धा भांडला नसता, अन् कदाचित तो उपहारगृहातच गेला नसता, कारण अशा तऱ्हेचा गुन्हा रचणारा माणूस निवांत अन् एकांतवास शोधतो, स्वतःला विसरू पाहतो, आपल्याला कुणी पाहू नये, ऐकू नये असं त्याला वाटतं, आणि ते काही अंदाज आखून नव्हे तर उपजत प्रेरणेनं. ज्यूरीतील सभ्य गृहस्थहो, मानसशास्त्रीय पद्धत हे दुधारी शस्त्र आहे, आणि आम्हालाही ते वापरता येतं. त्या सबंध महिनाभर उपहारगृहात आरडाओरडा केल्याबद्दल बोलायचं तर, आपण पुष्कळ वेळा लहान मुलांना, किंवा उपहारगृहातून बाहेर पडणाऱ्या दारूड्यांना, ' मी ठार मारीन तुला ' असं ओरडताना ऐकत नाही काय ? पण म्हणून काही ते कुणाचा खून करीत नाहीत. आणि ते घातक पत्र– तोसुद्धा दारूच्या धुंदीतला चिडखोरपणाच नव्हता

काय? उपहारगृहाच्या बाहेर भांडाभांडी करणाऱ्याचा तो 'मी तुला ठार करीन! मी तुम्हा सर्वांना ठार मारीन' असा नुसताच ओरडा नव्हता काय? का नाही, ते तसं का असू शकत नाही? त्या पत्राला विचित्र म्हणण्याऐवजी 'घातक' म्हणण्याचं काय कारण? कारण, त्याच्या बापाचा खून झालेला आढळला, एका साक्षीदारानं आरोपीला हातात शस्त्र घेऊन बागेतून बाहेर पळताना पाहिलं, आणि त्यानं त्याला प्रहार करून पाडलं; म्हणून म्हणतात की, त्यानं पत्रात आखल्याप्रमाणं सर्व कृती केली, आणि ते पत्र 'विचित्र' नसून 'घातक'च होतं.

"आता, बरं झालं, आपण खऱ्या मुद्द्यावर येऊन पोचलो : 'ज्याअर्थी तो बागेत होता, त्याअर्थी त्यानं त्याचा खून केला असला पाहिजे,' हा तो मुद्दा. 'ज्या अर्थी तो **होता** त्याअर्थी त्यानं **केला असला पाहिजे**' या थोड्या शब्दांत सरकारी पक्षाची सर्व बाजू उभी आहे. तो तिथं होता, म्हणून त्यानं केलं असलं पाहिजे. आणि जरी समजा तो तिथं असला तरी 'पाहिजे' असं काही नसलं तर? हां, पुराव्यांची मालिका सर्व योगायोग– सूचक आहेत हे मी कबूल करतो. पण या सर्व घटनांची, एकमेकांशी संबंध मनात न आणता, अलग अलगपणे तपासणी करा. उदाहरणार्थ, आरोपी म्हणतो की,मी वडिलांच्या खिडकीपासून दूर पळत गेलो या त्याच्या विधानाची सत्यता कबूल करण्याला सरकारी वकील नकार का देतात? खुनी माणसाच्या मनात एकदम आलेल्या आदरणीय अन् 'धार्मिक' भावनांची रेवडी उडवून सरकारी वकील जे व्यंग्यात्मक टोमणे मारण्यात रमले ते आठवा. पण समजा तसंच काही असेल, पित्याविषयीचा समजा आदर नाही पण धार्मिक भयाची भावना असेल तर? 'यावेळी माझी आई माझ्यासाठी प्रार्थना तर करीत नसेल' असे प्राथमिक चौकशीच्या वेळचे आरोपीचे उद्‌गार आहेत, आणि म्हणून मादाम स्व्येतलैवा वडिलांच्या घरात नाही अशी स्वतःची खात्री होताच तो तिथून पळाला. 'पण खिडकीतून पाहून अशी त्याची खात्री पटणं शक्य नव्हतं' असा सरकारी वकिलांचा आक्षेप आहे. पण का शक्य नव्हतं? का? आरोपीनं दिलेल्या संकेतांमुळं खिडकी उघडली गेली. फ्योदर पावलोविचच्या तोंडून कदाचित असा एखादा शब्द, असा एखादा उद्‌गार उच्चारला गेला असेल की ज्यामुळं आरोपीला ती तिथं नाही हे समजलं असेल. आपण त्याची जशी कल्पना करतो, कल्पना करण्याची आपल्या मनाची तयारी करतो तशीच प्रत्येक गोष्ट आहे असं आपण का गृहीत धरावं? हजारो गोष्टी वास्तव सृष्टीत अशा घडत असतील की ज्या सूक्ष्मात, सूक्ष्म कल्पनेच्या सुद्धा पकडीत येणार नाहीत.

" 'होय, पण ग्रिगरीनं तो दरवाजा उघडा पाहिला आणि म्हणून आरोपी घरातच खात्रीनं होता, म्हणून त्यानं त्याला मारलं.' आता, ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, त्या दरवाज्यासंबंधानं पाहू....लक्षात घ्या की त्या दरवाज्यासंबंधी एका साक्षीदाराचा जबाबच फक्त आपल्यापाशी आहे, आणि तो त्या वेळी अशा अवस्थेत होता की...

पण समजा तो दरवाजा उघडा होता; समजा आरोपी ते अमान्य करताना खोटं बोलत आहे– आत्मरक्षणाच्या उपजत प्रेरणेनं, त्याच्या स्थितीतल्या माणसाला ते साहजिक आहे; समजा, तो खरोखरच त्या घरात गेला होता– तरी काय? तो तिथं होता म्हणून त्यानं खून केला असं अनुमान कसं निघतं? तो आत घुसला असेल, खोल्याखोल्यांतून धावत गेला असेल; आपल्या बापाला त्यानं बाजूला ढकललं असेल, त्याच्यावर प्रहार केला असेल; पण मादाम स्व्येतलोवा तिथं नाही अशी त्याची खात्री पटताच तो ती तिथं नाही अन् आपण वडिलांचा खून केला नाही याचा आनंद वाटून तिथून पळत गेला असेल आणि वडिलांना ठार करण्याच्या मोहातून आपण सुटलो म्हणून, त्याची मनोदेवता स्वच्छ होती अन् बापाला न मारल्याच्या आनंदात होती म्हणूनच कदाचित तो शुद्ध भावना, दयेची अन् करुणेची भावना मनात राहण्याला योग्य होता, आणि म्हणूनच तो क्षुब्धतेच्या भरात ग्रिगरीला हाणून खाली पाडल्यानंतर लगेच एक मिनिटात कुंपणावरून उडी टाकून त्याच्या मदतीला धावला.

"विलक्षण वक्तृत्वानं सरकारी वकिलांनी आपल्यापुढं मोक्रोय येथील आरोपीच्या मनाची भयानक स्थिती वर्णिली; त्यावेळी प्रीती त्याला नव्या जीवनाकरिता आवाहन करीत होती, तर प्रीती करणं त्याला अशक्य होतं कारण त्याच्यामागं त्याच्या बापाचं रक्तबंबाळ प्रेत उभं होतं आणि पलीकडं त्याचं प्रायश्चित्त आणि तरी सरकारी वकिलांनी त्याचं प्रेम मान्य केलं, त्याचं स्पष्टीकरण त्यांनी, आपल्या पद्धतीला अनुसरून, त्याच्या झिंगलेल्या अवस्थेबद्दल, गुन्हेगाराला फाशीला नेताना काय होतं त्याबद्दल, अजून फाशी बरीच दूर आहे वगैरेवगैरेबद्दल, बोलून दिलं. पण पुनः मी विचारतो, वकीलसाहेब, तुम्ही नवीनच एक व्यक्तित्व उभं नाही का केलंत? आरोपी इतका का असंस्कृत अन् निष्ठुर आहे की जर त्याचे हात बापाच्या रक्तानं खरोखरच माखलेले असते तर त्यावेळी प्रेमाचा अन् शिक्षा चुकविण्याच्या युक्त्या–प्रयुक्त्यांचा विचार करण्याची क्षमता त्याच्यात राहील? नाही, नाही, नाही! ती आपल्यावर प्रेम करते अन् तिनं आपल्याला आपल्याजवळ बोलावलं, नव्या सुखाची आशा दर्शविली हे त्याला स्पष्ट होताच, अहो, त्यावेळी, मी निश्चयपूर्वक सांगतो, त्याला, आत्महत्या करण्याची प्रेरणा दुप्पट, तिप्पट तीव्रतेनं जाणवली असेल, आणि जर बापाच्या खुनाची रुखरुख त्याच्या सदसद्विवेकबुद्धीला खात असती तर त्यानं स्वतःला ठारच केलं असतं. अं. हं, नाही, आपली पिस्तुलं कुठं आहेत हे तो विसरला नसता! मी आरोपीला ओळखतोः सरकारीव किलांनी त्याला जो रानटीपणा, पाषाणहृदयीपणा चिकटविला आहे तो त्याच्या स्वभावाशी विसंगत आहे. त्यानं स्वतःलाच मारून घेतलं असतं, हे खचित. त्यानं स्वतःला मारलं नाही याचं कारण 'त्याच्या आईची प्रार्थना त्याच्या बचावाला धावली.' आणि आपल्या वडिलांचं रक्त सांडण्याच्या बाबतीत तो निरपराधी राहिला हेच आहे. तो संत्रस्त होता, त्याला मोक्रोय इथं त्या रात्री दुःख होत होतं ते फक्त म्हाताऱ्या

ग्रिगरीबद्दलचं आणि त्यानं परमेश्वराची प्रार्थना केली की म्हातारा जिवंत राहू दे, 'आपला प्रहार इतका घातक न होवो, आणि आपल्याला त्याकरिता यातना सहन कराव्या न लागोत. सत्य घटनांचा असा अर्थ का आपण ग्रहण करू नये ? आरोपी खोटं बोलतो असा विश्वसनीय पुरावा आपल्याकडं काय आहे ?

" पण पुन्हा लागलीच आम्हांला सांगितलं जाईल. " त्याच्या बापाचं प्रेत आहे ते ? त्याचा खून न करता जर तो पळाला असेल, तर त्याचा खून कुणी केला ? इथं, मी पुन्हा सांगतो, सरकारी वकिलांचं सर्व तर्कशास्त्र तुमच्यापुढं आहे. त्यानं जर खून केला नाही, तर मग कुणी केला ? त्याच्या जागी उभा करायला दुसरा कुणीच नाही.

" ज्यूरीतील सद्गृहस्थहो, खरोखरीच तसं आहे ! दुसरं मुळीच कुणी नाही असं निश्चितपणे, प्रत्यक्षतः सत्य आहे काय ? सरकारी वकिलांनी आपल्या बोटावर त्या रात्री त्या घरात कोण कोण होते त्या सर्व व्यक्ती मोजल्याचं आपण ऐकलंच; त्यांतल्या तीन व्यक्ती खुनाला जबाबदार होऊ शकल्या नसत्या हे मी मान्य करतो— स्वतः खून झालेला इसम, म्हातारा ग्रिगरी, अन् त्याची बायको. मग राहता राहिले आरोपी अन् स्मिर्द्याखफ हे दोघे, आणि सरकारी वकील नाट्याभिनय करून उद्‌गार काढतात की दुसरं कुणीच आरोप ठेवायला तिथं नसल्यामुळं आरोपीनं स्मिर्द्याखफचं नाव घेतलं. जर तिथं सहावा इसम असता, अगदी सहाव्या इसमाचं भूत जरी असतं तरी त्यानं स्मिर्द्याखफवरचा आरोप एकदम शरमेनं सोडून देऊन त्या दुसऱ्यावर तो ठेवला असता. पण, ज्यूरीतील सद्गृहस्थहो, मी बरोबर उलटा निष्कर्ष का बरं काढू नये ? तिथं दोन इसम आहेत — आरोपी अन् स्मिर्द्याखफ. तुम्हांला दुसरा कोणी आरोप ठेवायला मिळत नाही म्हणूनच केवळ तुम्ही माझ्या अशिलावर आळ घेत आहात असं मी का म्हणू नये ? आणि तुमच्याकडं दुसरा कोणी नाही याचं एवढंच कारण की तुम्ही स्मिर्द्याखफला साऱ्या संशयातून बाजूला ठेवण्याचं ठरविलं आहे.

" हां, एवढं खरं की स्मिर्द्याखफवर आरोप फक्त आरोपीनं, त्याच्या दोघां भावांनी, अन् मादाम ख्येतलोवानंच केला आहे. पण त्याच्यावर आरोप करणारे दुसरेही आहेत : एका प्रश्नासंबंधीचे— एका संशयाचे मोघम प्रवाद, एक अस्पष्टशी बातमी, एक अपेक्षेची भावना, सर्वांत शेवटी आपल्यापाशी अतिशय सूचक अशा घटनांच्या संयोगाचा पुरावा आहे, अर्थात तो अपुरा आहे हे मी मान्य करतो. पहिली गोष्ट म्हणजे, नेमकी या दुर्घटनेच्या दिवशीच ती फिट आलेली आपल्याला आढळते, तिच्या खरेपणाविषयी सरकारी वकिलांना काळजीपूर्वक बचाव करणं आवश्यक वाटलं आहे, कारण काय माहीत नाही. नंतर खटल्याच्या आदल्या दिवशी रात्रीच स्मिर्द्याखफची एकाएकी आत्महत्या, नंतर आरोपीच्या दोन भावांपैकी थोरल्यानं आज कोर्टात दिलेली तितकीच चकित करून सोडणारी

साक्ष; तो आपल्या भावाला गुन्हेगार मानत होता, पण आज त्यानं नोटाचं एक पुडकं इथं दाखल केलं अन् स्मिर्दाखफ खुनी आहे म्हणून जाहीर केलं. हां, कोर्टाची अन् सरकारी वकिलांची इवान कारमाझफला मेंदूचा ज्वर झाला असल्याची खात्री झाली आहे त्यात मी ही पूर्णपणे सामील आहे, त्याचं निवेदन म्हणजे खरोखर वातभ्रमात योजलेला, खुनाचा गुन्हा मृत माणसावर टाकून आपल्या भावाला बचावण्याचा, जिवावर उदार होऊन केलेला प्रयत्न असू शकेल. पण पुन्हा स्मिर्दाखफचं नाव घेतलं जातं, पुन्हा काही रहस्य असल्याचं सूचत होतं. यात अपुरं, खुलासा न झालेलं असं काही आहे. पण आपण त्यात आता जाऊ या नको. त्याविषयी मागाहून.

"कोर्टानं खटल्याचं काम पुढं चालू ठेवण्याचं ठरविलं आहे, पण त्या दरम्यान मी सरकारी वकिलांनी सूक्ष्म रीतीनं आणि बुद्धिचातुर्यानं स्मिर्दाखफचं जे स्वभावचित्रण केलं आहे त्यासंबंधीच्या माझ्या अभिप्रायाचे चार शब्द सांगावे म्हणतो. परंतु मी जरी त्यांच्या बुद्धिचातुर्याचं कौतुक करीत असलो तरी मी त्यांच्याशी सहमत होऊ शकत नाही. मी स्मिर्दाखफला भेटलो आहे, मी त्याला पाहिलं आहे त्याच्याशी बोललो आहे, अन् त्याची माझ्यावर अगदी वेगळीच छाप पडली आहे. तो शरीर-प्रकृतीनं दुर्बल होता हे खरं; पण मनोबळाच्या, मनोवृत्तीच्या बाबतीत तो सरकारी वकिलांनी जसा दुर्बल असल्याचं प्रदर्शित केलं आहे तसा तो दुर्बल मनुष्य मुळीच नव्हता. सरकारी वकिलांनी इतक्या परोपरीनं त्याच्या ज्या भित्रेपणाबद्दल सांगितलं त्या भित्रेपणाचा मागमूसही मला त्याच्यात दिसला नाही. त्याच्यात सीधेपणाही म्हणाल तर नव्हता. उलट, त्याच्यात मलासाधे भोळेपणाच्या बुरख्याखाली लपविलेला पराकाष्ठेचा अविश्वासी स्वभाव, आणि बऱ्याच व्यापक स्वरूपाची बुद्धिमत्ता आढळली. त्याला दुबळ्या मनाचा समजण्यात सरकारी वकिलांचा फारच भोळेपणा होता. त्याची माझ्यावर एक निश्चित स्वरूपाची छाप पडली; मी त्याला सोडून निघताना माझी स्पष्टपणे खात्री झाली की तो खुनशी प्राणी आहे, पराकाष्ठेचा महत्त्वाकांक्षी, सूडबुद्धीचा आणि अतिशय हेवेखोर आहे. मी काही प्रश्न विचारले : त्याला आपल्या जन्मकुळीसंबंधी तिटकारा होता, त्याबद्दल त्याला लाज वाटत होती, आणि आपण 'गलिच्छ लिझावेता'चा मुलगा आहोत याची आठवण होताच तो आपले दात आवळत होता. ज्या ग्रिगरीनं अन् त्याच्या बायकोनं त्याच्या लहानपणी त्याची काळजी वाहिली त्यांच्याबद्दल त्याला आदर वाटत नव्हता. तो रशियाला शिव्या देई अन् त्याची मस्करी करी. तो फ्रान्सला जाण्याची अन् फ्रेंच नागरिक होण्याची स्वप्नं पाहत होता. ते अमलात आणण्याची साधनं आपल्याजवळ नाहीत असं वरचेवर तो म्हणत असे. त्याचं स्वतःखेरीज कुणावरही प्रेम नव्हतं अन् स्वतः-विषयी त्याचं विलक्षण उच्च मत असावं असा माझा समज आहे. संस्कृतीची त्याची कल्पना चांगले कपडे, ककड इस्त्री केलेले सदरे अन् चमकणारे बूट एवढ्यापुरतीच

मर्यादित होती. स्वतःला फ्योदर पावलोविचचा अनौरस मुलगा तो समजत असल्या-मुळं (त्याबद्दलचा पुरावा आहे), आपल्या धन्याच्या औरस पुत्रांच्या दर्जाशी तुलना करता आपल्या दर्जाची त्याला घृणा वाटत असावी. त्या मुलांना सर्व काही होतं, याला काहीच नव्हतं. त्यांना सर्व प्रकारचे हक्क होते. त्यांना वारशाचा हक्क होता, तर तो फक्त आचारी होता. त्यानं स्वतःच मला सांगितलं की फ्योदर पावलोविचला त्या नोटा पाकिटात ठेवायला आपण मदत केली. त्या रकमेचं उद्दिष्ट त्याला द्वेष करण्यालायक वाटत असलं पाहिजे. तेवढ्या रकमेनं त्याच्या जीवनाचं भवितव्य भरभराटीचं झालं असतं. शिवाय, तीन हजार रुबल त्याला नव्या सप्तरंगी नोटांच्या स्वरूपात दिसले. (मी त्याला त्याबद्दल मुद्दाम विचारलं). हो, महत्त्वाकांक्षी अन् हेवेखोर माणसाला एकदम मोठी रक्कम दाखविण्याच्या बाबतीत सावध राहा! आणि इतका पैसा एका माणसाच्या हातात त्यानं पहिल्याप्रथमच बघितला. त्या सप्तरंगी नोटांच्या दर्शनाचा त्याच्या कल्पनाशक्तीवर अहितकर प्रभाव पडला असावा, पण त्याचे परिणाम तत्काळ दिसले नाहीत.

"विद्वान सरकारी वकिलांनी, अत्यंत चातुर्यानं, स्मिर्द्याखफच्या अपराधीपणाविषयी अनुकूल अन् प्रतिकूल असे सर्व युक्तिवाद आमच्यापुढं रेखाटले, आणि आम्हाला बोट ठेवून विचारलं की फिटचं ढोंग करण्यात त्याचा हेतू काय होता? पण तो कदाचित ढोंग मुळीच करीत नसेल, ती फिट त्याला अगदी स्वाभाविकपणे आली असेल, पण ती तशीच स्वाभाविकपणे निघूनही गेली असेल, आणि हा आजारी मनुष्य बराही झाला असेल, अगदी पूर्णपणे कदाचित नसेल, पण तरी अपस्माराच्या रोग्यांच्या बाबतीत घडतं त्याप्रमाणं परत शुद्धीवर आला असेल.

"सरकारी वकील विचारतात– नेमक्या कोणत्या वेळेस स्मिर्द्याखफ तो खून करू शकला असेल? पण ती नेमकी वेळ दाखवून देणं अगदी सोपं आहे. तो गाढ निद्रेतून (कारण तो केवळ झोपीच गेलेला होता– अपस्माराच्या फिटनंतर गाढ झोप येते.) जागा झाला असेल तो जेव्हा म्हाताऱ्या ग्रिगरीनं 'पितृघातकी' म्हणून बेंबीच्या देठापासून ओरडा केला त्याचवेळी! त्या अंधारातल्या आणि शांत वातावरणातल्या ओरडीनं स्मिर्द्याखफ जागा झाला असेल, त्या वेळी त्याची झोप कमी गाढ असण्याचा संभव आहे: तो स्वाभाविकच एक तास अगोदर जागा झालेला असावा.

"अंथरुणातून उठून तो जवळजवळ नकळत अन् कोणताही निश्चित हेतू न धरता जिकडून आवाज आला तिकडं काय प्रकार आहे हे पाहण्याकरिता जातो. त्याचं डोकं अजूनही त्याला आलेल्या फिट्च्या परिणामानं बधिर आहे, त्याच्या इंद्रियसंवेदना अर्धवट झोपेत आहेत; पण एकदा बागेत गेल्याबरोबर, तो उजेडाच्या खिडक्यांकडं चालत गेला आणि त्याला आपल्या धन्याकडून भयंकर बातमी कळते, त्याला पाहून अर्थात धन्याला आनंद झाला असेल. त्याचं मन लगेच कामाला

लागते. तो आपल्या घाबरलेल्या धन्याकडून सर्व तपशील ऐकतो, आणि आस्ते आस्ते त्याच्या संभ्रमित मेंदूमध्ये एक कल्पना आकार घेते— भयानक पण प्रलोभक अन् लाजवाब तर्कशुद्ध अशी. त्या म्हाताऱ्याला ठार करायचं, ते तीन हजार घ्यायचे आणि सारा दोष आपल्या तरुण धन्यावर टाकायचा. आपला सुगावा लागण्यातून आपण सुरक्षित आहोत हे लक्षात येताच द्रव्याच्या लूट करण्याच्या, जबरदस्त लालसेनं त्याचा ताबा घेतला असेल. हं; हे असे आकस्मिक अन् अनावर आवेग अनुकूल संधी मिळताच, आणि विशेषतः ज्यांना आपण खून करू अशी आगाऊ कल्पना नसते अशा खुनी माणसांच्या मनात फार वरचेवर येतात. आणि स्मिर्द्याखफनं आत जाऊन आपला बेत पार पाडला असेल. कोणत्या हत्यारानं! कोणत्या काय, बागेत उचललेल्या कोणत्याही दगडानं, पण कशा करिता, कोणत्या हेतूनं? कोणत्या काय? ते तीन हजार, ज्यांच्यामुळं त्याचं पुढचं जीवन सुखाचं होणार होतं. अंहं, मी स्वतःचाच प्रतिवाद करीत नाही, तो पैसा कदाचित असेलही. अन् कदाचित एकट्या स्मिर्द्याखफलाच तो कुठं शोधायचा, त्याच्या धन्यानं तो कुठं ठेवला आहे, हे माहीत होतं आणि ते त्या नोटांच्या वरचं आच्छादन— ते जमिनीवरचं फाडलेलं पाकीट?

"सरकारी वकील ज्या वेळी आपली कुशाग्रबुद्धीचा तर्कसिद्धान्त स्पष्ट करून सांगत होते की कारमाझफसारख्या अनुभवी चोरानंच असं पाकीट जमिनीवर राहू दिलं असतं, स्मिर्द्याखफसारख्यानं नाही, त्यानं आपल्याविरुद्धचा पुरावा असा राहू देणं टाळलंच असतं, त्या वेळी ऐकत असताना माझ्या मनात आलं की मी काहीतरी अगदी परिचयाचं असं ऐकतो आहे, आणि तुम्हाला खरं तरी वाटेल, मी हाच युक्तिवाद, हाच बरोबर तर्क की कारमाझफ कसा वागला असता हा, नेमक्या दोन दिवसांपूर्वीच, खुद्द स्मिर्द्याखफकडून ऐकला होता. विशेष म्हणजे मला त्या वेळी तो ठळक प्रकारे जाणवला. मला वाटलं, या माणसात साधेपणा आहे तो कृत्रिम आहे; ही कल्पना मी माझीच आहे असं समजावं अशी घाई त्याला ती सुचविताना झाली होती. जणू तो माझं मन भरवीत होता. हीच कल्पना तपासणीच्या वेळी त्यानं विद्वान सरकारी वकिलांच्या मनात भरवून देऊन त्यांना सूचित करून ठेवली नाही का?

"मला विचारण्यात येईल: 'ग्रिगरीच्या त्या म्हाताऱ्या बायकोसंबंधी काय म्हणता? तिनं तो आजारी मनुष्य जवळच रात्रभर विव्हळत असलेलं ऐकलं ना.' होय, तिनं ऐकलं खरं, पण तो पुरावा फारच अविश्वसनीय आहे. मला एक बाई माहीत आहे, ती फार रागानं तक्रार करायची की अंगणातल्या कुत्र्यामुळं ती रात्रभर जागी राहते. तरी तो बिचारा प्राणी, रात्रीतून फक्त एकदा की दोनदाच भुंकायचा, असं दिसून आलं. अन् हे स्वाभाविक आहे. जर कोणी झोपेत असलं अन् मोठ्यानं विव्हळणं ऐकलं तर ते माणूस आपल्याला जाग आल्याचा त्रास

वाटून उठतं, पण लगेच पुन्हा झोपी जातं. दोन तासांनंतर पुन्हा मोठ्यानं विव्हळ-ण्याचा आवाज, पुन्हा ते माणूस जागं होतं अन् पुन्हा झोपी जातं; आणि असंच पुन्हा दोन तासांनी घडतं– रात्रीतून एकूण तीन वेळा. दुसऱ्या दिवशी सकाळी तो झोपणारा जागा होतो अन् तक्रार करतो की सबंध रात्रभर कुणीतरी मोठ्यानं विव्हळत होतं अन् मला रात्रभर झोप येऊ दिली नाही. अन् त्याला तसं वाटणारच; कारण दोन तासांच्या मध्यंतरातली झोप त्याला आठवत नाही, त्याला फक्त जागेपणीचे क्षण आठवतात, त्यामुळं त्याला वाटतं रात्रभर आपण जागेच होतो.

" पण स्मिर्दाखफनं आपल्या शेवटच्या पत्रात तशी कबुली का नाही दिली, असं सरकारी वकील विचारतात. त्याच्या सदसद्विवेकबुद्धीनं त्याला एकच पावलाची प्रेरणा दिली, दोन्हींची का नाही ? पण, माफ करा, सदसद्विवेक बुद्धीत पश्चात्ताप येतो, आणि आत्महत्या करणाऱ्याला पश्चात्ताप वाटला नसावा, फक्त निराशाच जाणवली असावी. निराशा अन् पश्चात्ताप या दोन अगदी वेगळ्या गोष्टी आहेत. निराशा सूडबुद्धीची अन् मिळतं न घेण्याजोगी असू शकते, अन् आत्महत्या करणाराला, स्वतःवरच हात टाकताना, आयुष्यभर ज्यांचा त्यानं द्वेष केला असेल त्यांच्याबद्दल दुप्पट जोरानं द्वेष वाटला असेल असा संभव आहे.

" ज्यूरीतील सद्गृहस्थहो, तुमच्या न्यायनिवाड्याचा परिणाम अन्याय होण्यात न होईल याची खबरदारी घ्या ! जे मी आत्ता तुमच्यापुढं मांडलं त्या सर्वांत असंभवनीय असं काय आहे ? माझ्या युक्तिवादातील चूक मला दाखवा; अशक्यता काय, विचित्र काय, ते शोधा. आणि माझ्या मुद्द्यातश क्यतेची, संभाव्यतेची यत्किंचित छटा जरी असली, तर त्याला गुन्हेगार ठरवू नका. अन् फक्त छटाच आहे का? मला जे जे म्हणून पवित्र वाटतं त्या सर्वांची शपथ घेऊन मी सांगतो की मी जे आता खुनाचं स्पष्टीकरण पुढं मांडलं आहे त्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. मला जे त्रस्त करतं अन् राग आणतं ते हे की फिर्यादी पक्षानं आरोपी विरुद्ध पुराव्यांचा जो ढीग रचला आहे त्यातला एकही पुरावा खात्रीलायक आणि अखंडनीय असा नाही.आणि तरी या पुराव्याच्या एकत्रीकरणानं या दुर्दैवी मनुष्याचा सत्यानाश केला जाणार आहे. होय, एकत्रीकरणानं होणारा परिणाम भयानक आहे. ते रक्त, त्याच्या बोटातून ठिबकणारं ते रक्त, तो रक्तानं डागाळलेला सदरा, अंधाऱ्या रात्रीत उठणारा 'पितृघातकी !' हा ओरडा आणि तो म्हातारा डोकं फुटून खाली पडतो ते. आणि मग उक्तींची, निवेदनांची, हावभावांची, ओरड्यांची उधळण ! हंः ! याचा इतका प्रभाव पडतो, त्यानं मन इतकं पक्षपाती बनतं; पण, ज्यूरीतील सज्जन हो, तुमचं मन असं पक्षपाती बनेल ? लक्षात घ्या, तुम्हांला बांधण्याची न् मोकळं सोडण्याची निरंकुश सत्ता दिलेली आहे, पण सत्ता जितकी जास्त, तितकी तिची जबाबदारी पण महाभयंकर.

" मी आता जे बोललो त्यातलं अणुमात्र काही मी मागं घेऊ इच्छीत नाही, पण क्षणभर समजा की माझ्या अभागी अशिलानं आपले हात आपल्या वडिलांच्या रक्तानं भरले आहेत या सरकारी वकिलांच्या मताशी मी सहमत झालो. ही एक गृहीत धरलेली कल्पना आहे, हे पुन्हा मी सांगतो; मला त्याच्या निरपराधीपणाविषयी काडीइतकाही संशय नाही. पण, समजा, त्याच्या म्हणण्याप्रमाणं, माझा अशील पितृघातकी आहे असं मी गृहीत धरतो. तसं असलं तरी, मला काय म्हणायचं आहे ते ऐकून घ्या. माझ्या अंतःकरणात काही विशेष तुम्हांला सांगायचं आहे, कारण तुमच्या हृदयात आणि मनात फार मोठा संघर्ष असला पाहिजे असं मला वाटतं. ज्यूरीतील सज्जनहो, तुमच्या हृदयाचा अन् मनाचा मी उल्लेख केला याबद्दल मला क्षमा करा, पण मला अगदी शेवटपर्यंत सत्यनिष्ठ अन् कळकळ बाळगून राहायचं आहे. आपण सारेच कळकळ ठेवणारे होऊ या ! !'

याठिकाणी भाषणात काहीशा मोठ्यानं वाजविलेल्या टाळ्यांनी व्यत्यय आणला. खरोखर शेवटचे शब्द अशा कळकळीच्या स्वरानं उच्चारले गेले की प्रत्येकाला वाटलं की याला खरोखरच काही तरी सांगायचं आहे, आणि जे काय तो सांगण्याच्या बेतात आहे ते अत्यंत महत्त्वाचंच असणार. पण मुख्य न्यायाधीशांनी, टाळ्या ऐकून, मोठ्या आवाजात दरडावून सांगितलं की जर या प्रसंगाची पुनरावृत्ती झाली तर मी न्यायालय मोकळं करायला लावीन. सर्व आवाज गपचीप झाले अन् फेत्युकोविचनं आपलं भाषण पुन्हा सुरू केलं, या वेळी त्याच्या आवाजात आतापर्यंत जो सूर वापरलेला होता त्याहून अगदी वेगळा भावनापूर्ण असा सूर होता.

१३

विचार भ्रष्ट करणारा

"ज्यूरीतील सद्गृहस्थहो, गोळा झालेल्या पुराव्यांनीच माझ्या अशिलाचा नाश होण्याचं भय निर्माण झालं आहे असं नाही." त्यानं बोलायला सुरुवात केली, "माझ्या अशिलाचा खरोखर घात करणारी एकच गोष्ट आहे– त्याच्या बापाचं प्रेत. ही सामान्य खुनाची केस असती तर पुराव्याचा यःकश्चितपणा, अपुरेपणा अन् त्याचा प्रत्येक भाग अलग अलग तपासल्यावर दिसून येणारा चमत्कारिकपणा हे लक्षात घेऊन तुम्ही हा आरोप धुडकावूनच लावला असता; किंवा निदान केवळ त्याच्या विरुद्ध असलेल्या पूर्वग्रहामुळंच त्याचा सर्वनाश करण्याकरिता तयार व्हायला तुम्ही कां कूं केली असती; आणि दुर्दैव असं की, तसा पूर्वग्रह होण्याच्याच लायकीचा तो आहे ! पण ही सर्वसाधारण खुनाची केस नाही, हे पितृहत्येचं प्रकरण आहे. त्याचा माणसांच्या मनावर परिणाम होतो, आणि तो इतका होतो की पुरावा अत्यंत क्षुद्र अन् अपुरा असला तरी त्याची क्षुद्रता अन् अपुरेपणा पूर्वग्रह नसलेल्या

माणसाच्या मनालासुद्धा कमी भासू लागतो. असा आरोपी निर्दोष कसा सोडता येईल ? जर त्यानं तो खून केलेला असला अन् तो शिक्षा न होता सुटला असं झालं तर ? असंच प्रत्येकाला अंतरात एकप्रकारे अनिच्छेने, अंतःप्रेरणेनंच वाटतं.

"होय, पित्याचं रक्त सांडणं ही भयानक वस्तू आहे— ज्या पित्यानं मला जन्म दिला, प्रेम केलं, माझ्याकरिता झीज सोसली, अगदी लहानपणापासून मोठा होईपर्यंत माझ्या आजारपणाची चिंता केली, माझ्या सुखाकरिता साऱ्या आयुष्यभर कष्ट सोसले, आणि माझ्या आनंदात अन् यशात सोबत केली त्या पित्याचं रक्त ? अशा पित्याचा खून करणं ? कल्पनाच करवत नाही त्याची. ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, पिता म्हणजे काय ? खरा पिता म्हणतो मी ! त्या महान् शब्दाचा अर्थ काय ? त्या नावात असलेली महान कल्पना कोणती ? आम्ही आत्ताच अंशतः खरा पिता म्हणजे काय अन् तो कसा असला पाहिजे याचा निर्देश केला. आपण आत्ता ज्या प्रकरणात इतके खोल गुंतून गेलो आहोत अन् ज्यामुळं आपल्या हृदयाला वेदना होत आहेत–त्या या आपल्यापुढं आलेल्या प्रकरणात, पिता फयोदर पावलोविच कारमाझफ हा ज्या पित्यासंबंधी आपण आत्ता उल्लेख केला त्या पित्याच्या कल्पनेशी जमणारा नव्हता. तेच दुर्दैव आहे. आणि खरोखर काही पिते हे दुर्दैवालाच कारणीभूत होतात. हे दुर्दैव काय ते आपण जरा अधिक जवळून तपासू या; तसं करताना, ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, तुम्हाला जो निर्णय करायचा आहे त्याचं महत्त्व लक्षात घेता कशापासूनही तुम्ही मागं सरता कामा नये. आपण, लहान मुलांप्रमाणं किंवा भयभीत बायकांप्रमाणं, कोणत्याही कल्पनेपासून मागं न सरणं हे आपलं विशेष कर्तव्य आहे, असं विद्वान सरकारी वकील उद्‌गारले ते बरोबर आहे.

"परंतु आपलं आवेशपूर्ण भाषण करीत असताना, माझे विद्वान प्रतिपक्षी (अन् मी माझं तोंड उघडण्यापूर्वीच ते माझे प्रतिपक्षी होते) अनेक वेळा उद्‌गारले: अरे, मी आरोपीचा बचाव पीटर्सबर्गहून येथपर्यंत आलेल्या वकिलाच्या हाती देणार नाही. मी आरोप करणारा आहे, पण मी बचाव करणाराही आहे !' असे ते अनेक वेळा उद्‌गारले, पण ते एक निर्देश करायला विसरले की जर हा भयंकर आरोपी लहानपणी आपल्या बापाच्या घरी असताना त्याच्यावर ममता करणाऱ्या एकट्या एक म्हाताऱ्यानं त्याला दिलेल्या केवळ एक पौंड बदामाकरिता तेवीस वर्षं त्याचा इतका कृतज्ञ राहिला, असा मनुष्य तेवीस वर्षं आपल्या बापाच्या मागच्या अंगणात 'पायात बूट न घालता अन् आपली छोटी विजार एका बटनाच्या आधारावर लोंबकळत असलेल्या अवस्थेत' आपण कसे धावत होतो (हे शब्द त्या ममताळू डॉक्टर हर्झनस्तुबेंचे आहेत) याची चांगली आठवण त्याला राहणं संभवनीय नाही काय ?

"हंः, ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, या दुर्दैवी घटनेकडं आपण अधिक जवळून पाहण्याची का गरज आहे, आपल्याला अगोदरच जे माहीत आहे ते पुन्हा पुन्हा

कशाला बोलायचं ? माझा अशील जेव्हा इथं, त्याच्या बापाच्या घरी आला तेव्हा त्याचं कसं स्वागत झालं ? त्याला निष्ठुर अहंकारी राक्षस म्हणून का चितारता? त्याच्यावर नियंत्रण चालत नाही, तो बेफाम अन् बेछूट आहे. त्याच्याकरिताच तर आता आपण त्याच्यावर कायदा चालवीत आहोत. पण त्याच्या अशा जीवनाला कोण जबाबदार आहे ? त्याचा स्वभाव उत्तम असताना अन् त्याचं हृदय कृतज्ञतापूर्ण अन् भावनाप्रधान असतानासुद्धा अशा तऱ्हेचं न शोभणारं जे त्याचं संगोपन झालं जबाबदार कोण ! कोणी त्याला समजूतदार होण्याचं वळण लावलं होतं ? अभ्यासानं त्याला ज्ञानाचा प्रकाश लाभलाय ? त्याच्या बाळपणी कोणी एवढंसं तरी त्याच्यावर प्रेम केलं ? माझ्या अशिलाला एखाद्या रानातल्या पशूप्रमाणं विधात्याच्या हवाली करण्यात आलं. अनेक वर्षांच्या वियोगानंतर तो कदाचित आपल्या बापाला भेटायला आसुसलेला असेल. आपलं बाळपण आठवून त्यानं कदाचित हजारदा त्याच्या बालिश स्वप्नांना पछाडणारी किळसवाणी भुतं हाकून लावली असतील अन् मनापासून आपल्या बापाला मिठी मारण्याची अन् त्याला क्षमा करण्याची आस बाळगली असेल ! अन् इथं त्याच्यापुढं काय वाढून ठेवलं होतं ? चांगुलपणाची चेष्टा उडविणारे टोमणे, संशय अन् पैशासंबंधी झगडे यांनी त्याचं इथं स्वागत झालं. त्याच्या कानांवर घृणास्पद बोलणी अन् रोज ब्रँडी पिऊन उच्चारल्या जाणाऱ्या दुराचाराच्या उपदेशाचे शब्द याखेरीज काही पडत नव्हतं, अन् शेवटी त्याला आपला बाप आपल्याच पैशांनी आपल्या प्रियकरणीला आपल्यापासून फूस लावीत असल्याचं दिसलं. ज्यूरीतील सद्गृहस्थहो, हे क्रूरपणाचं अन् घृणास्पद होतं ! आणि तो म्हातारा सदोदित आपल्या मुलाकडून होणाऱ्या अनादराबद्दल अन् क्रूरपणाबद्दल तक्रार करीत होता. त्यानं त्याची चारचौघांत निंदा केली, त्याला दुखवलं, त्याच्यावर आळ घेतले, त्याची न फेडलेली कर्जे विकत घेतली अशाकरिता की तो तुरुंगात पडावा.

"ज्यूरीतील सद्गृहस्थहो, माझ्या अशिलासारखी माणसं जी उग्र, बेछूट अन् वरवर बेबंद असतात, ती केव्हा केव्हा, मी तर म्हणतो बऱ्याचदा, अत्यंत कोमल मनाची असतात, फक्त ती तशी दिसून येत नाहीत. हसू नका, माझ्या या कल्पनेला हसू नका ! विद्वान् सरकारी वकील माझ्या अशिलाचं शिलर वर उदात्ततेवर अन् सौंदर्यावर प्रेम असल्याबद्दल त्याला आत्ताच निर्दयपणे हसले ! त्याच्याजागी मी असतो तर मी त्याबद्दल हसलो नसतो. असे स्वभाव— होय, अशा स्वभावांची बाजू घेऊन मी बोलत आहे, मला बोलू द्या— अशा स्वभावांविषयी इतक्या अनेकवेळा अन् इतक्या निर्दयपणे गैरसमजूत करून घेतली गेली आहे— अशा स्वभावांना जणू त्यांच्याबरोबर विरोधी— त्यांच्या बेछूटपणाच्या, रौद्रपणाच्या विरोधी— अशा कोमलतेची, सज्जनतेची अन् न्यायाची आस लागलेली असते, नकळत ते त्यासाठी तहानलेले असतात. वरवर दिसायला ते कोपिष्ट अन् आक्रस्ताळी

असले तरी, उदाहरणार्थ; स्त्रीवर प्रेम करण्याची कुवत त्यांच्यात असते, ती वेदनादायक असली तरी, ते प्रेम आत्मिक अन् उदात्त असतं. पुन्हा सांगतो मला हसू नका, अशा स्वभावांच्या बाबतीत फार वेळा अशी स्थिती असते; पण ते आपले आवेग – जे कित्येक वेळा अतिशय असंस्कृत असतात– लपवून ठेवू शकत नाहीत आणि तीच गोष्ट विशेषरूपानं प्रगट होते, उठून दिसते. त्या आवेगांच्या आतला माणूस दिसून येत नाही. त्यांचे आवेग तत्काळ ओसरतात, पण उदार स्त्रीच्या संगतीत हा वरवर असंस्कृत अन् ओबडधोबड दिसणारा माणूस नवीन जीवन शोधतो, स्वतःला सुधारण्याचा, अधिक चांगलं होण्याचा, थोर मनाचा अन् अन्नूदार होण्याचा, ' उन्नत अन् सुंदर ' (या शब्दांचा कितीही उपहास केला गेला तरी) होण्याचा तो प्रयत्न करतो.

" मी आत्ताच म्हटलं की मी माझ्या अशिलाच्या वाङ्‌निश्चयाच्या विषयाला हात घालू धजणार नाही. पण एखादा शब्द मी बोलणं इष्ट होईल. मघाशी जे आपण ऐकलं ती काही साक्ष नव्हती, ती एका वेड्यापिश्या अन् सूडबुद्धीच्या स्त्रीची किंचाळी होती, आणि तिनं त्याला बेइमानीबद्दल अद्वातद्वा बोलायला नको होतं– अं हं, तिनं तसं बोलणं हे तिचं काम नव्हतं, कारण तिनंच त्याच्याशी बेइमानी केली आहे ! जर तिनं थोडा विचार केला असता तर तिनं अशी साक्ष दिली नसती. हं, तिच्यावर विश्वास ठेवू नका ! नाही, माझा अशील तिनं त्याला म्हटलं तसा राक्षस नाही !

" मानवजातीचा प्रेमी क्रूसावर ठोकला जाण्याच्या आदल्या रात्री म्हणाला होता : ' मी तो भला मेंढपाळ आहे. भला मेंढपाळ असतो तो आपल्यातली एकही मेंढी हरवू नये म्हणून आपल्या मेंढ्यांकरिता जीव टाकतो.' आमच्यामुळं एका माणसाचा आत्मा हरवला असं होऊ नये !

" मी आत्ता प्रश्न केला की ' पिता म्हणजे काय, अन् उद्‌गारलो की तो एक महान शब्द आहे, मूल्यवान नाम आहे. पण, सभ्य गृहस्थहो, माणसानं शब्द प्रामाणिकपणानं वापरले पाहिजेत, आणि मी वस्तूंची नावं त्यांच्या योग्य नामांनी घेऊ इच्छितो; वृद्ध कारमाझफसारखा बाप हा ' बाप ' म्हणता येणार नाही अन् बाप होण्याला तो लायकही नाही. नालायक बापाविषयी पितृप्रेम हे विसंगत आहे, अशक्य आहे. शून्यातून प्रेम निर्माण करता येत नसतं; फक्त परमेश्वरच शून्यातून काही निर्माण करू शकतो.

" ' पित्यांनो, आपल्या मुलांना चिडवून राग आणू नका ' असं ख्रिस्तशिष्य प्रेमानं चमचमणाऱ्या हृदयानं लिहितो. मी हे पवित्र शब्द माझ्या अशिलाकरिता उद्‌धृत नाही करीत, मी सगळ्या पित्यांकरिता त्यांचा उल्लेख करतो. पित्यांना उपदेश करण्याचा अधिकार मला कुणी दिला ? कुणीच नाही. परंतु एक मनुष्य म्हणून अन् एक नागरिक म्हणून मी माझं आवाहन करीत आहे–

आपलं इहलोकांचे जीवन दीर्घकाळचं नाही, आपण पुष्कळ दुष्कृत्यं करतो अन् पुष्कळ दुर्वचनं बोलतो. म्हणून, आपण सारे एकत्र जमतो तेव्हा एकमेकांशी चांगला शब्द बोलण्याची जी कोणती संधी मिळेल ती चटकन साधू या. तेच मी या वेळी करीत आहे : मी या जागी असतानाच त्या संधीचा मी लाभ घेत आहे. सर्वोच्च सत्तेकडून जे हे व्यासपीठ आम्हाला देण्यात आलं आहे ते उगीच देण्यात आलेलं नाही– साऱ्या रशियाचे कान आमच्याकडे लागले आहेत ! मी फक्त इथं हजर असलेल्या पित्यांकरिता बोलत नाही, मी सर्व पित्यांना ओरडून सांगतो : 'पित्यांनो, आपल्या मुलांना चिडवून राग आणू नका ! होय, आपण अगोदर स्वतः ख्रिस्तानं घालून दिलेला नियम पाळू या आणि मगच आमच्या मुलांच्या बाबतीत तशी अपेक्षा करण्याचं धाष्टर्य करू या. नाही तर, आपण आपल्या मुलांचे पिते नसून त्यांचे शत्रू आहोत, आम्हीच त्यांना आमचे शत्रू बनविलं आहे. 'जे माप तू दुसऱ्याला लावशील त्याच मापानं तू परत मोजला जाशील' — हे मी सांगत नाही, हे ईश्वरोक्त बोधवचन आहे, दुसरे जसे तुम्हाला मापतील तसंच तुम्ही त्यांना मापा. जर मुलं आमच्या मापानं आम्हाला मोजत असतील तर आपण त्यांना दोष कसा देऊ शकतो ?

"थोड्याच दिवसांपूर्वी फिनलंडमधील एका नोकरमुलीवर गुपचूपपणे एका मुलाला जन्म दिल्याचा संशय घेण्यात आला. तिच्यावर नजर ठेवण्यात आली, आणि जिच्याविषयी कुणालाही काही माहीत नव्हतं अशी एक पेटी वरच्या माळ्याच्या एका कोपऱ्यात काही विटांच्या मागं ठेवलेली आढळली. ती उघडण्यात आली आणि आत पाहतात तो तिनं मारून टाकलेल्या एका नवजात अर्भकाचं प्रेत त्यात आढळलं. त्याच पेटीत आणखी दोन अर्भकांचे हाडांचे सापळे सापडले, तिच्याच कबुली जबाबावरून तिनं जन्मतःच मारलेली ती मुलं होती.

"ज्यूरीतील सद्गृहस्थहो, ही काय त्या मुलांची आई म्हणायची ? तिनं त्यांना जन्म दिला ही गोष्ट खरी; पण ती त्यांची आई झाली का ? तिला कोणी आई हे पवित्र नाव द्यायला धजेल का ? सभ्य गृहस्थहो, आपण निर्भीड होऊन बोलू या; नव्हे आपण परखडही बोलू या; या क्षणी तसं करणं आणि ऑस्त्रोस्कीच्या नाटकातल्या मॉस्कोमधील स्त्रिया विशिष्ट शब्दांच्या आवाजाबरोबर जशा बिचकतात तसं अमुक शब्दांना अन् विचारांना न बिचकणं हे आपलं कर्तव्य आहे. नव्हे, गेल्या काही वर्षांतील प्रगतीनं आम्हांलासुद्धा स्पर्श केला आहे हे आपण सिद्ध करू या, आणि आपण स्पष्टपणे म्हणू या की बाप म्हणजे नुसता मुलाला जन्म देतो तो नव्हे, तर जो जन्म देतो अन् त्याच्याविषयीचं आपलं कर्तव्य पार पाडतो तो.

"हां, अर्थात दुसरा त्याचा अर्थ आहेच, 'बाप' या शब्दाचा दुसरा एक अर्थ केला जातो, त्यात कोणीही बाप, मग जरी तो राक्षस असला, जरी तो आपल्या मुलाचा शत्रू असला तरी, तो माझा बापच आहे, कारण एकच की त्यानं

मला जन्म दिला आहे. पण हा एक प्रकारे अगम्य अर्थ आहे जो माझ्या बुद्धीला आकलन होऊ शकत नाही, पण केवळ श्रद्धेनंच, किंवा 'धर्माज्ञा' म्हणूनच म्हणणं अधिक बरं, मी तो अर्थ ग्रहण करतो, जशा इतर काही गोष्टी मला समजत नाहीत, पण धर्म त्या मानण्याची मला आज्ञा करतो. त्याप्रमाणं पण तशा स्थितीत ती वस्तू प्रत्यक्ष जीवनाच्या क्षेत्राच्या बाहेर राहू दे. प्रत्यक्ष जीवनाच्या क्षेत्रात त्या क्षेत्राचे काही हक्क आहेत खरे. पण त्याबरोबरच त्यात आपल्यावर महान् कर्तव्य अन् बंधनंही घातली गेली आहेत. त्या क्षेत्रात, जर आपल्याला सुसंस्कृत खरं म्हणजे, ख्रिश्चन—व्हावयाचं असेल तर आपण बुद्धीनं अन् अनुभवानं योग्य मानलेल्या निष्ठांचाच, अंमल केला पाहिजे, नव्हे ते आपले कर्तव्य आहे— अशा निष्ठांचा की ज्या विश्लेषणाच्या मुशीतून बाहेर पडलेल्या आहेत. थोडक्यात सांगायचं तर, आपण बुद्धिप्रामाण्यानं वागलं पाहिजे, स्वप्नात किंवा वातभ्रमात असल्यासारखं वागता कामा नये, म्हणजे त्यायोगे आपल्याकडून कुणाला इजा पोहोचण्याचा संभव राहणार नाही, आपल्याकडून कोणाही माणसाला वाईट रीतीनं वागविलं जाऊन त्याचा नाश होण्याचा संभव राहणार नाही. तरच ते खरं ख्रिश्चन धर्माचं काम होईल, ख्रिश्चन धर्माचं कार्य केवळ गूढवादी नव्हे तर बुद्धिवादी अन् परोपकाराचं...'

यावेळी कोर्टाच्या बऱ्याच भागातून जोरजोरात टाळ्या पडल्या, पण फेत्युकोविचने आपले हात हलवून जणू त्यांना विनंती केली की मला विनाव्यत्यय माझे भाषण पुरे करू द्या. कोर्टात चटकन् पुनः शांतता पसरली. वक्ता पुढे बोलू लागला.

"सद्गृहस्थहो, आमची मुलं जसजशी वाढत जातात अन् बुद्धिवाद करू लागतात तशी अशा तऱ्हेचे प्रश्न ती टाळू शकतील असं आपण मानता काय? नाही, त्यांना ते शक्य नाही, आणि आम्ही त्यांच्यावर अशक्य असणारं नियंत्रण लादणार नाही. नालायक बापाच्या दर्शनानं तरुण मुलांच्या मनात आपसुकच त्रस्त करणारे प्रश्न उत्पन्न होऊ लागतात, विशेषतः त्याचं मन त्याच्या सोबत्यांच्या उत्तम बापांशी तुलना करतं तेव्हा. या प्रश्नाला ते परंपरागत चालत आलेलं उत्तर देतात. 'त्यानं तुला जन्म दिलाय, आणि तू त्याच्या रक्तामांसाचा आहेस, तेव्हा त्याच्यावर प्रेम करायला तू बांधलेला आहेस.' तो तरुण सहजच विचार करतो: 'पण त्यानं जेव्हा मला जन्म दिला तेव्हा त्याचं माझ्यावर प्रेम होतं का? तो मला ओळखतही नव्हता, त्याक्षणी त्या विकाराच्या आवेगाच्या क्षणी, कदाचित् दारू प्याल्यामुळं त्यावेळी तो विकार भडकलेलाही असेल त्या क्षणी— मी स्त्री आहे की पुरुष हेही त्याला माहीत नव्हतं, अन् त्यानं कदाचित् माझ्यात फक्त मद्यपीपणाचं बीज उतरवलं असेल— त्यानं माझ्याकरिता जे काही सर्व केलं ते एवढंच... त्याच्यावर प्रेम करायला मी बांधलेला कसा, केवळ त्यानं मला जन्म दिला म्हणून? नंतरच्या आयुष्यात त्यानं माझी काहीसुद्धा चिंता वाहिली नसताना?'

" हां, हे प्रश्न कदाचित् तुम्हाला एकदम असंस्कृत अन् कठोरपणाचे वाटतील, पण तरुण मनाकडून अशक्य संयमाची अपेक्षा करू नका. 'निसर्गाला दारातून बाहेर हाकललंत तर तो खिडकीतून उडून आत येईल,' आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, आपण शब्दांना भिऊ या नको, तर गूढवादी कल्पनांच्या नव्हे तर बुद्धीच्या अन् मानवतेच्या आदेशांना अनुसरून या प्रश्नाचा निर्णय करू या. त्याचा निर्णय कसा होईल ! कसा म्हणजे, असा. मुलानं बापापुढं उभं राहावं अन् त्याला विचारावं. 'बाबा, मी तुमच्यावर प्रेम का करावं, सांगा ! बाबा, मी तुमच्यावर प्रेम करावं याबद्दल कारण दाखवा,' अन् जर तो बाप त्याला उत्तर देऊ शकला अन् त्याला त्यानं बरोबर कारण दाखवलं, तर तिथं खरं, नैसर्गिक, पित्याचे नातं आपल्याला मिळतं ते न कळणाऱ्या एखाद्या गोष्टीच्या पूर्वग्रहावर आधारून नव्हे तर बुद्धिवादाच्या, जबाबदारीच्या अन् निव्वळ मानवतेच्या आधारावर. पण जर तो बरोबर कारण दाखवू शकला नाही, तर तिथं कौटुंबिक बंधाचा शेवट होतो. तो त्याचा बाप नव्हे, अन् मुलाला त्याला परका मनुष्य, नव्हे, शत्रू म्हणूनसुद्धा, मानण्याचा हक्क आहे. ज्यूरीतील सद्गृहस्थहो, आमचं न्यायासन हे सत्य अन् निकोप विचारांची प्रणाली झालं पाहिजे."

या ठिकाणी वक्त्याच्या भाषणात जोरजोराच्या टाळ्यांचा व्यत्यय आला, त्या दडपून टाकणे शक्य नव्हते. अर्थात सगळयाच्या सगळ्या श्रोतृसमाजाने त्या दिल्या नव्हत्या, पण निम्म्याहून अधिक समाजाने खात्रीने दिल्या होत्या. हजर असलेल्या बापांनी अन् आयांनी टाळ्या दिल्या. वरच्या गॅलरीतून, जिथं स्त्रिया बसल्या होत्या तिथून, आरोळ्या अन् मोठमोठ्याने उद्गार ऐकू आले. हातरुमाल उडवले गेले. मुख्य न्यायाधीशांनी जोरजोराने घंटी वाजवायला सुरुवात केली. अर्थात ते श्रोतृसमाजाच्या वागणुकीने क्रुद्ध झाले होते, पण धमकी दिल्याप्रमाणे कोर्ट मोकळे करायला सांगण्याचे त्यांना धारिष्ट झाले नाही. उच्च दर्जाची माणसे ज्यांच्या छातीवर मानाची पदके होती, अन् जे न्यायाधीशांच्या मागच्या बाजूला खास राखून ठेवलेल्या खुर्च्यांवर विराजमान झाले होते– अशा वृद्ध लोकांनीसुद्धा वक्त्याच्या भाषणाला टाळ्या दिल्या अन् आपले हातरुमाल उडविले. त्यामुळे जेव्हा गोंगाट शमला, तेव्हा मुख्य न्यायाधीशांनी फक्त पुनः एकदा कोर्ट मोकळे करायला लावण्याची दहशत उच्चारली तेवढीच, आणि फेत्युकोविच उत्तेजित अन् विजयी वृत्तीने पुढे बोलू लागला.

" ज्यूरीतील सद्गृहस्थहो, ज्या भयानक रात्रीबद्दल आज इतकं सांगण्यात आलं ती तुमच्या लक्षात आहे, त्यावेळी मुलगा कुंपणावर चढला अन् ज्यानं त्याला जन्म दिला होता त्या शत्रूच्या अन् छळ करणाऱ्याच्या समोरासमोर उभा ठाकला. मी अत्यंत जोरदारपणे आग्रहपूर्वक सांगू इच्छितो की तो आपल्या बापाच्या घरी धावत गेला तो पैशाकरिता नव्हे; चोरीचा आरोप वेडेपणाचा आहे हे मी पूर्वी सिद्ध

केलं आहे. आणि त्याचा खून करण्याकरिता म्हणून तो त्या घरात घुसला नाही, छेः छेः, मुळीच नाही! ते जर त्याच्या मनात असतं तर किमान त्यानं अगोदरच सशस्त्र होऊन जाण्याची खबरदारी घेतली असती. तो पितळी बत्ता त्यानं उत्स्फूर्तपणे उचलला तो स्वतःला त्याचं कारण न कळता. त्यानं आपल्या बापाला खिडकीवर टिचक्या मारून फसवलं, कबूल. त्यानं आत जाण्याला वाट करून घेतली, कबूल. मी पूर्वीच सांगितलं की या दंतकथेवर क्षणभरही माझा विश्वास बसत नाही, पण असू द्या, क्षणभर आपण ते मानू या. सद्‌गृहस्थहो, जे जे पवित्र त्याची शपथ घेऊन मी सांगतो की, जर तो त्याचा बाप नसता, दुसरा कोणी साधा शत्रू असता, तर तो खोल्या-खोल्यांतून धावत गेल्यानंतर आणि ती स्त्री तिथं नाही याची खात्री करून घेतल्यानंतर त्यानं आपल्या प्रतिस्पर्ध्याला कसलीही दुखापत न करता झपाट्यानं तिथून धूम ठोकली असती. त्यानं त्याच्यावर प्रहार केला असता, त्याला कदाचित बाजूला सारलं असतं, यापेक्षा जास्त काही केलं नसतं, कारण त्याच्या मनात तसा विचारही नव्हता, त्याला तितका वेळही नव्हता. त्याला समजून घ्यायचं होतं ते ती कुठं आहे एवढंच. पण हा बाप, हा बाप! ज्या बापानं त्याच्या लहानपणापासून त्याचा तिटकारा केला होता, जो त्याचा शत्रू. त्याचा छळ करणारा अन् आता त्याचा प्रतिस्पर्धी, त्याचं नुसतं दर्शन त्याला बस्स होतं! द्वेषाची एक सणक अनिच्छेने अनिवारपणे त्याच्या अंतःकरणात उसळली, तिनं त्याची बुद्धी झाकोळून टाकली. हे सारं एका क्षणात भडकलं! तो वेडाचा, माथेफिरूपणाचा आवेग होता, पण तो निसर्गाचाही आवेग होता. आपल्या शाश्वत कायद्याच्या भंगाचा (निसर्गातल्या सर्वच गोष्टींप्रमाणं) अप्रतिहतपणे अन् अजाणता सूड घेणारा तो आवेग होता.

"पण त्यावेळीसुद्धा आरोपीनं त्याचा खून केला नाही— माझं हे मत कायम आहे, ते मी मोठ्यानं ओरडून सांगतो!— त्यानं फक्त उद्वेगपूर्ण तिटकाऱ्याच्या भरात तो बत्ता नुसता परजला, त्याला मारण्याच्या हेतूनं नव्हे, आपण त्याला मारणार आहोत असं जाणून नव्हे. जर हा घातक बत्ता त्याच्या हाती नसता, तर त्यानं आपल्या बापाला कदाचित फक्त ठोसा मारून खाली पाडलं असतं, पण त्याला ठार मारलं नसतं. तो तिथून पळाला तेव्हा आपण त्या म्हाताऱ्याला ठार मारलं की काय हे त्याला माहीत नव्हतं. असा खून हा खून नव्हे. असा खून ही पितृहत्या नाही. छेः छेः, अशा बापाच्या मरणाला पितृहत्या म्हणता येणार नाही. अशा खुनाला पितृहत्या म्हणणं हा दूषित पूर्वग्रह आहे.

"पण मी तुम्हाला पुनः पुन्हा माझ्या अंतरात्म्याच्या खोलातून आवाहन करतो; हा खून खरोखर घडला काय? ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, जर आपण त्याला दोषी ठरवलंत अन् शिक्षा केलीत तर तो आपल्या मनाशी म्हणेल : 'या लोकांनी माझं संगोपन करण्याकरिता, माझ्या शिक्षणाकरिता, माझं भवितव्य सुधारण्याकरिता मला बरा बनविण्याकरिता, मला माणूस करण्याकरिता काहीही केलेलं नाही. य

लोकांनी मला खाऊपिऊ घातलं नाही, माझी बंदीत असताना अन् मी वस्त्रहीन असताना भेट घेतली नाही, अन् इथं यांनी मला सक्त मजुरीकरिता पाठवलं आहे. मी यांच्या ऋणातून सुटलो. आता मी त्यांचं काही लागत नाही, अन् कुणाचंच यापुढं कायमचं काही लागत नाही. ते दुष्ट आहेत तर मी दुष्ट होईन. ते निष्ठुर आहेत तर मी निष्ठुर होईन. ' ज्यूरीतील सद्गृहस्थहो, हेच तो म्हणेल. अन् मी प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, त्याला दोषी ठरवून तुम्ही त्याला फक्त दोषी होण्याचा मार्ग मोकळा कराल : तुम्ही त्याची सदसद्विवेक बुद्धी काढून घ्याल, तो त्यानं सांडलेल्या रक्ताला शिव्याशाप देईल आणि त्याचा त्याला पश्चात्ताप होणार नाही. त्याचबरोबर तुम्ही त्याच्यातील नवा मनुष्य बनण्याची शक्यता नष्ट करून टाकाल, कारण तो जन्मभर तसाच दुष्ट अन् तसाच अंध राहील.

" पण तुम्ही त्याला भयंकर, कल्पना करता येणार नाही इतकी कमालीची भयानक शिक्षा ठोठावू इच्छिता, अन् त्याचबरोबर त्याला वाचवायचं अन् त्याच्या आत्म्याला नवा जन्म द्यायचा अशी ही तुमची इच्छा आहे, असं आहे काय ? तसं असेल तर तुमच्या दयेनं त्याला पादाक्रांत करा ! तो त्यानं कसा थरथरा कापू लागेल अन् भयाक्रांत होऊन जाईल ते तुम्ही पाहाल अन् ऐकाल. ' ही दया मी कशी सहन करू ? इतकं प्रेम मी कसं सहन करू ? ती माझी लायकी आहे काय ? असं तो ओरडून म्हणेल.

" अहो, त्याचं अंतःकरण, ते बेफाम पण कृतज्ञ हृदय ज्यूरीतील सद्गृहस्थहो, मी जाणतो, ते तुमच्या दयेपुढं वाकेल; ते महान् अन् प्रेमळ कृतीकरिता आसुसलेलं आहे, ते विघळून जाईल अन् वर वर चढू लागेल. असे आत्मे आहेत की जे त्यांच्या संकुचितपणामुळे साऱ्या जगाला दोष देत सुटतात. पण अशा आत्म्याला दयेनं जिंकून घ्या, त्याला प्रेमाचं दर्शन द्या, की तोच आपल्या भूतकाळाला शिव्या-शाप देईल, कारण त्याच्यात अनेक सत्प्रेरणा आहेत. अशा तऱ्हेचं अंतःकरण विशाल होईल अन् त्याला दिसेल की ईश्वर कनवाळू आहे आणि माणसं सज्जन आहेत, न्यायी आहेत. तो भयव्याकुळ होईल, पश्चात्तापानं अन् यापुढं त्याच्यावर जी प्रचंड ऋणं होतील त्यांनी तो पार जमीनदोस्त होईल. आणि मग तो 'मी ऋणा-तून सुटलो ' असं न म्हणता, ' सर्व माणसांच्या दृष्टीनं मी गुन्हेगार आहे अन् सर्वां-पेक्षा मी जास्त नालायक आहे असं म्हणेल. पश्चात्तापाच्या अन् मर्मभेदक, हृदय-द्रावक मनस्तापाच्या अश्रूंनी तो ओरडून म्हणेल : ' दुसरे माझ्यापेक्षा अधिक चांगले आहेत, त्यांना मला वाचवायचं होतं, माझा नाश करायचा नव्हता ? ' अहो, दयेचं हे कृत्य करणं तुम्हाला कितीतरी सुलभ आहे, कारण खरा पुरावा असा काहीच इथं नसल्यामुळं ' हा, तो दोषी आहे ' असं तुम्ही जाहीर करणं फारच भयंकर होईल.

" एका निर्दोषी माणसाला शिक्षा करण्यापेक्षा दहा दोषी माणसांना दोषमुक्त

म्हणून सोडणं बरं ! गतशतकाच्या आमच्या वैभवशाली इतिहासातून येणारा तो महाप्रतापी ध्वनी तुम्हाला ऐकू येतो ? तुम्ही तो ऐकता ? रशियन न्यायपीठ हे केवळ शिक्षा करण्याकरताच अस्तित्वात आलेलं नसून गुन्हेगाराच्या मुक्तीकरितासुद्धा ते आहे याची माझ्यासारख्या क्षुद्र माणसानं तुम्हाला आठवण करून देण्याचं कारण नाही. इतर देश खुशाल प्रायश्चित्ताचा अन् कायद्याच्या अक्षरावर बोट ठेवण्याचा विचार करोत, आम्ही कायद्याचा भाव अन् त्याचा अर्थ यांना चिकटून राहू. तो आहे पतितांची मुक्ती अन् त्यांना नवजीवन. जर हे खरं असेल, तर रशिया अन् त्यांचा न्याय हा असा असेल, तर हा देश उत्साही मनानं पुढं जाऊ शकेल. ज्यांच्यापासून सारे देश तिटकाऱ्यानं बाजूला सरतात, त्या तुमच्या पिसाट तीन घोड्यांच्या गाड्यांनी आम्हाला बुजविण्याचा प्रयत्न करू नका. सुसाट धावणारी तीन घोड्यांची गाडी नव्हे तर रशियाचा वैभवशाली रथ शांतपणे अन् डौलानं आपल्या ध्येयाकडं चालत राहील. तुमच्या हाती माझ्या आशिलाचं भवितव्य आहे, तुमच्या हाती रशियाचा न्याय आहे. तुम्ही त्याच्या मागं उभे राहावं, त्याचं संरक्षण करावं, त्याचा संभाळ करणारी माणसं इथं आहेत, तो योग्य माणसांच्या हाती आहे हे तुम्ही सिद्ध करून दाखवावं !"

१४

शेतकरी खंबीर राहतात

अशा रीतीने फेत्युकोविचने आपले भाषण संपविले, आणि श्रोतृसमुदायाच्या उत्साहाला उधाण आले. त्याला थांबविणे अशक्यच होते. स्त्रिया रडल्या, पुष्कळ पुरुषसुद्धा रडले, अगदी दोन उच्च दर्जाच्या व्यक्तींच्या डोळ्यांतूनसुद्धा टिपे गळली. मुख्य न्यायाधीशांना नमावे लागले, आणि आपली घंटी वाजविण्याचेसुद्धा त्यांनी लांबणीवर टाकले. अशा तऱ्हेची भावनोत्कटता दाबणे म्हणजे काही तरी पवित्र गोष्ट दाबून टाकणे होते, स्त्रिया मागाहून असेच म्हणाल्या. खुद्द वक्त्याचे हृदयसुद्धा खरोखरी द्रवले होते.

आणि बरोबर याच क्षणी इप्पोलित किरिलोविच काही आक्षेप घेण्याकरिता उठला. लोक त्याच्याकडे संतापाने पाहू लागले. "एँ ! याचा अर्थ काय ? सरळ आक्षेप घ्यायची याला छाती होते," स्त्रिया बडबडल्या. पण सगळा स्त्री समाज जरी तुटून पडला असता अन् त्यात त्याची बायको जरी असती तरी तो त्यावेळी थांबला नसता. तो पांढरा फटक पडला होता, भावनावेगाने तो थरथरत होता, त्याची पहिली वाक्ये समजलीही नाहीत, तो जोरजोराने श्वास घेऊ लागला, स्पष्टपणे धड त्याला बोलताही येईना, त्याचे सूत्र सुटले. पण लवकरच त्याने स्वतःला सावरले. त्याच्या या नंतरच्या भाषणातील काहीच वाक्ये मी इथे देतो :

"...मी एक अद्‌भुतरम्य कथा गुंफली आहे असा माझ्यावर आक्षेप घेण्यात आला आहे. पण हा बचाव म्हणजे एका अद्‌भुतरम्य गोष्टीच्या जोडीला दुसरी अद्‌भुतरम्य गोष्ट नव्हे तर काय! जो काही अभाव होता तो काव्याचा. फ्योदर पावलोविच, आपल्या प्रियेची वाट पाहत असताना, पाकीट फाडून उघडतो अन् जमिनीवर टाकून देतो. या विचित्र कृतीत गुंतला असताना तो तोंडानं काय बोलतो तेही आपल्याला सांगितलं गेलं. कल्पनेची ही झेपच नव्हे काय? आणि त्यानं पैसा बाहेर काढून घेतला याला तरी आपल्यापाशी काय पुरावा आहे? तो काय म्हणाला हे कुणी ऐकलंय? तो दुबळ्या मनाचा वेडा, स्मिर्दायकोफ, त्याचं बायरन कवीच्या नायकात रूपांतर होतं, तो आपल्या गैरवाजवी जन्माचा समाजावर सूड घेतो– ही बायरन पद्धतीची अद्‌भुतरम्य कथा नाही काय? आणि मुलगा आपल्या बापाच्या घरात घुसतो अन् त्याचा खून न करता त्याचा खून करतो. हीसुद्धा अद्‌भुतरम्य कथा नव्हे बरं का– हा स्फिंक्स आहे कोडं घालणारा जी त्याची त्यालाच सोडविता येत नाहीत. जर त्यानं त्याचा खून केला असला तर, खून केला म्हणा, खून न करता खून केला म्हणण्यात अर्थ काय– कुणाला त्याचा अर्थ लागणार आहे?

"नंतर आम्हाला सक्त बजावलं जातं की हे सत्य अन् निकोप विचारांचं न्यायपीठ आहे आणि 'निकोप विचारांच्या' या न्यायपीठावर एक धीरगंभीर घोषणा ऐकू येते की बापाच्या खुनाला 'पितृहत्या' म्हणणं हा केवळ दूषित पूर्वग्रह आहे! पण जर पितृहत्या हा दूषित पूर्वग्रह असेल, आणि जर प्रत्येक मुलानं आपल्या बापाला मी तुमच्यावर का प्रेम करावं असं विचारायचं असेल, तर आमचं काय होईल? समाजाच्या मूळ अधिष्ठानाचं काय होईल? कुटुंबसंस्थेचं काय होईल? पितृहत्या हा केवळ मॉस्कोच्या व्यापाऱ्यांच्या बायकांचाच फक्त बागुलबोवा आहे असं दिसतं. रशियाच्या न्यायसंस्थेचं दैव अन् भवितव्य यांच्या बाबतची अत्यंत मूल्यवान्, अत्यंत पवित्र हमी ही अशा विकृत अन उच्छृंखल स्वरूपात आमच्यापुढं मांडली जाते-केवळ एकच गोष्ट साधण्याकरिता, ज्याचं समर्थन करता येणार नाही अशाचं समर्थन करण्याकरिता. 'अहो, दयेनं त्याला पार चिरडून टाका' असं बचावाचे वकील सांगत आहेत; पण तेच तर गुन्हेगाराला हवं आहे, आणि उद्या तो किती चिरडून गेला आहे ते दिसेलच. आणि बचावाच्या वकिलाची केवळ आरोपीची निर्दोष सुटका करण्याबद्दलची मागणी फारच नेमस्त नाही काय? भावी पिढ्यांच्या मनात मुलाच्या पराक्रमाचं स्मरण कायम राहावं म्हणून त्याच्या पितृहत्येच्या सन्मानार्थ एखादी धर्मदाय संस्था का स्थापन करू नये? धर्मात अन् प्रेषिताच्या वचनात दुरुस्त्या करण्यात येतात– हा सारा गूढवाद आहे म्हणतात, आणि विचार शक्तीच्या अन व्यावहारिक शहाणपणाने केलेल्या विश्लेषणातून पार पडलेला आमचाच एक खरा खिश्चनधर्म आहे, असं आम्हाला सांगण्यात येतं. आणि अशा रीतीने ते आमच्यापुढं खिस्ताचा खोटा आभास उभा करतात! ज्या

मापाने तू मापशील तेच माप परत तुला लावले जाईल असं बचावाचे वकील म्हणतात आणि त्यातून लगेच निष्कर्ष काढतात की ज्या मापानं आपण मोजले जाऊ त्या मापानं आपण दुसऱ्यांना मोजावं अशी ख्रिस्ताची शिकवण आहे— आणि हे उद्‌गार सत्याच्या अन शाबूत अकलेच्या व्यासपीठावरून बरं! भाषण करण्याच्या आदल्या दिवशीच फक्त आम्ही प्रेषितांच्या उपदेशाकडे डोकावून पाहतो, कशाकरिता? काही म्हटलं तरी जी एक किता म्हणून ग्रंथरचना आहे तिच्याशी आपली ओळख आहे असं दाखवून श्रोतृसमाजाला दिपविण्याकरिता त्यात कदाचित एक विशिष्ट प्रभाव पाडण्याच्या दृष्टीनं उपयोग होण्याचा संभव आहे. हे सारं आपलं कर्म साधण्याकरिता! परंतु ख्रिस्तानं जी आज्ञा आम्हाला केली आहे ती अगदी वेगळीच आहे. त्यानं तर असं करण्यापासून सावध राहा म्हणून आम्हांला सांगितलं आहे, कारण दुष्ट जग हे असं वागत असतं, पण आपण क्षमा केली पाहिजे अन दुसरा गाल पुढं केला पाहिजे, आमचा छळ करणारे जे माप आम्हाला लावतात ते माप आपण त्यांना लावता काम नये. आमच्या प्रभूनं हे आम्हांला शिकवलं आहे. मुलांना आपल्या बापांचा खून करण्याला मनाई करणं हा दूषित पूर्वग्रह आहे असं नाही शिकवलं. आणि आम्ही सत्याच्या अन सद्‌बुद्धीच्या न्यायपीठावरून आमच्या प्रभूचा उपदेशाची दुरुस्ती नाही करणार, बचावाचे वकील मेहेरबानीनं कुणाला 'क्रूसावर चढविलेला मानव जातीचा प्रेमी' म्हणतात? सनातनी मनाच्या सगळ्या रशियाचं याच्या उलट मत आहे, तो तर त्याला 'तू आमचा परमेश्वर आहेस' असं म्हणतो."

या ठिकाणी मुख्य न्यायाधीशांनी मध्येच हस्तक्षेप करून या अतिउत्साही वक्त्याला थांबविले आणि अशा संबंधात सभाध्यक्ष नेहमी करतात त्याप्रमाणे, त्याला 'अतिशयोक्ती करू नका, आपल्या मर्यादा ओलांडू नका' अशा तऱ्हेची नम्र विनंती केली. श्रोतृसमाजसुद्धा अस्वस्थ झाला होता. जमलेला लोकसमुदाय बेचैन होता, नव्हे, संतापाचे उद्‌गारसुद्धा निघत होते. फेत्युकोविचने नुसते उत्तरसुद्धा दिले नाही; तो फक्त व्यासपीठावर चढला, त्याने आपला हात आपल्या छातीवर ठेवला अन् दुखावलेल्या स्वरात काही थोडे शब्द सभ्यतापूर्वक उच्चारले. त्याने पुन्हा, सहज जाताजाता अन् औपरोधिकपणे, 'अद्‌भुतरम्य गोष्टी' अन् 'मानसशास्त्र' या विषयांना स्पर्श केला, आणि योग्य त्या ठिकाणी वचन उद्‌धृत केले: "ज्युपिटर, तू रागावला आहेस, म्हणून तुझं बोलणं चुकीचं आहे" ते ऐकताच श्रोतृसमुदायात मान्यतादर्शक हास्य उसळले, कारण इप्पोलित किरिलोविच हा कोणत्याही रीतीने ज्युपिटर नव्हता. मग, आपण तरुण पिढीला त्यांच्या बापांचा खून करण्याची शिकवण देत आहोत या आरोपाच्या संबंधात, फेत्युकोविच अतिशय सभ्यतापूर्वक म्हणाला की या आरोपाला आपण उत्तरही देणार नाही. सरकारी वकिलाने जुन्या धर्मशास्त्राला असंमत मनांचा उच्चार बचावाच्या वकिलाने

केल्याच्या आरोपावर फेत्युकोविचने सूचित केले की ही व्यक्तीला उद्देशून केलेली वक्रोक्ती आहे अन् या कोर्टात, " एक नागरिक अन् राजनिष्ठ प्रजाजन म्हणून असलेल्या माझ्या लौकिकाला धक्का लावणारे " आरोप होण्यापासून आपण सुरक्षित राहू अशी आपण अपेक्षा केली होती. परंतु या त्याच्या शब्दांबरोबर मुख्य न्यायाधीशांनी त्यालाही मध्येच हटकले, आणि फेत्युकोविचने आपले भाषण खाली लवून संपविले, कोर्टात त्याला अनुमोदनात्मक गुणगुण पसरली. आणि आमच्या महिलांच्या मताने, इप्पोलित किरिलोविच " कायमचा जमीनदोस्त झाला."

यानंतर आरोपीला बोलण्याची मुभा देण्यात आली. मीत्या उभा राहिला, पण फारच थोडे बोलला. तो भीती वाटेल इतका थकून गेलेला होता, शरीराने, तसाच मनानेही. सकाळी सामर्थ्याच्या अन् स्वातंत्र्याच्या मुद्रेने त्याने प्रवेश केला होता ती मुद्रा आता मावळली होती. तो जणू त्यादिवशी अशा अनुभवातून पार झाला होता की ज्यामुळे त्याला आजपर्यंतच्या जीवनात जे कळले नव्हते असे काही फार महत्त्वाचे शिक्षण पुढच्या आयुष्यासाठी मिळाले होते. त्याचा आवाज दुबळा बनला होता, तो पूर्वीसारखा ओरडला नाही. त्याच्या शब्दात नम्रतेचा, पराभवाचा अन् शरणागतीचा एक नवाच सूर होता.

" ज्यूरीतील सद्‌गृहस्थहो, मी काय बोलावं ? ही माझ्या दृष्टीनं ईश्वरी न्यायाची वेळ आली आहे, हा माझ्यावर ईश्वराचा हात येतो आहे असं मला वाटतं ! चुका करणाऱ्या माणसाचा हा शेवट येतो आहे ! पण, परमेश्वरसाक्ष, मी पुनः आपल्याला सांगतो की माझ्या वडिलांच्या रक्तपाताच्या बाबतीत मी निर्दोषी आहे ! हे शेवटचं मी सांगतो की त्यांना मी मारलेलं नाही ! मी चुका करीत होतो, पण जे चांगलं आहे त्याबद्दल मला प्रेम होतं. प्रत्येक क्षणी मी सुधारायची धडपड करीत होतो, पण मी जगलो तो एखाद्या जंगली पशूसारखा. मी सरकारी वकिलांचे आभार मानतो. त्यांनी मला माहीत नसलेल्या, माझ्याविषयीच्या अनेक गोष्टी सांगितल्या; पण मी माझ्या वडिलांना मारलं हे मात्र खरं नाही. सरकारी वकिलांची गैरसमजूत झालेली आहे. मी माझ्या वकिलांचेही आभार मानतो. त्यांचं भाषण ऐकत असता मी रडलो; पण मी माझ्या वडिलांना मारलं हे खरं नाही, अन् त्यांनी तसं समजण्याचं काही कारण नव्हतं. आणि डॉक्टरांच्यावर विश्वास ठेवू नका. मी पूर्णपणे अक्कलहुषारीत आहे, मात्र माझं हृदय भरून आलेलं आहे. तुम्ही मला वाचवलंत, तुम्ही मला मुक्त केलंत, तर मी तुमच्यासाठी प्रार्थना करीन. मी सुधारलेला माणूस होईन. मी ईश्वरसाक्ष माझा शब्द देतो की मी सुधारलेला होईनच ! आणि जर तुम्ही मला दोषी ठरवलंत अन् शिक्षा केलीत, तर माझा अवतार संपला असं मानून भवितव्यतेपुढं नम्र होईन. पण मला वाचवा, माझ्या ईश्वरापासून मला वंचित करू नका ! मी स्वतःला जाणतो, मी बंड करून उठेन ! माझं अंतःकरण भारावून गेलं आहे, सद्‌गृहस्थहो... मला वाचवा."

तो जवळजवळ आपल्या जागी एकदम कोसळून पडला, त्याचा आवाज सद्गदित झाला; शेवटचे वाक्य त्याने कसेबसे उच्चारले. मग न्यायाधीशांनी प्रश्न विचारायला सुरुवात केली आणि दोन्ही पक्षांना आपापले निष्कर्ष योग्य रीतीने मांडायला सांगितले. पण मी तपशील सांगत बसत नाही. शेवटी ज्यूरीतील लोक मसलतीकरिता बाजूला जायला उठले. मुख्य न्यायाधीश अतिशयच थकून गेले होते, त्यामुळे ज्यूरीला त्यांनी दिलेला शेवटचा आदेश काहीसा हलक्या स्वरात होता. " निःपक्षपाती व्हा, बचावाच्या पक्षाच्या वक्तृत्वानं प्रभावित होऊ नका, पण तरी दोन्ही पक्षांची म्हणणी तोलून घ्या. तुमच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात आलेली आहे हे लक्षात ठेवा, " वगैरे वगैरे.

ज्यूरी बाजूला गेली अन् कोर्ट तहकूब झाले. लोकांना उठून इकडे तिकडे हिंडण्याची, आपल्या आतापर्यंत साचलेल्या प्रतिक्रियांची देवाण–घेवाण करण्याची अन उपहाराच्या दुकानात जाऊन ताजेतवाने होण्याची मुभा मिळाली. वेळ बराच झाला होता, रात्रीचा जवळजवळ एक वाजला होता, पण कोणीच निघून गेले नाही; ताण इतका प्रचंड होता की कुणाच्याही मनात विसावा घेण्याचा विचारही आला नाही. सगळे दबलेल्या अंतःकरणाने प्रतीक्षा करीत होते; अर्थात तसे म्हणणे कदाचित गैरवाजवी होईल, कारण स्त्रिया केवळ उन्मादवायू व्हावा तशा अधीर मनःस्थितीत होत्या. अन् त्यांची अंतःकरणे निश्चित होती. निर्दोष सुटका अटळ आहे असे त्यांना वाटत होते. काही जण आनंदित झाले, काहींना राग आला, तर काही उद्विग्नचित्त झाले, त्यांना तो निर्दोष सुटावा असे वाटत नव्हते. खुद्द फेत्युकोविचला आपल्या यशाबद्दल विश्वास होता. त्याच्या अवतीभवती लोक जमून त्याचे अभिनंदन करीत होते, त्याची वाहवा करीत होते.

" बचावाच्या वकिलाला ज्यूरीशी बांधणारे अदृश्य असे धागे असतात, तसे धागे बनताहेत की नाही ते माणसाला आपलं भाषण चालू असताना भासत असतं. त्या धाग्यांची मला प्रतीती होती. ते आहेत. आपली बाजू जिंकली गेली. तुम्ही निश्चित राहा, असे तो एका घोळक्याला म्हणाल्याचे मागाहून मला सांगण्यात आले.

" आमचे खेडूत आता काय सांगतील ? " एक धिप्पाड, रागीटसा दिसणारा, देवीचे वण असलेला सद्गृहस्थ, जो जवळपासचा एक जमीन मालक होता तो, संभाषणात गुंतलेल्या सभ्य गृहस्थांच्या घोळक्यात जाऊन म्हणाला.

" पण ते सगळे खेडूत थोडेच आहेत ? त्यांच्यात चार तर सरकारी कारकून आहेत. "

" होय, कारकून आहेत खरे. " जिल्हा कौन्सिलचा एक सभासद त्यांच्यात मिसळत म्हणाला.

"अन् तुम्ही त्या नाझार्येफला, तो पदक लावलेला व्यापारी जो ज्यूरीतील एक सभासद आहे त्याला ओळखता का?"

"त्याचं काय?"

"डोकं असलेला तो माणूस आहे."

"पण तो कधी बोलत नाही."

"तो तसा फार बोलणारा नाही, पण ते बरंच. पीटर्सबर्गच्या माणसानं येऊन त्याला शिकविण्याची गरज नाही. तो स्वतः साऱ्या पीटर्सबर्गला शिकवील असा आहे. तो बारा मुलांचा बाप आहे. याचा विचार करा."

"खरोखर, ते त्याला निर्दोषी सोडणार नाहीत असं तुम्हाला वाटतं?" दुसऱ्या एका घोळक्यात आमच्या तरुण अधिकारी वर्गातील एकजण उद्गारला.

"ते सगळे त्याला खात्रीनं निर्दोषी म्हणून सोडतील" एक निर्धाराचा आवाज उमटला.

"त्याला निर्दोषी न सोडणं हे निर्लज्जपणाचं, लांच्छनास्पद होईल!" तो अधिकारी उद्गारला. "समजा त्यानं खून केलाच असला– बापा–बापात किती फरक असतो! अन् शिवाय तो इतका वेडाच्या लहरीत होता...त्यानं खरं म्हणजे बत्ता हवेत परजला असेल अन् म्हाताऱ्यावर हाणून त्याला खाली पाडलं असेल याखेरीज दुसरं काही नाही. पण त्या हुजऱ्याला त्यांनी कशाला मध्ये ओढलं. हं:, तो केवळ मूर्खपणाचा सिद्धान्त वाटतो बुवा! मी जर फेत्युकोविचच्या जागी असतो, तर मी सरळ एवढंच म्हटलं असतं: 'त्यानं त्याचा खून केला; पण तो दोषी नाही. उडत गेलं सारं!'"

"तेच तर त्यानं सांगितलं, फक्त 'उडत गेलं सारं' एवढं तो म्हणाला नाही!"

"नाही, मिखाईल सेम्योनोविच, तेही तो बोलल्यासारखंच होतं," तिसरा एक आवाज म्हणाला.

"काय सांगता, सभ्य गृहस्थहो, एका नटीनं आपल्या जाराच्या विवाहित पत्नीचा गळा कापला होता. तिला मागच्या लेंटच्या दिवसांत निर्दोषी म्हणून सोडण्यात आलं."

"पण तिनं तो पुरता कापला नव्हता."

"म्हणून काय झालं? तिनं तो कापायला सुरुवात केली होती."

"तो जे मुलांच्याबद्दल म्हणाला त्याविषयी तुम्हाला काय वाटतं?"

"उत्कृष्ट!"

"अन् गूढवादाबद्दल बोलला तेसुद्धा!"

"हंः, गूढवादाचा विषय द्या सोडून, कृपा करून!" आणखी कुणीतरी म्हटलं; "इप्पोलित अन् त्याचं इथून पुढचं भवितव्य याचा विचार करा. त्याची बायको मीत्याकरिता उद्या त्याचे डोळे ओरबडून बाहेर काढील."

"ती आहे का इथं?"

"काय विचारणं! ती जर इथं असती तर तिनं कोर्टातच त्याचे डोळे ओरबाडून बाहेर काढले असते. ती दातदुखीनं घरीच राहिली आहे. हं, हं, हं!"

"हॅ, हॅ, हॅ!"

तिसऱ्या एका घोळक्यात :

"काही म्हटलं तरी ते मितेन्काला नक्की निर्दोषी म्हणून सोडून देतील."

"उद्या त्यानं 'मेत्रोपोलिस' उलथं पालथं केलं तर मला आश्चर्य वाटणार नाही. तो आता दहा दिवस पीतच राहील बघा!"

"भूत आहे भूत!"

"भुताचा खरोखर यात हात असला पाहिजे. इथं नाही तर ते असणार कुठं?"

"सद्गृहस्थहो, बचाव बोलका होता यात शंका नाही. परंतु तरी बापाचं डोकं बत्त्यानं फोडणं हे काही बरोबर नाही! अरे, नाही तर आपली स्थिती काय होणार आहे?"

"आणि तो रथ? रथाबद्दलचं ते बोलणं तुम्हाला आठवतं?"

"हो तर; त्यानं गाडीचं एकदम रथात रूपांतर केलं!"

"अन् उद्या तो केवळ आपलं काम साधण्याकरिता रथाचं गाडीत रूपांतर करील."

"काय हल्ली लबाड लोक निघाले आहेत. रशियात आता न्याय तरी राहणार आहे की नाही?"

पण इतक्यात घंटी वाजली. ज्यूरीनं बरोब्बर एक तासभर विचारविनिमय केला, कमी नाही की जास्त नाही. लोक आपापल्या जागांवर बसताच कोर्टात सर्वत्र गाढ शांतता पसरली. ज्यूरीतील लोक कोर्टात कसे चालत आले ते मला आठवतं. आला शेवट! त्यांना विचारलेले प्रश्न मी अनुक्रमानं सांगत नाही, अन् खरं म्हणजे, मी ते विसरलोही आहे. मला फक्त मुख्य न्यायाधीशांच्या पहिल्या अन् मुख्य प्रश्नाला दिलेलं उत्तर आठवतं : "आरोपीनं खून चोरी करण्याच्या उद्देशानं आणि अगोदर योजना करून केला काय?" (हे शब्द मला बरोबर आठवतात.) जिकडंतिकडं गपचीप होतं. ज्यूरीचा प्रमुख—जो कारकुनांमधला वयानं सर्वांत लहान होता त्यानं, कोर्टातल्या त्या स्मशानातल्यासारख्या शांततेत, स्पष्ट, मोठ्या आवाजात जाहीर केलं :

"होय, दोषी!"

आणि तेच उत्तर प्रत्येक प्रश्नाला त्यानं दिलं : “होय, दोषी!” आणि ते सौम्य स्वरूप देणारी अशी कसलीही टीकाटिप्पणी न करता. अशी अपेक्षा कुणालाही नव्हती; जवळ जवळ प्रत्येकाचा काही नाही तरी निदान दयेची शिफारस तरी होईल असाच अंदाज होता. कोर्टातील प्रगाढ शांतता मोडली नाही– सगळे पुतळ्यासारखे स्तब्ध झाले; यात ज्यांना शिक्षा व्हावीशी वाटत होती तेही होते अन् ज्यांना तो निर्दोष सुटावा असे वाटत होते तेही होते. पण ही स्थिती क्षणिक टिकली. त्यानंतर भयंकर कोलाहल माजला. श्रोतृवर्गातल्या पुष्कळ पुरुषांना बरे वाटले. काहीजण आपला आनंद लपविण्याचा बिलकुल प्रयत्न न करता आपले हात चोळीत राहिले. या निवाड्याशी जे सहमत झाले नाहीत ते चिरडून गेल्यासारखे झाले, आपले खांदे त्यांनी उडविले, ते कुजबुजू लागले, पण तरी अजूनही त्यांना ते खरे आहेसे वाटेना. पण स्त्रियांची स्थिती मी काय वर्णू? त्या बंडच करून उठतील असे मला वाटले. पहिल्याप्रथम त्यांचा आपल्या कानांवर विश्वासच बसेना. मग एकाएकी पुढील उद्गारांनी सारे कोर्ट दणाणून गेले : “काय याचा अर्थ? पुढं काय?” त्या एकदम आपल्या जागांवरून पुढे झाल्या. त्यामुळे या निवाड्याचा लगेच फेरविचार होईल अन् तो उलटविला जाईल असे त्यांना वाटत असल्याचे दिसले. त्याच क्षणी मीत्या एकदम उठून उभा राहिला अन् हृदय विदीर्ण करणाऱ्या आवाजात आपले हात पुढं पसरून म्हणाला :

“मी परमेश्वराची अन् ईश्वराकडून न्याय मिळणाऱ्या त्या भयंकर दिवसाची शपथ घेऊन सांगतो की मी माझ्या वडिलांच्या रक्तपाताचा गुन्हा केलेला नाही! कात्या, मी तुला क्षमा करतो! बंधूंनो, मित्रांनो, त्या दुसऱ्या स्त्रीवर दया करा!”

त्याला पुढे बोलवेना, तो भयंकर आवाज काढून मोठमोठ्याने हुंदके देऊ लागला, त्याचा तो आवाज इतका विचित्र, अनैसर्गिक होता की तो त्याचा नसावासे वाटले, तो सबंध न्यायालयभर ऐकू गेला. गॅलरीच्या अगदी मागच्या दूरच्या कोपऱ्यातून एक हृदयभेदक किंकाळी ऐकू आली– ती ग्रूशिंकाची होती. वकिलांची भाषणे सुरू होण्यापूर्वी पुन्हा कोर्टात प्रवेश मिळण्याची तिने विनंती केली त्यात तिला यश मिळाले होते. मीत्या एकदम घाबरून गेला. शिक्षा जाहीर करण्याचे दुसऱ्या दिवसावर ढकलण्यात आले. साऱ्या कोर्टात धमाल उडाली होती, पण मी ऐकायला थांबलो नाही. मात्र मी बाहेर पडत असताना पायऱ्यांवर माझ्या कानी काही आलेले उद्गार मला आठवतात.

“वीस वर्षे खाणीकडं आता त्याची रवानगी होईल!”

“हो, कमी नाही व्हायची.”

“छान, आमचे खेडूत एकंदरीत खंबीर राहिले हं.”

“अन् आमचा मीत्या जन्मातून उठला.”

उपसंहार

१

मीत्याच्या सुटकेचे बेत

या खटल्यानंतर पाच दिवसांनी, एके दिवशी अगदी सकाळी नऊ वाजता, आल्योशा कतिरीना इवानोवनाकडे उभयतांनाही अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या एका बाबीविषयी बोलण्याकरिता अन् तिला एक निरोप पोचविण्याकरिता गेला. ती ग्रूशिंकाला एकदा ज्या खोलीत भेटली होती त्याच खोलीत बसून त्याच्याशी बोलली. पलीकडच्या खोलीत इवान ताप खूप चढून बेशुद्धावस्थेत पडला होता. कतिरीना इवानोवनाने खटल्याच्या वेळच्या त्या प्रकारानंतर लगेच त्या आजारी अन् बेभान अवस्थेतल्या माणसाला आपल्या घरी घेऊन जाण्याची आज्ञा केली होती, लोकापवाद अटळपणे आपल्यावर येईल अन् सर्वसाधारणपणे लोकांची नाखुषी आपण ओढवून घेऊ हे जाणूनही त्याची पर्वा न करता तिने ही व्यवस्था केली. तिच्यासोबत राहणारी एक नातलग बाई कोर्टातल्या त्या प्रकारानंतर लगेच मॉस्कोला निघून गेली होती, दुसरी राहिली होती. पण जरी दोघी निघून गेल्या असत्या तरी कतिरीना आपल्या निश्चयाला चिकटून राहिली असती अन् त्या आजाऱ्याची शुश्रूषा करीत अन् रात्रंदिवस त्याच्यापाशी बसून ती राहिलीच असती. वार्विन्स्की अन् हर्झनस्तुब त्याच्यावर उपचार करीत होते. तो सुप्रसिद्ध डॉक्टर मॉस्कोला परत गेला होता, त्या आजाराचा काय शेवट होण्याचा संभव आहे याविषयी आपले मत द्यायचे त्याने नाकारले होते. डॉक्टर जरी कतिरीना इवानोवनाला आश्वासनपर सांगत होते, तरी रोगी बरा होण्याची खात्रीलायक आशा ते तिला अजून देऊ शकत नव्हते.

आल्योशा दिवसांतून दोन वेळा आपल्या भावाला पाहण्याकरिता येत होता. पण या खेपेस तो एक खास निकडीचे काम घेऊन आला होता, अन् हा विषय काढणे किती अवघड आहे याची त्याला जरी कल्पना होती. तरी त्याला अतिशय त्वरा करायची होती. त्या सकाळी त्याला आणखी एक कामगिरी होती अन् ती त्याला पुढे ढकलता येण्यासारखी नव्हती, म्हणून त्वरा करण्याची गरज होती.

ते पाव एक तास बोलत होते. कतिरीना पांढरी फटक पडली होती, अन् अतिशय थकलेली होती, आणि तरी वाताचा झटका यावा तशा क्षुब्ध मनःस्थितीत ती होती. आल्योशा आपल्याकडे का आला असावा याची तिला आगाऊ कल्पना आली होती.

"त्याच्या निर्णयाची चिंता करू नकोस," ती आत्मविश्वासपूर्ण जोराने आल्योशाला म्हणाली. "या ना त्या मार्गानं त्याला त्या निर्णयाला येणं भागच आहे. त्यानं निसटून जावंच. त्या दुःखी माणसानं, त्या इभ्रतदार अन् तत्त्वाच्या वीर पुरुषानं—अं हं. दमीत्रि फ्योदरोविच नव्हे, पण तो त्या दरवाज्याच्या पलीकडच्या बाजूला पडलेला आहे तो–ज्यानं आपल्या भावाकरिता स्वतःचं बलिदान केलं तो," कात्या चमकत असलेल्या डोळ्यांनी म्हणाली, "त्यानं मला पुष्कळ दिवसांपूर्वी निसटून जाण्याची सारी योजना सांगितली आहे. यापूर्वीच त्यानं वाटाघाटी सुरू केलेल्या तुला माहीतच आहेत. मी तुला पूर्वी काही सांगितलंच आहे. इथून जो तिसरा मुक्काम पडेल तिथं बहुधा तो होईल, तिथून एक तुकडी सैबेरियाला नेण्यात येणार आहे तेव्हा. हं, अजून त्याला पुष्कळ अवकाश आहे. इवान तिसऱ्या मुक्कामाच्या सुपरिंटेंडंटला यापूर्वीच भेटून आला आहे. पण त्या तुकडीचा ताबा कुणाकडं असणार ते आम्हाला अजून कळलेलं नाही, अन् ते इतके दिवस अगोदर समजणं अशक्य आहे. उद्या कदाचित मी तुला इवानफ योदरोविचनं खटल्याला सुरुवात होण्याच्या आदल्या दिवशी गरज पडली तर जी योजना करून माझ्याकडं दिली होती ती दाखवीन. ती केव्हा, आम्ही भांडत असताना तू पाहिलंस त्या वेळी, आठवतं तुला? तो नुकताच पायऱ्या उतरून खाली गेला होता, पण तुला बघताच मी त्याला परत यायला सांगितलं; आठवतं तुला? आमचं भांडण कशाबद्दल झालं माहीत आहे तुला?"

"नाही, मला माहीत नाही," आल्योशा म्हणाला.

अर्थातच त्यानं तुला सांगितलेलं नसावं ते. ते त्या निसटून जाण्याच्या योजनेबद्दल होतं. त्यानं तीन दिवस अगोदर मुख्य कल्पना मला सांगितली होती, अन् आम्ही लगेच त्याबद्दल भांडायला सुरुवात केली अन् तीन दिवस आम्ही भांडत होतो, आमचं भांडण अशाकरिता होतं की जेव्हा त्यानं मला सांगितलं की दमीत्रि फ्योदरोविचला शिक्षा झाली तर तो त्या भिकारडीबरोबर पळून दूरदेशी जाईल, तेव्हा मला एकदम भयंकर संताप आला. का ते मला सांगता येणार नाही, माझं मलाच त्याचं कारण माहीत नाही... हं, त्या भिकारडीबद्दल माझ्या मनात अर्थात् भयंकर राग होता, अन् तिनंसुद्धा दमीत्रिबरोबर परदेशी जावं, म्हणजे काय!" कतिरीना एकाएकी उद्गारली, तिचे ओठ रागाने थरथरू लागते. "जेव्हा इवान फ्योदरोविचला त्या स्त्रीबद्दल मला संताप आहे असं दिसलं, तेव्हा चटकन् त्याच्या मनात आलं मला दमीत्रिचा मत्सर वाटत आहे, अन् अजून

माझं दमीत्रिवर प्रेम आहे. ही अशी आमच्या पहिल्या भांडणाची सुरुवात, मी काही स्पष्टीकरण देत नव्हते, मला क्षमा मागणं शक्य नव्हतं. असला माणूस, मी अजून त्या...वर प्रेम करीत आहे असा संशय घेऊ शकतो हे मला सहन करणं शक्य नव्हतं... आणि बरेच दिवसांपूर्वी मी स्वतः त्याला माझं दमीत्रिवर प्रेम नाही, माझं तुझ्याशिवाय दुसऱ्या कुणावरही प्रेम नाही असं सांगितलं असताना! त्या भिकारडी-बद्दल माझ्या मनात असलेल्या तिटकाऱ्यामुळंच मला त्याचा राग आला होता. तीन दिवसांनंतर, तू आलास त्या संध्याकाळी त्यानं मला एक सीलबंद लिफाफा आणून दिला, त्याला जर काही बरं वाईट झालं तर तो मी तत्काळ उघडायचा होता. हं:, त्याला आपण आजारी पडणार याची अगोदरच कल्पना होती! त्या लिफाफ्यात सुटून जाण्याचा सारा तपशील आहे अन् जर आपण मेलो किंवा भयंकर आजारी पडलो, तर मीच एकटीनं मीत्याला वाचवायचं होतं. नंतर त्यानं माझ्याकडं पैसे — जवळ जवळ दहा हजार रुबल — ठेवले. ज्या नोटांचा सरकारी वकिलानं आपल्या भाषणात उल्लेख केला होता ना, त्या नोटा होत्या त्या. कुणाकडून तरी त्याला कळलं की त्यानं त्या मोडून आणण्याकरिता पाठविल्या होत्या म्हणून. इवान फ्योदरोविचनं आपल्या भावाला वाचविण्याचा विचार सोडून दिलेला नाही आणि, अजून त्याला माझ्याबद्दल मत्सर वाटत होता अन् माझं मीत्यावर प्रेम आहे अशी अजून त्याला खात्री वाटत होती तरीसुद्धा, त्या सुटकेच्या योजनेबद्दल मला त्यानं आपल्या विश्वासात घेतलं याचा माझ्या मनावर अतिशय परिणाम झाला. अरे, हा केवढा त्याग! अं हं, अलेक्सी तुला या आत्मबलिदानाच्या मोठेपणाची कल्पना नाही येणार. मला वाटलं पूज्य भावनेनं त्याच्या चरणांवर डोकं ठेवावं, पण एकदम माझ्या मनात आलं की मीत्या वाचविला जात आहे या कल्पनेनं आनंद होऊन मी तसं केलं असं तो मानील (अन् खात्रीनं तसंच त्यानं मानलं असतं!), अन् माझ्याविषयी असा अन्यायाचा विचार त्याच्या मनात येऊ शकतो या नुसत्या शक्यतेच्या विचारानं मी इतकी संतापले की पुन्हा माझा मनावरचा ताबा सुटला, अन् त्याच्या चरणांचं चुंबन घेण्याऐवजी, पुन्हा मी त्याच्यावर भडकले! हाय हाय, मी दुर्दैवी आहे! हा माझा स्वभाव, माझा भयंकर, दुर्दैवी स्वभाव मला भोवतो! हं! तुला दिसेल की शेवटी यालासुद्धा मी दमीत्रि-प्रमाणं, त्याग करून दुसऱ्या जिच्याशी त्याचं जमेल तिच्याकडं मी ढकलणार आहे. पण....छे:, मला ते सहन करणं शक्य झालं नाही, मला स्वतःला मारून टाकावंसं वाटतं. अन् ज्यावेळी तू आत आलास अन् तुला मी बोलावलं अन् त्याला आत यायला सांगितलं, त्यावेळी त्यानं माझ्यावर टाकलेल्या तिटकाऱ्याच्या अन् द्वेषाच्या कटाक्षानं मी इतकी संतापले— आठवतं तुला? की मी ओरडून तुला म्हणाले की यानं— यानंच माझ्या मनात दमीत्रि खुनी आहे हे भरवलं! मी ही जहरी भाषा जाणूनबुजून त्याला पुन्हा दुखविण्यासाठी बोलले. आपला भाऊ खुनी आहे हे त्यानं

कधी, कधी सुद्धा माझ्या मनात भरवलं नाही. उलट, मीच त्याच्या मनात भरवलं! अरेरे, माझा नीच स्वभाव सगळ्या गोष्टींना कारणीभूत आहे! खटल्याच्या वेळी जो बीभत्स प्रकार घडला त्याला वाट मी करून दिली. आपण इज्जतदार व्यक्ती आहोत, अन् जरी माझं त्याच्या भावावर प्रेम असलं तरी आपण सूडबुद्धीनं किंवा मत्सरानं त्याचा सत्यानाश करणार नाही हे त्याला मला दाखवायचं होतं. म्हणून तो कोर्टात आला... मी आहे या साऱ्याचं कारण, सारा दोष माझाच आहे!"

कात्याने यापूर्वी कधीही आल्योशापाशी अशी कबुली दिली नव्हती, आणि त्याला वाटले की, ती यावेळी अशा असह्य वेदना सोसत असल्याच्या अवस्थेत आहे की जेव्हा अगदी अभिमानी अंतःकरणसुद्धा आपला अभिमान चिरडून टाकते अन् दुःखाने पराजित होऊन सपशेल लोटांगण घालते. आजच्या तिच्या गाढ शोकाचे दुसरे एक भयंकर कारण, जरी तिने ते खटल्यानंतरच्या इतक्या दिवसांत आल्योशापासून काळजीपूर्वक चोरून ठेवले होते तरी, त्याला माहीत होते; पण जर यावेळी त्यासंबंधाने त्याच्यापुढे बोलण्याइतकी ती खालच्या अवस्थेला पोचली असेल तर ते त्याला काही कारणामुळे दुःखद वाटले असते. खटल्याच्या वेळी तिने जो 'बेइमानीपणा' केला त्याचे दुःख ती भोगत होती. आणि आल्योशाला वाटले की तिची सदसद्विवेकबुद्धी तिला आपल्यापाशी, आल्योशापुढे, साश्रू, आक्रंदनाने अन् उन्मादवायूने जमिनीवर गडबडा लोळत ते कबूल करायला भाग पाडत आहे. पण तो क्षण येऊ नये अन् तिला त्यापासून दूर ठेवावे असे तीव्रतेने त्याला वाटू लागले. त्यामुळे तो जे काम घेऊन आला होता ते अधिकच बिकट होत होते. तो पुन्हा मित्याविषयी बोलला.

"ते ठीक आहे, ते ठीक आहे, त्याच्याबद्दल तू काळजी करू नको!" ती पुन्हा तिखटपणे अन् आग्रहहाने बोलली. "हे सारं केवळ काही काळापुरतं आहे, मी त्याला ओळखते, त्याच्या हृदयाची मला फार चांगली ओळख आहे. तो पळून जायला संमती देईल याची शंका नको. ते अर्थात अगदी तडकाफडकी होईल असं नाही; त्याला त्याकरिता मनाचा निश्चय करायला वेळ मिळेल. इवान तोपर्यंत बरा होईल अन् स्वतःच सारं जमवून आणील, त्यामुळं मला त्यात काहीच करावं लागणार नाही. काळजी करू नको; तो पळून जायला कबूल होईल, त्यानं यापूर्वीच कबुली दिली आहे. तो त्या स्त्रीला सोडून देईल असं का तुला वाटतं? आणि ते काही तिला त्याच्याकडं जाऊ देणार नाहीत, तेव्हा त्यानं पळून जाणं प्राप्त आहे. त्याला भय वाटतं ते तुझं, तू त्याला नैतिक भूमिकेवर पळून जायला संमती देणार नाहीस अशी त्याला भीती वाटते. पण जर तुझा पाठिंबा इतका आवश्यक असेल तर तू उदारपणानं ते घडू दिलं पाहिजेस," कात्या दुष्टपणानं म्हणाली. ती थांबली अन् हसली.

"तो कसल्यातरी स्तोत्रासंबंधी बोलतो," ती पुन्हा पुढे बोलू लागली, "कसला तरी क्रूस जो त्याला वाहावा लागणार आहे, कसलं तरी कर्तव्य; इवान फ्योदरोविचनं मला त्यासंबंधानं बरंच सांगितलं, आणि तो कशा रीतीनं बोलत होती माहीत आहे!" कात्या एकदम स्वतःची भावना दाबणे शक्य न झाल्यामुळे ओरडली, "मला सांगताना त्या कवडीमोल माणसावर त्याचं किती प्रेम दिसून आलं अन् कदाचित त्याचक्षणी त्याला त्याचा किती द्वेष वाटला, हे माहीत नाही तुला! मी ती त्याची हकीकत अन् त्याचा शोक तिरस्कारानं अन् तिटकाऱ्याच्या भावनेनं ऐकला. पशू! होय, मी पशू आहे. मीच त्याच्या तापाला कारणीभूत आहे. पण तो तुरुंगात पडलेला माणूस मुळीच क्लेश सहन करू शकणार नाही." कात्या चिडून म्हणाली, "असा माणूस काय दुःख सहन करू शकेल? त्याच्यासारखी माणसं कधीच दुःख सहन करीत नसतात!"

तिच्या शब्दात द्वेषाची अन् तिरस्कारपूर्ण धिक्काराची छटा होती. अन् तरी त्याला बेइमान होणारी तीच होती. "कदाचित आपण त्याच्यावर किती अन्याय केला असं वाटून ती कधी कधी त्याचा द्वेष करते." आल्योशा स्वतःशी म्हणाला. त्याने आशा बाळगली की ते "कधी कधी"च फक्त घडत असावे. कात्याच्या शेवटच्या शब्दात त्याला आव्हानाचा सूर आढळला, पण त्याने ते स्वीकारले नाही.

"मी तुला आज सकाळी जे बोलावणं पाठविलं ते तू त्याचं मन वळवायचं वचन द्यावंस म्हणून. की तुलासुद्धा पळून जाणं हे नामुष्कीचं, भ्याडपणाचं, किंवा अधार्मिक असं काही तरी वाटतं?" कात्या अधिकच आव्हानात्मक बोलली.

"छेः, नाही. मी त्याला सर्व सांगेन." आल्योशा तोंडातल्या तोंडात बोलला. "त्यानं तुला आज भेटून जायला सांगितलंय" तो एकदम मोठ्याने बोलला, आणि तिच्या तोंडाकडे स्थिर नजरेने पाहू लागला. ती एकदम चपापली अन् कोचावर त्याच्यापासून एकदम थोडी मागे सरली.

"मला? शक्य तरी आहे?" ती पांढरी पडून अडखळत बोलली.

"शक्य आहे अन् असलं पाहिजे," आल्योशा, अधिक आश्वासित होऊन जोराने म्हणाला. "त्याला तुझी गरज विशेषतः याचवेळी आहे. जर आवश्यकता नसती तर मी हा विषय काढून तुला त्रास दिला नसता. तो आजारी आहे, त्याचं डोकं ठिकाणावर नाही, तो एकसारखं तुझ्याबद्दल विचारतो. तुझ्याशी समेट करण्याच्या इच्छेनं तुला तो बोलावत नाही, तर फक्त तू आपल्याकडं यावंस अन् आपल्या दारापाशी फक्त दर्शन द्यावंस एवढीच त्याची इच्छा आहे. त्या दिवसापासून इतक्या गोष्टी घडल्या आहेत. आपण तुला अगणित परीनं दुखावलेलं आहे याची त्याला जाणीव आहे. तो तुझी क्षमा मागत नाही; 'मला ती क्षमा करणं अशक्य आहे.' तो स्वतःला

म्हणतो, पण फक्त तू त्याच्या दाराशी यावंस अन् दर्शन द्यावंस एवढीच त्याची इच्छा आहे."

" हे इतकं अचानक आहे..." कात्या अडखळत म्हणाली. " अलीकडे कित्येक दिवस मला आतून असं वाटत होतंच की तू हा निरोप घेऊन येशील. तो मला बोलावील हे मला माहीत होतं. पण ते अशक्य आहे !"

" अशक्य असू दे, पण ते कर. एवढा विचार कर की पहिल्यांदाच त्याला आपण तुला किती दुखावलंय याची जाणीव होत आहे, आयुष्यात अगदी पहिल्या प्रथम; इतक्या संपूर्ण स्वरूपात त्याला त्याची कधीच कल्पना आलेली नव्हती. तो म्हणाला, 'ती येत नाही म्हणाली तर जन्मभर मी दुःखी राहीन.' ऐकलंस का ? त्याला जरी वीस वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झालेली असली, तरी तो अजून सुखी होण्याचा बेत करतो आहे – हे दयाजनक नाही काय, विचार कर– तू त्याला भेटलंच पाहिजेस; त्याचा सर्वनाश झालेला असला तरी तो निरपराधी आहे, ' आल्योशाच्या तोंडून आव्हान स्वरूपात हे शब्द निघाले. " त्याचे हात स्वच्छ आहेत, त्यावर बिलकुल रक्त नाही ! त्याला पुढं अनंत यातना होणार आहेत त्याकरिता आत्ता तू त्याला भेट. जा, अंधारात जाणाऱ्या त्याच्या मार्गावर त्याचं शुभचिंतन कर– फक्त त्याच्या दाराशी जाऊन उभी राहा, एवढंच.... तुझं ते कर्तव्य आहे, तुझं ते कर्तव्य आहे !" आल्योशा शेवटी म्हणाला, त्यानं ' कर्तव्य ' या शब्दावर खूप जोर दिला.

" माझं कर्तव्य आहे... पण मला शक्य नाही..." कात्या आर्ततेने म्हणाली. " तो माझ्याकडं कसं पाहील... छेः, शक्य नाही."

" तुमचे डोळे एकमेकांना भेटले पाहिजेत. तू जर आता तुझ्या मनाचा निश्चय केला नाहीस तर सबंध आयुष्य तू कसं काढशील ?"

" आयुष्यभर यातना भोगलेल्या बऱ्या."

" तुला गेलं पाहिजे, तुला गेलंच पाहिजे," आल्योशा कठोरपणे जोर देऊन पुनःपुन्हा म्हणाला.

" पण आजच कशाला, असं एकदमच कशाला ?.... मला माझ्या रुग्णाला सोडता येणार नाही..."

" एक क्षणभर सोडू शकशील. फक्त एक क्षणच लागेल. जर तू आली नाहीस तर त्याला रात्री वात होईल. मी तुला खोटं सांगणार नाही; दया कर त्याच्यावर !"

" दया माझ्यावर कर !" कात्या तिखटपणे बोचेल अशा स्वरात म्हणाली, अन् तिच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

" तर मग तू येणार तर. " तिचे अश्रू बघून आल्योशा दृढपणे म्हणाला. " मी त्याच्याकडं जाऊन तू लगेच येत आहेस असं त्याला सांगतो. "

" नको, मुळीच तसं त्याला सांगू नकोस," कात्या भयभीत होऊन म्हणाली. " मी येईन, पण त्याला अगोदर सांगू नकोस, कारण मी गेले तर जाईन, पण आता नाही जाणार ..अजून मला माहीत नाही...."

तिच्या आवाजाने तिला दगा दिला. तिने जोराने श्वास घेतला. आल्योशा जायला निघाला.

" अन् जर मला कुणी भेटले तर काय ? " ती एकदम म्हणाली, तिचा आवाज क्षीण झाला होता, ती पांढरी पडली होती.

" म्हणूनच तर तू आता गेलं पाहिजेस, कुणी तुला भेटू नये म्हणून, तिथं आता कुणीही असणार नाही हे मी तुला खात्रीपूर्वक सांगतो. आम्ही तुझी वाट पाहतो, " तो दृढपणे शेवटी म्हणाला, आणि खोलीच्या बाहेर पडला.

२

क्षणभर असत्य हेच सत्य होते

मीत्या ज्या इस्पितळात पडला होता तिकडे तो झपझप निघाला. मीत्या, त्याच्या नशिबाचा कौल लागल्यानंतर मज्जातंतूच्या ज्वरानं आजारी पडला होता, आणि त्याला शहराच्या इस्पितळाच्या तुरुंगविभागाकडे पाठविण्यात आले होते. परंतु अनेकांच्या (आल्योशा, मादाम होहलाहोवा, लिझ इ. च्या) विनंतीवरून, डॉक्टर वार्विन्स्कींनी मीत्याला इतर कैद्यांबरोबर न ठेवता, एका स्वतंत्र छोट्या खोलीत पूर्वी जिथं स्मिर्दाकोफ होता तिथे, ठेवले होते. खोल्यांवरून जाणाऱ्या वाटेच्या एका टोकाला एक पहारेकरी होता ही गोष्ट खरी, आणि खिडकीला जाळी लावलेली होती, त्यामुळे वार्विन्स्कीने जी मेहेरबानी दाखविली होती— जी अर्थात् कायद्याला धरून नव्हती— त्याबद्दल त्याला निश्चित राहायला हरकत नव्हती; पण तो दयाळू अंतःकरणाचा अन् कनवाळू तरुण होता. मीत्यासारख्या माणसाला चोरांच्या अन् खुन्यांच्या समाजात एकदम इतक्या अल्पावकाशात दाखल होणं किती कठीण होईल, त्याला हळू हळूच त्याचा सराव झाला पाहिजे, हे त्याने जाणले. आप्तांच्या अन् मित्रांच्या भेटी घ्यायला डॉक्टरने अन् तिथल्या तुरुंगप्रमुखाने आणि पोलिस कॅप्टनने सुद्धा, अनौपचारिकपणे मंजुरी दिली होती. परंतु फक्त आल्योशा अन् ग्रूशिंका तेवढेच मीत्याला भेटले होते. राकितीनने दोनदा जबरदस्तीने प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न केला, पण मीत्याने वार्विन्स्कीला त्याला येऊ न देण्याबद्दल आग्रहपूर्वक विनवणी केली.

इस्पितळातील पोषाखात तो आपल्या अंथरुणावर बसलेला आल्योशाला दिसला, त्याला ताप आल्यासारखा वाटत होता, व्हिनेगर अन् पाणी यांच्या मिश्रणात भिजवून ओला केलेला टॉवेल त्याच्या डोक्यावर ठेवलेला होता. त्याने

आल्योशा आत येत असताना त्याच्याकडे सांगता न येण्यासारख्या दृष्टीने बघितले, पण त्यात भयाची झाक स्पष्टपणे दिसून येत होती. खटल्यानंतर तो अतिशय विचारमग्न असे; कित्येक वेळा तो अर्धा अर्धा तास गप्प बसून असे, अन् कशावर तरी जोरजोराने अन् वेदनेने विचार करीत असावासे वाटे, त्याला आजूबाजूचे कशाचेही भान नसे. तो आपल्या विचारमग्न अवस्थेतून जागा होऊन बोलू लागला तर नेहमी अर्धवटपणे बोले अन् त्याला जे बोलायचे असे ते तो कधी बोलत नसे. तो केव्हा केव्हा वेदनायुक्त मुद्रेने आपल्या भावाकडे पाही. तो आल्योशापेक्षा ग्रूशिंकापाशी अधिक निवांत होई असे दिसे. तो तिच्याशी क्वचितच काही बोलणे करी हे खरे असले, तरी ती आत आली की त्याचा चेहेरा आनंदाने उजळून जाई.

आल्योशा त्याच्यापाशी त्याच्या अंथरुणावर जाऊन मुकाट्याने बसला. यावेळी मीत्या आल्योशाची उत्कंठेने वाट पाहात होता, पण त्याला एकही प्रश्न विचारण्याचा धीर त्याला झाला नाही. कात्या यायला कबूल होईल हे त्याला जवळ जवळ कल्पनेतसुद्धा अशक्य वाटले, अन् त्याचबरोबर त्याला वाटले की जर ती आली नाही, तर काही तरी अकल्पनीय असे घडून येईल. आल्योशाला त्याच्या भावना समजल्या.

" त्रिफोन बोरिरसोविचनं आपली सारी खाणावळ मोडून तोडून टाकलीय असं मला कळलं," मीत्या चाचरत बोलू लागला, " त्यानं सगळी फरसबंदी उचकटली आहे, तक्तपोशी बाजूला केली आहे, सगळी गॅलरी फोडून काढली आहे, म्हणे. तो एकसारखा खजिन्याचा— जे पंधराशे रुबल मी तिथं लपवून ठेवल्याचं सरकारी वकिलानं सांगितलं त्यांचा शोध घेतो आहे. त्यानं घरी गेल्याबरोबर माकडचेष्टा करायला सुरुवात केली असं म्हणतात. बरं प्रायश्चित्त मिळालं हरामखोराला ! इथल्या पहारेकऱ्यानं मला हे सांगितलं; तो तिकडचाच आहे ! "

" ऐक," आल्योशा म्हणाला, " ती येईल, पण केव्हा ते मला माहीत नाही. आज येईल. कदाचित काही दिवसांनी येईल, ते मला सांगता येणार नाही. पण ती येणार, येणार हे निश्चित."

मीत्या एकदम दचकला, तो काही तरी बोलणार होता, पण गप्प राहिला. त्या बातमीचा त्याच्यावर प्रचंड परिणाम झाला. त्यांचे काय बोलणे झाले ते समजून घ्यायला त्याला अतिशयच आवडले असते हे उघड दिसत होते, पण त्याला पुन्हा विचारायची भीती वाटली. त्यावेळी कात्याकडून काहीही निष्ठूरपणाचे अन् तुच्छतादर्शक ऐकायला मिळणे त्याला सुरी भोकसल्यासारखे वाटले असते.

" इतर गोष्टींबरोबर ती असंही म्हणाली की तुझ्या पळून जाण्यासंबंधी मी तुझ्या विवेकबुद्धीला स्वस्थ करीन अशी मी खात्री दिली पाहिजे. इवानला जर तोपर्यंत बरं वाटलं नाही, तर ती त्या बाबीत स्वतः लक्ष घालील."

"तू हे अगोदरच मला सांगितलं आहेस." मीत्या विचार करीत म्हणाला.

"अन् तू ते ग्रूशाला सांगितलं आहेस." आल्योशा म्हणाला.

"होय," मीत्याने कबूल केले. "ती आज सकाळी येणार नाही." त्याने भीत भीत आपल्या भावाच्या चेहऱ्याकडे पाहिले. "ती आज संध्याकाळपर्यंत येणार नाही. मी जेव्हा तिला काल कात्या उपायजोजना करीत आहे असं म्हटलं तेव्हा ती काही बोलली नाही, पण तिनं आपलं तोंड आवळलं. ती फक्त एवढंच पुटपुटली, 'करू दे!' ते महत्त्वाचं आहे हे ती समजली. मी पुढं तिचे विचार काढून घ्यायला धजलो नाही. तिला, मला वाटतं, आता समजलं आहे की कात्याला आता माझी पर्वा नाही, तिचं इवानवर प्रेम आहे."

"खरंच?" आल्योशाच्या तोंडून बाहेर पडले.

"कदाचित् नसेल. मात्र एवढंच की ती आज सकाळी इकडं येणार नाही." मीत्या पुन्हा झटकन् खुलासा करीत म्हणाला; "मी तिला माझ्याकरिता काही कर म्हणून म्हटलं आहे. इवान आपणा सर्वांहून सरस आहे, तुला माहीतच आहे. तो जगला पाहिजे, तो बरा होईल."

"तुला खरं तरी वाटेल, जरी कात्याला त्याच्याविषयी भय वाटतंय, तरी तो बरा होईल याविषयी तिला मुळीच संशय नाही. !" आल्योशा म्हणाला.

"याचा अर्थ तो मरणार याची तिला खात्री आहे. ती घाबरलेली असल्यामुळंच तो बरा होईल याविषयी तिला इतकी खात्री वाटते."

"इवानचं शरीर बळकट आहे, अन् मलासुद्धा तो बरा होईल अशी सर्वतोपरी आशा वाटते," आल्योशा सचिंतपणे बोलला.

"होय, तो चांगला बरा होईल. पण तिची खात्री आहे की तो मरणार. तिला बरंच दुःख सहन करावं लागेल...." यावर स्तब्धता पसरली. एक गंभीर चिंता मीत्याला पोखरत होती.

"आल्योशा, माझं ग्रूशावर भयंकर प्रेम आहे रे!" तो एकदम कंपित स्वरात, डोळ्यांत अश्रू आणून म्हणाला.

"ते तिला तिकडं तुझ्याकडं जाण्याची परवानगी देणार नाहीत." आल्योशा लगेच उद्‌गारला.

"आणि आणखी एक काही मला तुला सांगायचं होतं," मीत्या पुढे म्हणाला, त्याच्या आवाजात एकदम एक झंकार उमटला. "त्यांनी जर मला वाटेत किंवा तिकडं मारझोड केली, तर मी त्यांना वळणार नाही. मी कुणाला तरी ठार मारीन अन् त्याकरिता गोळी खाईन. अन् हे असं वीस वर्षं चालणार! आत्ताच ते माझ्याशी उद्धटपणानं बोलतात. मी इथं, माझाच न्यायनिवाडा करीत रात्रभर पडून असतो. माझी तयारी नाही! येईल ते मुकाट्यानं मी सहन करू शकत नाही. मला 'स्तोत्र' म्हणायचं होतं; पण जर एखादा पहारेकरी उद्धटपणानं मला बोलला,

तर ते सहन करून घ्यायची ताकद अंगी नाही. ग्रूशासाठी मी वाटेल ते सहन करीन... वाटेल ते, फक्त मारझोड सोडून... पण तिला तिकडं येऊ दिलं जाणार नाही."

आल्योशाने मंद स्मित केले.

"ऐक, भाऊ, एकदाच मी तुला सांगून टाकतो,' तो म्हणाला, "त्यासंबंधानं मला असं वाटतं. अन् मी तुला खोटं सांगणार नाही हे तुला माहीत आहे. ऐक : तुझी तयारी नाही, अन् असे क्लेश ओढवून घेणं तुला जमणारही नाही. दुसरं म्हणजे, तुझी मानसिक तयारी नसताना असे हुतात्मेपणाचे क्लेश ओढवून घेण्याची तुला गरजही नाही. तू जर आपल्या वडिलांचा खून केला असतास तर मात्र तू स्वतःला झालेली शिक्षा भोगत नाहीस याबद्दल मला दुःख वाटलं असतं. पण तू निरपराधी आहेस, अन् हे क्लेश तुला फार होतील. तू स्वतःला क्लेश भोगण्यानं वेगळा माणूस बनविण्याची इच्छा करीत होतास. माझं म्हणणं, त्या 'वेगळ्या' माणसाची सदोदित जन्मभर अन् जिथं जिथं जाशील तिथं फक्त आठवण ठेव म्हणजे झालं; आणि तेवढं तुला पुरेसं आहे. हे महान् कष्ट भोगण्याचं आपण नाकारलं ही गोष्ट तुला जन्मभर याहीपेक्षा अधिक महान् कर्तव्य करण्याची जाणीव ठेवण्याला उपयोगी पडेल, अन् कदाचित् तू तिकडं जाण्यापेक्षा ही जाणीव सतत राहिल्यानं तुला नवा मनुष्य बनायला अधिक मदत होईल. कारण तिथले कष्ट तुला सहन होणार नाहीत अन् तू झुरत राहशील, अन् शेवटी कदाचित म्हणशील : 'मी कुणाचं काही देणं लागत नाही.' तो वकील त्याबद्दल जे म्हणाला ते बरोबर होतं. अशा तऱ्हेचा प्रचंड भार वाहणं सर्वच माणसांना शक्य नसतं. काहींना तर ते अशक्यच होतं. माझे त्याबद्दलचे विचार, तुला जर ते इतक्या अगत्यानं हवे असतील तर असे आहेत. तुझ्या पळून जाण्याबद्दल जर इतर माणसं– अधिकारी म्हणा, सैनिक म्हणा– जबाबदार धरली जायची असती तर मी तुला 'परवानगी' दिली नसती," आल्योशा हसत म्हणाला. "पण त्यांनी सांगितलंय. त्या मुक्कामाच्या सुपरिंटेंडेंटनं खुद्द इवानला सांगितलंय– की जर व्यवस्थित जमवून आणलं तर फार मोठी चौकशी होणार नाही अन् ते त्यातून सहीसलामत सुटू शकतील. अर्थात् अशा प्रकरणातसुद्धा, लाच देणं हे अप्रामाणिकपणाचंच आहे, पण त्याबद्दल बरं-वाईट म्हणणं मी माझ्या अंगावर घेऊ शकत नाही, कारण इवाननं अन् कात्यानं तुझ्या वतीनं काम करायला माझी नेमणूक केलीय. मला जाऊन लाच द्यावी लागेल हे मला माहीत आहे. मला तुला सत्य ते सांगितलं पाहिजे. आणि म्हणून तुझ्या स्वतःच्या कृतीच्या बरेवाईटपणाबद्दल मी ठरवू शकत नाही. पण एवढं मात्र तुला मी खात्रीपूर्वक सांगतो की मी तुला कधीही दोषी म्हणून धिक्कारणार नाही. आणि एवढ्या बाबीवरून जर मी तुझ्या गुणावगुणांची परीक्षा केली तर ते विचित्रच म्हणावं लागेल. मला वाटतं आता सर्व गोष्टी मी तुला सांगितल्या."

"पण मी स्वतःच माझा धिक्कार करतो ना!" मीत्या म्हणाला. "मी निसटायचं हे तुला बाजूला ठेवून ठरविण्यात आलं आहे; मीत्या कारमाझफ्लीं पळून जाण्याव्यतिरिक्त दुसरं काहीच करणं शक्य नव्हतं? पण मी स्वतःचा धिक्कार करीन, अन् जन्मभर माझ्या पापाबद्दल प्रार्थना करीत राहीन. जेसुईट लोक असंच बोलतात ना? आपण बोलतो आहोत तसं?"

"होय." आल्योशा मंदपणे हसला.

"तू नेहमी संपूर्ण सत्य सांगतोस अन् काही लपवून ठेवीत नाहीस यामुळेच माझं तुझ्यावर प्रेम आहे," मीत्या उल्हासित हास्य करीत म्हणाला. "तेव्हा माझा आल्योशा जेसुईटसारखा होताना मी त्याला पकडलं अं? मला त्याबद्दल तुझा पापा घेतला पाहिजे. आता बाकीचं ऐक; माझ्या हृदयाची दुसरी बाजू मी तुला उघडी करतो. मी अशी योजना आखली न् निश्चित केली आहे. जरी मी पैसा अन् पासपोर्ट बरोबर घेऊन पळालो आणि अमेरिकेलासुद्धा गेलो, तरी मी चैनीकरता, सुखाकरिता, पळून जात नाही, तर कदाचित सैबेरिया इतक्याच वाईट अशा परदेशाला निर्वासित म्हणून जात आहे या विचारानं मी माझ्या मनाची प्रसन्नता कायम ठेवीन. सैबेरियाइतकीच ती वाईट आहे, आल्योशा, तितकीच! मला त्या अमेरिकेचा पूर्वीपासूनच द्वेष आहे, झक मारो ती! ग्रूशा माझ्याबरोबर असली तरी! जरा तिच्याकडं पाहा. ती काय अमेरिकन आहे? ती रशियन आहे, ती हाडीमाशी रशियन आहे; मातृभूमीच्या ओढीनं ती तळमळत राहील, अन् घटके-घटकेला मला दिसतं की ती माझ्या खातर क्लेश सोसते आहे, तिनं माझ्यासाठी आत्मक्लेश ओढवून घेतले आहेत. अन् तिनं बिचारीनं काय अपराध केला? आणि तिकडचे ते तुच्छ लोक, माझ्यापेक्षा ते जरी अधिक चांगले असले-अगदी त्यांतला प्रत्येक माणूस तरी त्यांच्याशी माझं कसं जमणार? त्या अमेरिकेचा मला अगोदरच तिटकारा आहे! यंत्रांच्या बाबतीत भले ते चकित करून सोडणारे असोत-अगदी त्यांच्यातला प्रत्येक-जण तरी, झक मारोत ते, माझ्या अंतरात्म्याशी त्यांचं नातं जमणारं नाही. माझं रशियावर प्रेम आहे. आल्योशा, जरी मी स्वतः बदमाश असलो तरी रशियाच्या ईश्वरावर माझी भक्ती आहे. मी तिथं गुदमरून जाईन!" तो मोठ्याने उद्गारला, त्याचे डोळे एकदम झळाळू लागले. त्याचा आवाज अश्रूंनी सद्गदित झाला. "म्हणून मी असं ठरवलंय आल्योशा, ऐक," आपल्या भावनावेगावर आवर घालून तो पुढे म्हणाला, "तिथं ग्रूशाला घेऊन पोचल्याबरोबर आम्ही लोकांपासून दूर कुठंतरी, जंगली अस्वलांच्या संगतीत, जमिनीवर काम करायला ताबडतोब सुरुवात करू. तिकडंसुद्धा वस्तीपासून दूर असे भाग असतीलच. अजूनही तिथं लाल चामडीची माणसं कुठंतरी क्षितिजाच्या कडेला राहतात म्हणे. तेव्हा 'मोहिकनांच्या शेवटच्या वंशजांच्या' देशात जायचं, आणि तिथं आम्ही मी अन् ग्रूशा भाषाशास्त्र शिकू. काम अन् भाषा- अशी तीन वर्षं आम्ही तिथं काढू आणि तेवढ्या काळात

आम्ही इंग्रजांप्रमाणं इंग्रजी बोलायला लागू. अन् तेवढं झालं की, अमेरिकेला राम राम ! आम्ही रशियाला अमेरिकन नागरिक म्हणून येऊ. हं, असा बेचैन होऊ नकोस. आम्ही या छोट्या शहरात येणार नाही. कुठंतरी दूर उत्तरेकडच्या किंवा दक्षिणेकडच्या कुठल्यातरी भागात येऊन आम्ही लपून राहू. त्या वेळपर्यंत अमेरिकेत असताना माझ्यात बदल घडून आलेला असेल, अन् तिच्यातसुद्धा. तिथले डॉक्टर माझ्या चेहऱ्यावर एखादी गाठ वगैरे आणून देतील– नाहीतर ते इतके यंत्रज्ञ झाल्याचा उपयोग काय ? किंवा मी माझा एक डोळा काढून टाकीन, दोन हात दाढी वाढवीन अन् नाहीतरी रशियासाठी झुरल्याने माझे केस पांढरे व्हायला लागतीलच. ते मग मला खात्रीनं ओळखणार नाहीत. अन् ओळखलंच तर पाठवू देत ते आम्हाला सैबेरियाला– मला पर्वा नाही. तेच आमचं नशीब असं त्यावरून दिसेल. इथंसुद्धा कुठंतरी जंगलात आम्ही जमिनीचं काम करू, अन् मी आयुष्यभर अमेरिकन म्हणून वेष घेऊन राहीन. पण आम्ही आमच्या भूमीत मरू. हा माझा बेत आहे. अन् तो बदलणार नाही. तुला मान्य आहे ? ”

“होय,” आल्योशा त्याला प्रतिवाद करू नये या बुद्धीने म्हणाला. मीत्या एक मिनिट थांबला अन् एकदम म्हणाला,

“खटल्यात त्यांनी कसं सारं बरोबर बनवत आणलं हं ! त्यांनी ते बनवत आणलं नाही ना ? ”

“त्यांनी बनवत आणलं नसतं, तरी तुला शिक्षा ही झालीच असती.” आल्योशा निःश्वास टाकून म्हणाला.

“होय, इथले लोक मला विटले आहेत ! ईश्वर त्यांचं भलं करो, पण हे कठीण आहे.” मीत्या अतिशय दुःखाने विव्हळला. पुन्हा एक मिनिट शांतता पसरेली.

“आल्योशा, या महाव्यथेतून मला एकदाचा सोडव ना ! ” तो एकदम उद्‌गारला. “मला सांग, ती आता येणार की नाही ? सांग मला. काय म्हणाली ती ? कसं बोलली ती ? ”

“ती म्हणाली मी येईन, पण ती आज येईल की नाही ते मला माहीत नाही. तिला फार कष्ट होताहेत, बरं का.” आल्योशाने भीत भीत आपल्या भावाकडे पाहिले.

“तिला कष्ट होत असणार असं मला वाटलं तर बरं ! आल्योशा, मला खरोखर वेड लागायची पाळी येईल. ग्रूशा माझ्याकडं पाहत राहते. तिला समजतं. देवा, माझं चित्त शांत कर; मला हवंय तरी काय ? मला कात्या हवी आहे ! मला काय हवं ते मला समजतं का ? ही कारमाझफची माथेफिरू, पापी वृत्ती आहे ! अंहं, मी क्लेश भोगायला लायक नाही. मी बदमाष आहे, एवढंच म्हणायचं दुसरं काय ? ”

" ती पाहा आली," आल्योशा ओरडून म्हणाला.

त्याच क्षणी कात्या दरवाज्यात दिसली. क्षणभर ती मीत्याकडे दिङ्मूढ नजरेने पाहत निश्चळ उभी राहिली. तो चटकन आपल्या पायांवर उठून उभा राहिला, अन् एक बुजरा भाव त्याच्या मुद्रेवर उमटला. तो फिका पडला, पण लगेच भित्रे, आर्जवी स्मित त्याच्या ओठांवर फिरकले, अन् एका अनिवार आवेगाने त्याने आपले दोन्ही हात कात्यापुढे केले. ते पाहून ती झेपावून त्याच्याकडे धावली. तिने त्याचे ते हात धरले, अन् जवळ जवळ जबरीनेच त्याला अंथरुणावर बसविले. ती त्याच्या शेजारी बसली, अन् त्याचे हात तसेच आपल्या हाती ठेवून तिने ते अतिशय जोराने दाबले. अनेक वेळा दोघांनी बोलण्याचा प्रयत्न केला, पण लगेच थांबून ते पुन्हा विचित्र स्मित करीत न बोलता एकमेकांकडे डोळे लावून पाहत राहिले. अशी दोन मिनिटे गेली.

" मला तू क्षमा केलीस का ?" मीत्या शेवटी कसेबसे बोलला, आणि त्याच वेळी आल्योशाकडे वळून तो म्हणाला, " मी काय विचारतो आहे, ऐकलंस का तू ?" त्याचा चेहेरा आनंदाने नाचत होता.

" त्याच कारणानं तर मी तुझ्यावर प्रेम केलं, तू हृदयाचा उदार आहेस म्हणून !" कात्याच्या तोंडून निघाले. " माझ्या क्षमेचा तुला, किंवा तुझ्या क्षमेचा मला, काही उपयोग नाही; तू मला क्षमा केलीस न केलीस तरी तू माझ्या हृदयात कायमचाच दुखरी जागा होऊन राहणार आहेस, तशीच मी तुझ्या हृदयात– असंच होणार..." ती श्वास घेण्याकरिता थांबली. " मी कशासाठी आले ?" ती घाबरत घाबरत घाईने पुन्हा बोलू लागली. " तुझ्या पायांना मिठी मारण्याकरिता, अस्से तुझे हात दुखतील इतके दाबण्याकरिता– तुला आठवतं मॉस्कोमध्ये मी ते कसे पिळत असे ते ! तुला पुनः सांगण्याकरिता की तू माझा देव आहेस, माझा आनंद आहेस, तुला सांगण्याकरिता की माझं तुझ्यावर वेडंपिसं प्रेम आहे रे," ती वेदनेने विव्हळली, अन् एकदम तिने त्याचे हात हावरेपणाने आपल्या ओठांवर दाबले. तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. आल्योशा अवाक् होऊन गोंधळून जाऊन उभा राहिला; तो जे पाहत होता ते त्याला अगदी अनपेक्षित होते.

" प्रेम संपलं आहे, मीत्या !" कात्या पुन्हा बोलू लागली, " पण भूतकाळ मला इतका प्रिय आहे की तो विसरणं मला दुःख देणारं आहे. असं नेहमीच राहील हे जाण. पण जे खरं घडून आलं असतं ते आता एक मिनिटभर तसंच राहू दे," ती अडखळली, त्याच्या चेहऱ्याकडे पुन्हा आनंदभराने पाहत तिने हसू आणले. " तुझं दुसऱ्या स्त्रीवर प्रेम आहे, माझं दुसऱ्या पुरुषावर, अन् तरी मी तुझ्यावर सदोदित प्रेम करीत राहीन, अन् तू माझ्यावर; तू जाणतोस हे ? ऐकतोस ना तू हे ? माझ्यावर प्रेम कर, आयुष्यभर तू माझ्यावर प्रेम कर !" ती ओरडून म्हणाली, तिच्या आवाजात एक प्रकारे भयदर्शक कंप होता.

" मी तुझ्यावर प्रेम करीन, अन्...माहीत आहे तुला, कात्या, " मीत्त्या शब्दा-शब्दागणिक श्वास घेत बोलू लागला, " माहीत आहे तुला, पाच दिवसांपूर्वी, त्या सायंकाळीसुद्धा, जेव्हा तू मूर्च्छित होऊन खाली पडलीस अन् तुला बाहेर नेलं त्यावेळी...माझं तुझ्यावर प्रेम होतं...आयुष्यभर ! ते तसंच राहील, ते नेहमी तसंच राहील.... "

अशा रीतीने ते एकमेकांशी बेहोषीनेने गुणगुणत राहिले, त्यांचे ते शब्द अर्थशून्य, कदाचित खरेही नसणारे, असे होते, पण त्या वेळी त्यांना ते पूर्ण खरे वाटत होते, आणि ते जे बोलत होते ते ते मनापासून मानीत होते.

" कात्या, " मीत्त्या एकदम म्हणाला, " मी त्याचा खून केला असं खरंच तू मानतेस ? तू यावेळी तसं मानीत नाहीस हे मला माहीत आहे, पण त्यावेळी... जेव्हा तू साक्ष दिलीस त्यावेळी...खात्रीनं, खात्रीनं तू ते मानीत नव्हतीस ! "

" त्यावेळीसुद्धा मी ते मानीत नव्हते. माझा कधीच त्यावर विश्वास नव्हता. मला तुझ्याबद्दल द्वेष वाटत होता, आणि क्षणभर मी स्वतःला ते मानायला लावलं. मी साक्ष देत असताना मी स्वतःला मानायला लावलं अन् मी ते मानलं, पण मी जेव्हा बोलायची थांबले तेव्हा मी ते चटकन सोडून दिलं. त्याबद्दल तुला संशयच नको ! मी इथं आले ती स्वतःला शिक्षा करून घेण्याकरिता हे मी विसरलेच." ती म्हणाली. तिच्या आवाजात एक नवीन सूर उमटला, एका क्षणापूर्वीच्या प्रेमळ स्वरापेक्षा हा अगदी भिन्न होता.

"नाही, तुझा भार मोठा आहे." मीत्त्याच्या तोंडून जणू नकळत बाहेर पडलं.

" मला जाऊ दे," ती हळूच बोलली. " मी पुन्हा येईन. यावेळी हे माझ्या सहनशक्तीच्या पलीकडं आहे."

ती आपल्या जागेवरून उठत होती, इतक्या एकाएकी तिच्या तोंडून मोठ्याने किंचाळी बाहेर पडली अन् ती झोके खात एकदम खाली बसली. ग्रूशिंका एकाएकी पायांचा आवाज न करता खोलीत आली. ती येईल अशी कोणालाही अपेक्षा नव्हती. कात्या झटकन् दरवाज्याकडे निघाली, पण ती ग्रूशिंकापाशी पोचताच एकदम थांबली, चुन्यासारखी पांढरीफेक पडली अन् जणू कानात बोलावे तितक्या हलक्या दुःखपूर्ण स्वरात उद्गारली:

" क्षमा कर मला !"

ग्रूशिंकाने तिच्याकडे टक लावून पाहिले, आणि एक क्षण थांबून, सूडाच्या, विखारी स्वरात उत्तर दिले.

"आपण, तू अन् मी, द्वेषानं भरलेल्या आहोत, पोरी, आपण दोघी द्वेषानं भरलेल्या आहोत ! आपण काय एकमेकीला क्षमा करणार ! त्याला वाचव, म्हणजे मी जन्मभर तुझी पूजा करीन."

"तू तिला क्षमा नाही करणार !" क्षुब्ध होऊन मीत्याने ठपका दिला.

"काळजी करू नकोस, मी तुझ्याकरिता त्याला वाचवीन !" कात्या हलक्या स्वरात भरभर बोलली, अन् ती खोलीच्या बाहेर धावली.

"अन् तिनं आपण होऊन तुझी क्षमायाचना केली असताना तू तिला नकार द्यावास !" मीत्या परत रागाने उद्गारला.

"मीत्या, तिला दोष द्यायचं धाडस करू नकोस; तुला तो अधिकार नाही !" आल्योशा तापून म्हणाला.

"तिचे गर्विष्ठ ओठ बोलले ते, तिचं अंतःकरण नाही बोललं," ग्रूशिंका तिटकाऱ्याच्या स्वरात आपल्या मनातले बोलली. "ती जर तुला वाचवील तर मी तिला सर्वस्वी क्षमा करीन..."

ती बोलायची थांबली, जणू तिने काही तरी आतल्या आत दाबून टाकले असावे. ती अजून स्वतःला सावरू शकली नव्हती. ती आली होती ती, मागाहून दिसून आले त्याप्रमाणे, आकस्मिकपणेच आली होती, आपल्याला तिथे काय आठवले याविषयी कसलासुद्धा संशय तिच्या मनात नव्हता.

"आल्योशा, धाव तिच्या मागं!" मीत्या आपल्या भावाला ओरडून म्हणाला; "तिला म्हणावं... काय ते मला माहीत नाही... अशी तिला इथून जाऊ देऊ नकोस!"

"मी पुन्हा तुझ्याकडं रात्र झाल्यावर येईन." आल्योशा म्हणाला अन् तो कात्याच्या मागे धावत गेला. त्याने तिला इस्पितळाच्या आवाराच्या पलीकडे गाठले. ती झरझर चालली होती, पण आल्योशाने तिला गाठताच ती झटकन त्याला म्हणाली :

"अंहं, त्या स्त्रीपुढं मी स्वतःला शिक्षा करून घेऊ शकत नाही ! मी तिची क्षमा मागितली कारण मला शेवटचा कडू घोट पिईपर्यंत स्वतःला शिक्षा करून घ्यायची इच्छा होती. ती मला क्षमा नाही करायची... त्याकरिता तर मला ती आवडते ! " ती कृत्रिम स्वरात पुढं म्हणाली, आणि तिचे डोळे भयंकर तिटकाऱ्याने चमकले.

"भाऊला या प्रकारची किंचित्सुद्धा कल्पना नव्हती," आल्योशा पुटपुटत बोलला. "ती येणार नाही अशी त्याची खात्री होती..."

"निःसंशय. आपण तो विषय सोडून देऊ," ती बोलणे तोडून म्हणाली. "ऐकून घे. मी तुझ्याबरोबर आता अंत्यक्रियेला येऊ शकणार नाही. मी त्यांच्याकडं फुलं पाठविली आहेत. मला वाटतं अजून त्यांच्याकडं पैसे असावेत. अवश्य वाटलं तर, त्यांना सांग, म्हणावं मी त्यांना कधी अंतर देणार नाही... आता मला सोड, कृपा करून सोड मला. तुला अगोदरच उशीर झालाय — प्रार्थनेच्या घंटा वाजायला लागल्या पाहा... मलाजाऊ दे कृपा करून !"

३

इल्यूशाचे दफन. त्या दगडाजवळचं भाषण

त्याला खरोखरच उशीर झाला होता. त्यांनी त्याची वाट पाहिली होती अन् त्याच्याविना त्यांनी ती सुरेख फुलांनी सजविलेली छोटी शवपेटी चर्चकडे घेऊन जायचे ठरविले होते. ती शवपेटी बापड्या छोट्या इल्यूशाची होती. मीत्याला शिक्षा झाल्यानंतर दोन दिवसांनी तो वारला होता. घराच्या फाटकापाशी मुलांच्या, इल्यूशाच्या शाळासोबत्यांच्या, आरोळ्यांनी त्याचे स्वागत केले. ती सगळी अधीरपणे त्याची वाट पाहत होती आणि शेवटी तो आला त्याचा त्यांना आनंद झाला. ती बारा एक मुले होती, त्यांच्या खांद्यावर त्यांच्या पुस्तकांच्या पिशव्या किंवा पाकिटे होती. " बाबा रडतील, बाबांच्याबरोबर राहा " असं इल्यूशा मरणोन्मुख होऊन पडलेला असताना त्यांना म्हणाला होता, अन् मुलांना ती आठवण होती. कोल्या क्रासोत्किी त्यांच्यात म्होरक्या होता.

" तू आलास, कारमाझफ, मला किती आनंद झाला म्हणून सांगू ! " तो आल्योशापुढे आपला हात करून म्हणाला. " इथं काय भयंकर स्थिती आहे. खरोखर पाहून अंगावर शहारे येतात. स्नेगियेव काही प्यालेला नाही, आम्हाला नक्की माहीत आहे त्याला आज प्यायला काही मिळालेलं नाही, पण तो प्यालेला असल्यासारखा वाटतो...मी एवढा धीराचा, पण हे भयंकर आहे बाबा. कारमाझफ, तुझा मी खोळंबा करीत आहे, पण तू आत जाण्यापूर्वी एक प्रश्न विचारू ? "

" काय तो, कोल्या ? " आल्योशा म्हणाला.

" तुझा भाऊ दोषी आहे की निर्दोषी ? त्यानं तुमच्या वडिलांना मारलं की हुजऱ्यानं ? तू म्हणशील तेच खरं असेल. याचा विचार करता करता मला गेल्या चार रात्री झोप नाही."

" त्या हुजऱ्यानं त्यांना मारलं, माझा भाऊ निर्दोषी आहे," आल्योशाने उत्तर दिले.

" हेच मी म्हटलं होतं." स्मुरोव म्हणाला.

" म्हणजे तो निर्दोषी असूनही बळी जाऊन मरणार तर ! " कोल्या उद्गारला; " जरी त्याचा सर्वनाश झाला असला तरी तो आनंदात आहे ! मला त्याचा हेवा करावासा वाटेल ! "

" म्हणजे काय ? तू कसा काय हेवा करणार ? का म्हणून ? " आल्योशा चकित होऊन म्हणाला.

" असंच सत्याकरिता कधी मला बलिदान करता आलं तर !" कोल्या उत्साहाने बोलला.

"पण असल्या कामाकरिता नाही, अशा नामुष्कीनं अन् भयानक रीतीनं नाही हं!" आल्योशा म्हणाला.

"अर्थातच ... मला साऱ्या मानवजातीकरिता मरावंसं वाटेल, अन् नामुष्कीचं म्हणालास, मला नाही तिची पर्वा— आमची नावं खुशाल नाश पावोत. मला तुझ्या भावाबद्दल आदर वाटतो!"

"अन् मलासुद्धा!" एक दुसरा मुलगा म्हणाला. हा मुलगा म्हणजे ज्याने आपल्याला ट्रॉय कुणी स्थापन केले माहीत आहे असे एकदम अन् अनपेक्षितपणे सांगितले होते, तो होता. यावेळीही तो 'मलासुद्धा' म्हणताना लाजाळूच्या झाडासारखा लाजून कानांपर्यंत लाल लाल झाला.

आल्योशा आत खोलीत गेला. इल्यूशाचे हात घडी केलेले होते अन् त्याचे डोळे निळ्या रंगाच्या दफनवस्त्राखाली झाकलेले होते, त्या वस्त्राला सभोवार पांढरी किनार होती. त्याचा क्षीण चेहरा मुळीच बदलला नव्हता, अन् विलक्षण गोष्ट म्हणजे त्या प्रेताची सडकी दुर्गंधी मुळीच येत नव्हती. त्याच्या चेहऱ्यावरचा भाव गांभीर्याचा अन् जणू विचारात असल्यासारखा होता. त्याचे हात छातीवर आडवे ठेवलेले होते, विशेष सुरेख दिसत होते, जणू संगमरवरी कोरलेली मूर्ती. त्याच्या हातात फुले होती अन् ती शवपेटी आतून अन् बाहेरून फुलांनी मढविलेली होती, ती फुले अगदी सकाळीच लिझ होहलाहोवाने पाठवून दिली होती. पण कातिरीना इवानोवनाकडूनसुद्धा फुले आली होती, अन् आल्योशाने जेव्हा दरवाजा उघडला तेव्हा कॅप्टनच्या कापणाऱ्या हातात एक गुच्छ होता अन् त्यातली फुले तो आपल्या लाडक्या मुलाच्या अंगावर पसरत होता. आल्योशा आत आला तरी त्याने त्याच्याकडे पाहिले नाही, अन् कुणाकडेच पाहण्याची त्याची इच्छा नव्हती, आपल्या वेड्या शोक करणाऱ्या बायकोकडे 'आई'कडेसुद्धा; ती आपल्या अपंग पायांवर उभे राहून आपल्या मृत लेकराला अधिक जवळून पाहण्याची धडपड करीत होती. नीनाला मुलांनी तिच्या खुर्चीत बसवून ती खुर्ची ढकलीत शवपेटीच्या अगदी जवळ आणून ठेवले होते. आपले डोके शवपेटीवर टेकून ती बसली होती अन् तीसुद्धा आतल्या आत रडत होती यात शंका नाही. स्नेगिर्योवचा चेहरा उत्कंठित, तथापि गोंधळल्यासारखा अन् चिडल्यासारखा दिसत होता. त्याच्या हालचाली अन् त्याच्या तोंडातून बाहेर पडणारे शब्द यात काही चमत्कारिकपणा होता. "म्हाताऱ्या, लाडक्या म्हाताऱ्या!" असे तो इल्यूशाकडे बघून मिनिटामिनिटाला म्हणत होता. इल्यूशाला "म्हाताऱ्या" म्हणून लाडिकपणे, तो जिवंत असताना हाक मारण्याची त्याची सवय होती.

"बाबा, मलासुद्धा एक फूल द्या ना; ते पांढरं त्याच्या हातातलं काढून मला द्या," ती वेडी आई हुंदके देत मागू लागली. एक तर इल्यूशाच्या हातातल्या पांढऱ्या छोट्या गुलाब—पुष्पाकडे तिचे लक्ष गेले असावे किंवा त्याच्या हातातले ते

फूल त्याची आठवण म्हणून ठेवण्याची तिची इच्छा असावी. ती बेचैन होऊन चुळबूळ करीत होती, त्या फुलाकरिता तिने आपले हात पसरले होते.

"मी ते कुणालासुद्धा देणार नाही, तुला मी काही देणार नाही," स्नेगिर्योव रूक्षपणे म्हणाला. ती त्याची फुलं आहेत, तुझी नाहीत ! सर्व काही त्याचं आहे, तुझं काही नाही !"

"बाबा, आईला एक फूल द्या ना!" नीना आपले अश्रूंनी भरलेले तोंड वर उचलून म्हणाली.

"मी काहीही कुणाला देणार नाही, अन् तिला तर मुळीच नाही ! तिचं इल्यूशावर प्रेम नव्हतं. तिनं त्याची छोटी तोफ काढून घेतली अन् त्यानं ती तिला दिली," कॅप्टन मोठमोठ्याने हुंदके देऊन रडू लागला, त्याला इल्यूशाने आपली तोफ आईला कशी देऊन टाकली याची आठवण झाली. ती गरीब बापडी, वेडी बाई गुपचूप अश्रूंनी न्हाऊन निघाली, तिने आपले तोंड आपल्या हातांनी झाकून घेतले.

बाप शवपेटीपासून दूर व्हायला तयार नाही अन् ती बाहेर काढायची तर वेळ झाली हे पाहून मुले त्या पेटीभोवती वर्तुळ करून जवळ जवळ उभी राहिली अन् ती उचलू लागली.

मला त्याला कबरस्तानांत नाही पुरायचं," स्नेगिर्योव एकदम किंचाळला; मी त्याला त्या दगडापाशी, आमच्या दगडापाशी पुरणार ! इल्यूशानं तसं मला सांगितलंय. मी त्याला बाहेर नेऊ देणार नाही !"

तो गेले तीन दिवस एकसारखा, आपण त्याला त्या दगडापाशी पुरणार असं म्हणत होता, पण आल्योशा, क्रासोकीन, घरमालकीण, तिची बहीण अन् सर्व मुले यांनी मध्यस्थी केली.

"काय कल्पना तरी, म्हणे त्या अपवित्र दगडापाशी पुरायचं, त्यानं काय गळफास लावून घेतला होता की काय," ती म्हातारी घरमालकीण रागावून म्हणाली, "तिथं कबरस्तानात तिथली जमीन क्रूसानं पवित्र केली आहे. तिथं चांगली त्याच्याकरिता प्रार्थना होईल. तिथं चर्चमध्ये संगीत कानांवर येईल अन् डीकन इतक्या स्पष्ट रीतीनं अन् शब्द न् शब्द वाचतो की दर खेपेला जणू त्याच्या थडग्याजवळच ते वाचल्यासारखं होईल अन् त्याला ते पोहोचेल."

शेवटी कॅप्टनने निराशेने कुठं तुम्हाला न्यायचं तिकडं न्या." अशा अर्थाचा आविर्भाव केला. मुलांनी ती पेटी उचलली, पण जसे ते त्या आईच्या जवळून जाऊ लागले, तसे ते किंचित् थांबले, त्यांनी ती पेटी जरा खाली केली अशाकरिता की ती इल्यूशाला निरोपाचे शब्द बोलेल. पण तो अति–लाडका चेहेरा पाहताच, तिचे सर्वांग थरथर कापू लागले, तिने गेले तीन दिवस तो दुरूनच पाहिला होता; तिचे शुभ्र होत चाललेल्या केसांचे डोके झटके येऊन आचके खाऊ लागले.

" आई, त्याच्यावर क्रूसाचं चिह्न कर, त्याला तुझे आशीर्वाद दे, पापा घे त्याचा," नीनाने ओरडून तिला सांगितले. पण तिचे डोके अजूनही एखाद्या आपो-आप चालणाऱ्या यंत्रासारखे आचके घेत राहिले, अन् दुःखातिरेकाने चेहरा वेडा-वाकडा होऊन ती, एक शब्दही न काढता, आपल्या मुठीने छाती बडवून घेऊ लागली. त्यांनी तिथून ती शवपेटी पुढे नेली. नीनाच्या जवळ त्यांनी ती पेटी आणली तेव्हा तिने आपले ओठ शेवटचे आपल्या भावाच्या ओठांवर टेकले. आल्योशाने घराबाहेर पडताना घरमालकिणीला मागे जे राहिले आहेत त्यांच्याकडे लक्ष दे म्हणून विनंती केली, पण तिने त्याचे बोलणे संपायच्या पूर्वीच त्याला मध्येच थांबविले अन् म्हटले,

" खात्रीनंच, मी त्यांच्यापाशी राहीनच, आम्हीसुद्धा ख्रिश्चनच आहोत." ती म्हातारी असे म्हणत असताना रडत होती.

त्यांना ती पेटी चर्चकडे नेण्याकरिता फार दूर जावे लागले नाही, तीनशे कदमांपेक्षा जास्त अंतर नव्हते. तो शांत नितळ दिवस होता, थोडेसे धुके होते. चर्चच्या घंटा अजूनही वाजत होत्या. स्नेगिर्योव त्या पेटीच्या मागोमाग गडबड करीत अन् विमनस्कपणे धावत होता, त्याच्या अंगावर आखूडसा उन्हाळ्याचा अंगरखा होता, त्याचे डोके उघडे होते, अन् त्याची मऊ, जुनी, रुंद कडा असणारी टोपी त्याच्या हातात होती. तो सचिंत अन् गोंधळलेल्या मनःस्थितीत असावासे वाटत होते. एका वेळी त्याने शवपेटीतल्या डोक्याला आधार देण्याकरिता आपला हात लांब केला, पण त्याने वाहून नेणाऱ्यांना फक्त अडथळा मात्र झाला, दुसऱ्या वेळी तो बाजूबाजूने धावत चालला अन् त्यांच्यात आपल्याला जागा मिळते का पाहू लागला. एक फूल बर्फावर पडले अन् तो जणू ते फूल गेले म्हणजे जगातले सर्व काही गेले, त्यावर जणू सारे काही अवलंबून असल्याप्रमाणे ते उचलण्याकरिता पुढे घुसला.

" आणि पावाचा तुकडा, अरे, आपण तो तुकडा आणायला विसरलोच की !" तो विस्मयाने एकाएकी ओरडला. पण मुलांनी त्याला लगेच आठवण दिली की तुम्ही तो तुकडा आणला आहे अन् तो तुमच्या खिशात आहे. त्याने तो लगेच बाहेर काढला अन् खात्री करून घेतली.

" इल्यूशानं तो घ्यायला मला सांगितलं होतं., इल्यूशानं," त्याने चटकन् आल्योशाला खुलासा केला. " एके दिवशी रात्री मी त्याच्यापाशी बसलो होतो अन् एकदम तो मला म्हणाला, ' बाबा, मला खड्डयात ठेवून तो भरला म्हणजे वर पावाचा चुरा पसरा म्हणजे चिमण्या उडत उडत खाली येतील, मला ते ऐकू येईल अन् मी एकटाच पडलोय असं न वाटता मला आनंद वाटेल."

" फार छान," आल्योशा म्हणाला, " आपण नेहमीच पाव वगैरे घेऊन गेलं पाहिजे."

"रोज, अगदी रोज," कॅप्टन चटकन् म्हणाला, त्या विचाराने त्याला आनंद वाटलेला दिसला.

ते शेवटी चर्चमध्ये पोहोचले अन् त्यांनी ती पेटी मध्यावर ठेवली. मुले तिच्या सभोवार उभी राहिली अन् प्रार्थना चालू असेपर्यंत ती पूज्यभावनेने तशीच उभी राहिली. ते एक जुनाट अन् गरीबसे चर्च होते. पुष्कळशा प्रतिमांना मागे चौकटीच नव्हत्या, पण अशी चर्चे प्रार्थना करायला फार चांगली. प्रार्थना चालू असताना स्नेगिर्योव काहीसा शांत झाला, अर्थात् मधूनमधून त्याच बेभान अन् जणू कसलीही संगती नसलेल्या चिंतेचे उद्रेक त्याच्या तोंडातून बाहेर पडत होते. एके वेळी शव-पेटीपाशी जाऊन त्याने वरचे पांघरूण की फुलांची माळ नीट केली, मेणबत्तीच्या घरातून एकदा मेणबत्ती निसटून पडली तेव्हा ती परत ठेवण्याकरिता तो धावला अन् भीती वाटावी इतका वेळ त्यासाठी धडपडत राहिला, मग ती त्याची ऊर्मी थंड झाली अन् तो शवपेटीपाशी जाऊन शून्य दृष्टीने अस्वस्थपणे अन् गोंधळलेल्या मनःस्थितीत मुकाट्याने उभा राहिला. प्रार्थनेचा 'एपिसल'चा भाग झाल्यानंतर तो एकदम जवळ उभ्या असलेल्या आल्योशाच्या कानाशी कुजबुजला की एपिसल बरोबर वाचलं गेलं नाही, पण त्याला काय म्हणायचंय ते तो बरोबर सांगू शकला नाही. "लाइक दि चेरूबिम्" ही प्रार्थना चालू असताना, तो ती गाण्यात सामील झाला, पण शेवटपर्यंत म्हणत राहिला नाही. खाली गुडघे टेकून, त्याने आपले कपाळ फरशीवर टेकले अन् बराच वेळ तो तशा स्थितीत राहिला.

शेवटी खुद्द दफनाचा विधी आला अन् मेणबत्त्या सर्वांना वाटल्या गेल्या. विमनस्क अवस्थेत असलेला तो बाप उगीचच इकडे तिकडे धांदल करीत राहिला, पण त्या हृदयस्पर्शी अन् परिणामकारक प्रार्थनांनी त्याच्या अंतरात्म्याला हलविले अन् जागे केले. एकाएकी त्याने आपल्या अंगाचे मुटकुळे केले अन् एकामागून एक एकसारखे तो हुंदके देत राहिला, प्रथम त्याने ते दाबण्याचा प्रयत्न केला, पण शेवटी तो मोठमोठ्याने हुंदके देऊ लागला. जेव्हा सगळे मृताचा शेवटचा निरोप घेऊ लागले अन् शवपेटी झाकू लागले, तेव्हा त्याने आपले हात त्या पेटीभोवती टाकले, जणू तो इल्यूशाला झाकू देऊ इच्छीत नव्हता, अन् हावरेपणाने अन् एकसारखा तो आपल्या लाडक्या बाळाच्या ओठांची चुंबने घेऊ लागला. शेवटी त्यांनी कसेबसे त्याला त्या पायरीवरून दूर नेले, पण एकदम त्याने आवेगाने हात पुढे केला अन् त्या शवपेटीवरची काही फुले उचलून घेतली. त्याने त्यांकडे पाहिले अन् एक नवीन कल्पना त्याच्या डोक्यात आलेली दिसली, त्यामुळे क्षणभर तो आपले दुःखही विसरल्यासारखे वाटले. हळूहळू तो विचारमग्न होत गेला आणि शवपेटी वर उचलून खड्ड्यापाशी नेली तेव्हा त्याने काही अडथळा केला नाही. ती कबर चर्चजवळच्या त्या कबरस्तानात बरीच मोलाची होती, कतिरीना इवानोवनाने त्याकरिता पैसे भरले होते. नेहमीचे विधी झाल्यानंतर कबर खोदणाऱ्यांनी पेटी

कबरीत खाली घेतली. स्नेगिर्योव हातात ती फुले घेऊन त्या उघड्या कबरीवरून इतका खाली वाकला की मुलांनी भिऊन त्याचा कोट पकडला अन् त्याला मागे ओढले. काय चालले आहे हे त्याला समजत नसावेसे दिसले. ते जेव्हा ती कबर भरू लागले तेव्हा त्याने पडणाऱ्या मातीकडे एकदम सचिंतपणे बोट दाखविले अन् काही तरी बोलण्याचा तो प्रयत्न करू लागला, पण त्याला काय म्हणायचे आहे ते कुणाला समजेना, अन् तो एकदम थांबला. मग त्याला आठवण झाली की, पाव कुस्करायला पाहिजे, त्यावेळी तो भयंकर उद्दीपित झाला, त्यानं ती पाव एकदम बाहेर काढला अन् त्याचे तुकडे तुकडे करून ते तो त्या कबरीवर भिरकावू लागला.

"या, पक्ष्यांनो, उडत या, चिमण्यांनो, उडत खाली या!" तो चिंतातुरपणे पुटपुटला.

मुलांपैकी एकाला दिसले की हातात फुले घेऊन पावाचे तुकडे करणे त्याला अवघड होते आहे तेव्हा त्याने 'ती फुले थोडा वेळ दुसऱ्या कोणाकडे तरी द्या' म्हणून सांगितले. पण ते करायला तो तयार होईना अन् एकदम आपली फुले हे लोक आपल्या हातातून काढून घेऊनच जाऊ म्हणतात अशी भीती त्याला वाटत असल्यासारखी दिसली. आणि मग त्या कबरीकडे पाहून अन् जणू सर्व काही बरोबर केले गेले आहे. अन् पावाचे तुकडे पसरले आहेत याबद्दल स्वतःचे समाधान करून घेऊन तो जो एकदम मागे वळला तो अगदी शांत मनाने, त्याचे सर्वांना आश्चर्य वाटले; तो घरच्या वाटेला लागला. पण त्याची पावले अधिकाधिक जलद पडू लागली, जवळजवळ तो पळतच चालला. मुले अन् आल्योशा त्याच्याबरोबर राहिले.

"ही फुलं आईकरिता आहेत, ही फुलं आईकरिता आहेत हं! मी आईशी निष्ठुरपणानं वागलो," तो एकदम म्हणू लागला.

कुणीतरी त्याला डोक्यावर टोपी घाला, गारठा आहे असे सांगितले. पण त्याने ती टोपी जणू रागावून बर्फात फेकून दिली अन् एकसारखा "मला नको ती टोपी, मला नको ती टोपी" असे तो म्हणत राहिला. स्मुरोवने ती उचलली अन् ती त्याच्या मागोमाग तो घेऊन चालला. सगळी मुले रडत होती, अन् त्यातसुद्धा कोल्या अन् तो ट्रॉयचा शोध लागलेला मुलगा सर्वांत जास्त रडत होते. जरी स्मुरोव, कॅप्टनची टोपी हातात घेऊन चालला असताना खूपच दुःखाने रडत होता, तरी तेवढ्यातल्या तेवढ्यात धावता धावता वाटेवरच्या बर्फावर पडलेला विटेचा एक तुकडा उचलून जवळून उडणाऱ्या चिमण्यांच्या थव्यावर त्याने भिरकावला. तो नेम त्याचा अर्थात् चुकला अन् तो रडत रडत तसाच धावत राहिला. अर्ध्या वाटेत, स्नेगिर्योव एकदम थांबला, अर्धे एक मिनिट निश्चल उभा राहिला, जणू एकदम काहीतरी त्याच्या डोक्यात आले असावे, आणि एकाएकी चर्चकडे वळून त्या सोडून आलेल्या कबरीकडे धावत सुटला. पण मुलांनी चटकन् त्याला गाठले अन् सर्व बाजूंनी त्याला पकडून धरले. मग तो जणू धक्का मारल्याप्रमाणे

हताश होऊन जमिनीवर पडला, अन् धडपड करीत, हुंदके देत, अन् आक्रोश करीत तो मोठ्याने ओरडू लागला, "इल्यूशा, म्हाताऱ्या, माझ्या लाडक्या म्हाताऱ्या!" आल्योशाने न् कोल्याने त्याचे सांत्वन करून आणि त्याचे मन वळवीत त्याला उठविण्याचा प्रयत्न केला.

"कॅप्टन, रडू नका, शूर माणसानं धैर्य दाखवायला हवं," कोल्या हळू स्वरात बोलला.

"तुम्ही ती फुलं चुरगळून टाकाल," आल्योशा म्हणाला, "अन् आई तर त्यांची वाट पाहते आहे, ती रडत बसली आहे कारण तुम्ही अगोदर तिला मुळीच काही दिली नाहीत. इल्यूशाचा चिमुकला बिछाना अजून तसाच तिथं आहे..."

"होय, होय, आई!" स्नेगिंयोवला एकदम आठवण झाली, "ते तो बिछाना घेऊन जातील, ते तो घेऊन जातील," जणू खरोखरच ते तो घेऊन जातील अशी भीती वाटून तो बोलला. त्याने एकदम उडी टाकली अन् घराकडे धूम ठोकली. पण ते फार दूर नव्हते अन् ते सगळे मिळूनच घरी आले. स्नेगिर्योवने दरवाजा उघडला अन् आपल्या बायकोला हाक मारली, थोड्याच वेळापूर्वी तो तिच्याशी अतिशय निर्दयपणे भांडला होता.

"आई, गरीब अपंग लाडके, इल्यूशानं ही बघ तुला फुलं पाठवली आहेत," तो एक लहानसा पुष्पगुच्छ हाती धरून तिला म्हणाला, तो गुच्छ तो बर्फात धडपड करीत असताना भिजून अन् विस्कटून गेला होता. पण त्याच वेळी त्याची नजर कोपऱ्यातल्या इल्यूशाच्या छोट्याशा बिछान्याजवळ असलेल्या इल्यूशाच्या चिमुकल्या बुटांकडे गेली, ते घरमालकिणीने नीट जोडी लावून ठेवले होते. ते जुने झालेले ठिगळे जोडलेले, मळलेले, कडक बूट पाहताच त्याने आपले हात झाडले अन् त्या बुटांकडे तो धावला, आपल्या गुडघ्यांवर पडून त्याने एक बूट पटकन् वर उचलला आणि आपले ओठ त्यावर टेकून त्याचे तो हावरेपणाने मुके घेऊ लागला, अन् रडत रडत म्हणाला, "इल्यूशा, म्हाताऱ्या, लाडक्या म्हाताऱ्या, तुझे ते चिमुकले पाय कुठं बरं आहेत?"

"त्याला तुम्ही कुठं नेलंत? कुठं नेलंत त्याला तुम्ही?" ती वेडी हृदय विदीर्ण करणारा टाहो फोडून म्हणाली. नीनाही हुंदके देऊन रडू लागली. कोल्या त्या खोलीच्या बाहेर पळाला, मुलेही त्याच्या मागोमाग गेली. आल्योशाही शेवटी बाहेर गेला.

तो कोल्याला म्हणाला, 'रडू द्या त्यांना, यावेळी त्यांचं सांत्वन करण्यात काही अर्थ नाही. एक मिनिटभर आपण थांबू अन् मग परत जाऊ."

"अं हं, त्याचा काही उपयोग नाही, हे भयंकर आहे," कोल्या म्हणाला. "तुला माहीत आहे, कारमाझफ" आपलं बोलणं कुणाला ऐकू जाऊ नये इतका

आपला आवाज खाली आणून तो म्हणाला, " मला फारच दुःख वाटतंय, जर त्याला काही करून परत आणणं शक्य असेल, तर मी त्यासाठी वाटेल ते देईन."

" हं, मी सुद्धा." आल्योशा म्हणाला.

" तुला काय वाटतं, कारमाझफ, आपण रात्री इकडं परत आलो तर बरं होईल का ? तो आता पिऊन येईल, बरं का. "

" कदाचित् येईल. आपण दोघं, तू अन् मी मिळून येऊ या, तेवढे आपण त्याच्या म्हणजे आई अन् नीना यांच्या सोबत एक तास घालवायला पुरे आहोत. आपण सगळेच जण जर गोळा झालो तर पुन्हा आपण त्यांना सर्वच गोष्टींची आठवण आणून देऊ." आल्योशाने सुचविले.

" घरमालकीण त्यांच्यासाठी आता जेवणाची तयारी करीत आहे. अंत्यविधीचं जेवण किंवा असंच काही होणार आहे, धर्मगुरू येत आहेत; आपण तिकडे परत जाऊ या का, कारमाझफ ? "

" अर्थातच, " आल्योशा म्हणाला.

" हे सारं किती विचित्र आहे, कारमाझफ, इतकं दुःख अन् त्यामागून पॅनकेक खाणं, हे सारं आपल्या धर्मात अगदी अनैसर्गिकसं वाटतं. "

" ते सामन माशाची भाजीसुद्धा करणार आहेत. " ट्रॉयसंबंधी ज्याने शोधून काढले तो मुलगा मोठ्याने म्हणाला.

" माझी हात जोडून तुला प्रार्थना आहे, कार्ताशोव, तू वेडगळपणानं बोलून पुनः मधे व्यत्यय आणू नकोस, आम्ही तुझ्याबरोबर बोलतोय काय ? तू आहेस की नाहीस हे आमच्या गावीही नसताना मध्ये उगीच का तोंड घालतोस ? " कोल्या चिडून त्याला तोडून बोलला. तो मुलगा शरमेनं लाल झाला पण उत्तर देण्याचा त्याला धीर झाला नाही.

मधल्या या वेळात ते वाटेनं हळू हळू चालले होते, इतक्यात स्मुरोव एकदम उद्गारला :

" हा पाहा इल्यूशाचा तो दगड, याच्याखाली त्याला ते पुरणार होते. "

ते सगळे त्या मोठ्या दगडापाशी स्तब्ध उभे राहिले. आल्योशाने पाहिले अन् स्नेगिर्योवने त्या दिवशी त्याला जे वर्णन केले ते संपूर्ण चित्र, इल्यूशा रडत अन् आपल्या बापाला मिठी मारून मोठ्याने म्हणाला होता, " बाबा, बाबा, त्यानं तुमचा कसा हो अपमान केला ! " हे एकदम त्याच्या कल्पनेपुढे उभे राहिले. एक आकस्मिक आवेग त्याच्या अंतरात उत्पन्न झालासे दिसले. गंभीर अन् कळकळीच्या मुद्रेने त्याने इल्यूशाच्या शाळासोबत्यांच्या चमकदार, प्रसन्न चेहेऱ्यांकडे एक एक करीत पाहिले, अन् एकदम तो त्यांना म्हणाला.

" मुलांनो, मला, इथे तुम्हाला उद्देशून काही बोलावंसं वाटतं."

मुले त्याला वेढून उभी राहिली अन् एकदम लक्षपूर्वक अन् अपेक्षेने त्यांनी आपली नजर त्याच्याकडे लावली.

" मुलांनो, आपण लवकरच वेगळे होऊ. मी काही काळ माझ्या दोन भावांसोबत राहीन, त्यांतला एक सैबेरियाला चालला आहे, दुसरा मरणाच्या दाराशी पडला आहे. पण मी लवकरच हे शहर कदाचित खूप दीर्घकाळसाठी, सोडून जाईन, म्हणून आपण एकमेकांचा निरोप घेऊ. आपण इथं, इल्यूशाच्या या दगडा-पाशी एक बोली करू या की आम्ही इल्यूशाला अन् एकमेकांना कधी विसरणार नाही. आणि जीवनात पुढं आमच्यावर कोणतेही बरे-वाईट प्रसंग आले, जरी आपण पुढं आणखी वीस वर्षं भेटलो नाही, तरी आपण एकेकाळी ज्याच्या अंगावर दगड फेकले आठवतात तुम्हाला, त्या पुलापाशी? आणि मागाहून ज्याचा आपणा-सर्वांना इतका लळा लागला त्या गरीब मुलाला आपण कसं पुरलं ते आपण सदोदित लक्षात ठेवू. तो सुरेख मुलगा होता, प्रेमळ अंतःकरणाचा, शूर मुलगा होता, त्याला आपल्या वडिलांच्या इज्जतीला धक्का लागल्याबद्दल फार वाईट वाटलं, त्यांचा जो निर्दय अपमान झाला त्याचा त्याला संताप आला अन् त्यांची त्यानं बाजू घेतली. अन् म्हणून, पहिली गोष्ट मुलांनो, आपण जन्मभर त्याचं स्मरण ठेवू. आणि जर आपण अतिशय महत्त्वाच्या कामात गुंतलेले असलो, जरी आपण मानाच्या जागेवर गेलो असलो किंवा अतिशय विपत्तीत पडलेलो असलो तरी– जेव्हा आपण सारे एकत्र होतो, त्या सालस मुलावर प्रेम करीत असतानाच्या काळात एका चांगल्या अन् ममतेच्या भावनेनं आपण एक झालो होतो, त्या भावनेनं आपल्याला आपण आहोत त्यापेक्षा अधिक चांगलं बनवलं होतं, तो इथला काळ किती चांगला होता याची आपण आठवण ठेवू या. माझ्या छोट्या कबुतरांनो,–' कबुतरं ' याच नावानं मला तुम्हांला हाक मारू दे, कारण यावेळी तुमच्या भल्या गोड चेहेऱ्याकडं पाहताना त्या सुंदर निळ्या पक्ष्यांसारखेच अगदी तुम्ही मला दिसता. माझ्या लाडक्या बाळांनो, कदाचित मी तुम्हांला काय सांगतो आहे ते तुम्हाला कळणार नाही, कारण मी पुष्कळ वेळा न समजल्यासारखं बोलतो, परंतु तरीसुद्धा ते तुम्हांला आठवेल अन् कधी तरी माझ्या बोलांशी तुम्ही सहमत व्हाल. भविष्यकाळच्या जीवनाच्या दृष्टीनं एखाद्या चांगल्या आठवणीहून, विशेषतः बाळपणच्या, घराच्या आठवणीहून अधिक उच्च, अधिक मजबूत अन् अधिक हितकर असं दुसरं काही नाही हे तुम्ही ओळखणं अवश्य आहे. लोक तुमच्या शिक्षणासंबंधानं खूप बोलतात, पण एखादी चांगली, पवित्र आठवण, बाळपणापासून जतन करून ठेवलेली, तीच खरोखर सर्वोत्कृष्ट शिक्षण आहे. जर माणूस अशा अनेक आठवणी स्वतः सोबत जीवनात घेऊन जाईल, तर तो आपल्या जीवनाच्या अंतापर्यंत सुरक्षित आहे, आणि जर माणसाच्या अंतःकरणात एकच चांगली आठवण राहिली असली, तर तीसुद्धा केव्हा तरी आपल्याला वाचविण्याचं साधन होऊ शकेल. कदाचित आपण पुढं मागं

दुष्टही बनू, कदाचित दुष्कृत्यापासून दूर होण्याला असमर्थ होऊ, लोकांच्या अश्रूंना अन् आता कोल्या म्हणाला त्याप्रमाणं, 'मला सर्व मानवांकरिता दुःख सहन करावंसं वाटतं' असं म्हणणाऱ्यांना आपण कदाचित हसू आणि अशा लोकांची द्वेषानं कुचेष्टासुद्धा करू. पण आपण कितीही वाईट झालो— ईश्वर करो अन् तसं न होवो! तरीसुद्धा, जेव्हा आपल्याला, आपण इल्यूशाला कसं पुरलं, त्याच्या शेवटच्या दिवसांत आपण त्याच्यावर किती प्रेम केलं, अन् आपण सगळे कसे मित्र बनून या दगडापाशी बोलत बसलो, याची आठवण होईल, तेव्हा आपल्यातला अत्यंत क्रूर अन् अत्यंत कुचेष्टा करणारा जो असेल— जर आपण तसे झालोच तर—तोही, त्या क्षणी आपण प्रेमळ अन् सज्जन झाल्याबद्दल आपल्या अंतरात हसण्याचं धाडस करणार नाही! विशेष म्हणजे, कदाचित, ती एकच आठवण त्याला मोठ्या दुष्कर्मा-पासून दूर ठेवील आणि तो मनाशी विचार करून म्हणेल, 'होय, मी त्यावेळी भला, शूर अन् प्रामाणिक होतो!' तो खुशाल स्वतःशी हसू दे, त्याला महत्त्व नाही, मनुष्य पुष्कळ वेळा चांगुलपणाला अन् प्रेमळपणाला हसतो. तो केवळ अविचारीपणा आहे. पण मुलांनो, मी तुम्हाला खात्री देऊन सांगतो की तो हसत असताना आपल्या अंतःकरणात एकदम म्हणेल, 'छेः छेः, हसणं ही माझी चूक आहे कारण ही गोष्ट काही हसण्यासारखी नाही!"

"असं खरंच होईल, मला तुझं बोलणं समजतं, कारमाझफ!" कोल्या चमकणाऱ्या डोळ्यांनी म्हणाला.

मुले हेलावून गेली होती आणि त्यांनासुद्धा काही बोलावेसे वाटत होते, पण त्यांनी स्वतःला आवरले, अन् ती बोलणाऱ्याकडे एकाग्रतेने अन् भावनावश होऊन पाहू लागली.

"मी हे म्हणालो ते आपण समजा वाईट झालो तर, हे लक्षात घेऊन," आल्योशा पुढे बोलू लागला, "पण आपण वाईट व्हायचं काहीच कारण नाही, आहे का मुलांनो? प्रथम अन् सर्वात अगोदर आपण प्रेमळ होऊ या नि मग प्रामाणिक अन् मग आपण कधीही एकमेकांना विसरू या नको! हे मी पुन्हा सांगत आहे. मी माझ्याकडून तुम्हाला वचन देतो की, मी तुम्हा एकालाही विसरणार नाही. माझ्या-कडं बघणारा प्रत्येक चेहरा तीस वर्षे झाली तरी मी आठवणीत ठेवीन. आताच कोल्या कार्ताशोवला म्हणाला की, तू जगात आहेस की नाहीस हे जाणण्याची आम्हाला पर्वा नाही. पण कार्ताशोव जगात आहे, ट्रॉय शहर स्थापन करणाऱ्यांचा शोध लावताना जसा तो लाजला तसा तो यावेळी लाजत नाही, तर माझ्याकडं आपल्या आनंदी, प्रेमळ, गोड बारीक बारीक डोळ्यांनी पाहत आहे. हे मी विसरू शकत नाही. मुलांनो, माझ्या लाडक्या मुलांनो, आपण सगळे इल्यूशासारखे उदार अन् शूर, कोल्यासारखे हुशार, शूर अन् उदार (अर्थात तो मोठा होत जाईल तसा याहून अधिक हुशार होईल), अन् कार्ताशोवसारखे नम्र, हुशार अन् गोड

होऊ या. पण त्या दोघांचीच का मी नावं घ्यावीत? मुलांनो, तुम्ही सारेच मला प्रिय आहात, या दिवसापासून पुढं सदोदित तुम्हा सर्वांचं या माझ्या हृदयात स्थान आहे, अन् तुम्ही माझ्याकरिता तुमच्या हृदयात स्थान ठेवा अशी मी तुम्हाला विनंती करतो! बरं, जी प्रेमाची अन भलेपणाची भावना आपण जन्मभर स्मरणात ठेवणार आहोत अन् ठेवू इच्छीत आहोत ती भावना आपल्यात निर्माण करून कुणी बरं आपल्याला एकत्र आणलं? दुसरं कोण, इल्यूशाच; तो आपला सज्जन मुलगा, लाडका मुलगा, सदासर्वकाळ आपल्याला बहुमोल वाटणारा आपला इल्यूशा! त्याला आपण कधीही विसरू या नको. त्याचं स्मरण आजपासून पुढं चिरकाल आपल्या अंतःकरणात राहो!"

"होय, होय, चिरकाल, चिरकाल राहो!" मुले आपल्या दुमदुमणाऱ्या आवाजात, मार्दवयुक्त मुद्रेने ओरडली.

"आपण त्याच्या चेहेऱ्याची, त्याच्या कपड्यांची अन् त्याच्या त्या इवल्या-इवल्या बुटांची आठवण ठेवू या, त्याच्या दुर्दैवी, नीतीला चुकलेल्या वडिलांची अन् साऱ्या शाळेला तोंड देऊन तो एकटा त्यांची बाजू घेऊन कसा उभा राहिला त्याची आपण आठवण ठेवू या."

"आम्ही अवश्य आठवण ठेवू, आम्ही जरूर आठवण ठेवू." मुले ओरडली. "तो शूर होता, तो सज्जन होता."

"आहा! किती माझं त्याच्यावर प्रेम होतं!" कोल्या उद्गारला.

"अहाहा, बाळांनो, अहाहा, प्रिय दोस्तांनो, जीवनाची भीती धरू नका! जेव्हा आपण काही चांगलं अन् न्यायाचं कृत्य करतो तेव्हा जीवन किती चांगलं असतं बरं!"

"होय, होय," मुलांनी उत्साहाने दुजोरा दिला.

"कारमाझफ, तुझ्यावर आमचं प्रेम आहे!" एक आवाज, बहुधा कार्ताशोवचाच, उत्स्फूर्तपणे म्हणाला.

"तुझ्यावर माझं प्रेम आहे, तुझ्यावर आमचं प्रेम आहे!" सर्वांनी तोच सूर उचलला. त्यांच्यापैकी अनेकांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

"कारमाझफचा जयजयकार!" कोल्या भावनोत्कटतेने ओरडला.

"अन् त्या मृत मुलाची स्मृती चिरंजीव राहो!" आल्योशा भावनेने बोलला.

"चिरंजीव राहो!" मुलांनी पुन्हा री ओढली.

"कारमाझफ," कोल्या म्हणाला, "आम्हाला धर्मात जे शिकवलंय की आपण मेल्यानंतर पुन्हा वर उठणार आहोत अन् जिवंत होऊन पुन्हा एकमेकांना, सर्वांना, इल्यूशालासुद्धा, भेटणार आहोत, ते खरं असेल का?"

"खात्रीनं आपण पुनः वर उठू, खात्रीनं आपण एकमेकांना भेटू अन्

आनंदानं न् उल्हासानं जे काय घडलं ते सारं एकमेकांना सांगू!" आल्योशाने अर्धवट हसून, अर्धवट उत्साहाने उत्तर दिले.

"अहाहा, काय गंमत येईल नाही!" कोल्या उद्गारला.

"ठीक, आता आपण बोलणं पुरं करू या अन् त्याच्या अंत्यक्रियेच्या भोजनाला जाऊ या. आपण पॅनकेक खाऊ याबद्दल वाईट वाटून घेऊन नका— ती फार जुनी रूढी आहे आणि त्यात काही चांगलं आहे!" आल्योशा हसत म्हणाला. "ठीक, चला, जाऊ या! अन् आता आपण हातात हात घालून जाऊ."

"अन् नेहमीच असे, जन्मभर हातात हात घालू. कारमाझफचा जयजयकार!" कोल्या पुन्हा एकदा उत्कट भावनेने ओरडला अन् पुन्हा एकदा मुलांनी ती घोषणा केली.

"कारमाझफचा जयजयकार!"

समाप्त

परिशिष्ट १ : कादंबरीची पार्श्वभूमी

' **ब्रात्या कारमाझोवी** ' (Bratya Karamazovy) म्हणजे ' कारमाझफ बंधू ' ही दस्तयेवस्कीची अगदी शेवटची कादंबरी आणि अनेकांच्या मते त्याची सर्वश्रेष्ठ कादंबरी. १८७८ च्या जूनमध्ये दस्तयेवस्कीने ह्या कादंबरीच्या लेखनास प्रारंभ केला आणि १८८० च्या ऑक्टोबरमध्ये, म्हणजे त्याच्या मृत्यूआधी केवळ तीनच महिने लिखाण पूर्ण केले. या वेळी दस्तयेवस्कीची शरीरप्रकृती खालावलेली होती. हे लेखन आपण जर झपाट्याने पुरे केले नाही तर ते कधीच पुरे होणार नाही अशी भीती त्याला वाटत होती.

एकोणिसाव्या शतकात युरोपात व रशियात कादंबऱ्या मासिकातून क्रमशः प्रसिद्ध होत आणि मग पुस्तकरूपाने बाहेर पडत. कारमाझफ बंधू ही ' **रुस्कयी वेस्तनिक** ' म्हणजे ' रशियन-दूत ' या नियतकालिकात क्रमशः प्रसिद्ध झाली. अशा तऱ्हेने प्रसिद्ध होत असतानाच तिचे अभूतपूर्व स्वागत चहूबाजूंच्या रशियन वाचकांनी केले. आकाराने टॉल्सटॉयच्या ' वॉर ॲण्ड पीस ' एवढी मोठी होईल अशी जबरदस्त कादंबरी लिहून आपल्या साहित्यिक प्रवासाची अंतिम उंची गाठायची हा विचार दस्तयेवस्कीच्या मनात १८६८ पासून घोळत होता, तो या कादंबरीच्या रूपाने साकार झाला. अर्थात मूळ आराखडा आणि प्रत्यक्षातील कादंबरीलेखन यांच्यात काळ उलटत गेला तसा फरक पडत गेला. मुळात ही ' नास्तिक ' नावाची कादंबरी होणार होती. ' महान दुरात्मा ' असेही नाव काही वेळा दस्तयेवस्की सांगत असे. वेगवेगळ्या पाच प्रभावी कथा या कादंबरीत एकत्र गुंफल्या जाणार होत्या. उपलब्ध स्वरुपात तीन वेगवेगळ्या कथा एकत्र गुंफलेल्या दिसतात. पहिली कथा कारमाझफ कुटुंबाची, दुसरी कथा फादर झसीमफ यांच्या जीवनाची आणि तिसरी कथा क्रासोतकीन व इल्यूशा यांच्या मैत्रीची.

प्रस्तुत कादंबरीचे मूळ कथाबीज दस्तयेवस्कीच्या मनात तो सैबेरियातील ओम्स्क येथील तुरुंगवासात असतानाच पडले. ' दि हाऊस ऑफ दि डेड ' हे कादंबरीवजा आत्मकथन दस्तयेवस्कीने १८६१ साली लिहिले. त्यात इल्यिन्स्की नावाच्या तरुणाची व्यक्तीरेखा त्याने रेखाटली होती त्यातच या कादंबरीचे मूळ आहे.

प्रत्यक्ष आत्मकथन क्रमशः प्रसिद्ध होतानाच कालांतराने वडिलांच्या खुनाचा आरोप असलेला इल्यिन्स्की प्रत्यक्षात निर्दोष असल्याचे सिद्ध झाले परंतु बिचाऱ्या इल्यिन्स्कीचे तारुण्य आणि प्रतिष्ठा ही मात्र तुरूंगात चिरडली गेली. ' दि हाऊस ऑफ दि डेड ' च्या पुढील लेखांच्या वेळी दस्तयेवस्कीने ही चूक नमूद केली आणि न्यायालय कशी दारुण घोडचूक करते आणि एखादे जीवन उद्ध्वस्त करते ह्याविषयी

हळहळ व्यक्त केली. परंतु या घटनेने दस्तयेवस्कीच्या मनावर अतिशय खोल परिणाम झाला आणि त्याची परिणती ‘ कारमाझफ बंधू ’ च्या लेखनात झाली.

मीत्या कारमाझफ ही प्रमुख व्यक्तीरेखा ‘ इल्यिन्स्की ’ वरून घेतलेली आहे. इल्यिन्स्की हा खानदान कुटुंबातील उधळ्या व बेफाम असा तरुण होता, पण तो मनाने निष्कपटी व भावनाप्रधान होता. त्याचे वडील साठीच्या सुमाराचे होते. आपल्या कर्जबाजारी मुलाला वळणावर आणण्याचा बिचाऱ्या वडिलांनी बराच प्रयत्न केला, परंतु त्याला यश आले नाही. इल्यिन्स्कीचे वडील सधन शेतकरी होते आणि त्यांचा खून झाला. खुनाचा आळ इल्यिन्स्कीवर आला आणि त्याला खुनी ठरविण्यात येऊन त्याची रवानगी सैबेरियातील ज्या तुरुंगात दस्तयेवस्की होता, तेथे करण्यात आली. इल्यिन्स्की हा मीत्याप्रमाणेच सैन्यातून हकालपट्टी झालेला तरुण कॅप्टन होता.

इल्यिन्स्कीने स्वतःच पोलिसात खुनाबाबतची वर्दी दिलेली होती, आणि नंतर तो निघून गेला होता आणि महिनाभर मौजमजेत जीवन जगत होता. पोलिसांनी मृतदेह शोध घेतल्यानंतर तो उघड्या सांडपाण्याच्या नाल्यातच झांकलेला सापडला. मृताचे मस्तक धडापासून वेगळे करण्यात आले होते आणि धडाजवळच ठेवलेले होते. मौज म्हणजे शिराखाली उशीदेखील ठेवण्यात आली होती. तपासणीत इल्यिन्स्कीने आपण खून केला नाही हे वारंवार सांगितले तरी पुराव्यांच्या आधारे तो खुनी ठरला आणि त्याला वीस वर्षांची सजा भोगावी लागली.

दस्तयेवस्की आणि इल्यिन्स्की तुरुंगात एकत्र होते आणि दोघेही तरुण असल्याने त्यांच्यात मैत्री निर्माण झाली. इतर कैदी इल्यिन्स्कीकडे अतिशय तिरस्काराने बघत असत. इल्यिन्स्की मात्र चांगल्या मनःस्थितीत होता आणि हसून खेळून राहाण्याचा सदोदित प्रयत्न करीत असे. ‘ माझे वडील शेवटपर्यंत धडधाकट होते ’ असे तो सांगे. परंतु इतर कैद्यांनी एका रात्री इल्यिन्स्कीला “ पकडा ! पकडा त्याला ! उडवा त्याचे डोके, डोके ! ” असे झोपेत ओरडताना ऐकले असेही दस्तयेवस्कीला कळले. प्रत्यक्षात मात्र दस्तयेवस्कीला इल्यिन्स्की भाबडा आणि मोकळ्या स्वभावाचा वाटला. इल्यिन्स्की आणि दस्तयेवस्की ‘ यांच्या संभाषणांचा तपशील उपलब्ध नाही हे स्वाभाविक आहे. परंतु इल्यिन्स्की ही व्यक्ती नीट समजून घेण्याचा दस्तयेवस्कीचा प्रयत्न निश्चितच असणार.

हातून प्रत्यक्षात खून घडला नसताही त्याची सजा मात्र भोगावी लागते यामुळे मीत्या कारमाझफ आगळ्या तऱ्हेचा शोकात्मक नायक ठरतो आणि वाचकांची सहानुभूती जिंकू शकतो. ‘ क्राईम ॲण्ड पनिशमेण्ट ’ मधील नायक रास्कोलनिकफ हाही तरुण खुनीच आहे. परंतु तेथे तो प्रत्यक्ष खुनी असल्यामुळे वाचकांची उत्स्फूर्त सहानुभूती त्याला मिळण्यात अडचण येऊ शकते हा अनुभव दस्तयेवस्कीला होता. ही अडचण स्मिर्द्याखफचे पात्र निर्माण करून दस्तयेवस्कीने कौशल्याने दूर केली आहे.

दस्तयेवस्कीचा पत्रव्यवहार आणि कच्चे आराखडे यांचा आधार घेऊन काही रशियन साहित्यसंशोधक असे मानण्याकडे झुकतात की प्रस्तुत कादंबरीचा तिसरा खण्ड लिहिला जाणार होता आणि आहे या स्वरूपात कादंबरी अपूर्ण असावी. आल्योशा पुढे ग्रूशिंकाच्या प्रेमात पडतो आणि त्यातून त्याचे अधःपतन होते. अनेक दुष्कृत्ये त्याच्या हातून घडतात. परंतु अखेरीस तो गोरगरिबांच्या भल्यासाठी होणाऱ्या क्रांतीकारी चळवळीत भाग घेतो आणि त्याला फाशीची शिक्षा होते. हा कथाभाग संकल्पित तिसऱ्या खंडात येणार होता. कच्च्या नोट्स व आराखडे यांच्या आधारे मांडली जाणारी ही कल्पना कम्युनिस्ट विचारसरणीच्या रशियनांना आकर्षक वाटावी अशी आहे. परंतु आहे या स्वरूपात 'कारमाझफ बंधू' ही कादंबरी अपूर्ण वाटत नाही. तिचा शेवट इतक्या उंचीवर जातो आणि इतक्या समर्पक तऱ्हेने होतो की यापुढे काही असेल असे वाचकाला तेवढ्यापुरते वाटत नाही. कादंबरी फ्योदर पावलोविचच्या मुलांच्या ओळखीने सुरू होते आणि आल्योशा मुलांना 'पुनरुज्जीवन' ही शक्य गोष्ट असल्याची ग्वाही देतो तिथे संपते. एका अर्थी यात संगती आहे.

प्रस्तावनेत दस्तयेवस्कीने दोन खण्डांचा, दोन कादंबऱ्यांचा उल्लेख केला आहे. तो पाहाता आहे या ठिकाणी कादंबरी संपली आहे हे मानणे उचित होय.

मात्र आहे या स्वरूपात कदंबरीचा नायक आल्योशा आहे हे स्वीकारता येत नाही. प्रस्तावना वाचली नाही अशा वाचकाला विचारल्यास तो हेच उत्तर देतो की कादंबरीचा नायक मीत्या कारमाझफ आहे. दुसरा खण्ड तर सारा त्याच्या भोवतीच फिरत राहातो. आल्योशा जर कादंबरीचा नायक असेल तर मग तिसऱ्या खण्डाची शक्यता धुडकावून लावता येत नाही. आणि आहे या स्थितीत 'कारमाझफ बंधू' अपूर्ण आहे. परंतु जर तिसरा खण्ड लिहिला गेला असता तर ती आणखी आशय संपन्न झाली असती आणि वेगळ्या तऱ्हेने परिपूर्ण झाली असती अशी कल्पना आपल्या करावी लागते. आहे ही कादंबरी अपूर्ण आहे या अ–यथार्थ वाटणाऱ्या कल्पनेपेक्षा ही दुसरी कल्पना आपल्या मनाला जास्त समाधानकारक वाटू शकते.

'कारमाझक बंधू' या कादंबरीचे लिखाण चालू असताना दस्तयेवस्कीच्या मनात शेक्सपीयरचे 'हॅम्लेट' आणि फ्रीडरीश शिलरचे 'डी रॉयबर' (रॉबर्स) ही दोन नाटके संदर्भासाठी म्हणून असावीत असे स्पष्ट दिसते. खुद्द कादंबरीत त्यांचे उल्लेख आलेले आहेत. 'रॉबर्स' मध्ये दोन भाऊ भांडतात आणि त्याचे पर्यवसान त्यांच्या पित्याच्या वधात होते अशी कथा आहे. कादंबरी लेखनाच्या सुरुवातीसच या नाटकाचा प्रयोग दस्तयेवस्कीने पाहिला होता, आणि त्याला तो अतिशय प्रभावी वाटला होता. 'हॅम्लेट' मध्ये वडिलांचा खून होतो परंतु तो मुलगा करीत नाही तर त्याचा काका करतो आणि तो राजपद आणि भावाच्याच पत्नीविषयी आसक्ती मुळे करतो. सफोक्लीझ या प्राचीन ग्रीक नाटककाराचे 'ईडिपस' हे नाटक मात्र

दस्तयेवस्कीच्या मनात एक संदर्भ म्हणून दिसत नाही. प्रत्यक्ष कादंबरीत कोठे त्याचा उल्लेख येत नाही.

१९१२ नंतर 'ब्रदर्स कारमाझफ' प्रथमच इंग्रजी अनुवादरूपाने अवतरली आणि पुढे मराठी वाचकांनाही उपलब्ध झाली. कॉन्स्टन्स गार्नेट बाईचा सुप्रसिद्ध अनुवाद जिवंत आणि रसाळ आहे. प्रस्तुत मराठी अनुवाद त्यावरूनच केलेला आहे. ज्यूलिअस काटझर (प्रोग्रेस पब्लिशर्स १९८०, मॉस्को) आणि डेव्हिड मॅगरशॅक (पेन्ग्विन, १९५८) यांनी केलेले इंग्रजी अनुवाद उत्तम असून तेही वाचकांना सध्या उपलब्ध असतात.

परिशिष्ट २ : दस्तयेवस्कीचा जीवनपट

पर्व पहिले

१८२१ ३ ऑक्टो. फ्योदर मिखाईलोविच दस्तयेवस्कीचा मॉस्को येथे जन्म. वडील, गरीबांसाठी असलेल्या हॉस्पिटलमध्ये डॉक्टर.

१८३७ आईचा मार्या फ्योदरोवनाचा मृत्यू.

१८३८ पीटर्सबर्ग येथील सैनिकी इंजिनिअरिंग विद्यालयात प्रवेश.

१८३९ दारोव्ये येथील इस्टेटीवर वडिलांचा शेतकऱ्यांकडून खून.

१८४३ युद्ध खात्यातील इंजिनिअरिंग विभागात लेफ्टनंट म्हणून कामास सुरुवात.

१८४४ नोकरीचा राजीनामा. बाल्झाकच्या 'यूजेनी ग्रांदे' या कादंबरीचा रशियन अनुवाद क्रमशः प्रकाशित.

१८४५ 'पूअर पीपल' (Bednye lyudi) कादंबरीचे हस्तलिखित विख्यात समीक्षक बेलिन्स्की पाहातो व खूप कौतुक करतो.

१८४६ जाने. १५ पीटर्सबर्गमधील Peterbursky sbornik या नियतकालिकात पूअर पीपल प्रकाशित. दोन आठवड्यातच 'दि डबल' (Dvojnik) ही कादंबरी Otechestvennye zapiski या नियतकालिकात प्रकाशित.

१८४७ दि लॅण्डलेडी (Khozayka), दि फेंट हार्ट (Slaboe serdtse), ॲन ऑनेस्ट थीफ (Chestnyi Vor) आणि 'व्हाईट नाईटस' (Belye Nochi) या चार कथा Otechest मध्ये प्रकाशित.

१८४९ एप्रिल २३. पेत्राशेवस्की कटात सामील म्हणून अटक.
डिसेंबर २२. वधासाठी तयारी पण ऐन क्षणी सुटका. 'पीटर आणि पॉल' किल्ल्यात कारावास. नेतोचका–नेझवानोवा Netochka Nezvanova ही कादंबरी Otechest. नियतकालिकात अपूर्ण राहाते.

पर्व दुसरे

१८४९ डिसेंबर २४. बेड्या घालून सैबेरियाकडे घोडागाडीतून रवानगी.

१८५० जानेवारी २३. ओम्स्क येथील तुरुंगात सक्तमजुरीसाठी कैदी म्हणून दाखल.

१८५४ फेब्रुवारी. कारागृहातून सुटका व मंगोलिअन सरहद्दीजवळील सेमी-पालातिन्स्क गावी सक्तीच्या लष्करी सेवेत साधा सैनिक म्हणून दाखल.

१८५६ हवालदार – एनसाईन – म्हणून बढती.

१८५७ कारागृहात लिहिलेली **दि लिट्‌ल हिरो** (Malenkyi geroy) ही Otechest. नियतकालिकात निनावी प्रकाशित.
फेब्रुवारी २. मार्या दमीत्र्येवना इझायेवा या विधवेशी कुझनेत्स्क येथे विवाह. नोबलमनचा दर्जा परत मिळतो.

१८५९ सैन्यातून निवृत्त होण्याची परवानगी. रशियाला परततो. वाटेत त्वेर येथे मुक्काम.
डिसेंबर १६ ला पीटर्सबर्ग येथे परततो.

पर्व तिसरे

१८५९ **अंकल्स ड्रीम** (Dyadushkin Son) ही कादंबरी Russkoe slovo या नियतकालिकात प्रकाशित. दि फ्रेंड ऑफ दि फॅमिली म्हणजेच **दि व्हिलेज ऑफ स्तेपानचिकोवो** (Selo stepanchikovo i ego obitateli) ही कादंबरी otechest. या नियतकालिकात प्रसिद्ध.

१८६० **दि हाऊस ऑफ दि डेड** (Zapiski iz mertvogo doma) ची प्रस्तावना व पहिले प्रकरण हे Russkoe slovo मध्ये येते. दस्तयेवस्कीचे आजवरचे लिखाण दोन खंडात प्रकाशित.

१८६१ दस्तयेवस्कीचा वडिलभाऊ मिखाईल 'काळ' (Vremya) नावाचे मासिक काढतो. **दि इन्सलटेड ॲण्ड दि इंज्युअर्ड** (Unizhennyei oskorblennye) ही कादंबरी आणि 'दि हाऊस ऑफ दि डेड' संपूर्ण या मासिकातून प्रसिद्ध होतात.

१८६२ 'दि हाऊस ऑफ दि डेड' पुस्तक स्वरूपात येते. जून जुलै ऑगस्ट युरोप दौरा. पॅरिस, लंडन, जिनेवाला जातो. **ॲन अनप्लेझंट इव्हेंट** (Skverny anekdot) ही कथा टाइममध्ये प्रकाशित.

१८६३ **विंटर नोट्स ऑन समर इंप्रेशन्स** (Zimnyia zametky o letnikh vpechatlenyakh) ही प्रवास टिपणे व्रेम्या (टाईम)मध्ये प्रकाशित. व्रेम्या (टाईम)वर बंदी आणली जाते. ऑगस्ट—सप्टेंबर ऑक्टोबर तीन महिन्यांचा दुसरा युरोप दौरा. सोबतीस आपोलिनार्या ही मैत्रीण. तिच्याशी प्रेम प्रकरण. जुगारी होतो.

१८६४ इपोका (Epokha) नियतकालिकाचा संपादक होतो. **नोट्स फ्रॉम अंडरग्राऊंड** (Zapiski iz podpolya) त्यात प्रकाशित.
एप्रिल १५ : मॉस्कोत पहिल्या पत्नीचा मृत्यू.
जुलै १० : भाऊ मिखाईल याचा मृत्यू.

१८६५ इपोका बंद पडते. जुलै–ऑक्टोबर तिसऱ्यांदा युरोपात जातो. विझबाडेनला पोलिना सुस्लोवाला भेटतो. आजवरच्या लिखाणाची द्विखंडी आवृत्ती. पोलिना प्रकरण असफल.

पर्व चौथे

१८६६ क्राईम अॅण्ड पनिशमेन्ट (Prestuplenie in akazanie) क्रमशः द रशियन हेरल्ड Russkyi vestnik या नियतकालिकात प्रसिद्ध.
ऑक्टोबर : अॅना ग्रिगोऱ्येवना स्नितकीना या तरुण स्टेनोकडून दि गॅंबलर (Igrok) लिहवून घेतो. संपूर्ण लिखाणाच्या तिसऱ्या खंडात ती प्रकाशित.

१८६७ फेब्रुवारी १५ अॅना स्नितकीनाशी लग्न. क्राईम अॅण्ड पनिशमेन्ट पुस्तकरूपाने प्रसिद्ध.
एप्रिल १४ : नवदंपत्ती ड्रस्डेनला जातात.
जुलै १० : बाडेन-बाडेन येथे तुर्गेन्येफशी भेट.
ऑगस्ट : जिनेवाला येतो.

१८६८ दि इडियट (Idiot) क्रमशः रशियन हेराल्डमध्ये येते. सोफिया ही मुलगी तीन महिन्याची वारते. मिलान, फ्लोरेन्स येथें जातो.

१८६९ व्हिएना, प्राग, ड्रेस्डेन येथे प्रवास. ल्युबफ या मुलीचा जन्म.

१८७० दि इटर्नल हजबंड (Vechnyi muzh) ही कादंबरी डॉन (Zarya) नियतकालिकात प्रकाशित.

१८७१ पीटर्सबर्गला परततात. फयोदर या मुलाचा जन्म.

१८७२ रशियन हेरल्डमध्ये दि पझेस्ड म्हणजेच-डेव्हिल्स (Besy) क्रमशः प्रसिद्ध.

१८७३-४ दि सिटिझन (Grazhdanin) या सनातनी नियतकालिकाचा संपादक.

१८७३ दि डेव्हिल्स पुस्तकरूपाने प्रसिद्ध.

१८७४ दि इडियट पुस्तकरूपात. मार्च २६ सेन्सॉर बोर्डाचे नियम मोडल्याबद्दल अटक व सुटका. एमूस. जिनेव्हा सफर.

१८७५ ए रॉ यूथ (Podrostok) ही कादंबरी otechest मध्ये क्रमशः प्रसिद्ध. बर्लिन, एमूस सफर. अलेक्सी या मुलाचा जन्म.

१८७६ ए रॉ यूथ पुस्तक रूपात. दि डायरी ऑफ ए रायटर Dnevnik pisatolya चे अकरा अंक. नोव्हेंबरच्या अंकात ए मीक वन (Krotkaya) ही सुप्रसिद्ध कथा.

१८७७ दि डायरी या मासिकाचे आणखी, नऊ अंक. एप्रिलच्या अंकात दि ड्रीम ऑफ ए रिडिक्यूलस मॅन ही कथा (Son smeshnogo oholovoka).

१८७८ अलेक्सीचा मृत्यू–पुत्र शोक. व्लादिमीर सोलोव्योवबरोबर ओप्तिना मठाला भेट.

१८७९ दि ब्रदर्स कारमाझफ (Bratya Karamazovy) क्रमशः रशियन हेरल्डमध्येचौथ्या खंडातील तिसऱ्या भागापर्यंत प्रसिद्ध. एमूसला भेट.

१८८० 'दि ब्रदर्स'चा उर्वरित भाग प्रसिद्ध व ब्रदर्स पुस्तकरूपात.
जून ८ : मॉस्कोत पुष्कीनच्या पुतळ्याच्या अनावरण प्रसंगीचे विख्यात भाषण.

१८८१ जानेवारी २८ : फुफ्फुसाच्या विकाराने मृत्यू.
फेब्रुवारी १ : आलेक्झांदर नेव्स्की कबरस्तानात दफन.

१९१८ जून ९ : दुसरी पत्नी ॲना स्नितकीना हिचे ७२ व्या वर्षी निधन.

× × ×

या कादंबरीचे अनुवादक **भाऊ धर्माधिकारी** हे मूळचे कोल्हापूरचे. त्यांच्या आयुष्याचा मोठा भाग भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात खर्च झाला. त्यांच्या साहित्यकार्याला सुरुवात जरी त्या स्वातंत्र्यकालात विविध कामांच्या उलाढालीत, तुरुंगातील वास्तव्यात वगैरे झाली असली तरी केवळ साहित्याच्या प्रांगणात त्यांची हालचाल गेल्या २५ वर्षातील आहे. या स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी गांधीजींचे विचार निरनिराळ्या पुस्तकांच्या रूपाने मराठीत आणले, काही गुजराती साहित्यातील ग्रंथरत्नांचा मराठी वाचकांना अनुवादाच्या रूपाने परिचय करून दिला, 'बाराब्बास'सारख्या नोबेल पारितोषिक विजेत्या कादंबरीचे भाषांतर मराठीत केले, इंग्रजीत प्रसिद्ध झालेल्या गांधीजींच्या समग्र वाङ्मयखंडांपैकी ८ खंडांची भाषांतरे मराठीत केली, गुजराती-मराठी शब्दकोश, मराठी गुजराती शब्दकोश गुजराती भाषा प्रवेश, हिंदी–मराठी–इंग्रजी तसाच मराठी–हिंदी–इंग्रजी असे दोन त्रिभाषाकोश भारत सरकारकरिता तयार करून दिले. भाषांतरकर्ता व स्वतंत्र लेखक म्हणून त्याचप्रमाणे गांधी विचाराचा एक कार्यकर्ता म्हणून ते महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. वयाची ७८ वर्षे त्यांनी नुकतीच पूर्ण केली आहेत.

× × ×

मराठीतील दस्तयेवस्की

शापित कोशाकीण : अशोक डांगे
(कॉन्टिनेन्टल प्रकाशन)

जुगारी : जयंत दीक्षित
(कॉन्टिनेन्टल प्रकाशन)

देव जागा आहे : स. अ. शुक्ल
क्राईम ॲण्ड पनिशमेंटचा अतिसंक्षिप्त अनुवाद
(महाराष्ट्र ग्रंथ भांडार)

ईडियट : र. ग. विद्वांस
(गजानन प्रकाशन)

कारमाझफ बंधू : भाऊ धर्माधिकारी
खंड १ व २
(कॉन्टिनेन्टल प्रकाशन)

दस्तयेवस्की : समीक्षा लेखसंग्रह
अनिरुद्ध कुलकर्णी
(कॉन्टिनेन्टल प्रकाशन)

आगामी

काकांचे स्वप्न : अविनाश बिनीवाले
(कॉन्टिनेन्टल प्रकाशन)

कारमाझफ बंधू (२)

'कारमाझफ बंधू' या कादंबरीच्या पहिल्या खंडात कारमाझफ कुटुंबाचा परिचय घडतो. मीत्त्या, इवान आणि अनौरस स्मिर्द्याखफ या भावंडांना वडिलांविषयी वाटणाऱ्या तिटकाऱ्याचे दर्शन घडते. सात्त्विक आणि धार्मिक भाऊ आल्योशा व मरण पावणारे धर्मगुरु झसीमफ यांचे उदात्त संबंध हेलावून टाकणारे आहेत. ग्रूशिका या सौंदर्यवतीमुळे निर्माण झालेली फ्योदर पावलोविच व मीत्त्या या पिता-पुत्रातील तेढ कडवट होत जाते.

प्रस्तुतच्या दुसऱ्या खंडात वडिलांचा प्रत्यक्ष खून, मीत्त्याला अटक व कोर्टातील खटला हे कथाभाग येतात. खून स्मिर्द्याखफने केला असेही दिसत असले तरी अनेक पुराव्यांच्या आधारे कोर्टात मीत्त्या खुनी ठरतो आणि त्याची रवानगी सैबेरियातील एका तुरुंगात होते. मीत्त्या गुन्हेगार ठरला असला तरी ग्रूशिका आणि ओल्योशा त्याला ठामपणे निर्दोष समजतात, त्याला प्रेमाची ग्वाही देतात आणि त्याचे जीवन उजळून टाकतात.

नाट्यमय प्रसंग, असामान्य व्यक्तिरेखा, भारून टाकणारे वातावरण, अर्थवाही वाद-संवाद, सखोल जीवनदर्शन आणि जीवन-भाष्य या साऱ्यांमुळे दस्तयेवस्कीची ही कादंबरी आधुनिक विश्वसाहित्यात फार महत्त्वाची ठरली आहे. तिचा हा संपूर्ण, मराठी अनुवाद वाचकांना वाचनीय आणि संग्राह्य न वाटेल तरच नवल !